# गोष्टींच्या गुहेत

संपादक

मंगला वरखेडे

साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य

अक्षरबालवाङ्मय – ४

# गोष्टींच्या गुहेत

संपादक

## मंगला वरखेडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव :** अक्षर बालवाङ्मय भाग - ४
गोष्टीच्या गुहेत

➢ **संपादक :** मंगला वरखेडे

➢ **प्रथमावृत्ती : २०१९**

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ **© प्रकाशकाधीन**

➢ **मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत : रु. १३६९**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे मनोगत

२१व्या शतकातील नवा अध्ययनशील समाज घडविण्यासाठी बालपणापासूनच मुलांची वाचनाभिरूची संस्कारित करण्याची गरज आहे. मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे आजकाल फार मोठ्या प्रमाणावर बालसाहित्य निर्माण होत असले, तरी त्यातून कोणते साहित्य निवडावयाचे याविषयी मुलांना आणि पालकांना योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही. हे लक्षात घेऊन निरनिराळ्या भाषेतील काही निवडक पुस्तके मुलांच्या वाचनात असावीत, या उद्देशाने 'अक्षरबालवाङ्मय' प्रकल्पाची योजना आखण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत मराठीतील बालसाहित्याबरोबरच इतर भारतीय व विदेशी भाषांमधील अभिजात साहित्याची निवडक पुस्तके मराठीत भाषांतरित करून प्रकाशित करण्याची योजना आहे. या पुस्तकांमध्ये कथा, कविता, नाटक, कादंबरी अशा ललित वाङ्मयप्रकारांबरोबरच विज्ञान-तंत्रज्ञान, इतिहास, सामाजिक शास्त्रे व सामान्य ज्ञानाविषयीच्या पुस्तकांचाही समावेश करण्यात आला आहे.

मराठी भाषेत मुद्रित बालवाङ्मयाची परंपरा १५० हून अधिक वर्षांची आहे. १९व्या शतकात ब्रिटिश राजवट सुरू झाल्यानंतर महाराष्ट्रात मुद्रणालये स्थापन झालीत व तेथपासून मराठी भाषेत मुद्रित साहित्याची परंपरा सुरू झाली. तत्पूर्वी आपल्याकडे हस्तलिखित पुस्तकांची निर्मिती होत असे; परंतु अशा पुस्तकांच्या बहुप्रती करून वितरित करण्यात अनंत अडचणी असल्याने वाङ्मयाचा सार्वत्रिक प्रसार होऊ शकला नाही. मुद्रणक्रांतीमुळे मराठीत निरनिराळे साहित्य प्रकार अस्तित्वात आले. बालसाहित्याचे नवे आविष्कारही याच काळात पुढे आलेत. प्रारंभीच्या काळात संस्कृत व इंग्रजी भाषेतील बालसाहित्याची मोठ्या प्रमाणावर भाषांतरे करण्यात आली. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाबरोबरच मुलांसाठी मुबलक प्रमाणात वाचन साहित्य तयार करण्याची गरज निर्माण झाली. त्यानुसार वेळोवेळी महाराष्ट्रातील ब्रिटिश

आमदानीतील व स्वतंत्र भारतातील शिक्षण खात्याने पुढाकार घेऊन मुलांसाठी वाचनपाठमाला संपादित केल्या. इतर अनेक खाजगी प्रकाशन संस्थांनी मुलांसाठी नवीन साहित्य प्रकाशित केले. पुढे यथावकाश स्वतंत्र बालसाहित्यही लिहिले जाऊ लागले. गेल्या २०० वर्षांतील बालसाहित्याचा हा समग्र पट लक्षात यावा या हेतूने काही प्रातिनिधिक बालसाहित्य पुनर्मुद्रित करण्याची कल्पना पुढे आली. त्यातूनच 'अक्षरबालवाङ्मय प्रकल्प' साकार झाला. मराठी भाषिक मुले, शिक्षक आणि पालक या सर्वांना निवडक बालसाहित्य सहज उपलब्ध व्हावे या हेतूने हा प्रकल्प साहित्य संस्कृती मंडळाने हाती घेतला आहे.

मराठी भाषेचे वळण निरनिराळ्या कालखंडात कसे बदलत गेले आहे, याचा मागोवा घेण्यासाठी, तसेच बालसाहित्याच्या आशयाचा परिघ कसा विस्तारत गेला याचे विहंगमावलोकन करण्यासाठी प्रस्तुत प्रकल्पातील पुनःप्रकाशित करण्यात येणाऱ्या पुस्तकांचा उपयोग होईल. मराठी भाषेच्या संशोधकांना व पाठ्यपुस्तकनिर्मिती करणाऱ्या संपादकांनाही या प्रकल्पाचा उपयोग होईल, असा विश्वास आहे.

सुजाण मराठी पालक व शिक्षकांनी ही ग्रंथसंपदा आपल्या शाळांतून, वाचनालयांतून आणि घरोघरीच्या ग्रंथसंग्रहातून मुलांना उपलब्ध करून द्यावी, ही विनंती.

**सदानंद मोरे**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रस्तावना | ०७ |
| १. पौराणिक गोष्टी | ३५ |
| २. स्पष्टीकरण कथा | १९३ |
| ३. सृष्टिकथा | २५३ |
| ४. पशु-पक्ष्यांच्या गोष्टी | ३०१ |
| ५. परिकथा व अद्‌भुतरम्य गोष्टी | ५२१ |
| ६. चातुर्यकथा | ६५९ |
| ७. राजाराणीच्या गोष्टी | ६८७ |
| ८. मनुष्य स्वभावाच्या गोष्टी | ८९१ |
| ९. संकीर्ण कथा | १०४३ |
| १०. संदर्भ सूची | १११५ |

# प्रस्तावना

मुलांना गोष्ट ऐकायला आवडते, गोष्टीतल्या कल्पित आणि अद्‌भुतरम्य सृष्टीत ते रमतात. फार पूर्वीपासून लोककथांच्या माध्यमांतूनच मुलांचे भावनिक, बौद्धिक व सामाजिक पोषण होत आले आहे. मुले दोन-तीन वर्षांची झाल्यानंतर त्यांना झोपविण्यासाठी गोष्ट सांगण्याची प्रथा जगातल्या जवळपास सर्वच संस्कृतीत आढळते. पाश्चिमात्य संस्कृतीत *'बेडटाईम स्टोरी'* सांगण्याची प्रथा आहे; तशी ती मराठी संस्कृतीतही आहे. पाळण्यातल्या मुलांना झोपविण्यासाठी अंगाईगीते म्हटली जात, तशी मराठी कुटुंबात मुलांना घास भरवतांना आईने गोष्ट सांगण्याची प्रथा होती. एक घास चिऊचा, एक घास काऊचा करीत पुढे सरकणारी 'कावळ्या-चिमण्याची गोष्ट' ही या अर्थाने मराठीतीली पहिली बालकथा म्हणायला हवी. या बालकथांच्या माध्यमांतूनच बालपणात मुलांचे बौद्धिक व भावनिक भरण-पोषण होत असते; मुलांच्या विचारप्रक्रियेवर प्रभाव टाकणाऱ्या मूल्यसंस्कारांचा कोश अशा कथावाङ्‌मयातूनच संस्कारित होत असतो.

जगभरातल्या सर्व भाषांत फार प्राचीन काळापासून गोष्टी सांगण्याची परंपरा चालू आहे. रात्री शेकोटीभोवती बसून लोक एकमेकांना पशू-पक्ष्यांच्या, चंद्र-ताऱ्यांच्या, गुराखी-शिकारी यांच्या गोष्टी सांगत असत. कुटुंबसंस्था अस्तित्वात आल्यावर आजोबा-आजी नातवंडांना गोष्टी सांगून झोपवत; अंगाई गीतांतूनही गोष्ट रचून आई मुलांचे मन रिझवीत असे. या

कथनपरंपरेतूनच लोकसंस्कृतीचा पाया रचला जात असे. महाराष्ट्राचे लोकजीवनही त्याला अपवाद नाही. मराठी समाजजीवनात कथा कीर्तनांना महत्त्वाचे स्थान होते. गावात भागवत सप्ताह होत असत. घराघरात हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप या ग्रंथांची व पोथ्यापुराणांची पारायणे चालत. श्रावण महिन्यात व्रतवैकल्यांचा भाग म्हणून रोज एक 'कहाणी' सांगण्याची प्रथा स्त्रियांमध्ये प्रचलीत होती. रामायण, महाभारतादि महाकाव्ये, हरिविजय, पांडवप्रताप यासारखे पौराणिक वाङ्मय; वारकरी, महानुभाव, नाथ, लिंगायत इत्यादी पंथांचे सांप्रदायिक वाङ्मय; बौद्धांच्या जातककथा, जैनांच्या चूर्णिका इत्यादी धार्मिक वाङ्मयाचे कुटुंबात आणि मंदिर-मठांत नित्यनेमाने मननपठण होत असे. या धार्मिक प्रथा-परंपरांतून पालकांना गोष्टींचा खजिना प्राप्त होत असे. पंचतंत्र, हितोपदेश, कथासरित्सागर, दृष्टांतपाठ, इत्यादी ग्रंथांतूनही गोष्टींचे एक सामाजिक संचित प्रत्येक पिढीकडे संक्रांत होत असे. मुलांना गोष्टी सांगण्यासाठी या सामूहिक संचिताचा प्रामुख्याने वापर होत असे. प्रत्येक स्त्री स्वत:कडे अशा कथा-गोष्टींचा साठा जतन करून ठेवीत असे. बालकांना सांगण्यासाठी तिच्याकडे कधीच गोष्टींचा तुटवडा पडत नसे.

मौखिक परंपरेतील हे बालवाङ्मय प्रामुख्याने परिसरलक्ष्यी असे. पूर्वीच्या ग्रामरचनेतील गावाभोवती बांधलेले कोट, देवळे, नदी, पाणवठे, आखर-अंगण, घरे, हवेल्या, वाडे, गोठे, परसदार अशा परिसरातील भौतिक वस्तूमात्रांशी आणि झाडे, पक्षी, पाने, फुले, गायी-म्हशी, सूर्योदय-सूर्यास्त अशा पर्यावरणीय घटितांशी नाते जोडीत या स्त्रिया किंवा घरातली ज्येष्ठ माणसे मुलांना गोष्टी सांगत असत. गोष्टींच्या अशा कथनलयींच्या तालावर, परिसराशी मैत्र जोडत मुलांचे "बालपण" संस्कारित होत असे. त्यामुळे मराठी भाषिकांच्या एकूण सांस्कृतिक जीवनातच 'कहाणी' किंवा 'गोष्ट" या कथनप्रकाराला अंगभूत स्थान प्राप्त झालेले आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्रात जिजाई शिवबांना झोपवताना रामायण-महाभारतातल्या गोष्टी सांगत असल्याचा इतिहास या दृष्टीने पुरेसा बोलका आहे. मुलांच्या डोळ्यांवर झापड येईपर्यंत गोष्ट सांगायची असल्याने या गोष्टींचा आकार मोठा असायचा. 'कापूस कोंड्याची गोष्ट" ही

कधीच न संपणारी गोष्ट कदाचित याच वर्गातली असणार. अर्थात मुलांसमोर नमुनादर्श ठेवण्यासाठी पुराणपुरुषांच्या चरित्रकथांना प्राधान्यक्रम असायचा. कथानकांत पौराणिक वाङ्मयातले कथाबंध, पंचतंत्र-हितोपदेशांतील प्राणिकथा, महानुभावांच्या दृष्टांतकथा, बौद्धांच्या जातककथा, जैनांच्या चूर्णिका, संतांच्या चरित्रकथा आणि इतिहासातील वीरगाथा अशा विविध प्रकारचे पूर्वसंचित उपयोगात येत असे. त्यात पौराणिक कथाबंध विशेष लोकप्रिय होते. 'कृष्णा'चा कथाबंध हा त्यातल्या त्यात जास्त लोकप्रिय होता. मुलांसाठी जत्रेत हमखास कृष्णछाप जरीची टोपी, वेळूची बासरी, मोराचे पीस खरेदी केले जाई. मुलांच्या पोषाखात, दागिने व अलंकारात आणि गोष्टींच्या कथानकांतही कृष्णाच्या चरित्रकथेतील बाळलीळांचा प्रभाव असायचा. मौखिक कहाण्यांमध्ये कृष्णाच्या दही-दूध चोरण्याच्या बाळक्रीडा, गोपाळांबरोबरची कृष्णाची मैत्री, कालियामर्दनची शौर्यकथा, श्रीमंतीपेक्षा मैत्रीचे मूल्य जपणारे सुदाम्याचे पोहे, इत्यादी कथांची आवर्तने चालत. महाभारतातील भीमाची शौर्यगाथा, अर्जुनाची धनुर्विद्या, इ. कथांना मौखिक लोककथांमध्ये प्राधान्य मिळत असे. संतांच्या चरित्रांतील ज्ञानदेव, निवृत्ती, मुक्ताबाई या भावंडांच्या कथा, वाळवंतात चटके बसणाऱ्या अंत्यजाचे पोर कडेवर घेणाऱ्या आणि तहानलेल्या गाढवाला पाणी पाजणाऱ्या संत एकनाथांच्या कथा; भक्त प्रल्हादाची देवावरची अढळ निष्ठा, गुरुदक्षिणा म्हणून अंगठा कापून देणाऱ्या एकलव्याची गुरुनिष्ठा, अंध मात्यापित्यांची सेवा करणाऱ्या श्रावणबाळाची मातृ-पितृभक्तीची गोष्ट अशा कथांतून नैतिक संस्कारांचे धडे दिले जायचे. महानुभावांच्या दृष्टांतपाठातील एक हत्ती आणि सात आंधळे अशा प्रकारच्या कथांमधून जीवनाकडे पाहाण्याची सम्यक दृष्टी प्रदान केली जात असे. पंचोपाख्यान, हितोपदेशांतील प्राणिकथांतून बुद्धीपेक्षा चातुर्य, शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ, सज्जनांचा विजय आणि दुर्जनांचा पराजय अशा सूत्रकथा ऐकवल्या जात. हुषार कोल्हा, लबाड लांडगा, साळिंदराचे अंगावरच्या काट्यांचा शत्रूवर मात करण्यासाठी उपयोग करण्याचे शहाणपण, अशा अनेक प्राणिकथा मुलांचे रंजन आणि उद्बोधन करीत असत. रामलीला,

भोवाडा, चित्रकथी, दशावतार, गण-गौळणी-भारुडे इत्यादी स्वरूपात पारंपरिक लोकरंगभूमीही क्रियाशील होती. तत्कालीन बालकांच्या मनोरंजनाचे तेही एक महत्त्वाचे माध्यम होते. मुलांच्या अभिरुचीवर या सांस्कृतिक पर्यावरणाचा गडद प्रभाव असायचा. मराठी मुलांची वाचनसंस्कृती घडविण्यात आणि मूल्यसंकारांची पायाभरणी करण्यात या मौखिक वाङ्मयप्रकारांचा महत्त्वाचा वाटा होता. पुढे मुद्रणयुगात रंजन-बोधाची साधने विस्तारली तरी हा सांस्कृतिक वारसा कायम राहिलेला दिसतो. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात मुलांसाठी लेखन करणारे वासुदेव गोविंद आपटे यांनी आपल्या बालपणीचा अनुभव नोंदवताना म्हटले होते की, "लोककथा हे लहान मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचे प्रधान अंग आहे. .. भुताखेतांच्या अनेक अद्भुत कथा परंपरेने लहाणपणी मुलांना ऐकायला मिळतात. .. आम्ही आमच्या बाळपणी रोज संध्याकाळी अशा प्रकारच्या गोष्टी ऐकण्यांत तासचे तास घालवीत असू". बालशिक्षणाचा हा पायाभूत सांस्कृतिक वारसा जगभरात जोपासला गेला आहे; त्याचा एक धावता आढावा घेऊ या.

**लोककथांची जागतिक व्याप्ती :**

जागतिक पातळीवर लोककथा संकलनाचे प्रयत्न फार पूर्वीपासून सुरू होते. १२ व्या शतकात सेमुंड या धर्मोपदेशकाने नॉर्वेच्या लोककथा संकलीत केल्या; डॅनिश इतिहासकार सॅक्सो याने दंतकथा, लोककथा व अद्भुतकथांचे संकलन मेले. व्हिक्टर रिडबर्ग याने स्कॅन्डेनेव्हियन या बर्फाच्छादित प्रदेशातील 'सागा' म्हणजे वंशकथा संकलित केल्या. लोककथांचे शास्त्रीय पद्धतीने संकलन-संपादन करण्याचे श्रेय सर्वप्रथम जर्मनीतील भाषावैज्ञानिक आणि लोकसाहित्याचे अभ्यासक जेकब लुडविग कार्ल ग्रिम व विल्यम कार्ल ग्रिम या दोन अभ्यासकांना दिले जाते. ग्रीम बंधूंनी जर्मनीतील विविध भागांत हिंडून पारंपरिक लोककथांचे (folk-tales) संकलन केले. शेतकरी, कामगार, आजोबा, आजी यांच्याकडून ऐकलेल्या कहाण्या त्यांनी त्यांच्याच भाषेत शब्दबद्ध केल्या. या मौखिक लोककथांचे संकलन १८१२ व १८१५ साली दोन खंडात 'नर्सरी ॲण्ड हाऊसहोल्ड टेल्स' या नावाने प्रसिद्ध झाले.

बालकांच्या व कौटुंबिक संबंधांच्या या कथा ऐकताना परिसरातली मुलेही गोळा होत; ग्रीम बंधूंना या मुलांच्या प्रतिसादांचेही निरीक्षण करता आले. पशू-पक्ष्यांच्या लीळा, वादळे, तुफानातली संकटे व साहसाचे प्रसंग, मिश्किल विनोद आणि करुणरसाने भरलेले प्रसंग, राजा-राणी; पऱ्या-राक्षसांचे अनोखे अनुभवविश्व, कथेतील पात्रांचे चातुर्य आणि मुर्खपणाच्या करामती यामुळे मुले कथानुभवाशी एकाग्र होत व कथेतील पात्रसृष्टीशी समरस होत. लोककथांमध्ये मुलांना रिझवण्याची फार मोठी क्षमता असते, हे ग्रीम बंधूंच्या लक्षात आले. त्यांनी संपादित केलेल्या या लोककथा *'ग्रीम बंधूंच्या कथा'* या नावाने जगभर लोकप्रिय झाल्या. ग्रीम बंधूंनंतर जगभरात लोककथा संकलनाच्या कामाला गती मिळाली. रशियन लोककथांच्या संकलनात रॉल्स्टन, डॅसेंट या लेखकांचा पुढाकार होता; क्रोकर, लव्हर, वाइल्ड यांनी आयर्लंडच्या लोककथांचा संग्रह केला. आफ्रिकेतल्या जंगली मानवजातीच्या लोककथाही संकलित झाल्या. अगदी अलीकडे अरुण प्रभुणे यांनी अमेरिकेतील संशोधकांच्या मदतीने उत्तरध्रुवावरील लोककथा संकलित करून त्याचे मराठी भाषांतरही उपलब्ध करून दिले आहे.

**भारतीय लोककथासंकलन**

भारतात इंग्रजी अमदानीत ब्रिटिश अभ्यासकांनी १९ व्या शतकात लोककथा संकलनाच्या कामाला सुरुवात केली. रिचर्ड टेंपलने पंजाबच्या लोककथा संकलित केल्या; उत्तरभारतातल्या लोककथांचे संकलन विल्यम क्रूक या लेखकाने केले; दक्षिणेतल्या लोककथा संकलनाचे काम थर्स्टन यांनी, बंगालच्या लोककथांचे संकलन जी. एच डेमेंट व लाल बिहारी डे यांनी, राजस्थानच्या लोककथांचे संकलन कर्नल टॉड यांनी केले. महाराष्ट्रातील लोककथा संकलनाचे काम मेरी फ्रेरे आणि जॅक्सन यांनी केले. १८६८ साली मेरी फ्रेरे यांचे Old Deccan Days हे लोककथांचे पुस्तक प्रसिद्ध झाले. जॅक्सन यांनी Indian Antiquary या मासिकातून महाराष्ट्रातील लोककथांविषयीची टिपणे प्रसिद्ध केली. मॅक्सम्युलरने भारतातील दैवतकथाशास्त्राचा अभ्यास करून भारतीय लोकमानसातील लोकपरंपरेने

आलेल्या लोककथांच्या तौलनिक अभ्यासाचे क्षेत्र खुले केले. १८४४ साली त्यांनी हितोपदेशाचे जर्मनीत भाषांतर केले. १८९५ साली 'Science of Mythology' हे दैवतकथाशास्त्राचे पुस्तक प्रसिद्ध केले. १८५९ साली थिओडेर बेनेफे याने 'पंचतंत्रा'चे भाषांतर केले. इमॅन्यूएल कॉसकिन ह्या फ्रेंच अभ्यासकाने बौद्धकथा या जागतिक मूलकथा असून भारतातून त्या जगभरात पोहचल्या असा सिद्धांत मांडला. जगभरातल्या लोककथांमध्ये साम्य आढळते; कारण या कथा प्रवाशांनी, धर्मप्रसारकांनी निरनिराळ्या देशांत पोहचविल्या. त्यामुळे लोककथा या 'भ्रमणकथा' असतात, असे म्हटले जाते.

**मराठी लोककथा संकलन :**

मराठीत 'हत्तीच्या गोष्टी' हे प्राण्यांवरचे पहिले पुस्तक १८५३ मध्ये कोंडो अमृत महाराव यांनी लिहिले.१८७१ साली 'ब्युटी ॲण्ड बिस्ट' या गोष्टीचे 'सुंदरी आणि अस्वल' हे भाषांतर प्रसिद्ध झाले. १९ व्या शतकात प्राथमिक शाळेसाठी तयार करण्यात आलेल्या पाठ्यपुस्तकांतून कांही लोककथा संपादित झाल्या. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन-तीन दशकांत मराठी लोककथा संकलनाच्या कामाला प्रारंभ केला. 'आदित्य राणूबाईची कथा', 'ऋषिपंचमीची कथा' ह्या व्रतकथांचे संकलन केले. 'हातग्याचा भोंडला', 'सूर्यकहाणी व सूर्यव्रत' अशा लेखांतून त्यांनी लोककथांची चर्चा सुरू केली. *'लोककथा'* ही पारिभाषिक संज्ञा रूढ करण्याचे श्रेयही राजवाड्यांकडेच जाते. 'ज्ञानेश्वरीतील निवडक नीतिकथां'चेही त्यांनी संपादन केले. राजारामशास्त्री भागवत यांनी १८८५ साली लोककथांत येणाऱ्या यक्ष, किन्नर, गंधर्व, विद्याधर या पात्रांची चर्चा केली. १९११ साली कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी 'अरेबियन नाईटस'च्या कथा भाषांतरित केल्या. १९१६ साली विष्णु धों. कर्वे यांनी 'लहान मुलांकरिता गोष्टी' या पुस्तकातून ग्रीम बंधूंच्या लोककथा व हॅन्स अण्डरसनच्या काही गोष्टींचे मराठी रूपांतर केले. १९२७ साली म. का. कारखानीस यांनी 'अद्‌भुतकथा' नामक अनुवादित कथांचे तीन भाग प्रसिद्ध केले. त्यातही ग्रीम बंधूंच्या लोककथा होत्या. सिंड्रेला, डकलिंगच्या कथा

होत्या. शंकर गणेश दाते यांनी १९२९-३० साली 'लोककथा' नामक दोन पुस्तके प्रसिद्ध करून याप्रकारच्या संकलनाचे महत्त्व आधोरेखीत केले. सदाशिव काशिनाथ छत्रे, राजारामशास्त्री भागवत, विष्णूशास्त्री चिपळूणकर, म. मो. कुंटे, ना. गो. चापेकर, काका कालेलकर, वामनराव चोरघडे, साने गुरुजी, दुर्गा भागवत, कमलाबाई देशपांडे, अनुसया लिमये, ना. रा. शेंडे, दा. गो. बोरसे, डॉ. नांदापूरकर, डॉ. सरोजिनी बाबर, मालतीबाई दांडेकर, मधुकर वाकोडे इत्यादी लेखकांनी लोककथांचे संकलन केले. सरोजिनी बाबर यांनी तर महाराष्ट्र सरकारच्या वतीने गावोगावीच्या लोककथांचे फार मोठ्या प्रमाणावर संकलन केले. दुर्गा भागवतांनी पंजाब, तामिळनाडू इत्यादी प्रांतोप्रांतीच्या लोककथांचे संकलन-संपादन केले. वि.वा. जोशी यांनी 'चंद्रपुरी लोककथां'चे व खानदेशातील लोककथांचे संकलन दा. गो. बोरसे, भा. रं. कुलकर्णी, कृष्णा पाटील, रमेश सूर्यवंशी, सुधीर कोठावदे, सुनंदा पाटील यांनी केले. कोकणातील लोककथांचे संकलन प्र. श्री. नेरूरकर, नीलकंठ विठ्ठल नाईक, उदय खानोलकर, ना. बा. रणसिंग, मोहन रणसिंग, गोविंद गारे, यांनी केले. ना. रा. शेंडे, शैलजा देवगावकर, विठ्ठल वाघ, मधुकर वाकोडे, भाऊ मांडवकर यांनी विदर्भातील लोककथांचे संकलन केले. प्रभाकर मांडे, रा. चिं. ढेरे, गुंथर सोंथायमर इत्यादी अभ्यासकांनी लोककथांच्या अभ्यासाच्या दिशा विस्तारित केल्या. देशविदेशाच्या लोककथांना मराठी साज चढवून रूपांतरे करण्याचा प्रयोग साने गुरुजींपासून मालतीबाई दांडेकरांपर्यंत अनेक लेखकांनी केले. त्यामुळे मराठीत आज जगभरातील लोककथा उपलब्ध झाल्या आहेत. या लोककथांची सामुग्री वापरून मुलांसाठी स्वतंत्रपणे कथा-कादंबऱ्या लिहिण्याचेही प्रयोग झाले आहेत.

**मराठी लोककथांचा ग्रांथिक वारसा :**

भारतीय लोककथांची मुळे इथल्या सांस्कृतिक परंपरेत लोकप्रिय झालेल्या वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत यांसारख्या बीजग्रंथांमध्ये आढळून येतात. गुणाढ्याचे 'बृहत्कथा', सोमदेवाचे 'कथासरित्सागर', 'कथासरित्सागर'मधूनच विस्तारलेले 'वेताळपंचविशी' आणि

'सिंहासनबत्तीशी', तसेच पंडित विष्णुशर्माचे 'पंचतंत्र' हे ग्रंथ म्हणजे मराठी कथांची गंगोत्री समजले जातात. या कथा भारतभर निरनिराळ्या भाषांमध्ये पसरल्या आहेत. या पारंपरिक ग्रंथांतील कांही निवडक कथा प्रस्तुत खंडासाठी निवडण्यात आल्या आहेत. अशा या बीजग्रंथांचा एक धावता परिचय करून घेऊ या.

**१.वेद-उपनिषदे :** वेद-उपनिषदे या प्राचीन ग्रंथांचा भारतीय लोकजीवनावर गडद प्रभाव आहे. वसिष्ठ, विश्वामित्र, कण्व, पाराशर, याज्ञवल्क्य या प्राचीन ऋषी-मुनींनी सांगितलेल्या वेद उपनिषदांतल्या कथा मौखिक लोकवाङ्मयातून रूपांतरित होऊन निरनिराळ्या स्थानिक भाषांतून आपापल्या पद्धतीने कथन केल्या गेल्या. त्यामुळे अनेक लोककथांमध्ये वेद-उपनिषदांतल्या बीजकथांचे संस्कारित आविष्कार पहायला मिळतात. उदाहरणार्थ, उपनिषदातील नचिकेताच्या गोष्टीचे अनेक प्रकारांनी पुन:कथन झालेले आविष्कार भारतीय भाषांमध्ये आढळतात. ऋग्वेदातील वसिष्ठ-विश्वामित्राच्या कथा, शतपथ ब्राह्मणातील पुरुरवा-उर्वशीची कथा, लोकजीवनात रूजल्या आहेत.

**२.रामायण-महाभारत व पुराणकथा:** वाल्मिकीचे 'रामायण' आणि व्यासांचे 'महाभारत' ही दोन्ही महाकाव्ये आणि अग्नीपुराण, वायुपुराण, मत्स्यपुराण, गरुडपुराण, नारद पुराण व भागवतादि पुराणे सर्व भारतीय भाषांच्या लोकवाङ्मयीन परंपरेत मुरलेली आहेत. लोकरामायणाच्या कितीतरी कथा भिलोरी, बंजारा, कातकरी, कोकणी, अहिराणी बोलीतल्या लोककथांमध्ये आजही कथन केल्या जातात. राम-लक्ष्मण आणि सीतेच्या चौदा वर्षांच्या वनवासाच्या कथा, दंडकारण्यातल्या प्रवासात शबरी भिल्लीणीची उष्टी बोरे आवडीने खाणारा राम,पुतनामावशीचे कपटकारस्थान, रावणाने सुवर्णमृगाच्या रूपात सीतेला पाडलेली भुरळ, जटायु व हनुमान यांनी रामभक्तीपोटी केलेली साहसी कृत्ये, राम, भरत, कृष्ण आणि बलराम यांचे बंधूप्रेम, कौसल्या आणि कैकयी यांचा सापत्नभाव, राम-रावण युद्ध, मारुतीचे लंकादहन, वानरांचे सेतुबंधन अशा कितीतरी कथा मुलांनी बालपणीच

ऐकलेल्या असतात. महाभारतातले पाच पांडव, त्यांचा वनवास, कौरव-पांडव युद्ध, अभिमन्यूचा चक्रव्यूह भेदण्याचा प्रसंग, शरपंजरी पडलेला भीष्म, अर्जुनाचे सारथ्य करणारा कृष्ण, गोपाळांबरोबर विटीदांडू खेळणारा कृष्ण, यमुनेच्या डोहात कालियामर्दन करणारा कृष्ण आणि बालपणीचा मित्र कृष्ण याला पोह्यांची पुरचंडी भेट देणारा सुदामा अशा कितीतरी गोष्टींनी भारतीय मुलांचे बालमन संस्कारित झालेले असते. रामायण -महाभारत आणि भागवत पुराणांतील अशा कांही निवडक गोष्टी या खंडात संकलित केल्या आहेत.

पुराणकथेमध्ये हकिगत किंवा वृत्तांत असतो; मात्र त्याला सत्याचा आधार नसतो. त्यातली सगळीच पात्रे मानवी नसतात. देवदेवता, राक्षस, भुत-पिशाच्च अशी अमानवी पात्रे असतात. चमत्कार आणि अद्‌भुतरम्यतेचा मसाला ठासून भरलेला असतो. उदाहरणार्थ, मळापासून (मातीपासून) गणपती निर्माण झाला, धडापासून मुंडके वेगळे केलेल्या पार्वतीपुत्राला हत्तीचे तोंड बसवले आणि त्याचा गणपती झाला. केवळ भारतीय पुराणातच अशा गोष्टी असतात, असे नाही. बॅबिलोनियातही अशीच कथा आहे. आदिदेवाने आपले मुंडके धडापासून वेगळे केले. त्यातून वाहणाऱ्या रक्तात इतर देवांनी माती कालवली आणि त्यातून मनुष्य व इतर प्राण्यांची निर्मिती झाली. मातीपासून मानव निर्माण झाल्याची अशी कथा बायबलमध्येही आहे. पुराणकथेतील ही पात्रे अतिमानवी असल्याने त्यांचे वर्तनही तसेच असामान्य असते. उदाहरणार्थ, गाडाभर अन्न खाणारा बकासुर राक्षस, सहा महिने झोपणारा कुंभकर्ण, बोराच्या अळीत वास्तव्य करणारा नाग, पर्वतांच्या झऱ्यांसाठी जमीन खणून जलमार्ग तयार करणारा इंद्र, राक्षसांनी चोरलेल्या गायी परत आणणारा इंद्र, तांडवनृत्य करणारा महादेव, लाकडातून प्रकट होणारा प्रल्हाद, अशा चमत्कृतीजन्य गोष्टी रंजक असतात आणि त्यामुळे वाचनाची गोडीही लागते.

मुलांना भारतीय संस्कृतीचा परिचय होण्यासाठीही या पुराणकथांचा नक्की उपयोग होईल. यादृष्टीने वा. गो. आपटे यांनी मुलांसाठी बालभागवत, बालरामायण, बालगीता अशा पुस्तकांची निर्मिती केली आहे; के. ना. वाटवे

यांनी दहा भागांत भागवतातील कथांचे रूपांतर केले आहे.अमरेंद्र गाडगीळ यांनी बारा पुस्तकांतून देवादिकांच्या गोष्टी सांगितल्या आहेत. वि. कृ. श्रोत्रिय यांनी वेद-उपनिषदांतील कथा 'वेदांतील गोष्टी' या नावाने सुलभ भाषेत कथन केल्या आहेत. दा. न. शिखरे यांनी 'पुराणातील कथा' ह्या पुस्तकांतूनही वेदांतल्या गोष्टींचे पुन:कथन केले आहे.पं. महादेवशास्त्री जोशी यांनी मुलांसाठी 'प्राचीन सुरस गोष्टी' नामक दहा पौराणिक कथांची माला प्रसिद्ध केली आहे. जिज्ञासू वाचकांनी ही पुस्तकेही जरूर वाचली पाहिजेत.

**३.बृहत्कथा :** इ. स. च्या पहिल्या शतकात गुणाढ्याच्या 'बृहत्कथा' या ग्रंथाची निर्मिती झाली. बृहत्कथा म्हणजे दीर्घ कथा. गुणाढ्याने पैशाची भाषेत एक लाख श्लोक रचून या कथा सांगितल्या आहेत. पैशाची ही त्यावेळची लोकभाषा होती. या ग्रंथाची कालांतराने संस्कृत, प्राकृत व अन्य देशी भाषांत भाषांतरे, रूपांतरे होऊन या कथा भारताच्या अनेकविध प्रांतात पोहचल्या . क्षेमेंद्राने ११ व्या शतकात या ग्रंथाचा संस्कृतमध्ये 'बृहत्कथा मंजिरी' हा संक्षेपानुवाद केला; तो अधिक लोकप्रिय झाला होता. 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक कथां'मध्येही बृहत्कथेतील कथांचे अंश आळतात.

**४. कथासरित्सागर :** गुणाढ्याच्या 'बृहत्कथा' या मूळ पैशाची भाषेतील ग्रंथाच्या आधारे सोमदेव नावाच्या काश्मिरी पंडिताने 'कथासरित्सागर' हा ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिला. सोमदेवाने अनुवादलेला हा ग्रंथ श्लोकबद्ध आहे. काश्मिरचा राजा अनंतदेव याची पत्नी राणी सूर्यमती हिच्या मनोरंजनासाठी कथासरित्सागर ग्रंथाची रचना झाली असे म्हणतात. या ग्रंथाचा काळ अकराव्या शतकातला आहे. एका गोष्टीतून दुसरी गोष्ट याप्रमाणे साखळीकथांच्या स्वरूपात या गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत.

**५. वेताळपंचविशी:** गुणाढ्याच्या 'बृहत्कथा' या संग्रहातूनच 'वेताळपंचविशी' या ग्रंथाची रचना झाली आहे.वेताळाने सांगितलेल्या पंचवीस कथा ह्या ग्रंथात आहेत. शिवदास, वल्लभदास, जंभलदास यांनी 'वेतालपंचविंशतिका' या नावाने याचे संस्कृत भाषेत रूपांत केले. सदाशिव काशिनाथ छत्रे ह्यांनी १८३० साली ह्या कथा 'वेताळपंचविशी' ह्या नावाने

मराठीत आणल्या. विक्रम-वेताळाच्या कथा म्हणून त्या 'चांदोबा' मासिकांतून नित्यनेमाने क्रमश: प्रसिद्ध होत असल्याने या कथा देशभरातल्या मुलांच्या वाचनात आल्या. जर्मन, इटालियन भाषेतही याचे अनुवाद प्रसिद्ध झाले. मालिका कथेच्या स्वरूपात या कथा सादर झाल्या. विक्रमादित्य राजाला क्षांतिशील नावाचा एक कापालिक सतत बारा वर्षे रोज एक बिल्वफळ भेट देत असे. त्याने दिलेल्या प्रत्येक बिल्वफळात पाच मौल्यवान रत्ने असत. ते लक्षात आल्यावर राजाने कापालिकास बोलावून, 'तुझी इच्छा काय आहे?' असे विचारले. एक विशिष्ट विधी करण्यासाठी भाद्रपद मासाच्या कृष्णपक्षातील चतुर्दशीच्या काळोख्या रात्री शिसूच्या झाडावर टांगलेले प्रेत आपल्याला हवे आहे, असे तो सांगतो. राजा स्वतः ते प्रेत आणण्यास निघतो. हे प्रेत आणण्याचे काम पूर्णतः मौन पाळून करावयाचे असते. मात्र राजा तेथे पोहचण्याच्या आधीच त्या प्रेताचा ताबा वेताळाने घेतलेला असतो. ह्या प्रेताला सोडण्यासाठी वेताळ राजाला एक गोष्ट सांगतो आणि त्यानंतर त्या गोष्टीबाबत एक कूटप्रश्न विचारतो.हे प्रश्न अत्यंत मार्मिक असतात. तो राजाला अशा पंचवीस कथा सांगतो आणि त्या प्रश्नांची उत्तरे राजाकडून घेऊन प्रत्येक वेळी मौन पाळण्याची अट राजाला मोडायला लावतो. अशा पंचवीस अद्‌भुतरम्य कथांचा संच म्हणजे 'वेताळपंचविशी'.

**६. सिंहासनबत्तीशी :** वैजनाथशास्त्री पंडिताने मूळ संस्कृत कथासंग्रहाचे मराठी भाषांतर १८१४ साली केले. याही ग्रंथात राजा विक्रमादित्याच्या गोष्टी आहेत. विक्रमादित्याचे सिंहासन बत्तीस पुतळ्यांचे होते. प्रत्येक पुतळी करवी एक कथा ह्याप्रमाणे ३२ कथांचे निरुपण करण्यात आले आहे. या कथांचे स्वरूप चातुर्यकथांच्या धाटणीचे आहे. मागे लागलेल्या यमापासून राजा विक्रमादित्य गाईचे रक्षण कसे करतो व त्यामुळे त्याला स्वर्गीची कामधेनू कशी प्राप्त होते, यासारख्या या कथांच्या रचना आहेत.

**७. पंचतंत्र :** पंडित विष्णुशर्मा यांच्या 'पंचतंत्र' ग्रंथाचा महानुभाव पंथीयांनी मराठीत 'पंचोपाख्यान' या नावाने अनुवाद केला आहे. पंचतंत्र या ग्रंथाची निर्मितिकथा मजेदार आहे. सुमारे एक हजार वर्षांपूर्वी अमरशक्ती नामक राजा

राज्य करीत होता. त्याला वसुशक्ती, उग्रशक्ती आणि अनेकशक्ती अशी तीन मुलं होती. पण या राजपुत्रांना अभ्यासाची गोडी नव्हती; त्यामुळे ते शाळेत जायला तयार नसत. राजगृही शिक्षक ठेवला तर त्या शिक्षकाचेही ते ऐकत नसत. काहीही सांगितले तरी 'पालथ्या घड्यावर पाणी' अशी त्यांची स्थिती होती. राजाला ही निर्बुद्ध मुले पुढे आपला राजपाठ कसा चालवतील याची काळजी वाटे. एकदा राजाने मंत्रिमंडळातील सर्व सहकारी आणि राज्यातले सुमारे पाचशे पंडित यांची खास सभा बोलवून राजपुत्रांच्या शिक्षणाविषयी असलेल्या उदासीनतेचा प्रश्न कसा सोडवावा ह्याबाबत चर्चा केली. बऱ्याच पंडितांनी मुलांना स्मृतिग्रंथ, व्याकरण, कौटिल्याचे अर्थशास्त्र शिकवावे अशी शिफारस केली. पण ज्यांना शिकण्यातच गोडी नाही, ते ह्या ग्रंथांचे ग्रहण कसे करतील, ह्या प्रश्नाला उत्तर नव्हते. या सभेत सर्वविद्यापारंगत पंडित विष्णुशर्मा हजर होते. राजाने हा प्रश्न विष्णुशर्मा यांनी सोडवावा, असे त्यास साकडे घातले व बदल्यात शंभर गावांची गुरुदक्षिणा देऊ असे वचन दिले. विष्णुशर्माने राजाज्ञा प्रमाण मानली; मात्र आपण पेशाने शिक्षक आहोत व शिकवणे हा आपल्या कर्तव्याचा भाग असल्याने शंभर गावांची बिदागी नाकारून नम्रपणे राजपुत्रांना शिकविण्याचे काम स्वीकारले. मी विद्या विकणार नाही ('नाहं विद्याविक्रयं करोमि') हे पंडिताचे उत्तर ऐकून राजा संतुष्ट झाला. विष्णुशर्माने पांडित्य बाजूला ठेवून राजपुत्रांना व्यवहारज्ञान, नीतिबोध व राजशकट चालविण्यासाठी लागणारी बौद्धिक कौशल्ये शिकता येतील अशा गोष्टी सांगायला सुरुवात केली. या गोष्टी हंस, घुबड, कावळा, कोल्हा, मांजर अशा पशुपक्ष्यांच्या असल्या तरी रूपकात्मक भाषेतून मनुष्यस्वभावाचे व व्यवहारातील डावपेचांचे ज्ञान देणाऱ्या होत्या. ह्या मनोरंजक गोष्टीतूनच 'पंचतंत्र' ग्रंथाची निर्मिती झाली.

विष्णुशर्माने या ग्रंथात पाच तंत्रांचा वापर केला असल्याने त्यास 'पंचतंत्र' असे नाव दिले गेले. ही पाच तंत्रे अशी :

१.मित्रभेद : मित्रांमध्ये भेद निर्माण करण्याच्या युक्तीचे विशदीकरण

(उदाहरणार्थ, पिंगलक नावाचा सिंह आणि संजीवक नावाचा बैल यांच्या

मैत्रीत फूट पाडणाऱ्या कोल्ह्याची गोष्ट)

२.मित्रसंपत्ती : मित्र मिळविण्याच्या युक्तींचे विवरण

(उदाहरणार्थ, कपोतराज चित्रग्रीव, त्याचा मित्र मूषक हिरण्यक, हिरण्यकाची मैत्री संपादन करणारा कावळा लघुपतनक, त्याचा मित्र कासव मंथरक आणि शेवटी ह्यांना येऊन मिळणारा मृग चित्रांगद ह्यांच्या मैत्रीची कथा.)

३.काकोलूकीय : संधि-विग्रह

(उदाहरणार्थ, कपटनीतीच्या मार्गाने कावळा आणि घुबड यांच्यात निर्माण झालेल्या वैराची कथा)

४.लब्धप्रणाश : मिळालेले घालविणे

(उदाहरणार्थ, हाती आलेले वानर सुसराने कसे घालवले, त्याची कथा)

५.अपरीक्षित कारक : घाईने केलेली कृती

(उदाहरणार्थ, परिस्थिती नीट समजून न घेतल्याने पश्चातापाची वेळ येते हे सांगणारी ब्राह्मण व मुंगुस यांची गोष्ट.)

इसापच्या नीतिकथा आणि पंचतंत्रातल्या गोष्टींमध्येही सारखेपणाचा अनुबंध आहे. इसापच्या नीतिकथांना इंग्रजीत 'फेबल' म्हणतात. फेबल म्हणजे गुलामांनी कथन केलेल्या रूपकात्मक धाटणीतल्या प्राणिकथा.

(उदाहरणार्थ, कोल्ह्याला द्राक्षे आंबट ही कथा.) या कथा जगभरातल्या भाषांमध्ये तिथल्या स्थानिक संस्कृतीनुसार लोकभाषेत कथन केल्या गेल्या आहेत. म्हणूनच लोककथांना 'भ्रमणकथा' असेही म्हणतात.

**८. जातककथा :** जातक हा पाली भाषेतला ५४७ कथांचा धर्मग्रंथ आहे.या कथांचा काळ इ. स. पू. पाचव्या शतकापासून इ. स. ४३० पर्यंतचा मानला जातो. जातककथा म्हणजे जन्माच्या कथा. बौद्ध धर्मपरंपरेनुसार या बोधिसत्त्वाच्या पूर्वजन्मीच्या कथा आहेत.'बोधि' म्हणजे लोककल्याणाच्या तत्त्वाचे ज्ञान. त्या ज्ञानासाठी जो सतत प्रयत्न करतो तो बोधिसत्त्व. गौतम बुद्धाने बुद्ध जन्म घेण्यापूर्वी हत्ती, हरिण, वाघ, वृक्ष, व्यापारी, राजा, सैनिक असे निरनिराळे जन्म घेतले होते; त्या विविध जन्मातल्या त्याच्या अवतारांना

'बोधिसत्त्व' म्हणतात. या बोधिसत्त्वाने दान, शील, नैष्कर्म्य, प्रज्ञा, वीर्य, शांती, सत्य, अधिष्ठान, मैत्री व उपेक्षा ह्या दहा पारमितांच्या योगे लोकोद्धारासाठी जे सतत प्रयत्न केले त्याच्या हकिगती म्हणजे जातककथा. या हकिगती मनोरंजक व उद्‌बोधक आहेत. बौद्ध धर्माबरोबर या जातककथाही जगभर पसरल्या. अजिंठ्याच्या गुफांमध्ये शिबीजातक, शंखपाल जातक, महाजनक जातक, चांपेय जातक, विदुर पंडित जातक, षड्‌दन्त जातक, महाहंस जातक, महाकपिजातक, निग्रोधमृग जातक, मातृपोषक गजजातक, इत्यादी जातककथेवर आधारलेली चित्रे रंगवलेली आहेत. वेरुळच्या लेण्यांमध्ये जातककथांवर आधारलेली अनेक दगडी शिल्पे कोरलेली आहेत.साची, अमरावती आणि भरहूत स्तूपांवर जातककथांतील घटना-प्रसंगांची दृष्ये खोदली आहेत. जपान, इंडोनेशिया,थायलंड, चीन, ब्रम्हदेश (म्यानमार), अफगाणिस्तान इत्यादी देशांतील स्तुपांमधे जातककथेची चित्र-शिल्पे कोरलेली आहेत.

समाजाला गोष्टीरूपाने नैतिक मूल्यांचे धडे देणे हा जातककथांचा मुख्य हेतू आहे. फार पूर्वीपासून बालसाहित्यात जातककथांचे दालन उघडले गेले आहे. पंचतंत्र, कथासरित्सागर या आद्य कथासंग्रहांमध्ये सिंहाचे कातडे पांघरणारा गाढव, लांडगा आणि कोकरू, कावळा आणि कोल्हा अशा कांही जातककथांचा समावेश झालेला होता. १९२४ साली धर्मानंद कोसंबी यांनी 'ज्ञानाचा प्रसार हाच राष्ट्राच्या उद्धाराचा राजमार्ग आहे' या भूमिकेतून मुलांसाठी निवडक जातककथांचे मराठीत भाषांतर केले होते. बडोदे संस्थानात असताना महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणेने मराठीत फार मोठ्या प्रमाणावर वाचनसाहित्यनिर्मिती करण्याची चळवळ झाली; त्यात चिं. वि. जोशी यांनी निवडक जातककथांचे मराठी भाषांतर केले. अलीकडच्या काळात दुर्गा भागवत यांनी समग्र जातककथांचे भाषांतर केले; शिवाय खास मुलांसाठी 'बालजातक'ही लिहिले. सारांश, पंचतंत्र-कथासरित्सागर या प्राचीन कथाग्रंथांपासून अजिंठा-वेरूळच्या शिल्पांपर्यंत ज्या कथांचा संचार आहे अशा जनप्रिय संस्कृतीकथा मुलांच्या वाचनात असल्या पाहिजेत, या

भूमिकेतून नमुन्यादाखल काही निवडक जातककथा प्रस्तुत 'गोष्टींच्या गुहेत' या खंडासाठी निवडल्या आहेत.

जातक कथांची धाटणी लोककथांसारखीच आहे. त्यामुळे पं. महादेवशास्त्री जोशी यांनी म्हटले असावे की, "जातक वाङ्मय बुद्धाच्या पूर्वी लोककथांच्या स्वरूपात अस्तित्वात होते." दुर्गा भागवत यांनी 'जातककथां'चे महात्म्य फार थोड्या शब्दांत सांगितले आहे :

"जातक हा धर्मग्रंथ आहे. अतिशय मनोरंजक, बोधप्रद आणि व्यवहारचातुर्याने, त्याचप्रमाणे तत्त्वज्ञानाने भरलेला आहे. मुलांना कावळा, कोल्हा, तित्तिर वगैरेंच्या गोष्टी तो सांगतो. स्त्रियांना पातिव्रत्य शिकवतो. त्यांच्यातल्या उत्तम मुलीचा, पत्नीचा, माता व सुनेचा तो गौरव करतो आणि कुटील, दु:शील स्त्रियांचा धिक्कार करतो. तरुणांना तो व्यवहार-नीती शिकवतो. वृद्धांना शांतीचे व सहनशीलतेचे पाठ देतो. आपापल्या मर्यादा ओळखून स्थूल व्यवहारापलीकडे नजर टाकायला तो सगळ्यांना सांगतो. नर्म विनोद, उपरोध, कारुण्य आणि शहाणपणाने या कथा भरलेल्या आहेत." (दुर्गा भागवत, १९७१: सिद्धार्थ जातक, खंड १, प्रस्तावना, पृ. तीन)

**९. चूर्णी :** जैनांच्या धर्मकथांना 'चूर्णी' म्हणतात. जातककथांप्रमाणेच 'चूर्णि'कथांमध्ये प्राणिकथा व दंतकथांचा कल्पनाबंध असतो. धर्मशिक्षणाच्या उद्देशाने कथन केलेल्या या कथांमध्ये नीतिबोध केंद्रस्थानी असला तरी कथेचा घाट रंजनप्रधान लोककथेच्या वळणाचा आढळतो. लोककथांच्या जवळ जाणाऱ्या अशा कल्पनाबंधाच्या काही 'चूर्णी' कथा मुलांच्या वाचनाभिरुचीच्या विकासासाठी व त्यांचा सांस्कृतिक संदर्भकोश विस्तारण्यासाठी येथे निवडल्या आहेत.

**१०. दृष्टांत कथा :** मराठी वाङ्मयाच्या इतिहासात आद्य गद्य वाङ्मय महानुभाव साहित्यिकांनी निर्मिले आहे. 'लीळाचरित्र', 'स्मृतिस्थळ' या चरित्रग्रंथांतून आणि 'दृष्टांतपाठ', 'पंचोपाख्यान' या नीतिबोधात्मक ग्रंथातून मराठी कथेच्या जडणघडणीची प्रारंभकालीन रूपे आढळतात. कहाणी, लोककथा यांच्या रूपबंधाशी जवळीक साधणाऱ्या या कथा आहेत. शालेय

पाठ्यपुतकांतून बालवाचकांना त्यांचा अधूनमधून परिचय होत असतो. प्रत्येक मराठी मुलाने बालपणी ऐकलेली चिमणी-कावळ्याची गोष्ट महानुभावांच्या लीळाचरित्रात कशी आली आहे ते पहा :

"तंव धमाई : गोसावियाची श्रीमूर्ति गौरवर्ण देखिली : मग म्हणति : गोसावियाची श्रीमूर्ति हळदी उटिली : म्हणौनि गौर आली : तर ते हळदी माझां अंगी लावा कीं : म्हणौनि आळि घेतली : कांही केल्या संवरति ना : मग सर्वज्ञे म्हणितले : बाइ : तया बाइया हे तुम्हां कहाणी सांगैल : आली : पासि घेतली : साळेचें घर मेणाचे काउळियाचें घर सेणाचें : पाउसाळां काउळेयाचे घर पुरे जाये : साळेचें वाचे : मग उगीच राहिली."

आधुनिक मराठी कथेत गौरी देशपांडे, उर्मिला सिरूर वगैरे अनेक लेखिकांनी या कावळ्याचिमणीच्या गोष्टीचा कल्पनाबंध वापरून नव्या कथा लिहिल्या आहेत. या अर्थाने या कथा बीजकथा असून त्यांच्या कल्पनाबंधातून आधुनिक मराठी कथेचा वृक्षविस्तार झालेला आहे. या खंडात काही निवडक दृष्टांतकथा संपादित केल्या आहेत; त्या कल्पनाबंधांतून मुलांनीही नव्या कथा लिहून पहाव्यात. 'ससा-कासवा'च्या शर्यतीच्या बीजकथेचा विस्तार करणाऱ्या मुलांनी लिहिलेल्या काही कथा या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत, त्या जरूर पहाव्यात.

**लोककथांचे स्वरूप :**

एकीचे बळ, शक्तीपेक्षा युक्ति श्रेष्ठ, अशा सूत्र कल्पनांना कथनमूल्य देण्याचे काम लोककथांतून केले जाते. लोककथेतले शब्द प्रेरणादायी असतात; त्यातील भावना माणसाच्या संवेदनशीलतेला फुंकर घालणाऱ्या असतात, तर कथांमध्ये दडलेला आशय मुलांच्या मनाची वैचारिक मशागत करणारा व नीतिबोधाच्या मुशी संस्कारित करणारा असतो. आजारपण, कुटुंबातल्या जवळच्या आप्ताचा मृत्यू यासारख्या घटनांमुळे आलेल्या दु:खाला फुंकर घालण्याचे सामर्थ्य या कथांमध्ये असते. एकटेपणाला कसे सामोरे जावे, त्यातून कसे सावरावे याचे चित्रण या कथांतून येत असते. घरांतून पळून गेलेली मुले; अडचणींच्या सांपळ्यांत सापडलेल्या मुलांच्या

जीवनात येणाऱ्या प्रसंगांचे काठकंगोरे ह्या गोष्टींतून अभिव्यक्त झालेले असतात. आप्तमित्रांमधील नात्यांचा सच्चेपणा पडताळणारे प्रसंग, पेच-प्रसंगात सापडलेल्यांशी लोक कसे वागतात याचे मनोविश्लेषणही या कथांतून अतिशय सहजपणे केलेले असते.अनपेक्षित घटना प्रसंग एखाद्याच्या जीवनात आणि स्वभावात अमुलाग्र बदल घडवून आणतात,परिस्थिती माणसाला बदलवते. पात्रे ज्या कठीण पेचप्रसंगातून वाटचाल करीत असतात, त्यातून त्यांची जीवनाविषयीची समजूत कशी प्रगल्भ होत जाते, जाणिवांचे क्षितिज कसे विस्तारते याचे दर्शन या कथांतून घडते. या कथांतर्गत पात्रांना दुसरी माणसे वाचता येऊ लागतात. मित्र, पालक, अनोळखी-अपरिचित माणसे यांच्या सोबत वावरताना, त्यांच्याशी संवाद-विसंवाद होत असताना या अन्य माणसांच्या भावभावना, आशा- आकांक्षा, स्वार्थ आणि परमार्थ, प्रेम आणि मत्सर अशा कितीतरी पैलूंवर कथानिवेदक प्रकाश टाकीत असतो. स्वाभाविकच वाचकालाही या माणसांच्या भूमिकेत जाऊन विचार करण्याचे कौशल्य संपादित करता येते. पात्रांच्या मनात डोकावून, त्याच्या अनाकलनीय वागण्याचा अर्थ लावता येतो. यातून सहानुभाव (compassion)वाढीला लागतो.

कुटुंबात एखादा माणूस व्यसनाधीन झालेला असतो; अशा माणसाशी कुटुंबातील इतर लोक कसे वागतात त्याचे बारकावे टिपणारे प्रसंग फिरत्या भिंगासारखे टिपले जातात. लोक त्याच्या वागण्याकडे नकारात्मक दृष्टीतून पहातात, रागाने धुडकावतात, त्याच्यापासून त्यांना भीती वाटते, त्याच्याशी जुळवून घेताना त्यांची दमछाक होते. त्याची किळस वाटते आणि दयाही येते, रागही येतो आणि सहानुभूतीही वाटते. प्रसंगवशात ही माणसे अकारण दुसऱ्यावर दोषाचे खापर फोडतात; कधी क्षमायाचना करतात, कधी स्वत:च सुधारण्याचा प्रयत्न करतात. अशा सर्व वैविध्यांसह पात्रांचे व्यक्तिदर्शन लोककथांमधून घडत असते. आपापल्या जीवनरीती आणि भिन्न भिन्न स्वभावधर्म सांभाळून लोक परस्परांमधले प्रेमाचे नाते कसे जपतात याचे बारकावे लोककथांमधून टिपलेले असतात. उदाहरणार्थ, आई-वडिलांची

कौटुंबिक पार्श्वभूमी व आर्थिक परिस्थिती बेताची असली, त्यांचे रोजचे जगणे कष्टाचे असले;.नोकरीतल्या अशाश्वततेमुळे येणारी अस्थिरता, यातून होणारी ओढाताण मध्यमवर्गीय वाचकाला आपल्या स्वत:च्या व आजुबाजूच्या अनुभवविश्वाशी तुलना करायला प्रेरित करते. अशा प्रसंगांशी वाचक समरूप व्हावेत; गोष्टींतल्या पात्रांशी त्यांचे सहानुभावाचे नाते निर्माण व्हावे अशी प्रसंगनिर्मिती लोककथांमध्ये झालेली असते. आणि म्हणूनच लोककथा कुठल्याही देशातली, प्रदेशातली असो; कुठल्याही मानवजातीतली असो तिच्यात सर्वांना साद घालण्याची आवाहनक्षमता असते. त्यामुळेच जगभरातल्या लोककथांचे निरनिराळ्या भाषांत भाषांतरे, रूपांतरे झालेली आढळून येतात. अशा देश-विदेशांतल्या सार्वत्रिक आवाहनक्षमता असलेल्या कांही निवडक लोककथांचे संपादन प्रस्तुत खंडात करण्यात आले आहे.

लोककथांमध्ये सत्याची किंवा वास्तवाची हाताळणी निरनिराळ्या पद्धतीने केलेली असते; त्यानुसार कथेत सत्याचे भिंग फिरत राहाते. उदाहरणार्थ, सत्यकामाची कथा. सत्यकाम हा जाबाला या शापित गणिकेचा मुलगा. ऋतपर्ण, गीतधवन आणि धर्मपाद हे जाबालाचे तीन सहचर. यापैकी आपला पिता कोण हे सत्यकामाला शोधून काढायचे आहे. या कथेत पितृत्वाचा शोध म्हणजे जन्मदात्याचा शोध एवढाच मर्यादित अर्थ कथाकाराला अभिप्रेत नाही. नाती ही केवळ जन्माने ठरत नाहीत, तर गुणधर्मांनी ठरतात. एकीकडे पोपटाच्या पिलावर प्रेम करणारा ऋतपर्ण त्याला द्रव्यलोभासाठी विकतो आणि दुसरीकडे शेंड्याच्या फांदीत अडकलेल्या कावळ्याला सोडविण्यासाठी गौतम धडपडत असतो; या दोघांची सत्यकाम तुलना करतो, आणि आपले नाते ऋतपर्णापेक्षा गौतमाशी जोडतो. लौकिक अर्थाने गौतम सत्यकामाचा पिता नसेलही; पण सत्य त्याहून अधिक व्यापक आणि सुंदर आहे. सारांश, या लोककथा मुलांना शिकवत नाहीत, तर त्यांच्यासमोर शिकण्याच्या अनेकानेक पद्धती, आणि जगण्याचे विविध पर्याय सहजगत्या उलगडून ठेवतात आणि मुलांना त्यांच्यातील सुप्त शक्ती ओळखायला प्रेरित

करतात; त्यांच्यातली कल्पकता व सर्जनशीलता जागवण्याचे काम करतात.

**पात्रसृष्टी :**

लोककथांमध्ये ठराविक साच्याची पात्रे आढळतात. दानशूर राजा, स्तुतिप्रिय राजा, अहंकारी राजा. बहुतेक राजांना आवडती राणी, नावडती राणी अशा दोन राण्या असतात. राण्यांमध्येही पतिव्रता, सवतीमत्सर करणाऱ्या, सावत्र मुलाचा छळ करणाऱ्या राण्या अशी विविध स्वभावाची पात्रे असतात. इसाप, बिरबल, तेनालीराम, आप्पाजी प्रधान यासारखी चतुर पात्रे असतात. लोभी ब्राह्मण, विद्वान ब्राह्मण, दरिद्री ब्राह्मण; लोभी सावकार, फसवणारा सोनार, थापाड्या न्हावी अशा ठराविक स्वभावधर्माच्या व्यक्तिरेखा पुन्हा पुन्हा भेटतात. लोककथांमध्ये इनामदार कुत्रा, स्वामीनिष्ठ घोडा, सोन्याचे अंडे देणारी कोंबडी, असे वैशिष्ट्यपूर्ण प्राणी असतात. जादूची अंगठी, जादूचा दिवा अशा रहस्यमय वस्तू असतात. इतकेच नाही तर बोटाएवढा माणूस, फुलपाखराएवढी मुलगीही असते. घटनाप्रसंगांमध्येही असे काही ठराविक आकृतिबंध आढळतात. उदाहरणार्थ, जलद पळणारा ससा आणि संथ चालीचा कासव यांची धावण्याची शर्यत, वाघाची गाढवाकडून फजिती, चुलीतल्या राखेवर बोरे ठेवून उपद्रवी कोल्ह्याची गांडोली शेकणाऱ्या चतुर म्हातारीची करामत, नावडत्या पदार्थाच्या आग्रहाला बळी पड्णाऱ्या जावयाच्या फजितीच्या गोष्टी, बासरीवाल्याच्या नादाने नदीत बुडणाऱ्या उंदरांची गोष्ट अशा रंजक घटनाप्रसंगांनी लोककथेचे कथानक गुंफलेले असते. त्यामुळे ठराविक साच्याची पात्रे आणि सुष्टांचा विजय व दुष्टांचा पराजय अशी ठराविक स्वरूपाची कथानके असूनही ह्या कथा वाचकांना आवडतात; कारण जास्त गुंतागुंतीची कथानके आणि सूक्ष्म स्वभावचित्रणे असलेल्या कथा वाचण्याचे त्यांचे वय नसते. त्यामुळे या सरधोपट स्वभावचित्रणाच्या व ढोबळ कथानकाच्या गोष्टी मुलांना आवडतात. टोपी घातली की अदृश्य होणारा माणूस आणि सतरंजीवर बसून आकाशात उडणारा माणूस त्यांना खराच वाटतो. पशुपक्षी आणि झाडेपानेही सोन्याची होतात याची त्यांना गंमतच वाटते. कारण स्वप्नरंजन हा मुलांचा स्थायीभाव असतो. त्यामुळे

लोककथांच्या अद्‌भुत विश्वात ते स्वत:ला विसरून त्या स्वप्नमयी दुनियेत रममाण होत असतात. बालवाङ्‌मयात लोककथांना त्यामुळेच अग्रस्थान मिळालेले आहे. पुन्हा पुन्हा वाचाव्या आणि इतरांना सांगाव्या अशा ह्या जादूमयी लोककथांचा प्रातिनिधिक खजिना या खंडातून संपादित करण्यात आला आहे.

**रूपकात्मक कथा :**

लोककथांमधील बहुतांश गोष्टी या रूपकात्मकच असतात. निसर्गघटितांचे मानुषीकरण करण्याची प्रवृत्ती या गोष्टींमध्ये सरसकट आढळून येते. उदाहरणार्थ 'एकाक्ष मांजर' ही गोष्ट हे एक रूपक असते; त्याच्याआडून मांजरीची नाही, तर माणसांची कथा सांगितलेली असते. तिथे उपमान हे उपमेयाचे प्रतिनिधित्व करीत असते. लबाड लांडगा, हुषार कोल्हा ही मनुष्यस्वभावाची रूपकेच असतात. कधी प्राणिमात्रांचे स्वभावविशेषही गोष्टीत रंग भरतात. उदाहरणार्थ, अस्वले भांडकुदळ असतात; ससा भित्रा असतो, मांजर चपळ असते इत्यादी. कधी निसर्गघटितांचे दैवतीकरण केलेले असते. उदाहरणार्थ, पर्जन्यतत्त्व, वायूतत्त्व यांचे इंद्र-वरुण-हनुमानादी देवतारूपांत रूपांतर केलेले असते. चंद्र, सूर्य, तारे; नद्या-समुद्र; पशुपक्षी, वनस्पती इत्यादींविषयीच्या लोकसमजुती, शकून-अपशकूनाचे तपशील यातून लोकांच्या मनातील श्रद्धा-समजुतींचे दर्शन या लोककथांतून घडते. उदाहरणार्थ, मांजर आडवी गेली म्हणजे अपशकून, वडाची पूजा केली म्हणजे नवऱ्याचे आयुष्य वाढते अशा समजुती. कधी दैनंदिन वस्तू, पदार्थांचेही रूपकात्मक स्वरूप कल्पून गोष्ट रचली जाते. उदाहरणार्थ, 'अंगठी'चे प्रतीक. मुलाला रस्त्यात सापडलेली अंगठी ही त्याच्या दुरावलेल्या आईचे प्रतीक असते. या अंगठीमुळे त्याच्या आईविषयीच्या स्मृती जागवल्या जातात. आपण एक आफ्रिकन राजपुत्र असून आपली आई आफ्रिकेत आपल्यासाठी सुयोग्य स्थळाची निवड करण्याकरिता गेली आहे, अशी कल्पना तो स्वत:च्या मनात घोळवत रहातो. अंगठीशी चालणारा त्याचा संवाद हा खरे तर

अप्रत्यक्षपणे आईशी चाललेला संवाद असतो.

**चातुर्यकथा :**

अनेक लोककथांमध्ये चतुराईने संकटावर मात करणारी पात्रे भेटतात. एका जरठ म्हातारीला एक दांडगा कोल्हा आपल्या शक्तिबळाच्या जोरावर कायम उपद्रव देत असतो. म्हातारीच्या झोपडीतली बोरे, हरभरे यावर तो डल्ला मारतो. या फुकट्या कोल्ह्यामुळे गरीब म्हातारी त्रासते. पण आपल्या कृश शरीरामुळे ती कोल्ह्याचा थेट मुकाबला करू शकत नाही. पण तिच्याकडे शक्ती नसली तरी युक्ती असते. चतुराईने ती चुलीच्या राखेवर हरभरे ठेवते. हरभऱ्यांना चटावलेला कोल्हा झोपडीत शिरतो आणि राखेवर ठेवलेल्या हरभऱ्यांवर ताव मारण्यासाठी सरसावतो; आणि राखेतल्या निखाऱ्यांनी कोल्ह्याची गांडोली शेकते. धटिंगण कोल्ह्याला अद्दल घडते आणि त्याच्या जाचातून म्हातारीची कायमची सुटका होते. 'शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ' ह्या म्हणीला सार्थ ठरवणारी ही चातुर्यकथा माणसाला संकटांचा मुकाबला करण्याची नवी रीत शिकवते. दुबळ्या माणसांच्या मनातला आत्मविश्वास जागवते; त्याच्यात हिंमत येते आणि तो संकटाचा यशस्वी सामना करून शत्रूला चकवण्यात यशस्वी होतो. बिरबल, तेनालीराम आणि आप्पाजी प्रधानांच्या चातुर्यकथा याही याच प्रकारात मोडतात. दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना आपल्या हुषारीने नामोहरम करणारी पात्रे विघ्नसंतोषी लोकांचा कावा ओळखायला शिकवतात आणि अशा दुष्टांना आपल्या अक्कलहुशारीने धडा कसा शिकावा याचा मंत्रही देतात.

**व्रतकथा :**

मराठी संस्कृतीत मंगळगौर, हरतालिका, सोळा सोमवार इत्यादी व्रते केली जातात. या व्रतात उपास करणे आणि गोष्ट सांगणे या दोन बाबी हमखास असतात. ह्या व्रतकथांचाही एक साचा ठरलेला असतो. 'आटपाट नगर होते' अशीच कुठल्याही व्रतकथेची सुरुवात असते आणि व्रतपालनाची फलश्रुती सांगून झाली की "ही साठा उत्तराची कहाणी सफळ संपूर्ण होवो' असा शेवट झाल्यानंतर संपते. 'उतू नको मातू नको, घेतला वसा टाकू नको' हा

व्रतपालनाचा इशाराही या कथेत असतो. अगदी छोटी छोटी वाक्ये. क्रियापदे किंवा धातुसाधितात समग्र वाक्यार्थ गोठविण्याची कथनशैली हे 'कहाणी'चे वैशिष्ट्य सांगता येईल. उदाहणार्थ,

"मुली दोघी नवऱ्या होत्या. बाहीर जावो नको, फिरो नको. राजा देखेले. प्रजा देखेले. बटकी करील. दासी करील. त्या मुली खेळाया गेल्या. राजे शिकारीस आले होते. त्यांनी देखिल्या. 'या मुली कोणाच्या?' 'भटा-भिक्षुकाच्या'. 'जाऊन सांगा. एक राजास द्या, एक प्रधाास द्या.' एक म्हणतो, 'भटा-भिक्षुकांच्या मुली घेऊन काय कराल? दासी कराल, बटकी कराल. ब्राह्मणास बोलाविले. बसायास गादी दिली. टेकायास मुडा दिला. हाती फुलांचा झेला दिला. विडा दिला. ब्राह्मणा, भिऊ नको. कापू नको. एक मुलगी राजास दे, एक प्रधानास दे. बरे म्हटले. त्याच मुहर्ती वाजत गाजत लग्न लागले. आपण बसले हत्तीवर. राण्या बसल्या सुखासनावर. ऐशा घरास गेल्या...."

अशा काही निवडक व्रतकथा येथे संकलीत केल्या आहेत.

**स्पष्टीकरण कथा :**

उत्पत्तिकथा किंवा स्पष्टीकरणकथा हा लोककथांचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. सृष्टीनिर्मितीचे कुतुहल माणसाला आदिम काळापासून आहे. चंद्र, सूर्य, तारे, आकाश, धरती यांचा जन्म कसा झाला याविषयीच्या लोककथा जगातल्या सर्व भाषांत आढळतात. इंद्रधनुष्याचे सात रंग कसे आले, काजव्याला उजेड कसा मिळाला, चंद्रावर डाग कसे आले, चंद्राला ग्रहण का लागते, कावळ्याला एकच डोळा का, खारीच्या पाठीवर पट्टे का अशा एक ना अनेक प्रश्नांची आपापल्या परीने उत्तरे शोधणाऱ्या कल्पित कथा मुलांच्या जिज्ञासेला खतपाणी पुरवतात. पुढे विज्ञानकथांतही अशा स्पष्टीकरणात्मक लोककथांच्या वळणाच्या गोष्टी वाचायला मिळतात. मुलांची सर्जनशीलतेची भूमी नांगरण्यासाठी अशा स्पष्टीकरणकथा त्यांनी जरूर वाचल्या पाहिजेत. या उद्देशानेच आकाश उंच कसे गेले, समुद्राकाठी वाळू का? जिराफाची मान लांब का? इ. स्पष्टीकरण कथा 'गोष्टीच्या गुहेत' समाविष्ट केल्या आहेत.

**लोककथांतील जागतिक संस्कृतीचे चित्रण:**

लोककथा ज्या भाषेत सांगितल्या जातात, तिथल्या स्थानिक लोकांच्या रीतीभातींचे, खाण्यापिण्याचे, धर्मश्रद्धांचे, निसर्गाचे, शेती आणि उद्योगांचे, समाजरचनेचे कितीतरी पैलू प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे उमटलेले असतात. त्यामुळे जागतिक संस्कृतीचा परिचय होण्यासाठी मुलांनी, शिक्षकांनी आणि पालकांनी देशविदेशातल्या लोककथा जरूर वाचल्या पाहिजेत. नमुन्यादाखल काही उदाहरणांची चर्चा आपल्याला इथे करता येईल. उदाहरणार्थ, लोककथेला काही एक भौगोलिक पार्श्वभूमी असते. उदाहरणार्थ, निकोबारच्या लोककथांमध्ये ते बेट कसे अवतरले याची कथा हमखास असते. एका महापूरात हे बुट बुडाले. सगळी माणसे वाहून गेली. एक माणूस तेवढा उंच झाडाच्या शेंड्यावर बसून होता, तो वाचला. पूर ओसरल्यावर तो खाली उतरला. त्याला ताडाच्या झाडात कुत्रीचे कान अडकून पडल्याचे दिसले. त्याने कुत्रीची सुटका केली. बेटावर आता दोघेच उरले. हा माणूस आणि ती कुत्री. त्या दोघांपासून पुढे मानवी संतती निपजली. म्हणून निकोबारची माणसे लुंगी नेसतात, कुत्र्याच्या शेपटाप्रमाणे लुंगीचा पार्श्वभाग फडफडत असतो. त्यांच्या पागोट्याला कुत्र्याच्या कानासारखी दोन शिंगे असतात. अशा प्रकारच्या उत्पत्तिकथा जवळपास सर्वच भाषांत आढळतात. निकोबारच्या बेटावर नारळाची झाडी असल्याने नारळाचे संदर्भ अधून मधून त्यांच्या लोककथेत येत रहातात. बेटावरच्या लोकांच्या आर्थिक जीवनव्यवहारात होड्यांना महत्त्व आहे; त्यामुळे होड्या ज्या झाडापासून बनवतात त्या झाडांचे तपशील, होड्या तयार करणारे कारागीर, त्यांची खरेदी विक्री करणारे दलाल यांची पात्रे निकोबारच्या लोककथांत आढळतात. होडी मेजवानीचा सण, सण-उत्सवात ताडी देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्याची पद्धत इत्यादी स्थानविशिष्ट संस्कृतीचा परिचय या लोककथांतून आपल्याला होत असतो.

**'अलास्कन' लोककथांविषयी**

उत्तर ध्रुवाजवळ अलास्का ही बर्फाळ भूमी आहे. अमेरिकेच्या संयुक्त संस्थांनातले हे सर्वांत मोठे राज्य आहे. अमेरिकेने रशियाकडून 'अलास्का'चा

हा भूप्रदेश विकत घेतला होता. ह्या भूप्रदेशाचे मूळ नाव 'अलास्का' हे रशियन लोकांनीच रूढ केले होते. 'अल्युशन' बेटावर राहाणाऱ्या 'अल्युट्स' भाषिक लोकांचा रहिवास असलेला भूप्रदेश म्हणजे अलास्का. अलास्का म्हणजे 'महान भूमी' असाही त्याचा एक अर्थ सांगितला जातो. उत्तर ध्रुवाजवळ असल्याने इथले हवामान अतिशय थंड असते. बर्फाने गोठलेल्या प्रदेशांत अन्नधान्य पिकविणे कठीण जात असल्यामुळे या भागात सतत अन्नधान्याचा तुटवडा असतो. स्वाभाविकच ह्या भागात लोकवस्तीही विरळच होती. प्राचीन काळापासून इथे राहणाऱ्या मानवी टोळ्यांनी आपल्या मौखिक परंपरेतून लोककथांचा वारसा पुढच्या पिढ्यांकडे संक्रमित केला आहे.

अलास्कातील बहुतेक लोककथांमध्ये तिथल्या निसर्गजीवनाचे पडसाद आढळतात. स्थानिक निसर्ग घटनांविषयीच्या कुतुहलातून या कथांचा जन्म झालेला आहे. त्यामुळे साळींदराला टोकदार पिसे कशी मिळाली?, गोड्या पाण्याची सरोवरे का असावीत? अशा स्पष्टीकरणकथा आणि आख्यायिका या लोककथांमध्ये आढळतात. समुद्राकाठच्या बर्फाळ प्रदेशांतील प्राणीसृष्टीशी माणसाचे जोडलेले नाना प्रकारचे संबंध या कथांमध्ये पहायला मिळतात. प्राण्यांविषयी प्रेम आणि भीती या दोन्हींचे आविष्कार या कथांतून वाचायला मिळतात. यातल्या बऱ्याच कथा या 'दैवतकथा' असून त्यांचा नायक 'रेव्हन' पक्षी आहे. शंकराप्रमाणेच हा रेव्हन विश्वनिर्माता आहे. आणि सर्वनाश करणाराही आहे. रेव्हनची अनेकविध रूपे या लोककथांत आढळतात. तो युक्तिबाज असतो तसाच फसवणाराही असतो; दयाळू असतो, तसाच अनर्थ निर्माण करणाराही असतो. बीव्हर, अस्वल, पाणबुड्या पक्षी, घुबड, बेडूक, सांबर इत्यादी प्राण्यांच्या या कथांमध्ये अद्‌भुतरसजन्य चमत्कृती आणि रंजनाचा भरपूर मसाला भरलेला आहे. या छोट्या छोट्या गोष्टींतून शिकण्यासारखे खूप काही आहे. उत्तर ध्रुवीय लोककथांमध्ये एस्किमो लोकांच्या जीवनपद्धतीचे दर्शन घडते. समुद्रातील मासे, जमिनीवरील अस्वलादी प्राणी हे त्यांचे अन्न असल्याने तेथील लोककथांमध्ये शिकारीच्या कथा हमखास आढळतात.

**अस्वलाच्या लोककथा**

अस्वलाविषयीच्या अनेक लोककथा आढळतात. भारतात हिमालयातही अस्वल असतात. पण उत्तर ध्रुवीय कथांपेक्षा हिमाचल प्रदेशातील लोककथांमधे अस्वल काहीसे वेगळे असते. ऋतुमानानुसार येथील अस्वलात बदल होतात. उन्हाळ्यात केस आखूड होतात. हिवाळ्यातला फिकट तपकिरी रंग उन्हाळ्यात गडद होत जातो. हिमालयातली अस्वले अक्रोड, जर्दाळू, सफरचंद खातात. डोंगराच्या उतारावरून चेंडूसारखी गडगडत खाली येतात. हिमालयातले काळे अस्वल मांसभक्षक असते. ते माणसाचाही फडशा पाडते. हिमालयातल्या लोककथांमध्ये त्यामुळे अस्वलाच्या लोककथा आढळतात. महाराष्ट्रात मेळघाटच्या जंगलात अस्वलांची वस्ती असल्याने तिथल्या लोककथांमध्येही अस्वलाच्या गोष्टी आढळतात. रामायण महाभारतातही अस्वलाच्या गोष्टी आढळतात. अस्वलाची नखे चंद्रासारखी म्हणून त्याला चंद्रभक्त समजतात. त्याच्या छातीवर पांढरा पट्टा दिसतो म्हणून त्याला जानवे घालणारा ब्राह्मण समजतात. महाराष्ट्रातील मेळघाटच्या जंगलातील अस्वल मांस खात नाही, फळे खातो, आणि तो रामभक्त आहे अशी समजुत या कथांमध्ये वाचायला मिळते. त्यामुळे अस्वलाची हत्या केल्याने ब्रह्महत्येचे पातक लागते अशी लोकसमजूत आहे. थोडक्यात प्रदेशविशिष्ट लोकसंस्कृतीच्या खुणा आपल्याला लोककथांमध्ये वाचता येतात. त्यामुळे अशा वाचनातून मुलांचा जागतिक संस्कृतीचा संदर्भकोश विस्तारायला मदत होते.

या लोककथा वाचल्याने मुलांना स्वत:लाही गोष्टी लिहिण्याचे आणि सांगण्याचे कौशल्य संपादित करता येईल. गोष्ट म्हटली की, तिच्यात अनेक पात्रं असतात. त्यात एखादे ठळक वा मध्यवर्ती पात्र असते. या पात्राच्या वाट्याला मित्र येतात, तसे त्याच्या वाट्याला शत्रूही येतात. या सुष्ट-दुष्ट पात्रांच्या संगतीतून घडणाऱ्या घटना-प्रसंगातूनच गोष्टीचे कथानक आकाराला येते. कथानायकाच्या अंगी काही गुण असतात, तशा काही दुबळ्या जागाही असतात. त्याचा स्वभाव कधी रागीट असतो, कधी संशयी असतो, कधी

भाबडेपणा असतो, तर कधी डावपेच खेळण्यात, साहसी कृत्ये करण्यात रमणारा असतो. त्याच्या ह्या स्वभावधर्मामुळे कथानकांत काही रोमांचकारी, अद्‌भुत प्रसंग निर्माण होतात. एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रयत्न होतात. काही पात्रे प्रेमळ असतात, काही दुष्ट; तर काही स्वार्थी असतात, काही मदतीचा हात पुढे करणारी असतात. त्यातून कथानक पुढे जात रहाते. गर्विष्ठ सिंहाची क्षुल्लक उंदिर जाळे कुरतडून सुटका करतो, तेव्हा गोष्टीला वेगळीच कलाटणी मिळते; चपळ गतीने धावणाऱ्या सशाला कासव शर्यतीत हरवते तेव्हा गोष्टीत नाट्य निर्माण होते आणि वाचकाला त्यातून बरेच काही शिकायलाही मिळते. मोठेपणी जीवनातल्या पेचप्रसंगांतून वाट काढताना या लोककथा त्याची सोबत करतात. आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात आणि राजनीतिशास्त्रात लोककथांच्या माध्यमांतून पेचप्रसंगांतून तोडगा कसा काढावा; युक्तिवाद कसे करावेत हे शिकविले जाते. मुलांच्या बौद्धिक मशागतीची कितीतरी तंत्रे लोककथांमध्ये खच्चून भरलेली असतात. म्हणून लोककथांशी आपले चिरंजीव मैत्र जोडले जाते. जगभरातल्या अशा निवडक शाश्वत चिरंजीव कथांचा खजिना 'गोष्टींच्या गुहेत' या पुस्तकांतून आपल्याला उपलब्ध करून दिला आहे. गुहेत शिरल्यावर जसे आपल्याला कल्पनेपलिकडचे अद्भुतरम्य जग पहायला मिळते, अलिबाबाच्या गुहेची तिळा उघडल्यावर जसा सोन्यानाण्यांचा, हिऱ्या-मोत्यांचा खजिना हाती लागतो, तसाच गोष्टींचा खजिना या पुस्तकातून बालवाचकांना सापडेल. या लोककथांमध्ये जंगले आहेत, गुहा आहेत, सापळे आहेत, किल्ले आहेत, भुते आहेत, पऱ्या आहेत, राक्षस आणि चेटकिणी आहेत. बुद्धीला ताण देणारी कोडी आहेत, मनाला रिझवणारा कल्पनाविलास आहे; त्यातून आपले मनोरंजनही होईल आणि जीवनबोधही होईल, अशी अपेक्षा आहे.

**ऋणनिर्देश :**

जगभरातल्या निवडक लोककथांचा धांडोळा घेण्याचे काम यापूर्वी अनेक मान्यवर लेखकांनी केला आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटी अशा सर्व उपलब्ध साधनांची सूची दिली आहे. या सर्व लेखकांचे मनःपूर्वक आभार !

महाराष्ट्रातील शाळा व सार्वजनिक ग्रंथालयांनी या संदर्भसूचीतील मूळ पुस्तके मिळवून आपल्या बालवाचकांना, शिक्षक-पालकांना जरूर उपलब्ध करून द्यावीत. या विविध पुस्तकातील गोष्टींचा निवडक खजिना या ग्रंथाच्या माध्यमातून मुलांना उपलब्ध करून देता आला, याचा आनंद विशेष आहे.

असा हा दुर्मिळ ग्रंथठेवा प्रामुख्याने पुढील ग्रंथालयांतून उपलब्ध झाला :

१. श्रीराम वाचनमंदिर, सावंतवाडी
२. सौ. जान्हवी पराग जोशी, ग्रंथपाल, नगरवाचन मंदिर, कणकवली
३. सौ. मनिषा शेणई, ग्रंथपाल, करवीर वाचनालय, कोल्हापूर
४. श्री. राजन महादेव पांचाळ, ग्रंथपाल, रा. ब. अनंत शिवाजी देसाई जिल्हा ग्रंथालय, कुडाळ
५. श्री. अनिल मधुकर पंडित, सार्वजनिक वाचनालय, अरोंदा
६. श्री. शशिकांत विष्णू हुकेरी, मिरज
७. श्रीमती उषा वसंत आगाशे, मिरज
८. श्री. श्रीकांत येडूरकर, उपाध्यक्ष, मिरज विद्यार्थी संघ
९. श्रीमती सुरेखा नाईक व श्री.सतीश सूर्यवंशी,सांगली जिल्हा नगरवाचनालय
१०. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर
११. परशुराम सायखेडकर वाचनालय, नाशिक
१२. सांता क्लारा कौंटी लायब्ररी, कुपरटिनो, कॅलिफोर्निया, युएसए

या वाचनालयांचे ग्रंथपाल व पदाधिकारी यांच्या सौहार्दपूर्ण सहकार्यामुळेच हे काम यशस्वी होऊ शकले, यासाठी त्यांचे मन:पूर्वक आभार.

या ग्रंथासाठी प्रा. मनोहर सराफ, श्री. दिगंबर गाडगीळ, प्रा. सुनंदा पाटील यांनी अनेक लोककथांचे मराठी अनुवाद करून दिले; मौखिक कथांचे पुनर्लेखन केले यासाठी त्यांचेही मनःपूर्वक आभार.

या लोककथांचा तपास काढण्यात महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबा भांड, श्री. गंगाधर बुवा, प्रा. अविनाश सप्रे, विलिंग्डन महाविद्यालय, सांगलीचे सेवानिवृत्त ग्रंथपाल श्री.रास्ते श्री. प्रदीप

कर्णिक, श्री. चंद्रकांत भोंजाळ, श्री. नंदकुमार मोरे, श्रीमती उषा वसंत आगाशे इत्यादी सुहृदांनी बराच वेळ दिला, यासाठी त्यांच्या ऋणात राहणेच मी पसंत करीन. म. रा. साहित्य संकृती मंडळाच्या सचिव श्रीमती मीनाक्षी पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनीही प्रकल्पाच्या कामात वेळोवेळी मदत केली, डॉ. एकनाथ पगार, डॉ. नीतीन रिंढे, चित्रकार डकवे यांनी अनुरूप मुखपृष्ठ करून दिले. हर्षल वरखेडे यांनी उपयुक्त सूचना केल्या; संशोधन साहित्याचे संकलन संपादन करण्यात, अक्षरजुळणी व मुद्रितशोधनात, तसेच चित्रे-रेखाटने व ग्रंथसजावटीसाठी सहाय्य करणाऱ्या माझ्या सर्व संशोधन सहाय्यक चमूचेही मन:पूर्वक आभार!

**मंगला वरखेडे**

संपादक, अक्षर बालवाङ्मय प्रकल्प
२४, चेरी हिल, पाइपलाइन रोड,
आनंदवल्ली, नाशिक - ४२२०१३.
मोबाईल नं. : ८५५२९१९४७१
इ-मेल : mangalawarkhede@gmail.com

# १

# पौराणिक गोष्टी


१.१. आदित्यराणूबाई ३९

१.२. सोमवारची कहाणी ४५

१.३. शुक्रवारची कहाणी ४७

१.४. मरीआईची कहाणी ५०

१.५. महादेव पार्वतीची जन्मकथा ५३

१.६. खंडोबाच्या बानूची गोष्ट ५४

१.७. बकासुराची गोष्ट ५७

१.८. लंकादहन ६०

१.९. देवदूताचे वरदान ६२

१.१०. इमाम आणि देवदूत ६६

१.११. पोप आणि नोकर ६९

१.१२. रेव्हन काळा कसा झाला ७३

१.१३. रेव्हनची गोष्ट ७६

१.१४. अपण्णक जातक ७८

१.१५. तंडुलनालि जातक ८२

१.१६. मातिपोसक जातक ८६

१.१७. बक जातक ८९

१.१८. आरामदूसक जातक ९३

१.१९. निग्रोधमिग जातक ९५

१.२०. यक्षप्रश्न १००

१.२१. मोठा देव कोण बरे? १०२

१.२२. होळीविषयी लोककथा १०५

१.२३. कहाणी आकाशदिव्यांची १०९

१.२४. वसुबारस याची कहाणी ११२

१.२५. धनतेरस ११४

१.२६. भाऊबीज ११९

१.२७. करुणा १२३

१.२८. पुरुषार्थ १२४

१.२९. सर्वात वाईट वस्तू १२६

१.३०. श्रावणबाळ १२८

१.३१. धौम्य व उपमन्यू १३१

१.३२. गुरुदक्षिणा १३५

१.३३. गोष्टी सांगेत युक्तीच्या चार १३९

१.३४. चित्रकाराचे चातुर्य १४३

१.३५. अन्नपूर्णा देवीची गोष्ट १४७

१.३६. हान्या महाराज १५३

१.३७. वशिष्ठ-विश्वामित्रांची गोष्ट १५६

१.३८. वरुणपुत्र भृगुची गोष्ट १५९

१.३९. 'नू'चे नाणे १६१

१.४०. दानशूर बळीराजा १६५

१.४१. जनस्थान नाशिकविषयी लोककथा १७०

१.४२. ग्रहणासंबंधी दंतकथा १७२

१.४३. आधारियेचा परिसाचा दृष्टांत १७३

१.४४. सत्यकामाची गोष्ट १७५

१.४५. नचिकेताची गोष्ट १७९

१.४६. देवकी व कंस यांची गोष्ट १८२

१.४७. कृष्णाच्या बाळक्रीडा १८३

१.४८. कालियामर्दन १८६

१.४९. पर्वताची छत्री केली १८८

१.५०. सुदाम देवाची गोष्ट १८९

# १.१ आदित्यराणूबाई

ऐका आदित्यराणूबाई तुमची कहाणी. आटपाट नगर होतं. त्या नगरात एक ब्राह्मण होता. तो नित्य समिधा, फुलं, दूर्वा, आणायला रानात जात असे. तिथं नागकन्या देवकन्या वसा वसत होत्या. ब्राह्मणानं विचारलं, "काय गं बायांनो, कसला वसा वसतां? तो मला सांगा." "तुला रे वसा कशाला हवा? उतशील, मातशील, घेतला वसा टाकून देशील." ब्राह्मण म्हणाला, "उतत नाही, मातत नाही, घेतला वसा टाकीत नाही." तेव्हा त्या म्हणाल्या, "श्रावणमास येईल, तेव्हा पहिल्या आदितवारी मौन्यानं (मुकाट्यानं) उठावं, सचीळ (वस्त्रासहित) स्नान करावं, अग्रोदक पाणी आणावं. विड्याच्या पानावर रक्तचंदनाची आदित्यराणूबाई काढावी. सहा रेघांचं मंडळ करावं, सहा सुतांचा तातू करावा. त्याला सहा गाठी द्याव्या. पानफूल वहावं, पूजा करावी. पानाचा विडा, फुलांचा झेला, दशांगाचा धूप, गुळखोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा, सहा मास चाळावी, सहा मास पाळावी, माघी रथसप्तमी संपूर्ण करावं. संपूर्णाला काय करावं? गुळाच्या पोळ्या, बोटव्यांची खीर, लोणकडं तूप, मेहूण जेवू सांगावं. असेल तर चिरचोळी द्यावी, नसेल तर जोडगळसरी द्यावी, ती नसेल तर दोन पैसे दक्षिणा द्यावी आणि आपल्या व्रताचं उद्यापन करावं." असा वसा ब्राह्मणानं केला. त्याला सूर्यनारायण प्रसन्न झाला. भाग्यलक्ष्मी आली. तेव्हा राजाच्या राणीने ब्राह्मणाला बोलावणं धाडलं, ब्राह्मण जाते वेळेस भिऊ लागला. कापू लागला. तेव्हा राजाच्या राणीनं सांगितलं, "भिऊ नका, कापू नका, तुमच्या मुली आमचे येथे द्या." "आमच्या मुली गरीबाच्या, तुमच्या घरी कशा द्याव्या? दासी कराल, बटकी कराल." राणी म्हणाली, "दासी करीत नाही, बटकी करीत नाही. राजाची राणी करू, प्रधानाची राणी करू."

मार्गेश्वराचा महिना आला. ब्राह्मणानं लगीन करून मुली दिल्या, एक राजाचे

घरी दिली. दुसरी प्रधानाचे घरी दिली. गेल्या पावली मुलींचा समाचार घेतला नाही. बारा वर्षांनी समाचारास ब्राह्मण निघाला. राजाच्या घरी गेला. लेकीनं बसायला पाट दिला, पाय धुवायला पाणी दिलं. "बाबा बाबा, गूळ खा पाणी प्या." गूळ खात नाही, पाणी पीत नाही. माझी कहाणी करायची आहे ती तू ऐक. "तुझी कहाणी ऐकायला मला वेळ नाही. राजा पारधीला जाणार आहे. त्याला जेवायला उशीर होईल." तोच त्याचे मनांत राग आला. तेथून निघाला प्रधानाच्या घरी गेला. तिनं पाहिलं, आपला बाप आला. म्हणून बसायला पाट दिला, पाय धुवायला पाणी दिलं. "बाबा, बाबा, गूळ खा, पाणी प्या." "गूळ खात नाही पाणी पित नाही, माझी कहाणी करायची आहे, ती तू अगोदर ऐक." तुझी कहाणी नको ऐकू तर कोणाची ऐकू? घरात गेली, उतरडीची सहा मोत्ये आणली. तीन आपण घेतली. तीन बापाच्या हातात दिली. त्याने मनोभावे कहाणी सांगितली लेकीनं चित्तभावे ती ऐकली. नंतर जेवून खाऊन बाप आपल्या घरी आला. बायकोनं विचारलं, "मुलींचा समाचार कसा आहे?" जिनं कहाणी ऐकली नाही, ती दारिद्र्याने पीडली. दुःखानं व्यापली. राजा मुलखावर निघून गेला. जिनं कहाणी ऐकली होती, ती भाग्यानं नांदत आहे." इकडे दरिद्री जी झाली होती, तिनं आपल्या लेकाला सांगितले. "मावशी घनघोर नांदत आहे, तिकडे जाऊन काही दिलं तर घेऊन ये."

पहिल्या आदितवारी पहिला मुलगा उठला, तळ्याच्या पाळी जाऊन उभा राहिला. "अगं अगं दासींनो, तुम्ही दासी कोणाच्या?" "आम्ही दासी प्रधानाच्या. प्रधानाच्या राणीला जाऊन सांगा, तुमच्या बहिणीचा मुलगा आला आहे." "कसा आला आहे? तळ्याच्या पाळीला उभा राहिला आहे." 'परसदारनं घेऊन या.' परसदारानं घेऊन आल्या. न्हाऊ माखू घातलं, पीतांबर नेसायला दिला, जेवू खाऊ घातलं. कोहोळा पोखरला, होनमोहोरा भरल्या. "वाटेस आपला जाऊ लागला. तो सूर्यनारायण माळ्याच्या रूपानं आला. हातीचा कोहोळा काढून नेला. घरी गेला. आईनं विचारलं, "काय रे बाबा, मावशीनं काय दिलं?" दैवे दिलं, कर्मानं नेलं. कर्माचं फळ पुढं उभं राहिलं. मावशीनं दिलं होतं. पण सर्व

गेलं.

पुढं दुसऱ्या आदितवारी दुसरा मुलगा गेला. तळ्याच्या पाळी जाऊन उभा राहिला. “अगं अगं दासींनो, तुम्ही दासी कोणाच्या?” “आम्ही दासी प्रधानाच्या.” प्रधानाच्या राणीला निरोप सांगा. त्यांनी सांगितला. मग प्रधानाच्या राणीनं त्याला घरी नेऊन न्हाऊ माखू घातलं पितांबर नेसायला दिला, जेवू खाऊ घातलं. काठी पोखरून होनामोहोरांनी भरून दिली. “बाबा, ठेवू नको. विसरू नको. जतन करून घरी घेऊन जा, म्हणून सांगितलं. वाटेत सूर्यनारायण गुराख्याच्या रूपानं आला, हातची काठी काढून घेतली. घरी गेला, झालेली गोष्ट राणीला सांगितली. “दैवे दिलं, ते सर्व कर्मानं नेलं.”

पुढं तिसरे आदितवारी तिसरा मुलगा गेला, तळ्याच्या पाळी उभा राहिला. त्यालाही पहिल्यासारखं प्रधानाचे घरी नेऊन न्हाऊं माखू घातलं, पीतांबर नेसायला दिला, जेवू खाऊ घातलं, नारळ पोखरून होनमोहोरांनी भरून दिला. “ठेवू नको, विसरू नको.” म्हणून सांगितलं, घरी जाताना विहिरीत उतरला. तो गडबडून विहिरीत पडला. घरी गेला. आईनं विचारलं. “काय रे बाबा, मावशीनं काय दिलं?” “आई गं, मावशीनं दिलं, पण दैवानं ते सर्व बुडालं.”

चवथ्या आदितवारी चवथा मुलगा गेला. तळ्याच्या पाळी उभा राहिला. त्यालाही प्रधानाच्या राणीनं घरी नेऊन न्हाऊ माखू घातलं, पितांबर नेसायला दिला. जेवू खाऊ घातलं. त्याला दह्याची शिदोरी होनामोहोरा घालून बरोबर दिली. सूर्यनारायण घारीच्या रूपाने आला. हातची शिदोरी घेऊन गेला. घरी गेला. आईनं विचारलं, “काय रे बाबा, मावशीनं काय दिलं?” “आई मावशीनं दिलं, पण दैवानं ते सर्व नेलं.”

पाचव्या आदितवारी आपण उठली, तळ्याच्या पाळी उभी राहिली. दासींनी तिचा निरोप तिच्या बहिणीला सांगितला. बहिणीनं तिलाही परसदारानं घरी नेलं. न्हाऊ घातलं माखू घातलं, पाट बसायला दिला. प्रधानाची राणी आदितवाराची कहाणी करू लागली. “काय वसा करतेस तो मला सांग.” बहीण म्हणाली, “अगं अगं चांडाळणी, पापिणी, बापाची कहाणी ऐकली नाहीस, म्हणून

तुला दारिद्र्य आलं." राजाच्या राणीनं विचारलं, "याला बहिणीच्या घरी राहिली. श्रावणास आला. सांगितल्याप्रमाणं सूर्यनारायणाची पूजा केली. इकडे राजाला भाग्य आलं. राजानं बोलावणं धाडलं. प्रधानाची मुलं म्हणाली, "मावशी मावशी, तुला छत्र आली, चामरं आली, पाईक आले, परवर आले." "मला रे पापिणीला छत्रं कोठली? चामरं कोठली? पाईक कोठले? परवर कोठे?" बाहेर जाऊन दाराशी बघतात, तो राजा बोलावू आला आहे. राजा आला तशी घरी जायला निघाली. एकमेकींना बहिणीबहिणींनी आहेर केले. वाटेनं जाऊ लागली. पहिल्या मजलेस स्वयंपाक केला. राजाला वाढलं, मुलांना वाढलं, आपलं पान वाढून घेतलं, तो कहाणीची आठवण झाली. "करा रे हाकारा, पिटा रे डांगोरा. नगरात कोणी उपाशी आहे का? याचा शोध करा." लाकूडतोड्या म्हणाला, "तुझ्या बाईची कहाणी ऐकून मला काय फळ? माझं पोट भरलं पाहिजे." असं म्हणून तो राणीकडे आला. तशी सहा मोत्ये राणीनं घेऊन तीन त्याला दिली. तीन आपल्या हातात ठेवली. मनोभावे कहाणी सांगितली, चित्त भावे त्याने ऐकली. त्याची लाकडाची मोळी होती, ती सोन्याची झाली. तो म्हणाला, "बाई बाई! कहाणी ऐकल्याचं एवढं फळ, मग वसा घेतल्याचं काय फळ? काय वसा आहे तो मला सांगा." "तुला रे वसा कशाला हवा? उतशील, मातशील, घेतला वसा टाकून देशील," "उतत नाही, मातत नाही, घेतला वसा टाकीत नाही." तेव्हा वसा सांगितला.

पुढं दुसऱ्या मजलेस गेली. स्वंयपाक केला. राजाला वाढला, मुलांना वाढलं. आपलं पान वाढून घेतलं, तेव्हा कहाणीची आठवण झाली. "करा रे हाकारा, पिटा रे डांगोरा. नगरात कोणी उपाशी आहे का? याच शोध करा." "उपाशी नाही, काही नाही" माळ्याचा मळा पिकत नाही, विहिरीला पाणी लागत नाही, असा एक माळी चिंतेनं बसला आहे त्याला हाक मारली. "आमच्या बाईची कहाणी ऐक." तो आला. राणीनं सहा मोत्ये घेऊन तीन आपण घेतली, तीन माळ्याला दिली. राणीनं कहाणी मनोभावे सांगितली. चित्तभावे माळ्यानं ऐकली. माळ्याचा मळा पिकू लागला. विहिरीला पाणी आल. तो म्हणाला, "बाई बाई!

कहाणी ऐकल्यावर एवढं फळ, मग वसा घेतल्याचं काय फळ? काय वसा असेल तो मला सांगा." मग राणीनं त्याला वसा सांगितला.

पुढं तिसऱ्या मजलेस गेली स्वंयपाक केला. राजाला वाढलं. मुलांना वाढलं. आपलं पान वाढून घेतलं, तेव्हा कहाणीची आठवण झाली. "करा रे हाकारा, पिटा रे डांगोरा. नगरात कोणी उपाशी आहे का? याचा शोध करा." "उपाशी नाही, काही नाही." एक म्हातारी, तिचा एक मुलगा वनात गेला होता, एक डोहात बुडाला होता, एक सर्पानं खाल्ला होता, त्यामुळं चिंताक्रांत बसली होती. तिला म्हणाले, "आमच्या बाईची कहाणी ऐक." ती म्हणाली, "कहाणी ऐकून मी काय करू? मी मुलासाठी रडते आहे. बरं येते" मग ती राणीकडे आली. राणीनं पहिल्याप्रमाणं तिला कहाणी सांगितली. तिनं चित्तभावे ऐकली. तिचा मुलगा वनात गेला होता तो आला. डोहात बुडाला होता तो आला. सर्पानं खाल्ला होता तो आला. ती म्हणाली, "बाई बाई! कहाणी ऐकल्याचं हे फळ, मग वसा घेतल्याचं काय फळ? काय वसा तो मला सांगा." मग राणीनं तिलाही वसा सांगितला.

पुढं चौथ्या मजलेस गेली. स्वंयपाक केला. राजाला वाढलं, मुलांना वाढलं. आपलं पान वाढून घेतलं, तेव्हा कहाणीची आठवण झाली. "करा रे हाकारा, पिटा रे डांगोरा. नगरात कोणी उपाशी आहे का? याचा शोध करा." "उपाशी नाही, काही नाही." काणा डोळा, मांसाचा गोळा, हात नाही, पाय नाही, असा एक मनुष्य रस्त्यामध्ये होता. त्याच्या अंगावर तांब्याभर पाणी ओतलं पालथा होता तो उताणा केला. सहा मोत्ये होती. तीन मोत्ये त्याच्या बेंबीवर ठेवली, तीन मोत्ये आपण घेतली, राणीनं मनोभावे कहाणी सांगितली; ती त्यानं ऐकली. त्याला हातपाय आले. देह दिव्य झाला. तो म्हणाला, "कहाणी ऐकल्याचं एवढं फळ, मग वसा घेतल्याचं काय फळ? काय वसा तो मला सांगा." मग राणीनं त्याला वसा सांगितला.

पाचव्या मुक्कामाला घरी आली. स्वंयपाक केला. सूर्यनारायण जेवायला आले. साती दरवाजे उघडले. लोहघंगाळं पाणी तापवलं. षड्रस पक्वान्न जेवायला केली. सूर्यनारायण भोजनाला बसले, त्यांना पहिल्या घासाला केस

लागला. ते म्हणाले, “अगं अगं, कोणाच्या पापणीचा केस आहे?” राजाच्या राणीला बारा वर्षं दारिद्र्य आलं होतं. तिनं आदितवारी वळचणीखाली बसून केस विंचरले. “काळं चवाळं, डोईचा केस, वळचणीची काडी, डाव्या खांद्यावरून वेशीबाहेर टाकून दे.” राजाच्या राणीला सूर्यनारायणाचा कोप झाला, तसा कोणाला होऊ नये.

ब्राह्मणाला, मोळीविक्याला, राजाच्या राणीला, माळ्याला, म्हातारीला, काणा डोळा मांसाचा गोळा, इतक्यांना जसा सूर्यनारायण प्रसन्न झाला, तसा तुम्हा आम्हा होवो. ही साठा उत्तराची कहाणी, पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

(पारंपरिक कहाणी)

# १.२ सोमवारची कहाणी

(महादेवाच्या गाभाऱ्यातील खुलभर दुधाची कहाणी)

आटपाट नगर होतं. तिथं एक राजा होता. तो मोठा शिवभक्त होता. त्याच्या मनात आलं आपल्या महादेवाचा गाभारा दुधानं भरावा. परंतु हे घडेल कसं? अशी त्याला चिंता पडली. प्रधानाने युक्ती सांगितली, दवंडी पिटली, "गावातल्या सर्व माणसांनी आपल्या घरचं सगळं दुध घेऊन दर सोमवारी महादेवाच्या देवळी पुजेला यावं" सर्वांना धाक पडला. घरोघरची माणसं घाबरून गेली. कोणाला काही सुचेनासं झालं. त्याप्रमाणे घरात कोणी दूध ठेवलं नाही. वासरांना पाजलं नाही. मुलांना दिलं नाही. सगळं दूध देवळांत नेलं. गावचं दूध गाभाऱ्यात पडलं तरी देवाचा गाभारा काही भरला नाही.

एक म्हातारी बाई तिनं घरचं कामकाज आटपलं. मुलाबाळांना खाऊ घातलं. लेकीसुनांना न्हाऊ घातलं. गाईवासरांना चारा घातला. त्यांचा आत्मा थंड केला. आपल्या जिवाचं सार्थक व्हावं म्हणून थोडं गंध व फूल घेतलं. चार तांदुळाचे दाणे घेतले. दोन बेलाची पानं घेतली आणि वाटीभर दूध घेतले. दुपारी म्हातारीबाई देवळात आली. मनोभावे पूजा केली. थोडं दूध नैवेद्याला ठेवलं. देवाची प्रार्थना केली. "जय महादेवा, नंदिकेश्वरा, राजानं पुष्कळ दूध तुझ्या गाभाऱ्यात घातलं; तुझा गाभारा भरला नाही. माझ्या वाटीभर दुधाने भरणार नाही. पण मी आपली खुलभर दूध भक्तीनं अर्पण करते." असे म्हणून राहिलेले दूध गाभाऱ्यात टाकलं, ही म्हातारी पुन्हा परत निघाली तोच चमत्कार झाला. म्हातारी परतताच गाभारा भरला. हे गुरवाने (पुजारी) पाहिलं. राजाला कळवलं. पण गाभारा कसा भरला त्याचा काही केल्या पत्ता लागेना. दुसऱ्या सोमवारी राजानं देवळात शिपाई बसवला तरीही शोध लागला नाही. पुढे तिसऱ्या सोमवारी राजाच देवळात बसला. म्हातारीच्या वेळेस गाभारा भरला. राजानं तिचा हात धरला. म्हातारी घाबरू लागली. तिला अभयवचन दिलं. तिनं कारण

सांगितलं. “तुझ्या आज्ञेनं काय झालं? वासरांचे मुलांचे आत्मे तळमळले. मोठ्या माणसांचे हालहाल झाले, ते देवाला आवडले नाही. म्हणून गाभारा भरला नाही.” याला युक्ती काय करावी? ‘मुल वासरांना दूध पाजावं. घरोघर सगळ्यांनी आनंद करावा. देवाला भक्तीनं पंचामृती स्नान घालावं. दुधाचा नैवेद्य दाखवावा. म्हणजे देवाचा गाभारा भरेल. देव संतुष्ट होईल’ त्याने म्हातारीला सोडून दिलं. गावात दवंडी पिटवली.

चौथ्या सोमवारी राजानं पूजा केली मुलाबाळांना गाईवासरांना दूध ठेवून उरलेलं दूध देवाला वाहिलं. हात जोडून प्रार्थना केली. डोळे उघडून पाहताच देवाचा गाभारा भरून आला. राजाला आनंद झाला. म्हातारीला इनाम दिलं. लेकीसुना घेऊन म्हातारी सुखानं नांदू लागली.

ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सफळ संपूर्ण.

(पाऊस पडला नाही तर महादेवाचा गाभारा दुधाने भरावा, अशीही एक समजूत आहे. मुलाबाळांना दूध देऊन शिल्लक राहिलेलं दूध गाभाऱ्यात नेऊन टाकल्यावर गाभारा भरतो. वासरांचं, मुलांचं दूध तोडून गाभारा भरणं योग्य नाही, असंही काही लोककथांतून गोष्टीतून सूचित केलं गेलं आहे - संपादक.)

(पारंपरिक कहाणी)

# १.३ शुक्रवारची कहाणी

(पैशापेक्षा मनाची श्रीमंती मोठी हा संदेश देणारी गोष्ट)

आटपाट नगर होतं. तिथं एक गरीब ब्राह्मण रहात असे. तो दारिद्र्याने फारच त्रासलेला होता. त्याची बायको शेजारणीच्या घरी एके दिवशी बसायला गेली. तिनं आपल्या गरिबीचं गाणं गायलं. शेजारणीने तिला शुक्रवारचं व्रत संगितलं. ती म्हणाली, " बाई, शुक्रवारचं व्रत कर. हे शुक्रवार तू श्रावणापासून धर. सारा दिवस उपास धरावा. संध्याकाळी सवाष्णीला बोलवावं. तिचे पाय धुवावेत, तिला हळद कुंकू द्यावं. तिची ओटी भरावी. नंतर आपण जेवावं. याप्रमाणे वर्षभर करून त्याचं उद्यापन करावं." असं सांगितलं. ही घरी आली. देवाची प्रार्थना केली व शुक्रवारचं व्रत करू लागली.

त्याच गावात तिचा भाऊ रहात असे. तो एके दिवशी सहस्त्रभोजन घालू लागला. साऱ्या गावाला आमंत्रण केलं. बहिणीला काही बोलावलं नाही. ती गरीब, तिला बोलावलं तर लोक हसतील. दुसऱ्या दिवशी भावाकडे ब्राह्मणांचे थवेच्या थवे येत आहेत; पोटभर जेवत आहेत. बहिणीनं विचार केला, आपला भाऊ सहस्त्रभोजन घालतो आहे, बोलावणं करायला विसरला असेल. तर आपल्या भावाच्या घरी जायला काही हरकत नाही. सोवळं नेसली. बरोबर मुलांना घेतलं आणि भावाच्या घरी गेली. पुष्कळ पानं मांडली होती. एका पानावर जाऊन बसली. शेजारच्या पानावर मुलांना बसवलं. सर्व पानं भरली. सारं वाढणं झालं; तेव्हा तिच्या भावानं तूप वाढायला घेतलं. वाढता वाढता तिच्या पानाशी आला. ती खाली मान घालून बसली होती. तिला हाक मारली, "ताई, ताई, तुला वस्त्र नाही, पात्र नाही, दागिना नाही; तुझ्याकडे पाहून सगळे लोक हसतात. ह्यामुळे मी तुला काही बोलावलं नाही. आज तू जेवायला आलीस ती आलीच, आता उद्या काही येऊ नकोस!" असं सांगून पुढे गेला. ही आपली तशीच जेवली. हिरमुसलेलं तोंड केलं. मुलांना घेऊन घरी आली.

दुसऱ्या दिवशी मुलं म्हणू लागली, 'आई, आई, मामाकडे जेवायला चल!' बहिणीनं विचार केला, कसा झाला तरी आपला भाऊच आहे, बोलला म्हणून काय झालं? आपली गरिबी आहे, तर आपल्याला ऐकून घेतलंच पाहिजे. आजचा दिवस आपला बाहेर पडला, तितकाच फायदा झाला. असं म्हणून त्याही दिवशी ती भावाकडे जेवायला गेली. भाऊ तूप वाढता वाढता तिच्या पानाशी आला. ती खाली मान घालून बसली होती. भावानं तिला हाक मारली, "ताई, ताई, भिकारडी ती भिकारडी आणि सांगितलेलं ऐकत नाहीस. तू जेवायला येऊ नको म्हणून काल सांगितलं. आज आपली डुकरिणीसारखी पोरं घेऊन आलीस. तुला लाज कशी नाही वाटली? आज आलीस तर आलीस, उद्या आलीस तर हात धरून घालवून देईल!" तिने ते मुकाट्यानं ऐकून घेतलं. जेवून उठून चालती झाली. पुन्हा तिसऱ्या दिवशी जेवायला गेली. भावाने पाहिलं. हात धरून घालवून दिली. फार दु:खी झाली. देवाची प्रार्थना केली. सारा दिवस उपवास घडला. देवीला तिची दया आली. दिवसानुदिवस सुखाचे दिवस दाखवू लागली.

असं करता करता वर्ष झालं. बाईचं दरिद्र गेलं. पुढे एके दिवशी ती शुक्रवारचं उद्यापन करू लागली. भावाला जेवायला बोलावलं. भाऊ मनात ओशाळला. बहिणीला म्हणू लागला, "ताई, ताई, तू उद्या माझ्या घरी जेवायला ये. नाही काही म्हणू नको. घरी काही जेवू नको. उद्या तू आली नाहीस तर मी काही तुझ्या घरी येणार नाही!" बहिणीनं "बरं' म्हटलं. भावाच्या मनातलं कारण जाणलं. दुसऱ्या दिवशी लवकर उठली. वेणीफणी केली, दागदागिने ल्यायली. उंची पैठणी नेसली. आणि भावाकडे जेवायला गेली. भाऊ वाट पहातच होता. ताई आली तशी तिचा हात धरला. पाटावर बसवलं. पाय धुवायला ऊन पाणी दिलं. पाय पुसायला फडकं दिलं. इतक्यात जेवायची पानं वाढली. ताईचं पान आपल्या शेजारी मांडलं. भाऊ जेवायला बसला. ताईनं आपली शालजोडी काढून बसल्या पाटी ठेवली. भाऊ पाहू लागला. मनात कल्पना केली की, शालजोडीने उकडत असेल, म्हणून काढीत असेल. नंतर ताई आपले दागिने

काढू लागली. बसल्या पाटी ठेवू लागली. भावाने विचार केला, जड झाले म्हणून काढीत असेल.

नंतर ताईने भात कालवला. मोठासा घास केला, तो उचलून सरीवर ठेवला. भाजी उचलून ठुशीवर ठेवली. लाडू उचलून चिंचपेटीवर ठेवला. जिलबी उचलून मोत्यांच्या पेंड्यावर ठेवली. भावाने विचारलं, “ताई, ताई, हे काय करतेस?’”

ती म्हणाली, “दादा, मी करते हेच बरोबर आहे. जिला तू जेवायला बोलावलंस तिला मी भरवते आहे.”

भावाला काही समजेना. त्यानं तिला पुन्हा सांगितलं, “ अगं ताई, तू आता जेव तरी".

तिनं सांगितलं, “बाबा, हे माझं जेवण नाही. हे ह्या लक्ष्मीचं जेवण आहे. माझं जेवण होतं ते मी सहस्त्रभोजनाच्या दिवशी जेवली.’’

इतकं ऐकल्यावर भाऊ मनात ओशाळला. तसाच उठला आणि बहिणीचे पाय धरले. झाल्या अपराधाची क्षमा मागितली. बहिणीने क्षमा केली. नंतर दोघं जेवली. मनातली अढी काढून टाकली. दोघांनी देवीचे आभार मानले. भाऊ बहिणीकडे जेवायला गेला. तिला आनंद झाला. देवीने जसं तिला समर्थ करून आनंदी केलं, तसं तुम्हा आम्हाला करो. ही साठा उत्तराची कहाणी, पाचा उत्तरी सफळ संपूर्ण.

[ "सुबोध वाचन', पुस्तक ६ वे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. ३-५]

# १.४ मरीआईची कहाणी

(स्वच्छता संदेश देणारी गोष्ट)

ऐका देवी, मरीआई तुमची कहाणी.

एक आटपाट नगर होते. तेथे एक राजा होता. राजा मोठा पुण्याचा, मोठा भाग्याचा. त्याचे राज्य म्हणजे सुखाचे. त्रास नाही, चिंता नाही, रोग नाही, राई नाही. सारे लोक सुखी होते. पण होता होता काय झाले, एकदा आषाढचा महिना आला. झिम झिम पाऊस पडू लागला. शेते हिरवीगार दिसू लागली. गाई गुरांना चारा झाला. दूध दुभत्याची चंगळ झाली. शेतातली कामे संपली. मुली माहेरी आल्या. आई-बापांना आनंद झाला. माझी नव्या नवसाची, भरल्या चुड्याची बाबी आली. तिला कोठे ठेवू असे झाले. रोज नवी नवी पक्वान्ने होऊ लागली. नगरात आनंदी आनंद होता. खाण्या-पिण्यास ताळतंत्र राहिले नाही.

इकडे काय झाले, मरी आई देवीने हे सारे पाहिले. तिने मनात विचार केला, राजाच्या राज्यात जावे. लगाबगा उठली. तिने कुंकवाचा मळवट भरला. केस मोकळे सोडले; आणि अनवाणी चालत निघाली. नगराच्या वेशीपाशी आली आणि तिने आत डोकावून पाहिले. तिला मोठा आनंद झाला. नगरात ती शिरली. मरीआई रस्तोरस्ती फिरू लागली. प्रत्येक घरांत डोकावून पाही. घाण दिसली की शिरली तिथे. लोक पटापट मरू लागले. मोठा कहर गुदरला. रोज पाच-पन्नास माणसे मरू लागली. वार्ता राजाच्या कानी गेली. राजाला फार वाईट वाटले. माझी प्रजा कोण मारते? मी कोणाचे वाईट केले नाही. देवाच्या सेवेत अंतर केले नाही. गोरगरिबांना नाडले नाही. कर वाटेल तसे घेतले नाही. मग देवाचा माझ्या राज्यावर कोप का? राजा दु:खी झाला. त्याला खाणे पिणे रुचेना. सुखविलास सुचेना. तो देवाला शरण गेला व म्हणाला, “ देवा नारायणा, चुकले माकले क्षमा कर; माझी प्रजा सुखी कर.” राजाच्या स्वप्नात देव येऊन म्हणाला. “राजा, राजा, उठ अरे. निजतोस काय? तुझ्या नगरात मरीआईचा

फेरा आला आहे ना?' तिला नगराच्या बाहेर घालव. ती उद्या तुझ्या राजवाड्याकडे येणार आहे."

राजा उठला. मरीआईसाठी त्याने तयारी केली. सर्व राजवाडा झाडून झुडून स्वच्छ केला होता. रांगोळ्या घातल्या होत्या. धूप-दीप लावले होते. चंदनाचे सडे घातले होते. घाणीचे कोठे नाव नव्हते. राजा मरीआईची वाट पहात बसला.

मरीआई त्या दिवशी लवकर उठली. राजवाड्याकडे जाऊ लागली. परंतु राजवाड्यात स्वच्छता पाहून दु:खी झाली. राजाने विचारले, "आई, आपण दु:खी कष्टी का? सेवेत काय कमी आहे?"

मरीआई म्हणाली, " काय सांगू राजा, मला तुझ्या राज्यात फारसे खायला मिळाले नाही."

राजा म्हणाला, "आई, इतकी प्रजा बळी पडली, तरी तू सुखी नाहीस?"

मरीआई म्हणाली, " राजा, माझी भूक तुला माहीत नाही. मी जाते तेथे गावाची म्हसणवटी करते. तुझ्या नगरात मला पोटभर खायला मिळाले नाही. मी उपाशी आहे."

राजाने विचारले, "आई, माझे राज्य तुला आवडले का? "

"नाहीरे, तितकेसे काही आवडले नाही. तुझे लोक फार स्वच्छतेने राहतात. घर स्वच्छ दिसले की, माझे कपाळ उठते."

राजा बोलला, "मग मरीआई, माझी इतकी माणसे कशी मेली?"

मरीआई म्हणाली, " राजा थोडी घरे माझ्या आवडीची सापडली, त्या घरांत मी गेल्ये. दारातच उकिरडे होते, तेथे घाणीची रास साचलेली. माशांचे घोंघावणे चाललेच होते. राजा, ह्या जागा मला फार आवडल्या. काही लोकांनी खाण्यांत धरबंद ठेवला नव्हता. वाटेल तेव्हा, वाटेल तितके, हवे तसे खात होते. त्यांच्यावर मी कृपा केली, त्यांना मी नेले."

राजाने मनात विचार केला, मरीआईला स्वच्छता का आवडत नाही? ठीक आहे. राजाने नगरात दवंडी पिटवली.'घरे दारे स्वच्छ ठेवा. दारात उकिरडे करू नका. शिळे पाके खाऊ नका. माशा अन्नावर बसू देऊ नका. पाणी गाळून,

तापवून प्या. जेवताना लिंबाचा सडळ हाताने उपयोग करा.”

दवंडी लोकांनी ऐकली व लोक तसे करू लागले. मरीआई संतापली. रागाने खवळली; जशी नागीण! ती राजाकडे गेली व म्हणाली, “राजा मोठा रे कपटी आहेस तू. मला भूकेने मारतोस! मी तुझ्यावर कोपले आहे. तुझ्या राज्यात फिरून म्हणून येणार नाही.”

राजाला आनंद झाला. लोक सुखी झाले. तुम्ही आम्ही पण सुखी होऊ या. ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण !

[ "बालसुधा', पुस्तक ३ रे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. ५७-५९]

# १.५ महादेव पार्वतीची जन्मकथा

(उत्पत्ती कथा)

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. इथे फक्त पाणीच पाणी होते. त्या पाण्यातील एका कमलपत्रावर देवाचा जन्म झाला. देवाने एकदा आपला खांदा घासला तर त्यातून कावळ्याची अन् खेकड्याची निर्मिती झाली. कावळा देवाच्या खांद्यावर येऊन बसला. देवाने कावळ्याला एक कामगिरी सोपविली. कुठूनही आणि कसेही करून माती आणायची. कावळा फिर-फिर फिरला. पण त्याला कुठेच माती मिळाली नाही. तो थकून खेकड्याच्या पाठीवर विश्रांतीसाठी बसला. तेव्हा खेकडा आणि कावळा आपापसात गोष्टी करू लागले. कावळ्याने आपली व्यथा त्याला सांगितली. तेव्हा खेकडा म्हणाला, "देवाने माझी पाठ कडक केली तर मी माती शोधून आणतो. खेकड्याने थेट समुद्राच्या तळाशी बुडी मारली. तेथे त्याला गांडूळ सापडले. त्या गांडूळाच्या मानेला पकडून खेकड्याने त्याला समुद्राच्या वर आणले. आजही गांडूळाच्या मानेवर खेकड्याने पकडल्याची खूण दिसते. तेव्हा गांडूळाने आपल्या तोंडातून माती काढून देवाला दिली. देवाने ती माती समुद्रावर पसरली. तेव्हा जमिनीचे तुकडे समुद्रावर दिसू लागले. देव त्या जमिनीवर चालू लागले आणि काय गंमत ! देवाच्या हातावर एक मोठा फोड आला. त्या फोडातून महादेव पार्वती जन्माला आले.

# १.६ खंडोबाच्या बानूची गोष्ट

(जेजुरीच्या खंडोबाची चरित्रकथा)

लईदी झालं या गोष्टीला. तवाच्या येळेला इंद्रदेव बसलंवतं सभेला. दरबार खच्चून भरलेला. सरदार मानकरी, भालदार चोपदार जमा झालेले. तशी इंद्रदेवाच्या मनात काय आलं कुणाला माहीत, आपल्या साती लेकींना त्यानं दरबारात बोलीवलं. विचारलं कसं, ''तुम्ही कुणाच्या कोण पोरी हो ?'' तशी ''आम्ही तुमच्या लेकी देवा'' पोरींनी असं उत्तर केलं. मग इंद्रानं पुन्हा विचारलं, "कुणाच्या जिवावर जगता तुम्ही ?'' सहा पोरींनी त्यावर उत्तर केलं, "तुमच्या तुमच्या !'' पण सातवी ठसक्यानं बोलली, "मी माझ्या जिवावर जगते !'' त्यासरशी इंद्रदेवाला राग आला. संतापाच्या भरात त्यानं तिला शाप दिला, ''भूलोकी चालती हो.'' आणि जादूची कांडी फिरवून तिला चार महिन्यांची पोरगी केली ! आता काय करावं ? दरबार विचारात पडला. पण इंद्रानं एका सरदाराला हुकूम सोडला, ''घेऊन जा हिला. द्या फेकून जंगलात.'' तशी त्या बाबानं हिला उचलली. पोटाशी धरली. घरला आला. सोन्यानं मढविलेल्या पेटीत हिला निजवली. पेटी डोक्यावर घेतली, मोठ्या चुंबळीवर अधांतरी ठेवली. निघाला. आला स्वर्गलोकातून धरणीवर. गाठलं जंगल. तिथे ही पेटी ठेवली न् त्या पोरीला 'तुझं उदंड होईल' असा आशीर्वाद देऊन माघारी फिरला.

इकडे तोवर ढोल नाच करणारे धनगर त्या जंगलात आले. दिवसा उजेडी काय गा चकाकतंय म्हणाले न् त्या पेटीजवळ आले. बघतात तर सोन्यानं मढविलेली पेटी. ती बघून देवाची कृपा झाली म्हणाले. नाचगाणं उभं गाव आलं, आणिक एकानं जिवाचा धडा करून ती पेटी उघडली तर आत तान्हं बाळ मुठी चोखीत निजलेलं ! ह्यांना बघून खुदकिनी हसतेलं. तशी तिथे केवढा आनंद उभा राहिला ! त्या धनगरानं हे बाळ उचललं. गेला घरला घेऊन. स्वत:च्या पोरागत जोपासना केली. बिरुबा देवाची रोज पूजा बांधली.

होता होता ह्या पोरीला आकरावं सरून बारावं लागलं. तशी रीतीरिवाजाप्रमाणे त्या धनगरानं हिचं लगीन करायची भाषा केली. तर हिनं सांगितलं, ''काळजी नको. माझा नवरा मी बघीन.'' बिचारा धनगर गप्प बसला. हिनं मग शंकराची पूजा बांधली. स्वतः तप करीत बसली. एक दिवस मग तिथं एक म्हातारा साधू आला. त्यानं हिला खडाव दिले. हे खडाव पायात घाल म्हणाला. म्हणशील तिथं ते तुला नेतील असं बोलला अन् स्वतः निघून गेला. हिनं मग प्रचीती घ्यावी म्हटलं. खडाव पायात घातले. माझ्या पतिदेवांचेकडे चल म्हणाली. तर काय चमत्कार म्हणावा ? खडाव हिला घेऊन जे उंच उंच उडाले ते थेट जेजुरीला येऊन थांबले ! तिथं मल्हारीदेव न् म्हाळसा रंगमहालात निजले होते. मल्हारीच्या रूपानं ही भाळली. काजळकडांना बोट घातलं. पदराची धांदोटी फाडली. बोटानं कायसंसं लिहिलं. खुदकन हसली आणि खडावांच्या संगतीनं पुन्हा आपल्या घरी आली. शंकराच्या पूजेला बसली.

इकडे तोवर मल्हारीला जाग आली. त्यानं ती पत्रिका वाचली. त्याचं भान गेलं. हाडबडून उठला. म्हाळसा दचकली. तिनं मग सारीपाटाचा डाव मांडला. मल्हारी खेळायला बसला. पण जाग्यावर चित्त होतंच कुठं ? सारखा डाव हारत चालला. ह्यानं डाव हरला तर जंगलात निघून जायचं अन् तिनं हरला तर गळक्या घागरीनं रांजण भरायचे अशी पैज लागली. डाव म्हाळसानं जिंकला. मल्हारी राज्य सोडून जंगलात निघून गेला.

वाटेत देऊळ लागलं. तिथल्या देवानं दर्शन दिलं. म्हाताऱ्याचं रूप घेऊन अशा अशा ठिकाणी जा म्हणाला. मल्हारी म्हातारा झाला. जख्खड म्हातारा हं! ... गेला बानूच्या घरी. धनगरांच्या वाड्यावर. ह्याला मग तिनं हुकूम सोडला. मेंढरं वळीत बैस. "हा'' "बरं' म्हणाला. गेला मेंढरं घेऊन. पण होता होता एक दिवस काय झालं की, मल्हारीनं मेंढरांचं कातडं न् मांस बाजूला केलं ! त्यासरशी रक्ताचा-पाट वाहायला लागला!... बानू घाबरून उठली. त्याच्यावर कडाडली, ''हे काय केलंस ? भरून दे माझी मेंढरं.'' तशी हा शांतपणे म्हणाला,

‘‘देतो देतो. पण माझी बायको झालीस तरच ! त्या सरशी हिचा जळफळाट झाला. दातओठ खात ती ओरडली, “मेल्या कुणाशी बोलतोयस तू हे ?’’ तो म्हणाला, “तुझ्याशी ! तुझ्याशी ! का?’’ आणि मग दोघांची ही जुंपली ! शेवटी रडकुंडीला येऊन बानू लग्नाला तयार झाली. मग मल्हारीनं ती मेंढरं जशीच्या तशी साजिवंत केली. दोघांचं लगीन लागलं. लोकरीचे हार एकमेकांनी एकमेकांना घातले. धनगर सुखावला. बानू रड रड रडली. काय पदरात पडलं म्हणून तिनं सारी दुनिया डोक्यावर घेतली.

तेवढ्यात मेघ गरजले. वीज कडाडली. आभाळ दणाणलं न् मल्हारी पहिलं रूप घेऊन बानूपुढे उभा राहिला !....त्या दर्शनानं बानूचा आनंद गगनात मावेना. राजी-खुषीनं आपली थरारती काया तिनं मल्हारीच्या पुढ्यात झोकली न् घोड्यावर स्वार होऊन दोघेजण जेजुरीला निघून गेले..."

(सरोजिनी बाबर : भांगतुरा)

# १.७ बकासुराची गोष्ट

(महाभारतातील कथानकावर आधारित)

कौरवांनी पांडवांना कुंतीसह ठार मारण्याचा प्रयत्न केला. पण ते वाचले. पांडव ब्राह्मणाचा वेश धारण करून एकचक्रा नगरीत एका ब्राह्मणाच्या घरी येऊन राहिले. कुंती व भीम घरी रहात. बाकीचे चौघे पांडव भिक्षा मागून आणीत. ते ती भिक्षा कुंतीकडे देत. त्यातला एक भाग ती भीमाला देई आणि बाकीच्या भागात कुंती, धर्मराज, अर्जुन, नकूल आणि सहदेव आपला उदरनिर्वाह करीत.

एके दिवशी ते चौघे पांडव नेहमीप्रमाणे भिक्षेसाठी बाहेर पडले. काही वेळाने ब्राह्मणाच्या घरात आक्रोश चाललेला कुंतीने ऐकला. तिने आत जाऊन चौकशी केली. ब्राह्मणाच्या कुटुंबावर कोणते संकट आले आहे, हे तिला समजले.

नगराबाहेर एका गुहेत अत्यंत क्रूर आणि भयंकर बलाढ्य असा बकासूर नावाचा राक्षस रहात होता. तेरा वर्षांपूर्वी त्याने त्या शहरावर हल्ला केला होता. राजा पळून गेला आणि सर्व राज्य बकासुराच्या हाती आले. त्याला भूक लागली की, तो गुहेतून बाहेर येई, आणि त्या शहरातील पुरुष, स्त्रिया व मुले यांना ठार मारून खात असे. त्याची धाड केव्हा येईल याचा नेम नव्हता. लोकांनी धास्ती घेतली. सर्व उद्योग थंडावले. तेव्हा लोकांनी त्या बकासुराशी एक करार केला. आठवड्यातून एकदा त्यांनी बकासुराला भरपूर भात, दही,पक्वान्न, मांस पाठवायचे. त्याने ते खावे; त्याबरोबरच गाडीचे दोन बैल, व गाडी आणणारा माणूस यांचाही फडशा उडवावा. मात्र गावात येऊन वाटेल तशी कत्तल करू नये. बकासुराने परकीय हल्ल्यापासून नगरीचे रक्षण करावे. ही व्यवस्था कित्येक वर्षे चालू होती. आज अन्नाची गाडी घेऊन जाण्याची पाळी त्या ब्राह्मणावर आली होती. म्हणून घरात रडारड चालली होती.

ही सर्व हकिगत कुंतीला सांगून ब्राह्मण म्हणाला, “आम्ही गरीब आहोत, आम्हांला पैसे देऊन आमच्याबद्दल दुसऱ्या कोणास पाठविता येणार नाही.

तेव्हा आम्हा सर्वांना एकदम खाऊन तरी त्याची भूक भागू देत. आता यातून सुटकेची आशा नाही."

कुंतीने हे सारे ऐकले. तिला वाईट वाटले. तिने भीमाला हे सांगितले. तो गाडीबरोबर जाण्यास तयार झाला. कुंती पुन्हा ब्राह्मणाकडे आली आणि म्हणाली, " भटजीबुवा, तुम्ही भिऊ नका. मला पाच पुत्र आहेत. त्यांच्यापैकी एक अन्न घेऊन बकासुराकडे जाईल.

ब्राह्मणाला अत्यंत आश्चर्य वाटले. त्याने कुंतीचे म्हणणे ऐकले नाही. तो म्हणाला, "माझ्याकरिता दुसऱ्याचा बळी देणे मला नको.'' कुंती म्हणाली, "माझ्या मुलाच्या अंगी अचाट बळ आहे. त्याने असले अनेक राक्षस मारले आहेत. तो मंत्रामुळे मिळालेल्या शक्तीने बकासुराला ठार मारील. मात्र तुम्ही हे कोणासही सांगू नका. तुम्ही सांगितले तर त्याची शक्ती नाहिशी होईल."

पुष्कळ दिवसांनी आपणांस राक्षसाबरोबर दोन हात करण्याची संधी मिळणार, म्हणून भीमास आनंद झाला. भिक्षेहून इतर चौघे पांडव परत आले. भीमाला आनंदात पाहून त्यांना आश्चर्य वाटले. आपल्या आईकडून त्यांना त्याच्या आनंदाचे कारण समजले. तेव्हा धर्मराजास आईचा राग आला. आईने भीमाचा जीव उगाच धोक्यात घातला असे त्याला वाटले. त्याने आईला तसे सांगितले देखील. तेव्हा कुंती म्हणाली, "आपण इतकी वर्षे या ब्राह्मणाच्या घरी राहात आहोत, त्याच्या उपकाराची फेड करणे हा आपला धर्म आहे. तेच मानवाचे भूषण. भीमाच्या शक्तीबद्दल आपली खात्री आहे. भ्यायचे काही कारण नाही. आश्रयदात्याच्या उपयोगी पडण्यात धन्यता आहे.

हे ऐकून धर्मराज काहीच बोलला नाही. आईचे म्हणणे त्याला पटले. नंतर नगरातील लोक ब्राह्मणाच्या घरी आले. त्यांच्या बरोबर भात, दही, पक्वान्न, मांस यांनी भरलेली दोन बैलांची गाडी होती. भीम बाहेर येऊन गाडीत बसला; आणि त्याने गाडी गुहेच्या रस्त्याने चालवली. पुढे वाजंत्रीवाले निरनिराळी वाद्ये वाजवीत होते. ही मिरवणूक नेहमीच्या जागी आल्यावर नागरिक परत गेले. एकटा भीम काय तो गाडीवर राहिला.

त्याने समोर पाहिले. गुहेपुढचा भाग मांस, हाडे, तुटलेले अवयव, रक्त, कृमी-कीटक यांनी भरलेला होता. वर गिधाडे घिरट्या घालीत होती. भीमाने गाडी थांबवली. त्याला वाटले की, बकासुराची व आपली झुंझ सुरू झाली की, आपल्या सर्व अन्नाचा नाश होऊन जाईल. बकासुराला मारल्यावर स्नान वगैरे होईपर्यंत आपणास काही खाता येणार नाही. तेव्हा आधीच आपण हे खाऊन टाकावे. असा विचार करून तो भराभर अन्न खाऊ लागला.

आधीच उशीर झाल्यामुळे बकासूर रागावला होता. भीम अन्न खात आहे, असे पाहून तो भयंकर सांतापला. भीमाने बकासुराला पाहिले. अजस्त्र देह, लाल दाढीमिशा, केसांच्या जटा झालेल्या. आणि या कानापासून त्या कानापर्यंत पसरलेला जबडा, हे सर्व भीमाने पाहिले. पण आपले खाणे चालूच ठेवले. बकासूर भीमावर चालून आला. भीमाने त्याला डाव्या हाताने दूर सारले. बकासूराने भीमाच्या पाठीवर गुद्दे लगावले. “छान अंग रगडतो आहेस हं" असे भीम हसत म्हणाला. बकासुराने एक वृक्ष उपटून भीमावर फेकला. भीमाने डाव्या हाताने तो बाजूला ढकलला, आणि आपला उद्योग चालूच ठेवला. सर्व अन्न खाऊन झाल्यावर ढेकर देत भीम उठला. त्याची आणि बकासुरची झुंज सुरू झाली.

एखाद्या मुलाने चिंध्यांच्या बाहुलीशी खेळावे, तसा भीम त्या राक्षसाशी खेळला. त्याने त्याला खाली आपटले, आणि वर उडवले. शेवटी त्याने त्या राक्षसाला जमिनीवर पाडले. आणि त्याच्या पाठीवर गुडघा टेकून त्याची हाडे मोडली. बकासूर रक्त ओकून मरण पावला. बकासूराची शेवटची किंकाळी तेवढी हवेत घुमत राहिली. भीमाने ते प्रचंड धूड ओढत नगराच्या वेशीपाशी आणून टाकून दिले. तो ब्राह्मणाच्या घरी आला. त्याने स्नान केले व आनंदित झालेल्या आपल्या मातेला साष्टांग नमस्कार केला.

[ "बालसुधा', पुस्तक ३ रे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. ७०-७३]

# १.८ लंकादहन

(रामायणातील कथाभागावर आधारित गोष्ट)

रावणाने कपटाने सीतेला पळवून नेल्यानंतर रामाला फार दु:ख झाले. त्याने सगळीकडे सीतेचा शोध सुरू केला. परंतु सीतेचा शोध लागेना. शोध करीत करीत राम-लक्ष्मण किश्किंधा नगरीपर्यंत येऊन पोहोचले. तेथे 'वाली' या नावाचा वानर राज्य करीत होता. त्याने आपला धाकटा भाऊ 'सुग्रीव' याच्यावर फार अन्याय केला होता. रामाने सुग्रीवावरील अन्याय दूर करण्याकरिता वालीला ठार मारले आणि सुग्रीवाला राज्यावर बसविले. या उपकाराची फेड म्हणून सुग्रीवाने रामाला मदत करण्याचे कबूल केले. त्याने आपले आणि इतर वानर राजांचे सारे सैन्य गोळा केले. लाखो वानर वीर गोळा झाले.

सुग्रीवाने वानरांच्या टोळ्या करून सीतेच्या शोधासाठी निरनिराळ्या दिशांना पाठविले. आपला मित्र मारुती याला त्याने दक्षिण दिशेकडे पाठविले. दक्षिणेत शोध घेत घेत मारुती समुद्रापर्यंत आला. सीता लंकेत असल्याची बातमी वानर सैन्याला मिळाली होतीच. परंतु समोर शंभर योजने लांब असा समुद्र पसरला होता. आता कसे करावे, असा वानर सैन्यापुढे पेच पडला. परंतु एवढ्यात मारुतीने समुद्रावरून उड्डाण केले व तो थोड्याच वेळांत लंकेत येऊन पोहोचला. लंकेत शोधता शोधता मारुतीला अशोक वनात सीता आढळली. तिच्या भोंवती अक्राळविक्राळ राक्षसिणींचा पहारा होता. सीता फार दु:खी दिसत होती.

संधी साधून मारुतीने रामाची अंगठी सीतेला दिली. तिलाही ओळख पटली. तिचा आनंद गगनात मावेना. तिने रामाला "आपली लवकर सुटका करा" असा निरोप मारुतीबरोबर पाठविला.

मारुतीच्या आगमनाची बातमी एवढ्या वेळांत सर्व लंकेत पोहोचली. राक्षसांनी पुष्कळ प्रयत्न केल्यानंतर मारुती त्यांच्या हाती सापडला. या

माकडाला चांगलीच अद्दल घडविली पाहिजे, असा राक्षसांनी विचार केला. त्याच्या शेपटीला चिंध्या बांधून ती पेटवून दिली म्हणजे हे माकड आपोआप जळून मरेल असे त्यांनी ठरविले. त्यांनी मारुतीच्या शेपटीला चिंध्या गुंडाळण्यास सुरुवात केली. राक्षसांची फजिती करण्यासाठी मारुतीने आपली शेपटी लांबविण्यास प्रारंभ केला. कितीही चिंध्या गुंडाळल्या तरी पुरेनात. शेपटी आपली वाढतेच आहे! अखेर कंटाळून राक्षसांनी मारुतीची शेपटी पेटवून दिली.

मारुतीनेही त्या दुष्ट राक्षसांची खोड मोडण्याचे ठरविले. पेटलेल्या शेपटीने तो लंकेतील एका वाड्यावरून दुसऱ्या वाड्यावर धडाधड उड्या मारू लागला. एकामागून एक वाडे पेट घेऊ लागले. थोड्याच वेळांत सारी लंका पेटली. राक्षसांची एकच धावपळ सुरू झाली. फजिती झालेल्या राक्षसांची गंमत बघत बघत मारुती समुद्राकांठी आला. त्याने समुद्राच्या पाण्यात आपली शेपटी विझवली आणि पुन्हा उड्डाण करीत तो रामाकडे परत आला. सीतेचा शोध लागला हे ऐकून रामाला अतिशय आनंद झाला.

[ "बालसुधा', पुस्तक ३ रे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. १०५-१०७]

# १.९ देवदुताचे वरदान

(बगळे एका पायावर उभे का राहतात, त्याची कथा)

एक घनदाट जंगल होतं. जंगलाच्या मधोमध एक विशाल नदी वाहात होती. या नदीमुळे जंगलाचे दोन भाग पडले होते. एक पूर्वेचा आणि दुसरा पश्चिमेचा. पूर्वेच्या जंगलात हंसांची तर पश्चिमेच्या जंगलात बगळ्यांची वसती होती.

हंस आणि बगळ्यात पटत नव्हतं. ते कधीच एक झाले नव्हते. उलट ते एकमेकांचा द्वेष करीत. कधी चुकून हंस किंवा बगळा इकडच्या तिकडे आला गेला तर तो बिचारा यमसदनीच जाई ! आणि मग दोन्ही जंगलात मोठी लढाई सुरू होई. सर्वत्र अशांतता पसरे. जंगल त्या धुमश्चक्रीत दुमदुमून उठे. इतका हाहाकार होई की झाडेझुडपं आक्रोश करीत, लतापर्ण ढसढसा रडत, चंद्र-चांदण्या भीतीने दडून बसत. देवदेवताही थरकापू लागत !

एकदा एका बगळ्याचं छोटसं बालक उडता उडता नकळत पूर्वेच्या जंगलात गेलं, त्याला नुकतेच पंख फुटले होते. अंगात नीट उडण्याइतपत बळ आलं नव्हतं. त्यामुळे ते थकून गेलं. इतकं की त्याला जागचं उठता येईना. धापा टाकीत ते नदीच्या किनाऱ्यावर बसतं न बसतं तोच हंसांच्या बालकांनी त्याला घेरलं. दोनचार शहाण्या हंसांनीही बालकांना साथ दिली. बिचारं बगळ्याचं बालक भीतीनं घाबरून गेलं. आपले इवलाले नाजुक पंख फडफडवून त्यानं उडण्याचा प्रयत्न केला पण ते उडू शकलं नाही. त्यानं जोरजोराने ओरडण्याचा यत्न केला पण त्याची आर्त हाक पश्चिमेच्या जंगलापर्यंत पोचू शकली नाही. गयावया करून ते त्या हंसांच्या बालकांकडे जीवदानाच्या आशेनं भिरभिर पाहू लागलं. आसवांनी जमीन न्हाऊन निघाली. परंतु त्याची कीव कुणाला आली नाही. त्यानं मोठ्या प्रयासानं सारं बळ एकवटून आपल्या आईला हाक देण्याचा पुन्हा प्रयत्न केला, तोच त्याची कोमल मान मुरगळली गेली. एक बारीकसा चीत्कार चोचवाटे हवेत तरंगला आणि मग ते बगळ्याचं बालक तडफडत

तडफडत मरण पावलं !

त्या बालकाच्या हृदयस्पर्शी मृत्यूची वार्ता बगळ्यांना कळली तेव्हा त्यांना मनस्वी दुःख झालं ! त्यांचा आत्मा तळमळून उठला, अंगातील रक्त सळसळलं, त्या बालकाच्या झालेल्या अमानुष हत्येची भयंकर चीड आली. झालेल्या अन्यायानं त्यांची अंतःकरणं पेटली ! एक विराट सभा भरून बगळ्यांनी एकमुखाने प्रतिज्ञा केली, जोपर्यंत हंस आमचं बालक जिवंत करणार नाहीत तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. याचा बदला आम्ही सहस्र पटीने घेतल्याशिवाय राहणार नाही !'

या भीषण प्रतिज्ञेने केवळ संपूर्ण जंगलच नव्हे तर आकाशपाताळ थरारून गेलं, वाराही कंपित झाला. झाडेझुडपही थरथरा कापू लागली. आता काय घडणार, या चिंतेनं देवदेवताही गांगरून गेल्या !

पूर्ण बदला घेतल्याशिवाय अन्नपाणी ग्रहण करायचं नाही असा निर्धार करून, हजारो टोळ्यांच्या जमावानिशी बगळ्यांनी हंसांवर चाल केली. त्यावेळी सर्व हंस ऐषआरामात लोळत पडले होते. आपलं कोण काय बिघडविल या घमेंडीत ते सुखाची झोप घेत होते. पण त्या भयाण अंधाऱ्या रात्री बगळ्यांनी बेगुमानपणे त्यांच्यावर हल्ला केला. बाणाच्या वेगानं ते त्यांच्यावर तुटून पडले. तेव्हा ते सर्व हंस घाबरून गेले आणि जीव वाचविण्यासाठी सैरावैरा पळू लागले. परंतु त्यांची लहान लहान बालकं बिचारी कुठे पळणार ? त्यांच्यात धाव घेण्याची शक्ती ती कुठली ? एकाएकी हे काय होत आहे हेच त्या माऊल्यांना काही कळेना ! बगळ्यांनी त्या बालकांना गराडा घालून पकडले, ती बालके धाय मोकलून रडू लागली. आईबापाला हाक देऊ लागली. पण त्यांच्या मदतीसाठी कोण धावणार ? कोण आपले प्राण घालवणार ? प्रत्येकाला आपापल्या जिवाची चिंता !

परंतु, हंसांच्या बालकांचा तो हृदयद्रावक आक्रोश ऐकून, एक म्हातारा बगळा म्हणाला, "बंधूंनो, हंसांची ही छोटी छोटी बालकं आपल्याच बालकांसारखी आहेत. आईवडिलांच्या दुराचारामुळे तीही तशी वागू लागली.

त्यामुळेच आपलं जीवाभावाचं बालक आपल्याला सोडून गेलं ! जे व्हायचं ते झालं. आता या बालकांचा सूड घेणं, बदला घेणं हा काही आपला माणुसकीचा धर्म नव्हे. बदला घ्यावयाचा तो त्यांच्या शूर म्हणविणाऱ्या आईबापांकडून घेऊ या. बालकांना सोडून दिलं पाहिजे. एकानं पाप केलं याचा अर्थ दुसऱ्यानंही करावं असं नाही. परंतु जे असं पाप करतात त्यांना धडा देणेही आवश्यक आहे."

म्हाताऱ्या बगळ्याचा सल्ला सर्वांनी मान्य केला. त्यांनी हंसांच्या बालकांना ताब्यात घेऊन सुरक्षित ठेवले आणि मग जोरदार लढाई सुरू झाली. अनेक हंस मारले गेले, रक्ताची नदी वाहू लागली. काही हंसांना बगळ्यांनी आपल्या ताब्यात घेतलं. त्या रात्री सर्वत्र भयाण वातावरण पसरलं. जसजशी रात्र वाढत गेली तसतशी भयानकताही वाढत गेली. बगळ्यांनी बालकांना जसे संरक्षण दिले तसेच हंसींनाही ताब्यात घेऊन सुरक्षित ठेवले होते. पण पुढे बगळे आपले काय करणार या भीतीने हंसी रात्रभर रडत होत्या. त्या पळून जाऊ नयेत म्हणून काही बगळे पहारा देत होते. रात्रीचे भेसूर वातावरण काळजाचे पाणी करी. आकाशात तारे चमकत पण तेही भीतीने इकडे तिकडे दडी मारीत.

रात्रीचे बारा वाजले. इतक्यात एक तारा तुटून पडताना आढळला. त्याच्या लख्ख प्रकाशानं संपूर्ण जंगल प्रकाशमान झालं. जेथे आपलं बालक तडफडून मेलं अगदी त्याच जागी तो तारा पडल्याचे बगळ्यांनी पाहिलं. पाहाता पाहाता त्या जागी एक देवदूत उभा असल्याचं आढळलं. बगळ्यांनी त्याला लवून प्रणाम केला. आशीर्वाद देत तो देवदूत त्या बगळ्यांना म्हणाला, “मी तुम्हाला प्रसन्न झालो आहे. तुम्ही हंसांची बालकं नि त्यांच्या मातांचं रक्षण केलं. मागा, तुम्हाला काय हवं ते !!”

हात जोडून बगळे विनम्रतेने म्हणाले, “देवा, आम्ही गरीब आहोत. मोठ्या कष्टानं आम्ही आपला उदरनिर्वाह चालवितो. जाणूनबुजून आम्ही कोणाला त्रास देत नाही. तरी हे देवा, आम्हावर मोठा अन्याय होतो. आमचे रक्षण करा. आमचं बालक आम्हाला परत द्यायला लावा. आणि असे काही करा की ज्यामुळे

आम्ही आपले पोट सहजतेने भरू शकू.''

''ठीक !!'' देवदूत म्हणाला, मग जेथे बगळ्याचं बालक मरण पावलं होतं तेथे त्यानं चुटकी वाजविताच ते बालक जिवंत झालं ! त्याला पाहून बगळ्यांचा आनंद गगनात मावेना. त्यांनी ताब्यात ठेवलेल्या हंस, हंसी आणि त्यांच्या बालकांना मुक्त केलं. तेव्हा देवदूत हंसांना म्हणाला, "तुम्ही सर्व मानस सरोवरात राहायला जा. तेथे तुम्हाला मोत्यांचा चारा मिळेल. पण तुम्ही तेथे अहिंसेचे प्रतीक बनून राहा. आपल्या आत्मज्ञानानं न्याय-अन्यायाची काटेकोर छाननी करीत जा. पाणीमिश्रित दुधाचे पाणी वेगळे व शुद्ध दूध वेगळे करण्याचं सामर्थ्य तुम्हाला प्राप्त होवो ! जा.''

देवदूताची आज्ञा मानून सर्व हंसांनी मानस सरोवराकडे प्रयाण केलं. नंतर देवदूत बगळ्यांना म्हणाला, "आता तुम्हाला कोणी त्रास देणार नाही. या नदीच्या पात्राकडे पहा. जेथे जेथे जल संचित राहील तेथे तेथे तुमचे खाद्य तुम्हाला प्राप्त होईल, हां, पण एक अट आहे. तुम्हाला डोळे मिटून एका पायावर उभे राहावे लागेल, तेव्हाच तुमचे खाद्य तुम्ही प्राप्त करू शकाल !

बगळ्यांनी देवदूताची अट मान्य केली. देवदूत अंतर्धान पावला. बगळे आणि हंस यांचा झगडा कायमचा मिटला. सगळीकडे शांतीचे वातावरण पसरले!

आजही बगळे देवदूताची अट पाळत आहेत. ते डोळे मिटून नदीच्या पात्रात किंवा तळ्याच्या काठी एका पायावर उभे असलेले दिसतात आणि मग त्यांची इच्छा सफल होते !

(ना. रा. शेंडे : लोकसाहित्य संपदा)

# १.१० इमाम आणि देवदूत

**(इराणची लोककथा)**

शेकडो वर्षांमागची गोष्ट. इराण देशातील एका पहाडाजवळ एका विस्तीर्ण तलावाच्या काठी एक लहान झोपडी होती. त्या झोपडीत एक गरीब धनगर, त्याची बायको, व इमाम नावाचा त्यांचा आठ-दहा वर्षांचा एक लहान मुलगा, ही रहात असत. या तिघांनाही पोटाकरता संबंध दिवस राबावे लागे. धनगर व त्याची बायको पहाडावर जाऊन सरपण गोळा करीत व त्याच्या मोळ्या बांधून त्या जवळच्या शहरात नेऊन विकीत. त्याचप्रमाणे त्यांचा हा मुलगा इमाम सकाळी उजाडल्याबरोबर आपल्या शेळ्यांना जवळच्या माळरानावर चरावयास नेई व संध्याकाळी दिवस मावळण्याच्या सुमारास परत येई.

एक दिवस नेहमीप्रमाणे सूर्यास्ताच्या वेळी इमाम शेळ्या वळवीत आपल्या झोपडीकडे आला. आईने वाढून ठेवलेली भाकर त्याने खाल्ली व मग झोपडीच्या दाराशी येऊन त्याने बाहेर नजर फेकली. रात्र झाली होती. आकाशात पौर्णिमेचा चंद्र प्रकाशत होता. त्याचे स्वच्छ पिठासारखे चांदणे सभोवती सगळीकडे पसरले होते. ते पाहून इमामचा चेहरा प्रफुल्लीत झाला. त्याने झोपडीतले एक पुस्तक उचलले व आनंदाने बाहेर तलावाच्या काठी धाव घेतली.

थोड्याच वेळात त्या चांदण्याच्या प्रकाशात ते पुस्तक वाचण्यात तो अगदी गढून गेला. तासामागून तास जाऊ लागले. चंद्र हळू हळू मावळतीला वळू लागला. रात्र संपत आली. पण इमामला किती वेळ झाला याचे भानही नव्हते, इतके त्याचे मन पुस्तक वाचण्यात रमून गेले होते.

इतक्यात आकाशात संचार करणाऱ्या एका देवदूताची दृष्टी त्या मुलाकडे गेली. देवदूत आकाशातून खाली उतरला व इमामच्या अगदी जवळ येऊन उभा राहिला. आपल्यासमोर देवदूत उभा आहे, असे पाहताच इमाम आश्चर्यचकित

झाला. उठून त्याने देवदूताला भक्तिभावाने वंदन केले.

“बाळ, तू कोण आहेस? मध्यरात्र उलटून गेली. तो पहा चंद्र पहाडाखाली उतरू लागला. आता थोड्या वेळाने सूर्योदय होईल; तरी तू अजून इथे वाचीत बसला आहेस हे कसे?” देवदूताने कनवाळू स्वरात विचारले.

“फरिश्ता, माझे नाव इमाम. माझे आईबाप व मी त्या जवळच्या झोपडीत राहतो. माझा सबंध दिवस शेळ्या वळविण्यात जातो. रात्रीच तेवढी पुस्तके वाचायला मला फुरसत मिळते. आम्ही फार गरीब आहोत. दिव्यात घालयला तेल नाही. त्यामुळे ज्या दिवशी असे शुभ्र चांदणे पडले असेल, त्या दिवशी मी चांदण्यात येऊन पुस्तक वाचीत असतो.” - इमामने उत्तर दिले.

त्याची ही ज्ञानार्जनाची लालसा पाहून देवदूताला त्याचे फार कौतुक वाटले. त्याचप्रमाणे त्याच्या गरिबीबद्दल त्याला दयाही आली. नंतर थोडा वेळ विचार करून देवदूत इमामला म्हणाला, “बेटा, विद्येबद्दल तुला वाटत असलेली एवढी गोडी पाहून मला फार संतोष वाटला. मी देवदूत आहे. मला कोणताही चमत्कार घडवून आणता येतो, हे तुला माहीतच आहे. चल,तर जवळ ये, तुझ्या मस्तकावर मी माझा एक जादूचा श्वास सोडतो. त्या श्वासासरशी आत्ताच्या आता एका क्षणात जगातील सर्व ज्ञानभांडाराचा तुला लाभ होईल; आणि मग तुझी गरिबी, पोटाकरिता सबंध दिवसभर तुला करावे लागणारे हे कष्ट, रात्रभर जागून थोडं थोडं ज्ञान मिळविण्याकरता तुला करावी लागणारी ही मेहनत, या सगळ्या गोष्टी टळतील.”

यावर त्या लहान मुलाने काय उत्तर दिले असेल बरे?

कृतज्ञतेच्या स्वरात इमाम देवदूताला म्हणाला, “मेहरबान! आपल्या कृपाळूपणाबद्दल मी फार आभारी आहे. पण मला क्षमा करा. आपण देऊ केलेली ही देणगी मला स्वीकारता येत नाही. आपण केलेल्या चमत्कारामुळे जगातले सगळे ज्ञानभांडार जरी मला प्राप्त झाले, तरी त्याची मला खरी गोडी वाटणार नाही. माझ्या मनाला त्यामुळे खरे सुख लाभणार नाही. पण त्या ज्ञानभांडारातला थोडासा अंश जरी मी स्वप्रयत्नाने प्राप्त करून घेतला, तरी

तेवढ्याने माझ्या हृदयाला कायमचा आनंद लाभेल. माझ्या सबंध आयुष्यभर टिकणारा एक सुखाचा ठेवाच मला मिळाल्यासारखा होईल.''

त्या एवढ्याशा मुलाचा विचारीपणा व स्वाभिमान पाहून देवदूताला त्याचे अधिकच कौतुक वाटले. त्याने प्रेमाने इमामला जवळ घेतले, मायेने त्याच्या पाठीवरून हात फिरविला व पुन्हा विचारले, " बाळ, ज्ञानसंपादनाबद्दलची तुझी ही उच्च भावना पाहून मी तुझ्यावर संतुष्ट झालो आहे. मी केलेल्या चमत्काराने तुला ज्ञानप्राप्ती करून घ्यायची नसेल, तर त्याबद्दल माझा आग्रह नाही. पण तुला कोणती तरी देणगी दिल्यावाचून माझे समाधान होणार नाही. तरी तुला हवी असलेली कोणतीही एखादी वस्तू माग पाहू."

देवदूताच्या ह्या शब्दांना इमामने उत्तर दिले, " परवरदिगार, आपला कृपाप्रसाद म्हणून एखादी वस्तू मला आपल्याला द्यावयाची असेल, तर एका गोष्टीची मला फार जरूर आहे, तेवढी द्या. काळोख्या रात्री चांदण्यांचा प्रकाश नसल्याने मला पुस्तक वाचणे शक्य होत नाही. तरी अशा दिवशी दिव्यात घालायला मला थोडे तेल मिळेल असे करा. म्हणजे दिव्याच्या प्रकाशात मला वाचता येईल."

देवदूताने त्याची ही छोटीशी मागणी मोठ्या संतोषाने मान्य केली, हे सांगावयास नको.

देवदूताच्या दैवी सामर्थ्याने आपोआप प्राप्त होणारे जगातले सर्व ज्ञानभांडार स्वीकारण्याचे त्याने नाकारले. दिव्याच्या प्रकाशात वाचायला मिळावे म्हणून त्याजकडे तेल मागितले. असा हा एका गरीब धनगराचा मुलगा इमाम, पुढे मोठेपणी "इमाम घिझाली' या नावाने प्रसिद्धीला आला. इराण देशातच नव्हे तर साऱ्या जगभर एक ज्ञानी संत म्हणून त्याची ख्याती पसरली.

[ "बालसुधा', पुस्तक ५ वे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. ३-६]

# १.११ पोप आणि नोकर

**(रशियन लोककथा)**

एका गावात एक पादरी (धर्मगुरू) राहत होता. त्याने एक नोकर ठेवला होता. अनेक वर्षांपर्यंत चांगल्या रीतीने काम करण्याबद्दल नोकराने त्याच्याशी करार केला होता. जर कराराप्रमाणे त्याने बरोबर काम केले नाही, तर त्याच्या पाठीचे पेटीच्या आकाराचे चामडे काढण्यात येईल, आणि जर का नोकराने आपली नोकरी चांगल्या रीतीने केली तर हाच व्यवहार पादरी साहेबांबरोबर करण्यात येईल. यापूर्वी पोप साहेबांजवळ पुष्कळ नोकर येवून गेले होते. पण कुणीही टिकू शकला नव्हता.

वेळ भराभर निघून जात होता. पोप साहेबांनी पाहिले की, नोकर प्रत्येक काम सुंदर आणि व्यवस्थित रीतीने पार पाडीत आहे. पोप महाराज समजून गेले की, हा नोकर त्यांना संकटांनी वेढून टाकणार आहे. त्यांनी नोकरापासून आपला बचाव करण्यासाठी एक मार्ग काढला.

गावा शेजारच्या जंगलात फार मोठ्या संख्येने अस्वले राहत होती. त्याने नोकराला एक अस्वल पकडून आणण्यास सांगितले. नोकर जंगलात गेला व त्याने एक अस्वल पकडून आणले. घरी येताच त्याने पोपला विचारले- "पोप महाराज, कुठे ठेवू या अस्वलास?" पोप भयंकर संकटात पडला. त्याने आपली सुटका करून घेण्यासाठी - "अस्वलास गाडीला बांधून घे आणि माझे कर्ज वसूल करण्यासाठी जा. माझ्या कर्जदार प्राण्यात एक भूत आहे. ते डोहात राहते, समजलास?" पोपच्या आदेशानुसार नोकर डोहाजवळ गेला. त्याने अस्वलास सोडले आणि आपल्याजवळ फिरू दिले. त्याच्याजवळ ताण होता. त्याची तो दोरी तयार करू लागला. भूताचा मुलगा पाण्याच्या बाहेर आला. त्याने नोकरास विचारले -'काका, काका, तुम्ही हे काय तयार करीत आहात ? ' "दोरी तयार करतो . दोरीने डोहाच्या सर्व किनाऱ्यांना बांधून घेईन. आणि तुम्हा

सर्व भूतांना पाण्याच्या बाहेर काढेन."

भूताचा मुलगा अगदी तत्परतेने पाण्यात शिरला आणि वृद्ध भूताला त्याने सांगितले-

'बाबा, ये बाबा, ! मी आता वर गेलो होतो, किनाऱ्यावर तिथे एक माणूस दोरी तयार करीत होता. मी त्याला विचारले "तुम्ही काय करीत आहात?", तेव्हा तो म्हणाला, "मी या दोरीने डोहाच्या घड्यांना बांधून ठेवणार आहे. कारण की तुम्हा सर्व भूतांना बाहेर काढावयाचे आहे."

वृद्ध भूत म्हणाले - "तू पुन्हा त्याच्याजवळ जा आणि विचार की त्याला शेवटी काय पाहिजे आहे ?"

याच सुमारास नोकराने खड्डा खोदून त्यावर आपली टोपी ठेवली. तिच्या तळव्यास त्याने एक छिद्र केले होते.

भुताचा मुलगा बाहेर आला आणि त्याने विचारले -"तुम्हास काय पाहिजे?"

'ही टोपी सोन्याने भरून दे !'

भूताचा मुलगा परत आपल्या बापाजवळ गेला व त्याने नोकराची गोष्ट सांगितली.

वृद्ध भूत म्हणाले - 'ठीक आहे, पण त्याला सांग की, तुला लांब धावेमध्ये मला जिंकावे लागेल.'भूताचा मुलगा नोकराजवळ आला. नोकराजवळ एक ससा होता. भूताच्या मुलाने त्यास शर्त सांगितली.

नोकर म्हणाला-"माझ्या सारख्याला तुझ्याबरोबर धावणे कसे काय बरे वाटेल. माझ्याजवळ एक छोटासा मुलगा आहे तोच तुला धावेत हरवून टाकेल."

भूताचा मुलगा आणि ससा धावू लागले. ससा एकामागून एक उड्या मारत दृष्टिआड झाला. भूताच्या मुलाला त्याच्या पावलांची चिन्हे देखील दिसली नाहीत. भुताचा मुलगा आपल्या बापाजवळ परत आला व म्हणाला 'बाबा,त्याच्याजवळ एक बोटभर मुलगा आहे. तो माझ्याबरोबर धावला आणि मला मागे सोडून दृष्टिआड झाला.'

वृद्ध भूताने त्याला पुन्हा परत पाठवून म्हटले की, "त्याच्याशी कुस्ती

जिंकण्याची शर्त ठेव."

भूताचा मुलगा परत नोकराजवळ आला व त्याने कुस्ती जिंकण्यासाठी शर्यत ठेवली. नोकर म्हणाला-"तू माझ्याबरोबर कुस्ती खेळू शकणार नाहीस. प्रथम तू माझ्यासोबत असलेल्या या वृद्ध इसमाशी कुस्ती खेळ. तोच तुला चीत करेल." नोकराने त्याला अस्वलाजवळ पाठविले.

अस्वल आणि भूताच्या मुलात कुस्ती झाली. अस्वलाने भूताला अशी बुक्की मारली की ते आकाशात उडून गेले. भूत भिवून आपल्या वृद्ध पित्याकडे गेले. वृद्ध भूताने त्याच्या हातात एक काठी देवून सांगितले , त्याला म्हणावे की, जा या काठीला हवेत जास्त उंच फेकेल तोच जिंकेल.

भूत, नोकराजवळ आले आणि त्याने आपली शर्त मांडली. नोकर म्हणाला, 'ठीक आहे. प्रथम तू फेक.' भूताने काठीला ढगांपर्यंत फेकले. नोकराची पाळी आली, तेव्हा त्याने भूताला म्हटले-'तू आपले डोळे लावून घे. कारण की, तुला दिसणार नाही इतक्या उंच मी काठीला फेकणार आहे.'

भूताने आपले डोळे बंद केले आणि नोकराने काठीला झुडपांमध्ये फेकून दिले. जेव्हा भूताने डोळे उघडले तेव्हा नोकर म्हणाला- 'पाहिले ! मी काठी इतक्या उंच फेकली की, ती दृष्टीने दिसूच शकत नाही.'

भूत परत आपल्या वृद्ध पित्याकडे गेले व त्याने आपल्या अपयशाचा सर्व वृत्तांत सांगितला.

आता त्यांच्यापुढे कोणताच मार्ग नव्हता आणि म्हणून ते टोपीत सोने भरू लागले. पण टोपी तर खड्डयावर ठेवली होती, आणि तिच्या मध्यभागी छिद्र केले होते. त्यामुळे खूप सोने टाकून देखील टोपी भरली नाही. शेवटी खड्डा जेव्हा सोन्याने भरला, तेव्हा नोकराने 'पूर्ण करा' असे म्हटले. त्याने सर्व सोने आपल्या गाडीत भरले, अस्वलास गाडीला बांधले आणि तो पोप महाराजांच्या घराकडे निघाला.

सोन्याने भरलेली गाडी पाहून पोप महाराज आश्चर्यचकित झाले. घरी आल्याबरोबरच नोकराने विचारले - 'पोपजी ! सोने आणले आहे" . आणि पोप

म्हणाला-"अस्वलास माझ्या घोड्याशेजारी ठेव." नोकराने तसेच केले. पण परिणाम उलट झाला. अस्वलाने घोड्याला खाऊन टाकले.

आता पोप महाराजांची छाती धड्धड् करू लागली. त्याला कळून आले की, आपण जाता या संकटातून आपली सुटका करून घेऊ शकत नाही. त्याने पळून जाण्याचा पक्का विचार केला. आपल्या पत्नीच्या मदतीने त्याने डबल रोटीचे तुकडे वाळवून एका पिशवीत भरले. नोकर देखील मूर्ख नव्हता. त्याने पोप महाराजांची युक्ती ओळखून घेतली. त्याने त्या थैलीतून डबलरोटीचे तुकडे काढून घेतले व त्यात आपण स्वतः बसला.

रात्र होताच पोप आणि त्याची पत्नी घर सोडून पळत निघाले. जाता जाता दोघेही थकले. तेव्हा पोपानी म्हणाली-"थोडा वेळ आराम करू आणि डबलरोटी खाऊन घेऊ."

नोकर थैल्यांमधून बोलला. 'हे पोपजी आणि पोपानीजी मी इथे आहे.'

त्यांना वाटले तो आमच्या मागे लागला आहे आणि म्हणून ते आणखी जोराने पळू लागले. पळता-पळता थकल्यानंतर त्यांनी पुन्हा आराम करण्याचे आणि पोटात काही तरी घालण्याचे ठरविले. पण नोकराने पुन्हा तोच आवाज लावला- 'हे पोपजी आणि पोपानीजी मी इकडे आहे.' ते दोघेही पुन्हा धावू लागले. पण कुठपर्यंत धावतील ? शेवटी थकून जाऊन एका ठिकाणी बसून जेवण करण्याचा त्यांनी विचार केला. ते थांबले व पिशवी उघडून पहातात तर तिथे त्यांना नोकर साहेब विराजमान दिसले.

नोकर बाहेर निघाला व म्हणाला- 'बोला पोपजी,आता तुमच्या पाठीच्या पेटीएवढे चामडे काढून घेऊ आणि हातोड्याच्या वाराने डोके पिटून काढू काय?'

पोप महाराज हात जोडून क्षमा मागू लागले. नोकराने त्याला क्षमा केली आणि ते सर्व मिळून एका कुटुंबातील लोकांसारखे राहू लागले.

# १.१२ रेव्हन काळा कसा झाला?

(रेव्हन आणि गनूक यांच्यामध्ये रंगणाऱ्या सामन्याची पुराणकथा)

एकदा समुद्रात होडी वल्हवत असताना रेव्हनला गनूक भेटला. त्यावेळी गनूकला त्याचे सामर्थ्य दाखवायची आणि रेव्हनवर त्याचे वर्चस्व सिद्ध करून दाखवायची इच्छा झाली. म्हणून त्याने त्याची जादूची टोपी काढून टाकली आणि सगळ्या समुद्रावर दाट धुके निर्माण केले. हे धुके इतके दाट होते की, रेव्हन त्याच्या होडीचे पुढचे टोकही पाहू शकत नव्हता!

रेव्हनला एकटे मागे ठेवून गनूक त्याची बोट वल्हवत रेव्हनपासून लांब गेला. रेव्हन तेव्हा पांढऱ्या रंगाचा होता. काहीच पाहू शकत नसल्यामुळे रेव्हन समुद्रावर खूप वेळ भरकटत राहिला. शेवटी तो घाबरून गेला आणि आपल्या मेव्हण्यावर ओरडला, "गनूक कुठे आहेस तू ?"

पण तरीही गनूक गप्पच राहिला आणि रेव्हन होडी वल्हवत कोणत्या मार्गाने गेला आहे आणि कुठे हरवला आहे, हे शांतपणे लक्ष देऊन पाहत राहिला.

रेव्हन गनूकला सतत हाका मारीत राहिला. धुके नाहीसे करण्याविषयी आणि तो स्वतः कुठे आहे ते कळवण्याविषयी विनवू लागला.

"काय झाले आहे ? तू का बरं रडत आहेस ?" गनूकने मदत मागणाऱ्या आपल्या मेव्हण्याला - पांढऱ्या रंगाच्या रेव्हनला विचारले.

गनूकने टोपी परत स्वतःच्या डोक्यावर ठेवली आणि त्याच क्षणी धुके नाहीसे झाले.

रेव्हनने त्याच्याकडे बघितले आणि म्हटले, "तू माझ्यापेक्षा जास्त सामर्थ्यवान आहेस."

"तू केव्हापासून या जगात राहत आहेस ?" गनूकने विचारले.

रेव्हनने त्यावर उत्तर दिले की, "हे जग अस्तित्वात येण्यापूर्वीच त्याचा जन्म झालेला आहे."

मग गनूकला विचारले, "तो किती काळापासून या जगात राहत आहे ?"

गनूकने उत्तर दिले, "जगणारा जीव खालच्या जागेतून वर आला तेव्हापासून."

यानंतर "दैकी नूव' नावाच्या बेटावरील स्वतःच्या घरी गनूकने रेव्हनला जेवायचे आमंत्रण दिले. दोघे मिळून मेजवानीचे जेवण जेवले आणि गनूकने त्या पांढऱ्या पक्ष्याला ताजे पाणी देऊ केले. रेव्हन यापूर्वी कधीही असे पाणी प्याला नव्हता. कारण त्याच्या जगामध्ये फक्त समुद्राचेच पाणी होते. केवळ गनूकजवळच हे ताजे पाणी होते. ते पाणी त्याने एका भल्या मोठ्या प्रचंड दगडी विहिरीत ठेवले होते. त्या विहिरीवर दगडाचेच जड झाकण होते.

रेव्हनला त्या पाण्याची चव खूपच आवडली. त्याला ते पाणी अजून जास्त प्यायचे होते. पण गनूक रेव्हनपेक्षा जास्त सामर्थ्यवान असल्यामुळे त्याच्याकडे पाणी मागायला रेव्हन घाबरला. जेवल्यानंतर रेव्हनने त्याला त्याच्या मूळ वंशाच्या गोष्टी सांगितल्या आणि जगाच्या निर्मितीबाबतही तो त्याच्याशी बोलला. गनूकने बराच वेळ ऐकले पण मग तो दमून गेला. ताज्या पाण्याचे रक्षण करण्यासाठी तो मोठ्या दगडाच्या झाकणावर झोपून गेला.

जेव्हा रेव्हनचा मेव्हणा गाढ झोपून गेला, तेव्हा रेव्हनने कुत्र्याची थोडी विष्ठा घेतली आणि गनूकच्या खाली ठेवून दिली. हे सगळे करून तो थोडे चालत लांब गेला आणि त्याने गनूकला हाक मारली.

"जागा हो ! आणि बघ, तू काय करून ठेवले आहेस ते !" रेव्हन किंचाळला.

गनूकने जेव्हा रेव्हनचे हे शब्द ऐकले तेव्हा त्याने उडी मारली आणि घाण पाहिली. स्वतः घाण केली असे समजून ती स्वच्छ करण्यासाठी तो समुद्राकडे धावत गेला. रेव्हनने आता वेळ वाया घालवला नाही. तो विहिरीकडे पळत गेला आणि त्याने ते शक्तिशाली झाकण वर उचलले. आधी तो थोडे पाणी प्याला. जेव्हा त्याची तहान भागली तेव्हा त्याने तोंडभरून पाणी घेतले. धुराड्यातून उडायला सुरुवात केली. पण गनूकने त्याला थांबवले.

गनूकने जाळ तयार केला आणि रेव्हनने त्याला फसवल्यामुळे त्या

जाळाबरोबर निर्माण होणाऱ्या धुरात त्याला लपेटून टाकले. परिणामतः त्या धुराने रेव्हनचा रंग काळा झाला. तो याच्या आधी नेहमीच पांढरा होता. शेवटी गनूकला त्याच्या मेव्हण्याची दया आली आणि त्याने रेव्हनला जाऊ दिले.

रेव्हन "नास' नदीवर असलेल्या त्याच्या घराकडे उडून गेला. उडताना त्याने चोरून घेतलेल्या ताज्या पाण्याचे थेंब पडत राहिले. जिथे जिथे हे पाणी पडले, तिथे तिथे जमिनीवर सरोवरे, नद्या आणि ओढे तयार झाले.

(उषा प्रभुणे, अरुण प्रभुणे [मूळ लेखक : जॉन इस्मेल्सर] : उत्तर ध्रुवाजवळील अलास्कन लोककथा)

# १.१३ रेव्हनची गोष्ट

(सूर्य, चंद्र आणि ताऱ्यांची जन्मकथा)

सुरुवातीच्या काळात रात्रीच्या वेळी सूर्य, चंद्र आणि तारे नव्हते. रेव्हन हा सर्वशक्तिमान होता. त्याने सगळ्या प्राण्यांना, माशांना आणि माणसांना निर्माण केले होते. तरी ते सगळे प्राणी अंधारातच राहत होते. कारण त्याने अजून सूर्य तयार केला नव्हता.

एके दिवशी रेव्हनला समजले की नास नदीच्या काठी एक प्रमुख राहतो. त्याला अशी एक विलक्षण मुलगी आहे जिच्याकडे सूर्य, चंद्र आणि तारे आहेत. ते तिने देवदाराच्या लाकडापासून बनवलेल्या पेटीमध्ये ठेवले आहेत. नदीकाठचा हा प्रमुख आणि त्याचे लोक तिचे आणि त्या पेटीचे उत्तम प्रकारे रक्षण करीत असतात.

रेव्हनच्या लक्षात आले की, त्या खेड्यातील लोकांकडून त्यांची ही संपत्ती युक्तीनेच चोरून घेतली पाहिजे. म्हणून त्याने स्वतःचे रूपांतर त्या प्रमुखाच्या नातवंडाच्या रूपात करायचे ठरवले. त्यांच्या घराजवळ असणाऱ्या उंच झाडावर रेव्हन उडत गेला आणि स्वतःला हेमलॉक झाडाच्या सुईसारख्या टोकदार पानामध्ये बदलवून घेतले. त्यानंतर टोकदार पानाच्या स्वरूपात तो त्या मुलीच्या पाणी प्यायच्या भांड्यात पडला. प्रमुखाच्या मुलीने ते भांडे पाण्याने भरून घेतले आणि त्या पानासकट ती पाणी प्यायली. अशा प्रकारे त्या प्रमुखाच्या मुलीच्या शरीरात प्रवेश करून रेव्हनने बाळाचे रूप घेतले. नंतर योग्य वेळी त्या तरुण मुलीने एका मुलाला जन्म दिला. तो मुलगा प्रमुखाचा अत्यंत लाडका होता. मुलगा मागेल ते त्याला मिळू लागले.

सूर्य, चंद्र आणि तारे देवदाराच्या एका सुंदर कोरलेल्या लाकडी पेटीत ठेवलेले होते. ती पेटी घराच्या लाकडी जमिनीवर ठेवलेली होती. त्यासाठी तो नातू सतत रडायला लागतो. आजोबांनी जेव्हा ती पेटी नातवाला दिली, तेव्हाच

त्याचे रडणे थांबले. चंद्र आणि तारे त्या नातवाला खेळायला मिळाल्यावर लगेच त्याने चंद्र आणि ताऱ्यांना धुराड्यातून वर सोडून दिले. ते आकाशात सगळीकडे विखुरले. हे पाहून त्याच्या आजोबांना अत्यंत वाईट वाटले. पण नातू असा चुकीचा वागला तरी तो त्यांचा अत्यंत लाडका असल्यामुळे त्यांनी त्याला शिक्षा केली नाही.

चंद्राला आणि ताऱ्यांना मोकळे केल्यावर तो लहान सूर्यप्रकाश असलेल्या पेटीसाठी रडायला लागला. त्याचे रडणे काही केल्या थांबतच नव्हते. रडून रडून तो मुलगा आजारी पडला. आजोबांना शेवटी ती पेटी त्याला द्यावीच लागली.

नातूरूपी रेव्हन त्या पेटीशी खूप वेळ खेळला. मग अचानक तो परत पक्षी बनला आणि त्या पेटीसकट धुराड्यातून उडून गेला. उडत उडत शेवटी रेव्हन नास नदीवर असलेल्या खेड्यापासून बराच लांब आला. त्या वेळी अंधारात लोक बोलत बसलेले असतात. त्यांचे बोलणे रेव्हनने ऐकले. नंतर तो त्यांना जाऊन भेटला.

"तुम्ही कोण आहात ? तुम्हाला प्रकाश मिळाला तर आवडेल का ?" असे त्या लोकांना रेव्हनने विचारले. ते लोक त्यावर त्याला म्हणाले की, तो खोटे बोलणारा आहे. कुणीही प्रकाश देऊ शकत नाही.

तो खरे बोलत आहे हे दाखवण्यासाठी रेव्हनने कोरीव कामाने सुशोभित केलेली पेटी उघडली आणि सूर्यप्रकाशाला जगात आणले. ते लोक त्यामुळे इतके घाबरले की जगाच्या कानाकोपऱ्यात पळून गेले.

आता जगात तारे असतात, चंद्र आणि सूर्यप्रकाश असतो आणि अंधार फार काळ राहत नाही.

(उषा प्रभुणे, अरुण प्रभुणे [मूळ लेखक : जॉन इस्मेल्सर] : उत्तर ध्रुवाजवळील अलास्कन लोककथा)

# १.१४ अपण्णक जातक

(हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे लागू नये)

. १ .

वाराणशीचे राज्य. राजाचे नाव ब्रह्मदत्त. या राज्यातल्या एका व्यापाऱ्याच्या कुळात बोधिसत्त्वाचा जन्म झाला. बोधिसत्त्व मोठा झाला. देशोदेशी हिंडून व्यापार करू लागला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पावसाळा संपल्यावर वाराणशीचे व्यापारी दूरदेशी व्यापाराला निघण्याची तयारी करीत होते. देवदत्त या दुसऱ्या एका व्यापाऱ्याचा पाचशे गाड्यांचा जथा तयार होता. बोधिसत्त्वाच्याही पाचशे गाड्या तयार होत्या. बोधिसत्त्वाने विचार केला आपल्या दोघांच्या मिळून हजार गाड्या एकाच वेळी निघाल्या तर बैलांच्या चारापाण्याची फरफट होईल. त्यापेक्षा दोघांनी काही दिवसांचे अंतर ठेवून निघणे शहाणपणाचे राहील. त्याने देवदत्तला हा विचार बोलून दाखवला. देवदत्तने स्वतःशी विचार केला आणि तो बोधिसत्त्वाला म्हणाला, तुझा प्रस्ताव योग्य आहे. मी पुढे निघतो, तू ये सवडीने. आणि तो पाचशे गाड्या घेऊन पुढे गेलासुद्धा.

आपण पुढे गेलो तर बैलांना चारापाणी नीट मिळेल एवढाच विचार त्या व्यापाऱ्याने केला नव्हता. आपला माल पहिल्यांदा विक्रीला उपलब्ध झाल्याने भाव पण चांगला मिळेल असा मतलबी हिशेब त्याने केला होता. देवदत्तचा हा विचार ऐकून त्याच्या साथीदारांना आनंद झाला. त्याने केलेल्या हिशेबी निवडीतली ही चलाखी बोधिसत्त्वाच्या जथ्याला कळल्याशिवाय राहिली नाही. त्यांनी ती बोधिसत्त्वाच्या कानावर घातली. आता आपल्याला पहिल्यापेक्षा कमी भाव मिळेल याची हळहळ साथीदारांनी व्यक्त केली.

बोधिसत्वाने त्यावर आपणच कसे फायद्यात राहू याचं समर्थन केलं. तो म्हणाला, असं पहा, पावसानं खराब झालेल्या रस्त्यांची डागडुजी केल्याशिवाय

देवदत्तला पुढे जाता येणार नाही. नद्या दुथडी वाहत असल्याने त्याला नव्या वाटा शोधाव्या लागतील, जंगलातल्या झऱ्यांचा केरवारा साफ करावा लागेल आणि मगच पुढे जावं लागेल. त्यामुळे आपल्यासाठी मार्ग प्रशस्त करण्याचं काम आपोआपच होणार नाही का? शिवाय भावाचं म्हणाल तर, त्याने एकदा भाव ठरवल्यामुळे किंमतीची वहिवाट पडलेली असेल. आपल्याला घासाघीस करावी लागणार नाही. तेव्हा मागे रहाण्यात आपला तोटा नसून फायदाच आहे.

बोधिसत्वाच्या या युक्तिवादातला शहाणपणा कुणाला नाकारता आला नाही.

. २ .

तिकडे देवदत्त निपाणी जंगलातून वाट काढीत होता. या जंगलात पाणी नसते म्हणून त्याने आपल्या माल भरलेल्या गाड्यांसोबत मोठ मोठे रांजण भरलेल्या गाड्याही सोबत घेतल्या होत्या. या अपर्ण जंगलातून वाट तुडवताना समोरून पांढऱ्या बैलांच्या गाड्यांचा एक ताफा येताना दिसला. गाड्यांवरच्या नोकरमाणसांच्या गळ्यांत कमळांचे हार होते. गाड्या समोरासमोर आल्या. समोरच्या तांड्यातला कमळापती व्यापारी खाली उतरला. देवदत्तही आपल्या गाडीतून खाली उतरला. दोघांनी परस्परांचा परिचय करून घेतला. कमळापती म्हणाला, 'तुमच्या गाड्यांमध्ये हे मोठ्ठाले रांजण कसे काय?' निपाणी जंगलात पाणी नाही, म्हणून आपण हा पाण्याचा साठा सोबत घेतला आहे - देवदत्तने खुलासा केला.

कमळापतीने छद्मी हास्य केले. म्हणाला, "कशाला हे मुक्या जनावरांना फुकटचे ओझे? कुणी सांगितलं तुम्हाला या जंगलात पाणी नाही म्हणून? अहो हा बारमाही पावसाचा पट्टा आहे. आमच्या बैलांकडे पहा. अजून त्यांच्या पाठी ओल्या आहेत. गाडीच्या चांकांना लागलेली चिखलाची पेंड अजून दूर झालेली नाही. पलिकडच्या हिरव्यागार झाडीमंडळाजवळ तर मोठ्ठा तलावसुद्धा आहे. मला वाटतं हे फुकटचं ओझं तुम्ही वाहू नये."

देवदत्तला वाटलं, आपलं खरंच काहीतरी चुकलं आहे. त्याने पाण्याचे

रांजण तिथेच ओतून बैलांचं ओझं हलकं केलं. अपर्ण जंगलात मिळालेल्या ह्या सुखद सल्ल्याने त्याचं मन उल्हसीत झालं आणि त्याने आपला ताफा झाडीमंडळाच्या दिशेने हाकारला.

पण काही केल्या रस्ता सरेना. झाडीमंडळ येईना. सगळे जण तहानेने व्याकूळ झाले. पाण्यावाचून बैलही तडफडू लागले. अखेर जंगलात गाड्या सोडून सगळे पायउतार झाले. सगळ्यांना ग्लानी आली होती. तेवढ्यात कमळापती आणि त्याच्या साथीदार यक्षांनी आपले मूळ रूप धारण केले. या मानवभक्षक यक्षांनी देवदत्त, त्याचे साथीदार, बैल, या सगळ्यांवर ताव मारला. हाडे तिथेच टाकून ते उडत्या चालीची गाणी गात पसार झाले.

. ३ .

देवदत्त व्यापाराला निघून गेल्यानंतर पंधरवाड्याने बोधिसत्व आपला ५०० गाड्यांचा लवाजमा घेऊन त्याच वाटेने कूच करू लागला. त्यानेही सोबत पाण्याचे रांजण घेतले होते. फक्त फरक एवढाच होता की, बोधिसत्व देवदत्तप्रमाणे तांड्याच्या अग्रभागी न रहाता शेवटच्या गाडीत बसला होता. निपाणीच्या जंगलात गाड्या आल्या. समोरून पांढऱ्या बैलांचा, कमळांचे हार घातलेल्या गाड्यांचा ताफा येऊन थांबला. बोधिसत्वाच्या गाडीवानांनी ही वार्ता क्रमाने शेवटच्या गाडीत बसलेल्या बोधिसत्वापर्यंत पोहचवली. त्याने तिथूनच पहिल्या गाडीवानापर्यंत संदेश पोहचवला, "तुम्ही कुणीही ह्या कमळापतीच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. तारतम्याने विचार करा. गाडीच्या चाकांची चिखलाची पेंड, बैलांच्या ओल्या पाठी आणि गळ्यांतले कमळांचे हार ह्या जलखुणा नसून ती मायाजाल निर्माण करण्याची, भ्रमात टाकणारी दुःश्चिन्हे आहेत. जर नुकताच पाऊस पडलेला असेल तर हवेत गारवा असायला हवा होता. आभाळात ढगांची वर्दळ असायला हवी होती. पण असं काहीच नाही. उलट सगळा रखरखाट आहे. समोर दिसणाऱ्या झाडीमंडळाची व तलावाची आपण प्रत्यक्ष खात्री करून घेऊ आणि मगच वाटले तर रांजण तलावात उपडे करू. पण तोपर्यंत या मृगजळावर विश्वास ठेवायला नको."

बोधिसत्वावर पूर्ण विश्वास असणाऱ्या त्याच्या सवंगडी गाडीवानांनी यक्षाच्या युक्तिवादांना भीक न घालता आपल्या गाड्या रेटून पुढे हाकारल्या.

काही अंतर कापून गेल्यावर त्यांना मालाने भरलेल्या पाचशे गाड्या दिसल्या. पण जवळपास ना माणसं ना बैलं. हाडांचे ढीग तेवढे पडलेले होते. बोधिसत्वाने काय घडले असेल याचा खुलासा केला. देवदत्त मायाजालाला भुलला. तारतम्य आणि विवेक गहाण टाकून त्याने परमत जसेच्या तसे स्वीकारले. त्यामुळे त्याची ही दुर्दशा झाली. बोधिसत्वाच्या ह्या खुलाशाने सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला. त्या पाचशे बेवारशी बैलगाड्यातला माल उतरवून आपल्या गाड्यांत भरला. बोधिसत्वाच्या नेतृत्वाखाली योग्य मुक्कामास पोहचला. मालाला उत्तम भाव मिळाला. भरपूर नफा कमवून तांडा वाराणशीला सुखरूप परतला.

(भावानुवाद : रमेश नारायण वरखेडे (रमाकांत अंगुळहुळे)
: ब्रेन टॉनिक मासिक जून २००६)

# १.१५ तंडुलनालि जातक

**(जातककथेचा नमुना)**

ही कथा शास्त्याने जेतवनात राहत असताना लालुदायी येराळा, ज्याला मठ्ठ असे म्हणत असत, त्याला उद्देशून सांगितली.

त्यावेळी दब्ब नावाचा थेर भिक्षुसंघात अन्नवाटपाचा अधिकारी होता. सकाळी भात वाटताना कधीकधी उत्तम तांदळाचा भात तर कधी अगदी वाईट तांदुळाचा भात लालुदायी थेराच्या वाट्याला येत असे. वाईट भात असेल त्या दिवशी तो त्या वाटणाऱ्याला अगदी हैराण करुन टाकायचा. तो म्हणायचा, 'दब्बालीचं वाटप कसं करावं हे कळतं का ? आम्हाला काही कळत नाही की काय ? ' एकदा तो असाच त्या वाढणाऱ्याला बोलत असतांना 'ठीक आहे तर मग. तूच वाटे दे ना' असे म्हणून ते भांडे तिथल्या वाटपाच्या लोकांनी त्याच्या स्वाधीन केले. तेव्हापासून तोच संघात अन्नाचे वाटप करू लागला. पण कुठला भात उंची तांदळाचा आणि कुठला हलक्या तांदळांचा हे त्याला कळत नसे. ह्याप्रमाणे संघात इतक्या अधिक वर्षे घातलेल्या माणसाला उंची तांदुळांचा भात आणि कमी वर्षे घालवलेल्यांना हलक्या तांदुळांचा भात द्यायचा हे ठरलेले होते. त्याप्रमाणे जागा ठरवताना अमुक वर्षाचे या ठिकाणी आणि दुसरे ह्या ठिकाणी असेही त्याने नीट मांडून ठेवले नाही. त्यामुळे एकाच वर्गातले लोक काही इथे तर काही तिथे बसले. कारण अमुकाने अमुक ठिकाणी बसावे अशा खुणा त्याने जमिनीवर नाही तर भिंतीवर रेघा मारून करून ठेवल्या आणि त्यामुळे काही इथे तर काही तिथे अशी पांगापांग झाली.

दुसऱ्या दिवशी वाटपाच्या दालनात काही ठिकाणी भिक्षूंची गर्दी झाली तर काही ठिकाणी ते अगदी विरळ झाले. काहींच्या रेघा वर होत्या तर काहींच्या खाली. लालुदायीला ह्या स्थानरचनेची माहिती नसल्यामुळे त्याने आपण ठरवल्याप्रमाणेच वाटप केले.

भिक्षु त्याला म्हणाले, 'आयुष्मान, उदायी, काही खुणेच्या रेघा वर आहेत तर काही खाली आहेत. उत्तम भात अमुक वर्षे काढलेल्यांसाठी असतो, हलका भात अशा अशांसाठी असतो. '

पण त्याने त्यांना असे उत्तर दिले की, 'जर ही खूण इथं आहे, तर तुम्ही तिथं उभे का राहिलात ? मी तुमच्यावर का विश्वास ठेवू ? मी केलेल्या खुणेचाच मला विश्वास वाटतो ? '

तेव्हा पोरगेले श्रावक त्याला म्हणाले, 'आयुष्मान लालुदायी, मठ्ठ उदायी, अशा खुणा दिल्यास की भिक्षुंना जे द्यायचं असतं ते मिळत नाही. त्या खुणा द्यायला अगदी अपात्र आहेस. तू इथून चालता हो. ' असे म्हणून त्यांनी त्या मठ्ठ उदायीला उर्फ लालुदायीला तिथून घालवून दिलं. त्यावेळी त्या वाटपघरात खूपच गलका झाला. ते ऐकून शास्ता आनंद थेराला म्हणाला, 'आनन्दा, वाटपघरात खूपच कल्लोळ माजला आहे.काय झालं आहे ते पाहून ये.'

आनन्द थेराने घडलेली हकीगत तथागताला सांगितली. तेव्हा तो म्हणाला,'हा उदायी आताचअसा मूर्खपणानं दुसऱ्यांना त्यांच्या लाभापासून वंचित करतो आहे असं नाही. तर पूर्वीसुद्धा हा असंच करीत असे.' थेराने त्याची फोड करण्याची विनंती केली तेव्हा भगवानाने पूर्वजन्मीचे कारण सांगून ही गोष्ट सांगितली.

पूर्वी वाराणशीत ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असता बोधिसत्त्व मालाची किंमत ठरवून त्याची खरेदी व विक्री करणारा अधिकारी होता. राज्यात येणाऱ्या जाणाऱ्या हत्ती-घोड्यांची, रत्नांची, सोन्याची व अशाच सर्व तऱ्हेच्या किंमती वस्तूंची तो खरेदी व विक्री करीत असे. परंतु राजा लोभी होता. प्रामाणिक व बुद्धिमान अशा या सेवकाची सचोटी ह्याला आवडेना. कारण 'लबाडीने किंमती ठरवण्याखेरीज दुसऱ्याला लुबाडून आपल्याला धनवान कसं होता येईल ? असा चोख व्यवहार करणारा माणूस असल्यावर फायदा तो कितीसा होणार ? दुसराच माणूस पाहिला पाहिजे' असा विचार करून राजाने एका गावंढळ माणसाला आपला कारभारी नेमले व बोधिसत्वाला कामावरून काढून टाकले.

हा दुसरा कारभारी परदेशातील मालांच्या किंमती राजाची मर्जी पाहून ठरवू लागला.

एकदा उत्तरेकडील देशातून एक घोडयांचा व्यापारी पाचशे घोडे विकायला घेऊन आला. त्या घोड्यांची किंमत या नव्या अधिकाऱ्याने मापटेभर तांदूळ एवढीच ठरवली. तांदूळ त्याच्या पदरी टाकून घोडी पागेत बांधली. व्यापारी पूर्ण नागवला गेला. पण बोलतो काय ? राजाविरुद्ध न्याय कोण देणार ? अखेर तो बोधिसत्त्वाकडे आला आणि सारी हकिगत सांगून म्हणाला. 'आता मी काय करावं ते सांगा ?' असं करा, त्या माणसालाच लाच द्या आणि मग त्यालाच विचारा- आम्हाला हे तांदूळ विकायचे आहेत. त्यांची किंमत काय ठरवावी ? राजेसाहेबांच्या समोर आपण याची किंमत ठरवाल कां ? तो जर 'ठरवतो'असे म्हणाला तर मला कळवा. मी पण येतो तिथे.'ठीक आहे' असे म्हणून तो व्यापारी त्या नव्या कारभाऱ्याकडे गेला आणि त्याला त्याने भरपूर लाच दिली. त्याबरोबर तांदळाचा भाव ठरवायचे त्या अधिकाऱ्याने कबूल केले. व्यापाऱ्याला घेऊन तो राजाकडे गेला. तिथे दुसरेही मंत्री आले होते. बोधिसत्त्वही होताच. व्यापारी राजाला म्हणाला, 'महाराज, पाचशे घोड्यांबद्दल हे तांदूळ मला मिळाले आहेत. आता त्यांची किंमत करायची आहे. तर ती किती असावी ? ' हा व्यवहार राजालाही माहीत नव्हता. त्याने अधिकाऱ्याला विचारले, 'पाचशे घोड्यांची किंमत तू काय केलीस ?'

'एक मापभर तांदूळ.'

'ठीक, पाचशे घोड्यांचा भाव मापटंभर तांदूळ. पण आता या तांदळाचा भाव कसा काय ठेवायचा ?'

'वाराणशीची राजधानी आणि तिच्या आसपासची गावं असं सारं राष्ट्र,हीच या तांदळाची किंमत.'त्या अधिकाऱ्याने उत्तर दिले. हे तांदूळ इतके महाग असल्याचे कारण, ते तांदूळ राजाच्या कोठारातले होते. हे ऐकून बोधिसत्त्व म्हणाला,'महाराज,पाचशे घोड्यांची किंमत मापटंभर तांदूळ होते का ? आणि मापटंभर तांदळाचं मोल सारं राज्य नव्हे का ?'

'तू तांदळाच्या एका मापाची किंमत किती म्हणून विचारतोस ? अरे,आतून बाहेरून सारी वाराणशी आणि त्यातल्या त्यात हे पाचशे घोडे जमेस धरले तरीही ह्यांची किंमत या तांदळांच्या एका मापाएवढी होणार नाही.'

ते ऐकून सारे मंत्री टाळ्या पिटून हसू लागले. 'वा ! वा !' आमचं राज्य आतापर्यंत आम्ही पृथ्वी मोलाचं समजत होतो. पण त्याची किंमत आज या अधिकाऱ्यानं मापटंभर तांदूळ ठरवली. याला इतके दिवस अधिकारावर ठेवलाच कसा ? पण हा महाराजांचा तोंडपुजेपणा करतो. मग काय ?' असे म्हणून सारे चेष्टा करीत सुटले.

आता मात्र राजा ओशाळला. त्याने ह्या अधिकाऱ्याला काढून टाकले व फिरून बोधिसत्त्वाला त्या जागेवर नेमले.

शास्त्याने धर्मकथन करुन ही गाथा सांगितली.

मापटे तांदुळाचे ते वाराणशी बरोबरी।
घोड्यांच्या पाचशे तैसे मापटे ते बरोबरी॥

शास्त्याने धर्मोपदेश केल्यावर दोन्ही गोष्टींचा मेळ बसवून जातकातल्या व्यक्ती कोण ते सांगताना तो म्हणाला, 'हा मठ्ठ उदायी अथवा लालुदायी म्हणजेच तो मूर्ख खेडवळ किंमती ठरवणारा आणि मी म्हणजे तो शहाणा किंमती ठरवणारा.'

(लोकसाहित्य : य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक)

# १.१६ मातिपोसक जातक

(मातृभक्ति - मातिपोसकजातक नं. ४५५)

अनेक जन्मींच्या संसारात संसरत असता आमचा बोधिसत्त्व एकदा हत्तीच्या योनीत जन्माला येऊन वयात आल्यावर मोठ्या गजसंघाचा धुरीण झाला होता. वृद्धापकाळामुळे त्याची आई अंध झाली व हत्तीच्या कळपाबरोबर तिला रानावनात फिरणे अशक्य झाले. तिला एका सुरक्षित स्थळी ठेऊन बोधिसत्त्व इतर हत्तींबरोबर चांगली चांगली फळे वगैरे आहाराचे पदार्थ पाठवीत असे. परंतु ते रसलोलुप हत्ती वाटेतच ती फळे खात असत व बिचाऱ्या वृद्ध हत्तीणीच्या वाट्याला पालापाचोळा वगैरे नीरस पदार्थच येत असत.

एकदा आईच्या समाचाराला गेला असता बोधिसत्त्वाला आपल्या आईची दीनावस्था दिसून आली व त्याचे कारण समजून आल्यावर त्याने असा निश्चय केला की, इतःपर गजसंघाचे नायकत्व सोडून देऊन आपल्या मातेच्या सेवेत ती जिवंत असे तोपर्यंत रहावयाचे. त्याचा हा बेत हस्तियुथाला पसंत पडला नाहीं. तथापि तो त्याने अमलात आणला.

एके दिवशी एक वनचर त्या अरण्यात वाट चुकून इतस्ततः भटकत फिरत असलेला बोधिसत्त्वाच्या पहाण्यात आला. या अजस्र हत्तीला पाहिल्याबरोबर वनचर भयकंपित होऊन पळत सुटला. पण रस्ता बिकट असल्यामुळे त्याला दूर जाता येईना. त्याची अशी गाळण झालेली पाहून बोधिसत्त्व म्हणाला, “बा मनुष्या, माझ्यापासून तुला भय आहे अशी शंका मनांत आणून इतस्ततः पळू नकोस. तुझ्यावर काही आपत्ती आली असावी असे मला वाटते. आणि जवळ येऊन तू जर मला आपला वृत्तांत सांगशील तर कदाचित या आपत्तीतून तुझा मी उद्धार करू शकेन.”

वनचर जवळ जाऊन साष्टांग प्रणिपात करून म्हणाला, “गजपुंगव, आज सात दिवस मार्ग चुकल्यामुळे मी या अरण्यात आहे.” यांतून पार पाडून मला

मनुष्यवस्तीत नेऊन सोडाल तर मी आपला अत्यंत ऋणी होइन, त्या हस्तिनागाने वनचराला आपल्या पाठीवर बसवून अरण्यांतून पार पाडले आणि वाराणशीला जाणाऱ्या मोठ्या सडकेवर नेऊन ठेविले.

त्याच वेळी वाराणशीच्या राजाचा मंगळहस्ती मरण पावला होता व तशा प्रकारचा दुसरा हत्ती मिळणे मुष्कील होते. राजाने तसा हत्ती मिळवून देणाऱ्या मनुष्यास मोठे बक्षिस मिळेल असे सर्व शहरात भेरी वाजवून जाहीर केले होते. द्रव्याच्या लालुचीने त्या वनचराने हत्ती पकडणाऱ्या राजाच्या माहुतांना बोधिसत्त्वाचे वसतिस्थान दाखवून दिले.

त्यांनी बोधिसत्त्वाला घेरून त्याच्यावर शस्त्रास्त्रांचा वर्षाव केला. आपणाला वेढणाऱ्या सर्व माणसाला तुडविण्याचे सामर्थ्य बोधिसत्त्वाच्या अंगी असूनही त्याने आपल्या गंभीर शांतीचा भंग होऊ दिला नाही. तो आपल्या मनाशीच म्हणाला, ''मी क्रोधोन्मत्त झालो तर या सर्वांचा संहार करण्यास विलंब लागणार नाही. पण तेणेकरून मी शीलभ्रष्ट होईन, म्हणून सहनशीलपणाने यांचे प्रहार सोसावे हेच चांगले.'' मुख्य माहुताने बोधिसत्त्वाची लक्षणे तेव्हाच ओळखिली व तो त्याच्या जवळ जाऊन त्याला मोठ्या प्रेमाने वाराणसीला घेऊन गेला.

राजाच्या हत्तीशाळेत बोधिसत्त्वाचा मान उत्तम प्रकारे राखण्यात आला होता हे निराळे सांगावयास नकोच. परंतु त्याने अन्नपाणी ग्रहण करण्याचे अगदीच वर्ज्य केले. हे वर्तमान राजाला समजले तेव्हा हस्तिशाळेत जाऊन तो बोधिसत्त्वास म्हणाला, "हे नागराज, अन्नपाणी वर्ज्य करून तू आपल्या शरीराला ताप देऊ नकोस. येथे सुखाने राहून आमच्या राज्याचे पुष्कळसे हित तुला करिता येईल.''

हत्ती म्हणाला, "परंतु ती बिचारी अनाथ, आंधळी, एकाकी अरण्यात काय करील ? चंडोरण पर्वतावर मोठमोठाल्या खुंटाला आदळून तिची गति काय होईल ?'' राजा म्हणाला, "ही बाई कोण आहे?'' ''महाराज, ती माझी आई आहे.'' हत्ती उत्तरला. हे त्या हत्तीचे मातृप्रेम पाहून राजा अत्यंत गहिवरला आणि म्हणाला, ''माहुतहो, या मातृभक्त गजाला ताबडतोब मुक्त करा व त्याच्या

मूळच्या ठिकाणी नेऊन सोडा.''

त्याप्रमाणे बोधिसत्त्वाला सोडण्यात आल्यावर त्याने सोंडेत पाणी घेऊन ते आपल्या आईच्या पाठीवर शिंपडले. तेव्हा ती म्हणाली, “अरे, हा मेघ देखील भलत्याच वेळी वर्षाव करीत आहे. माझ्यापाठी संतप्त पृष्ठभागावर पाणी शिंपडणाऱ्या माझ्या प्रियपुत्राची मला हा आठवण देत आहे.'' तेव्हा बोधिसत्त्वाने आपण स्वतःच सेवेसाठी हजर आहे असे सांगून आपल्या आईला अत्यंत मुदित केले. तिने काशीराजाला मनःपूर्वक आशीर्वाद दिला.

त्या राजाने बोधिसत्त्वाच्या गुणांवर प्रसन्न होऊन तेथील पुष्करणीच्या जवळ एक गाव वसविला आणि त्याला व त्याच्या आईला रोज आहार मिळावा अशी व्यवस्था केली.

आई निवर्तल्यावर बोधिसत्व करंडक नावाच्या आश्रमात राहून तेथील ऋषीची सेवा करू लागला. राजाने बोधिसत्त्वाची एक पाषाणप्रतिमा करवून तिचा मोठा गौरव केला आणि जंबुद्वीपातील लोक प्रतिवर्षी त्या ठिकाणी जाऊन गजोत्सव करू लागले.

(धर्मानंद कोसंबी : जातक-कथासंग्रह)

# १.१७ बक जातक

(शाठ्य सदांच साधत नसते - बक जातक नं. ३८)

प्राचीनकाळी बोधिसत्त्व एका सुंदर तलावाच्या काठी असलेल्या वृक्षावर वृक्षदेवता होऊन रहात होता. त्या काळी उन्हाळ्याच्या दिवसात एका लहानशा तलावातील पाणी आटत चालले होते; आणि त्यांत पुष्कळ मासे रहात असत. तेव्हा एक बगळा त्या तळ्याच्या काठी येऊन चिंताग्रस्त स्थितीत बसला. ते पाहून तळ्यातील मासे त्याला म्हणाले, "हे आर्य, तू कशाचा विचार करीत आहेस."

बगळा म्हणाला, "दुसरा कसला? मी तुमच्या संबंधानेच विचार करीत आहे. ह्या तळ्यातील पाणी दिवसेंदिवस आटत चालले आहे; खावयाला मिळण्याची मारामार, व उन्हाळा तर भयंकर ! तेव्हां हे बिचारे मासे आता काय करतील ह्या विचारात मी पडलो आहे," मासे म्हणाले, "मग ह्यातून सुटण्याला आम्हाला कोणता उपाय ?" बगळा म्हणाला, "जर माझा उपदेश ऐकाल तर तुम्हांपैकी एकेकाला चोचीत धरून एका मोठ्या सरोवरात नेऊन सोडीन."

पण माशांना ही गोष्ट पटेना. ते म्हणाले, "असे कधी झाले आहे काय ? जगाच्या आरंभापासून माशांवर प्रेम करणारा बगळा कोणी पाहिला आहे काय ? आमच्यापैकी एकेकाला दूर नेऊन मारून खाण्याचा तुझा हेतू असला पाहिजे."

बगळा म्हणाला, "माशांस बगळे मारून खातात हे खरे आहे. परंतु विश्वासघाताचे पातक मी कसे करीन. माझ्यावर तुम्ही विश्वास ठेवून तरी पहा. आता दुसरा एकादा उत्तम तलाव नाही असे तुम्हास वाटत असेल, तर माझ्याबरोबर तुमच्यापैकी एखाद्याला पाठवा म्हणजे त्याला मी तो तलाव दाखवून आणतो. तेव्हा तरी तुमची खात्री होईल."

माशांनी खात्री करून घेण्यासाठी आपणांपैकी एका मोठ्या काण्या माशाला त्याजबरोबर पाठविले. त्याने त्या माशाला मोठ्या सरोवरांत नेऊन सोडले, व

पुन्हा पूर्वस्थळी आणून पोहोचविले. काण्या माशाने आपल्या भाऊबंधांसमोर नवीन तलावाचे रसभरीत वर्णन केले. तेव्हा सर्व मासे तिकडे जाण्यास उत्सुक होऊन बगळ्यास म्हणाले, "आर्य, आम्हाला नेऊन त्या ठिकाणी पोहोचविण्याची मेहरबानी कर.''

बगळ्याने प्रथमतः त्या काण्या माशालाच तिकडे नेले; व त्याला सरोवर दाखवून एका वृक्षाच्या फांद्यांच्या खाचीत दडपून मारून खाल्ले, व काटे मुळात टाकले; आणि पुन्हा माशांजवळ जाऊन, ''आपण त्याला सोडून आलो; आता ज्याची मर्जी असेल त्याला येऊ द्या,'' असे म्हणून आणखी एका माशाला आणून आणखी पूर्वीप्रमाणेच त्याची गत केली. ह्याप्रमाणे सर्व माशांना त्याने मारून खाल्ले. एक तेवढा खेकडा त्या तळ्यात शिल्लक राहिला. तेव्हा बगळा त्याला म्हणाला, "बा खेकड्या, तू तरी तेथे कशाला राहातोस ? बाकी सर्व मासे सुखाने मोठ्या सरोवरात संचार करीत आहेत. व तू येथे एकटाच ह्या आटत जाणाऱ्या डबक्यात बसला आहेस. तेव्हा चल माझ्या बरोबर. मी तुला त्या सुंदर तलावात नेऊन पोहोचवितो.''

खेकड्याने विचार केला की, "ह्या चोराने माशांना नेऊन मारून खाल्ले की जिवंत सोडले हे कोणी सांगावे ? पण ह्याच्या बरोबर जाऊन त्यांची स्थिती काय झाली, हे पाहण्यास हरकत नाही, जर ह्याने सुखरूपपणे मला पोहोचविले तर ठीकच आहे; न पेक्षा माझ्या तावडीतून हा जिवंतपणे निघून जाणार नाही ह्याविषयी खबरदारी घेतली पाहिजे.'' तो बगळ्यास म्हणाला, "बगळेमामा, माशांना तुम्ही नेलेत हे ठीक झाले. परंतु मला कसे न्याल ?'' बगळा म्हणाला, ''कसे म्हणजे ? चोंचींत धरून !'' खेकडा म्हणाला, "एकतर तुमच्या चोचीत मी मावणार नाही; व दुसरे असे की मी गुळगुळीत असून घट्ट आहे, तेव्हा तुम्हाला मला नीट पकडता यावयाचे नाही. पण माझे हे आकडे फार सुदृढ आहेत. ह्यानी जर मी आपल्या मानेला धरून लोंबकळत राहिलो, तर खाली पडण्याची भीती नाही आणि त्या योगे तुम्ही मला सुरक्षितपणे तिकडे घेऊन जाल.''

बगळ्याला ही गोष्ट पसंत पडली. खेकड्याला आपल्या मानेला लटकावून



तो सरोवराजवळ गेला, व त्याला ते सरोवर दाखवून वहिवाटीप्रमाणे आपल्या नेहमीच्या वृक्षाकडे वळला. तेव्हा खेकडा म्हणाला, “बगळे मामा, सरोवर तर ह्या बाजूला राहिले, आणि तुम्ही मला येथे कोठे नेता ?’’

बगळा रागावून म्हणाला, “काय, मोठे आले आहेत की नाही तुम्ही आमचे भाचे ! तुला गळ्याला लटकावून फिरत आहे, म्हणून तू मला दास समजतोस काय? हा पहा इकडे त्या माशांच्या काट्यांचा केवढा ढीग पडला आहे ! तुझीही हाडे ह्याच राशीवर पडणार हे पक्के लक्षात ठेव.’’

खेकडा म्हणाला, “त्या माशांच्या मूर्खपणामुळे, त्यांना मारून खाणे तुला सोपे गेले. पण आता प्रसंग खेकड्याशी आहे हे तू विसरू नकोस. माझ्या आकड्यांनी तुझी जी मान पकडली आहे ती उगाच नव्हे. एवी तेवी मला जर मरावयाचे आहे तर आपण दोघेही बरोबरच मरू. हे पहा, तुझे डोके कापून कसे खाली पाडतो ते!’’ असे म्हणून त्याने आपल्या आकड्यांनी बगळ्याची मानगुटी दाबली. बगळ्याची बोबडी वळली, व डोळे पांढरे होण्याची पाळी आली. तो म्हणाला, ‘‘महाराज, माझ्यावर मेहेरबानी करा. मला जीवदान द्या. मी तुम्हाला सुरक्षित तलावात पोहचवून देतो.

खेकड्याने “ठीक आहे’’ असे उत्तर दिल्यावर बगळ्याने त्याला नेऊन सरोवराच्या पाण्याच्या काठी हळूच चिखलावर ठेवले. तेव्हा खेकड्याने कमळाच्या देठाप्रमाणे त्याचा गळा कापून टाकला, व पाण्यात प्रवेश केला. तेव्हा वृक्षदेवतेच्या रूपाने रहाणारा आमचा बोधिसत्त्व म्हणाला, ‘‘शठ आपल्या शाठ्यानें सदोदित सुखी होतो असे नाही. बकाला जसा खेकडा भेटला तसा शठाला कोणीतरी भेटतोच.’’

(धर्मानंद कोसंबी : जातक-कथासंग्रह)

# १.१८ आरामदूसक जातक

(मूर्खावर आपले काम सोपवू नये - आरामदूसक जातक नं. ४३)

एका काळी वाराणसी नगरीत उत्सवाची उद्घोषणा करण्यात आली होती. त्या दिवसापासून सर्व लोकांनी उत्सवास सुरुवात केली. पण राजाच्या बगीच्यांतील माळ्यास आपले काम टाकून या उत्सवास जाता येईना. पुढे त्याला अशी एक युक्ति सुचली की, आपल्या उद्यानात रहाणाऱ्या वानरांच्या टोळीवर बगीच्याला पाणी देण्याचे काम सोपवून आपण एक दिवस तरी उत्सवाला जावे. तो त्या टोळीतील मुख्य वानराला म्हणाला, ''मित्रा या उद्यानापासून मला जसा फायदा आहे तसा तो तुम्हाला देखील आहे. येथील फलपर्णादिक खाऊन तुम्ही आपला निर्वाह करिता. तेव्हा एक दिवस माझे थोडे काम करणे तुमचे कर्तव्य आहे.

तो वानर म्हणाला, ''आपले काय काम आहे ते आम्हास समजावून द्या म्हणजे आम्हाला शक्य असेल ते आम्ही करू.''

माळी म्हणाला, "तुम्ही या झाडाच्या रोपांना आजचा दिवस तेवढे पाणी द्या म्हणजे तेवढ्या अवधीत मी उत्सवाची थोडी मौज पाहून माघारी येतो. तो वानर म्हणाला, ''ठीक आहे, आम्ही मोठ्या संतोषाने हे काम करितो.''

माळी पखाली आणि लाकडाची भांडी वानरांच्या स्वाधीन करून शहरात गेला. इकडे मुख्य वानर आपल्या टोळीतील वानराला म्हणाला, "आमच्यावर सोपविलेले काम आम्ही मोठ्या शिताफीने केले पाहिजे. येथल्या पाण्याचा अपव्यय न करिता ते मोठ्या काटकसरीने वापरले पाहिजे, नाहीतर आम्हास आणि बागवानाला पाण्यासाठी त्रास सोसावा लागेल. तेव्हा तुम्ही झाडाच्या रोपाला पाणी देत असतांना त्यांच्या मुळाच्या प्रमाणाने पाणी देत जा. ज्यांची मुळे खोल गेली असतील त्यांना जास्ती पाणी द्या व ज्यांची उथळ असतील त्यांना कमी द्या.''

वानरांनी आपल्या पुढाऱ्याच्या आज्ञेप्रमाणे सर्व रोपे उपटून पाहून त्यांच्या मुळांच्या प्रमाणावर त्यांस पाणी दिलें !

या वानरांच्या कृत्यामुळे बिचाऱ्या बागवानाचे किती नुकसान झाले असेल याची कल्पनाच केली पाहिजे ! मूर्खावर जो आपल्या कामाचा भार टाकतो त्याची शेवटी अशीच हानी होते !!

(धर्मानंद कोसंबी : जातक-कथासंग्रह)



# १.१९ निग्रोधमिग जातक

(उदारधी मृग - निग्रोधमिग जातक नं. १२)

एका काळी आमचा बोधिसत्त्व मृगकुलांत जन्मला होता. त्याची कांति सुवर्णासारखी होती; डोळे वज्रमण्यासारखे तेजस्वी होते; शिंगें रजत वर्णाची होती; तोंड अरुणवर्ण, आणि हातपाय लाक्षारसानें चित्रित केल्यासारखे सुंदर होते. त्याची वालधि चमरमृगाच्या वालधीसारखी शोभिवंत होती, व शरीर जवान घोड्यासारखे सुंदर दिसत होते. तो आपल्या पाचशे मृगांच्या परिवारासह अरण्यामध्ये राहत होता. त्याला त्याचे लोक न्यग्रोधमृगराज या नावाने ओळखत असत. त्याच अरण्यामध्ये बोधिसत्त्वाच्या जातीचा दुसरा एक शाख नावाचा मृग आपल्या मृगगणासह रहात असे.

त्या काळी काशीच्या राजाला मृगयेची फारच चट लागली होती. तो दररोज शिकारीला जातांना मृगांना वेढण्यासाठी आपल्या शेतकरी लोकांना घेऊन जात असे. त्यामुळे लोकांची फार हानी होई. शेतांतील कामे अर्धवट रहात असत, व वेळेवर शेताची पेरणी वगैरे न झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असे. तेव्हा वाराणसीच्या आसपास राहाणाऱ्या लोकांनी असा विचार केला की, “भलत्याच वेळी शिकारीला जावे लागल्यामुळे आमची कामे तशीच रहातात, त्यापेक्षा आपण एक मोठे कुरण तयार करून व त्याच्या भोवती एक बळकट कुंपण घालून अरण्यातून पुष्कळ मृगांना त्या कुंपणात आणून सोडू. म्हणजे रोज राजा एखाद्या दुसऱ्या मृगाची शिकार करून मांस खाईल, व आम्हाला शिकारीला नेणार नाही.”

त्याप्रमाणे त्या लोकांनी एक मोठे कुंपण तयार केले, आणि मृगांना पाणी पिण्यासाठी तेथे एक लहानसा तलाव खोदला. पावसाळ्यानंतर जेव्हा त्या कुंपणात गवत वाढले तेव्हा नागरवासी आणि ग्रामवासी सर्व लोक आपापली शस्त्रास्त्रे घेऊन मृगांना आणण्यासाठी अरण्यात शिरले. तेथे त्यांनी न्यग्रोध

मृगाच्या आणि शाखमृगाच्या स्थानाला वेढा दिला, आणि दांडक्यांनी झुडपे बडवून व मोठ्याने आरडाओरड करून त्या मृगांना तेथून हुसकावून लावले. परंतु मृगांना पळून जाण्याला दुसरी वाट न ठेवल्यामुळे त्यांना वाराणसीच्या राजासाठी नवीन कुंपणात शिरल्याशिवाय दुसरे गत्यंतर राहिले नाही. ते सगळे मृग त्या कुंपणांत शिरल्यावर रयत लोकांनी त्या कुंपणाचे फाटक लावून टाकिले, व राजवाड्यात जाऊन ते राजाला म्हणाले, ''महाराज, आपण आम्हाला घेऊन रोज शिकारीला जात असल्यामुळे आमचे फार नुकसान होत आहे. म्हणून आम्ही हजारएक मृगांना नवीन कुंपणात आणून सोडले आहे. आता रोज आपणाला जे एक दोन मृग मारावयाचे असतील ते मारून त्यांचे मांस खात जा. पण आम्हाला मात्र शिकारीला जाण्याचा हुकूम करू नका.''

राजाला लोकांचे म्हणणे योग्य वाटलें, व शिकारीला जाण्याबद्दल त्यांच्यावर त्या दिवसापासून सक्ती करण्यात येणार नाही असे अभिवचन देऊन त्याने त्या लोकांना आपापल्या घरी पाठविले; आणि तो आपल्या मुख्य स्वयंपाक्यासह त्या कुंपणात गेला. तेथे न्यग्रोध आणि शाख ह्या दोन मृगांना पाहून तो अत्यंत संतुष्ट झाला, व त्या दोघांना त्याने अभयदान दिले. त्या दिवसापासून राजा स्वतः एखाद्या मृगाला मारून घेऊन येत असे किंवा त्याचा मुख्य स्वयंपाकी मृगाला मारून आणीत असे.

परंतु मृग राजाला किंवा त्या सूदाला पाहून इतस्ततः पळत सुटत, व एक मृग मरेपर्यंत चार पाच मृगांना बाण लागून ते घायाळ होत असत; आणि कधी कधी त्या जखमांमुळे मरण पावत असत. बोधिसत्त्वाच्या अनुयायी मृगांनी ही गोष्ट बोधिसत्त्वाला कळविली, तेव्हा शाखाला बोलावून तो त्याला म्हणाला, "मित्रा, एकासाठी पुष्कळ मृगांचा नाश होत आहे. दररोज एकाचे मरण तर चुकावयाचे नाहीच, पण एवढ्यासाठी इतरांचा नाश होऊ न देणे आम्हास शक्य आहे. आम्ही राजाला अशी विनंती करू की, आजपासून बाणाने मृगाला मारण्यात येऊ नये. एक जागा तयार करून तेथे एक लाकडाचा ओंडका ठेवण्यात यावा, व रोज एका मृगाने जाऊन त्या ओंडक्यावर आपले डोके ठेवून तेथे पडून रहावे;

आणि राजाने किंवा राजाच्या सूदाने त्याचे डोके कापून त्याला तेथून घेऊन जावे.''

ही गोष्ट शाखमृगाला पसंत पडली. तेव्हा बोधिसत्त्व त्याला म्हणाला, ''माझा आणि तुझा परिवार सारखाच आहे. अर्थात एक दिवस माझ्या गणावर पाळी असावी, व एक दिवस तुझ्या गणावर असावी.''

ह्याही गोष्टीला शाखमृग कबूल झाला; व त्या दिवसापासून आळीपाळीने एक मृग निश्चित ठिकाणी पाठविण्याचे ठरले. दुसऱ्या दिवशी राजा मृगाला मारण्याकरिता तेथे आला असतां अभयदान मिळालेले हे दोघे मृग पुढे सरसावून राजाला म्हणाले, "महाराज, आपणाला रोज एकाच मृगाचे मांस लागते, पण त्याच्यासाठी आमच्या गणांतील पुष्कळ मृग नाश पावतात. एवढ्यासाठी आजपासून आमच्यावर मेहेरबानी करून आपण एक स्थान निश्चित करा. आमच्यापैकी रोज एक मृग त्या ठिकाणी जाऊन तेथे ठेवलेल्या ओंडक्यावर आपले डोके ठेवून पडून राहील. त्याला आपण एका घावाने ठार मारून तेथून घेऊन जावे. म्हणजे आजकाल बाणाच्या प्रहाराने जे पुष्कळ मृग घायाळ होतात, ते व्हावयाचे नाहीत; व आपणाला मृगामागे चहूंकडे धावण्याचेही श्रम पडावयाचे नाहीत.''

राजाने त्या मृगांची विनंती मान्य करून त्यांच्या सांगण्याप्रमाणे एक स्थान तयार केलें; व त्या दिवसापासून त्या ठिकाणी ठेवलेल्या ओंडक्यावर डोके ठेवून निजलेल्या मृगालाच मारून आणावे असा त्याने आपल्या स्वयंपाक्याला हुकूम केला. काही काळपर्यंत ही व्यवस्था सुरळीत चालली होती.

एके दिवशी शाखमृगाच्या अनुयायांपैकी एका गर्भिणी मृगीवर त्या ठिकाणी जाण्याची पाळी आली. तेव्हा ती शाखाला म्हणाली "महाराज, आजची माझी पाळी दुसऱ्या कोणत्या तरी मृगाला द्या, मी सांप्रत गर्भिणी आहे; आणि प्रसूत झाल्यावर माझे लेकरू व मी अशी दोघेही पाळीवर जाऊ.''

शाख म्हणाला. "बाई असे करण्याचा मला अधिकार पोहचत नाही. ज्याच्यावर पाळी आली असेल त्यानेच त्या ठिकाणी गेले पाहिजे. मी जर

अन्यायाने वागू लागलो तर आमच्या समाजात मोठी अव्यवस्था होईल. तेव्हा मला तुझ्या विनंतीला मान देता येत नाही.''

ती मृगी मोठ्या कष्टी अंतःकरणाने न्यग्रोधमृगाजवळ गेली, व त्याला म्हणाली, "महाराज, मी शाखमृगाच्या परिवारापैकी एक गर्भिणी मृगी आहे. आज राजाच्या अन्नासाठी देह अर्पण करण्याची माझ्यावर पाळी आली आहे. पाळी दुसऱ्याला देऊन सध्या मला मोकळे करावे, अशी मी आमच्या पुढाऱ्याला विनंती केली; परंतु त्याने ती फेटाळून लाविली. आता जर आपल्या मंडळीपैकी माझ्याऐवजी एखादा मृग पाठविण्याची मेहेरबानी कराल तर पुढे प्रसूत झाल्यावर तुमच्या समाजावर पाळी येईल त्यावेळी मी व माझे लेकरू त्या पाळीचा आनंदाने स्वीकार करू.''

बोधिसत्त्व म्हणाला, "बाई, तू काही काळजी करू नको. मी तुझ्या पाळीची व्यवस्था करतो. तू चारा खाऊन आणि पाणी पिऊन आनंदाने रहा.''

त्या दिवशी राजाचा स्वयंपाकी त्या ठिकाणी येऊन पाहतो, तो अभयदान मिळालेला न्यग्रोधमृगच त्या ओंडक्यावर डोके ठेवून पडला होता. ते आश्चर्य पाहून तो तसाच धावत राजापाशी गेला आणि म्हणाला, ''महाराज, आज मी मृगाला मारून आणण्यासाठी रोजच्या ठिकाणी गेलो होतो. तेथे आपण अभयदान दिलेल्या दोन नायक मृगांपैकी एक जण त्या ओंडक्यावर डोके ठेवून पडलेला आहे ! परंतु आपल्या हुकूमावाचून त्याला मला कसा हात लावता येईल ? म्हणून मी तसाच धावत येथे आलो आहे, आता आपला हुकूम होईल त्याप्रमाणे करण्यात येईल.''

राजा त्या स्वयंपाक्याबरोबर स्वतः त्या ठिकाणी गेला, आणि ओंडक्यावर डोके ठेऊन निजलेल्या न्यग्रोधमृगाला म्हणाला, "मित्रा, मृगराजा, तुला मी अभयदान दिले असतां तू या ठिकाणी येऊन का निजलास ?''

''महाराज, मी मृगसंघाचा नायक असल्यामुळे माझ्यावर पाळी येण्याचा संभव नाही. परंतु शाखाच्या परिवारापैकी एका गर्भिणी मृगीवर पाळी आली होती. तिने ती दुसऱ्या मृगाला देण्याची मला विनंती केली. परंतु एकाचे मरण मी

दुसऱ्याला कसे द्यावे ? तेव्हा तिची पाळी माझ्यावर घेऊन मी येथे पडलो आहे. मला मारिले असता आपल्या वचनाचा भंग होईल अशी शंका धरू नका. का की मी मजसाठी मरत नसून गर्भिणी मृगीसाठी मरण्यास सिद्ध झालो आहे.''

राजा म्हणाला, "मी त्या गर्भिणी मृगीलाही अभय देतो. तू आतां या ओंडक्यावरून ऊठ.''

''पण महाराज, इतर मृगांची वाट काय ? गर्भिणी मृगीची पाळी मी घेतली व त्यामुळे तिला अभयदान मिळाले, ही बातमी मृगसंघाला लागल्याबरोबर प्रत्येक मृग आपली पाळी चुकविण्यासाठी मला विनंती करील; व त्या योगे मला वारंवार येथे येऊन आपणाला तसदी द्यावी लागेल ! त्यापेक्षा आपण आजच मला मारावे हे बरे !''

राजा म्हणाला, "असे असेल तर मी सर्व मृगांना अभय देतो.''

बोधिसत्त्व म्हणाला, ''महाराज या उद्यानातील मृगांनाच आपण अभय देता. पण अरण्यातील इतर श्वापदांनी काय करावे ? त्यांची गती काय होणार ?''

राजाने सर्व प्राण्यांना अभयदान देण्याचे अभिवचन दिल्यावर बोधिसत्त्व त्या ओंड्यावरून उठला, आणि त्याने राजाला शील राखण्यासाठी व धर्माने राज्य करण्यासाठी उपदेश केला. नंतर राजाने त्या सर्व मृगांना कुरणातून मोकळे केले व ते अरण्यात आपल्या मूळच्या ठिकाणी गेले.

तेथे त्या गर्भिणी मृगीला एक सुंदर पुत्र झाला तो लहानपणी वारंवार शाखमृगाजवळ जात असे. आईला जेव्हा ही गोष्ट समजली तेव्हा ती त्याला म्हणाली, "बाबारे, तुला तुझे कल्याण व्हावे अशी इच्छा असेल तर शाखमृगाचा सहवास न करिता न्यग्रोधाची संगति धर. न्यग्रोधाबरोबर मरणे श्रेयस्कर आहे; पण शाखाबरोबर जगणे श्रेयस्कर नाही.''

(धर्मानंद कोसंबी : जातक-कथासंग्रह)

# १.२० यक्षप्रश्न

(महाभारताच्या 'वनपर्वा'तील कथा)

वनामध्ये युधिष्ठिराची चारही भावंडे मृत झाली होती. तो प्रसंग असा की, महाभारतात वनपर्वाच्या अखेरीस यक्षप्रश्नांचा प्रसंग वर्णिला आहे.

जयद्रथाच्या तावडीतून द्रौपदीची सुटका केल्यावर वनवासी पांडव काम्यवनाचा त्याग करून पुन्हा द्वैतवनात आले. त्यावेळी त्यांना खूप तहान लागलेली होती. तेव्हा युधिष्ठिराने नकुलास सांगितले.

'झाडावर चढून जवळपास कुठे सरोवर आहे का ? ते पहा.'

नकुलाने झाडावरून हिरवळलेला टापू पाहिला आणि तिथे जलाशय असेल असा निश्चय करून धर्मराजाची आज्ञा घेऊन तो पाणी आणायला निघाला. सरोवरापाशी येताच तहानेने व्याकूळ झालेला नकूल पाणी प्यायला पुढे सरसावताच त्याच्या कानावर कुठून तरी शब्द पडले. 'हे माद्रीसुता हे सरोवर पूर्वीपासून माझ्या ताब्यात आहे. तू पाणी पिण्याचे साहस करू नकोस. प्रथम माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि त्या उत्तराने जर माझे समाधान झाले तर पाणी पी आणि घेऊन जा.' नकुलाने त्या शब्दांकडे दुर्लक्ष करून पाणी प्राशन केले आणि त्याचा परिणाम म्हणून तो निश्चेष्ट झाला.

नकुलाला उशीर का झाला? म्हणून पहायला सहदेव गेला. त्याचीही तीच गत झाली. शेवटी अर्जुन आणि भीम गेले. त्यांचीही तीच अवस्था झाली. शेवटी वाट पाहून युधिष्ठिर तेथे आला. आपले चारही भाऊ असे मृतवत पडलेले पाहून त्याला अतिशय वाईट वाटले आणि एखाद्या भुताच्या प्रभावाने तर हे झाले नसेल ना असे त्यांना वाटले. शेवटी विचाराअंती ह्या पाण्याचाच तर हा प्रभाव नसेल ना ? म्हणून पाण्याची परीक्षा घेण्यासाठी तो सरोवरात उतरला. तोच

याच्या कानावर शब्द आले. 'हे राजा. माझ्या प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत म्हणून तुझ्या भावंडांची ही गत झाली आहे. तरी तू माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि

माझे समाधान झाले की मग पाण्याला स्पर्श कर ?' एक बगळा हे सांगतो आहे हे युधिष्ठिराला समजताच 'माझ्या भावंडांना मारण्याचे सामर्थ्य सामान्य पक्षांत नाही. तरी तू कोण आहेस हे मला सांग. मग मी प्रश्नांची उत्तरे देईन.' असे धर्मराजाने सांगितले. यावर तो यक्ष रूपात प्रगट झाला आणि यक्ष व धर्मराज यात प्रश्नोत्तरे झाली.

**यक्ष -** कोण एकटा हिंडतो ? नाश झाला तरी पुन्हा कोण उत्पन्न होतो ? थंडीचे औषध कोणते ?

**युधिष्ठिर -** सूर्य एकटाच हिंडतो. नाहीसा झाला तरी चंद्र पुन्हा उगवतो. अग्नी हेच थंडीचे औषध आहे.

असे अनेक प्रश्न विचारल्यानंतर शेवटी महत्त्वाचा प्रश्न यक्षाने विचारला, 'जगातील सर्वांत मोठे आश्चर्य काय आहे ?'

त्यावर धर्मराज म्हणाला, ''दररोज लोक मृत्युमुखी पडून यमलोकाला जात आहेत आणि हे स्वतःच्या डोळ्यांनी पहात असून सुद्धा राहिलेले लोक 'अमर' बनण्याची इच्छा करतात हे आश्चर्य नाही का?''

धर्मराजाच्या उत्तराने यक्ष समाधानी झाला. धर्मराजाची आणखी एक परीक्षा घ्यायचे त्याने ठरविले. यक्ष म्हणाला, ''या चारांपैकी कोणा एकाला मी जिवंत करू ते सांग ?''

त्यावर धर्मराज म्हणाला, 'कुंतीचे तीन आणि माद्रीचे दोन असे आम्ही पाचजण आहोत. कुंतीचा मी एक जिवंत आहे. आता माद्री-मातेचा पुत्र म्हणून नकुलाला जिवंत कर.'

धर्मराजाची ही समबुद्धी पाहून यक्षाला अधिकच समाधान वाटले आणि त्याने चौघाही भावांना जिवंत केले.

यक्षाचे प्रश्न अतिशय कठीण होते म्हणूनच आजही काही कठीण प्रश्न उद्‌भवला की 'मोठा यक्षप्रश्न उभा राहिला' असे आपण म्हणतो.

# १.२१ मोठा देव कोण बरे?

एकदा काय झालं! अग्नीदेव, वरुणदेव, वृषभदेव आणि करहणमाता (अन्नदेवता) यांच्यात झगडा सुरू झाला. अग्नीदेव म्हणाले, 'ते काही नाही, मीच या धरतीवरील मोठा देव आहे.' वृषभदेव आपली मान डोलवत-डोलवत म्हणाले, 'नाही नाही. मीच या धरतीवरील मोठा देव आहे.' करहणमाता या तिघांना न जुमानता जोरात म्हणाली, 'तुम्हा तिघांपेक्षा मीच मोठी देवता आहे.' त्यांच्यातला झगडा काही संपेना! शेवटी आपला झगडा घेऊन ते देवांचा राजा इंद्र यांच्याकडे गेले.

अग्नीदेवाचा राग अजूनही कमी झालेला नव्हता. इंद्राच्या दरबारात पाय ठेवताच अग्नीदेव म्हणाले, "देवाधि देवा, मी अग्नीदेवच या धरतीवरील मोठा देव आहे ना? माझं म्हणणं हे ऐकतच नाहीत. आपणच हा झगडा मिटवावा." वरुणदेव, वृषभदेव, करहणमाता आपापले मोठेपणा व महिमा सांगू लागले. इंद्रदेवाने त्यांना शांत केलं. त्यांची समजूत काढली आणि सांगितलं की सर्व देवतांचा दरबार भरवून सर्व साक्षीने तुमच्यातील मोठा देव कोण ते जाहीर करतो. चारही देवता आपापल्या वाटेने निघून गेल्या.

राजा इंद्राने सर्व देवतांना तातडीचे बोलावणे पाठवून दरबार भरवला. ठरल्याप्रमाणे सर्व देवता इंद्राच्या दरबारात हजर झाल्या. पण एक देवता सभेस हजर नव्हती. त्या देवतेचे नाव विलदातीबाई होते. राजा इंद्रदेव जमलेल्या देवतांना म्हणाला, या झगड्याचा अचूक निवाडा विलदातीबाईच करू शकेल. त्यांच्या गैरहजेरीत हा निवाडा होणे संभव नाही. राजा इंद्राचे म्हणणे सर्वांना पटले. देवदरबारात हजर असलेला अरहणपुऱ्यु नावाचा देव इंद्राला म्हणाला, देवाधिदेवा विलदातीबाईंना देवदरबारात घेऊन येण्याची कामगिरी मझ्यावर सोपवा. मी ते काम करीन.

विलदातीबाई सातासमुद्रापलीकडे राहत होती. अरहणपुऱ्यु देव विचार

करतो. सात समुद्र ओलांडून पार जायचे कसे? त्यांनी आपल्या दोन्ही हाताचा मळ काढला. मळाचे मगर बनविले. मगरीला जिवंत केले. तिला पाण्यात सोडतांना अरहणपुऱ्यु देव म्हणाले, "मगरी मगरी, सातसमुद्र पार करण्याची ताकद तुझ्यात असेल तर तू तरंगत राहशील, नाहीतर बुडून मरशील.'' मगर तरंगत होती. अरहणपुऱ्यु देवाला आनंद झाला. त्याने मगर छातीला बांधली आणि प्रवासाला निघाला.

सात समुद्र पार केल्यावर अरहणपुऱ्यु देवाला विलदातीबाईचे घर दिसले. विलदातीबाई नुकतीच आंघोळ आटोपून बसली होती. अरहणपुऱ्युदेव आपले येण्याचे कारण सांगतो. इंद्राच्या दरबारात सर्व देवदेवता आपली आतुरतेने वाट बघताहेत हे ऐकताच विलदातीबाईंनी एक मण महू आणि एक मण भांग याची एक गोळी करून चिलिममध्ये भरली व चिलिम पेटवली. त्याबरोबर खूप धूर झाला आणि एका क्षणात विलदातीबाई आणि अरहणपुऱ्यु देव दरबारात हजर झाले.

राजा इंद्र आणि इतर देवतांनी विलदातीबाईचे स्वागत केले. हजर देवतांच्या संमतीने विलदातीबाईने झगड्याचा निवाडा करायला सुरूवात केली. चौघांना समाधानकारक निवाडा मिळावा म्हणून एक प्रयोग केला. या प्रयोगासाठी तिने एका माणसाची निवड केली आणि आठ दिवसांचा कालावधी मागून घेतला. त्या माणसाला जंगलात सोडून, तिथे अग्निदेवतेचे दर्शन घडणार नाही अशी सोय केली. पण त्या माणसाचे फारसे नुकसान झाले नाही. आठ दिवसांनतरही तो जिवंतच होता.

त्यानंतर विलदातीबाईने त्या माणसाला आठ दिवस अन्नदेवतेपासून दूर ठेवले. तो झाडांची पाने, फळे खाऊन जिवंत राहिला.

त्यानंतर विलदातीबाईने त्या माणसाला आठ दिवस वृषभ दर्शन घडू दिले नाही. तरीही तो माणूस जिवंत राहिला. त्यानंतर त्या माणसाला आठ दिवस पाण्याशिवाय ठेवले. माणूस जेमतेम एक दिवस, दुसरा दिवस राहू शकला. तिसऱ्या दिवशी पाणी-पाणी करीत तो वेड्यासारखा फिरू लागला. आठ दिवसानंतर तो मरायला टेकला.

या छोट्याशा प्रयोगावरून विलदातीबाईने हे समजावून सांगितले की, माणूस अग्नी, वृषभ, अन्न या वाचून राहू शकेल, पण पाण्याशिवाय जगणे शक्य नाही.

आठ दिवसानंतर पुन्हा इंद्रदेवाच्या नगरीत देव-देवतांचा दरबार भरला. सगळेजण निवाडा ऐकण्यासाठी उत्सुक होते. विलदातीबाईने अतिशय शांतपणे आपला निवाडा जाहीर केला, अग्नीदेव, वरुणदेव, वृषभदेव आणि करहणमाता या चौघा देवतांमध्ये मला वरूणदेवतेचे पारडे जड वाटते. आपण पाहिलेच की माणूस अग्नी, वृषभ, अन्न याशिवाय काही काळ जगू शकेल पण पाण्याशिवाय जीवन जगणे असंभव आहे. म्हणून या धरतीवरील मोठी देवता वरुणदेव आहे. सर्व देवतांनी एकमताने वरुणदेवाचा महिमा मानला. वरुणदेवाचा जयजयकार झाला.

अग्नीदेव, वृषभदेव आणि करहणीमाताही वरुणदेवाचा महिमा मानतात. त्यांच्यातला झगडा विलदातीमातेने हुशारीने सोडविला. इंद्रासकट सर्व देवता या निवाड्याने खुश होत्या. पण परत झगडा नको म्हणून विलदातीमातेने अग्नीदेव, वरुणदेव, वृषभदेव आणि करहणीमाता यांना जवळ बोलाविले आणि सांगितले, वरुणदेवा आपण रांजणात राहवे, अग्नीदेवा आपण चुलीत रहा, वृषभदेवा आपण गोठ्यात रहा आणि करहणमातेने कोठीत राहावे. अशाप्रकारे विलदातीमातेने चारही देवतांच्या जागा ठरवून दिल्या. तेव्हापासून चौघेही आपापल्या जागी राहून आपले काम सुरळीतरित्या पार पाडताहेत!



# १.२२ होळीविषयी लोककथा

(गोदाकाठची लोककथा)

गोदाकाठच्या परिसरात फाल्गुन महिन्यात होळी हा सण अत्यंत आनंदाने साजरा केला जातो. या होळी सणाविषयी एक लोककथा अशी सांगितली जाते :

'विष्णुच्या दरबारात दोन द्वारपाल राहात होते. इतक्यात भृगु महाऋषी विष्णूस यज्ञाचे फळ देण्यासाठी विष्णुच्या घरी जात असतात. तेव्हा विष्णूचे द्वारपाल जय आणि विजय हे भृगुऋषीला विष्णुच्या दर्शनासाठी जाण्यास सक्त मनाई करतात. तेव्हा भृगु महाऋषी त्या द्वारपालाला शाप देतात, "तुम्ही तीन जन्म पृथ्वीतलावर उन्मत्त असे राक्षस होऊन पडाल तेव्हा द्वारपालांनी शरण येऊन भृगु महाऋषीस उःशाप मागितला. भृगु ऋषी म्हणाले "तुम्ही राक्षस होऊन पडल्यावर श्रीविष्णु तुमचा उद्धार करतील व तुम्ही पुन्हा द्वारपाल व्हाल" तेव्हा ते पृथ्वीतलावर हिरण्याक्ष व हिरण्यकश्यप असे दोन राक्षस होऊन पडले. हे दोन्ही भाऊ उन्मत्त व महाअंतुरबळी युद्धिष्ठर असे बनले.

हिरण्याक्ष पृथ्वीची घडी करून आपल्या काखेत घेऊन पाताळगमन करण्यासाठी निघाला तेव्हा श्रीविष्णू नारायणास चिंता पडली. तेहतीस कोटी देव, ऋषी-महाऋषी आदी मुनीजन विष्णूस हात जोडून प्रार्थना करू लागले. तेव्हा विष्णु भगवानाने एका डुकराचे रूप धारण करून पृथ्वीतलावर अवतार घेतला व हिरण्याक्षासोबत त्या डुकराने घनघोर युद्ध केले. अखेर विष्णुने जोराची धडक मारून हिरण्याक्षास ठार केले. ही बातमी त्याचा बंधू हिरण्यकश्यप यास कळली. हिरण्यकश्यप चिडून आपल्या भावाच्या वधाचा सूड घेण्यासाठी निघाला. तेव्हा त्याची पत्नी कयाधू हिने आपल्या पतीस (म्हणजे हिरण्यकश्यपास) सांगितले, "तुमचा भाऊ महाअंतुरबळी होता, युद्धिष्ठर होता, परंतु त्याला साध्या डुकराने मारले. ते डुक्कर नसून विष्णु भगवान होते. तुम्ही जर आता युद्धाला गेलात तर तुमचाही वध होईल." तेव्हा

हिरण्यकश्यपाने विष्णुचे जो कोणी नामस्मरण करील त्याला फाशी देण्यात येईल, असे सांगितले. राजाची राजाज्ञा झाल्यामुळे त्याच्या राज्यात कोणीही देवाचे नाव घेत नसत.

एके दिवशी हिरण्यकश्यप आपल्या कयाधू पत्नीस म्हणाला, “मी आता अरण्यामध्ये तपश्चर्या करण्यासाठी जात आहे. जोपर्यंत मला ब्रह्मदेव प्रसन्न होत नाही तोपर्यंत मी परत येणार नाही.' असे सांगून तो सकाळी - सकाळी अरण्यामध्ये निघून गेल्यावर त्याला एक दृश्य दिसले : तो ज्या झाडाखाली तपश्चर्या करण्यासाठी बसणार होता त्या झाडावर दोन पक्षी (पोपट व मैना) मंत्र बोलत होते. “श्रीराम - नारायण, नारायण नारायण” असे मंत्राचे बोल होते. आपला जो शत्रू आहे त्याचेच नाव आपल्या कानावर येत आहे, त्यासाठी आजचा दिवस शुभ कार्याचा नसून अपशकुनी दिवस आहे असे त्यास वाटले. म्हणून तो परत आपल्या राज्यात आला. तेव्हा त्याची पत्नी कयाधू म्हणाली “हे पतीदेव तुम्ही म्हणाला होता की, जोपर्यंत ब्रह्मदेव माझ्यावर प्रसन्न होत नाही तोपर्यंत मी परत येणार नाही; आणि तुम्ही तर संध्याकाळीच परत आलात.'' त्यावर हिरण्यकश्यप आपल्या पत्नीस म्हणाला “कयाधू मी ज्या वृक्षाखाली तपश्चर्या करण्यासाठी बसलो त्या वृक्षावर दोन पक्षी वेद पाठांतर करीत होते. आणि ते नारायण, नारायण, नारायण असे म्हणत होते." कयाधूलाही एवढीच संधी सापडली होती. ती प्रत्येक पाच मिनिटाला विचारायची की, “पतीदेव ते दोन पक्षी काय म्हणत होते? तेव्हा हिरण्यकश्यप पुन्हा पुन्हा नारायण, नारायण असे सांगायचा. कयाधूने आपल्या पतीकडून म्हणजे हिरण्यकश्यपाकडून एकशे आठ वेळेस नारायण, नारायण असे नामस्तोत्र म्हणून घेतले. त्यानंतर तिला डोहाळे सुरू झाले. ती स्वत: नारायण, नारायण असे नामस्मरण करू लागली. तिच्या पोटात वाढणाऱ्या बाळावर आपोआप या नामस्मरणाचा संस्कार होऊ लागला. तेव्हा हिरण्यकश्यपास फार क्रोध आला. त्याचे ब्रीद होते, “आपल्या राज्यात कोणत्याही देवाचे नाव घेऊ द्यायचे नाही; परंतु येथे स्वतः आपली धर्मपत्नीच नामस्मरण करते आहे. याबद्दल रागावून

हिरण्यकश्यपाने कयाधूस महान अशा अरण्यात नेऊन सोडले. त्यावेळी सायंकाळी आकाशातून इंद्रदेव गमन करत होते. तर या जंगलात कयाधूच्या अंगाचा प्रकाश पडत होता. कयाधू इतकी सुंदर होती की तिला पाहून इंद्राच्या मनात पाप आले. तिला चोरून आपल्या राज्यात नेण्यासाठी इंद्र तिच्याजवळ आला आणि तिला हात लावणार इतक्यात, नारदमुनी तेथे आले व इंद्राला म्हणू लागले की, "पापदृष्ट्या हे दुराचार्या तुझ्यासारखा कपटी या त्रिजगात कोणीही नाही. अरे ती एक महान सत्य पतिव्रता आहे आणि तू आपल्या पोटात अभिलाषा धरून तिला चोरून नेत आहेस." हे नारदाचे शब्द ऐकताच देव इंद्र लज्जीत होऊन तिथून निघून गेला.

नारदाने कयाधूस आपल्या आश्रमात नेले. तेव्हापासून कयाधू येथेच राहून नारदाची पूजाअर्चना करू लागली. संताच्या संगतीमुळे तिला सुंदर व दिव्य असा मुलगा झाला. मुलगा झाल्यावर कयाधू परत आपल्या राज्यात आली व पती हिरण्यकश्यपास म्हणाली, "हे पतीदेवा माणसाच्या हातून चूक होतच असते. मला क्षमा करा. मी महान अपराध केला आहे. आता जर मी देवाचे नाव घेतले तर मला वाटेल ती शिक्षा करा. ती भोगण्यास मी तयार आहे.'' असे म्हटल्यावर हिरण्यकश्यपाने कयाधूस राजमहालात घेतले. त्यांचा लहान बाळ प्रल्हाद काही दिवसाने थोडा मोठा झाला. त्याला चालताबोलता येऊ लागले. तो केव्हाही, कोठेही पद्मासन घालून 'नारायण - नारायण' म्हणत असे. हिरण्यकश्यपाला हे समजताच, "या पापीष्ट्याचे मला तोंड पाहायचे नाही असे म्हणाला. हिरण्यकश्यपाने प्रधानाला बोलावून भक्त प्रल्हादाला एका उन्मत्त, माजलेल्या हत्तीच्या पायाखाली चिरडण्याचे ठरविले. प्रल्हादाचे हात-पाय बांधून हत्तीच्या पायाखाली चिरडण्याचा प्रयत्न केला पण प्रल्हादाला काहीही इजा झाली नाही. हे पाहून हिरण्यकश्यपाने विषारी साप, विंचू इत्यादी विषारी प्राणी असलेल्या कोठडीत प्रल्हादाला कोंडले. तेव्हा भक्त प्रल्हाद सदैव नारायण, नारायण याच मंत्राचा जप करू लागला. तेव्हाही विष्णुदेवाने त्याचे रक्षण केले. प्रल्हादाला काहीच होत नाही असे पाहून हिरण्यकश्यपाने चिडून

एका मोठ्या कढईत तेल तापविले. त्या कढईत नारळ टाकले तर ते फुटून जात होते, इतके तेल तापले होते. अशा तेलात प्रल्हादाला टाकण्याचा प्रयत्न होतो, परंतु देवकृपेने त्या कढईतल्या गरम तेलाची फुले होतात व तेल थंड होते. हे पाहून हिरण्यकश्यपाला खूप दुःख होते.

हिरण्यकश्यप भक्त प्रल्हादाला मारण्यासाठी अनेक प्रयत्न करतो. भक्त प्रल्हादाला एका उंच कड्यावरून दरीत फेकले जाते. पण तिथेही भगवान विष्णू अलगद प्रल्हादाला झेलतात. हे पाहून हिरण्यकश्यपाची बहीण होलिका ही आपल्या कडक तपाच्या बळावर अग्नीदेवतेला प्रसन्न करून घेते व हिरण्यकश्यपाला म्हणते, “दादा मला अग्निदेवता प्रसन्न आहे. मी प्रल्हादाला मांडीवर घेऊन अग्नीमध्ये प्रवेश करते. अग्नीदेव मला प्रसन्न असल्यामुळे मला काहीही होणार नाही, पण माझ्या मांडीवर असलेला प्रल्हाद जळून खाक होईल."

ही कल्पना हिरण्यकश्यपाला चांगली वाटली. हिरण्यकश्यपाने एकावर एक गौऱ्या रचल्या. त्यात होलिका भक्त प्रल्हादासह बसली. हिरण्यकश्यपाने तिला अग्निकाष्टा दिली. काही वेळाने होलिकेला अग्नीचे चटके बसू लागले. त्यातच ती जळून नष्ट झाली व भक्त प्रल्हाद त्यातून हसत बाहेर आला. हे पाहून हिरण्यकश्यपाला खूप दुःख झाले. होलिकेने कपटाने आपल्या वरदानाचा वापर केला म्हणून ती यात नष्ट झाली. ज्या ठिकाणी होलिका नष्ट झाली होती त्याच ठिकाणी होलिका एरंडाच्या रूपाने प्रकट होते. म्हणून आजही होळी हा सण साजरा केला जातो व त्या होळीत एरंडाचे झाड किंवा फाटा ठेवला जातो. यात कपटाचा नाश होतो, अशी समजूत आहे.

# १.२३ कहाणी आकाशदिव्यांची

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. तेव्हा देव देखील दिवाळी साजरी करायचे. देव, देवता, यक्ष, गंधर्व, किन्नर, पऱ्या आभाळात दिवाळीची मजा करायचे. पृथ्वीवरच्या माणसांना, मुलामुलींना देखील देवांची दिवाळी बघायला मिळायची. त्यावेळीची ही गोष्ट.

एकदा काय झालं...

एका गावात हेमा आणि कुमा नावाच्या दोघी बहिणी राहत होत्या. बहिणी-बहिणी पण सावत्र. हेमा रूपाने नीटनेटकी, नाकीडोळी नीटस. कुमा मात्र बसक्या नाकाची, काळ्या रंगाची होती. हेमा वागायला गोड तर कुमा खाष्ट. लोकांनी मदत करावी, त्यांच्याशी चांगलं बोलावं, हा हेमाचा स्वभाव, तर येईल त्याच्या अंगावर वसकन् धावायचं, उठसूठ ज्याला त्याला टाकून बोलायचं असं होतं कुमाचं वागणं.

एकदा नेहमीप्रमाणे दिवाळीचे दिवस आले, आकाशात देवांनी दिवाळीचा थाट सुरू केला. हेमा आणि कुमा ती गंमत पहात होत्या. कुमा हेमाला म्हणाली, “ए हेमे, आपल्याला तिथं जाऊन दिवाळी करायला मिळाली तर काय मज्जा येईल नाही?” “होय. का नाही येणार ? अगं, आपण मुली. तिथली दिवाळी ही फक्त देवांसाठीच असते.''

देव अंतर्ज्ञानी असतात. त्यांना पृथ्वीवरच्या माणसांचं बोलणं ऐकू यायचं. मात्र देव काय बोलताहेत हे माणसांना ऐकायला मिळायचं नाही. हेमा कुमाचं बोलणं ऐकून परीराणी देवाला म्हणाली, “देवा, हेमा-कुमापैकी कुणाला तरी या वर्षीच्या दिवाळीत इथं बोलवायचं का?"

‘छे, छे! मुलांना आणि सदेह, स्वर्गात आणायचं? अं हं! हे शक्य नाही. आजवर कधी असं घडलं नाही, आताही तसं करता येणार नाही.' तरी देखील

परीराणीने देवास वारंवार विनंती केली. तेव्हा देवाला दया आली. त्यावर ब्रह्मदेव म्हणाले, 'हे पहा, मुलींना इथं आणायचं की नाही ते नंतर पाहू. पण कुठली वाईट व कुठली चांगली हे अगोदर ठरवू या. मग मी या दिवाळीनिमित्त एक आगळी गंमत सांगेन."

ब्रह्मदेवाची ही कल्पना सर्वांना पसंत पडली. हेमा आणि कुमाची परीक्षा घेण्यासाठी परीराणीने एका परीक्षकाला पृथ्वीतलावर जायला सांगितले.

छोट्या दोस्तांनो, अन् खरोखरीच एक परी भिकाऱ्या म्हातारीचे रूप घेऊन पृथ्वीवर अवतरली. प्रथम ती म्हातारी कुमाच्या दारात उभी राहिली. कुमा त्यावेळी पणत्यांमध्ये तेल ओतीत होती. म्हातारी कुमाला म्हणाली, “बाळे, तू मला थोडं तेल देतेस? माझ्याजवळ शिळी भाकरी आहे, पण कोरडी भाकरी मी कशी खाऊ ?"

लटलटती मान, तोंडातून लाळ गळते आहे व अंगावर फाटके मळके कपडे अशा वेषातील ती म्हातारी पाहून कुमाला तिची किळस वाटली. म्हातारीला पाहून ती एकदम मोठ्याने ओरडली, “ईऽऽ कोणऽऽ भिकारडीऽऽ तुला लाज नाही वाटत सणासुदीच्या दिवसात अशा वेषात आमच्या दारात यायला? दुष्ट कुठली. दृष्ट लागेल बाई माझ्या सुखाला. चल जा निघ इथून!" असं म्हणून कुमाने तिला हाकलले.

म्हातारीच्या रूपातील ती परी वरकरणी नाराजी दाखवीत परंतु मनातल्या मनात कुमाला हसत पुढे निघाली. पुढचे घर होते हेमाचे. म्हातारी घराबाहेरील अंगणात आली. हेमा त्यावेळी पणत्यांमध्ये तेल भरीत होती.

"बाळ," म्हातारीने हाक मारली. “काय आजीबाई, या हो!" म्हणत हेमाने तिचे स्वागत केले. धावत अंगणाबाहेर गेली. तिनं म्हातारीला आधार दिला. म्हातारीचे हात धरून हेमाने तिला घरात आणले. सतरंजीवर बसवले.

“कशाला? कशाला पोरी मला घेतेस घरात?' म्हातारी बोलली. “वाऽऽ आजीबाई आता दिवाळी सुरू होणार. आणि तुम्ही तर माझ्या पाहुण्या.” हेमा लाघवीपणाने बोलली. “अगं, कसला पाहुणचार करतेस? मला खायला थोडं तेल दे म्हणजे झालं. कोरडी भाकरी चटणी आहे माझ्याकडं. म्हातारी म्हणाली.

“वाऽऽ आजीबाई असं कसं होईल? मी तुमच्या अंगाला तेल लावणार. तुम्हाला न्हाऊ घालणार. मग तेलचटणीचं बघू.' हेमाच्या या आर्जवी बोलण्यामुळे म्हातारीचा जीव मोठा झाला.

‘गुणाची ग ऽऽ बाई माझी' म्हणत म्हातारीने हेमाच्या कानावर उलट्या हाताने बोटे मोडून तिची दृष्ट काढली.

- हेमाचं तिकडं लक्ष कुठं होतं? तिनं म्हातारीचे हात धरले, तिला घरात नेलं, खरोखरीच तिला तेल लावून न्हाऊ घातलं. म्हातारीची शिळी भाकरी गोठ्यातील गाई वासरांना दिली व म्हातारीला गोड धोड पदार्थ दिले. हेमाचा पाहुणचार घेऊन म्हातारी आभाळात आली.

‘‘देवा, सांगू का कोणती मुलगी?" असं परीराणी म्हणत होती तर तिला मध्येच अडवीत देव म्हणाले, “परीराणी हे का मला सांगायला हवंय? अग, ती हेमा मोठी चांगली मुलगी आहे."

“मग तिला आणायचे ना या दिवाळीत?" परीराणीचा प्रश्न. अं! पण मी तिला बक्षीस देणार आहे.' “कसलं बक्षीस?" परीराणीनं पुनः विचारलं. त्यावर देव बोलले, ‘‘ही घे जादूची कांडी. नेऊन दे हेमाला. सांग तिला कागदात बांधून दिवाळीत टांगून ठेवायला."

परीराणी म्हातारीचं रूप घेऊन पुन: पृथ्वीवर आली. तिने हेमाला जादूची कांडी दिली व ती गुप्त झाली. हेमाने एका कागदात ती कांडी ठेवून कागद घराबाहेर टांगला. जादूने त्याचा आकाशकंदील झाला.

अशीच अनेक वर्षे लोटली. ते गाव, हेमा आणि कुमा आता नाहीत. देवाची दिवाळी आहे पण ती दिसत नाही.

मात्र हेमाची आठवण म्हणून तो आकाशकंदील अजूनही दिवाळीच्या दिवसात टांगून ठेवतात.



(दत्ता टोळ : दसरा-दिवाळी [संपादक : सरोजिनी बाबर])

# १.२४ 'वसुबारस'ची कहाणी

(व्रतकथेचा नमुना)

आटपाट नगर होतं. तिथं एक कुणब्याची म्हातारी होती, तिला एक सून होती. गाई-गुरं होती. ढोरं म्हशी होत्या. गव्हाळी-मुगाळी वासरं होती. एके दिवशी काय झालं, आश्विनमास आला. पहिल्या द्वादशीच्या दिवशी सकाळी म्हातारी उठली, शेतावर जाऊ लागली. सुनेला हाक मारली, मुली इकडे ये ! सून आली, "काय म्हणून म्हणाली' तशी म्हातारी म्हणाली "मी शेतावर जाते. दुपारी येईन. तू माडीवर जा, गव्हाचे, मुगाचे दाणे काढ, गव्हाळे, मुगाळे शिजवून ठेव', असं सांगितलं. आपण निघून शेतावर गेली. सून माडीवर गेली, गव्हाळी-मुगाळी वासरं उड्या मारीत होती. त्यांना ठार मारली. चिरली व शिजवून ठेवून सासूची वाट पहात बसली. दुपार झाली. तशी सासू घरी आली. सूनेनं पान



वाढलं. सासूनं देखलं. ताबंड मांस दृष्टीस पडलं. तिनं हे काय म्हणून सुनेला पुशिलं. सुनेनं सर्व हकिगत सांगितली. सासू घाबरली. न समजता चूक घडली, म्हणून तशीच उठली. देवापाशी जाऊन बसली. प्रार्थना केली. “देवा, देवा हा सुनेच्या हातून अपराध घडला, तिला ह्याची क्षमा करा ! गाईची वासरे जिवंत कर. असं न होईल तर संध्याकाळी मी आपला प्राण देईन." असा निश्चय केला. देवापाशी बसून राहिली. देवानं तिचा एकनिश्चय पाहिला. निष्कपट अंत:करण देखिले. पुढे संध्याकाळी गायी आल्या. हंबरडा फोडू लागल्या. तशी देवाला चिंता पडली. हिचा निश्चय ढळणार नाही असं देवाला वाटलं. मग देवानं काय केलं ? गाईची वासरं जिवंत केली. ती उड्या मारत मारत प्यायला गेली. गाईचे हंबरडे बंद झाले. सुनेला आश्चर्य वाटलं. म्हातारीला आनंद झाला. तसा सर्वांना आनंद झाला. नंतर म्हातारीनं गाई-गोऱ्ह्यांची पूजा केली. स्वयंपाक करून नैवेद्य दाखविला. देवाचे आभार मानले. नंतर आपण जेवली. आनंदी झाली. तसे तुम्ही-आम्ही होवू. ही साठा उत्तराची कहाणी, पांचा उत्तरी, पिंपळाच्या पारी, गाईच्या गोठी सुफळ संपूर्ण !

(लोकसाहित्य : य.च.म.मुक्त विद्यापीठ)

# १.२५ धनतेरस

(आश्विन वद्य त्रयोदशीचा दिवस 'धनतेरस' या नावाने वाखाणला जातो. तेरस याचा अर्थ तेरा! म्हणून त्रयोदशीला बोली भाषेत तेरस म्हणू लागले. धनतेरस ह्या दिवसाला बायकांची दिवाळी असेही म्हणतात. कारण या दिवशी प्रभातकाली घरातील सर्व स्त्रिया व मुली अभ्यंगस्नान करतात. धनतेरस या सणामागे प्राचीन काळची एक कथा जडलेली आहे.)

प्राचीन काळी यमुना नदीच्या काठी हरीतपूर नावाची एक नगरी होती. तेथे हंस नावाचा एक राजा राज्य करीत होता. तो मोठा शूर व प्रजाहितदक्ष होता. त्याला शिकारीचा फार छंद होता. तो नेहमी अरण्यातून शिकार करीत भटकत असे.

वसंत ऋतूचे दिवस होते. राजा शिकारीसाठी बाहेर पडला. बराच दूर गेल्यानंतर त्याला एक काळवीट दिसला. राजाने काळवीटाचा पाठलाग सुरू केला. काळवीट दाट जंगलात शिरला. राजाची शिकार हुकली.

दोन प्रहर झाली होती. राजा तहानेनं व भुकेनं हैराण झाला. बरोबरच्या लोकांची चुकामूक झाली. तेथून पाच सहा मैलावर हंस राजाचा परम मित्र हैम राजाची राजधानी होती. राजा मित्राच्या राजमंदिरी आला. हैम राजाने हंसाचे यथोचित आदरातिथ्य केले.

त्याच दिवशी हैम राजास पुत्ररत्न झाले होते. सर्वत्र आनंदी आनंद झाला होता. सनई चौघडे झडत होते. गुढ्या तोरणे उभारून प्रजाजन आनंदोत्सव साजरा करीत होते. नागरिक सुवासिनी वाजतगाजत यमुनेच्या पाण्याचे कलश आणून राजमंदिराच्या पायऱ्यावर ओतत होत्या.

प्रीती भोजन झाल्यानंतर उभय मित्र राजमहालात गप्पा गोष्टी करत आराम करत होते. नूतन राजपुत्राचे जातक वर्तविण्यासाठी राज ज्योतिषी व अनेक

ऋषीमुनी आले होते. हैमराजाने सर्वांचे स्वागत केले. ते सर्वजण आसनावर बसले.

'नूतन राजबालक शुभ तिथी, शुभ वार, शुभनक्षत्र व शुभ योगावर जन्मले आहे. महत्त्वाचे ग्रह उच्चीचे आहेत. राजपुत्र महारथी योद्धा व चक्रवर्ती सम्राट होईल; तो दीर्घायु होईल. राजपुत्र सर्व सुलक्षणांनी युक्त आहे.' सर्वांनी एक मुखाने भाकीत वर्तविले. राजाला आनंद झाला. त्याने सर्वांना उपहार, वस्त्र प्रावरणे व भरपूर सुवर्णदान केले. राज पुरोहित, राजज्योतिषी व सर्व ऋषिमुनी संतुष्ट होऊन राजाला व नूतन राजपुत्राला आशीर्वचन करून आनंदाने निघून गेले.

बलाहक नावाचा एक तरूण ऋषी मागे राहिला. त्याने राजाचे कसलेही दान स्वीकारले नव्हते. त्याने सांगितले, "राजपुत्राला दंश होईल त्यावेळी फार सावधपणे वागून नागदंशापासून त्याचा बचाव केला तर हा अपमृत्यू टळेल व तो शतायुषी होईल. भाग्यवान होईल. चक्रवर्ती सम्राट होईल. मी कटुसत्य कथन केले आहे. अपमृत्यूचा दिवस, नेमकी वेळ व मृत्यूचे कारण कथन केले आहे. सावधान राहून राजपुत्राचा अपमृत्यू टाळण्याचा आटोकाट प्रयत्न करण्याचे काम तुमचे आहे.'' एवढं बोलून व काहीही न स्वीकारता बलाहक मुनी ताडताड निघून गेला.

राजपुत्राच्या जन्मोत्सवाच्या आनंदी वातावरणात मिठाचा खडा पडला, सर्व राजपरिवार व प्रजाजन दु:ख सागरात बुडून गेले.

हंस राजा खंबीर होता. तो घाबरला नाही. त्याने हैम राजाची, राणीची व सर्वांची समजूत घातली. "घाबरू नका. अद्यापि वीस वर्षांचा अवधी आहे. वाटेल ते प्रयत्न करू व राजपुत्राचा अपमृत्यू टाळू. हे भाकीत ऐकून राजपुत्राला कोणी आपली मुलगी देणार नाही. मला राजकन्या झाली तर मी तिचा विवाह राजपुत्राशी करून देईन. ती भाग्यवान असेल, पुण्यवान असेल, तर तिचे वैधव्य टळेल. प्रयत्नांती परमेश्वर भेटतो हे ध्यानी घ्या."

दोन दिवस राहून हंस राजा, परत गेला. राजपुत्राचा नामकरण समारंभ

झाला. त्याचे नांव हेमचंद्र ठेवण्यात आले. राजकुमार शुक्लेंदुप्रमाणे दिसामासांनी वाढू लागला. तीन वर्षांनी हंस राजास कन्या झाली. हंसाला आनंद झाला. राजकन्येचे नाम हेमांगिनी ठेवण्यात आले.

कालचक्र झपाट्याने फिरत होते. हेमचंद्रास विसावे वर्ष लागले, हेमांगिनी सतरा वर्षांची उपवर कन्या झाली. हेमचंद्र हेमांगिनीचा विवाह ठरलेलाच होता. हंस राजाने मोठ्या थाटामाटाने विवाह समारंभ साजरा केला. हंसाने हेमचंद्राच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली. त्याने युमनेच्या डोहाच्या मध्यभागी एक खांबी राजमहाल बांधला. तो गोलाकार होता. मध्यभागी एक दालन असून सभोवती चार सारखी दालने होती.

कोजागिरी पौर्णिमा होताच हेमचंद्र व हेमांगिनी त्या महालात राहावयास गेले. तो महाल सुसज्जित करण्यात आला होता.

हेमांगिनी मोठी धैर्यशाली राजकन्या होती. तिने जरूर ते साहित्य मागवून घेतले. सर्व तयारी केली. आश्विन वद्य त्रयोदशी उजाडली. तो काळ दिवस होता. ती काळरात्र ठरणार की, शुभ रात्र ठरणार हे विधात्याचे हाती होते. मधल्या दालनात चंदनाच्या पलंगावर हेमचंद्र व हेमांगिनी बसले. सूर्यास्त होण्यापूर्वी सर्व महाल दिव्यांनी प्रज्वलित केला. सर्वत्र लखलखाट झाला. प्रत्येक दालनात सुवर्णमुद्रा, हिरे, माणिक, मोती यांच्या राशी घालून ठेवल्या. सुवर्ण पात्रे भरून केशरी मधुर दूध ठेवले. कोणालाही दिसणार नाही अशा अदृश्य जागेमधून मुरली पुंगी वगैरे वाद्यांचे नादमधूर सूर निनादू लागले. हेमांगिनी हेमचंद्राला धीर देत यमदूताची वाट पाहात बसली.

यम दरबारात एकच धांदल उडाली. कराल, विकराल, कालमुख व कालद्रष्टा या चार भयंकर यमदूतांवर हेमचंद्रास आणणेचे काम सोपविण्यात आले.

यम राजानी प्रथम कराल यास पाठविले. तो वेळेत परत आला नाही म्हणून विकरालाची रवानगी झाली. तोही आला नाही तेव्हा कालमुखास पाठविले. त्याचाही पत्ता नाही म्हणून कालद्रष्टा रवाना झाला. तोही बेपत्ता झाला. यमराज चिडले. संतापले व स्वत: रेड्यावर आरूड होऊन घटनास्थळी आले, त्यांनी

आपले वहान रेडा याला यमुनातीरी चरावयास सोडले. काल, भुजंग कालीचे रूप घेऊन महालात प्रवेश केला.

असंख्य दिव्यांच्या लखलखाटाने त्यांचे डोळे दिपले. मंजूळ सूर निनादानी ते डोलू लागले. धनराशींचा मोह होऊन त्यावर बसून डोलू लागले. मसालेदार दुधाच्या सुगंधाने मोहून जाऊन दूध प्राशन केले. एवढे झाल्यावर त्यांना आपल्या कामाचे स्मरण झाले. ते धनराशीवरून उठू लागले तो चित्रगुप्त जन्म मरणाची चोपडी घेऊन हजर झाला.

''महाराज, राजपुत्राच्या अपमृत्यूची वेळ टळली आहे. आता आपण यमपाश टाकू शकणार नाही व टाकले तरी ते राजपुत्रास बांधू शकणार नाहीत. राजकन्येचे चातुर्य प्रशंसनीय आहे. नाग कशाने लुब्ध होईल हे जाणून तिने सर्व व्यवस्था केली व नागरूपी यमदूतांची मात्रा चालू दिली नाही."

यमदूतांनी व यमराजांनी आपले सत्य स्वरूप प्रकट केले. हेमचंद्र व हेमांगिनीने त्यांना साष्टांग नमस्कार घातला, "मुली, तुझ्या प्रसंगावधानाने व चातुर्याने यमदूतानाच नव्हे तर मलाही भारावून सोडलेस. धन्य आहे तुझी! मी प्रसन्न झालो आहे. तुला हवा तो वर माग" यमराजांनी सांगितले.

महाराज, या अभागिनीसाठी स्वतः धावून आलात. मला चुडेदान दिलेत यात मला संतोष आहे. मला काही नको. पण महाराज, या तुमच्या मुलीची एकच नम्र विनंती आहे. आश्विन वद्य त्रयोदशी दिवशी प्रदोश काळी दीपोत्सव करून, धनदौलतीची व गुराढोरांची यथासांग पूजा करतील त्यांच्या घरी निदान त्यादिवशी तरी अपमृत्यू घडू नयेत. सर्व चराचर सृष्टी आनंदमय व्हावी. एवढाच आशीर्वाद द्यावा. यापेक्षा मला अन्य काही मागावयाचे नाही. सर्व जग सुखी तर आम्ही सुखी आणि हा दिवस " धनतेरस' या नावाने वाखाणला जावा. सर्वांनी हा सण आनंदाने साजरा करावा एवढीच विनंती आहे.

"तथास्तु' " तुझ्या विनंतीप्रमाणे सर्व घडेल' असे बोलून यमराज चित्रगुप्त व चारी यमदूत अंतर्धान पावले. युवराज्ञी हेमांगिनीने युवराजाचा अपमृत्यू टाळल्याची वार्ता वाऱ्याप्रमाणे सर्वत्र पसरली. सर्वत्र उत्साहाला उधाण आले.

युवराज व युवराज्ञीची हत्तीवरून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. आनंदोत्सवाला भरती आली. हंस राजाच्या व हैम राजाच्या राज्यभर एक सप्ताह उत्सव साजरा करण्यात आला. हंसराजाने अपार अन्नदान, वस्त्रदान केले व धनदान केले. हंस राजाला मुलगा नव्हता. त्याने आपले राज्य हेमचंद्रास दिले.

(वा.वि.कुलकर्णी : दसरा-दिवाळी [संपादक : सरोजिनी बाबर])

# १.२६ भाऊबीज

आटपाट नगर होतं, तिथं एक भाऊ रहात होता. त्याला एकुलती एक बहीण होती. दोघांचा एकमेकांवर भारी जीव असायचा. तर एकदा काय झालं की, ह्या भावाच्या घरी त्याची ही बहीण माहेरपणाला आली, भावाला मोठा आनंद झाला. फार दिवसांनी बहीण भेटली म्हणून तो हारखून गेला. बहिणीसाठी काय करू नि काय नको असं त्याला झालं. म्हणून तो आपल्या बायकोला म्हणाला कसा, “अग, आज चांगल्या पोळ्या कर पुरणाच्या. माझ्या पंक्तीला माझी बहीण बसू दे." तशी ती त्याच्या तोंडावर “बराय' म्हणाली. पण ती पडली मुलखाची द्वाड. तिनं नवऱ्याचं ऐकलं नाही. त्याच्या एकट्यापुरत्या व आपल्यापुरत्याच तेवढ्या पुरणाच्या पोळ्या केल्या. आणिक बहिणीसाठी कणकीच्या कोंड्याच्या रोट्या केल्या.

सैपाक झाला. पाट मांडला. भाऊ जेवायला बसला. बहिणीला म्हणाला, 'ये बाई, संगं जेवू या.” पण त्याची बायको म्हणाली, "अं हं! बाप्या माणसांच्या पंक्तीला कुठं बायका बसत्यात व्हय? मी हाय की दिवानसाबासंगं जेवायला? तुमी जेवा म्होरं बघून." ह्याला ते खरं वाटलं. तो जेवला खावला. निघून गेला. पण बहिणीच्या ताटातील कोंड्याची रोटी तिला जाईना. ती उपाशीच राहिली.

होता होता चार दिवस असेच आले न् गेले. बहीण बिचारी कंटाळली. उपासमार तरी कुठवर काढायची? पण भावाला बोलली नाही. घरी जाते म्हणाली. भावानं आग्रह केला. चार दिवस आणखी रहा म्हणाला पण नाही म्हणाली. गेलं पाहिजे म्हणून तिनं नेट धरला. म्हणून मग हा चोळीपातळ आणावं म्हणून बाजाराला निघाला. तर बायको आडवी आली. म्हणाली, “तुम्ही नको जाऊ. मी आणते." आणिक स्वतः बाजारात गेली.

तिथं तिनं चोळी पातळ घेतलं; पण कशावरून तरी वाद झाला. दुकानदारावर ती कडाडली, “माझी मला खळखळी दे नि तुझी पातळ चोळी घे."

झालं, तिथं ही मारामरी जुंपली. तशी ही रडत ओरडत घरी आली. अशानं असं झालं म्हणून तिनं हा मोठा आकांत मांडला. तशी बहीण म्हणाली, “नको चोळी पातळ! तशीच जाईन मी." मग भाऊ म्हणाला, ‘लाटीव वड्या ने भाकर तरी दे बांधून, वाटंला हुईल."

त्यावर हिनं “हूं' म्हटलं, पण वड्या भाकरीच्या ऐवजी तिनं एका फडक्यात शेणकुटं बांधली. बहिणीला बिचारीला काय माहीत हिचा कावा? ती मुकाट्यानं हे गाठोडं घेऊन निघाली. ओझं लागलं तशी थबकली, बोलली मात्र नाही. भावजयीकडे बघून तशीच वळली.

तर अर्धा निम्मा रस्ता ओलांडल्यानंतर तिचं बारकं पोरगं भूक लागलीय म्हणालं, म्हणून ही थांबली. गोठोडं उघडलं, बघतीय तर शेणकुटं ! आता काय करावं? पोरानं तर रडून रडून हैदोस घातला. काय तरी, कुठं तरी गवसतंय का बघावं म्हणाली. उठून विहिरीकडे निघाली. रड रड रडली. तशी शंकरपार्वतीला काळजी पडली. त्यांनी माणसाचं रूप घेतलं. हिच्यासमोर ते आले. काय पाहिजे म्हणून त्यांनी हिला विचारलं. तशी हिनं झाली गोष्ट साईनसंगीत देवाच्या कानावर घातली, आणिक म्हणाली कशी, “पोराला काय घालू खायला? गांवचा पल्ला लई लांब हाय अजून."

त्यामुळे मग पार्वती म्हणाली, "त्या शेजारच्या मळ्यात जा. तिथं तुला एक मोठा भोपळा दिसेल. तोडून घे. घरी ने. चिरून उकडत घाल. तुझ्या मनासारखं हुईल." हिनं तसं केलं. घरी गेल्याबरोबर बिगीनं भोपळा चिरून चुलीवर शिजत ठेवला न् नदीला पाणी आणायला गेली.

इकडे तोवर शेजारणी जमल्या. काय शिजत लावलंय म्हणाल्या. कुणाला दाद लागली नाही. आपल्यातच कुजबुजल्या. माघारी गेल्या. चुलीवरचा हंडा उघडून बघितला तर मोकळा दिसला म्हणून पुटपुटत गेल्या.

इतक्यात बहीण घरी गेली. तिनं चुलीवरचा हंडा उचलून खाली उतरला. बघतेय तर हंडा वजनदार झालेला आणि सोन्यानं गच्च भरलेला! तिचं भान हरपलं. नवऱ्याला सांगत गेली. अशानं असं झालं म्हणाली. देव पावला म्हणून

हरखली. तिनं कोरभर भाकरीएवढा सोन्याचा तुकडा काढून घेतला. बाजारला गेली. दागिने केले. सामानसुमान आणलं. कपडालत्ता केला.

होता होता मग एकदा काय झालं की, एका बाजारात भावजयीनं तिला बघितलं. तिच्या अंगावरचा चांगला कपडालत्ता आणि दागदागिना बघून तिला मोठं नवल वाटलं. एवढं हिनं कुठून आणलं म्हणाली. आणि मग तिनं आपल्या घरचं गाठोडं हिनं चोरलं म्हणून तिच्यावर आळ घेतला. नवऱ्याचे चांगले कान भरले. नवऱ्याला पण तिचं बोलणं खरं वाटलं. तो बहिणीवर रागावला. तावातावानं तिच्या घरी आला. भला मोठा दगड घेऊन आला. जेवला नाही. बोलला नाही. बहिणीची नजर चुकवून एका तुळीवर जाऊन बसला. बहिणीला मारायला टपला.

बहीण जेवली नाही. मुलांना तिनं जेवू घातलं, नवऱ्याला जेवू घातलं. काम आवरून ती समईजवळ आली. आणि आता भाऊ तिच्या डोक्यात दगड घालणार तितक्यात ही म्हणाली कशी, ''ऐक समुईबाई, फार दिसांनी भावाला भेटायला गेले. भाऊ पुरणाची पोळी कर म्हणाला. पण भावजयीनं मला कोंड्याची रोटी वाढली. भावाच्या पंक्तीला बसू दिलं नाही. भावाला लुगडं चोळी करू दिली नाही. खुळखुळीवर भांडण काढलं. केला सौदा मोडला. आणिक बरं का समईबाई, मी यायला निघाले. भाऊ म्हणाला, लाटीव वड्या ने, भाकरी ने. हिनं शेणकुटं बांधून दिली. वाटेवर पोरगं रडलं, भूक लागली म्हणालं, पण गाठूडं सोडतीया तर अगं, आत शेणकुटं बरं का? देवाला दया आली. शंकरपार्वती माणूस होऊन आली. मला भोपळा दिला. घरी नेऊन व चिरून शिजवा म्हणाली. मी तसं केलं. हंडा सोन्यानं भरला. नशीब उजाडलं. मी घर सजवलं, दागिने केले, चांगलं लुगडं घेतलं आणिक बरं का समईबाई, भावजयीनं घरचं गाठूडं चोरलं म्हणून माझ्यावर आळ घेतला. भावाचे कान भरले. आणिक बरं का समईबाई तो मला मारायला आता आलाय! तुळीवर दगड घेऊन बसलाय. यंदाची हीच माझी भाऊबीज. समईबाई, माझ्या भावाला संभाळ. उदंड आऊक्ष दे, दिवाळी तुझ्या रूपानं आलीय."

भावानं हे सारं ऐकलं. तो उठला. गहिवरला. दगड बाजूला टाकला. धावत बहिणीकडे आला. त्यानं बहिणीच्या पायावर डोकं ठेवलं. ढसाढसा रडला. झाली गोष्ट समजली म्हणाला. चुकी झाली बोलला.

बहिणभाऊ कडकडून भेटले. प्रेमाने बोलले बसले. समाधानानं जेवले खावले. त्यांच्या मनाला आनंद झाला. भावानं बायकोला बेदम ठोकली. सारी धनदौलत बहिणीकडे घेऊन आला. म्हणाला, “ही घे भाऊबीज" पण बहीण शहाणी होती. “बोललास त्यातच पोट भरलं' म्हणाली. तिनं भावजयीला बोलावून तिचा सन्मान केला. भावाची धनदौलत धक्का न लावता परत दिली. म्हणाली, “भाऊ भेटला. पंक्तीला जेवयाला मिळालं. भाऊबीज साजरी झाली."

सगळीकडे मग आनंदी आनंद झाला. आमची कहाणी संपली. तुमची तहान भूक हरपली.

(सरोजिनी बाबर : दसरा-दिवाळी)

# १.२७ करुणा

(जैन लोककथा)

एका कुटुंबात तीन भाऊ होते. त्यांच्या बायका आळीपाळीने स्वयंपाक करीत असत. एके दिवशी लहान सूनेला स्वयंपाक करावयाचा होता. त्या दिवशी तिने विचार केला की आज मी असा स्वयंपाक करते की सगळेजण बोटे चाटून जेवतील. तिने बरेच पदार्थ तयार केले. पण जेव्हा भोपळ्याची भाजी चाखून पाहिली तेव्हा तिला ती कडू वाटली. तिने ती भाजी एकीकडे ठेवून दुसरी भाजी बनविली.

इतक्यात एक श्वेतांबर जैन मुनी भिक्षा घेण्यास आले. तिने विचार केला की, मुनींना तर स्वादाशी काही घेणं देणं नसतं. तर का नाही, यांनाच भाजी देवून टाकावी, आणि तिने तसेच केले.

जेव्हा मुनी भिक्षा घेवून आपल्या निवासस्थानी आले आणि इतर मुनींच्या बरोबर जेवावयास बसले. तेव्हा त्यांना दिसले की भाजीत तर एक पाल मरून पडली आहे. हे पाहून आचार्यांनी लागलीच आदेश दिला की ही भाजी दूर जंगलात फेकून द्या. कारण ही विषारी झाली आहे.

मुनी भाजीचे भांडे घेवून जंगलात गेले आणि एका निर्जनस्थानावर ते रिकामे करू लागले. त्यांनी थोडी भाजी ओतलीच होती की काही मुंग्या तेथे आल्या आणि ती भाजी खाऊ लागल्या. पण चाटताच त्या मुंग्या तेथेच मरून पडू लागल्या. हे पाहून मुनी विचार करू लागले की मी जिथे पण ही भाजी टाकीन तिथे कोणी न कोणी प्राणी खाईल आणि मरेल. माझा मुनिधर्म हेच सांगतो की मी कोणत्याही जीवाचे प्राण घेवू नये. यावर एकच उपाय आहे की मी स्वतः ही भाजी खावी आणि प्राण्यांवर करूणाभाव असणाऱ्या मुनींनीं असंच केलं.

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# १.२८ पुरुषार्थ

(जैन लोककथा)

एका शहरात तीन मित्र रहात होते. एक राजपुत्र, एक मंत्रिपुत्र आणि एक वणिक पुत्र. एकदा तिघंही एकत्र आले आणि विचार करू लागले की कोण कशामुळे जिंकला आहे. राजपुत्र म्हणाला, "मी आपल्या पुण्यामुळे जिंकलो आहे." मंत्रीपुत्र म्हणाला, "मी आपल्या बुद्धिबळावर जिंकलो आहे." वणिक पुत्र म्हणाला, "मी आपल्या चतुराईने जिंकलो आहे.''

तिघे मित्र परदेशात गेले आणि एका शहरातील बगीच्यात थांबले. वणिक पुत्रास जेवण्याची व्यवस्था करण्यास सांगण्यात आले. वणिक पुत्र एका वाण्याच्या दुकानावर गेला. त्या दिवशी कोणतातरी सण होता आणि दुकानात इतकी गर्दी होती की तो वाणी सर्व ग्राहकांना लवकर किराणा देवू शकत नव्हता. तेव्हा वणिक पुत्र त्याच्या दुकानात थांबून ग्राहकांना मीठ, तूप, तेल, गुळ इ. वस्तू बांधून देवू लागला.

वाण्याने हिशोब केला तर त्या दिवशी त्याला बराच नफा झाला होता. त्याने वणिक पुत्रास जेवणासाठी निमंत्रित केले. परंतु तो म्हणाला, "माझे अजून दोन मित्र आहेत." त्या वाण्याने त्याच्या मित्रांना देखिल बोलावून त्यांना जेवण, विडा देऊन सत्कार केला आणि त्याला पाच रूपये दिले.

दुसऱ्या दिवशी मंत्री पुत्राची पाळी होती. तो न्यायालयात गेला तेव्हा तेथे खटला सुरू होता. दोन सवतींमध्ये भांडण सुरू होते. एका सवतीला मुलगा होता परंतु ज्या सवतीस मुलगा नव्हता ती त्या मुलाचे अत्यंत प्रेमाने पालन पोषण करीत होती. त्यामुळे तो मुलगा आपल्या आईजवळ पण जात नव्हता. एक दिवस दोघींमध्ये भांडण जुंपले. दोघी म्हणत होत्या की, "हा माझाच मुलगा आहे." न्यायाधीश पण बुचकळ्यात पडला. तेव्हा मंत्रीपुत्राने विनंती केली की, "जर तुमची आज्ञा असेल तर मी ह्या खटल्याचा निर्णय देवू शकतो."

न्यायाधिशाने होकार देताच मंत्रीपुत्र दोन्ही सवतीना बोलावून म्हणाला, “जर तुम्ही खरं बोलला नाही तर आम्ही या मुलाचे दोन तुकडे करून दोघींना अर्धे-अर्धे वाटून देवू.”

हे ऐकताच मुलाची आई रडत रडत म्हणाली, “मला मुलगा नको आहे. यास माझ्या सवतीला देवून टाका. जर हा जिवंत राहिला तर मी कमीत कमी त्याला पाहू तर शकेन.”

न्यायाधिशाने ओळखले की हा मुलगा कोणाचा आहे. त्या मंत्रीपुत्राचा त्यांनी सन्मान करून त्याला एक हजार रुपयाचे बक्षीस दिले.

तिसऱ्या दिवशी राजपुत्राची पाळी होती. तो आपले भाग्य अजमवण्यासाठी निघाला. दिवसभर भटकत राहिला आणि शेवटी येवून मित्रांना म्हणाला, “मित्रांनो, मला वाटतं की माझ्या पुण्याची, माझ्या भाग्याची जागा आपले राज्यच आहे. आपण तेथेच परत जावे.”

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# १.२९ सर्वात वाईट वस्तू

(उत्तरप्रदेशची लोककथा)

एक मौलवी होते. त्यांनी सगळीकडे आपल्या प्रामाणिकपणाचा प्रचार प्रसार केला. मशीदीत बसून दिवसभर मुलांना शिकवित असत आणि जी फी मिळे त्यात आपला उदर निर्वाह करीत असे. एक दिवस संध्याकाळी ते घरी आले आणि पत्नीला म्हणाले, "आज काय स्वयंपाक केला आहे. फार भूक लागली आहे."

ती म्हणाली, "आपण जेवावयास बसा. मी कोंबडा बनविला आहे."

"कोंबडा कुठून आणला?" मौलवीनी विचारले.

"संध्याकाळी आपल्या अंगणात एक कोंबडा उडून आला; मी त्याला कापले आणि शिजविले." पत्नी म्हणाली.

"दुसऱ्याचा कोंबडा तू कापला. तुला लाज कशी वाटली नाही. लोकांना कळलं तर ते काय म्हणतील. तू माझे नाव डुबवयास निघाली आहेस की काय? कोणाला विचारलं तरी होतं का?" मौलवी म्हणाले.

"मी संपूर्ण गल्लीत सगळ्यांना विचारलं, तो कोणाचाही नव्हता. तेव्हाच कापला."

"बरं, बरं, मसाला कुठून आणला?"

"मसाला तर घरात होताच"

"बरं, ठीक आहे. मी कोणा दुसऱ्याचा कोंबडा खात नाही. मसाला आपलाच आहे म्हणून तू फक्त रस्सा वाढ." मौलवीजी म्हणाले.

पत्नीने रस्सा वाढला. मौलवीने सगळा रस्सा संपविला आणि म्हणाले, "थोडा रस्सा अजून वाढ."

पत्नी भांडच घेवून आली. आणि वाटीत रस्सा ओतू लागली तर एक दोन बोट्या त्यात पडल्या. ती चमच्याने त्या बोट्या काढू लागली. तर ते म्हणाले, "राहू दे, ज्या बोट्या आपोआप येत आहे त्या येवू दे. त्यांना तर मी न स्वतः घेत

आहे, न तू देत आहेस. तेव्हा यात काही पाप नाही.” याप्रमाणे बऱ्याच बोट्या त्यांच्या वाटीत आल्या. त्यांनी पोट भरून त्या खाल्या.

सकाळी झोपून उठले तर काय पाहतात की त्यांच्या पाठीवर कोंबड्याचे पंख उगविले आहेत. ते घाबरले. आणि चादर पांघरून मशीदीत मुलांना शिकवायला आले. इमाम साहेबांनी विचारले, “काय बरं वाटत नाही का? चादर का पांघरली आहे. त्यांनी आपले दुःख इमाम साहेबांना सांगितले.”

इमाम साहेबांनी उपाय सुचविला की उद्या तुम्ही वाईटातील वाईट वस्तू खा तरच तुमचे पंख नष्ट होतील.

मौलावी शोधात निघाले. भूकेने बेजार होवून बाजारात फिरत होते. त्यांनी पाहिले एका सावकाराच्या घरी जेवणावळ सुरू आहे. त्याने मौलवीजींना आग्रह केला. एकाहून एक चांगले पक्वान्न पाहून ते जेवावयास बसले. पोटभर जेवण केले.

सकाळी उठून पाहतात. तर पंख गायब. अत्यंत आनंदित होवून ते इमाम साहेबांकडे गेले. कारण विचारले तेव्हा इमाम साहेब म्हणाले, “तुम्हाला माहितच आहे, सावकाराचा व्यवसाय व्याजाने पैसे देणे आहे. त्याच्याजवळ गरीबांच्या व्याजावर एकत्र झालेला पैसा आहे. जेवणावळ ही त्याच पैश्यातून दिली आहे. व्याजापेक्षा कोणतीही वाईट वस्तू नाही. म्हणून तुमचे पंख गायब झाले आहेत.”

मौलवीच्या लक्ष्यात आले आणि त्यांनी भविष्यात सत्य आणि प्रामाणिकपणाने जगण्याची शपथ घेतली.

# १.३० श्रावणबाळ

“बाळ श्रावणा", आईने हाक मारली. “कोठे आहेस तू?”

“हा काय तुझ्या जवळच आहे", श्रावण म्हणाला.

“असा जवळ ये बरं" , आई म्हणाली.

“हा आलो, काय पाहिजे आई तुला?” श्रावणाने विचारले.

आई म्हणाली, “हे बघ, मी आणि तुझे वडील आता अगदी पिकली पाने झालो आहोत. केव्हा गळून पडू, ते कळायचेही नाही. तेव्हा, त्यापूर्वी....”

“त्यापूर्वी काय? आई मी तुझी कोणतीही इच्छा अपुरी ठेवणार नाही.” - श्रावण म्हणाला .

आई म्हणाली, “ते आम्हाला ठाउक का नाही? आम्ही उभयता म्हातारी माणसं, त्यात आंधळी. आमचं सर्व काही तू प्रेमाने करतोस. आम्हाला क्षणभरही विसरत नाहीस. सर्व प्रकारची सेवा करतोस. तुझ्यासारखा मातृभक्त आणि पितृभक्त मुलगा आम्हांस मिळाला आहे, ही देवाची कृपा. पण ..”

“पण काय आई?, मी तुमचा मुलगा आहे. मुलाने मातापितरांची सेवा केलीच पाहिजे. ते त्याचे कर्तव्यच आहे. पण आई, तुला काय हवे ते संकोच न करता सांग. बघ मी तुझी इच्छा पूर्ण करतो की नाही.” - श्रावण म्हणाला.

“तू करशील रे, म्हणूनच संकोच वाटतो. तुला किती त्रास द्यायचा!”

“बाबा, तुम्ही तरी सांगा हो. माझं काही चुकलं आहे का? सेवेत काही कमी तर पडलो नाही?”

“नाही रे बाळा, तुझ्या आईच्या मनांत काशी यात्रेला जावयाचे आहे. तुला कष्ट द्यायला तिचं मन तयार होत नाही.” श्रावणाचे बाबा म्हणाले.

“त्यात कसले कष्ट? बाबा, आई, आपण उद्याच निघायचे.”

“अरे, पण आम्हांला चालणे कसे होणार? बैलगाडीचे हादरे आम्हांस सहन होणार नाहीत.”

“त्याची व्यवस्था मी करतो. तुम्ही काही काळजी करू नका.” श्रावण म्हणाला. दुसऱ्या दिवशी आपल्या वृद्ध व अंध मातापितरांना घेऊन श्रावणाने काशीचा मार्ग धरला. त्याने एक कावड केली. तिच्यामध्ये त्याने त्यांना बसवले. ती खांद्यावर घेऊन तो मार्ग आक्रमू लागला. बरेच दिवसानंतर तो एका घनदाट अरण्यात आला. माता पितरे थकल्यामुळे त्याने अरण्यातच मुक्काम करावयाचे ठरविले. त्यांना तहान लागली म्हणून तो लोटा घेऊन पाणी आणण्यासाठी नदीवर गेला.

याच वेळी आयोध्येचा राजा दशरथ त्याच अरण्यात आलेला होता. नदीवर पाणी पिण्यासाठी हिंस्त्र प्राणी आले की त्यांची शिकार करावयाची म्हणून नदीच्या तीरावरील एका झाडावर धनुष्यास बाण लावून बसला होता.

श्रावण नदीवर आला. त्याने लोटा धुतला आणि तो पाण्यात बुडविला. लोट्यात पाणी भरताना त्याचा आवाज झाला. दशरथ राजाने तो आवाज ऐकला. त्याला वाटले, हत्तीच पाणी पिऊ लागला आहे. आवाजाच्या दिशेने त्याने बाण सोडला आणि "आई ग!” अशी आर्त किंकाळी त्याच्या कानावर पडली. घात झाला असे वाटून तो घाईघाईने नदीवर आला. श्रावणाच्या बरगडीत बाण घुसल्याचे त्याला दिसले. रक्त भळाभळा वहात होते. धावत जाऊन त्याने श्रावणाचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले.

“कोण तू? अशा रात्री या अरण्यात काय करीत होतास?” - दशरथाने विचारले.

“मी श्रावण. माझ्या वृद्ध आणि अंध मातापितरांसाठी पाणी न्यायला आलो होतो. पण आपण कोण?” श्रावणाने क्षीण आवाजात विचारले.

“मी आयोध्येचा राजा दशरथ. शब्दवेधाची विद्या मला येत नसती, तर किती बरं झालं असतं! हा प्रसंग टळला असता.”- राजा म्हणाला.

“झालं ते झालं. होणारं कधीच टळत नाही. आता असं करा महाराज, हा कुशीत घुसलेला बाण काढा. फार वेदना होताहेत हो. अन् मग हे पाणी घेऊन माझ्या आईवडिलांना द्या. मात्र काही बोलू नका. तुम्ही श्रावण नाही, हे त्यांना कळणार नाही.”

राजाने सांगितले की, बाण बाहेर काढल्याबरोबर तू मरण पावशील. तुला मी आयोध्येस नेतो व राजवैद्याकडून उत्तम औषधे देऊन बरा करतो. पण श्रावणाने ते ऐकले नाही. या वेदनेपेक्षा मृत्यू बरा, असे तो म्हणाला. नाइलाजाने राजाने बाण बाहेर काढला. विव्हळत विव्हळत मातृपितृभक्त श्रावणाने "आई! बाबा!" करीत प्राण सोडला.

दशरथ पाणी घेऊन श्रावणाच्या मातापितरांकडे आला. त्याची चाहूल लागताच आई म्हणाली, "बाळा, किती रे वेळ झाला तुला! किती कष्टतोस तू आमच्यासाठी! बाळा पाणी मिळेना का ? फार दूर जावे लागले का रे?" दशरथाने तोंडातून चकार शब्द न काढता लोटा आईच्या हाती दिला. पण ती माऊली पाणी न पिताच म्हणाली, " बाळ, बोल ना रे. रागावलास आमच्यावर? तुला फार त्रास देत आहोत आम्ही. पण काय करू? रागावलास म्हणून बोलत नाहीस, होय ना? तू बोलल्याशिवाय आम्ही पाणी पिणार नाहीत."

तहानलेल्या त्या वृद्धांनी पाणी प्यावे म्हणून दशरथास बोलावे लागले. त्याचा आवाज ऐकताच दोघेही एकदम म्हणाले, "कोण तू? आमचा बाळ कोठे आहे? सांग काय केलंस तू त्याला?" दशरथाला सर्व हकिगत सांगावीच लागली. ती ऐकताच त्या दोघांनी एकच आकांत मांडला. " बाळ, आम्हाला सोडून कसा रे गेलास? आम्हा आंधळ्यांची काठी गेली! बाळ किती कष्ट पडले रे तुला आमच्याकरता! आणि आमच्यासाठी प्राणही दिलास रे! तुझ्याशिवाय आम्ही जिवंत तरी कसे राहू? बाळ श्रावणा, श्रावणा..."

दशरथाने त्यांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे ती दोघे त्याच्यावरच उसळली आणि संतापाने म्हणाली, "आमचा एकुलता एक मुलगा तू मारलास. आम्ही तर आता जगत नाहीच; पण लक्षात ठेव, आमच्यासारखाच तू पुत्रशोकाने मरशील. आमचा शाप आहे तुला." आणि थोड्याच वेळात त्यांनी पुत्रशोकाने प्राण सोडला. धन्य मातृपितृभक्त श्रावण आणि धन्य ती मातापितरे!

[ 'बालसुधा', पुस्तक ३ रे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. १२०-१२४]

# १.३१ धौम्य व उपमन्यू

फार प्राचीन काळी धौम्य या नावाचे एक महान ऋषी होऊन गेले. ते आपल्या शिष्यांना केवळ ज्ञान देत नसत, तर ज्ञानाच्या जोडीला व्यवहार शिकवीत असत. त्यासाठी शिष्यांना आश्रमात पडतील ती कामे करावी लागत. कामे करीत असताना त्यांना आपोआपच व्यवहारज्ञानही प्राप्त होई; आणि त्यांची शरीरे सुदृढ बनत. धौम्य ऋषींच्या आश्रमातील सर्व शिष्यांत उपमन्यू, वेद आणि आरुणी हे तीन अत्यंत बुद्धिमान आणि आज्ञाधारक शिष्य गुरुजींचे फार आवडते होते. विद्येसाठी उपमन्यू जेव्हा आश्रमात होता, तेव्हा धौम्यांनी त्याच्याकडे गाई चारण्याचे काम सोपविले. या कामानिमित्त उपमन्यूला रानावनात, अरण्यात, इकडे तिकडे हिंडावे लागे. तेथील शुद्ध हवा, निर्मळ पाणी, यामुळे उपमन्यू थोड्याच दिवसांत चांगला धष्टपुष्ट दिसू लागला. एके दिवशी गुरुजींनी त्याला विचारले, "बाळ उपमन्यू, तू रानावनात वणवण हिंडतोस; उन्हाने, श्रमाने थकून जातोस; त्यामुळे खरे म्हणजे तू अशक्त व्हायला पाहिजेस. परंतु, तू तर दिवसेंदिवस चांगला धष्टपुष्ट होत चालला आहे, याचे कारण काय बरे?"

उपमन्यूने मोठ्या विनयाने उत्तर दिले, "गुरुवर्य, आश्रमात तर मी यथेच्छ खातोच; शिवाय गावात गेल्यावर भिक्षा मागून मिळेल ते पण मी मनसोक्त खातो, यामुळे."

त्याला मध्येच थांबवून आचार्य म्हणाले, " छे! छे! हे तुझे करणे मुळीच बरोबर नाही. आश्रमात तुला पोटभर खायला मिळत असताना भिक्षा मागणे अगदी चुकीचे आहे. खरं म्हणजे, भिक्षान्न साऱ्या आश्रमाला मिळाले पाहिजे. आता येथून पुढे आश्रमात तर तुला भोजन मिळणार नाहीच; शिवाय मिळालेले सर्व भिक्षान्न तू मला आणून दिले पाहिजेस." धौम्यांना उपमन्यूची परीक्षा घ्यावयाची होती. म्हणूनच त्यांनी अशी कठीण अट उपमन्यूला घातली.

उपमन्यू अत्यंत आज्ञाधारक शिष्य असल्यामुळे त्याने गुरुंची आज्ञा शब्दश: पाळली. त्यानंतर तो रोज काही न खाता पिता गाई घेऊन जाऊ लागला आणि संध्याकाळी परतल्यावर मिळालेले सर्व भिक्षान्न गुरुजींना देऊ लागला. असे कांही दिवस गेले; परंतु उपमन्यूच्या शरीरावर काहीही परिणाम झालेला नाही असे पाहून धौम्यांना मोठे आश्चर्य वाटले. एके दिवशी त्यांनी उपमन्यूला विचारले, "उपमन्यू, तू आश्रमात जेवत नाही. संध्याकाळी सर्व भिक्षन्न माझ्याकडे देतोस. तरीही तुझ्या शरीरावर काही परिणाम झालेला दिसत नाही. आजकाल तू खातोस तरी काय? :

उपमन्यूने खरे ते सांगितले. "आचार्य, त्या दिवसापासून मी गाईचे दूध पितो. त्यामुळे माझी भूक तर भागतेच, शिवाय गाई चारण्याचे श्रमही नाहीसे होतात."

मनातून धौम्य उपमन्यूच्या खरे बोलण्यावर खूष झाले. पण बाहेरून मात्र कठोर होऊन ते त्याला म्हणाले, " बाळ उपमन्यू, ही तर अत्यंत वाईट गोष्ट आहे. गाई आश्रमाच्या असल्यामुळे त्यांच्या दूधावर आश्रमातल्या सर्वांचा अधिकार आहे. तेव्हा माझ्या परवानगीवाचून गाईचे दूध पिणे, ही तर शुद्ध चोरी आहे. येथून पुढे असे करू नकोस."

उपमन्यूने गुरुंची ही आज्ञाही पूर्णपणे पाळली. दुसऱ्या दिवसापासून दूध पिणे त्याने सोडून दिले. असेच आणखी काही दिवस गेले. गुरूंना त्याने 'मी आता काय खाऊ?' असे कधीही विचारले नाही. धौम्य ऋषी आता हा काय करतो, यावर लक्ष ठेवून होते. उपमन्यू आता झाडाची पाने खाऊ लागला. परंतु झाडांच्या पानांनी पोट कसे भरणार? तो दिवसेंदिवस अशक्त होत चालला. मात्र गुरुंची सेवा आणि गायी चारण्याचे काम यात मात्र त्याने कधी चुकारपणा केला नाही. परंतु हळू हळू काही विषारी झाडांच्या पानांमुळे त्याची दृष्टी मंद होऊ लागली; आणि पुढे तर तो पूर्णपणे आंधळा झाला. तेव्हापासून गाई चारायला नेणे त्याला मोठे कठीण होऊन बसले.

एके दिवशी नित्याच्या सरावामुळे त्याने गाई चारायला नेल्या खऱ्या; परंतु आंधळेपणामुळे परत येताना त्याला उशीर झाला. रात्र होऊन काळोख पडला.

आधीच अशक्तपणामुळे त्याच्या पायांत त्राण उरले नव्हते; त्यामुळे अडखळत, ठेचाळत, येता येता तो एका खोल, पडक्या अंधाऱ्या विहिरीत पडला. इकडे आश्रमात गाई परत आल्या तरी उपमन्यूचा पत्ता नाही, असे पाहून धौम्य काळजीत पडले. गाईही हंबरून वनाकडे चालण्याचा इशारा देऊ लागल्या. धौम्य मुनींना अंतर्ज्ञानाने सर्व घटनेची जाणीव झाली. आपल्या प्रमुख शिष्यांना घेऊन ते उपमन्यूच्या शोधासाठी बाहेर पडले. बराच शोध करूनही उपमन्यूचा पत्ता लागेना. तेव्हा "उपमन्यू, तू कुठे आहेस?" असा पुकारा त्यांनी केला. थोड्या वेळाने जवळच्याच पडक्या विहिरीतून "आचार्य, मी येथे आहे, विहिरीत." असा उपमन्यूचा थकलेला आवाज आला. महर्षी धौम्य लगबगीने विहिरीजवळ गेले. सर्व कल्पना आलीच होती. ते म्हणाले, " वत्सा, अश्विनीकुमारांची प्रार्थना कर. त्यांचा मंत्र मी तुला शिकविलेला आहे. ते प्रसन्न झाले म्हणजे, तुझा सर्व त्रास दूर होईल."

उपमन्यूने प्रार्थना केली. गुरुंनीही उपमन्यूसाठी अश्विनीकुमारांची प्रार्थना केली व ते आश्रमात निघून गेले. त्या प्रार्थनेने अश्विनीकुमार उपमन्यूवर प्रसन्न झाले. त्यावेळी विहिरीत सर्वत्र प्रकाश पसरला व उपमन्यू बाहेर आला. अश्विनीकुमार त्याला म्हणाले, "तुझी गुरूभक्ती, सेवा, निष्ठा व कर्तव्यप्रेम पाहून आम्ही प्रसन्न झालो आहोत. तुझ्यासाठी आम्ही ही मधूर फळे आणली आहेत; ही खाल्ल्याने तू सर्व त्रासांतून मुक्त होशील."

उपमन्यू नम्रतापूर्वक त्यांना म्हणाला, "मी आपला अत्यंत ऋणी आहे. आपली आज्ञा मोडणे उचित नाही. परंतु माझा नाईलाज आहे. गुरूला अर्पण केल्याशिवाय मी ही फळे खाऊ शकत नाही. मला क्षमा करा."

उपमन्यूची ती दृढ गुरूभक्ती पाहून अश्विनीकुमारांना अधिकच आनंद वाटला. ते म्हणाले, "तुझे शरीर दिव्य व बलवान बनेल, सर्व प्रकारची विद्या तुला प्राप्त होईल." इतके म्हणून अश्विनीकुमारांनी उपमन्यूला स्पर्श केला आणि ते अंतर्धान पावले. त्या स्पर्शाबरोबर उपमन्यूच्या साऱ्या शरीरात चैतन्य खेळू लागले. हातात ती फळे घेऊन आश्रमाकडे तो धावत सुटला. गुरुजींच्या पाया

पडून आपल्या अश्रूंनी त्याने धौम्यांचे चरण भिजवले. आचार्य धौम्यांनी त्याला प्रेमपूर्वक जवळ घेतले व सद्‌गदीत कंठाने त्याला ते म्हणाले, “ वत्सा, तुझी साधना आज पूर्ण झाली. अश्विनीकुमार तुझ्यावर प्रसन्न झाले आहेत. सारे वेद, सारी शास्त्रे, सारे ज्ञान, विज्ञान यांची तुला आज प्राप्ती झाली आहे. ती फळे खाऊन टाक.”

दुसऱ्या दिवशी उपमन्यू ज्ञानसंपन्न होऊन कृतज्ञतेने बाहेर पडला. त्याला निरोप देताना धौम्य ऋषींचे डोळे प्रेमाश्रूंनी भरून गेले होते.

[ 'बालसुधा', पुस्तक ४ थे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. ३-७]

# १.३२ गुरुदक्षिणा

(विजयादशमीचे सोने)

प्राचीन काळी ऋषिमुनी विद्यादानाचे काम करीत असत. त्यांचे आश्रम म्हणजे वेदाभ्यासाच्या शाळाच असत. अनेक शिष्य आश्रमात राहून विद्याभ्यास करीत होते. ऋषिमुनींनासुद्धा वेदविद्यापारंगत शिष्यांकडे पाहून कृतार्थ झाल्यासारखे वाटे. अध्ययन संपले की, काही ना काही गुरुदक्षिणा देण्याचा प्रघात होता. त्याशिवाय गुरुंचे ऋण फिटले असे समजत नसत.

कौत्स नावाचा एक सुलक्षणी, सुशील व सुंदर मुलगा होता. वेदशास्त्राचे अध्ययन करावे अशी इच्छा मनात धरून तो वरतंतू नावाच्या एका श्रेष्ठ ऋषींकडे विद्याभ्यासासाठी गेला. त्याची अनिवार इच्छा पाहून वरतंतूंना मोठा हर्ष झाला. सुमुहर्तावर त्यांनी कौत्सला विद्या शिकवायला आरंभ केला. वरतंतूसारखा श्रेष्ठ गुरू आणि कुशाग्र बुद्धीचा व तीव्र स्मरणशक्तीचा कौत्स्यासारखा शिष्य! मग विद्यादान सफल न व्हायला काय झाले! कौत्साने मन लावून अभ्यास केला. गुरू जे शिकवीत ते कौत्स चटकन मुखोद्‌गत करी. कालांतराने कौत्स सर्व विद्यांत पारंगत झाला. आता गुरूंचा निरोप घेऊन अध्ययन संपवावे असा विचार त्याने केला. त्यावेळी गुरूंना कोणती गुरुदक्षिणा द्यावी याचा त्याच्यापुढे प्रश्न पडला.

त्याने गुरूस वंदन करून विचारले, “गुरूवर्य, आपल्या विद्यादानाने मी आपला अत्यंत ऋणी झालो आहे, आपणाला गुरूदक्षिणा द्यावी अशी माझी इच्छा आहे; आपण आपली आवड सांगावी. मी ती पुरी करीन.”

कौत्सा, मी विद्या विक्रय करणारा गुरू नव्हे. गुरूदक्षिणा घेणे म्हणजे अप्रत्यक्षपणे विद्या विकणेच होय. आपला शिष्य विद्येने सुसंस्कृत झालेला पाहून जो आनंद होतो, तीच खरी गुरूदक्षिणा होय. ती गुरूदक्षिणा मला पावली आहे, मी धन्य आहे.” गुरू म्हणाले.

परंतु गुरूदक्षिणा दिल्याशिवाय विद्या सफल होत नाही, अशी कौत्साची भावना असल्याने तो वरतंतूंना परोपरीने विनवू लागला. तेव्हा वरतंतू म्हणाले, “कौत्सा, दक्षिणा देणारच असशील तर मी तुला चौदा विद्या शिकवल्या आहेत; त्या प्रत्येक विद्येबद्दल एक कोटी याप्रमाणे १४ कोटी मुद्रा आणून दे. पण या १४ कोटी मुद्रा तू एकाजवळूनच आणून दिल्या पाहिजेत. दहावीस जणांतून जमा केल्यास मी घेणार नाही.”

ही अट पाळणे कठीण आहे, हे दिसत असूनही कौत्साने ती मान्य केली. गुरू गुरूदक्षिणा घेण्यास कबूल झाले, याचाच त्याला आनंद झाला होता.

त्याने प्रयत्न सुरू केला. एवढी मोठी रक्कम कोठून आणायची? अनेक मोठ्या राजांकडे त्याने हे दान मागितले, परंतु त्याची गरज पुरी करणारा कोणीही त्याला भेटला नाही. तो हिरमुसला झाला. सचिंत होऊन भटकू लागला. कोणी तरी त्याला सुचविले, ‘कौत्सा, आयोध्येचा रघू राजा दानशूर म्हणून प्रसिद्ध आहे. तो कुणासही विन्मुख करीत नाही, अशी त्याची ख्याती आहे. त्यास भेट, चौदा कोटी मुद्रा तुला सहज मिळतील.

कौत्स तत्काळ आयोध्येस गेला. त्याने रघू राजाची भेट घेतली. सकलविद्यांत प्रविण अशा कौत्साचं स्वागत रघू राजाने व राणीने अत्यंत पवित्र भावनेने केले. त्यांनी कौत्सासारख्या विप्रश्रेष्ठाचे आगमन एका उत्सवासारखे मानले. दोघांनी कौत्साची पूजा केली. पण तेथील परिसर न्याहाळून कौत्साची आशा पार मावळून गेली. कारण रघू राजा हा आता विपुल ऐश्वर्याचा धनी राहिला नव्हता; दान करून दारिद्र्यावस्थेत आनंद मानणारा योगी झाला होता. नुकताच विश्वजित यज्ञ करून त्याने आपले भांडार लुटवले होते. या रघुवंशाच्या राजांचे हे ब्रीदच होते की, दिग्विजय करायचा तो उपभोगाच्या लालसेने नव्हे. दिग्विजयाने मिळवलेले धन दान करून वाटून टाकायचे. हा आदर्श रघू राजाने पाळला होता.

राजाने कौत्सास विचारले, “ महाराज, या दासाकडून काय अपेक्षा आहे?’

दीर्घ नि:श्वास सोडून कौत्स म्हणाला, “राजा, मी तुमच्या सत्काराने तृप्त

झालो आहे; तरीपण जे मागावयास आलो आहे, ते न मागता परतणार आहे.तुम्ही माझी इच्छा पुरी कराल की नाही याबद्दल शंका वाटू लागली आहे."

" हे द्विजश्रेष्ठा", राजा बोलला. "आपले काम कितीही दुष्कर असले तरी मी करीन. माझ्या स्थितीसंबंधी मुळीच काळजी करू नका. आपली इच्छा नि:संकोचपणे सांगावी. हे ऐकून कौत्साने राजास गुरूदक्षिणेचा सर्व वृत्तांत सांगितला व म्हटले, "माझ्या गुरूंनी बजावले आहे की, दहा घरी भिक्षा मागून मिळवलेल्या १४ कोटी मुद्रा मला चालणार नाहीत. हे द्रव्य मला एकाच दात्याकडून मिळाले पाहिजे. तुमची कीर्ती ऐकून मी तुमच्याकडे आलो. पण माझी घोर निराशा होणार असे दिसते आहे."

कौत्साचे निराशायुक्त भाषण ऐकून रघुराजास हसू आले व तो उद्‌गारला, "आपले म्हणणे सत्य आहे. मी विश्वजित यज्ञ केल्यामुळे अगदी निष्कांचन झालो आहे. तरीही आपणाला चौदा कोटी मुद्रा लवकरच देतो, याबद्दल खात्री बाळगा."

राजाने प्रधानाशी सल्लामसलत केली. प्रधानाने राजास सांगितले की, चौदा कोटी मुद्रा यांना देणे अशक्य आहे. खजिना रिता झाला आहे. कुठूनही करभार यायचा बाकी राहिला नाही. इंद्राकडून मात्र संपत्ती यायची आहे. ती आल्यास या ब्राह्मणाची इच्छा पूर्ण करता येईल. प्रधानाचे भाषण ऐकून रघूस आनंद झाला. इंद्रावर स्वारी करण्याचा निश्चय करून त्याने प्रधानास तशी आज्ञाही दिली. ब्राह्मणांस विचारून शुभदिवस नक्की केला. ब्राह्मणाने आश्विन शुद्ध दशमी हा दिवस सुचविला. त्या दिवशी स्वारी केल्यास यशप्राप्ती नक्की होईल, असे सांगितले.

हे वर्तमान नारदास समजताच तो इंद्राकडे गेला, व त्याने ही सर्व हकिगत त्याला कळविली. इंद्राने लागलीच कुबेरास पाचारण केले. रघुराजाचा पराक्रम त्याला माहीत होता. त्याने कुबेरास रघुराजाच्या नगरात सुवर्णमुद्रांचा वर्षाव करण्याची आज्ञा केली. आज्ञा होताच कुबेराने आयोध्या नगरीच्या बाहेर शमी व आपट्यांच्या झाडांवर सुवर्णवृष्टी करवली.

इकडे आयोध्येतील लोक रात्री झोपलेले होते, ते सकाळी उठून पाहतात तो,

शमी, आपट्यांच्या झाडांवर एक सुवर्णाचा पर्वतच तयार झालेला दिसला. सर्व जण आश्चर्यचकित झाले. राजाने त्या सर्व सुवर्णमुद्रा कौत्साच्या स्वाधीन केल्या. ते सर्व द्रव्य घेऊन कौत्स गुरूंकडे आला. साष्टांग प्रणिपात करून ते सर्व द्रव्य त्याने गुरूस अर्पण केले. पण ते गुरू द्रव्याची अभिलाषा धरणारे नव्हते. त्यांनी केवळ १४ कोटी इतक्याच मुद्रा घेतल्या व बाकीचे धन परत नेण्यास सांगितले. १४ कोटीहून अधिक घेण्यास स्पष्ट नकार दिला.

निरुपायाने उरलेले द्रव्य घेऊन राजाचे दूत आयोध्येला परत आले. झालेला सर्व प्रकार राजास सांगून त्यांनी ते द्रव्य राजापुढे ठेवले. पण राजाही भोगलोलूप व स्वार्थी नव्हता; लक्ष्मीस तृण मानणारा होता. ते द्रव्य त्यानेही नाकारले व कौत्सास निरोप पाठवला की, “हे द्रव्य आपल्यामुळे प्राप्त झाले आहे, तेव्हा ते तुमचेच आहे. मला हे नको. आपणाकडेच ठेवावे.”

कौत्साने उलट कळवले, “राजा, मला गुरूदक्षिणा देण्यासाठीच द्रव्य हवे होते, त्याहून अधिक द्रव्य घेऊन मी काय करू? मी वेदपठण करणारा ब्राह्मण, पापमूलक अशा द्रव्याचा विटाळसुद्धा मला नको. माझे कार्य झाले आहे. द्रव्य आपणाजवळच ठेवा.”

गुरूंना द्यावयाच्या द्रव्याहून अधिक द्रव्य न घेणारा निस्पृह कौत्स वंद्य की गरजेपेक्षा अधिक दान पदरात टाकणारा व परत आलेले सुवर्ण नाकारणारा रघुराजा अधिक निर्लोभी?

राजाने द्रव्याकडे पाठ फिरवली. शमीच्या व आपट्यांच्या झाडांजवळ ते ठेवून दिले. तेव्हापासून शमीची व आपट्याची पाने आपण सोने समजून लुटतो व वाटतो. दसऱ्याचा म्हणजेच विजया दशमीचा सण सर्वांच्या परिचयाचा आहे.

[साहित्यसुधा, इ. ७ वी, १९७९, कर्नाटक सरकार, पृ. ३६-४०]

# १.३३ गोष्टी सांगेन युक्तीच्या चार

(महाभारतातील कथा)

पांडवांचा बारा वर्षांचा वनवास संपला. त्यानंतर एक वर्षभर त्यांना विराटाच्या मत्स्य देशात अज्ञातवासात राहून काढावे लागले. हाही खडतर काळ संपला व त्यांनी विराटाच्या नगरीस रामराम ठोकला. उपप्लव्य नावाच्या एका नगरामध्ये ते उघडपणे वास करू लागले. कृष्ण आणि बलराम द्वारकेहून तेथे आले. मित्रमंडळ व आप्तेष्ट आले. या सर्वांच्या उपस्थितीत अर्जुनपुत्र अभिमन्यूचे विराटाची कन्या उत्तरा हिच्याशी मोठ्या थाटात लग्न पार पडले.

त्यानंतर सर्वांनी मिळून खल केला. यामध्ये असे ठरले की, दुर्योधनाशी बोलणी करण्याकरिता व त्याचे मन वळवावे यासाठी एका खास दूताची रवानगी करावी. हे काम पार पाडण्यासाठी राजकारण धुरंधर अशा मुत्सद्द्याचीच नेमणूक करावयास हवी. राजा द्रुपदच्या दरबारात सर्व प्रकारची धार्मिक कृत्ये करणारा एक विद्वान व व्यवहारी ब्राह्मण होता. त्यास योग्य त्या सूचना देऊन दुर्योधनाशी बोलणी करण्यासाठी पाठवायचे ठरले. पण शांततेच्या तहाच्या वाटाघाटी चालू असताना युद्धाची तयारीही चालू ठेवायची हे राजकारणाचे एक तंत्र आहे. त्यानुसार पांडव युद्धाची तयारी करू लागले. कारण त्यांना खात्री होती की, दुर्योधन कसल्याही विनंतीस भीक घालणार नाही. दुर्योधनही मोठा राजकारणी. त्यानेही आपल्या बाजूने जय्यत तयारी चालू ठेवली.

ठरल्याप्रमाणे द्रुपदचा कुशल ब्राह्मण हस्तिनापुरास गेला. पांडवांनी आपल्या बाजूच्या लोकांस तयारीत राहण्यास सांगितले. श्रीकृष्णाची भेट घेण्यासाठी म्हणून अर्जुन स्वत: द्वारकेला गेला. दुर्योधनास हे कळताच रथारूढ होऊन त्यानेही द्वारकेस प्रयाण केले. दोघेही एकाच वेळेस द्वारकेस पोहोचले. भगवान श्रीकृष्ण दोघांनाही आधार वाटत होता. त्याची मदत म्हणजे हमखास विजय असे त्यांना वाटत होते.

द्वारका नगरीमध्ये श्रीकृष्णाच्या महालात प्रवेश होणे त्यांना मुळीच अवघड नव्हते. कारण दोघेही श्रीकृष्णाचे आप्तच. त्यावेळी कृष्ण गाढ झोपलेला होता. तो जागा होईपर्यंत दोघेही तेथेच वाट पहात बसले. श्रीकृष्णाच्या डोक्याच्या बाजूस असलेल्या सुंदर नक्षीकाम केलेल्या शोभिवंत आसनावर, दुर्योधन बसला तर अर्जुन पायाच्या बाजूस हात जोडून विनम्र भावाने उभा राहिला. साहाजिकच श्रीकृष्ण उठला तेव्हा त्यास प्रथम दृष्टीस पडला तो अर्जुन.

त्याने प्रथम अर्जुनाचे स्वागत केले व त्याचे कुशल विचारले. मग दुर्योधनाकडे वळून त्याचेही स्वागत केले व कुशल विचारले. नंतर उभयतांस प्रश्न केला, "आज कसे काय येणे झाले?"

प्रथम दुर्योधन बोलला, " श्रीकृष्णा, कौरवपांडवात युद्ध होण्याचा संभव दिसतो. त्याप्रसंगी तुझी साथ मला हवी. मी व अर्जुन दोघेही तुला सारखेच. दोघेही तुझे आप्तच. तुझ्या शयनमंदिरात येतेवेळेस मी आधी आलो. प्रथम आलेल्यास प्रथम संधी, ही जगाची रहाटी आहे. जनार्दना, तू महात्मा आहेस. तूच आदर्श घालून द्यावयास हवा. म्हणून धर्माचे पालन कर. मी प्रथम आलो, हे लक्षात राहू दे."

यावर पुरुषोत्तमाने म्हटले, " ठीक आहे, दुर्योधना. पण मी उठल्यावर मला अगोदर दिसला तो अर्जुन. म्हणून याबात तुम्हा दोघांचा मजवर समान हक्क आहे. मी दोघांसही साहाय्य केले पाहिजे. जगाची रीत अशी आहे की, बक्षिसी लहानास पहिल्यांदा द्यायची व मोठ्यास त्याच्यानंतर. पण अर्जुना तू कशासाठी आलास ते समजू दे."

"तुझ्या कृपाप्रसादाचा लाभ व्हावा यासाठी. युद्धात पांडवांना तुझ्या मदतीची आवश्यकता आहे. म्हणून येणे घडले." अर्जुन नम्रपणे म्हणाला.

श्रीकृष्ण दोघांसही उद्देशून म्हणाला, ठीक आहे, माझ्याकडे प्रचंड व अजिंक्य असे सैन्य आहे. ते एकाने घ्यावे व दुसरीकडे मी जातीने राहीन. परंतु मी स्वत: शस्त्र हाती धरणार नाही, किंवा युद्धात प्रत्यक्ष भाग घेणार नाही, केवळ युक्तिच्या चार गोष्टी सांगेन. अर्जुन लहान असल्याने प्रथम त्याने मागणी

करावी.

श्रीकृष्णाने असे सांगितल्यावर दोघेही विचारमग्न झाले. काय निवडावे हा खरोखरीच गहन प्रश्न होता.

कृष्णाने विचारले, “सांग पार्था, सांग. तुला मी हवा की माझे मोठे सैन्य हवे?”

क्षणाचाही विलंब न लावता नतमस्तक होऊन अर्जुनाने उत्तर दिले, “श्रीकृष्णा, मला तू हवाच; मग तू नि:शस्त्र का असेना.” हे ऐकताच दुर्योधनाच्या आनंदास पारावार उरला नाही. काय ही अर्जुनाची अक्कल असे त्यास वाटले. त्याला हवे होते ते मिळाले. आपली पसंती सांगण्याची आवश्यकताच त्याला उरली नव्हती. सहाजिकच वासुदेवाचे प्रचंड सैन्य त्याच्या बाजूस आले. तो हर्षाने बलरामाकडे गेला, आपल्या अक्कलहुषारीची तारीफ करीत त्याला सर्व वृत्तांत कथन केला.

तेव्हा बलराम म्हणाला, “छान झाले दुर्योधना. तुझा विजय असो. पण माझा पेच कसा सोडवू? कृष्ण ज्या बाजूस आहे, त्याविरुद्ध मी उभा ठाकू कसा? तसेच मी पार्थासही मदत करणार नाही; माझा नाइलाज आहे, दुर्योधना. क्षत्रिय धर्माचे पालन कर. या भूमीचे राजे तुझे गुणगान करतात. क्षत्रियाच्या ब्रिदास जागून युद्ध कर. खरे पाहता, कृष्ण व मी दोघेही कौरव-पांडवांचे नातेवाईक असल्यामुळे आम्ही यात पडू नये, असे मी कृष्णास निक्षून सांगितले होते; पण त्यास हे पटले नाही.”

दुर्योधनाने बलरामाचा निरोप घेतला व आनंदाच्या बेहोशीत तो हस्तीनापुरास परतला. “किती मुर्ख हा अर्जुन! द्वारकाधीशाचे प्रचंड सैन्य माझ्या बाजूने लढणार, जोडीला बलरामच्या सदिच्छा आहेतच. आणि एकाकी वासुदेव सैन्याविना तिकडे राहणार! विजयाचे पारडे माझ्याकडे झुकणार!”

पुढे श्रीकृष्ण व अर्जुन असे दोघेच बोलत बसले असतां, श्रीकृष्णाने प्रश्न केला, “धनंजय, शस्त्रहीन एकाकी अशा माझी पसंती तू का केलीस? पराक्रमी सैन्य का नाकारलेस?’

अर्जुन नम्रपणे म्हणाला, “ भगवंता, तू सर्वशक्तिमान प्रभू आहेस. तू एकटाच

सर्व राजांना व त्यांच्या सैन्यांना जिंकण्यास समर्थ आहे. तू माझा साथी व सारथी हो. केवळ तुझ्या सान्निध्यामुळे माझ्या अंगी प्रचंड बळ येईल व मी युद्ध जिंकू शकेल. ही माझी फार दिवसांची इच्छा आज तुझ्या कृपेमुळे सफल झाली. तुझ्यासारखी निष्कलंक कीर्ती मला हवी, केवळ उपभोग नको."

अर्जुनाने लोटांगण घातले. सस्मित वदनाने श्रीकृष्ण उद्गारला, "पार्था, माझी बरोबरी करू इच्छितोस! कर प्रयत्न, तुला यश येवो. तथास्तु."

भारतीय युद्ध सुरू झाले तेव्हा हा जगाचा स्वामी भगवान नारायण अर्जुनाचा सारथी झाला. रणांगणावर रथ हाकू लागला. अर्जुनाच्या घोड्यांची निगा राखणे, त्यांचा खरारा करणे, हे कामसुद्धा त्याने मोठ्या आनंदाने केले.

दुर्योधन व अर्जुन यांच्याबरोबर आधी केलेल्या कराराचे त्यांनी पालन केले - "न धरी शस्त्र करी, मी गोष्टी सांगेन युक्तीच्या चार"

राजकारणधुरंधर, मुत्सद्दी, शक्तीपेक्षा युक्तीने कार्यभाग साधतात. भारतीय युद्धात हे दिसून आले. पांडवांचा विजय झाला.

[साहित्यसुधा, इयत्ता ७ वी, १९७९, कर्नाटक सरकार, पृ. १६२-१६६]

# १.३४ चित्रकाराचे चातुर्य

(कोरियन लोककथा)

एक चित्रकार होता. फारच सुंदर अशी चित्रे काढायचा तो. त्याची चित्रे पाहून लोक अत्यंत प्रभावीत होत असत.दूरवर त्याची ख्याती पसरली होती. त्यानं काढलेलं चित्र प्राप्त करण्यासाठी लोकांची नेहमी धडपड चालत असे. या प्रतिभावान कलावंताचे चित्र मिळविण्यासाठी वाट्टेल ती किंमत मोजण्याची तयारी लोक दाखवीत. प्रचंड अशी लोकप्रियता, प्रसिद्धी अन् पैसा मिळाला तरी हा चित्रकार अहंकारापासून दूर होता. त्याचा स्वभाव अगदी सरळ होता. त्याला पैशाचा मोह मुळीच नव्हता. एखादा रसिक त्याच्या चित्रासाठी मोठी रक्कम द्यायला असमर्थ असला तर तो त्याची अडवणूक करीत नसे. तो देईल त्या रकमेत आपलं चित्र त्याला देऊन टाकी. कमविलेल्या संपत्तीचा बराचसा भाग तो रंजल्या-गांजलेल्यांना मदत करण्यात खर्च करीत असे.

त्याच्या कौशल्याने प्रभावित झालेल्या एका धनाढ्य सावकाराला त्याच्याकडून आपले चित्र काढून घ्यायची इच्छा झाली. मानधनाची रक्कम एक हजार वौन (कोरियाचे चलन) ठरविण्यात आली. चित्रकाराने काही दिवसात चित्र तयार केले. मन लावून त्याने हे चित्र काढले होते. अगदी हुबेहूब चित्र होतं ते.

सावकाराने जेव्हा चित्र पाहिलं तेव्हा तो खूप आनंदित झाला. पण चित्रकाराला एक हजार वौन देणं त्याच्या जिवावर आलं. त्याला ही रक्कम फार मोठी वाटू लागली. क्षणभर विचार करून तो धूर्तपणे म्हणाला, "याला माझं चित्र म्हणतोस तू ? माझे डोळे, नाक किती विचित्र दिसतात या चित्रात. हे माझं चित्र आहे असं कुणीही म्हणू शकणार नाही. आता तुझं नुकसान व्हावं असं मला मुळीच वाटत नाही. कॅनवास, रंग यांच्यासाठी तुझे शंभर-दीडशे वौन नक्कीच खर्च झाले असतील. मी तुला फार तर तीनशे वौन देईन. तुझी इच्छा असेल तर

मी लगेच पैसे द्यायला तयार आहे."

सावकाराने विचार केला - हे चित्र स्वतःजवळ ठेऊन चित्रकार काय करील ? त्याला तर याचा काहीच उपयोग नाही. त्याला नाईलाजाने चित्र विकावंच लागेल... आपल्या युक्तीवर सावकार बेहद्द खूश होता.

चित्रकाराला फार मोठा धक्का बसला. सावकाराचे हे वर्तन त्याला आवडले नाही. खूपच दुःख झालं. त्याचा स्वाभिमान दुखावला गेला. त्यानं सावकाराला धडा शिकवायचा निश्चय केला. काही क्षण विचार करून तो म्हणाला. "तुमच्या अपेक्षेप्रमाणे मी चित्र काढू शकलो नाही याचा खेद वाटतो मला... पण हे चित्र तुमचं नाही याची खात्री आहे ना तुम्हाला ?"

"हो. नक्कीच. हे चित्र माझं नाहीच." सावकार ठासून म्हणाला. खुद्द चित्रकारानेच चित्र चांगलं नसल्याचं कबूल केलं होतं,तेव्हा तो आपण सांगितलेल्या किंमतीला चित्र नक्कीच देणार असा सावकाराला विश्वास वाटत होता.

"हे चित्र तुमचं नाही असं लिहून देऊ शकाल का तुम्ही ?" चित्रकाराने विचारले.

"कां नाही ? आताच लिहून देतो तसं." असं म्हणून सावकाराने एका कागदावर 'हे चित्र माझं नाही' असं लिहून त्या खाली स्वाक्षरी केली अन् तो कागद चित्रकाराला देऊन टाकला. चित्रकाराने तो कागद आपल्या खिशात ठेवून दिला अन् म्हणाला, "जे चित्र तुमच्या पसंतीला उतरलंच नाही त्याच्यासाठी तुमच्याकडून पैसे घेणे मला उचित वाटत नाही."

आणि ते चित्र एका कागदात काळजीपूर्वक लपेटून चित्रकार निघून गेला. चित्रकाराने चित्र परत नेल्याचे पाहून सावकाराला त्याच्या मूर्खपणाचे हसू आले.

दुसऱ्या दिवशी सावकाराची बायको जेव्हा बाजारातून परतली तेव्हा संतापाने ओरडलीच, 'काय फाजीलपणा आहे हा ? '

"आँ ? काय झालं ?" सावकाराने विचारले.

" मी म्हणते असं करायची त्याची हिंमतच कशी झाली ?" ती आणखी भडकून म्हणाली.

'पण झालं तरी काय ?"

"मला काय विचारताय ? तुम्हीच जा चौकात अन् तिथं काय चाललय् ते पहा आपल्या डोळ्यांनी." ती फणकाऱ्याने म्हणाली.

सावकार चौकाच्या दिशेने निघाला. चौकात ही गर्दी जमली होती. तिथं लावलेलं एक चित्र पाहून लोक पोट धरून हसत होते. तो लगबगीने तेथे पोहोचला. लोकांनी जेव्हा त्याला पाहिलं तेव्हा तर लोकांची हसून हसून मुरकुंडी वळली !

ज्या चित्राला पाहून लोक हसत होते ते चित्र त्याचंच होतं. चित्राच्या खाली मोठ्या अक्षरात लिहिलं होतं - 'मूर्ख शिरोमणी'. - चित्रकाराचे चातुर्य.

हा प्रकार पाहून तो भडकला. तडक चित्रकाराकडे गेला. त्याला पाहताच तो रागावून ओरडला, "काय अगाऊपणा आहे हा ?"

"काय झालं शेठजी ?" चित्रकाराने शांतपणे विचारले.

"माझं चित्र चौकात लटकावून वर मलाच विचारतोस ?" सावकाराचा पारा खूपच चढला.

"तुमचं चित्र ? पण तुम्हीच तर लिहून दिलय् की ते चित्र तुमचं नाहीए म्हणून..." चित्रकार म्हणाला.

सावकार गप्प गारच झाला. काय करावं हेच त्याला सुचेना. फारच अस्वस्थ झाला तो. चित्रकाराने आपल्याला चांगलंच कोंडीत पकडलं हे त्याला कळून चुकलं. बऱ्याच वेळेनंतर तो कसाबसा म्हणाला, "ठीक आहे. मी एक हजार वौन द्यायला तयार आहे. ते चित्र मला देऊन टाक."

"पण ते चित्र तर तुमचं नाहीए... काय करणार तुम्ही ते घेऊन ? ' चित्रकाराने विचारले.

"त्याच्याशी तुला काय करायचंय ? ते चित्र मला हवं आहे अन् त्याची किंमत द्यायला मी तयार आहे. त्या चित्राचं मी काय करीन याच्याशी तुला कर्तव्य

नाही.” आपला राग आवरून सावकार म्हणाला.

"ठीक आहे शेठजी, पण आता या चित्राची किंमत दहा हजार वौन आहे. आणि एवढी रक्कम तुम्ही देऊ शकत नसाल तर मला हे चित्र विकायचं नाही.” चित्रकार दृढतेने म्हणाला.

आणि सावकाराला दहा हजार वौन मोजून द्यावे लागले.

ही सारी रक्कम चित्रकाराने एका अनाथालयाला देऊन टाकली !

(देवीचंद राठोर : देशविदेशच्या कहाण्या)

# १.३५ अन्नपूर्णा देवीची गोष्ट

(जपानची पुराणकथा)

फार फार वर्षांपूर्वी आकाशाच्याही वर तोका आमाहारा येथे विश्व निर्मात्याचे घर होते. त्याकाळी 'अमेनो मिनाकानुसि' नावाच्या देवाचा सर्वत्र संचार होता. 'अमेनो मिनाकानुसि' या देवाने अनेक देव-देवता निर्माण केल्या. या देवी-देवतांमध्ये 'इजानागि' आणि 'इजानामि' या दोन देवी देवतांचाही समावेश होता.

एके दिवशी अमेनोमिनाकानुसिने इजानागि आणि इजानामि यांना 'अमेनोहोको' नावाचे शस्त्र दिले आणि सांगितले, 'मी आता या जगातील सर्व वस्तू, प्राणिमात्र बनवण्यास तयार आहे. तुम्ही फक्त एका नव्या देशाची निर्मिती करा आणि त्याला व्यवस्थित आकार द्या !' परमेश्वराच्या आज्ञेनुसार दोघांनीही शस्त्रं उचलली आणि ढगांवर बसून प्रवासाला निघाले. काही अंतरावरच एका विशाल पक्षाने त्यांना अडवले; इजानागीने हातातील शस्त्र गोल गोल फिरवले आणि ढग बाजूला झाले. एक सुंदर पूल दिसू लागला. इजानागिने इजानामिचा हात धरला. दोघेही पुलावर उतरले. त्यांनी पुलाखाली पाहिले परंतु त्यांना काहीच दिसत नव्हते. इजानागिने पुन्हा शस्त्र गोल गोल फिरवले आणि खालून मधुर आवाज ऐकू आला. इजानागिने शस्त्र वर उचलले तर शस्त्र खारट पण्यात भिजले होते. पाण्याचे थेंबही टपकत होते. आणि क्षणार्धात धुकं विरलं ! इजानागि आणि इजानामिने पाहिलं तर जिथे खारट पाण्याचे थेंब टपकले होते तिथे एक प्रदेश निर्माण झाला होता. दोघेही त्या प्रदेशावर उतरले. तिथे 'आमेनो मिहा सिरा' नावाचा एक खांब होता. या खांबाच्या डाव्या बाजूला इजानागि आणि उजव्या बाजूला इजानामि उभे राहिले. दोघांनी प्रेमाने एकमेकांचे हात हातात घेतले. थोड्याच वेळात तिथेच झोपी गेले.

सूर्योदयाबरोबर दोघे उठले. सृष्टी-सौंदर्याने नटलेला प्रदेश पाहून दोघांनाही खूप आनंद झाला. या आनंदातच ते चालत राहिले. चालता चालता त्या

प्रदेशाला त्यांनी 'आवाजि' असे नावही दिले. या प्रदेशाच्या एका पर्वतावर चढले. चोहिकडे नजर फि रवताच दूरवर समुद्राच्या लाटा उसळत होत्या. काही क्षणातच चार नव्या प्रदेशांची निर्मिती झाली. हे सर्व प्रदेश पहिल्या प्रवासापेक्षा मोठे होते. त्यांना 'सिकोकु' नाव दिले. इजानागि आणि इजानामि 'सिकोकु' च्या एका उंच पहाडावर चढून पुन्हा चोहोकडे पाहू लागले. काही क्षणातच 'ओकि क्यूम्यू' या नव्या प्रदेशांची निर्मिती झाली. अशा रितीने एका मागोमग एक असे 'इकि', 'त्सुसिमा' आणि 'सादो' नावाच्या प्रदेशांची निर्मिती झाली. सगळ्यात शेवटी 'होश्यू' नावाच्या प्रदेशाची निर्मिती झाली. अशा या सर्व आठ प्रदेशांनी मिळून 'ओओयासिमा' नावाचा देश बनला. 'ओओयासिमा' म्हणजेच आजचा 'जपान' देश!

'जपान' देशाच्या निर्मितीनंतर या देशाच्या शासन-व्यवस्थेसाठी पस्तीस देव-देवतांची निर्मिती करण्यात आली. या सगळ्यांच्या पालन पोषणासाठी दजानामिने इतर अनेक वस्तूंचीही निर्मिती केली.

एके दिवशी इजानामिचा मृत्यू झाला. इजानागि शोकाकुल झाला. इजानामि या दुःखातच इजानामिचा पाठलाग करीत देवी जगतात शिरला. या मृत्यूलोकात इजानागिला बरेचसे मृतदेह दिसले. तिथे अनेक राक्षसिणी बसल्या होत्या. भयभीत झालेल्या इजानागिने इजानामिचा अखेरचा निरोप घेतला आणि ओओयासिमाला (जपानला) परत आला. नदी किनाऱ्यावर हातातील काठी उभी केली. अंगावरील कपडे एकेक करून फेकले. या कपड्यांमधून, छडीतून एकेक देवता निर्माण झाली. नदीत स्नान केले.त्यानंतर समुद्रावर गेला.तिथेही स्नान करताच समुद्ररक्षक देवाची निर्मिती झाली. यानंतर त्याला गाढ झोप लागली.

दुसऱ्या दिवशी आंघोळ करताच तो शरीराने आणि मनानेही पवित्र झाला.आमेनोमिनाकानुसि म्हणजे सत्यदेव. या सत्यदेवाच्या आज्ञेनुसार पवित्र देशाची निर्मिती करणाऱ्या इजानागिने उजव्या हाताने उजवा डोळा धुताच 'आमानेरासु' नावाच्या महादेवीचा जन्म झाला.आमोनेमिना प्रमाणेच अंधःकाराचा नाश करणारी सुर्यासारखीच ही 'कानुशि' पवित्र देवी आहे.

त्याचवेळी आकाशवाणी झाली 'हे देवी तू सूर्याचा अवतार आहेस.' 'नाकामा-गाहारा'चं तू शासन करशील !

यानंतर इजानागिने डावा डोळा धुतला आणि 'त्सुकियोमि' नावाची देवता निर्माण झाली. हाच चंद्राचा अवतार मानला जातो. त्यामुळे रात्र प्रकाशमान होऊ लागली. अखेरीस इजानागिने नाक साफ करताच सुसानोओ हा बलशाली आणि वीर देव निर्माण झाला. या देवाकडे समुद्राचे पर्यायाने सृष्टीचे शासन कार्य सोपवले. परंतु 'सुसानोओ' कुठलं ही काम न करता फक्त रडतच राहिला. इजानागिने रडण्याचे कारण विचारले. सुसानोओ म्हणाला, ' मला यमलोकात आईला भेटायला जायचे आहे. ' इजानागि सुसानेओला समजावित म्हणाला, यमलोक अंधःकार आणि मृत्यूचा देश आहे. त्यामुळे तिथे जाणे योग्य नाही परंतु सुसानोओने आपला हट्ट सोडला नाही. तो रडतच होता. इजानागिला सुसानोओचा खूप राग आला. रागातच इजानागि म्हणाला, 'तुझ्यासारख्या हट्टी लोकांचं इथं काही काम नाही. तू इथून चालता हो ! पुन्हा कधीच परत येऊ नकोस !'

रडत रडत सुसानेओ आपल्या आईला भेटायला निघाला. परंतु आपले पितृदेव आपल्याला परत भेटणार नाहीत याचंही दुःख वाटत होतं ! त्यामुळे सुसानोओने आमानेरासु या आपल्या मोठ्या बहिणीकडे जायचे ठरवले. आणि आकाश मार्गाकडे चालू लागला. सुसानोओ आमातेरासु'वर आक्रमण करेल या भीतीने ताकामागाहारा देवतेने आमानेरासुचे केस-वस्त्र बदलून रत्नांनी पुरुषरुपात सजवले. परंतु सुसानोओने आमातेरासुला विनम्रपणे अभिवादन केले. आकाशात कां आलास ? असे आमातेरासुने विचारताच सुसानोओ म्हणाला, 'आईच्या भेटीसाठी रडत होतो. म्हणून पितृदेवांनी निर्वासित केलं. त्यामुळे मोठ्या बहिणीची आठवण झाली. भावाच्या भेटीचा आनंद व्यक्त करीत महादेवी आमातेरासु म्हणाली, 'तुझ्या मनात कुठलाही वाईट विचार नाही. किंवा तू कुठल्याही दुष्ट भावनेने इथे आलेला नाहीस याची कबुली या सगळ्यांना दे. त्यानंतरच तू इथे राहू शकतोस ! सुसानोओ आपली कबुली देतांना म्हणाला, 'मी मनाने निर्मळ आणि पवित्र आहे. हे सिद्ध करण्यासाठी देवात्म्यांना बोलावून

बालकांना जन्म देण्याचं आश्वासन देतो. '

महादेवी आमातेरासु आणि सुसानोओ आकाश गंगेच्या दोन्ही किनाऱ्यांना उभे राहिले. महादेवी आमातेरासु सुसानोओला म्हणाली, 'तू माझा लाडका भाऊ आहेस. त्यामुळे तुझी सगळ्यात मौल्यवान अशी तलवार तू मला दे.' भावाचेही बहिणीवर प्रेम असल्यामुळे भावाने आपली प्राणप्रिय तलवार बहिणीला दिली. महादेवीने तलवारीचे तीन तुकडे केले. शुद्ध पाण्याने स्वच्छ केले आणि तोंडात टाकले. चावून चावून फेकले. काही क्षणातच देवीच्या तोंडातून पांढराशुभ्र धूर निघाला. या धुरातून तीन देवी प्रकट झाल्या.

यानंतर सुसानोओ म्हणाला, 'ताई, तुझ्या केसातील रत्न मला दे. '

महादेवीने क्षणाचाही विलंब न करता आपल्या केसातील रत्न सुसानोआला दिले. सुसानोओने शुद्ध पाण्याने रत्न स्वच्छ केले. रत्न घासायला सुरुवात करताच मधुर स्वर निनादू लागले. त्यानंतर सुसानोओने रत्न तोंडात टाकले. खूप वेळ चावत राहिला. आणि जोरात फुंकर मारली. चारी दिशांत पांढरेशुभ्र धुके पसरले. हळूहळू धुके विरले. या धुक्यांतूनच पाच सुंदर देवता प्रकट झाल्या. महादेवी आमातेरासु सुसानोआला म्हणाली, 'दादा, मी निर्माण केलेल्या तीन देवी तुझ्या आहेत आणि तू निर्माण केलेल्या पाच देवी माझ्या आहेत.' आपण अतिसुंदर देवतांची निर्मिती केली याचा सुसानोओला गर्व झाला. मोठ्या आनंदात गर्वाच्या भाषेत सुसानोओ म्हणाला, 'ताई,देवतांची निर्मिती करत असतांना माझ्या मनात कुठलाही वाईट विचार नव्हता. त्यामुळेच सुंदर देवतांची निर्मिती झाली.त्यामुळे मी जिंकलो.' असे म्हणत सुसानोओ घोड्यावर स्वार झाला. डोक्यात आनंदाचे वारे घुमत होते. घोडाही सैरभैर होत पळत होता. पळता पळता घोडेस्वाराने शेतीवाडीचे प्रचंड नुकसान केले. घोडा सैरभैरपणे धावत असल्यामुळे ठिकठिकाणी घोड्याची लीद पसरत होती. महादेवीचे पवित्र पुजाघरही खराब झाले. तरीही आमातेरासु भावावर रागावली नाही. ताईला वाटले आनंदाचे वारे ओसरले की सर्व ठीक होईल ! परंतु आमातेरासुचा अंदाज चुकला. सतत धावल्यामुळे सुसानोओचा घोडा मृत झाला. तरीही सुसानोओचा खोडकरपणा वाढतच होता.

महादेवीकडे एक चरखा होता. देवी-देवतांना भेट देण्यासाठी या चरख्यावर कपडे विणण्याचे काम करून घेत होती. या चरख्यावरच सुसानोओने घोड्याचे शव टाकले. त्यामुळे विणकाम करणाऱ्या स्त्रिया घाबरल्या. हातातील काम सोडून पळाल्या.

आपल्या लाडक्या भावाच्या पापाचे ओझे महादेवीने स्वतःकडे घेतले. या पापाचं प्रायश्चित्त म्हणून महादेवी 'आमानोइवाया' नावाच्या गुहेत तपश्चर्येसाठी गेली. सूर्याचा अवतार असलेली महादेवी आमातेरासु गुहेत शिरताच सगळीकडे अंधःकार पसरला. राक्षस-राक्षसिणी आनंदाने नाचू लागले. सूर्यप्रकाश नसल्यामुळे थंडगार वारे वाहू लागले. शेतातील पिके, फुलझाडे सुकू लागली. सूर्य प्रकाशाअभावी सारी चराचर सृष्टी नष्ट होईल या विचाराने देवी-देवता चिंतीत झाल्या. आमातेरासु महादेवीला गुहेतून कसे बाहेर काढावे याची चर्चा सुरु झाली. सर्वानुमते निर्भेळ, निरपेक्ष आनंद-महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या निर्हेतुक सद्भावामुळे कल्याणकारी महादेवीने *कुऽऽचऽकू* अशी जोरदार बांग देणारे कोंबडे एकत्र केले. त्याचबरोबर रत्नांच्या घर्षणाने तीव्र ध्वनि उत्पन्न होईल व आरशांच्या प्रकाशाने उजेड पसरेल या उद्देशाने रत्नजडित आरसे बनवणारे कलाकारही बोलावले. एका देवाने पर्वतावरून पवित्र वृक्ष उपटून आणला. या वृक्षाच्या फांदीच्या टोकाला रत्नांचे गुच्छ बांधले. फाद्यांना आरसे टांगले. झाडाच्या बुंध्यापासूनचा भाग पांढऱ्या शुभ्र कापडाने सजवला आणि सर्व देवी-देवता महोत्सवात सहभागी झाले. सर्वशक्तीमान - सर्वश्रेष्ठ देवता 'अमेनेताचिकारा ओनोकामि' गुहेच्या प्रवेशव्दाराजवळ लपले. मंत्रपाठासह यज्ञात आहुती देण्यास सुरुवात झाली.ढोल-बासरीच्या तालावर नृत्यांगना उलटे नृत्य करू लागल्या. आणि देवी-देवतांची हसून हसून पुरेवाट झाली. गुहेतील अमितोरासु महादेवीने हा हास्य कल्लोळ ऐकातच गुहेचं दार किलकिलं केलं. आणि नृत्यांगनांना विचारले, मी गुहेत आल्यामुळे सारी सृष्टी अंधारात बुडाली असतांनाही इतका आनंदोत्सवाचा आवाज का येत आहे ? नृत्यांगना म्हणाली, 'देवी, आपल्यापेक्षाही तेजस्वी देवीचे आगमन झाले आहे. म्हणूनच सर्व देवी-देवता आनंदोत्सव साजरा करीत आहेत. आपण स्वतः

एकदा त्या देवीला बघता का?' आनंदोत्सवाचा गोंगाट ऐकून महादेवींना तेजस्वी देवीला पहाण्याची इच्छा झाली. सूर्यकिरणांचा प्रकाश दिसू लागताच देवी-देवतांनी झाडावर लावलेले आरसे अमितोरासुच्या दिशेला फिरवले. देवीने गुहे बाहेर डोकावून पाहताच गुहेच्या प्रवेशद्वाराजवळील सर्वश्रेष्ठ देवाने महादेवीचा हात धरून बाहेर ओढले. क्षणार्धात गुहेचे दार बंद झाले. जपान देशासह सर्वत्र प्रकाशाचे साम्राज्य पसरले.

सुसानेओने केलेल्या पापाची शिक्षा म्हणून त्याच्या दाढीमिशा आणि हातापायाची नखे कापावी तसेच त्याला देव लोकांतून घालवून द्यावे असे सर्व देवी-देवतांनी एकमताने ठरवले. परंतु अजूनही सुसानेओचा पापाचा घडा भरलाच नव्हता. एके दिवशी भूक लागली म्हणून सुसानोओने अन्नपूर्णा देवीकडे जेवण मागितले. देवीने आपल्या नाका-तोंडाच्या माध्यमातून रुचकर जेवण बनवले. सुसानोओने ते पाहिले. देवीने रुचकर जेवणाची थाळी त्याच्यासमोर ठेवताच सुसानोओ क्रोधित स्वरात म्हणाला, 'मला इतके घाणेरडे जेवण कां देत आहे ?' देवीच्या प्रति उत्तराची वाट न पाहताच सुसानोओने अन्नपूर्णा देवीला मारून टाकले. मानवजातीची तारणहार अन्नपूर्णा देवीच्या मृत शरीराच्या डोक्यातून रेशीम किडे निर्माण झाले. डोळ्यांतून अन्नधान्याची रोपे निर्माण झाली. अशा या अन्नपर्णा देवीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आजही शेती पिकवून मानव आपली कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

# १.३६ हान्या महाराज

(आदिवासींमधील गाडगे महाराज)

खानदेशातील पाटबारा नावाच्या गावात एक अत्यंत गरीब माणूस राहात होता. तो भिल्ल समाजाचा असून अतिशय दु:खी, कष्टी होता. त्याचे नाव काकड्या असे होते. त्याच्या पत्नीचे नाव 'गोमती' होते. दोघं पती-पत्नी जमीनदाराच्या शेतात कष्ट करीत असत; पण मोबदला फारच तुटपुंजा मिळत होता. तरी कुरकुर न करता ते खूप कष्ट करीत होते. कष्ट करूनही पोटभर अन्न त्यांच्या नशिबी नव्हते. त्यात त्यांना एक मूल झाले. त्या मुलाचे नाव त्यांनी 'हान्या' असे ठेवले. हान्या बालपणापासूनच शांत, सुस्वभावी होता. तो मोठा झाला ते अनेक प्रश्न घेऊनच! तो आपल्या पित्याला, मातेला नेहमी विचारत असे, "आई, बाबा आपला आदिवासी समाज इतका मागास का आहे? आपला समाज पिढ्यान पिढ्या गरिबी / दारिद्र्य का सोसतो? आपला समाज व्यसनमुक्त कसा होणार?" एक ना दोन असे अनेक प्रश्न तो आई-वडिलांना विचारायचा.

हान्या इतर मुलांपेक्षा वेगळा आहे हे समजायला त्यांना वेळ लागला नाही. हान्या जसजसा मोठा होऊ लागला तसतसं वयापेक्षा जास्त शहाणपण प्राप्त होऊ लागलं होतं. शेतात आई-बाबांसोबत कामाला गेला की, तो बरोबरीच्या लोकांना एकत्र जमवायचा आणि त्यांना समजावायचा, "बाबांनो, ऐका, आपला समाज मागास, दरिद्री असण्याचं कारण अज्ञान आहे. व्यसन आहे. तसेच रोगराईपासून मुक्त व्हायचं असेल तर रोज आंघोळ करा. घर-अंगण स्वच्छ ठेवा." हान्या अशा शहाणपणाच्या गोष्टी करायचा तेव्हा आई-बाबांचं काळीज फुलून येत होतं. अनेकांना हान्याच्या गोष्टी पटत होत्या. तो स्वत:ही पहाटे लवकर उठायचा. नदीवर जाऊन स्वच्छ आंघोळ करायचा आणि सूर्यदर्शन, पूजन केल्याशिवाय अन्न सेवन करत नव्हता.

दिवसेंदिवस हान्याची साधुत्ववृत्ती वाढत होती. आपल्या समाजाविषयीची कळकळ त्याला स्वस्थ बसू देत नसे. आता हान्या एक तपस्वी पुरुष बनला. लोक त्याला "हान्या महाराज" म्हणू लागले. त्याने आपल्या गावात, परिसरात खूप सुधारणा केली. आपल्या आदिवासी बंधु-भगिनींना स्वच्छतेचे, व्यसनमुक्तीचे पाठ दिले.

हान्या महाराज म्हणजे धडगाव परिसरातील जणू गाडगे महाराजच होता. अतिशय साधी पण स्वच्छ राहणी. हान्या महाराजाच्या आणखी एक गोष्ट लक्षात आली. आपल्या समाजात पती-पत्नीचा सन्मान नाही. तेव्हा त्यांच्यात एकमेकांविषयी आदरभाव निर्माण व्हावा, परस्परांचे महत्त्व पटावे म्हणून दर सोमवारी आरती समारंभ घडवून आणला. त्याने गावातल्या लोकांना एकत्र बोलावले आणि आपल्या मनातील विचार बोलून दाखविला. "गड्यांनो, स्त्री आणि पुरुष समान आहेत. स्त्रीचे महात्म्य ओळखा. तिचा सन्मान घरातूनच झाला पाहिजे. तेव्हा आज आपण एक आरती करणार आहोत." गावातील लोक विचार करू लागले, इथे कुठंय मंदिर, देव! मग आरती कशी आणि कोणाची करायची? त्याने लोकांना सांगितले. "आज आपण कोण्या परमेश्वराची आरती करायची नसून आजच्या आरतीचे नाव आहे - 'सतीपतीची आरती' म्हणजे पतीने पत्नीची आरती करायची आणि पत्नीने आपल्या पतीची आरती करून एकमेकांना सन्मानीत करायचे, कबूल?"

हान्या महाराजांचा इशारा होताच तेथे जमलेल्या सगळ्या जोडप्यांनी एकमेकांची आरती केली. आरतीनंतर हान्या महाराजांनी त्या जमावाला उपदेश केला - दारू पिऊ नका, चोरी करू नका. स्वच्छ रहा. आपले शरीर, घर, अंगण स्वच्छ ठेवा. रोगराईपासून स्वत:ला वाचवा. घरातील सर्वांनी एकमेकांचा आदर करायला शिका.

उपदेश करते समयी हान्या महाराज 'आप' या शब्दाचा प्रयोग जास्त करीत असत. 'आप' म्हणजे आपण सर्व, 'आप' म्हणजे आत्मा. तेव्हापासून आरती समारंभाला येणाऱ्या लोकांना 'आपमंडळी' म्हणण्याची प्रथा पडली आणि ही

आपमंडळी जेव्हा जेव्हा एकमेकांना भेटतात तेव्हा हात जोडून एकमेकांच्या हातांना हात लावून 'आपकी जय हो' या पद्धतीने नमस्कार करतात. हान्या महाराजांनी आदिवासी बांधवांना स्वच्छतेचा, व्यसनमुक्तीचा, सचोटीचा मार्ग दाखविला. कुटुंबात एकमेकांचा सन्मान करायला शिकवले.

आज हान्या महाराज नाहीत. पण त्याचे विचार धडगाव परिसरातील पाड्यात अजूनही जिवंत आहेत. आजही धडगाव तालुक्यातील 'पाटबारा' गावात दर सोमवारी 'सतीपतीची' आरती होते. आदिवासींना स्वच्छतेचे, कष्टाचे, निर्व्यसनाचे पाठ शिकविणाऱ्या हान्या महाराजांवर तेथील आदिवासींनी भजने रचली. ही भजने दर सोमवारी आणि दिवाळी व गुढीपाडव्याला गायली जातात. हा वसा हे भजनी मंडळ गावोगाव देतात. असा हा पहाडातला छोटासा 'हान्या महाराज' आपल्या कर्तृत्ववानने चिरंजीव झाला आहे.

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# १.३७ वशिष्ठ विश्वामित्रांची गोष्ट

(प्रेमाची महती)

राजा विश्वामित्र आपल्या सैन्यासह अरण्यात शिकारीला गेला होता. फिरत फिरत तो वसिष्ठ मुनींच्या आश्रमाजवळ आला. महर्षी वसिष्ठांनी कुटित राहूनसुद्धा राजा विश्वामित्र आणि त्याच्या सैन्याचा भोजन देऊन राजेशाही पद्धतीने आदरसत्कार केला याचे विश्वामित्राला आश्चर्य वाटले.

जेव्हा विश्वामित्राला समजले की नंदिनी गाईच्या प्रभावामुळे वसिष्ठ हे सारे करू शकले तेव्हा विश्वामित्राने वसिष्ठ मुनींकडे ती गाय मागितली. कोणत्याही प्रकारे आणि कितीही किंमत दिली तरी ती गाय देण्यास वसिष्ठांनी नकार दिला. आपल्या बलसामर्थ्याने विश्वामित्र नंदिनीला ओढून नेऊ लागले. परंतु वसिष्ठाच्या आदेशाने नंदिनीने आपल्या हुंकारातून मोठमोठे वीर योद्धे निर्माण केले आणि त्या योद्ध्यांनी विश्वामित्राच्या सैन्याला पिटाळून लावले.

राजा विश्वामित्राने बरीच दिव्यास्त्रे सोडली पण वसिष्ठाच्या ब्रह्मदंडाला स्पर्श करताच ती निस्तेज बनू लागली. विश्वामित्राने आणखी कठोर तपश्चर्या करून आणखी काही दिव्यास्त्रे निर्माण केली पण वसिष्ठांच्या सामर्थ्यापुढे ती कुचकामी ठरली तेव्हा विश्वामित्राला समजले की 'क्षात्रबल तपस्वी ब्राह्मणाला पराजित करू शकत नाही. शेवटी त्याने स्वतः ब्राह्मणत्व प्राप्त करण्याचा दृढ-निश्चय केला आणि त्यासाठी कठोर तपश्चर्या केली. शेकडो वर्षाच्या उग्र तपस्येनंतर प्रत्यक्ष ब्रह्मदेव प्रसन्न झाले आणि म्हणाले, 'जर वसिष्ठ मुनी तुम्हाला ब्रह्मर्षी म्हणून मान देत असतील तरच तुम्ही ब्राह्मण म्हणून संबोधले जाल.'

आता वसिष्ठासमोर नतमस्तक होणे हे विश्वामित्राला अपमानास्पद वाटले. जेव्हा जेव्हा विश्वामित्राचा वसिष्ठाशी संबंध येत असे तेव्हा तेव्हा वसिष्ठ त्याला 'राजर्षी' म्हणून संबोधित असे. 'राजर्षी' म्हणून हाका मारली की विश्वामित्राचा राग अधिकच वाढत असे. शेवटी शेवटी रागाचे पर्यवसान शत्रुत्वात झाले व

विश्वामित्र वसिष्ठाचे कट्टर शत्रू बनले. एका राक्षसाच्या सांगण्यावरून विश्वामित्राने वसिष्ठाचे शंभर पुत्रही ठार केले आणि वसिष्ठाला घोर अपमानित करण्याच्या संधीची तो वाट पहात होता.

शेवटी नवीन सृष्टी निर्माण करण्याचा त्याने संकल्प केला आणि आपल्या तपोबलाने नवीन अन्न, नवीन झाडे, वेली, पशु-पक्षी बनविले. शेवटी ब्रह्मदेवाने प्रत्यक्ष येऊन त्याला थांबविले आणि 'तू निर्माण केलेले प्राणी-पक्षी-झाडेही ब्रह्मदेवाच्या सृष्टीतच इतरांप्रमाणेच रहातील' असे आश्वासन दिले.

आता सर्वच उपाय थांबल्यानंतर विश्वामित्राने वसिष्ठाला मारण्याचाच बेत केला. समोर जाऊन कित्येक वेळा पराजय झाला. शेवटी एकदा लपत छपत रात्रीच्या वेळी ते वसिष्ठाला मारण्यासाठी आश्रमाजवळ गेले व आश्रमाबाहेरील गवतात लपून बसले.

बाहेर चांदणे पसरले होते. वसिष्ठ आणि त्यांची पत्नी आश्रमाबाहेरील अंगात गप्पागोष्टी करत होते.. वसिष्ठांची पत्नी अरुंधती म्हणाली -

"आज चंद्राचा प्रकाश किती लख्ख पडला आहे." वसिष्ठ म्हणाले.

'आजकाल विश्वामित्राच्या तपोबलाच्या तेजाप्रमाणेच आजच्या चंद्राचाही प्रकाश तेजस्वी झाला आहे. ह्या प्रकाशाकडे पाहिल्यावर मला विश्वामित्राच्या दिव्य तेजाची आठवण होत आहे.'

लपून बसलेला विश्वामित्र हे ऐकत होता. त्याचे एक मन म्हणाले,

'अहंकारी विश्वामित्रा तुझा धिक्कार असो. अरे ज्याला मारण्यासाठी तू आला आहेस, ज्याचे शंभर पुत्र ठार करून तू त्याला त्रास दिला आहे. ज्याच्याविषयी तुझ्या मनात द्वेषाचा अग्नी भडकतो आहे, त्या महर्षी वसिष्ठाचे केवढे मोठेपण की जो आपल्या प्रिय पत्नीलाही तुझी यशोगाथा सांगतो आहे. तोच खरा मोठ्या मनाचा महात्मा आहे.'

आणि तात्काळ विश्वामित्राने आपल्या हातातली शस्त्रे टाकून दिली व त्याने वसिष्ठांच्या पायावर डोके ठेवले. त्यांचे दास्यत्व स्वीकारले. त्यामुळे वसिष्ठांविषयीचा समूळ द्वेष नाहीसा झाला. साधु-महात्मे तर शत्रूवरही प्रेम

करतात मग विश्वामित्र तर शत्रुत्व झुगारून देऊन शरण आला होता.

वसिष्ठांची क्षमा बुद्धी जागी झाली आणि ते उद्गारले. 'विश्वामित्रा, द्वेष आणि शस्त्र यांचा त्याग करून तू आज ब्राह्मणत्व पदाला पोचला आहेस !'

विश्वामित्र म्हणाले- 'महर्षी, मी द्वेष आणि शस्त्र यांचा नुसता त्याग केला नाही तर आजपासून आपले दास्यत्व स्वीकारले आहे.' वसिष्ठाला गहिवरून आले आणि विश्वामित्राचे दोन्ही हात आपल्या खांद्यावर ठेवून ते म्हणाले-- 'उठा ब्रह्मर्षी विश्वामित्र.' घोर युद्ध, द्वेष, शत्रुता, तपोबल या सर्वांपेक्षाही त्याने शरणागत होऊन दास्यत्व स्वीकारले तेव्हाच तो ब्रहर्षी पदाला पोचला. "दास्यभक्तीत एवढे महान सामर्थ्य आहे. म्हणून तर तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात

संताचिया पायी हा माझा विश्वास ।। सर्वभावे दास झालो त्यांचा !!

(साठवणीच्या गोष्टी)

# १.३८ वरुणपुत्र भृगुची गोष्ट

(पर्यावरण संरक्षणाची प्राचीन कथा)

वृक्षतोड हेच महान पाप आहे असे सांगणारी एक कथा 'शतपथ ब्राह्मणात' आली आहे. भृगुऋषी हा वरुणाचा मुलगा होता. त्याला आपल्या विद्येचा इतका गर्व झाला की, वरुणापेक्षाही आपण जास्त विद्वान आहोत असे त्याला वाटू लागले.

हे वरुणाला समजल्यावर तो म्हणाला, "बाळ तू पूर्वदिशेला जा. तिथे काय दिसेल ते पाहून दक्षिणेकडे जा. तेथे जे दिसेल ते पाहून पश्चिमेकडे जा. तेथे जे दिसेल ते पाहून उत्तरेकडे जा आणि तुला जे दिसेल ते मला येऊन सांग."

प्रथम भृगु पूर्वदिशेला गेला. तेथे त्याला चमत्कार दिसला. काही क्रूर लोक दुसऱ्यांना मारून त्यांचे तुकडे तुकडे करीत होते आणि 'हे तुला, हे मला' अशी त्यांची आपसात वाटणी करीत होते. भृगु म्हणाला- 'हा काय भीषण प्रकार ? हे दुष्ट लोक खुशाल दुसऱ्याला मारून तुकडे करून खात आहेत.'

ते ऐकून ते लोक म्हणाले, "ह्या लोकांनी आम्हाला पूर्वजन्मी असेच वागविले होते. त्याचे उसने आम्ही आता फेडतो आहोत. नंतर भृगु दक्षिणेला गेला. पश्चिमेला गेला. पुढे उत्तरेलाही गेला. प्रत्येक ठिकाणी त्याला तशाच प्रकारचे क्रूर दृश्य पहायला मिळाले. ही सर्व दृश्ये पाहून भृगु भेदरला आणि घरी येऊन अंथरुणावर पडून राहिला. तेवढ्यात त्याचा पिता वरुण' तेथे आला आणि म्हणाला - "अरे पडून का राहिला आहेस. अभ्यास का करीत नाहीस.'

त्यावर भृगु उदास होऊन म्हणाला- 'बाबा मी सर्व वेद पाठ केले. परंतु या पाहिलेल्या घटनांचा अर्थ मला समजला नाही. माझ्या अज्ञानाचेच मला वाईट वाटत आहे. मग हसत हसत वरुणाने पाहिलेल्या दृश्यांचे कोडे उलगडणारे स्पष्टीकरण केले. वरूण म्हणाला- 'जे लोक तू पूर्वेस पाहिलेस ती झाडे होती. पृथ्वीवर जे लोक झाडांच्या फांद्या, फुले, फळे अकारण तोडतात ते मेल्यावर ती

झाडेही त्यांना असेच तोडून खातात.

दक्षिणेस तू जे पाहिले ते सारे पशू होते. पशुधन ही समाजाची महान संपत्ती आहे. त्या पशुधनाला तितक्याच प्रेमाने सांभाळायला हवे. त्यांच्यावरही पुत्रवत प्रेम करायला हवे, त्यांना लळा लावायला हवा. परंतु तसे न करता जे लोक या पशुधनाला, या जनावरांना योग्य वागणूक देत नाहीत. त्यांना कामाला लावतात, त्यांच्या अंगावर मोठा भार देवून त्यांना श्रमवितात, त्या मुक्या जनावरांच्या खाण्या-पिण्याकडे लक्ष देत नाहीत. त्यांना शिकार करून मारतात व खातात; मेल्यावर ती जनावरेही त्यांना असेच तोडून खातात.

भृगुला पर्यावरणाच्या एकएका घटकाची महती पटत गेली आणि पर्यावरणाच्या ज्ञानाशिवाय आपले पांडित्य किती थोटके होते त्यामुळे आपण किती अज्ञानी होतो, याची त्याला जाणीव झाली. शेवटी वरूण म्हणाले- 'पुत्रा जगात झाडे तोडणे, जनावरांना राबविणे आणि त्यांची शिकार करणे हेच मोठे पापाचरण आहे. हे ज्याला समजते तोच खरा ज्ञानी होय. ज्यांच्यामुळे हा निसर्ग सुंदरतेचे रूप धारण करतो त्यावर आघात करणे हेच मोठे पाप आहे. तुला ही जाणीव झाल्याशिवाय तुझे ज्ञान अपूर्णच राहील.

भृगु ऋषि हे महान तत्त्ववेत्ते, महाकवी आणि शास्त्र ज्ञानातील व्यासंगी होते परंतु त्यांना सुद्धा आपल्या ज्ञानाची परिपूर्णता होण्यासाठी निसर्गातील झाडे, पशू, वनस्पती यांचे अंतरंग जाणणे आवश्यक ठरले. निसर्ग हाच परमात्मा आहे आणि निसर्गाचे रक्षण व जाणीव हेच यथार्थ ज्ञान आहे असे सांगणारी ही प्राचीन कथा ऋषिमुनींच्या जीवनातही पर्यावरणाविषयी कोणती दृष्टी होती याचे मोठेपण सांगून जाते.

(साठवणीच्या गोष्टी)

# १.३९ 'नू'चे नाणे

(चिनी लोककथा)

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. चीनमधील 'ताओन लिन' या गावी एक पुजारी होता. त्याचं नाव होतं 'वान चिंग.' देशभर भ्रमण करून तो आपल्या गावी परतला. फावल्या वेळेत तो गावकऱ्यांना आपल्या भटकंतीतील अनुभव ऐकवत असे. गावकरी मोठ्या उत्सुकतेने त्याच्या गोष्टी ऐकत असत. विशेषतः चीनमधील भव्य आणि प्रसिद्ध अशा बुद्ध मंदिरांची जेव्हा तो वर्णने करीत असे तेव्हा लोक ती वर्णने ऐकून स्तिमित होत. ही वर्णने ऐकून ऐकून आपल्या गावातही एखादं भव्य मंदिर उभारावं असं गावकऱ्यांना वाटू लागलं.

मंदिर उभारण्यासाठी लागणारं साहित्य जमवणं फारसं अवघड नव्हतं. प्रश्न होता भगवान बुद्धांच्या मूर्तीचा ! मूर्ती घडवणारे कारागीर तर गावात होते; पण मूर्ती तयार करण्यासाठी लागणारा खर्च, मूल्यवान धातू आणायचे कोठून, हा खरा प्रश्न होता. गावातील बहुतांश लोक निर्धन होते. या समस्येची सोडवणूक कशी करायची याची साऱ्यांना चिंता लागली.

काही लोकांनी पुजारी बाबांना भेटून आपली समस्या सांगितली.

काही वेळ विचार करून बाबा म्हणाले, 'एक उपाय आहे.'

'कोणता बाबा ? ' एकाने उत्सुकतेने विचारले.

'गावात पुजाऱ्यांची सहा घरं आहेत. प्रत्येक घरातला एक-एक पुरुष सदस्य चीनभर हिंडून सोनं, चांदी, पैसा जमवू शकेल. आपल्या देशात श्रीमंत लोक बरेच आहेत. हे लोक या पवित्र कार्यासाठी सढळ हाताने मदत करतील असा मला विश्वास वाटतो.'

सगळ्यांना हा उपाय ऐकून हुरूप चढला. सगळे उत्साहाने कामाला लागले.

जवळच्याच एका शहरी एक श्रीमंत स्त्री होती. अपार संपत्तीची मालकीण होती ती. तिच्या सेवेसाठी दास-दासींचा बराच मोठा ताफा होता. त्यातल्या

एका दासीची छोटीशी मुलगी होती- 'टीन नू.' ती वयानं लहान असली तरी समजूतदार आणि कष्टाळू होती. आपल्या आईला ती कामात मदत करीत असे. या गोड स्वभावाच्या मुलीचे सगळेजण खूप लाड करायचे.

एकदा 'टीन नू' ला रस्त्यावर एक पैसा सापडला. चीनमधील सर्वात लहान असं तांब्याचं नाणं होतं ते. तिने तो पैसा उचलून घेतला. हा पैसा मिळाल्याचा तिला खूप खूप आनंद झाला होता.

'टीन नू' ने तो पैसा मालकिणीच्या बागेतील एका दगडाखाली दडवून ठेवला. रिकामा वेळ मिळे तेव्हा ती हा पैसा काढून न्याहाळीत बसायची. हा पैसा जणू तिचं सर्वस्वच होतं!

एके दिवशी एक पुजारी त्या धनाढ्य स्त्रीच्या घरी आला. बुद्ध-मूर्तीसाठी त्याने काही धन देण्याची विनंती केली. 'टीन नू' तेथेच काम करीत होती. पुजाऱ्याचं बोलणं ती लक्षपूर्वक ऐकत होती. मालकिणीनं जेव्हा पुजाऱ्याला भरपूर सोनं-नाणं दिलं तेव्हा भगवान बुद्धांच्या मूर्तीसाठी आपणही काही तरी द्यावं असं तिला वाटलं. पण आपण तर गरीब आहोत, आपण काय देणार?... या विचारानं ती खिन्न झाली. तिचं विचारचक्र चालू होतं...

अचानक तिला बागेत दडवून ठेवलेल्या आपल्या पैशाची आठवण झाली. आनंदाने तिचा चेहरा उजळला. ती लगेच धावत गेली अन् तो पैसा आणून पुजाऱ्याच्या हातावर ठेवत म्हणाली, 'भगवान बुद्धांची मूर्ती तयार करण्यासाठी माझी ही छोटीशी भेट स्वीकारावी."

ते अत्यल्प किंमतीचं नाणं पाहून पुजाऱ्याच्या कपाळावर आठ्या पसरल्या. काहीशी नापसंती दर्शवीत तो म्हणाला, 'मुली, या पैशाचा काय उपयोग करणार आम्ही ? हा तुझ्या जवळच राहू दे.' आणि त्यानं 'टीन नू'ला पैसा परत केला. तिला खूप वाईट वाटलं. किती तरी वेळ ती रडत होती.

अनेक दिवस लोटले. सगळे पुजारी परतले होते. मूल्यवान धातू आणि भरपूर पैसे जमले होते. आता भव्य अशी मूर्ती तयार करायला अडचण नव्हती. गावकऱ्यांच्या उत्साहाला उधाण आले.

मूर्ती तयार करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. सगळे धातू एकत्र करून वितळविण्यात आले. वितळलेले सारे धातू एकजीव होऊन गेले. हा तप्त रस काळजीपूर्वक साच्यात ओतण्यात आला. बराच वेळ लोटला; तप्त रस पूर्णपणे थंड झाल्याची खात्री करून साचा हळूहळू तोडण्यात आला.

पण हे काय... ? भगवान बुद्धांची भग्न अशी मूर्ती दिसू लागली. ही तुटकी-फुटकी मूर्ती पाहून लोकांत निराशा पसरली. दोन-चारदा पुन्हा प्रयत्न करण्यात आला. पण दरवेळी भंगलेली मूर्तीच तयार होत असल्याचे पाहून लोक चिंताक्रांत झाले. पुजारी बाबांना ही गोष्ट फारच खटकली. ते शांतपणे विचार करू लागले... 'काही तरी विपरीत असं नक्कीच घडलं असावं... कुणावर तरी अन्याय झाला असावा... कुणाचं तरी मन दुखावलं गेलं असावं...'

सगळ्या पुजाऱ्यांना बोलावून धन गोळा करताना जे जे प्रसंग घडले ते विस्ताराने सांगायची सूचना बाबांनी केली. एखादा प्रसंग ऐकताना ते अधून मधून प्रश्नही विचारू लागले. ही विचारपूस सुरू असताना 'टीन नू' चा प्रसंग ऐकताच ते काहीसे उत्तेजित झाले. ज्या पुजाऱ्याने हा प्रसंग सांगितला त्याला बाबांनी आज्ञा दिली, 'आत्ताच्या आत्ता 'टीन नू'कडे जा आणि तिच्याजवळचा पैसा मागून आण.'

पुजारी ताबडतोब निघाला. 'टीन नू'ला भेटून त्याने तिला सगळं काही सांगितलं. अन् शेवटी म्हणाला, 'मुली, भगवान बुद्धांच्या प्रतिमेसाठी तुझा पैसा हवा आहे. मागे मी नकार दिला याचं खूप वाईट वाटतं मला... तो पैसा देशील कां?'

'हो.... हो.... का नाही ? 'नू' म्हणाली अन् धावत पळत जाऊन तिने पैसा आणला आणि पुजाऱ्याला दिला. पुजाऱ्याने काळजीपूर्वक तो पैसा अंगरख्याच्या खिशात ठेवला.

तो परतला आणि त्याने पैसा बाबांच्या ताब्यात दिला.

पुन्हा नव्याने साचा तयार करण्यात आला. धातू वितळू लागले. धातूच्या उकळत्या रसात बाबांनी नूचा पैसाही टाकला. क्षणभरात तो पैसा वितळून गेला.

अतिशय जपून रस साच्यात ओतला गेला... रस थंड झाल्यावर साच्याचे आवरण दूर करण्यात आले. यावेळी साच्याचे आवरण दूर होताच लोक हर्षातिरेकाने मूर्तीकडे पाहतच राहिले. अनेकांच्या तोंडून सहजोद्गार बाहेर पडले-'सुंदर! अति सुंदर!'

खरोखरच अत्यंत सुंदर अशी मूर्ती साकारली होती. 'अशी मूर्ती संपूर्ण चीनमध्ये कुठेच नाही'असे बाबांनी सांगितल्यावर लोकांच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

याच बरोबर लोकांनी एक आगळीच गोष्ट पाहिली. मूर्तीच्या वक्षावर एक लहानसे चिन्ह दिसत होते... 'टीन नू'च्या पैशाएवढाच त्याचा आकार होता... हा 'टीन नू'- चाच पैसा होता! आजही 'ताओन-लिन' येथील बुद्ध मूर्तीच्या वक्षावर 'टीन नू'चा पैसा अगदी स्पष्टपणे दिसतो!!

(देवीचंद राठोर : देशविदेशच्या कहाण्या)

# १.४० दानशूर बळीराजा

(भांगेत तुळस उगवावी तसा हिरण्यकश्यपू असुराच्या पोटी देवभक्त प्रल्हाद जन्माला आला. प्रल्हादाच्या मातेची, कयाधूची सत्वशीलता फळाला आली. आणि तेव्हापासून या दैत्यांच्या वंशात तुळशीचे बनच्याबन फोफावले. प्रल्हाद पुत्र सत्वशील विरोचनाच्या पोटी दानशूर म्हणून अमरत्व पावलेल्या बळीने जन्म घेतला. त्या उदारदात्या बळीराजाची ही कथा.)

बळीराजा आपल्या नगरीत सुखाचे राज्य करीत होता. धर्माचे, समृद्धीचे, दानाचे अधिष्ठान असा ह्या नगरीचा लौकिक होता. सर्व प्रजा आनंदाने नांदत होती. आपल्या राज्यात सर्वत्र आबादी आबाद असावे म्हणून नेहमीच राजा देशोदेशीच्या विद्वान दशग्रंथी ब्राह्मणांना व ऋषिजनांना बोलावून यथासांग यज्ञयाग करीत असे. अगणित दानधर्म करीत असे. विद्वानांचा आणि प्रजेचा दुवा घेत असे.

होता होता बळीराजाच्या पुण्याईने ९९ यज्ञ यथासांग पार पडले. आपल्या हातून झालेल्या ह्या धर्मकृत्याने आणि दानधर्माने तो संतुष्ट झाला होता, सुखावला होता आणि शंभरावाही यज्ञ आपल्या हातून व्हावा ह्या इच्छेने तो यज्ञाची तयारी करू लागला होता.

इकडे इंद्रपुरीत मात्र स्वतः देवेंद्र बळीराजाच्या ह्या अलौकिक धर्मपरायणतेमुळे आणि त्याने केलेल्या अपरंपार पुण्याच्या साठयामुळे चांगलाच हादरला होता. बळीचे शंभर यज्ञ झाले तर त्याला इंद्रपद मिळण्याचा हक्क होता आणि त्यासाठीच आपले पद जाते की काय या चिंतेने खुद्द इंद्र चांगलाच घाबरला होता. रात्रंदिवस त्याचे मन चिंतेने पोखरले जात होते. म्हणूनच बळीचे शंभर यज्ञ होता कामा नयेत यासाठी तातडीने काहीतरी करणे भाग होते. त्याने जर शंभर यज्ञ पुरे केले तर ? या अशुभ शंकेने इंद्र अक्षरशः

आपले डोके धरून बसला होता. ह्या भयाण संकटातून कसे निभावून निघावे याचा विचार करता करता तो अगदी वैतागून गेला होता. अखेर त्याने काही तरी तोडगा काढण्यासाठी सर्व देवांची तातडीची सभा बोलावली.

देवांना कळेना की, इतक्या तातडीने देवेंद्राने सभा का बोलावली? पण इंद्राचे बोलावणे म्हणताना सर्वजण आपापली कामे बाजूला सारून इंद्रसभेत वेळेवर उपस्थित झाले. सर्वजण आसनस्थ झाल्यावर काळजीयुक्त स्वरात आपल्यावरील संकटाची समग्र हकिगत इंद्राने कथन केली आणि बळिराजा सारख्या महान दानशूर, धर्मनिष्ठ राजाला शंभराव्या यज्ञयागापासून कसेही करून परावृत्त करण्यासाठी काही उपाय सुचवा असे विनवून सांगितले. अशावेळी देवगण यावर काय तोडगा काढतात याकडे तो आशेने पहात राहिला.

हकिगत ऐकल्यावर देवांमधील प्रत्येकानी आपापली मते मांडली. बरीच उलटसुलट चर्चा झाली. शेवटी बळीकडे श्रीविष्णूंनी वेषांतर करून स्वतः जावे आणि बळीचे सत्वहरण करावे; वेष बटुवामनाचा घ्यावा हेही ठरले. दानाच्या पेचात बळीस टाकावे आणि त्याचा व्रतभंग करावा असेही सर्वांचे मत पडले.

श्री विष्णूंना ह्या कामगिरीवर लगेच जाणे भाग होते. कारण तिकडे बळीराजाची यज्ञाची तयारी पूर्ण होत आली होती. म्हणून त्यांनी घरी जाताच, हुबेहूब बटू वामनाचा वेश परिधान केला. त्या वेषातच ते लक्ष्मीपुढे उभे राहून निरोप मागू लागले. लक्ष्मी देवीपदातच राहिल्याने तिने मनोमन ओळखिले की, आपले पतिराज काही महत्वाच्या कामासाठी जात असावेत. सहज विचारावं "कुठे जाताय' म्हणून तर विचारलंही, त्याला 'जरूरीच्या कामाला' असं उत्तर देऊन विष्णूभगवान निघालेही.

बराच प्रवास झाल्यावर बळीची नगरी जवळ दिसू लागली आणि लांबूनच त्या भाग्यनगरीचे वैभव डोळे दिपवू लागले. अनेक रेखीव फळाफुलांनी लहडलेली वने-उपवने, उंच उंच टोलेजंग प्रासाद, विशाल भव्य मार्ग, झगमगत्या वस्तूंनी भरलेल्या बाजारपेठा, ही सारी समृद्धी पाहून विष्णू सुखावले, आनंदले.

पण आपण ज्या कामासाठी आलो ते योजिलेले काम करावयासच हवे

म्हणून ह्या साऱ्या राजवैभवाने मोहित झालेले भगवान आपल्या कामगिरीवर निघाले. भव्य राजरासादापाशी येताच द्वारपालाने लवून वंदन केले. त्याकाळी द्विजांचा सर्व ठिकाणी आदर सत्कारच होत असे.

बटुवामनाने आत प्रवेश केला. सत्वशील बळीराजा यज्ञाच्या तयारीत गुंतलेलाच होता. पण बटुवामन आल्याचे कळताच लगेच आपल्या कामातून त्या द्विजाजवळ गेला आणि विनम्रपणे वंदन करता झाला. द्विजाला आसनावर बसवून त्याची यथासांग पूजा केली. आणि लीनतेने राजा बटूस म्हणाला, “महाराज, आपली कोणती इच्छा मी पुरी करावी ती आज्ञा व्हावी."

आर्जवी आणि हात जोडून हे राजाने विचारातच प्रत्यक्ष भगवानही " ह्याचे सत्व कसे बरे हरण करावे' या विचाराने अस्वस्थ झाले, तरी क्षणभरातच सावरले आणि काही सांगणार तेवढयात.... काही निराळेच घडू लागले.

गुरूवर्य शुक्राचार्य बळीराजाजवळच यज्ञयागाची तयारी करीत दर्भ निवडीत बसले होते. त्यांनी अंर्तमनाने जाणले की, हा बटू खरा नव्हे. ही विष्णूंची स्वारी इथे सत्वहरण करण्यासाठी बटुवेषात आलेली आहे. आणि म्हणूनच बळीसारख्या पुण्यशील राजाचे सत्व जाऊ नये यासाठी बळीने दानाचे उदक बटूचे हातावर सोडू नये असे शुक्राचार्यांना वाटले.

त्यांनी लगेच राजास बाजूस नेऊन वस्तुस्थितीची स्पष्ट कल्पना दिली व तू इच्छित दानाचे आश्वासन देऊ नकोस असे आर्वजून सांगितले. तसेच “राजा, ह्या दानाने तुझा घात होणार आहे." असा इशाराही दिला पण.....

हे सारे मुनिवर्यांचे ऐकूनही दानासाठी आजवर पुढे केलेला हात परत मागे कधीच न घेणारा बळीराजा, त्याने क्षणभरही विचार केला नाही. तो म्हणाला, “आजवरचे दानाचे सत्व राखण्यासाठी आज सत्व गेले तरी चालेल पण आलेल्या याचक द्विजाला इच्छित दान करणे हे माझे ब्रीद आहे. त्यापासून मी कधीही वंचित होणार नाही." असे शुक्राचार्य गुरूंना राजाने नम्रपणे सांगितले.

जवळच राजाची धर्मपत्नी बसली होती. तिने सारे संभाषण ऐकले होते. ती पतिव्रता स्त्री राजास म्हणाली, ‘हे पतिदेवा, बटूच्या रूपात प्रत्यक्ष भगवान श्रीविष्णू आलेत असे आपले मुनिवर्य सांगताहेत ना, मग विचार कसला

करायचा? अहो, एवढा महान पृथ्वीमोलाचा याचक म्हणून आपल्या घरी आलाय. हे आपलं केवढं पुण्य आहे? आणि महाराज, प्रत्यक्ष देवाधिदेव आपणाकडे आलेत त्यांचे आतिथ्य त्यांच्या इच्छेप्रमाणेच व्हावे हे उचित नव्हे काय? मी सांगते ह्या दानाने कोणतेही अरिष्ट कोसळू दे, चालेल. पण आपण ह्या याचकाची इच्छा पूर्ण करावी.'

पत्नीचे हे ओजस्वी विचार ऐकून राजा प्रसन्न झाला नि द्विजाला म्हणाला, “महाराज, करावा पुढे हात, मी इच्छित दानाचे उदक आपल्या पवित्र हातावर सोडण्यासाठी उत्सुक आहे.'

शुक्राचार्य सारे जाणून होते. राजाचे हे बोल ऐकताच ते फार अस्वस्थ झाले. त्यांना रहावेना. म्हणून त्यांनी एका अतिसूक्ष्म जिवाचे रूप घेतले आणि राजा ज्या सुवर्ण झारीने बटूच्या हातावर उदक सोडणार होता त्या झारीच्या ताटीत आचार्य जाऊन बसले. म्हणजे पाणी पडू नये. ते बंद रहावे हा विचार.

पण भगवंत, तेही सर्व जाणणारेच की? त्यांनी मनोमनी हा आर्चायांचा कावा ओळखला आणि एक दर्भाची काडी घेऊन ती बाहेरून तोटीत खुपसली. ती काडी नेमकीच शुक्राचार्यांच्या डोळ्यांत घुसली व भळाभळा तोटीतून रक्त वाहू लागले. हे पाहून बळीराजा घाबरला. हे रक्त कसले? काहीच कळेना.

इतक्यात डोळा फुटलेले गुरूजी झारीतून बाहेर आले. मग बळीराजाने बटुवामनाच्या हातावर यथासांग दानाचे उदक सांडले. आणि संतुष्ट होता राजा बटूस म्हणाला, "द्विजवरा, तू तुझे इच्छित काहीही माग, जे मागशील ते मी या क्षणी द्यायला तयार आहे."

तेव्हा घाईघाईने वामनरूप विष्णू म्हणाले, “छे, छे, महाराज मला आपले राज्य, धनदौलत काहीही नकोय; माझी मागणी फार अल्प आहे. राजा, मला फक्त तीन पाऊले धरणी दे."

"तथास्तु, दिली धरणी महाराज" असे राजाने म्हणताच श्री विष्णूनी झपाझप आपुली पाऊले एका क्षणात कल्पनातीत मोठी केली. आणि एक पाऊल स्वर्गात व दुसरे धरणीवर ठेवले ह्या दोनच पाऊलांनी सारा स्वर्ग व पृथ्वी भरुन गेली.

हे पाहून बळीराजा भांबवला, त्याला कळेना की हे काय घडते आहे? राजाचा

असा अस्वस्थ चेहरा पाहून बटू म्हणाला, “राजा पहातोस काय? तू तर दानशूर म्हणून मोठा लौकिक मिळविलेला आहेस तरी ही साधी तीन पाऊले जमीन देण्यास तू असमर्थ ठरतो आहेस असे दिसते!"

राजाने क्षणभर विचार केला नी बोलला, "नाही नाही! महाराज, मी माझे सत्व जाऊ देणार नाही. बटुराज आजवर माझ्या घरातून कुणीही याचक अतृप्त, विन्मुख गेलेला नाही. तसे आपणही जाणार नाही." असे म्हणत बळीने आपले मस्तक खाली झुकविले व म्हणाला,

‘‘महाराज, आपले तिसरे पाऊल ह्या मस्तकावर ठेवावे." बटूने तिसरे पाऊल बळीच्या मस्तकावर ठेवले आणि पायाच्या दाबाने बळीला पाताळात गाडले!

अर्थात बळीराजाच्या ह्या असीम दानशूरतेने श्री विष्णू मनोमन अति संतुष्ट झाले. म्हणाले, "हे बळीराजा, तू धन्य आहेस, राजा, तुझ्या दातृत्वाची किर्ती अखंड तेवत राहील. मी तुजवर पूर्ण संतुष्ट आहे. तेव्हा तू काहीही वर मागून घे. मी तो आनंदाने तुला देईन."

इतके अरिष्ट घडले तरीही बळीराजा स्थितप्रज्ञपणे देवास म्हणाला, ‘‘भगवान्, आपण याचक म्हणून मज दारी आलात, मला आपल्या सारख्या सर्वेश्वराला दान करण्याची संधी दिलीत या परता आणखी काय हवे? मी कृतार्थ झालोय, देवा एकच मागतो आपणापाशी, आपण अखंड माझ्या सन्नीध रहावे हीच इच्छा."

भगवान “तथास्तु' म्हणाले नि तेव्हापासून बळीराजाचे ते व्दारपाल म्हणून राहू लागले. असा हा दानाने अमर झालेला राजा.

ह्याच बळीराजाच्या अमर कहाणीची स्मृति रहावी म्हणून आपण भारतीय कार्तिक शुद्ध प्रतिपदेस “बलिप्रतिपदा' हा दिवस साजरा करतो.

(इंदिरा कुलकर्णी : दसरा-दिवाळी [संपादक : सरोजिनी बाबर])

# १.४१ जनस्थान : नाशिकविषयी लोककथा

(रामायणातील कथा)

अगस्ती मुनी यांना दक्षिण भारतातील प्रबळ राक्षसांचा नाश करण्यासाठी व ऋषीमुनींना आश्रय देण्यासाठी उत्तर भारतातून ब्रह्मा, विष्णू महेश यांना दक्षिण भारतात पाठवतात. तेव्हा महादेव म्हणतात की, “मी गोदाकाठच्या पंचक्रोशीत जनस्थान या ठिकाणी ‘कपालेश्वर' या नावाने प्रकट होईन” आणि विष्णूने वचन दिले की, “मी रामअवतारी तुमच्या भेटीला येईन.” हे वचन घेऊनच ते दक्षिण भारतात येतात. त्यानंतर अगस्ती ऋषी अनेक प्रबळ राक्षसांना संपवून गोदावरीच्या परिसरात आले. राक्षसभवन येथील विलवला आणि वातापी या राक्षसांना संपवले. पुढे ते ‘जनस्थाना'कडे जात होते. जनस्थानाचा हा परिसर खूप पवित्र परिसर म्हणून ओळखला जात होता. या ठिकाणी प्रत्यक्ष महादेव कपालेश्वराच्या नावाने प्रकट झाले होते. त्यामुळे या ठिकाणी अनेक ऋषी - मुनी राहात होते. पण या परिसरात खूप जंगल होते आणि राक्षसांचा संचारही जास्त होता. येथील ऋषी-मुनींना राक्षसांचा खूप त्रास होत असे. या राक्षसांना संपवण्यासाठी अगस्ती महाऋषी या परिसरात आले होते व येथेच ‘अनकाई गावाच्या बाजुला उंच पर्वतावर त्यांनी आश्रम स्थापन केला व कपालेश्वराची पुजा-अर्चना सुरू केली.

रामअवतारी रामाला १४ वर्षांचा वनवास भोगावा लागला होता. वनवासी असताना राम, लक्ष्मण, सीता हे सोबत होते. ते गोदावरीकाठी पंचवटीच्या परिसरात आले तेव्हा अगस्तींना दिलेल्या वचनाची त्यांना आठवण झाली आणि ते परिसरातून जनस्थानाकडे अगस्ती ऋषीच्या दर्शनासाठी आश्रमात आले. काही दिवस या पंचवटीच्या जंगलात राम वास्तव्य करून राहिले होते.

एके दिवशी लक्ष्मण फळे, कंदमुळे शोधत हातात खड्ग (तलवार) घेऊन जंगलात भ्रमंती करू लागले. वाटेत याच जंगलात शूर्पणखेचा मुलगा ‘सांभ' हा

तपस्या करत बसला होता. लक्ष्मण जंगलातून रस्ता काढत काढत जात होता. वाटेत आलेल्या वेली खड्गने तोडत होता. वाटेत आलेल्या एका जाळीवर असेच लक्ष्मणाने आपले खड्ग मारले त्याच जाळीत सांभ तपस्या करत बसला होता. लक्ष्मणाच्या खड्गने सांभाचा वध झाला होता. खड्गचे रक्त पाहून लक्ष्मण चिंतेत पडला. आपल्या हातून साधू मेला का दुर्जन हे मला काही कळत नाही. म्हणून रामापाशी येऊन लक्ष्मणाने घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. तेव्हा रामाने आंतरदृष्टीने जाणले की हा शूर्पणखेचा मुलगा सांभ राक्षसाचा वध झाला आहे.

रामाचे हे बोलणे ऐकून लक्ष्मणाला वाटले आता आपले आणि राक्षसांचे हाडाचे वैर निर्माण झाले, हे याचे सूचक आहे.

शूर्पणखा आपल्या मुलाच्या (सांभाच्या) भेटीसाठी आली. तर त्याचे मुंडके एका बाजुला आणि धड एका बाजूला हे पाहून तिचा राग अनावर झाला. तिने आपल्या मुलाचा बदला घेण्याचे ठरवले. पण हा वध कोणी केला ते तिला कळाले नाही. परंतु दुसऱ्याच दिवशी लक्ष्मण याच जंगलात फिरताना शूर्पणखेने पाहिला. यानेच आपल्या मुलाचा वध केला असावा असे तिला वाटले. त्याचा बदला घेण्यासाठी तिने कपटबुद्धीने एका सुंदर तरुण मुलीचे रूप धारण केले आणि लक्ष्मणाकडे फुलाचा हार घेऊन गेली. तिने लक्ष्मणाला लग्न करण्याची मागणी घातली. माझा स्वीकार करावा' असे ती म्हणते. तेव्हा लक्ष्मण तिला सांगतो की 'मी रामाचा आदेश मोडत नाही. तू रामाकडे जाऊन रामाचा आदेश आणावा. मग मी तुझा स्वीकार करीन' लक्ष्मणाचे हे बोलणे ऐकून शूर्पणखा रामाकडे जाते. तेव्हा राम तिला ओळखतो आणि तिच्या पाठीवर लिहितो, "ही येताच हिचे नाक - कान, स्तन कापून टाक. ही रावणाची बहीण शूर्पणखा आहे." हा संदेश घेऊन ती लक्ष्मणापाशी येते. व संदेश देते. हा संदेश पाहताच लक्ष्मण तिचे नाक व कान कापून टाकतो. ही घटना जनस्थान येथे घडली आहे. म्हणून जनस्थानाला तेव्हापासून नाशिक या नावाने ओळखले जाऊ लागले.

(गोदाकाठच्या लोककथा)

# १.४२ ग्रहणासंबंधी दंतकथा

एकदा देव आणि दैत्य दोघांनी मिळून समुद्रमंथन करून चौदा रत्ने मिळवली. वाटणी करता करता सुधा (अमृत) कोणी घ्यावे याबाबत वाद निर्माण झाला. या वादात दैत्यांनी सुधेचा कुंभ जबरदस्तीने देवांपासून हिसकून घेतला. तेव्हा विष्णूने मोहिनीचे रूप घेतले. मोहिनीरूप विष्णूने दैत्यांना अमृत वाटण्याचे काम मी करतो असे सांगितले. दैत्यांना ही गोष्ट मान्य झाली. त्यांनी अमृतकुंभ मोहिनीरूप विष्णूंच्या स्वाधीन केला. विष्णूने देवास आणि दैत्यांना समोरासमोर दोन रांगांमध्ये बसविले. सर्वप्रथम देवांना अमृत वाढले. राहू नावाच्या दैत्यास वाटले की सगळे अमृत देवांमध्येच वाटले गेले तर आपल्याला मिळणार नाही. म्हणून दैत्य राहू चंद्र व सूर्य यांच्यामध्ये येऊन बसला. अमृत वाढता वाढता राहू दैत्यालाही अमृत वाढले. राहू ते लगेच पीत असताना चंद्रसूर्यांनी राहुची लबाडी श्रीविष्णूंच्या लक्षात आणली. विष्णूनेही ताबडतोब आपल्या चक्राने त्याचे मस्तक तोडले. परंतु अमृत त्याच्या कंठापर्यंत पोहोचले होते. त्यामुळे त्यास मृत्यू आला नाही. त्याचे धड व शिर अमर झाले. तो जिवंत राहिला. तेव्हापासून त्या दैत्याच्या शिरास राहू व धडास केतू असे म्हणू लागले. दैत्याने आपल्या या अपमानाचा बदला घेण्यासाठी चंद्रसूर्याचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. त्यामुळेच राहू केतू चंद्रसूर्यास ग्रासण्यासाठी अधूनमधून त्यांच्यावर झडप घालतात. त्यामुळे चंद्रसूर्याच्या दैनंदिन भ्रमणगती अडथळा निर्माण होतो. त्यामुळे ग्रहणे होतात अशी लोकसमजूत आहे. देवांच्या कृपेने आणि लोकांच्या प्रार्थनेने चंद्रसूर्याची यातून सुटका होते.

(गोविंद मंगेश कालेलकर : लौकिक दंतकथा)

# १.४३ आधारियेचा परिसाचा दृष्टांत

(महानुभाव ग्रंथातील गोष्ट)

कव्हणा एका महात्माचिये आधारिये परिसू होता तो कव्हणी एका ब्राह्मणाचे घरा वसतीसी जाये. दारी तिटत तिटत ऐसे पाणी पडत होते तेणे तयाचे वस्त्र आंबट-ओले ऐसे जाले होते.

घरिचीया ब्राह्मणी ओसरीये पिढे घातले, पाये धुतले, तांबिया भरुनी दिधला. तेणे संध्या केली. तव तो ब्राह्मणू आला. डोईये वानेराची पेंढी, ते ठेविली. तिये सदुर्बळे ऐसी ब्राह्मणे तेयाते गाये एकी दुभे. तेणे गाये दुहिली. राळेयाचे खिचटे गोंदले लोणियाचा कवडा ताविला. मग तयासी ठाव केला, तया दोघाही तो जेविला.

तुटकी ऐसी बाज, तियेवरी फाटकी ऐसी वाकळ अंथुरली ते निजावया दिधली, तयाचे पाये धुतले, चोपडीले. इतुकेनि तो संतोषिला.

तुमचि जेतुली लोखंडे आहात, तेतुकी बांधौनि आमचिये बाजीबुडी ठेवा. पास, फाळ, इळा, कु-हाडी तुता बांधोनी, तियाचिये बाजेबुडी ठेविली. तो पहाटेचि उठिला, आधारियेचा परिसू काढिला तेथ लावुनी आपण निगोनि गेला.

तो ब्राह्मण उठिला, डोईए लोखंडे ठेवुनि शेता घेऊनि गेला. वखरू जुंपिला, तव फाळ लव लागला. तुतेनी करोनी माती फेडिली, तव माती न फिटे. इळेनी करोनी गवत घेऊ बैसला, तव गवत नेघवे. कु-हाडी करूनी झाडे फेडू आदरिली, तव कु-हाडी वाकली. ऐसा निधावला. लोखंडे डोईए ठेवुनी घरा घेऊनी आला.

दारी लोखंडे घातली. मग भणितले, “पापिणी पापिणी, कवणासी बि-हाड दिधले? महात्मेनी कुंजातर केले. अजि माझा सोनियाचा देहाडा वाया गेला.”

“महात्मेनी कुंजातर केले? " ऐसे भणोनी ते बाहेरी आली तव विवळले असे. वरील माती फिटली आंतुन सोने झळझळ करीत दिसताये

तिया म्हणितले, “ महात्मेनी कुंजातर केले, की आमचेया दरिद्राचा मुळी इळा घातला?” ऐसे म्हणोनी ते भितरी घेऊनी गेली.

**भावानुवाद :** या दृष्टांतकथेची भाषा ही १३ व्या शतकात बोलली जाणारी मराठी भाषा होती. आजच्या मराठीत या दृष्टांतकथेचा भावानुवाद पुढीलप्रमाणे:

" कोण्या एका महात्म्याजवळ जीवन जगण्यासाठी आधार म्हणून परीस होता. तो महात्मा कोणा एका ब्राह्मणाच्या घरी रहाण्यासाठी गेला. घराच्या दारात थेंबथेंब पाणी ठिबकत होते. त्यामुळे त्याचे कपडे आंबट-ओले झाले होते. घरातील ब्राह्मणीने ओसरीत बसण्याचे पाट ठेविले. महात्म्याचे पाय धुतले. तांब्या भरून दिला. त्याने संध्या केली. त्यानंतर ब्राह्मण आला. त्याच्या डोक्यावर गवताची पेंढी होती. ती त्याने ठेवली. त्या गरीब ब्राह्मणाने गायीचे दूध काढले. तिने राळ्याची खिचडी रांधली, लोणी कढवले. मग त्याला वाढले. महात्मा खिचडी आणि लोणीचे जेवण जेवला.

तिने तुटक्या बाजेवर फाटकी वाकळ अंथरून महात्म्याची झोपण्याची व्यवस्था केली. त्याचे पाय धुतले व चेपून दिले. त्याने तो संतुष्ट झाला. तो तिला म्हणाला, तुमच्याकडे जेवढी म्हणून लोखंडे असतील तेवढी बाजेच्या पायथ्याशी ठेवून दे." त्याप्रमाणे तिने पास, फाळ, विळा, कुऱ्हाड आणून बाजेच्या पायथ्याशी नेऊन ठेवले.

सकाळी ब्राह्मण उठला, डोक्यावर लोखंडी अवजारे घेऊन शेतावर गेला. वखर जुंपले, तर फाळ लवू लागला. खुरप्याने माती खरडू लागला तर माती निघेना. विळ्याने गवत कापू लागला, तर गवत कापले जाईना. कुऱ्हाडीने झाड तोडू लागला तर कु-हाड वाकली. अखेर कंटाळला आणि डोक्यावर लोखंडी अवजारे घेऊन घरी निघाला. ब्राह्मणाने दारात लोखंडे टाकली आणि बायकोला म्हणाला, ''पापिणी, कुणाला आश्रय दिला? महात्म्याने जादूटोणा केला. माझा सोन्याचा संसार लुटला गेला." ''महात्म्याने जादूटोणा केला?" असे म्हणत ती बाहेर आली. लोखंडावरची माती दूर झाली होती. आतून सोने झळाळत होते. ती नवऱ्याला म्हणाली, "महात्म्याने जादूटोणा केला की आमच्या दारिद्र्यावर विळा घातला? दारिद्र्य दूर केले?" असे म्हणून तिने सारी अवजारे घरात नेली.

(शं. गो. तुळपुळे : दृष्टांतपाठ)

# १.४४ सत्यकामाची गोष्ट

सत्यकाम अगदी एकटा पडला. त्याचे सर्व खेळगडी त्याला सोडून गेले होते. त्यांच्या आईबापांनी त्यांची उपनयने करून त्यांना विद्याध्ययनासाठी गुरुगृही पाठवून दिले होते. बरोबरचे सर्व खेळगडी गुरुगृही जाऊन विद्याभ्यासाला लागले असता, आपण मात्र माशा मारीत बसणे किंवा गावात भटक्या मारीत राहणे, माझ्या मित्रांनो, सत्यकामासारख्या हुषार व होतकरू मुलाला पसंत कसे पडावे? त्याच्या मनाला मोठी हुरहूर लागून राहिली. आपली आई आपले उपनयन करून विद्यार्जनासाठी आपल्याला गुरुगृही का पाठवून देत नाही, हे त्याच्या बालमनाला उमगेना. तो मोठा बुचकळ्यात पडला. सत्यकामा, तू पितृहीन व शिवाय एका दासीचा मुलगा. तुझी काळजी कोण वाहणार ? परंतु जगाने आपली काळजी वाहिली नाही तरी आपण आपली काळजी घ्यावयाची व बालपणाचा बहुमोल काल फुकट जाऊ द्यावयाचा नाही असे सत्यकामाने ठरविले. गुरुगृही जाऊन विद्याभ्यास करावयाचा असा त्याने आपल्या मनाशी निश्चय केला. गुरुगृही गेले असता आपले स्वतःचे नाव, आपले गोत्र म्हणजे आपल्या कुळाचे नाव वगैरे सागावे लागते ही माहिती त्याला होती; म्हणून तो आपल्या आईकडे गेला आणि तिला म्हणाला :

“आई, मी ब्रह्मचारी होऊन विद्याभ्यासासाठी गुरुगृही जाऊ इच्छितो. मी कोणत्या गोत्राचा आहे ते मला सांगतेस?”

मुलाचा प्रश्न अगदी साधा व सरळ होता; परंतु तिला तो मोठा अवघड वाटला असावा. मुलाच्या त्या एका प्रश्नामुळे तिच्या पूर्वचरित्राचा चित्रपट तिच्या डोळ्यांपुढे सुरू झाला असला पाहिजे. तथापि आपल्या मुलांपासून सत्य लपवून ठेवावयाचे नाही असा तिने निश्चय केला. तिने आपल्या मुलाला उत्तर दिले :

“तुझे गोत्र काय ते मला माहीत नाही. दासी म्हणून मी अनेक ठिकाणी अनेक

तऱ्हांचे काम करीत असता, मुला, तू माझ्या पोटी जन्मलास तेव्हा मला तुझे गोत्र काय ते माहीत नाही, माझे नाव जाबाला आणि तुझे नाव सत्यकाम आहे. मी सत्यकाम जाबाला आहे, एवढे तू आपल्या गुरूला जाऊन सांग."

मुलांनो, ती बिचारी आपल्या मुलाला अधिक काय सांगणार ? आणि तिने अधिक सांगितले असते, तरी त्या निष्पाप बालकाला त्यांत फारसे काय समजले असते ? एकाच वाक्यांत तिने आपले आत्मवृत्त मुलाला व त्याच्या निमित्ताने सर्व जगाला सांगून टाकिले, ती अविवाहित असूनहि तिला सत्यकाम झाला होता. अनाथ अबला मूग गिळून गप्प बसली होती. तिच्या करुण कहाणीने कोणाच्या हृदयाला पाझर फुटणार नाही ? आपल्या आईचे हे दु:ख व त्यामुळे आपल्या विद्यासंपादनाच्या मार्गात उत्पन्न होणारी धोंड सत्यकामाच्या ध्यानात आली होती, असे त्याने पुढे गुरूला दिलेल्या, उत्तरावरून अनुमान निघते. परंतु तो विद्येसाठी अधीर झाला होता. आईचाच सत्य बोलण्याचा कित्ता गुरुपाशी गिरवावयाचा व त्याचेच पाय धरावयाचे, असे त्याने मनाशी ठरविले व जरूर ती माहिती आईकडून मिळताच तो गौतम ऋषीकडे गेला व त्यांना म्हणाला,

'भगवन् ! मी आपल्याजवळ विद्याध्ययनाकरिता ब्रह्मचारी म्हणून राहतो. मी आपल्याला शरण आलो आहे.'

सत्यकामाने अटकळ बांधली होती त्याप्रमाणे गौतम ऋषींनी त्याला प्रश्न केला, "हे मुला, तू कोणत्या गोत्राचा आहेस ?"

सत्यकामाने उत्तर दिले, "मी कोणत्या गोत्राचा आहे ते, महाराज, मला ठाऊक नाही. मी आईला विचारले; ती मला म्हणाली, की परिचारिका, दासी अशी मी अनेक तऱ्हांनी सेवा करीत असता, तारुण्यामध्ये मला तू झालास. त्यामुळे तू कोणत्या गोत्राचा आहेस हे मला माहीत नाही. फक्त माझे नाव जाबाला आहे आणि तुझे नाव सत्यकाम आहे. तो मी सत्यकाम जाबाल आहे."

त्या काळच्या रिवाजाप्रमाणे गौतमाने सत्यकामाचा पूर्व इतिहास ऐकून त्याला विद्या देण्याचे कदाचित् नाकारलेही असते. परंतु आईने सांगितलेल्या माहितीपैकी सत्यकामाने एक अक्षरसुद्धा आपल्या गुरूपासून लपवून ठेविले

नाही. माझ्या मित्रांनो, याला म्हणतात सत्यनिष्ठा, सत्य बोलण्याने जन्माचे नुकसान होण्याचा संभव असताहि जो सत्यापासून एक रतीभरही ढळत नाही, त्यालाच सत्यवान् हे नाव शोभते.

सत्यकाम गौतमाच्या कसोटीला उतरला. शिष्याच्या गुणावरून तो उच्च कुळातीलच असला पाहिजे असे त्याने ठरविले व तो सत्यकामाला म्हणाला,

"तू उच्चवर्णीय नसतास तर तुझ्या तोंडून असे निर्भय सत्य बाहेर पडले नसते. वत्सा, तू सत्यापासून ढळला नाहीस, एक समिधा आण. मी तुझे उपनयन करतो."

मुलांनो, तुमच्यामध्ये स्वतःला उच्चवर्णीय म्हणवून घेण्यात अभिमान बाळगणारे पुष्कळ असतील, परंतु माझा तुम्हाला असा सवाल आहे, की जर गौतम ऋषी आज पुन्हा आपल्यामध्ये अवतीर्ण झाले व त्यांनी या मंडळींची सत्यकामाप्रमाणे परीक्षा घेतली, तर त्यात किती उत्तीर्ण होतील बरे ? या प्रश्नाचे उत्तर माझ्या पत्त्यावर पाठविण्याची आवश्यकता नाही. तुमच्यापैकी प्रत्येकाने त्याचे आपल्या मनाशी उत्तर दिले म्हणजे माझे काम झाले. आज हिंदू समाजात गुण व वर्ण यांचा काहीच संबंध उरलेला नाही. जन्म हाच केवळ वर्ण ठरविण्याचे साधन समजला जातो. जो ब्राह्मणकुळात जन्मला तो ब्राह्मण. मग त्याच्या आंगचे गुण ब्राह्मणाला न शोभणारे असले, तरी समाज त्याच्याकडे लक्ष देत नाही. त्यामुळे मनुष्याच्या आंगचे गुण व त्याचा धंदा यांच्यामध्ये मेळ राहिला नाही. या स्थितीत गुणांचा विकास होण्याला संधी मिळत नाही. आज हिंदू समाज अपकर्षाच्या उतरणीला लागलेला दिसतो त्याचे हे एक मुख्य कारण आहे. वर्ण ठरविण्यात जन्माला काहीच महत्त्व नाही असे, मुलांनो, माझे म्हणणे नाही. जन्माला स्थान आहे, परंतु ते गौण आहे. मुख्य स्थान आपण गुणांनाच दिले पाहिजे. ज्याच्यामध्ये ब्राह्मणाचे गुण नसतील, तो केवळ ब्राह्मण आईबापांच्या पोटी जन्माला आला आहे, म्हणून आपण त्याला ब्राह्मण मानतां कामा नये. उलट, ज्याच्या अंगी ब्राह्मणाचे गुण असतील तो ब्राह्मणकुळात जन्मला नसला, तरी आपण त्याला ब्राह्मण मानिले पाहिजे. हिंदुधर्मात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे फक्त चारच वर्ण आहेत. समाजाच्या सुव्यवस्थित

संघटनेला व धारणेला बुद्धी, शौर्य, संपत्ती व शरीरसेवा या चार गोष्टींची मुख्यतः जरुरी असते. जो बुद्धीने समाजाची सेवा करतो तो ब्राह्मण, जो शौर्याने सेवा करतो तो क्षत्रिय, जो संपत्तीने समाजाची सेवा करतो तो वैश्य, व जो शरीराने समाजाची सेवा करतो तो शूद्र, या चार वर्णाचा हेतु गुणांप्रमाणे कर्मीची वाटणी करून व्यक्तीच्या विकासाला मदत करणे एवढाच आहे. यात उच्च-नीच या भावनेला मुळीच स्थान नाही, आपल्या शरीराचे कान, डोळे, दात, पाय वगैरे निरनिराळे अवयव आहेत व त्यांची निरनिराळी कार्ये आहेत. म्हणून आपण कानांपेक्षा डोळे श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असे का मानीत नाही. (तसे मानू तर तो आपला मूर्खपणा होईल.) या अवयवांचे निरनिराळे व्यापार शरीराच्या आरोग्यासाठी व सुखासाठी अवश्य असतात. त्याचप्रमाणे समाजपुरुषाच्या धारणेसाठी व सुखासाठी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या चतुर्विध सेवेची जरूरी आहे. प्रत्येकाने आपला विशिष्ट गुण इतरांच्या सेवेला लावून आपला व त्याचबरोबर आपल्या समाजाचा उद्धार करावयाचा आहे. हे वर्ण प्राधान्यतः गुणांवरूनचे ठरले पाहिजेत व पूर्वीच्या काळी ते तसे ठरत असत, हे सत्यकाम जाबालाची गोष्ट आपल्याला स्पष्ट दाखवीत आहे.

माझ्या मित्रांनो, पूर्वीच्या काळी गुणांनाच प्राधान्य देत. म्हणूनच ज्याच्या पित्याचे कुलही माहीत नाही, अशा सत्यकाम जाबालासारख्या दासीपुत्राला गुरूच्या घरी जाऊन विद्यार्जन करता आले; व परमेश्वराने त्याला जे गुण दिले होते त्यांचा विद्येने विकास करून त्यांच्या द्वारा त्याला समाजाची सेवा करता आली, नियमितपणा, कष्टाळूपणा, गुरुसेवा व गुरुभक्ती, दीर्घोद्योग व दांडगा अभ्यास या गुणांच्या जोरावर सत्यकाम जाबाला गुरूपासून विविध विद्या संपादन केली. विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर तो स्वगृही परत आला व योग्य वधूशी विवाह करून तो आदर्श आश्रमवासी व नागरिक यांचे जीवन कंठू लागला. त्याने अनेक सत्पात्र ब्रह्मचाऱ्यांना विद्या देऊन आपल्याप्रमाणेच त्यांनाही धन्य केले.

- छांदोग्योपनिषद्, अ. ४, ख. ४, (शंकरराव देव : उपनिषदांतील गोष्टी)

# १.४५ नचिकेताची गोष्ट

प्राचीन काळी उद्दालक नावाचे एक ऋषी होऊन गेले. त्यांना नचिकेता नावाचा एक पुत्र होता. नचिकेता फार चाणाक्ष हुषार व चौकस बुद्धीचा होता. अवतीभवती घडणा-या घटनांबद्दल नानाप्रश्न विचारून तो आपल्या पित्याला भंडावून सोडी. एकदा उद्दालक ऋषींनी 'विश्वजित' नावाचा फार मोठा यज्ञ आरंभिला. हा यज्ञ करणे फार कठीण कर्म होते. कारण यात सर्वस्वाचे दांन करावे लागे. यज्ञाचे वेळी उद्दालक ऋषी आपल्या जवळील गाईचे रोज दान करी. शेवटी शेवटी रोड व अशक्त गाईच शिल्लक राहिल्या. त्याही त्याने दान केल्या. तेव्हा या हुषार मुलाच्या मनात विचार आला की या रोड व अशक्त गाईच्या दानाने आपल्या पित्याला पुण्य कसे लाभणार. आपल्याजवळील सर्वात उत्तम वस्तूचे दान केले तरच पुण्य लाभणार. उत्तमातील उत्तमाचा त्याग केला तरच आपल्या पित्याला पुण्य लाभेल. असा विचार करून तो आपल्या पित्याजवळ गेला व म्हणाला, "बाबा मी तुमचा मुलगा तुमच्या जवळील सर्व श्रेष्ठ वस्तू आहे. तुम्ही माझे दान कोणाला करणार ?" मुलाचा हा प्रश्न ऐकून उद्दालक आश्चर्यचकित झाले. गालातल्या गालात हसून नचिकेताला म्हणाले, "अरे वेड्या, मुलाचे का कोणी दान करतात. जा खेळायला, मुले वाट पाहत असतील." पण नचिकेताचे समाधान झाले नाही. रोडक्यागाई दान करून पित्याला पुण्य कसे लाभेल ? या एकाच प्रश्नाचा भुंगा त्याचे डोके कुरतडू लागला. आपल्या या शरीराचा आपल्या पित्याकरिता काही उपयोग व्हायलाच हवा असा विचार त्याच्या मनात सारखा येऊ लागला. या विचारातच तो आपल्या पित्याकडे गेला व विचारू लागला, "बाबा तुम्ही मला कोणाला दान देणार?" हा त्याचा भोळा भाबडा प्रश्न उद्दालक ऋषीचा पिच्छा सोडीना. शेवटी पिता चिडला व रागाच्या भरात चिडून उद्दालक ऋषी म्हणाले, "मर, मी तुला यमाला दिले." तोंडून शब्द निघून गेले व मग ऋषींना पश्चाताप झाला. आपण

रागाच्या भरात काय बोलून गेलो. पण भात्यातून बाण निघून गेला तो परत कसा घेता येणार ?

नचिकेताने पित्याला नम्रभावाने नमस्कार केला व यमराजाकडे जाण्यास निघाला. तो चालता असता आकाशवाणी झाली. व यमराजाकडे जाण्याचा रस्ता त्याला समजला. यमाचे राज्य पितृलोकात होते. यम प्राण हरण करणारा म्हणून तो दुष्ट असे आपण समजतो. पण यमराज फार दयाळू राजा. आपल्या प्रजेचे पालन तो पितृवत करतो. यमाचे दोन इमानी कुत्रे यमराजाच्या दरबाराचे रक्षण करीत. नचिकेत यमराज्यात पोहचला. तेव्हा यम राज्यात नव्हता ही बातमी समजताच यमाच्या दरबाराच्या पायरीवर तो यमाची वाट पाहात बसला. अन्न पाणी न घेता तीन रात्री तो तेथेच बसून राहिला. यम राज्यात आल्यावर त्याने नचिकेताची प्रेमाने विचारपूस केली. “बाळा तू कोण ? कोठून आलास ? कशासाठी आलास? माझी वाट पाहत तू उपवासी का बरे राहिलास?” अत्यंत नम्रपणे यमाला नमस्कार करून नचिकेत उत्तरला, “माझ्या पित्याने मला आपणाकडे पाठविले आहे.” असे म्हणून त्याने सर्व हकिगत सांगितली. यमाला फार आश्चर्य वाटले. पित्याचे वचन खरे करण्याकरिता देहत्याग करणाऱ्या नचिकेतावर यमराज प्रसन्न झाले. आपल्याकडे आलेला अतिथी तीन दिवस उपवासी राहिला या पापाचे प्रायश्चित म्हणून त्याने नचिकेताला तीन वर मागण्यास सांगितले.

नचिकेताने पहिला वर मागितला. “माझ्या पित्याला सर्व दु:खातून दूर कर.” यमराज म्हणाले, “तथास्तु” बाळ दुसरा वर माग. नचिकेत म्हणाला, “माझ्या हातून परोपकार घडू दे, यज्ञयागादी पुण्य कर्म माझ्या हातून होऊ देत.” “तथास्तु यमराज उद्गारले. बाळा नचिकेता तू स्वत: करता काहीच मागितले नाहीस आता तिसरा वर माग. यमाला प्रणिपात करून नचिकेता म्हणाला, “महाराज, मृत्यूनंतर जीवाचे काय होते ? मृत्यूवर विजय कसा मिळवावा हे आपण मला समजावून द्याल का ?” हा वर ऐकून यम विचारात पडले. जन्ममृत्यूचे रहस्य यमराज कसे सांगणार ! पण शब्द दिला. शब्द मागे कसा

फिरवणार ? यम राजाला मोठा पेच पडला.

नचिकेताचा नम्रभाव व ज्ञानलालसा पाहून त्याला आपला शिष्य करण्याचे यमाने ठरविले. तरीपण शेवटचा प्रयत्न करून पाहावा म्हणून यम नचिकेताला म्हणाले, “बाळा तुला दुसरे काही हवे का ? धन-रत्ने, हिरे-जवाहर, सुंदर लावण्यवती अप्सरा, मोठमोठी राज्ये मी तुला देतो. जन्ममृत्यूचे रहस्य समजावून घेण्याचा हट्ट सोड.'' यावर नचिकेता म्हणाला, “महाराज, या नश्वर देणग्या घेऊन काय करू ? आत्मज्ञान मिळाले तर जन्माचे सार्थक होईल. तरी मला ज्ञानापासून वंचित करू नका.'' नचिकेताचे मनापासूनचे हे बोल ऐकून यमराज संतुष्ट झाले. व त्याला शिष्य म्हणून स्वीकारले. पुढे यमराजाने त्याला आत्मज्ञानाचा मार्ग सांगून आत्मा ईश्वर आहे म्हणून तो अमर आहे. हे ज्ञान होणे म्हणजे मृत्यूवर विजय मिळविणे होय अशा त-हेचा उपदेश त्याला यमाने केला. नचिकेताला जन्म मरणाचे रहस्य ज्ञात झाले. या आनंदात तो पित्याकडे परत आला. आपला मुलगा ज्ञानी होऊन आला हे पाहून पित्याला उद्दालक ऋषीला ही परम संतोष झाला.

(शंकरराव देव : उपनिषदांतील गोष्टी)

# १.४६ देवकी व कंस यांची गोष्ट

यादववंशांत शूरसेन नांवाचा एक राजा झाला. हा मथुरेंत राहून राज्याचा कारभार पाहत असे. म्हणून मथुरा ही सर्व यादव राजांची राजधानी असे लोक समजू लागले. या शूरसेनाचा मुलगा वसुदेव याचे कंसाची बहीण देवकी हिच्याशी मोठ्या थाटाने लग्न झाले. लग्नसमारंभ उरकल्यावर देवकीला घेऊन वसुदेव जाण्यास निघाला, तेव्हां कंस हा आपल्या बहिणीस व मेहुण्यास पोचविण्यासाठी मोठ्या इतमामानें सोन्याचे शेकडों रथ घेऊन निघाला; इतकेच नाही, तर आपल्या बहिणीच्या संतोषासाठी तिचा रथ हांकण्याचे काम त्याने स्वतः हातीं घेतले. भाऊबहिणींचे हे प्रेम पाहून लोकांना मोठे कौतुक वाटले. कंस रथाचे घोडे हांकीत आहे, इतक्यांत त्याच्या कानीं पुढील शब्द पडले, "मूर्ख कंसा, जिला मोठ्या समारंभानें तू सासरी पोंचवीत आहेस, त्या तुझ्या बहिणीच्या आठव्या संततीच्या हातून तुझा मृत्यु आहे." हे शब्द ऐकतांच बहिणीविषयींचें कंसाच्या मनांतलें प्रेम एकदम मावळले, आणि तो शस्त्र उपसून देवकीला ठार मारण्यास तयार झाला. "असे अविचाराचे कृत्य करूं नकोस," असें वसुदेवाने त्याला पुष्कळ प्रकारांनी सांगून पाहिले; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. कंस स्वभावाने दुष्टच होता. तो आपला आग्रह सोडीना. शेवटी हिला जी संतती होईल ती मी तुझ्या स्वाधीन करीन, पण हिला या वेळीं सोड, असे वसुदेवानें कबूल केले, तेव्हां कंसाने तिला सोडले.

(वा. गो. आपटे : बालभागवत)

# १.४७ कृष्णाच्या बाळक्रीडा

कंसाने राज्यातल्या सगळ्या तान्या मुलांना मारण्याच्या कामगिरीवर प्रथम पूतना राक्षशिणीला पाठविले होते. ती शहरे, गावे व गौळीवाडे यातून मुलांचा नाश करीत करीत गोकुळात आली. नंद त्या वेळी काही कामासाठी बाहेर गेला होता. राक्षसी सुंदर स्त्रीचे रूप धारण करून यशोदेकडे गेली व गोड गोड शब्द बोलली. मग तिने श्रीकृष्णाला उचलून मांडीवर घेतले आणि त्याला ती पाजू लागली. तिने आपल्या स्तनाला भयंकर जालिम विष लाविले होते. कृष्ण प्रत्यक्ष विष्णूचा अवतार ! त्याला त्या राक्षसीचे कपट ठाऊक होते. आणि परमेश्वराला विषाची ती बाधा कोठून होणार ! कृष्णाने नुसते विषच नव्हे, तर तिच्या अंगातले रक्त सुद्धा शोषून घेतले, आणि तिला मारून टाकिले !

एकदा यशोदेने त्याला नीट न्हाऊ घातले, अंगात कपडे घालून ओव्या गात दह्यादुधाच्या गाड्याखाली त्याला पाळण्यात निजविले, आणि आपण कामाला गेली. इकडे कृष्ण जागा होऊन वर पाय करून नाचू लागला, आणि पायांनी सबंध गाडाचा गाडा उलथून पाडला !

एके दिवशी त्याला मांडीवर घेऊन यशोदा हसवीत खेळवीत बसली होती. तेव्हा एकाएकी त्याचे अंग इतके जड झाले की, जणू काय मोठा डोंगरच मांडीवर घेतला आहे !

कृष्णाविषयीच्या अनेक चमत्काराच्या गोष्टी ऐकून कंसाने त्याला मारण्यासाठी तृणावर्त राक्षस धाडला. हा वावटळीचे रूप घेऊन आला होता. त्याने कृष्णाला उचलून नेले. पण कृष्णाने त्याची मानगुटी धरून त्याला ठार केले.

कृष्णाने एकदा जांभई देताना तोंड उघडले, तेव्हा यशोदेला त्यात पृथ्वी, आकाश, सूर्य, चंद्र वगैरे सर्व ब्रह्मांड दिसले !

शेजारीपाजारी राहणाऱ्या गवळिणींच्या घरी जाऊन कृष्णाने धार

काढण्याच्या अगोदरच वासरे सोडून द्यावी; बेलाशक घरात शिरून दूध, दही व लोणी खावे, व आपल्या सोबत्यांना द्यावे. निजलेल्या तान्ह्या मुलांना चिमटे घेऊन रडवावे; अशा नाना प्रकारच्या खोड्या कराव्या. कृष्ण फार खोड्या करतो म्हणून यशोदेने त्याला एकदा दोरीने उखळीशी बांधले आणि ती कामाला गेली. इकडे तो उखळीसह सरकत सरकत दोन झाडांच्या मधून गेला, आणि उखळीमध्ये अडकवून त्याने दोन्ही वृक्ष समूळ पाडले.

रोहिणीचा मुलगा बलराम हा श्रीकृष्णाहून थोडासा मोठा होता. ते दोघेही एकाच जागी राहत व खेळत. काही दिवसांनी नंद वगैरे सगळे गवळी गोकुळातून निघून वृंदावनास जाऊन राहिले. तेथे यमुनेचे वाळवंट आणि गोवर्धन पर्वत यासारखी खेळण्याची उत्कृष्ट ठिकाणे मिळाली, तेव्हा बळराम, कृष्ण व त्यांचे खेळगडी यांना फार आनंद झाला. राम व कृष्ण गुरे चारण्यासाठी नेण्याइतके मोठे झाले, तेव्हा ते मुरल्या,पावे, शिंगे, व चेंडू, काठ्या वगैरे खेळण्याचे सामान घेऊन रानात जाऊ लागले. एके दिवशी ते रानात गेले असता एक राक्षस वासराचे रूप घेऊन त्यांच्या गुरात शिरला. कृष्णाने रामाला डोळ्याने खुणावले. त्याबरोबर रामाने त्याच्या तंगड्या धरून गरगर फिरविले आणि कवठीच्या झाडावर फेकून दिले.

एकदा गुरांना पाणी पाजण्यासाठी सगळे जण यमुनेवर गेले होते. तेथे बगळ्याचे रूप घेऊन एक राक्षस बसला होता. त्याने कृष्णाची प्रथम खोडी केली. म्हणून त्याची चोच धरून श्रीकृष्णाने त्याला उभा चिरले.

राम, कृष्ण व दुसरे गोपाल (गवळ्यांची मुले) रानात जात, तेव्हा बरोबर शिदोरी नेत; आणि दुपारचे वेळी यमुनेच्या काठी रमत गमत, परस्परांच्या थट्टा मस्करी करीत व एकमेकांना वानगी देत, मोठ्या आनंदाने खात; केव्हा मुरल्या, पावे, शिंगे वाजवत व त्यांच्या नादावर नाचत; केव्हा धावत; केव्हा झाडांवर बसलेल्या वानरांची खाली लोंबणारी शेपूट ओढीत; त्यांना वाकुल्या दाखवीत; केव्हा पशुपक्ष्यांसारखे शब्द काढीत. असे ते गोपाल खेळत असता अघ नावाचा एक राक्षस अजगराचे रूप घेऊन तोंड उघडून बसला होता, त्याच्या तोंडात

नकळत हे गोपाळ शिरले. कृष्णही त्यांचेमागून शिरला. हे पाहून राक्षस तोंड मिटू लागला. पण यावेळी कृष्ण वेगाने वाढत चालल्यामुळे त्याला तोंड मिटता येईना. शेवटी दम लागून राक्षस मेला. तेव्हा सगळे गोपाल बाहेर पडले.

अशारितीने राम व कृष्ण यांनी अनेक वेळा राक्षसांना मारून आपल्या सोबत्यांचे रक्षण केले व आपल्या पराक्रमाने सर्वांना चकित करून सोडले.

(वा. गो. आपटे : बालभागवत)

# १.४८ कालियामर्दन

एके दिवशी कृष्ण वृंदावनात गाई चारीत असता दुसरे गोपाल फार तहान लागली, म्हणून त्याची वाट न पाहता पाणी पिण्यासाठी यमुनेवर गेले. तेथे एक मोठा डोह होता व त्यात कालिया नावाचा एक भयंकर विषारी सर्प राहत होता. त्या सर्पाच्या विषामुळे ते पाणी जहरी झाले होते. तरी सगळे गोपाल ते प्याले आणि विषबाधा होऊन मरून पडले. इतक्यात कृष्ण तेथे आला, आणि त्याने सर्वांचे विष उतरून त्यांना जिवंत केले. मग त्या सर्पाला त्या डोहातून हाकून लावावे असा विचार करून श्रीकृष्णाने कंबर बांधली आणि जवळच असलेल्या कळंब वृक्षावरून त्या विषारी डोहात उडी टाकिली ! त्याबरोबर पाणी जोराने उसळले व मोठा खळबळाट झाला. तो आवाज ऐकून कालिया सर्प त्वेषाने

बाहेर निघाला, व कृष्णाला कडकडून दंश करून त्याने त्याच्या अंगाला विळखा घातला. हे पाहून कृष्णाचे सोबती अगदी घाबरून गेले व गाई हंबरडे फोडू लागल्या. इकडे कृष्णाला घरी येण्याला रोजच्यापेक्षा आज फार उशीर झाला, म्हणून नंद व यशोदा काळजी करीत होती. बराच वेळ झाला तरी अजून कृष्ण व त्याचे खेळगडी यापैकी कोणीच घरी येईना, तेव्हा सगळे गोप त्यांचा शोध करीत करीत डोहापाशी आले, आणि कृष्णावरले हे संकट पाहून भीतीने गांगरून गेले. इकडे कृष्णाने हळू हळू आपले शरीर फुगविण्याला प्रारंभ केला, आणि फुगविता फुगविता ते इतके फुगविले की, त्या सर्पाला वेदना होऊ लागल्या. त्याने अंगाला घातलेला विळखा सोडला; तथापि कृष्णाला पुनः दंश करण्याची संधी तो पहातच होता. इकडे कृष्णही त्याच्या फडांवर उडी मारण्याची संधी पहात त्याच्या भोवती घिरट्या घालीत होता. होता होता कृष्णाने संधी साधली. तो कालियाच्या डोक्यावर चढला, आणि वर नाचून नाचून त्याने आपल्या टाचांनी त्याच्या फणा ठेचून टाकल्या. कालियाचे सगळे अंग त्यामुळे खिळखिळे होऊन त्यातून रक्त वाहू लागले. तेव्हा त्याची रग जिरली असे पाहून कृष्णाने त्याला तो डोह सोडून दुसरीकडे जाण्यास सांगितले व त्याप्रमाणे तो निघून गेला.

(वा. गो. आपटे : बालभागवत)

# १.४९ पर्वताची केली छत्री

त्या काळी अशी चाल होती की, एखाद्या वर्षी पाऊस पडला नाही, तर इंद्राला प्रसन्न करून घेण्यासाठी यज्ञ करावा. त्याप्रमाणे नंद वगैरे गोपांनी यज्ञाची तयारी केली. पण इंद्राचा आणि आपला संबंध काय ? त्यापेक्षा ज्याच्याशी आपला रोज संबंध येतो त्या गोवर्धन पर्वताला नैवेद्य अर्पण करावा हे बरे, असे कृष्णाने सुचविले. नंदालाही ती गोष्ट पटली. तेव्हा इंद्राला आपला अपमान झाला असे वाटून त्याने रागाच्या सपाट्यात भयंकर वृष्टी करणाऱ्या मेघांना मोकळे सोडले. ते गोकुळावर अतिवृष्टी करू लागले. विजांचा कडकडाट झाला; गारांचा वर्षाव झाला; जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. उभे राहण्यास तिळा एवढी देखील कोरडी जमीन राहिली नाही. थंडीने सर्व अगदी काकडून गेले. आता काय करावे याची सर्वांना काळजी येऊन पडली. तेव्हा इंद्राचा गर्व उतरण्यासाठी कृष्णाने तो गोवर्धन पर्वत उपटून करंगळीवर उचलून धरला आणि छत्रीखाली जसे आपण उभे राहतो तसे सगळे गोप व गोपी गाईवासरेसुद्धा त्या पर्वताखाली आश्रयास येऊन उभी राहिली. कृष्ण करंगळीवर पर्वत घेऊन सात दिवस उभा होता. हे इंद्राने पाहिले, तेव्हा त्याचा गर्व उतरला; पाऊस लख्ख उघडला; नदीनाल्यांचे पाणी ओसरले; जमीन कोरडी झाली; तेव्हा सगळी माणसे पुनः गोकुळात जाऊन राहिली.

(वा. गो. आपटे : बालभागवत)

# १.५० सुदामदेवाची गोष्ट

कृष्ण लहानपणी सांदीपनी गुरूपाशी विद्या शिकत होते, तेव्हा तेथे त्यांच्याबरोबर सुदामदेव नावाचा ब्राह्मणाचा एक मुलगा विद्याभ्यास करीत होता. तो कृष्णाचा जिवलग मित्र होता. पुढे कृष्ण मथुरेला गेला, आणि सुदामदेव आपल्या घरी गेला. तेव्हापासून कित्येक वर्षेपर्यंत त्यांची दोघांची गाठ पडली नाही. इकडे कृष्णाचे वैभव वाढत चालले, आणि त्याची कीर्तीही चोहोंकडे पसरली. ती ऐकून सुदामदेवाला मित्राचा उत्कर्ष झाल्याबद्दल फार आनंद झाला. सुदामदेव मोठा विद्वान्, सुशील व सदाचरणी ब्राह्मण होता. तो अतिशय दरिद्री होता, तथापि जे मिळे त्यात समाधान मानून राहत असे. त्याला बायकोही त्याच्या सारखीच सदाचरणी मिळाली होती. तथापि दारिद्र्यामुळे तिला अंगभर वस्त्र व पोटभर अन्न मिळत नसे, याचे तिला वाईट वाटे. सुदामदेव व कृष्ण हे बाळपणचे स्नेही असून त्यांचे एकमेकांवर फार प्रेम आहे हे तिला ठाऊक होते. श्रीकृष्णाच्या भेटीस सुदामदेव गेल्यास आपले दारिद्र्य एका क्षणात नाहीसे होईल ही तिची पक्की खात्री होती. आणि म्हणून ती कृष्णाच्या भेटीला जाण्यासाठी आपल्या पतीच्या पाठीस सारखी लागली होती. पुष्कळ दिवस सुदामदेवाने तिच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही. पण एक दिवस त्यालाही वाटले की द्रव्यासाठी नाही तरी मित्राच्या भेटीसाठी आपण द्वारकेला जावे आणि आपल्या बाळमित्राला एकदा डोळे भरून पहावे. म्हणून त्याने द्वारकेस जाण्याचा विचार केला. फार दिवसांनी मित्राच्या भेटीला जावयाचे, तेव्हा त्याला देण्यासाठी त्याला आवडेल अशी एखादी वस्तू नेली पाहिजे. सुदामदेवाच्या घरात तर अशी काही वस्तू नव्हती. तेव्हा त्याच्या बायकोने चार शेजारणीपाजारणीच्या घरून चार मुठी पोह्यांच्या कण्या मागून आणिल्या, आणि त्या सुदामदेवाच्या धोतराच्या पदरात बांधून दिल्या. त्या घेऊन ब्राह्मणाची स्वारी निघाली, ती द्वारकेला आली. द्वारकेच्या भोवतीं

कडेकोट बंदोबस्ताचे चौकीपहारे होते. त्यातून सुदामदेवाने मोठ्या कष्टाने बाहेर पडून दुसऱ्या काही ब्राह्मणांबरोबर नगरात एकदाचा प्रवेश केला, आणि शोध करीत रुक्मिणीचे मंदिरात कृष्ण बसले होते तेथपर्यंत ब्राह्मण जाऊन पोचला. सुदामदेवाला पाहताच कृष्णाने त्वरेने पुढे होऊन आपल्या मित्राला आलिंगन दिले, त्याचे पाय धुतले, व त्याच्या अंगाला सुवासिक पदार्थांच्या उट्या लाविल्या. हा फाटके तुटके नेसलेला दरिद्री ब्राह्मण, आणि कृष्ण याचा इतका आदर का करतात हे कोणालाच काही कळेना. कृष्णाच्या व त्या ब्राह्मणाच्या पुष्कळ वेळपर्यंत सुखदुःखाच्या गोष्टी झाल्या. त्यात गुरूच्या घरी रहात असता नानाप्रकारच्या प्रसंगांतून आपण कसे पार पडलो, गुरुजींचे आपल्यावर कसे प्रेम होते, आपण एके जागी कसे हसलो, खेळलो, विद्या पढलो, इत्यादि लहानपणच्या आठवणी निघाल्या, तेव्हा दोघांच्याही नेत्रांतून प्रेमाश्रु वाहू लागले. गोष्टी झाल्यानंतर "माझ्यासाठी तू काय भेट आणली आहेस ती दे" असे कृष्णाने म्हटले. तेव्हा ज्याचे ऐश्वर्य मोठमोठ्या राजांचेही डोळे दिपवून टाकीत होते त्याला आपण आणिलेल्या भिकार कण्या भेट म्हणून कशा द्याव्या अशी लज्जा वाटून सुदामदेव विचारात पडला. तो खाली मान घालून बसला. तेव्हा कृष्णाने आपण होऊन त्याच्या धोतराच्या पदरात बांधलेले पोहे धुंडाळून काढले, आणखी त्यातले मूठभर पोहे मोठ्या आवडीने खाल्ले. ते त्याला इतके गोड लागले की, त्याच्यापुढे रसभरित पंचपक्वान्ने अगदी फिकी वाटली, हा सगळा प्रेमाचा प्रभाव ! दुसरे काय ?

सुदामदेवाने एक दिवस कृष्णाच्या येथे राहून दुसरे दिवशी निरोप घेतला. कृष्णानेही त्याला दूरपर्यंत पोचवायास जाऊन असाच वारंवार भेट देत जा म्हणून आग्रहाने सांगितले. सुदामा आला तसा परत वाट चालू लागला; पण “मला थोडे तरी धन द्या” असे शब्द त्याच्या तोंडातून लज्जेमुळे निघाले नाहीत, व कृष्णानेही आपण होऊन त्याला काही ‘घे’असे म्हटले नाही. आपल्या मित्राने ऐश्वर्य प्राप्त झाले असताही पूर्वीची ओळख कायम ठेवून आपणास सख्ख्या भावाप्रमाणे वागविले, या गोष्टीचीच सुदामदेवाला मोठी

धन्यता वाटली ! इतकंच नाही, तर धन दिले नाही हे त्याने उपकारच केले; कारण, धन मिळाले असते तर कदाचित् आपल्या डोळ्यांवर धुंदी आली असती, असे मनात समजून तो आनंदित झाला.

याप्रमाणे मित्राच्या भेटीचा लाभ घडल्याबद्दल आनंद मानीत तो ब्राह्मण आपल्या गावाजवळ जसजसा येत चालला, तसतसे त्यांच्या गावाचे स्वरूप एकदम पालटलेले त्याला दिसले. मोठाले श्रीमंती थाटाचे वाडे, सुंदर बगीचे, आणि आपले स्वागत करण्यासाठी उत्तमोत्तम वस्त्र व अलंकार घालून आलेले स्त्रीपुरुष पाहून सुदामदेव अगदी थक्क झाला. जिला नेसायला धड वस्त्र नव्हते, ती आपली स्त्री भरजरी पैठणी नेसली आहे व शालू पांघरली आहे, आणि आपले चंद्रमौळी घर इंद्रभुवनाप्रमाणे शोभत आहे, हा काय चमत्कार आहे ते बराच वेळ त्याला उमगेना. पण लवकरच त्याच्या ध्यानात आले की, हा सगळा कृष्णाचा खेळ आहे! तेव्हा असा प्रेमळ व गमती मित्र मिळाल्याबद्दल त्याला केवढी धन्यता वाटली असेल याची कल्पनाच केली पाहिजे.

(वा. गो. आपटे : बालभागवत)

# स्पष्टीकरण कथा


२.१. आकाश उंच का गेले? १९५

२.२. गव्हावर खूण का? १९७

२.३. समुद्राच्या काठी वाळू का? १९८

२.४. खेकडे वाळू का उकरतात १९९

२.५. जगामध्ये प्रकाश कसा आणला गेला? २०३

२.६. या जगात वस्ती कशी वाढली २०६

२.७. सूर्य आणि चंद्र यांची उत्पत्ती २०८

२.८. सप्तर्षिमंडळ २०९

२.९. चंद्रावरील डाग २११

२.१०. आकाशगंगा २१२

२.११. विद्युत २१४

२.१२. दगडचोथ २१५

२.१३. झाडे चालायची का थांबली २१६

२.१४. सिंह गर्जना का करतात २१८

२.१५. सिंह फळे का खात नाहीत २२१

२.१६. चित्त्याच्या गालावर ओघळणाऱ्या अश्रूंचे डाग २२३

२.१७. चित्ता वेगवान पळणारा कसा झाला २२६

२.१८. जिराफाची मान लांब का झाली २२७

२.१९. साळूला टोकदार पिसे कशी मिळाली २३०

२.२०. खारीच्या पाठीवर तीन पट्टे का? २३२

२.२१. कावळा काळा का? २३५

२.२२. कोंबडे किडे का खातात २३९

२.२३. बहिरी ससाण्याची चोच छोटी का? २४३

२.२४. हट्ट राजपुत्राचा, जन्म माकडांचा २४४

२.२५. स्त्री चतुर की पुरुष चतुर? २४८

२.२६. चिनीमातीच्या भांड्यांची निर्मिती कथा २५०

२.२७. पावशेगो २५२

# २.१ आकाश उंच का गेले?

(मराठी लोककथा)

कोणी एके काळी आकाश आणि सूर्य अगदी जवळ जवळच होते. एकदा अचानक सूर्याच्या उष्णतेची तीव्रता वाढली. अग्निज्वालेइतकी दाहक झाली. अशा या उष्णतेने लोक होरपळून निघत होते. या काळातच एक शेतकरी शेतात काम करीत होता. शेतकरी टकलू होता. शेतकऱ्याला डोक्यावर एकही केस नव्हता. शेतकऱ्याचे डोके सूर्याच्या तीव्र उष्णतेने तापले. डोके इतके तापले की, नारळासारखे त्या टक्कल पडलेल्या डोक्याचे दोन तुकडे झाले. आणि काही क्षणातच तो स्वर्गवासी झाला. त्या शेतातच शेतकऱ्याची मुलगी तांदूळ कांडत होती. आपले वडील काम करता करता सूर्याच्या उष्णतेमुळे जमिनीवर कोसळलेले पाहताच, दु:खाच्या आवेगात तांदूळ कांडण्याचे मुसळ अधिकच वेगाने खाली-वर करू लागली. जितक्या वेगाने मुसळ वर न्यायची तितक्याच वेगाने मुसळ खाली येत असल्यामुळे उखळातील तांदूळही ती इकडे तिकडे पसरत होते. पसरणारे तांदूळही गतीने गोळा करीत होती. अशा या वेगवान क्रियांमुळे अचानक मुसळ वर नेता नेता आकाशाला टेकले आणि आकाश मुलीच्या डोक्यावर कोसळले!

मुलीच्या डोक्याची शकले उडाली. तुकडे तुकडे झाले! मुलगीही स्वर्गवासी झाली! उष्माघाताने नवरा मेला, पाठोपाठ वडिलांच्या मृत्युच्या आघाताने मुलगीही गेली. त्यामुळे त्या मुलीची आई दु:ख सागरात बुडाली! अशा या अति दु:खावेगातच मुलीच्या आईने आकाश आणि सूर्याला शाप दिला, `दुष्ट आकाश आणि सूर्य, आजपासून तुम्ही लाखो योजने दूर जा! यापुढे आम्हा मानवजातीतील प्राणी-पशु-पक्ष्यांना सुखाने जगू द्या!'

ही शापवाणी ऐकताच आकाश सूर्य वरवर जाऊ लागले. त्याचवेळी एक धोबी गाढवाच्या पाठीवर कापड्याचे गठ्ठे धरून नदीकाठी जात होता.

गाढवाच्या पाठीवर ओझे जास्त झाल्यामुळे गाढव चालू शकत नव्हते. धोबी गाढवाच्या पायावर काठी मारत होता. गाढवाला काठीचा मार असह्य झाला. गाढवाने मागच्या दोन पायांनी धोब्याला धक्के दिले. आणि गाढवाच्या पाठीवरील सर्व कपडे खाली पडताच गाढव सुसाट पळू लागला. गाढवाच्या वेगाने धोब्याला पळता भुई थोडी झाली. अखेरीस धोबी दम टाकत ओरडू लागला, `थांब, थांब रे!' आकाश आणि सूर्याला वाटले आपल्यालाच थांबायला सांगत आहे. म्हणून आकाश-सूर्य स्थिर झाले. सारी सृष्टी धोबीदादांना धन्यवाद देऊ लागली!

(शंकर गणेश दाते : मराठी लोककथा)

# २.२ गव्हावर खूण का?

(मराठी लोककथा)

एकदा गहू आणि हरभरा यांच्यात श्रेष्ठ कोण? असा वाद सुरू झाला. गहू म्हणाले, `मी मानवजातीला सगळ्यात पोषक आहे. माझ्याशिवाय माणूस जगू शकतच नाही. हरभरा म्हणाला, `मीच सगळ्यात पोषक आहे, दोघांचा वाद पराकोटीला पोहोचला. तिकडून ज्वारीचे कणीस म्हणाले, अरे दोघे असे किती वेळ भांडत बसणार आहात? तुमच्यात श्रेष्ठ कोण हे ठरविण्यासाठी सरळ देवाकडे जा!

हरभरा आणि गहू दोघेही देवाकडे गेले. देवाला म्हणाले, `देवराज आमच्या दोघात श्रेष्ठ कोण सांगा पाहू?' देव सुरवातीला म्हणाले, अरे, तुम्ही दोघेही श्रेष्ठ आहात? कारण तुमच्या दोघांमध्ये मानवजातीला पोषक तत्त्व आहेत. परंतु गहू म्हणाले, `देवराज तरीही मी हरभऱ्यापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण मानवाच्या रोजच्या आहारात माझा मुख्य अन्न म्हणून उपयोग केला जातो. मी नसतो तर मानव उपाशीच राहिला असता!' हरभरा म्हणाला, `मीच श्रेष्ठ आहे. मानवाची प्रथिनांची गरज हरभऱ्यामुळेच पूर्ण होते. देवाने दोघांचे मत ऐकल्यानंतर असा निर्णय दिला की, गव्हापेक्षा हरभरा श्रेष्ठ आहे. कारण हरभरा प्रक्रिया करून आणि नुसताही खाता येतो. गहू खाता येत नाहीत! देवाचा निर्णय ऐकून गहू, हरभरा परत आले. परंतु गव्हाविरूद्ध निर्णय झाल्यामुळे अतिदु:खाने गव्हाने स्वत:च्या उरावर धाव घालून घेतले. तीच खूण गव्हावर दिसते.

(शंकर गणेश दाते : मराठी लोककथा)

# २.३ समुद्राच्या काठी वाळू का?

(मराठी लोककथा)

फार फार वर्षांपूर्वी समुद्राच्या काठावर भाकरीचं पीठच पीठ पसलेले होतं. ज्याला भूक लागेल तो समुद्राकाठी जाऊन आपल्या हवं तेव्हढं पीठ घ्यायचा आणि भाकरी करून खायचा! कुणीही गरजेपेक्षा चिमूटभरही जास्त पीठ घ्यायचं नाही असा अलिखित कायदा होता. निसर्गाने माणसाला अमाप पीठ दिलं होतं. समुद्राकाठी कुणीही राखणदार नव्हता की, शिपाई नव्हता. प्रत्येक जण आपापला संयम ठेवत, हव्यास न करता गरजेपुरते पीठ घेऊन आपापली भूक भागवीत होता. सारे काही सुखा-समाधानात गुण्या-गोविंदाने चालले होते.

एकदा काय झालं, एका बाईला रोज रोज समुद्राकाठी येण्याचा कंटाळा येऊ लागला. म्हणून तिने पाच-सहा दिवस पुरेल इतके पीठ उचललं आणि घरी आली. संध्याकाळ होताच चंद्राने समुद्राकाठच्या पिठात लोळण घेतलं आणि पांढरा शुभ्र चंद्र आकाशात स्थिरावताच सगळं पीठ नाहीसं झालं! समुद्राकाठी उरली फक्त वाळूच वाळू! पिठासारखी, सोनेरी, सोनेरी!

(शंकर गणेश दाते : मराठी लोककथा)



# २.४ खेकडे वाळू का उकरतात?

(व्हिएतनामी लोककथा)

अनेक वर्षांपूर्वी व्हिएतनामच्या एका लहानशा खेड्यात 'दा त्रांग' नावाचा शिकारी होता. पहाटे पहाटे तो धनुष्य-बाण घेऊन शिकारीसाठी निघत असे. शिकारीला जाताना त्याला गावाबाहेर असलेल्या एका पडक्या देवळाजवळून जावे लागे. देवळाच्या परिसरात दोन नाग राहायचे. पहिल्यांदा जेव्हा दा त्रांग ने त्यांना पाहिलं तेव्हा तो खूप घाबरला. पण या नागांकडून कसलाही धोका नाही असं लक्षात आल्यावर त्याची भीती दूर झाली. शिकारीहून परतताना दररोज तो त्यांना शिकारीतला काही भाग देत असे. काही दिवसातच त्या नागांशी त्याची दाट मैत्री झाली. कधी कधी विरंगुळा म्हणून तो त्या नागांशी खेळत बसे !

एके दिवशी शिकारीला जाताना त्यानं पाहिलं की, एक प्रचंड असा काळाकुळकुळीत सर्प त्याच्या मित्रांवर सारखे हल्ले चढवतो आहे. त्याने लगेच त्या प्रचंड सर्पावर बाण सोडला. क्षणार्धात तो सर्प गतप्राण झाला. त्या मित्र नागांपैकी एकाचा मृत्यू झाला. दुसरा खूपच जखमी झाला होता. दा त्रांगने एक खड्डा खूणन त्यात मृत नागाचं दफन केलं.

जखमी नागाला घेऊन तो घरी आला. तो आणि त्याच्या पत्नीने अतिशय काळजीपूर्वक त्याची सेवा-सुश्रूषा केली. काही दिवसातच तो नाग पूर्णपणे बरा झाला.

एके रात्री नाग मनुष्यवाणीत बोलू लागला,' मित्रा, माझ्यावर तुझे अनंत उपकार आहेत. त्याची परतफेड करता येणं शक्यच नाही. आपल्या मैत्रीची आठवण म्हणून माझ्या या छोट्याशा भेटीचा स्वीकार कर. असं म्हणून नागाने त्याच्या हातावर एक मोती ठेवला अन् सळसळत निघून गेला.

तो काही सामान्य मोती नव्हता. अद्भुत असं सामर्थ्य होतं त्या मोतीत ! हा मोती तोंडात ठेवला म्हणजे कोणत्याही पशू,पक्षी , एवढेच नव्हे तर अगदी

कीटकांची सुद्धा भाषा कळू लागे. त्यांच्याशी संभाषण करता येई. आणखी एक वैशिष्टय होतं त्या मोत्याचं. नागाने ज्याला हा मोती दिला तोच फक्त त्याचा उपयोग करू शके. दुसऱ्याला त्याचा उपयोग करता येणार नव्हता. दा त्रांग शिवाय इतरांना त्या मोतीचा उपयोग नव्हता.

नेहमी प्रमाणे तो सकाळी शिकारीसाठी निघाला. सावज शोधत असताना एका झाडाच्या अगदी वरच्या फांदीवर बसलेला कावळा त्याला दिसला. दा त्रांगने तोंडात मोती ठेऊन त्याला विचारलं, 'कावळे दादा, जवळपास एखादं जनावर आहे का हो ?'

कावळ्याने काही दूर अंतरावर चरत असलेल्या एका हरणाचा ठाव-ठिकाणा सांगितला. दा त्रांगने त्या हरणाची शिकार केली अन् काही भाग त्या कावळ्याला दिला. आता तो दररोज त्या कावळ्याच्या मदतीने शिकार करू लागला.

एके दिवशी कावळ्यासाठी ठेवलेला मांसाचा तुकडा कोल्ह्याने पळवला. कावळ्याला वाटलं की दा त्रांगने आपल्याला फसवलं. त्यानं दा त्रांगला अद्दल घडविण्याचा निश्चय केला. दा त्रांगला या गोष्टीची कसलीच कल्पना नव्हती.

नेहमीप्रमाणे जेव्हा दा त्रांगने कावळ्याला सावजाबद्दल विचारलं तेव्हा तो म्हणाला, 'पलीकडच्या झुडुपात एक गलेलठ्ठ हरीण आहे. पण फारच सावध दिसतोय तो. तू येथे पोहचेपर्यंत तो तिथून नक्कीच गायब होऊन जाईल. तू इथूनच वेध घेऊन बाण सोड.'

दा त्रांगने झाडीतून येणाऱ्या आवाजावरून वेध घेतला अन् बाण सोडला. त्या झाडीत दुसरा एक शिकारी लपून बसला होता. दा त्रांगचा बाण त्याच्या वर्मी लागला. बाण लागताच तो ठार झाला. दा त्रांगला अतिशय दुःख झालं. कावळ्याने आपल्याला का फसवलं हे मात्र त्याला कळू शकलं नाही.

या घटनेची खबर लागताच राजाच्या सैनिकांनी दा त्रांगला पकडलं. राजाज्ञेनं त्याला तुरुंगात डांबण्यात आलं. कावळ्याच्या दुष्टपणामुळे दा त्रांगच्या नशिबी तुरुंगवास आला. तुरुंगात एकटेपणाचा त्याला फारच त्रास होई. पण गप्प बसण्यावाचून गत्यंतर नव्हतं. एके दिवशी त्याला आपल्या मोत्याची आठवण झाली. आणि अचानक त्याला आपला एकटेपणा घालविण्याच्या

उपाय सुचला. मोत्याच्या मदतीने तुरुंगातील कीटकांशी, तुरुंगाजवळ वावरणाऱ्या पक्षांशी आणि उंदराशी तो गप्पा मारू लागला. या गप्पांमधून त्याला नव्या नव्या गोष्टी कळू लागल्या. त्याला असंख्य मित्र लाभले. तुरुंगातील जीवन त्याला काहीसे सुसह्य वाटू लागले.

एके दिवशी मुंग्यांच्या फौजेत उडालेली धांदल पाहून त्याने चौकशी केली. मुंग्यांनी त्याला सांगितलं की,लवकरच जवळच्या नदीला मोठा पूर येणार आहे. दा त्रांगने ही गोष्ट तुरुंगाधिकाऱ्याच्या कानावर घातली. त्याने राजाला ही सूचना दिली. पण राजाने त्याकडे कानाडोळा केला. दोनच दिवस लोटले अन् अचानक नदीला प्रचंड पूर आला. या पुरामुळे बरचसं नुकसान झालं.

राजाला तुरुंगाधिकाऱ्याने दिलेली पूर्वसूचना आठवली. लगेच अधिकाऱ्याला बोलावण्यात आलं. अधिकाऱ्याने दा त्रांग बद्दल सांगितले. दा त्रांगला राजापुढं आणण्यात आलं. दा त्रांगने सगळं काही प्रांजळपणे राजाला सांगितलं. दा त्रांगची सुटका करून त्याला दरबारात नोकरी देण्यात आली. तो नेहमी राजाजवळ राही. दा त्रांग मोत्याच्या मदतीने वेगवेगळ्या प्राण्यांचे बोलणे ऐकून राजाला सांगत असे. यामुळे राजाचं मनोरंजन होई. प्राण्यांकडून मिळालेल्या काही महत्त्वाच्या माहितीमुळे तर राज्याचा फार मोठा फायदा झाला.

दा त्रांग बद्दल राजाला आपुलकी वाटू लागली. राजाच्या कृपेने त्याला सुखाचे दिवस लाभले. आनंदाने तो कालक्रमणा करू लागला.

एके सायंकाळी दा त्रांगला राजाने आपल्याबरोबर नौका-विहारासाठी नेले. आकाशातून उडणाऱ्या पक्षांच्या थव्यांना पाहून राजाने या पक्षांचे संभाषण ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली. दा त्रांगने तोंडात मोती ठेऊन त्यांचं बोलणं राजाला सांगितलं. काही वेळाने सूर्याच्या सोनेरी किरणांत चमचमणारे मासे पाहिले. पाण्यावर उसळी घेणारे हे मासे फारच सुंदर दिसत होते. हे मासे काय बोलत असावेत, हे जाणण्याची इच्छा राजाने व्यक्त केली. दा त्रांग आणि मासे यांचा संवाद सुरू झाला. बराच वेळ ते बोलत होते. त्यांचं बोलणं झाल्यावर सारं काही राजाला सांगण्यासाठी दा त्रांगने तोंड उघडले अन् दुर्दैवाने त्याच्या

तोंडातला मोती पाण्यात पडला. क्षणभरातच तो मोती दिसेनासा झाला. दा त्रांगला अतीव दुःख झालं. तो रडू लागला.

राजाने त्याचं सांत्वन केलं. पाणबुडे बोलावले गेले. राजाने त्यांना तो मोती शोधून काढण्याची आज्ञा दिली. अनेक पाणबुडे कामाला लागले. त्यांनी पाण्यात तळापर्यंत सूर मारून सर्वत्र मोत्याचा शोध घेतला. पण एवढासा मोती शोधणं म्हणजे गवताच्या गंजीत सुई शोधण्यासारखं होतं. अनेक दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर शोध थांबविण्यात आला. दा त्रांग नेहमी शोकमग्न राहू लागला. त्याचं सर्वस्व हरवलं होतं. त्याने मात्र मोत्याचा शोध चालूच ठेवला. अनेकांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. पण तो कुणाचेच ऐकेना. रात्रंदिवस तो मोती शोधू लागला. त्याला खाण्यापिण्याचीही शुद्ध राहत नसे. अतिश्रमाने एके दिवशी त्याचा मृत्यू झाला. नदीच्या काठीच त्याचं दफन करण्यात आलं.

व्हिएतनामी लोकांत असं म्हटलं जातं की दा त्रांगचा आत्मा खेकड्यात प्रवेशला आणि त्यामुळेच खेकडे रात्रंदिवस सारखी वाळू उकरीत असतात.

खेकड्याच्या रुपाने दा त्रांगच वाळू उकरून मोती शोधीत असतो. खेकड्यांनी उकरलेले खड्डे पाण्याच्या प्रवाहाने बुजून जातात; पण खेकडे आपला प्रयत्न सोडत नाहीत.

# २.५

# जगामध्ये प्रकाश कसा आणला गेला?

(एस्किमो लोककथा)

सुरुवातीच्या काळात सगळीकडे फक्त रात्रच असायची, तेव्हा गडद अंधार असायचा. शेकोटी आणि सीलमाशांच्या तेलावर जळणारे दिवे यांच्या उजेडाशिवाय दुसरा कुठलाच उजेड नसायचा. शिकाऱ्यांना अंधारात शिकार करावी लागत असे आणि सांबरांना अंधारात अडखळत अन्नाच्या शोधासाठी फिरावे लागत असे.

एके दिवशी एका तरुण माणसाने प्रकाशाच्या शोधासाठी जगभर फिरावयाचे ठरवले. जेव्हा वसंत ऋतू आला, तेव्हा त्याने भक्कम आणि वेगवान अशी कायाक नाव तयार केली. वाळलेल्या माशांनी नाव भरून घेतली आणि बरोबर सीलमाशांची मूत्राशये ताज्या पाण्याने भरून घेतली. जेव्हा हे सगळे काम पूर्ण झाले, तेव्हा त्याने त्याची नाव समुद्रात लोटली आणि प्रकाशाच्या शोधासाठी त्याच्या गावापासून लांब जाण्यासाठी वल्हवायला सुरुवात केली. त्याची आई खूप रडली कारण तिला माहीत होते की, ती त्याला परत पाहू शकणार नाही. पण गावातील लोकांनी मात्र तो क्षितिजावर दिसेनासा होईपर्यंत त्याला हात हलवून प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या, कारण ते अशी आशा बाळगून होते की, तो प्रकाश शोधून काढेल आणि जगात प्रकाश घेऊन येईल.

त्या माणसाने खूप दिवस नाव वल्हवली. जेव्हा भूक लागत असे तेव्हा तो खाण्यासाठी थांबत असे, जेव्हा तहान लागत असे तेव्हा मूत्राशयाच्या पिशवीतले पाणी पीत असे आणि जेव्हा दमत असे तेव्हा तो झोपत असे. त्या

काळी दिवस आणि रात्र अशा दोन विरुद्ध गोष्टी नसल्यामुळे लोक जेव्हा खूप दमत, तेव्हा झोपत.

जेव्हा एक व्हेल मासा त्याच्याजवळ आला, तेव्हा त्या माणसाने विचारले की त्याला प्रकाश कुठे शोधता येईल हे माहीत आहे का ? पण समुद्रातल्या कुठल्याच प्राण्याला प्रकाशाची माहिती नव्हती.

पाण्यावर खूप काळ घालवल्यानंतर तो माणूस एका बेटावर पोहचला. त्याने त्याची बोट जमिनीवर ओढून घेतली. थोडे वाळवलेले मासे आणि व्हेलमाशाची चरबी खाल्ली. नंतर तो झोपून गेला. सकाळी जागा झाला तेव्हा त्याने एक खूप चमत्कारिक प्रकार पाहिला. एक तेजस्वी गोल चेंडू समुद्राच्या काठावरून वर येत असलेला त्याला दिसला. गोल चेंडू वर आला तेव्हा आजूबाजूचे आकाश प्रकाशमय झाले. त्या माणसाला त्या चेंडूच्या झगझगीतपणामुळे उबदार वाटू लागले.

तो गोल चेंडू कुठून आला असेल, म्हणून आश्चर्यचकित होत त्याने तासन् तास त्याच्यावर लक्ष ठेवले. शेवटी तो जिथून आला त्या जागेवर परत खाली जाऊ लागला. पाण्यात जेव्हा तो पूर्ण बुडाला तेव्हा अंधार झाला.

त्या माणसाने त्या बेटावर थांबण्याचे ठरविले आणि तो गोल चेंडू परत दिसेपर्यंत तो तिथेच वाट बघत बसला. त्यानंतर त्या माणसाने सूर्य सापडेपर्यंत त्या दिशेने नाव वल्हवत राहायचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी जेव्हा तो चमकदार चेंडू परत वर आला तेव्हा त्या माणसाने लगेच त्याची नाव त्या दिशेने समुद्रात लोटली आणि त्याला शक्य होईल तेवढ्या वेगाने वल्हवायला सुरुवात केली. शेवटी तो प्रकाश जिथून येत होता, तिथे त्या जमिनीवर पोचला. तो चेंडू आधीच खाली निघून गेला होता आणि परत अंधार झाला होता. सूर्याचा माग काढीत सूर्याला शोधायला तो पायी निघाला. काही अंतरावर त्याने एक मोठे घर पाहिले. चमकणारा प्रकाश त्यातून बाहेर पडत होता.

शांतपणे त्या लहान उघड्या जागेकडे तो माणूस रांगत गेला आणि खोलीत

पाहू लागला. त्याला एक माणूस घाण जमिनीवर झोपलेला दिसला. त्याच्या मागे तो मोठा तेजस्वी चेंडू होता. तो चेंडू इतका तेजस्वी होता की त्याच्या डोळ्यांना त्रास होऊ लागला. म्हणून तो त्याच्याकडे पाहू शकत नव्हता.

त्या माणसाने बाहेरच्या अंधाराकडे पाहिले आणि विचार केला की, हा माणूस त्या चेंडूला कधीकधी बाहेर जाऊ देत असावा. जेव्हा तो जाऊ देतो तेव्हा दिवस असतो; जेव्हा तो परत आत घेतो, तेव्हा ती रात्र असते.

त्या शूर माणसाने खूप वेळ लक्ष देऊन पाहिले. जेव्हा त्याची खात्री झाली की चेंडूला सांभाळणारा माणूस गाढ झोपला आहे तेव्हा त्याने खिडकीतून परत आत पाहिले. नंतर गुपचूप लपत लपत त्या तेजस्वी चेंडूकडे गेला. शेवटी ज्याला दिवस म्हणतात, त्या गोष्टीला पकडण्याइतका जवळ जाण्यात तो यशस्वी झाला. हे काम करुन तो सुरक्षितपणे जेव्हा बाहेर आला, तेव्हा सूर्याला घेऊन त्याने बोटीच्या दिशेने पळायला सुरुवात केली. बोटीवर पोचण्याच्या थोडे आधी त्याने मागून जोरात किंचाळण्याचा रागीट आवाज ऐकला, 'थांब ! माझा प्रकाश मला परत दे. सूर्य मला परत दे ! '

तो माणूस मोठ्या वेगात पळत होता. त्याने तो चेंडू बोटीत टाकला आणि नंतर स्वतः पण बोटीत उडी मारून बसला. त्या दुसऱ्या माणसाकडे बोट नव्हती. म्हणून दिवसाला घेऊन त्या माणसाने स्वतःची सुटका करून घेतली.

शेवटी तो माणूस जेव्हा त्याच्या खेड्यात पोचला, तेव्हा त्याने जगात दिवसाला मोकळे सोडून दिले. तेव्हापासून तेथे नेहमी रात्र आणि दिवस असतो. त्यामुळे एस्किमोंना केव्हा झोपायचे आणि केव्हा शिकारीला जायचे, ते कळू लागले.

(उषा प्रभुणे, अरुण प्रभुणे [मूळ लेखक : जॉन इस्मेल्सर]
: उत्तर ध्रुवाजवळील अलास्कन लोककथा)

# २.६ या जगात वस्ती कशी वाढली?

(भिल्ली लोककथा)

आदिवासी भिल्ल समाजाची एक स्त्री खूप दयाळू होती. ती रोज नदीवर भगर धुवायला जात असे. ती त्यातील अर्धाशेर किंवा शेरभर भगर नदीतल्या माशांना खायला देत असे. ती नदीवर आली की ते मासे तिच्याजवळ येऊन खेळत. ती त्यांचे मुके घेत असे आणि त्यांना म्हणत असे, “तुम्ही किती सुंदर दिसता. पण एके दिवशी कोणीतरी तुम्हाला खाईल, ही किती दुःखाची गोष्ट आहे?"

एके दिवशी त्यांच्यातला एक मोठा मासा तिच्याजवळ आला आणि तिला म्हणाला, 'तू माझ्या मुलांना अन्न देऊन वाचविले आहेस म्हणून तुला एक खास गुपित सांगतो. थोड्याच दिवसात मोठा जलप्रलय होणार आहे आणि त्याच्यात हे सर्व जग बुडणार आहे. म्हणून तू तुझ्या नवऱ्याला पाणी शिरणार नाही अशी एक पेटी बनवायला सांग. तिच्यात पाच वर्षे पुरतील इतक्या जीवनावश्यक वस्तू भर; तू तुझ्या नवऱ्याबरोबर तिच्यात बस आणि पेटी लावून घ्या. तुम्ही वाचाल."

मग त्यांनी तशी पेटी बनविली. ती स्त्री आणि तिचा नवरा त्या पेटीत बसले. त्या पेटीत त्यांनी पाच वर्षे पुरतील इतक्या जीवनावश्यक वस्तू भरल्या. एके दिवशी मोठा जलप्रलय झाला आणि पृथ्वीवरचे सर्व काही बुडाले. पण ती पेटी पाण्यावर तरंगू लागली. तिच्यात तो भिल्ल आणि त्याची पत्नी जिवंत होते. ज्यावेळी जलप्रलय थांबला त्यावेळी ती पेटी एका खडकावर अडकली.

सर्व देव जलप्रलयाची करामत पाहण्यासाठी पृथ्वीवर आले. त्यांना ती पेटी दिसली. प्रथम त्यांना तो एक दगड आहे असे वाटले, पण नीट पाहिल्यावर ती एक पेटी आहे असे त्यांना आढळले. त्यांनी ती पेटी उघडली. तिच्यात त्यांना दोन माणसे आढळली. त्यांना त्यांची दया आली आणि त्यांनी त्यांना जमीन

दाखविली. देव त्यांना म्हणाले, “ज्यावेळी तुम्ही या जमिनीवर राहायला जाल त्यावेळी ती जमीन विस्तारत जाईल. मग तुम्ही या जमिनीवर सुखाने राहा." असे सांगून देव स्वर्गात परतले.

ती स्त्री आणि तो भिल्ल पुरुष जमिनीवर आले त्यावेळी पाणी सरकत गेले आणि जमीन विस्तारत गेली. त्यांनी त्या जमिनीत धान्य पेरले आणि पीक घेतले. त्यांना पुष्कळ मुले झाली आणि त्यानंतर या जगाची वस्ती वाढली.

(चामुलाल राठवा : देहवाली साहित्य)

# २.७ सूर्य आणि चंद्र यांची उत्पत्ती

(निकोबार लोककथा)

खूप खूप वर्षांपूर्वी जग जेव्हा नवीन होते आणि आभाळ, पृथ्वी खूप खाली लोंबकळत होते, तेव्हा आज आपण जसे पाहतो तसे सूर्य, चंद्र अथवा स्वर्गीय दिव्य वस्तू तिथे नव्हत्या, याचा परिणाम म्हणजे पृथ्वी एक फसफसणाऱ्या ज्वालेच्या चेंडुसारखी वस्तू होती आणि तिचे तापमान प्रचंड होते. अति तीव्रतेच्या उष्णतेमुळे तिचे निरनिराळे भाग एकमेकाला चिकटून राहिले होते.

एके दिवशी पृथ्वीवर राहणारी जाणती माणसे एकत्र आली आणि पुढे काय करायचे याचा त्यांनी विचारविनिमय केला. खूपशा चर्चेनंतर त्यांनी काही जणांना लांबसर धनुष्य बनविण्यास आणि पोफळीच्या पानांचे दांडे तसेच नारळीच्या पानांचे पेड यांच्यापासून बाण तयार करण्यास सांगितले.

आभाळ खूप पाठीमागे सरकेपर्यंत त्यांनी त्याच्यावर बाणांचा वर्षाव केला. त्यांनी मारलेले काही बाण मागे परत आले नाहीत, तर काही तिथे अडकून राहिले. नारळीच्या पानांच्या पेडापासून बनवलेल्या बाणांच्या ज्वाला होऊन स्फोट झाला आणि त्यातून सूर्य निर्माण झाला. हा असा सूर्य आहे की, ज्याला मानवी चेहरा होता आणि त्याच्या आठ बाहूंमधून त्याची मुले दिसत होती. पोफळीच्या पानांच्या दांड्यांपासून बनवलेल्या बाणांचा ज्वालांमध्ये स्फोट झाला नाही; मात्र त्यामधून चंद्र तयार झाला.

(अशोक बेंडखळे [मूळ लेखक : रॉबीन रॉय चौधरी]
: निकोबारच्या लोककथा)

# २.८ सप्तर्षिमंडळ

(शिवरात्री महात्म्यातील कथा)

पुण्यवान् आणि साधू पुरुषांचे आत्मे मृत्यूनंतर स्वर्गात जातात; त्यांच्या पुण्याच्या प्रमाणानें कमी अधिक तेज मिळते. तेच आत्मे तारे होत, अशी सर्वसाधारण समजूत आहे. सप्तर्षिमंडलातील सात तेजःपुंज तारे म्हणजे काश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि आणि वसिष्ठ हे सात ऋषि आहेत, असे मानण्यांत येते, ते ह्याच समजुतीचे द्योतक होय. हे सात ऋषि आपल्या पुण्यबलाने देवांप्रमाणे पूज्यत्वास प्राप्त झाले होते. ह्या सप्तर्षिमंडळासंबंधाने शिवरात्री महात्म्यात असलेली कथा.

एकदा शिवरात्रीच्या दिवशी एका पारध्यास त्याच्या कर्जाच्या बाबतीत पकडण्यात येऊन तुरुंगात टाकण्यात आले. तो तुरुंगात असता दैववशात कांही भक्त शिवनामाचा जप करीत होते ते त्याच्या कानी पडले. त्याचा अर्थ त्याला कळला नाही, तरी तोही 'शिव' 'शिव' असे म्हणत राहिला, व संध्याकाळी तुरुंगातून सुटल्यानंतरही त्याने तोच जप पुढे चालू ठेविला. त्या दिवशी त्याला अन्न न मिळाल्यामुळे आपोआपच उपोषण घडले होते. पुढे आपणांस व आपल्या कुटुंबांतील माणसांस अन्न मिळविण्याकरितां, हरणाची शिकार करण्यासाठी तो एका बेलाच्या झाडास टेकून उभा राहिला. धनुष्याच्या दोरीस बाण लावीत असतां त्याने त्या झाडाची काही पाने तोडली व ती खाली फेकून दिली. कर्मधर्मसंयोगाने तेथे खाली शिवाचे लिंग होते, त्यावर पडली. त्यामुळे त्यास शिवरात्रीच्या दिवशी शिवाचे बिल्वपत्रांनी पूजन केल्याचे पुण्य लाभले. हे सर्व चालले असता तो तोंडाने शिवनामाचा उच्चार करीतच होता. ह्याचा परिणाम असा झाला की, त्याची मागील सर्व पापे नष्ट झाली, व त्यास आणि त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांस स्वर्गात स्थान मिळाले. तो पारधी व त्याच्या कुटुंबांतील ती माणसे म्हणजेच आकाशांतील सप्तर्षिमंडळ होय. अशी एक

समजूत आहे. ह्याचप्रमाणे, उत्तानपाद राजाचा पुत्र ध्रुव यास ईश्वराच्या निश्चलभक्तीमुळे आकाशांत अढळ पद मिळाले, तोच ध्रुव तारा होय.

सप्तर्षिमंडळास काही लोक खाटले बागले म्हणतात. त्यातील चार ऋषि म्हणजे वाटेवर एक पुरुष निजला आहे, आणि बाकीचे तीन चोर आहेत, असे समजतात.

(गोविंद मंगेश कालेलकर : लौकिक दंतकथा, १९३४)



# २.९ चंद्रावरील डाग

ब्रह्मदेवाचा पुत्र दक्ष प्रजापती यास सत्तावीस कन्या होत्या. दक्ष प्रजापतीने या सत्तावीस कन्यांचे लग्न चंद्राशी लावले. या सर्व कन्यांमध्ये रोहिणी रूपसंपन्न होती. त्यामुळे चंद्राचे रोहिणीवर सर्वात जास्त प्रेम होते. ही गोष्ट सव्वीस बहिणींच्या लक्षात येताच त्यांनी दक्ष प्रजापतीकडे तक्रार केली. चंद्र आपल्या सर्व मुलींवर सारखे प्रेम करत नाही हे ऐकताच दक्ष प्रजापतीस खूप राग आला. या रागातच दक्ष प्रजापतीने चंद्रास शाप दिला. 'तू नेहमी क्षयाने झुरत राहशील आणि तुझ्या मुखावर डाग पडेल.' त्यामुळे चंद्राच्या कला क्षीण होत जातात अशी लोकसमजूत आहे.

(गोविंद मंगेश कालेलकर : लौकिक दंतकथा)



# २.१० आकाशगंगा

(ऑस्ट्रेलियन लोककथा)

फार फार वर्षापूर्वी एका आदिवासी जमातीत एक तरुण गायक व नर्तक होता. या गायकाला अलौकिक अशा मधूर स्वराची दैवी देणगी लाभली होती. तो गाऊ लागला की, जमातीचे सगळे लोक नाचू लागायचे ! नाचता नाचता स्वयंस्फूर्तीने त्याच्याबरोबर गाऊ लागायचे. या गाण्याच्या जादुई दुनियेचा स्वर आकाशापर्यंत पोहोचत होता. त्यामुळे आकाशातील तारेही आपापली नेहमीची जागा सोडून गाणे ऐकायला आकाशात इकडे-तिकडे हिंडू लागत. अशी ही अपूर्व अजब स्वरमोहिनी साऱ्या आसमंताला संमोहित करणारी होती.

हा तरुण गाण्यात जसा तरबेज होता तसाच तो नेमबाजीतही निपूण होता. एके दिवशी तो भल्या पहाटे उठला आणि रानात शिकारीला गेला. झाडांवर उडते कोल्हे लोंबत होते. या कोल्ह्यांचा नायक चांगला धष्ट-पुष्ट होता. या धष्ट-पुष्ट अशा मोठ्या नायक कोल्ह्याला तरुण शिकाऱ्याने बाण मारला. बाण कोल्ह्याच्या शरीरातून झाडाच्या खोडात रुतला. कोल्हा मोठ्याने विव्हळू लागला. त्याच्या विव्हळण्यामुळे झाडच्या झाडच जणू जागे झाले. आणि शेकडो उडते कोल्हे आरडा ओरडा करीत झाडातून बाहेर पडले आपल्या नायकाचे काय झाले ? ते जवळ जाऊन पाहू लागले. आपल्या नायकाची ती मृतवत अवस्था बघून कोल्हे चिडले. सर्व कोल्ह्यांनी शिकाऱ्याला घेराव घातला. सगळ्यांनी मिळून शिकाऱ्याला उचलले आणि उडून गेले. गायक शिकाऱ्यासह सर्व कोल्हे उंच, उंच आकाशापर्यंत गेले. अशारितीने तो तरुण गायक जमिनीवरून थेट स्वर्गात गेला. त्यामुळे गायक दिवसभर गावात दिसलाच नाही. सारे गाव बेचैन झाले. रोजच्या वेळेप्रमाणे सारे गाव रात्री नृत्य-गाण्यासाठी एकत्रित जमले. पण कुणालाच त्या नेहमीच्या ठराविक पद्धतीचं गाणं म्हणता येईना ! नाचाचा तालही धरता येईना. काय करावे ? अशा विचारात बिचारे

सगळेच खिन्न होऊन उभे होते. इतक्यात नवल घडले ! अती दूर वरून आकाशातून त्यांना गाणे ऐकू येऊ लागले. गाणे तेच ! म्हणणाराही निश्चितच तोच, त्याचे वाद्यही अगदी तेच ! खात्रीने आपलाच तरुण गायक कुठे तरी दूर गात आहे, असे सगळ्यांनाच वाटू लागले. हळू हळू आकाशातून येणारा आवाज मोठा मोठा होत होता. आसमंतात चैतन्य पसरले. सगळेच गाण्याच्या साथीबरोबर नाचू लागले. मध्यरात्रीपर्यंत नृत्य केल्यावर सगळेच थकले. बसता बसता सगळ्यांची नजर वर आकाशाकडे जाताच काय आश्चर्य ? हजारो लहान-मोठे तारे गाणे ऐकायला रांगेत उभे होते. एखादा मोठा आखीव दुधासारखा शुभ्र पण तेजस्वी रस्ताच असावा असे वाटत होते.

पाहता पाहता लोकांना समजले, की आपला गायक स्वर्गवासी झाला आहे ! तो आता परत येणार नाही ! लोकांना फार वाईट वाटले. आपलं चैतन्य हरवल्यासारखे वाटले !

परंतु ताऱ्यांची ती भली मोठी पंगत, पांढरी रांग रोजच आकाशात उजळू लागली. हे पाहता पाहता लोकांना गायकाची ही स्मृती समाधान देत राहिली. तोच हा दूधरस्ता-आकाशगंगा होय !



# २.११ विद्युत

मथुरेचा दुष्ट राजा कंस ह्यास एकदा आकाशवाणीने असे कळविले की, तुझ्या भगिनीच्या पोटी जो पुत्र जन्मास येईल त्याच्या हातून तुझा वध होईल. तेव्हा कंसाने आपली बहीण देवकी व तिचा पती वसुदेव यांस शृंखलांनी बद्ध करून कारागृहात टाकिले, व त्यांच्यावर कडक पहारा ठेविला. तेथे जेव्हा जेव्हा देवकीस अपत्य होई, तेव्हा तेव्हा तत्क्षणीच त्यास नेऊन तो मारून टाकीत असे. ह्याप्रमाणे त्याने तिच्या सहा मुलांस मारून टाकिले. सातव्या खेपेस देवकीस कृष्ण नावाचा पुत्र झाला, त्याच वेळी मथुरेत नंदास मुलगी झाली. कंसाचा कडक पहारा असतांनाही वसुदेवाने गुप्तपणे ह्या मुलांची अदलाबदल केली. आपली बहीण प्रसूत झाली आहे ही बातमी जेव्हा कंसास समजली, तेव्हा त्याने त्या मुलीस धरून तिला आता शिलेवर आपटणार, तोच ती त्याच्या हातांतून निसटून आकाशात उडून गेली, व अजूनपर्यंत ती तेथेच राहत आहे. ही देवकीकन्या म्हणजेच विद्युत होय, अशी सर्व भाविक लोकांची समजूत आहे.

(गोविंद मंगेश कालेलकर : लौकिक दंतकथा)

# २.१२ दगडचोथ

एकदा गणेश चतुर्थीच्या दिवशी सर्व देव आपापल्या वाहनांतून फिरावयास निघाले. ते फिरत असता गणपती आपल्या मूषक वाहनावरून खाली पडला. ते पाहून चंद्रास हसू आले, गणपतीस ते सहन न होऊन त्याने चंद्रास असा शाप दिला की, आजच्या दिवशी (गणेश चतुर्थीस) तुझे मुखावलोकन कोणीही करणार नाही. ह्या दिवशी कोणास जर चुकूनही चंद्रदर्शन झाले, तर त्याच्यावर चोरीचा अथवा दुसऱ्या कशाचा तरी आळ येतो, अशी समजूत आहे. तथापि, तो दूर करण्याचा एक उपाय आहे. तो कोणता म्हणाल, तर शेजाऱ्यांच्या घरावर दगड फेकण्याचा. ह्या कृत्याबद्दल शेजाऱ्यांनी शिव्या दिल्या म्हणजे चंद्रदर्शनाने घडलेल्या पापापासून शुद्धी होते. म्हणून काही ठिकाणी ह्या दिवसास 'दगड चोथ' असे म्हणण्याचा प्रघात पडला आहे.

(गोविंद मंगेश कालेलकर : लौकिक दंतकथा)

# २.१३ झाडे चालायची का थांबली ?

(लोककथा, निकोबार)

खूप खूप वर्षांपूर्वी जेव्हा आपले जग अगदी बाल्यावस्थेत होते, तेव्हा झाडे एका ठिकाणाहून दुसरीकडे जाऊ शकत आणि जमिनीखालच्या मूळांना वेगवेगळ्या जागी पाठवू शकत. त्याकाळी माणसे आणि झाडे एकमेकांची उपकारकर्ती होती. प्रवास करताना माणसे क्वचित थकून जात. कारण झाडे ते नेत असलेले सामान आपल्या फांद्यावर ठेवायला देत. झाडांना माणसाजवळील वजन वाहून नेणे आनंदाचे वाटे आणि माणसे त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे पाहिजे तिथे हाकून नेत. जेव्हा माणसांना जंगलामधील आपल्या बागांमधून वस्तू आणाव्याशा वाटत, ते एवढेच करीत की त्या वस्तू तोल सांभाळून झाडांच्या फांद्यांवर ठेवित आणि झाडे त्या त्यांच्या गावापर्यंत घेऊन येत. शिवाय त्या दिवसात ज्या माणसांना चालण्याचा त्रास असे ती झाडांच्या फांद्यांवर बसत आणि सुरक्षितपणे आपल्या घरी आणली जात किंवा जिथे त्यांना जायचे असेल तिथे त्यांना नेले जाई. किती विलक्षण प्रवास होता तो !

एकदा खूप माणसे जंगलात गेली. गावाकडे परत येतांना त्या प्रत्येकाकडे खूप काही सामान जमले. त्यांनी ते सगळे झाडांच्या फांद्यांवर ठेवले आणि त्यांच्यासह ते निघाले. परंतु त्या फांद्यांवर ठेवलेल्या भरपूर वजनामुळे ती झाडे डळमळू लागली, रस्त्यात अडखळू लागली. त्याबरोबर जी माणसे पाठीमागून येत होती ती झाडे एकमेकांवर पडल्यामुळे आणि एकमेकांवर आपटल्यामुळे जे एक विनोदी दृश्य निर्माण झाले त्याने फिदीफिदी हसली. त्यांनी कर्कश आवाजात टाळ्या पिटल्या. माणसांच्या या टवाळकीने झाडांना अतिशय त्रास झाला त्यांना आपली मानखंडना झाल्यासारखी वाटली आणि त्यांनी त्यापुढे चालायचे थांबवले.

आजकाल आपण जेव्हा प्रवास करतो, स्वतःच सामान उचलून आपण खूप त्रास करुन घेत असतो. कारण झाडे आता चालत नाहीत. त्यामुळे त्यांची मदत होत नाही. झाडे चालायची का थांबली त्याची ही गोष्ट होय.

# २.१४ सिंह गर्जना का करतात?

(बाटोन्का लोकांमधील कथा)

माणूस नावाचा प्राणी जगात जन्माला आला आणि त्यानंतर पुढच्या काळात, जिवंत प्राणी मारून त्यावर आपले पोट भरणारे प्राणी जन्मले. त्या सगळ्यांत सिंह हा भारी ठरला. सगळे प्राणी त्याला घाबरून राहू लागले. सुरुवातीला सिंहाचा आवाज इतर प्राण्यांसारखाच बेताचा होता, त्याला गर्जना करायला येतच नव्हत्या. त्यामुळे तो गुपचूप गवतखाऊ जनावरांवर झडप घालून त्यांना मारायचा आणि खाऊन टाकायचा. त्यासाठी फार खटाटोप करावा लागायचा नाही.

सिंह शिकार करायला बाहेर पडला आहे हे अजिबात कळायचं नाही. सगळी जनावरं सतत भीतीखाली वावरायची. एके दिवशी त्यांनी सगळ्या जनावरांची बैठक बोलावली. बैठकीत यावर विचार करायचा, सिंहाच्या भीतीखालून सुटका कशी होईल याचा उपाय शोधायचा, असं ठरलं.

बराच वेळ एकत्र बसून सगळे बोल बोलले, पण कुणालाच धड उपाय सुचला नाही. मात्र एक ससा फार हुशार डोक्याचा होता. त्याला काही बाही युक्त्या सुचायच्या. तो म्हणाला, ‘मला उपाय सुचलाय. सिंहाचा आवाज पावसाळी आभाळाच्या गडगडाटासारखा जोरदार होईल असं करायचं. सिंहानं तोंड उघडलं की चारी दिशांना लांबवर कळलं पाहिजे. 'आला रे आला काळ!’

सगळ्यांनी खुषीनं माना हलवल्या. फार छान उपाय आहे. पण हे व्हावं कसं? सिंहाचा आवाज मोठा करणार कोण ? ह्या प्रश्नावर सशानं एक डोळा मिचकावला आणि तो थेट आपल्या कामगिरीवर सुटला.

डेरेदार झाडाच्या सावलीला सिंह विसावा घेत पडलेला सशाला आढळला. त्याच्याजवळ अदबीनं जाऊन ससा बोलला, "महाराज, आपल्यासारख्या

थोरामोठ्यांना वाईट बातमी द्यायची म्हणजे अवघडच वाटतं. पण इलाज नाही, निरोप हा पोचवलाच पाहिजे. महाराज, आपला मोठा भाऊ फार आजारी आहे. 'असशील तसा निघ आणि मला येऊन भेट' असा त्यांचा आपणाला निरोप आहे."

निरोप ऐकताच सिंह भलताच बेचैन झाला. सशाला म्हणाला, "कुठं आहे माझा भाऊ ? वाट दाखवत तू पुढं हो. मी तुझ्या मागनं येतो. चल."

ससा टणाटण उड्या घेत पुढं, आणि सिंह त्याच्या मागं असे ते निघाले जंगलातल्या पायवाटेनं. सशानं सिंहाला चांगलं मैलोनमैल ताणलं. आधीच सिंहाची झोप अर्धवट झालेली. त्यात हा लांबचा पल्ला. सिंह दमला. पार भेंडाळला. धापा टाकत तो एका झाडाच्या सावलीत डोळे मिटून पेंगता पेंगता गाढ झोपून गेला.

मग सशानं मधाड्या पाखराची मदत घेतली. हे पाखरू झाडावर लागलेलं मधाचं पोळं शोधून काढण्यात फार तरबेज होतं. त्यानं सशासाठी भलं मोठं पोळं शोधून काढलं. सगळ्या माशा मध गोळा करायला जंगलात गेल्या होत्या. पोळं मोकळं लोंबत होतं. जंगलच्या रिवाजाप्रमाणे पोवळ्यातल्या कांद्याचा चांगल्या मधानं ओथंबलेला तुकडा मधाड्याला खायला देऊन सशानं बाकीच्या भागातला मध घेतला. तो आणून सावलीला गाढ झोपलेल्या सिंहाच्या पंजाना व तोंडाला चोपडला. आपण धूम पळाला आणि जवळच जाळीत जाऊन लपून राहिला.

इकडं मध घेऊन सगळ्या माशा पोवळ्याकडं परतल्या. बघतात तर पोळे कुणी तरी पार लुटून फस्त केलेलं. त्या सगळ्या भयंकर संतापल्या. दाही दिशांना लुटारूंची शोधाशोध सुरू झाली. आणि माशांना सिंहाचा पत्ता लागला. त्याच्या पंजांना, तोंडाला मध लागलेला बघून आग्या माशांचा घोळका घों घों करून सिंहावर कोसळला. आपल्या विषारी नांग्या मारून त्यांनी सिंहाच्या सगळ्या अंगाचा आगडोंब केला. सिंह वेदना असह्य होऊन ओरडायला लागला. ओरडता ओरडता त्याचा लहान आवाज मोठा होत होत आभाळाच्या

गडगडाटासारखा भयंकर झाला. ओरडण्याच्या, विव्हळण्याच्या जंगल दणाणून टाकणाऱ्या गर्जना झाल्या.

सिंहाचा आवाज कायमचा का बदलला त्याची ही अशी कथा आहे.

'सशाचे फार फार उपकार झाले' असं सगळी जनावरं सारखं म्हणत राहिली. त्यांना आता लांबून सिंहाचं ओरडणं ऐकू येऊ लागलं. सिंह दूर आहे तोवर जनावरं सावध होऊन आपला बचाव करू लागली.

(व्यंकटेश माडगूळकर [मूळ लेखक : निक ग्रीव्हज्]
: झाडावर चढणारा कोल्हा आणि आफ्रिकेतील इतर प्राणीकथा)



# २.१५ सिंह फळे का खात नाहीत?

(हम्बाकुशू टोळीमधील कथा)

मब्वावा नावाच्या कोल्ह्याला एके दिवशी 'था' झाडाचे चवदार फळ सापडले. सावलीत बसून कोल्हा फळ खाऊ लागला. तेवढ्यात सिंहाची गर्जना त्यानं ऐकली. कोल्हा मनात म्हणाला, 'हा भुकेलेलाच आहे. इकडून नाही आला आणि माझ्या तोंडचा घास नाही घेतला म्हणजे मिळवली.' अशा साशंक मनानं घाईघाईनं तो फळे खाऊ लागला. सिंहाची भूक भली मोठी. शिवाय तो जंगलचा राजा. कोणाही प्राण्याच्या पुढ्यातला घास हिसकावून घ्यायचा अधिकारच त्याला मिळालेला होता.

सिंह आला तो कोल्ह्याच्याच बाजूला जवळ येऊनही ठेपला.आपल्या पुढ्यातला 'था' झाडाच्या फळाचा घास सिंहानं हिसकावून घेऊ नये म्हणून धूर्त कोल्ह्यानं युक्ती लढवली. मब्वावा आधाशीपणानं भराभरा फळ खात राहिला. सिंह आपलं खाणं बघतो आहे हे त्याला माहीत होतं. मग एकाएकी मब्वावा खाली जमिनीवर कोसळला. कण्हला, कुंथला. त्याच्या सगळ्या अंगाचा आळपिळा झाला आणि तो शेवटी गप्पगार पडला. सिंह दुरून बघतच होता. त्याला वाटलं हे फळ विषारी असेल. बापडा कोल्हा मेला.

आणि जवळ जाऊन कोल्हयाच्या भानगडीत न पडता सिंह आपल्या वाटेनं गेला. दिसेनासा झाला. मग गेल्यासारखा पडलेला मब्वावा उठून बसला. कोणा मेलेल्या कोल्ह्याची हाडं आपल्याला कुठं दिसली होती हे त्यानं आठवलं. कुठेतरी जवळपासच पडलेली कोल्ह्याची ती हाडं त्यानं गोळा करून आणली आणि त्या झाडाखाली त्यानं मरून पडल्याचं सोंग वठवलं होतं त्या जागी टाकली. आपली सकाळी बनवाबनवी ठीक झाली ह्याचं समाधान झाल्यावर तो आपल्या बिळाकडं गेला.

काही दिवसानंतर सिंहानं त्या झाडाजवळून जाताना खाली पडलेल्या रसाळ फळांचा सडा पाहिला. तो झाडाखाली गेला आणि कोल्ह्याची हाडं बघताच जागीच थांबला. मेलेल्या मढ्यावर भूक भागविणाऱ्या कोणी प्राण्यांनी कोल्ह्याची हाडं चोहोकडं विखरून टाकली होती. कुणालाही बघताच कणव यावी असं ते दृश्य होतं.

सिंहाला मब्वावा कोल्ह्याची आठवण आली. ह्याच झाडाखाली, इथंच, विषारी फळ खाऊन कोसळताना आपण त्याला पाहिला होता. शप्पत ! मी जन्मात कधी फळाला तोंड नाही लावणार आता !

आणि खरचं त्या दिवसापासून सिंहानं 'था' झाडाच्या फळाला कधी तोंड नाही लावलं. 'था' झाडाच्या फळाला नाहीच नाही; पण इतर कोणत्याही फळालासुद्धा नाही. कोल्हे आणि त्याच्यासारखे इतर लहान प्राणी फार आनंदले. आता त्यांना सिंहाची भीती नव्हती. आनंदाने भरपूर फळे खायची. मजा करायची!

- व्यंकटेश माडगूळकर (मूळ : निक ग्रीन) : झाडावर चढणारा कोल्हा
आणि आफ्रिकेतील इतर प्राणिकथा

# २.१६ चित्याच्या गालावर ओघळणाऱ्या अश्रूंचे डाग कसे आले?

(झुलू लोकांमधील कथा)

कोणे एके काळी एक दुष्ट आणि आळशी शिकारी झाडाच्या सावलीला बसला असताना त्यानं एक हरणाचा कळप शांतपणे चरताना पाहिला. खालच्या भागातील झाडं तोडून मोकळ्या झालेल्या गवताळ रानात हा कळप होता. शिकारी मनाशी म्हणाला, 'ह्या असल्या उन्हाच्या सणक्यात दडत, रांगत, एवढ्या लांबवर जाऊन हरणाची शिकार करण्यात काही तथ्य नाही. फारच कष्ट पडतील.'

असं तो मनाशी म्हणतोय तोवर त्याला उजव्या बाजूला झाडीत हालचाल झालेली दिसली. नीट न्याहाळून बघताच ह्याच कळपाच्या मागावर जाणारी एक चित्त्याची मादी त्याला दिसली. दबतदबत ती कळपाच्या दिशेने जात होती. अगदी पद्धतशीर अशी तिची शिकार चालू होती. कळपाकडून वारा तिच्या दिशेला वहात होता. अगदी सावकाश अशी ती कळपावर जात होती. झुडपाची दडप घेत, इंचाइंचानं ती अंतर कापत होती. शिकारी चकीत दृष्टीनं पहात होता. कळपातलं एक हरीण अडाणीपणा करून एकटंच चरत चरत बाजूला घसरलं होतं. चित्तीण त्याच्यावर नजर ठेवून पुढं सरकत होती.

चित्तीणीने एकदम आपले पुढचे लांब पाय पोटाकडे दुमडले आणि धनुष्यातला तीर सणसणावा तशी झेप घेतली. बघून थक्क व्हावं अशा गतीनं हरणावर जाऊन तिनं त्याला पकडलं. हरणाला उडी घेऊन पळता आलंच नाही.

धापा टाकत चित्तीणीनं आपली शिकार ओढत ओढत गवताळ रानाच्या

कडेला झाडाच्या सावलीत आणली. शिकारी बघत होता. आत्ता दिसलेला तिचा वेग आणि कौशल्य ह्याचं तो आश्चर्य करत होता. तेवढ्यात त्याच्या लक्षात आलं की झाडाच्या सावलीत चित्तीणीची तीन पिल्लंही आहेत. आई शिकार करून कधी आणतेय ह्याची वाट बघताहेत. आळशी शिकाऱ्याला त्या पिल्लांचा फार दुस्वास वाटला. त्याच्या मनात आलं की, आपल्यात असं निष्णात शिकारी असणारं कोणी असतं तर केवढी बहार होती.

मग आळशी शिकाऱ्याच्या डोक्यात एक वाईट गोष्ट आली. चित्ता माणसाला कधी मारत नाही हे त्याला ठाऊक होतं. ह्या पिल्लांपैकी एक आपण उचलून नेऊ आणि त्याला पाळू. आपल्यासाठी शिकार करायला शिकवू.

पिल्लं पळवण्यासाठी संधीची वाट बघत तो तिथंच थांबला. दिवस मावळायच्या वेळेला चित्तीणीनं आपली पिल्लं झुडुपात दडवून ठेवली आणि स्वतः ती पाणी पिण्यासाठी झऱ्यावर गेली. शिकारी माणसानं आपला भाला सावरला आणि पळत पळत तो पिल्लं दडवलेल्या झुडपाशी गेला. त्याला तीन तीन पिल्लं दिसली. पळून जाण्याएवढी ती मोठी झाली नव्हती. ह्या तिन्हीतलं कोणतं पिल्लू न्यावं हे शिकाऱ्याला कळेना. त्यानं तिन्ही पिल्लं उचलली व म्हणाला, 'एकापेक्षा तीन अधिक बरी.'

पिल्लांची आई एका घंट्यानं परत आली. बघते तर बाळं नाहीत. तिच्या काळजानं ठाव सोडला. बापडी रडरड रडली. एक रात्र, एक दिवस रडली. डोळ्यातलं पाणी गालांवर गळून दोन्ही गालांवर डाग पडले. तिच्या रडण्याचा आवाज मोठा होता. तो ऐकून एक म्हातारा माणूस काय झालं हे बघायला आला.

हा आलेला माणूस फार शहाणा होता. जंगलातल्या प्राण्यांबद्दल त्याला उत्तम माहिती होती. शिवाय त्याला प्राण्यांबद्दल मोठा आदरही होता. काय झालं हे कळल्यावर त्याला फार राग आला. तो आळशी शिकारी चोर तर होताच, पण त्यानं टोळीची वहिवाटही धुडकावून लावण्याचा गुन्हा केला होता. शिकाऱ्यानं शिकार करताना फक्त आपलं कौशल्य बळ वापरलं पाहिजे. ह्यापेक्षा वेगळ्या पद्धतीनं शिकार करणं म्हणजे वहिवाटीचा अनादरच.

तो शहाणा माणूस खेड्याकडं आला. सगळ्या जाणत्या गावकऱ्यांना त्यानं

ही हकिगत सांगितली. गावकरी फार संतापले. त्यांनी आळशी शिकाऱ्याला धरला आणि आपल्या खेड्याबाहेर कायमचा हाकलून दिला.

मग त्या शहाण्या म्हाताऱ्यानं चित्तीणीची तिन्ही पिल्लं घेतली आणि आईला परत दिली. पण अतोनात रडण्यामुळे चित्तीणीचे गाल डागाळून गेले ते कायमचेच.

झुलू लोक सांगतात, वहिवाट सोडून इतर वाटांनी शिकार करणं योग्य नाही, हे कळावं म्हणून चित्त्याच्या दोन्ही गालांवर आजही अश्रूंच्या खुणा दिसतात.

(व्यंकटेश माडगूळकर [मूळ लेखक : निक ग्रीव्हज्]
: झाडावर चढणारा कोल्हा आणि आफ्रिकेतील इतर प्राणीकथा)



# २.१७
# चित्ता वेगवान पळणारा कसा झाला?

(बुशमन लोकांमधील कथा)

एकवार निर्मात्याच्या मनात आले की सगळ्या प्राण्यांत वेगाने पळणाऱ्या प्राण्याची निवड केली पाहिजे. मग त्याने त्सेसिबी आणि चित्ता ह्या दोघांची शर्यत लावली. त्सेसिबी जातीचं हरण अतिशय वेगवान पळणारं होतं. त्यावेळी चित्त्याचे पंजे मऊच होते. हे काही पळण्याच्या कामाचे नाहीत हे चित्त्याच्या ध्यानी आले. त्याने रानकुत्र्याचे पंजे उसने घेतले.

एका उंच गोरख चिंचेपासून शर्यत सुरू झाली. निर्माता स्वतःच शर्यतीचा प्रमुख होता. गोरख चिंचेपासून दूरवरच्या टेकडीपर्यंत सपाट रान होतं. निर्मात्याने 'जा' असा इशारा दिला आणि दोघा खेळाडूंनी दौड सुरू केली.

लवकरच त्सेसिबी हरण चित्त्याच्या पुढं गेलं. अर्ध रान संपलं तेव्हाही त्सेसिबीच पुढं होतं. तेच जिंकणार असं ठरलं आणि अचानक अपघात झाला. दगडाला अडखळून त्सेसिबी खाली कोसळला. त्याचा पाय मोडला. आता शर्यत चित्त्याच्या हातात होती. पण चांगल्या स्वभावाचा चित्ता पळाला नाही. पुढं तो थांबला. हरणाला मदत करायला पुढं झाला. पुढं पळून शर्यतीत पहिला नंबर मिळवण्याऐवजी ह्या घडीला त्सेसिबी हरणाला मदत करणं जास्ती महत्त्वाचं आहे असं त्याला वाटलं.

चित्त्याचं हे वागणं बघून सृष्टीचा निर्माता फारच खूष झाला. त्यानं चित्त्याला जमिनीवरचा सर्वात वेगवान प्राणी केलं. ह्या बक्षिसाबरोबर रानकुत्र्यांचे पंजे कायमचे ठेवून घेण्याची परवानगीही त्यानं चित्त्याला दिली.

(व्यंकटेश माडगूळकर [मूळ लेखक : निक ग्रीव्हज्]
: झाडावर चढणारा कोल्हा आणि आफ्रिकेतील इतर प्राणीकथा)

# २.१८ जिराफाची मान लांब का झाली?

(पूर्व आफ्रिकेतील एक कथा)

सृष्टीनिर्मात्याने इतर जनावरांना दिली होती तशीच मान आणि तसेच पाय जिराफालाही दिले होते.जिराफ हा दिसायला एलंड आणि कुडू जातीच्या काळविटांसारखाच होता.

सगळं नीट चाललेलं होतं. पण मधेच एका वर्षी भयाण दुष्काळ पडला. गवत, झाडपाला, वेली जनावरांनी केव्हाच ओरबाडून संपवल्या. कडवट चव आणि वाईट वास असलेल्या गवताचे पिवळे डुंबे आणि वाळक्या काटक्याकुटक्या ह्याखेरीज काहीही उरलं नाही.जनावरात मोठी चढाओढ सुरू झाली. चरणं आणि पाणी पिणं ह्यासाठी रोज अनेक मैलांची मजल त्यांना मारावी लागे. अशा कठीण काळात तगडी जनावरं तेवढी जगतात. दुबळी मरून जातात.

एके दिवशी जिराफ आपल्या मित्राला गेंड्याला भेटला. उष्ण वावटळी उठताहेत, आभाळाकडे मृगजळ चमचमतंय, अशा उजाड मैदानात हे दोघं भेटले. झऱ्याकडं जाणाऱ्या वाटेनं पायपीट चालली असताना त्यांची आपसात सध्याच्या वाईट काळाबद्दल बोलणी झाली.

"मित्रा", जिराफ बोलला. "कशी जत्रा भरली इथं बघ. सगळे खायला हुडकताहेत ते गवत. ह्यांच्या खुरांनी आता ते धुराळ्याखाली गाडले जाईल. आणि त्या तिकडं त्या उंच बाभळी बघ...”

"ओमफ" गेंडा बेंबलला. (चांगलं बोलणं हे गेंड्याला कधीच जमलं नाही. आजही जमत नाही.) जिराफ म्हणाला."बाभळीच्या शेंड्याला असलेली कोवळी कोवळी पानं खाता आली असती तर किती बरं होतं. बाभळीच्या शेंड्यावर रग्गड खायला आहे. पण काय उपयोग ? मला झाडावर चढायला येत नाही. तुलाही येतं असं दिसलं नाही कधी.”

गेंडा म्हणाला,"नाही रे, मला नाही येत." आपल्या अधू डोळ्यांनी तिरके बघत गेंड्यानं बाभळीचा हिरवा विस्तार न्याहाळत कबुली दिली. तो पुढे म्हणाला, "मला वाटतं आपण मांत्रिकाकडं जावं. तो शहाणा आणि ताकदीचा आहे." एवढं बोलून एक काटकी चघळत गेंडा विचार करू लागला.

जिराफ म्हणाला,"तुझी कल्पना चांगली आहे. कसं जायचं ? मित्रा, तुला वाटतं त्याची मदत मिळेल आपल्याला?"

दिवस मावळायला हे दोघे मित्र निघाले. वाटेवरच्या झऱ्यातलं गढूळ पाणी पिऊन त्यांनी तहान भागवली.

सबंध रात्र आणि दुसरा तिसरा प्रहरपर्यंतचा दिवस चालून जिराफानं आणि गेंड्यानं मांत्रिकाची वस्ती शोधून काढली. त्याच्यासमोर आपली अडचण मांडली.

मांत्रिक हसून बोलला, "फारच सोपं आहे. उद्या दुपारी इथं या. मी तुम्हा दोघांना मंतरलेला झाडपाला खायला देतो. तो खाल्ल्यावर तुमचे पाय, तुमच्या माना अशा लांबतील की तुम्हाला झाडांच्या शेंड्यावरचा कोवळा पाला सहज खाता येईल !" एवढं सांगून मांत्रिक झाडपाला मंतरण्याच्या खटाटोपाला लागला. गेंडा आणि जिराफ विलक्षण उल्हासित होऊन झऱ्याकडे धावले.

दुसऱ्या दिवशी फक्त जिराफच मांत्रिकाच्या झोपडीच्या दारात आला. दिलेल्या वेळेवर पोचला. कमी डोक्याचा बापडा गेंडा. त्याला इतर जनावरांच्या नजरेतून वाचलेला छान हिरव्या गवताचा डवंगा दिसला. दुपारी आपल्याला मांत्रिकाकडे जायचे आहे हे साफ विसरून गेंडा गवत खाण्यात रमला.

काही वेळ गेंड्याच्या येण्याची वाट पाहिल्यावर मांत्रिक कंटाळला. जिराफालाच सगळा झाडपाला देऊन तो आपल्या झोपडीत शिरला.

जिराफाने सगळा मंतरलेला झाडपाला खाल्ला. त्याच्या चारी पायात आणि मानेत काही विलक्षण झिणझिण्या जाणवू लागल्या. जिराफाने डोळे मिटले आणि पुन्हा उघडले तर त्याच्या पायाखालची जमीन दूरदूर चालली होती. असं का बरं वाटावं ? गंमतच आहे. जिराफाने घाबरून डोळे मिटले. घेरी

आल्यासारखे झाले. मग त्यानं डोळे उघडून पाहिलं.

वाहवा ! आजूबाजूचं जग बदललेलं दिसलं. जिराफ उंच उंच वाढला होता. केवढा तरी प्रदेश सहज दृष्टीच्या टप्प्यात येत होता. जिराफानं खाली आपल्या लांबलांब पायांकडं पाहिलं, आपल्या लांब मानेकडं पाहिलं. त्याला हसू आलं. आता बाभळीचे हिरवेगार शेंडे डोळ्यांसमोरच होते. अगदी दोन ढांगा टाकताच तोंडात येतील इतके जवळ. मांत्रिकाची जादू अद्भुतपणे कामाला आली होती.

इकडे गवत खाता खाता गेंड्याच्या एकदम लक्षात आलं, अरे, आपल्याला मांत्रिकाच्या झोपडीत जायचं होतं. दुडक्या चालीनं तो लगेच धावत सुटला आणि मांत्रिकाच्या झोपडीकडे आला.

पण आता फार वेळ झाला होता. लांब पायांचा, उंच मानेचा रुबाबदार जिराफ बाभळीच्या हिरव्यागार शेंड्यावर मस्त चरत होता. त्याच्याशी स्पर्धा करायला कोणतंही जनावर नव्हतं.

गेंड्याला मांत्रिकाने सांगितलं की, "बाबारे, आता मंतरलेला झाडपाला संपला. तुझ्यासाठी काही नाही." तेव्हा गेंड्याचं टाळकं फिरलं. नाकाडावरचं टोकदार शिंग उगारून त्यानं मांत्रिकाला लांबपर्यंत पळवलं. मांत्रिक पुढं आणि गेंडा मागं असा जोरदार पाठलाग सुरू झाला. मांत्रिक भन्नाट धावत सर्व झाडीत दिसेनासा झाला.

आजही लोक म्हणतात, माणूस दिसला की गेंड्याचं टाळकं फिरतं. जिराफला मिळालेल्या लांब आणि सुरेख मानेचं बक्षिस आठवून तो दिसेल त्या माणसामागं मांत्रिक समजून हाहा करायला धावतो.

(व्यंकटेश माडगूळकर [मूळ लेखक : निक ग्रीव्हज्]
: झाडावर चढणारा कोल्हा आणि आफ्रिकेतील इतर प्राणीकथा)

# २.१९

# साळूला टोकदार पिसे कशी मिळाली?

(अलास्काची लोककथा)

(रेव्हनने साळूची पहिल्यांदा निर्मिती केली तेव्हा तिच्या अंगावर आता आहेत तशी तीक्ष्ण स्वरूपाची टोकदार पिसे नव्हती. तेव्हा तिचे शरीर मऊ केसांचे बनलेले होते. ही पिसे पुढे टोकदार कशी झाली ? याची ही कथा.)

साळूजवळ स्वतःचे रक्षण करण्यासाठी कोणतेही साधन नसल्यामुळे बाकीचे प्राणी तिला त्रास देत. त्यातल्या त्यात अस्वल आणि लांडगा जास्तच छळत. ते तिचे अन्न पळवून नेत व तिला भुकेले ठेवीत. तिला मजेसाठी सतावून जेरीस आणीत.

असे खूप वर्षे चालले. आता साळूने स्वतःचे रक्षण करण्याचे थोडेसे प्रकार आत्मसात करून घेतले. त्यातली उत्तम युक्ती म्हणजे झाडावर चढून जाणे. असे वर चढून गेले म्हणजे तिचे शत्रू तिथे पोचू शकत नसत. पण कधी कधी तिला पाहिजे तसे झाड जवळपास नसायचे. मग अस्वल आणि लांडगा अशा वेळी तिचे सर्व अन्न पळवून नेत. साळू तेव्हा इतकी हळूबाई होती की बहुतेक प्राण्यांपेक्षा तिला वेगात पळताच येत नसे. म्हणून तो काळ तिच्यासाठी वाईट काळ होता.

उन्हाळ्यात एक दिवस नेहमीप्रमाणे साळूला त्रास देताना अस्वलाने आणि लांडग्याने तिला चिखलाच्या डबक्यात ढकलून दिले. गरीब बिचारी साळू जेव्हा डबक्यातून बाहेर आली, तेव्हा तिचे मऊ केस घाणीमुळे जड होऊन गेले होते. अस्वल आणि लांडगा ते पाहून खूप हसले आणि तिचे अन्न घेऊन पळून गेले.,

जवळ एकही नदी किंवा तळे नव्हते, त्यामुळे साळूला अंगावरचा चिखल धुऊन टाकता आला नाही. उन्हाळ्यातल्या कडक उन्हामुळे थोड्या वेळाने

तिच्या अंगावरील चिखल वाळून गेला. त्यामुळे तिचे सगळे केस टोकदार आणि कडक बनले.

त्या दिवसानंतर अस्वलाने साळूला एकदा पायवाटेने जाताना पाहिले. ते जेव्हा साळूच्या जवळ आले तेव्हा नेहमीप्रमाणे त्याने तिला ढकलून दिले. पण अस्वलाचे पंजे जेव्हा तिच्या केसांना लागले, तेव्हा ते आश्चर्यचकित झाले. साळूच्या केसांना पंजे लागताक्षणी अस्वल वेदनेने किंचाळले आणि पळून गेले. अस्वलाने आणि लांडग्याने नंतर तिला कधीही त्रास दिला नाही. तेव्हापासून सगळ्या साळूंच्या अंगावर काट्यासारखे टोकदार केस/पिसे असतात. त्यामुळे मोठे प्राणी त्यांना त्रास देत नाहीत आणि त्यांचे अन्नही पूर्वीप्रमाणे पळवून नेत नाहीत.

(उषा प्रभुणे, अरुण प्रभुणे [मूळ लेखक : जॉन इस्मेल्सर]
: उत्तर ध्रुवाजवळील अलास्कन लोककथा)



# २.२० खारीच्या पाठीवर तीन पट्टे का?

(अमेरिकन 'इंडियन' संस्कृतीतली लोककथा)

ज्या काळात प्राणी बोलू शकत त्या प्राचीन काळात एक अस्वल पुढे पुढे चालले होते.

एका मोठ्या लाकडाच्या ओंडक्याला वळसा घालून पुढे गेल्यावर ते अस्वल खाण्यासाठी काही अन्न मिळते का, याचा शोध त्याच्या पंजाच्या मदतीने घेऊ लागले. त्यावेळी त्याला स्वतःबद्दल मोठा विश्वास वाटला, 'खरोखरच, मी करू शकत नाही अशी कोणती गोष्टच नाही,' असे अस्वल म्हणाले.

तेवढ्यात एक बारीक आवाज आला,'काय हे खरेच आहे?' अस्वलाने खाली बघितले. जमिनीतील बिळातून एक छोटी खार अस्वलाकडे बघत होती.

अस्वल म्हणाले, होय, ते खरेच तसे आहे. असे बोलून त्याने त्याचा केवळ एकच प्रचंड मोठा पंजा मोठ्या लाकडी ओंडक्याजवळ नेला आणि त्या ओंडक्याला त्याने सहज ढकलून दिले. मग ते अस्वल खारीला म्हणाले, बघितलेस,किती सहजपणे मी हे करू शकलो. बाकी सर्व प्राण्यांमध्ये मी सर्वात अधिक शक्तिमान आहे. मी काहीही करू शकतो. बाकी सर्व प्राणी मला घाबरतात.'

यावर खारीने विचारले, 'सकाळी उगवणाऱ्या सूर्याला तू थोपवू शकतोस काय ? ' अस्वलाने यावर एक क्षण विचार करून म्हटले,'यापूर्वी मी असा कधी प्रयत्न केलेला नाही. पण मला खात्री आहे, की उगवणाऱ्या सूर्याला मी निश्चित थोपवू शकतो.'

खार म्हणाली, 'तुला खात्री आहे ?'

अस्वल म्हणाले, 'मला खात्री आहे. बघ, उद्या सकाळी सूर्य उगवणार नाही. मी अस्वल हे तुला सांगतो आहे, हे लक्षात घे.' असे बोलून ते अस्वल वाट बघण्यासाठी पूर्वेकडे तोंड करून खाली बसले.

सूर्य त्याच्या मागे जरी रात्रीसाठी अस्ताला गेला असला तरी अस्वल तिथेच आणि तसेच बसून होते. खार बिळात गेली आणि तिच्या सुबक उबदार घरट्यात गुंडाळी करून बसली. अस्वल किती मूर्ख आहे हे लक्षात येऊन ती गालातल्या गालात हसत होती. संपूर्ण रात्रभर ते अस्वल तिथेच व तसेच बसून राहिले. शेवटी पहाटपक्षाचे गाणे सुरू झाले. सूर्योदयाची प्रभा फाकून पूर्व दिशा प्रकाशाने उजळून निघाली. हे पाहून अस्वल अस्वस्थ झाले. त्याला ते असह्य वाटू लागून ते म्हणू लागले, 'सूर्य आज उगवणार नाही. सूर्य आज उगवणार नाही.'

अर्थात रोजच्याप्रमाणे सूर्य उगवला. अस्वल अत्यंत अस्वस्थ झाले. खार मात्र आनंदित झाली. ती हसू लागली.'अस्वलापेक्षा सूर्य बलवान आहे,' असे चीं चीं करीत हसून म्हणू लागली. तिला इतका आनंद झाला होता, की त्या आनंदाच्या भरात ती तिच्या बिळाच्या बाहेर येऊन स्वतःभोवती गिरक्या घेत घेत गाऊ लागली-

'सूर्य उगवला,
सूर्य उगवला
अस्वल रागावले तरी
सूर्य उगवला'

इकडे अस्वल उदासपणे हे सर्व बघत बसले होते. गिरक्या मार मारून, मार मारून आणि हास हासून, हास हसून खारीचे आनंदाने गाणे म्हणणे चालूच होते. शेवटी ती थकून पाठीवर लोळू लागली. मग ओढ्याच्या प्रवाहातल्या माशांपेक्षाही चपळ असणाऱ्या अस्वलाने अत्यंत त्वरेने आपला एक मोठा पंजा खारीला मारून तिला जमिनीवर एकाच जागी घट्ट धरुन ठेवले. नंतर ते अस्वल खारीला म्हणाले, 'कदाचित उगवणाऱ्या सूर्याला मी थोपवू शकलो नसेल; पण आता तुला दुसरा सूर्योदय काही कधीच बघता येणार नाही. '

खार उद्गारली, 'ओ, ओ,ओ, अरे अस्वला, तू सर्वात बलवान आहेस बाबा. सर्वात चपळ तूच आहेस. सर्व प्राण्यांमध्ये तू सर्वोत्तमही आहेस. अरे मी फक्त विनोद करीत होते.' हे खारीचे बोलणे ऐकून अस्वलाने त्याचा पंजा थोडाही

हलवला नाही. उलट अस्वल खारीला म्हणाले, 'चल, तू जी प्रार्थना म्हणणार असशील ती लवकर म्हण. स्वर्गाचा रस्ता धरण्याची तुझी वेळ आता आली.'

यावर खार म्हणाली,'अरे अस्वला, मला मरायला आवडले असते; पण तू मला इतक्या जोरात दाबत आहेस, की मला नीट श्वासही घेता येत नाही. जास्तीत जास्त कशीबशी मी चीं चीं तेवढी करू शकते आहे. अरे, प्रार्थना म्हणण्याइतपत मी श्वासही घेऊ शकत नाहीए. जर तुझा पाय तू थोडा वर उचलशील, अगदी किंचित जरी वर उचलशील, तर निदान मी श्वास तरी घेऊ शकेन आणि मग त्या विश्व-निर्मात्याची मी माझी शेवटची प्रार्थना करू शकेन. त्या विश्वनिर्मात्यानेच तर सर्व काही निर्माण केले आहे. त्यापैकीच मोठे, हुशार शक्तिमान तसेच ताकदवान अस्वलही त्याचीच निर्मिती आहे आणि त्यानेच या मूर्ख, क्षीण आणि बारक्या खारीलाही निर्माण केले आहे.'

हे ऐकल्यावर अस्वलाने त्याचा पंजा थोडा वर उचलला. आणखी किंचित वर उचलला. पण खारीला इतके पुरे होते. खारीने मग थोडी मोकळेपणाने जागीच वळवळ केली आणि डोळ्याची पापणी लवते न लवते इतक्या अवकाशात अत्यंत चपळाईने तिच्या बिळाकडे धूम ठोकली. अस्वलानेही तितक्याच चपळाईने त्या छोटया खारीकडे पंजा नेला, पण तो तिला घासून गेला. खार निसटली. अस्वल इतके चपळ नव्हते की ते खारीला पकडू शकेल. पण तरी अस्वलाच्या पंजाने खारीच्या पाठीवर तीन फिके व्रण मात्र उमटवले.

अगदी आजतागायत खार आपल्या पाठीवर ते व्रण आपल्याला वागवताना दिसते. जेव्हा एखादा प्राणी दुसऱ्या प्राण्याची टर उडवतो, त्याचा उपहास करतो तेव्हा काय होते, याची जणू आठवण म्हणून खार हे व्रण पाठीवर वागवते.

आपल्याकडेही अशीच एक कथा आहे. सीतेच्या शोधासाठी लंकेला जाणे आवश्यक झाल्याने सागरावर सेतू बांधणे चालू असते. त्यात खार आपल्या परीने मदत करीत असते. म्हणून प्रभु रामचंद्र खारीच्या पाठीवर बोटांनी कुरवाळतात. त्या बोटांचे म्हणजेच खारीच्या पाठीवरील तीन पट्टे आहेत, असे महाराष्ट्रात समजतात.

# २.२१ कावळा काळा का?

(चिनी लोककथा)

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. त्यावेळी सगळ्या पक्षांचे रंग कसे पांढरे शुभ्र होते. मोर पांढरा, पोपट पांढरा, बगळा पांढरा, चिमणी पांढरी, कावळा पांढरा. एकदा काय झाले. देवाने सर्व पक्षांना आपल्या घरी बोलावले. सगळे पक्षी देवाच्या महालात दाटीवाटीने जमले. मोर, कबुतर, चिमणी, पोपट सगळे आले होते. फक्त कावळाच तेवढा आला नव्हता.

देवाने बघितले. सगळे पक्षी देवाने बोलाविल्याप्रमाणे जमले होते. जणू काही शुभ्र ढगच देवाच्या महालात उतरले होते. देवाने एकदा सर्व पक्षांवर नजर फिरवली आणि देवाच्या लक्षात आले फक्त कावळा आलेला नाही.

देवाने पक्षांना विचारले, "कावळा का आला नाही."

कोणालाच काही माहीत नव्हते. त्यामुळे कोणालाच उत्तर देता येईना. देवाने चिऊताईला जवळ बोलावले व तिच्या पाठीवरून ममतेने हात फिरवीत देव म्हणाला, "चिऊताई !... तू कावळ्याला चांगलंच ओळखतेस, तू जाऊन घेऊन ये पाहू कावळ्याला."

चिमणी कावळ्याकडे गेली. कावळा एका झाडाच्या फांदीवर डुलक्या घेत बसला होता. चिमणीने कावळ्याला देवाचा निरोप सांगितला आणि ती म्हणाली, "देवाने तुला ताबडतोब बोलावले आहे."

कावळ्याने उर्मटपणाने विचारले, "का ?"

चिमणी म्हणाली, " मला माहीत नाही."

कावळा म्हणाला, "मग मी येत नाही."

चिमणी परत देवाकडे गेली आणि सांगू लागली, 'कावळा म्हणाला मी येत नाही.' देवाला राग आला. परंतु त्याने तो आवरला, आणि कबुतराला सांगितले,

"कबुतरा ! जारे !... तू जाऊन कावळ्याला घेऊन ये."

कबुतर उडत उडत कावळ्याकडे गेले आणि म्हणाले, "देवाने तुला ताबडतोब बोलावलं आहे."

कावळ्याने फांदीवरून झोका घेत विचारलं, "कां?"

कबुतर म्हणाले, "देव ते आपल्याला नंतर सांगणार आहे."

कावळा म्हणाला, "मग देवाला सांग मी नंतर येईन."

कबुतर बिचारे तसेच परतले. देव मनातून रागावला, पण त्याने राग आवरला. नंतर सर्व पक्षांकडे पाहून तो म्हणाला, "तुम्हा सर्व पक्षांना मी बोलावले कारण मला तुम्हाला विविध रंग द्यायचे आहेत. म्हणजे तुम्ही खूप खूप सुंदर दिसाल."

पक्षांना आनंद झाला.

"बोला तुम्हाला कोणते रंग हवेत ?" देवाने विचारले.

प्रथम पोपट पुढे आला आणि म्हणाला "देवा !... मला हिरवागार रंग दे. म्हणजे मी कुणालाही गर्द रानात दिसणार नाही."

देव म्हणाला, "ठीक आहे." देवाने त्याला हिरवेगार केले. फक्त त्याची चोच तितकी रंगवायची राहिली.

पोपट म्हणाला, "देवा !...माझ्या चोचीचा रंग तेवढा लालचुटूक कर हं !"

देवाने त्याची चोच लाल लाल केली. आता पोपट पूर्वीपेक्षा खूप संदर दिसू लागला. ऐटीने तो सर्वांकडे पाहू लागला. मग एक एक पक्षी रांगेने पुढे येऊ लागला.

चिमणी म्हणाली, "देवा !... मला आपला मातकट किरमिजी रंग दे. मातीचा सुंगध मला खूप आवडतो."

देवाने चिमणीलाही छान रंगवले. चिमणी भुर्रकन् उडून गेली.

त्यानंतर कबुतराने निळा रंग मागितला. देवाने त्याला सुंदर निळसर रंग दिला.

बगळ्याने सांगितले, "देवा !.. मला पांढराच रंग आवडतो. माझी चोच तेवढी

पिवळी धमक कर ना !..."देव हसला. त्याने बगळ्याची चोच हळकुंडासारखी पिवळी केली.

नंतर मोराचा नंबर आला. मोर म्हणाला, "मला खूप रंग हवेत." देवाने त्याची पिसे विविध रंगाने रंगविली. मोर खूप सुरेख दिसू लागला. त्याला खूप आनंद झाला. आनंदाने पिसारा फुलवून तो नाचू लागला.

सगळ्या पक्षांना असे विविध रंग देवाने दिले. त्यातील काही पक्षी उडून गेले. तरी बरेच पक्षी तेथेच होते. इतक्यात सावकाशपणे डुलत डुलत कावळा आला. देव निरनिराळ्या पक्षांना सुंदर सुंदर रंग देतो आहे. हे त्याला कळले होते. त्यामुळे तो आल्याबरोबरच रांग मोडून उतावीळपणे देवापुढे गेला. देवाने ते पाहिले. देवाला राग आला. तरीही राग आवरत देव म्हणाला "ये कावळे दादा ! तुला कोणता रंग हवा ?"

कावळ्याने सगळे पक्षी बघितले. जणू तेथे रंगीबेरंगी पक्षांची जत्राच भरली होती. कावळ्याला काही सुचेना. त्याला काही ठरविता येईना. तो पुरता गोंधळून गेला.

देव म्हणाला, "तुला कबुतरासारखा निळा रंग देऊ ?"

कावळा म्हणाला, "का ? निळाच का ?"

देव म्हणाला, "का म्हणजे ? त्यामुळे तू सुंदर दिसशील."

कावळ्याने मानेनेच 'नको' म्हटले.

देव म्हणाला, "तुला गुलाबी रंग हवा ?"

कावळा म्हणाला, "का ? गुलाबीच का ?"

देव म्हणाला, "तुला तो शोभेल."

कावळ्याने नाक मुरडले.

देव म्हणाला, "तुला हिरवा रंग देऊ ?"

कावळा म्हणाला, "कां ? हिरवाच कां ?"

देव एक एक रंग विचारीत होता. रंग विचारता विचारता देवाचे रंग संपत आले तरी कावळ्याचे 'का का' काही संपत नव्हते. देव कंटाळून गेला. शेवटी देव

रागाने म्हणाला, ‘लवकर बोल, तुझ्यामागे रांगेत कितीतरी पक्षी उभे आहेत अजून त्यांना रंगवायचे आहे.

कावळा म्हणाला, "का ? का रंगवायचे आहेत ?”

आता मात्र देव संतापला. देव कावळ्याला म्हणाला, "तुला बोलावले तेव्हा तू आला नाहीस. आता आलास आणि मधेच घुसलास. कोणता रंग हवा विचारले तर तुला सांगता येत नाही. सांग लवकर, मला वेळ नाही.”

कावळा म्हणाला, "का ? का वेळ नाही ? तुम्हाला दुसरे काय काम आहे?”

आता देव कमालीचा संतापला. रागाने त्याचे डोळे लाल झाले. त्याने कावळ्याची मानगुट पकडली. कावळा ओरडू लागला. देवाने त्याला चक्क काळ्या रंगाच्या पिंपात बुडवून काढले आणि सोडून दिले. कावळा घाबराघुबरा होऊन पंख फडफडवत उडून गेला.

तेव्हापासून कावळा काळाकुट्ट झाला तो कायमचा.... अजूनही तो देवाला "का... का...” असे विचारीत फिरत असतो.

- शशिकांत केनकर : चीनमधील वैद्य आणि इतर गोष्टी, १९७८

# २.२२ कोंबडे किडे का खातात?

(चिनी लोककथा)

कोंबडा किडे का खातो ? तुम्ही म्हणाल किडे चवीला रुचकर लागत असतील ! परंतु तसे नाही.

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे ही. त्यावेळी कोंबड्याला शिंगे होती. कोंबडा त्या काळी फार शूर पक्षी समजला जाई. त्याचे उभे राहणे रुबाबदार दिसे. सुरेख पिसे, लालचुटूक तुरा आणि दोन गोल अणकुचीदार शिंगे. कोणालाही त्याची शिंगे बघितल्यावर हेवा वाटे. कोंबड्यालाही स्वतःच्या शिंगांचा अभिमान वाटे.

एक दिवस कोंबडा दाणे टिपत असताना त्याला जमिनीवर मोठी थोरली सावली सरकताना दिसली. एवढी मोठी सावली कुणाची ? त्याने सहज मान वर करून आकाशाकडे बघितले. आकाशातून एक बैल उडत येत असताना त्याला दिसला. त्याचे डोके आकाशाच्या एका टोकाला भिडले होते आणि शेपटी आकाशाच्या दुसऱ्या टोकाला भिडली होती. तो बैल मोठा धष्टपुष्ट दिसत होता. कोंबडा बघतच राहिला.

तो बैल खाली आला आणि कोंबड्याजवळ येऊन उभा राहिला. कोंबड्याला तो आपल्यापुढे का येऊन उभा राहिला ते कळेना.

बैल म्हणाला, "मी स्वर्गातून आलो आहे."

"हं..." कोंबडा दाणे टिपीत ऐकू लागला.

"कसं काय चाललय तुझं ?"

"चांगलं चाललंय !" कोंबड्यानं उत्तर दिलं आणि तो पुन्हा दाणे टिपू लागला.

बैल तेथेच उभा राहिला. आपल्या येण्याचा हेतू कोंबड्याला कसा सांगावा हे त्याला कळेना. बैलाने विचार केला आणि तो म्हणाला, "मित्रा ! मला देवाने त्याचा रक्षक होण्याची गळ घातली आहे."

"चांगलं आहे की !"

"चांगले आहे. पण..."

"पण काय ?"

"मला शिंगं नाहीत रे !"

कोंबड्याने त्याच्याकडे निरखून बघितलं. खरोखरी बिचाऱ्या बैलाला शिंगे नव्हती.पण "शिंगामुळे काय फरक पडणार आहे ?" कोंबड्याने विचारले.

"वा ! ... खूप फरक पडेल. शिंगे नसली तर मी देवाचे रक्षण तरी कसे करू ? कुणीही येईल आणि मला धुडकावून थेट देवाजवळ जाईल. देवाजवळ वर मागेल आणि सगळीकडे अनर्थ होईल. ते निस्तरायला पुन्हा मलाच जावं लागेल. तिथेही शिंगे नसल्यामुळे माझेच हसे होईल."

कोंबडा लक्षपूर्वक बैलाचे बोलणे ऐकत होता. त्याला बैलाचे म्हणणे पटले. बैलाची दया आली. बैल त्याच्याकडे बघत गप्प उभा होता.

"तुझं म्हणणं तरी काय आहे ?" कोंबड्याने विचारले.

"मला कृपा करून तुझी शिंगे उसनी दे." बैल अजिजीने म्हणाला.

कोंबड्याने दाणे टिपायचे थांबवले. खूप विचार केला आणि मान वाकडी करीत तो म्हणला, "पण माझी शिंगे मला परत मिळतील याचा काय भरवसा ?"

"त्याचाही मी विचार केला आहे." बैल म्हणाला.

"तुझी आणि किड्याची दोस्ती आहे. त्याला आपण विचारू. ती तुला माझ्याबद्दल सांगेल."

कोंबडा म्हणाला, "हं !... मग हरकत नाही."

ते दोघे किड्याकडे गेले. किडा अंगावर ऊन घेत भुसभुशीत जमिनीवर वळवळत चालला होता. त्या दोघांना पाहून किडा थांबला.

कोंबडा किड्यापुढे उभा राहिला आणि मान वाकडी करून ऐटीत म्हणाला,

'काय रे किड्या !... '"मी याला माझी शिंगं उसनी दिली तर परत मिळतील कां ?"

किड्याने बैलाकडे बघितले. बैलाने डोळे लाल केले होते. तो ढुशी मारण्याच्या पवित्र्यात उभा होता. ते पाहून किडा घाईघाईने म्हणाला,

"कोंबडेदादा तू काळजीच करू नकोस. तुझी शिंगे तुला परत मिळतील. मी तुला बैलाबद्दल सांगतो. हा बैल फार समंजस आहे."

कोंबड्याला वाटले आता बैलाला शिंगं द्यायला काय हरकत आहे ? बैल काही दिवस देवाचा रक्षक होईल. तो जेव्हा परत येईल तेव्हा आपली शिंगे परत मिळतील. मग आपणही शिंगे लावून बैलाबरोबर देवाकडे जाऊ आणि देवाचे रक्षक होऊ . ही संधी सोडायची नाही असे कोंबड्याने ठरविले.

कोंबड्याने बैलाला आपली शिंगे दिली आणि बैल त्याचे आभार मानून आकाशातून निघाला. बैल दिसेनासा होईपर्यंत कोंबडा आणि किडा त्याच्याकडे बघत राहिले. बैल निघून गेला.

दुसऱ्या दिवशी पहाट झाली. कोंबडा उठला. परंतु त्याला आपली शिंगे दिसेनात. मग त्याच्या लक्षात आले की शिंगे बैलाने नेली आहेत. त्याने आपली मान आकाशाकडे नेली आणि तो मोठ्ठयांदा ओरडला "कु कु कू कु माझी शिंगे आणलीस का परत ?"

परंतु त्याला कुणीही उत्तर दिले नाही. सारे आकाश रिकामेच राहिले.

जेव्हा दुपार झाली आणि बैल आला नाही. तेव्हा कोंबडा किड्याकडे गेला. किडा सुस्त होऊन मातीत पडून राहिला होता. कोंबडा म्हणाला, "अरे ! त्या बैलाने माझी शिंगे आणून दिली नाहीत."

किडा म्हणाला, "तू फार काळजी करतोस बुवा !... आज नाही तरी उद्या नक्की तुझी शिंगे परत मिळतील."

परंतु रोज सकाळी कोंबडा उठायचा आणि आकाशाकडे पाहून ओरडायचा "कु... कु...कू...कु माझी शिंगे आणलीस का परत ?"

परंतु त्यानंतर कोंबड्याला आकाशात कधीही बैल दिसला नाही. बैलाने कधीही शिंगे आणून दिली नाहीत. दिवसेंदिवस कोंबडा शिंगासाठी झुरत चालला. कोंबडा मरायला टेकला तरी त्याला त्याची शिंगे परत मिळेनात. शेवटी मरतेसमयी कोंबड्याने किड्याला बोलावले आणि तो खोल आवाजत म्हणाला, "अरे ! त्या बैलाने माझी शिंगे अजून परत आणून दिली नाहीत."

किडा म्हणाला, "तू फार काळजी करतोस बुवा ! आज नाही तरी उद्या नक्की..."

परंतु किड्याला आपले बोलणे पूर्ण करताच आले नाही. कोंबड्याने रागारागाने किड्याला चोचीत पकडले आणि मटकावून टाकले.

त्याचा चट्टामट्टा झाल्यावर कोंबडा आपल्या सर्व मुलांना आणि नातवंडांना म्हणाला, आजपासून तुम्ही सर्वांनी किडे खायचे. कारण या किड्याने मला फसवले. अन्यथा माझी सुंदर शिंगे मी त्या बैलोबाला दिलीच नसती... शिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे किडे....

"अत्यंत रुचकर लागतात." कोंबड्याच्या मुलांनी आणि नातवंडांनी एक सुरात गिल्ला केला.

परंतु बरे झाले कोंबड्याने मान टाकली होती. कारण कोंबड्याने जर आपल्या मुला-नातवंडांना विचारले असते, 'अरे, तुम्हाला काय माहीत ?' तर सगळी चिटुकली पिटुकली पिले एकमेकांच्या तोंडाकडे बघत बसली असती.

परंतु त्या दिवसापासून कोंबड्यांना शिंगे नाहीत आणि कोंबडे मात्र किडे खातात.

# २.२३ बहिरी ससाण्याची चोच छोटी का?

(अलास्काची लोककथा)

खूप वर्षांपूर्वी रेव्हनने पाण्यावरून उडताना पाण्यावर काहीतरी तरंगताना पाहिले. त्याला वाटले की तो अग्नी असेल म्हणून तो उडत अगदी त्याच्याजवळ गेला. तेव्हा त्याला दिसले की ती एक जळणारी फांदी आहे.

पक्षीश्रेष्ठ रेव्हनने सगळ्या पक्षांना बोलावले. रेव्हनचे बोलणे ऐकण्यासाठी सगळे पक्षी किनाऱ्यावर आले.

काळा रेव्हन म्हणाला, 'तुमच्यापैकी एकाने तेथे उडत जावे आणि मला तो अग्नी आणून द्यावा.' रेव्हनने सगळ्या पक्षांकडे बघितले व त्याने बहिरी ससाण्याला अग्नी आणण्यासाठी निवडले. कारण त्या काळात बहिरी ससाण्याला लांब चोच होती. रेव्हन बहिरी ससाण्याला म्हणाला,'तेथे उडत जा आणि माझ्यासाठी ती जळती फांदी घेऊन ये. ती फांदी जरी खूप गरम असली तरी खाली पडू देऊ नकोस.'

हे ऐकून बहिरी ससाणा पाण्यावरच्या त्या जळत्या फांदीजवळ उडत गेला आणि त्याने त्याच्या लांब चोचीत ती फांदी पकडली. सगळे पक्षी जिथे एकत्र जमले होते तिथे बहिरी ससाणा नंतर परत आला. तो परत येइपर्यंत जळत्या फांदीने त्याची लांब चोच जाळून टाकली होती. फक्त थोडीशीच चोच बाकी उरली होती. म्हणून आजच्या बहिरी ससाण्याला छोटीशीच चोच असते.

(उषा प्रभुणे, अरुण प्रभुणे [मूळ लेखक : जॉन इस्मेल्सर]
: उत्तर ध्रुवाजवळील अलास्कन लोककथा)

# २.२४ हट्ट राजपुत्राचा, जन्म माकडांचा

(आफ्रिकन लोककथा)

पश्चिम आफ्रिकेतली गोष्ट आहे. तिथे एक राजा रहात होता. त्याला तशी बरीच बायका-मुले होती; पण त्या सर्वांमध्ये एक राजपुत्र त्याचा विशेष लाडाचा होता. राजाच्या आवडत्या राणीचा एकुलता एक पुत्र अशी राजप्रासादात त्याची ओळख होती. या राजपुत्राचे सर्व हट्ट पुरविले जात. त्याला हवी ती प्रत्येक गोष्ट राजा त्याला देत असे. या राजपुत्राचे वयाच्या सहाव्या वर्षी स्वत:चे घर होते. उच्च प्रतीचे मखमली कपडे, सोन्या-चांदीचे रत्नजडित दागिने घालून राजपुत्र डौलाने फिरत असे. राजाने मोठ्या हौशेने त्याला आपल्या राज्यातल्या मुलांचा राजा बनवले होते. त्या राज्यात प्रौढांच्या तुलनेत मुलांचीच संख्या जास्त होती. त्यामुळे या बाळराजाचा विशेषच रूबाब असे. राजपुत्र दररोज बाजारपेठेतल्या चौकात मुलांच्या सभा घेत असे. राजपुत्राचे बोलणे, बसणे, पोषाख, दागिने यांचे निरीक्षण करीत सर्व मुलं राजपुत्रासमोर शांत बसत असत. सभा विसर्जित होईपर्यंत कुणीही जायचे नाही किंवा झोपायचेही नाही, असा राजपुत्राचा दंडकच होता. त्याच्या या जाचक निर्बंधामुळे राज्यातल्या कोणत्याच मुलाला राजपुत्राविषयी मनापासून आपुलकी वाटत नव्हती. केवळ राजशिष्टाचार म्हणून ते या बाळराजाच्या सभेला हजेरी लावत.

एके दिवशी सभेत राजपुत्राचे आत्मपुराण सुरू होते. बाळराजे म्हणाले, “मी या राज्यातला सगळ्यात भाग्यवान मुलगा आहे. या जगातली प्रत्येक गोष्ट माझ्यासाठीच आहे. मी म्हणेल तेव्हा ती वस्तू मला उपलब्ध करून दिली जाते."

बाळराजांचे हे आत्मपुराण सभेतली एक चिमुरडी मुलगी शांतपणे ऐकत होती. ती उठली आणि म्हणाली, “ बाळराजे प्रणाम! खाविंदांना एक प्रश्न

विचारण्याची मुभा आहे का?" बाळराजे त्या चिमुरड्या मुलीकडे पाहून खुश झाले. त्यांनी तत्काळ तिला प्रश्न विचारायला अनुमती दिली. चिमुरडीने विचारले, "बाळराजे, तुमच्याजवळ सर्व काही आहे असे तुम्ही म्हणता, पण मला ते अतिशयोक्त वाटते."

गर्विष्ठपणे राजपुत्र चिमुरडीला म्हणाला : " सांग बरे माझ्याकडे काय नाही? "

काहिशा उपराधानेच त्या चिमुरडीने विचारले, " चंद्र आहे का तुमच्याकडे ?"

तिच्या या प्रश्नाने सर्व मुलांमध्ये एकच हास्यकल्लोळ झाला. सगळ्यांनी राजसभेच्या नियमांचं उल्लंघन केल्यामुळे राजपुत्र खूप चिडला. पण त्याच वेळी राजपुत्राच्या लक्षात आले, की ती मुलगी बरोबर बोलते आहे. चंद्र आकाशातच असतो. तो कुठे आहे आपल्याजवळ? राजपुत्र जरा वरमलाच. त्याने तत्काळ सभा विसर्जित केली आणि दाणदाण पावले टाकीत तो आपल्या पितामहांना भेटण्यासाठी राजप्रासादाकडे निघाला.

राजप्रासादात पोहचताच राजपुत्राने थेट राजाकडे हट्ट धरला, आणि आपल्याला चंद्र हवा असल्याची मागणी केली. राजा म्हणाला, "बेटा तू गंमत करतो आहेस ना?"

राजपुत्र ठामपणे म्हणाला, "नाही पिताश्री, मला खरोखरीचा चंद्र हवा आहे."

राजाने नकारात्मक मान हलवली. म्हणाला, " बाळराजे, मी तुम्हाला चंद्र कसा देऊ? तो आकाशातून पृथ्वीवर थोडाच आणता येणार आहे?"

राजपुत्राला असा नकार ऐकायची सवय नव्हती. त्या चिमुरड्या मुलीच्या प्रश्नामुळे आता राज्यातल्या सर्व मुलांसमोर आपले हसे होणार, त्यांना कसे तोंड दाखवणार, या कल्पनेने तो अस्वस्थ झाला. दोन्ही हातांचे तळवे डोळ्यांवर ठेवून त्याने गळा काढून रडायला सुरुवात केली. डोळ्यांतून घळा घळा पाळी वाहू लागले. रडत रडत तो राजाला म्हणाला, "तुम्ही मला चंद्र देणार नसाल तर माझ्या अंतिम श्वासापर्यंत मी राजवाड्यातून बाहेर पडणार नाही, सारं आयुष्य एकाकी दु:खात काढील" आणि शोकमग्न राजपुत्र आपल्या राजकक्षात निघून गेला.

राजा काळजीत पडला. अपल्या आवडत्या राजपुत्राला तो असं दु:खी बघू शकत नव्हता. त्याने ताबडतोब राज्यातल्या ज्येष्ठ आणि अनुभवी लोकांची सभा बोलावली आणि आदेश दिला की, राजपुत्राला चंद्र कसा मिळवून देता येईल याचा आपण शोध घ्या.

लोकांनी आपापसात चर्चा केली आणि म्हणाले," महाराज आपण चेष्टा तर करीत नाही?"

राजा म्हणाला, " जोपर्यंत राजपुत्राला चंद्र मिळत नाही, तोपर्यंत तो दु:खी रहील. आणि मला ते सहन होणार नाही."

उपस्थित लोकांमधला एक जण ऊठून नम्रपणे म्हणाला, "महाराज, राजपुत्र फार लहान आहेत. परंतु सुदृढ आहेत. खात्रीने ते चंद्र हस्तगत करू शकतील. पण मी जरा वेगळी गोष्ट सांगतो. काही विशिष्ट कारणासाठी परमेश्वराने चंद्राची योजना आकाशात केली आहे, त्यामुळे चंद्राला तिथेच राहू देणं योग्य होईल."

हाताची घडी घालत राजा म्हणाला, "या पृथ्वीतलावरील सर्वात महत्त्वाची आणि मौल्यवान गोष्ट म्हणजे माझा मुलगा आहे. त्याला चंद्र हवा आहे, आणि तो मिळालाच पाहिजे."

उपस्थित लोकांनी पुन्हा बरीच चर्चा केली आणि सर्वानुमते एक कल्पना मांडण्यात आली.

"राज्यातील सर्व सैनिकांना दहा वर्षासाठी एक मोठा स्तंभ बांधण्याच्या कामाला लावावे. दहाव्या वर्षाच्या अखेरीस म्हणजे राजपुत्र १६ वर्षांचा होईपर्यंत स्तंभ तयार होईल. मध्यरात्री चंद्र राजपुत्राचा डोक्यावरून सरकत जाईल तेव्हा चंद्राला आकाशातून राजपुत्र खेचून घेईल."

राजाला कल्पना फारच अवडली. लोकांच्या नंतर काय चर्चा झाल्या याकडे दुर्लक्ष करीत राजा निघून गेला.

पुढच्या दहा वर्षांत राज्यातील प्रत्येक जण स्तंभ बांधण्याच्या कामास लागले. गावातील लोकांना वाटत होते, की राजपुत्र जसजसा मोठा होईल, तसतसा त्याच्या विचारात बदल होईल आणि तो हट्ट सोडून देईल. परंतु जर हट्ट

कायम राहिला तर काय होईल ते सांगता येत नाही. त्यामुळे गावकरी चिंताग्रस्त असत.

दहाव्या वर्षाच्या अखेरीस उंच स्तंभ बांधून तयार झाला. मध्यरात्री राजा, राजपुत्र आणि काही गावकरी स्तंभाच्या शेवटच्या टोकावर चढले. श्वास रोखून सर्व जण बघत होते. राजाने हात उंचावून चंद्राला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आणि मोठ्याने ओरडत हात मागे घेतला. चटका बसल्याने राजाचा हात काळा झाला होता. हातावर फुंकर घालत राजा राजपुत्राला म्हणाला, "बाळा, तुला चंद्र मिळणं शक्य नाही. तो फार उष्ण आहे."

परंतु हट्टी, लाडावलेला, अहंभावी १६ वर्षीय राजपुत्र ऐकायला तयार नव्हता. वयाच्या सहाव्या वर्षी जो राजा मुलाला समजावू शकला नाही तो राजा आता मुलाला कसे सांगेल हा लोकांना प्रश्न होता.

इतक्यात राजपुत्र म्हणाला, "मी दहा वर्षे वाट पहिली. आता मी चंद्र मिळवणारच. अशी प्रतिज्ञा करीत राजपुत्र दोन्ही हात उंचावून चंद्राला पकडू लागला. राजपुत्राच्या हातातून धुराची वलये निघू लागली, सर्व शक्तीनिशी तो चंद्राला खेचू लागला आणि क्षणार्धात चंद्राचे तुकडे तुकडे झाले. चंद्राच्या गरम उष्ण तुकड्यांचा वर्षाव सुरू झाला. आगीचे लोळ उठले आणि त्या आगीत स्तंभ कोसळला. राजा, राजपुत्र आणि सगळे गावकरी होरपळून निघाले.

आफ्रिकन देवतेला या सर्व मूर्ख लोकांची दया आली. त्यांनी केलेल्या चुकीचे प्रायश्चित्त म्हणून त्या सर्व लोकांचं माकडात रूपांतर केलं. आणि ते झाडांवर उड्या मारू लागले. जगभर प्राचीन काळापासून या मूर्ख, अहंकारी लोकांच्या माकडलीळा आणि माकडचेष्टा सगळेजण पहात आहेत.



# २.२५ स्त्री चतुर की पुरुष चतुर?

कोणे ऐके काळी एका डोंगराच्या पायथ्याशी एका झोपडीत शांता- शंकर हे पती-पत्नी सुखाने संसार करीत होते. एकदा काही कामानिमित् शंकर जवळच्या गावी गेला. परत यायला शंकरला बराच वेळ लागला. शांता बराच वेळ त्याची वाट पहात झोपडीच्या दाराशी उभी राहिली. परंतु दूरवर नजर टाकली तरी शंकर दिसत नव्हता. शेवटी कंटाळून शांता घरात आली. स्वयंपाक केला, जेवणाची वेळ झाली तरी शंकर आला नाही. चिमणीच्या दिव्याची वात कमी केली आणि न जेवताच झोपण्याची तयारी करू लागली. तितक्यात शंकर आला. गावाकडच्या बाजारातून आणलेल्या वस्तू शांताला दाखवू लागला. परंतु शांता काहीच बोलली नाही. शंकराने हात-पाय धुतले. आणि चुलीकडे पाहिले तेव्हा लक्षात आले की, शांता जेवली नाही. शंकराने शांताला विचारले, `तू जेवली का नाहीस?' शांता म्हणाली, `तुमच्या आधी मी कशी जेऊ?' शंकर म्हणाला, `तूच ओळख! बराच विचार केलां तरी शांताला काहीच कळत नव्हतं.

बाहेर चांदण्यात झाडाखाली बसत शंकरने शांताला बाहेर बोलावले. निरभ्र आकाशातील टिपूर चांदणं पहात शंकराने शांताला विचारले, `मला एक सांग, स्त्री-पुरुषांमध्ये स्त्री चतुर की पुरुष चतुर?' शांता म्हणाली, `मला वाटते पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिक चतुर असतात. घरातील बऱ्याच गोष्टी दूरदर्शीपणाने पूर्ण करीत असतात.' शंकराच्या मते स्त्रिया घरातून फारशा बाहेर जात नसल्यामुळे स्त्रियांमध्ये व्यवहारचातुर्य नसते?' बराच वेळ दोघांची संवादात्मक वादा-वादी सुरू होती. अखेरीस वाद अपूर्णच राहिला.

दोघेही घरात आले. बरीच रात्र झाली तरी शांता झोपत नाही हे पाहून शंकरने शांताला विचारले. `तू झोपत का नाहीस?' शांता म्हणाली, तो नाही म्हणून मला झोप येत नाही. `तो कोण ?' असे शंकरने विचारताच शांता म्हणाली, 'ती कोण?

ते आधी सांगा?' शंकर गालातल्या गालात हसत म्हणाला, तिच्या काळजीने तुला झोप येत नाही का? अग वेडे ती म्हणजे भूक. मला भूक नाही म्हणून जेवण नको असं म्हणायचं होत मला! आता तुझा तो कोण सांग पाहू? लाजत लाजत शांता म्हणाली, `अहो, तो म्हणजे वारा नाही म्हणून मला झोप येत नाही इतकंच. नमस्कार केल्यासारखे दोन्ही हात जोडून शंकर म्हणाला, तुम्ही बायका फार चतुर असतात हे मान्य केलं बरं का?'

# २.२६
# चिनीमातीच्या भांड्यांची निर्मिती कथा

(जावा बेटावरील लोककथा)

कुणी एके काळी एक राजा दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडला. दरिद्री झाला. रोजच्या जेवणासाठीही काहीच उरले नव्हते. पूर्वजांनी जपून ठेवलेले ठेवणीतले अनमोल हातमागही विकले. संकट काळात कुणीच कुणाचे नसते. राजा एकाकी झाला. अखेरीस राजा रानात राहू लागला.ब्रह्मदेवाने राजाची दयनीय अवस्था पाहिली. ब्रह्मदेवाला फार वाईट वाटले. ब्रह्मदेवाने लगेचच एका देवदूताला आज्ञा केली, 'देवदूता जा, या राजाला श्रीमंत कर ! ' ब्रह्मदेवाची आज्ञा शिरसावंद्य मानून देवदूत राजाजवळ आला. राजाला म्हणाला,'आपल्या देवाने ज्या मातीपासून चंद्र-सूर्याची निर्मिती केली, त्या मातीतील थोडीशी माती उरली. ती माती देवाने याच पर्वताच्या एका अवघड कड्यापाशी टाकून दिली आहे. त्या मातीची आपण भांडी बनवू शकतो. विविध प्रकारची भांडी कशी बनवायची ते मी तुला शिकवतो. ही भांडी विकली तर तू श्रीमंत होशील ! ' राजा हसून म्हणाला, 'आपल्या अनमोल सूचनेबद्दल धन्यवाद. पण मातीची गाडगी मडकी विकून कोणी कधी श्रीमंत झाले आहेत कां?असे असते तर जगातले सगळे कुंभारच लखपती झाले असते ! ' देवदूत म्हणाला,'तुम्ही ती माती आधी बघा, सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती माती पांढरी शुभ्र आहे. दुसरी महत्त्वाची बाब ही की, ती माती चकाकणारी आहे. त्यामुळे या मातीपासून बनवलेली भांडी चमकदारच होतील. सूर्य चंद्राचे तेज आपणास माहित आहे ना? त्याच मातीची भांडीही तितकीच तेजस्वी राहतील!'

देवदूताचे म्हणणे राजाला पटले, राजा बरे म्हणाला, देवदूत व राजाने मिळून मोठ-मोठे रांजण, सुरया व विविध प्रकारची भांडी बनवली. सूर्य-चंद्राच्या

प्रकाशात ही भांडी इतकी चकाकायची की, कुणालाही चोरून न्यायचा मोह झाल्याशिवाय रहायचा नाही ! त्यामुळे राजाने या भांड्यांच्या रक्षणासाठी बांबूंच्या काड्यांचे कुंपण घातले. भांड्यांचे ढिगारे रचले जात होते. परंतु दुर्दैव असे की धुवांधार पाऊस सुरू झाला. जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. या प्रलयाला घाबरून देवदूत ब्रह्मलोकी परत गेला. वीजांच्या कडकडाटाला घाबरुन राजा झोपडीत गेला. सकाळी उठून पहातो तर पाण्याच्या प्रवाहात भांडी पुढे पुढे धावत आहेत. हळूहळू बरीच भांडी दूर दूर वहात गेली. काही भांडी बोर्निओत गेली तर काही चीन, जपानमध्ये गेली. काही सुमात्रा बेटात पळाली ! राजाचे नशीब चांगले ! काही भांडी उरली ! उरलेली भांडी राजाने विकली. राजाला पैसे मिळाले. मिळालेल्या पैशातून राजाने आपले हातमाग परत मिळवले. आणि हळूहळू राजा श्रीमंत झाला.

काही काळानंतर बोर्निओ बेटातला सीदयाक जमातीला हे सुंदर रांजण घनदाट जंगलात आढळले. हे रांजण पाहताच, चंद्र-सूर्य ज्या मातीपासून बनले आहेत त्याच मातीचे हे रांजण घडवलेले आहेत हे लक्षात आले. त्या जमातीच्या लोकांनी हे देवाने पाठवलेले पवित्र रांजण स्वच्छ धुतले. त्यांची पूजा केली. पवित्र रांजण ठेवण्यासाठी एक देऊळ बांधले. असं सांगतात की, आजही हे पवित्र रांजण या देवळात पहायला मिळतात. तसेच ज्या दिवशी नवी चिनी मातीची भांडी किंवा सुरई, रांजण खरेदी करतात त्या दिवशी नाच-गाणे करून आनंदोत्सव साजरा करतात. भांडी खरेदीचा हा दिवस शुभ दिवस मानला जातो.

# २.२७ पावशेगो

(हस्त नक्षत्रातल्या पावसाची गोष्ट)

एक होती सासू व एक होती सून. सून कित्येक दिवसांत माहेरी गेलेली नसल्यामुळे फार कंटाळली होती. एके दिवशी तिला बोलवायाला माहेराहून माघारी आला. मग काय विचारता? सुनेने ताबडतोब निघायची तयारी केली. तेव्हा सासू म्हणाली ' मुली,गुरांना तेवढे पाणी दाखव आणि मग जा.' पण सून काय-उतावळी झालेली ! तिने कोठिंब्यांत शेण कालवले ते गुरांपुढे ठेवले व सासूला येऊन म्हणते, ' दाखवले पाणी गुरांना!' पण सासूला नवल वाटले की इतक्या लवकर कसे पाणी दाखवून झालें ? म्हणून ती स्वतः पहायला गेली. पहाते तो पाण्यांत शेण कालविलेले. तेव्हा तिने रागाने कोठिंबा सुनेच्या डोकीत मारला व तिला शाप दिला की तुला पाणी म्हणून प्यावयाला मिळणार नाही. फक्त हस्त नक्षत्रांत एक थेंब पाणी मिळेल. पुढे सून मेली. व आता ती पाखरू होऊन 'पावशे गो' असे ओरडत असते. पण तिला काही पाणी मिळत नाही. फक्त हस्त नक्षत्रांत एक थेंब मिळतो.

(शंकर गणेश दाते : लोककथा)



# ३

# सृष्टीकथा


३.१. आदिमानवाची चंद्रावर स्वारी २५५

३.२. चंद्रावर हल्ला २५९

३.३. पृथ्वीवर अवतरली चंद्रिका २६३

३.४. साळींदरची प्रकाशभेट २७०

३.५. सूर्य आणि चंद्र २७७

३.६. एक होती कळी २७९

३.७. अग्नीची अख्यायिका २८२

३.८. जो चंद्रावर उडून गेला तो २८४

३.९. चंद्रावरील मुलगी २८७

३.१०. चंद्र-सूर्याच्या घरी पाणी २९०

३.११. इंद्रधनुष्य २९२

३.१२. प्यूँली २९५

३.१३. यी तेजदेवता २९९

३.१४. कृत्तिका नक्षत्राची गोष्ट ३००

# ३.१ आदिमानवाची चंद्रावर स्वारी

(ब्रह्मदेशातली लोककथा)

आज आपण जगभरात जेवढी लोकसंख्या पाहातो, तेवढी एके काळी नव्हती. या जगात खूप कमी लोक राहत होते. तेव्हा आजच्यासारखी शहरे नव्हती. प्रत्येक जण उंच बर्फाच्छादित डोंगरांच्या दरीत राहत असत. डोंगरात रहाणाऱ्या या लोकांना 'चीन्स' म्हणत. या सगळ्यांची एकच भाषा होती. त्याकाळी आजच्यासारखे अनेक भाषा बोलणारे लोकसमूह नव्हते. एकच भाषा असल्यामुळे त्यांचा परस्परांमध्ये उत्तम संवाद होत असे. त्यामुळे सर्वांमध्ये मैत्रीचे नाते होते. चीन्स लोकांना निसर्गातच अन्नधान्याची, भाज्याफळांची मुबलक उपलब्धी असल्याने त्यांना कशाची म्हणून चिंता नव्हती. बर्फ वितळल्यावर डोंगरावरून धबधब्याचे पाणी पडायचे, नदीत भरपूर मासे मिळायचे. सगळे सुबत्तेचे, आनंदाचे वातावरण असायचे. दारिद्र्य, गरिबी हे शब्दही नव्हते. प्रत्येक जण आपल्या गरजेपुरती शेती करायचे. शेतीची कामे आटोपली की मोकळा वेळ मिळायचा. या मोकळ्या वेळात हे लोक दूरदूरच्या जंगलात, हिरवळीत सहली काढायचे. एक वाघाची भीती सोडली तर त्यांना कशाची म्हणून चिंता नव्हती.

इतके साधे सरळ जीवन जगणाऱ्या लोकांना एक प्रश्न मात्र कायम सतावत होता. तो म्हणजे आकाशात दिसणारा चंद्र. हा चंद्र कधी खूप मोठा, तेजस्वी, गोलाकार दिसायचा आणि कधी अगदी कोयत्याच्या कोरीसारखा दिसायचा. सतत इकडून तिकडे फिरणारा, आकार बदलणारा हा चंद्र पाहून या लोकांना अनेक प्रश्न पडायचे. त्यांच्या दिनक्रमावरही त्याचा परिणाम व्हायचा. त्यामुळे चंद्र हा या लोकांच्या चर्चेचा एक महत्त्वाचा विषय बनला होता.

एके दिवशी एक माणूस बांबूचे कोवळे कोंब आणि हिरवा भाजीपाला घेऊन वस्तीवरच्या बाजारात आला होता. आपल्या मनाला कायम सतावणाऱ्या

चंद्राविषयी तो आपल्या मित्रांशी बोलत होता. “हा चंद्र का असा सतत भटकत असतो? माझे हात जर त्याच्यापर्यंत पोहचण्याइतके लांब असते, तर मी नक्कीच या उनाड भटक्या चंद्राला पकडून आणले असते; आणि त्याला थेट आपल्या गावातल्या खांबाला बांधून घातले असते. या गोलाकार चेंडूला पकडून मुलांना खेळायला दिला असता.”

बाजारात शेंगा विकायला आलेली एक बाई त्या बांबूचे कोंभ विकणाऱ्या माणसाला म्हणाली, “अरे बाबा, तू वेडा का खुळा? हा चंद्र म्हणजे एक फार मोठा धातूचा गोळा आहे. एवढा जड गोळा तुझ्या हातात येणार नाही, आणि मुलांना तर त्याच्याशी नक्कीच खेळता येणार नाही.” आकाशात भटकणारा चंद्र हा एक धातूचा गोळा असल्याची नवीच माहिती ऐकून लोकांना आश्चर्य वाटले. ते त्या चंद्राकडे संशयाने पाहू लागले. एकाला वाटले, “असेना का हा धातूचा गोळा. तसे असेल तर आपण त्याच्यापासून शेतीची अवजारे तयार करू.”

दुसरा एक तरुण मुलगा म्हणाला, “अरे तुम्हाला सांगतो, या आकाशात भटकणाऱ्या चंद्राच्या पोटात एक दिवा आहे. काल रात्री मी असाच जंगलात फिरायला गेलो होतो, तेव्हा मी त्याच्या पोटातला दिवा पाहिला. त्याचा उजेड इतका स्पष्ट होता की, त्या उजेडात मला लांबून येणारा वाघ दिसला. त्या दिव्यामुळेच मी वाचलो.”

हे ऐकून तिसऱ्या माणसाला उत्साह आला. तो म्हणाला, “अरे या चंद्राला आपल्याला पकडता आलं तर रोज संध्याकाळी-रात्री आपल्या सगळ्यांना त्याच्या उजेडात फिरता येईल. वाघाची भीतीही जाईल. पकडायलाच हवे आपण त्याला!” मात्र त्याच्यापर्यंत पोहचायचे कसे हा प्रश्न काही सुटत नव्हता. सगळ्यांना वाटायचे, आपल्याला उंच हात हवे होते! यावर उपाय काय, यावर बरीच उलटसुलट चर्चा होत राहिली.

प्रत्येकाने आपापली मतं मांडल्यावर सर्वांनी मिळून एक निर्णय घेतला. काही झालं तरी आपण चंद्रापर्यंत पोहचायचंच. पर्वतराजीवरच्या सर्व माणसांनी एकत्र येऊन एक भले थोरले, उंच मचाण बांधायचे ठरवले. आजच्या भाषेत सांगायचे तर एक मोठा टॉवर बांधायचा निर्णय झाला. त्यानुसार कामाची

विभागणी करण्यात आली. पूर्वेकडच्या खोऱ्यातल्या लोकांनी विटा बनवण्यासाठी माती आणायची. पश्चिमेकडच्या लोकांनी उंच झाडांचे लांबसडक खांब आणायचे. दक्षिणेकडच्या लोकांनी बांबूच्या मोळ्या आणायच्या. उत्तरेकडच्या लोकांनी मचाणाचा मजबूत पाया घालण्यासाठी पर्वतावर खोल खड्डा खणायचा.

ठरलेल्या नियोजनानुसार सर्व जण कामाला लागले. खड्यात काही खांब रोवून ते एकमेकांना घट्ट बांधून पाया तयार करण्यात आला. त्यावर झाडाच्या फांद्या आणि बांबूंच्या दांड्यांनी भिंती आणि पायऱ्या रचण्याचे काम सुरू झाले. खूप उंचापर्यंत असे बांधकाम झाले तरी चंद्राच्या जवळपासही पोहचता येईना. चारी दिशांना जाऊन लोक बांधकामाची सामग्री जमा करायचे, पण पुन्हा पुन्हा सामग्री गोळा करायला जाताना दमछाक होऊ लागली. पण तरीही हार न मानता प्रत्येक जण या थकव्यावर मात करण्यासाठी एकमेकांना दिलासा देऊ लागले. एक जण म्हणाला, “आता लवकरच आपलं ध्येय साध्य होईल.” काही दिवसांनी दुसरा म्हणाला, “आता फार वेळ लागणार नाही, चंद्राचा दिवा स्पष्ट दिसू लागला आहे.” पण नंतर पुन्हा काही दिवसांनी दिव्याचा आकार छोटा व्हायचा, उजेड मंद व्हायचा. पुन्हा एकदा लोकांमध्ये अस्वस्थता यायची.

टॉवर चांगलाच उंच झाला होता. पण लोक म्हणू लागले, “दिवसभर कामापेक्षा चढ-उतार करण्यातच आपला वेळ जातो, आणि दमवणूकही होते. खायला-प्यायला वेळ मिळत नाही, मुलांकडे लक्ष देता येत नाही, अशा तक्रारी सुरू झाल्या. त्यावर एका म्हाताऱ्या अनुभवी माणसाने तोडगा काढला. तो म्हणाला, “असं पहा, सर्वांनी सारखी चढ-उतार करून दमण्यापेक्षा आपण थोडी कार्यविभागणी करू. काही लोक सर्वात वरच्या मचाणावर म्हणजे वरच्या टॉवरवरच थांबून पुढचे काम करीत राहतील. त्यांनी खाली-वर चढ-उतर करण्याचे कारण नाही. काही लोक मधल्या भागावर थांबून खालून येणारी सामग्री वरच्या माणसांना पोहचवतील. तळमजल्यावरील लोक बांधकामाचे साहित्य आणि अन्नपदार्थ तयार करून वरच्या पातळीवर काम करणाऱ्यांना पाठवत राहतील. सर्वांना ही कार्यविभागणी मान्य झाली.

काही काळानंतर असे लक्षात आले की, तळमजल्यावरच्या रसद पुरवणाऱ्या लोकांना सर्वात जास्त कष्ट करावे लागत आणि त्या तुलनेत सर्वात उंच स्थानावर काम करणाऱ्या लोकांना उसंत मिळू लागली, आराम करता येऊ लागला. उंचावरून दिसणाऱ्या सृष्टीसौंदर्याची मजा चाखता येऊ लागली. काम थोडे आणि आनंद जास्त! तळमजल्यावरच्या लोकांना कामाचा ताण पडू लागला आणि आनंदापेक्षा ते कष्टाचेच धनी झाले. वरच्या मजल्यावरच्या लोकांचा खालच्या मजल्यावरील लोकांशी असलेल्या संबंधात दुरावा निर्माण होऊ लागला. टॉवर मात्र बांधून झाला नाही.

हळूहळू तळाच्या लोकांना सर्वांसाठी अन्नधान्य पिकवण्याचा, अवजड सामान गोळा करून वरच्या मजल्यावर पाठवण्याचा शीण येऊ लागला. त्यांनी वरच्या मजल्यावर रसद पाठविण्याचे काम थांबवले. वरच्या मजल्यावरचे लोक भुकेने तडफडून मरू लागले. बरेच लोक आपण चंद्राला पकडण्यासाठी टॉवर बांधण्याचे कार्य हाती घेतले आहे, हेच विसरले, आणि ते टॉवरवरून खाली उतरून या प्रकल्पापासून दूर निघून गेले.

या टॉवरचे पुढे काय झाले, हे आज कुणालाच सांगता येत नाही. कुणी म्हणतात, या बांधकामामुळे चंद्रच वैतागला, आणि त्यानेच या टॉवरला ढकलून दिल्याने तो धडाधड कोसळला. कुणी म्हणतात, मोठे वादळ आले आणि त्यात टॉवर कोसळला. अशा बऱ्याच समजुती असल्या तरी या पर्वतराजीतल्या चिन्सच्या वंशावळीतली मुलं मात्र आपल्या पूर्वजांच्या या ध्यासाला विसरली नाहीत. नाना प्रकारच्या युक्त्या-प्रयुक्त्या लढवून चंद्राला आपल्या ताब्यात घेण्याचा त्यांचा प्रयास अजूनही चालूच आहे. चंद्रही दूरून माणसांच्या या खेळाकडे गंमतीने पहात आहे.

[असे म्हणतात की, चिन्स जमातीची माणसं पुढे प्रगत झाली. त्यांनी आपल्या तंत्रज्ञानात खूप प्रगती केली. त्यांनी चांद्रयान तयार केले आणि चंद्रावर स्वारी करून त्यावर आपला झेंडा रोवला. चंद्रातला दिवा मात्र याकडे मजेनेच पाहतो आहे, आणि त्याने अजून उजेड देण्याचे काम थांबवलेले नाही! ]

# ३.२ चंद्रावर हल्ला

(कोरियन लोककथा)

कोणे एके काळी पृथ्वीवर डोंगरांच्या घळ्यांमध्ये तारा राजाचे राज्य होते. सर्व बाजूंनी उंचच उंच डोंगर आणि चहुबाजूंनी पसरलेलं घनदाट जंगल यामुळे इथे अंधाराचेच राज्य असायचे. राजाने आपल्या प्रजेला किमान गरजेपुरता का होईना प्रकाश देण्यासाठी म्हणून खास योजना आखली होती. डोंगररांगाच्या मधोमध सपाट भूपृष्ठावर अखंड पेटलेल्या धुनीची राजाने व्यवस्था केली होती. अग्नीची होळी पेटविण्यासाठी नित्यनेमाने मोठमोठे ओंडके आणून टाकणे ही काही साधी गोष्ट नव्हती. सर्वसामान्य माणसांच्या आवाक्यात न येणारी ही कामगिरी पार पाडण्यासाठी राजाने मोठमोठे दणकट बांध्याचे कुत्रे पाळले होते. वादळवाऱ्यात, पावसापाण्यात हे कुत्रे टनावारी लाकडाचे ओंडके वाहून आणत. 'अग्नीश्वान' या नावाने हे कुत्रे ओळखले जात.

आकाशात एक प्रखर उष्णता देणारा तेजस्वी दिवा असल्याची वार्ता राजाच्या कानावर आली होती. असा कायम प्रकाश आणि उष्णता देणारा दिवा आपण आपल्या राज्यात आणला तर सर्व प्रजाजनांची कायमची सोय होईल, या कल्पनेने त्याला पछाडले होते. अखेर एके दिवशी त्याने राजदरबारातील मंत्रीगणांपुढे हा प्रस्ताव ठेवला. हा तेजस्वी दिवा आपण प्राप्त करू शकलो तर आपल्या राज्यातला अंधार कायमचा दूर होईल. हा दिवा कसा प्राप्त करता येईल, याविषयी दरबारात चर्चा सुरू झाली.

एवढा मोठा शक्तिशाली दिवा आणायचा तर त्यासाठी तेवढ्याच ताकदीची माणसे पाठवावी लागतील. तशी माणसे आपल्याकडे नाहीत, त्यामुळे तेजस्वी दिवा प्राप्त करणे हे दिवास्वप्नच ठरेल, असे सर्व मंत्रीगणांचे मत पडले. शेवटी राजालाच पर्याय सापडला. ही कामगिरी आपल्या पदरी असलेल्या अग्नीश्वानांकडे सोपविण्याचा पर्याय मांडण्यात आला. सर्वात शक्तिशाली

अग्नीश्वानाला दरबारात पाचारण करण्यात आले. राजाने या महाअग्नीश्वानाला आपली कल्पना सांगितली. राजाने आपल्यावर जो विश्वास दाखविला त्याने प्रसन्न होऊन महाअग्नीश्वानाने 'भुंकार' करून प्रस्तावाला संमती दिली.

राजाज्ञा घेऊन महाअग्नीश्वान तत्काळ आपल्या कामगिरीवर निघाला. मोठमोठे ओंडके वाहून आणण्याच्या आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या सत्वपरीक्षेची वेळ आली आहे, या भावनेतून त्याने आपला प्रवास सुरू केला.

राज्याच्या सर्व हद्दी पार करून पृथ्वीच्या टोकाशी येऊन पोहोचल्यावर महाश्वानाला आकाशात प्रकाशणारा तो तेजस्वी दिवा दिसला. दीर्घ श्वास घेऊन त्याने आकाशाच्या दिशेने छलांग लावली. त्या तेजोगोलाच्या जवळपास तो पोहचला होता. त्याने आपल्या पुढच्या पायांचे पंजे पसरून ओंजळीत तो दिवा पकडण्यासाठी झेप घेतली खरी, पण त्याचे पंजे भाजून निघाले. दिवा तर हाताला लागलाच नाही, पण त्या दिव्याच्या अग्निज्वालांनी त्याचा महाकाय देह बटाट्यासारखा भाजून निघाला. रिकाम्या हातानेच त्याला परत फिरावे लागले.

राजापुढे जाऊन महाश्वानाने मान खाली घातली. राजाने काय झाले ते ओळखले. आपले अग्नीश्वान कर्तव्यात कुचराई करणार नाहीत, याची राजाला खात्री होती. त्याने महाश्वानाचे सांत्वन केले आणि एवढे धाडस हसत हसत स्वीकारले म्हणून त्याचे कौतुकच केले.

अर्थात राजाच्या डोक्यातून आकाशातला चमकणारा दिवा आणण्याची कल्पना हद्दपार झालेली नव्हती. हा प्रखर तेजस्वी दिवा मिळाला नाही, तरी आकाशात चमचमणारा आणखी एक तेजस्वी दिवा आहे, तो मिळवण्यासाठी काय करता येईल या विचारात तो गढून गेला. पण आता महाअग्नीश्वानाच्या तोडीचा दुसरा अग्नीश्वान दिसेना. अखेर महाराजांनी परत मंत्रीसभा बोलावली. प्रखर उष्णतेचा दिवा आपल्याला मिळवता आला नाही, तरी आपण दुसरा नुसताच चकाकणारा आकाशातला थंड दिवा आणण्यासाठी प्रयत्न करण्याची कल्पना राजाने सर्वांसमोर मांडली.

या मोहिमेवर कुणाला पाठवावे याविषयी खलबते सुरू झाली. राज्याच्या सरसेनापतींनी अग्नीश्वानदलातील फारसा अनुभवी नसलेला एक तरणाबांड कुत्रा आणून समोर उभा केला. हे काम त्याच्या कुवतीबाहेरचे आहे, असे राजासकट दरबारातील सर्व मानकऱ्यांचे मत पडले. पण सरसेनापती म्हणाले, या युवाश्वानाने महाश्वानासारखे जड ओंडके जरी वाहून आणले नसले, तरी जंगलात सर्वदूर पसरलेली जास्तीत जास्त लाकडे गोळा करून आणण्यात त्याचा हातखंडा आहे. त्याचा स्वभाव जिद्दी असून काम फत्ते केल्याशिवाय तो जंगलातून परत येत नाही. तेव्हा नव्या दमाच्या या युवाश्वानाला ही कामगिरी देऊन पहावी, असा प्रस्ताव सेनापतींनी आत्मविश्वासाने मांडला. प्रयत्न करून पहायला हरकत नाही, असे म्हणून सर्वांनी या प्रस्तावाला संमती दिली.

राजाज्ञा मिळताच युवाश्वान राजवाड्यातून बाहेर पडला. नदीत सचैल स्नान करून त्याने आपले अंग ताजेतवाने करून घेतले; आणि मजल दरमजल करीत तो टेकड्या ओलांडून पृथ्वीच्या टोकाला येऊन पोहचला. सगळीकडे अंधारून आले होते. अजून चंद्रोदय व्हायचा होता. तोपर्यंत पुरेशी विश्रांती घेऊन तो आकाशात पेटणाऱ्या दिव्याची वाट पहात राहिला.

आता चंद्रोदय झाला होता. गोल चेंडूसारखा हा दिवा आपल्या पंजात मावेल का, तो निसटून तर जाणार नाही ना, याचा स्वत:शी अंदाज घेतला. पंजात दिवा पकडण्याची योजना त्याने सोडून दिली. त्याचा त्याच्या जबड्यावर जबरदस्त विश्वास होता. जंगलात लचके तोडून त्याने वाघाला सुद्धा जेरीस आणले होते. त्याने स्वत:भोवती एक मोठी गिरकी घेतली आणि पक्ष्यासारखा तो आकाशात झेपावला. त्याचा वेग इतका होता की, जमिनीवरील झाडे हलून वादळ निर्माण झाले. वाऱ्याच्या भोवऱ्यांतून तो भेंडोळ्यासारखा वर भिरकावला गेला. पांढऱ्या शीतल दिव्याच्या गारठ्याने त्याचा देह कुडकुडू लागला. पण जिद्दी युवाश्वान हटला नाही. त्याने आपल्या जबड्यातले दात त्या थंडगार गोळ्यात खुपसले आणि झटकन लचका तोडला. सगळाच्या सगळा दिव्यगोल त्याच्या तोंडात मावणारच नव्हता. म्हणून एकेक लचका तोडून आणायचे त्याने ठरवले.

एकामागून एक लचके तोडल्याने चंद्रगोल क्षीण होत गेला. तोंडातले दात पडल्यावर तोंडाचे बोळके व्हावे तसा तो खपाटीला लागला. अर्ध्या भाकरीसारखा दिसू लागला. आता सगळीच्या सगळी भाकरी आपण हडप करू अशा मिजाशीत युवाश्वानाचा हल्ला सुरूच होता.

आकाशातला हा चंद्रदिवा बर्फापेक्षाही शीतल असल्याने युवाश्वानाचा जबडा गोठून बधिर झाला. त्याच्या जबड्याची हालचाल थांबली. तोंडातले चंद्रगोळे ओघळून पडले आणि पुन्हा चंद्रदिव्यात मिसळून गेले. अर्ध्या भाकरीचा चंद्रदिवा पूर्वीसारखाच गोलाकार झाला.

युवाश्वान जिद्दीचा होता. त्याने पुन्हा आपली आघाडी सुरू केली. पुन्हा चंद्रदिव्याचे लचके तोडले, चंद्रदिवा रोडावत गेला.. पुन्हा चंद्रदिव्याच्या शीतल थंडीत जबडा बधिर झाला. चंद्रगोळे निसटून पुन्हा मुळच्या रूपात जोडले गेले. हा खेळ बरेच दिवस चालू राहिला. चंद्रदिवाही हट्टी आणि युवाश्वानही हट्टी. कुणीच मागे हटायला तयार नाही. तारा राजा अजूनही त्या युवाश्वानाची वाट पहात आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. जिद्दी युवाश्वानाची चंद्रावरची स्वारी अजून पराभूत झालेली नाही. आजही लचके तोडले गेल्याने चंद्रदिवा रोड होतांना दिसतो, कधी अर्ध्या भाकरीसारखा, कधी वाकलेल्या म्हाताऱ्या काठीसारखा, कधी अगदीच विरघळून दिसेनासा होणारा आणि पुन्हा एकदा अंगभर फुगणारा!



# ३.३ पृथ्वीवर अवतरली चंद्रिका

(जपानी लोककथा)

तशी ही जुनीच गोष्ट आहे. जपानमधल्या बांबुबनातली आहे. एक गरीब म्हातारा नित्यनेमाने बांबूबनात यायचा. तिथून बांबूची रोपे जमा करायचा. रोपे विकून आपली उपजीविका करायचा. एके दिवशी धारदार कोयता घेऊन म्हातारा बांबूबनात गेला होता. त्याने कोयत्याने एक बांबूची फांदी कापली. त्याबरोबर बांबूच्या पोकळीतून चंद्रकिरणासारखी प्रकाशाची रेषा बाहेर आली. ही प्रकाशरेषा चंद्रासारखीच शीतल आणि धवलशुभ्र होती. हे अघटित दृष्य पाहून म्हातारा चक्रावून गेला. तरीही त्याने शांत मनाने ती बांबूची फांदी बुडापासून कापून बाजूला काढली. त्याने मोठ्या कुतुहलाने त्या बांबूच्या पोकळीत डोकावून पाहिले. त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. बांबूच्या पोकळीत अलगद एक नवजात बालिका झोपलेली होती. हिरव्या देठासारखी कोवळी आणि अलवार. त्या सुकुमारिकेकडे तो पहातच राहिला. बालिकेच्या चेहऱ्यावर चंद्रासारखे शीतल तेज पसरले होते. रंगाने ती तशीच उजळ होती. या बांबूच्या उपवनात आपल्याला ही फारच मौल्यवान भेट मिळाली आहे, हे पाहून तो सुखावला. आजूबाजूला आपल्याला कुणी पहात नाही ना, हे पाहून घेतले आणि अलगदपणे त्याने ते बाळ उचलून घेतले. त्यानंतर डोक्यावरचे उपरणे टोपलीत अंथरले आणि त्यावर त्या सुकुमार बालिकेला झोपवले. तिला जराही धक्का लागणार नाही, याची काळजी घेत तो टोपलीतून बालिकेला घरी घेऊन आला.

या म्हाताऱ्या जोडप्याला मुलबाळ नव्हते. त्यामुळे परमेश्वराचा प्रसाद समजून त्यांनी त्या बाळाचा सांभाळ करायचे ठरवले. दिवसेंदिवस चंद्रकलेसारखे बाळाच्या चेहऱ्यावरचे तेज अधिकाधिक उजळ होत गेले. त्यामुळे त्यांनी तिचे नाव 'चंद्रिका' ठेवले.

बाळाला जोजवण्यात दिवस मजेत जात होते. पण पोटपाण्यासाठी बांबूबनात जाऊन रोपे काढण्याचे काम करायलाच हवे होते. म्हणून म्हातारा कोयता घेऊन बांबूबनात गेला. त्याने बांबूची पहिलीच फांदी तोडली आणि आजही तसाच चमत्कार घडला. कापलेल्या बांबूच्या पोकळीत सोन्याची नाणी भरलेली होती. म्हाताऱ्याने आपल्या उपरण्यात ती नीट बांधून घेतली आणि तो तडक घराकडे निघाला.

म्हाताऱ्याला हा अनुभव नवाच होता. पण पुढे पुन्हा पुन्हा हा अनुभव येत गेला. कधी बांबूच्या पोकळीत मोती मिळाले, कधी नाणी! गरीब म्हाताऱ्याचे दिवस पालटले. थोड्याच दिवसात तो श्रीमंत झाला. पण त्याला या श्रीमंतीचा गर्व चढला नाही. त्याच्या लेखी हा जादूई पैसा होता. अंगमेहनतीतून मिळालेला नव्हता. त्यामुळे वेड्यासारखे खर्च करून हे पैसे उधळणे त्याच्या मनाला पटत नव्हते. चंद्रिकेच्या भविष्यासाठी, तिला शिकवून मोठे करण्यासाठी हे पैसे राखून ठेवले पाहिजेत, या भावनेने तो काटकसरीनेच राहत होता.

चंद्रिका मोठी झाली. म्हाताऱ्याने तिच्यासाठी चांगले शिक्षक शोधले. आपली चंद्रिका सर्व विषयात पारंगत झाली पाहिजे म्हणून त्याने गुरुजींना भरभरून दक्षिणा दिली. चंद्रिकेची समज फार उत्तम होती. कुठल्याही गोष्टीचे तिला चटकन आकलन व्हायचे. शिक्षणातील तिची ही प्रगती पाहून तिचे शिक्षक तिच्यावर खूष होते. चंद्रिकेने अभिजात जपानी कविता वाचल्या. या कवितांचे पठण-मनन करून तिने त्या आपल्या मनात जपून ठेवल्या. हळू हळू तीही कविता लिहू लागली. चंद्रकोरीसारखेच दिसणारे तीन-चार ओळींचे जपानी हायकू आणि सोबत त्या कवितेला साजेसे चित्र ती रेखाटू लागली.

‘आकाशाच्या बागेत
उमलली फुले
चमेलीचा गंध
आभाळभर दरवळे.’

**किंवा**

'पाखरू भिरभिरलं
फांदीभर फिरलं
फुलांमध्ये विसावलं.'

तिने अशा कितीतरी कविता लिहिल्या. रेशमी कपड्यांवर चित्रं रंगवली. संगीत शिकली. सकाळ-संध्याकाळ तिच्या ओठांवर गाणं असायचं. साधी-सरळ पण गोड स्वभावाची ही लोभसवाणी मुलगी सर्वांना आवडायची.

चंद्रिका आता वयात आली होती. डोक्यावरचे लांबसडक केस, बदामी डोळे, गालावर पडणारी खळी आणि पौर्णिमेच्या चांदण्याला लाजवेल असा गोरा रंग यामुळे सगळ्या परिसरात ती उठून दिसायची. आभाळातल्या परीसारखी दिसणारी चंद्रिका कधी कधी खिडकीतून बराच वेळ चंद्राकडे टक लावून पहात बसायची. कधी तिचा चेहरा कोमेजल्या फुलासारखा मलूल व्हायचा. एवढी आनंदी मुलगी अशी अचानक कशी काय हिरमुसून बसते, याचे घरातल्या लोकांना आश्चर्य वाटायचे. बाहेरच्या जगात मात्र 'सौंदर्याची पुतळी' अशीच तिची ख्याती होती. तरुणांच्या लेखी तर ती स्वप्नातली परीच होती. ते तिला पत्र लिहायचे, छान छान भेटवस्तू पाठवायचे. पण चंद्रिका त्याकडे ढुंकूनही पहायची नाही. सगळ्या भेटवस्तू ज्याच्या त्याला परत जायच्या. चंद्रिका नेमकी कशात हरवली आहे, हे कुणालाच समजत नव्हतं.

अखेर तिच्या बाबांनीच पुढाकार घेतला. आपल्या या नाजूक कन्येचं तशाच एखाद्या छानशा राजकुमाराशी लग्न लावून द्यावं, असं त्यांनी ठरवलं. बाबांनी चंद्रिकेची मनधरणी केली. "हे वय लग्नाचं आहे. तुझ्या लग्नाने आम्हाला किती आनंद होईल. तुझ्या सुखातच आमचं सुख आहे. तेव्हा तुला आवडेल त्या राजकुमाराशी तू लग्न कर. तुला आपला वर निवडण्याचं स्वातंत्र्य आहे." पण चंद्रिकेची कळी खुलेना. अखेर एके दिवशी तिने बाबांना खरं काय ते सांगून टाकायचं ठरवलं. ती म्हणाली, "बाबा, माझं तुमच्यावर जिवापाड प्रेम आहे. तुमच्या मनाविरूद्ध आपल्या हातून काहीही घडू नये, याची मी नेहमी काळजी घेते. पडत्या फळाची आज्ञा पाळावी, तसा तुमचा शब्द झेलते. पण तुम्ही

लग्नाचं म्हणता ते मात्र मला शक्य नाही. पृथ्वीवरच्या कुठल्याच तरुणाशी मला लग्न करायचं नाही, करता येणारही नाही. मला तुम्ही तसा आग्रह करू नका."

बाबांना चंद्रिकेच्या मनाविरूद्ध काहीही होऊ द्यायचे नव्हते. त्यांनी चंद्रिकेच्या भूमिकेला पाठिंबा दिला. चंद्रिकेशी विवाह करू इच्छिणाऱ्या सर्व सुकुमार तरुणांना त्यांनी चंद्रिकेचा मनोदय कळविला. सगळे तरुण निराश झाले आणि परत फिरले.

दरम्यान एक तरुण चंद्रिकेच्या झोपडीत आला. गळ्यात सोनसाखळी, अंगात रेशमी कुडता घातलेल्या या तरुणाने तिच्यासाठी एक पत्र आणलं होतं. रेशमी वस्त्रात गुंडाळलेलं ते पत्र त्याने तिला दिलं. पत्र जपानच्या सम्राटाचं होतं. सम्राटाने चंद्रिकेला राजगृहात येण्याचं निमंत्रण दिलं होतं. पण चंद्रिकेनं नम्रपणे त्याला नकार दिला. राजदूताने चंद्रिकेला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. राजाचे पत्र हा राजाचा आदेश असतो. तो पाळायलाच हवा असंही सांगतो. चंद्रिकेचे बाबाही राजाज्ञेचा अवमान करू नको, म्हणून तिची समजूत काढू लागले. आपण ही राजाज्ञा पाळली नाही तर मृत्यूदंडही होऊ शकतो, याची कल्पना दिली. पण चंद्रिका आपल्या निर्णयावर ठाम होती.

चंद्रिकेने बाबांना सांगितले, "तुम्ही काळजी करू नका बाबा. मीच महाराजांना पत्र लिहून माझी भूमिका कळवते." असे म्हणून तिने सम्राटाला कवितेतून उत्तर पाठविले-

"नाईटिंगेलला भेटायचं तर बागेतच जायला हवं
तिच्याशी बोलायचं तर गायलाच हवं
गाणारा कुणीही नाईटिंगेलला आवडतो."

राजदूताने चंद्रिकेचं पत्र सम्राटाला दिलं. तिच्या कवितेनं सम्राटाचा राग दूर झाला. तिला भेटण्याची त्याची इच्छा अधिकच प्रबळ झाली, आणि तो चंद्रिकेकडे निघाला. राजमहालातून निघाला आणि चंद्रिकेच्या झोपडीत आला. बाबांनी आणि चंद्रिकेने मिळून सम्राटाचे स्वागत केले. राजाने चंद्रिकेशी मनसोक्त गप्पा मारल्या. चंद्रिकेच्या ओठातून बाहेर पडणारे शब्द त्याला

खडिसाखरेसारखे गोड वाटत होते. तिची बोलण्याची लकब, वागण्यातली आदब, आणि सौंदर्याचा शिडकावा यामुळे राजा खूष झाला. तो आनंदाने म्हणाला, “आजचा दिवस माझ्यासाठी भाग्याचा आहे. जपानच्या सम्राटाला साजेशी रूपगुणसंपन्न महाराज्ञी गवसल्याचा हा क्षण माझ्यासाठी सर्वात आनंदाचा क्षण आहे. हा राजा चंद्रिकेला रीतसर लग्नासाठी मागणी घालत आहे.”

चंद्रिका शांतपणे राजाला म्हणाली, “महाराज, तुमच्या भावना माझ्यापर्यंत पोहचल्या. पण मला तुमच्याशीच नव्हे तर पृथ्वीतलावरच्या कोणत्याही पुरुषाशी विवाह करता येणार नाही. आपला अवमान करण्याचा माझा उद्देश नाही, पण मी मुळी या पृथ्वीवरची भूकन्याच नाही. दुसऱ्या ग्रहावर रहाणारा माझा बाप केव्हाही येऊन मला आपल्या घरी घेऊन जाईल. मी त्या क्षणाची वाट पहात थांबले आहे.”

आता मात्र राजाला चंद्रिकेचे बोलणे उद्धटपणाचे वाटले. त्याच्या मनात राग दाटून आला. तो चंद्रिकेला म्हणाला, “स्वर्गातला देवसुद्धा तुला इथून नेऊ शकणार नाही. हे माझे राज्य आहे, आणि या राज्यातल्या प्रत्येक गोष्टीवर माझी मालकी आहे. येऊ दे तुझ्या पित्याला, तो कसा तुला घेऊन जातो, ते पाहतोच.” राजाने चंद्रिकेच्या घराभोवती हजारो सैनिकांचा पहारा बसवला, आणि तो राजवाड्यात परतला.

पौर्णिमेच्या दिवशी चंद्रिकेने राजाला पत्र लिहिले. ‘लवकरच मी पित्याच्या घरी जात आहे, आता आपली समक्ष भेट होणार नाही, म्हणून पत्राद्वारे आपल्याला सर्व शुभेच्छा!’

पत्र वाचताच राजा चंद्रिकेकडे जायला निघाला. हळूहळू दिवस मावळला. वाटेत अंधार पडला. चंद्रोदयाची वेळ झाली होती, पण आकाश काळ्या ढगांनी भरून आले होते. राजाला काही केल्या आजूबाजूचे दिसेना. अखेरीस तो कसातरी धडपडत चंद्रिकेच्या बागेत येऊन तिथेच विश्रांतीसाठी थांबला.

काही वेळाने काळवंडलेल्या ढगांतून एक मोतिया रंगाचा रथ येताना

दिसला. रथात चंद्रासारखाच गोरापान, रेशमी वस्त्रे ल्यालेला तेजस्वी माणूस बसलेला दिसला. रथाचे चंद्रिकेच्या अंगणात आगमन झाले. तो तेजस्वी माणूस रथातून पायउतार झाला आणि त्याने म्हातारबाबाला सांगितले, "मी चंद्रिकेला घेऊन जाण्यासाठी आलो आहे." बाबाला हे परक्या माणसाचे सलगीचे बोलणे आवडले नाही. त्याने धाडकन् दरवाजा लावून घेतला. पण लगोलग दारे-खिडक्या आपोआप उघडल्या गेल्या. त्या चांद्रदूताने चंद्रिकेला हाक मारली, "तुझ्या वडिलांनी तुला नेण्यासाठी रथ पाठविला आहे, तू बाहेर ये."

चंद्रिका, म्हातारबाबा आणि आजी बागेत आले. बाबांनी चंद्रिकेला मिठी मारली आणि ते रडू लागले. आजी म्हणाली, "अगं तुला मुलीसारखं वाढवलं, आणि आज अशी अचानक आम्हाला सोडून कशी जाते?"

चंद्रिकेने म्हाताऱ्या बाबांची आणि आजींची समजूत काढली. म्हणाली, "माझे वडील चांद्रवनाचे राजे आहेत. मी त्यांची एकुलती एक कन्या आहे. तुमच्यासारख्या दयाळू लोकांच्या सहवासात राहून तुमचा आनंद वाढवावा म्हणून त्यांनीच मला पृथ्वीवर पाठवण्याची योजना आखली होती. मला वाटते आता माझे काम पूर्ण झाले आहे. शिवाय मी जरी इथून निघून जात असले, तरी तुम्हाला कधीच दूरावणार नाही. आकाशातून मी रोज तुम्हाला पाहीन आणि पृथ्वीवरून रोज तुम्ही माझी डोळाभेट घेऊ शकाल."

चांद्रदूताने घाई केली. सूर्योदयापूर्वी त्याला परतायलाच हवे होते. चंद्रिकेने जड अंत:करणाने म्हातारबाबा आणि आजींचा निरोप घेतला. सम्राटासाठी तिने बाबांजवळ एक बाटली दिली. म्हणाली, "महाराजांना ही बाटली द्या. त्यातले पेय प्याल्यावर त्यांचे मन शांत होईल. त्यांना म्हणावं, मला माफ करा. माझ्या मनात जपानच्या सम्राटाविषयी जराही राग नाही." आणि चंद्रिकेचा रथ आकाशाकडे झेपावला.

बाबांनी सकाळी सूर्योदयाबरोबर राजाला चंद्रिकेचा निरोप दिला आणि सोबत भेट म्हणून दिलेली बाटली सुपूर्त केली. राजा शोकाकूल झाला. त्याने ते पेय प्यायला नकार दिला. म्हणाला, "चंद्रिकेच्या आठवणीत रात्र जागवायलाच

मला आवडेल. तिच्या जाण्याने मला दु:ख जरूर झाले आहे; पण तिच्या थोड्याशा सहवासातील आठवणींचे चांदणे मला आयुष्यभर आनंद देईल." जपानच्या राजाला जसे चांदणे देऊन चंद्रिकेने सुखावले, तसे तुम्हा-आम्हा सर्वांनाही भरभरून हे चांदणे वाटून दिले आहे. पौर्णिमेच्या दिवशी म्हातारबाबाच्याच नाही तर पृथ्वीवरच्या सर्व बागांमध्ये चंद्रिकेचे हे चंदेरी देणे मानवजातीला आनंद वाटत रहाते.

# ३.४ साळींदरची प्रकाशभेट

(सायबेरियन लोककथा)

कोण्या एके काळी सायबेरियन लोकांना साळींदर हा प्राणी फार आवडायचा. कुठल्याही प्रश्नाचे चटकन् उत्तर शोधणारा हुशार व चाणाक्ष प्राणी म्हणून साळींदरची ओळख होती. साळींदर दयाळू स्वभावाचा होता. कुणाच्याही मदतीला चटकन् पुढे यायचा. सर्वांमध्ये मिळून मिसळून रहायचा. त्यामुळे सर्वांना तो हवा हवासा वाटायचा. तो सायबेरियन शेतकऱ्यांचा जिवाभावाचा दोस्त होताच; पण तितकाच तो आकाशाचाही मित्र होता.

आकाशराजाचे घर खूप मोठे होते. घराच्या भिंती पांढऱ्या शुभ्र चकाकणाऱ्या बर्फाच्या होत्या. जमिनीवर पांढऱ्या रंगाचेच मऊसूत गालीचे अंथरलेले असायचे. प्रत्येक खोलीत मंद घंटानाद चालू असायचा. शिवाय घरात नेहमी एक शेकोटी पेटलेली असायची. त्या शेकोटीतून लालबुंद ज्वाला धगधगत रहायच्या.

शेकोटीच्या दोन्ही बाजूंना दोन मोठे आरसे ठेवलेले असायचे. एक आरसा सोनेरी आणि दुसरा चंदेरी होता. शेकोटीचा प्रकाश या आरशांवर पडून परावर्तीत व्हायचा. बर्फाच्या भिंतीतून पाझरून पृथ्वीवर पसरायचा.

एकदा साळींदर आकाशराजाला भेटायला गेला. आपला जानी दोस्त साळींदर आला की, आकाशराजा आपण 'राजे' आहोत हेही विसरून जायचा. साळींदरबरोबर गप्पागोष्टी करण्यात रमून जायचा. त्या दिवशीही त्यांनी अशाच दिलखुलास गप्पा मारल्या. केक्स खाल्ले, चहा प्याले. सगळे सोपस्कार आटोपल्यावर संध्याकाळी साळींदर आकाशराजाला म्हणाला, "मित्रा, आता मला परतायला हवं. माझी घरी जायची वेळ झाली आहे."

आकाशराजाने त्याला निरोप देण्यापूर्वी आपल्या मैत्रीची भेट म्हणून काहीतरी सोबत घेऊन जा म्हणून विचारले. साळींदर म्हणाला,

“अरे राजा, तुझ्या जिव्हाळ्याच्या चार गोष्टी ऐकूनच मी तृप्त झालो आहे, आता वेगळ्या भेटीची काय गरज आहे?”

आकाशराजा म्हणाला, “अरे, ते खरे असले तरी राजधर्म म्हणून मला आलेल्या अतिथीला भेट दिल्याशिवाय रिकाम्या हाताने परत पाठविता येणार नाही. तेव्हा तू संकोच करू नकोस. माझ्या घरातली तुला जी गोष्ट मनापासून आवडली असेल ती तू अवश्य घेऊन जा.”

मित्राच्या या आग्रहाने साळींदर सुखावला. म्हणाला, “ठीक आहे, तुझा एवढा आग्रहच आहे, तर मला काही तरी खाऊ बांधून दे. लांबचा प्रवास आहे, उपयोगी पडेल.”

आकाशराजाने त्याला छान छान फळांचा करंडा आणि मिठाईचा पुडा बांधून दिला. हा खाऊ घेऊन साळींदर परत जायला निघाला. आकाशराजाला आपल्या या मित्राला निरोप देताना फारच जड गेले. तो म्हणाला, “थांब, मी पुढेपर्यंत येतो. तुला जरा जवळचा (शॉर्टकट) रस्ता दाखवतो. लवकर पोहोचशील.” असे म्हणून आकाशराजा साळींदराच्या सोबतीने बाहेर पडला.

थोडे अंतर चालून गेल्यावर त्या दोघांची रस्त्यात पृथ्वीराजाशी गाठ पडली. दोघांनी एकमेकांना अभिवादन केले, ख्याली-खुशाली विचारली. आकाशराजा पृथ्वीराजाला म्हणाला, “राजे, आज इतक्या दूर कशासाठी आलात?” पृथ्वीराजा म्हणाला, “राजाधिराज, आज तुमच्याच भेटीला निघालो आहे. पण आपली रस्त्यातच भेट झाली. बाकी काहीही म्हणा राजाधिराज, तुमच्या राज्यात एवढ्या संध्याकाळीसुद्धा किती स्वच्छ प्रकाश पडला आहे! काय रहस्य आहे, कळेल का?”

आकाशराजाने पृथ्वीराजाला आलिंगन दिले आणि म्हणाला, “या प्रकाशाचे रहस्य असे काही वेगळे नाही. आमच्या राजवाड्यात नेहमी अग्निकुंड पेटलेला असतो. त्या अग्निकुंडातून निघणाऱ्या ज्वालांचा हा प्रकाश आहे.” आकाशराजाने पृथ्वीराजाला रात्री आपल्याकडेच मुक्कामी रहाण्याचा आग्रह केला. म्हणाला, “राजे, रात्रभर रहा आमच्याकडे. गप्पा-विनोद होतील. माझा

छोटा दोस्त साळींदरही आहे, त्यालाही ठेवून घेऊ. खाऊ, पिऊ, मजा करू.” पृथ्वीराजाने आकाशराजाचे अगत्याचे निमंत्रण स्वीकारले, साळींदरलाही आपल्या मित्राचे मन मोडता आले नाही. ते तिघे तत्काळ आकाशराजाच्या महालाकडे निघाले.

आकाशराजाने पृथ्वीराजाला आणि आपल्या साळींदर मित्राला खास राजघराण्याला शोभेल अशी मेजवानी दिली. राजवाडा सुंदरच होता, तशात आज तो अधिकच सजवलेला दिसत होता. प्रत्येक खिडकीत मेणबत्ती तेवत होती. सगळीकडे सुखावणारा प्रकाश भरून होता. पृथ्वीराजाला आकाशराजाचे हे वैभव पाहून आनंदही झाला आणि असूयाही निर्माण झाली. कारण पृथ्वीवर असा उजेडाचा सडा पडलेला कधी दिसायचा नाही. तिथे सतत अंधार असायचा. शिवाय झाडाझुडुपांमुळे या अंधारात भरच पडायची. त्यामुळे वातावरणात आकाशराजासारखा जोश तर नसायचाच; उलट सर्वत्र उदास छाया पसरलेली असायची. या दोन राज्यांच्या तुलनेने पृथ्वीराजा अस्वस्थ झाला. मेजवानीत आणि रात्रीच्या गाण्याच्या मैफलीत त्याचे मन रमेना.

कशीबशी मैफल संपली. आता निरोपाची वेळ जवळ आली होती. नेहमीप्रमाणे आकाशराजाने आपला अतिथीधर्माचा रिवाज सांभाळण्यासाठी साळींदर आणि पृथ्वीराजाला भेटवस्तू नेण्याचा आग्रह केला.

साळींदर म्हणाला, “मित्रा, तू दिलेला खाऊ अजून तसाच आहे, तो मला पुरेसा आहे. त्यापेक्षा तू पृथ्वीराजालाच काहीतरी भेट दे.” आकाशराजाने मग पृथ्वीराजाला अगत्यपूर्वक विचारले, “राजे, आपल्या आजच्या या मैफलीची आठवण म्हणून आपल्याला इथली जी गोष्ट आवडली असेल, ती आमच्याकडून भेट म्हणून जरूर घेऊन जा.”

पृथ्वीराजाला आकाशराजाच्या या अगत्याचे कौतुक वाटले. आपण आकाशराजाच्या आग्रहाला मान द्यायला हवा, म्हणून कोणती गोष्ट भेट म्हणून मागावी, याचा तो विचार करू लागला. वास्तविक स्वत: राजपद उपभोगत

असल्याने त्याला काही मौल्यवान भेटीची लालसा नव्हती. पण आकाशराजाच्या राजवाड्यातील अनमोल संध्याकाळ खुलवणाऱ्या त्या मनोहारी आरशांनी त्याचे मन लुभावले होते. पृथ्वीराजाने हे चमचमणारे आरसेच भेटीदाखल द्यावेत अशी इच्छा प्रदर्शित केली. तो आकाशराजाला म्हणाला, "हे चमचमणारे आरसे माझ्या घरातल्या शेकोटीभोवती खुलून दिसतील, आपण ते मला दिले तर हे आरसे माझ्या राजवाड्यात आपल्या अगत्याची आठवण कायम ताजी ठेवतील."

आता मात्र आकाशराजा धर्मसंकटात सापडला. आरशांशिवाय आपल्या राजमहालाचे वैभव नाही, याची त्याला जाणीव होती. पृथ्वीराजा असली काही भेट मागेल हे त्याला अपेक्षित नव्हते. पण अतिथीधर्म तर पाळायलाच हवा, म्हणून त्याने जड अंत:करणाने ते दोन्ही आरसे काढून पृथ्वीराजाला दिले.

पृथ्वीराजा आरसे घेऊन आणि साळींदर फळा-मिठाईचा उपहार घेऊन परतीला निघाले. आपल्या स्वभावधर्माप्रमाणे आकाशराजा पुढेपर्यंत त्या दोघांना सोडायला गेला. पण आता आरसे शेकोटीसमोरून काढून घेतल्याने परावर्तीत होणारा प्रकाश नव्हता. सगळीकडे अंधार दाटून आलेला होता. रस्ता शोधायला त्रास पडत होता. आकाशराजा कसाबसा आपल्या राजमहालात परतला आणि उदास मनाने शेकोटीसमोर बसून राहिला. जे झाले ते बरे नाही, हे खरे असले तरी आपण आपला अतिथीधर्म पाळला या विचाराने त्याने आपल्या मनाची समजूत काढली.

इकडे पृथ्वीवर परावर्तित होणारा प्रकाश अचानक नाहीसा झाला. सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले. साळींदरची थोडीफार शेती होती. पण प्रकाश ओसरल्याने पाऊसही पडेना आणि पीकपाणीही पिकेना. पृथ्वीवरची प्रजा हवालदिल झाली. हे सारे अघटित आकाशघरातले आरसे काढून आणल्यानेच झाले हे अर्थातच हुशार साळींदरच्या लक्षात आले. पृथ्वीराजाने आकाशराजाला हे आरसे परत करण्यातच राजाचे आणि प्रजेचे हित आहे, आणि त्यासाठी आपण पृथ्वीराजाला साकडे घातले पाहिजे, असा त्याने

मनाशी निश्चय केला आणि तो पृथ्वीराजाकडे निघाला.

आकाशराजाचा मित्र साळींदर आज आपल्याला स्वत:हून भेटायला आला, हे पाहून पृथ्वीराज संतुष्ट झाला. त्याने आनंदाने साळींदरचे स्वागत केले. आपुलकीने ख्याली-खुशाली विचारली. साळींदरने प्रामाणिकपणे कुठलाही आडपडदा न ठेवता राजाला पृथ्वीवरच्या प्रजेचे कसे हाल होत आहेत, याचा वृत्तांत कथन केला. सगळीकडे अंधार पसरला आहे. शेतातली पिके पिवळी पडत चालली आहेत, अन्नधान्यच पिकले नाही, तर प्रजा जगेल कशी, म्हणून त्याने चिंतेचा सूर लावला. आणि शेवटी हे सारे काही आकाशराजाचे आरसे काढून आणल्याने झाले आहे, हे परखडपणे कथन केले.

पृथ्वीराजाच्या कपाळावर आठ्या पडल्या. पण साळींदरने त्याकडे दुर्लक्ष केले आणि त्याने थेट राजाला विचारलेच, “कुठे आहेत ते आरसे?” पृथ्वीराजा म्हणाला, “अरे बाबा साळींदर, ते आरसे मला खरोखरच आवडले, म्हणून मी मागितले. हे सुंदर आरसे जपून ठेवावेत म्हणून मी ते सुरक्षित ठेवून दिले आहेत.”

साळींदरने चहूकडे नजर फिरवली; पण त्याला ते आरसे कुठे दिसले नाहीत. याचा अर्थ राजाने ते लपवून ठेवले असावेत, हे चाणाक्ष साळींदरने ओळखले.

दरम्यान साळींदरला पाहुणचार म्हणून पृथ्वीराजाने चहा-फराळाची व्यवस्था केली. सगळेच पदार्थ फार रूचकर होते, पण साळींदरला ते गोड लागत नव्हते. राजाकडून हे आरसे कसे काढून घेता येतील आणि आकाशराजाला कसे परत नेऊन देता येतील याची तो युक्ती शोधत होता.

चहा-फराळाची मेजवानी संपल्यावर आतिथ्यधर्म म्हणून पृथ्वीराज साळींदरला म्हणाला, “मित्रा, आपल्या आजच्या या भेटीची स्मृती म्हणून तुला माझ्याकडचे जे काही आवडले असेल, ते तू भेट म्हणून आनंदाने घेऊन जा.” साळींदर मानेनेच नाही म्हणाला. ‘निदान थोडाफार खाऊ तरी ने’ म्हणून पृथ्वीराजाने आग्रह केला. पण साळींदरने त्यालाही नम्रपणे नकार दिला. पृथ्वीराजाला साळींदरचे हे वागणे खटकले. राजा त्याला म्हणाला, “तुला माझा पाहुणचार आवडला नाही का? तू काहीच बरोबर नेत नाही, याने माझ्या मनाला

वेदना होत आहेत; तेव्हा तू तुझा हट्ट सोड, आणि माझ्या समाधानासाठी तरी काही छोटी-मोठी भेट घेऊन जा."

आता राजा आपण मागू ते देईल, असा विश्वास आल्यावर चतुर साळींदरने पृथ्वीराजाकडे मागणी केली, "मित्रा तू तुझे राजपद विसरून निखळ मैत्रीची जी भावना प्रदर्शित केली, ती माझ्यासाठी खूप मोलाची आहे. मी तुझ्या इच्छेचा आदर करतो. तू मला सोन्याचांदीचा नजराणा देण्याच्या भानगडीत पडू नकोस. मला फक्त तुझ्या राजवाड्यासमोरील तळ्याचं मनोहरी प्रतिबिंब दाखव." आता राजाची मोठीच पंचाईत झाली. तळ्याचं प्रतिबिंब दाखवायचं तर आपल्याला आरसे बाहेर काढावे लागतील. राजाला ते मानवले नाही. त्याने साळींदरला 'दुसरे काही माग, हे आपल्याला शक्य होणार नाही,' म्हणून सांगीतले.

साळींदरने थोडा विचार केला आणि तो राजाला म्हणाला, "ठीक आहे, प्रतिबिंब नाही देता येणार तर नको देऊ. पण तुझ्या घरातले प्रतिध्वनी मला दिले तरी मी खुष होईल." आता मात्र पृथ्वीराजापुढे मोठाच पेच निर्माण झाला. साळींदरने खाऊला नकार दिला, आपण प्रतिबिंबाला नकार दिला. आता प्रतिध्वनीचा तिसरा पर्यायही आपण मान्य केला नाही, तर त्यामुळे राजधर्माचा अवमान होईल. तरीही राजा म्हणाला, "साळींदर, मला तुला नाराज करायचे नाही, आणि मलाही माझा अतिथीधर्म पाळायचा आहे. आता तूच मला सांग, प्रतिध्वनी म्हणजे फक्त आवाजाचा पडसाद असतो, मी तो तुला कसा काय देणार? त्यापेक्षा तू असे काही तरी माग की मी ते तुला सहजपणे देऊ शकेल."

साळींदरने बऱ्याच वेळापूर्वी दाराजवळ एक जुना खोका पडलेला पाहिला होता. खोक्याचं झाकण कदाचित नीट लागलेलं नसावं, त्यामुळे त्या खोक्यातून काही प्रकाशकिरण वर डोकावताना दिसत होते. तेवढ्यावरून हुशार साळींदरने ताडले होते, की या खोक्यात ते मौल्यवान आरसे दडवून ठेवलेले असावेत. साळींदर राजाला म्हणाला, "मित्रा, मलाही तुला नाराज करायचे नाही. तुझा अतिथीधर्म मोडल्याचे पाप मला माझ्या डोक्यावर

घ्यायची इच्छा नाही. पण मला गरीबाला फार काही मागायला सुचतही नाही. तेव्हा तू मला तो दाराजवळचा जुना खोका तेवढा दे, मी खूष होईल."

पृथ्वीराजाला खरंच साळींदरचा फार राग आला. पण आता आपण वचन पाळले नाही तर अतिथीधर्माचा आणि पर्यायाने राजधर्माचाही भंग होईल म्हणून नाइलाजाने ही मागणी मान्य करावीच लागणार होती. राजाचे मन खट्टू झाले. डोळ्यांत पाणी दाटून आले. पण तरीही स्वत:ला सावरून त्याने तो खोका साळींदरच्या हवाली केला. त्याला रस्त्यापर्यंत सोडायला न जाता दारातूनच निरोप देऊन दरवाजा खाडकन् लावून घेतला.

साळींदर मात्र खोका घेऊन घरी न जाता थेट आकाशराजाला भेटायला निघाला. आकाशघरी पोहचल्यावर तो आपल्या मित्राला म्हणाला, "राजा, या गरीब मित्राने आज तुझ्यासाठी छोटीशी भेटवस्तू आणली आहे, ती तू स्वीकारावी, अशी मी तुला विनंती करतो." आकाशराजा या छोट्याशा भेटीनेही भारावून गेला. त्याने तत्काळ खोका उघडून अशी कोणती भेटवस्तू आणली आहे, ते पाहिले. ते दोन आरसे होते. आकाशराजाचे जीव की प्राण असलेले आरसे! त्याने चटकन् ते दोन्ही आरसे आपल्या शेकोटीसमोर ठेवले. आणि झटकन् साऱ्या पृथ्वीवर प्रकाशाचे तेज पसरले. साळींदरने आपल्या मित्राला मिठी मारली.

आजही आपण आकाशात नजर टाकली तर हे दोन्ही आरसे चमचमताना आपल्याला दिसतात. त्यातला सोनेरी आरसा म्हणजे सूर्य आणि चंदेरी आरसा म्हणजे चंद्र! सूर्य प्रकाशासोबत उष्णताही देतो आणि चंद्र प्रकाशासोबत शांतता देतो. ही सारी त्या साळींदराची कृपा!

# ३.५ सूर्य आणि चंद्र

(बंजारा लोककथा)

सूर्य आणि चंद्र दोघे सख्खे भाऊ. सूर्य मोठा तर चंद्र धाकटा होता. त्यांच्या घरची परिस्थिती कमालीची खालावलेली. घरी त्यांची आई आणि हे दोघे असे तिघेच जण होते. आई काबाडकष्ट करून दोघांना भरवत होती. पण तिच्या मिळकतीत एकवेळचे पोटभर जेवणही मिळत नव्हते. मोठा सूर्य. त्याची भूक भागत नव्हती. तेव्हा चंद्र आपल्या हिश्श्यातील त्याला खायला द्यायचा. आईच्या हिश्श्यातील त्याला थोडे मिळत होते, तरी त्याची चिडचीड सुरूच असे.

एकदा गावजेवण होते. गावातल्या सगळ्यांनाच जेवणाचे आमंत्रण होते. एरव्ही दुर्लक्षित असलेले हे म्हातारीचे घर, आज त्यांना जेवणाचे आमंत्रण आहे म्हटल्यावर सूर्य-चंद्राला आनंद होतो. सूर्याला विशेष आनंद होतो. आजतरी पोटभर जेवायला मिळेल. विविध पदार्थ खायला मिळतील. तो खुशीत होता.

दोघे भाऊ जेवायला जातात. आई वृद्धापकाळाने थकली होती. ती आपल्या मुलांनाच जेवायला पाठवते. जेवणाचे ताट समोर येताच सूर्य भराभर खायला सुरुवात करतो. पण चंद्राने तोंडात घास घेतल्याबरोबर त्याला घरी आई उपाशीच झोपल्याचे आठवते. आपण मिष्टान्नावर ताव मारायचा आणि आईने उपवास काढायचा. त्याला या विचाराने जेवण जात नाही.

सूर्य पोट तट्ट फुगेपर्यंत जेवतो. चंद्राच्या तोंडातला घास तोंडातल्या तोंडातच फिरत राहतो. काय करावे? आईसाठी अन्न घरी न्यावे तर चोरी केल्यासारखे होईल. काय करावे म्हणजे आईलाही जेवण मिळेल आणि ती चोरीही ठरणार नाही. तो आपल्या हाताच्या मोठमोठ्या वाढवलेल्या नखात अन्न भरतो. घरी आल्यावर प्रत्येक नखातील अन्न तो आईसमोर ठेवतो. आई धन्य होते. तृप्त होते. अन्न किती आणले याला महत्त्व नाही. ते आईसाठी

आठवणीने आणले याला महत्त्व आहे.

आई आपल्या धाकट्या मुलाला आशीर्वाद देते, “मुला तू सदोदित शीतल छायेत राहशील. तुझा सहवास सर्वांनाच आवडेल.” तर सूर्याला शाप देते, “तुला कडक उन्हात राहावे लागेल. तुझ्या तप्त उन्हाने लोक त्रस्त होतील.”

आईच्या या शापामुळे दोघा भावांचे विभाजन झाले असे बंजारा लोक मानतात. तसेच आईच्या शापामुळे सूर्य तप्त कडक उन्हाचा दाह सहन करतो, तर आईच्या वरदानाने चंद्र शीतल प्रकाशात सर्वांना हवाहवासा वाटतो. सूर्य मोठा असूनही लोक चंद्र-सूर्य असे म्हणतात, याचे कारण दोघांचे स्वभाव आहेत.

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)



# ३.६ एक होती कळी

एक होती कळी. सुंदर, टपोरी. जाणाऱ्या-येणाऱ्यांच्या नजरा तिच्यावर पडल्या की, लोक म्हणायचे काय सुरेख आहे ही कळी ! तो तो कळी भाव खायची. आपल्या सौंदर्यावर भारी भरायची. मस्का मारायची. शेजारच्या कळ्या तिच्याशी बोलायच्या, हसायच्या. पण कळी काही कुणाशी बोलायची नाही की, हसायची नाही की, खेळायची नाही. आपल्या सौंदर्याचा तिला इतका गर्व की ती सगळ्यांना तुच्छ लेखायची. आपल्याच तोऱ्यात मग्न होती.

एके दिवशी वारा कळीला म्हणाला, "ए सुंदर कलिके, चल माझ्याबरोबर फिरायला. मी तुला हसवेल, डोलवेल. तुला साता समुद्राकडच्या सुंदर सुंदर गोष्टी सांगेन. खेळतेस माझ्याबरोबर ?" कलिका म्हणाली, "तुझ्याबरोबर खेळायला मी मुळीच येणार नाही. अन् तुझ्याशी दोस्ती तर मुळीच करणार नाही. उनाडासारखा इकडून तिकडे आणि तिकडून इकडे गर-गर करीत राहतो. तुला घर ना दार! मी नाही येत तुझ्याबरोबर !" वारा हसला. तिच्याकडे न बघताच निघून गेला.

मग आला दवबिंदू. म्हणतो कसा, "कलिके कलिके खेळतेस माझ्याबरोबर? आपण खूप गप्पा मारू. मी तुला आभाळातल्या सुंदर सुंदर गोष्टी सांगेन. येतेस?" कलिका म्हणते, "नाही रे बाबा. अरे, तुझे आयुष्य तरी किती ? झाडांच्या पानांवर टिकून आहेस तोवर चमचम करशील मग खाली पडलास तर क्षणात तुझे आयुष्य संपेल. क्षणभर असे तुझे आयुष्य ! मी कशी येऊ तुझ्याबरोबर ?" नाराज होऊन दवबिंदू निघून जातो.

मग येतो सूर्याचा पहिला किरण. कालिकेला हलकेच जागे करत म्हणतो, "ए सुंदर कलिके, एकटीच आहेस. मी येऊ तुझ्याशी खेळायला? आपण खूप खेळू, गप्पा मारू आणि... आणि मी तुला चंद्राच्या तारकांच्या सुंदर सुंदर गोष्टी

सांगतो. येतेस?" कलिका जरा घुश्यात म्हणाली, "मुळीच नाही. तू जवळ येत जाशील तस तसा मला ताप लागेल. मी नाही येत तुझ्यासोबत." सूर्यकिरण निघून जातो. कलिका परत एकटीच उरते.

इकडे सगळ्या कलिका वाऱ्याच्या झुळकेशी खेळतात, दवबिंदूशी छान छान गोष्टी करतात आणि सूर्याच्या स्पर्शाने मोहरून उठतात. अन् सगळ्याच कलिकांचे सुंदर फुलात रूपांतर होते. सुंदर, रंगीबेरंगी फुले पाहून वारा त्यांच्याशी दंगामस्ती करू लागतो. विविध रंगांची फुलपाखरं त्यांच्याशी खेळायला, गुजगोष्टी करायला येऊ लागतात. मधमाशा त्यांच्यातील मकरंद वेचू लागतात. फुललेल्या आनंदी फुलांचा सुगंध सर्वत्र दरवळतो. सुगंधामुळे लोक तिकडेच आकर्षित होत होते. लोक म्हणत, काय छान फुलं फुलली आहेत.

मात्र सुंदर कळी फुललीच नाही. वारा तिच्याकडे जाईना, दवबिंदू तिच्याकडे बघेना ! सूर्यकिरणांनी तिच्याकडे पाठ फिरविली. जवळच असलेल्या कळ्या-फुलांनी तिच्याशी बोलणे टाकले होते. कळीला आपली चूक लक्षात आली. तिने वाऱ्याला बोलावले, "ये ना, माझ्याशी खेळायला. मला तू सातासमुद्रापलीकडच्या गोष्टी सांगणार होतास ना?" सुंदर कलिकेचे कोमेजलेले तोंड पाहून वाऱ्याला तिची दया आली तो तिच्याशी खेळू लागला. सातासमुद्रापलीकडच्या गोष्टी सांगू लागला. वाऱ्याच्या सहवासाने कलिका सुखावली.

दवबिंदूला ती म्हणाली, "ये, ना माझ्याशी खेळायला." दवबिंदूलाही तिची कीव आली. तो कोणतेही आढेवेढे न घेता कलिकेशी खेळायला गेला. ती दवबिदूंच्या स्नेहाने ओलीचिंब झाली.

तिने सूर्यकिरणांना विनंती केली, "ये, मला फुलव." सूर्यकिरणांनी तिला जवळ घेतले. आसमंतातल्या साऱ्या नवलाईच्या गोष्टी सांगितल्या. कलिका खुदकन हसली.

सकाळी एक सुंदर फूल फुललेले लोकांनी पाहिले आणि जाणारे-येणारे

म्हणत होते, “काय सुंदर फूल आहे.” कलिका सुखावली. सगळ्यांशीच हसून खेळून बोलू लागली.

एक पुजारी आला. त्याने ते सुंदर फूल पाहिले आणि देवावर चढविले. कलिका धन्य झाली.

अशीच धन्यता तुम्हाला मिळो !

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)



# ३.७ अग्नीची अख्यायिका

(उत्तर अमेरिकेतील लोककथा)

जमीन तयार केल्यानंतर रेव्हनने माणूस निर्माण करायचे ठरवले. त्याने माती व समुद्राकाठची वाळू घेतली आणि पहिला माणूस तयार केला.

हे झाल्यावर रेव्हनने ठरवले की सगळ्या जगात फिरून आपण काय काय निर्माण केले आहे, ते पाहावे. रेव्हन त्याच्या प्रवासात विचार करीत होता की, आपण माणसाला असे काही देऊ शकू का, की ज्यामुळे त्याला त्याचे जीवन चांगल्या पद्धतीने जगता येईल. नंतर त्याच्या लक्षात आले की, माणसाला अग्नी द्यायचे आपण विसरून गेलो आहोत. आपण माणसाला अग्नी दिल्यास माणूस त्याचे अन्न शिजवू शकेल आणि स्वतःला उबदारपण ठेवू शकेल.

रेव्हनने त्याच्या मित्रांना व इतर पक्षांना बोलावून घेतले आणि अग्नी कसा मिळवायचा, हे त्यांना माहीत आहे का, असे विचारले. सीगल नावाचा समुद्रपक्षी म्हणाला, 'दहा हजार धुरांच्या दरीत'. त्याने अग्नी पाहिला आहे. हे ऐकून रेव्हनने विचारले, की कुणी स्वयंसेवक होऊन त्याच्यासाठी अग्नी आणायला तयार आहे का?

रानघुबडाला हे माहीत होते की, आपली चोच इतर सगळ्यांपेक्षा लांब आहे. त्यामुळे आपले पंख न जळू देता आपण जळते लाकूड सुरक्षितपणे आणू शकतो. म्हणून रानघुबड जळणारे लाकूड आणायला तयार झाले. सगळे पक्षी आणि रेव्हन घुबडाला पाठवायला जरी तयार झाले असले तरी त्या छोट्याशा रानघुबडाच्या लांब चोचीचा सगळ्यांना फार मत्सर वाटला.

मग घुबडाने पाण्याचे खूप मोठे अंतर उडून पार केले आणि ते 'दहा हजार धुरांच्या दरी' जवळ पोचले. 'दहा हजार धुरांची दरी' म्हणजे खूप मोठ्या प्रमाणात असलेला लहान लहान ज्वालामुखींचा समूह. तेथे हवा इतकी गरम होती की त्यामुळे रानघुबडाचे काही पंख होरपळून गेले.

रानघुबडाने जळणारे लांब लाकूड शोधले, लांब चोचीत पकडले आणि माणूस जिथे राहत होता, तिथे परत उलटे उडायला सुरुवात केली. पण तो तिथे पोचायच्या आधीच जळणाऱ्या लाकडामुळे त्याची चोच भाजायला सुरुवात झाली. घुबडाला आता जळणारे लाकूड समुद्रात टाकून द्यावे असे वाटू लागले.

त्याचवेळी रेव्हन त्याच्याजवळ उडत आला आणि ओरडून म्हणाला, 'जळणारे लाकूड तू खाली टाकू नकोस ! जर तसे केलेस, तर ते नक्कीच पाण्यात पडून जाईल.'

चोच जरी जळत होती आणि खूप वेदनाही होत होत्या तरी रेव्हनचे ते बोलणे ऐकून छोटे घुबड उडतच राहिले. शेवटी माणूस राहत होता तिथे रानघुबड आणि रेव्हन पोचले. रानघुबडाने जळणारे लाकूड तिथे टाकून दिले. त्यामुळे आता माणूस अन्न शिजवू शकणार होता आणि स्वतःला उबदारही ठेवू शकणार होता.

घुबडाच्या लांब चोचीचा खूप भाग जळाल्यामुळे त्याची छोटीशीच चोच मागे शिल्लक उरली. उष्णतेने त्याचे पंख होरपळून गेले. त्यामुळे त्याला लांबवर प्रवास करता येईना आणि धुरामुळे त्याचा आवाजही बदलून गेला. त्यामुळे रानघुबड फक्त कर्कश शीळ घालू शकत होते. म्हणून त्याची सगळी संतती, वंशज आता याच रुपात दिसू लागले आहेत.

# ३.८ जो चंद्रावर उडून गेला तो

(एस्किमो लोककथा)

एकदा एका तरुण अमेरिकन-इंडियन स्त्रीने जंगलात एका लहान बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकला. ती जेव्हा शोधण्यासाठी गेली तेव्हा तिला ते बाळ सापडले नाही. त्यानंतर अजून एक स्त्रीने रडायचा आवाज ऐकला. तीही शोधायला गेली पण तिलाही शोध लागला नाही. परत जेव्हा बाळ रडले तेव्हा जिला स्वतःचे मूल नाही अशी एक वयस्क स्त्री तेथे गेली. झाडामध्ये असलेल्या पोकळीत तिला एक बाळ सापडले. बाळाला तिने तिच्या घरी नेले आणि त्याला स्वतःचेच बाळ म्हणून वाढवायचे ठरवले.

ती वयस्क स्त्री एक चांगली माता होती. बालक पुढे मोठे झाले. त्या बालकाचा एक तरुण युवक बनला. त्या वयस्क स्त्रीसाठी जरी तो चांगला मुलगा होता, तरी तो नेहमी लबाडी करायचा. याबाबतीत तो बराचसा रेव्हनसारखा होता.

आता त्याने तारुण्यात पदार्पण केले. त्याच्या आईचे अजून जास्त वय झाल्यामुळे तिने तिचे भाऊ आणि चुलत भाऊ राहत असलेल्या जवळच्या खेड्यात राहायला जायचे ठरवले. ते भाऊ त्याला शिकवून मोठे करू शकतील असे तिला वाटते.

ते दोघे तिच्या माहेरच्या कुटुंबात राहायला गेल्यानंतर थोड्याच दिवसांनी धावतपळत येऊन एक मनुष्य सांगू लागला की, गोठलेल्या मोठ्या तलावाच्या जवळ त्याने पन्नास सांबरं पाहिली आहेत.

हे ऐकून सगळेच उत्तेजित झाले. त्या वयस्क स्त्रीने वाढवलेला तो तरुण मुलगा म्हणाला, "मी जाईन आणि स्वतः सगळी सांबरं मारून टाकीन."

खेड्यातील सगळे लोक हे ऐकून हसले. कारण त्याने आतापर्यंत कधीही शिकार केलेली नव्हती. दुसऱ्या दिवशी पहाटेच थंडीत वापरावयाचा टोपडे

असलेला जुना फरकोट त्या मुलाने घातला. बर्फात वापरायचे जुने झालेले बूट घातले आणि त्याने त्या प्राण्यांच्या दिशेने चालण्यास सुरुवात केली. सांबराच्या जवळ तो जाऊ शकेल यावर कुणीच विश्वास ठेवायला तयार नव्हते. त्याने एकट्याने एक सांबर जरी मारले तरी पुष्कळ झाले, असे त्यांचे मत होते.

तो तरुण माणूस त्या अचपळ सांबरांच्या जवळ आला. सांबरांनी जेव्हा त्या माणसाला पाहिले तेव्हा तो त्याच्या धनुष्यबाणाचा उपयोग करूच शकणार नाही अशा पद्धतीने ती सांबरं त्याच्यासमोर उभी राहिली. त्यावेळेस त्याच्या मनात एक कल्पना आली. त्याने त्याचा कोट व बर्फात वापरावयाचे बूट काढले आणि ते एका लहान झाडावर अशा पद्धतीने ठेवले की तो एक माणूसच वाटावा. त्यानंतर तो त्या कळपापासून लांब गेला. एवीतेवी त्याने त्याच्याबरोबर टोपडे असलेला एक नवीन फरकोट आणला होता आणि बर्फात वापरायचे नवे बूटही आणलेले होते. त्याने तो कोट चढवला आणि बूट घातले.

हे नवीन कपडे घातल्यावर त्याने ती सगळीच्या सगळी सांबरं पकडली आणि मारुन टाकली ! नंतर तो खेड्यात परत गेला आणि त्याने काय काय केले ते लोकांना सांगितले; पण कुणीही त्यावर विश्वास ठेवला नाही.

"मी सगळी सांबरं मारून टाकली आहेत." तो म्हणाला.

लोकांनी जरी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला नव्हता तरीसुद्धा खरे काय आहे, ते पाहण्यासाठी ते तिकडे निघाले. ते तलावाजवळ पोचले. त्यांनी सगळी मेलेली सांबरं पाहिली. त्यांचा त्यांच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. या तरुण माणसाने नक्कीच स्वतः ही सगळी मारली नसावीत, असा त्यांनी विचार केला; पण सगळ्या खेड्याला पूर्ण हिवाळ्यात पुरेल इतके मांस आता तेथे होते.

सगळे लोक जेव्हा सांबरांना कापून व त्यांची आतडी बाहेर काढून ते मांस नीट एकत्र करुन ठेवत होते, तेव्हा हा तरुण माणूस शेकोटी पेटवत होता. त्याने त्याच्या बर्फाच्या नवीन बुटांवर सांबराची चरबी टाकली आणि ते शेकोटीत टाकून जाळून टाकले. नंतर तो जोरात हसत आणि गाणी म्हणत इकडेतिकडे फिरू लागला. तो मूर्ख आहे, असा विचार करून बाकीच्या लोकांनी त्याच्याकडे

दुर्लक्ष केले.

सांबरांच्या मांसाचे काम पूर्ण होण्याच्या आधी प्रत्येक सांबराची थोडी थोडी चरबी त्याच्यासाठी राखून ठेवायला त्या तरुण माणसाने सर्व लोकांना सांगितले होते. पण जेव्हा सगळे घरी पोचले, तेव्हा एकानेही थोडीसुद्धा चरबी त्याला दिली नाही. एक छोटासा चरबीचा तुकडा त्याला जमिनीवर सापडला होता. तेवढाच एक तुकडा त्याच्याजवळ होता.

तो खूप चिडला आणि दुखावलाही गेला. त्याने सगळे प्राणी मारुनसुद्धा एकानेही त्याला चरबीचा एकही तुकडा दिला नव्हता. त्याच्या म्हाताऱ्या आईने त्याला शांत करायचा प्रयत्न केला. पण ती त्याला शांत करू शकली नाही.

रात्री उशिरा त्या तरुण माणसाने डोक्यावर चरबीचा तो छोटासा तुकडा ठेवला आणि उडी मारून जमिनीच्या वर उडायला सुरुवात केली. म्हातारीने त्याचे पाय पकडून त्याला खाली ओढायचा प्रयत्न केला, पण तिच्यात पुरेशी शक्ती नसल्यामुळे ते तिला जमले नाही. वर उडत राहणे त्याने चालूच ठेवले. अखेर तो चंद्रावर जाऊन पोचला! पण तेथे पोचण्यापूर्वी त्याने त्या खेड्यातल्या सगळ्या माणसांना मारून टाकले. तेव्हापासून तो चंद्रावर राहू लागला.

# ३.९ चंद्रावरील मुलगी

(निकोबारची लोककथा)

कोणे एके काळी निकोबारमध्ये एकाकी जागी असलेल्या घरात एक विधवा स्त्री चार मुलींसह राहत होती. त्या चौघींमध्ये तीन मुली मोठ्या वय झालेल्या तर शेवटची मुलगी छोटी होती. त्या छोटीचे नाव होते टो-मी-रॉक (म्हणजे सौंदर्य) तर इतर मुलींची नांवे अशी होती. टो-केन(मेहनती), टो-पेट-नागेन (स्वतःपूरते पाहणारी) आणि वा-मी-रो (गोष्ट सांगणारी)

घरापासून काही अंतरावर त्यांची बाग होती. उन्हाळ्याच्या प्रारंभी जेव्हा निरुपयोगी झाडे बागेत वाढली होती, आईने मुलींना ती झाडे तोडून टाकण्यास सांगितले. ती स्वतः जाऊ शकत नव्हती. कारण सर्वात छोट्या मुलीची देखभाल करण्यास दुसरे कुणी नव्हते.

दुसऱ्या दिवशी सकाळी मोठी बहिण टो-केन आपल्या दोन बहिणींसह जंगलात निघाली. तिथे गेल्यानंतर त्या बहिणींनी काम सुरू केले. सूर्य जसजसा आकाशात वरती आला तसतसे वातावरण अधिक उष्ण होऊ लागले. थकल्यामुळे त्या बहिणींपैकी वा-मी-रो विश्रांती घेण्यासाठी झाडाच्या सावलीत गेली. त्यानंतर ती झाडावर चढली आणि झाडांच्या पारंब्यांवर लोंबकळून खूप खेळली, मजा केली. तिने दिवसाच्या राहिल्या वेळातही काही काम केले नाही. दुसऱ्या दोन्ही मोठ्या मुलींनी सूर्याचे प्रखर ऊन पाठीवर झेलून खूप काम केले.

'वा-मी-रो कृपया खाली ये आणि ही वाढलेली झाडे काढण्यास मदत कर.' टो-केन म्हणाली. त्या विनंतीचा काही परिणाम झाला नाही. कारण वा-मी-रो ला कुठल्याच प्रकारचे काम करायचे नव्हते.

टो-पेट-नागेत (दुसरी बहिण) तिला म्हणाली, 'आपण जेव्हा घरी परत जाऊ आईला तुझ्याबद्दल सांगू मग तुला खूप मार मिळेल.' परंतु वा-मी-रो बधली नाही. कारण ती आईची आवडती मुलगी होती.

जेव्हा संध्याकाळ झाली वा-मी-रोने आपल्या डोक्यावर चिखलाचे काही शिंतोडे उडवून घेतले आणि ती दोघी बहिणींच्या अगोदर घरी पोचली. तिने आईला सांगितले, दिवसभर मी एकटीने काम केले. दुसऱ्या दोघींनी दंगामस्ती केली आणि दिवसभर खेळण्याशिवाय काही केले नाही.

हे ऐकल्यावर तिची आई खूप रागावली आणि म्हणाली,'त्यांना येऊ दे तर खरं. मी त्यांना चांगला धडा शिकवते. तू खूप थकली असशील म्हणून जा आणि जेवून घे. जेवण फळीवर ठेवलेले आहे.'

थोड्या वेळानंतर दिवसभर कामाने पूर्ण थकलेल्या त्या दोघी मोठ्या बहिणी घरी पोचल्या. कुठल्याप्रकारे स्वागत न झाल्यामुळे त्यांची खूप निराशा झाली. त्यांना अगदी कमी जेवण देण्यात आले. त्यांनी ते शांतपणे खाल्ले. त्यांचे जेवण संपल्यानंतर त्यांच्या आईने विचारले, 'जेवण चांगले होते की नाही ? त्यावर त्या उत्तरल्या,'हो चांगले होते. '

'तुम्हाला हे माहित आहे की, मी तुम्हाला आज जनावरांसाठी राखून ठेवलेले अन्न दिले; कारण तुम्ही दोघींनी काही काम केले नाहीत, फ क्त खेळत राहिलात आणि स्वतःचे मनोरंजन केलेत ! ' आईचे बोलणे ऐकल्यावर टो-केन आणि टो-पेट-नागेन या अतिशय दुःखी झाल्या. त्यांनी उत्तरादाखल काही म्हटले नाही; कारण त्यांना माहित होते की, त्यांची आई वा-मी-रो ने जे तिला सांगितले त्याच्यावर नेहमी विश्वास ठेवला. त्याची ती पुनरावृत्ती करीत होती.

त्या अतिशय निराश झाल्या. त्यांचे आपल्या घरावरचे सर्व प्रेम संपले आणि त्यांनी पळून जाण्याचा निश्चय केला. एका छोट्या पेटीमध्ये आपले सामान भरुन त्या रात्री त्यांनी चोरपावली घर सोडले. बेटावर कुठेही गेल्यास आई त्यांना शोधून काढेल या विचारांनी त्यांनी चंद्रावर जाण्याचा निश्चय केला. भटकत असताना त्यांना एक टो-आ-न्यू-ओ नावाची खाली लटकलेली वेल दिसली. त्या वेलीच्या साहाय्याने त्यांनी आकाशात जायचा प्रयत्न केला. परंतु लवकरच तो प्रयत्न सोडून दिला.

'चल कोळ्याच्या जाळ्याच्या मदतीने चढण्याचा प्रयत्न करु या' टो-केनने सुचवले.

'आपण पाय ठेवल्याबरोबर ते तुटले, तर आपली फजिती नाही का होणार ?' टो-पेट-नागेन म्हणाली.

'काही असले तरी प्रयत्न करू या.' दुसरी उत्तरली.

अशा प्रकारे प्रथम टो-केन वर गेली आणि त्यानंतर तिच्या बहिणीने तोच कित्ता गिरवला. आश्चर्याची बाब म्हणजे कोळ्याचे जाळे तुटले नाही. त्या दोघीही अधिक अधिक वर गेल्या. त्यांनी खूप अंतर कापल्यानंतर त्यांच्या एकाएकी लक्षात आले की, त्या रा-फोहची बनवलेली छोटी छानशी करंडी खाली विसरल्या आहेत. म्हणून टो-केनने तिच्या छोट्या बहिणीला ती आणण्यासाठी खाली धाडले.

तथापी ती घरी पोहचल्याबरोबर तिच्या आईने तिला ताबडतोब पकडले. आईने वा-मीरो ला टो-पेट नागेनवर लक्ष ठेवण्यास सांगितले आणि स्वतः टो-केनला शोधण्यासाठी गेली. तिला जमिनीपासून काहीच अंतरावर कोळ्याच्या जाळ्यावर असलेली टो-केन सापडली. ती आपली बहिण टो-पेट नागेनची वाट बघत होती आणि त्यासाठी काही अंतर खाली आली होती. आईने तिला ताबडतोब खाली येण्यास सांगितले. परंतु तिने नकार दिला. त्यानंतर तिने टो-केनचा पाय पकडला आणि खाली ओढण्याचा प्रयत्न केला. परंतु तिने कोळ्याचे जाळे घट्ट पकडले आणि लाथ मारुन आईच्या पकडीपासून स्वतःला मोकळे केले. या क्रियेमध्ये तिच्या एका पायाचा लवचिकपणा हरवला. असे होऊनही ती चढून वर गेली आणि शेवटी चंद्राच्या पृष्ठभागापर्यंत पोचली. आपल्या निष्ठुर आईच्या पंज्यामधून आपण मोकळे झालो याने ती भयंकर खुष झाली. चंद्राच्या पृष्ठभागावर तिने अंग टाकले आणि ती झोपली. तिने जवळच्या पेटीचा उशी म्हणून वापर केला.

निकोबारचे रहिवासी अजूनही मानतात की चंद्रावरचे पट्टे म्हणजे तिथे शांतपणे पहुडलेल्या टो-केनची सावलीमय आकृती होय. पौर्णिमेच्या दिवशी कुणीही हे पाहू शकतो.

# ३.१० चंद्र-सूर्याच्या घरी पाणी

(नायजेरियन लोककथा)

कोणे एके काळी सूर्य आणि पाणी खूप चांगले मित्र होते. पृथ्वीवर सूर्य आणि पाणी गुण्या गोविंदाने रहात होते. पाण्याला भेटायला सूर्य नित्यनेमाने येत होता. परंतु पाणी कधीच सूर्याला भेटायला जात नव्हते. एके दिवशी गप्पांच्या ओघात सूर्याने पाण्याला विचारले, 'मित्रा मी नेहमी तुझ्याकडे येतो. तू माझ्याकडे का येत नाहीस ? ' पाणी म्हणाले, 'अरे मित्रा, माझ्या विस्तीर्ण प्रदेशात तू केव्हाही येऊ शकतोस ! परंतु मी जर तुझ्याकडे आलो तर तुलाच घराबाहेर पडावे लागेल ! मी तुझ्याकडे यावे असे वाटत असेल तर तुला खूप मोठे घर बांधावे लागेल. आणि सगळ्यात महत्त्वाचे सांगतो, असंख्य लोकांसह, जलचर प्राण्यांसह मी येणार असल्यामुळे विस्तीर्ण प्रदेशात असंख्य खोल्याही असल्या पाहिजे !' पाणी मित्र आपल्याकडे येणार या कल्पनेने सूर्याला खूप आनंद झाला. आनंदाच्या आवेशात पाण्याचा सर्व अटी मान्य केल्या.

सूर्य घरी येताच बायकोने म्हणजे चंद्राने हसतमुखाने सूर्याचे स्वागत केले. सूर्याचे आनंदित सुहास्य वदन पाहताच चंद्राने विचारले आज काही विशेष घडलेले दिसते आहे ! सूर्य म्हणाला, 'माझा परम मित्र पाणी माझ्याकडे येण्यास तयार आहे. फक्त मित्राच्या स्वागतासाठी भोलेमोठे घर बांधावे लागणार आहे. चंद्रालाही खूप आनंद झाला. दोघेही उत्साहाने कामाला लागले. पाण्याशी चर्चा केल्याप्रमाणे विस्तीर्ण प्रदेशावर घर बांधून तयार झाले. सूर्य पाण्याच्या भेटीला आला. मित्राला म्हणाला, 'मित्रा तुझ्या स्वागतासाठी आम्ही सज्ज आहोत ! तू केव्हा येतोस ? ' पाणी मित्र म्हणाला,'उद्याही मी येऊ शकतो ! परंतु तयारी व्यवस्थित केली आहे, ना ? ' सूर्याने मित्राला बिनधास्तपणे येण्याविषयी आश्वासन दिले.

दुसऱ्या दिवशी आपल्या सर्व मित्र-परिवारासह पाणी सूर्याच्या भेटीला

निघाले. सूर्याच्या घराबाहेर येताच पाण्याने सूर्य मित्राला हाक मारली, 'मित्रा, मी बिनधास्त येऊ शकते ना ? आम्हा सगळ्यांची पुरेशी व्यवस्था केली आहेस ना? ' हसतमुखाने पाण्याचे स्वागत करीत सूर्य म्हणाला, ये ये मित्रा, आज माझ्या आयुष्यातील हा सगळ्यात आनंदाचा दिवस आहे.

पाणी आपल्या सर्व जलचर मित्रांसह आत येताच घरभर पाणीच पाणी झाले. 'हे पाहून पाण्याने पुन्हा सूर्याला विचारले,अजून आत येऊ शकते ना ?' सूर्य म्हणाला, 'मित्रा काळजी करू नकोस भरपूर जागा आहे. जसजसे पाणी आत येऊ लागले तसतसे पाण्याचे लोट वाहू लागले. सूर्य मित्राला पाण्याने पुन्हा विचारले, 'अजून काही मित्र आले तर चालतील ना ? 'चंद्रसूर्य म्हणाले, आमच्याकडे प्रथमच पाहुणे येत आहेत. त्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला आहे. कितीही मित्र आले तरी चालतील, आम्ही सर्वांचे मनापासून स्वागत करू! परवानगी मिळताच पाण्याची एक मोठी लाट आत येताच चंद्र सूर्य घराच्या छतावर फेकले गेले. परंतु पाहुण्यांच्या आगमनामुळे चंद्र-सूर्य आनंदाने छतावर बसून गंमत पहात होते. काही क्षणातच छतावरून पाण्याचे लोट वाहू लागले. पाण्याचा वेग इतका प्रचंड होता की, त्या वेगामुळे चंद्र-सूर्य आकाशात लोटले गेले. आजही चंद्र सूर्य आपल्याला आकाशातच दिसतात.

# ३.११ इंद्रधनुष्य

(गढवाली लोककथा)

वसंतऋतू नुकताच सुरू झाला होता. अलखनंदेच्या काठी एक अत्यंत सोयीची जागा वसंतोत्सवासाठी निवडली गेली होती. आर्य युवक युवती यांचा जल्लोष सुरू झाला होता. आपल्यायोग्य वर वधू निवडण्याची स्पर्धा वसंतोत्सवात सुरू व्हायची !

उत्तमोत्तम पोषाखांची जणू ही एक प्रदर्शनीच भरली होती. पुरुषांनी आपले ठेवणीतले कपडे घातले होते आणि तरुणींनी आपापले केस उत्तम प्रकारे गुंफून तऱ्हेतऱ्हेच्या फुलांनी सजविले होते. एकमेकांशी गोष्टी, परिचय,हा आपल्याला शोभेल काय ? ही स्त्री आपल्याला पसंत करील ? ते इशारे, ती इंगिते... तरुण तरुणींना शोभण्याजोगी होती ! नृत्य, गीत आणि घोडदौडीचा कार्यक्रम आखलेला होता.

कुमारिकांच्या गर्दीत एक षोडशी पिवळा पोषाक करून सुंदर वेणी घालून आपल्याच नादात गुंग होती. सर्वांचे लक्ष तिच्याचकडे लागले होते. पिवळ्या वस्त्रामधून तिची कांचनकाया झळाळत होती. गोऱ्या गोऱ्या मुखावर तिच्या सुंदर केसांच्या बटा खेळत होत्या. तिच्या ओठावरचे हास्य... हिमालयावर पहिला किरण जसा शोभा देतो तशी तिच्या मुखावरची शोभा विलसत होती. एखाद्याचे रूप हे अनेक जन्माच्या पुण्याईचे फळच असते ! त्या पुण्यफळाकडे सगळ्यांचीच दृष्टी लागलेली होती. युवक मनातल्यामनात निश्वास टाकत होते, अन् प्रार्थना करीत होते,'देवांनो, मदनाला लवकर पाठवा.' त्यांची पंचमहाभूतांची पूजा मनोमन चालू होती !

ती तरुणी मात्र याबाबतीत उदासीनसी दिसत होती. हरिणसारखे तिचे डोळे कुणाला तरी शोधत होते. एवढ्यात काय झाले ? एक सुंदर राजकुमार एका सुसज्ज रथावर बसून कुठूनतरी वसंतोत्सवात सामील झाला. पौरुषाचा आणि

मदनाचा जणू पुतळाच ! त्याच्या केसामध्ये पंख सजविले होते. हातात धनुष्यबाण होता. बांधा सुडौल होता. त्या सुंदर रूपाकडे ती षोडशी मुग्ध होऊन बघतच राहिली. तिला एका प्रकारे संकोच वाटला. ती त्याच्याकडे कटाक्ष टाकू लागली.

तो राजकुमारही रथाखाली उतरून तिच्याकडे जाऊ लागला. ती कुमारीही पुढे झाली. मंद मधुर हास्य करीत तिने त्याचे स्वागत केले. राजकुमाराने चटकन तिचा हात धरला आणि काही क्षण चालून एका सधन कुंजाकडे ते वळले.

अलखनंदाच्या धारा सर्वदूर वाहत होत्या. हिमालयाच्या शोभेत जणू त्या हसत होत्या. हिमालयाचे सर्व सुगंध घेऊन वारा वाहू लागला.तेथील शिळांना स्पर्श करीत करीत पंचमहाभूतांची क्रीडा सुरू झाली. बुराँसची लाल लाल फु ले म्हणजे जणू कोवळ्या सूर्य-किरणांचे हास्यच. निसर्गात एक प्रकारे उन्माद भरलेला होता आणि युवक-युवतींच्या कोलाहलामध्ये हिमालयाची सर्व शोभा सामावून गेली होती.

'तुला,फार दिवसापासून मी शोधत होतो. आज तू दिसलीस. डोळ्याचे पारणे फि टले माझ्या. वाऱ्याने तृणांकुर या भूमीवर जसे खेळविले आहेत,तसाच मी तुझ्या मनाशी क्रीडा करतो. ती झाडे बघ चहुकडून वेलींनी वेढलेली आहेत. तू ही तसेच कर.' त्याने त्या तरुणीला आपल्या बलदंड बाहूत आबद्ध करून टाकले.

तारुण्याच्या या नवीन अनुभूतीने ती तरुणी रोमांचित झाली. तिच्या गालावर उषेची लाली उठून दिसू लागली. तिच्या डोळ्याच्या पापण्या खाली झाल्या. आपण स्त्री आहोत हे तिला जाणवले. असा मधु-मधुर अनुभव तिला पहिल्यांदाच आला. ती मंदमंद हसू लागली.

'ये राणी, तुझ्या केसात मी फुले माळतो. परागयुक्त फुले तोडून त्याने तिचे केस सजविले. वृक्षांच्या सालींचा रक्तिम आणि फुलांच्या पिवळ्या चूर्णाने राजकुमाराने तिचा भांग भरला.'

वसंतोत्सवाचा कोलाहल अजून संपला नव्हता. राजकुमाराने तिला आपल्या रथावर घेतले आणि निवासाकडे जाण्याचा त्याने घोड्यांना इशारा दिला.

इतर तरुण हे सगळे बघत होते. सर्वांना ते सहन झाले नाही. त्यांच्यापैकी सगळ्यात दुष्ट असलेला एक तरुण आपला रथ घेऊन त्यांच्यामागे धावला, ओरडला,'या कुमारीवर माझे प्रेम जडले आहे. ती माझी आहे.'

'पण हिने माझा स्वीकार केला आहे. म्हणून ती माझीच आहे.'

त्या दुष्टाला ते सहन झाले नाही. त्याने आपले धनुष्य ताणले. शर संधान सुरू झाले. एक बाण त्या प्रणयपूरित तरुणीच्याच वक्षस्थळात घुसला. तिने एक किंकाळी फोडली आणि ती रथाखाली कोसळली.

ईर्षा वेगळी आणि हिंसा वेगळी ! सर्व युवक युवती हळहळून म्हणू लागल्या. 'देवांच्या राज्यात असा अनाचार ?'

राजकुमाराच्या सर्व लक्षात आले. त्याच्या जणू डोळ्यात तो बाण घुसला. कारण त्याचे डोळे वाहू लागले. त्याचा आक्रोश बघून सर्वांच्या डोळ्यांत पाणी आले. आजवर असे कधीच घडले नव्हते. असे हे अघटित देवेंद्राच्याही मनात सलले. इंद्राने आपले धनुष्य सज्ज केले. तो दुष्ट आततायी, इंद्राच्या तावडीतून वाचू शकला नाही.इंद्राच्या धनुष्याने त्या दुष्टाचा बळी घेतला.

तेव्हापासून ते इंद्रधनुष्य आकाशात दिसू लागले. त्या तरुणीबद्दल इंद्राच्या मनात करुणा उत्पन्न झाली. इंद्र म्हणाला,'हे तरुण स्त्रिये,तू जशी लाल पिवळ्या रंगामध्ये न्हाऊन निघाली आहेस, माझ्याही धनुष्यात तुझे हे रंग सामिल होतील आणि ते सप्तरंगी दिसेल. त्या इंद्रधनुष्याने लोकांना माझीही आठवण होईल. '

आज देखील इंद्रधनुष्य आकाशात दिसते. युवती त्याच्याकडे बघतात आणि तो राजकुमार व ती राजकुमारी यांची त्यांना आठवण येते. त्यांच्या डोळ्यांतून झरझर अश्रू झरतात. त्यालाच आपण पाऊस म्हणतो !

# ३.१२ प्यॅुली

(गढवाली लोककथा)

(जंगली भागात, पहाड-पर्वतामध्ये एक छोटेसे पिवळ्या रंगाचे फूल दिसून येते. टेहरी, गढवाल मधील लोक त्या फुलाला 'प्यॅूली' म्हणून ओळखतात. तिकडील लोकांमध्ये या फुलासंबंधी एक लोककथा आहे.)

प्यॅूलीचे फुलात रुपांतर होण्याच्या अगोदर असे म्हणतात, फार पूर्वी प्यॅूली ही एक किन्नरी होती. एक मोठा वनप्रदेश तिच्या ताब्यात होता. त्या प्रदेशावर तिचेच साम्राज्य होते. तिची प्रजा म्हणजे, भालू, वानर, हरिण, हिलाँस, कप्फू इत्यादी पशु-पक्षी ! त्या सर्वांमध्ये कुटुंबभावना होती !

ही किन्नरी या सर्व पशु-पक्ष्यांशी , हे जणू आपलेच कुटुंब आहे अशा तऱ्हेने वागत होती. किन्नरीकडून सर्वांना लाड, प्रेम, कौतुक मिळायचे. किन्नरी म्हणजे जणू त्यांचा प्राणच !

तिच्या संगतीत जादू असावी. कारण हरिणशावक ते ऐकून स्वतःला विसरून जायचे ! फुले तिच्या अवती भवती असायची. दुर्वा जणू तिच्या पायाखाली स्वतःला झोकून द्यायच्या नद्या,निसर्ग तिच्या तालावर नाचायचे. कारण ती सर्वांची लाडकी होती. निसर्ग जणू आपले सर्व सौंदर्य तिच्या अंगाअंगात भरून द्यायचा. चंद्रकलेसारखी तिची प्रत्येक कला, नाजुक सुंदर दिसायची !

किन्नरीच्या साम्राज्यात दुःख असे नव्हतेच. दुःखी माणसाची सावली देखील तिथे पडली नव्हती. पापी हातांनी कुणी फुलांना स्पर्श केला नव्हता. पशू म्हणा, पक्षी म्हणा कुणीही कधी अमंगळ शब्द ऐकला नव्हता. योगक्षेमात, लोकक्षोभ नव्हते. तिच्या साम्राज्यभर शांततेची छाया जणू पसरली होती !

तिच्याकडे बघितले म्हणजे कसे पवित्र पवित्र वाटायचे. असे वाटायचे की जणू काही ती तपस्विनी सीता वा पार्वतीच ! पूर्वजन्मीचे पुण्यफल तिच्या मुख

कमलावर विलसत होते. ती आपल्या निवासाच्या बाहेर पडली, की वाटायचे कोळ्याच्या तंतू वस्त्राने तिचे अंगअंग झाकले गेले आहे. बाहेर पडली की कुंजाकुंजातून ती नाचायची. पक्षांच्या किलबिलाटात आपलाही स्वर मिसळून द्यायची. जीव-जंतूंना कुरवाळायची. फुलांचे हार लेवून, नद्यांच्या खळखळाटाच्या तालावर ती नाचायची. ती हसली म्हणजे वाटायचे की चांदण्याच चमकत आहे. क्षणाचे तिचे अस्वस्थ होणे, जणू कुणी तिच्या कानाशी कुजबुजत आहे. ही चाहूल कशाची हे कळेनासे व्हायचे. ही अशी हुरहुर कधी हसविते कधी स्वतःलाच हरवून बसविते.

एक दिवस आपले काळेभोर केस सोडून ती एका निर्झराकाठी बसली होती. डावा हात हनुवटीवर ठेवून उजव्या हाताने एका हरिण पाडसाला कुरवाळीत होती. तिचे डोळे नदीवर उठणाऱ्या तरंगावर खिळले आहे. हृदयात हसरी चाहूल...! कुठूनतरी कसला तरी आवाज आला.एक सुंदर नवयुवक तिच्या समोर येऊन उभा राहिला. त्याच्या चेहऱ्यावर यौवनाचे रंग खुलले होते. बुद्धीचे तेज विलसत होते. परिश्रमांची छटा त्याच्या चेहऱ्यावर दिसत होती.घामाने त्याचे शरीर चिंब झाले होते. जवळच वाहाणाऱ्या निर्झराकडे त्याची तहानलेली दृष्टी होती.

प्यॅूलीने हे सर्व पाहिले. ती स्तिमित झाली ! तो प्रवासीही एकटक ती रुपाची खाण बघत होता. जणू काय त्याची तहान त्या रूपाकडे बघूनच निमाली.

प्यॅूलीने आजवर असे रुप कधी पाहिले नव्हते. अचानक एका नवख्या माणसाला पहाताच तिला किंचित संकोच वाटला. परंतु तिच्या मनात असेही आले की आपल्या मनाचा कसला तरी अभाव भरून निघत आहे.

‘तुमच्याकडे पाहून कुणीतरी शिकारी आला आहे असे मला वाटले. अन् आमच्या इथे शिकारीला मज्जाव आहे. ‘

‘ मी शिकारी नाही. मी एक राजकुमार आहे. तुम्हाला भ्यायचे कारण नाही. शिकार करण्याची आता मला गरजच राहिली नाही. ‘

क्षणभर कुणीही बोलले नाही. कदाचित दोघांना बोलण्याचे भानही नसावे.

राजकुमार तृप्तीची नजर लावून किंचित हसला.

सूर्य पश्चिमेला सरकत होता. पशुपक्षी स्वच्छंदाने आवाज करीत प्यूँलीसाठी फळे तोडून आणू लागले. ते दृष्य पाहून राजकुमाराला आश्चर्य वाटले. पक्षांनी आणलेली ताजी फळे प्यूँलीने राजकुमाराच्या आतिथ्यासाठी सादर केली. अशा आतिथ्याने राजकुमार भारावून गेला.

'किती छान ! इथे किती चांगले वाटते आहे ! सर्वत्र जंगल असूनही सगळे कसे मंगल मंगल भासते आहे. ही शांतता, हे सुखी जीवन... खरेच असे वाटते की इथून जाऊच नये.'

'मोठमोठ्या शहरांवर राज्य करणारा राजकुमार इथे या जंगलात राहून करणार काय ?'

'ते मलाही ठाऊक नाही. पण इथून मात्र हलूच नये असे वाटते.'

दोघांची नजरानजर झाली.दोघांच्या डोळ्यांतील भाव...चटकन राजकुमार म्हणाला,'तू माझ्याबरोबर चलशील ? माझ्यावर अन् माझ्या राज्यावर तुझीच सत्ता असेल.'

प्यूँलीची नजर खाली वळली. तिने उत्तर दिले नाही. संमतीची छटा तिच्या चेहऱ्यावर दिसू लागली. ती शंकित होऊन म्हणाली, 'माझे सर्व लागे-बांधे इथेच आहेत. इथले सर्व जीव मला प्रिय आहेत. त्यांना मी कसे सोडू ?'

पण लगेच तिच्या मनात आले...ही व्याकुळता...ही सौंदर्याची खाण... ! यासाठीच तर जगायचे असते. पण या सगळ्यांना सोडून जायचे म्हणजे... !

पण तारुण्याची ओढ, हृदयाची हुरहुर....अखेर ती राजकुमाराबरोबर जाण्यास तयार झाली.

दुसऱ्या दिवशी राजकुमाराबरोबर प्यूँली निघाली.तिच्या सख्या सोयऱ्यांनी तिला निरोप दिला. पण त्या निरोपात आपले कसे होणार,ही चिंता होतीच. आपल्या प्रिय साम्राज्ञीचा वियोग...!

असे कधीतरी घडणारच होते.तेथले पशु-पक्षी पुन्हा आपल्या भरवशावर नित्यक्रमाला लागले. सर्व जीवनक्रम पूर्ववत झाला.

प्यूँली आता राजधानीत राहू लागली. सारे ऐश्वर्य , प्रेम यात ती न्हाऊन निघत होती ! तरी देखील तिला तिच्या सख्या-सोबत्यांची आठवण येतच राहिली. पशु-पक्षांची गाणी, नद्यांची खळखळ, ती पर्वते शिखरे प्यूँलीला असे वाटू लागले की सगळे आपल्याला बोलावीत आहेत.

इकडे या राजधानीत ही सगळी माणसे...! तिने आजवर कधी न पाहिलेली इर्षा, घृणा,लोभ, मोह..... ! तिचे राणीपद तिला बोचू लागले. राजकुमाराच्या राणीवशात अनेक राण्या आहेत. त्यात आपणही एक.

प्यूँली मनात गोंधळून गेली. तिचे हृदय गलबलून आले. ती उदास उदास राहू लागली. तिच्या मनाची शांती नाहीशी झाली. अस्वस्थतेचा परिणाम तिच्या देहावर दिसू लागला. दिवसें दिवस ती कोमेजू लागली. आजारी झाली. ती फिकी दिसू लागली. जगण्याची इच्छाच नुरली.

राजकुमाराच्या सांत्वनाचा काही एक परिणाम झाला नाही. ती आणखीनच खंगू लागली. अखेर जवळ आलेली दिसताच ती कण्हत कुंथत म्हणाली.....

‘ माझी एक अखेरची इच्छा आहे ! ‘

‘सांग माझ्या लाडक्या राणी ! ‘

प्यूँलीने आपली इच्छा व्यक्त केली.‘यापुढे शिकारीला जाल तर माझ्या भावाबहिणींना मारू नका. माझे प्राण गेल्यावर कलेवर माझ्या राज्यातील शिखरांच्या आसपास ठेवून द्या.’

हे प्यूँलीने अखेरचे वाक्य ! तिच्या कुडीतून प्राण-पक्षी उडून गेला.

राजकुमाराने तिची अखेरची इच्छा पूर्ण केली. त्या ठिकाणी प्रिय वस्तूंच्या सानिध्यात एके दिवशी एक लहान रोप उगवले. तिच्या सग्या सोयऱ्यांनी ते जपले. रोप मोठे झाले. त्याला एक फूल उमलले..... एक फूल अनेक फूले ! त्या फु लाला तिचे जंगलातील बंधू बांधव ‘प्यूँली’ असे म्हणू लागले.

‘रम्य फूल ते सान सोनुले.’

# ३.१३ यी तेजदेवता

(ऑस्ट्रेलियन लोककथा)

कुणी एके काळी आद्यदेव सृष्टी निर्माता बाईमी यांनी पशुपक्षी, जलचर, कीटक, फुले,वृक्ष अशी सारी सृष्टी निर्माण केली. परंतु ही सारीसृष्टी चित्रासारखी स्तब्ध होती. निर्जीव होती. या सृष्टीत चैतन्य नसल्यामुळे जमिनीतून रोपांना अंकूर फुटत नव्हते. तळ्यातील पाण्यावर बर्फाचे दाट थर असल्यामुळे जलचर बंदिवान झाले होते. अतिथंडीमुळे पक्षी गारठले. त्यामुळे पशुपक्षी गुहांमध्ये लपून राहिले ! सृष्टी निर्माता बाईमीला काळजी वाटू लागली. सूर्यदेवता 'यी' अनेक काळांपासून गाढ झोपली होती. बाईमीने तेजोदेवता 'यी'ला हाक मारली, 'हे देवते, ऊठ आणि पृथ्वीवर ये. पृथ्वीवर तुला खूप काम आहे, लवकर ये ! बाईमीचा आवाज ऐकताच तेजो देवतेने डोळे उघडले आणि पृथ्वीवर दाटलेला दाट काळ्या अंधाराला चिरीत पृथ्वीवर उतरली.

तेजोदेवतेचे पाऊल पृथ्वीवर पडताच धरतीचे हृदय आनंदाने खालीवर होऊ लागले. पृथ्वीचे अंतरंग चैतन्याने उमलू लागले. जमिनीतील रोपे, वृक्ष, गवत, फुले सारेच चैतन्याने डोलत डोलत हर्षभरीत नजरेने 'यी'कडे पाहू लागले. सारी सृष्टी उमलू-फुलू लागली. सफल झाली. सृष्टीने भाज्या, फळे, धान्य, फुले, फळांचा कोश उघडा केला ! या चैतन्याने बाईमीला खूप आनंद झाला ! बाईमीने तेजोदेवतेला तळी, नद्या, समुद्रावरही फिरावयास सांगितले. तेजोदेवतेच्या प्रकाश-किरणाच्या उष्णतेने बर्फ वितळले. जलचर मुक्त झाले पाण्यात पोहू लागले ! सगळ्यात शेवटी तेजोदेवता गुहांच्या प्रवेशव्दाराशी गेली. तेजोदेवतेच्या उष्ण किरणांमुळे थंडीने गारठलेले पशुपक्षी, किटक चैतन्यमय झाले. गुहेबाहेर हिंडू-फिरू लागले. सारी जीवसृष्टी सजीव झालेली पाहून सृष्टीनिर्माता बाईमी आनंदित झाला.

# ३.१४ कृत्तिका नक्षत्राची गोष्ट

(ऑस्ट्रेलियन लोककथा)

एका राजाची एक सुंदर राणी होती. एका कावळ्याला ही राणी खूप आवडत होती. एके दिवशी राणी आपल्या सहा दासींसोबत रानात पांढरे सुरवंट शोधीत होत्या. कावळ्याने पाहिले आणि कावळ्याला एक युक्ती सुचली. कावळ्याने सुरवंटाचे रूप घेतले. रानातील दाट झुडपात लपून बसला. राणीच्या दासींनी सुरवंट पकडण्यासाठी साधे लाकडी गळ टाकले. परंतु या साध्या लाकडी गळात सुरवंट अडकलाच नाही. काही वेळाने राणीने सुंदर हाडांचा गळ बनवला. आणि काय आश्चर्य या हाडांच्या सुंदर गळात कावळा अडकला. राणीने क्षणभराचाही विलंब न करता गळ जवळ ओढला. पापणी लवते न लवते तोच सुरवंटाचे एका राक्षसात रूपांतर झाले आणि राक्षसाने राणीला पळवून नेले. रानात राहिलेल्या सहा दासीही आकाश मार्गाने उडून गेल्या. त्याच कृत्तिका होत.





# पशु पक्ष्यांच्या गोष्टी


४.१. चतुर कासव ३०५

४.२. ससा आणि कासव शाळेला निघाले ३०७

४.३. ससा आणि कासव शाळेला निघाले - २ ३१२

४.४. सशाचं हृदय ३१४

४.५. कासव अस्वल शर्यत ३१७

४.६. वेड्या कासवाची गोष्ट ३२०

४.७. कावळेराव ३२२

४.८. ढुम ढुम ढुमाऽऽक ३२७

४.९. माकडांची शाळा ३३०

४.१० राजा, ससा आणि माकड ३३३

४.११. कासव आणि माकड ३३५

४.१२. कळीचा माकड ३३८

४.१३. चतुर कोल्हा ३४१

४.१४. मूर्ख कोल्हा ३४३

४.१५. झाडावर चढणारा कोल्हा ३४५

४.१६. आळशी उंट आणि हुशार कोल्हा ३४८

४.१७. वेडा मगर आणि हुशार कोल्हा ३५०

४.१८. साळींदर आणि कोल्ह्याची गोष्ट ३५१

४.१९. बीव्हर आणि साळू ३५४

४.२०. कोंबड्याचा तुरा ३५६

४.२१. दुष्ट सिंह ३६०

४.२२. सिंह आणि चर्मकार ३६३

४.२३. सिंह आणि ससा ३७३

४.२४. मोती पोवळ्याची गोष्ट ३७७

४.२५. गाईंचे सैन्य ३७९

४.२६. बैल आणि खेचर ३८२

४.२७. गायक गाढव ३८७

४.२८. उडणाऱ्या हत्तीची गोष्ट ३९०

४.२९. हत्ती आणि पाऊस ३९१
४.३०. हत्ती शिष्टाचार शिकतो ३९४
४.३१. हत्ती आणि ससा ३९६
४.३२. चिमणीचा दाणा ३९९
४.३३. बोरोली पिकली गांडोली शेकली ४०२
४.३४. दोन बेडूक मित्रांची गोष्ट ४०३
४.३५. सागर आणि समुद्र पक्षी ४०६
४.३६. अंशुची मासेमारीची मोहीम ४११
४.३७. मोठ्या अंड्याची छोटी गोष्ट ४१७
४.३८. घारीचे बाळ ४१९
४.३९. खोल किती आहे? ४२६
४.४०. वांदर, उंदिर, मांजर, चानी व कांडेचोर यांची गोष्ट ४२८
४.४१. गोगलगाई बारशाला जातात ४३०
४.४२. पहिला झेब्रा ४३२
४.४३. आभाळातला जिराफ ४३५
४.४४. मुलगा आणि अस्वल ४३६
४.४५. दहा पायांचे अस्वल ४४३
४.४६. पांढऱ्या अस्वलाची गोष्ट ४४५

४.४७. अस्वलाचे आदरातिथ्य करणारा माणूस ४५७

४.४८. कांचील आणि मगर ४६२

४.४९. कांचीलचे चातुर्य ४६६

४.५०. बुलबुल बोलतो ४७०

४.५१. याक ४८६

४.५२. भाग्यवान पक्षी ४८९

४.५३. भूतदया आणि मैत्रभाव ४९२

४.५४. कठीण समय येता कोण कामास येतो ४९७

४.५५. लहान असती महान ५००

४.५६. बगळा आणि खेकडा ह्यांची गोष्ट ५०५

४.५७. चिमणी व कावळा ५०८

४.५८. सत्य कुत्रे महाराज ५१०

४.५९. चिमुकली इसापनीती ५१३

# ४.१. चतुर कासव

(तापीकाठच्या लोककथा)

पावसाळ्यात आनंदाने जीवन जगणाऱ्या कासवाचे उन्हाळ्यात किती हाल होतात, विचारू नका. कडक उन्हाळ्याचे ते दिवस होते. जवळ जवळ सगळेच तलाव सुकून कोरडे झाले होते. एका तलावात थोडासा चिखल होता. तेथे असलेले खेकडे मटकवून थंडाव्यासाठी कासव त्या चिखलाला चिकटून बसले होते.

एवढ्यात एक लबाड कोल्हा काही खायला मिळते का या विचाराने तलावाजवळ आला. दोन दिवसांपासून पोटभर अन्न न मिळाल्याने तो मोठी शिकार शोधत होता. एवढ्यात त्याला चिखलात काही तरी हलल्यासारखे दिसले. त्याने पटकन् झडप घालून कासवाला पकडले. कासवाने आपले अंग आत खेचून घेतले. कोल्ह्याने कासवाला चाव चाव चावले. पण काही केल्या त्याचे तुकडे होईना! कोल्ह्याच्या ताब्यातून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी कासव कोल्ह्याला म्हणतो, “कोल्हेदादा, मी उन्हाने वाळून खाक झालो आहे. तू मला पाण्यात भिजत घाल, नरम झाल्यावर मग मला खा.” कोल्हाही भुकेने व्याकूळ झाला होता. पण काय करणार? कासवाला त्याने उचलले आणि पाण्याजवळ घेऊन आला. चतुर कासवाचे काम झाले. पण कोल्ह्याच्या ताब्यातून स्वत:ची सुटका कशी करायची? कारण कोल्ह्याने कासवाला पाण्यात ठेवले असले तरी त्यावर पाय ठेवून तो उभा होता.

बराच वेळ कासव काही बोलत नाही असे बघून कोल्हा म्हणाला, “का रे कासवा, अजून नरम झाला की नाही.” त्यावर चतुर कासव म्हणाले, “पूर्ण धड नरम झाले, पण तू पाय ठेवला तेवढा भाग भिजायचा राहिल्याने कडक राहिला. तू माझ्या शरीरावरचा पाय काढून घे. सगळे शरीर नरम झाले की तुला खायला मजा येईल. काढतोस का पाय?”

भुकेने व्याकूळ झालेल्या कोल्ह्याला कासवाला केव्हा खाऊ आणि केव्हा नाही असे झाले होते. कोल्ह्याने कासवावर दाबून ठेवलेला पाय काढताच कासव सळकन् पाण्यात सरकले आणि आपली मुंडकी बाहेर काढून म्हणू लागले, “राम राम कोल्हे दादा, मी निघालो.”

त्यावर कोल्ह्याला आपल्या हातातील शिकार गेल्याचे दु:ख झाले. उपाशीपोटी आणखीनच पोटात खड्डा पडला. तरीही तो कासवावर चिडत म्हणाला, “दगाबाज कासवा, माझ्यावर तंगडी करून पळून गेलास काय ! तू खऱ्या हिंमतीचा असशील तर आता बाहेर येऊन दाखव. तुझा फडशा पाडतो की नाही बघ.” त्यावर दात काढत कासव म्हणाले, “अरे! मी कडक होतो तेव्हाच का नाही मला खाल्ले. स्वत:ला फार हुशार आणि चतुर समजतो ना! पण कबुल कर मी तुझ्यापेक्षा चतुर आणि हुशार आहे की नाही ? अरे इतका वेळ तुझ्या ताब्यात असूनही तुला मला खाण्याची अक्कल सुचली नाही. आता भोग आपल्या अक्कलेची फळं! आता जा आणि खा खेकडे-बेडकं, हा हुशार कासव चालला पळून !”

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ४.२. ससा आणि कासव शाळेला निघाले

[ ससा आणि कासव यांच्या शर्यतीची गोष्ट तुम्हा आम्हाला सर्व परिचित आहे. राम गणेश गडकरी यांच्या 'चिमुकल्या इसापनीती'त ही बीजकथा या संग्रहात दिलेली आहे. पहा (४.५९) नव्या संदर्भात नवी भर घालून अनेकांनी या बीजकथेचा आपापल्या पद्धतीने विस्तार केला आहे. शालेय विद्यार्थ्यांनीही या बीजकथेचा केलेला विस्तार यापुढील तीन कथांमध्ये दिला आहे. या विस्तार कथांमधून मुलांना शर्यतीपेक्षा किंवा स्पर्धेपेक्षाही मैत्रभाव महत्त्वाचा वाटतो आणि त्यामुळेच ह्या कथा पारंपरिक कथेपेक्षा कशा वेगळ्या आहेत ते पहा. ]

ससा आणि कासव हे दोघे जण शेजारी-शेजारी राहत होते. हे दोघेजण एकाच शाळेत व एकाच वर्गात शिकत होते. कासव घरातून लवकर निघायचे पण सश्याच्यानंतर शाळेत पोहचायचे. ससा घरातून लेट निघायचा तरीपण कासवाच्या अगोदर शाळेत पोहचायचा. सश्याचा पळण्याचा स्पीड जास्त होता. परंतु कासवाचा पळायचा स्पीड कमी होता. कासव हे खूप हळूहळू पळायचे. त्याला जोरात पळता येत नव्हते. व सश्याला जोरात पळता येत होते. म्हणून ससा स्वतःला खूप शहाणा समजत होता. त्याला असे वाटत होते की, आपल्यापेक्षा कोणीही जोरात पळू शकत नाही. कासव तर आपल्या समोर काहीच नाही असे त्याला वाटत होते. शाळेत गेल्यावर ससा कासवाची टिंगल उडवायचा. कासवपण गुपचूप बसून राहायचे. कासव सश्याला काही बोलत नव्हते. ससा कासवाला रोज म्हणायचा की, "तू दररोज जॉगिंग कर. म्हणजे तू जोरजोरात पळू शकशील." हे ऐकून कासव व ससा शाळा सुटल्यावर घरी परतायचे. ससा नेहमी कासवाच्या पुढे राहायचा. कधीच तो त्याच्या मागे राहत

नसे. त्यामुळे कासव नेहमी हरायचे. त्याच्या मागे राहायचे.

एके दिवशी ससा आणि कासव शाळेत जायला निघाले. ससा शाळेचा गणवेश घालून आपल्या दप्तरात वही, पुस्तके भरून घराला कुलूप लावून कासवाकडे गेला. तेव्हा कासवाचे काहीही आवरलेले नव्हते. कासवाला माहीत नव्हते की आजही आपली शाळा आहे. त्याला असे वाटत होते की आपण जर शाळेत गेलो तर आजही ससा आपली टिंगल उडवेल. म्हणून कासव शाळेत जायला तयार नव्हते. पण ससा कासवाकडे आला. म्हणून कासवाने लवकर जेवण केले व गणवेश घातला. नंतर शाळेचे पुस्तके व वही भरून दप्तर तयार केले. सश्याला बसून-बसून बोअर झाले होते. कासवाने एक-दोन तास आवरायला लावला होता. कासवामुळे सश्यालासुद्धा आता शाळेला वेळ झाला होता. कासवाने आपले दप्तर घेतले व घराला कुलूप लावून शाळेत जायला निघाले. सश्याला पटले की आता शाळेला वेळ झाला आहे. आपण असे हळूहळू चाललो तर आपण शाळेत लेट पोहचू. तेवढ्यात कासव म्हणाला, "आपण दोघे रिक्षा करून रिक्षावाल्याला दहा पैसे देऊन शाळेत जाऊ. म्हणजे आपल्याला शाळेला लेट होणार नाही. " सश्याला कासवाचे म्हणणे आवडले नाही. ससा कासवाला म्हणाला, "अरे दहा पैसे कमवायला किती कष्ट करावे लागतात माहीत आहे का तुला" मग ते दोघे परत चालायला लागले. चालता-चालता सश्याला अशी एक युक्ती सुचली की जिच्यामुळे शाळेला लेट होणार नाही व रिक्षाचे दहा पैसेपण वाचतील. त्याच्यावर कासव सश्याला म्हणाले की तुला माझी युक्ती आवडली नाही तर मला पण तुझी युक्ती आवडणार नाही. ससा म्हणाला, "अरे मी तर माझी युक्ती सांगितली पण नाही; तरी पण तुला ती आवडली नाही. 'मी ती युक्ती सांगणार नाही' असे ससा कासवाला म्हणाला. तेव्हा कासव म्हणाला, "चल तू तूझी युक्ती सांग आपण तुझ्या युक्तीनेच शाळेत जाऊ." तेव्हा सश्याने आपली युक्ती सांगायला सुरूवात केली.

सश्याची युक्ती अशी होती की, "आपण इथून जर आपल्या शाळेपर्यंत शर्यत लावली तर आपले पैसे वाचतील व लवकर शाळेत पोहचू." कासवाला सश्याची

ही युक्ती आवडली. मग ससा आणि कासव या दोघांची शाळेपर्यंतची शर्यत सुरू झाली. ससा जोरजोरात पळू लागला. पण कासव हळूहळू पळत होते. कासव खूप मागे राहिले होते. ससा जोरजोरात पळत असताना पुढे एक मोठा सिग्नल आला. ससा त्या सिग्नलवर थांबून राहिला होता. सिग्नल सुटल्यावर ससा निघाला. पण कासव मागे राहिल्यामुळे ते सिग्नल पार करू शकले नाही. दुसऱ्या बाजूचे सिग्नल सुटले होते. तेवढ्यात पहिला सिग्नल सुटला. कासव सिग्नल ओलांडत होते. सिग्नल ओलांडल्यावर कासव हळूहळू पळू लागले. तेव्हा एकदम जोरात वादळी पाऊस सुरू झाला. पाऊस जोरजोरात कोसळू लागला. विजा चमकू लागल्या. कासव एका प्रचंड मोठ्या आंब्याच्या झाडाखाली जाऊन बसून राहिले. ते पाऊस जाण्याची वाट पाहत होते. पण पाऊस काही थांबत नव्हता. इकडे कासव येत नाही म्हणून ससा घाबरून गेला होता. सश्याला वाटले की कासव हरवले आहे. ससा ज्या रस्त्यानी आला त्या रस्त्यानी परत जाऊ लागला. ससा सिग्नलजवळ आल्यावर त्याला दिसले की कासव एका प्रचंड मोठ्या आंब्याच्या झाडाखाली बसले आहे. ते कासव घाबरलेले होते. ससा कासवाजवळ आला तेव्हा कासवाला थंडी वाजत होती. ससा जोरात पळत-पळत घरी गेला व कासवासाठी छत्री व आपल्यासाठी रेनकोट घेऊन कासवाजवळ आला. कासवाला छत्री दिली व सश्याने रेनकोट घातला. मात्र कासवाला रेनकोट आवडला होता. कारण रेनकोटमुळे काही पाऊस लागत नाही व थंडी वाजत नाही. पण ससा तो रेनकोट देत नव्हता. कासव दुःखी झाले होते. सश्याला कासवाचे दुःख सहन झाले नाही. सश्याने आपल्या अंगातून तो रेनकोट काढला. कासवाला दिला. आणि सश्याने ती छत्री घेतली. कासवाला आनंद झाला. व तेवढ्यात पाऊस थोडा कमी झाला होता. त्या दोघांची शर्यत परत सुरू झाली. आता ते दोघे मिळून शाळेत पोहचले. कासव व ससा दोघे जण खूप खूष होते. त्या शर्यतीत कोणीही जिंकले नाही. ती शर्यत पूर्ण झाली नाही. ससा म्हणाला, "आपण आता आपली शर्यत उद्या सकाळी पूर्ण करू." जो उद्या सकाळी लवकर उठेल आणि सर्व गणवेश व दप्तर

भरून शाळेत पोहचेल तो ही शर्यत जिंकेल. असे त्या दोघांचे ठरले. पाच तासांनी त्यांची शाळा सुटली. दोघे जण घरी जायला निघाले.

दोघे जण आपापल्या घरी गेल्यावर आपापला अभ्यास करून, जेवण करून दोघे जण लवकर झोपले. रात्र उलटली. दुसऱ्या दिवसाची सकाळ उजाडली. दोघे जण सकाळी लवकर उठले. आंघोळ करून आपापला शाळेचा गणवेश घालून आपल्या दप्तरात वही, पुस्तक भरून घराच्या बाहेर पडले. ससा आणि कासव यांच्यात परत शर्यत सुरू झाली. मात्र आज ससा व कासव दोघेही जोरजोरात पळू लागले होते. कासवपण आज जोरात पळत होते. कासवाला आज शर्यत जिंकायची होती. व सश्याला पण आज शर्यत जिंकायची होती. ससा व कासव हे दोघेजण मोठ्या सिग्नलपर्यंत जोरात पळत आले. त्यांना वाटले की आपण हा सिग्नल ओलांडून जाऊ. पण तसे झाले नाही. ससा, कासव ज्या रस्त्यांनी आले तो रस्ता बंद झाला. व दुसरा रोड सुटला. ससा आणि कासव दोघेजण तो रस्ता बंद होईपर्यंत थांबून राहिले. पण त्यांचा वेळ कमी राहिला होता. जेव्हा त्यांचा रोड सुटला तेव्हा दोघेजण पळत-पळत शाळेत गेले. ससा व कासव दोघेही जिंकले होते.

वर्गात आल्यावर दोघेही आपापली स्तुती करू लागले. त्यांची शाळा सुटली तेव्हा दोघेजण घरी जायला निघाले. ससा आणि कासव या दोघांमध्ये आज परत शर्यत सुरू झाली होती. ससा जोरात पळत होता आणि कासवपण जोरात पळत होते. पळता पळता सश्याचा पाय मुरगळला. त्याचा पाय खूप दुखू लागला. त्याच्या पायात ठणका होवू लागल्या. तेव्हा कासव सश्याला डॉक्टरांकडे हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. डॉक्टरांनी कासवाला सांगितले की, "सश्याच्या पायाचे ऑपरेशन करावे लागेल." हे ऐकून कासवाला धक्का बसला. कासवाने डॉक्टरांना सांगितले की, तुम्ही सश्याच्या पायाचे ऑपरेशन करून टाका. सश्याला पायाच्या ऑपरेशनसाठी रक्ताची गरज लागणार आहे. त्याचे रक्त खूप गेले आहे. त्याचे हाड मोडलेले आहे. तेव्हा कासव डॉक्टरांना म्हणाला तुम्ही माझ्या पायाचे हाड त्याच्या पायाला लावा. त्यांच्यामधील हे प्रेम

पाहून डॉक्टरांनी त्याचे ऑपरेशन फुकटात करून दिले. मग सश्याचा पाय नीट झाल्यावर कासवाने त्याला घरी नेले. कासवाने त्याला औषधे, गोळ्या आणून दिल्या. त्याच्यामुळे त्यांची मैत्री जमली व ते दोघे कधीही शर्यत लावत नव्हते. ते आनंदाने शाळेत जाऊ लागले.

(विक्रम नामदेव गांगुर्डे, इ. ९वी ब रवींद्रनाथ विद्यालय, नाशिक
: ब्रेन टॉनिक मासिक, ऑक्टो-नोव्हेंबर २००६)

# ४.३. ससा आणि कासव शाळेला निघाले

ससा आणि कासव म्हटल्यावर आपल्या डोळ्यांसमोर एकच गोष्ट उभी राहते ती म्हणजे 'ससा व कासवाची शर्यत'. पण माझी गोष्ट यापेक्षा निराळीच आहे बरं का.

एक जंगल होतं. त्या जंगलात ससा व कासव हे दोघे घनिष्ठ मित्र राहत होते. त्याच जंगलात एक शाळा होती. ते दोघे त्या शाळेत सकाळी बरोबर जात असत. ससा टुणटुण उड्या मारत पुढे निघून जाई. तर कासव मात्र हळूहळू जात असे. त्यामुळे त्याला शाळेत शिक्षा होत असे. असे खूप दिवस घडले. सशाने कासवाची मैत्री सोडून दिली व दोघेजण स्वतंत्रपणे शाळेत जाऊ लागले. असेच दिवस उलटत गेले.

एके दिवशी अचानक हत्ती सर वर्गात येऊन म्हणाले की, आपल्या वर्गाची सहल जाणार आहे. हे ऐकून सगळ्या प्राण्यांना आनंद झाला. पण हत्ती सरांनी लगेच नमूद केले की, ही सहल केवळ मजा करण्याची नसून शैक्षणिक सहल आहे. त्यात तुम्हाला अनेक वनस्पतींची माहिती मिळवायची आहे. सगळ्या प्राण्यांनी ही गोष्ट मान्य केली.

दोनचार दिवसांनी सहल निघाली. प्रत्येकाने आपल्याबरोबर स्वतःच्या आवडीचा खूप खाऊ घेतलेला होता. शिवाय माहिती लिहिण्यासाठी जवळ वही-पेनसुद्धा ठेवले होते. हसत-खेळत, गाणे गात सहल निघाली. बसमध्ये सगळे गाण्याच्या भेंड्या खेळू लागले. माकडाने तर चक्क भीमरूपी स्तोत्र म्हटले. त्याचे बघून कासवाने सगळ्या देवांचे एकत्रित असलेले एक भजन म्हटले. शेवटी हत्ती सरांनी सगळ्यांना गणपती अथर्वशीर्ष शिकवले. असे करता करता ते सहलीच्या ठिकाणी म्हणजेच आनंदवनात पोहचले. तेथे सगळ्यांनी मिळून मिसळून सहभोजन केले. थोड्याशा विश्रांतीनंतर हत्तीसरांनी

सगळ्यांना बोलावले आणि दोन-दोनचे गट पाडून दिले. आणि काय आश्चर्य, सशाच्या जोडीला कासव आले. सरांनी त्यांना विविध वनस्पती गोळा करायला सांगितले.

ससा व कासव एका तळ्याजवळ जाऊन पोहचले. तळ्याजवळ असलेली वनस्पती तोडण्यासाठी ससा जवळ जाताच त्याचा पाय घसरला आणि तो तळ्यात जाऊन पडला. सशाला पोहता येत नसल्याने तो गटांगळ्या खाऊ लागला व मोठमोठ्याने ओरडू लागला. त्याचा आवाज ऐकताच कासव तळ्यापाशी आले. त्याने आपल्या जीवाची काळजी न करता पाण्यात उडी मारली. तो पोहण्यात पटाईत असल्याने क्षणात त्याने सशाचे कान ओढून त्याला बाहेर काढले. कासवाशी वाईट वागल्याबद्दल सशाने कासवाची माफी मागितली. नंतर दोघेजण सरांकडे गेले. घडलेली हकीगत ऐकून सरांनी कासवाचा गौरव केला व सगळ्यांपेक्षा जास्त व विविध वनस्पती एकत्रित जमा केल्याबद्दल याच जोडीचा गौरव केला.

ते सगळे त्यांच्या जंगलात पोहचले व झोपी गेले. मात्र सशाला झोप आली नाही. त्याने कासवाला भेटवस्तू देण्याचे ठरविले. त्याने एक लाकडाची लांब फळी घेतली. लाकडाचा एक गोल तयार केला. तो त्या फळीला जोडला. त्याने असे चार गोल कापले व ते फळीला लावले.

सकाळी पहिल्यासारखाच ससा कासवाला बोलवायला आला. त्याने ती फळी कासवाला दिली. रस्त्याने कासवाला त्या फळीवर चढायला व त्याच्या आधारे चालायला सांगितले. अशा रितीने कासवाचा स्केटिंग बोर्ड तयार झाला व ससा आणि कासव रोज शाळेत जाऊ लागले. दोघेही बरोबर व वेळेआधी शाळेत पोहचू लागले. तेसुद्धा शाळेची पहिली घंटा होण्याचा आत.

(श्रेया शांताराम भानोसे, इ. ७वी अ मा.रा.सारडा कन्या विद्यामंदिर, नाशिक
: ब्रेन टॉनिक मासिक, ऑक्टो-नोव्हेंबर २००६)

# ४.४ सशाचं हृदय

(कोरियन लोककथा)

कोणे एके काळी समुद्राच्या तळाशी एक महाल होता. या महालात विविध प्रकारचे मासे, कासव आणि साप राहत असत. एके दिवशी सापांचा राजा पोटदुखीमुळे इकडेतिकडे सरपटत होता. दिवसरात्र वेदना असह्य झाल्यामुळे तळमळत होता. त्याच्या कुटुंबातील राजकुमार, राजकन्या, राणी, प्रधान सगळेच काळजी करू लागले. काय करावं कुणालाच काही सुचत नव्हते आणि राजाच्या वेदनाही कुणाला बघवत नव्हत्या. प्रधान म्हणाले, "आपण आपले मुख्य राजवैद्य माशाला बोलावू." राजवैद्यांनी राजाची नाडी पाहिली आणि म्हणाले, "महाराजांना सशाचं हृदय उकडून खायला दिलं तर लवकर आराम पडेल."

ससा आणण्यासाठी कासवाला सांगण्याचं ठरलं. कारण कासव पाण्यात आणि पाण्याबाहेरही जिवंत राहू शकतं. राजासाठी काम करण्याची संधी मिळते आहे, याचा कासवाला विशेष आनंद झाला. राजाचा निरोप घ्यायला कासव आला आणि कामगिरी यशस्वीपणे पार पाडीन असा सगळ्यांना विश्वासही दिला. याच वेळी राजालाही खूप आनंद झाला. राजा म्हणाला, "कासवा, फार पूर्वी तुझे आजोबा सशाबरोबरची धावण्याची शर्यत जिंकले होते. जा, माझ्यासाठी ससा घेऊन ये, आमच्या सगळ्यांच्या तुला शुभेच्छा आहेत!"

कासव समुद्रातून वर जमिनीवर आलं. हळूहळू समोर दिसणाऱ्या पर्वताच्या दिशेने चालू लागलं. वसंत ऋतूचा काळ असल्यामुळे जिकडे तिकडे हिरवळ होती. फळं-फुलं बहरलेली होती. पक्षी, फुलपाखरं भिरभिरत होती. अवतीभोवती हरीण, माकडं, चित्ते, हत्ती, वाघ, इ. प्राणीही दिसू लागले. तितक्यात हिरवळीवर एक सुंदर गुबगुबीत पांढरा शुभ्र ससा दिसला. कासवाने सशाला नमस्कार केला. "ससोबा, अशा या सुंदर हिरवळीवर आपली भेट

झाली, खूप खूप आनंद झाला आहे." ससा म्हणाला, "मी जगातील जवळ जवळ सगळ्या प्राण्यांना भेटलो आहे; पण तुझ्यासारखा विचित्र प्राणी काही पाहिला नाही. तुझे पाय कसे तर बिनबोटांचे! मान कशी तर सतत हलणारी! पाठ कशी तर दगडासारखी टणक! एखादा दगडाचा वाडगाच जणू! काय म्हणायचं आहे तुला?" खरं तर कासवाला फार राग आला होता. पण राजाने सोपवलेली कामगिरी फत्ते करण्यासाठी कासवाने राग गिळला. शांत झाला आणि म्हणाला, "मी कासव, माझी पाठ जरी दगडासारखी टणक असली तरी तिच्यामुळे मी पाण्यात राहतो, मनात आलं तर जमिनीवरही फिरू शकतो. मी खूप लांबवरचं पाहू शकतो. समुद्रातल्या सगळ्या सजीव प्राण्यांचा मी कॅप्टन आहे! ससोबा, जगातले सगळे प्राणी पाहिले आहेस, असं म्हणतो म्हणून विचारतो, समुद्रातले प्राणी, वनस्पती, समुद्रसर्प, त्यांचा महाल पाहिलास का? नसेल बघितला तर चल, बस माझ्या दगडाच्या टणक पाठीवर आणि बघ सागराची नवलाई!"

सशाने विचार केला, खरंच सागर, सागरतळ आपण पाहिलाच नाही. कासव म्हणतं आहे तर बघू एक नवं जग. कासवाच्या पाठीवर ससा बसला. कासव खोल समुद्रात सशाला आपल्या राजाच्या महालात घेऊन आला. एका सिंहासनावर एक कुरूप राक्षसासारखा सर्प पाहून ससा घाबरला.

"ए भित्रोबा, चिल्लूर, चिमुरड्या मी या समुद्राचा राजा आहे. डोळे भरून सागराची नवलाई पाहून घे. कारण थोड्याच वेळात मला तुझं हृदय उकडून खायचं आहे. आमचे राजवैद्य मासेराव यांनी सांगितलं आहे की सशाचं हृदय उकडून खाल्ल्याशिवाय पोटदुखी थांबणार नाही आणि म्हणूनच आमचे कासवराव तुला येथे घेऊन आले आहेत"

आपण आता मरणार या कल्पनेने ससा थरथर कापू लागला. राजा म्हणाला, "ए ससोबा, बघ, तुझं हृदय काढल्यावर तुझं शव (मृत शरीर) रेशमी कापडात ठेवण्यात येईल. एका सोन्याच्या पेटीत ठेवलं जाईल आणि ही पेटी फळांच्या बागेत पुरण्यात येईल. त्याजागी चांगलं स्मारक बांधू, तुझा फोटो लावू. अनेक शतकं तुझी ही स्मृती जपली जाईल. कारण तू एका राजाचे प्राण वाचवणार आहेस. कधीतरी एखादा शिकारी किंवा वन्य प्राण्यांचं तू भक्ष्य झाला असतास

त्यापेक्षा तुला अशा या मरणाची संधी मिळाल्याबद्दल तू देवाचे आभार मान!" असं सशाला समजावल्यावर राजाने आपल्या सहकाऱ्यांना सशाचं हृदय काढण्यास सांगितले. सहकारी पुढे आले.

तेवढ्यात ससोबा म्हणाले, "माझ्यामुळे एका राजाला जीवदान मिळत असेल तर मी जरूर माझं हृदय देईन. खरंतर मला त्याचा आनंदच आहे. पण मी सहज हिरवळीवर फिरायला आलो होतो. माझं हृदय मी सुरक्षिततेसाठी लपवून ठेवत असतो. कासवदादांनी मला ही सगळी कल्पना दिली असती तर मी हृदय घेऊनच इकडे आलो असतो."

"खरं सांगतो आहेस का? राजा म्हणाला. महाराज कुणाच्याही उपयोगी पडण्यातच प्राण्याच्या जीवनाची सार्थकता असते. आणि आपल्यासारख्या महान राजासाठी हृदय देण्यात ही सार्थकता लाभत असेल तर मी कसं खोटं बोलणार?" राजालाही ते पटलं. राजा कासवरावांना म्हणाले, "जा, लवकर जा, आणि हृदयासह ससोबांना घेऊन या."

ससोबा तडक कासवाच्या पाठीवर बसले आणि समुद्रकिनाऱ्यावर आले. पाठीवरून उडी मारून ससोबा दुडक्या चालीने आपल्या हिरवळीकडे निघाले.

कासव ससोबाला म्हणाले, "ससोबा हृदय घेऊन लवकर ये."

ससोबा मागे वळून म्हणाले, "कासवासारखा मूर्ख कासवच. अरे कासवा, तू, तुझा राजा, तुम्ही सगळे मूर्ख आहात! अरे, असं हृदय काढून कुणी हिंडू-फिरू शकतं का? आणि कुणाचं हृदय खाऊन कुणाचा मृत्यूही टळू शकत नाही. मृत्यूला राजा असो वा रंक, माणूस असो वा प्राणी सगळे सारखेच असतात. त्यामुळे आपल्या गावाला जा आणि राजाला आपल्या मृत्यूला आलिंगन देण्याची तयारी ठेवायला सांग. झाडाची जुनी पानं गळतात आणि चैत्रात नवी पालवी येते. प्राणिसृष्टीतही एक प्राणी गेला की दुसरीकडे दुसरा प्राणी जन्माला येतो, हे सृष्टीचक्र समजून घे. म्हणजे पुन्हा असा मूर्खपणा करण्याची वेळ येणार नाही."

# ४.५. कासव-अस्वल शर्यत

[ कासव-अस्वल शर्यत ही पळण्याची शर्यत आहे. भारतीय लोककथेतील ससा-कासवाची पळण्याची शर्यत इथे आठवणे अगदी स्वाभाविक आहे. दोन्ही कथांत मंदगती कासव कायम आहे. स्पर्धक मात्र बदलला आहे. एका ठिकाणी अस्वलासारखा शक्तिमान प्राणी आहे, तर दुसऱ्या ठिकाणी सशासारखा चपळाईने पळणारा प्राणी आहे. घमेंडी स्वभाव मात्र दोन्ही कथांत आहे आणि उतरलेली घमेंडही दोन्हीकडे आहे. कासवाचे चातुर्य आणि युक्तिबाजपणाही दोन्ही कथांत कायम आहे. दोन वेगवेगळ्या संस्कृतीत कल्पनांचे असलेले, हे साधर्म्य थक्क करणारे निश्चितच आहे. ]

गोठवून टाकणाऱ्या हिवाळ्याच्या सुरुवातीचा काळ होता. सर्वत्र खूप बर्फ पडला होता. सगळी डबकी,तळी आणि मोठे तलावही गोठून गेले होते. अस्वलांनाही गोठवणारी थंड हवा होती. अशा हवेत उघड्यावर उगाच हिंडू नये तर संपूर्ण गोठवणारा 'पांढरा हिवाळा' संपेपर्यंत गुहेत झोप काढणे शहाणपणाचे असते,अशी समज ज्याला अद्याप यायची बाकी आहे, असे अस्वल उगाच गुरगुरत जंगलातून इकडून तिकडे हिंडत होते.

हिंडता हिंडता ते अस्वल एका मोठ्या गोठलेल्या तलावाच्या काठी पोहोचले. गोठलेल्या तलावाच्या बर्फातून तोंड बाहेर काढले आहे, असे एक कासव त्या अस्वलाला दिसले. त्या जुन्या मित्राला कोणत्याही प्रकारचे अभिवादन न करता ते आढ्यताखोर अस्वल मोठ्याने ओरडून म्हणाले, 'हाय ! अहो हळुराव, काय बघताहात ? कुठं लक्ष आहे ? 'कासवाला राग आला. अस्वलाकडे मिटमिट बघत ते म्हणाले, "मला हळुराव तू का बरं म्हणतोस ?' हे ऐकल्यावर तर त्या अस्वलाला जास्तच चेव चढला. अस्वल कासवाला म्हणाले, अरे सर्व प्राण्यात सर्वात मंद म्हणजे तू ! मग तुला हळुराव म्हणायचे नाही तर काय ? त्यात काय बिघडले ? तू आहेसच मुळी सर्वात मंद. म्हणून

हळुराव ! अरे, तुझ्याबरोबर जर कधी मी पळायची शर्यत लावली असती, तर तुला मी कधीच मागे टाकून शर्यत जिंकली असती !'

अस्वलाची ही तुच्छतावादी भाषा ऐकून कासव शांतपणे म्हणाले,'मित्रा,ठीक आहे. असे नुसते बोलण्यापेक्षा आपण शर्यतच लावून ठरवू की दोघांत कोण अधिक चपळ आहे.' अस्वलाने कासवाकडे एकदा बघितले आणि ते म्हणाले,'ठीक आहे. पण आपली शर्यत होईल कुठे ?'

कासव उत्तरले, 'उद्या सकाळी याच तलावाकाठी आपण पळण्याची स्पर्धा ठेवू. तू तलावाच्या काठाकाठाने पळत राहा आणि मी तलावाच्या पाण्यातून पोहत राहीन.' अस्वल म्हणाले,'अरे पाण्यातून पोहताना तू कसा दिसणार ? कारण हा सर्व तलाव बर्फाने भरून जाऊन गोठला आहे.' कासव उत्तरले, हे बघ,आपण असे करू या, गोठलेल्या तलावातील बर्फाला मी तलावाच्या काठाकाठाने जागोजागी काही विशिष्ट अंतरावर भोकं पाडतो. बर्फाच्या खालच्या पाण्यातून मी पोहतो. मी पोहतो आहे हे तुला कळण्यासाठी प्रत्येक भोकात तोंड खुपसून मी बाहेर काढीत जाईन म्हणजे मी कुठल्या भोकापर्यंतचे अंतर कापीत पोहत पुढेपुढे चाललो आहे, हे तुला समजत राहील. अस्वलाला कासवाचे हे बोलणे पटले. अस्वल म्हणाले, 'ठीक आहे. मला मान्य आहे. उद्या सकाळी आपली पळण्याची शर्यत होईल.

दुसरा दिवस उगवल्यावर मग दुसरेही पुष्कळ प्राणी ही मजेशीर शर्यत पाहण्यासाठी जमा झाले. त्या मोठ्या तलावाच्या काठावर हे जमलेले प्राणी एका रांगेत उभे राहिले. त्यांना दिसले की शर्यतीच्या तयारीने आलेले अस्वल जमिनीवरच्या बर्फावर मनसोक्त लोळले. उठले. उड्या मारल्या. या प्रकाराने त्याने शर्यतीसाठी स्वतःला तयार केले. मग सूर्य जेव्हा क्षितिजावर हातभर वर आला तेव्हा त्या मोठ्या तलावाच्या झालेल्या बर्फातून कासवाने डोके वर बाहेर काढले. कारण ते बर्फाखाली पाण्यात होते. बर्फाला पाडलेले ते पहिलेच भोक होते. तिथूनच शर्यत सुरू होणार होती. त्या पहिल्या भोकातून डोके बाहेर काढून ते कासव अस्वलाला म्हणाले, 'अस्वला, चल मी शर्यतीसाठी तयार आहे. मग अस्वलही लगबगीने शर्यत जिथून सुरू होते त्या जागी जाऊन उभे

राहिले. शर्यत सुरू करण्याची सूचना मिळताच अस्वलाने सुसाट धावायला सुरुवात केली. बर्फात चौखूर उधळण्याने त्याच्या पंजांनी सर्वत्र बर्फ पडत होता आणि धावण्याने श्वासाचा वेग वाढल्याने त्याच्या नाकातून बाहेर पडणाऱ्या उच्छ्वासांचे थंड हवेचे पांढऱ्या वाफेत रुपांतर झाले होते. या वाफेचा पांढरा ढग त्याच्या डोक्यावर तरंगू लागला होता. इकडे पहिल्या भोकातून तोंड बाहेर काढणारे कासव पुन्हा बर्फाच्या खाली होते. त्याचे कौतुक होत होते. अस्वल मात्र शर्यत पूर्णपणे हरले होते.

अत्यंत मानहानी झाल्याने निराशेने त्या अस्वलाने दुखऱ्या पायांना कसेबसे ओढत घर गाठले. मनाने आणि शरीराने ते इतके भयंकर थकलेले होते, की घरी पोहोचल्यावर त्याला लगेच गाढ झोप लागली. संपूर्ण हिवाळा संपून सुखद उन्हाळ्याची चाहूल लागेपर्यंत ती गाढ निद्रा चालूच होती !

अस्वल आणि सर्व प्रेक्षकप्राणी निघून गेल्यावर त्या हुशार आणि विजयी कासवाने आपल्या मोठ्या पंजाने तलावाच्या बर्फावर खुणेची थापटी मारली. या खुणेच्या थापटीचा अर्थ बर्फाखालील पाण्यात असणाऱ्या कासवांना बरोबर कळला आणि डझनभर कुरुप हिरवी तोंडं बर्फातील त्या सर्व भोकांमधून एकाचवेळी दत्त म्हणून एकदम प्रकट झाली ! ही डझनभर कुरुप हिरवी कासवे त्या विजयी कासवाचे चुलत भाऊ होते, म्हणूनच ते सर्वच्या सर्व विजयी कासवाप्रमाणेच दिसत होते !

सर्व भावंडांना पाहून ते कासव उद्गारले,'हे माझ्या भावंडांनो,मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे. सर्वांना सतत नावे ठेवणाऱ्या त्या उद्दाम आणि बढाईखोर अस्वलाला आपण सर्वांनी आज चांगलाच धडा शिकवला आहे.' असे म्हणून ते विजयी कासव हसले आणि त्याच्याबरोबर त्याच्यासारखी दिसणारी डझनभर कासवेही अगदी तश्शीच हसली ! ते कासव हसून पुढे म्हणाले,'अन्य प्राण्यांना आपण आज असेही दाखवून दिले आहे, की कासव हा काही सर्व प्राण्यांतला हळुराव नाही.'

(अरुण प्रभुणे : नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या अस्वल लोककथा)

# ४.६. वेड्या कासवाची गोष्ट

कोणे एके काळी, एका तळ्यांत कंब्रुग्रीव या नावाचा एक कासव रहात होता.

कंबुग्रीव म्हणजे कमानदार मानेचा. तर हा कमानदार मानेचा कासव ज्या तळ्यांत रहात होता, त्या तळ्यांत दोन हंस पक्षीही रहात होते. त्या तिघांची छान मैत्री जुळली होती नि ते दिवसभर एकमेकांशी खेळण्यात आणि गप्पा मारण्यात रमत असत.

अशी वर्षं लोटली नि त्यांची मैत्री दृढ होत गेली. एका वर्षी उन्हाळा कडक पडला होता. पाऊस पडत नव्हता. तळ्यांतलं पाणी आटू लागलं. दररोज ते तिघे मित्र आशेनं आकाशाकडे बघत. पण एकही पावसाळी ढग दिसत नव्हता.

एक हंस दुस-या हंसाला म्हणाला, 'हे तळं लौकरच कोरडं ठणठणीत होईल, आपण दुसरं तळे किंवा नदी शोधायला हवी. आपण कंब्रुग्रीवाकडं बोलून काही तरी ठरवू या. त्याचा विचार ऐकू या.'

आणि त्या हंसानी कासवाला आपला बेत सांगितला. कासव थोडा वैतागला नि मग तो बोलला, 'हे मला सांगण्यात काय अर्थ ? मी पाण्यात राहाणारा प्राणी. पाण्याशिवाय मी जगू शकणार नाही. मरून जाईन. आणि तुम्ही निघून गेलात तर मी आणखीच लौकर मरेन कारण तुम्ही दूर निघून गेल्याचं दुःख मला सोसणार नाही. तुम्ही जर माझे खरे मित्र असलात तर, तुमच्याबरोबर मलाही नेण्याचा मार्ग तुम्ही शोधून काढाल. तुम्हाला ठाऊकच आहे की कायदेपंडित मनु ह्यानं सांगितलं आहे की, शहाणी माणसे संकटाच्या वेळी आपल्या मित्राला किंवा नातेवाईकाला वाचविण्याची शक्य तेवढी धडपड करीत असतात.

कंब्रुग्रीवाला आपल्याबरोबर दुस-या तळ्यांत नेण्याचा उपाय शोधण्यात ते तीन भित्र गढले. दोन दिवस ते विचार करीत होते विचार विचार आणि विचार-पण उपाय काही सुचेना.. एवढ्यात कासवाला एक छानदार युक्ती सुचली.

'एक काठी घेऊन या तुम्ही. ती मध्यभागी मी तोडांत धरतो. तुम्ही दोघे दोन टोकं तुमच्या चोचीत पकडा आणि दुस-या तळ्याकडे उडत जा.'

तसा एक हंस म्हणाला, 'वा : ही छान युक्ती आहे. मात्र ह्यात एक धोका आहे आपण हवेतून उडत असताना तू बोलता कामा नये. बोलण्यासाठी तोंड उघडलं तर तोंडातली काठी सुटून तू खाली पडशील आणि मरून जाशील.

त्यावर कासवानं न बोलण्याचं, तोंड न उघडण्यांच वचन दिलं. हवाई हवेतल्या प्रवासात गप्प राहाण्याचं त्यानं कबूल केलं

दुस-या दिवशी हंसानी एक काटकी आणली. ठरल्याप्रमाणे कासवानं मध्यभागी ती दातानी पकडली. हंसानी दोन टोकं चोचीत धरली नि ते भर्रकन उडाले. सकाळची वेळ होती. नदीत आंघोळी करण्यासाठी खूप माणसं आली होती. एक काटकी दोन हंसानी दोन टोकांना धरली आहे.

आणि मधला भाग दाताने पकडून एक कासव लोंबकळतो आहे. हा मजेशीर देखावा पाहून लोक हसत सुटले.

नंतर ती तिघं एका मोठ्या गावावरून उडत जाऊ लागली, रस्त्यातील एक माणूस आपल्या मित्राला म्हणाला, 'रामू, अरे, हे काय उडतयं आकाशातून ? ते दोन पक्षी कोणाला घेऊन उडत जातायत? किती मजेशीर दिसतय हे नाही का?

कासवानं हे ऐकलं आणि तो भयंकर चिडला..

'दुसऱ्याची टिंगल करण्याबद्दल मी तुला धडा शिकवतो....' असं कासव रागारागानं बोलणार होता.

पण पहिला शब्द उच्चारण्यासाठी त्यानं तोंड उघडताच त्याच्या तोंडातली काठी सुटली आणि तो धाडकन् खाली पडला. त्याच्या पाठीवरल्या घट्ट कवचाचे तुकडे तुकडे झाले.

आणि ज्या माणसानं त्याची टिंगल केली त्यानंच त्याला उचललं नि घरी नेऊन खाऊन टाकलं.

तेव्हा लक्षात ठेवा तुम्ही काय बोला, कुठे बोलता हे नेहमी काळजीपूर्वक ध्यानात ठेवून काय ते बोला.

(कुमुदिनी रांगणेकर : मुलांचं पंचतंत्र, १९८२)

# ४.७ कावळेराव

(तापीकाठची लोककथा)

एक होता कावळा आणि एक होती चिमणी. दोघेही गरिबीला कंटाळलेले. वैतागलेले. थकून गेलेले. एकदा कावळा भेटला चिमणीला. सांगायला लागला, आपण मिळून शेत घेऊ या. राबू दोघं मिळून, अन् सधन बनू. चिमणी विचार करते कावळेराव मदतीला आहेत. काही अडचण येणार नाही. ती पटकन होकार देते.

कावळा डोळ्यांत पाणी आणून चिमणीला म्हणतो, चिमणे, चिमणे शेत खरेदीसाठी लागणारा पैसा माझ्याजवळ नाही. चिमणी म्हणाली, काळजी करू नकोस. मजजवळ आहे ना! मी देते. तिने आपले छोटे-मोठे दागिने, पै-पै जोडलेले पैसे कावळ्याच्या हवाली केले. कावळा खुश झाला. निघाला शेत खरेदीला.

दोघांनी एक सुरेख शेत खरेदी केलं. चिमणी कावळ्याला म्हणाली, कावळेराव, कावळेराव शेत दोघांचं! दोघांनी राबायचं. खूप पिकवायचं आणि सुखानं रहायचं. कावळा म्हणाला, “होय गं चिमणीबाई!”

दुसरा दिवस उजाडला. दोघे निघाले. शेतात पोहचले. आपलं शेत. चिमणीचा उर भरून आला. आपल्या मालकीच्या शेतात फिरताना चिमणीचा आनंद गगनात मावेना!

दोघे शेतातील काडी-कचरा वेचू लागतात. नको असलेली झाडे तोडू लागतात. इतक्यात कावळ्याची चोंच जाते मोडून. तो चिमणीला म्हणतो, चिमणे, चिमणे, मी लोहाराकडे जाऊन नवीन चोंच बसवून आणतो. चिमणी म्हणते, बरं!! चिमणी एकटीच संपूर्ण शेत स्वच्छ करते. नको असलेली झाडे तोडते. तोडलेली झाडे शेताबाहेर फेकते. तिला मदतीची गरज असते. ती कावळ्याला हाक मारते -

"चिव-चिव-चिव
कावळेराव-कावळेराव
याहो राव - याहो राव
झाडे फेकायला याहो राव
चिव-चिव-चिव"

कावळा म्हणतो -

"काव-काव-काव
येतो ग येतो वेडे चिमणे,
चोंच बनवतोय धडा-धडा
काव-काव-काव"

चिमणी एकटीच सर्व तोडलेली झाडे, जमा केलेला काडी-कचरा दमा-दमाने फेकते. शेत पेरणीसाठी तयार होते. पण कावळा पेरणीचा विषयच काढत नाही. शेवटी चिमणीच म्हणते -

"चिव-चिव-चिव
कावळेराव-कावळेराव
तांदूळ पेरायला याहो राव, याहो राव
चिव-चिव-चिव.."

कावळा म्हणतो -

"काव-काव-काव
येतोय ग येतोय अडाणी चिमणे
चोंच बनवतोय धडा-धडा
काव-काव-काव.."

चिमणी बिचारी एकटीच निघते. शेतभर तांदूळ पेरते. चिमणीच्या मेहनतीने भात शेती फुलून येते. आता पिक कापणीवर येते. पण कावळा कापणीचे नाव काढत नाही. तेव्हा चिमणी म्हणते -

"कावळेराव-कावळेराव
याहो राव - याहो राव

तांदूळ कापणीसाठी
याहो राव - याहो राव
चिव-चिव-चिव.."

कावळा अतिशय बेफिकीरीने उत्तर देतो -

"काव-काव-काव
येतोय ग येतोय बावळट चिमणे,
चोंच बनवतोय धडा-धडा"

चिमणीच्या डोळ्यांतून आसवांचे मोती निखळू लागतात. मेहनत करून चिमणी अगदी बारिक झाली होती. तरीही कावळा तिची काळजी घेत नव्हता. चिमणीच्या जिवावर कावळा मात्र दिवसेंदिवस फुगत चालला होता.

चिमणी एकटीच कापणीसाठी निघते. वाटलं होतं मागोमाग कावळा येईल. पण कावळा येत नाही. आता मळणी करायची होती. तिला वाटते, एकदा कावळ्याला विचारावे का? अगदी केविलवाणी होते. ती कावळ्याला म्हणते,

चिव-चिव-चिव
कावळेराव-कावळेराव
याहो राव - याहो राव
मळणी करण्यासाठी
याहो राव - याहो राव
चिव-चिव-चिव..

कावळा पांघरूण घेऊन झोपला होता. झोपल्या-झोपल्या तो म्हणतो -

काव-काव-काव
येतोग-येतो मूर्ख चिमणे,
चोंच बनवतोय धडा-धडा
काव-काव-काव..

चिमणी न बोलता एकटीच मळणीसाठी शेतात जाते. अंगी उसने बळ आणून मळणी करते. तांदळाची रास बघते. दुःख विसरते. तिचे मन भरून येते. ती सुखावते. घर तांदळाने भरते. तरी कावळा काही गोड बोलत नाही. चिमणीला खूप वाईट वाटते. पण सांगणार कुणाला? पोटातली बात कधी ओठावर आणत नाही.

चिमणी आपल्या मालकीच्या शेतातील मेहनतीने तयार केलेल्या तांदळाचा भात शिजवते. भाताचा सुगंध घरभर पसरतो. चिमणी पाणी भरायला बाहेर पडते. संधी साधून कावळा उठतो आणि गरमा गरम भाताचे पातेले संपवून टाकतो. रिकाम्या पातेल्यावर झाकण ठेवतो आणि परत झोपून जातो.

चिमणी पाणी भरून येते. ती खूप दमलेली, भूकेलेली होती. चुलीवरचे पातेले बघते तर रिकामे. संतापाने तिचा भडका होतो. तिची सहन करण्याची सीमा संपते. ती कावळ्याला खूप बोलते, शिव्या देते. कावळा हसतो. म्हणतो,

"बावळट, मूर्ख चिमणे,
चोच कधी तुटते का?
ही बघ माझी चोच."

तो चिमणीला चोचीने टोचून टोचून जखमी करतो. चिमणी जेमतेम स्वतःची सुटका करून घेते. दुहेरी दुःखाने विव्हळते. कावळ्याने केलेल्या फसवणुकीने ती चिडते आणि असंख्य चिमण्यांना एकत्रित करून आपली कहाणी सांगते. सगळ्या चिमण्या एकत्रित होतात आणि कावळ्याला धडा शिकविण्यासाठी चिमणीबरोबर तिच्या घरी जातात.

कावळा आरामशीर बाजेवर झोपला होता. सगळ्या चिमण्या एकदम कावळ्यावर तुटून पडतात. कावळ्याला चोचीने टोचून टोचून मारून टाकतात.

शेवटी आळशीपणा, भोंदूगिरी टिकत नाही. टिकते ती मेहनत. सच्चेपणा, हेच खरे!

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ४.८. ढुम ढुम ढुमाक

(तापीकाठच्या लोककथा)



एक होता सरडा. तो आपल्या घराभोवती काटेरी कुंपण बनवत असतो. त्यातला एक काटा त्याच्या शेपटीत मोडतो. काटा काढण्याचा तो खूप प्रयत्न करतो, पण काटा काही निघेना ! सरडा गेला न्हाव्याकडे. म्हणतो कसा, ''न्हावी दादा, न्हावी दादा, माझ्या शेपटीतला काटा काढून द्या ना !'' न्हावी म्हणतो, ''नको रे बाबा, काटा काढता काढता तुझी शेपटी तुटली तर !'' सरडा म्हणतो, ''न्हावी दादा, नाही तुटणार. काढा काटा !''

न्हावी सरड्याच्या शेपटीतला काटा काढायला जातो तर शेपटी जाते तुटून! सरडा न्हाव्याला म्हणतो, ''माझी शेपटी परत बसवून दे नाहीतर तुझी नऱ्हाणी दे. न्हावी त्याला नऱ्हाणी देतो.''

नऱ्हाणी घेऊन सरडा पुढे जातो. तेथे एक बाई भाकऱ्या करीत असते. सरडा तिला म्हणतो कसा, ''बाई, बाई, माझी नऱ्हाणी घे ना भाकरी शेकायला, बघ तुझे

हात भाजतायेत !'' ती म्हणते, ''नको रे बाबा ! भाजू दे माझे हात, पण तुझी नऱ्हाणी तुटली तर...'' सरडा म्हणतो, ''नाही तुटणार, घे.''

बाई सरड्याच्या नऱ्हाणीने भाकरी शेकू लागते. पण नऱ्हाणी जाते मोडून. सरडा लागतो रडायला. म्हणतो कसा, ''बाई, बाई, माझी नऱ्हाणी दे, नाही तर तुझ्या भाकऱ्या दे.'' बाई त्याला भाकऱ्या देते.

भाकऱ्या घेऊन सरडा ऐटीत निघतो. तेथे त्याला एक कुंभार दिसतो. सरडा कुंभाराला म्हणतो, ''कुंभारदादा, कुंभारदादा, मी आत्ता अंघोळ करून येतो. माझ्या भाकऱ्यांकडे लक्ष दे ना !'' कुंभार म्हणतो, ''नको रे बाबा. माझी लहान-लहान मुलं आहेत; त्यांनी तुझ्या भाकऱ्या खाल्ल्या तर...'' सरडा म्हणतो, ''नाही खाणार!''

सरडा आंघोळीला जाताच कुंभाराची मुलं त्याच्या भाकऱ्या खाऊन टाकतात. सरडा परत येतो तर भाकऱ्याच नाहीत. म्हणतो कसा, ''कुंभारदादा, कुंभारदादा, माझ्या भाकऱ्या दे !'' कुंभार म्हणतो, ''खाल्ल्या पोरांनी.'' सरडा म्हणतो, ''कुंभारदादा, कुंभारदादा, माझ्या भाकऱ्या दे, नाहीतर तुझे मडकेच घेऊन जातो.''

सरडा मडके घेऊन निघाला. थोडे पुढे गेल्यावर त्याला एक बाई दूध काढतांना दिसते, पण तिच्याजवळ भांडे नव्हते. सरडा त्या बाईला म्हणतो, ''बाई, बाई, माझ्याजवळचे हे मडके घे. बाई म्हणाली, नको रे बाबा. मडके फुटले तर तू भरून घेशील. सरडा म्हणाला, नाही फुटणार, घे.''

बाईने सरड्याकडचे मडके घेतले आणि दूध काढू लागली. पण मडकं फुटलं. सरडा लागला रडायला, बाई, बाई, माझं मडकं मला परत दे. नाहीतर तुझी म्हैसच घेऊन जातो.

सरडा म्हैस घेऊन निघाला. पुढे त्याला एका शेतात एक शेतकरी शेत नांगरत असताना दिसतो. नांगराला एका बाजूला बैल आणि दुसऱ्या बाजूला त्याची बायको जुंपलेली असते. सरडा म्हणतो, ''शेतकरी दादा, शेतकरी दादा, माझं ऐका. माझी म्हैस आपल्या बायकोच्या जागी जुंपा आणि आपल्या बायकोचे प्राण वाचवा.'' शेतकरी म्हणतो, ''नको रे बाबा. तुझी म्हैस मेली तर...''

सरडा म्हणतो, ''छे छे. नाही मरणार, जुंपा.''

शेतकरी आपल्या पत्नीला मुक्त करून म्हशीला जुंपतो. पण म्हैस जाते मरून. सरडा लागतो रडायला. म्हणतो कसा, ''शेतकरी दादा, शेतकरी दादा, माझी म्हैस मला परत करा. नाहीतर तुमची बायको जातो घेऊन.''

सरडा शेतकऱ्याची बायको घेऊन ऐटीत निघतो. रस्त्यात त्याला एक डोंबारी दिसतो. त्याच्या हातातलं ढोलकं सरड्याला खूप आवडतं. तो डोंबाऱ्याला म्हणतो, ''डोंबारी दादा, डोंबारी दादा, तू नाचून नाचून मरून जाशील तेव्हा ह्या बाईला नाचव.'' डोंबारी म्हणतो, ''नको रे बाबा. ती बाई मेली तर...'' सरडा म्हणतो, ''नाही मरणार, नाचव.''

डोंबारी तिला दोरावर चढवून नाचायला लावतो. वरून पडून बाई जाते मरून. सरडा म्हणतो, ''माझी बाई मला परत कर; नाही तर तुझी ढोलकी जातो घेऊन.''

सरडा डोंबाऱ्याची ढोलकी घेऊन उंच टेकाडावर जातो आणि आपल्या चातुर्याचा पाढा गातो -

ऐका हो ऐका ... शेपटीवरती नऱ्हाणी जिंकली.

ढुम ढुम ढुमुक ... ढुम ढुम ढुमुक ...
नऱ्हाणीवरती रोटली (भाकरी) जिंकली.

ढुम ढुम ढुमुक ... ढुम ढुम ढुमुक ...
भाकऱ्यांवरती माठ जिंकला.

ढुम ढुम ढुमुक ... ढुम ढुम ढुमुक ...
माठावरती म्हैस जिंकली.

ढुम ढुम ढुमुक ... ढुम ढुम ढुमुक ...
म्हशीवरती बाई जिंकली.

ढुम ढुम ढुमुक ... ढुम ढुम ढुमुक ...
अन् बाईवरती हे ढोलकं जिंकलं.

ढुम ढुम ढुमुक ... ढुम ढुम ढुमुक.

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ४.९. माकडांची शाळा

एक जंगल होते. त्याचे नाव होते चंपकवन. तेथे खूप झाडे, ओढे, डोंगर होते. जंगल म्हटल्यावर प्राणी होतेच. माकड, चित्ते, हरीण, वाघ, सिंह, हत्ती, लांडगे, कोल्हे इत्यादी. ते चंपकवनात अतिशय आनंदात राहत. माकडे तर खूपच धडपडी होती. नेहमीच काहीतरी करण्यात दंग असत. त्यातच सर्कशीतून पळून आलेल्या एका माकडाची भर पडली. त्याचे नाव होते 'विचित्र'. नावाप्रमाणेच त्याच्याअंगीसुद्धा तसेच गुण होते.

माकडांनी त्याची आपुलकीने विचारपूस केली. त्यांचे हे प्रेम पाहून विचित्र थक्क झाला. त्याला या माकडांसाठी खूप काही करावेसे वाटू लागले. मग माकडांच्या सभेत त्याने माणसांच्या मुलांसाठी सुरू असलेल्या 'सर्व शिक्षा अभियाना'प्रमाणेच माकडांसाठी 'शिक्षण अभियान' सुरू करण्याचे ठरवले.

माकडांनी त्याला विविध शंका विचारल्या. विचित्रने त्यांच्या शंका दूर केल्या. मग शाळेसाठी एक चांगलेसे झाड निवडण्यात आले. विचित्र माकडाच्या हातून 'भूमीपूजना'प्रमाणे 'वृक्षपूजन' झाले. मग झाडाचे खोड घासून घासून माकडांनी कसे बसे ओबडधोबड फळे बनवले. रंगीत मातींची ढेकळे आणून खडूंचा प्रश्न सोडवण्यात आला. तसेच माकडांसाठी सवलत म्हणून पुस्तके वाटण्यात आली. त्यानंतर माकडांमध्ये शिक्षक व मुख्याध्यापक या हुद्द्यांसाठी भांडणे सुरू झाली. तेव्हा विचित्रने 'इलेक्शन' घेऊन हा प्रश्न सोडवला. मुख्याध्यापक म्हणून विचित्र व शिक्षक म्हणून मोंटू व चिंटू यांची निवड झाली.

दुसऱ्या दिवसापासून शाळा सुरू झाली. मोंटू मास्तर वर्गात आले. नमस्ते वगैरे झाल्यानंतर माकडे खूपच गडबड करू लागली. तेव्हा मोंटू सरांनी राजू हा चुणचुणीत माकड 'मॉनिटर' म्हणून नेमला. मग मुले 'फळा', 'खडू' हे काय आहे हे विचारू लागली. मग सरांनी बिचकत-घाबरत ते रंगीत ढेकूळ हातात घेतले व

जोरजोरात त्या ओबडधोबड फळ्यावर घासले. त्यातून पडणारी माती पाहून मास्तर म्हणाले, "हे एक कीस मिळवण्याचे साधन आहे." हे बोलणे संपले व सोनू माकडाने एक तास संपल्याची घंटा म्हणून दोन दगड एकमेकांवर जोरात आपटले. तो आवाज ऐकून माकडे घाबरली. दप्तरे न घेताच त्यांनी घरचा रस्ता पकडला. हा गोंधळ ऐकून काय झाले हे पाहण्यासाठी मोंटू माकड बाहेर आले. पण पळणाऱ्या माकडाच्या धक्क्याने तोल जाऊन ते जमिनीवर जोरात आपटले. त्यामुळे त्याला दोन दिवस दोरीने फांदीला पाय बांधून राहण्याचा सल्ला देण्यात आला.

या गोंधळामुळे घंटा न देण्याचा निर्णय मुख्याध्यापकांनी घेतला. दुसरे दिवशी चिंटू सर वर्गात आले. पुस्तकातील फळांच्या चित्रांची माहिती मुलांना द्यावी म्हणून त्यांनी मुलांना पुस्तके उघडण्याची 'ऑर्डर' दिली. चिंटू सर स्वतः प्लॅस्टिकची फळे दाखवू लागले. राजू माकडाने मागचा-पुढचा विचार न करता सरांच्या हातातील फळांवर झडप घातली व तो ती फळे खाऊ लागला. त्यामुळे राजूचे दात निकामी झाले. बाकीच्या माकडांनी पुस्तकातील चित्रातल्या फळांवर ताव मारण्यासाठी पाने फाडून टाकली. अशा रितीने पुस्तकांचा बट्ट्याबोळ झाला.

आता शाळेची परीक्षा जवळ आली. सर्व माकडांना मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षणाधिकारी म्हणजेच माकडांच्या टोळीचे प्रमुख 'राज शेरोबाबा' शाळेत आले. वर्गात जाऊन ते पाहू लागले. त्यांना सर्व माकडे बेंच तोड, ढेकळे एकमेकांना मार, फळे खराब कर, एकमेकांच्या चुगल्या कर, असे उद्योग करताना दिसले. त्यामुळे ते संतप्त झाले. त्यांनी तातडीने सभा बोलावली. त्यांनी मुलांनी केलेले उपद्व्याप सांगितले. मात्र मुख्याध्यापक 'विचित्र' या माकडाच्या बोलण्याने खुष झाले.

शिक्षणाधिकाऱ्यांना हार घालावा असे मुख्याध्यापकांच्या मनात आले. त्यांनी वर्गातील मुलांना फुले आणण्याचे फर्मान सोडले. मुलांना फुले न मिळाल्याने त्यांनी मिळतील त्या लहान-मोठ्या फळांचा हार बनवला.

मुख्याध्यापकांनी 'राज शेरोबाबांना' तो हार घातला. त्यातील फळे पाहून ते खुष झाले व अधाशासारखे फळे खाऊ लागले. खाण्याच्या नादात बाबा खाली पडले. चार-पाच माकडांनी त्यांना कसे बसे उचलून आणले. इतर माकडे देखील फळे घेण्यासाठी भांडू लागली. हे पाहून मुख्याध्यापक 'विचित्र' यांनी कार्यक्रम आटोपता घेतला. शाळा काढून देखील माकडांच्या वर्तनात काडीचाही फरक न पडल्याने माकडांसाठी सुरू झालेले 'सर्व शिक्षा अभियान' बंद करण्यात आले. माकडांनी त्याबद्दल केस ओढत, दात विचकत, चित्रविचित्र आवाज काढत आनंद व्यक्त केला आणि अशा प्रकारे शाळेचा 'इति' झाला.

(कृतिका सुनील मोरे, इ. ७वी ग मा. रा. सारडा कन्या विद्यालय, नाशिक
: ब्रेन टॉनिक मासिक, ऑक्टो-नोव्हेंबर २००६)

# ४.१०. राजा, ससा आणि माकड

(मॉरिशसची लोककथा)

एकदा एक राजा राज्य करीत होता. त्याने एका झाडावर एक मधाचे पोळे राखून ठेवलेले होते.एके दिवशी एका सशाने उंदराशी मैत्री केली. त्याच्या मदतीने त्याने त्या मधाची चोरी करायचे ठरविले.सशाने त्या झाडाखाली आगीचा जाळ केला. त्यातून धुराचे लोट बाहेर पडू लागले. तोपर्यंत तो उंदीर झाडावर चढून गेला आणि त्याने ते मधाचे पोळे आपल्या अणकुचीदार दातांनी कुरतडायला सुरवात केली.राजाने तो धूर पाहिला. तो त्या झाडाखाली आला आणि ओरडला,

'कोण आहे तो झाडावर ? कोण करतोय माझ्या मधाची चोरी ? '

ससा त्या उंदराच्या कानात हळूच पुटपुटला,

'राजाला सांग तू एकटाच आहेस. तो मला पाहू शकत नाही. मला धुराने कवटाळून टाकलं.राजा त्या आगीच्या जाळाजवळ आला. परंतु तो त्याच्या फार जवळ गेला नाही. मात्र त्या दुष्ट सशाने त्या झाडाखाली आणखी अधिकच दाट धूर तयार केला आणि तो दूर पळून गेला.

हळूहळू तो धूर ओसरला. राजाने वर झाडावर त्या उंदराला पाहिले. त्याने त्याला खाली येण्याचा हुकूम केला. तो इवलासा प्राणी झाडावरून खाली येताच राजाने त्याला ठार मारून टाकले.

काही दिवसानंतर सशाला एक माकड भेटला. ससा माकडाला म्हणाला,

'मित्रा ! मला एक जागा ठाऊक आहे. तिथे एक सुंदर मधाचे पोळे आहे. परंतु त्यातील मध काढून घेण्यासाठी दोघेजण पाहिजेत. तू जर कबूल झालास तर आपण दोघांनी तो मध वाटून घेऊया.'

त्या माकडाने सशाचे म्हणणे मान्य केले. तो त्या सशाच्या मागून गेला. त्या झाडाकडे आल्यावर ससा माकडाला म्हणाला,

'मित्रा, तो मध काढून घेण्यासाठी तुला त्या झाडावर चढले पाहिजे. मी या झाडाखाली राहीन आणि आगीचा मोठा जाळ करून धूर बाहेर काढीन.'

माकड झरझर झाडावर चढला. ससा खाली धूर करू लागला. मधमाशांना त्याने त्रास द्यायला सुरुवात केली. पुनः त्या झाडाखाली धूर झालेला पाहून राजा ओरडला,

'कोण आहे या झाडावर ? कोण चोरतोय माझा मध ?'

तेव्हा ससा त्या माकडाच्या कानात पुटपुटला,

'त्याला सांग तू एकटाच आहेस. तो मला पाहू शकत नाही. धुराने मला कवटाळून टाकलेय व लपवून ठेवलेय.'

परंतु या वेळी मात्र तो माकड पोट धरधरून हसू लागला आणि मोठया आवाजात तो राजाला म्हणाला,

' महाराज, आगीला भिऊ नका. तुमची विजार काही ती आग जाळणार नाही. आगीच्या जरा जवळ या आणि त्या धुरात काय दिसतंय ते पहा.'

राजा आगीजवळ गेला. त्याला तो दुष्ट ससा दिसला. त्याने काठीने त्या सशाला ठार मारून टाकले. त्यानंतर राजाने त्या माकडाला झाडावरून खाली ये म्हणून म्हटले. परंतु माकड हसत हसत राजाला म्हणाला,

"काय ? खाली येऊ म्हणता ? मी काय मूर्ख आहे ? माझं मरण मीच माझ्यावर ओढवून घेऊ म्हणता ? आता मला वाचविण्यासाठी माझ्याजवळ फक्त दोनच मार्ग आहेत. एक आहे वरचा आणि एक आहे खालचा. मला वरचा मार्ग पसंत आहे.'

असे म्हणून माकडाने या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारायला सुरुवात केली आणि हां हां म्हणता झाडाच्या शेंड्यात कुठेतरी तो गडप झाला. राजा जागच्या जागी तडफडत आणि चरफडत राहिला.

(प्र. श्री. नेरूरकर [मूळ लेखक : प्रल्हाद राम शरण]
: मॉरिशसच्या लोककथा)

# ४.११. कासव आणि माकड

(मॉरिशसची लोककथा)

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. एक होते माकड आणि एक होते कासव. या कासवाला सात मुले होती. माकड मात्र आळसात वेळ घालवीत असे.कासव खूप कष्ट करीत असे. एकदा कष्टाचे काम केल्यावर त्याला त्याची मजुरी मिळाली, तर त्या मजूरीच्या पैशातून त्याने तांदुळाचे एक पोते खरेदी केले.

ते पोते घेऊन कासव घरी येत असता वाटेतच मध्यावर थांबले. त्याने आपल्या पाठीवरचे पोते रस्त्यावर काढून ठेवले. मग ते लाकूडफाटा आणायला गेले.

पाठीवर लाकूडफाटा घेऊन ते परत आले, तर त्याच्या तांदुळाच्या पोत्यावर एक माकड बसलेले दिसले. माकड म्हणाले,

'मित्रा ! हे बघ मला एक तांदुळाचे पोते मिळाले.'

ते ऐकून कासवाने लगेच उत्तर दिले,

'हे तांदुळाचे पोते तुझे नाही, मित्रा, मी ते माझ्या मुलाबाळांसाठी खरेदी केले आहे. मी ते रस्त्यावर ठेवून लाकूडफाटा आणण्यासाठी गेलो होतो. माझे पोते मला परत दे.'

माकड त्याचे म्हणणे ऐकून घेईना. ते म्हणाले,

'जे उचलून घ्यायला चांगले असते ते जवळ ठेवण्याच्या योग्यतेचे असते. मी पोते परत देणार नाही.'

कासव दुःखीकष्टी झाले. परंतु त्याला काही करता येईना. तरीही त्याने एक शेटची विनंती केली,

'भल्या मित्रा ! एक किलो तांदूळ मला विकत दे. माझ्या मुलाबाळांसाठी. ती भुकेलेली आहेत. त्यांच्याकडे खाण्यासाठी काहीच नाहीये.' माकड म्हणाले,

'अशक्य ! माझा तांदूळ हा विकण्यासाठी नाही. कुणातरी चिनी माणसाच्या

दुकानात जा आणि विकत घे.'

'ठीक आहे, मित्रा. आपण पाहून घेऊ.' असे म्हणून कासव चालू लागले.

एकदा ते माकड झाडाच्या फांदीवर बसले होते. त्याची शेपटी खाली जमिनीपर्यंत लोंबत होती. कासव त्या वाटेने जात होते. त्याने त्या माकडाची शेपटी जमिनीवर टेकलेली पाहिली. त्याने ती घट्ट पकडली आणि म्हणाला,

'इथे मला एक माकडाची शेपूट मिळालीय. जे जे काही उचलून घ्यायला चांगले असते ते जवळ ठेवण्याच्या योग्यतेचे असते. मी आता ते परत करणार नाही.'

माकड म्हणाले, 'अरे मित्रा ! तू काय थट्टा बिट्टा करतोस की काय ? ते माझे शेपूट आहे. ते सोडून दे.'

कासव म्हणाले, 'रस्त्यावरील तांदुळाचे पोते ज्याने उचलले ते त्याच्या मालकीचे झाले. आता हे रस्त्यावरचे शेपूट ज्याने वर उचलले ते त्याच्या मालकीचे झाले.'

माकड रागाने लालबुंद झाले. त्याने आपले शेपूट वर खेचले. परंतु ते शेपूट कासव काही केल्या सोडून देईना. त्या दोघांमध्ये भयंकर भांडण जुंपले. ती बाब मग न्यायमंडळासमोर नेण्यात आली.

न्यायाधीश महाराज आपल्या न्यायासनावर बसलेले होते. ते माकड त्यांना म्हणाले, 'महाराज, या कासवाला शिक्षा करा आणि त्याला माझे शेपूट सोडून द्यायला सांगा.'

मग ते कासव न्यायाधीशांना म्हणाले, 'महाराज ! या माकडाला शिक्षा करा आणि त्याला माझे तांदळाचे पोते मला परत द्यायला सांगा.'

न्यायाधीशांनी त्या दोघांची उलट तपासणी केली. त्यांना ती सगळी भानगड नीट कळली. त्यांनी माकडाला विचारले,'तांदळाचे पोते कुठे आहे ? '

तो प्रश्न ऐकून ते माकड पोट धरधरून हसायला लागले. आपले पोट थोपटीत ते म्हणाले,

' माझ्या पोटात, महाराज. '

त्यानंतर न्यायाधीशांनी एका पोलिसाला बोलावून आणले. त्याला एक लाकडाचा ठोकळा आणायचा हुकूम त्यांनी केला. तो आणल्यावर त्या न्यायाधीशांनी त्या पोलिसाला त्या माकडाचे शेपूट त्यावर ठेवण्याचा हुकूम केला. नंतर ते शेपूट तोडण्याचा हुकूम केला.

हे सर्व झाल्यावर न्यायाधीशांनी आपला न्यायनिवाडा दिला. ते म्हणाले.

'जे जे काही उचलून घ्यायला चांगले असते ते जवळ ठेवण्याच्या योग्यतेचे असते. या माकडाने रस्त्यावरील तांदुळाचे पोते उचलले. ते पोते त्याच्या मालकीचे झाले. या कासवाने माकडाच्या शेपटाचे टोक रस्त्याने जाताना उचलले. ते शेपटाचे टोक त्याच्या मालकीचे झाले. परंतु माकडाला ते शेपटाचे टोक विकत घ्यायचे असेल आणि आपल्या शेपटाला ते चिकटवून टाकायचे असेल तर मी कासवाला अशी शिक्षा करतो.

माकड आणि कासव कान देऊन ऐकत होते.

शेवटी न्यायाधीश म्हणाले, 'कासवाने त्या शेपटीचे टोक तांदुळाच्या एका पोत्याच्या बदलात त्या माकडाला विकावे. न्यायालयाचे काम संपले आहे. तुम्ही आता जाऊ शकता.'

(प्र. श्री. नेरूरकर [मूळ लेखक : प्रल्हाद राम शरण]
: मॉरिशसच्या लोककथा)

# ४.१२. कळीचा माकड

(इंडोनेशियन लोककथा)

[ इंडोनेशियन लोक म्हणतात की, फार वर्षांपूर्वी, आता जसे माणसांत व जनावरांत आपापसांत वैर आहे, तसे नव्हते. सगळेजण एकमेकांशी गुण्यागोविंदाने राहात. हे सगळे वैर एका कळीच्या नारदाने - 'माकडाने निर्माण केले. ते कसे केले याबद्दल एक गंमतीदार गोष्ट सांगतात; ती अशी - ]

एक दिवस एक माकड भटकता भटकता दमून एका पर्वताच्या उंच शिखरावर बसले होते. तिथून त्याला खालचे सर्व जग दिसत होते. त्याने पाहिले. शेतकरी गाणे गात आनंदाने आपल्या भातशेतात काम करीत होता. म्हशी शेजारीच नदीत थंड पाण्यात डुंबत होत्या, वाघ जवळच्या रानात उन्हात पडून डुलकी घेत होता. चित्ता स्वस्थपणाने ऐटीत पायवाटेने जात होता, पक्षी घरट्यांत झोप घेत होते. आणि मधमाशा गुणगुणत पोळ्याभोवती मजेत घिरट्या घालीत होत्या.

माकडाला सगळेजण आनंदात आहेत हे पाहून बरे वाटेना. तो तिथून खाली उतरला नि सरळ चित्त्याकडे आला. चित्त्याने त्याला पकडले व खाऊ लागला.

'अरे थांब,मला रे बाबा का खातोस? इथे सगळीकडे कशी धष्टपुष्ट गुरे फिरताहेत. आंधळाच दिसतोस तू!'

'हट्, मला नाही गुरेबिरे दिसत. मला तूच एकटा दिसतो आहेस. मी तुलाच खाणार,' चित्ता म्हणाला.

"चल माझ्याबरोबर. तुला सुंदर गुरे दाखवतो." माकड म्हणाला.

चित्ता त्याच्याबरोबर निघाला. माकडाने त्याला एका उंच तुटक्या कड्याजवळ नेले. कड्याच्या कडेजवळ पाठ करून त्याला बसविले. मग तो त्याला म्हणाला, 'थांब, मी आग पेटवतो प्रथम. ती चांगली पेटली की आपण गुरे भाजून खाऊ.'

माकडाने आग पेटवल्यानंतर ती जास्त वाढवली आणि नंतर तो चित्त्याच्या बाजूने तिच्यात जास्त जास्त सरपण टाकू लागला. थोड्याच वेळात जमीन तापली व चित्ता मागे सरकला. माकडाने आणखी सरपण घातले. जमीन आणखी तापली. चित्ता मागे सरकला तो मुळी कड्यावरून सरळ खालीच गेला. मग माकड त्या शेतकऱ्याकडे जाऊन म्हणाला, 'काय रे, तुला सुंदरसे चित्त्याचे कातडे पाहिजे का ? तर मी एक मेलेला चित्ता दाखतो. तुझी सुरी घेऊन माझ्याबरोबर चल.'

तो शेतकरी आपली सुरी घेऊन त्याच्याबरोबर निघाला. माकडाने त्याला तो खाली पडून मेलेला चित्ता दाखविला. माणूस कातडे सोलण्यांत गुंग झाला असे पाहून माकड म्हशीकडे गेला नि त्यांना म्हणाला, 'शेतकरी कुठेतरी लांब गेला आहे. तुम्ही शेतातले पीक का खात नाही ? 'म्हशी नदीतून उठून तडक शेतात शिरल्या व भराभर पीक खाऊ लागल्या.'

माकड ताबडतोब मधमाशांकडे जाऊन त्यांना म्हणाला, 'त्या पहा म्हशी भातांचा सगळा फुलोरा खाऊन टाकताहेत. मग तुम्ही मध कसा गोळा करणार? त्यांना डसून घालवून का देत नाही तुम्ही ?

मधमाशा सगळ्या ताबडतोब म्हशीवर हल्ला करण्यासाठी गेल्या. मग माकड शेतकऱ्याच्या थोरल्या मुलाकडे गेला. तो मुलगा घोड्यांची राखण करीत होता. त्याला माकड म्हणाला, 'अरे, त्या बघ मधमाशा सगळ्या गेल्या आहेत तू पोळ्यातला मध का काढून घेत नाहीस ?'

मुलाने कुऱ्हाड उचलली आणि तो मध काढायला गेला. त्याने झाडावर उंच लटकलेली पोळी पाहिली व झाड तोडण्यासाठी तो कुऱ्हाडीचे घाव घालू लागला. मग माकड कावळ्यांकडे गेला आणि म्हणाला, 'ते बघा घोडे कसे चरताहेत. तिथे त्यांना राखायला कोणी नाही. तुम्ही त्यांचे रक्त का खात नाही ?

सगळे कावळे उडून गेले. आणि घोड्याच्या पाठीवर बसून त्यांना टोचू लागले. त्याचे रक्त काढू लागले. त्यामुळे घोडे सैरावैरा पळूल गाले. नंतर माकड वानरांकडे जाऊन त्यांना म्हणाला, 'कावळे घोड्यांच्या पाठी लागले आहेत. तुम्ही त्यांच्या घरट्यातली अंडी का खात नाही ? 'वानरांनी ताबडतोब

कावळ्यांच्या घरट्यांकडे मोर्चा वळविला.'

माकड वाघाकडे जाऊन चिंतातुरमुद्रा करून म्हणाला, 'काय करावे ? शेतकऱ्याचा मुलगा एक सारखी झाडावर झाडे तोडून टाकतो आहे ! असे चालू राहिले तर औषधालासुद्धा झाड रहाणार नाही शिल्लक. मग आपण काय करायचे.'

वाघ म्हणाला,'झाडे गेली की जंगल गेले मग माझ्या भक्षाची सोय काय ? छेः छेः मी जाऊन आत्ता त्याला थांबवतो.' 'म्हणून वाघ निघून गेला. मग माकड शेतकऱ्याच्या दुसऱ्या मुलाकडे जाऊन त्याला म्हणाला, अरे, पळ लवकर,वाघ तुझ्या भावाच्या मागावर जातो आहे. तो त्याला ठार मारणार आहे. ' तो मुलगा पळत आपल्या भावाच्या बचावाला गेला. नंतर माकड हत्तीचा थवा कुरणात चरत होता तिथे गेले. त्याने गवताला आग लावून दिली. हत्ती जिकडे तिकडे पांगले आणि त्यांना परत येतांना पाहून सगळी जनावरे बिचकून वाट फुटेल तिकडे पळून गेली.

मग माकड ऐटीत आपल्या पहिल्या जाग्यावर जाऊन बसले व खाली सगळीकडे पाहू लागले. खाली एकच गोंधळ झाला होता. शेतकरी चित्त्याचे कातडे काढीत होता, म्हशी त्याचे शेत लुटीत होत्या, मधमाशा म्हशीच्या मागे लागल्या होत्या,शेतकऱ्याचा मोठा मुलगा मधासाठी झाड तोडत होता,कावळे घोड्यांना पीडीत होते, वानर कावळ्यांची अंडी खात होते, वाघ मोठ्या मुलाचा मागोवा घेत जात होता, त्याच्या मागोमाग त्याला मारायला शेतकऱ्याचा दुसरा मुलगा जात होता, गवताचे कुरण जळत होते, हत्ती व इतर प्राणी इकडे तिकडे सैरावैरा पळत होते.

माकड मोठ्या आनंदात हसू लागला, नि म्हणाला,'पहा,मी एकट्याने थोड्या वेळात या जगात केवढा गोंधळ माजवला आहे तो ! आता हे सगळेजण एकमेकांचे कायमचे शत्रू होतील. केवढे हे माझे सामर्थ्य !'

(विजया खांबेटे : देशोदेशीच्या रंजक लोककथा)

# ४.१३. चतुर कोल्हा

(भिल्ली बोलीतील लोककथा)

एक जंगल होते. जंगलात अनेक प्राणी राहत होते. वाघ, कोल्हा, लांडगा, अस्वल अशा हिंस्त्र प्राण्यांचे वास्तव्य तिथे होते. एके दिवशी कोल्हा जंगलात फिरत असताना खूप जोरात पाऊस आणि सोसाट्याचा वारा सुरू झाला. कोल्हा घाबरला. पळत सुटला. पळता पळता त्याला दिसली गुहा. ही तर वाघाची गुहा. घेऊ या का आश्रय गुहेत? आणि वाघाने आपल्याला खाल्ले तर ! पुढेही मरण अन् मागेही मरण ! गुहेजवळ कोल्हा घुटमळत होता. गुहेत वाघाची चाहुल लागेना ! तेव्हा हिम्मत करून गुहेत शिरला. पण वाघ केव्हाही येण्याची शक्यता होती. त्याने स्वतःच्या बचावाची पूर्ण तयारी केली होती. अतिशय सुरक्षित जागी तो लपून बसला. इतक्यात एक अस्वल पावसापासून, वाऱ्यापासून स्वतःला वाचवित त्याच गुहेत शिरताना कोल्ह्याने पाहिले. आता अस्वल आपल्याला खाणार. काहीतरी युक्ती केली पाहिजे. अस्वल कोल्ह्यापासून थोड्याच अंतरावर होते. एवढ्यात कोल्ह्याने एकदम विचित्र आवाज काढायला सुरूवात केली. अस्वलाने विचार केला हा आवाज वाघाचा

नाही. मग आत कोण आहे ? उसने अवसान आणून अस्वलाने जोरात विचारले, "कोण आहेस रे तू ! माझ्या समोर ये." विचित्र आवाजात कोल्हा बोलला, "ए, मी कोण म्हणून विचारतोस ? मी ... मी अस्वलाचे केस उपटणारा, वाघाचे तोंड बांधणारा, एक शिंग्याचे शिंग बांधणारा असा अजब प्राणी आहे." अस्वल घाबरले. पळत सुटले. वाटेत त्याला वाघ भेटला.

वाघाने पळणाऱ्या अस्वलाला थांबवत विचारले, "अस्वलदादा, अस्वलदादा एवढे पळत कुठे निघालात ?" अस्वलदादा म्हणाला, "काय सांगू बाबा वाऱ्या-पावसापासून वाचण्यासाठी थोडा वेळ आश्रयाला तुझ्या गुहेत शिरलो तर अजबच दृश्य दिसले, वाघोबा तुझ्या गुहेत एक खूप विचित्र प्राणी शिरला आहे. म्हणतो कसा, "मी अस्वलाचे केस उपटणारा, वाघाचे तोंड बांधाणारा, एक शिंग्याचे शिंग बांधणारा प्राणी आहे." असा अजब कोणता प्राणी आहे समजत नाही, तूच जाऊन बघ म्हणजे समजेल." एवढे बोलून अस्वल पळत सुटले.

वाघ संतापात आपल्या गुहेजवळ आले. आणि गुहेत शिरताच वाघ डरकाळी फोडत म्हणाला, "कोण आहेस रे तू ? बाहेर निघ मी तुला फाडून खातो." वाघाची डरकाळी ऐकून कोल्हा थरथर कापू लागला. आता आपल्याला वाघ फाडून खाणार. पण तरीही धीर न सोडता कोल्हा आवाज बदलून बोलू लागला, "ये वाघा, ये ! मी तुझीच वाट बघत होतो. तू मला ठार मारतोस काय ? अरे, मी अस्वलाचे केस उपटणारा, वाघाचे तोंड बांधणारा आणि एकशिंग्याचे शिंग बांधणारा विचित्र प्राणी आहे. थांब तुझेच मुस्काट प्रथम बांधतो." वाघ विचार करू लागला, "माझ्यापेक्षा बलवान, अस्वलापेक्षा ताकदीचा आणि एकशिंग्यापेक्षा शक्तीशाली प्राणी कोण असेल ? पण प्रथम जीव वाचविणे महत्त्वाचे होते. वाघाने तेथून पळ काढला. थोड्याच वेळात बाहेरचे वातावरण शांत झाले. वारा आणि पाऊस थांबला होता. जवळपास कोणी नाही असे पाहून लपलेल्या कोल्ह्याने वाघाच्या गुहेतून पळ काढला. अशा प्रकारे मोठ्या चातुर्याने कोल्ह्याने आपला जीव वाचविला.

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ४.१४. मूर्ख कोल्हा

(तापीकाठची लोककथा)

एक कोल्हा होता. त्याला सगळेच मूर्ख कोल्हा म्हणून ओळखायचे. आपल्या या ओळखीने कोल्हा खूप दुःखी असायचा. तो विचार करू लागला, आपला मूर्खपणाचा शिक्का पुसून हुशार, बुद्धिमान कोल्हा ही प्रतिमा सगळ्यांसमोर येण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. लोकांनाच मूर्ख बनवून आपल्याला राजाप्रमाणे सन्मान मिळवायला हवा.

खूप खूप विचार केल्यावर त्याला एक कल्पना सुचली. तो जंगलातील सगळे प्राणी उठण्यापूर्वी नदीवर गेला. तिथे त्याने दगड, माती, चिखलाच्या साहाय्याने छान ओटा बनविला. ओटा शेणाने सारविला. उरलेला चिखलाचा, शेणाचा, गाळाचा एकत्र लगदा करून स्वतःच्या अंगाला चोपडला. स्वतःचेच रूप पाण्यात बघितल्यावर कोल्हा हसला. नदीकाठी असलेली दोन बेडके त्याने पकडली. ती मारली आणि त्यांनाही चिखल चोपडून कानात बांधली. आपले रूप तो पुन्हा नदीच्या पाण्यात न्याहाळू लागला. खुष झाला. आता आपल्याला कोणी ओळखू शकणार नाही याची खात्री झाली. आपल्या हुशारीवर तो खुष झाला.

सकाळ झाली. कोल्हा ओट्यावर जाऊन बसला. नदीवर पाणी पिण्यास कोणी प्राणी आला की, कोल्हा ओरडायचा,

"ए माझ्या मागून म्हण -

चांदीचा ओटा, सोन्याने लिंपला

कानात कुंडले, जसा राजा बसला."

आपल्या जंगलात कुणी अजब कोल्हा आला आहे हे पाहून प्राणी कधी कुतुहलाने तर कधी भीतीने म्हणू लागले -

"चांदीचा ओटा, सोन्याने लिंपला

कानात कुंडले, जसा राजा बसला."

या अजब कोल्ह्याला बघायला सगळे जमले. कोल्हा सगळ्यांना म्हणू लागला, "मी या तळ्याचा राजा आहे. तुम्हाला पाणी प्यायचे असेल तर म्हणा - ''चांदीचा ओटा, सोन्याने लिंपला कानात कुंडले, जसा राजा बसला."

सगळे एकसुरात बोलू लागले. कोल्ह्याचा आनंद गगनात मावेना! आपला हेतू साध्य झाला. जंगलातील मूर्ख प्राण्यांनी मला ओळखले नाही. आता मी सर्वांवर राज्य करीन. या विचाराने तो नाचू लागला. नाचता नाचता त्यांच्या अंगावरचा वाळलेला चिखलाचा थर पडू लागला. मूर्ख कोल्ह्याचे मूळ रूप उघडे पडू लागले. तरी मूर्ख कोल्हा आपल्याच तंद्रीत होता. मात्र इतरांच्या लक्षात आले, मूर्ख कोल्ह्याने अंगाला माती फासून आपलं रूप बदललं !

कोल्हा ओरडला, असे गप्प का? बोला बोला

'चांदीचा ओटा, सोन्याने लिंपला
कानात कुंडले, जसा राजा बसला.'

सगळे खदा खदा हसू लागले. आणि त्याला चिडवत म्हणाले,

'मातीचा ओटा, शेणाने लिंपला
कानात बेंडकोळी, जसा घुबड बसला.'

मूर्ख कोल्ह्याने पाहिले अंगावरचा चिखलाचा थर गळून पडला होता. तो खाली मान घालून उभा होता. सगळे 'मूर्ख कोल्हा रे मूर्ख कोल्हा' म्हणत निघून गेले. कोल्हा परत एकटाच उरला.

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ४.१५. झाडावर चढणारा कोल्हा

(स्वित्झर्लंडमधील कथा)

कोल्हा इतर जनावरांशी लबाडीनं वागतो हे जगजाहीर होते. त्यामुळे त्याच्यावर कोणी विश्वास ठेवत नसे. पण तरीही कोल्हा सतत कुणा ना कुणाला फसवायचा आणि जनावरं फसायची. 'हा बढाया मारणारा आहे' म्हणून सगळे त्याला टाळायचे.

एकदा खाणंपिणं शोधण्याच्या मोहिमेवर बाहेर पडलेल्या कोल्ह्याला रानमांजर दिसलं. झाडाच्या फांदीवर ते मोठ्या ऐटीनं हिंडत होतं. कोल्ह्याला एकदम मांजराविषयी असूया वाटली. का तर कोल्ह्याला असं झाडावर हिंडायला येत नव्हतं.

रानमांजराला त्याने विचारले. "का रे बाबा अशी झाडं वेंधतोस ?"

रानमांजर म्हणालं, "झाडावरनं मला चोहोबाजूचं छान दिसतं. शत्रू येतोय का मित्र येतोय हे लांबनं कळतं आणि मी दिसलो की कुत्रा पाठलाग करतो. त्यालाही चुकवता येतं झाडावर चढून."

"किती भेदरट आहेस रे तू रानमांजरा. घाबरट खुळचट, पक्षी आणि साप एवढेच झाडात लपतात. बाकी कुणी नाही !"

कोल्ह्याच्या ह्या बोलण्यानं रानमांजर दुखावलं. पण त्यानं तसं दाखवलं नाही. आपला आब होता तसाच ठेवला. कोल्हा लबाड आहे. त्याच्यापासून संभाळूनच राहणं बरं.

मग रानमांजर कोल्ह्याला म्हणालं, "तुझ्यासारखं वेगानं धावणं काही मला जमणार नाही आणि कुत्रा हा तर माझा जन्माचा वैरी आहे."

"मी कुणाही जनावरांपेक्षा जास्ती वेगानं पळू शकतो." बढाईखोर कोल्हा म्हणाला. "मानगुटी धरणारे ते जुने जाणते कुत्रे जरी आले तरी मी नाही बधणार.

त्यांची टाप नाही मला पळताना गाठायची."

रानमांजर म्हणालं, "खरं आहे. पण झाडावर चढायला येणं हे ऐन संकटाच्या वेळी फार फार उपयोगी पडतं. तुला ही कला शिकाविशी वाटते कां ? मी शिकवीन."

राजमांजरानं उदार अंतःकरणानं देऊ केलेली ही मदत कोल्ह्यानं स्वीकारली.

"हां, कोणतेही ज्ञान अपाय करत नाही, आणि तूर्त मी मोकळा आहे. हातातली कोणतीही गोष्ट मला अर्धवट सोडावी लागणार नाही", तो म्हणाला.

म्हणजे झाडावर चढणं शिकायला हा अगदी उत्सुक होता.

रानमांजर झाडावरून जमिनीवर उतरलं आणि कोल्ह्याला सुरुवातीचा धडा शिकवला गेला. पण कोल्हा हा काही चांगला विद्यार्थी नव्हता. त्याचे पंजे झाडाच्या फांद्या पकडून ठेवायला उपयोगाचे नव्हते. तो वारंवार फांद्यांवरून खाली घसरला. वारंवार खालच्या चिखलात पाठीवर पडला. कोल्हा रागाने लाल होत गेला. अखेरीला त्याचा राग अनावर झाला. त्यानं संतापानं रानमांजराला थप्पड लगावली. रानमांजराचा पाय ओढून कोल्हा ओरडला, "माझं हसं केल्याबद्दल मी तुझा जीव घेतो."

खरं म्हणजे रानमांजराचं मरणच ओढवलं होतं. पण त्याच्या पूर्वपुण्याईने रानकुत्र्यांची टोळी अचानक भुंकत भुंकत त्या जागी आली. त्या टोळीकडे कोल्ह्यानं नजर टाकली आणि त्याचा सगळा रुबाब, सगळी बढाई वितळून गेली. त्यानं रानमांजराचा पाय सोडला. रानमांजर लगोलग झाडाच्या खोडावरनं सरसर वर चढून धोका नाही अशा जागी जाऊन बसलं. दोन्ही पायात शेपूट घालून कोल्हा धूम पळाला. रानकुत्र्यांच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी तो खवल्या मांजराच्या बिळात शिरला. कुत्री मागोमाग होतीच. पण त्यांना बीळ उकरता आलं नाही. कुत्र्यांनी खटपट करून पाहिली. पण काही इलाज चालेना. तेव्हा कोल्ह्याचा पिच्छा सोडून ती आपल्या वाटेनं परत गेली.

जरा वेळानं कोल्हा हळूच बिळाबाहेर डोकावला, तर झाडावर बसलेलं रानमांजर दात काढून हसताना त्याला ऐकू आलं. आपला आब राखण्यासाठी तोंड फिरवून कोल्हा दूर पळाला. तेव्हा तर ते रानमांजर खो खो हसलेलं त्याला ऐकू आलं. आपली ही फजिती राजमांजरानं बघितली आहे ह्याचा विसर कोल्ह्याला पडलेला नाही. रानमांजराचा वचपा काढण्याची कुठलीच संधी सोडायची नाही असं कोल्ह्यानं ठरवून टाकलं होतं.

आता कधीही कोल्हा बघितला की ते रानमांजर झाडावर चढून बसतं. कारण कोल्ह्याचा सूड ही फार भीती वाटण्याजोगी गोष्ट आहे हे रानमांजराला माहीत आहे.

(व्यंकटेश माडगूळकर [मूळ लेखक : निक ग्रिव्हज्]
: झाडावर चढणारा कोल्हा आणि आफ्रिकेतील इतर प्राणीकथा)

# ४.१६. आळशी उंट आणि हुशार कोल्हा

फार फार वर्षांपूर्वी एका वाळवंटात एक उंट राहात होता. भगभगीत वाळवंटात पोटापाण्यासाठी उंटाला खूप भटकावे लागत असे. एकदा त्याला आपल्या पूर्वजन्मातल्या काही गोष्टी आठवल्या. पूर्वजन्मी आपण खूप जपतप केले. खूप पुण्य जमा झाले. त्याचा फायदाही झाला. ही गोष्ट आठवताच सगळा आळस झटकून जपतप करायचे ठरवले. प्राणीजगतात एक अनोखा चमत्कार घडला. उंट महोदयांनी अनुष्ठान मांडले. दिवसरात्र ब्रह्मदेवाचा धावा केला.

एक पशू धावा करतो आहे या गोष्टीचे ब्रह्मदेवास आश्चर्य वाटले आणि ब्रह्मदेव संतुष्ट झाले. उंटाला देवांनी विचारले, "हे उंटा तुला काय हवे ते माग, तुझी इच्छा पूर्ण होईल!"

उंट म्हणाला, "देवा, या वाळवंटी प्रदेशात सहजपणे फिरवता येईल अशी चारशे कोसांची लांब मान मला द्या." ब्रह्मदेव 'तथास्तु! तथास्तु!' म्हणाले आणि गुप्त झाले.

लांबच लांब मान मिळाल्यावर उंट महाशय एकाच सोयीच्या जागेवर बसले आणि सहजपणे मान फिरवून आपला चारा-पाणी मिळवू लागले. थोड्या कष्टात भरपूर सुख मिळाल्याच्या आनंदात समाधानी झाले. कुठल्याच गोष्टीसाठी कष्ट करावे लागत नव्हते. चारा-पाणी खाऊन झाल्यावर दूर अंतरावर मान टेकवून आराम करीत असे. हळूहळू उंटराज गलेलठ्ठ बनू लागले. अवजड शरीर आणि मठ्ठ मेंदू यामुळे ते आळशीपणाकडे झुकू लागले. अशा या आळशी उंटाची देवाने परीक्षा पाहायचे ठरविले.

एकदा चारा-पाण्यासाठी चारशे कोसांची लांब मान फिरवत असताना त्या वाळवंटी प्रदेशात वादळ सुटले. पाऊस पडला. स्वतःचे संरक्षण करण्यासाठी उंटाने आपली मान एका गुहेत घातली आणि निर्धास्त झाला. या वादळवाऱ्यात

आसरा शोधत शोधत एक कोल्हा आपल्या बायकोला घेऊन त्या गुहेजवळ आला. गुहेत येताच त्यांना उंटाची मान दिसली. आसराही मिळाला आणि अन्नही मिळाले म्हणून दोघेही आनंदित झाले. लगेचच उंटाचे लचके तोडायला सुरुवात केली. चारशे कोसावरील उंटाच्या जेव्हा हे लक्षात आले तोपर्यंत कोल्हा-कोल्हीने उंटाच्या मानेचा पूर्ण फडशा पाडला होता. धडपड करत जगणाऱ्या कोल्हा-कोल्हीने तृप्ततेचा ढेकर दिला आणि आळशी उंटाचा मात्र अंत झाला.

# ४.१७. वेडा मगर आणि हुशार कोल्हा

समुद्राच्या काठी एक गाव होतं. तिथं एक मगर आणि एक कोल्हा राहायचे. त्यांनी दोघांनी मिळून शेती करायचं ठरवलं. सुरवातीला बटाट्याची शेती केली. मगर म्हणाले, "आपण उत्पन्नाची वाटणी कशी करायची ते आधी ठरवून टाकू." कोल्ह्याने त्याला मान्यता दिली. मगर म्हणाले, "मी झाडांचा वरचा भाग घेईन, खालचा तू घे." कोल्हा म्हणाला, "चालेल, तू म्हणशील ते मला मान्य आहे." पुढे बटाट्याचं पीक तयार झालं. मगराने झाडाचे शेंडे कापून नेले. पण घरी गेल्यावर त्यात एकही बटाटा मिळाला नाही. कारण बटाटे मातीच्या खाली जमिनीत लागतात आणि झाड-पाला जमिनीच्या वर असतो. मगर परत शेतावर गेला. तिथे कोल्हा माती खणून बटाटे काढण्यात मग्न होता. मगराला आपली चूक कळली. पुढच्या पिकाच्यावेळी शहाणं व्हायचं त्याने ठरवलं.

पुढचं पीक भाताचं घेतलं. मगर म्हणाला, "कोल्हेदादा, यावेळी पिकाचा खालचा भाग माझा, वरचा तू घे." करार झाला. पुढे भाताचं पीक तयार झालं. कोल्ह्याने वरचं पीक कापून नेलं. त्याला कणगी भरून भात मिळाला. मगर शेतात जाऊन जमीन खणू लागला. तिथं त्याला काहीचं मिळालं नाही . पुन्हा त्याला आपली चूक समजली. आता मात्र मगर निधारपूर्वक म्हणाला, "पुढच्या पिकाच्यावेळी वरचा भाग माझा, खालचा तुझा." कोल्ह्याने संमती दिली.

पुढचं पीक घेतलं उसाचं. पीक तयार झाल्यावर मगराने शेंडे कापून नेले. पण एका शेंड्याला धड चव नाही. नुसती हिरवी पानं. कोल्ह्याने बुडखाच्या गोड ऊसावर ताव मारला. ते पाहून मगराला राग आला आणि म्हणाला, "कोल्हे दादा, तू दादा कसला, लबाड, भामटा आहेस. तुझ्याबरोबर यापुढे मी शेती करणार नाही." तेव्हा पासून मगराची आणि कोल्ह्याची शेती संपली.

आता कोल्हा लबाड की हुषार हे ज्याचे त्याने ठरवायचे.

(पुनःकथन : डॉ. मंगला वरखेडे)

# ४.१८.साळींदर आणि कोल्ह्याची गोष्ट

(ग्रीक लोककथा)

[ कोल्हा हा एक धूर्त, कावेबाज, चतुर आणि लबाडी करण्यात पटाईत असलेला प्राणी आहे. कोल्ह्याच्या अनेक चातुर्यकथा प्रसिद्ध आहेत. वास्तविक सिंह हा जंगलचा राजा, पण कोल्हा त्यालाही फसवतो. विहिरीच्या पाण्यात सिंहाला त्याचेच प्रतिबिंब दाखवून “तुझा प्रतिस्पर्धी तुला आव्हान देत आहे" अशी बतावणी करून तो सिंहाला चिथावतो. सिंह त्या प्रतिबिंबावर चाल करून जातो, आणि विहिरीत पडतो. ग्रीक लोककथा मात्र याहून वेगळी आहे. ]

कोल्हा दिसायला सुंदर, अत्यंत चपळ, वेगाने पळणारा. याउलट साळिंदर म्हणजे अगदीच गबाळा प्राणी. दिसायला थुलथुलीत. संथपणे डुलत डुलत चालणारा. आपण भले आणि आपले काम, कुणाच्या अध्यात मध्यात पडणार नाही, कुणाची स्वत:हून खोड काढणार नाही. अन्न शोधण्यासाठी बाहेर पडायचं, अन्यथा आपलं घर सांभाळायचं. अशा निरूपद्रवी साळिंदरवर कोल्ह्याचा डोळा असतो.

कोल्हा साळिंदरवर हल्ला करण्यासाठी टपून बसतो. रात्रंदिवस तो साळिंदरच्या बिळाभोवती फेऱ्या मारून त्याच्यावर पाळत ठेवतो. केव्हा ना केव्हा साळिंदर बिळातून बाहेर येईल, आणि मग आपण त्याच्यावर अचानक हल्लाबोल करायचा, असा मनातल्या मनात बेत करून तो सावधपणे साळिंदरची वाट पहात रहातो. सावज गळाला लागण्यासाठी तासनतास वाट पहावी लागते, ज्याची शिकार करायची त्याला गाफील ठेवावं लागतं, अशा युक्तीच्या सर्व गोष्टींचे ज्ञान कोल्ह्याला असते. साळिंदरला पकडण्यासाठी कोल्हा या सर्व युक्त्यांचा वापर करतो. साळिंदरला मात्र याची मुळीच खबरबात नसते. ते आपलं अन्न शोधण्याचं काम मुकाटपणे करीत असतं.सफरचंद, मश्रुम, कीटक असे काही बाही गोळा करून बिळात

साठवण्याचा उद्योग चालू असतो. एकटे भटकण्यापेक्षा आपल्या सख्या सोबत्यांबरोबर मिळून मिसळून रहाणे त्याला आवडते.थंडीच्या दिवसात परस्परांची उब मिळून ते थंडीपासून आपला बचाव करतात. आताही ते असेच फिरत होते. धुळीत त्यांच्या पावलांचे ठसे उमटून एक चाकोरी उमटली होती. कोल्ह्याने ती पाऊलवाट ओळखली. त्याबरोबर खुशीत येऊन त्याने एक उडी मारली. " अरे व्वा! आता तू सापडलाच माझ्या तावडीत" असे म्हणून त्याने झटकन ती चाकोरी ओलांड्ली. मैदान गाठले. पुसटशा खुणांवरूनही माग काढण्यात कोल्हा पटाईत होता. साळिंदरच्या जवळपास पोहचायला त्याला फार वेळ लागला नाही.

छोट्या साळिंदरला धोक्याची चाहूल लागली. संकट घेरून आले आहे, हे त्याने ओळखले. कोल्ह्याला हुलकावणी देण्यासाठी लागणाऱ्या युक्तीच्या चार गोष्टी त्याच्याकडे नव्हत्या. पण आत्मसंरक्षणासाठी त्याचे शरीर हीच एक फार मोठी गोष्ट त्याच्याकडे होती. सर्वप्रथम त्याने त्याच्या तोंडातून फेस बाहेर काढायला सुरूवात केली. तो फेस त्याने आपल्या पिसांना चोपडला. त्याच्या वासाने असा विचित्र दर्प सुटला की, कोल्हा सैरभैर झाला. त्या वासाने साळिंदरचे सहकारी सावध झाले. त्यांनीही बचावाचा पवित्रा घेतला. त्यांच्या शरीराच्या मणक्यांची रचनाच अशी होती की, चटकन चेंडूसारखी त्याला शरीराची गुंडाळी करता यायची. डोके, पाय, पोट सगळे काही गुंडाळले जायचे. आणि पिसांची रचनाही टोकदार सुयांसारखी असे. त्या पिसांच्या पोकळीत हवा भरली जायची आणि सगळी पिसे ताठरून बाहेर यायची. एखाद्या धारदार शस्त्रासारखे साळिंदर पुढे आल्यावर कोल्ह्याला पळून जाण्याखेरीज दुसरा पर्याय उरला नाही. कोल्हा हरला. साळिंदर जिंकले.यानंतरही दररोज कोल्ह्याने साळिंदरला पेचात पकडण्यासाठी निरनिराळ्या युक्त्या करून पाहिल्या; परंतु साळिंदरच्या एककलमी प्रतिकारापुढे कोल्ह्याला माघारच घ्यावी लागली. कंटाळून कोल्हा जंगलात निघून गेला.

ही बोधकथा तुम्हा आम्हाला बरेच काही शिकवून जाते. एक म्हणजे

सगळ्यांनी मिळून मिसळून राहिले, तर एकमेकांना त्याचा फायदाच होतो. एकमेकांना बोचकारत बसण्यापेक्षा एकमेकांची उब मिळवून थंडीसारख्या नैसर्गिक संकटाचा सामूहिकपणे सामना करण्याचे शहाणपण साळींदरकडे आहे. आपण भले दिसायला कुरूप असू, लहानखुरे असू, पण संकटसमयी स्वत:ला पंगू न समजता सर्व शक्तीनिशी प्रतिकाराला सज्ज झाले तर निदान आपण आपले आत्मसंरक्षण नक्कीच करू शकतो. कोल्ह्याकडे भले चतुराईच्या, हुशारीच्या चार गोष्टी अधि्क असल्या, तरी साळिंदरकडे त्याहून अधिक मोठी गोष्ट होती, ती म्हणजे संकटात न डगमगता आपल्या जवळच्या साधनसामग्रीचा तत्काळ आणि सर्व शक्तीनिशी आत्मविश्वासाने वापर करायची. एवढ्या एका गोष्टीमुळेच सळिंदरला कोल्ह्यावर मात करता आली, तशी ती तुम्हा आम्हाला करता येवो, ही साठा उत्तराची गोष्ट सफळ संपूर्ण.

(पुनःकथन : रमेश नारायण वरखेडे)

# ४.१९. बीव्हर आणि साळू

(अलास्कन लोककथा)

[ इतर अनेक पुराणकथा आणि दंतकथांप्रमाणेच ही कथाही घडलेल्या एका प्रसंगातून आजच्या काळावर प्रकाश टाकते. अशाच पद्धतीची कथा शिम्शियन जमातीमध्ये सांगितली जाते.]

खूप खूप वर्षांपूर्वी म्हणजे अगदी ट्लिंगट जमात अस्तित्वात येण्यापूर्वी साळू आणि बीव्हर हे चांगले मित्र होते. नेहमी एकमेकांच्या घरी जात येत होते. साळू घरी आली की ती परत जाताना तिचे खूप काटे पडत. बीव्हरला ते आवडत नव्हते. म्हणून बीव्हर ठरवतो की साळूच्या घरी जाऊन तिला कधीही आपल्या घरी येण्याचे आमंत्रण द्यायचे नाही.

एके दिवशी साळूने त्याच्या घरी येण्याची इच्छा आहे, असे बीव्हारला सांगितले.

‘ माझ्या पाठीवर बसवून माझ्या तळ्यावर असलेल्या घरी मी तुला घेऊन जाईन' बीव्हर म्हणाला.

पण साळू जेव्हा त्याच्या पाठीवर चढून बसली, तेव्हा बीव्हरने तिला नेहमीसारखे सरळ त्याच्या घरी नेले नाही. त्याने तिला तळ्याच्या मध्यावर असलेल्या एका झाडाच्या कापलेल्या बुंध्याजवळ नेले आणि तेथेच उतरायला सांगितले.

‘हे माझे घर आहे‘ असे पोहता पोहता बीव्हरने निघताना सांगितले आणि साळूला खोडावर बसवले. साळूला असे संकटात टाकून बीव्हर निघून गेला.

पहिल्यांदा साळूला कळलेच नाही की तिचा मित्र तिच्याशी असा का बरं वागला असेल ? ती विचार करू लागली की आता या खोडावरून आपली सुटका कशी करून घ्यावी ? शेवटी तिने तिची विशेष शक्ती उपयोगात आणली.

'हा तलाव गोठून जाऊ दे' असे गाणे तिने म्हणायला सुरुवात केली.

आणि थोड्या वेळाने तलाव गोठला ! साळू खोडावरून खाली उतरली आणि बर्फावरून चालत सुरक्षित किनाऱ्यावर आली. त्यानंतर साळू जंगलात बीव्हरला भेटली आणि म्हणाली, " माझी इच्छा आहे की, आत्ताच तू माझ्या घरी यावेस. मी माझ्या पाठीवरून तुला नेईन."

असे म्हणून साळूने बीव्हरला पाठीवर घेतले आणि सगळ्यात उंचच उंच असलेल्या झाडावर ती चढली.

त्यानंतर साळूने बीव्हरला सांगितले की हेच तिचे घर आहे. साळूने असे म्हटल्यावर बीव्हर तिच्या पाठीवरून खाली उतरला.

बीव्हर खाली उतरल्यावर साळू झाडावरून खाली उतरली. बीव्हरने जसे साळूला झाडाच्या खोडावर सोडून संकटात टाकले, तसे साळूने बीव्हरला झाडाच्या अगदी वरच्या टोकावर सोडून दिले आणि संकटात टाकले. त्यानंतर बराच वेळ बीव्हरला खाली उतरता आले नाही. त्याला तेथेच अडकून बसावे लागले. शेवटी तीक्ष्ण दात आणि पंजांचा उपयोग करून तो खाली घसरत येऊ शकला. असे घसरत आल्याने बीव्हर झाडावरून खाली पडला नाही. तेव्हापासून झाडाच्या सालीवर रेघा दिसू लागल्या.

(उषा प्रभुणे, अरुण प्रभुणे [मूळ लेखक : जॉन इ. स्मेल्सर]
: उत्तर ध्रुवाजवळील अलास्कन लोककथा)

# ४.२०. कोंबड्याचा तुरा

(तापीकाठची लोककथा)

एकदा अरुणदेव आकाशात भ्रमण करीत होते. फिरता फिरता त्याचे लक्ष पृथ्वीवर गेले. आभाळ लाल-केशरी रंगाच्या रंगछटा उधळत होते. फुले उमलायला सुरुवात झाली होती. मंद वाऱ्याची झुळुक वाहत होती. पृथ्वीवरची विलोभनीय शोभा बघून अरुण देवाला पृथ्वीवर फेरफटका मारण्याची इच्छा



झाली. इच्छा होताच अरुणदेव पृथ्वीवर अवतरले. पहाटेची शांत वेळ. त्याच वेळेस सर्व पक्ष्यांनी आपापल्या सुरात अरुणदेवाचे स्वागत केले. कोंबडा आरवला, चिमण्या चिवचिवल्या आणि अरुण देवाला सलामी ठोकून दाण्या-पाण्याच्या शोधात किलबील करीत उडाले.

पण एका झाडाखाली एक चिमणी रडत होती. तिचा एक पंख तुटलेला होता.

त्यामुळे तिला नीट उडता येत नव्हते. तिला नीट दिसतही नव्हते. कारण तिचा एक डोळा फुटलेला होता. शिवाय तिचा एक पाय तुटल्याने तिला नीट उभेही राहता येत नव्हते. त्यामुळे ती झाडाखाली पडून रडत होती. भूक लागलेली होती. पण कोणीच तिच्याकडं लक्ष देत नव्हतं.

एवढ्यात एक कबुतर तिथे आला. चिमणीने त्याला थांबवले आणि क्षीण आवाजात म्हणाली, "कबुतरदादा, कबुतरदादा, मला थोडे दाणे खाऊ घाल ना! मला उडता येत नाही." कबुतर म्हणाले, "छे ! छे ! मला अजिबात वेळ नाही." चिमणी परत काकुळतीला येऊन म्हणाली, "अरे! मी खूप तहानलेली आहे. कमीत कमी पाणी तरी दे !" कबुतराने चिमणीचे बोल ऐकून न ऐकल्यासारखे केले आणि निष्ठूरपणे उडून गेला. चिमणी परत रडू लागली. आता कोण आपला प्राण वाचविणार ? थोड्याच वेळात तिथे एक साळुंखी आली. गाणे गात-गात ती चिमणीच्या जवळ गेली. म्हणाली, "चिऊ ताई चिऊ ताई का रडतेस ?" चिमणीने आपलं दुःख साळुंखीला सांगितलं, "बघ ना, माझा डोळा फुटला, एक पाय तुटला, पंख तुटले. त्यामुळे मला उडता येत नाही. मला खूप भूक लागली आहे. खूप तहानही लागली आहे. तेव्हा कृपा कर, मला थोडं पाणी पाजशील तर उपकार होतील. दोन-चार दाणे खाऊ घालशील तर तुझे उपकार मी जन्मभर विसरणार नाही." साळुंखी म्हणाली, "नाही गं बाई, एवढा वेळ कुठून आणू ? तू हळूहळू ऊठ आणि स्वतःच शोध आपला दाणापाणी" आणि गाणे गात ती उडून गेली. चिमणी परत रडत बसली. कोणी मदतीला येत का नाही ? ती उठण्याचा प्रयत्न करत होती. प्रचंड वेदना होऊ लागल्या. परत पडली.

थोड्या वेळाने एक कोंबडा तिथे आला. चिमणीची अवस्था पाहून दुःखी झाला. म्हणाला, "चिऊताई चिऊताई का गं रडतेस ?" चिमणीला काही बोलवेना ! हा पण फुकटची चौकशी करेल आणि निघून जाईल. चिमणी आपली एकसारखी रडतच होती. कोंबड्याने घाईने पाणी आणले. चिमणीला पाजले. चिमणीला थोडी उभारी आली. ती म्हणाली, "कोंबडेदादा, कोंबडेदादा मला खूप भूक लागली आहे. दोन-चार दाणे खाऊ घालतोस का ? तुझे उपकार मी

आयुष्यभर विसरणार नाही.” चिमणीचे केविलवाणे रूप कोंबड्याला बघवेना. त्याने तिचे डोळे पुसले. स्वतःच्या हाताने तिला दाणे भरवले. चिमणीच्या जिवात जीव आला. संध्याकाळ होऊ लागली होती. कोंबडा म्हणाला, “चिमणीताई रात्रीची एकटी इथे पडून राहशील. कुठे सहारा नाही. माझ्या घरी येतेस ? मी तुझी सेवा करीन. रोज दाणा-पाणी देईन. बरी झालीस की तू माझ्या घराची देखभाल कर. मी दाणा-पाण्याची व्यवस्था करण्यासाठी बाहेर जाईन. चिमणी म्हणाली, “कोंबडेदादा प्रथम कबुतर, साळुंखी भेटल्यावर वाटले, भल्याची दुनिया नाही. पण तुझ्याकडे बघून वाटते, तुझ्या इतका भला कोणी नाही.” जखमी चिमणीला उठता येईना तेव्हा कोंबड्याने जमिनीवर आपले पंख पसरले त्यावर चिमणी झोपली. मग कोंबड्याने हळूच तिला पाठीवर घेतले आणि आपल्या घरी आणले. तो रोज चिमणीची सेवा करायचा. चिमणीच्या पायाची जखम भरत आली होती पण तरी तिला चालता येत नव्हते. डोळ्याने दिसत नव्हते. त्यामुळे ती दुःखी होती. ती रोज कोंबड्यासाठी दुवा करायची, “देवा, कोंबडेदादाला खूप आयुष्य दे. त्याचे भले कर.” अरुणदेव हे सारे दृष्य बघत होते. त्यांना कोंबड्याचे कौतुक वाटले. ते कोंबड्याच्या घरी गेले. त्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवला आणि म्हणाला, “तू चिमणीची मदत केली. सेवा केली. सांग तुला काय बक्षिस देऊ ? तू मागशील ते तुला देईन.” कोंबडा क्षणाचाही विलंब न करता म्हणाला, “देवा, मी खूप सुखी आहे. खातो-पितो. आनंदात जगतो. पण तुला काही द्यायचे असेल तर या दुःखी चिमणीसाठी काही कर. तिचा पाय, डोळा, पंख तुटले आहेत. ते नीट कर. तिला पुन्हा नव्याने दिसायला लागले, चालता यायला लागले आणि उडता यायला लागले तर मला आनंद होईल.” अरुण देवाने चिमणीला हळूच आपल्या डाव्या हाताच्या पंजावर घेतले आणि उजव्या हाताने तिच्या पाठीवर हात फिरवला, तर काय नवल ! चिमणीला पहिल्यासारखे दिसायला लागले, उडता यायला लागले. तिचा मोडलेला पाय चांगला झाला. ती आनंदाने नाचू लागली. तिने अरुण देवाला नमस्कार केला. कोंबड्याचे आभार मानले आणि आपल्या घरट्याकडे

निघाली.

कोंबड्यानेही अरुणदेवाला वाकून नमस्कार केला. अरुण देवाने आपल्या हातात असलेले लाल फुल अतिशय सन्मानाने कोंबड्याच्या डोक्यावर ठेवले. ते तिथेच चिटकले. त्यावर अरुणदेव म्हणाले, “कोंबडेदादा, हा तुरा सन्मानाचा. तुमच्या निर्लोभ वृत्तीवर खूष होऊन मी सर्वांच्या साक्षीने हा मानाचा, त्यागाचा, दानशूरपणाचा, सन्मानाचा तुरा तुला देत आहे.” तेव्हापासून कोंबडा आपल्या डोक्यावर सन्मानाचा तुरा मिरवतो, आणि अरुणदेवाचे रोज सकाळी बांग देऊन स्वागत करतो.

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ४.२१. दुष्ट सिंह

(तापीकाठची लोककथा)

एक घनदाट जंगल होते. त्या जंगलाचा राजा सिंह अतिशय दुष्ट होता. इतर प्राण्यांना तो खूप त्रास देत असे. त्याने त्यांचे जगणे कठीण केले होते. आपले व आपल्या कुटुंबियांचे प्राण वाचावे यासाठी सर्व जण देवाजवळ प्रार्थना करीत होते. दिवसेंदिवस त्याचा दुष्टपणा वाढतच चालला होता. सर्व प्राण्यांची केविलवाणी अवस्था झाली होती. जंगलातून जाणाऱ्या वाटसरूंना त्याचा भयंकर त्रास होत होता.

एकदा सर्व प्राण्यांची प्रार्थना जणू परमेश्वराने ऐकली. जंगलात एक पारधी आला, त्याने सिंहाला पकडण्याचा बेत आखला. त्यासाठी एक पिंजरा तयार केला. पण सिंह पिंजऱ्यात येणार कसा? त्याने युक्ती केली. एक बकरी पिंजऱ्याजवळ बांधली. पारध्याची युक्ती यशस्वी ठरली. बकरीला बघून सिंह पिंजऱ्याजवळ आला, त्याबरोबर पारध्याने पिंजऱ्याचा दरवाजा बंद केला. जंगलाचा राजा पिंजऱ्यात अडकला. दुष्ट राजा पिंजऱ्यात बंद झाला. जंगलातील सर्व प्राण्यांनी सुटकेचा श्वास सोडला.

पण सिंह अजून जिवंत होता. त्यामुळे पूर्णत: कोणीच आनंदी नव्हते. सिंहाची अवस्था व दयनीय स्थिती बघायला जंगलवासी पिंजऱ्याच्या जवळ जात होते. सिंह प्रत्येकाला अतिशय मृदू आवाजात तर कधी विविध आमिषे दाखवून प्रत्येकाला पिंजऱ्याचा दरवाजा उघडण्यासाठी विनंती करायचा, पण व्यर्थ. कुणीच पिंजऱ्याचा दरवाजा उघडला नाही. दोन दिवस उलटून गेले. सिंह भुकेने व्याकूळ झाला होता. पण कोणीच प्राणी व वाटसरू पिंजऱ्याची कडी उघडून सिंहाची मुक्तता करीत नव्हता. सिंह वेडापिसा झाला.

तिसऱ्या दिवशी सकाळीच एक वाटसरू अतिशय घाईने जंगलातून जात होता. कारणही तसेच होते. राजा भोजच्या घरी त्याला जेवणाचे आमंत्रण होते.

तेवढ्यात सिंहाचे लक्ष त्या वाटसरूवर पडले. त्याने वेगळीच युक्ती केली. चालत्या वाटसरूला जवळ बोलावले. त्याची खूप-खूप स्तुती केली आणि अतिशय गोड बोलून त्याला पिंजऱ्याची कडी उघडण्यास भाग पाडले. वाटसरू सिंहाच्या गोड बोलण्यावर भाळला आणि फसला, त्याने कडी उघडली.

पिंजऱ्यातून मुक्त झालेला सिंह बाहेर पडताच वाटसरूला म्हणाला, "ए वाटसरू, मी तीन दिवसापासून उपाशी आहे. मी तुला खाणार, तयार हो." वाटसरू घाबरला. म्हणाला, "बाबारे, मी केलेले उपकार आठव. मी तुला मुक्त केले." सिंह हसून म्हणाला, "उपकार ! कसले उपकार ? अरे... हा प्रकृतीचा नियम आहे की, प्रथम उपकार करणाऱ्यावरच हल्ला करा. त्याला त्रास द्या. मग इतरांना, तेव्हा तू मरायला तयार हो." वाटसरू म्हणाला, "हा माझ्यावर अन्याय आहे. थांब, मी तीन जणांची साक्ष घेतो. त्यांचे जे म्हणणे असेल ते मला मंजूर आहे.

वाटसरूचा पहिला साक्षीदार म्हणजे पिंजऱ्याजवळ बांधलेली बकरी. तिला विचारले, "उपकार करणाऱ्या व्यक्तीशी चांगली वागणूक हवी ना ?" बकरी म्हणाली, "मी ज्यांच्या शेतात राहते. त्या शेतकऱ्याला दूध देते. उत्पन्न देते, पण तरी ते आम्हाला कापून खातात. तेव्हा हे भल्या माणसा तुझ्या मताशी मी सहमत नाही." वाटसरू सिंहाला म्हणाला, "हे एक मत झाले, माझे अजून दोन साक्षीदार आहेत. त्यांना विचारू या. सिंह म्हणाला, "ठीक आहे." वाटसरू जवळ शांत उभ्या असलेल्या आंब्याच्या झाडाकडे आशेने बघत म्हणाला, "उपकार करणाऱ्या व्यक्तीशी वागणूक चांगली असावी ना?" त्यावर आंब्याचे झाड म्हणाले, "तुझ्या जातीचे लोक माझे पान, फांद्या, फळे सगळे ओरबाडून नेतात. तेव्हा मी तुझ्या मताशी सहमत नाही." वाटसरू निराश झाला. आता एकच साक्षीदार उरला. त्यानेही सिंहाची बाजू घेतली तर... वाटसरू घाबरला. एवढ्यात एक शिपाई तेथून जात होता. वाटसरूने त्याला थांबवून घडलेली घटना सांगितली आणि म्हणाला, "उपकार करणाऱ्या व्यक्तीशी वागणूक चांगली असावी ना?" शिपाई म्हणाला, "तू काय म्हणतो आहेस मला काहीच समजलेले

नाही. ही घटना घडली कशी? कुठे? सगळे मला दाखवा. तरच मी योग्य निर्णय घेऊ शकेल. सिंह म्हणाला, “ठीक आहे.” सगळे पिंजऱ्याजवळ आले. सिंह पिंजऱ्यात गेला, एवढ्यात शिपायाने पिंजऱ्याचा दरवाजा लावून घेतला. सिंह अतिशय नाराज झाला. खरं तर तो घडली घटना दाखविण्यासाठी परत पिंजऱ्यात शिरला. पण फसला. त्यानंतर शिपायाने वाटसरूची चौकशी केली. राजा भोजकडे जेवायचे आमंत्रण त्याच्या जिवावर येऊ शकले असते. पण चतुर शिपायामुळे तो वाचला.

तेव्हा शिपाई वाटसरूला म्हणाला, “उपकार करताना विचार करावा. दुष्टाला केलेली मदत फळतेच असे नाही. जा बाबा जा. राजाकडच्या जेवणाची वेळ अजून टळलेली नाही.”

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ४.२२. सिंह आणि चर्मकार

(मॉरिशसची लोककथा)

फार फार वर्षांपूर्वी एकदा एका खेडेगावात एक चर्मकार राहात होता. त्याचा एक छोटासा ग्रामधंदा होता. तो धंदा चांगला चालावा म्हणून त्याला असंख्य कातड्यांची गरज लागत असे. तो अरण्यात जात असे आणि मेलेल्या जनावरांची कातडी गोळा करीत असे. एखादे मेलेले जनावर त्याला आढळले की तो त्याची कातडी सोलायचा. ती स्वच्छ धुऊन काढायचा. मग ती नीट सूर्यप्रकाशात ठेवून तो सुकवायचा. मग त्या कातड्याचे सुंदर बूट तयार करायचा. ते शहरात नेऊन लोकांना विकायचा. अशा रीतीने तो आपल्या कुटुंबाचा निर्वाह करायचा.

आपला धंदा नीट चालावा म्हणून त्याला सतत काळजी लागलेली असे. त्यामुळे जवळ जवळ त्याची प्रत्येक सकाळ अरण्यात जात असे. अरण्यात जाऊन तो कातडी शोधत असे. एके दिवशी अरण्यात तो खूप आत आत त्याच्या दाट गडद भागात धाडस करून गेला. अरण्याच्या त्या भागात एक म्हातारा सिंह रहात असे; त्याची प्रकृती तोळामासा झालेली होती आणि म्हातारपणामुळे त्याचे अवयव थकलेले होते. सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा, तो चर्मकार आणि तो म्हातारा सिंह त्या दिवशी समोरासमोर आले. चर्मकाराची तर घाबरगुंडी उडाली. परंतु तो सिंह मात्र त्याच्याकडे एकसारखी नजर रोखून पहात राहिला. सिंहाची ती विचित्र वागणूक पाहून त्या चर्मकाराला अचंबा वाटला. तो स्वतःशी पुटपुटला,

'हा सिंह माझ्याकडे पाहून गर्जना का करीत नाही ? तो माझ्यावर हल्ला का करीत नाही? तो इतका शांतपणे का उभा राहिला आहे ?'

परंतु त्याचे त्यालाच उत्तर मिळण्यापूर्वी त्या सिंहाने त्याला विचारले,

'कोण आहेस तू ? आणि तू या अरण्यात काय शोधतो आहेस ? '

‘ मी एक चर्मकार आहे आणि मी मेलेल्या जनावरांची कातडी शोधतोय', तो चर्मकार म्हणाला.

सिंह थोडा वेळ विचारात पडला. मग तो म्हणाला,

‘ मेलेल्या जनावरांची हवी तेवढी कातडी मी तुला दाखवीन. परंतु त्या कातड्यांच्या बदल्यात माझ्या दुबळ्या पायांसाठी तुला बुटाचे दोन जोड हे तयार करावेच लागतील. या अरण्यातील अणकुचीदार काटे माझ्या पायाच्या तळव्यांना नेहमी फार टोचतात.'

‘करार ठरला. मी तुझे बुट तयार करीन. तू मला त्या जागेकडे घेऊन चल.' तो चर्मकार म्हणाला. त्याला खूप आनंद झाला होता. मात्र त्या सिंहामागून जाताना त्याच्या मनात नाना तऱ्हेचे विचार येऊ लागले. सिंह आपल्याला खोल खोल अरण्यात घेऊन जाण्यासाठी तर भुरळ पाडीत नाही आहे ना ?

उलट सिंह त्याला आपल्या गुहेत घेऊन गेला. ती जागा उंच सखल उंचवट्यांनी भरलेली होती. इथे तिथे झुडपे विखुरलेली होती. जमीन करडी झाली होती. परंतु त्या सगळ्या जागेत हाडाचे सापळे आणि कातडी पसरलेली होती. काही सुकलेली हाती. काही अर्ध सुकलेली होती तर काही अजून अर्धी अधिक ताजीतवानी होती. त्यात गुपित असे काहीच नव्हते. त्या सिंहाने निरनिराळ्या वेळी ती निरनिराळी जनावरे ठार मारलेली होती. त्यांचे मांस खाऊन टाकले होते आणि त्यांची हाडे आणि कातडी तिथे तशीच टाकून दिली होती.

कराराप्रमाणे त्या चर्मकाराने इकडे तिकडे विखुरलेली ती सगळी कातडी गोळा केली. त्यांची अनेक गाठोडी बांधली. ती घेऊन तो घरी गेला.ती जागा स्वच्छ करायला त्याला कित्येक दिवस लागले. परंतु तो खूप आनंदात होता कारण एवढ्या मोठ्या संख्येने त्याला मिळालेली ती कातडी त्याच्या धंद्याला वर्षानुवर्षे पुरणार होती. शेवटच्या वेळी त्या जागेत तो आला तेव्हा सिंहाच्या सदिच्छेबद्दल त्याने त्याचे आभार मानले. आपण त्याच्यासाठी बुटाचे जोड तयार करू आणि त्या जागी घेऊन येऊ असे वचन पुनः पुनः त्याने सिंहाला

दिले.

या प्रकारानंतर कित्येक महिने उलटले. परंतु तो चर्मकार त्या अरण्यात दृष्टीला पडला नाही. तो म्हातारा सिंह त्याची वाट पाहून पाहून कंटाळला. परंतु काही केल्या तो बुटाचे जोड किंवा तो चर्मकार या कुणाचाच पत्ता नव्हता. त्या म्हाताऱ्या सिंहाच्या मनात विचार आला.'इतका खोटारडा तो कसा काय निघाला ? त्याने आपला दिलेला शब्द तोडलाय. अशा अप्रामाणिक माणसाला शिक्षा ही झालीच पाहिजे.

आपले दैव उजळलेले पाहून तो चर्मकार मौजमजा करीत होता. अवघ्या काही थोड्या दिवसात त्याने संपत्ती प्राप्त केली होती. त्याने आपल्या धंद्याचा व्याप खूप वाढवला होता. आणि आता त्याने अनेक कामगारांना कामाला लावले होते. मेलेल्या जनावरांची कातडी शोधण्यासाठी अरण्यात जाण्याचे त्याने सोडून दिले होते. उलट त्याचे नोकर ते काम करीत होते. अशा रीतीने तो त्या खेडेगावातील सर्वात श्रीमंत माणूस झाला होता. शिवाय तो मोठा शक्तिमान माणूस झाला होता. सगळीकडे त्याचा प्रभाव पडत होता. त्यामुळे तो निर्भय झाला होता. मात्र एखाद्याला दिलेले वचन न पाळणे हे वाईट आहे हे मनातल्या मनात तो जाणून होता.

त्या चर्मकाराची सिंहाने खूप वाट पाहिली. त्याच्या विचित्र वागणुकीने तो चक्रावून गेला. मग एके दिवशी आपण स्वतःच त्याच्याकडे जायचे आणि त्याला भेटायचे असे त्याने ठरविले. हळू हळू सिंह उड्या मारीत त्या खेड्यात गेला. तो चर्मकार रहात होता ते घर त्याने शोधून काढले. रात्र पडल्यावर तो त्या घराजवळ गेला आणि चर्मकाराच्या घराच्या आसपास झाडेझुडपे वाढलेली होती त्यात तो लपून राहिला. दिवसा काही तो त्या माणसावर हल्ला करू शकत नव्हता. कारण आजूबाजूला सगळीकडे लोक वावरत होते. म्हणून त्याने रात्रीच्या वेळी, जर तो घरातून बाहेर आला तर त्याच्यावर हल्ला करण्याचे ठरविले.

परंतु मनात वाटत होती तशी संधी कधीच सिंहाला मिळाली नाही. त्या

चर्मकाराबरोबर सदासर्वकाळ कुणी ना कुणी तरी असायचाच. त्या सिंहाला तिथे तीन रात्री आणि तीन दिवस थांबावे लागले. तथापि , चौथ्या रात्री तो चर्मकार घरात बुटाचे जोड तयार करीत होता. त्याला कातडीच्या एका पट्टीची गरज लागली. ती घराबाहेर होती. आता जेव्हा घराबाहेर आला तेव्हा त्याच्याबरोबर कुणीच माणूस नव्हता. सिंह अशीच संधी पहात होता. परंतु तो घराच्या पडवीत येताच मोठमोठे पावसाचे थेंब पडू लागले. त्यांचा मोठा भीतिदायक आवाज वातावरणत उमटू लागला. रात्रीच्या त्या शांत वातावरणात ते थेंब केळींच्या पानावर जोरजोराने आदळू लागले आणि टिप टिप टप टप असा आवाज करू लागले. तो अनपेक्षित असा पाऊस आलेला पाहून त्या चर्मकाराची हालचाल मंदावली. पडवीतच तो थांबला आणि खूप मोठ्याने म्हणाला,

मला भीती नाही सिंहाची
परंतु भीती आहे मला फार मोठी
टिप टिप टप टप बुवाची

सिंहाच्या कानात ते शब्द पडले. त्या गाण्याचा पहिला भाग त्याला समजला.परंतु त्याच्या दुसऱ्या भागाचा अर्थ त्याला कळेना. तो आश्चर्य करू लागला,

'याचा अर्थ काय ? काय? त्या नावाचे कुणी जनावर आहे का ? टिप टिप टप टप बुवा ? तर मग ते भयंकर शक्तिमान असले पाहिजे. ते आता कोणत्याही क्षणाला इथे येईल. ते जनावर कसे विचित्र दिसत असेल ! हा माणूस सिंहांना भीत नाही. वाघांना भीत नाही. परंतु या प्राण्याची भीती मला वाटते, इथे इतःपर राहणे काही सुरक्षितपणाचे नाही. जर तो प्राणी इथे आला तर मी संकटात सापडेन. ही घाणेरडी जागा सोडून मी निघून जातो कसा ! हा माणूस मोठा दुष्ट आहे. चला, आपण निघूया.'

असे म्हणून तो सिंह त्या झुडपांतून बाहेर पडला. त्या घरापुढील कुंपण त्याने ओलांडले आणि तो अरण्याच्या वाटेने पळत सुटला. त्या चर्मकाराने

काळोखात एक जनावर पळत सुटलेय हे पाहिले. त्याच्या डोक्यात चटकन विचार आला. त्याच गावात त्याचा एक धोबी मित्र होता. काही आठवड्यापूर्वीच त्याचे गाढव हरवलेले होते. त्या धोब्याने आपल्या सर्व मित्रांना, जर ते आळशी गाढव कुठे दिसले तर त्याला पकडून ठेवण्याची विनंती केली होती. त्या चर्मकाराला वाटले की आता जे जनावर पळत गेले अरण्याच्या वाटेने, ते ते 'गाढव'च असले पाहिजे. त्या गाढवाला पकडायचे त्याने ठरविले. त्या पडवीच्या बाजूने एक भिंत होती. त्या भिंतीवरून त्याने उडी मारली. पडवीतून निघता निघता त्याने हातात एक लाकडाचे धुपटणे आणि एक मोठा दोराचा तुकडा घेतला. त्या पळणाऱ्या जनावराला पकडण्यासाठी तो तिथून निसटला. काही वेळ त्या जनावराचा पाठलाग केल्यावर त्याने त्या जनावराची मानगूट पकडली. त्या मानेभोवती त्याने तो दोर बांधला. नंतर तो दोर हाताने घट्ट धरून त्या जनावराच्या पाठीवर त्याने उडी मारली. आपल्या डाव्या हातात तो दोर धरून आपल्या उजव्या हातातील धुपटण्याने तो त्या बिचाऱ्या प्राण्याला झोडपू लागला. तो म्हणाला,

'अरे, आळशी मुर्खा ! तुझ्या धन्याकडून तू पळून गेलास नाही का? तुला घरी परत जावेसे का वाटत नाही ? किती काळ तू असा भटकत राहणार आहेस ?'

त्या सिंहाची दुर्दशा काय झाली असेल असे तुम्हाला वाटते? त्या खेडेगावात आल्याबद्दल तो स्वतःलाच शिव्याशाप देऊ लागला. परंतु अशा परिस्थितीत तो आता काय करणार होता? त्याला दुसरा कोणता पर्याय नव्हता. म्हणून तो तसाच पळत राहिला. त्याच वेळी त्याच्या मनात विचार येत होते. अरे अरे ! आपल्या मानेभोवती काहीतरी घट्ट आवळलं जातंय हे कसं आपल्याला जाणवलं! नंतर ते वजनदार जनावर आपल्या पाठीवर कसं कोसळलं! त्या भीतिदायक जनावराचाच तो हात असला पाहिजे. पण हे काही भलतसलतं घडून त्या दोघांचंही चुकलं होतं. त्या सिंहाला वाटत होतं की त्याच्यावर तो 'टिप टिप टप टप बुवा' बसलाय आणि तो त्याला बडवतोय. त्या चर्मकाराने निश्चय केला होता की काही झालं तरी त्या गाढवाचा पाठलाग करणं सोडायचं

नाही आणि सिंहाला आपल्या पाठीवरचं ते जड ओझं घेऊन पळण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. तो स्वतःशीच पुटपुटला,

'आतापर्यंत या चिवट, दांडगट आणि शक्तिमान जनावरासारख्या कोण्या जनावराने माझ्यावर कधी हल्ला केला नव्हता. आपण त्यालाच भितो असं जो तो चर्मकार म्हणत होता ते खरंच होतं.'

अशा या गोंधळात रात्रभर त्यांची ती दौड चालू राहिली. त्या सिंहाने इतका काही मार खाल्ला होता की जवळ जवळ त्याने आपला तोल घालविलाच होता. तो धावायचं म्हणून आपला यांत्रिकपणे धावत होता. उलट तो चर्मकारही ज्या प्राण्याच्या पाठीवर तो बसला होता त्याला मारून मारून दमला होता. आपण खरोखरच गाढवाच्या पाठीवर बसलो आहोत का असा त्याला संशय यायला लागला. अशा रीतीने पहाट झाली. क्षितिजाकडून सूर्याचे पहिले किरण पृथ्वीवर यायला लागले. ज्या जनावराने आपल्याला रात्रभर आपल्या पाठीवरून आपल्या गावापासून इतके दूर आणले ते जनावर आता त्याला दिसू लागले. ते जनावर म्हणजे गाढव नाहीय हे पाहून भीतीने जवळजवळ तो खाली कोसळणार होता. आता तो चांगला शुद्धीवर आला होता. त्या सिंहाचे अणकुणीदार केस त्याला टोचू लागले. परंतु त्याच क्षणाला त्याच्या मनात दुसरा एक विचार आला. त्याने थोडीशी जरी गडबड केली असती तरी तो कोण आहे हे सिंहाला कळले असते. मग सिंहाने त्याला खाऊन टाकले असते.

त्याच्या मनात आपण जगलं पाहिजे अशी प्रबळ इच्छा निर्माण झाली. म्हणून मनातील भीती त्याने कुठल्या कुठे पळवून लावली. त्या दुष्ट जनावराच्या पाठीवरून निसटून जाण्यासाठी त्याने एक योजना आखली. सुदैवाने त्या अरण्याच्या वाटेत त्याला एक वडाचे झाड दिसले. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ते वाढले होते. त्याच्या पारंब्या खाली जमिनीला टेकल्या होत्या. त्या पारंब्या म्हणजे त्याला एक वरदानच वाटले. कारण त्या पारंब्यांमधून तो पळून जाणार होता. अशा रीतीने तो सिंह त्या पारंब्यांजवळ येताच त्या चर्मकाराने एका पारंबीला घट्ट धरले आणि त्याने झाडावर उडी मारली.

त्या पारंब्यांना तो लोंबकळला आणि ताबडतोब झरझर काही क्षणांतच त्या झाडावर चढून गेला. वरून त्याने खाली पाहिले तर झाडाच्या बुंध्यामध्ये त्याला एक मोठी ढोल दिसली. लगेच तो त्या ढोलीत शिरला आणि लपून राहिला. तो सिंह मात्र आपला धूम पळतच होता. त्याच्या पाठीवरचं ओझं कमी झालं होतं. श्रमाने आणि भीतीने अगदी तो मरायला टेकला होता.

त्याचवेळी त्याच्या विरुद्ध दिशेने एक कोल्हा तिथे येऊन टपकला. अरण्याच्या राजाची मनःस्थिती अगदी वाईट झाल्याचं त्याने पाहिलं. त्याला काही समजेना म्हणून तो म्हणाला,

'शुभ प्रभात, मामू, शुभ प्रभात मामू! झालंय तरी काय? तुम्ही इतके घाबरलेले का दिसता? इतके जलद का पळता ?

'मला काही एक विचारू नकोस, भगिना.' सिंह म्हणाला. 'पळ, पळ्, भगिना. त्या वाटेने जाऊ नकोस. तिथे 'टिप टिप टप टप बुवा ' आहे. रात्रभर तो मला मरेपर्यंत मारत होता. चल, आपण इथून पळून जाऊया.' 'असला मूर्खपणा करू नकोस, मामू ! मला इकडे तिकडे कुणीही जनावर दिसत नाहीय. नक्कीच काहीतरी घोटाळा झालेला आहे.' तो कोल्हा म्हणाला. 'त्याला तू इतका का भितोस ? खाली बस आणि क्षणभर विश्रांती घे. तो कोण आहे तरी कोण हे मी पाहून येतो.'

असे म्हणून तो कोल्हा त्या झाडाजवळ गेला. परंतु तिथे त्याला कुणीही दिसले नाही. मग तो त्या वडाच्या झाडावर चढला. त्याला त्या झाडाच्या बुंध्यात एक ढोल दिसली. त्या ढोलीत आत काळोख होता. त्या ढोलीत त्याने आपले नाक खुपसले आणि आता डोकावून पाहू लागला. आत तो चर्मकार विसावला होता. त्याने आपली चिलिम पेटविली होती आणि तो तिचे झुरके घेत होता. दोन डोळे आपल्याकडे डोकावून पहाताहेत हे कळताच तो घाबराघुबरा झाला. ते कोणते जनावर या अशा वेळी आपल्याला त्रास द्यायला आले हे त्याला कळेना. परंतु दुसऱ्याच क्षणाला त्याला वाटले की या ढोलीत आपण सुरक्षित आहोत. मध्येच लुडबुड करणाऱ्या त्या प्राण्याला शिक्षा करण्याची

त्याने एक योजना आखली.

त्याने आपली चिलिम तोंडात घातली. आपल्या दोन्ही हातांनी ती घट्ट धरली. मग ती चिलिम तो सपाट्याने ओढू लागला. अशी सारखी आतून ओढत राहिल्यामुळे तिच्या तोंडावरचे निखारे पेटले आणि तिच्या तोंडातून एक मोठी आगीची ज्वाळा बाहेर पडली. एका क्षणाचाही विलंब न लावता त्याने ती पेटती चिलिम त्या दोन चकाकणाऱ्या डोळ्यांकडे नेली. त्यामुळे ते डोळे चांगलेच भाजले. त्या लुडबुडणाऱ्या कोल्ह्याला तेवढी शिक्षा पुरेशी होती. त्याने आपले भाजलेले तोंड त्या ढोलीतून बाहेर काढून घेतले. वेदनेने तळमळत त्याने त्या झाडावरून खाली उडी मारली आणि आपल्या शेपटीला पाय लावून तो धूम पळाला. सिंहाने दुरूनच त्याला येताना पाहिले. त्याला तो थांबविणार होता. परंतु ज्या वेगाने तो कोल्हा पळत होता ते पाहून सिंहाने ओळखले की त्या कोल्ह्यावर जबरदस्त हल्ला झाला असावा. तो सुद्धा बसल्या जागेवरून उठला आणि काहीही न बोलता लंगडत लंगडत अरण्यात निघून गेला. नंतर काही वेळाने त्याने कोल्ह्याला विचारले'

'भगिना, तुझं झालं तरी काय तिथे ? तू काय पाहिलंस? तो कसा दिसतो?'

'तो 'टिप टिप टप टप बुवा' नाहीय. तो 'तोंड जाळ्या' आहे. बघ. त्याने माझे तोंड जाळलेच. अरेरे ! ' तो कोल्हा रडत म्हणाला, 'या जागेपासून आपण दूर जाऊया'

'पण मी तुला ताकीद दिली होती तिथे जाऊ नकोस म्हणून, भगिना.' सिंह म्हणाला.

लवकरच त्याना त्यांच्या वाटेत एक माकड भेटला. त्या माकडाने त्याना थांबविले आणि ते दोघे का पळताहेत म्हणून चौकशी केली. सिंहाने नेहमीप्रमाणये त्याला त्या गूढ जनावराबद्दल - 'टिप टिप टप टप बुवा' - सांगितले, तर कोल्ह्याने तोंड जाळ्याला तोंड देण्याचे धाडस आपण कसं केलं ही हकिगत सांगितली. परंतु तो माकड आपल्या शूरपणाच्या नेहमीच बढाया मारीत असे. त्याने त्या दोघांना तिथेच थांबून आपली वाट पहायला सांगितले.

तो म्हणाला,

'तुम्हा दोघांना कोण उल्लू के पठ्ठे करतोय ?' त्याने त्या झाडाच्या बुंध्यावर उडी मारली आणि तो वर चढून त्या ढोलीपर्यंत गेला. तो आत पाहू शकला नाही. पण तो नशिबवान होता. आपली शेपटी आत घालून तो त्या ढोलीतील पोकळी पाहू शकत होता. एक क्षणभरही न बिचकता त्याने आपली शेपूट ढोलीत घातली आणि ती तो सभोवार फिरवू लागला. ती फिरती शेपूट त्या चर्मकाराच्या नाकाला स्पर्श करीत राहिली. आपली चिलिम ओढून झाल्यावर तो डुलकी घेत होता. झटकन तो जागा झाला. इकडे तिकडे काहीतरी फिरतेय असं त्याला वाटलं. तो सावध झाला. आपली संधी केव्हा येतेय ते पाहू लागला. ती फिरणारी वस्तू त्याच्याजवळ येताच त्याने ती आपल्या दोन्ही हातांनी घट्ट पकडून ठेवली आणि ती तो आत आत खेचू लागला.

त्या माकडाला पहिला हिसका चांगलाच जाणवला. आपल्याला कोणता धोका आहे हे त्याच्या लक्षात आले. आपली शेपूट सोडवून घ्यायचं त्याने ठरवलं. परंतु त्याला तसे करता येईना. शिवाय आतील खेचाखेची हळू हळू वाढत चालली होती. आता त्यानेही बाहेरून जोर वाढवायला सुरुवात केली. दोन्ही बाजूंनी खेचाखेचीला जोर येऊ लागला. शेवटी आतील खेचाखेची इतकी काही जोरदार झाली की त्या माकडाची ती शेपूट मुळातून उपटून निघाली आणि बिनशेपटीचा तो माकड आकाशात वर बाणासारखा उडाला. परंतु वर हवेत उडाल्याबरोबर त्याने स्वतःचा तोल सांभाळला आणि हळुवारपणे जमिनीवर आला. त्याला होणाऱ्या वेदना असह्य होत्या. त्या दुष्ट झाडाकडे न पाहता तो आपल्या मित्रांकडे धावत गेला. त्यांनी त्याला आपल्याकडे येताना पाहिले. ते जागेवरून उठले व त्याच्याबरोबर चालू लागले. थोड्या वेळानंतर सिंहाने त्याला विचारले,

'तुझं झालं तरी काय भतीजा ? तुला ते दुष्ट जनावर दिसलं का?'

'अहो काका ! अरे भगिना ! तो नाहीय. 'टिप टिप टप टप बुवा.' तो नाहीय. 'तोंड जाळ्या' तो आहे, 'शेपूट ओढ्या.' बघ इथे, मी बिनशेपटीचा झालोय.

त्याने माझी शेपूट उपटून काढली. आता मागे बघूया नको. शक्य तितक्या लवकर ही जागा सोडून जाऊया.' त्याबरोबर ते तिघेही घनदाट अरण्यात शिरून अदृश्य झाले.

तो चर्मकार थोडा वेळ त्या ढोलीत राहिला. परंतु आणखी कुणी लुडबुडणारा आपल्या जीवाला धोका देण्यासाठी येत नाही असे पाहून तो ढोलीतून बाहेर आला आणि सरळ आपल्या गावाला निघून गेला. त्यानंतर त्याच्या संपूर्ण आयुष्यात कोणतेही रानटी जनावर कधीच त्याला त्रास द्यायला आले नाही.

(प्र. श्री. नेरूरकर [मूळ लेखक : प्रल्हाद राम शरण]
: मॉरिशसच्या लोककथा)

# ४.२३. सिंह आणि ससा

(पंचतंत्रातील कथा)

मध्य भारतातल्या एका प्रचंड मोठ्या जंगलात एक दांडगा सिंह राहात होता. त्याचं नाव होतं भासुरक. त्याला स्वतःच्या शक्तीची घमंड होती. नि ह्या शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी तो खुशाल दुबळ्या जनावरांना ठार मारीत असे.

एकदा काय झालं, त्या जंगलातली सगळी जनावरं एकत्र जमली आणि सगळी सिंहाकडे गेली. सर्वांनी सिंहाला प्रणाम केला. आणि त्यांचा नेता म्हणाला, “महाराज, उगीच गंमत म्हणून तुम्ही आम्हाला ठार मारता. तुम्ही ते कृपया थांबवा अशी विनंती करायला आम्ही आलो आहोत. तुम्हाला आमच्यापैकी एकच जनावर भुकेला पुरं असतं. मग तुम्ही इतक्या प्राण्यांची हत्या का करता? तुम्ही आमचे राजे आहात. तुम्ही विचारानं वागायला हवं, तुम्हाला जेवढं पाहिजे असेल आणि आम्ही जेवढं देऊ शकू, तेवढेच तुम्ही आमच्याकडून घेणं योग्य. आपल्या प्रजेचं रक्षण करणं हे राजाचं मुख्य कर्तव्य असतं. राजा दुष्ट असला तर त्याचाच शेवटी नाश होतो. तरी आमची, तुमच्या नग्न प्रजेची ही विनंती आपण मान्य करा आणि तुमच्या जेवणासाठी रोज एका जनावराचा स्वीकार करा. दररोज दुपारी एक जनावर तुमच्या गुहेत हजर होईल अशी व्यवस्था आम्ही करू."

भासुरकानं थोडा वेळ विचार केला. नि मग तो बोलला, “तुमचं सांगणं योग्य आहे. दररोज एक जनावर स्वीकारायला मी तयार आहे. मात्र जर एखाद्या दिवशी ठरल्यावेळी जनावर हजर झालं नाही, तर मी तुम्हा सर्वांना ठार मारीन हे लक्षात ठेवा.'

त्या दिवसापासून जनावरं जंगलात मोकळेपणानं हिंडू लागली. दर दिवशी सकाळी नावाच्या चिठ्ठ्या टाकून त्यातली एक उचलली जाई. म्हणजे असं की जर उचललेल्या चिठ्ठीत हरिण हे नाव आलं तर सगळी हरिणं एकत्र जमत. आणि

सर्व हरिणांच्या नावाच्या चिठ्ठ्या टाकत. अन् त्यातून उचललेल्या चिठ्ठीत ज्या हरिणाचं नाव असेल ते हरिण सिंहाच्या गुहेत जाई.

एके दिवशी एका सशाची गुहेत जाण्याची पाळी आली. सिंहानं आपल्याला मारून खावं हे त्या सशाला पसंत नव्हतं. त्याचे खूप ससे दोस्त होते. त्यांच्याबरोबर खेळण्यात, उड्या मारण्यात, त्यानं सगळी सकाळ घालवली. दुपार झाली ती टळली तरी तो भासुरकाकडे जाईना! तो मुद्दाम टाळाटाळ करीत होता. त्या बलवान सिंहाला मारण्याची युक्ती तो शोधत होता. पण ती काही त्याला सापडेना.

शेवटी, मरण्यापूर्वी पोटभर पाणी तरी पिऊन घ्यावं म्हणून तो विहिरीकडे गेला. विहिरीच्या काठावर बसून तो पाण्याला तोंड लावणार इतक्यात त्या स्वच्छ पाण्यात त्याला स्वतःचं प्रतिबिंब दिसलं. अन् त्याला एक झक्क युक्ति सुचली. बस्स ठरलं. सिंहाला ह्या युक्तीनं चकवायचं. त्यानं स्वतःशी ठरविले. आणि बेटा डुलत डुलत भासुरकाच्या गुहेकडे पोचला.

भासुरक भुकेनं वैतागला होता. त्याची जेवणाची वेळ होऊन गेली होती. त्या एवढयाशा सशाला बघताच तो कमालीचा चिडला. अन् तो गरजला, "किती उशीर केलास. आणि शिवाय तू एवढासा बारकुला आहेस ! तुला खाऊन माझी भूक कशी भागेल? मी तुला तर खाणारच. पण जंगलातल्या प्राण्यांनी तुझ्यासारख्या मूठभर सशाला आज पाठविलं म्हणून मी त्या सगळ्यांना ठार मारणार'.

ससा नम्रपणे म्हणाला, “महाराज, आज सशांची पाळी होती. पण आम्ही एवढेसे चिमुरडे ! आमच्यातल्या एका सशाला खाऊन तुमची भूक कशी भागणार म्हणून एकाऐवजी पाच सशांना पाठविण्याचं ठरलं. पण आम्ही जंगलाच्या कडेशी येतो तर एक भयानक सिंहानं आम्हाला थांबविलं नि गुरगुरत विचारलं, “तुम्ही पाच जण कुठं निघाला आहात ? तुम्ही देवाचं नाव घ्या. विष्णुसहस्त्रनामाचा जप करा. कारण तुमचं मरण जवळ आलं आहे. तसं मी त्याला सांगितलं, “आम्ही ह्या जंगलाचे राजे, पराक्रमी भासुरक महाराज

यांच्याकडे जातो आहोत. आधीच उशीर झाला आहे.कृपा करून आम्हाला आणखी उशीर करू नका. आम्ही दुपारच्या आधी त्यांच्या गुहेत पोचलो नाही तर महाराज रागवतील.

त्यावर तो सिंह मोठ्यांदा गुरगुरला. नि तो ओरडला, "मी या जंगलाचा राजा आहे हे तुला ठाऊक नाही काय? कोण आलाय हा उपटसुंभ भातुरक? मी कधीच त्याचे नाव ऐकलं नाही. माझी सिंहिण म्हणत होती, तो हा नवा सिंह असणार! जा आणि त्या कोणा भासुरकाला इथं घेऊन ये, तू परत येईतोवर ह्या चार सशांना मी माझ्याकडे ठेवतो. ऐकलंत ना, महाराज, ह्यामुळे मला यायला उशीर झाला. अन् म्हणूनच तुम्हाला पुरेसं जेवण आज मिळणार नाही. कारण चार ससे त्या दुस-या सिंहानं ठेवून घेतलेत. तुम्ही वाटल्यास मला खाऊन टाका. पण त्या सिंहाला भेटण्याची तुमची इच्छा असली तर मी पुन्हाला तिथे नेतो. तुम्ही त्या सिंहाला लढण्याचे आव्हान देऊन मारून टाका. म्हणजे तुम्हाला पुन्हा पाच सशांना खाऊन भूक भागविता येईल.

ठीक ! ने मला त्या सिंहाकडे. भारदानं हुकून सोडला.

मघा ससा ज्या विहिरीचे पाणी प्याला होता तिथं तो भासुराला घेऊन गेला. विहिरीच्या काठावर टुणदिशी उडी मारून बसला ससा नि त्याने पाण्यात डोकावून पाहिलं, त्याला स्वतःच प्रतिबिंब दिसलं पुनः !

तो भासुरकाला म्हणाला, "महाराज, तुम्हाला भिऊन तो सिंह इथे आत लपून बसला आहे. तुम्ही आत वाकून पहा. म्हणजे तो तुम्हाला दिसेल."

भासुरकाने आपले पुढले दोन पंजे विहिरीच्या काठावर ठेवले नि त्यानं आत डोकावलं. आणि त्याला स्वत:चं प्रतिबिंब दिसलं. अन् हा दुसरा सिंह आहे असा त्याचा समज झाला. त्याला आव्हान देण्यासाठी भासुरकानं गर्जना केली. विहिरीच्या भिंतीत त्या गर्जनेचा प्रतिध्वनी उमटला.

भासुरकानं रागानं जबडा पसरीत विहिरीत पाहिलं. आणि पाण्यातल्या प्रतिबिंबानं तसाच जबडा वेंगाडला. अरेच्चा! हा आपल्याला वेडावतोय? अन् चिडून भासुरकानं भयानक गर्जना केली नि ताडकन् त्या दुस-या सिंहावर उडी

मारली. पण तो दुसरा सिंह होताच कुठे? त्याचच प्रतिबिंब होतं ते ! त्यामुळे पाण्यात उडी पडताच गटांगळ्या खाऊन भासुरका मरून गेला.

ससा खुशीत जंगलात पोचला पळत पळत. आणि त्यानं सगळ्या जनावरांना घडलेली हकिगत सांगितली. सगळी खूष झाली. आनंदानं हसत, नाचत सुटली. नंतर काही दिवस त्या जंगलात आनंदाचा उत्सव सुरू होता. मेजवान्या घडत होत्या. पाहिलंत ना ? चिमुरडया सशानं दांडग्या सिंहाला कसं चकविलं.

त्याने युक्तिनं जय मिळविला.

(कुमुदिनी रांगणेकर : मुलांचं पंचतंत्र, १९८२)

# ४.२४. मोती पोवळ्याची गोष्ट

(अहिराणी लोककथा)

एका गावात एक वृद्ध शेतकरी राहत होता. तो आंधळा होता. त्याला दिसत नसे. एके दिवशी चालता-चालता तो विहिरीत पडला. तेव्हा "देवा मला वाचव रे" असे तो ओरडू लागला.

त्याचवेळी शंकर-पार्वती नंदीवर बसून चालले होते. शेतकऱ्याची हाक ऐकून पार्वतीला त्याची दया आली. शंकर-पार्वतीने त्याला विहिरीतून बाहेर काढले.

शेतकरी म्हणाला, "तुम्ही फार चांगले लोक दिसतात, मला विहिरीतून बाहेर काढलं बरं झालं, मी आंधळा आहे, मला घरापर्यंत पोहचवून द्याल तर बरं होईल."

शंकर म्हणाले, "या नंदीची शेपटी धरून तू घरी जा."

शेतकरी नंदीची शेपटी धरून शेतातून चालायला लागला. नंदी जस-जसा पावलं टाकायचा तस-तसे तिथल्या मातीतल्या खड्यांचे मोती- पोवळे बनायचे. नंदीने शेतकऱ्याला घरापर्यंत पोहचवले. तेव्हा शेतकरी म्हणाला, "नंदीबा, मला रोज असं घरापर्यंत सोडशील का?" नंदीने रोज त्याला सोडायचं कबूल केलं.

सकाळी गावातल्या लोकांना, शेतकऱ्यांना आपापल्या शेतात मोती-पोवळे आढळले. काही लोकांनी हे मोती- पोवळे शेतकऱ्याच्याही दारात पाहिले. सगळ्या गावात चर्चा होऊ लागली की हा म्हातारा शेतकरी रोज रात्री चोरी करतो. शेवटी ही चर्चा राजाच्या कानावर गेली.

राजाने म्हाताऱ्या शेतकऱ्याला बोलावले आणि विचारले, "का रे बाबा, तू रोज रात्री मोती-पोवळ्याची चोरी करतोस, हे खरं आहे का?"

शेतकरी म्हणाला, "नाही महाराज, मी खरंच कशाची चोरी करत नाही. पण मला दिसत नसल्यामुळे मी विहिरीत पडलो आणि मला दोन सज्जन लोकांनी

त्यातून बाहेर काढलं आणि त्यांनीच मला सांगितलं की नंदीची शेपटी पकडून तू घरी जा. आणि रोज मला हा नंदी घरी आणून पोहचवतो."

राजा म्हणाला, "ठीक आहे, आज मी पण येतो तुझ्याबरोबर शेतात."

ठरल्याप्रमाणे राजा त्याच्याबरोबर शेतात गेला. संध्याकाळ होताच नंदी शेतात आला, म्हाताऱ्या शेतकऱ्याने त्याची शेपटी धरली आणि नंदी शेतकऱ्याच्या घराकडे चालायला लागला. नंदी जस-जसा चालायचा तशा त्याच्या पावलाखालच्या खड्यांचे मोती-पोवळे होतांना राजाने पाहिले आणि राजा आश्चर्यचकित झाला.

सगळ्या गावकऱ्यांना आणि शेतकऱ्याला त्याने दरबारात बोलावले. आणि सांगितले, "तो नंदी हा शंकर-पार्वतीचा नंदी आहे. शंकर-पार्वतीने या शेतकऱ्याला विहिरीतून बाहेर काढलं. अशा या देव माणसाचा मी नमस्कार करतो."

ओंजळभर मोहरा देऊन राजाने शेतकऱ्याचा सन्मान केला आणि गावकऱ्यांना सांगितले, "कोणालाही चोर म्हणण्यापूर्वी तो खरंच चोर आहे का याची खात्री करून घ्यावी. उगाचच कोणालाही बदनाम करू नये."

त्या दिवसापासून म्हाताऱ्या शेतकऱ्याला सगळेच आदराने 'बाबा' म्हणू लागले.



# ४.२५. माईंचे सैन्य

एके दिवशी 'तांबू' गाय रानात गेली. रानात चरता चरता दिवस कसा संपला ते कळलंच नाही. जरासं अंधारून आलं होतं. हळूहळू ती परतीच्या वाटेवर आली. परंतु बरोबरीच्या 'पांढरी', 'ढवळी', 'राणू' कुणीच दिसत नाही, हे लक्षात येताच तांबू गायीने आपला चालण्याचा वेग वाढवला. जवळजवळ रानातली वाट संपतच आली होती. दूरवर दिवे दिसत होती. इतक्यात वाघोबाराजे दत्त म्हणून समोरी आले! क्षणभर तांबू गायीला काही सुचेनासे झाले. भीती वाटली. पण चेहऱ्यावर भीती दिसू नये म्हणून वाघोबालाच विचारले, 'काय म्हणतोस वाघोबा? आज लवकरच सफरीवर निघालास?' वाघोबा म्हणाला, 'होय, लवकर बाहेर पडलो की शिकार चांगली मिळते!' 'म्हणजे तू मला खाणार?' तांबू गायीने असे म्हणताच वाघोबाने डरकाळी फोडली आणि दोन पावले आणखीनच पुढे आला. तांबू गायीची पाचावर धारण बसली. आता वाघोबाच्या तावडीतून सुटणे अवघड आहे हे तांबूच्या लक्षात आले. क्षणाचाही विलंब न करता तांबूने मान खाली घातली आणि म्हणाली, 'ए वाघोबा दादा, तू मला खा. पण माझी एक विनंती आहे, प्रथम तू मला माझ्या गोठ्यात जाऊ दे. गोठ्यात माझं वासरू वाट पाहतं आहे. ते खूप छोटं आहे. वासराला दूध देते आणि लगेच परत येते. तुझी गुहा कुठे आहे मला सांग. मी खरंच परत येईन. माझ्यावर विश्वास ठेव. माझा गोठा समोर दिवे दिसतात ना, तिथेच आहे. जर मी लवकर परत आली नाही तर तू गावात ये. पण खरंच सांगते, मी परत येईन. 'शब्दाला जागणं हाच खरा धर्म आहे' हे माझ्या आई-आजीने शिकवलं आहे. मला थोड्या वेळासाठी जाऊ दे!

तांबूची विनवणी ऐकून वाघोबा दादाला दया आली. तांबूचा गोठ्याकडे जाण्याचा रस्ता मोकळा केला आणि तिला म्हणाला, 'याच जागी भेटू या,

लवकर परत ये! मलाही खूप भूक लागली आहे.‘ मान वळवून तांबूने होकार दिला आणि वेगाने गावाकडे गेली. गोठ्यात वासरू वाट पाहात होतं. तांबूला पाहताच वासराने हंबरडा फोडला. घरातील रखमा, साजरा बाहेर आल्या. तांबूला बादलीत पाणी दिलं. गोठ्यात दिवा लावला. तांबूला नमस्कार करून दोघी घरात गेल्या. वासरू तांबूला लचावलं. वासराला दूध देता देता तांबू वासराला म्हणाली, ‘बाबारे, हे शेवटचं दूध देते आहे. उद्यापासून तुझं पोट तुलाच भरावं लागेल. रानातला वाघोबा माझी वाट पाहतो आहे. त्यालाही भूक लागली आहे. तुला असं सोडून जाताना मलाही खूप वाईट वाटतं आहे, पण इलाज नाही. हे जग असंच आहे. मोठा मासा छोट्या माश्याला खातो. अन्नसाखळी वगैरे म्हणतात म्हणे. हाच जगव्यवहार आहे. आपण शाकाहारी वर्गातले प्राणी. असं दुसऱ्याला मारून आपलं पोट भरणं आपल्या संस्कृतीत नाही. पण वाघोबाच्या मांसाहारी संस्कृतीविषयी काय बोलणार? तुला अखेरचं दूध द्यावं, यानंतर आईशिवाय जगण्याची सवय करायला हवी, हे सांगण्यासाठी मी आले. वाघोबा राजांना विनंती केली. त्यांनी मला तेवढी सवलत दिली म्हणून तुला अखेरचं भेटायला येऊ शकले. यापुढे तुला स्वतंत्रपणे जगावं लागेल. रस्त्यातले खाचखळगे ओलांडून चालत राहा. पुढ्यात आलेला चारा आपलाच आहे की नाही हे वास घेऊन खात जा! मांसाहारी प्राणी आणि सभोवतालचे मानव सारखेच! वाघोबासारखे प्राणी सरळ सरळ शिकार करतात. मानव प्राणी छुपेपणे घाव घालतात. मंत्रतंत्र करून, पूजा करून कुठलेही भातासारखे अन्न रस्त्यावर ठेवतात. अन्न चांगलेच असते. पण त्यावर टाकलेले गुलाल, कुंकू, काळा बुक्का या पदार्थांमुळे अन्नही दूषित होते. आपण अनवधानाने खातो आणि मग त्रास होतो. म्हणून पुढ्यातले पदार्थ खाताना काळजी घे. या जगात जशा चांगल्या गोष्टी आहेत तशाच वाईटही असू शकतात, हे समजून घे. जगता जगता अनुभवातून तुला बऱ्याच गोष्टी शिकता येतील.‘ तांबू गायीचा उपदेश ऐकता ऐकता वासराने पान्हा सोडला. वासराच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. तांबूचाही आवंढा दाटून आला. मायलेकराच्या ताटातूटीच्या प्रसंगी इतर

कुणीही आसपास नव्हते. अंधार दाटून आला होता. जड अंतःकरणाने तांबू गाय गोठ्यातून बाहेर पडली. पुन्हा मागे वळून पाहिले नाही.

रस्त्याच्या कडेच्या गोठ्यातून 'पांढरी', 'ढवळी', 'राणू' या तांबूच्या मैत्रिणींनी पाहिले की तांबू परत रानवाटेकडे जात आहे. तांबूच्या पाठोपाठ त्याही रानवाटेकडे निघाल्या. वाटेत तांबूला थांबून विचारले, 'काय गं एवढ्या अंधाराची रानाकडे निघालीस?' तांबू म्हणाली, 'वाघोबा वाट पाहतो आहे. मघाशी रानात भेटला. खातो म्हणाला. पण मीच वासराला दूध पाजण्यासाठी वेळ मागून घेतली. आता दिलेला शब्द पाळला पाहिजे ना!' गायी मैत्रिणींनी हंबरडा फोडला. गावातील सगळ्याच गायी रानाकडे चालू लागल्या. तांबू गाय पुढे आणि मागून सगळ्या गावातल्या गायी चालत होत्या. वाघोबा तांबूची वाट पाहत उभा होता. दूरवर त्याला तांबू गाय दिसली. त्याला खूप आनंद झाला. पण हा आनंद क्षणार्धात मावळला. कारण तांबूच्या पाठीमागे इतर गायींचे सैन्य पाहून वाघोबा घाबरला आणि गुहेत पळाला.

तांबूने आणि मैत्रिणींनी हे दृश्य पाहिले आणि एकमेकींना गळाभेट दिली. तांबूने सगळ्यांचे मान डोलवून आभार मानले. म्हणाली, 'असंच एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ!'

तांबूसह सगळा कळप गावाकडे परतला. तांबू वेगाने गोठ्यात आली आणि वासराला पोटाशी घेऊन आनंदाश्रू गाळले. म्हणाली, 'बाळा, एकीच्या बळाने आज साऱ्या जणींनी माझ्या मृत्यूला परत पाठविले. ही कृतज्ञता जपली पाहिजे. एवढंच लक्षात ठेव!' वासराने मान हलवून होकार दिला आणि आईच्या कुशीत शांत झोपला.

एकीचे बळ सर्वश्रेष्ठ फळ!

(पुनःकथन : मंगला वरखेडे)

# ४.२६. बैल आणि खेचर

एक श्रीमंत जमीनदार शेतकरी होता. आपल्या बायका-मुलांसह तो शेतावरच राहात असे. त्याला पशुपक्ष्यांची भाषा अवगत होती. फक्त हे ज्ञान दुसऱ्या कुणाला सांगायचे नाही, असे त्याच्यावर बंधन होते. त्याने ते ज्ञान दुसऱ्या कुणाला सांगितले तर त्याच्या वाट्याला मृत्यू येणार होता. त्यामुळे हे रहस्य त्याने कुणालाच कळू दिले नव्हते. पण या भाषिक देणगीमुळे त्याला पशु-पक्ष्यांच्या भावभावना चटकन समजायच्या. गोठ्यातले वासरू भुकेने व्याकूळ झाल्यामुळे त्याच्या आईचा धावा करते आहे; घोड्याला कंटाळा आला आहे, त्याला चक्कर मारून आणली पाहिजे हे त्याला चटकन कळायचे. मांजरांची भांडणं, कोंबड्यांचा कलकलाट, पक्ष्यांचे गुंजन यातला भावार्थ त्याला समजायचा.

या शेतकऱ्याच्या गोठ्यात एक बैल आणि एक गाढव आणि घोड्याच्या प्रजातीतले खेचर बांधलेले असायचे. बैल रोज शेतात काम करायचा. खेचराला तसे काही काम नसायचे, कधीतरी मालक फेरफटका मारण्यासाठी त्याच्या पाठीवर बसायचा, एवढेच त्याला काम.त्याची निगाही चांगली ठेवली जाई. एके दिवशी शेतकरी अंगणात बसलेला असताना त्याच्या कानावर बैल आणि खेचर यांच्यातला संवाद कानावर पडला.

बैल गाढवाला म्हणाले, “नमस्कार खेचर राजे! तुमचे आपले बरे असते, काही काम ना धाम, आपले मस्तीत पडून रहायचे. सकाळी सकाळी खिंकाळून सगळ्यांना उठवण्याचे काम मात्र तुम्ही इमाने-इतबारे करता. मालकाची तुमच्यावर मेहेरबानी असल्यामुळे गडी माणसे तुमची निगाही चांगली ठेवता. तुमची ऐट काय वर्णावी? तुमच्या आसपासची जमीन कायम झाडून स्वच्छ केलेली असते. नाहीतर आमचे पहा, सतत शेणा-मुतात पडलेलो असतो.

तुम्हाला खायला सडवलेल्या धान्याचे आंबोण, आम्हाला आपला सुका कडबा. तुम्ही आपले चैनीत राहाता, आम्ही मात्र दिवसभर नांगराला जुंपलेले असतो. दिवसभर नांगरून कोळपून मी तर बाबा अगदी थकून जातो. पण सांगा कुणाला? जरा कामात ढिलाई केली तर वरून काठीचे रट्टे बसतात आणि शिव्यांची लाखोली वाहिली जाते. एवढे थकून भागून रात्री गोठ्यात आल्यावर काय, तर म्हणे गव्हाणीतला सुका कडबा! दुखऱ्या शरीराला रात्र रात्र झोप येत नाही. तुम्ही मात्र डाराडूर झोपता. जाऊ दे बाबा, नशीब ज्याचे त्याचे."

खेचराने बैलाची व्यथा शांतपणे ऐकून घेतली. मग सज्जन मित्राचा आव आणून ते बैलाला म्हणाले, " बैलोबा, तू खरोखरच गरीब आहेस बाबा. तू अगदी भोळा भाबडा आहेस, शहाणपणा तुला ठाऊकच नाही. अगदी मट्ठासारखा वागतोस. उगाच नाही तुला सगळे जण *"बैलोबा"* म्हणत. मालकासाठी तू इतका राब राब राबतोस, पण त्यांना आहे का काही तुझ्या कष्टाची किंमत. उलट तुला ते काठीने बडवतात. शिव्या देतात. खायला कोरडा कडबा देतात. गोठ्यातली तुझी जागा स्वच्छ ठेवीत नाही. पण तू अगदीच कोडग्यासारखे सारे काही मुकाट्याने सहन करीत असतो. आपण नाही बाबा, हे एवढे कष्ट आणि हलाखीचे जगणे सहन केले असते."

बैल निराश होऊन फक्त मान हलवीत राहिला. मग खेचराला बैलाची दया आली. त्याने बैलाला दोन शाहाणपणाच्या गोष्टी शिकवायचे ठरविले.खेचर बैलाला म्हणाले, " तुला जर माझ्याहूनही सुखी जीवन जगायचे असेल, तर माझ्या सल्ल्याप्रमाणे वाग." बैल मनातून हुरळून गेला, म्हणाला, "सांगा खेचर राजे सांगा. आता तुम्हीच मला गुरूच्या स्थानी. आपण द्याल तो उपदेश लक्षात ठेवून मी वागेन."

यावर खेचराने बैलाला दोन युक्तीच्या गोष्टी सांगितल्या. खेचर म्हणाले, " "बैलोबा, उद्या तुम्ही उठल्यापासून आजारपणाचे सोंग करा. म्हणजे शेतावर तुझ्या मानेवर जू ठेवले की तू लागलीच खाली बैस. ते तुला मारतील, झोडतील, पण तू जागचा उठू नकोस. उठला तरी चालू नकोस, चाललास तरी थोड्याच

वेळात पुन्हा बसकण मार. असे चारदोन वेळा झाल्यावर काय होते ते तुला समजेलच. तुला संध्याकाळी गोठ्यात बांधल्यावर तुझ्यापुढे अगदी सरकीची ढेप ठेवली तरी तोंड लावू नकोस. गव्हाणीतल्या कडब्याला शिवू नकोस. उगाच भूक भागवण्यापुरत्या रात्री चारदोन काड्या खा. दुसऱ्या दिवशी शेतावर गेल्यावर असेच पहिल्यासारखे नाटक सुरू ठेव. बघ, ते तुला विश्रांती देतात, की नाही ते मला सांग."

खेचराचा सल्ला बैलाला पटला. दुसऱ्या दिवशी बैलाने मानेवर जू ठेवल्यावर बसकण मारली. काठ्यांचे रट्टे बसू लागले. तरी उठत बसत त्याने आपला खेचराचा सल्ला अमलात आणला. गड्याने त्याला काठीने बडवले, मारले-झोडपले, पण त्याने आपला निर्धार कायम ठेवला. त्याने कामात चालढकल करीत दिवस पार पाडला. गड्याने संध्याकाळी बैलाला गोठ्यात बांधले. मालकाला बैल आजारी असल्याचे सांगितले. मालकीणीने बैलाच्या पुढे ठेवण्यासाठी सरकीची ढेप आणि आंबोण तयार करून दिले. पण बैलाने त्याला तोंडसुद्धा लावले नाही. रात्रभर तो पोट फुगवून आजारपणाचे सोंग घेऊन पडून राहिला. दुसऱ्या दिवशी सकाळी तो नेहमीप्रमाणे झडझडून उठला नाही. हंबरला नाही. शेपूट उडवली नाही. सकाळी पुन्हा त्याला सरकी देऊन पाहिली, पण बैलाने तोंडही लावले नाही. आता गड्याची खात्री पटली, की बैल आजारी आहे. त्याने काळजीने मालकाला सांगितले, "धनी, बैल आजारी आहे. गुरांच्या दवाखान्यात नेऊन उपचार केले पाहिजेत. आपला कामाचा खोळंबा होईल, पण त्याला चार-दोन दिवस विश्रांती दिली पाहिजे."

गड्याचे बोलून झाल्यावर मालक गड्याला म्हणाला, " ठीक आहे, त्या बैलाला आज गोठ्यातच विश्रांती घेऊ दे. तू आज बैलाच्या जागेवर खेचराला घेऊन जा. त्या बदमाशाच्या मानगुटीवर जू ठेवून नांगराला जुंपा. बैलाचे सगळे काम खेचराकडून करून घ्या. हयगय करू नका."

गड्याला खेचरावरचा राग कळला नाही. धन्याची आज्ञा प्रमाण मानून तो मुकाट्याने खेचराला घेऊन शेतात गेला. दिवसभर बैलाचे काम खेचराकडून

करून घेतले. ते त्याला जमेना तेव्हा त्याने खेचराला भरपूर मारले-झोडपले. शेवटी मार खाऊन त्याच्या बरगड्या दुखू लागल्या, मानेची लक्तरे लोंबू लागली. संध्याकाळी घरी परत येताना त्याला धड चालता सुद्धा येईना.

इकडे बैल मात्र मजेत होता. आंबोण खाऊन सुस्तावला होता. कितीतरी दिवसांनी त्याला एवढी विश्रांती मिळाली होती. हे सगळे खेचराच्या सल्ल्यामुळेच शक्य झाले होते. तो मनातून सारखा गुरू खेचराचे आभार मानून त्याला दुवा देत होता. संध्याकाळी खेचर आल्यावर बैल आदराने उठून उभा राहिला. त्याने खेचर राजांचे आभार मानले.

गाढव चांगलेच ओशाळले होते. आपला फुकटचा सल्ला आपल्याच अंगाशी आला, म्हणून त्याला पश्चाताप होत होता. राग, पश्चाताप आणि मार खाऊन आलेला थकवा यामुळे गाढवाला काही बोलताच येईना. त्याने आपले मौनच पाळले. पण त्याच्या मनात दुसरेच काही शिजत होते. उद्याही बैलाच्या जागी आपल्यालाच जावे लागले तर आपले काही खरे नाही. यातून सुटका कशी करून घेता येईल या विचारात ते दंग होते.

यानंतर रात्र झाली,चांदणे पडले. शेतकरी आपल्या बायका-मुलांसह पौर्णिमेच्या चांदण्याचा आनंद लुटण्यासाठी गच्चीवर आले. सगळीकडे निरव शांतता होती. तेवढ्यात मालकाला खालून बैल-खेचर यांच्यात चाललेली गुजगोष्ट ऐकायला आली. खेचर बैलाला विचारत होते, “काय बैलोबा, उद्या काय बेत आहे तुमचा?” बैल म्हणाला “काही वेगळा बेत नाही महाराज. तुमच्या शिकवणुकीचं तंतोतंत पालन करायचं ठरवलं आहे, मी. पोट फुगवून आजार-पणाचा बहाणा मी कायम ठेवणार आहे. राजे, तुमच्या सल्ल्यानेच माझ्या वाट्याला हे दुर्मिळ सुख आले, मी आता तुमच्या शब्दाबाहेर नाही.”

यावर खेचराने बैलाला स्वप्नातून खडबडून जागे करणारे बोल सुनावले. खेचर म्हणाले, “ जरा जपून रहा. शहाणपणाने वाग. मी आजच मालकाचे आणि गड्याचे संभाषण ऐकले. मालक गड्याला सांगत होता, उद्या जर हा बैल असाच बसत रहिला तर त्याला संध्याकाळी गोठ्यात आणूच नको. त्याला थेट

खाटकाकडे नेऊन घाल. त्याला मारून त्याचे मांस गोरगरिबांना वाटून टाक. चामडे कमावून तेवढे मात्र बरोबर आण."

हे ऐकून बैलाला घामच फुटला. त्याने खेचराला भाबडेपणाने विचारले, "आता मी काय करावे?" यावर खेचर म्हणाले," घाबरू नकोस. मी सांगतो तसे वाग. उद्या सकाळी तुझ्यासाठी आंबोण आले, तर तू नेहमीसारखे हंबरून त्याचा फडशा पाड. शेतात जाऊन नेहमीसारखे काम कर. नाहीतर मालक तुला कापून काढील."

दुसऱ्या दिवशी सकाळी बैलाला गोठ्यातून बाहेर नेण्याच्या वेळेस मालक आपल्या बायकोसह तिथे आला. बैलाने शेपूट वर केली, मालकाला खूश करण्यासाठी हंबरला, डरकाळला. त्याचे आजारपणाचे नाटक संपले होते. पण बैलाचे हे उंडारणे पाहून मालक जोरजोराने हसू लागला. आपले पती असे उगाच का पोट धरून हसू लागले, हे त्या बाईला कळेना. तिने मा्लकाला विचारले, "अहो, असे अचानक काय झाले हसायला? तुम्ही ठीक आहात ना?" यावर मालक पुन्हा हसू लागले. म्हणाले, "माझ्या हसण्याचे रहस्य तुला सांगता येणार नाही; पण गोठ्यातल्या खेचराला मात्र ते चांगलेच समजले आहे." मालकाच्या या उत्तरावर त्याची बायको आणि गडी आवाक होऊन पहात राहिले. पशू-पक्ष्यांच्या भाषेची गंमत त्यांना थोडीच समजणार होती?

(पुनःकथन : डॉ. मंगला वरखेडे)

# ४.२७. गायक गाढव

एक होता धोबी. गावाचे कपडे धुवायचा. मजेत रहायचा. धोब्याकडे एक गाढव होतं. गाढव मात्र मरतुकडं आणि म्हातारं होतं. सकाळ झाली की मालक मळलेल्या कपड्यांचा गठ्ठा गाढवाच्या पाठीवर टाकायचा. नदीवर जायचा. सकाळी धुतलेले कपडे घेऊन घरी यायचा.रात्र होण्यापूर्वी मालक गाढवाची सुट्टी करायचा.

एके दिवशी संध्याकाळी गाढव फिरायला निघालं. काम संपलं होतं. पाठीवर कपड्यांचं ओझं नव्हतं, आणि मालकाची किटकिटही नव्हती. अशा गाढवाला भेटला एक कोल्हा. दोघेही एकटे होते. कामातून मोकळे होते. त्यामुळे दोघांची चटकन बनली दोस्ती. मग दोघेही मित्र भोजनाच्या शोधात एकत्र फिरू लागले.

गावाला लागून एक शेत होतं. शेताला काट्याचं कुंपण होतं. माणसं जाण्याएवढी पाऊलवाट होती. गाढव हळूच शेतात शिरलं. समोर हिरवंगार शेत. शेतात लुसलुशीत काकड्या बघून म्हाताऱ्या गाढवाच्या तोंडाला पाणी सुटलं. तोंडात दात नसले तरी कोवळ्या काकड्यांची मेजवानी बघून गाढव खूष झालं. आपल्या मित्राला त्याने आत बोलावलं. दोघांनी पोटभर काकड्या खाल्ल्या.

मग दोघंही हळुवार आलेल्या रस्त्यानं कुंपणाबाहेर आले. दुसऱ्या दिवशी पुन्हा दोघांनी काकड्यांवर ताव मारला. मग दररोजच त्यांचा हा कार्यक्रम ठरून गेला. मनसोक्त काकड्या खाल्ल्याने मरतुकडा म्हातारा गाढव हळूहळू मस्त झाला.

एक दिवस चांदणी रात्र होती. आकाशात पूर्वेकडे चंद्र उगवला होता. सर्वत्र टिपूर चांदणं पडलं होतं. काकड्या खाऊन गाढवाचं पोट भरलं होतं. थोडी सुस्तीही आली वातावरण असत. गाढव म्हणाला.

“माझ्या मित्रा, आजूबाजूला बघ. आकाशात चंद्र कसा चांदणे उधळीत आहे.

झाडांची पानं हळुवारपणे ह्या मंद प्रकाशाचं जणू स्वागतच करीत आहेत. अंगाला बोचणारी थंड हवा जणू गुदगुल्या करीत आहे. कशी मोहक रात्र आहे. माझ्या मनात गाण्याच्या लहरी उठू लागल्या आहेत."

कोल्हा म्हणाला,

"अरे काका, जरा सबुरीनं घ्या. कुठं तुम्ही खरंच गाऊ लागला तर शेताचा राखण करणारा मालक आवाज ऐकून धावून येईल. तुमच्या गाण्यामुळे तुम्ही संकटाला निमंत्रण देण्यासारखं आहे. आपण पडलो चोर. चोरानं आपली मर्यादा सोडू नये. चोर जर राजरोस सूचना देऊन घरात घुसू लागला तर कंबर मोडायला वेळ लागणार नाही."

गाढवाला राग आला हे ऐकून -

"काय शहाणपण ऐकिवतोस मला? इतकं सुंदर वातावरण असताना गायचं नाही म्हणणं म्हणजे धनवानानं कंजुषी केल्यासारखं होईल. आनंद झाला की तो व्यक्त केला पाहिजे. नसता त्या आनंदाला काही अर्थ राहत नाही. मला तर आता राहवत नाही. मी तर आता एक झकास गाणं म्हणणार."

गाढवाचा निर्धार ऐकून कोल्हा घाबरला. त्यानं गाढवाला पुन्हा समजावण्याचा प्रयत्न केला.

"काका, माझं ऐका. तुम्ही यावेळी तुमचं तोंड बंद ठेवणं आपल्या दोघांच्या हिताचं आहे. खरं सांगायचं झालं तर तुमचा आवाजही बेसूरच आहे."

"तू माझ्यावर जळतोस. मुर्खा, तुला सूर आणि तालाचं बुडूख आणि शेंडा तरी माहीत आहे काय? संगीत हा जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. तू पडला अरसिक." गाढवानं कोल्ह्याला ऐकिवलं.

"ठीक आहे काका, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. संगीतात मला काही कळत नाही. त्यामुळे तुमचं गाणं ऐकूनही उपयोग नाही. तुमच्या गाण्याच्या वेळी माझ्यासारखा अरसिक उपस्थित रहाण्यापेक्षा मीच स्वत:हून बाहेर जातो. मग तुम्ही मनसोक्त गा."

गाढव चिडून म्हणालं, "तू मूर्ख आहेस. फक्त मूर्खच नाही, तर महामूर्ख

आहेस. तुला वाटतं, माझं गाणं मधुर होऊ शकणार नाही. माझं तुला आव्हान आहे. तू आता ऐकच माझं गाणं." म्हणून गाढवानं आवाज काढण्यासाठी आकाशाकडं तोंड केलं.

"थोडं थांबा काका, मला बाहेर जाऊ द्या. मी बाहेर गेलो की, तुम्ही मनसोक्त गा. गाऊन झालं की या. मी बाहेर तुमची वाट पहातो." कोल्हा म्हणाला.

कोल्हा बाहेर जाताच गाढवानं उंच स्वरात राग आळवण्यास सुरुवात केली. रात्रीच्या शांततेत गाढवाचं ओरडणं दूरपर्यंत गेलं. गाढवाचा आवाज ऐकताच शेताचा राखणदार मोठी काठी घेऊन धावत आला. गाढव देहभान विसरून गात होतं. काठ्यांचा वर्षाव त्याच्या अंगावर पडू लागला. मार खाऊन खाऊन गाढव जमिनीवर पडलं.

थोड्या वेळानं गाढव शुद्धीवर आलं. बघतो तर गळ्यात एका मोठ्या दोराला मोठा दगड बांधून ठेवला होता. ते दगडाचं लोढणं ओढत, रखडत गाढव कुंपणाबाहेर आलं. गाढवाचं सर्वांग मार खाल्ल्यानं दुखत होतं. गळ्यातील ओझ्यानं त्याला चालणंही अवघड झालं होतं.

गाढवाला बघून कोल्हा उभा राहिला.

"वा, काका, तुमच्या गाण्यावर खुष होऊन राखणदारानं सुंदर बक्षीस दिलं आहे. अभिनंदन! तुमचं अभिनंदन!"

"मित्रा, माझ्या दु:खावर आणखी मीठ चोळू नकोस. तुझा सल्ला न ऐकल्याबद्दल मला आता वाईट वाटत आहे." गाढव म्हणालं.

# ४.२८. उडणाऱ्या हत्तींची गोष्ट

कुणी एकेकाळी हत्तीला चार पंख होते. जसा सकाळी कोंबडा बांग देतो तसेच हत्ती पण देत होते. असंही म्हणतात की हत्तीवर बसून देव विश्वफेरीला निघत असत. परंतु जेव्हा पृथ्वीची निर्मिती झाली आणि लोकांची वस्ती वाढली तेव्हा नवनवीन अडचणी निर्माण होऊ लागल्या. आकाशात उडता उडता थकवा आला की हत्ती घरांच्या छतावर येऊन बसत; त्यामुळे त्यांच्या वजनामुळे घरे पडायला लागली. काही माणसं मेली. माणसे हत्तींचा खूप तिरस्कार करू लागले. ही वार्ता देवांपर्यंत पोहोचली, देव विचारात पडले आणि काहीतरी मार्ग काढायलाच पाहिजे या निर्णयाप्रत आले.

एके दिवशी देवांनी सर्व हत्तींना बोलावले. भरपूर खायला प्यायला दिले, हत्ती भरपेट जेवले आणि शांतपणे झोपी गेले. हत्तींना गाढ झोपलेले पाहून देवांनी त्यांचे पंख काढून टाकले. चार पंखांपैकी दोन पंख मोरांना दिले आणि दोन केळाच्या झाडाला दिले.

हत्तींना जेव्हा जाग आली तेव्हा त्यांना कळलं की आपले पंख कापले गेले आहेत. त्यांना खूप वाईट वाटलं. कुणाच्या समोर जायची लाज वाटू लागली. म्हणून ते जंगलात पळून गेले. तेव्हापासून हत्ती माणसांना घाबरू लागले.

(पुनःकथन : डॉ. मंगला वरखेडे)

# ४.२९. हत्ती आणि पाऊस

(बुशमन लोकांमधील एक पुरातन कथा)

एके काळी निसर्गात दोन बलवंत शक्ती होत्या. हत्ती आणि पावसाचा देव. अभिमानी आणि बढाईखोर हत्ती पावसाशी नेहमी वाद घालायचा. दोघात हत्ती मोठा आहे असं पावसानं मान्य करावं हा हत्तीचा हेतू असायचा. एकदा अशाच वादात आपल्या ओल्या आणि खळखळाट करणाऱ्या आवाजात पावसानं हत्तीला विचारलं 'अहो गजराज, जिथं मी तुम्हाला चारा देतो तिथं माझ्यापेक्षा तुम्ही कसे मोठे असाल ? '

अभिमानी हत्ती हे कसे मान्य करणार ? काहीही विचार न करता तो म्हणाला, 'तू नाही मला चारा देत. माझा मी शोधतो आणि खातो. स्वतःच्या हिंमतीवर मी जगतो.'

आता वृथा वाद घालायचा नाही, आपलं सामर्थ्य मात्र दाखवायचं असं पावसानं ठरवलं. त्यानं आभाळ काळंभोर केलं, गडगडाट केला आणि बोलला, 'समजा मी नाहीसाच झालो तर तू जगशील ?' आणि पाऊस नाहीसा झाला.

पाऊस दिसेनासा झाल्यावर हत्ती आपल्याशीच मोठ्यांदा हसला, 'आता सगळं राज्य माझंच ! पाऊस पळून गेला म्हणजे आपण हार खाल्ली हेच त्यानं जाहीर केलं.' मग जंगलावर आणि रानावर सहाएक महिने हत्तीचंच राज्य होतं. सगळं सुरळीत चालू राहिलं. पावसाची आणि हत्तीची सततची खडाजंगी नसल्यामुळे सगळीकडे शांतता राहिली.

मग पाऊसकाळ आला. आता पुष्कळशा प्राण्यांच्या पोटात गर्भ होते. हिरव्या लुसलुशीत गवतानं आणि स्वच्छ पाण्यानं पाठच फिरवली होती. निळं आभाळ उष्ण राहिलं. कुठे कोपऱ्यातसुद्धा काळा ढग उमटला नाही. पोटातली बाळं भुकेलीच राहिल्यामुळे सगळे प्राणी काळजीत पडले. जेरीला येऊन सगळे

हत्तीला शोधत गेले. तोच त्यांचा रक्षण करणारा होता. हत्ती थोडा अस्वस्थ झाला पण प्रजेच्या मागणीची कदर करून म्हणाला, 'गिधाड हे पाऊस आणण्यात वस्ताद आहे, मी त्याला बोलावणं करतो.'

हत्तीनं गिधाडाला निरोप पाठवून बोलावलं, पण गिधाड हे पावसाचं नोकर होतं. हे दोघं आपसात मोठे भांडलेत हे त्याला माहीत होतं. निरोप आणण्याराला ते म्हणालं. "मला जमणार नाही. माफ करा. पाऊस आणणं झालं नाही माझ्याकडून तर गजराज काय करतील ह्याची मला भयंकर भीती आहे."

मग हत्तीनं सगळया पक्षात शहाणा म्हणवून घेणाऱ्या कावळ्याला बोलावलं, 'पाऊस आणण्यासाठी तू सोडत चिठ्ठी उचल", असं त्याला फर्मावलं. कावळ्यानं थोडा पाऊस आणला. काही भागातले झरे पाण्यानं वाहू लागले. पण काही काळानं तेही कोरडे पडले. बराच खोल असा एक झरा होता तो आटला नाही. हत्तीनं हा शेवटचा झरा आपल्या स्वतःसाठी राखून ठेवला. कासवाला सांगितलं 'मी चरायला दूर गेल्यावर तू हे पाणी राखायचं.' (चरण्यासाठी गवत मिळणं फार कठीण झालं होतं.)

'जशी आपली आज्ञा महाराज,' असं म्हणून कासव राखणीवर रुजू झालं.

एका जिराफाच्या कळपाला पुष्कळ तपास करूनही कुठं पाणी प्यायला मिळालं नाही तेव्हा तो कळप ह्या झऱ्यावर पाणी प्यायला आला. कासवानं त्याला अडवलं. पाणी प्यायला मना केली. 'हे तळं गजराजांनी स्वतःसाठी राखून ठेवलं आहे,' असं सांगितलं.

झेब्रे, सरळ शिंगे, फऱ्यावर व तोंडावर काळे पट्टे असणारी काळविटे, केसाळ लांबडं तोंड, वाकडी शिंगे आणि लांब शेपटीवाली काळविटे, स्प्रिंगबॉक जातीची लहान काळविटे, खेरीज आणखी इतर प्राणी ह्या सगळ्यांना कासवानं पाणी पिऊ दिलं नाही. हे सगळे प्राण्यांचे कळप आपसात कुजबुजत माघारी परतले. पाणी नाही तर आपण जगणार कसे ह्या काळजीनं सगळ्यांना घेरलं.

संध्याकाळी झऱ्यावर पाणी प्यायला सिंह आला. कासवानं सांगितलं, 'इथं इतरांनी पाणी प्यायचं नाही. हा झरा गजराजांचा आहे.' सिंहानं न ऐकल्यासारखं

केलं. कासवाला बाजूला ढकलून तो शांतपणे भरपूर पाणी प्याला. बापडं कासव काय करणार ?

सिंहाचं बघून इतर तहानलेल्या प्राण्यांनीही झऱ्याभोवती गर्दी केली आणि पोटभर पाणी पिऊन घेतलं. हत्ती चरून परत आला. बघतोय तर झऱ्याचं सगळं पाणी संपून फक्त राड राहिलेली. रागारागानं हत्तीनं सोंडेची तुतारी वाजवली आणि तो बिचाऱ्या कासवावर धावून गेला. त्यानं कासवाला जाब विचारला.

'मी दीन दुर्बल माझं कोण ऐकणार ? तहानेनं कासावीस झालेल्या प्राण्यांना मी कसा थांबवणार ?' असं समजावून सांगण्याचा प्रयत्न कासवाने केला. पण हत्ती इतका संतापलेला होता की त्यानं कासवाला सोंडेनं उचलून ते अख्खं गिळून टाकलं.

कासवाला मरायचं नव्हतंच. का म्हणून त्यानं उगाच आपली शिक्षा सोसायची ? हत्तीच्या पोटात गेल्या गेल्या त्यानं बाहेर पडण्यासाठी पोटाचा मऊ भाग फाडायला सुरुवात केली. हत्ती वेदनेनं किंचाळायला लागला. आपला अभिमान, आपला उद्धटपणा ह्याची ही फळं आहेत. त्यामुळे वैऱ्याला येऊ नये असलं यातनामय मरण आपल्या वाट्याला आलं हे त्याला कळून चुकलं.

कासव वाट काढून बाहेर आलं आणि इकडं हत्ती मरून पडला. लगोलग कासव तिथनं सटकलं. तेव्हापासून त्याला कुणी प्रश्न विचारला तरी ते कधी तोंड उघडत नाही. कोणाला ते धनी मानत नाही. मनाला येईल तसं वागतं.

सगळ्या प्राण्यांना जन्माचा धडा मिळालेला बघून पावसाच्या देवाला तहानलेल्या धरतीची करूणा आली. पाऊस धुवांधार कोसळला. सगळ्या नद्या, सगळे ओढे पुन्हा धुवांधार वाहू लागले.

(व्यंकटेश माडगूळकर [मूळ लेखक : निक ग्रिव्हज्]
: झाडावर चढणारा कोल्हा आणि आफ्रिकेतील इतर प्राणीकथा)

# ४.३०. हत्ती शिष्टाचार शिकतो

( शोना जमातीमधील कथा )

एके दिवशी नदीकडे जाणाऱ्या वाटेवर हत्तीला खार आडवी आली. सम्राटासारख्या तोऱ्यात चालणाऱ्या मातब्बर हत्तीनं तिला सोंडेनं वाटेतून बाजूला सारून म्हटलं, "बाजूला हो ग भिक्कार. चिमुरडे."

खारीला हा मोठा अपमान वाटला. तीही कोणी होतीच की. ह्या हत्तीला नीट वागायचं शिकवायला पाहिजे असं तिला वाटलं.

"ए" खार ओरडली, "असशील तू ढीग मोठा. मातब्बर उंचाडा समजतो स्वतःला. पण मी सांगते, चुकीचे आहे हे तुझं वागणं !" हत्तीनं वळून तिच्याकडे आश्चर्यानं पाहिलं व म्हटलं. "अंहं. चूकबीक काही नाही. मी मोठ्ठा आहे हे नकट्या पोरालासुद्धा माहीत आहे."

टिर्र... टिर्र... आवाज काढत आणि वरचेवर शेपूट उडवत खार रागानं म्हणाली, "मी असेन चिमुरडी. पण तुझ्यापेक्षा जास्त खाऊन दाखवते तुला. पैज तुझी माझी. होऊन जाऊ दे शर्यत आपली. कोण जास्ती ताडगोळे खातंय ह्याची. मीच जास्ती खाईन आणि जास्त वेळसुद्धा खाईन. कळलं का हो थोर हत्ती महाराज?"

हत्ती मोठ्यांदा हसला. त्याला फार गंमत वाटली. आणि गंमत म्हणूनच त्यानं त्या चिमुरड्या खारीनं दिलेलं आव्हान स्वीकारलं. शिवाय त्याला ताडगोळे फार आवडायचे. मग ह्या दोघांनी ताडगोळ्याचे मोठे ढीग जमवले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी शर्यतीला लागायचं असं ठरवलं. हत्तीनं अगदी मनावर घेतलं होतं. त्याला दम निघत नव्हता. संध्याकाळचं बाभळीच्या शेंगाचं चवदार जेवणसुद्धा त्यानं टाकलं. म्हणाला, उद्या शर्यतीच्या वेळेला सटकून भूक लागायला पाहिजे. खारीला एकदा तिची जागा दाखवून दिलीच पाहिजे.

दुसरा दिवस उजाडला. स्वच्छ आकाश, सुरेख कोवळे उन्ह, छान दिवस

होता. दोघांनी ताडगोळे खाणं सुरू केलं. भुकेल्या पोटी हत्ती चवीनं खाऊ लागला. खारीनं भराभर कुरतडायला सुरुवात केली आणि लवकरच तिचं पोट टम्म झालं. तशी ती गुपचूप निघून गेली. जवळच दडून वाट बघत असलेल्या चुलत भावंडाला तिनं खायला पाठवून दिलं. हत्ती खाण्याच्या कामात इतका दंग होता की, खार गेली आणि तिचे चुलत भावंड तिच्या जागी आले,याचा कशाचा पत्ता त्याला लागला नाही.

मग खारीचे भाऊ, बहिणी, चुलत भावंडं, काका, आत्या अशी भुकेली मंडळी एका पाठोपाठ एक येऊन ताडगोळ्यांचा ढीग कमी कमी करत गेली. दुपारच्या वेळी हत्तीनं खाण्यातनं डोकं वर करून पाहिलं तर खार नुसती खाण्यात दंग नव्हती तर तिच्या पुढ्यातल्या ताडगोळ्याचा ढीग हत्तीच्या ढिगाऱ्यासारखाच झपाट्यानं कमी झालेला होता.

मग हत्तीने विचारलं, 'काय खारुताई भरलं का पोट ? '

भरल्या तोंडानं खार म्हणाली, 'नाही अजून. तुमचं हो गजराज ? '

'छे आमचं कधीच भरणार नाही,' असं उत्तर देऊन हत्ती भराभर खाऊ लागला. संध्याकाळी सूर्य मावळायच्या सुमारास हत्तीचं पोट एवढं भरलं की त्याला धड उभं रहाता येईना. त्यानं समोर बघितलं तर खारुताई अजूनही ताडगोळे खातच होती.(शेजारच्या झाडावर मोठी झोप काढून ती परत ताडगोळ्यांवर आली होती)

हत्ती आवाज करून कण्हला, "खारुताई, धन्य आहे तुझी. आता मी हरलो. ह्यापुढं खाणं नाही होणार. तू जिंकली आहेस देवी !" आणि सलाम करायला हत्तीनं सोंड वर केली.

खारीनं आनंदानं उड्या घेऊन हत्तीचे आभार मानले. ती म्हणाली, " इथून पुढं दंभाचार करणं सोडून दे." त्या दिवसापासून आजतागायत हत्तीनं खारीविषयी सतत आदरच दाखवला आहे.

(व्यंकटेश माडगूळकर [मूळ लेखक : निक ग्रीव्हज्]
: झाडावर चढणारा कोल्हा आणि आफ्रिकेतील इतर प्राणीकथा)

# ४.३१. हत्ती आणि ससा

(मॉरिशसची लोककथा)

खूप खूप वर्षे झाली. एका रानात एक हत्ती रहात होता. त्याचा एक मित्र होता. तो होता ससा. एके दिवशी हत्ती सशाला म्हणाला,

'आपण एक जमिनीचा तुकडा विकत घेऊया आणि त्या जमिनीत आपण एक सुंदर बाग तयार करुया.'

सशाने हत्तीचे म्हणणे मान्य केले. परंतु तो म्हणाला,

'प्रथम आपण एक करार करूया. तुझ्या किंवा माझ्या हातातील कुदळीचा दांडा जर त्या कुदळीतून निसटला तर तुझ्या डोक्याने माझा दांडा आणि माझ्या डोक्याने तुझा दांडा परत कुदळीत बसवला पाहिजे.'

हत्तीने हा करार मान्य केला. त्या दोघांनी जमिनीचा एक तुकडा विकत घेतला आणि बाग तयार करण्याच्या उद्योगाला ते लागले.

ससा मोठा दुष्ट होता. त्याने मुद्दामच आपल्या कुदळीचा दांडा सैल केला आणि त्यामुळे तो एकसारखा त्या कुदळीतून बाहेर येऊ लागला. मग ससा हत्तीला म्हणाला,

'मित्रा माझ्या कुदळीचा दांडा बाहेर आलाय. तुझे डोके मला दे. तुझ्या डोक्यावर आपटून मी तो दांडा नीट करुन घेतो.हत्तीने आपले डोके पुढे केले. सशाने हत्तीच्या डोक्यावर आपटून तो दांडा कुदळीत घट्ट बसवला. बागेचे काम चालू राहिले.

परंतु एकदा दुसऱ्या वेळी, हत्तीच्या कुदळीचा दांडा बाहेर आला. तेव्हा तो सशाला म्हणाला,'मित्रा, माझ्या कुदळीचा दांडा बाहेर आलाय. मला तुझे डोके दे. मी मग तुझ्या डोक्यावर दांडा नीट बसवून घेईन.'

ससा घाबरला. तो थरथर कापू लागला. तो हत्तीसमोर गयावया करू लागला. 'अरे मित्रा, माझ्यावर दया कर. माझं डोकं किती किती लहान आहे.

तुझ्या पहिल्याच तडाख्याला ते फुटून जाईल.'

सशाचे ते बोलणे ऐकून हत्तीला राग आला. तो म्हणाला,

' मला काही एक ठाऊक नाही. करार म्हणजे करार. आणि आपण तो केलेला आहे. तुझ्या कुदळीचा दांडा बाहेर आला तेव्हा मी माझे डोके दिले. आता माझ्या कुदळीचा दांडा बाहेर आला आहे आणि तू तुझे डोके दिलेच पाहिजेस. तुझ्या डोक्यावरच मी तो दांडा नीट बसवून घेणार आहे.'

परंतु ससा काही केल्या आपले डोके देईना. हत्तीने त्याला मारण्याचा प्रयत्न केला. दोघांचे मोठे भांडण जुंपले. करार मोडण्यात आला. दोघांनीही त्या जमिनीच्या तुकड्यावर काम करायचे थांबविले.

दिवसामागून दिवस गेले. हत्तीने एके दिवशी आपल्या घरी मोठी मेजवानी दिली. त्याने अरण्यातील सर्व प्राण्यांना आमंत्रण दिले. परंतु सशाला मात्र दिले नाही. एक कासव त्या रात्री सतारीया म्हणून आले. सगळेजण नृत्य करणार होते आणि ते कासव सतार वाजवणार होते. त्याला खास आमंत्रण होते. मात्र त्याची सतार म्हणजे लांबट वाटोळा दुधी भोपळा होता. तो सुकलेला होता. त्याला तारा जोडलेल्या होत्या. या मेजवानीला कासव 'सतारीया' म्हणून जाणार आहे हे सशाला कळले. तो त्या कासवाकडे गेला आणि म्हणाला,

'मित्रा, मला त्या भोपळ्याच्या आत लपव. मी तुझ्यासाठी आतून तारा वाजवीन. मात्र एक गोष्ट लक्षात ठेव. मेजवानीच्या वेळी जे जे काही खायला प्यायला मिळेल त्यातील काही भाग भोपळ्यात माझ्यासाठी ओतत रहा.'

कासव दयाळू होता. त्याला सशाची दया आली. त्याने त्याला त्या भोपळ्यात घातले. नाच सुरू झाला. ससा आणि कासव सतार वाजवू लागले. प्रत्येकवेळी यजमानाने कोणते पेय प्यायला दिले की कासव त्यातील काही भाग सशाला द्यायचा. परंतु हळूहळू ते पेय सशाच्या डोक्यात चढले. त्याने त्या भोपळ्यातून गायला सुरुवात केली.

हत्ती ते गाणे लक्षपूर्वक ऐकत होता. त्याने सशाचा आवाज ओळखला. त्याला भयंकर राग आला. त्याने सभोवार चाललेला नाच थांबवला. तो सरळ

त्या कासवाकडे गेला आणि म्हणाला,

'या बदमाषाला तू इथे का आणलेस?'

कासव थरथर कापू लागले. त्याला भयंकर भीती वाटली. त्याच्या हातातील सतार निसटून खाली जमिनीवर पडली आणि तिचे तुकडे तुकडे झाले. सगळीकडे एकच गोंधळ उडाला. ससा त्या गडबड गोंधळात पळून जात होता. पण हत्तीने त्याला आपल्या पायाखाली घेतले आणि पिकलेली पपई जशी चिरडतात तसा त्याला आपल्या प्रचंड पावलाखाली त्याने चिरडून टाकले.

अशा रीतीने दुष्ट सशाला आपल्या बलाढ्य मित्राशी केलेला करार मोडण्याबद्दल योग्य शिक्षा मिळाली.

(प्र. श्री. नेरूरकर [मूळ लेखक : प्रल्हाद राम शरण]
: मॉरिशसच्या लोककथा)

# ४.३२. चिमणीचा दाणा

(नेपाळची लोककथा)

एक दिवस एका चिमणीला शेतात एक मटारचा दाणा सापडला. तिने तो चोचीत उचलला आणि खूप आनंदीत झाली. आता याने नक्कीच पोट भरेल. मग तिने विचार केला की देवाने माझ्यावर इतकी कृपा केली आहे तेव्हा खाण्याच्या आधी देवाची पूजा करावी. ती आंघोळीसाठी पवित्र नदीकडे जाऊ लागली. पण प्रश्न होता की हा मटारचा दाणा कुठे लपवावा. जर जमिनीवर ठेवला तर मुंग्या खाऊन टाकतील. किंवा पक्षी उचलून घेऊन जाईल. तिने तो दाणा एका पुलावर ठेवला तेथे एक सुतार काम करीत होता. ती त्याला म्हणाली, "भाऊ, जरा याच्याकडे लक्ष्य ठेव."

ती परत आल्यावर, त्या दाण्याबद्दल त्याला विचारले, तेव्हा तो हसत म्हणाला, "मी काही तुझा नोकर नाही मला तर सरकारकडून पगार मिळतो. तुझा दाणा कुठे इकडे तिकडे पडला असेल."

चिमणी निराश झाली. आता तर शेतकरी पण शेतात असतील, आता मला उपाशीच राहावे लागेल..... ती विचार करीत होती तेव्हाच एक शिपाई तिला येतांना दिसला. ती त्याच्याजवळ जाऊन म्हणाली, "शिपाई दादा, मी गरीब आहे. माझी मदत करा. माझा मटारचा दाणा कुठेतरी हरवला आहे. एक सुतार पुलावर काम करीत होता. मी त्याला लक्ष ठेवावयास सांगितलं होतं. पण त्याने तो दाणा चोरला असावा किंवा तो कुठे पडला असावा."

शिपाई म्हणाला, "अग मुर्ख चिमणी, तुझी इतकी हिमंत की मी कामाला जातांना तू थांबवतेस!..... माझं काम कायदा आणि शांती ठेवणे आहे. त्याचाच मला पगार मिळतो. मी एका गुन्हेगाराच्या घरी जात आहे. त्याने मला जेवणासाठी बोलाविलं आहे. तू जिवंत रहा की मर मला काय करायचे."

त्याचा राग पाहून चिमणी घाबरली आणि आपल्या नशीबाला कोसू (दोष

देऊ) लागली. तेव्हाच तेथून एक फौजदार जात होता. त्या चिमणीने त्याला सर्व प्रसंग सांगितला आणि विनंती केली, “फौजदारसाहेब, काय आपण माझी मदत कराल? सुताराने माझा मटारच्या दाण्याला कुठं तरी टाकून दिलं आहे. आणि शिपाई मदत करण्यास तयार नाही. आपण काही करू शकाल?”

फौजदार चिडला, “तुझी ही हिमंत की तू मला थांबवतेस. माहीत आहे काय मंत्री दौऱ्यावर येत आहेत. आणि मला सर्व बंदोबस्त करायचा आहे. त्याला माझं काम आवडलं नाही तर मला पदोन्नती मिळणार नाही, मला तुझ्या दाण्याशी काय करायचं आहे’’ असे बोलून तो निघून गेला.

चिमणी विचार करू लागली की हा कसा देश आहे. येथील लोक किती स्वार्थी आहेत की दुसऱ्याला मदत पण करीत नाहीत. आता तर मला उपाशीच राहावे लागेल. ती असा विचार करतच होती की तिला घोड्यावर स्वार मंत्री महाशय येतांना दिसले. तिने त्यांना थांबविले आणि विनंती केली की, “मंत्री महाशय, आपण माझ्यावर दया कराल का? माझा मटारचा दाणा हरवला आहे. येथून जितके सरकारी कर्मचारी गेले सगळ्यांनी माझी मदत करावयास नकार दिला. सुताराने तो दाणा हरविला. शिपाई मेजवानीसाठी निघून गेला. फौजदाराला स्वतःच्या पदोन्नतीची काळजी होती. कोणीच माझी गोष्ट विचारात घेतली नाही.”

मंत्री म्हणाला, “माझी इच्छा तुला मदत करावी हीच आहे पण आता राजे येथे येतील. मला त्यांचं स्वागत करावयाचे आहे.’’ असे बोलून ते पण निघून गेले.

चिमणीला समाधान वाटलं की मंत्री महाशयांनी माझं म्हणणं तर ऐकून घेतलं. त्याला वेळ असता तर त्यांनी नक्कीच मला मदत केली असती.

इतक्यात हत्तीवर स्वार राजेसाहेब दिसले, तिने त्यांना विनंती केली, “राजेसाहेब, आपण तर या देशांचे मालक आहात. आपण मला मदत कराल?”

राजाला हे आवडलं नाही की ही एक छोटीसी चिमणी आणि मला थांबविते. मी तर प्रजेला दर्शन देण्याकरिता जात होतो. राजाने तिच्या कोणत्याच प्रश्नाचे उत्तर दिले नाही. राजाचा अंगरक्षक ओरडला, “दूर हो!” ..... आणि राजा निघून गेला.

आता चिमणीची खात्री पटली की कोणीही तिची मदत करू शकणार नाही. राजापेक्षा श्रेष्ठ कोण आहे? अशा क्रूर राजाच्या राज्यात मी तो दाणा सोडून अंघोळीला जावयास नको होतं..... ती अगदी उदास झाली. तेवढ्यात तिला एक मुंगी दिसली. तिने त्या मुंगीला आपली सर्व कहाणी सांगितली. आणि म्हणाली, "त्या हत्तीला जावून सांग की राजाला सांगून माझं काम करून दे."

मुंगी म्हणाली, "ताई, मी आताच जाते.'' मुंगी हत्तीजवळ गेली. आणि तिने त्याच्या कानात सांगितलं, "तू ऐकलंच असेल की चिमणीने राजाला काय विनंती केली होती. माझी इच्छा आहे की तू राजाला तिची मदत करण्याचा आग्रह धर. नाही तर मी तुझ्या सोंडेंवर चावीन."

हत्तीने ही धमकी ऐकली आणि पटकन राजाला म्हणाला, "तुम्ही चिमणीची मदत करा. जर ती मला चावली तर मी तुम्हाला हत्तीवरून पाडून टाकीन आणि त्यामुळे तुमची हाडं मोडली जातील किंवा तुम्ही मरू पण शकाल."

राजाला आश्चर्य वाटले. त्यांनी मंत्रीला बोलाविलं आणि आज्ञा दिली की या चिमणीला मदत करा. मंत्री फौजादाराकडे गेला आणि म्हणाला, "शांतता ठेवण्याचं तुमचं काम आहे. काय तुम्हाला माहीत नाही की त्या सुतार आणि शिपाई दोघांनीही तिची काहीच मदत केली नाही. पटकन काही करा. नाही तर नोकरी जाईल." फौजदार शिपायाकडे गेला आणि त्याला रागावला. शिपाई सुताराला रागावला. तेव्हा सुताराने तो दाणा शोधून आणला. त्यामुळे चिमणी आनंदीत झाली.

( मथितार्थ हाच की एखादी लहानशी व्यक्ती पण मोठं काम करू शकते.)

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ४.३३. बोरोली पिकली गांडोली शेकली

एका बोरगाव नावाच्या खेड्यात सारजा नावाची एक आजी राहायची. ती गरीब होती पण कुणाकडे हात पसरायची नाही. परसात अळू, मेथी, काकडी लावायची. बाजारात विकून चार पैसे मिळवायची. शेंगदाणे, हरभरे भाजायची. कागदाचे कोन करून त्यात भरायची व शाळेतल्या मुलांना दहा- वीस पैशात विकायची. अंगणाला बोरीचे, वेलाचे कुंपण घालायची. हंगामात फळं आली की ती विकायची. चिमणी एकेक दाणा टिपते तशी संसार करायची.तरुणपणी नवरा गेला तरी ती हरली नाही. कष्ट करून आनंदाने जगत होती.

गावातली उनाड मुलं कधी तिची बोरं चोरायची. पोरंच ती! खायची गोष्ट खाणारच, म्हणून ती कानाडोळा करायची. गावाबाहेरच्या जंगलातला कोल्हा तिच्या परसातली काकडी, बोरं खायला यायचा. आजीची नजर चुकवून तो काकडी फस्त करायचा. झाडांची, वेलींची नासधूस करायचा. आजीला त्याचा राग यायचा. पण काही केल्या तिला उपाय सापडेना.

एकदा दोनदा भाजलेले हरभरे, शेंगदाणेही त्याने पळवले. अखेर या कोल्ह्याची खोड मोडायची तिने ठरविले. तिने चुलीत निखारे पेटविले. त्यावर तवा तापविला. हरभरे भाजले. तापल्या तव्याखाली राखेत निखारे तसेच ठेवले. दारात बोरांची पाटी ठेवली. मागच्या पडवीत दिवा विझवून झोपून राहिली. रात्र झाली. थंडी पडली होती. बोरांच्या वासाने कोल्हा घरात शिरला आणि बोरे खाल्ली. चुलीतल्या हरभऱ्याच्या वासाने तिकडे वळला. राखेतली ऊब चांगली वाटली म्हणून त्यावर बसला. तापल्या तव्याचा चटका बसला. ओरडत ओरडत बाहेर पळाला. पुन्हा तिकडे फिरकलाच नाही. आजी म्हणाली, *"बोरोली पिकली गांडोली शेकली"*

शक्तिपेक्षा युक्ती कामी आली. म्हाताऱ्या सारजा आजीची दांडग्या कोल्ह्याच्या त्रासातून सुटका झाली.

(पुनःकथन : रमेश वरखेडे)

# ४.३४. दोन बेडूक मित्रांची गोष्ट

एक सुंदर बाग होती. बागेत एक तळे होते. तळ्याकाठी दोन बेडूक रहायचे. दोघे अगदी जिवाभावाचे मित्र. एकाचे नाव राम, दुसऱ्याचे श्याम. राम शूर , तर श्याम भित्रा. आजुबाजूला थोडा खुट्ट आवाज झाला तरी श्यामराव तळ्यातल्या पाण्यात लपून बसायचे. श्यामरावांच्या या भित्रेपणाला तळ्यातले मासे, कासव हसायचे. 'भित्रे मंडुकराव' म्हणून चिडवायचे. रामने श्यामला भिऊ नको म्हणून खूप वेळा सांगून पाहिले. पण त्याचा काही उपयोग होईना. तळ्यातले इतर जलचर राम बेडकाला म्हणायचे , 'माणूस लोकात मुलांनी भिऊ नये म्हणून त्यांना हनुमान चाळीशी म्हणायला शिकवतात. तसा हा राम बेडूक श्यामला 'मंडुकोपनिषद" शिकवतो. पण पालथ्या घड्यावर पाणी, तसे श्याम बेडकाच्या बाबतीत या मंडुकोपनिषदा्चे व्हायचे. त्याच्या भित्रेपणात कुठलाच फरक पडेना.

एकदा बेडूक राम आणि श्यामराव बेडूक तळ्याकाठच्या झाडाखाली लपाछपीचा खेळ खेळत होते. खेळता खेळता श्यामराव बेडूक सापाच्या विळख्यात सापडले. श्यामला शोधण्यासाठी राम झाडाभोवती फेरी घालून तळ्याकाठी आले. पहातो तर काय? श्याम सापाच्या विळख्यात सापडला आहे. रामने एक युक्ती केली. सापाला दगड मारला. तशी सापाने जागच्या जागी हलचाल केली, आणि श्याम चपळाईने झाडाकडे पळाला. नंतर घाबरून तळ्यातल्या कपारीत जाऊन बसला. बरेच दिवस तो बाहेर येईचना. रामने खूप वेळा त्याची भीती घालवण्यासाठी त्याला समजावून सांगितले, तेव्हा कुठे तो सावधपणे बाहेर आला.

तलावाला लागून एक आंब्याचे झाड होते. या झाडावर एक कावळा बसायचा. त्याला श्याम बेडकाच्या खोड्या काढण्याची मोठी हौस. एके दिवशी कावळ्याने श्याम बेडकाला चांगलेच धमकावले. म्हणाला , "ए, भित्रा भागूबाई,

गोल डोळ्याचा. तुझ्या डोळ्यावर मारतो चोच, आणि फोडतोच बघ तुझा डोळा". श्यामची घाबरगुंडी उडाली. त्याने श्यामला जाऊन सगळे सांगितले. दुसऱ्या दिवशी राम कावळ्याला भेटला. म्हणाला, " ए, कावळ्या. तुझी कृष्ण कारस्थाने कळली मला. तू आमच्या मित्राला डोळा फोडण्याची धमकी दिली. ठीक आहे.तू त्याचा डोळा फोडणार तर मीही तुझे एक रहस्य फोडणार. बागेतल्या आणि तळ्यातल्या सगळ्या पक्षी-प्राणी मित्रांना मी तुला एकच डोळा कसा आहे ते आज ओरडून सांगणार". रामच्या या बोलण्याने कावळा घाबरला, आणि म्हणाला, "अरे मित्रा, मी तर श्यामची फक्त गंमत करत होतो. पण आज मी तुला वचन देतो, येथून पुढे मी कधीच श्यामला त्रास देणार नाही, त्याच्या खोड्या काढणार नाही". रामने श्यामला हा सगळा संवाद सांगितला. तेव्हापासून श्यामच्या मनातली भीती गेली आणि तो बिनधास्तपणे तळ्याकाठी हिंडू लागला.

एके दिवशी बागेत फिरता फिरता राम श्याम एकमेकांना भेटले. रामने विचारले, "तू काही खाल्लंस का?" श्याम म्हणाला, "अरे रामा, खरं म्हणजे आज मला दूध प्यायची इच्छा झाली आहे. चलतोस का डेअरीत?" रामने संमती दिली. टुणूक टुणूक उड्या मारीत दोघेही डेअरीत जायला निघाले. चालता चालता धांदरट श्यामचा मिठाच्या पिशवीवर पाय पडला. पिशवीतल्या मिठाने श्यामचे पाय आणि डोके पांढरे झाले. पुढे एका पाण्याच्या डबक्यात रामने श्यामचे पांढरे अंग थोडेफार धुतले, पण मिठाचा खारटपणा काही गेला नाही. या सगळ्या गोंधळामुळे डेअरीत पोहचायला बराच उशीर झाला. डेअरी एव्हाना बंद झाली होती. पण रामने शक्कल लढवली. डेअरीच्या दरवाजाला एक भोक होते. त्या भोकातून तो आत गेला. पाठोपाठ श्यामही आत गेला. तिथे खोलीभर दूधाची कॅन पाहून श्याम बेडकाचा आनंद गगनात मावेनासा झाला. श्यामने एक उंच उडी मारली, तसे कॅनचे झाकण सरकले आणि तो धपकन कॅनमध्ये पडला. रामच्या हे लक्षात आले. दुसऱ्या कॅनवर बसून राम म्हणाला, "घाबरू नकोस श्याम. तुला बाहेर पडता येईल. तू फक्त सतत हालचाल करीत

रहा. त्यामुळे  आपोआप दूध ढवळले जाईल. मीठामुळे तुझे अंग खारट झाले आहे, त्यामुळे दूधाचे दही होईल. एकदा का दही तयार झाले की, त्या दह्यावरून उडी मारून तुला बाहेर येता येईल. आत्मविश्वासपूर्वक प्रयत्न करीत रहा. घाबरलास तर दूधाच्या तळाशी राहशील. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' या न्यायाने  अंग घुसळले तर तू नक्की बाहेर येशील. श्यामने विचार केला, "राम आपला सच्चा मित्र आहे. त्याने आपल्याला अनेक संकटातून, अडचणीतून बाहेर काढले आहे, तेव्हा आताही तो सांगेल तसे वागावे'. आणि तो सतत आपले अंग घुसळत राहिला. थोड्याच वेळात दह्याचा घट्ट थर तयार झाला. आणि त्या दह्यावर पाय रोवून श्यामने टुणकन उडी मारली व तो कॅनबाहेर आला. श्यामची सहीसलामत सुटका झालेली पाहून रामला खूप आनंद झाला. त्यांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली, आणि आल्या मार्गाने ते भोकातून बाहेर पडले आणि तलावाच्या दिशेने निघाले. आता श्यामला मंडुकोपनिषद पाठ झाले होते. या मंडुकोपनिषदाच्या डरावाने त्याला घाबरवणारा कावळाही दूर उडून जाऊ लागला.

# ४.३५. सागर आणि समुद्र पक्षी

नाताळची सुटी लागली. सुटीत काय करायचे असा प्रश्न सागर, सीमा, परेश या मुलांपुढे पडला. सीमा म्हणाली, अभ्यासापेक्षा वेगळं काहीतरी करूया? परेश म्हणाला, संक्रांत येतेच आहे. आपण पतंग उडवू या. सागरने आकाशाकडे पाहिलं तर खरंच, काही मुलांनी पतंग उडवायला सुरुवातही केली होती. प्रत्येकाने पॉकेट मनीतले पैसे एकत्रित केले. तयार पतंग घेण्यापेक्षा पतंगाचे साहित्य खरेदी करायचे ठरवले. दुसऱ्या दिवशी सकाळी कागद, मांजा, चक्री इत्यादी साहित्य खरेदी केले. दिवसभरात ८-१० पतंग तयार झाले.

पतंग उडविण्यासाठी इमारतीच्या टेरेसवर गेले. सागर पतंग उडवू लागला. परेश ढिल देऊ लागला आणि सीमा गंमत पाहू लागली. पाहता पाहता जणू काही आकाशात रंगीबेरंगी पक्षी उडताहेत असे अनेक लहान-मोठे पतंग उडताना दिसू लागले. सागरचीही पतंग बऱ्याच उंच गेली होती. इतक्यात सीमा ओरडली, 'सागर पतंग खाली खेच. निळी पतंग तुझ्या पतंगाला काटेल! ओरडू नकोस गं, आपणच निळा पतंग काटणार आहे. बघच तू. सागर असं म्हणत होता तेवढ्यात निळ्या पतंगाबरोबर लाल रंगाच्या पतंगाने सागरचा पतंग काटला. सागर-परेश लगेच खाली उतरले आणि पतंग ज्या दिशेने उडत खाली पडत होती त्या दिशेला धावले. पाठोपाठ सीमा आलीच. पळता पळता तिघंही एका पडक्या घराजवळ आली. सीमा दूरवर थांबली. सागरला म्हणाली, "सागर पुढे जाऊ नकोस. त्या घरात मुलांना पकडणारा पांढरा दाढीवालाबाबा राहतो." सागर, परेश हसू लागले. अरे खरंच सांगते, राधाकाकू भांडी घासण्यासाठी माती घ्यायला आली तेव्हा मातीत पांढरे केसही दिसले. तेव्हा राधाकाकू म्हणाली, पुन्हा त्या घरातील माती आणणार नाही. हे ऐकताच दोघे चार पावले मागे सरकली. परंतु परेशला वरच्या कौलावर पतंगाचा मांजा दिसला. त्याने सागरला सांगितले, आणि सागर खिडकीवरून कौलांपर्यंत पोहोचला. हातात येईल तेवढा मांजा परेशला खाली जमा (गोळा) करायला सांगितला. मांजा

ओढता ओढता सागरला कौलांवर पक्ष्यांची फडफड जाणवली. म्हणून तो अधिकच वर चढला. पक्ष्याच्या पायाला लागल्यामुळे त्याला उडता येत नव्हते. त्याने परेशलाही मदतीला बोलावले. दोघांनी अलगद पक्ष्याला उचलले. आणि सीमाला झेलायला सांगितले. पक्षी खूपच वेगळा होता. राखाडी रंगाचे पंख. गळा आणि पोटावरचा भाग पांढरा होता. डोळ्यांजवळ दोन काळे डाग. जणूकाही डोळ्यांत काजळ घातले आहे. परेश, सागर, सीमा यांनी पक्ष्याला घरी आणले. पायाला जखम झाली होती. डेटॉलने पक्ष्याचा पाय स्वच्छ धुतला. मलम लावले. इतक्यात आई आली. मुलं पक्ष्याची सेवा-सुश्रुषा करता आहेत हे पाहून आईला खूप बरं वाटलं. थोड्याच वेळात आईने हळद आणून लावली. थोडं पाणीही वाटीत प्यायला दिलं. पक्ष्याला थोडं बरं वाटलं. पक्ष्याने उडण्याचा प्रयत्न केला. थोड्या उंचावर उडालाही. पण क्षणार्धात खाली आला. सागरने त्याला अलगद पकडलं. सीमाने घरातून एक टोपली आणली. त्या टोपलीत एक मऊ कापड अंथरलं. सागरने पक्ष्याला टोपलीत ठेवलं. जिन्याखालच्या गार हवेत टोपली ठेवली. सगळ्यांनी एकमेकांना सांगितलं, 'पक्षी झोपतो आहे. आपण थोड्यावेळाने परत येऊ.' असं म्हणून सगळे घरात पळाले. इतक्यात वडील आले. त्यांनी जिन्याखालच्या टोपलीत डोकावून पाहिले, तर त्यात समुद्रपक्षी! मुलांचा अजब पराक्रम पाहून वडील रागावतच घरात आले. सागरने थंडगार पाण्याचा ग्लास वडिलांना देत म्हटले, 'बाबा, मला पक्षी आवडला आहे. त्याला जखम झाली आहे. आपण काही दिवस ठेवू या आपल्याकडे.' 'अरे, समुद्रपक्षी आहे तो! सीगल' 'अरेव्वा! या आगळ्या वेगळ्या पक्षाच्या सोबत राहू या ना काही दिवस.' गालातल्या गालात हसत वडील आतल्या खोलीत गेले. मुलांना खूप आनंद झाला.

हळूहळू शेजारचे, परिसरातले ओळखीचे लोक समुद्रपक्षी पहायला येऊ लागले. पक्ष्यासाठी पिंजरा बनवला. सागर आणि सीमा पिंजऱ्यासह पक्ष्याला फिरायला रोज बागेत आणत. तो थोडावेळ आंब्याच्या झाडाला टांगत. इतर पक्षी पहात समुद्रपक्षी पिंजऱ्यात फिरू लागे. कधी कधी पिंजऱ्याच्या दारावर टोचा मारून 'मलाही मुक्तपणे फिरू द्या' असेच सांगत असे.

एकदा सागर आणि सीमा सहलीच्या निमित्ताने पक्षी अभयारण्यात गेले. शिक्षकांनी सुतारपक्षी, कोकिळा वगैरे पक्ष्यांची माहिती सांगितली. काही अनोख्या पक्ष्यांच्या माहितीसाठी एक माहितीपट दाखवला. या माहितीपटात अनेक पक्ष्यांबरोबर सीगल्स म्हणजेच समुद्रपक्ष्याचीही माहिती होती. मुलं अधिक जिज्ञासेने माहितीपट पाहू लागले. सीगल्स - समुद्रपक्षी समुद्रकिनारी असतात. या पक्ष्याचे पंख लांब आणि मजबूत असतात. पाण्यावर तरंगणाऱ्या नावेसारखे हे पक्षी काही वेळ पाण्यावर तरंगतात आणि क्षणार्धात जहाजामागे उडताना दिसतात. समुद्रात कितीही वादळ आले तरी वादळातून सहीसलामत बाहेर पडतात. नाविक या समुद्रपक्ष्यांना आपला मित्र मानतात. कारण समुद्रात जहाजाची दिशा चुकते, अशावेळी समुद्रपक्षी दिसताच जमिनीकडे जाण्याची दिशा मिळते. ही माहिती मिळाल्यावर सीमा-सागरने ठरविले की आपण आपल्या पक्षीमित्राला रोज नदीकिनारी फिरायला न्यायला हवे.

एके दिवशी वादळी हवा असल्यामुळे पक्ष्याला नदीकिनारी नेता आले नाही. जसजशी वादळी हवा सुरू झाली तसतसा पक्ष्याचा पिंजरा गोल गोल फिरू लागला. पक्ष्याला मोकळ्या वादळी हवेत उडायचे होते. सारं बळ एकवटून पिंजऱ्याचं दार तोडून तो स्वतंत्रपणे आकाशात उडू लागला. सागर-सीमा पक्ष्याच्या स्वतंत्रतेचा आनंद अनुभवत होते. थोड्याच वेळात सागरने आवाज देताच पक्षी सागरच्या जवळ आला. आता ते खरोखरच मित्र बनले होते. आता पिंजऱ्यात बंद करायची गरजच नव्हती.

दुसऱ्या दिवशी सकाळी आई मासे स्वच्छ करत होती. पक्ष्याने टोपलीतून अलगद मासा उचलला आणि दूर पळाला. त्याच्यामागे काठी घेऊन आई पळाली. पण पक्षी काही सापडेना. सागर शाळेत जायला निघालाच होता. आई पक्ष्याच्या मागे लागली आहे हे पाहून त्याने दप्तर बाहेर काढले. वह्या-पुस्तके बाजुला ठेवली आणि दप्तरात पक्ष्याला घातले. शाळेत आला.

जोशी सर संस्कृत श्लोक पाठांतरासाठी घेत होते. सर म्हणाले, 'या कुंदेन्दु तुषार हार धवला...' मुलांच्या आधी पक्ष्याने *'चिन-चान-चाव'* असा आवाज काढला. गुरुजींना वाटले सागरच खोडकरपणा करतो आहे. दरडावून गुरुजींनी

सागरला विचारले, 'काय वात्रटपणा चालवला आहे? बाकावर उभे रहा आणि ५० वेळा उभ्याने श्लोक लिहून काढ'. शिक्षा ऐकताच सागर घाबरला. बॅगकडे बोट दाखवून म्हणाला, 'गुरुजी मी काहीच केले नाही.' गुरुजी जवळ आले आणि बॅगेत पाहिले तर पक्षी. बॅग उघडताच पक्षी बाहेर आला अन् गुरुजींच्या डोक्यावरच बसला. सगळा वर्ग हसू लागला. गुरुजी रागाने लाललाल झाले. इतक्यात पक्षी खिडकीतून उडून गेला. सगळ्यांनाच सुटल्यासारखे झाले. पण सागर मनातून खट्टू झाला. एक चांगला मित्र दुरावल्यासारखे वाटले.

दुपारच्या वेळेत सीमा सांगायला आली, आपला पक्षीमित्र आला आहे. सागरने पक्ष्याला जवळ घेतले. एकमेकांच्या डोक्याला डोके लागले. सागरच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले आणि पक्षी *'टिपा-टावटान'* म्हणाला. दोघांनाही भेटण्याचा आनंद झाला.

संध्याकाळी बाबांबरोबर सगळे एकत्रित जेवायलाच बसले. बाबा म्हणाले, 'आपण सगळे समुद्र पहायला जाणार आहोत.' सागर-सीमाचा आनंद गगनात मावेनासा झाला. सहलीची सगळी तयारी झाली. सीमा म्हणाली, 'सागर आपल्या पक्षीमित्रालाही सोबत घेणार आहेस?' सागर म्हणाला, 'अर्थातच!' समुद्रपक्ष्याला समुद्राकडे न्यायलाच हवे. पक्ष्यासोबत समुद्रकिनारा पहायला सगळे निघाले. दोन दिवसांच्या प्रवासात आई, बाबा, सीमा, सागर आणि समुद्रपक्षी सगळ्यांनीच खूप धमाल, गप्पा, गोष्टी केल्या. आता पक्षी कुटुंबाचा घटकच बनला होता. आईबाबाही त्याचे खूप लाड करीत. पक्षीही त्यांच्या अंगाखांद्यावर उडत राही.

दूरवर चमकतं पाणी पाहून सागर आनंदाने ओरडला, "आलाच की समुद्र!" अथांग पाणी दुपारच्या उन्हात चमकत होतं. थोडं जवळ येताच समुद्राकाठची वाळूही चमकताना दिसू लागली. मच्छिमार वाळूवर मासे सुकवत होते. काही पर्यटक समुद्राच्या लाटांचे अनोखे सौंदर्य पाहण्यात गुंतले होते. आईबाबांनी सांगितले, 'आता रूमवर जाऊ. फ्रेश व्हायचे आणि मग समुद्रावर भटकायचे. पाण्यात डुंबायचे. पण फार पुढे जायचे नाही.' सागर-सीमाने आईबाबांच्या सूचनांचे पालन केले. फ्रेश झाल्यावर समुद्रावर आले. संध्याकाळची पाच-

साडेपाचची वेळ. समुद्रावर समुद्रपक्षी पाहून आपल्या पक्ष्याचे हे सर्व मित्रच आहेत हे पाहून दोघांनाही खूप आश्चर्य वाटलं. काही पक्षी पाण्यावर तरंगत होते तर काही आकाशात चक्राकार फिरत होते. सागरने ठरवले आपल्या पक्ष्याला समुद्रावर फिरायला आणू या. सागरने पक्ष्याला समुद्रकाठी आणताच पक्ष्याने उंच झेप घेतली आणि सर्व पक्ष्यांमध्ये सामील झाला. सर्व सारख्या पक्ष्यांमध्ये आपला पक्षी कोणता हे ठरवताच येईना. सागरने शिट्टी वाजवून पक्ष्याला परत बोलावण्याचा प्रयत्न केला. परंतु पक्षी परत आलाच नाही. क्षितिजापलिकडे सूर्य अस्ताला जात होता. केशरी पिवळ्या आकाशाकडे पाहता पाहता सीमा गुणगुणत होती, 'कुठे बुडाला पलिकडे तो सोन्याचा गोळा' आणि सागर खाली मान घालून परतीच्या वाटेला चालू लागला. मनात म्हणत होता, 'कुठे हरवला माझा सोनेरी मित्रपक्षी'

इतक्यात आईबाबा आले. सागर-सीमा पाहिलेत का सीगल्स? आणि तुमचा मित्र कुठे आहे? सागरचं मौन पाहून आई म्हणाली, 'आई-बाबांशिवाय सागर राहू शकतो का? नाही ना? मग आज आपला मित्र पक्षीही आपल्या आई-बाबांकडे, मित्रमैत्रिणींसोबत त्याच्या घरी गेला!'

बाबा सागरला समजावू लागले, 'सागर एका जखमी पक्ष्याला तू वाचवलेस. त्याची निगराणी राखलीस आणि आज त्याच्या परिवारात, त्याच्या वातावरणात सोडून त्याला मुक्त केलेस. आता थोडावेळ तुला आपला पक्षीमित्र गमावल्याचे वाईट वाटेल. पण एक लक्षात घे, माणूस जंगलात हिंडू फिरू शकतो, पण दीर्घकाळ राहू शकत नाही. तसंच पक्षीसुद्धा माणसांच्या जगात, सहवासात फार काळ राहू शकत नाहीत. पक्षी पाळणं म्हणजे पक्ष्याचं मुक्त आकाशात झेपावण्याला बंदी घालणं. आपण त्यांचं मुक्त हिंडण्याफिरण्याचं हे स्वातंत्र्य हिरावून घेऊ नये. आपण पक्षी निरीक्षणाचाच आनंद घ्यावा. त्यांना त्यांच्या मुक्त आनंदात स्वच्छंद विहार करू द्यावा, यातच खरे पक्षीप्रेम आहे.

(पुनःकथन : मंगला वरखेडे)

# ४.३६. अंशुची मासेमारीची मोहीम

[अंशू हा एक विचित्र मुलगा होता. नको ते करण्यात पटाईत होता. एकदा मात्र त्याचा डाव त्याच्याच अंगलट आला. आपण फेकलेल्या जाळ्यात तो स्वत:च फसला.]

अंशू एके दिवशी रस्त्याच्या कडेला बसला होता. त्याला मासे फार आवडायचे. बसल्या बसल्या मासे पकडायला जायचा बेत त्याच्या डोक्यात घोळत होता. आकाश तसे निरभ्र होते आणि मासेमारीसाठी तर फारच उत्तम होते. चांगले मासे मिळाले तर खायलाही होतील, आणि उरले तर बाजारात विकून चार पैसेही मिळवता येतील; मग आपल्याला हव्या त्या वस्तू खरेदी करता येतील या मनोराज्यात तो हरवला होता. आपल्याला मासे मनापासून आवडतात ही गोष्ट मात्र त्याला कुणाला कळू द्यायची नव्हती.

अंशू आपल्या दिवास्वप्नातून बाहेर आला. मासे पकडायचे तर आपल्याला आधी जाळे तयार करावे लागेल, ते पाण्यात टाकून रोज किती मासे गळाला लागले ते अधूनमधून जाऊन पाहावे लागेल. हे सगळे काम तसे मेहनतीचे होते. ते कसे पार पाडायचे याचा विचार करीत असतानाच त्याला एक अफलातून कल्पना सुचली आणि तो स्वत:शीच म्हणाला “आपल्याला एक जोडीदार शोधायला हवा!"

लगबगीने तो गावात गेला. भेटेल त्याला आपल्या व्यवसायात भागीदार बनण्याची गळ घालू लागला. पण कुणीच पुढे येईना. सर्वांनी त्याला सांगितले, “ अंशू, अरे आम्ही तुला चांगले ओळखतो. तुझ्याबरोबर धंदा करायचा, म्हणजे तू सर्व काम आमच्याकडून करून घेणार, आणि मलिदा मात्र तू खाणार!” लोकांचे हे बोलणे अंशूला लागायचे. पण त्यांच्या बोलण्यात अगदीच तथ्य नव्हते असेही नसल्याचे त्याचे मन सांगत होते. निराश होऊन तो म्हणायचा, "अरे, स्वत:च्याच भागीदाराला मी कसा काय रे फसवेल?' लोकांना मात्र त्याच्या या

बोलण्याचे हसे यायचे. म्हणायचे, " तुझे बरोबर आहे अंशू. खरोखर महामुर्ख असेल तोच तुझ्या बरोबर भागीदारी करेल."

त्या दिवशी बाजारपेठेत ओनिनीच्या कानावर आले की, अंशू एका मूर्ख भागीदाराच्या शोधात आहे. दुपारी जेवणाची वेळ झाली होती, तेवढ्यात अंशूला ओनीनी दिसला. तो तसाच त्याच्याकडे चालत गेला आणि म्हणाला, " ओनीनी, अरे मी तुला कधीचा शोधतो आहे. माझ्याकडे उद्योगव्यवसाय करण्याची एक भारी योजना आहे. इतर कुणाला संधी देण्याच्या आधी प्रथम तुलाच मी त्यात भागीदार होण्याचे आमंत्रण देतो." अंशूला वाटले ओनिनी तसा अगदी साधा सरळ मुलगा आहे, उगाच कुणाला पाणचट जोक सांगत बसण्यात त्याला रस नव्हता. तसा तो फार बोलघेवडाही नव्हता.

आपल्या मनात काय दडले आहे, याची अजिबात चाहूल लागू न देता ओनीने धीरगंभीर आवाजात अंशूला विचारले, " अंशू तुला नेमके काय हवे आहे?"

"मला तुझ्याबरोबर व्यवसायात भागिदारी करायला आवडेल?" अंशू म्हणाला.

"भागिदारी, आणि ती कशाची?"ओनीनीने विचारलं.

"मत्सोद्योग!" अंशूनं उत्तर दिलं.

"मला वाटतं, ही फारच उत्तम कल्पना आहे!" ओनीनीने अगदी सभ्य शब्दांत सांगितलं.

अंशू गालातल्या गालात हसला. अखेर त्याला एक महामुर्ख भागीदार मिळाला होता. सगळ्यांनी अंशू तुला फसवेल असा ओनीनीला धोक्याचा इशारा देण्याचा प्रयत्न केला. पण ओनीनी त्यावर कुठलीच प्रतिक्रिया दि्ली नाही. जरासं हसू ओठावर आणून तो गप्प रहायचा.

भल्या पहाटे उजाडता उजाडता अंशू आणि ओनीनी जंगलात जायला निघाले. ओनीनीला कसे उल्लू बनवायचे आणि सगळे काम त्याच्याकडून कसे करवून घ्यायचे याची पद्धतशीर योजना अंशूने आखली होती.

आपल्या नियोजित जागेवर पोहचताच त्यांना माशाचे जाळे बनविण्यासाठी अगदी योग्य असे वेताची झुडपे सापडली. ओनीनीने चटकन त्याच्याकडचा चाकू बाहेर काढला आणि अंशूला म्हणाला, “ आपण दोघे भागीदार आहोत, तेव्हा आपण आपले काम वाटून घ्यायला हवे.” अंशूला अर्थातच काम वाटून घेण्यात मुळीच रस नव्हता, तरीही मान हलवून त्याने आपली संमती दर्शविली.

ओनीनी म्हणाला, "पहिल्यांदा आपण झुडपातून वेताची पाती कापून घ्यायला हवीत. मी कापायला सुरुवात करतो.”

अंशू म्हणाला, “मग मी काय करायचे?”

“तू कशाला माझ्यासाठी थकतोस? मलाच जर पाते कापायचे आहेत, तर तू कशासाठी त्रास घ्यायचा हे काही मला कळत नाही?” ओनिनी म्हणाला.

“ काय"” अंशू जवळपास ओरडलाच. म्हणाला, “मलाच का पाते कापू देत नाहीस? तोपर्यंत तू विश्रांती घे.”

“पहा बुवा, तू म्हणशील तसे.” असे म्हणून ओनिनी झाडाच्या सावलीत जाऊन बसला.

सूर्य माथ्यावर येईपर्यंत अंशू वेत कापीत होता आणि ओनीनी झाडाच्या सावलीत स्नायू सैल करण्यासाठी व्यायाम करीत होता. त्यांना हवे तितके वेत मिळाल्यावर ओनीनी अंशूला म्हणाला,

"खरं तर माझ्या पाठीत चमक भरली आहे, पण तू माझी चिंता करू नकोस. मी आतापर्यंत विश्रांती घेतली होती, आता हे सर्व वेत पाण्यापर्यंत वाहून नेण्याचे काम मी करतो. ”

“नाही, तू मुळीच नाही" अंशू ओरडला. “मी वेत वाहून नेतो, तोपर्यंत तू पाठीला आराम दे.”

ओनीनीने 'आई ग, बाई ग' करीतआपल्याला खांद्यातून कळा येत असल्याने खूप दुखत असल्याचे भासवले. ते पाण्यात पोहचेपर्यंत ओनीने गवतात लोळण घेतली आणि जणू काय आपल्या पाठीवर पहाड कोसळला आहे इतक्या वेदना होत असल्याचे दाखवले.

“आता काय?” म्हणून अंशूने प्रश्न केला. त्याला वाटलं आता पुढचं काम सोपं आहे, ओनीनी ते करेल.

“ठीक आहे.आता आपण वेतांचे जाळे विणू या. मी विणतो जाळं. तोपर्यंत तू माझ्या मानेला आणि ताठरलेल्या बोटांना मसाज करून दे.” ओनीनी म्हणाला.

अंशूने त्याला थांबवलं. म्हणाला, “मूर्ख आहेस का? मी विणतो जाळं. तोपर्यंत तू तुझ्या दुखऱ्या मानेला आणि ताठरल्या बोटांना विसावा दे.”

ओनीनीने तत्काळ मान्य केलं आणि अंशू जाळं विणायला बसला. ओनीने आपल्याला बरंच दुखत असल्याचं नाटक केलं.

ओनीनीचं दुखणं पाहून अंशू मिष्किलपणे हसला. ओनीनीला आपण जंगलात आणून कसं मुर्ख बनवलं या कल्पनेनं मनातल्या मनात सुखावला.

जाळं तयार झालं. ओनीनी उठला आणि ते गोळा करू लागला.

“ काय करतो आहेस? अंशू पुन्हा त्याच्यावर ओरडला.

“अरे कुणाला तरी हे काम करावंच लागणार ना? शेवटी आपण भागीदार आहोत. काम वाटून घ्यायलाच हवं. मी टाकतो जाळं पाण्यात.”- ओनीनीनं उत्तर दिलं.

“मग मी काय करायला हवं?” काहीशा संशयानंच अंशूनं विचारलं.

"तिकडे शार्क आहेत. जर माझ्यावर त्यांनी हल्ला केला तर एक भागीदार म्हणून तू माझ्यासाठी मरण पत्करशील का? " ओनीनीनं उत्तर दिलं.

“वा! अरे दे माझ्याकडे ते जाळे. मी उतरतो पाण्यात. जर शार्क मला चावायला आले, तर तू माझ्यासाठी मरण पत्कर.” अंशू म्हणाला. आणि अंशू जाळं घेऊन खोल पाण्यात उतरला आणि त्याने तिथं जाळं पसरलं.

आता दुसऱ्या दिवशी सकाळी किती मासे गळाला लागले हे पहायला आपण बरोबरच येऊ, असा आपापसात करार करून ते दोघे घराकडे परतले. ओनीनी आपली मान-पाठ सांभाळत घराकडे निघाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते एकमेकांना भेटले. पुन्हा एकदा अंशू पाण्यात उतरला. दोन मोठे मासे जाळ्यात अड्कलेले त्याला दिसले. अंशू त्यांची वाटणी

करून छोटा ओनीनीला द्यायचा विचार करीत होता. परंतु ओनीनी म्हणाला, “नको. आधीच हे मासे छोटे आहेत; तेव्हा आज तू ते दोन्ही मासे घे. उद्या कदाचित जास्ती मासे गळाला लागतील, जे मिळतील ते सर्व मी नेईन."

वास्तविक ते दोन्ही मासे पुरेसे मोठे होते. पण ओनीनी म्हणाला म्हणून अंशूला ते छोटे वाटू लागले. अंशू ओनीनीला म्हनाला, “नको आज तू हे दोन्ही मासे ने. उद्याचे मी घेईन" आणि अखेर ओनीनीने ते दोन्ही मासे पदरात पाडून घेतले.

दुसऱ्या दिवशी चार मासे मिळाले. अंशू उपहासाने ओनीनीला म्हणाला,” काल दोन मासे घेऊन तू अखेर मुर्खच ठरला. मला बघ कसे घसघशीत चार मासे मिळाले.” ओनीनी हसून म्हणाला, “मला मोठी गंमत वाटत आहे, कारण उद्याचे मासे मला मिळणार आहेत, आणि ते आजच्या दुप्पट आणि आजच्या पेक्षा मोठेही असू शकतात. ”

अंशू गोंधळला. पण स्वत:ला सावरत तो ओनीनीला म्हणाला, “असे कर आज तू हे चारही मासे घेऊन जा. मी उद्या पकडेल.” ओनीनीने पुष्कळ समजावले, पण अंशूला ते पटले नाही. आजही चार मोठे मासे घेऊन अनीनी घरी परतला.

नंतरच्या दिवशी पुन्हा दोघे जाळे पहायला गेले. आता भरपूर मासे गळाला लागले होते. पण त्यातले बरेच मासे अगदी छोटे होते, काहींना सडल्यामुळे घाण वास येत होता. अंशू नाराज झाला. पण ओनीनीने त्याला दिलासा दिला. म्हणाला, बाजारात सर्व प्रकारचे मासे विकले जातात. याही माशांना काहीना काही किंमत येईलच की.”अंशूला ते पटले. काहीना काही रोकड रक्कम हाती लागेल या आशेने तो ते मासे बाजारात घेऊन गेला.

बाजारात गेल्यावर त्या सडक्या माशांचा घाण वास पसरला. लोक रूमालात नाक धरून अंशूकडे तिरस्काराने पाहू लागले. तेवढ्यात बाजारातला एक मुखीया तेथे आला. असले घाण मासे बाजारात आणून अंशूने आपल्या बाजाराच्या नावलौकिकाला डाग लावला म्हणून त्याने अंशूची पिटाई केली.

बाजारातल्या एका म्हातारीला ओनीनी भेटला. तिने ओनीनीला बाजारात घडलेली हकिगत सांगितली. म्हातारी त्याला म्हणाली, “अरे तुझ्या मित्राची बाजारात पिटाई होत आहे, आणि तू इकडे काय करतो आहेस? तू त्याचा भागीदार आहे ना? मग त्याची पिटाई होताना त्याच्याबरोबर तुही वार सोसले पाहिजेत.”

म्हातारीच्या तोंडून घडलेली हकिगत ऐकून ओनीनी स्वत:शी म्हणाला, "कोणी कुणाला मुर्ख बनवले, हे आता अंशूला कळेल. तो लगोलग बाजारात गेला. तिथे प्रत्येक जण अंशूची फजिती पाहून पोट धरधरून हसत होते. एका महिलेने ओनीनीला सांगितले, “अरे तो तुझा मित्र सारखी तुझी आठवण काढीत ओरडत होता. 'कुठे गेला तो माझा भागीदार मित्र? आता माझी एवढी पिटाई झाल्यावर निदान वेदना वाटून घ्यायला तरी समोर ये!”

(पुनःकथन : डॉ.रमेश नारायण वरखेडे)

# ४.३७. मोठ्या अंड्याची छोटी गोष्ट

एका जंगलात एक कोंबडी रहात होती. एका काटेरी कुंपणाजवळ तिने चार अंडी ठेवली. त्यानंतर ती चारापाणी शोधायला जंगलात गेली. थोड्या वेळानंतर ती परत आली. तिला तेथे तिच्या चार अंड्यांशेजारी आणखी एक पाचवे अंडे दिसले. ते अंडे इतर चार अंड्यांपेक्षा खूपच मोठे होते. "हे अंडे आपले नाही, मग ते कुणाचे असेल?" असा प्रश्न तिच्या मनात निर्माण झाला. तिने त्याचा तपास करायचा ठरवले. तिने एका टोपलीत ती सर्व पाच अंडी ठेवली आणि ती टोपली घेऊन जंगलात फिरू लागली. प्रथम तिला एक ससा भेटला. तिने ससोबाला विचारले,

"ससोबा, ससोबा, हे अंडे तुझे आहे का?"

ससोबा म्हणाला, "नाही गं बाई, हे अंडे माझे कसे असेल? दुसऱ्या कुणाला विचार?"

त्यानंतर ती पुढे चालत राहिली. रस्त्यात तिला एक हरीण भेटले. तिने हरिणीला विचारले,

"हरिणीताई, हरिणीताई, हे मोठे अंडे तुझे आहे का?"

हरिणताई म्हणाली, "नाही गं बाई, हे अंडे माझे कसे असेल? मी कोठे अंडे देते?"

ती चालतच राहिली. वाटेत तिला गाय, बकरी, मैना असे अनेक प्राणी-पक्षी भेटले. प्रत्येकाला तिने तोच प्रश्न केला. पण सगळ्यांनीच एकच उत्तर दिले, "ते अंडे आमचे नाही." कोंबडी बिचारी थकली. झाडाखाली बसली. टोपलीतली अंडी पहात बसली. तेवढ्यात पाठीमागून कोणीतरी दबकत दबकत येत असल्याची तिला चाहूल लागली. तो कोल्हा होता. कोल्हा म्हटला म्हणजे लबाडी करणारच, म्हणून तिने टोपली जवळ ओढून घेतली. कोल्हा म्हणाला,

"कोंबडीताई, इथे जंगलात काय करते आहेस?"

कोंबडी म्हणाली, “अरे बाबा, या टोपलीतली अंडी पाहिलीस का? ही चार छोटी अंडी माझी आहेत; पण हे पाचवे मोठे अंडे कोण ठेवून गेले ते कळतच नाही. मी सगळ्यांना विचारत फिरते आहे की, हे अंडे तुमचे आहे का?

कोल्होबा म्हणाला, “बरे झाले, तू भेटलीस. माझे अंडे हरवले होते. हे मोठे अंडे माझ्या कोल्हिणीचेच आहे. मला तू ते परत दे. माझी बायको खुष होईल!"

कोंबडीला आनंद झाला! ज्याचे अंडे त्याला परत देता येत आहे, याने ती खुष झाली. ती कोल्होबाला म्हणाली, “तुझे तू घेऊन जा.“ कोल्हा ते अंडे उचलायला लागला तेवढ्यात ते अंडेच फुटले, त्यातून एक मोठ्या पक्षाचे पिलू बाहेर पडले. इतर चार अंडीही पाठोपाठ फुटली. त्यातून कोंबडीची चार पिले बाहेर पडली. मोठ्या अंड्यातले पक्षाचे पिलू पाहिल्याबरोबर कोंबडीला कोल्ह्याची लबाडी कळली. तिने ती पिले टोपलीत भरली आणि धावत सुटली. आपल्या चार पिलांसोबत पाचव्या पिलाचीही आई झाली. तिने ते पिलू लहानाचे मोठे केले.

एक दिवस हे पिलू झाडावर चढले आणि उडून गेले. कोंबडीने आपले कर्तव्य पूर्ण केले होते. पिलू उडून गेले, तरी लबाडाचे भक्ष्य होण्यापेक्षा ते स्वावलंबी होऊन स्वतंत्र झाले, आणि मुक्त संचार करू लागले, याचा तिला आनंदच झाला होता!

# ४.३८. घारीचे बाळ

(आसामी लोककथेवर आधारित)

एक कुंभार होता. त्याला तीन मुली होत्या. मुलगा नव्हता. त्याला आता पुन्हा चौथी मुलगी नको होती. कुंभार बायकोला म्हणाला, “आता तुला पुन्हा मुलगी झाली तर मी तुला घरात घेणार नाही.”

कुंभाराची बायको माहेरी गेली. दुर्दैवाने तिला चौथी मुलगीच झाली. तिच्या अंगाचा थरकाप झाला. आता नवऱ्याला कसे तोंड दाखवायचे याची तिला काळजी लागली. तो आपल्याला घरात घेणार नाही, याची तिला खात्री होती. तिच्या आईने पुढे काय होईल याचा अंदाज घेऊन त्या बाळाला कपड्यात गुंडाळले, टोपलीत घातले आणि टोपली नदीत सोडून दिली.

तरंगत तरंगत टोपली पाण्याच्या प्रवाहाबरोबर वहात गेली. पुढे दुसऱ्या गावाच्या किनाऱ्याकडे आली. तिथे धोबी कपडे धूत होता. उत्सुकतेने त्याने टोपली उघडून पाहिली. टोपलीत तान्हं बाळ पाहून तो गोंधळला. बाळाला तसेच वाहू देणे योग्य नाही, हे त्याला पटत होते. आपण बाळाला घरी नेले तर आपली बायको काय म्हणेल, याचा तो विचार करीत राहिला. तेवढ्यात आकाशातून एक घार उडत आली आणि तिनं ते बाळ उचलून नेलं. घार वडाच्या झाडावर आली. तिथे फांदीवर बसून तिने बाळाला डोळाभरून पाहिलं. तिला ते फार आवडलं. तिने ते ठेवून घ्यायचं ठरवलं. लहानाचं मोठं करायचं ठरवलं. आपणच बाळाची आई आहोत असं तिला वाटू लागलं. तिने फांदीवर बाळासाठी एक छानसं घरटं बांधलं. जमेल तसं बाळासाठी अन्न, पाणी, कपडे, खेळणी गोळा करून आणू लागली. हळू हळू बाळ मोठं होत होतं. एक छानशी गोड मुलगी झाडावरच्या घरट्यात वाढत होती.

एके दिवशी एक राजकन्या नदीत आंघोळ करीत होती. तिने आपले कपडे, दागिने काठावर काढून ठेवले होते. आकाशातून उडणाऱ्या घारीने ते पाहिले.

आपल्या मुलीला आपण हे कपडे, दागिने घालवून नटवू या, असे म्हणून तिने एकेक करून ते उचलायला सुरुवात केली. राजकन्येचे कपडे, दागिने, आरसा, फणी, खेळणी उचलून तिने ते सुरक्षित जागी नेऊन ठेवले. मुलगी हळू हळू मोठी होत होती. आपली कन्या मोठी झाल्यावर तिला राजकन्येचे कपडे, दागिने घालून नटवण्याचे स्वप्न पहात घार लहानग्या मुलीशी खेळू लागली.

आता मुलगी बरीच मोठी झाली. नाचू बागडू लागली. घारीला तिच्यासाठी अन्न आणण्यासाठी दूर जावे लागे. तिला मुलीची काळजी वाटे. एके दिवशी जाताना ती मुलीला म्हणाली, "तू झाडाच्या आजूबाजूला खेळत रहा. एकटी असेल तेव्हा जपून रहा. कुणी तुला त्रास दिला, तर मी सांगते ते गाणं म्हणायला सुरुवात कर. मी असेल तेथून येईन. घाबरू नकोस. घारीने तिला परवलीच्या ओळी सांगितल्या :

"वारा वाहू दे,
वडाची पाने गळू दे
घार आई लवकर ये,
माझी माय भेटू दे"

बोलता बोलता दिवस सरत होते. मुलगी आता चांगली देखणी दिसत होती. खेळत बागडत आनंदाने वाढत होती.

उन्हाळ्याचे दिवस होते. एक प्रवासी विश्रांतीसाठी वडाच्या झाडाखाली बसला होता. अचानक एक लांबसडक सोनेरी केस उडत आला आणि प्रवाशाच्या तोंडावर पडला. त्याला आश्चर्य वाटले. एवढ्या जंगलात हा माणसाचा केस कसा? त्याने आजूबाजूला, खाली-वर पहायला सुरुवात केली. त्याला झाडावर एक सुंदर मुलगी केस विंचरताना दिसली. प्रवाशाने विचारले, "तू कोण आहेस? मुलगी आहेस की देवता?'' मुलीने प्रथमच असे काही ऐकले होते. पहिल्यांदाच अशा अनोळखी पुरुषाला ती पहात होती. ती घाबरली. काय उत्तर द्यावे हे तिला कळेना. तिने मग घार आईने सांगितलेले गाणे म्हणायला सुरुवात केली.

"वारा वाहू दे,
वडाची पाने गळू दे
घार आई लवकर ये,
माझी माय भेटू दे"

थोड्याच वेळात घार आली आणि म्हणाली, "काय झालं बाळा?" मुलीने झाडाखाली बसलेल्या माणसाकडे बोट दाखविले. त्या माणसाकडे पाहून घारीने विचार केला, माणूस तर चांगला दिसतो आहे. खरं तर आपल्या मुलीला असाच नवरा मिळाला तर किती बरं होईल! झाडाखाली बसलेल्या माणसासमोर पंख फडफडून ती म्हणाली, "अरे बाबा, हा सोनेरी केस त्या झाडावरच्या मुलीचाच आहे. मला ती तान्हं बाळ असतानाच नदीत वाहणाऱ्या टोपलीत सापडली. तिला मी माझ्या परीने सांभाळली, पालन पोषण केलं. तुला आवडली असेल तर तू तिच्याशी लग्न करून तिला तुझ्या घरी ने. मला आवडेल. नाही म्हणू नकोस."

प्रवासी म्हणाला, "मी साधा एक व्यापारी आहे. देवकृपेनं माझं सगळं व्यवस्थित चाललं आहे. मी संसारी माणूस आहे. मला बायको मुलं आहेत. तरीही तू म्हणत असशील तर मी तिच्याशी लग्न करून तिला सुखी ठेवण्याचा प्रयत्न करील."

प्रवाशाचा हा प्रामाणिकपणाच घारीला खूप भावला. तिने ढोलीत लपवलेला राजकन्येचा पोषाख, दागिने काढून तिला नटवलं आणि त्या पुरुषाशी तिचं लग्न लावलं. नवऱ्याकडे जाताना तिनं आठवणीने मुलीला सांगितलं, "तुला काही अडचण आली, संकटात सापडली तर मी सांगितलेलं ते गाणं म्हण, मी तुझ्या मदतीला असशील तिथे उपस्थित होईन."

तो व्यापारी आनंदाने तिला घेऊन आपल्या घरी परतला. ही नवी नटलेली नवरी पाहून व्यापाऱ्याच्या आधीच्या बायकोचा मत्सर जागा झाला. ती नव्याने घरात आलेल्या या मुलीला सगळी कामं सांगू लागली. स्वयंपाक करणं, धुणी धुणं, विहिरीवरून पाणी भरणं, जंगलातून सरपण आणणं, गोठा साफ करणं

अशी सगळी कष्टाची कामं तिला करावी लागत. फार त्रास पडला की ती आपल्या घार आईनं सांगितलेलं गाणं म्हणायची. जंगलातलं सरपण गोळा करायला, गोठा साफ करायला घार आई मदत करायची. तिच्या नवऱ्याला आपली पहिली बायको या नव्या बायकोला सवती मत्सराने वागवते हे दिसत होतं. आणि तरीही कुठलीच तक्रार न करता ही नवी नवरी सगळी कामं निटनेटकी, विनातक्रार करत होती. यामुळे व्यापाऱ्याच्या मनातलं तिच्यावरचं प्रेम अधिकच वाढलं.

वर्षात एक सण असा येई की, त्या दिवशी पत्नीने स्वत: विणलेलं वस्त्र नवऱ्याला भेट द्यायची प्रथा होती. या नव्या नवरीला त्याची कल्पना दिली गेली. नवऱ्याने तिला कापूस आणून दिला. पण तिला कापसाचे सूत कातून वस्त्र विणता येईना. अखेर ती कापूस घेऊन गावाबाहेर गेली आणि गाणं म्हणू लागली,

“वारा वाहू दे,
वडाची पानं गळू दे
घार आई लवकर ये,
माझी माय भेटू दे”

गाणं ऐकताच घार आली. तिने सगळी कहाणी ऐकली. म्हणाली, "तो कापूस एका टोपलीत दे. त्या सणाच्या दिवशी मी टोपली तुझ्या मागच्या अंगणात ठेवून जाईल. तुझा सण साजरा होईल. काळजी करू नकोस.” त्याप्रमाणे ठरल्या दिवशी घार टोपली ठेवून गेली. टोपलीत मऊसूत वस्त्र होतं. तिने ते आपल्या नवऱ्याला प्रेमपूर्वक अर्पण केलं. नवरा खूष झाला; पण त्याची पहिली बायको धुसफुसली. प्रत्येक वेळी ही संकटातून बाहेर कशी येते हे पाहाण्यासाठी तिच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवली. तेव्हा तिला कळलं की, हिला घार मदत करते. घारीला बोलावण्यासाठी ती गाणं म्हणते. पहिल्या बायकोने हे सगळं लक्षात ठेवून कपट कारस्थान रचलं. तिनं अंगणात जाऊन घार आईचं गाणं म्हटलं. घार आली. दबा धरून बसलेल्या त्या बाईनं झडप घालून घारीला

पकडलं. तिला शेणात चिणून मारलं. आता नव्या नवरीचा सहारा संपला होता. नंतर हाल करून तिला घराबाहेर काढलं आणि नदीवर नेऊन नावाड्याला विकली.

दु:खी कष्टी घार कन्या आता नावाड्याबरोबर मासे धरत होती. तिची घार आई आता तिच्या मदतीला नव्हती. एके दिवशी ती अशीच उदास मनाने नदीतल्या पाण्याशी बोलत दु:खी स्वरात गाणे म्हणत होती;

"वारा वाहिला,
वडाची पाने गळाली
दगा फटका झाला,
घार आई अंतरली
नदीबाई तूच आता आई,
तार नाही तर मार
नाही सोसवत आता
जगण्याचा भार"

ती असं उदास गाणं गात असतानाच तो प्रवासी नदीतल्या नावेतून पैलतीरावर जात होता. त्याने हे ओळखीचे सूर ऐकले. हे आपल्या दुसऱ्या बायकोचे सूर आहेत, हे त्याने चटकन ओळखले. प्रवाशाने नाव किनाऱ्याला लावली आणि तिची गाठ घेतली. नावाड्याला पैसे देऊन त्याने तिची सुटका केली आणि पुन्हा आपल्या घरी आणले.

आपल्या नवऱ्याने या घारकन्येला शोधून पुन्हा परत आणल्याचे पाहून व्यापाऱ्याची पहिली बायको मनातून धास्तावली. आपण तिला विकले नसून तीच घर सोडून पळून गेल्याची बतावणी करू लागली. व्यापारी हुषार होता. तो म्हणाला, "मी तुझ्या शब्दावर विश्वास ठेवीन. पण त्यासाठी तुला एक परीक्षा द्यावी लागेल." आपण आपल्या हुशारीने परीक्षेत यशस्वी होऊ असे वाटल्याने ती परीक्षेस तयार झाली.

सत्त्व परीक्षेचा दिवस उगवला. व्यापाऱ्याने एक खड्डा खोदून त्यावर भरपूर

बाभळीचे काटे पसरवले होते. खड्ड्याच्या दोन्ही टोकांना खांब रोवून एक दोर बांधला होता. व्यापाऱ्याने आपल्या दोन्ही बायकांना बोलावले. म्हणाला या दोराला धरून पैल बाजूला जायचे, इतकी साधी परीक्षा आहे. जो खोटं बोलेल तो खड्ड्यात पडेल. दोघींनी परीक्षेला तयार व्हावं. आधी लहान असलेल्या दुसऱ्या बायकोला परीक्षेला सामोरं जायला सांगण्यात आलं. घार आईच्या मुलीनं डोळे मिटले आणि हलक्या सूरात गाणं म्हटलं.

"वारा वाहू दे,
वडाची पाने गळू दे
खड्ड्यातल्या काट्यांना
ठरवू दे
खऱ्याचे खरे, खोट्याचे खोटे
ठरू दे"

दोराला धरून घारकन्या सरसर पलीकडे सुखरूप जाऊन पोहचली. परीक्षेत ती पास झाली. आता पहिल्या बायकोची पाळी होती. तिचे मन तिला खात होते. दोराला धरून ती चालू लागली. पण तिचा आत्मविश्वास ढासळला होता. तिच्या सर्वांगाला कापरे सुटले आणि तोल जाऊन ती काट्यांच्या खड्ड्यात पडली. खड्डा इतका खोल होता आणि काटे इतके जबरी होते की तिची जगण्याची शक्यताच नव्हती. *'जशी करणी तशी भरणी'* या न्यायाने पहिलीला शिक्षा भोगावी लागली.

घार आईची मुलगी तटस्थपणे हे सारे पहात होती. तिच्यातला भगिनीभाव जागा झाला. डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. आपल्या पायी कुणाचा जीव जाऊ नये, असे वाटून तिने घार आईचे स्मरण केले आणि तिच्या गळ्यांतून गाणं उमलत बाहेर आलं :

"वारा वाहू दे,
वडाची पानं गळू दे
काट्यांची फुलं होऊ दे

सवतीला माझ्या जगू दे”

आपल्या दुसऱ्या पत्नीचा हा निर्मळ भाव पाहिल्यावर व्यापाऱ्याने भराभर काटे दूर केले आणि खड्यात दोर टाकून पहिल्या बायकोला वर काढले. घारकन्येने तिला पाणी पाजलं. काट्याच्या ओरखड्यांवर हलक्या हाताने तूप लावलं. पदरानं वारा घातला. हळू हळू ती शुद्धीवर आली. झाल्या प्रकाराचा तिला पश्चाताप झाला. आता दोन्ही मिळून बहिणीच्या मायेनं एकत्र राहू लागल्या. नदीकाठच्या झाडाखाली जाऊन दोघींनी मिळून गाणं म्हटलं,

“वारा वाहू दे, वडाची पानं उडू दे
घार आईला निरोप दे
दोन्ही मुलींना आशीर्वाद दे”

(पुनःकथन : डॉ. मंगला वरखेडे)

# ४.३९. खोल किती आहे?

(खानदेशी लोककथा)

मारुती नावाचा एक सालदार होता. खूप कष्टाळू होता. सगळ्या गावातील लोक म्हणत, मारुती कामाला जसा वाघ आहे, तसा खायला बकासूर आहे. त्याच्या कामाबद्दल सगळेच कौतुक करीत. परंतु त्याला खायला भरपूर द्यावे लागते, याबद्दल खूप कुरकूर करीत. मारुतीचे सगळ्यात महत्त्वाचे स्वभाव वैशिष्ट्य सांगायचे तर, तो स्वाभिमानी होता, कुणी खायला दिल्याशिवाय तो खात नसे. आणि खाण्यावरून कुणी त्याला बोलले तर तो ते काम सोडून देत असे. बऱ्याच वेळा त्याच्या खाण्यावरून लोक त्याला कामावरून काढूनही टाकीत. परंतु त्यांची कामसूवृत्ती, प्रामाणिकपणा या गुणांमुळे दुसरीकडे लगेच काम मिळत असे.

एकदा एका भटजीकडे त्याला काम मिळाले. भटजी खूष झाला. परंतु एक-दोन दिवसात मारुतीसाठी जेवण बनवता बनवता भटजीची बायको कुरकूर करायला लागली. बायकोला समजविण्याच्या प्रयत्न करीत भटजी म्हणाला, 'दोन-चार भाकरी बनव की जास्तीच्याः एक माणूस चार लोकांचं काम करतो, आपलंही काम लवकर होतं हे समजून घेतलं पाहिजे.' पुन्हा चार पाच दिवसांनी बायकोने तक्रार केली. तिला रोज जास्तीचा स्वयंपाक करण्याचा कंटाळा येऊ लागला. भटजी बायकोला म्हणाला, 'एक युक्ती सांगतो' भाजी-पोळी सोबत रोज थोडासा गोड पदार्थ वाढायचा आणि मारुतीला सांगायचे, `थोडेसे आहे पण गोड किती आहे,'भटजीच्या बायकोला युक्ती पटली. दुसऱ्या दिवसापासून एकदाच वाढून देत थोडसं गोडही वाढे.

मारुतीची उपासमार होऊ लागली. मारुतीनेही ठरविलं! थोडसंच शेत नांगरायचं आणि आराम करायचा. दोन -तीन दिवसांनी भटजी शेतात आला. फारसं काम झालेलं नव्हतं. मारुतीला भटजी म्हणाला, `मारुती एवढंच शेत

नांगरलं?' मारुती म्हणाला, मालक, थोडसंच आहे पण खोल किती आहे?' ब्राह्मणाच्या लक्षात आलं, आपल्या युक्तीला मारुतीनेही युक्तीनेच उत्तर दिले. ब्राह्मणाला आपली चूक लक्षात आली. *'जसे दाम तसे काम'* या न्यायाने मारुतीला पोटभर जेवण देण्याचे आदेश ब्राह्मणाने आपल्या बायकोला दिला आणि मारुतीची उपासमार थांबली.



# ४.४०. वानर, उंदिर, मांजर, चानी व कांडेचोर यांची गोष्ट

(लोककथा)

एक होता वानर. एक होता उंदीर. एक होते मांजर. एक होती चानी.

व एक होता कांडेचोर. एकदा त्या सर्वांच्या मनांत आले की आपण खीर करून खावी. पण खीर करावयाची कशी ? सामान कुठे आहे ? तेव्हा मांजर म्हणाले-मी दूध आणते.

वानर म्हणाला-मी पातेले आणतो. उंदीर म्हणाला-मी गवले आणतो. चानी म्हणाली-मी लाकडे आणते. व कांडेचोर म्हणाला-मी गूळ आणतो.

मग प्रत्येकाने कबूल केल्याप्रमाणे सामान कुठून कुठून चोरून आणले. मांजराने खीर तयार केली. मग थोडा वेळ बाहेर फिरून यावे म्हणून खीर झाकून ठेऊन सगळी बाहेर पडली.

पण मांजर कसले लबाड. त्याने बघता बघता सगळ्यांच्या हातावर तुरी दिल्या. घरी येऊन खीर पिऊन टाकली व पुन्हा फिरायला गेले. घटकाभराने सगळीजणे फिरून आली. मांजर मात्र सगळ्यांच्या मागून आले. मग भूक लागल्यामुळे, खिरीवर ताव मारण्यासाठी पातेल्याजवळ गेली. पण पहातात तो पातेल्यांत खीर कुठे आहे? पातेले रिकामे. प्रत्येकजण दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहू लागला-की खीर खाल्ली कोणी? मांजर म्हणाले, मी तर बोवा सगळ्यांच्या मागून आले. मला काय ठाऊक?

तेव्हा धूर्त वानरानं चोर धरण्याची एक युक्ती काढली. जवळच एक तळे होते. त्याने एक घागर पाण्यावर उपडी ठेवली व म्हणाला या घागरीवर एकेकाने उभे राहायचे. ज्याच्या खेपेला घागर बुडेल तो चोर. म्हणून वानर पहिल्याने उभा राहिला व म्हणतो :

''च्यां च्यां करी वरच्ये डोंगरी
मी खीर खाल्ली तर बुड घागरी''

पण घागर काही बुडली नाही. तेव्हा उंदीर घागरीवर उभा राहिला व म्हणतो,

''चू चू करी वरच्ये डोंगरी
मी खीर खाल्ली तर बुड घागरी''

पण घागर काही बुडेना. अशी सगळी उभी राहिली पण घागर काही बुडली नाही. शेवटी मांजरावर पाळी आली. मांजर म्हणाले,

म्याव म्याव करी वरच्ये डोंगरी
मी खीर खाल्ली तर बुड घागरी

त्याबरोबर घागर बुडाली. चोर सापडला व मांजराची फजिती झाली.

इटुकली मिटुकली गोष्ट सरो
तुमचे आमचे पोट भरो.

(शंकर गणेश दाते : लोककथा)

# ४.४१. गोगलगाई बारशाला जातात

(बालकथा)

सकाळ झाली. गोगलबाई उठल्या. आपल्या पाठीवरच्या घरातून बाहेर अंगणात आल्या. सकाळचे कोवळे ऊन खात बसून राहिल्या. तेवढ्यात त्यांची एक मैत्रीण चिऊताई समोरून येताना दिसली. तिला पाहून गोगलबाईंनी विचारले, "काय चिऊताई, आज सकाळीच कसे येणे केले?"

चिऊताई म्हणाली, " मी आले आहे, बोलावणे करायला. उद्या किनई माझ्या बाळाचे बारसे आहे. मुद्दाम तुम्हांला सांगायला आले आहे. नक्की यायचे बरे का! आणि हे पहा, लवकरच निघा जरा. म्हणजे वेळेवर पोहचाल. बराय, येऊ मी, अच्छा!" असे म्हणून चिऊताई दुसरीकडे बोलावणे करायला लगेच भुर्रकन उडून गेल्या.

दुसऱ्या दिवशी गोगलबाई अगदी लवकर उठल्या. घाईघाईने तयार झाल्या आणि लगबगीने निघाल्या. बारशाला वेळेवर जावे म्हणून त्यांनी आपला वेगही बराच वाढवण्याचा प्रयत्न केला.

खूप खूप वेळ झाला. सगळी सकाळ गेली. दुपार झाली. दुपारही गेली. संध्याकाळ झाली. तरी चिऊताईचे घर काही येईना. लांबूनही ते दिसेना. पण घर येईतोवर चालायचे, बारसे चुकवायचे नाही, असे ठरवून त्या चालतच रहिल्या.

शेवटी एकदाचे दूर अंतरावर गोगलबाईंना चिऊताईचे घरटे दिसू लागले. चिऊताईच्या घरट्याभोवती खूप गर्दी जमली होती. खूप गडबड चालली होती. गोगलबाईंना आनंद झाला. त्यांना वाटले- मंडळी दिसत आहेत, धावपळ चालू आहे. म्हणजे बारसे उरकले नव्हते खास! चिऊताईची अगदी धांदल उडून गेली होती. समारंभाला खूप मंडळी आलेली दिसत होती. मैनाराणी आपल्या गोड आवाजात पाहुण्यांचे स्वागत करत होत्या. पोपटदादा त्यांना प्रेमाने फांद्यांवर

बसवत होता. साळुंकीमावशी गुलाबाच्या पाकळ्यांतून सगळ्यांना मध प्यायला देत होत्या. कावळेकाकू सारखी आपली मान इकडे तिकडे करून हवे-नको पाहत होत्या. फुलपाखरे मात्र रंगीबेरंगी सुंदर कपडे घालून इकडून तिकडे व तिकडून इकडे उगीचच मिरवत होती.

शेवटी एकदाच्या हाश्शहुश्श करत गोगलबाई घरट्यापाशी पोचल्या. धापा टाकत म्हणाल्या. "पहा चिऊताई, आले की नाही बाई वेळेवर बारशाला?"

यावर जमलेली सर्व मंडळी खो खो हसू लागली. त्यांच्या या हसण्यामुळे बिचाऱ्या गोगलबाई अगदी गोऱ्यामोऱ्या झाल्या. मग चिऊताईच त्यांना म्हणाली, "अहो गोगलबाई, बारसे कुठले? ते तर मागेच झाले. आज माझ्या बाळाचे लग्न आहे. बरे झाले, तुम्ही बारशाला निघलात, म्हणून लग्नाला तरी वेळेवर पोचलात.!"

[कथन- सई परांजपे, बालभारती, प. २ रे, १९७९, महाराष्ट्र, पृ. २५-२७]

# ४.४२. पहिला झेब्रा

(मध्य आफ्रिकेतल्या अंगांनी लोकांमधील एक कथा)

पृथ्वीवर सगळंच नवं नवं होतं, तेव्हा सगळी जनावरं एकसारखी होती. त्यांची शिंगं वेगळी आहेत, त्यांच्या अंगावरची कातडी चमकदार पिवळी तांबडी आहे आणि तिच्यावर काळे ठिपके आहेत असं काहीच नव्हतं. सृष्टिनिर्माता निर्माण करीत असलेल्या विशाल व्यवस्थेला पूर्ण स्वरूप देण्यात गढलेला होता. त्याने नाना प्रकारची शिंगं बनवली. आकार, लांबी, रुंदी ह्यात अफाट वेगवेगळेपणा ठेवला. नाना प्रकारची कातडी केली. केसाळ, रंगीबेरंगी, ठिपकेवाली, पट्टेवाली. काम झालं तेव्हा निर्मात्याने शिंगं, कातडी सरोवराच्या काठी असलेल्या एका गुहेत ठेवली.

मैदानावरच्या गवताळ कुरणात चरणाऱ्या सगळ्या जनावरांकडे निर्मात्याने मग निरोप पाठवला की, दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी गुहेकडे जावे आणि पसंत पडतील ती शिंगे आणि कातडी घेऊन जावीत. हा निरोप मिळताच जनावरांच्यात प्रचंड खळबळ उडाली. निर्मात्याने आपल्यासाठी कशी, कोणती, शिंगे आणि कातडी तयार ठेवली आहेत हे पहाण्याची विलक्षण उत्सुकता सगळ्यांनाच वाटली.

ह्या सगळ्यांतून एकटा झेब्रा मात्र बाजूला राहिला. खाणं ही एकच गोष्ट त्याच्या दृष्टीने महत्त्वाची होती. झेब्रा आधाशी प्राणी आहे हे जगजाहीर होतं. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच सगळी जनावरं सरोवराकाठच्या त्या गुहेकडे चालू लागली. झेब्रा मात्र गेला नाही. तो म्हणाला,'सरोवर फारच दूर आहे. केवढी तरी वाटचाल करावी लागेल. निघण्याआधी चांगलं खाऊन घेतलंच पाहिजे. लुसलुशीत चविष्ट गवताची न्याहारी न करता शिंगं आणि कातड्यांच्या मागं सगळे का धावत सुटलेत कुणाला ठाऊक !'

घाईने जाताना वरचेवर इतर जनावरांनी जिराफाला हाका दिल्या. “ए,पळ. गुहेकडं बोलावलय् सगळ्यांना”. झेब्रा तोंडातल्या तोंडात बोलला. "व्हा पुढं. मी येईन माझी न्याहारी आटोपल्यावर !” आणि गवताचा मोठ्ठा घास घेऊन त्याने तोंड बंद केलं. जाणारी जनावरं म्हणाली, 'ह्या झेब्र्याशी बोलण्यात अर्थ नाही. त्याला दुसऱ्या कुणाची किंमत नाही.' इतरांशी वागण्यातली रीत न पाळणाऱ्या झेब्र्याला तिथंच सोडून जनावरे पुढे गेली.

बऱ्याच वेळानं झेब्रा म्हणाला, 'बास आता. भरपेट न्याहारी झाली' आणि रमतगमत तो बाकी जनावरांनी रुंद वाट पाडलेली होती ती धरून सरोवराकडं गेला. सरोवराजवळ आल्यावर झेब्र्याला परत फिरलेली जनावरं दिसली. त्यांच्या बदललेल्या रूपाकडं बघून झेब्रा चकीत झाला. हत्तीनं काळसर राखी रंगाचा कोट पसंत केलेला होता. पण तोंडातून बाहेर आलेल्या सुरेख अशा दोन सुळ्यांनी त्या कसनुशा कोटाला शोभा दिली होती. सिंहानं उदी, पिवळसर रंगाचा कोट आणि काळसर लांब, राजेशाही आयाळ निवडली होती. सेबल काळविटानं काळा चकचकीत कोट आणि पाठीमागं वळलेली शिंगं घेतली होती.

नवी रूपं घेतलेली, एका पाठोपाठ एक जनावरं त्याने मागे टाकली. शेवटी गुहेच्या तोंडाशी पोहोचताना झेब्र्याला गेंडा दिसला. अधू डोळ्यांच्या गेंड्याने फार ढगळ कोट घेतला होता. लहान पोरानं बापाचा अंगरखा घातल्यावर जसा दिसेल तसा त्याचा कोट ढगळ दिसत होता. गेंड्यानं शिंग घेतानाही ती सारख्या आकाराची घेतली नव्हती. शिवाय ती डोक्याऐवजी नाकावर खोचली होती. तात्पर्य, गेंडा अगदी ध्यान दिसत होता! पण स्वतः मात्र फार खूष होता.

झेब्रा गुहेत गेला तेव्हा एकच कोट शिल्लक राहिला होता. त्याच्यावर ठळक काळे-पांढरे पट्टे होते. झेब्र्यानं गुहेत सगळीकडं शोधलं, पण शिंगं दिसली नाहीत. बरीच वाट चालून आल्यामुळे झेब्रा भुकेलेला होताच. त्यानं होता तो पट्टेरी कोट घालून पाहिला तर तो अगदी झकास त्याच्या अंगाला आला. फार भूक लागल्यामुळं आपल्या अंगावर हा इतरांपेक्षा निराळा दिसतोय ह्याचा विचार झेब्र्यानं केला नाही. आपल्यासाठी शिंगं उरली नाहीत ह्याचं वाईट वाटून

घेतलं नाही.

इकडं सगळी जनावरं कुरणातल्या गवतावर चरत चरत एकमेकांच्या नव्या रूपाची तारीफ करीत होती. झेब्रा कुरणात पोचला आणि कुणाशी काही वटवट न करता खाली मान करून चरायला लागला. ते त्याचं दुपारचं जेवण होतं.

झेब्र्याच्या अंगावरच्या पट्टेरी कोटानं सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. जनावरांनी आरडाओरडा करून , टर उडवून झेब्र्याचं स्वागत केलं. काळवीट ओरडलं, "बघा रे ह्या आधाशी झेब्र्याला. ह्याच्या अंगावरचा डगला बघा. शिंगाशिवाय भुंडं असलेलं ह्याचं डोकं बघा."

काळवीटामागोमाग बाकी जनावरांनीही एकच गिल्ला केला. झेब्र्याला पर्वा नव्हती. खायला भरपूर हिरवं लुसलुशीत गवत असलं म्हणजे झालं. करायचं काय आहे शिंगांना ?

आजपर्यंत कधीही झेब्र्याला शिंगांची गरज नाही लागली. बघाल तेव्हा तो गोल गरगरीत दिसतो आणि त्याचं काळं पाढरं अंगही तजेलदार, चकचकीत असतं.



# ४.४३. आभाळातला जिराफ

(बुशमन लोकांमधील एक पुरातन दंतकथा)

आदिवासींचं म्हणणं आहे, काळ जेव्हापासून चालू झाला तेव्हा सूर्याला आपली आभाळातली वाट नीट माहीत नव्हती. प्रत्येक गोष्टीकडे कुतूहलानं टक लावून बघणं ही सवय जिराफाला होती. सृष्टीनिर्मात्याला वाटलं की सूर्याकडे लक्ष देण्याची कामगिरी जिराफावर सोपवावी. त्याची नजर राहिली म्हणजेच सूर्य चुकून भलतीकडे जाणार नाही.

आपल्यावर सोपवलेली कामगिरी जिराफानं मनापासून बजावली. (त्यानं एवढी चोख नजर ठेवली की, सूर्य कधीही भलत्या दिशेला गेला नाही.) जिराफाच्या कामगिरीवर निर्माता खूष झाला. त्याचा सत्कार करावा असं निर्मात्याच्या मनात आलं. आभाळातल्या काही चांदण्यांच्या मूळच्या जागा बदलून त्यानं त्या अशा पद्धतीने मांडल्या की तो आकार जिराफाचा वाटावा. आजही आभाळात तुम्हाला जिराफ दिसतो.

आदिवासी ह्या चांदण्यांच्या आकाराला 'टुटवा' (जिराफ) म्हणतात. रात्री प्रवास करताना दिशा कळावी म्हणून ते ह्या आभाळातील खुणेचा उपयोग करतात. इंग्रजी बोलणारे लोक टुटवाला *'सदर्न क्रॉस'* म्हणून ओळखतात आणि तेही दिशा कळण्यासाठीच त्याचा उपयोग करतात.



# ४.४४. मुलगा आणि अस्वल

(एस्किमो लोककथा)

[ एका गावातील शिकारी नदीच्या वरच्या भागात सांबरांची शिकार करण्यास गेलेले असताना रहस्यमयरित्या गायब होतो. त्याच गावातील एक तरुण आणि अनाथ असलेला मुलगा विलक्षण साहस आणि धोका पत्करून ते कुठे गेले होते हे कसे शोधून काढतो आणि एक सामर्थ्यवान शिकारी कसा बनतो, हे सांगणारी ही कथा थक्क करून सोडणारी आहे. ]

एका नदीच्या मुखाजवळ एक गाव होते. निष्णात शिकारी म्हणून त्या गावचे लोक प्रख्यात होते. गावातील एस्किमोंनी त्यांचे इग्लू अशा प्रकारे उभारलेले होते, की तिथून त्यांना समुद्राच्या बर्फावरील सील मासे जसे सहज दिसू शकत, तसेच अवतीभवतीच्या डोंगरांना ओलंडून येणारी उत्तर अमेरिकेतील सांबरेही सहज दिसू शकत. यामुळेच ते फार यशस्वी शिकारी होते.

डोंगरावर चढणाऱ्या सांबरांच्या शोधात एके दिवशी त्या गावातील लोकांची एक टोळी नदीतून गाव सोडून निघाली. लहान लहान होड्यांना वल्हवीत ते नदीच्या वरच्या बाजूने अनेक मैल गेले. पण ते परत मात्र कधीच आले नाहीत. काही काळ त्यांची वाट पाहून मग त्यांना शोधायला शिकाऱ्यांची छोटी टोळी रवाना झाली. त्या नदीतून गेलेली ती टोळीसुद्धा त्या छोट्या गावात कधीच परत आली नाही.

गावातील मागे राहिलेल्या लोकांना मग काळजी वाटू लागली. नक्की काय करावे, हे मात्र त्यांना कळेना. गेलेल्यांना शोधायला अजून काही शिकाऱ्यांना नदीतून पाठवले तर आधीच्यांप्रमाणेच तेही हरवतील किंवा नाहीसे होऊ शकतील अशी भीती त्यांना वाटू लागली.

अगदी लहान असतानाच ज्याचे आई-वडील मरण पावले आहेत असा एक

तरुण मुलगा त्या गावात राहत होता. पोरका असल्याने तो अत्यंत गरीब होता. आपली स्वतःची होडी असावी आणि आपण मोठे शिकारी व्हावे अशी इच्छा मात्र तो मनात बाळगून होता. जेव्हा त्याला कळले, की गावातील शिकाऱ्यांच्या दोन टोळ्या गायब झाल्या आहेत, तेव्हा त्यांना शोधायला आपण एकट्याने जावे असे त्याला वाटू लागले. म्हणून त्याने गावातील एका वृद्धाला विचारले, की जर त्याला भाला, होडी या गोष्टी उसन्या मिळू शकल्या तर गायब झालेल्या माणसांना तो शोधू शकेल.

यावर त्या वृद्धाने धोक्याची सूचना दिली. " तू जर नदीतून वरच्या बाजूला गेलास, तर इतर शिकाऱ्यांप्रमाणे तू सुद्धा कदाचित कधीच परत येऊ शकणार नाहीस. तथापि हा धोका पत्करण्याची तुझी तयारी असेल, तर माझी होडी आणि भाला या गोष्टी मी तुला वापरायला दिल्या असे समज. खाली नदीकिनारी त्या आहेत."

मग मुलाने वेळ घालवला नाही. मोठ्या त्वरेने तो खाली होडीकडे गेला आणि अगदी जल्दीने त्याने होडीला वरच्या दिशेने नदीत लोटले. तो फार मोठा प्रवास होता; म्हणून प्रवासात आपल्या भाल्याने त्याने बदक आणि मासे मारले. अगदी अचूक नेम साध्य होइपर्यंत त्याने आपल्या भाल्याने चांगलाच सराव केला. नेमबाजीत मग तो इतका तरबेज झाला, की केवळ एका भाला फेकीत तो डोक्यावर उडणाऱ्या पक्ष्यांना अचूक मारू शकत असे.

नदीच्या वरच्या बाजूने अनेक दिवस नाव वल्हवीत नेल्यानंतर नदीच्या किनारी काही इग्लू त्याला दिसले. त्या इग्लूंना पाहून त्याने विचार केला, 'ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे. नदीच्या वरच्या बाजूला इतक्या दूरवर गाव असल्याचे तर मी कधीच ऐकले नव्हते. तेव्हा कदाचित गायब झालेल्या शिकाऱ्यांची ती छावणी असावी किंवा त्यांना इथे कैदेत ठेवले असावे.'

त्या गावात नेमके कोण राहते, याची खात्री नसल्याने सावधपणे तो त्या इग्लूंना सामोरा केला. त्या वसाहतीपासून बऱ्याच दूर अंतरावर खालच्या बाजूला त्याने आपली होडी न दिसेल अशा प्रकारे लपवून ठेवली. मग

आपल्याबरोबर त्याने त्याचा धारदार भाला व काही मृत पक्षी घेतले आणि सर्वात जवळच्या इग्लूजवळ तो रांगत रांगत गेला. आपल्याला कुणी पाहिले नाही याची खात्री करून घेण्यासाठी त्याने सभोवताली नजर टाकली. नंतर तो त्या इग्लूत शिरला. आत तो एकटाच होता. नंतर तो इतर इग्लूंमध्येही शिरला. पण ते सर्वच रिकामे होते.

गायब झालेल्या शिकाऱ्यांचे जर हे इग्लू असतील तर सध्याही ते शिकार करीत असलेच पाहिजेत, असा त्याने विचार केला. मग अनेक ओसाड इग्लूंपैकी एकात विश्रांतीसाठी तो लवंडला. त्यातील माणसे परत येण्याचीही तो वाट बघत होता.

विश्रांती घेत असताना त्याला असे जाणवले, की काहीतरी किंवा कुणीतरी येते आहे. म्हणून अतित्वरेने तो इग्लूच्या काळोख्या कोपऱ्यात दडला. तिथून तो प्रवेशव्दाराकडे पाहू लागला. लवकरच त्या भोकातून काहीतरी येत असलेले त्याला दिसले. ते सर्व जरी काळे होते तरी त्याचे तोंडच फक्त त्याला दिसू शकले. खाण्यासाठी ते तोंड इग्लूत हुडकीत होते. प्रवासाच्या सुरुवातीलाच ज्या बदकांना त्याने मारले होते, त्यांपैकी एकाला त्याने लगेच समोर फेकले. अधाशीपणे त्या तोंडाने ते मृत बदक घेतले व ते तोंड अदृश्य झाले.

कोपऱ्यात लपलेल्या मुलाचा थरकाप उडाला होता. कारण ते तोंड एका अस्वल-मानवाचे आहे हे त्याने ओळखले होते. या प्राण्यांविषयी त्याने भयंकर गोष्टी ऐकलेल्या होत्या. आपले केसाळ कोट काढून ठेवून हे प्राणी माणसांप्रमाणे इग्लूमध्ये राहतात हे त्याने ऐकले होते. त्याला हेही आठवले, की त्यांच्या गावात येणाऱ्या माणसाला ते मारून खातात. तो हे जाणून होता, की हे प्राणी अत्यंत धोकादायक असतात. काही मिनिटानंतर तो अस्वल-मानव परत आला. त्या भुकेल्या व तीक्ष्ण दातांच्या प्राण्यांकडे त्या मुलाने परत एकदा मृत बदकांपैकी एक बदक फेकले. असे काही वेळ चालल्यावर त्या मुलाच्या असे लक्षात आले, की त्याच्याकडील सर्व पक्ष्यांना त्या अस्वल-मानवाने खाऊन फस्त केले आहे. पुढच्यावेळी जेव्हा तो प्राणी येईल तेव्हा तो त्या मुलालाच खाऊन टाकीला !

मुलगा सापळ्यात अडकला होता. त्याने विचार केला, 'माझ्याबाबत जसे घडते आहे तसे माझ्या गावातील शिकाऱ्यांबाबतही निश्चित असेच घडले असले पाहिजे. ते इथेच आले असावेत आणि या महाभयंकर अस्वल - मानवाने त्यांना खाऊन टाकले असावे.'

वास्तविक तो अतिशय घाबरलेला होता, पण त्याला मोठा शिकारी बनायचे असल्याने त्याने एक योजना आखली. जेव्हा तो अस्वल-मानव त्याचे डोके इग्लूमध्ये अन्नासाठी खुपसेल, त्यावेळी त्याच्याकडे भाला फेकायचा, असे त्याने ठरवले. पुढच्यावेळी जेव्हा त्या अस्वल-मानवाने इग्लूत डोके खुपसले, तेव्हा त्या मुलाने अगदी काळजीपूर्वक नेम धरून त्याच्याजवळ असलेली, मोठे व्हेल मासे मारायची जी बरची होती ती सर्व शक्तीनिशी त्या अस्वल-मानवाच्या डोक्याच्या दिशेने फेकली. त्या बरचीचे पुढचे टोक त्या प्राण्यात खोलवर घुसले; तरी त्यामुळे तो प्राणी काही लगेच मारला गेला नाही. आत घुसलेली ती बरची बाहेर उपसून काढण्याचा त्याने प्रयत्न केला पण बरचीचे दोन तुकडे झाले. आपल्या जीवाला धोका आहे हे लक्षात घेऊन तो हलकेच त्या इग्लूतून पळून गेला आणि त्यापेक्षा आकाराने लहान असलेल्या इग्लूचा त्याने आश्रय घेतला.

त्या इग्लूमध्ये दोन वृद्ध अस्वली-मानव होत्या. स्वतःजवळ असलेल्या चामडे सोलण्याच्या चाकूसह तो मुलगा त्यांच्यावर तुटून पडला आणि त्याने त्यांना मारून टाकले. दोघींपैकी एकीला त्याने सोलले आणि तिच्या केसाळ कातडीच्या कोटाने त्याने स्वतःचे शरीर झाकून टाकले. नंतर तो इग्लूच्या भिंतीकडे कलला आणि अस्वली-मानव झोपल्याप्रमाणे पडून राहिला. त्याचे हे सर्व काही पूर्ण होते आहे तोच त्या इग्लूच्या प्रवेशव्दाराजवळ कुणीतरी आल्याची चाहूल त्याला लागली.

एक मोठ्ठा अस्वल मानव त्या छोट्या इग्लूत प्रवेशला आणि म्हणाला,"तुमच्या या इग्लूजवळील इग्लूमध्ये आपल्यातल्या एका महान शिकाऱ्यावर हल्ला झाला असून त्याच्या शरीरात एक बरची रुतून बसली आहे.

त्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणावर त्रास होतो आहे. तुम्ही तिथे येऊन त्याची नीट काळजी घेतली पाहिजे."

अस्वली कातड्याचा केसाळ कोट धारण केलेल्या त्या मुलाने उत्तर दिले. "मी लांबपर्यंत चालू शकत नाही. मी फार थकलो आहे आणि माझी सोबतीण गाढ झोपली आहे. तिला झोपेतून उठवण्याची माझी इच्छा नाही. तिला विश्रांतीची आवश्यकता आहे."

परंतु त्या अस्वली-मानवाने आग्रहच धरला. तो म्हणाला,'तू यायलाच पाहिजेस. मी तुला उचलून त्या इग्लूपर्यंत घेऊन जातो. तू जर त्याला मदत केली नाहीस तर तो मरून जाईल.

मुलाने ओळखले की त्याला जावेच लागेल. म्हणून आपल्या पायांवर तो अगदी सावकाश उठला आणि म्हाताऱ्या बाईप्रमाणे कापत चालू लागला. मग त्या अस्वल-मानवाने त्याचा एक हात एकदम पकडला आणि त्याला जवळच्या इग्लूकडे ओढत नेऊ लागला. जरी त्या मुलाने वृद्ध अस्वली- मानवाप्रमाणे अभिनय केला असला तरी तो तसा पूर्णपणे करू शकत नव्हता. अस्वल-मानव यामुळे संशयी बनला. तो म्हणाला, "नेहमीपेक्षा तू अधिक बलवान वाटत आहेस, ते कशामुळे ?"

यावर मुलाने तात्काळ विचार करून उत्तर दिले, "माझ्या जखमी बांधवाला मदत करता यावी म्हणून माझ्या सर्व शक्तिनिशी मी चालण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून मी तुला शक्तिमान किंवा बलवान वाटत असेन." या उत्तराने त्या अस्वल-मानवाचे समाधान झाले व त्याने अजून प्रश्न विचारले नाहीत.

पूर्वी ज्या इग्लूमध्ये तो लपला होता, त्यात तो अस्वल-मानव पडलेला त्याला दिसला. त्या अस्वल मानवाच्या छातीत बरची रुतून बसलेली होती, मोठे व्हेल मासे मारायची बरची होती ती. आणि त्या तुटलेल्या बरचीचा दांडा त्याच्या छातीतून बाहेर आलेला होता. त्या मुलाने त्या खोलीत सर्वत्र पाहिले तेव्हा त्याला तिथे एक अणकुचीदार दगड दिसला. तेलाच्या दिव्यावर मुलगा तो दगड गरम करू लागला. हे करताना ज्याने त्या मुलाला इग्लूत आणले होते त्या

अस्वल-मानवाला तो मुलगा म्हणाला, "त्या बांधवात रुतलेली बरची ओढून काढायची आहे. पण त्या जखमेतून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी आधी मला हा दगड गरम करून त्या जखमेवर ठेवायचा आहे." यावर मग त्या अस्वल-मानवाने संमतिदर्शक मान हलवली.

तो मुलगा पुढे म्हणाला, "जेव्हा मी ती बरची ओढून बाहेर काढायच्या तयारीत असेन तेव्हा तू हा दिवा विझवायचास आणि मोठमोठ्याने आवाज करून ओरडायचे. जखम बरी करण्याच्या उपायाचाच हा एक भाग असून असे तू केलेच पाहिजेस."

यावर पुन्हा अस्वल-मानवाने संमतिदर्शक मान हलवली. नंतर मग त्या मुलाने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. सर्वात आधी त्याने त्या तुटलेल्या बरचीच्या दांड्याचा शेवटचा भाग पकडला आणि मग त्या अस्वल मानवाला त्याचे काम सुरू करायला सांगितले. ठरल्याप्रमाणे ती खोली मिट्ट काळोखाने पूर्ण भरून गेल्यावर मुलाने बरची बाहेर ओढून काढली आणि तो गरम झालेला दगड त्या जमखेत अगदी खोलवर बुडवला. जखमी अस्वल-मानव वेदनेने आक्रोश करू लागला. पण दुसऱ्या अस्वल-मानवाला त्याचा आक्रोश ऐकूही आला नाही. कारण सूचनेप्रमाणे तो अत्यंत मोठ्याने आवाज करीत होता.

क्षणभरात तो जखमी अस्वल-मानव मेला. नंतर तो मुलगा निसटून जाण्याच्या तयारीत होता. पण निसटण्यापूर्वी त्या मोठ्याने आवाज करणाऱ्या अस्वल-मानवाच्या हृदयात त्याने ती बरची खुपसली.

त्या अनाथ मुलाने ती तुटलेली बरची बाहेर उपसून काढली आणि मोठ्या चपळाईने तो त्याच्या होडीच्या दिशेने जितक्या वेगात पळणे शक्य होते तितक्या वेगात पळू लागला. होडीत त्याने उडी मारली आणि अत्यंत बेफामपणे वल्हवीत ती होडी नदीच्या खालच्या बाजूला नेऊ लागला.

त्या गावातील लोकांनी दोन मृत अस्वल-मानवांच्या किंकाळ्या ऐकल्या होत्या आणि त्या मुलाला पळून जातानाही पाहिले होते. त्यामुळे मग त्यांनी नदीच्या काठाकाठाने त्याच्या होडीचा पाठलाग करायला सुरुवात केली. लांब

अंतरापर्यंत त्यांनी त्या मुलाच्या होडीचा पाठलाग केला, पण त्याला पकडता येईल इतके त्याच्या जवळसुद्धा ते कधी पोचू शकले नाहीत. शेवटी त्यांनी तो नाद सोडून दिला आणि त्यांच्या घरी ते परत गेले.

समुद्रमार्गे तो मुलगा त्याच्या गावी पोचला आणि त्याच्या साहसाची गोष्ट त्याने सर्वांना सांगितली. आश्चर्यचकित झालेल्या शिकाऱ्यांना त्याने त्या अस्वलाचे कातडे दाखवले आणि तुटलेली 'हारपून' म्हणजे सील आणि मोठ्या माशांना मारायची बरचीही दाखवली. त्यामुळे मग गायब झालेल्या शिकाऱ्यांच्या दोन गटांचे काय झाले असावे, हे त्यांना पूर्णपणे कळून चुकले.

ज्या वृद्धाने त्या अनाथ मुलाला त्याची होडी आणि भाला या गोष्टी उसन्या दिल्या होत्या, त्याला मुलाने जे काही केले त्यामुळे समाधान वाटले. म्हणून त्याने मग त्या मुलाला ती होडी आणि मोठे व्हेल मासे मारण्याची नवी बरची देऊन टाकली. त्यावेळेपासून मग तो मुलगा मोठा पुरुष बनला आणि 'ग्रेट हंटर' किंवा श्रेष्ठ शिकारी म्हणून ओळखला जाऊ लागला.

(अरुण प्रभुणे : नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या अस्वल लोककथा)



# ४.४५. दहा पायांचे अस्वल

एकदा एक दहा पायांचे ध्रुवप्रदेशी अस्वल अलास्काच्या उत्तरेला असलेल्या समुद्रकिनाऱ्याजवळ राहत होते. समुद्रातील हिमपर्वत आणि दूरवर तरंगणाऱ्या हिमखंडाच्या पलीकडील सील माशांची शिकार करणे यात त्याचा बहुतांश वेळ ते घालवीत असे. त्यामुळे हे अस्वल एस्किमोंच्या दृष्टीस अगदी क्वचितच पडत असे. त्या अस्वलाला प्रत्येक बाजूने पाच पाच असे पाय होते. जेव्हा ते अस्वल चालत असे किंवा पळत असे तेव्हा ते त्याच्या एका बाजूच्या पाचही पायांवर चालून किंवा पळून पुढे जात असे. नंतर मग त्याचे दुसऱ्या बाजूचे पाय त्यामागे पडत. अनेक पाय असल्यामुळे पळताना कधी कधी त्याचे पाय एकमेकात गुंतून ते पडतही असे. म्हणून त्याचा बहुतांश वेळ पाण्यातच ते व्यतीत करीत असे.

गोरा माणूस आर्क्टिक महासागरावर पोहोचण्यापूर्वीची अर्थात फार जुन्या काळातील गोष्ट आहे. समुद्रावर तरंगणाऱ्या हिमखंडावर एक श्रेष्ठ 'एस्किमो' शिकारी सील माशांची शिकार करीत होता. त्याने सीलची शिकार केली आणि गोठलेल्या रमणीय भागावरून तो त्याच्या दूरवरच्या घराकडे त्या माशाला फरपटत ओढत घेऊन चालला होता. अचानकच त्याची दृष्टी एका चमत्कारिक दृश्यावर पडली. बर्फामध्ये एका ध्रुवप्रदेशी अस्वलाच्या पावलांचे ठसे उमटलेले त्याला दिसले; पण याबाबत त्याची खात्री होईना की एक अस्वल की अनेक ? दहा पायांच्या ध्रुवप्रदेशी अस्वलाच्या चमत्कारिक गोष्टी त्याने यापूर्वी ऐकलेल्या होत्या. गावापासून दूरवर अशा अस्वलाची शिकार केली गेल्याचेही त्याने ऐकले होते. पण अशा प्रकारचे अस्वल असू शकेल यावर त्याने कधी विश्वास ठेवला नव्हता.

एका हाताने त्या मृत सील माशाला त्याच्या मार्गाने फरपटत नेणे त्याने चालू ठेवले होते. मात्र दुसऱ्या हातात त्याने त्याचा लांब भाला धरून ठेवला होता.

नंतर त्याच्या मागे दहा फुटांवरच दहा पायाच्या ध्रुवप्रदेशी अस्वलाच्या पावलांचा बर्फावर आदळून उठणारा ध्वनी त्याला ऐकू आला. तो थांबला. त्याने आपल्या खांद्यावरुन मागे वळून पाहिले. त्याच्या मागून जवळ येणारी उंच अशी हिमराशी म्हणजे ध्रुवप्रदेशी अस्वल होते. हे पाहून तो शिकारी खूप घाबरला.

लगेचच त्याने तो मृत सील तिथेच टाकला आणि तो पळाला. भाला मात्र त्या शिकाऱ्याच्या हातातच होता. आपले दहा जड पंजे बर्फात रुतवत रुतवत दहा पायांचे ते मोठे अस्वल त्या शिकाऱ्यामागे पळत होते. मिनिटभर ते अस्वल थांबले. तो सील मासा त्याने खाऊन टाकला आणि नंतर पुन्हा ते घाबरलेल्या शिकाऱ्याचा पाठलाग करू लागले.

जवळ जवळ असलेले दोन प्रचंड मोठे हिमखंड त्या माणसाने बघितले. तिकडे त्या बाजूने तो पळाला आणि तिथे जाऊन लपला, पण दहा पायांच्या त्या अस्वलाने वासावरुन त्याचा माग काढला. ते भुकेलेले ध्रुवप्रदेशी अस्वल एका हिमखंडाच्या शिखरावर चढले आणि त्या दोन हिमखंडाच्या बरोबर मधोमध पडले. अस्वल जे पडले ते नेमके उलटे. तोंडाची व छातीची बाजू वर आली. पायही वर झाले. जेव्हा ते उठू लागले तेव्हा त्याचे पाय एकमेकात गुंतले. अडकले.

एस्किमो शिकाऱ्याने त्याचा तो जड भाला घेतला आणि सर्व शक्तिनिशी त्या दहा पायांच्या अस्वलाच्या छातीत खुपसला जाईल असा फेकला. त्या अस्वलाने त्याचे ते दहा मोठे पाय हवेत मागे पुढे झाडले आणि जिवावर उदार होऊन उठण्याचा प्रयत्न केला, पण लवकरच ते अस्वल मेले.

नंतर त्या शिकाऱ्याने त्या अस्वलाचे सर्वच्या सर्व म्हणजे दहाही पाय कापून आपल्या गावी नेले. पण त्याने दहा पायांचे ध्रुवप्रदेशी अस्वल मारले यावर कुणीही विश्वास ठेवला नाही. त्यानंतर मात्र कुणीही अशा प्रकारचे विलक्षण व समजण्याच्या पलीकडे असलेले ध्रुवप्रदेशी अस्वल त्या आर्क्टिक प्रदेशात कधीच बघितले नाही.

(अरुण प्रभुणे : नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या अस्वल लोककथा)

# ४.४६. पांढऱ्या अस्वलाची गोष्ट

(आइसलँडची लोककथा)

एक होता तरुण मुलगा. त्याचं नाव ओथुन. तो आइसलँड या बर्फानं भरलेल्या देशात राहत होता. त्याला आई होती. उन्हाळा आला की बर्फ वितळे आणि जहाजं इकडून तिकडं, तिकडून इकडं येऊ-जाऊ लागत. ही जहाजं जाताना येतांना बघून ओथुनला मोठं कुतूहल वाटे की, कुठं बरं ही जहाजं जात असतील, कुठून येत असतील ? आपणदेखील या जहाजातून जाऊन दूर दूर काय आहे, बघून यावं !

एकदा नॉर्वे देशाकडचं एक जहाज आईसलँडला पोचता-पोचता लवकर हिवाळा सुरू झाल्यामुळं बर्फात अडकलं. जहाजाचा कप्तान फिकिरीत पडला. सगळा हिवाळा जर आता इथंच काढावा लागला तर जहाजासकट आपण बर्फातच बुडून जाऊ असं त्याला दिसलं. आता काय करावं ? काय करायचं ते ताबडतोब करायला हवं. तो लगेच कामाला लागला. त्या कामात त्याला सर्वात अधिक मदत ओथुनची झाली. सबंध हिवाळाभर त्यानं काम केलं आणि जहाजाला वाचविलं. त्यानंतर वसंत ऋतू आला आणि बर्फ वितळू लागलं. हळूहळू जहाज मोकळं झालं.

जहाजाचा कप्तान खूष होऊन ओथुनला म्हणाला, बोल, तुला काय इनाम देऊ ? ओथुनपाशी उत्तर तयारच होतं. तो म्हणाला, ‘ मला तुमच्याबरोबर जहाजातून घेऊन चला.’ कप्तानानं आनंदानं त्याची मागणी मान्य केली.

घर सोडण्यापूर्वी ओथुननं तीन वर्ष पुरेल एवढं खाण्याचं सामान घरात बेगमी करून ठेवलं. तो आईला म्हणाला, ‘ मी देशोदेशी फिरून येणार आहे. ‘

आईनं विचारलं, ‘तू माघारी केव्हा येणार ? ‘

ओथून म्हणाला, ‘तीन वर्षांनी ! हा दाणागोटा संपेपर्यंत मी येतोच ! ‘

आई म्हणाली, ‘गेलास तिकडं सुख मिळालं, तर तिकडंच नाही ना राहणार ?

म्हाताऱ्या आईला नाही ना विसरणार ? '

ओथुन म्हणाला, 'नाही अम्मी, तुला मी कसा विसरेन ? मी स्वतःला एकवेळ विसरेन; पण आईला कसा विसरेन ? ' आणि मग आईनं जड अंतःकरणानं त्याला निरोप दिला.

ओथुन जहाजातून नॉर्वे देशाला आला. तेथून तो ग्रीनलँडला गेला. तिथं त्याला बर्फासारखीच पांढरीशुभ्र गुबगुबीत अस्वलं बघायला मिळाली. ती बघून त्याला फार आनंद झाला. एखादं असं अस्वल आपण पाळावं असं त्याच्या मनात आलं आणि तिथं बारा महिने कष्ट करून त्यानं जे पैसे कमावले होते ते सर्व एक अस्वलाचं पिल्लू खरेदी करण्यात खर्च केले ! त्याला खूप आनंद झाला. आता त्याच्याजवळ होतं काय ? अंगावरचे कपडे अन् एक पांढरं शुभ्र गुबगुबीत अस्वलाचं पिल्लू !

ग्रीनलँडला असताना त्यानं स्वीडनचा राजा स्वीन याची कीर्ती ऐकली की हा राजा धार्मिक वृत्तीचा आहे आणि तो तीर्थयात्रा करणाऱ्यांना पुष्कळ मदत करतो. ओथुनला तीर्थयात्रा करण्याची अन् धर्मगुरू पोप यांचे दर्शन घेण्याची फार इच्छा होती. त्यानं विचार केला, हे अस्वल आपण राजा स्वीनला भेट म्हणून द्यावं आणि त्याच्या कृपेनं रोमची तीर्थयात्रा सुखानं करावी !

तो आपल्या अस्वलाला घेऊन डेन्मार्कला जायला निघाला, वाटेत जहाज नॉर्वेच्या किनाऱ्याला नांगरून पडलं. तेव्हा ओथुन ते पिल्लू घेऊन नॉर्वेच्या भूमीवर उतरला. नॉर्वे देशाचा राजा हेरल्ड नावाचा होता. ओथुन चालत चालत राजधानीच्या शहरातून जात असताना त्याच्यामागं जाणारं ते गुबगुबीत सुंदर अस्वल बघून प्रत्येकाला मजा वाटली. लोकांच्या तोंडी होता-होता ही बातमी राजाच्या कानापर्यंत पोचली. पांढरं शुभ्र अस्वल बाळगावं अशी राजाला स्वतःला फार हौस होती. त्यानं ओथुनला बोलावून आणलं.

राजा त्याला म्हणाला, 'ऐकलंय, की तुझ्यापाशी एक फार मोलाचं रत्न आहे!'

ओथुन राजाला सलाम करून म्हणाला, 'रत्न, आणि ते माझ्यासारख्या गरीब माणसापाशी ? हे अंगावरचे कपडे अन् हे अस्वल याखेरीज दुसरं काही

नाही.'

राजा लगेच म्हणाला,'अरे तेच ! ते अस्वल हेच रत्न मी म्हणतो. असं रत्नं राजापाशीच शोभेल. तुझ्यासारखा कंगाल माणूस त्याला कसा सांभाळणार ? म्हणून ते अस्वल मला विकत दे. तू त्याचे पैसे मागशील तेवढे मी तुला देईन !'

ओथुन म्हणाला, 'क्षमा करा महाराज, मला ते विकायचं नाही.'

राजा म्हणाला, 'तू मागशील त्याच्या दुप्पट पैसे देतो, ते मला दे.'

ओथुन म्हणाला, ' मला माफ करा. ते होणार नाही.'

राजा म्हणाला, 'चौपट पैसे देतो.' तरी ओथुननं नकारच दिला.

राजानं विचारलं, 'विकायचं नाही तर काय मला ते तू भेट देणार आहेस ?' तरी ओथुन हात जोडून 'माफ करा महाराज' म्हणाला,

राजा म्हणाला, 'विकायचं नाही, भेट म्हणून द्यायचं नाही. तर या अस्वलाचं तू काय करणार आहेस ? तुझे स्वतःचे खाण्याचे हाल; मग अस्वलाचं पोट तू कसं भरणार ?'

ओथुन म्हणाला, 'ते काही जन्मभर मी पाळणार नाही, ते मला डेन्मार्कचा राजा स्वीन याला नजर करायचं आहे. तोवर मी त्याला काहीही करुन सांभाळीन.'

हे ऐकून राजाला राग आला. कारण डेन्मार्कच्या राजाशी त्याचं फार वर्ष वैर होतं; आणि त्यांच्या सतत लढाया होत होत्या. म्हणून ओथून अस्वल आपल्याला भेट म्हणून न देता आपल्या शत्रूला भेट देणार ही गोष्ट त्याला कशी रुचणार ? पण त्यानं आपला राग लगेच आवरला आणि तो म्हणाला, 'म्हणजे तुला येथून डेन्मार्कला जायची इच्छा आहे ?'

ओथुन 'हो' म्हणाला. राजा म्हणाला, 'पण तिकडं जाण्याचा रस्ता धोक्याचा आहे. आमच्या सारख्या लढाया सुरू आहेत. वाटेत चोर-लुटारुही फिरत असतात. नागड्या-उघड्या माणसालाही ते जाऊ देत नाहीत. मग हे किंमती अस्वल घेऊन तू कसा जाणार ?'

ओथुन म्हणाला, 'अस्वल राजा स्वीनला भेट म्हणून द्यायचा माझ्या मनाचा

निश्चयच आहे. तेव्हा वाटेल ती जोखीम पत्करावी लागली तरी ती पत्करून मला जायलाच हवं!'

राजा विचारात पडला. थोड्या वेळानं तो म्हणाला, 'ठीक , तू जा; पण तू डेन्मार्कला सुरक्षितपणे पोहोचावस याची जबाबदारी माझी आहे असं मी समजतो. वाटेत तुला काही झालं किंवा तुझं मोलाचं अस्वल चोरलं गेलं तर तो माझ्या नावाला काळा डाग लागेल की हे तुझं अस्वल मीच काही कपट करून पळविलं! म्हणून मी तुला ही माझी खुणेची अंगठी देतो. जिथं तुला धोका वाटेल, तिथं ही अंगठी दाखविलीस की माझी माणसं तुला त्यातून सोडवून पुढं नेतील. त्यानं तुला कुठं अडथळा येणार नाही. पण तुला एक माझी सूचना आहे. तू परत येशील तेव्हा मला मुद्दाम भेटायचं आणि राजा स्वीननं तुझी कशी कदर केली ते मला सांगायचं. एवढं करशील?

ओथुननं ती सूचना मान्य केली आणि राजानं दिलेली खुणेची अंगठी घेऊन त्याचे मनापासून आभार मानले. खुश्कीच्या म्हणजे जमिनीवरच्या रस्त्यानं जाताना ठिकठिकाणी लढाईचे मोर्चे बांधले होते. त्यातून त्याला जावं लागलं; पण राजा हेरल्डनं दिलेल्या खुणेच्या अंगठीनं त्याचं काम बिनधोकपणे पार पडलं. ज्याच्यापाशी राजाच्या खुणेची ती अंगठी असेल, तो खुद्द राजाचा दूत समजला जाई; त्यामुळं ठिकठिकाणच्या सैनिकांनी ओथुनला त्याच्या अस्वलासह पुढं पुढं नेऊन सोडलं. असा जात-जात तो नॉर्वेच्या सीमेपर्यंत पोचला आणि तेथून जहाजात बसून डेन्मार्कला गेला.

डेन्मार्कला तो पोचला; पण कित्येक दिवस त्याला उपास काढावे लागले. त्याच्या अस्वलालाही पुरतं खायला मिळालं नव्हतं; त्यामुळं दोघंही उपासमारीनं व्याकुळ झाले होते. म्हणून डेन्मार्कच्या किनाऱ्याला पाय लागताच ओथुन अन्नाचा शोध करू लागला. जमिनीवर पाय ठेवताच तिथला कोतवाल प्रथम त्याला भेटला. देशा-परदेशातून कोण येतं, कोण जातं, याचा तपास काढण्याचं त्याचं काम होतं. पांढरं अस्वल बघून त्या कोतवालाचं मन लालचावलं. त्यानं ओथुनला हाक मारली. ओ परदेसी! कुठं चाललास? थांब!

ओथुन एकदम थबकला. त्यानं हा कोणी सरकारी कोतवालासारखा अंमलदार असावा हे ओळखलं तो त्याला म्हणाला, 'आपण कोतवाल कां ? मला अन् माझ्या या अस्वलाला काही खायला मिळण्याची सोय होईल का हो ?'

कोतवाल मिशीवर हात फिरवीत म्हणाला, 'होईल, होईल का नाही होणार ? पण पहिले हे मला सांग, की हे अस्वल घेऊन तू कुठं चाललायस ?

ओथुन म्हणाला, ' मी हे अस्वल राजा स्वीनना भेट देण्यासाठी आणलं आहे.

कोतवाल नाकपुड्या फुगवून म्हणाला, 'राजा स्वीनना ? अस्सं काय ? पण काय रे, तुझ्या आणि तुझ्या अस्वलाच्या पोटभर खाण्याची मी सोय केल्याबद्दल मला काय तू देणार ? '

ओथुन म्हणाला, ' मी हा असा कंगाल माणूस; आपल्याला काय देऊ शकणार ? '

कोतवाल म्हणाला,'कां नाही ? राजाला भेट देणार ना हे अस्वल ? मग या अस्वलात माझा भाग काय ? '

ओथुन म्हणाला, 'अस्वलात ? तुमचा भाग ? '

कोतवाल म्हणाला, 'हां हां, अर्धा भाग ! राजाकडून तुला परत भेट जी मिळेल, त्यातला अर्धा भाग मला देत असलास तर तुझी सारी व्यवस्था मी करतो. बोल. नाही तर तू आणि तुझं हे अस्वल उपाशी मार !'

ओथुनला स्वतःला तर भुकेनं खाल्लंच होतं; पण त्याहून देखील आपल्या अस्वलाची भुकेनं चाललेली तडफड बघून त्याला कोतवालाचं म्हणणं मान्य करावंच लागलं. कोतवालानं दोघांच्या भरपूर खाण्या-पिण्याची व्यवस्था केली आणि त्यांना राजाच्या वाड्याकडं घेऊन जाऊन राजापुढं नेऊन उभं केलं.

राजानं ओथुनला विचारलं, 'तू कोण आहेस ? कुठून आलास ? '

ओथुननं विनयपूर्वक आपली ओळख करून दिली आणि तो म्हणाला, ' महाराज, मी ग्रीनलँडहून हे पांढरंशुभ्र अस्वल आपल्याला भेट म्हणून देण्यासाठी आणलं आहे. हे अस्वल खरेदी करण्यासाठी मी माझ्याजवळचा सगळाचा सगळा पैसा खर्ची घातला आहे. माझं आणि माझ्या या अस्वलाचं पोट

भरण्यापुरतंसुद्धा माझ्यापाशी काही उरलेलं नाही. मला भीक मागावी लागत आहे. वाटेत मी नॉर्वे देशात उतरलो. तिथल्या राजा हेरल्डनं माझ्याकडं या सुंदर अस्वलाची मागणी केली, चौपट किंमत देतो म्हणाला; पण मी त्याला ते दिलं नाही. मी तिकडं चाललो आहे. हे एकून राजा हेरॉल्डचं आपल्याशी शत्रुत्व असतानादेखील त्यानं मला शांतपणे जाऊ दिलं. इतकंच नव्हे तर मला वाटेत कुणाचा त्रास होऊ नये, अडथळा होऊ नये म्हणून त्यानं आपली खुणेची अंगठीसुद्धा मला दिली. त्या अंगठीच्या बळावर मी येथपर्यंत सुरक्षित येऊन पोचू शकलो. पण इथली भीक मला महाग पडली, महाराज ! भीक पदरात घेण्यासाठी अस्वलाचा अर्धा हिस्सा मला द्यावा लागला !'

स्वीन राजाला आश्चर्य वाटलं. त्यानं विचारलं, 'अं ? काय म्हणालास ?'

'होय, खरं सांगतो महाराज, एका वेळचं माझं अन् या अस्वलाचं पोट भरण्याकरिता मला अस्वलाचा अर्धा भाग देण्याचं कबूल करावं लागलं. म्हणून मला वाटलं की ताबडतोब आपले दर्शन घेऊन हे अस्वल आपल्याला एकदाचं नजर करून टाकावं. मग माझं पुढं काय व्हायचं असेल ते होवो !'

हे ऐकून राजा स्वीन म्हणाला, 'काय ? माझ्या राज्यात अशी गोष्ट घडते ?'

ओथुन म्हणाला, 'या कोतवालसाहेबांनाच विचारा ना ! तेच माझ्या अस्वलाच्या मिळकतीत अर्धे भागीदार आहेत !'

कोतवाल दूर उभा होता. आपल्याकडं बोट दाखवून परदेशी राजाला काही सांगतो आहे हे त्याला दिसलं अन् तो घाबरला. रागानं राजाचे डोळे लाल झाले. तो म्हणाला, 'कोतवाला, तुला लोकांचं रक्षण करण्यासाठी नेमलं असताना तू त्यांना लुबाडतोस ? या माणसानं आपला सगळा मिळकतीचा पैसा खर्चून जिवावरच्या जोखमी सोसून इथवर हे अस्वल मला भेट देण्यासाठी आणलं आणि तू त्यात सौदा केलास ? माझ्याशी वैर करणाऱ्या हेरल्ड राजानंदेखील याला डेन्मार्कला येण्याच्या सर्व सोयी करून दिल्या; आणि तू त्याला लुबाडायला निघालास ? दुष्टा, तू माझं नाक खाली करायला लावलंस ! तुला सुळावर चढविण्याची शिक्षा द्यावी असं माझ्या मनात येतं; पण राजानं एवढा राग

धरणं बरं नाही असं राजनीती सांगते, म्हणून मी तुला फक्त या देशातून हद्दपार करण्याची शिक्षा करतो ! शिपाई, या कोतवालाच्या अंगावरचे सर्व कपडे काढून घ्या आणि त्याला या देशाच्या हद्दीबाहेर हाकलून द्या !'

मग ओथुनकडं वळून तो म्हणाला, 'तुझ्या या सुंदर आणि प्रेमळ भेटीचा मी आनंदानं स्वीकार करतो, तुझ्या मनाला वाटेल तितके दिवस तू माझा पाहुणा म्हणून इथं राहा ! '

राजा स्वीननं ओथुनला मोठ्या सन्मानानं ठेवून घेऊन त्याचा पाहुणचार केला. थोड्या दिवसांनी ओथुन राजाला म्हणाला, ' महाराज, आता मला परवानगी द्या ! '

राजानं विचारलं, 'का ? कंटाळा आला ? '

'आपल्या सहवासात आणि सुंदर देशात कुणाला कंटाळा कसा येईल ? पण मी इथं आलो तो मनात एक इच्छा धरून.'

'काय तुझी इच्छा आहे? '

'धर्मक्षेत्र रोमला जाऊन तिथं धर्मगुरू पोप महाराजांचं दर्शन घेण्याचं फार दिवस माझ्या मनात आहे. आपण यात्रेकरुंची सोय करता असं मी ऐकलं होतं; म्हणून मी आपल्याकडं आलो ! '

काही हरकत नाही. 'तुझ्या या धर्मयात्रेची आम्ही सगळी सोय करून देतो,' असं म्हणून राजानं ओथुनच्या रोमच्या यात्रेची सर्व तयारी करून दिली.

ओथुन तीर्थयात्रेला निघाला. त्यानं रोमला जाऊन धर्मगुरु पोप यांचं दर्शन धेतलं आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. मग तो तिथून परत फिरला. वाटेत तो आजारी पडला. या आजारात त्याच्याजवळ होता -नव्हता, तो सारा पैसा खर्च होऊन गेला. इतके त्याचे हाल झाले की कित्येक दिवस त्याला उपाशीपोटी काढावे लागले. तो केवळ हाडांचा सापळा राहिला. अशा अवस्थेतदेखील त्यानं आपला प्रवास चालूच ठेवला आणि तो कसाबसा डेन्मार्कला येऊन पोचला.

पण अशा भिकारी अवस्थेत राजाकडं जाऊन त्याला भेटावं कसं ? म्हणून तो धर्मशाळेत राहिला. इतक्यात ईस्टरचा सण आला. त्या दिवशी राजा प्रार्थना

करण्याकरिता देवळात जाणार, त्यावेळी त्याच्या नजरेला पडण्याची संधी घ्यायची असं त्यानं योजलं. म्हणून त्या दिवशी तो देवळाच्या वाटेवर एका कोपऱ्यात जाऊन उभा राहिला.

राजाची स्वारी देवळात आली. प्रार्थना करुन तो देवळाच्या बाहेर पडला. तेव्हाच त्याच्यापुढं व्हावं असं ठरवून ओथुन रस्त्यात पुढं झाला; पण राजाच्या बरोबर लवाजमा मोठा असल्यामुळं त्या गर्दीत तो बाजूला ढकला गेला. पण राजाची सगळीकडं फिरणारी नजर त्याच्यावर पडली आणि त्यानं 'हा कोण कंगाल, अस्थिपंजर माणूस आहे, त्याला माझ्याकडं आणा' असा हुकूम केला. सेवकांनी ओथुनला धरून राजा स्वीनपुढं आणलं. राजा त्याला विचारणार होता की तो कोण,कुठला,एवढ्यात त्याला ओथुनची ओळख पटली आणि तो उद्गारला,'कोण ? ओथून ? अरे, काय तुझी दशा ही ?' त्यानं त्याला आदरपूर्वक आपल्याजवळ घेतलं आणि तो राजवाड्यात आला. त्याला राजानं आपल्याजवळ घेतलेलं पाहून दरबारी माणसं हसू लागली. तेव्हा राजा म्हणाला,'अरे, तुम्ही त्याला नाही हसत; मला हसता ! याचं शरीर हाडांचा पिंजरा झालाय्, हा कंगाल झाला म्हणून काही तो तुच्छ ठरत नाही. त्याचं शरीर कंगाल असलं तरी आत्मा श्रीमंत आहे. हा कष्टी आहे. कष्ट देणारा नाही; म्हणून देवाची याच्यावर कृपा आहे.' हसणारे खजील होऊन गप्प बसले. राजा ओथुनला आपल्या बरोबरच घेऊन गेला आणि आपल्याच महालात त्याला त्यानं ठेवून घेतलं. तो त्याच्याकडून वरचेवर त्याच्या तीर्थयात्रेच्या हकिगती आणि अनुभव ऐकत राहिला. इतक्या तरुण वयातसुद्धा खूप अनुभव मिळाल्यामुळं तो अधिक शहाणा झाला होता. राजा म्हणाला, 'ओथुन, तू आता इथंच रहा. माझ्या दरबाराचं रत्न म्हणून तुला मी मानीन ! '

ओथुन म्हणाला, 'तीन वर्षं पुरी व्हायला आली. मला आता आईसलँडला जाऊन पोचलं पाहिजे ! '

राजा म्हणाला, 'त्या बर्फाळ मुलुखात तुझं काय पुरून ठेवलंय् ? '

ओथुन शांतपणे म्हणाला, 'माझी आई वाट पाहत आहे !' हे शब्द बोलाताना

त्याच्या डोळ्यांत अश्रू तरारले. राजाच्या मनावर त्या शब्दांचा परिणाम झाला.

ओथुन म्हणाला, 'माझ्या आईला मी तीन वर्षांची मुदत सांगून निघालो होतो. तिची तीन वर्षांचीच बेगमी करून मी बाहेर पडलो होतो. इथं मी मजेत रहायचं अन् तिनं तिथं माझी वाट बघत दुःखात दिवस काढायचे हे मला कसं बरं वाटेल?

मग राजानं त्याला घरी जाण्याची परवानगी दिली; आणि त्याच्यासाठी जहाजाची सोयही करुन दिली. थोड्या दिवसांनी राजा स्वीन ओथुनला घेऊन बंदरावर गेला. तिथं बरीच जहाजं उभी होती; पण त्यातसुद्धा एक जहाज अतिशय सुंदर होतं. राजा म्हणाला, 'कसं वाटतंय् हे जहाज ? पुष्कळ खर्च करून खास तुझ्यासाठी मी हे बनवून घेतलंय् ! '

ओथुननं पाहिलं आणि त्याच्या डोळ्यात कृतज्ञतेचे अश्रू आले. तो म्हणाला, 'इतकं सुंदर जहाज मी कधीच बघितलं नव्हतं ! '

राजा म्हणाला, 'तूच काय, कोणीच बघितलेलं नाही. हे मी तुला माझी भेट म्हणून बक्षीस देतो. तू मला अजोड असं अस्वल भेट दिलंस; तर मी तुला अजोड असं हे जहाज भेट देतो ! ओथुन राजाकडं आश्चर्यानं बघतच राहिला.

राजा म्हणाला, हे सगळं जहाज खाण्या-पिण्याच्या अन् अंगावर घालण्या-पांघरण्याच्या वस्तूंनी भरून ठेवलंय्. पुष्कळ वर्ष तुला त्या वस्तू पुरतील अन् तू मजेत राहू शकशील आणि तुझ्या आईला सुखात ठेवू शकशील. पण आइसलँडच्या समुद्रात बरेच छुपे खडक आहेत अन् तिथं जहाजं फुटण्याचा धोका सतत असतो असं ऐकतो. दुर्देवानं असं काही झालं आणि तुझं जहाज खडकावर आपटून फुटलं तर तू राजा स्वीनला भेटला होतास अन् त्यानं तुझा सत्कार केला होता हे कुणाला कसं कळणार ? थोडा वेळ थांबून त्यानं स्वतःचं उत्तर दिलंः 'ही सोन्याच्या नाण्यांनी भरलेली थैली घे. ती सदोदित तुझ्या कमरेला बांधून ठेव. जहाज बुडलं तरी ही थैली तरी तुझ्यापाशी राहील ! ' असं म्हणून त्यानं सोन्याच्या नाण्यांनी भरलेली एक चामड्याची थैली त्याला दिली. परत त्याच्या मनात आलं, 'सोन्या-रुप्याची नाणी तर पुष्कळांपाशी असतात, त्यात मी विशेष काय केलं ? थैली कदाचित हरवेल, चोरीलाही जाईल. मग

लोकांना कसं कळणार की तू राजा स्वीनचा पाहुणा अन् मित्र होतास?' विचार करुन त्यानं आपल्या बोटातली अंगठी काढून ओथुनच्या हातावर ठेवली अन् म्हणाला, 'ही तू तुझ्या बोटात घाल. देव न करो, पण दुर्दैवानं तुझं हे जहाज बुडलं, ही थैली हरवलीच, तरी निदान ही स्वीन राजाची अंगठी तुझ्यापाशी राहील. आणि ती तुला अन् लोकांना माझी आठवण करून देईल!'

थोडा वेळ थांबून पुनः तो त्याला म्हणाला, 'ही अंगठी तू कोणालाही देऊ नयेस असं तर मी म्हणू शकत नाही;पण द्यायचीच झाली तर जगात जो तुला मोठ्यातला मोठा माणूस वाटेल, त्याला ती तू खुशाल द्यावीस! '

आणि राजा स्वीननं ओथुनला प्रेमानं निरोप दिला.

ओथुनचं ते उत्कृष्ट जहाज नॉर्वेला पोचलं, तेव्हा राजा हेरल्डला दिलेल्या वचनाप्रमाणं ओथुन नॉर्वेच्या बंदरात उतरला आणि राजाला भेटायला गेला. त्याला पाहताच राजा हेरल्डनं त्याला ओळखलं. त्याला आपण काय सांगितलं होतं त्याचीही त्याला आठवण झाली आणि त्यानं मोठ्या उत्सुकतेनं विचारलं, 'राजा स्वीननं तुझा कसा पाहुणचार केला, सांग बघू!

ओथुन म्हणाला, 'फार छान!'

'तुझी अस्वलाची भेट त्यानं कशी स्वीकारली ?'

' मोठ्या आनंदानं अन् प्रेमानं!'

राजा हेरल्ड म्हणाला, 'तशी तर मीसुद्धा स्वीकारली असती! ' त्यात त्यानं विशेष काय केलं ?

मला रोमच्या यात्रेला जाण्याकरिता पैसे दिले.

'तसे तर तो नेहमीच पुष्कळांना पैसे देतो. त्यासाठी त्याला भेट द्यावी लागत नाही. पण त्यानं याहून विशेष काही केलं का ? सांग!'

'त्यानं मला आपल्या दरबारात राहण्याचं निमंत्रण दिलं. म्हणाला, मी तुला माझ्या दरबाराचं रत्न मानीन.'

हेरल्ड म्हणाला,'ही झाली फक्त तोंडचीच बात ! त्यानं तुला नुसती वचनंच दिली की आणखी काही दिलं ?

त्यानं माझ्यासाठी खास एक सर्वोत्कृष्ट जहाज बनवून दिलं. साधनं-

सामग्रीसहित!'

'अं:, ते तर मीही दिलं असतं. त्यानं त्यात विशेष काय केलं?'

त्यानं मला सोन्याच्या नाण्यांनी भरलेली ही थैली दिली. म्हणाला,'देव न करो, पण जर तुझं जहाज कदाचित् खडकावर आपटून फुटलं तर हे धन तुझ्या उपयोगी पडेल.' हे एकून राजा हेरल्ड म्हणाला, 'ही गोष्ट मात्र त्यानं विशेष केली खरी. हे करण्याचं मला सुचलं नसतं. दुसरं आणखी काय केलं?

ओथुननं आपल्या बोटात असलेली अंगठी दाखविली आणि म्हणाला, 'आपल्या बोटातली ही अंगठी काढून त्यानं मला दिली. म्हणाला, देव न करो, पण जर तुझं जहाज बुडालं, सोन्याची थैली हरवली, तरीसुद्धा माझी आठवण म्हणून ही अंगठी तुझ्यापाशी सदोदित राहील.'

'आणखी तो काय म्हणाला?'

'तो म्हणाला, 'ही अंगठी तू कुणालाही देवू नकोस असं काही मी म्हणत नाही; पण द्यायचीच झाली तर जगातल्या सर्वात मोठ्या माणसाची कृपा मिळत असेल तर ती खुशाल दे!'

थोडा वेळ थांबून ओथुन पुढं म्हणाला, 'आणि देवाच्या दयेनं जगातल्या ज्या सर्वात मोठ्या माणसाची कृपा मला मिळाली असं मला वाटतं, त्या श्रेष्ठ पुरुषाला ही अंगठी मी आता अर्पण करू इच्छितो. ही अंगठी मी आपल्याला अर्पण करतो. आपण तिचा स्वीकार करावा अशी माझी विनंती आहे.'

असं म्हणून त्यानं आपल्या बोटातून अंगठी काढली आणि ती राजा हेरल्डपुढं केली. राजा म्हणाला , 'थांब, मी जगातला सर्वात मोठा माणूस तू कसा ठरविलास? हे तुझे खुशामतीचे शब्द नाहीत काय?'

ओथुन निश्चयाच्या स्वरात बोलला, 'नाहीत महाराज!'

'कसे?'

ओथुन म्हणाला, 'मी पहिल्या प्रथम अस्वल घेऊन आपल्याकडे आलो होतो. त्यावेळी आपण मनात आणलं असतं तर सत्तेच्या बळावर माझं अस्वल काढून घेऊ शकला असता. अस्वलच नव्हे, तर माझं जीवनसुद्धा आपल्या हातात होतं. पण आपण तसं काही केलं नाही. उलट, आपल्या शत्रूकडं मी

जायचं म्हणालो तर मी सुरक्षित जावं अशी माझी सोय करून दिलीत. अशी उदारता आणि मानवता दुसऱ्या कुणी राजानं दाखविल्याचं माझ्या माहितीत नाही. म्हणून मी आपल्याला जगातला मोठ्यात मोठा माणूस मानतो; आणि आपली कृपा मला लाभावी याकरिता अन् स्वतःला भाग्यशाली समजून ही अंगठी मी आपल्याला अर्पण करतो. यायोगे राजा स्वीनचीही कीर्ती होईल, माझीही कीर्ती होईल आणि आपली कीर्ती तर आहेच!'

राजा हेरल्डने मग आनंदानं त्या अंगठीचा स्वीकार केला त्याच वेळी त्यानं जाहीर केलं की आजपासून नॉर्वेचं डेन्मार्कशी असलेलं शत्रुत्व कायमचं संपलं आहे. राज्यसभेत त्यानं ही घोषणा केली अन् सभेनं आनंदाचा जयघोष केला.

राजानं ओथुनला थोडे दिवस आपल्याकडं ठेवून घेतलं आणि नंतर पुष्कळ बहुमोलाच्या भेटी देऊन त्यानं त्याला निरोप दिला. ओथुन आपलं जहाज घेऊन देवाच्या दयेनं सुखरूप आपल्या देशाला पोचला. तो आपल्या घरी पोचला तेव्हा तिसऱ्या वर्षाचा तो शेवटचा दिवस होता आणि त्याची म्हातारी आई आपल्या मुलाच्या वाटेकडं डोळे लावून बसली होती. ओथुननं आई, 'आई' करीत आईच्या गळ्याला मिठी मारली!

(भाऊ धर्माधिकारी : देशोदेशीच्या लोककथा [भाग ९])

# ४.४७.
# अस्वलाचे आदरातिथ्य करणारा माणूस

[ या कथेतील अस्वलाची सहृदयता वाचकाच्या मनाला भावणारी आहे. अस्वलाने मानवी मूल सांभाळणे हाही भाग यात येतो. अस्वलाचे दुःख आणि माणसाचे दुःख तसेच दोघांचाही एकाकीपणा या गोष्टी वाचकाला निश्चितच अंतर्मुख करणाऱ्या आहेत. शत्रूलाही प्रेमाने आणि आदरातिथ्याने कसे जिंकता येते याचे उदाहरण म्हणूनही या लोककथेकडे बघता येते. माणूस-अस्वल यांच्या संबंधांचा शोध घेणारी ही कथा लक्षणीय आहे. ]

रेव्हन कुळातील एक माणूस त्याच्या लोकांबरोबर आनंदात राहत होता. एके दिवशी शिकारीहून परत आल्यावर त्याला असे समजले की, त्याचे सर्व कुटुंबीय आणि मित्र मारले गेले आहेत. त्याच्या टोळीतील अगदी अल्प लोक शिल्लक राहिले असले तरी गेलेल्या सर्व सहृदयांशिवाय जगणे त्याला असह्य वाटू लागले. त्याने विचार केला, 'मी जर शोधत दुसऱ्या गावाला गेलो, तर लोक असा विचार करू शकतात, की मी कुणी चेटूक करणारा जादूगारच आहे आणि चेटूक करून मीच माझे कुटुंब नष्ट केले आहे. लोकांनी असा विचार करणे ही गोष्ट माझ्यासाठी किती लाजिरवाणी आहे. त्यापेक्षा मीच माझा नाश करतो आणि जे माझे वंशीय ज्या चैतन्यतत्त्वाच्या प्रवासाला निघाले आहेत त्यांच्यात जाऊन मीही सामील होतो. '

मग तो जंगलात फिरू लागला. स्वतःलाच मारण्याविषयी मनात धैर्य गोळा करू लागला. शेवटी त्याला एक कल्पना सुचली. 'मी आता अस्वलांना शोधतो. त्यांनाच आता माझ्याकरता काम करू द्या.' असे तो स्वतःशी म्हणाला.

ज्यात सॅमन मासे आहेत अशा मोठ्या ओढ्याच्या मुखाशी त्याला

अस्वलांची पायवाट आढळली. त्या पायवाटेवर तो झोपला. मनात असा विचार केला, की जेव्हा अस्वले ओढ्याच्या प्रवाहातील सॅमन मासे खायला येतील तेव्हा ते त्याला मारून टाकू शकतील. अस्वलांच्या पायवाटेवर झोपलेल्या त्या माणसाला दिसले, की अनेक ग्रिझली अस्वले त्याच्याकडे चालत येत आहेत. प्रत्यक्ष अस्वले दिसताच तो माणूस खूप घाबरला. त्याला त्याचा भयानक मृत्यू दिसू लागला. त्याला हेही दिसू लागले, की ती अस्वले त्याच्या शरीराचा अवयव न् अवयव तोडून त्याचे तुकडे तुकडे करीत आहेत.

अस्वलांमधले सर्वात मोठे अस्वल जमिनीवर पडलेल्या त्या माणसाकडे पाहून वाकले. वाकलेल्या अस्वलाचा उघडलेला जबडा पाहून घाबरून गेलेला तो माणूस थरथरत्या आवाजात म्हणाला, 'तुम्हाला मेजवानीचे आमंत्रण देण्यासाठी मी इथे आलो आहे.' हे वाक्य ऐकताच त्या अस्वलाचा उघडलेला जबडा क्षणार्धात गपकन् मिटला. त्याची टोकदार झालेली पांढरी लोकर लुळी पडली.

अस्वलाचा मिटलेला जबडा पाहून थोडी हिंमत आलेला तो माणूस म्हणाला, 'तुम्ही जर मला मारू इच्छित असाल, तर मी मरण्यास तयार आहे. या जगात मी एकटा आहे. माझी सर्व संपत्ती, जायजाद, माझी मुले आणि माझी पत्नी या सर्वच गोष्टी माझ्यापासून हिरावल्या गेल्या आहेत.'

हे ऐकून ते महाकाय अस्वल मागे वळले आणि त्याच्या पाठोपाठ मागे वळलेल्या अस्वलांना उद्देशून काहीसे पुटपुटले. मग ती सर्वच अस्वले जिकडून आली होती तिकडच्याच दिशेने रखडत रखडत आवाज करीत चालू लागली. परतणाऱ्या अस्वलांना पाहून तो माणूसही गडबडून उठला आणि घाईघाईत आपल्या गावाकडे निघून गेला. घरी परतून त्याने अस्वलांना मेजवानी देण्याची तयारी सुरू केली. सर्वात आधी त्याने शेकोटीच्या असापास असलेली जुनी झालेली वाळू बदलून तिथे नवी स्वच्छ वाळू टाकली. नंतर लाकडे गोळा करुन घरी आणताना त्याने गावातील लोकांना अस्वलांना आमंत्रित केलेल्या मेजवानीच्या संदर्भात सांगितले. ती भयंकर अस्वलं मेजवानीच्या निमित्ताने

गावात येणार, हे ऐकून घाबरून गेलेल्या गाववाल्यांनी त्याला विचारले, 'अरे, तुला असे करण्याची का बरे इच्छा झाली ? '

दुसऱ्या दिवशी अगदी पहाटेच उठून त्या माणसाने आपला अंगरखा अंगातून काढला व आपल्या दंडावर, गळ्यावर आणि छातीवर लाल रंगाच्या पट्टयांनी स्वतःला रंगवून घेतले. अशी सर्व तयारी झाल्यावर घराच्या दाराबाहेर उभे राहून तो अस्वल पाहुण्यांची वाट पाहू लागला.

हे सर्व रंगवून झाले आणि ती सर्व अस्वले जंगलातून बाहेर पडली. सर्वात पुढे ते महाकाय अस्वल होते व त्याला अनुसरुन बाकी अस्वले येत होती. गावात येणाऱ्या अस्वलांना पाहून सर्व गावकरी घाबरून गेले. आपापल्या घरात जाऊन घराची दारे-खिडक्या बंद करुन त्यांनी स्वतःला कोंडून घेतले. तो माणूस मात्र तसाच स्थिरचित्ताने सर्व अस्वल पाहुण्यांच्या स्वागतासाठी शांत उभा होता. कारण त्यानेच स्वतःच्या घरी त्या अस्वलांना आमंत्रित केले होते. सर्व अस्वल पाहुणे घरात आल्यावर त्या अस्वलप्रमुखास त्याने सन्मानपूर्वक मुख्य जागी बसवले. अन्य अस्वले त्याच्या अवतीभोवती बसली.

सर्वात आधी त्या माणसाने सर्व अस्वलांना चरबीत साठवून ठेवलेल्या कॅनबरीज अर्थात छोटी लाल फळे मोठाल्या ताटांमधून खायला दिली. अस्वलप्रमुखाने त्याचा स्वीकार करून खाण्यास सुरुवात केली. यजमानाने मग आणखी वेगवेगळे पदार्थ खाण्यास दिले. सुकवलेले सॅमन मासे, समुद्रातील सुंदर हेरिंग माशांची अंडी, तेलात बुडवलेले मृगमांस या खास डिशेस त्याने अस्वलांना मेजवानीसाठी तयार ठेवल्या होत्या. प्रत्येक अस्वलाने हे सर्व पदार्थ अगदी अधाशीपणाने खाल्ले.

सर्व पदार्थांचा फ न्ना पाडल्यावर अस्वलप्रमुख त्याच्या मागच्या दणकट दोन पायांवर उभे राहून अगदीच अनोळखी व चमत्कारिक वाटणाऱ्या केविलवाण्या आवाजात बराच वेळ काही तरी बोलत असल्यासारखे वाटत होते. त्याच्या एकूण हावभावांना पाहून असे वाटत होते, की जणू काही ते व्याख्यानच देत आहे. सगळे बोलून झाल्यावर शेवटी ते महाकाय अस्वल

आपल्या चारी पायांवर जायच्या तयारीनेच जणू उभे राहिले. पण जाण्यापूर्वी त्या अस्वलांनी त्या माणसांच्या अंगावर त्याने स्वतःच ओढलेले जे लाल पट्टे होते, त्यांना प्रेमाने चाटायला सुरुवात केली. बाहू आणि छातीवर ओढलेल्या लाल पट्ट्यांना चाटूनच प्रत्येक अस्वलाने मग जंगलाकडे प्रयाण केले.

सर्व अस्वले निघून गेल्यावर तो माणूस मनात म्हणू लागला,'आजची ही संध्याकाळ खरोखरच किती विलक्षण आहे ! ते महाकाय अस्वल तर अगदी मानवाप्रमाणेच भासले, किंबहुना जवळपास मानवच भासले ! '

दुसऱ्या दिवशीची गोष्ट. तोच माणूस सॅमन ओढ्याच्या काठी मासे पकडीत बसला होता. अशा वेळी एक छोटे अस्वल सहजगतीने त्याच्या समोर आले. समोर आलेल्या त्या अनाहुत पाहुण्याकडे बघताना असे लक्षात आले, की ते अस्वल कणाकणाने अधिकाधिक पारदर्शक बनू लागले आहे; आणि मग त्यातून एक मानवी आकृती प्रकट झाली. अस्वलातून प्रकट झालेली ती मानवाकृती किंवा तो अस्वलमानव हिलगिट भाषेत बोलू लागला, 'फार फार वर्षांपूर्वी मी माणूसच होतो. अस्वलवंशीयांनी पकडून माझा सांभाळ केला. आज आता तर माझ्या स्वतःच्या इच्छेनेच मी त्यांच्यातलाच एक होऊन राहतो आहे. आमच्या अस्वलप्रमुखाने मला तुझ्याकडे मुद्दाम पाठवले आहे. काल रात्री त्याने जे व्याख्यान दिले ते तुला समजले काय ? '

तो माणूस म्हणाला, 'जरी मला ते व्याख्यान अवघड वाटत असले तरी मी ते नीट समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. पण मला नाही वाटत की मला त्याचा काही नीट अर्थ समजला आहे. '

हे ऐकल्यावर तो अस्वलमानव म्हणाला, 'आमचा अस्वलप्रमुख असे सांगत होता, की त्याच्या व तुझ्या हृदयाची म्हणजे मनाची अवस्था सध्या सारखीच आहे. तुमच्या दोघांची मने त्रस्त आहेत. दुःखाने भरलेली आहेत. बऱ्याच वर्षांपूर्वी आमच्या अस्वलप्रमुखालाही त्याचे कुटुंबीय आणि मित्र गमवावे लागले होते. ते सर्व त्याला सोडून गेले होते. मृत पावले होते. आज जो तू सर्व सुहृदांच्या मृत्यूमुळे शोकात चूर आहेस, अश्रू गाळीत आहेस त्याचे कारण तुझे सर्व सुहृद

तुला कायमचे सोडून दूर गेले आहेत. ते आता या जगात नाहीत. तुझ्या दुःखात तो सहभागी आहे. तुझ्यातही तो वाटेकरी आहे. '

अस्वलप्रमुखाची सहसंवेदना ऐकून तो माणूस अगदी आतून हेलवला गेला आणि उत्तरला.'कृपा करून अस्वलप्रमुखाला सांगा, की आपण भाऊभाऊच आहोत. '

(अरुण प्रभुणे : नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या अस्वल लोककथा)



# ४.४८. कांचील आणि मगर

[ इंडोनेशियाच्या लोककथांमध्ये कांचिल नावाचा प्राणी प्रख्यात आहे. त्याचे शरीर हरणासारखे नि तोंड उंदरासारखे असते ! तो अत्यंत कावेबाज नि चतुर असल्याबद्दल त्याची ख्याती आहे. ]

एकदा एक दिवस बुवाया मगर नदीच्या काठा-काठाने भक्ष्य शोधीत चालला होता. अकस्मात एका झाडाची जीर्ण फांदी कडाडकन मोडली व बुवायाच्या अंगावर पडली. फांदी खूप जड होती. तिच्याखाली बुवाया अडकून पडला. त्याला त्या फांदीखालून निसटता येईना, तेव्हा तो मोठमोठ्याने ओरडू लागला. शेजारच्या कुरणात 'काराबू' बैल चरत होता. त्याने ती ओरड ऐकली आणि काय झाले ते पाहण्यासाठी तो नदीकाठाकडे आला.

त्याला पाहून बुवाया काकुळतीने म्हणाला, 'मित्रा जरा ही माझ्या अंगावरची फांदी काढ रे ! खूप जड आहे ती. काही केल्या मला दूर करता येत नाही. '

काराबूला त्याची दया आली. तो चांगला दांडगा नि धष्टपुष्ट बैल होता. त्याने आपली दोन्ही शिंगे फांदीखाली घातली आणि हळूहळू वर उचलून ढकलून ती फांदी उलथून बाजूला लोटली. फांदीखालून सुटका होताच मगर म्हणाला,

'मित्रा, तुझे फार उपकार झाले. आता आणखी एक उपकार कर, मला फारच अशक्तपणा वाटतो आहे. तेव्हा जवळ येऊन मला जरा पाण्यात ढकलून देशील का ?'

'हो' असे म्हणून बैल त्याच्याजवळ गेला. थोडासा पाण्यात शिरताच मगराने बैलाचा पाय आपल्या जबड्यात पकडला आणि तो त्याला पाण्यात ओढू लागला !

'अरे अरे !' काराबू ओरडला, 'हे काय करतो आहेस ? मला पाण्यात कशाला ओढतोस ?'

'कशाला म्हणजे? 'बुवाया म्हणाला,'मला खूप भूक लागली आहे. तेव्हा तुला पाण्यात ओढून मी खाणार आहे !'

'वारे ! असा विश्वासघात करतोस काय?' असे म्हणून बैल त्याच्या अंगावर ओरडू लागला. ती आरडाओरड पलीकडच्या शेतात असलेल्या कांचिलच्या कानावर गेली. तो धावत तिथे केला आणि म्हणाला,

'काय रे ! कसली आरडाओरड चालली आहे ? '

'बघ बघ, हा कृतघ्न मगर ! ' काराबू ओरडला, 'हा झाडाच्या फांदीखाली अडकून पडला होता. मी मोठ्या कष्टाने त्याच्या अंगावरची फांदी दूर करून त्याला सोडवला. ते उपकार कुठेच गेले नि हा आता मला खाण्यासाठी माझा पाय पकडून मला पाण्यात ओढतो आहे.'

'अरे पण तू एक विसरतोस - बुवाया म्हणाला, माझ्या अंगावर फांदी पडली तेव्हा मी भक्ष्य शोधीत फिरत होतो. मोकळा झालो तेव्हा तूच मला सापडलास. तू माझं भक्ष्य आहेस. तेव्हा मी तुला खाणार !'

कांचिल विचारात पडल्यासारखे दाखवून म्हणाला, 'प्रश्न मोठा बिकट आहे खराच ! काराबूने तुला वाचवलं म्हणून तू त्याला सोडून देणं योग्य आहे. पण तो बैल म्हणून तुझं भक्ष्य आहे तेव्हा त्याला खायचं म्हटलंस तर तेही योग्य आहे ! यातून आता एकच मार्ग आहे. हा किचकट खटला एखाद्या न्यायाधीशापुढे नेला पाहिजे आणि त्याने दिलेला निर्णय मानला पाहिजे.'

'पण इथे कोण आहे रे न्यायाधीश व्हायला ?' मगराने विचारलेल्या या प्रश्नावर कांचिल पटकन म्हणाला,

' मी आहे ना इथे ! मी अगदी न्यायाला धरून निकाल देईन. कबूल आहे का?'

मगर म्हणाला, 'कबूल आहे ! '

'ठीक - कांचिल म्हणाला, ' मग आता एक गोष्ट प्रथम ठरवली पाहिजे. इथे मी येण्यापूर्वी बरोबर काय घडलं ते मला नीट कळलं पाहिजे. तरच मला खरा न्यायाचा निकाल देता येईल. बुवाया, फांदी अंगावर पडली तेव्हा तू कुठे होतास?'

'तो त्या तिथे होता' - असे म्हणून बैलाने आपल्या शिंगांनी ती जागा कांचिलला दाखवली.

कांचिल म्हणाला, 'अस्सं ! बुवाया तिथे होता काय ? मग आता बुवाया, तू त्या जागी जाऊन पाहिल्यासारखा पडून दाखव.'

बुवायाने बैलाचा पाय सोडून दिला आणि तो त्या जागेवर जाऊन पहिल्यासारखा पडला.

'तू असा पडला होतास ? ठीक ! ती फांदी तुझ्या अंगावर होती ना ? ती कशी पडलेली होती ?'

' मी दाखवतो -' असे म्हणून काराबूने आपल्या शिंगांनी ती फांदी उचलून लोटली आणि बुवायाच्या अंगावर टाकली.

'फांदी अशीच पडलेली होती ? '

'हो' मगर आणि बैल दोघेही म्हणाले.

'तुला त्या फांदीखालून आता अजिबात हालता येत नाही ? '

'नाही ! '

'प्रयत्न करून बघ ! माझी खात्री पटली पाहिजे !

बुवाया मगराने खूप प्रयत्न केला. पण अंगावरची फांदी त्याला दूर करता येईना. मग थकून तो क्षीण आवाजात म्हणाला,

'छे ! ही फांदी फारच अवजड आहे. पूर्वी अशीच पडली होती माझ्या अंगावर. मला तिच्याखालून बाहेर निघता येत नाही !'

'अस्सं-' काराबूकडे वळून कांचिल म्हणाला, 'हा मगर असा ह्या फांदीखाली अडकून पडलेला होता त्यावेळी तू इथे आलास; बरोबर ? '

'बरोबर ?' काराबू म्हणाला.

'तू त्याला फांदीखालून सोडवलंस ? '

'हो ! मग त्याने मला आपल्याला पाण्यात लोटायला सांगितलं. आणि थोडासा पाण्यात शिरताच त्याने माझा पाय पकडला.'

'ठीक आहे ! आता तुझी काय तक्रार आहे ?'

‘कोणाची, माझी ? ‘ काराबू उद्गारला,‘आता माझी काहीही तक्रार नाही !

'आणि तुझी रे ?' मगराकडे वळून कांचिलने विचारले.

‘ माझी केव्हाच तक्रार नव्हती -' मगर म्हणाला, ‘तक्रार केली होती कारबूने !’

‘छान, छान ! कांचिल उद्गारला, ‘ मग आता मला निवाड्याचा काही प्रश्नच उरला नाही ! कुणाचीच जर तक्रार नाही तर न्यायाधीशाचं काम उरलं नाही. मी जातो ! ‘

‘आधी कसा जाशील ? मगर ओरडला, मला या फांदीखालून बाहेर काढना!’

‘ते न्यायाधीशाचं काम नाही -‘ कांचिल म्हणाला, आणि शिवाय मला तेवढी शक्तीही नाही. काराबूला दया येत असेल तर तो तुला पुन्हा मोकळा करील !

‘छट्-‘ काराबू उद्गारला,‘एकदा अनुभव मिळाला तेवढा पुरे झाला ! उपकारकर्त्याच्याच जिवावर उठणाऱ्या विश्वासघातक्याला कोण सोडवील ? ‘

कांचिल आणि काराबू तिथून जाऊ लागले. मगर जोरजोराने शेपटी आपटीत ओरडला,

‘कांचिल ! कांचिल ! तू मला फसवलं आहेस ! याचा परिणाम बरा होणार नाही. साऱ्या मगर जातीला मी ओरडून सांगेन की, जो जो कांचिल तुम्हाला दिसेल त्याचा त्याचा नायनाट करा !’

फांदीखालून निसटण्याचा मगराने जोराजोराने प्रयत्न केला. पण खूप धडपड करूनही ती फांदी दूर होईना. त्याच्याकडे पाहून कांचिल हसून म्हणाला, ‘मूर्खा बुवाया ! आता या क्षणी तू तरी माझा नायनाट करण्याच्या परिस्थितीत नाहीस ! कशाला रे उगाच गमजा मारतोस !’

बुवायाला त्याच स्थितीत सोडून कांचिल आणि काराबू तिथून निघून गेले. तेव्हापासून सगळी मगर जात कांचिल हरणाची कट्टर वैरी बनली.

(विजया खांबेटे : देशोदेशीच्या लोककथा)

# ४.४९. कांचीलचे चातुर्य

एकदा जावा बेटात दुष्काळ पडला. सगळे प्राणी उपासमारीने व्याकुळ होऊ लागले. तेव्हा दुष्काळाबाबत काय उपाय योजावे हे ठरविण्यासाठी जावा बेटातील सगळ्या वाघांच्या राजाने आपल्या मंत्र्यांना बोलावून दरबार भरवला. ते समोर येऊन बसल्यानंतर राजाने व्याख्यानाला सुरुवात केली. ' माझे मदतनीस हो, आपल्या राज्यात दिवसेंदिवस अन्न मिळेनासे झाले आहे. माझी प्रजा अन्नावाचून कृश होत चालली आहे. सगळीकडे गोंधळ व काळजी निर्माण झालेली आहे. तरी अशा परिस्थितीत आम्ही काय करावे असे तुमचे मत आहे ? राजाच्या मंत्र्यांनी थोडा वेळ आपापसांत कुजबूज केली व नंतर ते राजाला म्हणाले, महाराज, याला एकच उपाय आहे आपल्या जवळच्या बोर्निओ बेटांना जिंकावे व त्यांना आपल्याला खंडणी द्यायला भाग पाडावे. दुसरा काही उपाय आम्हांला तरी दिसत नाही. जावा बेटातील सगळ्या वाघांचा तो राजा म्हणाला, 'ठीक आहे. आपण बोर्निओ बेटांतील रहिवासी जनावरांना निर्वाणीचा संदेश पाठवू.' असे म्हणून राजाने तो निरोप घेऊन जाण्यासाठी मंत्र्यांमधून तीन दूत निवडले व त्यांना निरोप सांगितला,'बोर्निओच्या जंगलच्या राजाकडे जा, त्याला सांगा,'जावा बेटातील सगळ्या वाघांच्या अधिपतीची तुला अशी आज्ञा आहे की आम्हांला खंडणीदाखल भरपूर सोने व अन्न पाठवावे . ते पाठवायचे जर तू नाकारलेस तर आम्ही तुमच्यावर सैन्य पाठवून तुमचा देश जिंकून घेऊ. आणि माझं बळ किती आहे त्याचे थोडेसे चिन्ह म्हणून त्या राजाला हे दाखवा.' असे म्हणून त्या वाघांच्या राजाने आपल्या मिशांतला सगळ्यांत लांब व जाड केस उपटला व त्यांच्या हाती दिला. मंत्र्यांनी तो केस मोठ्या बंदोबस्ताने मूल्यवान पेटीत घालून बरोबर घेतला व ते प्रवासाला निघाले. त्यांनी जावाचा समुद्र ओलांडला व ते बोर्निओला आले.

किनाऱ्यावर येऊन पोचल्यावर त्यांना पहिला प्रश्न पडला की बोर्निओच्या

राजाला कसे शोधावे ? त्यांना कोणालाही त्याचा पत्ता माहीत नव्हता व आसपासही कोणी जनावर दिसेना. शेवटी ते राजाच्या शोधासाठी जवळच्या जंगलात शिरले. पण त्यांना कोणीही दिसेना. कारण या तीन वाघांना येताना पाहून सगळे प्राणी भराभर लपत. ते तिघेजण एका रस्त्यावरून दुसऱ्या रस्त्यावर सारखे भटकत होते, ते अगदी दमून व कंटाळून गेले. शेवटी ते जंगलाच्या दुसऱ्या टोकाला येऊन पोचले. तिथे त्यांना कांचील हरण-उंदीर दिसला. ( हा प्राणी इंडोनेशियाच्या जंगलात असतो व त्याचा आकार हरणासारखा व तोंड उंदरासारखे असते. हा फारच हुशार व बुद्धिमान प्राणी मानला जातो.) कांचीलला पाहून ते थांबले व त्याच्याकडे काहीशा तिरस्काराने पाहू लागले. कारण हे तिघेही होते प्रचंड वाघ. तो त्यांच्यापुढे अगदीच लहानसा दिसत होता. 'ए चिमुरड्या,पिल्ला' त्यांनी विचारले. तुझा राजा कुठे आहे ? आम्ही जावाच्या वाघांच्या अधिपतीकडून त्याला शरण येण्याबद्दलचा हुकूम घेऊन आलो आहो.' कांचील नम्रतेने म्हणाला,'असं का, आमचे महाराज शिकारीत गुंतलेले आहेत. '

ते म्हणाले, ' मग आम्हांला त्याच्याकडे ने.आम्हांला संदेश पोचवायचा आहे.

कांचील थोडा वेळ विचार करून नम्रपणाचा आव आणून म्हणाला, 'अहो, प्रचंड जावाबेटांतील बलाढ्य राजाच्या शूर दूतांनो, आपण फार दमला आहात; आपण इथेच जरा विश्रांती घ्या. तोवर मी आमच्या महाराजांना आपला संदेश पोचवतो.'

ते म्हणाले, बरेच झाले तर मग. आता आमच्या महाराजांचा हा निरोप नीट ऐकून घे. आमचे अधिपती सोने व अन्न यांची खंडणी मागत आहेत. जर ती तुम्ही दिली नाहीत तर आम्ही मोठ्या सैन्यानिशी तुमच्यावर स्वारी करून येऊ व बोर्निओ विरुद्ध युद्ध करू. हे सांगितल्यानंतर आमच्या बलाढ्य महाराजांच्या मिशीचा हा केस तुमच्या राजाला दे व त्याला सांग की, आमचे महाराज किती बलाढ्य आहेत त्याचा हा लहानसा पुरावा आमच्या महाराजांनी तुम्हांला दिला आहे.'

कांचीलने ती केसाची पेटी घेतली; नंतर तो जंगलात शिरला व एका अंधाऱ्या जागी जाऊन विचार करीत बसला. 'बोर्निओच्या जनावरांचे काय होईल आता? वाघांची अन्नाची मागणी म्हणजे मांस. म्हणजे थोडक्यात माझ्यासारख्या गरीब जनावरांची चटणी ! छे, असे होता कामा नये. कांचीलला एक युक्ती सुचली. तो साळूबाईकडे गेला. त्याने तिला सर्व हकिगत सांगितली.

'मग मी काय करू म्हणतोस ?' तिने विचारले.

कांचील म्हणाला, 'साळूबाई, मला एक तुमचा मजबूतसा काटा द्या.'

साळूबाईंनी एक जाडजूड काटा काढून त्याला दिला. कांचील तो घेऊन त्या वाघांकडे आला. त्यांना तो म्हणाला,

'शूर अधिकाऱ्यांनो, मला आमचे महाराज भेटले. ते नुकतेच शिकारीहून परत येऊन विश्रांती घेत बसले होते. एका मोठ्या डोंगरावर त्यांचे हुजरे त्यांच्या पंज्यांना धार काढीत होते. मी त्यांच्या समोर गेलो व आपला निरोप त्यांना सांगितला. तो ऐकताच त्यांचे डोळे रागाने लाल झाले; शेवटी त्यांनी आपल्या राजासाठी हा निरोप दिला. 'त्या फाटक्या जावा देशाच्या तुटक्या राजाला सांगा की मला त्याच्या उद्धटपणाचा अतिशय संताप आला आहे. माझ्या बापाने हे बोर्निओ जिंकून घेतल्यापासून कितीतरी दिवस इथे शांतताच आहे. मलाही या शांततेचा कंटाळा आला आहे. माझे सैनिक युद्ध करायला अगदी उत्सुक होऊन नुसती सांगण्याची वाट पाहात आहेत. त्या मूर्ख फडतूस राजाला आणखी सांगा की, आम्हांला खंडणी घ्यायची सवय आहे, द्यायची नाही. आम्ही युद्धाला तयारच आहो !'

ते तीनही वाघ मोठ्या आश्चर्याने हा निरोप ऐकत होते. हा राजा इतका बलाढ्य असेल याची त्यांना कल्पना नव्हती. एवढेच नव्हे, तर कांचीलने तो साळूबाईचा काटा त्याच्या हातात दिला नि तो म्हणाला, 'आमच्या महाराजांनी रागारागाने आपल्या मिशीचा एक केस उपटला व तो तुम्हाला द्यायला माझ्याकडे दिला.'

त्या वाघांनी तो काटा घेतला. तो मजबूत, तीक्ष्ण केस पाहताच ते घाबरले.

त्यांच्या राजाच्या मिशीच्या पन्नास पट जाडजूड होता तो !ते वाघ ताबडतोब जावाला परते, आणि आपल्या राजाकडे गेले.

‘ महाराज, आम्ही आपला निरोप त्या राजाला दिला. आणि त्या घाणेरड्या राजाने हे उत्तर दिले. असे म्हणून त्यांनी कांचीलचे शब्द त्या राजाला सांगितले. नंतर त्यांनी तो साळूचा काटा राजाच्या हातात दिला. राजा तो हातात घेऊन थोडा वेळ लक्षपूर्वक त्याच्याकडे पाहत राहिला. नंतर त्याचे डोळे स्वप्नाळू दिसू लागले. तो गंभीरपणाने म्हणाला, ‘ माझ्या मंत्र्यांनो, तुम्ही गेल्यानंतर मला एक दुसरीच युक्ती सुचली होती व ती अंमलात आणण्यासाठी मी तुमची वाटच पाहत होतो. ती म्हणजे उगीच एखाद्या परक्या देशात जाण्यापेक्षा सुमात्रा व जावा बेटांतील हत्तीपासूनच आपली खंडणी वसूल करावी. ‘

सर्वांना त्याचे म्हणणे ताबडतोब पटले. कारण हत्ती हे निरुपद्रवी प्राणी आहेत. असे म्हणतात की, कांचीलच्या या चतुर निरोपापासून बोर्निओच्या जंगलात एकही वाघ सापडेनासा झालेला आहे ! सगळे वाघ जावाला पळून गेले.

(विजया खांबेटे : देशोदेशीच्या लोककथा)

# ४.५०. बुलबुल बोलतो

(रशियन लोककथा)

समुद्राच्या किनाऱ्यावर एक गाव होतं. गावात एक श्रीमंत व्यापारी राहत होता. घरात नोकर-चाकर,दासदासी पुष्कळ होत्या; पण व्यापारी आणि त्याची बायको सदोदित दुःखी असत; कारण त्यांच्या पोटी मूलबाळ नव्हतं. व्यापारी म्हणे, 'मला तर वाटतं, ही सारी मालमिळकत समुद्रात टाकून द्यावी ! आपल्या माघारी मिळकतीला पोटचा वारस नसेल तर ती घेऊन काय करायची ? ' हे उद्गार ऐकले की बायकोच्या डोळ्यांतून आसवं गळायची.

असे ते दोघे दुःखी असताना एकदा रस्त्यावरुन एक फेरीवाला ओरडत चालला होता, ते शब्द त्यांनी ऐकले. तो पुकारत होता, 'बुलबुल घ्या हो बुलबुल!'

व्यापाऱ्याचं तिकडं लक्ष गेलं. तो म्हणाला, 'कारभारणी, आपण एक बुलबुल पाळला तर कसं ? त्याच्यामुळं आपलं घर भरल्यासारखं वाटेल ! '

कारभारीण 'हो' म्हणाली, व्यापाऱ्यानं तो बुलबुल पक्षी खरेदी केला. त्या पक्ष्यासाठी त्यानं चांदीचा पिंजरा बनविला. त्यात सोन्याचा झोपाळा लावला, सोन्याच्या लहान लहान घंट्या ठेवल्या. कारभारीण स्वतः त्या बुलबुलाची सारी उसाभर करी.आता तिचा वेळ बुलबुलाचं सारं करण्यात आणि त्याचे शब्द ऐकण्यात मजेत जाऊ लागला. तो दोघांनाही मुलासारखा झाला.

पुढं असं झालं की बुलबुल घरात आल्यानंतर कारभारणीला दिवस गेले आणि तिला एक सुंदर मुलगा झाला. हा बुलबुलचा पायगुण असं कारभारणीला वाटलं; अन् ती त्याची आणखी चांगली सरबराई ठेवू लागली. व्यापाऱ्यानं आणि त्याच्या बायकोनं मुलाचं नाव 'वासिली' असं ठेवलं. आता मुलगाच तो आणि पुष्कळ दिवसांनी झालेला, तेव्हा त्याचं कोड-कौतुक आई-बाप खूप खूप करणारच.वासिली हळूहळू वाढू लागला तसं त्याचं त्या बुलबुलावर प्रेम बसलं.

सारा दिवस तो बुलबुलपाशी बसून राहायचा ; बुलबुल जे गोड-गोड आवाजात बोले, ते ऐकायचा अन् त्याच्याशी बोबडं बोबडं बोलायचा. बुलबुलही वासिलीला बघितलं की नाचायला लागायचा आणि गोड गोड बोलायचा.

हळूहळू वासिली किशोर वयाचा झाला. शाळेत शिकण्यातही तो हुशार निघाला. पण शाळेतल्या इतर मुलांसारखा तो खेळात न रमता, बाहेर हिंडायला जाऊ लागला. घरात असला की तो बुलबुलच्या संगतीत राहायचा; बाहेर गेला की झाडावर बसलेले पक्षी, इकडं तिकडं उडत जाणारे पक्षी न्याहाळत राहायचा. कबूतरं अन् कावळे, चिमण्या अन् साळुंक्या, बगळे अन् सारस, गिधाडं अन् घारी, ससाणे अन् भारद्वाज अशा किती तरी तऱ्हेतऱ्हेच्या पक्ष्यांचं तो निरीक्षण करीत राही. त्या सर्व पक्ष्यांची त्याला ओळख झाली होती. कोणता पक्षी केव्हा येतो, कुठं कुठं जातो, काय काय खातो, कसा आवाज काढतो या सर्वांची त्याला माहिती झाली होती. समुद्रकिनाऱ्यावर तो एकटा फिरायला जाई आणि समुद्रावरचे पक्षी पाहत राही. पक्ष्यांचा त्याला अजब छंद लागला होता.

एकदा त्याच्या वाढदिवशी व्यापाऱ्यानं त्याला काही रुपये भेट म्हणून दिले. म्हणाला,'तुला जे घ्यायचं असेल ते घे ! ' त्याला वाटलं, मुलगा घेऊन घेऊन काय घेईल ? काही खेळाच्या वस्तू, किंवा चैनीच्या वस्तू किंवा काही खायप्यायच्या वस्तू घेईल. पण वासिली सरळ गेला तो पक्ष्यांच्या बाजारात. तिथं पिंजऱ्यातून नाना तऱ्हेचे रंगीबेरंगी पक्षी विकायला ठेवले होते. आपल्या पैशातून घेता येतील तेवढे पक्षी पिंजऱ्यांसह त्याने खरेदी केले आणि मग ? एक एक पक्ष्याला पिंजऱ्यातून बाहेर काढून फर्र फर्र करीत आभाळात सोडून दिलं. पक्षी उडत जाताना बघून त्याला पराकाष्ठेचा आनंद होत होता आणि तो आनंदानं टाळ्या पिटत होता !

बापाला मुलाचे हे खेळ कळले आणि त्याला वाटलं, हा मुलगा हाती आलेली संपत्ती अशीच फर्र फर्र उडवून देणार ! त्यानं वासिलीला समजावलं, 'बेटा, एक-एक पैसा मिळवायला अंगातनं घामाचे थेंब काढावे लागतात तेव्हा पैसे जमतात. तू पैसे असे उडवून लावलेस तर लवकरच भिकारी होशील. '

मुलगा म्हणाला, ‘ मी पैसे काही उडविले नाहीत, बाबा; पक्षी उडविले ! ‘

बापानं कपाळाला हात लावला अन् पुनः त्याला पैसे द्यायचं बंद केलं. असे कित्येक दिवस गेले. मुलाचं पक्ष्यावरचं प्रेम दिवसेंदिवस वाढत चाललं होतं. तासन् तास तो घरात बुलबुलपाशी बसून राहायचा, तो बोले ते ऐकायचा.

आई म्हणाली, ‘ मुला बघ. तू शहाणा आहेस ! शाळेत अभ्यासात उच्च आहेस. पण हा तुझा छंद किती विचित्र आहे ! तुझे सवंगडी काय असे घरात बसून राहतात ? पक्ष्यांशी चाळे करतात ? अशानं लोक तुला वेड म्हणतील ! ‘

मुलगा हसून म्हणाला, ‘आणि तुला वेड्याची आई असं म्हणतील, होय ना ?’

आई म्हणाली, ‘हसतोस काय मुर्खा ! तुझ्या वयाची मुलं आता हळूहळू धंद्यांकडे लक्ष देतात. तू धंद्यात लक्ष घातलंस तर पुष्कळ कमाई करशील आणि लोक तुला ’शेठ, शेठ’ म्हणून तुझा मान सन्मान करतील, ते मला बघायचं आहे. तू असा त्या बुलबुलपुढंच बसून वेळ काढलास, तर असलेली दौलत सारी धुळीला मिळेल !’ वासिली यावर काही बोलला नाही.

एकदा व्यापारी आणि हा मुलगा जेवायला बसलेले होते. आई पुढं बसून वाढत होती. अचानक तिकडं चाललेलं बुलबुलचं गाणं त्यांच्या कानी आलं. तिघेजण ते ऐकत राहिले. कधी नाही पण आज व्यापाऱ्याच्या मनात विचार आला, ‘हा बुलबुल काय बरं बोलत असेल ? ‘ हा विचार इतका जोरदार झाला की,व्यापाऱ्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले, ‘हा बुलबुल काय बोलतोय् हे जो कोणी मला सांगेल, त्याला मी माझी अर्धी मिळकत देईन !’

कारभारणीनं हे ऐकलं अन् उसळून म्हणाली, ‘तुम्हाला सुद्धा वेड लागलंय् की काय ? बुलबुल काय बोलणार ? देवानं त्याला गळा दिलाय्. गात असेल ! एवढं त्यासाठी कासावीस कशाला होता ? ‘

व्यापारी म्हणाला, ‘अं हं, रोजच्यापेक्षा बुलबुलच्या आजच्या शब्दांत काही विशेष आहे असं मला जाणवतं ! आज तो वेगळ्याच रीतीनं बोलतोय ! ‘

कारभारीण म्हणाली, ‘म्हणजे तुम्हालाही मुलाचा वाण लागला म्हणायचा ! घरात एक वेडं होतं; आता दोन झाली म्हणू कां ? आता मला वाटायला लागलंय्

या बुलबुलला रानात सोडून द्यावं!'

एवढ्यात व्यापारी भानावर आला. म्हणाला, 'खरंच, माझंही डोकं चक्रम झालं बरं का! पक्ष्याची भाषा कुणाला कशी समजणार? अन् कोण मला ती सांगणार?'

बोलता बोलता त्यानं मुलाकडं नजर टाकली तर तो गपचीप होऊन बसला होता. त्याच्या हातातला घास हातातच राहून तो समोर नजर लावून बघत होता. त्यानं दुःखाचा उसासा टाकला आणि तो पानावरून उठला.

'अरे वासिली, काय झालं काय? तुला एवढं दुःख एकाएकी कसलं रे झाले?' बापानं विचारलं.

आई म्हणाली,'पैसे उडवून बाजारातले पक्षी घेतले असतील अन् उडवून लावले असतील. आम्ही बोलू म्हणून घाबरलाय्!'

वासिली म्हणाला,'नाही आई, मी पक्षी उडविले नाहीत!'

' मग वाईट काय वाटतंय तुला? भरल्या ताटावरनं उठायला तुला काही नाही वाटत? एवढी मी प्रेमानं वाढायला बसली आहे, अन् तुला खाववेनासं झालंय. तू दिवसें दिवस असं वेड्यासारखं काय करायला लागलायंस्? अरे, तू आमचा एकुलता एक मुलगा! तुझ्या बाबतीत आमच्या किती अपेक्षा आहेत!'

वासिली म्हणाला, 'त्या सगळ्या अपेक्षा व्यर्थ आहेत, आई. मी तुमची काहीही सेवा करू शकणार नाही. उलट तुम्हालाच माझी सेवा-चाकरी करावी लागणार आहे, याचं मला दुःख होतंय्!'

व्यापारी म्हणाला, 'अरे, आज तू लहान असताना आम्ही तुझी सेवा करावी; तू मोठा झाल्यावर तू आमची करशील!'

वासिली म्हणाला, 'अंहं, ते तसं घडणार नाही!'

व्यापारी म्हणाला, म्हणजे काय? आमच्या म्हातारपणी तू आमची सेवा नाही करणार? हेच का तू शाळेत शिकलास?

वासिलीला आता राहवलं नाही. तो म्हणाला, 'बाबा, तो बुलबुल असं बोलतोय्.'

'बुलबुल बोलतोय ? काय बोलतोय ? '

'तो म्हणतो- अहं, मला ते सांगवत नाही. मी नाही सांगणार ! '

'सांग सांग, काय म्हणतो बुलबुल ? अन् तुला कशी बुलबुलाची भाषा कळली? थापा मारायला शिकलास ? '

वासिली म्हणाला, 'नाही बाबा, मी थापा मारीत नाही. मी खरंच सांगतो, मला पक्ष्यांची भाषा समजते ! '

'काय समजते, सांग बरं ! '

वासिली म्हणाला, 'सांगतो, ऐका. त्या दिवशी मी बाजारावरून चाललो असताना दोन कबुतरं आपसात बोलत होती. ती म्हणत होती की उद्या त्या हिरव्या देवळाचं शिखर मोडून खाली पडणार आहे. आणि ते शिखर तसं खरोखर दुसऱ्या दिवशी मोडून पडलं ते तुम्ही ऐकलंतच. अशीच एके दिवशी एका घरात एक सुगरण घरटं बांधत होती तर तिला तांबट पक्षी म्हणाला, ताई, तिथं घरटं बांधू नकोस, या घराला आग लागणार आहे. अन् चार दिवसांनी ते घर आगीत जळून खाक झालं ! ते त्या लाडीमीर लोहाराचं घर ! '

व्यापारी हसून म्हणाला, 'बरोब्बर,घडलेल्या गोष्टींना धरून थापा रचायला चांगला शिकलायस् ! आता बुलबुलनं काय सांगितलं तेही तू असंच बनवून सांगणार , होय ना ? '

वासिली म्हणाला, ' नाही बाबा, मी बनवून काही सांगत नाही. खरंच मला पक्षांची बोली समजते. '

' मग बुलबुल काय म्हणतो, ते सांग बरं.'

बुलबुल म्हणतो, ' मुलगा आई-बापांची सेवा करणार नाही. उलट आई-बापांनाच तो आपल्या चाकरीत राबविणार आहे ! आई-बाप त्याचे चाकर म्हणून हातात लोटा घेऊन त्याचे पाय धुतील, आई त्याचे पाय पुसेल ! हे ऐकून कोणत्या मुलाला वाईट वाटणार नाही ? '

'पुन्हा थापा ! '

'नाही बाबा, थापा नाहीत. बुलबुल जे आता बोलला, ते ऐकलेलंच मी

तुम्हाला सांगतोय !'

' मूर्खा, व्यापाऱ्यानं रागानं मुलाचा कान धरून पिरगळला आणि तो म्हणाला, अशा तुझ्या थापा जर कदाचित् राजाच्या कानावर गेल्या तर फुकट आमचं मरण ओढवेल. कुठं चोरी झाली, दरोडा पडला, खून झाला आणि एखाद्या पक्ष्याचं नाव घेऊन तू अमक्यानं चोरी केली, तमक्यानं खून केला असं बडबडायला लागलास, तर ती माणसं आम्हाला जिवंत ठेवणार नाहीत. छीः, हे बिलकूल चालणार नाही !'

त्याच दिवशी व्यापाऱ्यानं वासिलीला घरात कोंडून ठेवलं अन् त्याच्यावर सक्त पहारा ठेवला. आणि दोन वेळा जेवायलाही दिलं नाही. म्हणाला, 'खोटं खोटं सांगितलं असं सांग आणि पुनः पक्ष्यांच्या नावावर खोटया गोष्टी बोलू नकोस ! '

वासिली म्हणाला, ' मी खोटं नाही सांगितलं. मला बुलबुलची बोली समजते. तो जे बोलला तेच मी तुम्हाला सांगितलं.'

'कुठं शिकायला गेला होतास तू पक्ष्यांची भाषा ?'

' मला पक्ष्यांनीच शिकविली !'

बाप म्हणाला, 'पुन्हा खोटं ! पक्ष्यांनी माणसांना आपली बोली कधी शिकवली आहे ? या घरात राहायचं असेल तर हे असं खोटं बोलणं मला चालणार नाही !'

आईनेही तसेच उद्गार काढले. त्या रात्री आई-बापांनी दोघांनी विचार करून ठरविलं की हा वेड्यासारखा बोलणार अन् आम्ही गोत्यात येऊ; त्यापेक्षा याला आपल्यापासून दूर करुन देवाच्या दयेवर कुठं लांब सोडून द्यावं. त्यांनी तशी तयारी केली आणि एके दिवशी रात्री वासिली गाढ झोपेत असताना त्याला उचलून समुद्रकिनारी नेलं. तिथं एक होडी त्यांनी तयार ठेवली होती. तिच्यात त्याला मऊ अंथरुणावर टाकलं आणि होडी समुद्रात लोटून दिली. जड अंतःकरणानं आणि रडत रडत दोघे घरी परत आले. म्हातारपणापर्यंत मुलगा नाही म्हणून रडणारी ही माणसं; झालेल्या मुलाचा आपल्याला त्रास होईल,

आपण गोत्यात येऊ, अशा भीतीला बळी पडून स्वार्थापायी मुलाला कायमचा सोडून देऊन मोकळी झाली!

घराच्या वरच्या माडीची खिडकी उघडी दिसली. कारभारीण म्हणाली, 'घाई-गडबडीत माझ्याकडून खिडकी उघडी राहिली वाटतं.माझी चांदीची भांडी चोरानं चोरली तर नाहीत? '

लगबगीनं दोघांनी वर जाऊन कपाटं अन् पेट्या तपासल्या तर सुतळीचा तोडासुद्धा गेला नव्हता. सगळं जिथं जसं होतं तसंच होतं. फक्त बुलबुलाचा पिंजरा उघडा पडला होता आणि बुलबुल उडून गेला होता.

व्यापारी म्हणाला, 'बरं झालं, पीडा गेली. त्याच्यामुळंच आपलं पोर आपल्याला गमवावं लागलं ! ' कारभारीण म्हणाली, अपशकुनी पाखरू ! मांजरीनं खाऊन टाकलं असलं पाहिजे. '

दोन-तीन दिवसात गावात वासिली कुणाला दिसला नाही, भेटला नाही. आई-बापांकडं मुलांनी चौकशी केली. आई रडत होती. रडत रडत म्हणाली, 'तीन दिवस झाले, कुठं नाहीसा झाला. कुठं जंगलात गेला अन् अस्वलानं मारलं की काय कुणास ठाऊक ! ' तिनं शोकानं डोकं आपटलं, छाती पिटली, आकांत केला अन् पुढं थंड झालं. लोक समजले, वासिली बिचारा जंगलात मारला गेला!'

वासिली गेला, बुलबुल गेला आणि हळू हळू व्यापाऱ्याचं भाग्यही गेलं. वर्षभरात त्याची मिळकत अर्धी झाली. त्याची चार गलबतं होती, ती सर्वच्या सर्व समुद्रात बुडाली. दुसरं वर्ष संपायच्या आतच उरलेली मिळकत देखील खलास झाली. घरदार विकून टाकावं लागलं आणि गाव सोडून धंदा शोधीत ते दोघे गावोगाव फिरू लागले.

अशी कित्येक वर्ष लोटली आणि वासिली नावाचा एक मुलगा आपल्या गावात होता, हे सुद्धा लोक विसरून गेले.

पण बुलबुलला माजरानं खाल्लं नव्हतं. त्यानं पिंजरा तोडून उघड्या खिडकीतून तो पसार झाला होता. उडत उडत तो समुद्रात वाहत चाललेल्या

होडीत झोपलेल्या वासिलीच्या शेजारी जाऊन बसला होता. त्यावेळी पहाटेचा वारा सुटला होता आणि सूर्य उगवण्याच्या बेतात होता. सूर्य उगवला आणि त्याचे किरण समुद्राच्या लाटांवर नाचू लागले. वासिली जागा होऊन पाहतो, तो चहू बाजूला पाणीच पाणी ! समुद्राच्या लाटांवर होडी एकसारखी वर खाली होत होती. क्षणात वर आकाशात, तर क्षणात खाली पाताळात ! तो घाबरून गेला. तेवढ्यात त्याच्या खांद्यावर बुलबुल बोलला, 'वासिली, मी तुझ्या बरोबर आहे, घाबरू नकोस. आत्ता थोडक्याच वेळात तुला मदत येऊन पोचेल. '

आणि झालं तसंच. थोड्याच वेळात एक मोठं जहाज समोरून येत असलंलं दिसलं. ते दिसताच वासिलीनं आपल्या अंगातला शर्ट काढला आणि वर हातात धरून हवेत फडफड करुन दाखवू लागला. गलबताच्या कप्तानानं ते पाहिलं. त्यानं गलबत होडीच्या जवळ आणलं आणि वासिलीला वर उचलून घेतलं. बुलबुल उडून पुनः वासिलीच्या खांद्यावर बसला. वासिली भुकेजला होता,तहानलेला होता. कप्तानानं त्याला खाऊ-पिऊ घातलं. मग विचारलं, 'गलबतातून तू एकटाच वाचलास ? तुमचं गलबत कुठं बुडालं ? किती दिवस झाले ? '

कप्तानाला वाटलं, एखाद्या गलबतातल्या माणसांपैकीच हा एक असावा. पण वासिलीनं आपली खरीखुरी गोष्ट त्याला सांगितली; आणि म्हणाला, ' मी या होडीत कसा आलो ते मला काही माहीत नाही. मी जागा झालो तेव्हा होडीत आहे असं मला दिसलं आणि घाबरलो. पण या बुलबुलनं मला सांगितलं की एक गलबत आता तुझ्याकडं येतंय् आणि म्हणून मी खूण केली. '

कप्तानाला बुलबुलविषयी वासिलीनं सांगितलं ते खरं वाटलं नाही; पण त्याच्या आई-बापांनी तेवढ्यावर त्याचा राग धरला ते त्याला आवडलं नाही. तो म्हणाला, 'लहान मुलं अशा गप्पा-गोष्टी सांगत असतात,त्यात रागवायचं काय एवढं ? पण एक मी सांगतो, माझ्या या गलबतावर मात्र तू असल्या गप्पा हाणू नकोस ! चल, आता तू माझ्यापाशीच रहा. '

वासिली तरी कुठं जाऊ शकत होता ? तो कप्तानाच्या जवळ राहिला. कप्तान

जे काय त्याच्याकडून करून घेईल, ते तो करू लागला. काही दिवसांतच कप्तानाचं मुलासारखं त्याच्यावर प्रेम बसलं.

एके दिवशी बुलबुल बोलला, 'आज कप्तानाचा चांदीचा पेला चोरीला जाणार आहे !' दुसऱ्याला कुणाला ते समजलं नाही; पण वासिलीला समजलं. पण तो काही बोलला नाही. कप्तानानं अशा गोष्टी बोलायच्या नाहीत असं सांगितलं होतं ना ? आणि खरंच, कप्तानाला आपला चांदीचा पेला सापडेना. त्यानं खूप शोधाशोध केली; पण मिळाला नाही. दुसऱ्या दिवशी बुलबुल पुनः बोलला, 'पेला परत येणार. चोराला पस्तावा झालाय.'

वासिलीला वाटलं, ही गोष्ट कप्तानाला सांगायला काही हरकत नाही. त्याला आनंदच वाटेल. म्हणून त्यानं तसं कप्तानाला सांगितलं. आणि खरंच त्या दिवशी संध्याकाळी टेबलावर कप्तानाला त्याचा पेला ठेवलेला दिसला.

कप्तानाला आश्चर्य वाटलं.त्यानं वासिलीला विचारलं, 'तुला रे कसं पेला परत येणार हे कळलं ?' वासिलीनं सांगितलं, 'बुलबुल बोलला. '

कप्तानानं ते ऐकलं; पण पुढं ते तो विसरून गेला.

असे पुष्कळ महिने लोटले. गलबताचा प्रवास चालूच होता. एवढ्यात एका पहाटे कप्तानाच्या खोलीच्या दारावर टकटक आवाज झाला. त्यानं विचारलं, 'कोण आहे ? '

' मी वासिली. '

'का रे, पहाटेचाच आलास ? बरं वाटत नाही ? ताप-बीप आलाय् काय ? '

वासिली म्हणाला, 'तसं काही नाही. माझी तब्येत चांगली आहे. पण मी तुम्हाला सांगायला आलोय की आपण ज्या दिशेला चाललोय्, तिकडं फार मोठं तुफान होणार आहे. म्हणून आपण जवळच्या बंदराकडंच गलबत वळवावं.'

'हं, हे तुला तुझ्या बुलबुलनंच सांगितलेलं दिसतंय्. पण तुझी ही चेष्टा माझ्यापुढं नाही चालायची. मी चाळीस वर्षे गलबत चालवतो आहे, समुद्राच्या हवेची मला पुरेपूर माहिती आहे. आज तर तुफान होणारच आहे. जा, तुझं काम कर. '

'पण..... '

'पण बीण काही नाही. तुझ्या या गप्पिष्टपणावर विश्वास ठेवून मी माझा रस्ता बदलेन तर माझ्या शहाणपणाची तारीफच होईल ! लोक मला हसतील. तुफान - बिफान काही होणार नाही.' असं म्हणून त्यानं केबिनचं दार बंद केलं.

गलबत पुढे-पुढे बराच वेळपर्यंत चाललं. संध्याकाळ झाली अन् हवेत एकदम् फेर पडला. वारा जोराचा वाहू लागला आणि गलबत हालू-डोलू लागलं. लाटा डोंगरासारख्या उसळू लागल्या. रात्रीचा अंधार पडू लागला आणि गलबत संभाळणं कठीण होऊ लागलं. एक शीड तुटलं. दोन होड्या निसटून पडल्या आणि कसंबसं करून कप्तान गलबताला एका जवळच्या बंदराकडं घेऊन गेला.

आणखी अनेक वर्षं गेली. वासिली तरुण झाला होता. गलबत हाकण्याच्या विद्येत तो प्रवीण झाला होता. अनेक देशांचा प्रवास त्यानं केला होता. असा प्रवास करीत करीत एका मोठ्या बंदराला त्याचं गलबत लागलं. परदेशी गलबत बघून चार माणसं तातडीनं त्या गलबतावर चढली. त्यांनी कप्तानाला गाठलं आणि विचारलं, 'तुमच्या गलबतावर कोणी वैद्य-हकीम आहे कां ? आम्ही इथल्या राजाचे दूत आहोत. '

कप्तान म्हणाला, ' वैद्य हकीम कोणी नाही बुवा. पण वैद्य-हकीम कशाला हवा तुम्हाला ? तुमच्या या मोठ्या शहरात वैद्य-हकीम कोणी नाहीत ? '

'तसे पुष्कळ आहेत, अगदी नामांकित आहेत; पण काही उपयोग नाही ! '

'कां बरं ? '

'आमच्या महाराजांना जो रोग झाला आहे, तो फार विचित्र आहे ! '

'असला कसला विचित्र रोग ? '

'तीन कावळे गेले सात महिने राजाला रात्रंदिवस सतावताहेत. दिवसा अन् रात्री एकसारखे काव काव करून त्याच्या भोवती फिरताहेत. त्यामुळे गेले सात महिने त्यांना झोप नाही. कुठंही गेलं तरी ते त्यांना सोडत नाहीत ! '

' मग तिरंदाजांकडून बाणांनी त्यांना मारून का टाकत नाही ? '

'कुणालाही हे कावळे दाद देत नाहीत. कशानेही ते मरत नाहीत. जाळ्यातही

सापडत नाहीत. सत्तेचाळीस वेळा राजानं आपला महाल बदलला; पण तितक्या वेळा कावळ्यांनीही आपली जागा बदलली. बस, रात्रंदिवस काव काव काव सुरू आहे!'

वासिली हे सारं ऐकत होता. तो म्हणाला, 'रात्रं दिवस ? '

'हो, रात्रंदिवस ! राजाला क्षणभर उसंत होऊ देत नाहीत. राजा जिवाला अगदी वैतागून गेलाय्. आज त्यानं दवंडी पिटायला लावली आहे की जो या कावळ्यांच्या पंज्यातून मला सोडवील, त्याला मी माझं अर्ध राज्य देईन. 'एवढ्यात बुलबुल काही बोलला. वासिलीनं ते ऐकलं. तो दूतांना म्हणाला, 'राजा बोलतो ते खरं करतो कां ? '

दूत म्हणाला, 'हो, राजा जे वचन देतो ते खरं करतो. त्याला जो बरं करील त्याला जाहीर केलेलं इनाम मिळेल. पण यात एक जोखीम मात्र आहे. जर का राजा त्या वैद्य-हकीमाकडून बरा झाला नाही, तर राजा असा संतापेल की त्याचं डोकंच तो उडवील ! पण सांगा, तुमच्या गलबतावर असा कोणी वैद्य-हकीम आहे ? '

पुनः बुलबुल काही बोललं. वासिलीनं ते ऐकलं. म्हणाला, ' मी येतो राजाला बरं करायला ! '

कप्तान ओरडला,'असलं मूर्खपणाचं साहस करण्याची काही जरुर? तू काय वैद्य हकीम आहेस? मुकाट्यानं आपल्या कामाला जा.'

वासिली म्हणाला, 'इथं वैद्य-हकिमाचं काम नाही. '

कप्तान त्याची खूप समजूत घालू लागला; पण वासिलीनं ऐकलं नाही. तो राजदूतांबरोबर राजवाड्यात गेला. राजाच्या खोलीत त्याला नेण्यात आलं. तिथं वासिलीला दिसलं, की राजा एका आरामखूर्चीत आपलं डोकं धरुन बसला आहे. थकवा आणि जागरणं यांनी तो हैराण होऊन गेला होता. खिडकी बंद होती; पण तिच्यापुढं कावळ्यांचा इतका जोरजोराने आवाज होत होता की, काही दुसरा आवाज कानातच शिरत नव्हता.

राजदूतांनी जवळ जाऊन राजाला काय सांगितलं ते आणि राजा त्यांना

काय बोलला ते दूर उभ्या राहिलेल्या वासिलीला ऐकू आलं नाही. अशा गोंगाटात राजाशी बोलायचं तरी कसं ? 'काव काव' करीत असलेले कावळे त्याच्या नजरेला पडले. कावळ्यांना दिसलं, की कुणी तरी आपलं बोलणं कान देऊन ऐकत आहे. तेव्हा ते जवळ येऊन थोड्या हलक्या आवाजात 'काव काव' करू लागले. वासिली आता जरा जास्त लक्ष देऊन ऐकू लागला. कावळे अधिक हलका आवाज करुन 'काव काव' करू लागले. वासिलीनं त्यांच्या 'काव काव'चं बोलणं ऐकलं; आणि खिडकी बंद करून तो राजापाशी आला. आता काव काव बरीच कमी आली होती, म्हणून राजाशी बोलणं त्याला शक्य झालं.

तो राजाला म्हणाला, ' महाराज, हे कावळे आपल्याकडं न्याय मागायला आले आहेत. तुम्हीच न्याय करावा असा त्यांचा आग्रह आहे, म्हणूनच ते इतके दिवस आपल्या दाराशी ओरडा करताहेत. आपण जो निर्णय कराल तो त्यांना कबूल आहे. '

राजानं विचारलं, 'पण तुला ते कसं कळलं ? तू थापा तर मारीत नाहीस ? '

वासिली म्हणाला, ' मला पक्ष्यांची भाषा कळते. आपण त्यांचा न्यायनिवाडा करा. '

राजा म्हणाला, 'पण मामला काय आहे ? '

वासिलीनं सांगितलं, 'या तिघांपैकी एक नर कावळा आहे, दुसरी मादी आहे आणि तिसरा त्यांचा मुलगा कावळा आहे. आई अन् बाप यांच्यात वाद पडलाय, की हा मुलगा कुणाचा ? बाप म्हणतो माझा, मादी म्हणते माझा. आता तुम्ही त्यांचा न्याय करा. '

असं म्हणून त्यानं खिडकी उघडली. बाहेर कावळे 'काव काव' करीत होते. राजानं खिडकीत जाऊन म्हटलं, 'हे कावळ्यांनो, माझं ऐका. तुमच्या तक्रारीचा मी न्याय देतो. '

असं म्हणताच ते सगळे कावळे शांत झाले. मग राजा म्हणाला,'मी निर्णय देतो की मुलगा त्याच्या आईचा ! '

एवढं बोलताच दोन कावळे एका दिशेनं अन् एक कावळा दुसऱ्या दिशेनं

उडून गेले. दोन कावळ्यांपैकी एक मादी आणि दुसरा तिचा मुलगा असला पाहिजे. सगळीकडं शांत शांत झालं. अशी शांती गेले सात महिने अन् साडे-तीन दिवस कुणाच्या अनुभवाला आली नव्हती. शांती पसरताच राजा एकदम कोसळून जवळच्या पलंगावर पडला आणि पडल्या पडल्या तो झोपी गेला. बघायला आलेले सगळे हळूहळू मागं मागं सरकले. पुष्कळ दिवसांत राजाला अशी झोप मिळाली.

वासिली जायला निघाला. तेव्हा वजीर म्हणाला, ' महाराजांच्या हुकुमाशिवाय तुला जाऊ देणार नाही. थोडा थांब.'

वासिली म्हणाला, 'पण मी इथं राहून करू काय ? '

वजीर म्हणाला, 'आम्ही सगळे जे करतोय् तेच ! ' म्हणजे माशा मारणं. वासिलीला आळशी राहणं पसंत नव्हतं. पण काय करणार ? कोणी त्याला जाऊच देईनात- राजा जागा होईपर्यंत !

आता राजा केव्हा जागा होणार ? सगळे वाट बघत राहिले. राजा नऊ दिवस आणि नऊ रात्री झोपला. तोवर इकडं कप्तान वासिलीची वाट पाहत थांबून राहिला होता. त्याला वाटलं, वासिलीचं डोकं राजानं उडवलं; आणि आता आपली धडगत नाही. त्यानं ताबडतोब भीतीनं गलबत हाकारलं आणि तो निघून गेला.

नऊ दिवस पुरते झाल्यानंतर राजानं एकदा डोळे उघडले त्यावेळी वजीर त्याच्या समोर आला. म्हणाला, ' महाराज, कावळे गेले. '

राजा अजून पुरता शुद्धीवर आला नव्हता. त्यानं विचारलं, 'कुठं गेले ? तुम्ही कोण ? कावळे आहात ? कावळ्यांसारखे का ओरडता ? '

सर्वांनी राजाला समजावलं की आम्ही कावळे नाही, आम्ही काव काव करीत नाही, आपण झोपी गेला होता वगैरे वगैरे. हे ऐकत-ऐकत राजा पुनः झोपी गेला. इतक्या महिन्यांची झोप साठली होती ती त्याला डोळे उघडूच देईना.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो पुरता शुद्धीवर आला. त्याला सगळं आठवलं. कावळ्यांच्या तडाख्यातून आपण सुटलो ते त्याला आठवलं. आपण कसे बरे

सुटलो ? आठवता आठवता वासिलीची त्याला आठवण झाली आणि त्यानं हुकूम दिला. तो तरुण मुलगा कुठं गेला ? 'तो गलबतावर निघून गेला का ? त्याला ताबडतोब माझ्या समोर आणा, जा, पळा ! '

नोकर लोकांनी वासिलीला राजासमोर आणून उभं केलं. राजा आता ताजातवाना झाला होता, खूप आनंदात होता. वासिलीला बघून कृतज्ञतेने त्याचं अंतःकरण इतकं भरून आलं की त्यानं त्याला मिठीच मारली. तो वासिलीला म्हणाला, 'मुला,तू मला जीवदान दिलंस. मी जगातून उठून चाललो होतो. तू देवदूतासारखा आलास अन् मला वाचविलंस. मी जाहीर केलं त्याप्रमाणे माझ्या राज्याच्या अर्धा भाग आता तुझा आहे. तू त्या भागाचा राजा; मी या भागाचा राजा. पण एवढ्यानं माझ्या मनाचं समाधान होत नाही. माझी एकुलती एक मुलगी, तिच्याशी तुझं मी लग्न करून देणार आहे.'असं म्हणून त्यानं आपल्या मुलीला आणविलं. राजाच्या सगळ्या कुटुंबानं इतके दिवस वासिली तिथं राहिल्यामुळं त्याला बघितलंच होतं. जरी त्याच्याशी प्रत्यक्ष कोणी बोललं नव्हतं, तरी राजाचा फार दिवसांचा रोग घालवून राजाला सुख दिल्याबद्दल त्या सर्वांच्या मनात वासिलीबद्दल कृतज्ञता आणि प्रेम उत्पन्न झालं होतं. सर्वांनी त्या लग्नाला मनापासून आशीर्वाद दिले.

काही दिवसांनी राजाचा हा जावई आपल्या बायकोला घेऊन राजाच्या गलबतातून सफरीवर निघाला. पुष्कळ देश त्यांनी पाहिले आणि फिरत फिरत वासिली आपल्या मूळ जन्मभूमीला येऊन पोचला. आता त्याचा पोशाख राजकुमाराचा होता. त्याला वासिली म्हणून कोण ओळखणार ? राजकुमार आणि राजकुमारी म्हणून सगळीकडं त्यांचं स्वागत झालं.

वासिली आपल्या आई-बापांना भेटायला अतिशय उत्कंठित झाला होता. त्यानं आपल्या बायकोला आपली पूर्वीची सर्व हकीकत सांगितली होती आणि आपल्याबरोबर सतत मित्र म्हणून असलेल्या बुलबुलाचीही तिला ओळख करून दिली होती.

आपल्या गावात तो शिरला आणि आपल्या घराकडं गेला; पण तिथं त्याचे

आईबाप नव्हते. त्याला अतिशय दुःख झालं. ते कुठं गेले हे कुणालाच माहीत नव्हतं. इतक्या वर्षात जुनी माणसं गेली होती आणि नवीन माणसांना पूर्वीची काही माहिती नव्हती. दुःखी अंतःकरणानं वासिली एका धर्मशाळेत उतरला. धर्मशाळेत जी माणसं नोकरीला होती, ती त्यांच्या तैनातीला लागली. कोणी त्यांच्या खाण्या-पिण्याकडं बघू लागलं, तर कोणी इतर सुखसोयीकडं. बाहेरून आल्यानंतर वासिलीचे पाय धुवायला एक म्हातारा पुढं झाला. आणि भांड्यात गरम पाणी घेऊन त्यानं त्याचे पाय धुतले. एक म्हातारी हातात टॉवेल घेऊन उभी होती. तिनं त्याचे पाय पुसले आणि ते अदबीनं बाजूला उभे राहिले. म्हातारी पाय पुसत असताना तिच्या हातावरची गोंदलेली अक्षरं वासिलीच्या नजरेला पडली होती आणि तो काही आठवण्याचा प्रयत्न करीत होता. एकदम त्याला काही आठवलं आणि तो त्या म्हातारीसमोर जाऊन उभा राहिला अन् तिच्याकडं पाहत राहिला. हळूहळू त्याला ओळख पटू लागली आणि त्यानं 'आई' म्हणून आपल्या आईला मिठी मारली!

होय, ती त्याची आईच होती आणि तो म्हातारा त्याचा बापच होता. बुलबुल बोलला होता. त्याप्रमाणं नशीबात होतं ते घडलं. बापानं मुलाचे पाय धुतले आणि आईनं पुसले!

त्यानं त्या दोघांना दोन्ही हातांनी धरलं आणि आपल्या खोलीत नेलं. आपला पोशाख उतरला. म्हातारा आणि म्हातारी चकित होऊन पाहत होती. त्यानं 'मी तुमचा वासिली म्हणून ओळख दिली. म्हातारीनं त्याच्या डाव्या खांद्यावर असलेला काळा तीळ बघितला आणि तिची खात्री पटली. राजकुमारी आली. तिच्याशी वासिलीनं दोघांची ओळख करुन दिली.

त्याच वेळी बुलबुलचा गोड आवाज सर्वांच्या कानी पडला. तो वासिलीच्या खांद्यावर बसून काही गात होता. वासिली आणि बुलबुल दोघे जिवंत आपल्याला भेटले! वासिली म्हणाला, 'बाबा, आई, या बुलबुलनंच माझं सतत रक्षण केलं अन् मला इथवर आणलं.'

आई-बापांनी बुलबुलपुढं हात जोडले आणि म्हणाले, 'पक्ष्या, तुझ्या इतकी

सुद्धा अक्कल आमच्यात नाही, तुझ्याइतकं प्रेमही आमच्यात नाही. आम्ही आमची कातडी बचावण्यासाठी पोटच्या पोराला दर्यात ढकललं; पण तू त्याला वाचवलंस अन् इथवर इतक्या वर्षांनी घेऊन आलास. पक्ष्या रे पक्ष्या, आम्हाला माफी कर, आम्हाला माफी कर!'

बुलबुल गातच होता. आईनं विचारलं, 'काय रे तो बोलतोय!'

वासिली म्हणाला, 'तो म्हणतोय, यापुढं तुम्हाला कसलंही दुःख येणार नाही. तुमचे दिवस सुखात जातील. मुलगा आणि सून तुमची सेवा करतील.'

म्हातारा आणि म्हातारी दोघांच्या डोळ्यांतून टपटप अश्रू पडले. ते आनंदाचे होते.

(भाऊ धर्माधिकारी : देशोदेशीच्या लोककथा [भाग ८])

# ४.५१. याक

तिबेटमध्ये अपापेक आणि जम्मू नावाचे वृद्ध जोडपे राहत होते. त्यांना तीन मुलगे होते. गप्पासांबरू, तेपागालू आणि डागेसांबरू अशी या तिघांची नावं होती. हे वृद्ध जोडपे खूप श्रीमंत होतं. त्यांनी आपल्या संपत्तीचे दोन भाग केले. एक वाटणी गप्पासांबरूला दिली. तर दुसरा हिस्सा डागेसांबरूला दिला. तेपागालूला काहीच दिलं नाही. तो आपल्या आई-वडिलांकडे गेला. आपल्याला संपत्तीचा हिस्सा देण्याची मागणी केली. परंतु आई-वडिलांनी काही देण्यास नकार दिला.

या घटनेमुळं तेपागालूला खूप वाईट वाटलं. तो निराश झाला. आपल्याकडं काहीही संपत्ती नाही. काही खायला, प्यायला नाही. अशा परिस्थितीत इथं राहण्यात काय अर्थ ? त्यापेक्षा दूर कुठं तरी जावं आणि कमवून खावं, असा विचार करून तेपागालू घर सोडून गेला. जाण्यापूर्वी तो मोठ्या देवाकडं गेला. त्याला विचारलं, 'आई-वडिलांनी मला संपत्तीतील वाटा न देण्याचं कारण काय? हा वाटा कधी मिळेल ? हे तूच सांग. 'देव म्हणाला,'तुला त्यांच्या मालमत्तेतील हिस्सा कधीच मिळणार नाही. मग तेपागालू आत्म्याकडं गेला अन् म्हणाला,'मला माझ्या आई-वडिलांच्या संपत्तीतील वाटा मिळेल की नाही ते सांग.' अन् आत्म्यानं वाऱ्याच्या रूपातून सांगितलं, 'नाही, तुला त्यांच्याकडून काहीही मिळणार नाही.'

खिन्न झालेला तेपागालू नाराजीनंच जंगलामध्ये गेला. झाडा-झुडपांतून वाट काढत काढत पुढं गेला. त्याला वाटेत एक मोठी गुहा लागली. गुहेच्या दोन्ही बाजूंनी वरून पाण्याचा प्रवाह वाहत येत होता. मध्ये फक्त कोरडा रस्ता होता. हा मुलगा या रस्त्यावरून चालत चालत खूप आतमध्ये गेला. गुहेच्या आतमध्ये खूप अंधार होता. तरीही तेपागालू तसाच चालंत राहिला. बरंच अंतर गेल्यानंतर त्याला एक विचित्र पक्षी दिसला. 'जतुंग-तुंगकर्मू' असं या पक्ष्याचं नाव होतं. तो

आपल्या प्रचंड मोठ्या अंड्यावर बसला होता, तेपागालूला ती जागा, तो पक्षी, ते प्रचंड अंडं सगळंच पाहून खूप नवल वाटलं. त्या पक्ष्याला त्यानं विचारलं,'या अशा आडजागेत तुला खायला तरी काय मिळतं ?'

पक्षी म्हणाला, 'मी तांदूळ खातो.'

'गेले अनेक दिवसांपासून मी उपाशी आहे. सारखा चालतोय. मला खूप भूक लागली आहे. मला तू थोडेसे तांदूळ देऊ शकशील का ?' तेपागालूनं विचारलं.

पक्षी उत्तरला, 'इथं माझ्या खाण्यासाठीही तांदूळ शिल्लक नाहीत. बाहेर जाऊनच मला अन्नाचा, तांदळाचा शोध घ्यावा लागणार आहे. परंतु या तीन अंड्यांवर मी बसलो आहे. त्यांना उबवतोय. आता तांदूळ आणण्यासाठी मी इथून उठलो तर ही अंडी थंड पडतील आणि खराब होतील. त्यामुळं मी बाहेरही जाऊ शकत नाही.'

तेपागोलू म्हणाला,'या अंड्यांना उबदार ठेवण्याचं काम मी करतो. तू बाहेर जा, अन् तांदूळ आण.'

तो पक्षी बाहेर जायला तयार झाला. जाताना तेपागालूला म्हणाला,'ही अंडी कशीही उबव चालतील, पण ही वरची बाजू कधीही खाली करायची नाही, हे पक्कं ध्यानात ठेव.' तेपागालू म्हणाला, 'ठीक आहे, त्या अंड्यांना मी स्पर्शही करणार नाही. फक्त हात वर धरून उब देत राहीन, म्हणजे वरची बाजू खाली होणार नाही.'

पक्षी तांदूळ आणायला बाहेर पडला आणि तेपागालू अंडी उबवत गुहेत बसला. थोड्या वेळानं त्यानं अंडी उत्सुकतेने निरखून पाहिली. मग हातात घेऊन तो पाहू लागला. ठेवताना तो पक्षाची सूचना विसरला अन् वरची बाजू खाली करून त्यानं अंडी ठेवली.

थोड्याच वेळात पक्षी तांदूळ घेऊन आला आणि त्यानं तेपागालूला ते खायला दिले. अंड्यांकडं लक्ष जाताच त्या पक्ष्याच्या लक्षात आलं, या मुलानं काहीतरी गडबड केली. अंड्यांचा वरचा भाग खाली दिसतोय. पक्षी खूप रागवला आणि भुर्रकन् दूरवर उडून गेला.

आता त्या गुहेत तो मुलगा एकटाच राहिला होता. एकटेपणामुळं त्याला रडूच

फुटलं. आता आपण काय करावं, हे त्याला समजेना. तो विचार करत बसला. 'सगळे म्हणतात देव खूप दयाळू आहे, संकटात सापडलेल्यांना मदत करतो.कदाचित तो आपल्याही मदतीला धावून येईल. या अंडयातूनच कोणी तरी बाहेर येईल, असं त्याला वाटलं. त्यानं एक अंडं हातात घेतलं आणि देवाची प्रार्थना केली, देवा, या अंड्यातून बाहेर येऊन मला मदत कर. तेपागालूने आपल्याकडच्या काठीनं एक अंडं फोडलं. त्यातून पांढरा याक बाहेर आला.अन् तो चक्क उडत उडत देवाकडं निघून गेला. तेपागालूनं दुसरं अंडं फोडलं. त्यातून लाल याक बाहेर आला अन् तो उडत उडत जंगलातल्या आत्म्याकडं गेला. आता मात्र मुलगा रडायला लागला.एकच अंडं राहिलं होतं. त्यातून आपल्याला मदत करणारं कोणी बाहेर यावं, अशी प्रार्थना तेपागालूनं देवाकडं केली.

त्यानं अखेरचं अंड फोडलं. त्यातून काळी मादी याक बाहेर आली आणि ती सरळ पाण्यात गेली. मुलगाही त्या याकपाठोपाठ गुहेच्या बाहेर आला. याकला पकडण्यासाठी हातात एक मोठी दोरी त्यानं ठेवली. प्रवाहाच्या काठावर मादी याक पाण्याच्या बाहेर येईल म्हणून तेपागालू वाट पाहत बसला. असाच वर्षभराचा काळ लोटला. हे संपूर्ण वर्ष याक पाण्यात डुबकी मारुन बसली होती, तर तेपागालू तिला पकडण्यासाठी काठावर बसून होता. एक वर्षानंतर याकनं पाण्यातून थोडंसं डोकं वर काढलं. तेपागालूनं मोठ्या शिताफीनं याकच्या डोक्यात दोरी अडकवली. आणि तिला बाहेर काढून घरी घेऊन आला. वर्षानं याकला एक बछडा झाला. तेपागालूला याकचं दूध आणि तूप भरपूर मिळालं. त्यामुळं तेपागालू हळू हळू श्रीमंत झाला. तीन वर्षात याकला आणखी तीन बछडे झाली आणि तेपागालूचा व्यवसायही वाढला.

तेपागालू परत आल्याचे आणि त्याच्याकडे याक असल्याची माहिती आपपेकला समजली. तो आणि त्याचे आणखी दोन मुलगे तेपागालूकडे आले. सगळे एकत्र आनंदात राहू लागले. नाचू,गाऊ लागले. प्राण्यांपासून आपल्याला दूध, तूप असं बरंच काही मिळू लागलं याचा त्या सर्वांना खूप आनंद झाला.

# ४.५२. भाग्यवान पक्षी

(काश्मिरी लोककथा)

फार फार वर्षापूर्वी एका गावात एक लाकूडतोड्या रहात होता. लाकूडतोड्या फार कष्टाळू आणि प्रामाणिक होता. रोज सकाळी उठायचा, आंघोळ करायचा. हात जोडून देवाला नमस्कार करायचा. देवा, कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी मला वृक्षतोड करावी लागते. सृष्टीची शोभा वाढविणारी झाडे तोडतांना मला फार दुःख होते. परंतु गरजेपेक्षा जास्त झाडे मी कधीच तोडत नाही. काही कमी जास्त चूक झाली तर मला माफ कर ! देवाजवळ असा माफीनामा मागायचा ! बायकोने दिलेला डबा घ्यायचा आणि जंगलाच्या दिशेने चालत रहायचा ! असा हा लाकूडतोड्याचा नित्यनेम होता.

एके दिवशी लाकूडतोड्या जंगलात गेला. कामाला सुरवात केली. मध्यान्हापूर्वीच लाकूडतोड्याला थकल्यासारखे वाटत होते. तास-दोन तास काम केल्यानंतर विश्रांतीसाठी झाडाखाली बसला. आणि काही वेळातच झाडाखाली झोपी गेला. समोरच्या झाडावर एक सुंदर पक्षी बसला होता. किडकिडीत शरीरयष्टीच्या थकलेल्या लाकूडतोड्याला पाहून पक्ष्याला वाईट वाटले. बिचारा लाकूडतोड्या किती कष्ट करतो. प्रामाणिकपणे राहतो. दिवसभर उन्हात काम करतो. अशा माणसांना थोडीफार मदत केली पाहिजे असा विचार करीत पक्षी लाकूडतोड्याच्या बाजूला बसला ! लाकूडतोड्या गाढ झोपला होता. छोट्याशा सुंदर पक्ष्याने एक सोनेरी अंडे ठेवले आणि तो उडून गेला. लाकूडतोड्या जागा झाला. बाजूला पडलेले सोनेरी अंडे पाहून आश्चर्य चकित झाला. देवाचा प्रसाद समजून लगेचच अंडे उचलले आणि खिशात ठेवले. टंगळ-मंगळ करीत दिवस घालवला. तोडलेल्या लाकडांची मोळी बांधली. नेहमीप्रमाणे लाकडाच्या वखारीत मोळी विकण्यासाठी गेला. दुकानदार म्हणाला, रोज मोठी मोळी आणणारा आज इतकी छोटीशी मोळी

आणली ? याचा अर्थ आज तू फारसं काम केलेलं दिसत नाही ? लाकूडतोड्या प्रामाणिकपणे म्हणाला, 'आज सकाळीच थोडी डुलकी लागली. जाग आल्यावर पाहतो तर, सोन्याचे अंडे बाजूला पडलेले दिसले.' असे म्हणून लाकूडतोड्याने सोन्याचे अंडे दुकानदाराला दाखवले. मुत्सद्दी दुकानदाराच्या तोंडाला पाणी सुटले ? लाकूडतोड्याला दुकानदाराने आमिष दाखवले आणि म्हणाला, मी तुला सोन्याचे नाणे देतो, तू मला तुझ्याकडचे अंडे दे ! भोळ्या लाकूडतोड्याने ही अदलाबदली मान्य केली. दुकानदार सोन्याचे नाणे देता देता लाकूडतोड्याला म्हणाला, 'जर सोन्याचे अंडे देणारा पक्षीच आणला तर तुला पाच सोन्याची नाणी देईन ! ' पाच सोन्याच्या नाण्यांसाठी पक्षी आणून देण्याचेही लाकूडतोड्याने मान्य केले आणि घरी आला.

दुसऱ्या दिवशी ज्या झाडाखाली सोन्याचे अंडे सापडले होते त्या झाडाखाली लाकूडतोड्या बसला. थोड्याच वेळात झाडाखाली झोपेचे सोंग घेत पडून राहिला. एक छोटासा पक्षी आला. लाकूडतोड्याच्या जवळ बसला. लाकूडतोड्या झटकन उठला आणि पक्ष्याला पकडले. पक्ष्याला म्हणाला, हे सुंदर पक्ष्या, आता मी दुकानदाराकडे तुला नेणार आहे. आणि पाच सोन्याच्या नाण्यांसाठी मी तुला विकणार आहे. पक्षी लाकूडतोड्याला समजावीत म्हणाला, हे भोळ्या माणसा, पाच सोन्याच्या नाण्यांपेक्षा सोन्याचे अंडे अधिकच मौल्यवान आहे हे तुला कळत नाही कां ? तो दुकानदार तुला मुर्ख बनवीत आहे ! लाकूडतोड्याला दुकानदार आपल्याला फसवत आहे हे लक्षात येताच तो पक्ष्याला म्हणाला, मला माफ कर ! लोभापायी मी तुला दुखावले ! लाकूडतोड्याने पक्ष्याला अलगद जमिनीवर ठेवले. पक्षी कण्हतच म्हणाला, 'आता मृत्यू जवळ आला आहे. खरं म्हणजे मी भाग्यवान पक्ष्यांच्या कुटुंबातून आलो आहे. माणसांचा भाग्योदय घेऊन आम्ही येत असतो. परंतु मानवी स्पर्शानेच आम्हाला मृत्यू येतो हे आमचे विधिलिखित आहे.' पक्ष्याचे बोलणे ऐकताच लाकूडतोड्याला फार वाईट वाटले. अत्यंत दुःखी अंतःकरणाने त्याने पक्ष्याला विचारले,'हे भाग्यवान पक्षीमित्रा, तुला मदत करण्याचा एखादा मार्ग

सांगू शकतोच कां?' मरणासन्न पक्षी म्हणाला, 'जेव्हा मी मृत होईन तेव्हा माझ्या एका पंखातील एक पीस अगदी समोर धरले की, त्याचक्षणी तू माझ्या घरापर्यंत पोहोचशील. तो पंख माझ्या कुटुंबियांना दे आणि जे घडले ते खरे खरे सांग ! ' असे म्हणताच भाग्यवान पक्षी मृत झाला. लाकूडतोड्याने, पक्ष्याने सांगितले तसेच केले.

काही क्षणातच लाकूडतोड्या भाग्यवान पक्षाच्या कुटुंबात पोहोचला. त्या कुटुंबातील पक्ष्यांना त्याने मृतपक्षाचे पीस दाखवले आणि जे घडले ते प्रमाणिकपणे सगळ्यांना सांगितले. लाकूडतोड्याचा वृत्तांत ऐकताच मृत पक्षाचे वडील म्हणाले, 'अरे बापरे ! आता आपल्याला काही तरी केलेच पाहिजे !' त्यांनी ताबडतोब मृतपक्षाचे पीस जमीनीवर ठेवले आणि नमस्कार करीत गोलाकार उड्या मारू लागले. दहा वेळा गोलाकार फिरल्यानंतर त्यांनी पक्ष्याच्या पिसाला स्पर्श केला आणि काय आश्चर्य ! मृत भाग्यवान पक्ष्याचा देह त्याजागी स्थलांतरीत झाला. मृतपक्ष्याच्या आईने आणि बहिणीने काही हिरवी पाने, गवत गोळा केले. पक्ष्याला वर उचलले आणि चोचीत गवत-पाने घातली. क्षणार्धात भाग्यवान पक्ष्याने डोळे उघडले. भाग्यवान पक्षी जिवंत झाल्याचे पाहून लाकूडतोड्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. भाग्यवान पक्षी म्हणाला, 'भाग्योदय घडविण्याचे काम आम्ही भाग्यवान पक्षीच करत असतो. परंतु लोभी, हावरट वृत्तीच्या लोकांजवळ आम्ही रहात नाहीत.' लाकूडतोड्या रडकुंडीला येत म्हणाला, 'माझ्या मुर्खपणामुळे मी तुला गमावले आहे, माफ कर! पण मित्रा आता फार दुःख देऊ नकोस !' भाग्यवान पक्षी म्हणाला, 'तू मला मदत केली आहेस ! त्यासाठी मी कृतज्ञ आहे. आणि म्हणूनच मी पुन्हा एकदा येईन ! पण तुला योग्यवेळ येईपर्यंत वाट पहावी लागेल ! '

अत्यंत दुःखी अंतःकरणाने लाकूडतोड्या घरी परत आला. भाग्यवान पक्षी एक दिवस निश्चित येईल हा आशेचा किरण उराशी बाळगीत लाकूडतोड्या रोज जंगलात जात होता. प्रामाणिकपणे आपले काम करीत होता.

(पुनःकथन : मंगला वरखेडे)

# ४.५३. भूतदया आणि मैत्रभाव

(नेपाळी लोककथा)

फार फार वर्षापूर्वी एका गावात तेजिंग आणि त्याची आई रहात होती. तेजिंगचे वडील लहानपणीच घर सोडून गेले होते. आई शेतीची कामे करून तेजिंगचे पालनपोषण करीत होती. एके दिवशी तेजिंगला आई म्हणाली, 'बेटा आज घरात धान्याचा एकही दाणा नाही. टिस्टा नदीवर जा आणि मासे पकडून आण ! संध्याकाळी भाजलेले मासे आपल्याला पुरेसे होतील. उद्या सकाळी धान्य खरेदी करेन.' तेजिंगने जाळे आणि टोपली घेतली. टिस्टा नदीवर आला. तेजिंग यापूर्वी बाबांबरोबर नदीवर मासे पकडण्यासाठी आला होता. त्यामुळे पाण्यात टोपली सोडून मासे पकडण्याचे तंत्र तेजिंगला माहित होते. बऱ्याचदा मासे पकडण्याचाही प्रयत्न केला होता. परंतु त्याच्या छोट्या हातातून मासोळ्या निसटून जायच्या. तरीही आईच्या मदतीसाठी आज नदीच्या पाण्यात टोपली टाकून मासे पकडण्याचा प्रयत्न करीत होता. नदीच्या थंडगार पाण्यात पाय टाकताच तेजिंगच्या अंगावर शहारे आले. देवाचे नाव घेत मासे पकडण्यासाठी वेगवेगळ्या दिशांना जाळे फिरवीत राहिला. जाळ्यात मासा येताच जड झाले की जाळे बाहेर काढायचा. परंतु त्याच्या छोट्या हातातून मासे सटकन पाण्यात निघून जायचे. नदीच्या पाण्यात अधिक पुढे जात पुन्हा टोपली सोडली. काही मासोळ्या जाळ्यात अडकल्या. नाईलाजाने टोपलीत मासोळ्या टाकल्या. यात शेपूट असलेल्या मासोळ्यांमध्ये सोनेरी रंगाची लाल डोक्याची रंगी-बेरंगी एक खूप छान रंगीत मासोळी मिळाली. या मासोळीकडे पाहताच तेजिंगला काचेच्या बरणीत ठेवण्याची इच्छा झाली. इतक्यात ती मासोळी पाण्यातून बाहेर पडण्याची धडपड करीत होती. तेजिंगने सर्व मासोळ्या घेऊन नदीतून बाहेर आला. टोपली उचलताच 'दादा मला सोडून दे, मी तुझे उपकार कधीच विसरणार नाही' असा आवाज आला. टोपलीतून माणसाच्या आवाजात

बोलणारी मासोळी पाहून भूत पिशाच्च आपला पाठलाग करत आहे की काय ? या कल्पनेने तेजिंग घाबरला. पण उड्या मारणाऱ्या मासोळीला पाहून तेजिंग म्हणाला, ' मासोळीबाई तुला मी सोडले तर माझी आणि आईची पोटपूजा कशी होईल ?' मासोळी म्हणाली, तू एक साहसी मुलगा दिसतोस ! ' दादा,थोडे अधिक कष्ट केलेस तर तुला निश्चित यश मिळेल. अधिक मासे पकडू शकशील ! कृपा करून मला सोडून दे ! जर मी वेळेवर घरी परत गेले नाही तर माझे आई-वडील खूप काळजी करतील. मला लवकर सोडून दे ! तेजिंग समजावणीच्या सुरात म्हणाला, ठीक आहे तू मला दादा म्हणतेस म्हणून तुला मारणार नाही, खाणारही नाही, 'पण तुला एका मोठ्या बाटलीत ठेवेन आणि तुझं सुंदर रूप, मनमोहक हालचाली निरखीत राहीन ! ' मासोळी म्हणाली, 'हे बघ दादा, तुला माझी जलक्रीडा पहायचीच असेल तर तू मला नदीत सोडून दे.' कारण तुला नदीच्या नितळ, मोकळ्या पाण्यात ही सुंदरता पहाणं अधिक आनंददायी वाटेल. बाटलीतल्या थोड्याश पाण्यात हालचाल करता येणार नाही. माझा जीवही गुदमरेल आणि त्यामुळे माझी जलक्रीडा पहाण्याचा आनंदही मिळणार नाही.' तेजिंग म्हणाला, "अगं मासाळीताई, आजपर्यंत तुझ्याइतकी सुंदर मासोळी मी पाहिलीच नाही. त्यामुळे आता मी तुला कसं सोडू ?" हात जोडून विनंतीच्या सुरात मासोळी म्हणाली, ' मला सोड रे भैय्या' तुझ्यासाठी सकाळ-संध्याकाळ माझ्या मैत्रिणींसह मी नदीकाठावर येईन. 'तू माझा खेळ बघ ! आवडेल ना तुला ?' मासोळीच्या या बोलण्यामुळे तेजिंग विचार करू लागला, जर मासोळीला आई-वडिलांपासून दूर केले तर मासोळीही दुःखी होईल आणि तिच्या आई-वडिलांनाही दुःख होईल. त्यापेक्षा मासोळीला नदीत सोडून द्यावे. नदीजवळ जाताच मासोळीला नदीत सोडले. मासोळीला निरोप देत तेजिंगने उरलेल्या मासोळ्यांची टोपली उचलली आणि घरी आला. टोपलीतल्या मासोळ्या पाहून आपला मुलगा मासे पकडण्यास पात्र झाला याचा आईला खूप आनंद झाला.

आईने मासोळ्या भाजल्या. तेजिंगला वाढले. परंतु तेजिंगला जेवणही गोड

वाटले नाही. त्याला आपल्या अवती-भवती सोनेरी मासोळी, तिची रंगी-बेरंगी शेपूट हलते आहे असा भास झाला. तिचा आवाज कानात घुमू लागला. अशा या भासमय दुनियेत त्याला झोप लागली. तो स्वप्नातही सोनेरी मासोळीलाच पहात होता.

सकाळ होताच तेजिंगने टोपली उचलली आणि नदीच्या दिशेने चालू लागला. नदीवर पोहोचताच जाळे पाण्यात टाकले. नदीच्या पाण्यात पाय सोडले. पाण्यात लहरी उठल्या. सोनेरी मासोळीला जणू त्या सूचना देत होत्या. जाळे जड वाटले म्हणून त्याने बाहेर काढले. आणि काय आश्चर्य ! कालच्या पेक्षा आज अधिक मासोळ्या मिळाल्या ! तेजिंगला या आनंदातच पाण्यातून सोनेरी मासोळी येते आहे असे क्षणभर वाटले. परंतु दुसऱ्याच क्षणी त्याला वाटले की, सूर्याच्या किरणांमुळे मासोळ्या चमकत असतील ! थोड्याच वेळात मासोळ्या टोपलीत घेऊन तो घराकडे निघाला. इतक्यात, सोनेरी मासोळीचा आवाज आला, “भैय्या, परत कां निघालास ? ठरल्याप्रमाणे मी येत होते. तू निराश होऊन परत निघालास का ? तुला मासे पकडण्यात अडथळा येऊ नये म्हणून मी उशीरा बाहेर आले. पाण्यातून मी तुला पहातच होते ! माझे प्राण वाचवलेस त्यामुळे माझ्यावर आणि आई-बाबांवरही खूप कृपा केली आहेस ! अशा दयाळू मुलाला मी कधीच विसरणार नाही.”

’दादा, तुला माहीत आहे का ? मी या नदीच्या राजाची मुलगी आहे.’ तू माझे प्राण कसे वाचवलेस ही गोष्ट आई-बाबांना सांगितली.त्यांनी तुझ्यासाठी भेटही दिली आहे. त्यांना तुला भेटायचे आहे. केव्हा भेटतोस ? असं म्हणत मासोळीने तिच्या जवळच्या तरंगणाऱ्या कासवाच्या पोटातून एक गाठोडी घेतली आणि तेजिंगला म्हणाली, ’ घे. तुझ्यासाठीच आहे. ’

तेजिंगला या सर्व गोष्टीचं फार आश्चर्य वाटले. भेटीची गाठोडी घेत तेजिंग म्हणाला,’धन्यवाद ताई, आज नाही पण उद्या-परवा आईला विचारतो आणि आईबाबांना भेटतो.’ मासोळीने ’ठीक आहे’ असे म्हणताच तेजिंग म्हणाला, ’आई काळजी करीत असेल!’ मला निघायलाच हवं ! मी घरी पोहोचल्यावरच ती

जेवण बनवेल ! त्यानंतर ती कामावर जाईल ! 'मी उद्या परत भेटेन !'

तेजिंगचा उत्साह वाढल्याने चालण्यातही गती आली. घरी पोहोचताच मासोळ्यांची टोपली आणि भेटीची गाठोडी आईला दिली. सोनेरी मासोळीची गोष्टही सांगितली. गाठोडी उघडताच मोत्याच्या माळा, सुंदर शिंपल्यांचे हार पाहून आईचा चेहरा आनंदाने चमकू लागला. आई म्हणाला, तेजिंग मत्स्यकुमारीची आणि तुझी मैत्री झाली ही चांगली गोष्ट आहे. पण एक लक्षात ठेव, आपण कष्टाची भाकरी खाणारे लोक आहेत ! संपत्तीचा लोभ ठेवू नकोस ? मेहनतीने कमवण्यातच जीवनाचा खरा आनंद मिळतो. मत्स्यकुमारीजवळ अतिलोभाने जास्त काही कधीच मागू नकोस ? मैत्रभावजपत रहा ! समजलं ! 'ठीक आहे आई. पण तिच्या आई-बाबांना भेटू का नको !' तेजिंगला समजावत आई म्हणाली, 'अरे वेड्या, त्यांच्या धन-संपत्तीचा लोभ ठेवू नकोस याचा अर्थ त्यांना भेटू नको असं कुठं आहे ?'

दुसऱ्या दिवसापासून नित्यनेमाने तो मासे पकडण्यासाठी आणि मत्स्यकुमारीला भेटण्यासाठी नदीवर जाऊ लागला. एके दिवशी भेटीची गाठोडी घेतली. नवे कपडे घातले आणि तेजिंग नदी किनाऱ्यावर आला. मत्स्यकुमारीने एका मोठ्या कासवावर तेजिंगला बसण्यास सांगितले. मत्स्यकुमारी आणि तेजिंग जल-यात्रा करत करत मत्स्यलोकांत पोहोचले. मत्स्यलोकांची आगळी वेगळी दुनिया पाहून तेजिंग खूष झाला. मत्स्यकुमारीचे वडील भेटताच ते तेजिंगला म्हणाले, 'दुसऱ्यांचं भलं करणं, दुसऱ्यांना दयाबुद्धी दाखवणं हेच माणुसकीचं वैशिष्ट्य आहे. हीच मनुष्याची खरी ओळख आहे.मत्स्यकुमारीला जीवदान दिलं. आम्ही उपकृत आहोत. आम्ही तुझ्यावर खुष आहोत ! तुला जे जे पाहिजे ते ते सर्व काही देऊ इच्छितो. मात्र तुला काय पाहिजे !' तेजिंग म्हणाला,'मत्स्यराज,मत्स्यकुमारीच्या मैत्रभावाने मी खुष आहे. फक्त आईच्या आणि माझ्या उपजिवीकेसाठी आपल्या इकडच्या परिसरात मासे पकडण्याची परवानगी द्यावी हीच विनंती.'

राजाला तेजिंगचा विनम्र, समाधानी, साधा भोळा स्वभाव खूपच आवडला.

हिऱ्या मोत्यांची गाठोडी देत राजा म्हणाला, 'बेटा, आमच्या राज्यातून तू रिकाम्या हाती कसा जाशील. ' हे घे ! आणि याबरोबरच तुला मासे पकडण्याची परवानगीही देत आहे.'

गाठोडी सांभाळत कासवावर बसत तेजिंगने मत्स्यकुमारीचाही निरोप घेतला. तेजिंगने घरी आल्यानंतर भूतदया व्रत अंगिकारायचे ठरवले. अवती भवतीच्या कोणत्याच प्राण्याला दुखवायचं नाही. त्रास द्यायचा नाही उपजिविकेसाठी आवश्यक तेवढेच मासे पकडायचे. अशी प्रतिज्ञा करीत माशाच्या रूपात आनंदी खेळकरपणे जगायचे ठरवले. यानंतर रोज नदी किनारी जायचे. मासे पकडायचे. मत्स्यकुमारीबरोबर जलक्रीडा करायची हाच तेजिंगचा जीवनक्रम बनला !

# ४.५४.

# कठीण समय येता कोण कामास येतो

(नेपाळी लोककथा)

एका जंगलात छोटे-मोठे, कुमार वयाचे, किशोरवयाचे खूप ससे होते. या सर्व सशांमध्ये एक किशोरवयीन ससा फारच चपळ, बोलघेवडा आणि चंचल होता. त्यामुळेच जंगलातल्या सर्व मित्र परिवारात तो सगळ्यांना हवा-हवासा वाटायचा. अनेक मोठे प्राणीही त्याच्यावर खूप प्रेम करायचे. आणि सशालाही त्यांच्याशी खेळतांना खूप मौज वाटायची. असा हा मौज-मजा, खेळ-मस्ती करणारा ससा घरी कमी आणि बाहेर जास्त रमत होता. कधी मयुरनृत्य पहात खुश व्हायचा तर कधी चिमण्या, साळुंक्या, कबुतरे इत्यादी पक्षीसमुहात उनाडक्या करत फिरायचा, तर कधी घोडे गाढवांच्या पाठीवर बसून शेतातून फेरफटका मारायचा ! या सशाच्या विविध करामतींमुळे आई-वडील फारच वैतागले होते. एकदा घरच्या वडिलधाऱ्यांनी सशाला समजावून सांगितले, 'बाळा, दिवसमान चांगले नाहीत. अशा, उनाडक्या करीत फिरण्यापेक्षा काही कामधंदा करून बघ!' सगळ्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत आत्मविश्वासपूर्वक ससा म्हणाला, कशाला फालतू काळजी करता ! संकटात मदत करणारे घोडा,हत्ती,म्हैस,कासव इत्यादी मित्रांचे कुटुंबीय चांगले समर्थ आहेत. लाड-कौतुकात वाढलेल्या सशाला बोलण्यात काही अर्थ नाही हे लक्षात येताच आई-बाबांनी सशाला काहीच बोलायचे नाही असे ठरवले. दिवसें दिवस तो अधिकच धीट होत गेला.

एके दिवशी जंगलात एक शिकारी शिकार खेळण्यासाठी आला. शिकाऱ्याच्या मागे त्याचा कुत्रा पळत होता. ससा आपल्याच नादात नाचत

कुदत घराकडे परत येत होता. अचानक कुत्र्याला ससा दिसला. सशाला पकडण्याचा प्रयत्न केला. ससा घाबरला, जीव वाचविण्यासाठी लांब उड्या मारीत तो धावू लागला. वादळामुळे रस्त्यात एक झाड आडवे पडले होते. या अडथळ्यामुळे कुत्र्याची गती कमी झाली. पळता पळता सशाला कावळा दिसला. सशाने कावळ्याला संकटातून वाचविण्याची विनंती केली. पण कावळा म्हणाला, 'मित्रा, मी एक छोटा पक्षी आहे; उडणाऱ्या पक्षाला मी घायाळ करु शकतो. पण कुत्र्याशी कसा सामना करू ? मला माफ कर ! 'इतक्यात झाडाचे अडथळे ओलांडून कुत्रा सशाच्या जवळ आला. त्यामुळे कावळ्याशी बोलण्यात वेळ न घालवता उड्या मारीत ससा पुढे निघाला.

एका मैदानात गाढव चरत होते. ससा गाढवाला म्हणाला, मित्रा कृपा करुन मला या संकटातून वाचव ! गाढव म्हणाले, 'हे बघ छोट्या मित्रा, कुत्र्याच्या एका उडीत तू पकडला जाशील ! मी एक सामान्य प्राणी आहे. त्यामुळे तू समोरच्या घोड्याला सांग. तो माझ्यापेक्षा मोठा आहे.' गाढवाच्या बोलण्यावर समाधान मानीत ससा घोड्याजवळ गेला. घोड्याला म्हणाला, घोडेदादा, मला तुझ्या मदतीची गरज आहे. मला या संकटातून वाटचवलेस तर मी तुझे उपकार आयुष्यभर विसरणार नाही. घोडा म्हणाला, 'हे बघ बाळा, तुला मदत करणं हे माझं कर्तव्य आहे. पण कुत्र्याशी शत्रुत्व घेणं मला परवडणारं नाही. कारण चारा-पाण्यासाठी मला नेहमीच गावातून जावं लागतं. आजपर्यंत कुत्र्यानं मला कधीच त्रास दिला नाही. त्यामुळे मी तुला मदत करू शकत नाही ! तू असं कर, तलावापलीकडे हत्ती आहे तो मोठा बलवान आहे. तो नक्की तुला मदत करेल !

हत्तीला शोधत शोधत ससा तलावाच्या किनाऱ्यापर्यंत आला. इतक्यात सशाला उन-पाळी खात बसलेला कासव दिसला. सशाने कासवाला विनंती केली, 'प्रिय मित्रा, तुझ्या पाठीवर बसवून मला तलावात ने. या कुत्र्यापासून माझा जीव वाचव ! ' कासव म्हणाले, 'मित्रा यापूर्वी माझ्या पाठीवर बसवून तुला तलावात फिरायला नेले आहे. पण आज नाही. कारण कुत्र्यांना पाण्यात पोहता येते. तुला पकडायच्या नादात तो तलावात आला तर पाण्यात बुडी मारताच

एकतर तुझा जीव गुदमरेल नाही तर कुत्रा तुला पकडेल ! त्यापेक्षा इथून लवकर पळ ! एखाद्या बिळात लपून बस. आणि स्वतःचा जीव वाचव ! सगळ्या मित्रांची नकारघंटा ऐकता ऐकता ससा दुःखी झाला. पळून पळून दमून गेला. अखेरीस जीव वाचवण्यासाठी हत्तीला शोधायला निघाला. पण वाटेत कुठेही हत्ती दिसला नाही. पळता पळता एका वडाच्या झाडाखाली उंदरांचा खेळ चालू होता. सशाने उंदरांची मदत घ्यायचे ठरवले. उंदराचा राजा म्हणाला, 'हे बघ ससुल्या, आमचं बिळ फारच छोटं आहे. त्यात तू कसा जाशील ? त्यापेक्षा समोरच्या झाडात मोठे-मोठे खड्डे आणि बिळं आहेत. तिथे जा आणि स्वतःचे प्राण वाचव ! ' उंदरांना धन्यवाद देत ससा फुलांनी बहरलेल्या झाडात शिरला. फुलांच्या सुवासामुळे कुत्र्याला ससा कुठे लपला असेल याचा अंदाज येत नव्हता. बराच वेळ इकडे-तिकडे डोकावत, भुंकू लागला. अखेरीस गावात निघून गेला.

झाडात लपल्याबरोबर बराच वेळ पळल्यामुळे सशाची श्वासाची गती वाढली! या एकटेपणात आई-बाबांचीही खूप आठवण येऊ लागली ! संकटात कुणीच आपला मित्र सखा नसतो या कटू सत्याची जाणीव होतांच डोळ्यातून अश्रू ओघळू लागले. या सर्व धावळीत आपल्या मित्रांची मदत जरी झाली नाही तरी एका अनोळखी छोट्याशा उंदराने आपल्याला संकटातून बाहेर पडण्याचा योग्य मार्ग सांगितला.थोडी विश्रांती घेताच सशाला बरे वाटले. त्याने उंदीर राजास धन्यवादही दिले. आणि घरी जाता जाता स्वतःच्या मनाशी संकल्प केला की, आजपासून स्वार्थी मित्रांसोबत रिकामटेकडेपणा करुन वेळ वाया घालवण्यापेक्षा काही तरी चांगले काम करण्याचा प्रयत्न करेन !

# ४.५५. लहान असती महान

कुणे एके काळी एक अत्यंत श्रीमंत राजा होता. राजा धार्मिक विचारांचा होता. दयाळू आणि जनतेच्या हितासाठी काम करणारा होता. या राज्यातील लोक कष्टात समाधान मानणारे होते. शेतात अन्नधान्य भरपूर प्रमाणात पिकत असल्यामुळे चिमण्यांनी किंवा उंदरांनी शेतातले धान्य खाल्ले तरी शेतकरी राजा कधी त्यांना हुसकून लावत नव्हते. उंदीर कुणाच्याही घरातल्या धान्याची किंवा कपड्यांचे नुकसान करत नव्हते. असे हे सुखी-समाधानी समृद्ध राज्य होते.

एकदा राज्यात दुष्काळ पडला. पाऊस पडत नसल्यामुळे जमिनीला भेगा पडल्या. पीक पेरणी बंद झाली. शेतीची कामं नसल्यामुळे शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसत होते. कोठारातील धान्यावर लोक जगत होते. राज्यातील लोकांप्रमाणेच उंदीरही जमा केलेले धान्य संपवत होते. कोठार रिकामे होताच उंदरांनी एक सभा बोलावली. या सभेत सरदार उंदराने एक पर्याय सांगितला. या पर्यायानुसार एके दिवशी सर्वजण मुषकराजाकडे गेले. राजास म्हणाले, 'सरकार,कोठार रिकामे झाले आहे. चोरी करुन, कुणाला त्रास देऊन अन्न मिळवणे हा आपल्या राज्यात गुन्हा समजला जातो. अन्न-पाण्यावाचून मुलं-बाळं उपाशी मरतील? त्यामुळे आम्हाला असे वाटते की,आपण आपल्या राज्याच्या दयाळू राजांना भेटावे. थोड्या-फार अन्न-धान्याची मागणी करावी.' प्रजेच्या या प्रस्तावावर मुषकराजांना थोड हसू आलं. परंतु क्षणभरातच मुषकराज म्हणाले,'तुमचं म्हणणं योग्य आहे.मला आपल्या सगळ्यांचा फार अभिमान आहे. आपल्या सर्वांच्या जीवितासाठी मी महाराजांकडे विनंती करतो!'

एके दिवशी आपल्या मित्रमंडळासह मुषकराज महाराजांच्या दरबारात

पोहोचले. व्दारपालांना विनंती करीत म्हणाले,'आम्हांला महाराजांना भेटायचे आहे!' द्वारपालांनी स्वागताधिकाऱ्यांकडे पाठवले. स्वागताधिकाऱ्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली. महाराजांना स्वागताधिकाऱ्यांनी मुषकराजांची समस्या सांगितली. महाराज हसत हसत म्हणाले, 'ठीक आहे. त्यांची समस्या समजून घेतली पाहिजे.' त्यांना बसायला सांगा ! एका कक्षात मुषकराज आपल्या मंत्रीमंडळासह स्थानापन्न झाले. राजा येताच सर्व उभे राहिले. नमस्कार केला. मुषकराजाने महाराजांना पुष्पगुच्छ देऊन राजाचा सन्मान केला. राजाने मुषकराजास आगमनाचे कारण विचारताच मुषकराज म्हणाले, 'जनहीत पहाणारे आपण दयावंत राजे आहात ! दुष्काळाचे सावट आहे. वृद्ध-मुलं भूकबळी होताहेत ! आमचं कोठार रिकामं झालं आहे. नवीन अन्नधान्याचे पीठ येत नाही तोपर्यंत कोठारात भर पडणार नाही. आम्ही अन्न-धान्य मागण्यासाठी आलो आहोत! पुढच्या वेळी धन-धान्य येताच आम्ही व्याजासहित परत करण्याचे आपणांस आश्वासन देतो.

राजा म्हणाला, 'इतके धान्य कुठे ठेवाल ? कसं नेणार ?' मूषकराज म्हणाले, महाराज, आपण त्याची काळजी करू नका ! आमच्याजवळ जागेची कमतरता नाही ! उंदरांकडे पहात दयावंत राजे महाराजे म्हणाले, 'राज्याचं अन्नभांडार आपल्या प्रजेसाठीच आहे.'

मुषकराजांकडे पहात महाराज म्हणाले, 'मुषकराज आता खूष आहात ना ?' वाकून नमस्कार करीत राजाचा सन्मान केला. आणि मूषकराज म्हणाले, 'आमच्यासाठी आपण जे काही केले त्यासाठी आम्ही कृतज्ञ आहोत ! फक्त एक विनंती आहे, जेव्हा धान्य घेण्यासाठी आमची प्रजा येईल तेंव्हा कुत्रा-मांजरांपासून त्यांचे संरक्षण व्हावे ! त्यांना कुठलीही इजा होऊ नये यासाठी आपण संरक्षण व्यवस्था पुरवावी ! राजाने मंत्री महोदयांना संरक्षण व्यवस्थेचे आदेश दिले. मूषक राजाने आभार मानले आणि बैठक कक्षातून बाहेर पडले.

मूषकराजाने आपल्या प्रजाजनांना ही आनंदाची बातमी दिली आणि सगळ्यांनी लवकरात लवकर आपले धान्य गोळा करण्याचे फर्मान सोडले. सर्व

उंदीर धावत-पळत एकही दाणा न सांडता धान्य नेत होते. ही शिस्त पाहून महाराज खूष झाले.

एके दिवशी उंदरांची एक टोळी फळांच्या शोधात जंगलात गेली. त्यांनी नदीच्या पलीकडे काही लोकांना तंबू ठोकताना पाहिले. तिकडे पार्टी असावी आणि नवे पदार्थ खायला मिळतील या आशेने सर्व उंदीर नदीतून पोहत पैलतीराला पोहोचले. परंतु तेथे वेगळेच दृष्य पाहून उंदीर परतले. आणि आपल्या मूषकराजांना ही वार्ता सांगितली. महाराजांना या गोष्टीची माहिती देणे आवश्यक आहे असे मूषकराजांना वाटले. आपल्या दोन-चार सहकाऱ्यांसह ते राजमहालाकडे चालू लागले. मध्यरात्री मूषकराजांची आणि महाराजांची भेट घडवणे द्वारपालास योग्य वाटत नव्हते. त्यामुळे द्वारपालांनी दरवाजा उघडला नाही. मूषकराज म्हणाले, 'हे पहा, देशावर संकट येत आहे. काही विचित्र घडण्याआधी राजास ही बातमी देणे आवश्यक आहे ? बातमीचे गांभीर्य लक्षात येताच द्वारपालाने महाराजांना संदेश पाठवला. महाराज येताच मूषकराज आणि इतर उंदरांनी जे पाहिलं ते वर्णन करून सांगितले. राजाच्या चेहऱ्यावरचे चिंतीत भाव पाहून मूषकराज म्हणाले, 'महाराज,आपली परवानगी असेल तर देशाच्या रक्षणासाठी आमचा मूषकपरिवारही बलिदान देण्यास तयार आहे.' राजा हसत हसत म्हणाला, 'मुषकराज, शत्रूपक्षाच्या बलशाली सशस्त्र सेनादलापुढे आपल्यासारखा साधारण प्राणी काम करु शकेल ? राजाच्या हसण्याकडे दुर्लक्ष करीत देशप्रेमी मुषकराज म्हणाले, 'राजे साहेब, कोठारातून धान्य कसं नेणार या आपल्या प्रश्नाला आमच्या मुषक परिवारानं किती कौशल्याने उत्तर दिलं होतं ! हे आपल्याला आठवत असेल तर आमच्यासाठी कोणतीच गोष्ट अशक्य नसते हे याआधीच आम्ही सिद्ध केले आहे. आताही आपण आदेश द्यावा ! आणि सैनिकांचीही पलटण तयार ठेवा. योग्य वेळी चाल केली तर मोठ्या संकटातून सगळ्यांनाच बाहेर पडता येईल ! '

संकटात प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा असतो असा विचार करीत राजा म्हणाला, ' मूषकराज, आपण फार महत्त्वाची गोष्ट सांगितली. आपल्या सूचनेचे

आम्ही स्वागत करतो. आपण पुढच्या कामाला लागा, आपल्याला योग्य वाटेल तसेच नियोजन करा. आमचा आपल्यावर पूर्ण विश्वास आहे.' महाराजांना नमस्कार करीत मूषकराज म्हणाले, 'आपल्या देशासाठी काम करण्याची संधी दिली यासाठी कृतज्ञ आहे महाराज ! लवकरात लवकर पलटणी तयार करा ! आम्ही लवकरात लवकर नदी किनारी पोहोचतो.

मूषकराजांचा आदेश होताच उंदीरसेना नदीच्या पैलतीरावर जाण्यास निघाली. मध्यरात्रीपर्यंत उंदीरसेना शत्रूच्या तंबूत शिरली !शत्रूसेना गाढ झोपली होती. सावधगिरीने तंबूतील सैनिकांचे केस, मिशा, भुवया कुरतडू लागले. काही उंदारांनी बंदुकांची काडतुसं कुरतडली. अन्न-धान्य अर्धवट खाऊन अंधारातच काही उंदीर पळून गेले. काही उंदीर झाडा-झुडपात पुढची गंमत पहाण्यासाठी लपले ! परत आलेल्या उंदरांनी आपल्या कर्तृत्वाची कहाणी मूषकराजांना दिली. उंदीर सेनेने शत्रूपक्षाच्या सैन्याचा चेहरा-मोहराच बिघडवला आहे हे ऐकून मूषकराजांनी शाबासकी दिली. आणि मूषकराज सैनिकांची पलटण पाठवण्याचा आदेश देण्यासाठी राजे महाराजांकडे गेले.

सैनिकांची पलटण पहाटे-पहाटे नदीच्या पैलतीरावर पोहोचली. सैनिकांनी बिगुल वाजवला. बिगुल ऐकताच शत्रूपक्षाचे झोपलेले सैनिक खडबडून जागे झाले. परंतु जाग येताच सैनिक एकमेकांकडे पाहून हसू लागले. कारण सगळ्यांचेच चेहरे चित्रविचित्र दिसत होते. कुणाची मिशी गायब तर कुणाच्या भुवया गायब ! काही एकमेकांवर दोषारोप करीत आरडा-ओरडा करू लागले. आणि दोषारोपाचे रूपांतर भांडणात झाले.

काही क्षणातच सैनिकांच्या लक्षात आले की, तंबूच्या दोऱ्याही तुटल्या आहेत. काही ठिकाणी तंबूचे कापडही फाटले आहे. रात्रीतून हे सर्व घडले कसे? हाच प्रश्न सर्व सैनिकांना पडला. इतक्यात समोरच्या सैनिकांनी बॉम्ब गोळे आणि बाणांचा वर्षाव करीत युद्ध सुरुही केले. अचानक झालेल्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी सैनिक बंदूक आणि धनुष्यबाण उचलायला लागताच लक्षात आले की, बंदुकांची काडतुसे तुटली आहेत, धनुष्य बाणांच्या तारा

तुटल्या आहेत ! सर्व सैनिक हतबल झाले ! कुणालाच काही सुचत नव्हते ! या सगळ्याचा परिणाम असा झाला की, बरेचसे सैनिक मृत्यूमुखी पडले ! काही सैनिक स्वतःचा जीव वाचविण्यासाठी पळू लागले ! अखेरीस उरलेल्या सैनिकांनी पराभव मान्य करीत शरणागती पत्करली ! मूषकराजांची योजना यशस्वी झाली.

विजयोत्सव साजरा करतांना राजे महाराज म्हणाले, 'कुठलाही प्राणी शरीराच्या आकारमानावरून दुबळा किंवा शूर नसतो. बौद्धिक क्षमता हेच प्राण्यांचं श्रेष्ठत्व असतं. मूषकराज आणि उंदीरसेनेने त्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. आणि बक्षीस म्हणून मूषकराजांना गुप्तहेर खात्याचा सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. उंदीरसेनेची शौर्यगाथा ऐकून शत्रूपक्षाच्या राजाला प्रश्न पडला की, ज्या राज्याचे उंदीर इतके हुशार आणि बुद्धिमान असतील, त्या देशाचे सैनिक किती शूर असतील ? शत्रूपक्षाचा राजा या पराभवाने खचला नाही; उलट विजयी राजाचे अभिनंदन करीत म्हणाला, 'राजे साहेब, आजपासून आपण शत्रूपेक्षा मित्र म्हणूनच राहू ! हे मैत्र जपण्यासाठीच मी माझ्या मुलीचं लग्न तुमच्या मुलाशी करून देतो. आपण या प्रस्तावास संमती द्यावी. दोन्ही राजांनी हस्तांदोलन करीत मित्रत्वाने रहाण्याचे ठरवले. मूषकराजांना गुप्तहेर खात्यात सल्लागाराचे पद मिळताच सर्वत्र स्वैर संचार करीत उंदीरसेना फिरू लागली. आणि म्हणूनच आजही या मूषकराजांची प्रजा घरात, शेतात, जंगलात, बाग बगीच्यात, नदी-नाल्यात मुक्त संचार करीत, मौज-मजा करीत हिंडत असतात.

# ४.५६.

# बगळा आणि खेकडा ह्यांची गोष्ट

एका भल्या मोठ्या तळ्याच्या काठी एक बगळा राहात होता. तो म्हातारा झाला होता आणि मासा गवसावा म्हणून तासन् तास एका पायावर उभं राहाणं त्याला आता झेपत नव्हतं. बरं, इतके कष्ट करून एकदा मासा मिळाला तर तेवढयानं त्याचं पोट भरत नसे.

पोटभर मासे कसे मिळवावे ह्याचा तो विचार करीत असताना, एक दिवस एक खेकडा त्याच्याजवळ आला. आणि त्याला म्हणाला, 'आज इतका उदास का दिसतोयस? मासे पकडण्यासाठी व तळ्याकडे येणार नाही का ?'

बगळ्यानं सुस्कारा सोडला, नि तो बोलला, "नाही ! हे बघ, आज सकाळी मी काही कोळयांना एकमेकांशी बोलताना ऐकलं, त्यांनी एक वेगळाच बेत केलाय रे! उद्या पहाटे येऊन ते जाळे लावणार आहेत म्हणे आणि एका सपाट्यांत सगळे मासे अवघ्या दोन दिवसात पकडणार आहेत. हे ऐकून मी वैतागलो आहे. मला खाण्या जेवण्याची इच्छा नाही. फार काय, इथं राहावं असं सुद्धा मला वाटत नाही.'

तसा खेकडा वाकडा, वाकडा चालत तळ्याकडे गेला आणि त्यानं सगळ्या खेकड्यांना, ही बातमी सांगितली. ते सगळे विलक्षण भ्याले नि आपल्याला मदत करण्याची त्यांनी बगळयाला विनंती केली.

थोडा विचार केल्याचा आव आणला बगळयानं ! अन् मग त्यानं म्हटलं, 'इथून जवळच एक देऊळ आहे. त्याच्या भोवतीच्या बागेत सुंदर तळे आहे. हे तळे देवळाच्या मालकीचे असल्यानं तिथे मासे पकडण्याची मनाई आहे. तुम्ही सगळे तिथे गेलात तर सुखरूप राहाल.

हे ऐकून मासे खूष झाले, बगळ्यालाच ते देवळाच्या मालकीचं तळं कुठ आहे ते ठाऊक होते. आणि तो तिथे उडून जाऊ शकत होता. शिवाय, तो आपला दोस्त आहे, हितकर्ता आहे असा विश्वास वाटत होता यांना.

बगळ्यानं होकार दिला. चार-चार, पाच-पाच माशांना तो रोज गटागटानं त्या नव्या तळ्याकडे नेऊ लागला. म्हणजे नेण्याची तो बतावणी करू लागला. प्रत्यक्षात त्या तळ्याकडे न जाता तो वाटेतल्या खडकावर त्या माशांना फेकायचा नि सावकाश त्यांना खाऊन टाकायचा.

काही दिवस असे गेले. बगळा दिससेंदिवस लठ्ठ होत होता नि त्याचा हावरटपणा वाढत होता. एक दिवस खेकड्याच्या मनात आलं की, आपण त्या देवळाच्या तळ्याकडे जाऊन बघावं. आणि आपल्याला तिथे नेण्याचा त्यानं बगळ्याला आग्रह केला.।

बगळ्याला रोज रोज मासे खाऊन कंटाळा आला होता. त्याला वाटलं, एक दिवस माशाऐवजी हा खेकडा खाल्ला तर तेवढाच पालट होईल. म्हणून त्यानं खेकड्याला नेण्याचं कबूल केलं. खेकड्याला पाठीवर घेऊन तो उडाला.

वाटेत खेकड्याला खडक दिसले नि तिथ माशांचे सुकलेले काटेही दिसले तसा खेकडा घाबरला, त्यानं विचारलं, 'बगळे दादा तुम्ही सांगत होता ते देवळाजवळचं तळं कुठं आहे ? इथे चहुंकडे फक्त खडक नि झाडं दिसतायेत.'

बगळ्याने मजेत उत्तर दिले, 'तुझे दोस्त मासे कायमचे झोपी गेले आहेत. आणि थोड्याच वेळात तुझीसुद्धा तीच अवस्था होणार आहे.'

खेकड्यानं बगळ्याची लबाडी ओळखली. आणि त्याच्या पाठीवरून सरकत खेकडा त्याच्या लांबोळ्या मानेकडे पोचला. नि झटकन् आपल्या तीक्ष्ण पंजात त्यानं बगळ्याची मान पकडली.

बगळा कासावीस झाला आणि उडता उडता खाली कोसळला, तशी खेकड्याने त्याची मान कुरतडून कुरतडून तोडली. आणि बगळ्याचं डोकं त्याने आपल्या दोस्तांना नेऊन दाखिवलं.

तो म्हणाला, “मित्रानो, माझं मरण ओढवलं होतं पण मी वाचलो. वेळीच मला

त्या लुच्च्या बगळ्याची लबाडी कळली. ह्या तळ्यांतले मासे पकडण्यासाठी, कोळी मोठं जाळं आणणार आहेत ही आपल्याला घाबरवण्यासाठी त्यानं बात मारली होती. आता स्वत:च्या हावरटपणापायी तो मेला.

(कुमुदिनी रांगणेकर : मुलांचं पंचतंत्र, १९८२)

# ४.५७. चिमणी व कावळा

एक होती चिमणी व एक होता कावळा. चिमणीला सापडले मोती. व कावळ्याला सापडला हरभरा. कावळ्याने हरभ-याचा दाणा खाऊन टाकला व चिमणीजवळ जाऊन म्हणतो, " चिमणुबाय, चिमणुबाय, बघू तुझे मोती.' चिमणी म्हणते, 'नको रे बाबा. चोरूनबिरून नेलंस तर ? ' कावळा झणतो, "छे ग. पाहून लगेच परत देतो.' तेव्हा चिमणीने त्याला मोती दिले. मोती मिळाल्याबरोबर कावळा जो उंच उडाला तो उंच एका झाडावर जाऊन बसला. चिमणी कावळ्याला म्हणाली, ' कावळया, कावळया, माझे मोती देरे.' कावळा म्हणाला, देत नाही जा.' तेव्हां चिमणी झाडाजवळ गेली व म्हणते, ' झाडा, झाडा, कावळयाला पाड रे. ' झाड म्हणाले 'मी नाही पाडीत जा.' तेव्हा चिमणी सुताराकडे गेली व म्हणाली, 'सुतारा, सुतारा, तू झाड तोडरे.' सुतार म्हणतो, मी नाही तोडीत जा. तेव्हा चिमणी राजाकडे गेली व म्हणाली, राजा, राजा, सुताराला दंड कर रे, 'राजा म्हणाला मी नाही करीत जा.' तेव्हा चिमणी राणीकडे गेली व म्हणत्ये, "राणी, राणी, राजावर रूस गो. राणी म्हणत्ये, मी नाही रुसत जा.' तेव्हा चिमणी उंदराकडे गेली व म्हणाला, " उंदरा, उंदरा, राणीचे लुगडे फाड रे.' उंदीर म्हणतो, 'मी नाही फाडीत जा.' तेव्हा चिमणी मांजराकडे गेली व म्हणाली, " मांजरा, मांजरा, उंदराला खा रे,' मांजर म्हणते 'नाही खात जा.' तेव्हा चिमणी कुत्र्याकडे गेली व म्हणाली, ' कुत्र्या , कुत्र्या मांजराला चाव रे.' कुत्रा म्हणतो मी नाही चावत जा.' तेव्हा चिमणी गेली सोट्याकडे व म्हणत्ये 'सोट्या, सोट्या, कुत्र्याला चोप रे.' सोटा म्हणतो " मी नाही चोपीत जा.' तेव्हा चिमणी गेली अग्नीकडे व म्हणत्ये अग्नी, अग्नी, सोट्याला जाळ रे. अग्नी म्हणतो " मी नाही जाळीत जा.' तेव्हा चिमणी समुद्राकडे गेली व म्हणत्ये 'समुद्रा, समुद्रा, तू अग्नी विझव रे. समुद्र म्हणतो, "मी नाही विझवीत जा.' तेव्हा चिमणी हत्तीकडे गेली हणाली, "हत्ती, हत्ती, समुद्र ढवळ रे.' ती म्हणतो " मी नाही

ढवळीत जा.' व्हा चिमणी मुंगीकडे गेली व म्हणाली मुंगी, मुगी, हत्तीच्या कानांत शीर गो.' तेव्हा मुंगी म्हणाली, 'हू'

त्याबरोबर हत्ती म्हणतो- नक्को, नको, मी समुद्र ढवळतो.

समुद्र म्हणतो- नको, नको, मी अग्नी विझवतो.' अग्नी म्हणतो-- 'नक्को, नको, मी सोट्याला जाळतो.'

सोटा म्हणतो- नक्को, नको, मी कुत्र्याला मारतो.'

कुत्रा म्हणतो- 'नक्को, नक्को, मी मांजराला चावतो.'

मांजर म्हणते- 'नक्को, नक्को, मी उंदराला खाते.'

उंदीर म्हणतो - 'नक्को, नक्को, मी राणीचे लुगडे फाडतो.'

राणी म्हणते- 'नक्को, नको, मी राजावर रुसते.'

राजा म्हणतो- नक्को, नक्को, मी सुताराला दंड करतो.'

सुतार म्हणतो- नको, नको, मी झाड तोडतो.'

झाड म्हणते- नको, नको, मी कावळ्याला पाडतो'

कावळा म्हणतो- नको, नको, मी मोती देतो.'

असे म्हणून कावळ्याने मोती दिले = चिमणी आनंदाने राहू लागली.

इटकुली मिटकुली

गोष्ट सरो तुमचे आमचे पोट भरो

(शंकर गणेश दाते : लोककथा)

# ४.५८. सत्य कुत्रे महाराज

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात सुनेगाव नावाचे पंधराशे ते दोन हजार लोकवस्तीचे एक लहानसे खेडे आहे. स्वाध्यायाच्या भक्ती फेरीच्या निमित्ताने या गावात जाणे झाले. त्या गावात एक मारुतीचे मंदिर आहे. त्या मंदिराच्या दर्शनी भागाच्या एका कोपऱ्यात एक चिमुकले मंदिर आढळले. त्या चिमुकल्या मंदिरात एक दगडी कुत्रा शेंदूर लावून स्थापन केला होता, व वरच्या भिंतीवर 'सत्य कुत्रे महाराज' अशी पाटी लावली होती.

ही पाटी पाहून मनात असा विचार आला की, संत कुत्रे महाराज हे या भागातील कोणी साधू महाराज होऊन गेलेत काय? थोडा बारकाईने तपास केला असता एका वृद्ध शेतकऱ्याकडून माहिती मिळाली ती अशी – सुनेगाव हे शेतकऱ्यांचे गाव. तेथील शेतकरी नेहमी कर्जबाजारी. पूर्वी सावकार लोक शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करीत असत. त्या खेड्यापासून दहा-पंधरा मैलांवर असलेल्या लोहा या मोठ्या शहरवजा गावात एक सावकार होता. सुनेगावच्या सर्व लोकांना त्याच्याकडून वेळप्रसंगी कर्ज मिळत असे. पिढ्यान-पिढ्या कर्जात सापडलेला शेतकरी कधीही मोकळा होण्याची शक्यता नसे. कारण दहा-बारा वर्षांनी दुष्काळाला तोंड द्यायचे व चांगले साल आले की थोडे फार व्याज देऊन सावकाराची मनधरणी करायची, हा कायमचा पायंडा होऊन गेला.

त्या गावातील एका प्रामाणिक शेतकऱ्याकडे सावकार साहेबांनी कर्जफेडीचा जोरात तगादा लावला. दाणा-चारा संपला होता. ही कर्जफेड आपल्याकडून कधीही होऊ शकणार नाही हे जाणून बिचारा शेतकरी काकुळतीला येऊन शेटजींना म्हणाला, "शेटसाहेब, मला तुमच्या ऋणात रहावयाचे नाही. मजजवळ हा एक प्रामाणिक कुत्रा आहे, तो तुम्हाला निश्चित उपयोगी पडेल. त्याचा स्वीकार करा व मला आपल्या ऋणातून मोकळे करा."

सावकार कुत्र्यास घेऊन घरी आले. एक महिन्यानंतर त्यांच्या घरी चोरी झाली. चोरांनी घर उपसण्यास सुरूवात केली. महत्त्वाच्या खोलींमधून, कपाटातून वस्तू आणून ते अंगणात एकत्र करीत होते. हा सर्व कारभार चालू असतांना कुत्र्याने मौल्यवान वस्तू तोंडात धरून जवळच असलेल्या पडक्या विहिरीत आणून टाकल्या. पहाटे चारच्या सुमारास सर्व कारभार आटोपल्यावर चोर अंगणात जमा केलेल्या वस्तू व कपडे घेऊन पसार झाले.

सकाळी सावकाराचे घर जागे झाले, चोरी झालेली लक्षात आली. सावकार फार दुःखी झाला. त्याचबरोबर कुत्र्याबद्दल त्याला विलक्षण राग आला व मनात म्हणाला, "हा कुत्रा भुंकला सुद्धा नाही" त्यामुळे रागाने कुऱ्हाड घेऊन ती कुत्र्यास मारणार, तोच कुत्र्याने सावकाराचा धोतराचा सोगा तोंडात धरला व तो त्यास ओढू लागला. सावकाराने कुऱ्हाड खाली टाकली व तो कुत्र्यामागे जाऊ लागला. पडक्या विहिरीजवळ कुत्रा थांबला. सावकाराला आपल्या सर्व मौल्यवान वस्तू विहीरीत पडलेल्या दिसल्या. त्या गोळा करून कुत्रा व सावकार घरी आले. सावकाराला फार आनंद वाटला व कुत्र्याची सचोटी व प्रामाणिकपणा पाहून त्याचे मन गहिवरून आले. आपल्या कुळाबद्दल (कुत्र्याचा मूळ मालक) त्याला धन्यता वाटली. त्याने कुत्र्याला चांगले खाऊ-पिऊ घातले. एक छोटीशी चिठ्ठी लिहिली: "प्रामाणिक कुत्र्याने आमचे धन व प्राण वाचविले, त्यामुळे तुमचा कुत्रा तुम्हास परत." चिठ्ठी कुत्र्याच्या पट्ट्यात अडकवून कुत्रा शेतकऱ्याकडे परत पाठविला.

कुत्रा परत आलेला पाहून शेतकऱ्याचा राग अनावर झाला. सावकाराची सेवा न करता हा पळून आला असे समजून शेतकऱ्याने रागाच्या भरात एका क्षणात कुत्र्यावर घाव घातला, व कुत्र्याने आपला प्राण सोडला. झालेली हकिगत वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली. सावकारासही ती समजली. लोक जमा झाले. फार हळहळले. कुत्र्याचा प्रामाणिकपणा व त्याचा मृतदेह पाहून सर्वांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. शेतकऱ्यालाही त्याचा पश्चाताप झाला.

मारूती मंदिराशेजारीच एका बाजूला त्या मृत आत्म्यास मूठमाती देऊन

सावकाराने एक मंदिर बांधून दिले. तेच हे सत्य कुत्रे महाराज मंदिर. माणसाहूनही प्रामाणिक व इमानदार कुत्रा हा सगळ्यांना देवरूपच वाटला.

आजही श्रद्धेने त्या परिसरातील लोक या सत्य कुत्रे महाराजांच्या दर्शनास येतात. त्याच्या दर्शनाने सर्व इच्छा पूर्ण होतात व संकटे दूर होतात असे त्यांना वाटते.

(कथक - नारायण कडू वरखेडे, चिखलओहोळ : ब्रेन टॉनिक मासिक)

# ४.५९. चिमुकली इसापनीती

## कथा पहिली - उंदीर व बेडूक

एका उंदराची एका बेडकाशी फार ओळख होती. उंदीर एका घरातील कोठीत राहात होता व बेडकाचे घर एका नदीत होते. एकदा उंदराने बेडकाला आपले घरी जेवावयास बोलाविले होते. पुढे बेडकाने उंदराला आपले घरी बोलाविले. पण नदीतून उंदराला बेडकाचे घरी जाता येईना. कारण उंदराला मुळीच पोहता येत नाही. मग बेडकाने एक तोड काढली. उंदराचे पाय आपले पायास बांधले आणि आपण पोहू लागला. यामुळे उंदीर बुडाला नाही खरा; पण नाका-तोंडात फार पाणी जाऊ लागले आणि निम्म्या वाटेतच बिचारा उंदीर तडफडून मेला. परंतु उंदराचे पाय बांधले होते आणि बेडूक सारखा पोहत होता. यामुळे तो मेलेला उंदीर तळाशी बुडाला नाही. पण तसाच वर तरंगत होता. हे वरून एका गरुडाने पाहिले. लागलीच गरुडाने खाली झेप टाकली आणि तो उंदरास वर नेऊ लागला. पण बेडकाचे पायही उंदराला बांधलेले होते; यामुळे तोही उंदराबरोबर वर गेला. गरुडाने दोघांनाही घरी नेले आणि खाऊन टाकले. पहा, भलती संगत केली यामुळे असे झाले. बेडूक नदीत राहणारा आणि उंदीर जमिनीवर राहणारा. यामुळे या दोघांची मेजवानी एका बाजूस राहिली आणि गरुडाची बरीक मेजवानी झाली. यासाठी संगत फार विचाराने करावी.

## कथा दुसरी - दोघे सोबती

रामा व हरी या नावाचे दोघे सोबती रानातून वाट चालत होते. रामा अंगाने बराच बोजड होता; पण हरी अगदीच सडपातळ व चपळ होता. झाडीतून एखादे जनावर येईल आणि आपणाला खाईल अशी रामाला सारखी भीती वाटत होती. हरी फार बढाईखोर होता. तो रामाला फुशारकीने उगीच धीर देत होता. तो एकसारखा रामाला हसत होता आणि सांगत होता की, "रामा, तू फार भितोस

बुवा! अरे, एखादा वाघ आला तरी मी आहे ना! मी ताबडतोब तुझे रक्षण करीन." असे बोलत ते चालले आहेत तोच झाडीतून एक मोठी आरोळी ऐकू आली. आरोळी ऐकताच दोघेही फार घाबरले. हरी सडपातळ आणि चपळ होता; रामाला तसाच टाकून तो भरभर एका झाडावर चढून गेला. बिचारा रामा बोजड होता. तो हरीसारखा झाडावर कसा चढणार? मग तो तसाच डोळे मिटून जमिनीवर पडला! जसा काही तो मेलेलाच आहे. रामाला माहीत होते की, सिंहाला मेलेली शिकार आवडत नाही. लौकरच झाडीतून एक भला मोठा सिंह बाहेर आला. रामाला पाहताच सिंह जवळ आला आणि रामाचे नाक-कान हुंगू लागला. तो भयंकर सिंह इतका जवळ आला तरी रामाने अगदी हालचाल केली नाही व नाकातून वाराही बाहेर जाऊ दिला नाही. हरी झाडावरून हे सारे पाहात होता. अखेर, रामा मेलेला आहे असे सिंहाला वाटून तो निघून गेला. लागलीच हरी खाली उतरला व दोघेही फिरून वाट चालू लागले. आपण रामाला फसविले याची हरीला लाज वाटतच होती; पण ते सारं हशांवारी घालवावयासाठी हरीने रामाला विचारले, "काय रे, सिंहाने  एवढे तुला कानात काय सांगितले?" रामा बोलला, "हरीसारखा लबाड सोबती कामाचा नाही; बढाईखोर माणसावर भरवसा ठेवू नये, असे सिंहाने मला सांगितले आहे." हे ऐकून हरी फारच खजील झाला.

## कथा तिसरी- लबाड गाढव

एका माणसाजवळ एक गाढव होते. तो माणूस वाणी होता. तो परगावी सामान विकत घेई आणि गाढवावर लादून आपले घरी आणी. एकदा तो वाणी गाढवावर मिठाची गोणी लादून ती घरी आणीत होता. वाटेत एक लहानशी नदी होती. नदीतून जाताना गाढवाचा पाय घसरला आणि ते नदीत पडले, तोच पाणी मिठाचे गोणीत शिरले व बरेच मीठ विरघळून गेले. फार मीठ विरघळले होते यामुळे गाढवाचे ओझे अगदी हलके झाले. पुढे काही दिवसांनी वाणी मिठाची दुसरी खेप घेऊन आला. नदीजवळ येताच गाढवाला मागील खेपेची आठवण झाली. लागलीच ते जाणूनबुजून पाय चुकवून नदीत पडले. पुन्हा मीठ विरघळून

ओझे हलके झाले. आणखी दोन-चार वेळा गाढवाने तसेच केले. शेवटी गाढवाची ही लबाडी मालकाला कळून चुकली. दुसरे खेपेस गाढवावर खूपसा कापूस लादून तो घरी येऊ लागला. पुन्हा नदीजवळ येताच गाढव खाली पडले. पण या वेळेस कापूस विरघळून भार कमी झाला नाही; उलट पाणी कापसात शिरून ओझे जड बरीक झाले. मोठे ओझे पाठीवर पडून ते लबाड गाढव भाराखाली चेंगरून गेले. मुलांनो, याकरिता आपले काम नेहमी इमानाने करावे. लबाडी केली तर ती कधीतरी उघडकीस येते व आपणास फारच मोठी शिक्षा घडते.

## कथा चौथी - देव आणि उंट

एकदा उंटाने देवाजवळ तक्रार केली की, "देवा, तू बाकीची जनावरे किती चांगली केली आहेस; कोणाला नखे दिली आहेस, कोणाला सुळे दात दिले आहेस आणि कोणाला शिंगे दिली आहेस, यामुळे ती जनावरे आपापले रक्षण करितात; पण मला तेवढे काहीच दिले नाहीस; मग मी आपले रक्षण कशाने करावे? बरे तर देवा, मला निदान शिंगे तरी दे."देवाने सांगितले की, "बाबा रे, तू चांगला मोठा आहेस. तुला पाहूनच दुसरी जनावरे भिऊन पळून जातील; तुला शिंगे काय करावयाची आहेत?" देवानी अशी समजूत घातली; पण उंट आपला हेका सोडीना. अखेर देवाला कंटाळा आला तरी उंटाची कुरकूर चाललीच होती, हे पाहून देवाने उंटाला शिंगे तर दिली नाहीतच; पण मूळचे उंटाचे मोठाले कान बरीक कापून टाकले. उंटाचे कान लहान असतात याचे कारण हेच. मुलांनो, हा अधाशीपणाचा परिणाम बरे! यासाठी नेहमी समाधानाने रहावे.

## कथा पाचवी - कासव आणि ससा

एक कासव हळू हळू घरी चालले होते. कासवाला लौकर चालता येत नाही; यामुळे थोडेसे चालावयासही फार वेळ लागे. हे एका सशाने पाहिले. ससा फारच जलद धावतो. तो हसून कासवाला बोलला, "काय रे, तू किती सावकाश चालतोस? अशारितीने तू घरी कधी पोहोचणार?" कासव शहाणे होते. ते

बोलले, "बाबा रे, तू एवढी ऐट मारू नकोस! मी सावकाश चालतो आणि तू जलद पळणारा आहेस. बरे, तर आपण एक पैज मारू. ती समोर टेकडी दिसते ना? तेथे आधी कोण पोहोचते ते पाहू बरे." हे ऐकून सशाने हसत हसत कासवाला सांगितले, "चल, मला ही पैज कबूल आहे." नंतर दोघेही वाट चालू लागले. सशाने एक धाव मारून कासवाला मागे टाकले. कासव सावकाश चाललेच होते. सशाने मागे वळून पाहिले तो कासव फारच दूर! हे पाहून सशाने विचार केला की, "हे कासव तर फारच मागे आहे; मग इतकी घाई कशाला हवी? आता या गार झुडपात थोडीशी झोप काढावी. कासव जरा जवळ आले की, एक उडी मारून टेकडी गाठावी." असा विचार करून ससा एका झुडपाखाली पडला व लौकरच गाढ झोपी गेला. इकडे बिचारे कासव हळू हळू चालत होते. पण ते वाटेत कोठेही थांबले नाही; सारखे चालतच होते. अशारितीने लौकरच ते टेकडीवर जाऊन पोहोचले. काही वेळाने ससा जागा झाला आणि पाहतो तो कासव टेकडीवर बसलेले! बिचारा ससा हे पाहून फारच वरमला. नंतर कासव बोलले, "बाबा रे, कधीही ऐट मारू नये; आणि आपले काम नेहमी वेळेवर करावे. तू जलद चालणारा ससा, पण आळसाने फसलास!"

## कथा पाचवी- मुलगा आणि वाघ

एक मुलगा एका कुरणात मेंढरे चारीत असे. जवळ शेतात शेतकरी आपले काम करीत असत. या कामकरी लोकांना फसवावयासाठी तो लबाड मुलगा दररोज उगीच ओरडत असे की, "वाघ आला रे वाघ!" मुलाची अशी आरोळी ऐकून बिचारे शेतकरी धावून येत व वाघबीघ काही नाही, असे पाहून परत जात. शेतकरी असे फसले की, तो मुलगा हसत सुटे. दोन चार वेळा शेतकरी असे फसले; पण पुढे मुलाची आरोळी ऐकून ते येईनासे झाले. अखेर एकदा खरोखरीच वाघ आला. वाघाला पाहून तो मुलगा फारच घाबरला व ओरडू लागला की, "वाघ आला रे वाघ!" पण लोकांना वाटले की, तो लबाड मुलगा नेहमीसारखाच फसवीत असेल. अशा समजुतीने कोणीही मदतीसाठी धावून

आले नाही व इकडे वाघाने मुलाची सारी मेंढरे मारून टाकली. पहा, एक वेळ खोटे बोलले की, पुढे लोक आपणावर भरवसा ठेवीत नाहीत.

## कथा सातवी - सिंह आणि उंदीर

एक सिंह दररोज एका झाडाखाली निजत असे. जवळच एक उंदीर राहात होता. सिंहाला झोप लागली की, उंदीर बिळातून बाहेर येई व सिंहाची आयाळ कुरतडीत असे. तो जागा झाला की उंदीर पळून जाई. एकदा सिंह जागा होता तोच उंदीर बाहेर आला. सिंहाला झोप लागली आहे असे उंदराला वाटले आणि तो जरासा जवळ आला. पण सिंहाने लागलीच उंदराची शेपटी धरली. उंदराने पाहिले की, आता सिंह आपणाला मारणार. मग तो रडू लागला व हात जोडून सिंहाची विनवणी करू लागला की, "महाराज, मला क्षमा करा. माझा जीव घेऊ नका. आपण मला मारले नाही तर मी कधी तरी आपले उपयोगी पडेन." हे ऐकून सिंहाला हसू आले व तो बोलला की, "जा, वेडा कुठला. मी सिंह जनावरांचा राजा आहे आणि तू एवढासा उंदीर. तू माझे काय काम करणार? पण मला तुझी दया येते. तू आता जा; फिरून असे करू नकोस." सिंहाने सोडून देताच उंदीर घरात पळून गेला. पुढे काही दिवसांनी एक पारधी तेथे आला व झाडाखाली आपले जाळे पसरून निघून गेला. काही वेळाने सिंह निजावयाला आला. सिंहाने जाळे पाहिले नाही आणि तसाच निजू लागला. तोच जाळे अंगावर पडून सिंह खाली सापडला. हे पाहून बिचारा सिंह ओरडू लागला. ओरडणे ऐकून उंदीर बाहेर धावून आला, व सिंहाला बोलला, "महाराज, घाबरू नका. मी आपला चाकर हजर आहे. आता जाळे तोडून टाकतो." असे बोलून तो दातांनी ते जाळे कुरतडू लागला. नंतर एका घटकेत उंदराने सारे जाळे तोडले आणि सिंहाला मोकळे केले. पाहा, उंदीर एवढासा जीव! पण सिंहाला कसा उपयोगी पडला. कोण कधी उपयोगी पडेल याचा नेम नाही.

## कथा आठवी - वेडे सांबर

एक सांबर नदीत आपले रूप पाहत होते. पाहता पाहता ते मनाशी बोलू लागले, "अहाहा, ही माझी शिंगे किती छानदार आहेत! ही किती शोभिवंत दिसतात! अशी चांगली शिंगे देवाने कोणालाही दिली नाहीत! पण हे पाय बरीक फारच वाईट आहेत! किती रोडके आणि घाणेरडे आहेत! अरेरे, यापेक्षा मला मुळीच पाय नसते तर किती बरे झाले असते!" सांबर असा विचार करीत आहे तोच काही शिकारी तेथे आले! पावलांची चाहूल लागताच सांबर जीव घेऊन पुढे पळू लागले व पारधी मागे पाठलाग करू लागले. पळता पळता सांबराची शिंगे एका काटेरी झुडपात अडकली. सांबराने बरीच खटपट केली तरी शिंगे काही निघेनात! अखेर शिकारी लोकांनी येऊन सांबराला ठार मारले! मरताने ते बोलले, "अरेरे, उगीच मी या पायाला नावे ठेवली! तेच बिचारे मला पळताना उपयोगी पडले! पण या शिंगांनी बरीक माझा जीव घेतला!" मुलांनो, जे वरून चांगले दिसते तेच चांगले नसते! जे उपयोगी पडते तेच खरोखर चांगले!

## कथा नववी - मांजर व बगळी

एका मांजरीची एका बगळीशी फार ओळख होती. बगळी फार चांगली होती; पण मांजर मोठी लबाड होती. तिने एकदा बगळीला आपल्या घरी जेवावयास बोलावले. बिचारी बगळी भोळी होती! तिला मांजरीची लबाडी काय ठाऊक? ती तशीच आनंदात मांजरीकडे गेली. मांजरीने एका ताटात खीर आणली आणि बगळीला बोलली, "ताई, आपण दोघी बहिणी बहिणी आहो, यासाठी आज एका ताटातच जेवू." असे बोलून, मांजरी जिभेने चटचट खीर चाटू लागली. पण बगळीची चोच लांब होती! तिला ताटातून खीर मुळीच खाता येईना! लबाड मांजरी खीर खातच होती. आणि मधून मधून बगळीला विचारत होती की, "ताई, सावकाश होऊ दे. खीर बरी झाली आहे ना?" बगळीला राग आला पण ती मुळीच बोलली नाही. उलट काही झाले नाही असे तिने दाखविले आणि हसत हसत घरी निघून गेली. पुढे मांजरीची एकदा खोड मोडावी असा बगळीने विचार केला. काही दिवसांनी तिने मांजरीला आपले घरी जेवावयास बोलावले! मांजरी

आशेने बगळीकडे गेली. पण बगळीकडे बारीक तोंडाची एक बरणी होती आणि तीत आंबरस घातला. नंतर तिने मांजरीला खावयास सांगितले व आपणही रस खाऊ लागली. बगळीची मान लांब आणि बारीक होती; यामुळे तिला सहज रस खाता येत होता. पण मांजरीचे डोके पडले मोठे! ते काही बरणीत शिरेना! मांजरीने बरीच धडपड केली पण तिचे मुळीच फावले नाही. अखेर बगळीने विचारले, "बाई, आजचा बेत बरा आहे ना? तू रस का खात नाहीस? खिरीसारखा चांगला रस आहे." हे ऐकून मांजरी ओशाळून घरी निघून गेली. याचे नाव जशास तसे.

## कथा दहावी - चिमणी आणि मुंगी

एक लहानशी मुंगी नदीवर पाणी पीत होती. पाणी पिता पिता तिचा पाय घसरला आणि ती नदीत पडली. जवळच एका झाडावर एक चिमणी बसली होती. ती फार दयाळू होती. मुंगी सारखी वाहून चालली होती. हे पाहून चिमणीने झाडाचे एक पान तोडले आणि ते नदीत टाकले. पानावर बसून तरंगत मुंगी जमिनीवर आली. नंतर काही वेळाने एक मुलगा तेथे आला. तो हातातील गोफणीने पाखरे मारीत असे. चिमणीला पाहताच मुलाने एक दगड उचलला आणि गोफणीचा नेम धरला. हे पाहून मुंगीने विचार केला की, चिमणीने मला मघाशी मदत केली आणि मला वाचवले. आता ती मरत आहे, तर मी तिला मदत केली पाहिजे. मग मुंगी हळूच जाऊन मुलाला कडकडून चावली. मुंगी चावताच मुलाचा नेम चुकला आणि गोफणीतून दगड खाली पडला. दगडाचा आवाज ऐकून चिमणी भूर्रकन उडून गेली. पहा. मुलांनो, आपण लोकांना उपयोगी पडलो तर लोक आपणाला उपयोगी पडतात.

(राम गणेश गडकरी)



# परिकथा व अद्भुतरम्य गोष्टी


५.१. कथा एका परीची ५२५

५.२. शुभ्रा ५२७

५.३. अंगुष्ठा ५३२

५.४. मत्स्यकन्या (मर्मेड) ५३५

५.५. अल्लाउद्दीनची गोष्ट ५३८

५.६. सात मजली हवेली ५४१

५.७. सोनेरी मोर ५४७

५.८. जादूचा मोर ५५१

५.९. जादूची पिशवी ५५३

५.१०. बोलणारी रजई ५५५

५.११. गाव पाहिला बाई ५५९

५.१२. कोळ्याचा मुलगा आणि तीन राक्षस ५६३

५.१३. खुशालीची चिमणी ५७१

५.१४. यामाटाचे आवाळू ५७४

५.१५. परीची देणगी ५७८

५.१६. उपकाराची परतफेड ५९०

५.१७. साबुरचा जादुई पंखा ५९५

५.१८. जादुची किटली ६०७

५.१९. एक अंडे, एक झाडू आणि एक पंखा ६१२

५.२०. मुडिया पर्वत ६१९

५.२१. उडणारा घोडा ६२३

५.२२. अजगरभाईची गोष्ट ६३१

५.२३. माणूस झाला अजगर ६३९

५.२४. जादुचा आरसा ६४१

५.२५. व्यवहारशून्य पंडित ६५०

५.२६. सिंह आणि बैल ६५२

५.२७. माधोसिंह ६५५

# ५.१. कथा एका परीची

(तापीकाठची लोककथा)

एक होती परी. खूप-खूप सुंदर. सागराच्या फेसासारखी गोरीपान. डाळिंबाच्या कळीसारखी नाजूक. कोमल. ती सागराच्या चमकदार फेसामध्ये जन्मली होती. ती नेहमीच आनंदी असायची. ढगांच्या डोंगरांवरून विहरायची. सागराच्या पाण्यात खेळायची. आभाळातल्या एका छानशा ढगात परीने आपला सुंदर महाल बनविला होता. कधी-कधी या सुरेख महालात ती रहायची.

परी कधी अदृश्य व्हायची. तर कधी दिसायची, प्रकट व्हायची. सागरतीरावरील लोक भय-भीत होत असत. तिच्या या खेळाने लोक घाबरत असत. परी आपलं जहाज हरवून टाकेल का? सागरातील मासे संपवून टाकेल का? आपलं जीवन दुःखी करेल का? या विचारांनी ते थकून जात. परी दिसली रे दिसली की भीतीने लोक थर-थर कापायचे.

खरे तर परी त्यांची खूप काळजी वाहत होती. ती सागरातील जहाजांची निगा राखायची. मासे पकडणारे कोळी होते त्यांना सांभाळायची. आभाळातल्या चांदण्या घासून-पुसून चकाचक ठेवायची. चंद्रावरची धूळ झटकून दूधासारखा लख्ख करायची.

परी हे सारे काम शांतपणे करायची. आपले काम संपले की परी खेळायला बाहेर पडायची. कधी सागराच्या फेसाळ पाण्यात खेळायची. तर कधी उंच आभाळात झोका घेतांना दिसायची.

परी होती सुंदर. हवीहवीशी. एकदा तिला देवांच्या राजाने बघितले. तो तिच्यावर भाळला. परी पांढऱ्या ढगावर आरूढ होती. इंद्र बनला काळा ढग. तिचा पाठलाग करू लागला. आता पकडेल का तो परीला? छे! छे!! तसे मुळी घडणार नाही.

काळा ढग परीच्या जवळ आला. पांढरा ढग काळवंडला. आग उसळली.

आणि परी निसटली. सागरात मिसळली. सागर तिचा पिता होता ना! इंद्र वरमला. माघारी वळला. राजधानीत हिरमुसला होऊन परतला.

आजही काळे ढग आभाळात जमा होतात. विजांचा कडकडाट होतो. ते आभाळातले इंद्राचे आणि परीचे भांडणच असते. देवांचा राजा हरतो. सागराची मुलगी जिंकते. इंद्र हरतो. परी जिंकते. इंद्र रडू लागतो. टपटप आसवं पडतात. सारे सांगतात पाऊस आला!

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ५.२. शुभ्रा

माझं नाव शुभ्रा. बालपणीच वडिलांचं छत्र हरपलं. आईसुद्धा अशीच मी लहान असताना सोडून गेली. पण माझ्या सावत्र आईने मला लहानाचं मोठं केलं. तिनं मला घरातली सगळी कामं शिकवली. साफसफाईपासून स्वैपाकापर्यंत. आणि मुख्य म्हणजे गाणं शिकवलं. मी सगळी कामं गाणी गुणगुणत करायची. गाण्यामुळे श्रम हलके होतात. कामाचा बोजा वाटत नाही. मला स्वतःला त्यामुळे काम करताना वेगळाच आनंद मिळायचा.

चारचौघींसारखंच माझं रोजचं जगणं सुरू होतं. पण एके दिवशी काहीतरी वेगळंच घडलं. आमचं घर राजाच्या किल्ल्याच्या परिसरातच होतं. मी रोजच्या सारखीच काम करता करता गात होती. माझ्या गाण्याच्या आवाजानं रस्त्यावरून चालत जाणारा राजपुत्र घरासमोर थांबला. त्याने माझं सगळं गाणं ऐकलं. त्यानंतर तो जवळपास रोजच माझ्या कामाच्या वेळेतलं गाणं ऐकण्यासाठी घराजवळ घुटमळायचा. एकदा माझंही त्याच्याकडे लक्ष गेलं. त्याच्या डोळ्यांकडे मी पाहिलं आणि लाजेने चटकन घरात शिरले. पाठोपाठ त्याने मला हाक मारली. पण मी थांबले नाही. मात्र सज्जातून माझं कबुतर त्याच्या दिशेनं सोडून दिलं. ते अगदी शहाण्यासारखं त्याच्या खांद्यावर जाऊन विसावलं. त्याने कबुतरावरून हळुवारपणे हात फिरवला. एवढं आम्हाला पुरेसं होतं. आम्ही एकमेकांच्या प्रेमात पडलो होतो.

पण ही गोष्ट राणीसाहेबांच्या नजरेतून सुटली नाही. माझ्यासारख्या सामान्य घरातल्या, सावत्र आईने वाढवलेल्या पोरक्या मुलीशी राजपुत्राने लग्न करायची कल्पना तिला मानवली नाही. तिने परस्पर माझा काटा काढायचे ठरवले.

एके दिवशी मी अशीच अंगणात काम करीत होते. तेवढ्यात राणीच्या नोकराने, शिकारीदादाने मला हटकले. जंगलात फिरायला म्हणून बोलावले.

रानात जायला मिळते, म्हणून मीही भुलले आणि त्याच्यासोबत चालू लागले. गाणी गाता गाता फुलं वेचली, फुलं वेचता वेचता रानातले पक्षी-प्राणी माझे मित्र बनले. मोठी मौज आली.

पण अचानक मला शिकारीदादाच्या हातातली तळपती सुरी दिसली. मी घाबरले. शिकारीदादा म्हणाला, 'पोरी, घाबरू नकोस. ही पहा टाकली सुरी.' त्याने सुरी खाली टाकली. मग शिकारीदादाने मला हळूच ती कानगोष्ट सांगितली. म्हणाला, "मुली, तू निरागस आहेस. तुझा गळा गोड आहे. पक्षी आणि प्राणीसुद्धा तुझ्या प्रेमात पडले; पण राणीसाहेब मात्र तुझा द्वेष करतात. तुला जंगलात नेऊन मारण्याची त्यांनी मला आज्ञा केली. पण मुली, माझ्याच्याने हे कृत्य होणार नाही. तेव्हा तू इथून दूर पळून जा. पुन्हा म्हणून कधी परत येऊ नकोस. आता क्षणभरही थांबू नकोस. पळ." त्या क्षणी मी पळाले, घरापासून दुरावले.

जंगलातून पळताना मी खूप घाबरलेली होती. तशात अंधार पडला. रात्र झाली. दुष्ट राक्षस, जंगली प्राणी माझा पाठलाग करत आहेत, असं मला वाटत होतं. आणि मी त्यांच्यापासून बचाव करण्याकरता वाट फुटेल तिकडे धावत राहिली. धावता धावता घेरी येऊन पडले. माझी शुद्ध हरपली.

जाग आली तेव्हा सकाळ झाली होती. ज्या राक्षसी हातांना मी घाबरत होते, ते हात राक्षसांचे नव्हते. त्या झाडांच्या फांद्या होत्या. अंधारात चमकणाऱ्या प्राण्यांचे डोळे हे मला घाबरवणाऱ्या जंगली प्राण्यांचे नसून माझ्या रक्षणासाठी सरसावलेल्या प्राणिमित्रांचे होते. जंगलात गाणी म्हणताना, फुले वेचताना ते माझे सोबती झाले होते. त्यांच्या प्रेमळ नजरांनी माझी भीती संपली. जंगलात आपण एकटे नसून सुरक्षित आहोत, अशा भावनेने मी सुखावले.

रात्रभर पळून पळून मी शरीराने मात्र पार थकून गेले होते. मला विश्रांतीची गरज होती. निवाऱ्याची एखादी जागा मिळते का म्हणून मी शोध घेत होते. तेवढ्यात एक सुंदरशी झोपडी मला दिसली. मी आणि माझे प्राणिमित्र झोपडीच्या दारापाशी पोहोचलो. दारावर ठकठक केली. आतून प्रतिसाद

मिळाला नाही. कुणीही दार उघडेना. अखेर मीच दाराचं हँडल फिरवलं, आणि दार उघडलं.

झोपडीत मी आणि माझ्या प्राणिमित्रांनी मिळून प्रवेश केला. आत कुणीही नव्हतं. पण तिथे छोटे छोटे सात पलंग मांडलेले होते. बाकी घर अत्यंत अस्वच्छ होतं. अस्ताव्यस्त पसारा पडलेला. इथं बऱ्याच दिवसांपासून कुणी राहिलेलं नसावं. काहीही असो. आपल्याला निवारा मिळाला, हे खूप होतं. मी माझ्या प्राणिमित्रांना म्हटलं, "चला, आता आपण सारे मिळून हे घर साफ करू या." आम्ही सगळ्यांनी मिळून घर-सफाईचा उपक्रम केला. कुणी शेपटीचा खराटा केला, कुणी सोंडेने पाणी शिंपडले, कुणी जाळी-जळमटं स्वच्छ केली. घर कसं स्वच्छ-सुंदर झालं. पाना-फुलांच्या कुंड्यासुद्धा सजवल्या. एवढं सारं झाल्यावर अगदीच दमल्यासारखं झालं, म्हणून त्या सात पलंगांपैकी एकावर जरा पहुडले, तर मला गाढ झोप लागली.

मला अचानक जाग आली ती एका प्रश्नाने. कुणी एक बुटका माणूस दुसऱ्या बुटक्याला विचारत होता, "ही मुलगी कोण? ही इथं कशी आली? कशाला आली?" या प्रश्नांच्या साखळीनेच मला जाग आली. मुलांसारखी दिसणारी ती सात बुटकी माणसं होती. म्हणजे हे घर या सात बुटक्यांचं आहे. मी त्या आश्चर्यातून स्वतःला सावरलं आणि माझी ओळख करून दिली. "दुष्ट राणीपासून बचाव करण्यासाठी मी अशी सैरा-वैरा पळत जंगलात फिरते आहे. तुम्ही जर मला या घरात राहू दिलं, तर मी हे घर साफ-सूफ ठेवेन. तुम्हाला चांगला स्वैपाक करून जेवू घालीन, तेव्हा मला इथं राहू द्या," म्हणून विनंती केली. मी 'जेवू घालीन' असं म्हटलं आणि तेवढ्या एका अटीवर त्यांनी मला तिथं रहायला परवानगीही दिली. त्यांनी 'हुर्ये' म्हणून माझ्या प्रस्तावाला संमती दिली. माझ्या प्राणिमित्रांनी भाज्या-फळे आणली होती; मी चटकन त्याचे सूप केले. सगळ्यांनी ते मिटक्या मारीत फस्त केले. रात्री सगळ्यांसाठी भोजन तयार केलं. माझं गाणं गुणगुणणं सुरूच होतं. त्या सात बुटक्यांपैकी एकानं ताल धरला, दुसऱ्यानं ठेका पकडला आणि मग आम्ही सगळे मिळून नाच-गाणं केलं.

अर्थातच माझं गाणं माझ्या 'राजकुमारा'साठीचं गाणं होतं. हे गाणं ही माझ्या मनाला सोबत होती.

दुसऱ्या दिवशी न्याहरी करून सातही बुटके हिऱ्याच्या खाणीत कामाला निघून गेले. 'संध्याकाळी लवकर घरी या, मी वाट पाहते' असं म्हणत त्यांना निरोप दिला. तेवढ्यात शेवटचा बुटका मागे वळून म्हणाला, "कुणालाही घरात घेऊ नकोस. अनोळखी माणसाशी बोलू नकोस. स्वतःची काळजी घे." त्याच्या बोलण्याचं हसूही आलं आणि हे लोक आपली केवढी काळजी घेतात, याचं समाधानही वाटलं.

संध्याकाळी ही सात भावंडं घरी येण्यापूर्वीच मी त्यांच्यासाठी खीर करायला सुरुवात केली. तेवढ्यात एक म्हातारी खिडकीजवळून जाताना थांबली आणि आत डोकावून म्हणाली, "काय गं, खीर बनवतेस का? बनव, बनव. पण सफरचंदाचा मऊसूत केक बनवून बघ." असं म्हणत त्या म्हातारीनं तिच्याकडचं लालबुंद सफरचंद माझ्या हातावर ठेवलं. "अगं सफरचंदाचा 'केक' बनवला तर कुणाच्याही तोंडाला पाणी सुटेल." मलाही मोह झाला. 'केक' बनवायचं मनात घेतलं पण तेवढ्यात त्या सातव्या बुटक्याचं वाक्य आठवलं, "अनोळखी माणसाशी बोलू नकोस!" पण ही म्हातारी अनोळखी असली तरी धोकेदायक आहे, असं काही माझ्या मनाला पटेना. तेवढ्यात पाखरांचा एक थवा आला आणि तो सफरचंदाला टोचे मारू लागला. म्हातारीने पाखरं हाकारली. पण पाखरांनी सफरचंदाला टोचे मारले, ही गोष्ट माझ्या मनाला भावली. जंगलातले पक्षी-प्राणी निर्मळ असतात. त्यांनी हा संकेत दिला आहे, तेव्हा म्हातारीचं ऐकायला हवं.

म्हातारीसाठी मी पेलाभर पाणी आणलं. म्हातारी संतुष्ट झाली. म्हणाली, "पोरी तू खूप गुणी मुलगी आहेस, तहानलेल्याची तहान, भुकेल्याची भूक भागवतेस." मी तुला आज एक गुपित सांगते, "हे सफरचंद साधंसुधं फळ नाही. ते इच्छापूर्ती करणारं फळ आहे. एक तुकडा खाल्ला तरी तुझं स्वप्न पूर्ण होईल." मी म्हातारीच्या पडत्या फळाची आज्ञा पाळली. सफरचंदाची फोड

खाल्ली आणि 'राजकुमारा, मला घेऊन चल' असं मनातल्या मनात पुटपुटली.

सफरचंदाची फोड पोटात गेली आणि मी चक्कर येऊन तिथेच पडले. माझी शुद्ध हरपली. किती दिवस, किती रात्री मी बेशुद्ध होते हे मला काहीच आठवत नाही. पण वसंत ऋतुतल्या सकाळी मला जाग आली, एवढे खरे. एका सुंदरशा पलंगावर मी पहुडले होते. ते सात बुटके आणि माझा राजकुमार पलंगाशेजारी बसून मला जाग येण्याची वाट पहात बसले होते. मी शुद्धीवर येताच त्याने मला मिठी मारली. माझ्या जंगलातल्या प्राणिमित्रांनी मी बेशुद्ध झाल्यावर सातही बुटक्यांना शोधले, त्यांनी राजकुमाराला शोधलं आणि ते सगळे मिळून माझी काळजी करत इथं पोहचले होते. दुष्ट राणी तिकडे हात चोळीत बसली. राजपुत्राने मला स्वीकारलं होतं. मला माझ्या प्राणिमित्रांचा आणि सातही बुटक्या खाणमजुरांचा खूप अभिमान वाटतो. त्यांच्यामुळेच माझे पोरकेपण संपले आणि मी राणी झाले. ज्यांचे कुणी नसते त्यांच्यासाठी सगळे मदतीला येतात, अगदी झाडे, पक्षी, कामगार आणि राजपुत्रसुद्धा! आणि माझ्या गळ्यातून आपोआप गाणं बाहेर आलं,

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे
परस्परसौख्यासाठी झटती सारे"

(पुनःकथन : डॉ. मंगला वरखेडे : ब्रेन टॉनिक मासिक, ऑक्टो-नोव्हें. २०१२)

# ५.३. अंगुष्ठा

कोणे एके काळी एका गावात एक बाई रहात होती. तिला मुलं खूप आवडत. पण तिला स्वतःला मूलबाळ नव्हते. एकदा ती एका चेटकिणीकडे गेली. चेटकिणीने तिला एक झाडाची मुळी दिली. ही मुळी कुंडीत लाव असे सांगितले. बाईने झाडाची मुळी कुंडीत लावली. पाहता पाहता पालवी फुटली. छोटेसे रोपटे कुंडीत डोलू लागले. एके दिवशी एक छानशी कळी दिसली. बाईंना खूप आनंद झाला. बाईने कळीचे चुंबन घेतले आणि काय आश्चर्य! कळीचे फुल झाले. त्या फुलात एक छोटीशी सुंदर बेबी दिसली. परंतु ती बेबी इतकी छोटी होती की त्या बाईच्या अंगठ्या एवढीच! म्हणून त्यांनी तिचे नाव 'अंगुष्ठा' असे ठेवले.

दिवसभर टेबलावर खेळायची आणि रात्री आक्रोडच्या अंथरूणात गुलाबाचे पंघरूण घेऊन झोपायची. एका रात्री कुरूप बेडकाने खिडकीतून उडी मारली आणि टेबलावर झोपलेल्या अंगुष्ठाला पाहून कर्कश आवाजात म्हणाला, "माझ्या मुलासाठी ही बायको म्हणून अगदी योग्य आहे." झोपेतल्या अंगुष्ठाला उचलून आपल्या चिखलाच्या घरी घेऊन आला. आपल्या कुरूप बेडूक मुलाला सांगितले, "पहा! तुझ्यासाठी बायको शोधून आणली," चिमुकल्या सुंदर अंगुष्ठाला पाहून बेडकाला खूप आनंद झाला.

अंगुष्ठा मात्र त्या कुरूप बेडकाला पाहून घाबरली आणि किंचाळू लागली. बेडकाला ही पळून जाईल अशी भीती वाटली म्हणून अंगुष्ठाला नदीवरच्या कमळाच्या फुलात ठेवायचा निर्णय घेतला. थोड्या वेळाने अंगुष्ठा रडू लागली. तिचे हुंदके ऐकून छोट्या माशांनी पाण्याबाहेर डोकावून पाहिले. छोट्याशा सुंदर अंगुष्ठाला पाहून माशांनी तिला मदत करायचे ठरवले. माशांनी कमळाच्या फुलाचा देठ तोडला. त्यामुळे फुल पाण्यावर तरंगू लागले. नदीकिनाऱ्याने तरंगत तरंगत दूरवर आली. काही वेळाने जोरात वारा सुटला. हवेच्या जोरामुळे

ती जमिनीवर फेकली गेली. एका जंगलात भर उन्हाळ्यात ती एकटीच राहू लागली. हिवाळा सुरू झाला आणि अंगुष्ठाला प्रचंड भूक लागली. अन्नाच्या शोधात तिने जंगल सोडले. चालता चालता एका शेतात आली. खूप दिवसांनी तिला धान्याचं कोठार दिसले. दार वाजवले. शेतातल्या उंदराने दार उघडले. अंगुष्ठाने खाण्यासाठी काहीतरी अन्न दे, अशी उंदराकडे मागणी केली. शेतातला उंदीर तसा दयाळू होता. त्याने आपल्या उबदार घरात बोलावले. आपले शेजारी मोले फार श्रीमंत आहेत. तुझी इच्छा असेल वर तू मोलेंशी लग्नही करू शकतेस. अर्थात मोले अंध आहेत. परंतु तुझ्या गोड आवाजाने त्यांचे मन तू सहज जिंकू शकशील. अंगुष्ठाला प्रश्न पडला ज्याची सूर्यप्रकाशाशी मैत्री नाही. तो कितीही श्रीमंत असला तरी काय उपयोग?

एकदा अंगुष्ठाचा आवाज श्री.मोलेंनी ऐकला आणि त्या गोड आवाजाने श्री.मोले अंगुष्ठाच्या प्रेमात पडले. मोलेंनी दोन घरांच्या मध्ये एक बोगदा तयार केला. अंगुष्ठाला त्या बोगद्यातून फिरवून आणायचे ठरविले. चालता चालता रस्त्याच्या बाजूला मेलेला पक्षी पाहून मोले चिडले आणि म्हणाले, “हा अगदी हिवाळ्याच्या सुरुवातीलाच मेलेला दिसतो आहे.” अंगुष्ठाला फार वाईट वाटले. ती काही बोलली नाही. काही वेळानंतर शेतातला उंदीर झोपलेला आहे, असे पाहून अंगुष्ठा सरपटत बोगद्यातील मेलेल्या पक्ष्याजवळ गेली. डोके टेकून म्हणाली, “हे मित्र पक्ष्या, तुला सद्गती मिळू दे.” आणि आश्चर्य! पक्षी हालचाल करू लागला. याचा अर्थ पक्षी मेलेला नव्हता. थंडीमुळे त्याला गाढ झोप लागली होती. आणि आता तो उठत होता. अंगुष्ठाने पक्ष्याची सेवा केली. तो लवकरच बरा झाला. वसंत ऋतूच्या सुरुवातीलाच स्वखुषीने पक्ष्याला बोगद्यात सोडले. पाणावल्या डोळ्यांनी अंगुष्ठाने पक्ष्याला निरोप दिला आणि पक्षी उडून गेला.

ठरल्याप्रमाणे अंगुष्ठाचा विवाहाचा दिवस उजाडला. मोलेच्या उदास घरात प्रवेश करण्यापूर्वी शेतातल्या मोकळ्या वातावरणात अंगुष्ठाला फिरून यावेसे वाटले. शेतात फिरता फिरता *कुड कुड कुड* असा आवाज आला. नजर वर करताच पक्षीमित्र दिसले. उदास छोट्या सुंदर अंगुष्ठाला पाहून त्याने सरळच

विचारले, 'मी उबदार हवेत चक्कर मारतो आहे. चल, माझ्या पाठीवर बस. जरा फिरून येऊ.' अंगुष्ठाला कल्पना आवडली. बराच वेळ उंच हवेत फिरल्यावर छान उबदार जागा दिसली. पक्ष्याने अंगुष्ठाला एका सुंदर फुलात बसवलं. त्या फुलात एक छोट्या पंखांचा चिमुकला माणूस बसलेला पाहून अंगुष्ठाला खूप आश्चर्य वाटलं. अंगुष्ठाला पाहून तो फुलचुखी तिच्या प्रेमातच पडला. त्याने तिला लग्नाची मागणी घातली. अंगुष्ठाने सहमती दिली.

अंगुष्ठाला खूप भेटवस्तू मिळाल्या; त्यात छोट्या पंखांची भेटवस्तू होती. ती परिधान करून अंगुष्ठा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर फिरायला लागली. आता सगळ्यात आनंदी होती अंगुष्ठा!

(पुनःकथन : डॉ. मंगला रमेश वरखेडे - ब्रेन टॉनिक मासिक, जुलै २०१४)

# ५.४. मत्स्यकन्या (मर्मेड)

(पोलंडची लोककथा)

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. पोलंडमधल्या वर्सा नदीच्या काठी एक छोटे गाव वसले होते. दोन कोळी रोज नदीवर जाऊन मासे पकडायचे. एकदा रात्रीच्या वेळी मासे पकडायला गेले असताना त्यांना नदीच्या तळातून सुरेल गाण्याचे सूर ऐकायला आले. आपल्याला काही भास झाला असेल, असे समजून त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. दुसऱ्या दिवशी चांदण्या रात्री मासेमारीला गेलेल्या या दोन कोळ्यांना पुन्हा एकदा नदीच्या तळातून गाण्याचे सूर पाण्यावर तरंगत वर येत आहेत, असे जाणवले. त्यांनी ही गोष्ट त्यांच्या मित्रांच्या कानावर घातली. एक मित्र म्हणाला, “नक्कीच जलपरी - मत्स्यकन्या गात असणार.” त्याने आपल्या कोळी मित्रांना एक सल्ला दिला. “तुम्ही या गाणाऱ्या जलपरीला पकडून राजाच्या हवाली का करीत नाही? त्यामुळे राजा खूष होईल आणि तो नक्की तुम्हाला मोठे इनाम देईल.”

मच्छिमारांना ही बक्षीस मिळवण्याची कल्पना पटली. पण त्याचबरोबर त्यांना काहिशी भीतीही वाटली. न जाणो जलपरी काही जादूटोणा करायची, आपण त्या मोहजालात फसायचो. त्यामुळे याबाबतीत आपण धर्मगुरुंचा सल्ला घेतलेला बरा. ते दोघे धर्मगुरूंकडे निघाले.

धर्मगुरुंनी सारे काही शांतपणे ऐकून घेतले आणि त्या कोळ्यांना सांगितले, “ जरूर धाडस करा आणि तिला पकडा. अजिबात आवाज न करता पुढे सरका आणि गळाच्या काठीला बांधलेली टोपली तिच्यावर टाका. मात्र एक खबरदारी घ्या. कानात मेणाचे बोळे घाला. कदाचित ती आपल्या गाण्यातून तुमच्यावर काही चेटूक करायची! तेव्हा काळजी घ्या आणि मोहिमेवर निघा.”

धर्मगुरुंचा सल्ला घेऊन ते घरी परतले. त्यांनी धर्मगुरुंनी दिलेल्या सूचनेप्रमाणे जाळ्याची टोपली विणली. ती गळाच्या काठीला बांधली आणि रात्र

होताच ते नदीवर गेले. लांबवरून त्यांना गाण्याचे गोड सूर ऐकू आले. त्यांनी आपली काठीला बांधलेली जाळीची टोपली उचलली आणि ते सूरांच्या दिशेने नदीकाठावरून चालू लागले. लव्हाळ्याच्या आडून त्यांना जलपरीचे ओझरते दर्शन झाले. कमरेपासून वरती एक अतिशय सुंदर लावण्यवती स्त्री आणि कमरेखालचा भाग मात्र चांदण्यात चमकणाऱ्या खवल्यांच्या मासोळीचा! तिचे हे रूपसौंदर्य पाहून ते आचंबित झाले. त्यांनी तातडीने आपल्या कानात मेणाचे बोळे कोंबले. अगदी हलक्या पावलांनी आवाज न करता ते त्या सुंदर जलपरीच्या मागे गेले आणि अलगद जाळीची टोपली तिच्यावर पांघरली. गरीब बिचारी मत्स्यकन्या विव्हळली, तिने आपली सुटका करून घेण्यासाठी बरीच फडफड करून पाहिली, पण त्यात तिला यश आले नाही.

या सगळ्या प्रकारात बरीच रात्र झाली होती. त्यामुळे त्या दोन्ही कोळ्यांनी नदीजवळ रहाणाऱ्या त्यांच्या एका मित्राच्या घरी जलपरीला नेऊन ठेवायचे ठरवले. त्यांनी आपल्या मित्राला सांगितले, “या जलपरीला तू बंद खोलीत ठेव आणि बाहेरून कुलूप लाव. सकाळ होताच आम्ही तिला घेऊन जाऊ आणि राजापुढे सादर करू.” मित्राने त्याप्रमाणे मत्स्यकन्येला आपल्या धान्याच्या गोदामात कोंडून ठेवले.

दोन्ही कोळी घरी परतल्यावर उत्तररात्री हा मित्र उठला; गोदामात कोंडलेल्या जलपरीला डोकावून पाहण्यासाठी तो तिथे गेला. त्याने जाळ्याच्या टोपलीतल्या मर्मेडला पाहिले; पण कानात बोळे घालायचे त्याला ठाऊक नव्हते. मत्स्यकन्येने जेव्हा या डोकावणाऱ्या माणसाला पाहिले, तेव्हा ती गाऊ लागली. इतके सुंदर आणि करूण गाणे त्याने यापूर्वी कधीही ऐकले नव्हते.

आपल्या शोकगीतातून जलपरीने त्या मित्रापुढे आपली कैफियत मांडली. “हे दयाघना, मला जाऊ दे, जाऊ दे मला माझ्या घरी, नदीपात्रातल्या माझ्या घराची मला ओढ लागली आहे. दयाळू माणसा मला दयेची भीक घाल आणि या कोठारातून माझी सुटका कर!” आता त्या सज्जन मित्राला राहवले नाही. त्याने टोपलीतील जाळी उघडली. जलपरी चटकन् बाहेर आली आणि नदीतीराच्या

दिशेने पळत सुटली. थेट नदीच्या तळाशी जाऊन विसावली. त्यानंतर ती कधीच कुणाला दिसली नाही.

अर्थात वर्साचे लोक जलपरीला विसरले नाहीत. आता नदीकाठच्या त्या खेड्याचे मोठ्या शहरात रूपांतर झाले आहे. पण आजही शहराच्या प्रवेशद्वारावर हातात ढाल-तलवार घेतलेल्या जलपरीचा पुतळा उभा आहे! अचानक एखाद्या रात्री वादळ येईल आणि नदीच्या तळातून जलपरी बाहेर येईल, असे या लोकांना वाटते. जलपरी दिसली नाही, तरी निदान तिचे गोड गाणे कधीतरी आपल्याला ऐकू येईल अशी वर्सा शहरातल्या लोकांची श्रद्धा आहे.

(ब्रेन टॉनिक मासिक, ऑगस्ट २०१५)

# ५.५. अल्लाउद्दीनची गोष्ट

गोष्टीतला अल्लाउद्दिन मूळ चीनचा रहिवासी. त्याचे वडिल मुस्तफा व्यवसायाने शिंपी होते. मुलाने शिवणकाम शिकावे, असे त्यांना खूप वाटे. पण तो शिकला नाही. त्याचे मन व्यवसायाचे शिक्षण घेण्यापेक्षा खेळण्या-हुंदडण्यातच रमत असे. एका छोट्या आजारात मुस्तफाचा मृत्यू झाला. त्यानंतर अल्लाउद्दिनच्या आईने शिवणकामाचा व्यवसाय सांभाळला. तिनेही अल्लाउद्दिनला सांगितले, "शिवणकाम शिक, चार पैसे कमव." पण अल्लाउद्दिनला काही ही वडिलोपार्जित विद्या शिकायची नव्हती. त्याला जादूविद्या शिकायची होती. चटकन श्रीमंत व्हायचं होतं. शिवणकामात दिवसभर राबायचं; आणि टिचभर पैसे मिळवून अर्धपोटी राहायचं, हे त्याला मान्य नव्हतं. आई-मुलाचा यावरून नेहमी खटका उडे. ती त्याला म्हणे, "तू काही गोष्टीतला अल्लाउद्दिन नाहीस. जादूचा दिवा घासला की, हवे ते मिळेल." आई असं म्हणाली की, तो तिच्याकडे अल्लाउद्दिन आणि जादूच्या दिव्याची गोष्ट सांगायचा हट्ट धरी.

अल्लाउद्दिनचे वडील आजारपणात गेले, त्यानंतर बऱ्याच दिवसांनी एक प्रवासी अल्लाउद्दिनला रस्त्यात भेटला. त्याने मुस्तफाची चौकशी केली. अल्लाउद्दिनने सांगितलं, "ते माझे बाबा होते. आता ते या जगात राहिले नाहीत." तो प्रवासी म्हणाला, "मुस्तफा माझा भाऊ होता. मी तुझा काका आहे. आता तुम्हाला मला मदत करायला हवी." त्या प्रवाशी काकाने अल्लाउद्दिनला पैसे दिले. दुसऱ्या दिवशी तो त्याला घेऊन बाजारात गेला. त्याने अल्लाउद्दिन आणि त्याच्या आईसाठी नवे कपडे खरेदी केले. थोडी मिठाई घेतली आणि रात्री जेवायला येतो म्हणून सांगितले. पुढे या प्रवासी काकाने अल्लाउद्दिनला एक अंगठी दिली आणि बाग बघायला म्हणून फिरायला नेले. तिथे एका दगडी

शिळेखालच्या अंधाऱ्या विहिरीत उतरून जादूचा दिवा मिळवण्यासाठी अल्लाउद्दिनला भुलवले. अल्लाउद्दिन विहिरीत उतरला. त्याने विहिरीतून जादूचा दिवा आणला. पण काका त्याला विहिरीबाहेर घेईना. त्याने त्याला पुन्हा आत ढकलले आणि शिळा बंद केली. अंधाऱ्या विहिरीत अल्लाउद्दिन रडत बसला. थंडीत कुडकुडला. थोडी उब यावी म्हणून त्याने हातावर हात घासले. त्याबरोबर बोटातली ती अंगठीही घासली गेली. ती जादूची अंगठी होती. ती घासल्याबरोबर एक गुलाम अल्लाउद्दिनसमोर उभा राहिला. तुझी हवी ती इच्छा पूर्ण करीन म्हणून सांगू लागला. अल्लाउद्दिन म्हणाला, "मला घरी पोहचव." त्याने त्याप्रमाणे त्याला घरी पोहचवले. वाट पहात बसलेल्या त्याच्या आईला दिलासा मिळाला.

अल्लाउद्दिनने तो दिवा घासूनपुसून स्वच्छ करायला घेतला. तो घासल्याबरोबर त्यातूनही एक गुलाम बाहेर आला. म्हणाला, "मी या जादूच्या दिव्याचा गुलाम आहे. तुझ्या सेवेसाठी हजर आहे." अल्लाउद्दिनने त्या गुलामाला पोटभर खायला आणायचा हुकूम दिला. गुलामाने लगेच त्याच्यासमोर सोन्याच्या थाळ्या आणि चांदीच्या वाट्यांमध्ये मिष्टान्न भोजन हजर केले. अल्लाउद्दिन आणि त्याची आई पोटभर जेवले.

मग अल्लाउद्दिनला त्याने एक जादूचा पडदा दिला. 'पडदेदादा पडदेदादा' म्हणून त्याला हाक मारली की तो पडदा प्रकाशित व्हायचा. त्यावर एक हसऱ्या जादूगाराची प्रतिमा झळकू लागायची. तो पडद्यावरचा जादूगार विचारायचा, "बोला महाराज, आपली काय सेवा करू?"

पडदे महाराजाला सांगितले की, "मिष्टान्न भोजन हवे', की पडद्यावर हालचाल होई. पडदे महाराजाचा चेहरा अदृश्य होई आणि तिथे मिष्टान्न भोजनाचे ताट येई. अल्लाउद्दिन जिभल्या चाटू लागे. तो तिथले पदार्थ उचलू लागे. पण ते हुबेहूब वाटणारे पदार्थ पडद्यावर चित्रासारखे दिसायचे. त्यांना वास यायचा, त्यांचा स्पर्शही मूळच्या पदार्थांसारखाच असायचा. पण त्याला ते उचलून खाता येत नव्हते.

अल्लाउद्दिनला पडदेदादाने केलेल्या थट्टेचा राग यायचा. मग तो पडदेदादावर ओरडे, 'मला हे असले चित्रातले पदार्थ नको. खरेखुरे हवेत.' त्यानंतर पडद्यावर पुन्हा हालचाल व्हायची. पदार्थांची चित्रमय यादी पडद्यावर झळकायची. 'यातले तुला काय हवे ?' अशी विचारणा व्हायची. त्या मेनुकार्डवरचा हवा तो पदार्थ अल्लाउद्दिनने निवडायचा. अल्लाउद्दिन म्हणाला, 'गुलाबजाम हवेत.'

मग गुलाबजाम कसे तयार करायचे, त्यासाठी कोणती सामुग्री पाहिजे हे सगळे पडद्यावर दिसू लागे. पडद्यामागून आवाज यायचा, 'आता कढई गॅसच्या शेगडीवर ठेवा. त्यात दोन चमचे तूप टाका. त्यात वाटीभर रवा टाका. तो हलवा. तांबूस भाजला की गॅस बंद करा.' वगैरे. त्याप्रमाणे अल्लाउद्दिनने गुलाबजाम तयार केले. त्याने ते आईलाही दिले. दोघांना मोठा आनंद झाला. तेव्हापासून अल्लाउद्दिनला स्वतः पदार्थ तयार करून खायची गोडी लागली.

एकदा त्याने उत्तम कपड्यांची मागणी केली. त्याला जगावेगळे कपडे हवे होते. पडदेदादाने पडद्यावर जगभरातल्या भरजरी कपड्यांची नमुना चित्रे दाखवली. ती कशी शिवतात ते सांगितले. अल्लाउद्दिनने तसे केले आणि त्याने स्वतः शिवलेले कपडे पाहून सगळे त्याची स्तुती करू लागली. असे कपडे आपल्यालाही हवेत म्हणून मागणी करू लागली. तो जगातला एक नामांकित फॅशन डिझायनर झाला.

(पुनःकथन : र. ना. वरखेडे,
ब्रेन टॉनिक मासिक, ऑक्टो-नोव्हें. २००८)

# ५.६. सात मजली हवेली

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका शहरात एक फार मोठा जवाहिऱ्या राहत होता. त्याचं नाव मणिकचंद होतं. तो छप्पन्न कोटी संपत्ती आणि सात मजली हवेलीचा मालक होता. त्याची अशी शान होती की राजाच्या लक्ष्मीला पण हेवा वाटावा. परंतु काळाचा महिमा, नियतीचा फेरा. मणिकचंदला व्यापारात जबरदस्त फटका बसला. सर्व काही नष्ट झालं. इकडे माणिकचंदची बायको आजारी पडली. आणि काही दिवसात तिला देवाज्ञा झाली. घरात फक्त त्याचा सोळा वर्षांचा मुलगा अमीचंद आणि माणिकचंद दोघं राहिले. एक तर संपत्ती गेल्याचं दुःख आणि दुसरे पत्नी वियोग. त्यामुळे शेठ माणिकचंद आजारी पडला. स्वाभिमानी स्वभावामुळे कोणा मित्राकडून एक पैसा पण उधार घेतला नाही. रोग असा बळकावला की शेवटची वेळ येवून ठेपली. तेव्हा तो अमीचंदाला म्हणाला, "तुला देवाच्या भरावशावर सोडून जात आहे. एक लक्षात ठेव हे शहर सोडून दुसऱ्या कोणत्याही शहरात काम सुरू कर. इथे तुला नव्याने काम सुरू करण्यास अडचणी येतील आणि हे पण लक्षात ठेव की नौकरी त्याच शेठजीची कर ज्याची हवेली सात मजली असेल."

जेव्हा माणिकचंद स्वर्गवासी झाले तेव्हा अमीचंदाने त्यांचे क्रियाकर्म केले व शहर सोडले. तो बऱ्याच शहरात फिरला पण त्याला सात मजली हवेली दिसून आली नाही. शेवटी तो अगदी निराश झाला. एक दिवस तो जवाहिऱ्याच्या दुकानासमोरून जात होता तेव्हा त्याने पाहिले की एक व्यापारी त्या जवाहिऱ्याला एक अष्टपैलू हिरा दाखवित आहे, आणि त्या हिऱ्याची खूप प्रशंसा करीत आहे. तो दुकानदार त्याला सांगत आहे की, "तुमचा हा हिरा फारच चांगला आहे. पण मी एक लाखापेक्षा जास्त किंमत देणार नाही."

तेव्हा तो व्यापारी म्हणाला, "शेठजी, इतक्या अप्रतिम हिऱ्याची किंमत फक्त

एक लाख! मी नाही देणार हा हिरा आणि त्याने शेठजीकडून तो हिरा परत घेतला."

शेठजीने त्याची किंमत आणखी वाढविली. अमीचंद तेथेच उभा होता तो हात जोडून म्हणाला "महाराज, मी गरीब माणूस आहे. पण रत्नपारखीचा मुलगा आहे. ह्या हिऱ्याला पाहून मला इच्छा झाली की मी पण हा हिरा जवळून पहावा. आपण हा हिरा मला दाखवाल?"

त्या व्यापाऱ्याने तो हिरा त्याला दाखविला. जवळच पाण्याने भरलेला तांब्या होता. अमीचंदने पटकन तो हिरा त्या तांब्यात टाकला, व्यापारी हाय हाय करू लागला. अमीचंद म्हणाला, "कशाला उगीच हाय हाय करता आहात. खडीसाखरेपासून हिरा बनविला आणि शेठजीकडून दोन लाख लुबाडत आहात. तुम्ही नीच आहात."

तेव्हा शेठजी पण आश्चर्याने अमीचंदकडे पाहू लागले. तो हिरा तर तेव्हाच पाण्यात विरघळला. धोकेबाज व्यापारी तर उठून पळून गेला. शेठजी अमीचंदला म्हणाले, "बेटा, तू मला एका ठगापासून वाचविलं. तर माझ्याकडे नौकरी करशील?"

अमीचंदने पाहिले शेठजीची हवेली पाच मजली आहे. सात मजली नाही. मग त्याने विचार केला की वडिलांच्या आदेशानुसार मी इतके शहर फिरलो पण कुठे सात मजली हवेली दिसली नाही. मग येथेच नौकरी का करू नये. तेव्हा अमीचंदने होकार दिला. आणि तेथे काम करू लागला.

अमीचंदाचे मालक त्याच्या कामावर खुश झाले. रत्नांची पारख तो अत्यंत बारकाईने करावयाचा आणि आपलं मत असं काही सांगायचा की त्याचे अनुभवी मालक पण आश्चर्यचकित होत!

एकदा शहरातील व्यापारी वर्ग विदेशात माल विकण्यासाठी व तेथील माल खरेदीसाठी जात होता. ह्या व्यापारी मंडळीत अनुभवी मुनीम आणि व्यापाऱ्यांची तरूण मुलं अनुभवासाठी पाठविली जात असत. पंचखंडी हवेलीच्या शेठजीला मुलगा नव्हता. म्हणून त्यांनी अमीचंदची हुशारी पाहून त्याला पाठविले.

सर्व जण आगबोटीने निघाले. दहा पंधरा दिवासाच्या प्रवासानंतर ते सर्व जण एका बेटावर पोहचले. तेथे सर्व प्रवासी काही तास थांबत असत. पुढच्या प्रवासासाठी माठांमध्ये पिण्याचे पाणी भरले जाई. समुद्राच्या किनाऱ्यावर एक लहानसा बाजार भरत असे. तेथे प्रवासी दिवसभर फिरत, आराम करीत, खात पीत आणि संध्याकाळी आपल्या प्रवासाला निघत. इतर प्रवासी तर तेथे बऱ्याच वेळा येऊन गेले होते; पण अमीचंद प्रथमच येत होता. तो बाजारात न थांबता, त्या बेटावर फिरावयास गेला. बेट फारच सुंदर होते. तेथे लोकही अल्पसंख्येतच होते. व्यापार पण विशेष नव्हता. फक्त पंचवीस तीस दुकाने होती. खाण्यापिण्याची आणि काही आवश्यक वस्तूंची दुकाने होती. काही लोक अशिक्षित होते ते गुरे ढोरे पाळीत होते.

अमीचंद फिरत फिरत बेटाच्या अशा भागात पोहचला जेथे अजून कोणीही गेले नव्हते. तो हे पाहून आश्चर्यचकित झाला की तेथे मोठ्या मोठ्या शिंपल्यांचा जणू एक पर्वतच आहे. आणि त्यावर शेवाळाचा थर जमला आहे. त्याने सहज एक शिंपले उघडले तर त्यात मोठ्या आकाराचे मोती पाहून तो आश्चर्यचकित झाला. एक एक मोती दहा हजार रूपये किंमतीपेक्षा कमी नव्हता. त्याने त्या शिंपल्याच्या ढिगाकडे दृष्टी फिरविली तर अंदाज आला की दीड दोन अब्ज रूपयांचे मोती येथे पडून आहेत. त्याने लागलीच निर्णय घेतला आणि कप्तानाला सांगितलं, "मला हे बेट खूपच आवडलं आहे, आणि येथील दूध विकणाऱ्या एका तरूणीवर प्रेम पण जडलं आहे. तेव्हा मी येथेच राहीन. परत जातांना मी तुमच्या बरोबर येईन."

कप्तानने त्याला समजाविले "अरे मूर्खा ज्या मालकाचे मीठ खातोस त्याच्याशी तरी प्रामाणिक रहा आणि आपलं कर्तव्य पूर्ण कर." त्यावर अमीचंद म्हणाला. "अहो कप्तान साहेब, तरूणपण चार दिवसाचं असतं. तेव्हा आता या वयात थोडी मजा करून घेईन आणि मग म्हातारपणी कर्तव्यपालन करीत राहीन."

इतर सहप्रवासी त्याची थट्टा करू लागले आणि निंदा पण. कारण पाच

मजली हवेलीत राहणाऱ्या शेठजीने असा अनुभवशून्य नौकर पाठवून फार मोठी चूक केली.

तो त्या बेटावरच राहिला आणि दुधवाल्यांना म्हणाला, "तुमच्या गाई ढोरांचे शेण मला विकत रहा आणि या पर्वतावर हे जे पांढरे दगड (शिंपले) पडले आहेत. त्यांना शेणात ठेवून गोवऱ्या तयार करा, मी तुम्हाला मजूरी देईन."

दुधवाले तसेच त्या बेटावरील लोक समजले की नक्कीच हा अमीचंद वेडा झाला आहे. पण तो कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देत नसे. त्या सहा महिन्यात त्याने शेकडो गोवऱ्या तयार करून घेतल्या. जितके शिंपले होते ते सर्व गोऱ्यांच्या आतमध्ये ठेवले. जेव्हा आगबोट परत त्या बेटावर आली तेव्हा सर्व व्यापारी विदेशातून चांगला नावीन्यपूर्ण माल घेऊन आले. ते म्हणाले, "अमीचंद, आता तरी परत येतो आहे की इथेच त्या दुधवालीशी प्रेम करता करता आयुष्य घालविणार आहेस." त्यावर अमीचंद म्हणाला, "नाही नाही बाबा, आता ह्या प्रेमाने माझं मन तृप्त झालं आहे. आता घरी जायचं आहे. पण कप्तान साहेब ह्या गोवऱ्या मी बरोबर घेणार आहे."

सर्वजण त्याची थट्टा करू लागले. ह्या गोवऱ्या काय बरोबर नेण्याची वस्तू आहे. परंतु अमीचंदने हट्ट धरला आणि म्हणाला की, "ह्या गोवऱ्या मी बरोबर घेईनच आणि याचे वेगळे भाडे पण देईन."

कप्तान म्हणाला, "मी रोख पैसे घेईन."

अमीचंदने रोख पैसे दिले. प्रवासात सर्व आपआपसात गप्पा मारतांना सांगत होते की त्यांनी काय काय नवीन माल आणला आणि जवळचा माल विकून किती फायदा मिळविला. आणि मग सर्वजण अमीचंदची थट्टा करू लागले, की जेव्हा अमीचंदला त्याचा शेठ विचारेल की 'तू काय आणले' तर हा म्हणेल की 'मी गोवऱ्या आणल्या'. एक दिवस सहज गमतीने एका शेठचा मुनीम म्हणाला की, "अमीचंद मला स्वयंपाकासाठी दोन गोवऱ्या दे."

तेव्हा अमीचंदने उत्तर दिले, "देईन, पण तू आधी मला पावती लिहून दे की मी पंचवीस हजाराच्या दोन गोवऱ्या अमीचंदकडून घेतल्या आहेत आणि ते पैसे माझ्या शेठजी कडून वसूल करावे."

हे ऐकून बोटीवरील सर्वजण हसू लागले, अमीचंद नक्कीच वेडा झाला आहे. म्हणूनच कवडी मोलाच्या ह्या गोवऱ्यांचे पंचवीस हजार मागतो आहे. एकजण हसत हसत म्हणाला "लिहून द्या, अमीचंदच्या वेडेपणाचा लेखी पुरावा सगळ्यांना दाखविता येईल."

बोट शहराच्या किनाऱ्यावर आल्यावर सगळ्यांनी आपआपल्या मालकांना निरोप पाठविला की माल नेण्यासाठी एक दोन बैलगाड्या पाठवाव्यात. पण अमीचंदाने चार बैलगाड्या मागविल्यात. त्या वेळेस अशी पद्धत होती की विदेशातून आलेला माल बैलगाड्यांमध्ये सजवून व्यवस्थित ठेवला जात असे आणि मग मिरवणूकीने आपआपल्या दुकानात नेला जात असे. आणि ही मिरवणूक पहाण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही कडेला लोक जमत आणि म्हणत हा दोन मजली, हा तीन मजली, हा चार मजली हवेलीच्या शेठजींचा माल आहे. सोने, चांदी आणि इतर माल पाहून लोक 'वाह वाह' म्हणत. शेवटी शहरातील सर्वात मोठ्या पाच मजली हवेलीच्या मालकाच्या मालाने भरलेल्या बैलगाड्या आल्या. पण त्यात गोवऱ्या पाहून सर्वजण शेठजींची थट्टा करू लागले. शहरात अमीचंदच्या मूर्खतेची चर्चा होवू लागली. शेठजी तर खूपच चिडले. जेव्हा बैलगाड्या हवेलीच्या समोर थांबल्या तेव्हा अमीचंद शेठजीच्या पाया पडला आणि म्हणाला, "माल आणला आहे. एक नजर मारावी."

शेठजींनी संतापून अमीचंदच्या गालात एक झापट लगावली आणि म्हणाले, "नालायका, तू माझी प्रतिष्ठा धुळीस मिळविली. मी तर तुला हुशार समजून पाठविलं होतं आणि आता पहा सर्वजण मला हसत आहे."

अमीचंद हात जोडून म्हणाला," आता जे झालं ते झालं पण आपण ह्या अमुक शेठकडे ही पावती पाठवून पन्नास हजार मागवून घ्या." शेठजी म्हणाला, "कशाबद्दल"? तेव्हा अमीचंद म्हणाला, "त्याच्या माणसाने माझ्याकडून दोन गोवऱ्या घेतल्या होत्या. तेव्हा मी त्याच्याकडून ही पावती लिहून घेतली होती. तुम्ही पन्नास हजार रूपये मागवून तर घ्या मग पहा तुमची प्रतिष्ठा वाढते की नाही."

तेव्हा शेठजी आणखीन संतापले; पण त्यांची बायको समजूतदार होती.

कारण ती सात मजली हवेलीच्या शेठजींची मुलगी होती. ती शेठजींना म्हणाली, “आधी ह्या गोवऱ्यांचे रहस्य काय आहे हे समजून तर घ्या,” तेव्हा शेठजींनी अमीचंदला विचारले, “हो तर बेटा, आता सांग ह्या गोवऱ्यांचं रहस्य काय आहे?”

तेव्हा अमीचंद म्हणाला, “ह्या एक एक गोवऱ्यामध्ये एक एक मोती ठेवला आहे.” मोती पाहून शेठजी अवाक् झाले. अमीचंदला प्रेमाने जवळ घेत ते म्हणाले, “बेटा, मला क्षमा कर. मी तुझी हुशारी ओळखू शकलो नाही. तू तर ह्या मोत्यांपेक्षा मूल्यवान आहेस.”

पण अमीचंद म्हणाला, “आता मी तुमच्याकडे राहाणार नाही. वडिलांनी खरंच सांगितलं होतं की सात मजली हवेली असणाऱ्याकडेच नौकरी कर. ज्या व्यापाऱ्याची जेवढी जास्त बुद्धी असते तेवढे त्याचे वैभवपण उंचावर दिसून येते. तुम्ही पाच मजली हवेलीचे मालक आहात म्हणूनच मी आणलेल्या गोवऱ्यांचे रहस्य तुम्ही ओळखू शकला नाही. आणि ह्या सात मजली हवेलीच्या शेठजींची कन्या असल्यामुळे त्यांनी तुम्हाला सुचविलं की आधी ह्या गोवऱ्याचे वैशिष्ट्य तर विचारा. जर मी गोवऱ्यात मोती लपवून आणले नसते तर सर्व व्यापाऱ्यांनी मला लुटून टाकलं असतं. माझे वडील सात मजली हवेलीचे मालक होते. त्यांनी मला हुशारी शिकविली होती. बरं तर आता मी निघतो.”

शेठजी व त्यांची बायको अमीचंदच्या पाया पडून म्हणाले की, “आमच्या एकुलत्या एक मुलीशी लग्न करून तू आमचा जावई हो.” तेव्हा अमीचंद म्हणाला, “जावई मी तेव्हाच होईन जेव्हा तुम्ही ते बेट विकत घ्याल जेणेकरून कोणी त्या बेटावरील मोत्यांचा मालक होऊ शकणार नाही.”

शेठजींनी लागलीच राजाकडून ते बेट विकत घेतले आणि आपल्या मुलीचे लग्न अमीचंदशी लावून दिले. आता शहरात सगळीकडे अमीचंदची प्रशंसा होऊ लागली. देव करो ज्याप्रमाणे अमीचंदचे सुख सौभाग्याचे दिवस परत आले तसे तुमचे आमचे सर्वांचे येवो.

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ५.७. सोनेरी मोर

कोणे एके काळी नदीकाठी एक बांबूचे घर होते. त्या घरात राम, हरी, श्रीधर असे तिघे भाऊ, त्यांची बहिण राधा आणि त्यांचे आई-वडील असे कुटुंब रहात होते. या तिघा भावात धाकटा श्रीधर खूप चांगले वागण्याचा प्रयत्न करी. आपल्यापासून इतर कुणाला त्रास होऊ नये याची तो स्वत: खूप काळजी घेई. परंतु श्रीधरचे वागणे बोलणे कुणालाच आवडत नसे. सगळ्यात लहान म्हणून तो दुर्लक्षित राही. एके दिवशी आईने विचारले, "जंगलातून लाकडे कोण आणणार आहे?"

मोठा भाऊ राम म्हणाला, "मी आणतो."

आई म्हणाली, "राम, तू खरोखर गुणी मुलगा आहेस. सगळी कामे कशी जबाबदारीने करतोस."

आईने रामला भाजी-पोळीचा डबा दिला. डबा आणि कुऱ्हाड घेऊन राम जंगलात निघाला. दुपारी राम लंगडतच घरी आलेला पाहून आईने विचारले, "राम काय झालं? आणि लाकडांचं काय केलं?"

राम म्हणाला, "अगं आई, मी जंगलात गेलो. एका झाडाखाली विश्रांतीसाठी बसलो होतो. थोड्याच वेळात एक म्हातारा बाबा तिथे आला. म्हणाला, "मला खूप भूक लागली आहे. तुझ्याकडे काही खायला असेल तर देतोस का?"

मी म्हणालो, "नाही रे बाबा, माझ्याकडे थोडीशीच पोळी-भाजी आहे. ती जेमतेम माझ्यापुरतीच पुरेशी आहे, तेव्हा तुला कशी काय देणार?"

"काहीही न बोलता म्हातारा बाबा पलीकडच्या झाडाखाली बसला. मी झाडावर चढलो. कुऱ्हाडीचा घाव घातला आणि क्षणार्धात हातातून कुऱ्हाड सटकली. पायावरच पडली. खूप रक्त आलं. मी डोक्याचा रूमाल पायाला बांधला, आणि जेवणाचा डबा घेऊन घरी आलो. कुऱ्हाड तिथेच विसरलो."

श्रीधर पलीकडच्या खोलीत पुस्तक वाचत होता. त्याने हे संभाषण ऐकले;

पण काहीच प्रतिक्रिया दिली नाही. हरी म्हणाला, "आई, काळजी करू नको, मी जातो जंगलात."

हरीने रामचा डबा उचलला, आणि तो जंगलाच्या दिशेने चालायला लागला. पाहता पाहता संध्याकाळ झाली. जवळच एक गाव दिसले. त्या गावातल्या पाटलाच्या वाड्यात तो रात्रभर राहिला. सकाळी पाटलीण बाईने त्याला चटणी-भाकरीची शिदोरी दिली. हरी जंगलाच्या दिशेने चालू लागला.

माध्यान्हापूर्वीच हरी जंगलात पोहचला. त्याने झाडाजवळ पडलेली आपली कुऱ्हाड उचलली; इतक्यात म्हातारा बाबा तिथे आला. हरीला म्हणाला, "ए मुला, मला फार भूक लागली आहे. तुझ्याकडे काही खायला असेल, तर देतोस का?" हरी म्हणाला, "माझ्यापुरताच आहे रे बाबा जेवण? तुला कसे काय देऊ?" काहीही न बोलता बाबा समोरच्या झाडाखाली जाऊन बसला.

हरीने कुऱ्हाड उचलली, आणि तो झाडवर चढला. झाडाच्या एका मोठ्या फांदीवर कुऱ्हाडीचा पहिलाच घाव घातला आणि कुऱ्हाड हातातून सटकली. ती हरीच्या पायावर पडली. हरी झाडावरून खाली उतरला. म्हाताऱ्याकडे रागाने पहात, जेवणाचा डबा घेऊन तो घराच्या वाटेने परत निघाला. हरीला घरी परत आलेलं पाहून आई म्हणाली, "काय रे बाबा, तूही परत आलास?"

हरी रडवेला होऊन म्हणाला, " अगं आई, पायाला बघ केवढी मोठी जखम झाली आहे. मी जंगलात जाताच तिथे एक म्हातारा आला. त्याने माझ्याकडे जेवण मागितले."

श्रीधरने पलीकडून हळूच विचारले, "मग तू काय सांगितलंस?"

हरी म्हणाला, "अरे, मीच पाटलीणीकडून चटणी-भाकरी घेतली होती; त्यातून त्या म्हाताऱ्याला कशी देणार?"

श्रीधर म्हणाला, "आई, आता मी जातो."

श्रीधरच्या या बोलण्यावर आई, राम, हरी सगळेच हसले. आई म्हणाली, "अरे बावळटा, या मोठ्या भावांना जे जमलं नाही, ते तुला कसं जमणार?"

श्रीधर शांतपणे म्हणाला, "आई, मी जाणार आहे जंगलात. पण आता नाही.

मी उद्या सकाळी निघतो."

दुसऱ्या दिवशी श्रीधर भाजी-पोळीचा डबा घेऊन जंगलाकडे निघाला. जंगलात लवकर पोहचता यावे म्हणून गावाबाहेरच्या रस्त्याने चालू लागला. जंगलात पोहचल्यावर दोघे भाऊ ज्या झाडापर्यंत पोहचले होते, तिथे गेला. श्रीधरने आपली कुऱ्हाड ओळखली. अवती भोवती नजर फिरविली. समोरच्या झाडाजवळ म्हातारा उभाच होता. त्याला बघून श्रीधर हसला. म्हाताऱ्या बाबाला म्हणाला, "बाबा, माझे दोघे भाऊ तुमच्याशी चांगले वागले नाहीत, त्यांच्या वतीने मी तुमची माफी मागतो."

बाबा श्रीधरजवळ येत म्हणाला, "मुला, मला खरंच खूप भूक लागली आहे."

श्रीधरने जेवणाचा डबा उघडला. म्हणाला, "अरे वा! भरपूर जेवण आहे. आपण दोघे पोटभर जेवू शकतो."

श्रीधरचे बोलणे ऐकून म्हातारा म्हणाला, "तुझ्या दोघा भावांपेक्षा तू खूपच कनवाळू आहेस. देव तुझे कल्याण करील." श्रीधर आणि बाबा यांनी जेवण केलं. श्रीधर म्हणाला, "चला आता लाकडं तोडली पाहिजेत." बाबा म्हणाला, "थांब. लाकडं तोडण्यापूर्वी झाडाच्या उंच फांदीकडे नीट लक्ष देऊन बघ. तुला अनमोल गोष्ट मिळेल."

श्रीधरने म्हाताऱ्या बाबांना नमस्कार केला, आणि तो झाडावर चढला. त्यानंतर सगळ्यात उंच फांदीकडे पाहू लागला. त्या फांदीवर सोनेरी पिसांचा मोर बसलेला दिसला. श्रीधरने त्या मोराला उचलून घेतलं. मोराला पाहून श्रीधर हरखून गेला. तो लाकडे तोडायचेच विसरला. या छानशा मोराला पाहून आपली लहान बहीण राधा आनंदी होईल असा विचार करीत श्रीधर घराकडे निघाला.

वाटेत त्याला तीन बहिणी आणि त्यांचे आई-वडील भेटले. श्रीधरच्या हातातील मोर पाहून त्या तिघी बहिणी *'मोरारे मोरा, काय तुझा तोरा'* असे गाणे म्हणत पुढे चालू लगल्या. हातात मोर घेतलेला श्रीधर पुढे, त्याच्या मागे त्या तिघी बहिणी, त्यांच्या मागे त्यांचे आई-वडिल असे सगळेच गाणी गात गात

गावापर्यंत येऊन पोहचले.

पाटलाच्या वाड्यावर बाहेर ओट्यावर पाटलाची मुलगी सुमन उदास चेहऱ्याने बसली होती. बऱ्याच दिवसांपासून ती हसली नव्हती, बोलली नव्हती. पाटलाने गावात दवंडीही पिटली होती, "जो कुणी माझ्या मुलीला हसवेल, त्याला मी माझ्या संपत्तीतला अर्धा हिस्सा बक्षीस देईल. मोर घेतलेला श्रीधर आणि गाणी गाणाऱ्या मुलींची मिरवणूक पाहून सुमन टाळ्या वाजवित हसू लागली. ओट्यावरून उतरून मिरवणुकीत सामील झाली. पाटलाला आणि पाटलाच्या घरातील सर्वांनाच आश्चर्य वाटले. पाटलाने श्रीधरला बोलावले, त्याचा यथोचित सन्मान केला. ठरल्याप्रमाणे काही सोने, रोख रक्कम श्रीधरला दिली, आणि म्हणाला, "आजपासून तू माझा जावई. माझ्या मुलीला आनंदात ठेव एवढंच मागणं मागतो."

सोनेरी पिसांचा मोर घेऊन श्रीधर घरी आला. राधा अंगणात खेळत होती. सुंदर मोर पाहून राधाही हरखून गेली. आई म्हणाली, "अरे बावळटा, तुला लाकडं आणायला सांगितली, आणि तू हा काय मोर घेऊन आलास? याने काय आपलं पोट भरणार आहे का?" श्रीधरने शांतपणे पाटलाने दिलेली सोन्या-नाण्यांची पिशवी आईच्या पुढ्यात रिकामी केली; आणि म्हणाला "यापुढे तुला स्वयंपाकाचाही त्रास होणार नाही; कारण पाटलाची मुलगी आता तुझी सून होणार आहे."

घडलेली सगळी गोष्ट श्रीधरने आईला वर्णन करून सांगितली. आईने श्रीधरला पोटाशी घेतले. तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. राधा मात्र अंगणात सोनेरी मोराबरोबर *'नाच रे मोरा नाच, आंब्याच्या बनात, नाच रे मोरा'* गाणे गात होती.

(तात्पर्य, भुकेल्याला अन्न, तहानलेल्या पाणी देणं, ही आपली संस्कृती आहे. )

(पुनःकथन - डॉ. मंगला वरखेडे, ब्रेन टॉनिक मासिक, डिसेंबर २०१४)

# ५.८. जादुचा मोर

(चिनी लोककथा)

कोण्या एके काळी एका गावात एक मुलगा रहात होता. तो फार गरीब होता. चहा पिण्यापुरतादेखील त्याच्याजवळ पैसे नव्हते. त्या गावात एक चहाचं दुकान होतं. तिथल्या मालकाला त्याची दया आली. त्यानं त्याला रोज मोफत चहा दिला.

एक दिवस तो मुलगा त्या दुकानाच्या मालकाला म्हणाला, "आता दूरदेशी जातो. तुमचे उपकार विसरणार नाही. माझ्याजवळ तुमचं बिल द्यायला पैसे नाहीत. पण मी व्यवस्था करतो ..." त्याने मग खिशातून एक कसलासा रंगीत खडा काढला. त्याची माती करून त्यानं दुकानाच्या भिंतीवर एक चित्र तयार केलं. खऱ्या मोरासारखा मोर केला. मग तो मालकाला पुन्हा म्हणाला, "हा मोर माझे पैसे चुकते करील. मी जेवढं आपलं देणं लागतो, त्याच्या दसपट रक्कम हा देईल."

“ते कसं काय?" मालकाला आश्चर्य वाटलं. तो मुलगा म्हणाला, "जेव्हा तुमच्या दुकानात पुष्कळ लोक येतील तेव्हा तीनदा टाळी वाजवा. मग काय होतं पहा. मात्र एक लक्षात ठेवा. केवळ एकच माणूस दुकानात असेल तर कधी टाळी वाजवू नका." त्यानंतर तो मुलगा निघून गेला.

दुसरे दिवशी दुकानात पुष्कळच माणसं आली. मालकानं मोराची परीक्षा घ्यायचं ठरवलं. तीनदा टाळी वाजवली. पहातो तो तो मोर भिंतीवरून खाली आला. पिसारा फुलवून नाचू लागला. लोकांना नवल वाटलं. मोराचा नाच प्रत्येकाच्या मनात भरला.

त्यानंतर दररोज असंच होत गेलं. दुकानात माणसांची रीघ लागली. पण एक दिवस काय झालं की, गावचा सावकार मोराच्या लोभानं तिथं आला. त्यानं जमलेल्या माणसांना धाक दाखवून घालवून दिलं. नोकरांच्याकडून मारहाण

करीत माणसं बाहेर काढली. एकट्यानं मोराचा नाच बघायचा बेत केला. त्यासाठी मोहरांनी भरलेली एक पिशवी दुकानाच्या मालकापुढं केली. मालकाला मोह झाला. तोंडाला पाणी सुटलं. त्यानं तीनदा टाळी वाजवली. मोर खाली आला. पण घटकाभरच नाचला. थकून गेला. भिंतीवर जाऊन कोलमडला. मरून गेला. ते बघून तो सावकार किंचाळला. दुकानाचा मालक घाबरला. त्यानं लाखदा टाळी वाजवली पण सारं शांत झालं होतं. त्याला मोठा पश्चाताप झाला.

त्यानंतर काही दिवसांनी तो गरीब मुलगा तिथं परत आला. त्यावेळी मध्यरात्र झालेली. सर्व झोपलेले. पण त्या मुलानं हलकेच दार वाजवलं. मालक बाहेर आला. 'यावेळी कोण आलं?' तो चिडला. पण पहातो तो पूर्वीचा गरीब मुलगा. मोराची हकिगत सांगावी म्हणून त्यानं तोंड उघडलं. पण तेवढ्यात त्या मुलानं खिशातून एक बासरी काढली. मोठ्या आनंदानं वाजविली. त्यासरशी तो मोर हळूहळू साजीवंत झाला. नाचत नाचत दुकानाबाहेर आला. त्या मुलाला बघून तो आनंदला. त्याच्यामागून निघाला. मुलगा बासरी वाजवत दूर निघून गेला. मोरानंही त्याची पाठ सोडली नाही. 'आ' वासून मालक बघत राहिला. पण पुन्हा त्या गावाला त्या गरीब मुलाचं अगर जादूच्या मोराचं दर्शन घडलं नाही. कुणाला माहीत तो मुलगा आणि मोर कुठं गेले असतील?

(ब्रेन टॉनिक मासिक, मे २००६)

# ५.९. जादूची पिशवी

(कोरियाची लोककथा)

एक तरुण जोडपे एका झोपडीत राहत होते. ते फार गरीब होते. दोघेही दररोज जंगलातून लाकडाच्या दोन मोळ्या आणित असत. एक मोळी स्वतःच्या उपयोगासाठी आणि दुसरी बाजारात विकण्यासाठी. एक दिवस त्यांनी रोजच्या प्रमाणे एक मोळी झोपडीत आणि एक मोळी झोपडीच्या बाहेर ठेवली. सकाळी पाहतात तर बाहेर ठेवलेली मोळी गायब झाली होती. त्यांनी आतमधील मोळी विकून दैनंदिन गरजा भागविल्या. पण आता रोज मोळी गायब होऊ लागली. असे तीन दिवस झाले. चौथ्या दिवशी त्या तरुणाने मोळीमध्ये जागा केली आणि त्यात तो लपून बसला. मध्यरात्री आकाशातून दोरखंड आला आणि मोळी उचलली गेली. ती मोळी स्वर्गात पोहचली. आत बसलेल्या तरुणाने पाहिले की एक पांढरे केस झालेल्या म्हाताऱ्याजवळ मोळी येत आहे. मोळी उघडली आणि आत बसलेल्या तरुणाला म्हातारा म्हणाला, “सगळेजण एक मोळी लाकडे तोडतात, तुम्ही दोन मोळ्या लाकडे का तोडता?”

युवकाने आदराने वाकून उत्तर दिले, “आम्ही गरीब आहोत. म्हणून मी आणि माझी पत्नी दररोज दोन मोळ्या भरतील इतकी लाकडं तोडतो. एक घरच्या कामासाठी आणि दुसरी विकून घरखर्च भागवितो.”

तो वृद्ध म्हणाला, “मी तुला एक पिशवी देतो. त्यातून तुला रोज एक चांदीचे नाणे मिळेल.”

घरी येऊन त्या तरुणाने ती पिशवी आपल्या पत्नीला दिली आणि सर्व किस्सा सांगितला. पत्नी रोज एक चांदीचे नाणे मिळवून एकत्र करू लागली. जेव्हा बरेच नाणे एकत्र झाले तेव्हा पती म्हणाला, “आता आपल्याला एक चांगली कुऱ्हाड विकत घ्यायला हवी. पण पत्नी तयार झाली नाही. त्याने दुसरा सल्ला दिला की आपण काही एकर जमीन विकत घ्यावी. तरी पण पत्नी तयार

झाली नाही. काही दिवसानंतर पत्नीने सल्ला दिला की आपण एक छोटीशी सुंदर झोपडी बांधून घ्यावी. पण पती म्हणाला, ''आता आपल्याकडे इतका पैसा एकत्र झाला आहे की आपण एक छोटसं घर का बांधू नये.'' पत्नी या गोष्टीला सहमत झाली.

त्याने जमविलेल्या नाण्यातून विटा आणि इतर बांधकामासाठी आवश्यक सामान विकत घेतलं आणि त्या दिवसापासून जंगलात जाऊन लाकडं तोडण्याचे काम पूर्णपणे बंद केले. घर अर्धेच बांधून झाले होते की सर्व समान संपले आणि नाणे देखील. पतीने त्याच दिवशी दुसऱ्यांदा पिशवी उघडली त्यातून चांदीचे एक नाणे मिळाले. त्याला वाटले की प्रत्येक वेळेस पिशवी उघडताच नाणं मिळू लागेल. त्याने पुन्हा पिशवी उघडली पण नाणं मिळालं नाही. आणि त्यानंतर पिशवीतून नाणे मिळणे बंद झाले. स्वर्गातील जादूची पिशवी तोपर्यंतच नाणे देत होती, जो पर्यंत तो युवक मेहनत करीत होता आणि त्याचा हेतू चांगला होता.

तात्पर्य हेच की माणसाने सद्हेतू ठेवावा व सतत परिश्रम करावे.

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ५.१०. बोलणारी रजाई

(जापानची लोककथा)

“या महाशय, आत या. मी आपले मनःपूर्वक स्वागत करतो,” असे सांगून हॉटेल मालकाने आनंदाने व्यापाऱ्याचे स्वागत केले. हॉटेल मालकाने त्याच दिवशी हॉटेल सुरू केले होते. आतापर्यंत कोणीच ग्राहक आला नव्हता. हॉटेल प्रथम श्रेणीचे नव्हते. मालक गरीब होता. त्याने हॉटेलात लागणारे सामान चटई, टेबल, भांडी इ. अडगळीच्या दुकानातून विकत घेतले होते. तरीपण व्यापाऱ्याला हॉटेल आवडले. तो जेवण करून अंथरूणावर पडला आणि त्याला झोप लागली. थोड्यावेळाने त्याला खोलीत दोन जणांचे बोलणे ऐकू आले. दोन लहान मुलं बोलत होती.

“दादा, काय तुला थंडी वाजत आहे.” एकाने विचारले.

“काय तुला पण थंडी वाजत आहे.” दुसऱ्याने विचारले.

व्यापाऱ्याला वाटलं चुकून हॉटेल मालकाची मुलं खोलीत आली असतील. जापानी हॉटेलमध्ये त्यावेळेस दारं नसायची त्यामुळे मुलांचे येणे शक्य होते.

तो व्यापारी मुलांना म्हणाला, “मुलांनो बाहेर जा ही खोली तुमची नाही.”

काही वेळ खोलीत शांतता राहिली. पण पुन्हा तेच बोलणे ऐकू आले.

व्यापारी वैतागला आणि त्याने उठून मेणबत्ती लावली आणि खोलीचे निरीक्षण करू लागला. पण कुठंही उंदराचे पिल्लूसुद्धा दिसले नाही.

त्याने मेणबत्ती तशीच राहू दिली आणि पुन्हा अंथरूणावर येऊन पहुडला.

पण पुन्हा तेच बोलणं ऐकू आलं, “दादा, काय तुला थंडी वाजत आहे.” एकाने विचारलं.

“काय तुला पण थंडी वाजत आहे.” दुसऱ्याने विचारलं.

बोलणं रजईतून ऐकू येत होतं याची त्याने खात्री करून घेतली. त्यानं पटकन

आपलं सामान गोळा केलं आणि बाहेर आला. मालकाला घडलेली हकिगत सांगितली.

मालक चिडून म्हणाला, “महाशय, मला असं वाटतं की तुम्हाला वाईट स्वप्न पडलं असावं. रजई कुठं बोलते का?”

व्यापाऱ्याने उत्तर दिलं, “तुमच्याकडे असलेल्या रजायांपैकी एक रजई बोलते. पण तुम्ही माझ्याशी असभ्यपणाने बोलत आहात. आता तर मी एक क्षणही येथे थांबणार नाही. असे म्हणत त्याने खिशातून काही नोटा काढून मालकाकडे फेकल्या आणि म्हणाला, “घ्या तुमचं भाडं, मी चाललो.”

दुसऱ्या दिवशी दुसरा यात्रेकरू आला. त्यालाही रात्री दोन मुलांचं तेच बोलणं ऐकू आलं. तो बाहेर आला आणि त्याने मालकाला प्रसंग सांगितला. यावर मालक म्हणाला, “महाशय, मी तुम्हाला जास्तीत जास्त आराम मिळावा हा प्रयत्न केला आणि तुम्ही मला अशी अशक्य गोष्ट सांगून त्रास देत आहात.” यात्रेकरू म्हणाला, “मी शपथ घेऊन सांगतो की मी स्वतः रजईतून दोन मुलांचं बोलणे ऐकले आहे. आता मी येथे मुळीच राहणार नाही.”

जेव्हा दुसराही ग्राहक चिडून निघून गेला तेव्हा मालकाचं डोकं ठणठणलं. तो आत गेला आणि एकानंतर दुसरी रजई पाहू लागला. तेव्हा त्याला पण तेच बोलणं ऐकू आलं.

मालकाने ती रजई आपल्या खोलीत आणली आणि रात्रभर पांघरूण झोपला. पण रात्रभर दोन्ही मुलं एक दुसऱ्याला हाच प्रश्न करीत होते. दुसऱ्या दिवशी मालक ती रजई घेऊन अडगळीच्या त्याच दुकानात गेला. त्याने दुकानदाराला विचारले, ‘‘तुम्हाला आठवत असेल की ही रजई तुम्ही मला विकली होती.’’

“का? काय झालं?” दुकानदाराने विचारले.

“तुम्ही ही रजई कुठून घेतली होती?”

त्याने समोरच्या एका दुकानाकडे इशारा केला. हॉटेल मालक तेथे गेला. त्याने दुसऱ्या दुकानाचे नाव सांगितले. दुसऱ्याने तिसऱ्याचे असे करता करता

त्याला कळले की ही रजई एका घर मालकाने दुकानदाराला विकली होती. आणि ती रजई त्याने आपल्या भाडेकरूकडून भाड्यापोटी घेतली होती.

त्या भाडेकरूच्या घरात चार जण होते. गरीब आईवडिल आणि त्यांची दोन लहान मुलं. वडिलांची मिळकत अत्यंत कमी होती. एकदा थंडीमुळे ते आजारी पडले आणि एक आठवडा खूप त्रास सहन करून वारले. आई हा आघात सहन करू शकली नाही आणि तिचा पण मृत्यू झाला.

आता घरात दोघं भाऊ होते. मोठा आठ वर्षाचा आणि लहान सहा वर्षाचा. त्यांनी पोट भरण्यासाठी घरातील एक एक वस्तू विकणे सुरू केले. कारण काही पर्याय नव्हता. शेवटी त्यांच्याकडे एक रजई उरली. जेव्हा बर्फ पडू लागला. तेव्हा दोघं भाऊ रजई पांघरून लेटले. परंतु थंडीमुळे झोप येत नव्हती. तेव्हा लहान भावाने मोठ्या भावाला विचारलं, "दादा, काय तुला थंडी वाजत आहे?" मोठा भावाने विचारलं, "काय, तुला पण थंडी वाजत आहे."

त्यांचं हे बोलणं रजईतील कापसातून जादूने गुंजत राहिले. तेव्हाच घरमालक आला आणि त्यांना रागवित म्हणाला, "घराचे भाडे द्या." मोठा भाऊ म्हणाला, आमच्याकडे ह्या रजईशिवाय काहीच वस्तू शिल्लक नाही." आणि त्याने ती रजई मागितली. तेव्हा मोठा भाऊ म्हणाला, "बाहेर बर्फ पडत आहे. आम्ही कुठं जाऊ."

घरमालक ओरडला, "फालतू गोष्टी करू नका. घर सोडून चालते व्हा."

शेवटी त्यांना बाहेर पडावंच लागलं. त्यांच्या अंगात फक्त शर्ट होता. ते घराच्या मागे एक दुसऱ्याला चिपकून लेटले. त्यांच्या अंगावर बर्फाचा थर जमत गेला. आणि मृत्यूमुखी पडले.

सकाळी एकाने त्यांचे मृत शरीर पाहिले आणि त्या दोघांचे मृत शरीर घेऊन तो दयेच्या देवीच्या मंदिरात गेला.

जपानच्या मंदिरामध्ये ह्या पवित्र देवीचे सुंदर आणि दयावान मुख दिसून येते. तिला एक हजार हात आहेत. असं सांगितलं जातं की तिच्याकरिता स्वर्गाची दार उघडी आहेत; परंतु ती तेथे जात नाही. कारण तिला त्या लाखो

गरीब आत्म्यांची चिंता आहे; जी जगात दुःख, रोग आणि कष्ट सहन करीत असतात. आणि ती आपल्या हजार हातांनी त्यांची मदत करीत असते.

दोघा भावांना दयेच्या देवी मंदिरातील एक कोपऱ्यात दफन करण्यात आले. एक दिवस त्या हॉटेलचा मालक त्या मंदिरात आला आणि त्याने पुजारी आणि तेथे उपस्थित लोकांना त्या रजईची आणि त्यातून येणाऱ्या आवाजाची गोष्ट सांगितली. आणि ती रजई पुजाऱ्याला दिली. त्या लहान मुलांचा असा अंत ऐकून पुजारी आणि उपस्थित लोकांचं मन पश्चत्ताप आणि दुःखाने हेलावून गेलं. आता रजईतून आवाज येणं बंद झालं होतं. कारण तिने आपला संदेश सगळ्यांना दिला होताच. पुजारी आणि इतरांना अत्यंत वाईट वाटलं की त्यांच्या शहरातील दोन लहान मुलं भूक आणि थंडीमुळे मृत्यूमुखी पडले.

आजही बऱ्याच गरीब लोकांचा आत्मा एक दुसऱ्याला विचारत असतात. “दादा, काय तुला थंडी वाजत आहे?”

“काय, तुला पण थंडी वाजत आहे.”

आजपण न जाणो किती गरीब लोकं घाणेरड्या वस्तीत राहतात. दिवसभर रक्त आणि घाम गाळतात, पण त्यांना पोटभर जेवण आणि गरजेपुरते कपडे पण मिळत नाही. त्यांची मुलं एक थेंब दुधाकरिता तडफडत असतात. आणि औषधपाणी न मिळू शकल्यामुळे अकाली मृत्यूमुखी पडतात. जर त्यांचे फाटलेले कपडे आणि जीर्ण झालेल्या चादरी बोलू शकले असते तर आजपण त्या बोलणाऱ्या रजईचा आवाज शहराशहरात आणि गावागावातून ऐकू आला असता.

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ५.११. गाव पाहिला बाई

डोंगराच्या पायथ्याशी एक छोटंसं गाव होतं. या गावाला पालन पोषण करणारा एक उदार राजाही होता. आपल्या गावातील सर्व लोक आनंदी रहावेत म्हणून हा राजा आपल्या प्रजेसाठी सर्व सोयीसुविधा पुरवित असे. त्यामुळे गावात सगळीकडे सुखा-समाधानाचे वातावरण होते. राजाने गावात सर्व प्रकारची फुलझाडे, फळबागा लावल्या होत्या. ज्याला हवे ते फूल, हवे ते फळ घ्यायला परवानगी होती. फक्त गरजेपेक्षा कुणी जास्त घेऊ नये हा नियम कटाक्षाने पाळला जाई. गावातील गायी-गुरांसाठी हिरवेगार कुरण तयार केले होते. त्यामुळे दूध-दुभत्याची चंगळ होती. गावात चौका-चौकात संगीताच्या मंद स्वरातील धून असणाऱ्या ध्वनिमुद्रिका लावलेल्या असत. मुख्य म्हणजे या गावातील राजाला गाणे गाण्याची आवड होती. सणावाराला, जत्रा-उत्सवात गावातील लोकांचे गाणे वाजावण्याचे कार्यक्रमही होत असत. गावातल्या शाळेत मुलांना हसत खेळत शिक्षण दिले जावे यावर राजाचा भर असे. त्यामुळे शाळेत विविध प्रकारचे खेळ शिकवले जात. हुतुतू, खो-खो, क्रिकेट इत्यादी मैदानी खेळांबरोबर कॅरम, बुद्धिबळ, चौपट असे बैठे खेळही असत. मुलांना परीक्षेचे ओझे नसायचे. त्यामुळे सगळे बाळगोपाळ आनंदात असायचे.

अशा या आनंदी गावात नेहमीप्रमाणे एके दिवशी राजा फेरफटका मारायला निघाला. फिरता फिरता त्याला एका घराच्या ओट्यावर उदास चेहऱ्याने बसलेली मुलगी दिसली. राजाला खूप आश्चर्य वाटले. राजा त्या मुलीजवळ गेला आणि त्याने तिला विचारले,

"मुली काय झालं? तू अशी उदास का? तुला काही हवं आहे का?"

पण काहीही उत्तर न देता ती मुलगी घरात निघून गेली. राजाला खूप वाईट वाटलं. उदास मुलीला पाहून आनंदी राजाही उदास झाला. तो आपल्या

महालात परत आला.

उदास राजाला खूष करण्यासाठी त्याच्या सातही राण्या कामाला लागल्या. एका राणीने राजाला गुलाबाच्या फुलांचा गुच्छ देऊ केला; पण राजाचे समाधान झाले नाही. दुसऱ्या राणीला वाटले, राजाला केशरी दूध आवडते, म्हणून तिने चांदीच्या पेल्यात दूध आणले, पण राजाने एक घोटसुद्धा घेतला नाही. तिसऱ्या राणीने नृत्य करून दाखविले, तरी राजाची कळी खुलेना. चौथ्या राणीने गाणे म्हटले, पण त्याचे मन रिझेना. पाचव्या राणीने काही विनोदी गोष्टी सांगितल्या, पण राजाने साधे स्मित हास्यही केले नाही. सहाव्या राणीने बालगोपाळांसोबत खेळाचे डाव मांडले, पण त्यातही राजा सहभागी झाला नाही. अखेर सातव्या पट्टराणीने राजाला थेट विचारले की,

"महाराज, आपण दु:खी तर आपली प्रजाही दु:खी. सगळे लोक उदास झाले आहेत. तेव्हा आपण मन मोकळे करून सांगावे; आपल्या राज्यावर काही संकट येऊ घातले आहे का? की आपले मन कुणी दुखावले आहे? आम्ही अपराध्यास योग्य ती शिक्षा देऊ."

राजा म्हणाला, "प्रधानांना बोलवा. "

प्रधानांना राजमहालात येण्यासाठी निरोप पाठविला. प्रधान आले. प्रधानाने राजाला मुजरा करून विचारले, "महाराज, काय आज्ञा आहे? मी तुमच्या हुकूमाचा ताबेदार आहे. कुठलीही अवघड गोष्ट असू द्या, आपण त्यावर मात करू."

राजा म्हणाला, " आपल्या गावात एक उदास मुलगी आहे. तिला महालात घेऊन यावे."

प्रधान आपल्या कामगिरीवर निघाले. दरम्यान सातही राण्यांनी आपल्या नोकरांकरवी या मुलीला रिझविण्यासाठी खेळणी, चॉकलेट, तऱ्हेतऱ्हेची मिठाई आणून ठेवली.

प्रधानाने उदास मुलीला राजमहालात आणले. राजाने त्या मुलीला आपल्या जवळ बोलाविले. तिच्या पाठीवरून ममतेने हात फिरविला, आणि म्हणाला, "

मुली, हा सगळा खाऊ, ही सगळी खेळणी तुझ्यासाठी आहेत. तुला हवं ते, हवं तेवढं घे. आणि एकदा हसून दाखव बघू."

पण मुलगी म्हणाली, "मला काहीच नको आहे."

तेवढ्यात त्या मुलीचे आई-बाबाही राजमहालात पोहचले. राजाला म्हणाले, "चारपाच दिवसांपासून ही मुलगी शाळेत जात नाही, आणि काही बोलतही नाही. आम्ही सगळेच काळजीत आहोत."

राजा त्या मुलीला म्हणाला, " तुझ्यासोबत मी येऊ का शाळेत?

मुलीची नजर जमिनीकडे स्थिर होती. शांतपणे उभी राहून ती पायाच्या अंगठ्याने जमीन कोरू लागली. राजा उठला. तिचे बोट धरलं. म्हणाला,'चल, आपण फिरायला जाऊ'.

मुलीच्या चेहऱ्यावरचे भाव थोडेसे बदलले. ती राजाबरोबर बागेत हिंडू लागली. बागेतल्या तळ्यातली बदके पाहून राजाने टाळी वाजवली. त्यापाठोपाठ मुलीनेही टाळ्या वाजवल्या. राजा तळ्यात पाय सोडून बसला. तशी ती मुलगीही पाण्यात पाय सोडून बसली. मुलीला असे आनंदात पाहून राजा सुखावला. त्याने मुलीला विचारले, " मुली, आता सांग बरं, का उदास होती तू?"

मुलगी म्हणाली, " मला सारं काही मिळत होतं, पण मला एकही मित्र नव्हता."

राजा म्हणाला ," आजपासून मी तुझा मित्र होतो, चालेल?"

तळ्याबाहेर येऊन मुलीने राजाला मिठी मारली. राजाचा हात हातात घेऊन " आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे" असं गाणं म्हणू लागली.

पाठोपाठ राजाच्या राण्याही आल्या. त्याही फेर धरून गाणे म्हणू लागल्या.

*"किलकिल पक्षी बोलती, झुळझुळ झरे वाहती,*
*पानोपानी फुले बहरती, फुलपाखरे भिर भिर*
*स्वप्नी आले काही, एक मी गाव पाहिला बाई"*

फेराचे गाणे चालू असतानाच प्रधानांनी शाळेतील मुलांना तिथे आणले.

आल्या आल्या मुलेही त्या फेरासोबत गाणे म्हणत बागडू लागली. सगळ्यांनी मिळून गाण्याचा ताल पकडला:

या गावाची गंमत न्यारी,
इथे नांदती मुलेच सारी
नाही पुस्तक नाही शाळा,
हवे तेवढे खुशाल खेळा
उडो बागडो पडो धडपडो,
लागत कोणा नाही
स्वप्नी आले काही एक,
मी गाव पाहिला बाई

ती मुलगी या मुलांसोबत केव्हा फेर धरून नाचू-गाऊ लागली, कळलेच नाही.

***

गोष्ट ऐकल्यावर राजू संजूला म्हणाला, " खरंच का रे असं गाव आहे? संजू म्हणाला, " अरे, ही सगळी माझ्या स्वप्नातली गोष्ट सांगत होतो मी."

यावर राजू आणि संजू खळखळून हसले आणि म्हणाले, "या गावातील मुलांना जसा आनंद आणि मित्र, मैत्रिणी मिळाले, तसे तुम्हा आम्हा सगळ्यांना मिळोत. ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सफळ संपूर्ण!"

(पुनःकथन - डॉ. मंगला वरखेडे, ब्रेन टॉनिक मासिक, ऑगस्ट २०१५)

# ५.१२. कोळ्याचा मुलगा आणि तीन राक्षस

एक कोळी होता. तो रोज नदीवर मासे धरायचा आणि ते सारे राजाला नेऊन द्यायचा. त्यासाठी राजाकडून त्याला ठरावीक पैसे आणि मासे धरण्यासाठी पीठ मिळत असे. होता होता तो कोळी म्हातारा झाला. मग आपल्या मुलाला बोलावून त्यानं आपलं मासे धरण्याचं जाळं त्याला दिलं आणि सांगितलं. "हे बघ, मी आता म्हातारा झालो. माझ्याने काही काम होत नाही. तुला मी या जाळ्यावर वाढविला. आता हे जाळं तू सांभाळ. रोज नदीवर मासे धरून ते राजाकडे नेऊन देत जा." कोळ्याचा मुलगा मोठा आज्ञाधारक होता. त्यानं ते जाळं घेतलं आणि वडिलांना म्हटलं, "बाबा तुम्ही मुळीच काळजी करू नका. मी मासे धरायचे काम चोख करीन."

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे कोळ्याच्या मुलानं जाळं उचललं आणि मासे धरायला तो नदीवर गेला. जाळं पाण्यात टाकून तो थोडा वेळ बसला. आणि मग जाळं काढू लागला. तर काय आश्चर्य? जाळं काही केल्या बाहेर निघेचना, कोळ्याच्या मुलाला वाटलं आज भरपूर मासे जाळ्यात आलेले दिसतात. बाबांना काही एवढे मासे कधी मिळाले नाहीत. मला मात्र पहिल्याच दिवशी चांगला लाभ होणार असं दिसतं. त्यानं सारी ताकद पणाला लावून जाळं ओढलं. पण जाळं काही बाहेर निघेना. तशी कोळ्याचा मुलगा इकडे तिकडे पाहू लागला. तोच त्याच्या पाठीमागून आवाज आला, "निम्मे मासे मला देणार असशील तर मी तुला मदत करायला तयारआहे." मुलानं चमकून मागं पाहिलं. तर झाडावर एक स्त्री बसलेली दिसली. तिनंच मदत करायची तयारी दाखविली होती. कोळ्याच्या मुलाला निम्मे मासे देऊन टाकावेसे वाटेना. काही न बोलता त्यानं पुन्हा जोर लावला नि ते जाळं खेचलं. पण जाळं काही केल्या अजिबात हलेना. अखेर त्यानं त्या स्त्रीला निम्मे मासे देण्याचं कबूल केलं. तेव्हा ती स्त्री

झाडावरून म्हणाली, “आता तू जाळं ओढून बघ बरं.” कोळ्याच्या मुलाला मोठं नवल वाटलं. त्याच्या मनात शंका आली की, ही बाई चेटकीण किंवा पिशाचीण तर नाही? तसं असलं तर ही रोज आपला छळ करील. म्हणून धैर्य करून त्यानं त्या स्त्रीला विचारलं, “बाई तू कोण आणि कुठची?” त्या स्त्रीने शांतपणे उत्तर दिले, “मी देवी आहे. तू रोज भल्या पहाटे सर्वांच्या अगोदर मासे धरायला येत जा. खूप मासे मिळतील. निम्मे मला दे, निम्मे तू घे.” मुलाच्या जीवात जीव आला. त्यानं विचार केला ही देवी आहे होय! मग तिला रोज मासे द्यायला हरकत नाही. ही काही आपल्याला इजा करणार नाही. उलट आपलं भलंच करील. देवीला निम्मे मासे मोठ्या खुषीने देऊन कोळ्याचा मुलगा निघाला. राजाला रोज द्यावयाचे तेवढे मासे नेऊन दिले, आणि बाकीचे मासे बाजारात नेऊन विकून टाकले. अशा तऱ्हेनं त्याला दुप्पट पैसे मिळाले. कोळ्याचा मुलगा रोज असे करू लागला आणि थोड्याच दिवसांत त्याने शेकडो रुपये मिळविले.

देवीला माशांची चटक लागली होती. आणि कधी चुकून मासे धरायचे राहून जाऊ नये म्हणून ती रोज मध्यरात्रीच मुलाला जागे करून नदीवर घेऊन जात असे. एकदा कोळ्यानं विचार केला की, हा पोरगा रोज रात्रीचाच कुठे जातो? ते पाहिले पाहिजे. म्हणून तो रात्री जागत बसला. मध्यरात्री देवी आली तेव्हा कोळ्यानं पुढं होऊन तिला विचारलं, “तू कोण आहेस?” देवीने उत्तर दिलं, “मी देवी आहे. मासे धरायला जाण्यासाठी तुझ्या मुलाला बोलवायला आले आहे.” कोळी म्हणाला, “गेले बावन्न दिवस तू रोज याला मध्यरात्री घेऊन जात आहेस. अशाने याची झोप पुरी होत नाही आणि हा वेडा होऊन जाईल. आज काही मी याला जाऊ देणार नाही.” देवी म्हणाली, “तुझा मुलगा बावन्न दिवस माझ्याबरोबर आला म्हणून मी याला बावन्न हत्तींइतके बळ दिले आहे. याला शंभर हत्तींचे बळ देण्याची माझी इच्छा आहे. तू याला माझ्याबरोबर पाठव.” पण कोळी काही मुलाला पाठवायला तयार होईना. अखेर देवी निघून गेली.

सकाळी कोळ्याचा मुलगा नेहमीप्रमाणे नदीवर गेला. वाटेत त्याच्या मनात विचार आला. देवीनं मला बावन्न हत्तींचं बळ दिल्याचं सांगितलं ते खरं की खोटं

हे पाहिलं पाहिजे. म्हणून जवळच असलेलं एक वडाचं झाड त्यानं जरासं हलवून पाहिलं. त्याच्या जराशा हलवण्यानं ते झाड जमिनीतून समूळ उपटूनच निघालं. कोळ्याच्या मुलाला आनंद झाला. आणि आंघोळीसाठी तो मुद्दामच हत्तीघाटावर गेला. त्या घाटावर रोज राजाचे हत्ती पाणी पिण्यासाठी येत असत. कोळ्याचा मुलगा त्या घाटावर बसून राहिला. थोड्या वेळात माहूत हत्ती घेऊन आले. मुलाला पाहून ते ओरडले, "अरे ए बाजूला हो नाही तर फुकट हत्तींच्या पायदळी तुडवला जाशील." पण कोळ्याच्या मुलानं माहुतांचं ऐकलं नाही. तेव्हा रागावून माहुतांनी हत्ती त्याच्यावर सोडले. पण कोळ्याच्या मुलाला तर देवीनं बळ दिलेलं होतं. त्यानं एका हत्तीची सोंड धरून माहुतासकट त्याला आकाशात दूर भिरकावून दिलं. पण मग मात्र हत्ती आणि माहूत फेकल्याबद्दल राजा शिक्षा करील असे वाटून कोळ्याचा मुलगा घाबरला आणि जंगलाकडे पळून गेला.

पळता पळता तो एका निर्जन जागी पोहोचला. तिथं त्याला एक राक्षस दिसला. एका मोठ्या झाडाच्या खोडाने तो आपले दात घासत बसलेला होता. कोळ्याच्या मुलानं धीटपणे त्याला विचारलं, तुझं नाव काय? त्याच्या धीटपणाचे कौतुक वाटून राक्षसानं उत्तर दिलं, "माझं नाव दंतबकर. मी राक्षस आहे. पण मी ऐकलं आहे की एक मनुष्य माझ्याहीपेक्षा बलवान आहे. त्यानं म्हणे राजाचे हत्ती आकाशात फेकून दिले.'' कोळ्याच्या मुलानं म्हटलं, "मीच तो माणूस आहे." दंतबकरला मोठा आनंद झाला. त्यानं कोळ्याच्या मुलाशी मैत्री केली आणि दोघे मिळून पुढे निघाले.

जाता जाता वाटेत त्यांना शेकडो गाड्या ओढून नेत असलेला राक्षस भेटला. कोळ्याच्या मुलाचा पराक्रम त्याच्याही कानांवर गेलेला होता. त्यानंही कोळ्याच्या मुलाशी आणि दंतबकरशी मैत्री केली. आता कोळ्याचा मुलगा, दंतबकर आणि गाडीवाला राक्षस असे तिघे मिळून पुढे चालले. वाटेत त्यांना एक अगडबंब राक्षस घोरत पडलेला आढळला. कोळ्याच्या मुलानं त्याचा केस उपटला पण राक्षस काही उठला नाही. दंतबकरनं एक भलंमोठं झाड त्याच्यावर आदळलं तरी त्याला काही लागलं नाही आणि गाडीवाल्या राक्षसानं गाड्या

त्याच्यावर चालविल्या तरी तो काही चिरडला नाही. त्या तिघांपेक्षा तो जास्त बलवान होता. अखेर तिघांनी मिळून त्याला गदगदा हलविले तेव्हा डोळे चोळत तो उठून बसला आणि म्हणाला, "एका माणसानं हत्ती फेकून दिल्याचं मी ऐकलं त्यामुळं माझे हातपाय गळून गेले नि मला झोप लागली. आता सांगा बघू तुम्ही कोण आहात?" सर्वांनी आपण कोण ते सांगितलं. आपण मिळून मिसळून रहायचं ठरविलं असल्याचंही सांगितलं. ते ऐकून तो अगडबंब राक्षसही खूष झाला. तोदेखील या तिघांचा मित्र बनला.

आता चौघेजण बरोबरच निघाले. जाता जाता वाटेत त्यांना एक धर्मशाळा दिसली. चौघांनी तिथं मुक्काम ठोकला आणि खाण्यापिण्याच्या व्यवस्थेला लागले. अगडबंब राक्षसाने दोघा राक्षसांना खांद्यावर बसविलं आणि तो नगराकडे निघाला. नगरीचे लोक तिघा राक्षसांना येताना पाहून घाबरले व सैरावैरा पळत सुटले. राक्षसांनी त्या सर्वांचं खाण्यापिण्याचं सामान उचललं आणि धर्मशाळेत आणून टाकलं. धर्मशाळेजवळच एक मोठा तलावदेखील होता. दंतबकरनं त्या तलावाचं पाणी आणलं. मोठमोठे वृक्ष उपटून चुलीत घातले. लाकडावर लाकूड घासून चूल पेटविली आणि तो स्वयंपाक करायला बसला. तेवढा वेळ रिकामं बसून काय करायचं म्हणून बाकीचे तिघे फिरायला गेले. दंतबकरनं भाकऱ्या करून त्यांचा मोठा ढीग लावला. तेवढ्यात तिथं एक भला मोठा राक्षस आला. आल्याबरोबरच त्यानं दंतबकरला दरडावलं. "या सर्व भाकऱ्या बऱ्या बोलानं मला देऊन टाक. नाही तर माझ्याशी गाठ आहे." दंतबकर भाकऱ्या देईना. तेव्हा दोघांची कुस्ती जुंपली. दंतबकरपेक्षा तो राक्षस बलाढ्य होता. त्याच्यापुढं दंतबकरचा टिकाव लागला नाही. आणि तो राक्षस साऱ्या भाकऱ्या वगैरे घेऊन निघून गेला. दंतबकरला वाटलं, झाला प्रकार आपल्या मित्रांना कळला तर ते सर्व मला हसतील. म्हणून त्यानं घाईघाईनं पुन्हा सर्व स्वयंपाक केला. थोड्या वेळांनं सर्वजण आले. इतर दोघा राक्षसांच्या नाही पण कोळ्याच्या मुलाच्या लक्षात आलं की, जाताना अंगण स्वच्छ होतं; पण आता मात्र तिथं कोणी लढल्याचं दिसत होतं. पण तो काही बोलला नाही.

दुसऱ्या दिवशी गाडीवाला राक्षस स्वयंपाकाला राहिला. तिसऱ्या दिवशी अगडबंब राक्षस राहिला. पण त्या दोघांचीही दंतबकरसारखीच दशा झाली. चौथ्या दिवशी कोळ्याचा मुलगा स्वयंपाकाला राहिला. त्या दिवशीदेखील तो उपटसुंभ राक्षस आला आणि भाकऱ्या मागू लागला. ते ऐकताच कोळ्याच्या मुलानं चुलीतलं भलं मोठं जळकं लाकूड घेऊन त्या राक्षसाच्या डोक्यावर एवढ्या जोरात हाणलं की तो जागच्या जागी ठार झाला. तेवढ्यात तिघे मित्र माघारी आले. कोळ्याचा मुलगा त्यांना म्हणाला, "तुम्ही हे मला पहिल्या दिवशीच सांगितलं असतं तर तुम्हांला दोन दोनदा स्वयंपाक करावाच लागला नसता."

त्यानंतर कोळ्याच्या मुलानं म्हटलं, "हे पहा, मी आता पुढं जाणार. तुम्हांला माझ्याबरोबर यायचे असेल तर चला. नाही तर इथंच रहा." त्या तिघा राक्षसांनी तिथंच मुक्काम करायचं ठरविलं. तेव्हा कोळ्याच्या मुलानं त्या तिघांना एक फूल दिलं आणि म्हटलं, "हे फूल कोमेजलं तर माझ्यावर काही संकट कोसळल्याचं समजून तुम्ही माझ्या मदतीला धावून या." त्या तिघा राक्षसांनी कोळ्याच्या मुलाला तसं वचन दिल्यावर तो पुढं निघाला.

पुढं गेल्यावर तो एका मोठ्या वाड्याशी आला. वाड्याभोवती छानदार बाग होती. आणि बागेत सोनेरी केसांची एक सुंदर मुलगी झोके घेत होती. तिनं हातानंच कोळ्याच्या मुलाला निघून जायला सांगितलं. पण कोळ्याचा मुलगा न घाबरता आत गेला आणि त्यानं सारी हकिगत विचारली तेव्हा ती मुलगी म्हणाली, "इथं राक्षसांचा सरदार आपल्या शंभर राक्षसांसह राहतो. मी राजकन्या आहे. माझे सोनेरी केस राक्षसांच्या सरदाराला फार आवडले म्हणून त्यानं मला पळवून आणलं आणि इथं डांबून ठेवलं. तो राक्षस आता येणारच आहे. तेव्हा तुम्ही इथून लांब पळून जा."

कोळ्याचा मुलगा म्हणाला, "एक सांग बघू, ते सर्व राक्षस एकदम आत येतात की, एकेकजण दारातून आत येतो?" राजकन्येनं उत्तर दिलं, "मुख्य दरवाजातून एकेकजण आत येतो आणि सर्वांच्या शेवटी राक्षसांचा सरदार

येतो." कोळ्याचा मुलगा म्हणाला, "मी दाराआड लपून बसतो. ते सर्वजण आत आले की, मी निघून जाईन; तोपर्यंत कुणाला काही बोलू नकोस."

कोळ्याचा मुलगा दाराआड लपून बसला. पहिला राक्षस दारातून आत शिरताच कोळ्याच्या मुलानं त्याला उचललं आणि जमिनीवर आपटून बाहेर फेकून दिलं. अशा तऱ्हेनं त्यानं सर्व राक्षसांना आणि त्यांच्या सरदाराला यमसदनाला धाडले. राजकन्येला मोठा आनंद झाला. आणि तिनं कोळ्याच्या मुलाशी लग्न केलं.

बागेपासून थोड्या अंतरावर एक नदी वहात होती. एके दिवशी राजकन्येनं नदीवर जाऊन स्नान केलं. त्या दिवशी तिनं आपले सोनेरी केस धुतले पण काही केस न्हाताना तुटले. ते केस तिनं एका द्रोणात ठेवले आणि तो द्रोण नदीत सोडून दिला. वहात जाणारा तो द्रोण शिकारीसाठी जंगलात आलेल्या एका राजपुत्राच्या दृष्टीस पडला. कुतूहलानं त्यानं तो द्रोण बाहेर काढला तेव्हा त्यास त्यात सोनेरी केस दिसले. त्यानं ओळखलं की हे केस एखाद्या राजकन्येचेच असले पाहिजेत. म्हणून आपल्या राज्यात परत आल्यावर त्यानं राजाला सांगून टाकलं की, "मी लग्न करीन तर या सोनेरी केसांच्या राजकन्येशीच करीन. तेव्हा राजाने महालातील सर्वांत चाणाक्ष अशा दासींना बोलावून तिला त्या राजकन्येचा शोध लावून घेऊन येण्यास सांगितलं.

दासी मोठी चतुर होती. तिनं विचार केला. हा द्रोण ज्याअर्थी नदीतून आला आहे तेव्हा नदीकाठीच कुठे तरी ती राजकन्या असली पाहिजे. म्हणून तिनं एक नाव घेतली आणि बरोबर काही शिपाई घेऊन ती नावेतून ज्या बाजूस द्रोण वाहत आला होता त्या बाजूला निघाली. जाता जाता एका ओसाड जागी एक मोठा वाडा तिला दिसला. त्या वाड्यातच राजकन्या असली पाहिजे असा विचार करून दासीनं नाव तिथं थांबविली. खाली उतरून तिनं एक नगारा झाडाआड लपवून ठेवला आणि शिपायांना म्हटलं, "तुम्ही इथंच लपून रहा. मी नगारा वाजवताच धावत येऊन राजकन्येला उचलून न्यायचं लक्षात ठेवा." त्यानंतर दासी वाड्यात गेली. तेथे राजकन्येला पाहताच दासीने तिला जवळ

घेतली आणि म्हटलं, “मी तुझी आत्या आहे.” आणि ती दासी तिथंच राहू लागली. थोड्याच दिवसांत राजकन्येचा तिच्यावर पूर्ण विश्वास बसला. कोळ्याच्या मुलालाही वाटलं की, राजकन्या एकटी राहते. तेव्हा आत्येची सोबत तिला मिळाली ते बरंच झालं.

एकदा दासीने गोड बोलून राजकन्येला म्हटलं, “महाराजांचे प्राण कशात आहेत ते विचारून ठेवायला हवं. कधी त्यांच्यावर काही संकट आलं तर आपल्याला कसं कळणार?” राजकन्या तिच्या बोलण्याला फसली. तिनं कोळ्याच्या मुलाला त्याचे प्राण कशात आहेत ते विचारलं. कोळ्याच्या मुलानं थट्टा करण्यासाठी कोपऱ्यातील केरसुणी दाखवीत म्हटलं, “त्या केरसुणीत माझे प्राण आहेत.” राजकन्येने आत्येला सांगितले की, “केरसुणीत महाराजांचे प्राण आहेत.” दासीनं गुपचूप ती केरसुणी जाळून टाकली आणि त्या जागी दुसरी तशीच केरसुणी आणून ठेवली.

संध्याकाळी कोळ्याचा मुलगा परत आला. तेव्हा दासीनं ओळखलं की, त्यानं आपल्याला फसविलं. तिनं पुन्हा गोड गोड बोलून राजकन्येचं मन वळविलं आणि महाराजांचे प्राण कशात आहेत ते विचारून घेण्यास सांगितले. राजकन्या पुन्हा फसली आणि तिनं कोळ्याच्या मुलाला त्याचे प्राण कशात आहेत ते विचारले. यावेळी मात्र कोळ्याच्या मुलानं खरं सांगून टाकलं की, खोलीत जे फूल ठेवलेले आहे त्यात माझा प्राण आहे.”

दुसऱ्या दिवशी कोळ्याचा मुलगा बाहेर जाताच दासीने राजकन्येला विचारलं, तेव्हा राजकन्येने त्याचे प्राण फुलात असल्याचे सांगून टाकले. दासीला काय हेच हवं होतं. तिनं राजकन्येला म्हटलं, “बाळ तू आंघोळीला नदीवर चल, मी पाठोपाठ तुझे कपडे घेऊन येतेच.” राजकन्या रोजच नदीवर स्नानाला जात असे. म्हणून तिला कसलीच शंका आली नाही. ती पुढे गेली. मागून दासीनं ते फूल चुलीत टाकलं आणि नदीकाठी येऊन नगारा वाजविला. त्याबरोबर तेथे लपून बसलेले शिपाई बाहेर पडले आणि दासीच्या इशाऱ्यासरशी राजकन्येला बळजबरीनं नावेत घालून तेथून निघाले. राजकन्येला आता कुठं आपली फसवणूक झाल्याचं समजलं.

इकडे ते फूल आगीत पडताच कोळ्याच्या मुलाच्या अंगाची लाही लाही होऊ लागली आणि खाली कोसळून तो तळमळू लागला. तिकडे त्या तिघा राक्षसांनी फूल कोमेजून चाललेलं पाहिलं आणि आपल्या मित्रावर संकट आल्याचं ओळखून ते ताबडतोब त्याच्या शोधार्थ बाहेर पडले. थोड्याच वेळात ते त्या वाड्यापाशी आले. तिथं त्यांना फूल आगीत पडल्याचं दिसलं. फूल पुरतं जळून गेलं नव्हतं. राक्षसांनी लगेच ते फूल आगीतून बाहेर काढलं आणि गार पाण्यात टाकलं. तिकडे कोळ्याच्या मुलाच्या जिवात जीव आला. त्यानंतर त्या तिघा राक्षसांनी कोळ्याच्या मुलाला शोधून काढलं आणि असं कसं घडलं ते विचारलं. कोळ्याच्या मुलानं घडलेली हकिगत सांगितली आणि मग ते सर्वजण राजकन्येला शोधायला निघाले. तर त्यांना कळलं. की, सोनेरी केसांची राजकन्या सापडली म्हणून त्या राज्यात आनंदी आनंद झालेला होता. सर्वत्र उत्सव साजरा केला जात होता. त्या चौघांनी चार मोठमोठे वृक्ष उपटून घेतले आणि रात्रीच्या वेळी नगरीच्या चार मुख्य प्रवेशदारांवर जाऊन तेथे उभे राहिले. सकाळी लोकांनी त्यांना पाहिलं. तशी घाबरून सर्वांची बोबडीच वळली. राजाच्या कानांवर ही बातमी गेली तेव्हा राजा स्वत : त्यांना पाहण्यासाठी आला. राक्षसांनी दातओठ खात ओरडून राजाला म्हटलं, “राजकन्येला आमच्या हवाली कर नाही तर आमच्याशी गाठ आहे.” राजानं राजपुत्राला बोलावून म्हटलं, “तुला सोनेरी केसांची ती राजकन्या हवी असल्यास, अगोदर या चौघांशी लढाई कर. नाही तर राजकन्या यांना देऊन टाक.” राजपुत्रात त्या चौघांशी लढाई करण्याइतकं धाडस नव्हतं. त्यानं मुकाट्यानं राजकन्येला त्या चौघांच्या स्वाधीन केलं.

कोळ्याचा मुलगा राजकन्येला घेऊन आपल्या वाड्यात परत आला आणि ते तिघे राक्षस मित्राचा निरोप घेऊन पुन्हा त्या धर्मशाळेत येऊन राहू लागले. सगळीकडे मग आनंदी आनंद झाला.

(पुनःकथन - डॉ. सौ. सविता जाजोदिया)

# ५.१३. खुशालीची चिमणी

(तिबेटियन लोककथा)

फार पूर्वीची गोष्ट आहे तिबेटियन देशात एक अत्यंत मागासलेला भूभाग होता. तेथे एकही नदी नव्हती. तेथील जमीन पण सुपीक नव्हती. झाडे, गवत काहीच नव्हते. त्यामुळे लोक गरिबीत आणि उपासमारीत जगत होते. त्यांनी खुशाली कधी पाहिली नव्हती. तरी पण त्यांचा विश्वास होता की जगात कुठेतरी खुशाली राहत असावी. तेथील लोकांनी हे ऐकलं होतं की खुशाली एक अत्यंत सुंदर, चिमणी आहे. आणि ती बर्फाळ पर्वतावर पूर्वेकडे रहाते. ती चिमणी ज्या भूप्रदेशावर उडत जाते तेथे खुशाली नांदते. दरवर्षी तेथील लोक त्या चिमणीच्या शोधात जात असत. पण ते तेथून परत येत नसत. काही वृद्धांचे असेही म्हणणे होते की त्या चिमणींचे रक्षण वृद्ध राक्षस करतात आणि तेच चिमणीच्या शोधात आलेल्या लोकांना मारून टाकतात.

एका वर्षी लोकांनी एका हुशार आणि शूर तरुणास त्या चिमणीचा शोध घेण्यास पाठविले. गावातील स्त्रियांनी अत्यंत आदराने त्याला निरोप दिला. तो तरुण पूर्वेकडे निघाला. रस्त्यात त्याला एक मोठा पर्वत दिसला. त्यावरील बर्फ चांदीप्रमाणे चमकत होता. त्या तरुणाला पहाताच एक राक्षस पुढे आला आणि त्याने कावळ्यासारख्या आवाजात त्याला विचारले “तू कोण आहेस? आणि येथे येण्याची तुला हिम्मत कशी झाली?”

“मी खुशाली चिमणीच्या दर्शनाला आलो आहे.” राक्षस हसत म्हणाला, “अजून अंड्याएवढा पण झाला नाहीस. आणि इथे येण्याची हिम्मत केलीस. जर तुला खुशाली चिमणीचा शोध घ्यायचा असेल तर आधी लुओसांभच्या आईला मारून टाक. नाही तर मी तुला शिक्षा देईन. मी तुझ्यासारख्या मुग्यांना मारत नाही. पण तुला नऊशे मैल दूर पहाडावर फेकून देईन.

त्या तरुणाने न घाबरता उत्तर दिले, “मी माझ्या आईवर प्रेम करतो म्हणून

कोणच्याही आईला मारणार नाही. तुम्हाला जी शिक्षा करावयाची असेल खुशाल करू शकता." तो राक्षस चिडला आणि त्याने पुढचा नऊशे मैलाचा रस्ता काटेरी दगडांनी भरून टाकला. तो तरूण तरी चालत पुढे जात होता. त्याची पादत्राणे तुटली, पायाला खरचटले पण त्याने माघार घेतली नाही. त्याला कारण माहित होते की तो खुशाली घेवून येईल ही अशा बाळगून लोकं वाट पहात असतील.

आता त्याला दुसरा राक्षस भेटला. तो म्हणाला, "जर तुला खुशालीच्या चिमणीला पहावयाचे असेल तर आधी म्हाताऱ्या सिलांगला मारून टाक नाहीतर मी तुला उपाशी मारीन." आणि त्याने त्या तरूणाची खाद्य सामुग्री असलेली मोठी पिशवी फेकून दिली. तसेच नदी व तेथील भूभाग वाळवंटात बदलून टाकला जेणे करून तो तरूण उपाशी मरेल.

तरी तो धैर्य ठेवून पुढे चालत राहिला. पुढील नऊशे मैल जाता जाता तो अगदी अस्थिपंजर झाला. तेवढ्यात त्याला तिसरा राक्षस भेटला, तो म्हणाला, "जर तुला खुशालीच्या चिमणीला पहावयाचे असेल तर बैमा नावाच्या त्या मुलीचे डोळे काढून आण. नाही तर मी तुझे डोळे काढून टाकीन."

परंतु तो तरूण आत्मविश्वासाने म्हणाला, "कोणीही कोणत्याही मुलीचे डोळे काढत नाही." हे ऐकताच राक्षस चिडला आणि त्याने त्याचे डोळे काढले. त्यामुळे तो आंधळा झाला. त्याने विचार केला आता सगळे अडथळे दूर झाले आहेत. मला उगवत्या सूर्याच्या दिशेकडे निघायला हवं. आणि तो चालत गेला नऊशे मैल गेल्यावर त्याला बर्फाने आच्छादित पर्वत दिसला. त्यावर खुशालीची चिमणी चिव चिव करीत होती. ती त्या तरुणास म्हणाली, "तू माझ्याकरिता किती त्रास सहन केला आहेस." तेव्हा तो म्हणाला, "हो, हे लाडके चिमणे, माझ्या गावाकडील लोक तुझे दर्शन करू इच्छितात. तुझ्याकरिता व्याकूळ झाले आहेत. तेव्हा तू माझ्याबरोबर चल."

खुशालीच्या चिमणीने आपले पंख फडकाविले. लागलीच त्या तरुणाची दृष्टी परत मिळाली. त्याचे घाव पण भरले गेले. तो पूर्वीपेक्षाही धष्ट पुष्ट झाला. त्या

चिमणीने त्याला चांगले जेवण दिले आणि त्याच्या गावाकडे निघाली.

गावाजवळ आल्यावर तिने विचारले, “सांग तुझी माझ्यापासून काय अपेक्षा आहे?” तो म्हणाला, “आम्हास आमच्या परिसरात खुशाली हवी आहे. जंगल, विविध प्रकारची व रंगाची फुले, सुपीक जमीन, आणि नद्या हव्या आहेत.” चिमणीने तीनदा चिवचिव केले. प्रथम चिवचिव करताच आकाशातून पाऊस पडू लागला. दुसऱ्यांदा चिवचिव करताच परिसर हिरवागार झाला. विविध पक्षी कलरव करू लागले. तिसऱ्यांदा चिवचिव करताच नद्या वाहू लागल्या. जमीन सुपीक झाली. हिरवळीवर ससे नाचू बागडू लागले.

अशा प्रकारे एका तरुणाच्या कष्टाने व मेहनतीने खुशालीच्या चिमणीचा शोध लागला आणि सर्व लोकांचे जीवन सुखी व समृद्धी झाले.

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ५.१४. यामाटाचे आवाळू

(जपानी लोककथा)

यामाटा हा एक लाकुडतोड्या होता. बिचाऱ्याकडे पाहिलं की कीवच यायची! कारण गरिबी, म्हणून कपडे भिकारडे असत. खायला प्यायला पोटभर नाही म्हणून चेहराही सुकलेल्या खारकेसारखा दिसे. अन् भरीत भर म्हणून त्याच्या डाव्या गालावर एक मोठे आवाळू होते, ते तर यामाटाला मुळीच आवडत नसे; पण त्यानं कित्ती मलमे चोपडली, औषधे चोळली, खूप पैसे खर्चून ते आवाळू जावं म्हणून चेटूकदेखील केलं, पण व्यर्थ. ते दुष्ट आवाळू त्याच्या गालावर ऐटीत उंचावर बसले होते ते मुळीच कमी झाले नाही. ही जन्माची पीडा झाली अन् हे ओझे मरेपर्यंत वाहावे लागणार हे यामाटाला समजून चुकले. बिचारा आणखी खिन्न दिसे.

पावसाळ्याचे दिवस होते ते. एक दिवस उघडीप बघून यामाटा लाकूड जमा करायला रानात गेला. मोळी बांधून परत निघणार तोच सरसरून पाऊस आला. खूप मुसळधार पाऊस पडू लागला. जोराच्या वाऱ्याने झाडे गदगद हलू डोलू लागली. काही तर उन्मळून पडली देखील ! बिचारा यामाटा घाबरून एका उंच झाडावर चढला व दाट फांद्यांच्या गर्दीत, त्या झाडाला एक मोठा खड्डा पडल्यासारखा झाला होता त्या ढोलीत शिरून अंग चोरून बसून राहिला.

त्याला अतिश्रमाने ग्लानी आली असावी. तो किती वेळ बसला होता, कुणाला माहीत ! पण त्याने डोळे उघडले तो झाडाच्या फटीफटीतून चांदण्यांचे कवडसे ओल्या जमिनीवर चकाकत होते. अन् आकाश तर अगदी स्वच्छ निळे दिसत होते. पाऊस थांबून पुष्कळ वेळ झाला होता असे दिसत होते.

तो उठून घरी जाणार तोच कुणाचा तरी शब्द त्याने ऐकला. दचकून, भिऊन त्याने परत झाडांच्या फांद्यात तोंड लपवून घेतले ! चोर तर नसतील ना ? का भूतबीत असेल ? पण छे ! चोर नव्हते ते ! शंभर एक अगदी वेगळी माणसे किंवा

यक्ष लोक होते ते ! कुणी राक्षसासारखे प्रचंड दिसत, कुणी अगदी हातभरच उंच होते, कुणाचे डोके बेडकासारखे तर एकाचे डोळे बरोबर घुबडाप्रमाणे होते. हत्तीसारखे लांब नाक असणाराही एक यक्ष होता !! सगळ्यांच्या अंगावर कातड्याचे कपडे होते. दाणदाण पावले टाकीत ते विचित्र लोक, यामाटा बसला होता त्याच झाडाखाली येऊन बसले !

बिचारा यामाटा, भीतीने त्याचा जीव एवढासा झाला ! जर या लोकांनी आपल्याला पाहिले तर आपला निकालच लागला ! पुन्हा आपली बायकापोरे कुठून पाहाणार आपण ? मोठ्याने श्वास घ्यायचेही त्याला भय वाटू लागले. पण त्या यक्षांचे तिकडे मुळीच लक्ष नव्हते ! ते खातपीत बसले होते. फळांचे ढीग पडले होते. मधे मधाचे द्रोणही होते. गंमत अशी की, 'आंबा' म्हणून एखादा यक्ष म्हणाला की टोपलीतून एक आंबा झपकन्, आपोआप उडून त्याच्या तोंडाशी जाई ! यामाटाला हे पाहता पहाता गंमत वाटू लागली ! खाणे झाल्यावर गप्पागोष्टी झाल्या, त्याही ऐकल्या त्याने. हळूहळू तो रंगून जाऊन ऐकत राहिला, त्या नादात भय पार विसरून गेला अन् मोठ्याने हसला देखील. पण नशिबाने त्या यक्षाचे लक्ष तिकडे गेले नाही एवढेच.

मग गाऊ लागले ते यक्ष. यक्षकिन्ननर लोकांचे संगीत किती वेगळे, किती मधुर ! यामाटाने इतके गोड गायन जन्मात ऐकले नव्हते. त्यालाही गायनाचा नाद होता. अन् तरुणपणात तो उत्कृष्ट नृत्य देखील करीत असे. यक्षलोक आता फेर धरून नाचत होते. ते मात्र त्याला आवडले नाही, कारण त्याचं नृत्य त्याच्याहून कितीतरी उत्तम ठरण्यासारखं होतं. एक यक्ष म्हणाला 'आता कुणीतरी नवीन तऱ्हेचा नाच करावा.'

पण कुणी पुढे येईना. यामाटा भान विसरलाच अगदी. टुणकन् त्यानं मऊ गवतावर उडी घेतली व काय गंमत, एकदम नृत्याला सुरुवात केली. आहो ! काय नाजूक पावले पडू लागली त्याची. अन् त्याला हवे होते तेच सूर, तोच ठेका वाद्यातून आपोआप निघू लागला ! तो अगदी तल्लीन होऊन नाचू लागला. स्वतःलाही विसरून गेला होता तो यावेळी.

नृत्य संपले. टाळ्या कड्कड्कड् वाजू लागल्या, अन् एकदम यामाटाच्या

लक्षात आलं की, आपणाभोवती यक्ष आहेत- माणसं नाहीत ! तरीपण तो घाबरला नाही. कारण ते सारे यक्ष त्याच्याकडे कौतुकाने पाहून हसत होते, त्यांतल्या मुख्याकडे पहात तो भीत भीत म्हणाला, 'मी तुम्हाला न विचारता मध्येच येऊन नृत्य केले.... मला माफ करा.'

मुख्य यक्षाचा चेहरा चांदीप्रमाणे पांढरा, चकचकीत होता. तो हसून म्हणाला - 'माफी कशाबद्दल ? तू इतके सुंदर नृत्य केलेस की खूष झालो आहोत आम्ही. फारच छान. उद्याही तू रात्री आमच्या बैठकीला ये. '

'येईन.' यामाटा म्हणाला.

'तर मग खूण म्हणून काही आम्हाला देऊन जा. म्हणजे उद्या येशील.'

'काय देऊ ? मी तर फार गरीब आहे.'

'गरीब आहे असे म्हणू नकोस. तुझ्या परसात खणून पहा, मोहरांचा तांब्या मिळेल तुला? यक्षांची भेट वाया जात नाही !'

एक यक्ष म्हणाला - 'हा परत येऊन नाच करील असे महत्त्वाचे काही तरी ठेवून घेऊ आपण. ओहो ! याला एक छानसे आवाळू आहे ! आवाळू म्हणजे आपण किती शुभचिन्ह मानता ! तेच ठेवून घेऊ या ! ' अन् मग त्याने यामाटाच्या गालावरून हात फिरवून अलगत आवाळू काढून घेतले, जणू टोपलीतून एक लिंबू उचलून घ्यावे तसे, मजेने ! किती गाल गुळगुळीत झाला होता आता यामाटाचा ! गालावरून पुन्हा पुन्हा हात फिरवीत ते व्दाड आवाळू खरंच गेलं ना? याची पुन्हा पुन्हा खात्री करून घेत यामाटा घरी आला. त्याच्या बायकोने तर त्याला आधी ओळखलंसुद्धा नाही, इतका तो झकास दिसत होता. सगळी हकिगत ऐकताच किती आनंद झाला तिला !

पलीकडच्या घरातून यामाटाचा शेजारी हिमा सगळे ऐकत होता. त्याच्याही गालावर एक आवाळू होते. 'मला नाचायला नीट येत नाही... पण भुताखेतांना खूष करण्यापुरते येते. 'भुतांना माणसाएवढा रसिकपणा व बुद्धी नसते काही' तो मनात म्हणाला अन् त्याच रात्री तो अरण्यात त्या झाडाखाली आला. यामाटाचे आवाळू उजव्या गालावर होते तर याचे डाव्या गालावर ! पण तसेच व तेवढेच. ते चाचपीत तो यक्ष बसले होते; तो तेथे येऊन उभा राहिला.

यक्ष लोक वाट पहात होते यामाटाची. शेजारी हिमा याने वंदन केले. 'कालचा माणूस तूच काय ? पुन्हा तुला आवाळू कसे आले?' यक्षाने विचारल्यावर हिमा म्हणाला -'हे कालच्याहून उत्तम आवाळू आहे माझं ! मी हे नेहमी बरोबर वागवतो.'

'ठीक, कालच्यासारखे सुंदर नृत्य कर पुन्हा एकदा. आम्ही त्यासाठी मुद्दाम जमून वाट पहातो आहोत. किती छान नाच तुझा!'

हिमाच्या छातीत जणू फुजियामाचा ज्वालामुखीच पेटला. पोटात धस्स झाले भीतीने. उगीच इथे आलो असे त्याला वाटले. कारण त्याला नाच येतच नव्हता मुळी, तरीपण त्याने प्रयत्न केला. पण नाचाऐवजी वेड्या वाकड्या उड्या, चमत्कारिक गिरक्या अन् पंखा हाता हातात हलवणे. त्या नाचाची वाईट दशा झाली अगदी. 'ह्याला आज झाले काय ! हा कसला नाच माकडाप्रमाणे करतोय् ,हा मूर्ख माणूस ?' ते ओरडले, चांदीचा चेहरेवाला ओरडून म्हणाला, 'बस्स पुरे झाला तुझा हा गाढवपणा. पहावत देखील नाही आम्हाला हा नाच ! मला नाही वाटत कालचा सुंदर नृत्य करणारा माणूस तूच आहेस म्हणून, पण तू म्हणतोस मीच तो. ठीक. आम्हाला नाच नको म्हणून तुझं हे आवाळू आम्ही परत करतो!'

लिंबाप्रमाणे त्याने आवाळू हवेत फेकले ! आणि अरेरे ! ते नेमके हिमाच्या उजव्या गालावर आदळले अन् तिथेच चिटकून बसले ! एका गालाऐवजी बापड्याच्या दोन्ही गालांवर दोन घाणेरडी आवाळू दिसू लागली ! तो भुतांची क्षमा मागणार तो ते सगळेच्या सगळे दिसेनासे झाले होते!

दोन्ही बाजूंची आवाळू रागाने ओढीत पश्चात्तापाने रडत तो घरी आला. कोणताही वैद्य ते नवे चिकटलेले आवाळूचे लचांड दूर करू शकत नाही अजून. यामाटा मात्र मोहरांचा तांब्या मिळाल्याने खाऊन पिऊन सुखात आहे अन् त्याचा चेहरा खारकेप्रमाणे सुकट न दिसता रसरशीत सफरचंदासारखा दिसतो आता!

(मालती दांडेकर : अतिपूर्वेच्या परीकथा (जपान))

# ५.१५. परीची देणगी

(जपानची लोककथा)

बराच वेळ रानात शोधाशोध करून मिगीने एक लाकडाची लहानशी मोळी तयार केली व तो घराकडे निघाला. त्याचे वृद्ध व अशक्त आईबाप घरी होते, लाकडे घरी पोचतील तेव्हा कुठे म्हातारी आई उठून सैपाक करणार ! कारण घरात सर्पण मुळीच उरले नाही, त्याला ठाऊकच होते.

त्याने आकाशाकडे पाहिले. सूर्य अस्ताला निघाला होता. 'अरे, संध्याकाळ होत आली, मला या लाकूडफाटा जमवण्याच्या नादात वेळेचं भानच राहिलं नाही की !' तो मनाशी पुटपुटला, मग लाकडाची गठडी पाठीवर व कुऱ्हाड खांद्यावर टाकून निघालाच तो.

असे हे गारठ्याचे दिवस, पहाल तेथे बर्फ साचलेलं. रानात काही ठिकाणी तर जमिनीवर बर्फाची जणू दाट साय धरलेली होती. त्यातून मनात असलं तरी झपाझप चालणं सोपं थोडंच ? थंडीने अंग शहारत होतेच. पायात चामड्याचे जोडे होते, ते पावलोपावली बर्फात रुतत होते. मनात मिगी विचार करीत होता, आता जलद घरी पोचल्याबरोबर चहा घ्यायचा कढत कढत अन् मग या ढलप्यांपैकी काहींची शेकोटी करून बाबा न् मी शेकत बसू जरा, तेव्हा ऊब येईल !

पहाल तिकडे जणू हिमसागर ! कठीण, सफेत घट्ट बर्फावर मावळतीचे किरण पडून बर्फ चमकत होते. या सायंकाळच्या उजेडात त्याला समोर काहीतरी हालचाल होते आहे असा भास झाला. मिगीचे डोळे लहानसे पण नजर मोठी तीव्र होती. काय आहे? बर्फाचाच एक वेडावाकडा तुकडा उठून हलतो आहे की आपल्याला हा सारा भासच झाला ?

पण छे ! तो भास नव्हता. खरेच समोर झाडाखाली पांढऱ्या बर्फावर पांढरी वस्तू हालचाल करीत होती ! काय आहे ते ? प्राणी ? की बर्फात चुकून

सापडलेला माणूस ? की सफेत कपड्यातले तान्हे आहे कुणाचे? पाहिले पाहिजे जवळ जाऊन. ते कोण बर्फात रुतून बसल्याप्रमाणे दिसतेय? त्याला माझ्या मदतीची जरुरी असेल कदाचित. तो वाकडी वाट करून तेथे गेलाच अखेरीस; उशीर होतोय घरी पोचायला खरा, पण होऊ दे ! हा प्राणी कोण अडकला आहे बर्फात ते पाहूनच जाणे बरे,नाहीतर उगीच मनाला रुखरुख लागायची ! असा विचार करीत तो तेथे पोचला. पहातो तो एक मोठा अतिशुभ्र बगळा वेडावाकडा बर्फावर पडलेला व वेदनेने लांब मान इकडून तिकडे फिरवतो आहे बिचारा ! याला असे काय झाले ! पक्षाची जात खरं म्हणजे आकाशात तरंगणारी, जमिनीवर आलेच तर थोडा वेळ; पण ते असे पडलेले नसतात वेडेवाकडे !

तो पक्ष्याजवळ बसला, पंखाला हात लावणार तोच पक्ष्याने वेदनेचा स्वर काढला व आपली भली मोठी चोच एका पंखाकडे रोखून धरली. जणू तो शहाणा पक्षी आपल्या वेदनेचे कारणच सुचवीत होता ! मिगीने निरखून पाहिले. तर एक अतिशय तीक्ष्ण लाकडी बाण त्याच्या एका पंखात घुसून त्या बाणाचे बारीक अग्र जमिनीतल्या बर्फात रुतलेले दिसत होते. जणू एखादा खिळा ठोकून कुणीतरी त्या बापड्या बगळ्याला तेथे जमिनीशी खिळून टाकले होते ! मिगीचा स्वभाव आधीच कनवाळू, त्यात त्याला पक्ष्यांबद्दल तर विशेषच ओढ व माया वाटे. त्याने खांद्यावरची कुऱ्हाड हाती घेतली तशी बगळा अगदी कासाविशीने ओरडला- दयाळू मिगीला हसू आले. तो उद्गारला-

'मित्रा, अरे भितोस काय एवढा ? कुऱ्हाड काही तुला ठार करायला काढली नाहीये मी ! मी आता तुझा तो बाण तोडून काढून तुला मोकळे करतो ! तू बिलकूल हलू नकोस बरं का. बाण घुसलेला आहे पंखात, तो उपसून काढताना तुला थोडसं दुखेल. पण ते सोसायचं तेवढं ! कसं? '

बगळ्याने दोनदा मान उचलून भुईवर टेकवली व तो निपचित पडून राह्यला. जणू त्याला मिगीचे बोलणे समजलेच ! मिगीने जमिनीत रुतलेल्या बाणाच्या भोवतीचे बर्फ कुऱ्हाडीने बाजूला केले व ते टोकदार अग्र हलकेच त्याच्या

पंखातून काढून टाकले, मग उरलेला बाण उपसून काढायला त्रास कितीसा ? थोडक्याच वेळात मिगीने त्याला थोपटले व म्हटले -

'छान ! तुझ्या पंखातला बाण निघाला हं मित्रा !' हे ऐकताच बगळ्याने आखडून पडलेले शरीर सावरले. तो उठून उभा राहिला. मग तीन वेळा त्याने भुईला डोके चिकटवून जणू त्याला वंदन केले आणि पंख झाडून त्याने उंच भरारी घेतली पहाता पहाता निळ्या आकाशात तो दिसेनासा झाला. बगळा किती समजूतदार, त्याने मला त्रिवार वंदनही केले. झकास ! ' तो मनाशी म्हणाला व चालू लागला. घरी आल्याबरोबर त्याने शेकोटी पेटवली व त्या शेकोटीशी शेकत असताना ती बगळ्याची भेट त्याने आई-वडिलांना सांगितली. त्याने जेव्हा अंथरुणावर अंग टाकले तेव्हा झोपेतही त्याला एक अतिशुभ्र बगळा दिसत होता काही वेळ !

*

उन्हाळ्याचे दिवस आले. वसंतऋतूची उष्ण पण बहारदार पावले धरतीवर उमटू लागली. जिथे तिथे साचलेले हट्टी बर्फ उन्हाच्या माऱ्याने वितळू लागले व त्याचे पाणी पाणी होऊन ते वाहून गेले! हा फुलांचा मौसम! रंगीबेरंगी वसंत फुले त्या मोडक्या तोडक्या झोपड्यांभोवतीही उमलून दिमाख दाखवू लागली. अशा वेळी एक अतिशय सुंदर मुलगी त्या फुलाइतकीच प्रसन्न दिसणारी त्या झोपडीच्या दारात येऊन उभी राहिलेली मिगीने पाहिली. जणू लाल जांभळ्या - पिवळ्या फुलातच हे मोठेसे एक फूल उमललेले होते !

तसे तिचे कपडे उंची, श्रीमंती नव्हते. एक साधासा किमोनो (सैल हातांचा झगा) त्यावर कमरलेला बांधलेली व पाठीमागे सुंदर नक्षीदार घडी दिसणारी एक 'ओबी' उर्फ शेल्यासारखे वस्त्र, बस. जपानी पद्धतीने तिने केस मस्तकावर मधोमध बांधले होते व त्यात झुलत्या मण्यांची छोटी फुलपाखरे व चकाकणाऱ्या चिमुकल्या फण्या होत्या. त्यामुळे तर ती फारच मनोहर दिसत होती.

मिगी पहातच राहिला. त्याच्या पहाण्यात आजवर इतकी देखणी मुलगी आलेलीच नव्हती ! त्याची वृद्ध आईही दारात येऊन कोण आलं आहे हे पाहू

लागली, तेव्हा तरुणी म्हणाली -

"मावशी, मी एक अनाथ मुलगी आहे, आईबाप नाहीत, पण इकडे कुठे जपानात माझे एक दूरच्या नात्याचे काका राहातात म्हणे, त्यांचा शोध घेत मी हिंडते आहे. तर आज वाट चुकली रानात ! मला आजची रात्र येथे आसरा मिळेल का ? सकाळी उठून मी परत शोधाला जाईन.'

'तुमचे काका कुठे राहातात ? '

'इकडेच कुठे ! नक्की पत्ता ठाऊक नाही. आम्ही अति गरीब, त्यांनी कधी आमची चौकशीसुद्धा केली नाही, की भेटलेलेही नाहीत येऊन. बडे शेतकरी गरीब दुबळ्या भावांशी जगात असेच वागत असतात की काय, देव जाणे !'

मिगी म्हणाला-' त्यांचं नाव काय ? इकडचे सगळे शेतकरी माझ्या माहितीचे आहेत, मी शोध काढीन उद्या.'

'त्यांचं नाव योशिदा.'

'ठीक. मी पाहतो उद्या.' मिगी म्हणाला. पण त्याला पक्के आठवत होते की, या नावाचा एकही शेतकरी पंचक्रोशीत कोणी नाही ! त्याची आई म्हणाली,

'बरं, तुझं नाव काय पोरी ?'

'शिझू ! '

'शिझूसान तुम्ही चला आत, या गरीब झोपडीत तुम्ही निश्चिंतपणे राहावे. त्याचे वडील दारात आले होते, त्यांनी सांगितले व शिझूसान' (शिझूताई)आत आली. मुलगी चालून चालून दमलेली, तिला त्याच्या आईने सॉय नावाचे पेय दिले व मग चहा व काही खाद्यपदार्थही दिले. शिझू हसली, ती थकली होती. तिला झोपडीतली एक लहानशी खोली त्यांनी दिली. चटईवर पडताच ती झोपी गेली !

दुसरे दिवशी सकाळी झटपट उठून शिझूने बागेतल्या रंगीबेरंगी फुलांचे गुच्छ केले व घरात जिकडे तिकडे अडकवले, मग चटकन नाश्त्याची तयारी केली. मोठी चपळ हंसतमुख पोरगी. मिगीला तर ती इतकी आवडली होती की तिचा तो बेपर्वा काका सापडूच नये व ती आपल्या घरीच राहावी असंही त्याला वाटू

लागलं ! नाहीतरी ज्याने जन्मभर दरिद्री भावाची चौकशीही केली नाही, तो या अनाथ पुतणीला तरी थारा देईल हे कशावरून ? श्रीमंती माणसाला नातीगोती विसरायला लावते म्हणतातच मुळी.

सकाळी शिझू म्हणाली - 'आपण मदत करता ? काकांचा शोध घ्यायला मी निघू आता ? '

आई म्हणाली - 'आमचा मिगी आज दूरवर जाऊन शोध घेईल त्यांचा. तू कुठे रानावनात एकटी भटकंती करशील ? तो पत्ता लावील काकांचा व मग तुला नेईल. खरं सांगू कां ? तुझे ते काका सापडले नाहीत तर फार बरं ! '

'अं ? म्हणजे ? '

'म्हणजे असं की आम्हीच तुझे काका-काकू आहेत असं समजून तू आमच्याच घरी राहावंस असं फार वाटतं. पोरी, आम्हाला तू फार आवडली आहेस गं.'

शिझू हसली, मिगीही हसला व म्हणाला -

'दोन तीन दिवस तरी थांबा, तोवर शोध घेतो मी, तुमच्या काकांचा. आई म्हणते ते खरंच तुम्ही कुठे व किती म्हणून पायपीट कराल ? दमून जाल ! राहा तोवर इथेच. ' ती 'बरे तर ! ' म्हणाली. मिगी शोधायला बाहेर पडला.

*

शिझूला सगळंच काम येत होतं घरातलं, ती म्हातारीला मदत म्हणून घरातली कामं करू लागली. तिने ते झोपडे स्वच्छ करून सामानसुमान नीट लावले, स्वैयंपाकाचे गरीबीचेच पण छान पदार्थ बनवले व म्हाताऱ्याला बांबूची चटई विणायला मदत केली. 'किती गुणांची आहे बापडी !' आम्हाला मुलगी नाही, तर ही मुलीसारखीच मला वाटते आहे ! फिरुन किती नम्र आहे, बोलणं किती गोड,मंजुळ ! ही आली अन् घरात जणू सूर्यप्रकाशच आलाय् असं वाटतं.'इथेच का ही राहीना ' त्याची आई वरचेवर म्हणत होती मनात ! अन् तसेच झाले. योशिदा नावाचा कुणीही बडा -छोटा शेतकरी त्या साऱ्या आसपासच्या खेड्यातून नव्हताच मुळी. मग मिगीने कितीही शोध शोध

शोधले,तरी पत्ता कुठला लागतो ? तीन दिवसांनी तसे त्याने घरी येऊन सांगितले. तशी ती खाली मान घालून उद्गारली,

‘तुम्हाला फार तसदी पडली. मला वाईट वाटतं त्याचं. काका सापडले नाहीत तेव्हा परत मी आमच्या खेड्यात जाऊन काही कामधंदा बघते. येऊ मी मावशी ? ’

'ये, पण घरात ! बाहेर कशाला कामधंदा बघतेस पोरी ? अगं तू तरुण पोरगी, इतकी रूपवान अन् एकटी राहणार ? ते बरं नसतं. तू इथेच राहा. आम्हाला मुलगी नव्हती, ती तुझ्या रूपानं घरी आली असं समजू आम्ही!’ म्हातारी प्रेमाने म्हणाली.

म्हातारा म्हणाला- 'आम्ही अगदी गरीब आहोत, पण जी काय ओली कोरडी भाकरी मिळते त्यातलीच अर्धी तुला देऊ बाळ ! रहा’ तिने मिगीकडे पाहिले, त्याचा चेहरा हर्षित दिसत होता. त्यालाही जणू अगदी हेच म्हणायचे होते ! तो हसला तशी प्रसन्नपणे हलकेच ती म्हणाली,

'ठीक आहे, मावशी मी इथे तुमच्या आसऱ्याला राहीन! अन् मग ती तेथे राहिली. तिने जपानी तऱ्हेतऱ्हेचे पंखे करायला सुरुवात केली, बांबूच्या पट्टयांच्या सुंदर करंड्या, टोपल्या व छोटी बसायची आसने विणली, त्यात तिने इतके रंगीत नक्षीचे फुलवेलींचे आकार गुंफले की, त्या साऱ्या वस्तू फारच देखण्या दिसू लागल्या. ती म्हणाली -

'काका, या वस्तू बाजारात विकायला पाठवा. खूप किंमत येईल आपल्याला ह्यांची. मग तुम्हाला चांगली पांघरुणे घेऊ. थंडी फार असते तेव्हा होतील !’

मिगीने ओळखले, ती आपल्या घरात बोजा होऊन राहणारी नाही, घरच्या गरिबीची तिला जाण आहे व मी एकटा राबून पैसे मिळवणारा आहे या घरी, हे जाणून तीही आर्थिक साहाय्य देते आहे शिझू ! बायको असावी तर अशी. ती आल्यापासून घर, बाग किती निर्मळ,नितळ दिसते. रंगीत फुलांचा मौसम हळूहळू हटला. पावसाळा मागे सरकला व हिवाळ्याचे कडक रूप प्रकट झाले. इतके बर्फ पडले की सगळी शेतातली उभी पिके गारठून थिजली व फार नासाडी

झाली शेताची त्यावर्षी. मिगीचे काळजीचे शब्द आले-'बाबा! यंदा आपल्या छोट्या शेतातले कुठलेही पीक हाती आले नाही. आपल्याला यंदा घरांत मासे व इतर धान्यं घ्यायला अजिबातच पैसे राहाणार नाहीत. काय करावे ? ' ते दोघेही काही बोलले नाहीत. खूप म्हातारी माणसं, त्यांच्याने श्रमही होत नव्हते आता. म्हातारी सैंपाकघर अन् म्हातारा बाग कसेबसे संभाळीत, पण त्याने मदत कितीशी होणार ? तेही चिंतेत बुडाले होते. मग शिझूसान म्हणाली -

'काका, मी आहे ना मदतीला मिगीच्या ? काळजी नका करू. मला सुरेख कापड विणता येते. मी विणीन, नक्षीदार कापड थोडं फार , त्याला चांगली किंमत येईल, बघा हवं तर.'

'ठीक ठीक सान. तुम्हाला काय सामान लागेल ? रेशीम, माग, सुया ? सांगा मी देतो आणून.' मिगी तत्परतेने म्हणाला.

ती हसली न् म्हणाली -

'ते सारं माझ्याजवळ आहे. छोटासा मागसुद्धा ! पण अट एकच. मी माझ्या खोलीत दार लावून बसेन, पुरे दोन दिवस ! मागाशी बसल्यावर मला मधे उठता येणार नाही - तुम्ही कोणी दार उघडायचं नाही मधे. '

'पोरी पण जेवण कसं देणार आम्ही मग ? का दोन दिवस उपासच ? '

'का ? रात्री तुम्ही कटोराभर भात, आणि तळलेला लहानसा मासा खोलीच्या दारात ठेवून द्या झाकून. मध्यरात्री जमेल तेव्हा खाईन की.'

'ठीक, तसं करेन.'

'परत सांगते एकदा, कृपा करून मधे दार उघडू नका कोणी. मधे वस्त्र तुटलं तर तसंच राहील म्हणून विनंती -'

'ठीक ! शप्पथ, मधे नाही दार उघडणार बाळे कुणी -' म्हातारी म्हणाली व चार दिवसांनी शिझू खोली बंद करून विणायला बसली. दोन दिवस ते दार घट्ट बंद होते, पण अन्नाच्या कटोऱ्या सकाळी रिकाम्या असायच्या. मिगीला तिची इतकी सवय आता झाली होती की कधी दोन दिवस संपतील व कधी आपण तिच्याशी बोलू असं झालं होतं ! उघडून पाहू का हळूच दार ? सतरांदा मनात

विचार येत होता पण त्याने फार मन आवरले. अन् मग दोन दिवसांनी शिझू बाहेर आली तेव्हा तिच्या हातात उंची दोन रेशमी शाली होत्या. त्यावर जरीच्या सोनेरी तारांची नक्षी होती; रंग सुंदर होता, नक्षी तर अप्रतिम होती ! त्या शाली श्रीमंतांच्या घरात शोभणाऱ्या अशा उच्च दर्जाच्या मौल्यवान दिसत होत्या ! आणि खरेच, त्यांची किंमत खूपच आली बाजारात. मग त्यांनी पावसाळ्यासाठी काही धान्यधुन्य घेऊन ठेवले व अंगभर पाघरुणं घेतली सगळ्यांनाच.

जेमतेम काही दिवस ठीक गेले. मिगी सारा दिवस शेतात मेहनत करी. येतांना जळणासाठी लाकडं आणत असे. त्याला दिवसभर राबण्याचा कंटाळा नव्हता, पण सायंकाळी तो थकून जाई, आणि काय नवल ? शिझूचा प्रसन्न चेहरा, तिनं बनवलेलं साधंसुधं अन्न, तिनं घरात विणलेल्या मऊ चटया, सगळं पाहून तो ते सारे श्रम पार विसरून जाई ! शिझुशीच लग्न करावे असेही त्याच्या मनात येऊ लागले. संसाराला ही किती योग्य जोडीदारीण आहे ? फिरुन रूपसुंदर, गुणी, विनम्र ! तो तिच्याकडे टक लावून पाहात राही, तिला ते समजायचं व चटकन ती तेथून निघूनच जायची. विचारू का हिला लग्नाचं मी ? पण ती अशी राजे रजवाड्याच्या घरात सहज शोभेल, इतकी सुस्वरूप, अन् मी? एक श्रमिक शेतकरी, अगदी दरिद्री, केवळ लाकूडतोड्या. घरात तांदूळ आहेत तर चहा नसणार ! तळहाताएवढं शेत अन् वितभर घर माझं. ती मला 'हो' म्हणणार नाही. दरिद्री तरुणाला अप्सरेसारखी बायको कुठली मिळणार ? विचारूच नये हे चांगलं, नाहीतर रागाहून निघून जाईल घरातून, नकोच ते.

विचाराने मनात काहूर माजे; पण तो कमी बोलणारा होता, त्याने हे सारं कधी तिला बोलून दाखवलं नाही. परत एकदा वसंतऋतू फुलला व परतला- पण यंदा पाऊसही रुसला होता जसा. तो वेळेवारी पडला नाही. दुष्काळाची चिन्हे दिसू लागली. सगळ्या शेतकऱ्यांत काळजीचे वातावरण दिसू लागले. पाऊस नाही, मग फळे, फुले, कुठले पीक पाणी तरी कशाचे ? तिच्या कापडाचे पैसे व मिगीने पोटाला चिमटा घेऊन मागे टाकलेली थोडीशी शिल्लक; उन्हाळ्यात बर्फ वितळावे तशी कुठे न केव्हा कशी हरवली कोण जाणे. या वर्षी या दुष्काळाला

तोंड कसे द्यावे ? या विचारात मिगी चिंताक्रांत होऊन बसला होता.

हलकेच गोड शब्द त्याने ऐकले -

'मिगी, तुम्हाला एक विनंती -'

'कोणती शिझूसान ? बोला ना, घरच्यानाच तुम्ही विनंती करता कशाला ? '

'तसं नव्हे. मला आर्थिक अडचण दिसते आहे या घरातली, तुमचे श्रमही पहातेच आहे मी -'

'मला कसले श्रम ? तरुणपणी नाही तर मग केव्हा श्रम करायचे ? '

'तेच म्हणते मी. मीही तरुण आहे ना ? मग मीही श्रम करते थोडे आता. मागल्यासारखेच, पण त्याहून बरेच मोठे कापड मी आता विणते- जास्तच उंची ! सोन्याच्या धाग्याने नक्षी गुंफते बघा, स्वतः मिकॅडो (जपानचा राजा) ते विकत घेईल

'महावस्त्र ! पण एक अट !!'

'ती पूर्वीचीच का ? दारं लावून उपाशी पोटाने रात्रंदिवस माग चालवायचीच अट ना ? नको बाबा ? तुमचे हाल फार होतात त्यात व मलाही तुम्ही कोंडून घेता ते सोसत नाही ? केव्हा दार उघडता असं झालं होतं अगदी. समजत नाही का तुम्हाला ? '

ती मनःपूर्वक हसली व म्हणाली -'समजतं सारं. पण फक्त एकदाच मला दार लावून महावस्त्र विणू द्या. ते इतके भारी किंमतीचे होईल की, जन्मभर तुम्हाला पैशाची वाण पडणार नाही एवढी किंमत देईल राजा ! फक्त एक वेळाच विणीन. आणि वस्त्र मोठे-तेव्हा पुरे तीन दिवस व तीन रात्री मी मागाशी बसेन. मात्र मधे कोणीही दार उघडता कामा नये, शपथ घ्या तशी. नाहीतर वस्त्र पार बिघडून जाईल बरं का ! '

'शपथ नको, मी नाही उघडणार दार ! कबूल ! ' तो म्हणाला.

त्यानंतर दोन दिवसांनी ती दार लावून घेऊन विणायला बसली. पूर्वीप्रमाणे भाताची कटोरी व मासे त्याने रात्री तिच्या दाराशी ठेवले, दाराआडून मधमाशीच्या गुणगुणण्याप्रमाणे लहानशा मागाचा गूं गूं असा आवाज येत होता.

सकाळी अन्नाची कटोरी रिकामी दिसत होती. त्याला शिझूबद्दल प्रेम दाटून आले. किती हे श्रम माझ्या कुटुंबासाठी ती घेते आहे ? पण यावेळी त्याचे मन फार अनावर होते. माग चालवताना कोणी न बघण्यासारखं काय असतं तिथे ? एवढा गुप्तपणा का ? अन् कोंडून घेऊनच का विणायचं हे महावस्त्र ? मंत्राने तर विणीत नाही ना कापड ही ? पाहू का हळूच दाराला फट पाडून?

तो अस्वस्थ होई. कोणी अमुक करू नका म्हटलं की, हट्ट तेच करण्याबद्दल फार वाढतो, म्हणतातच मुळी. तसेच झाले. दोन दिवस त्याने कशीबशी कळ काढली. तिसऱ्या दिवसाची सायंकाळ-म्हातारा-म्हातारी जरा गेले होते पाय मोकळे करायला. अगदी एकटाच तो आता घरात ! त्याला राहवेना. तीन दिवस तर संपत आले, रात्री थोडेच विणणार अंधारात ती? गरम चहा द्यावा करून अन् हळूच दार उघडून डोकवावे, काय हरकत आहे? बापडी किती दमली असेल ? पाहू उघडू दार अगदी जरासं किलकिलंच करतो- पण आता नाही राहवत बाबा!

मिगीने अखेर दरवाजा हलकेच उघडला. मावळतीची सोनेरी किरणे खोलीत शिरली. तो आत डोकावून पहातो तो शिझूसान कुठेच नव्हती. तिच्या जागी एक अतिशुभ्र सुंदर बगळा उभा होता व चोचीने मागाचे धागे मागेपुढे करीत होता. उन्हाची तिरीप पडताच बगळ्याने वर मान केली. तशी धागे तुटले. माग अदृश्य झाला. फक्त विणलेल्या वस्त्राचा एक मोठा तागा तिथे राहिला. त्याचा हात दोन हात भाग अजून अपुरा होता. जवळ पांढऱ्या शुभ्र पिसांचा ढीग होता. व ती नाजूक पिसे त्या वस्त्राच्या काठात तिने विणली होती- असे सुंदर विणकाम , कोणी जन्मात पाहिले नसेल इतक्या नव्या पद्धतीचे !!

तो स्तंभित होऊन म्हणाला, 'शिझूसान कुठे आहेत ? तुम्ही कोण व कसे इथे? ' बगळा दारात आला आणि मनुष्यवाणीने म्हणाला.

'मिगी, मला ओळखलं नाहीस ? तू ज्या बगळ्याच्या पंखातून मानेत रुतलेला बाण काढून वाचवलंस, तोच मी. अन् तुझे उपकार गुंफण्यासाठी मीच शिझूचे रूप घेऊन आलो होतो - उपकार कधी वाया जात नाही मिगी!'

'पण शिझुसान तुम्ही ? तुम्ही खऱ्या कोण ? '

'खरं विचारशील तर मी एक परी आहे. मिगी, पण एकदा पऱ्यांच्या राणीने रागावून मला शाप दिला व बगळ्याचे रूप दिले. आता शापाची मुदत संपली. पण तुम्ही लोक माझ्याशी इतके चांगले वागलात की किती धन्यवाद देऊ तेवढे कमीच ! पण मिगी, तू उतावीळपणानं एक चूक केलीस फार मोठी !'

'ती कोणती ?'

'आज शापमुदतीचा शेवटचा दिवस ? तू जर आजची रात्र मन आवरलं असतंस, तर उद्या माझा शाप संपून मी शिझुसानच्या रूपानं कायम तुझ्या घरी राहिले असते. मला दिसत होतं तुझं मन जडलेलं माझ्यावर, मलाही तू आवडत होतास. पण तू मला कापड विणताना बगळ्याच्या रूपात पाहिलं आहेस; तेव्हा आता मी परी आहे हे तुला समजल्यावर मी इथे मनुष्यरूपाने राहून संसार करू शकत नाही. माफ कर !

जरा थांबून बगळा म्हणाला - 'ही माझी टोपलीभर पिसं घे. त्याखाली सोन्याची नाणीही सापडतील तुला. फार मूल्यवान आहेत ही. तसेच हे वस्त्र व पिसे विकून टाक. तुला जन्मभर पुरेल एवढे द्रव्य त्यातून मिळेल. आईबाबांना नमस्कार सांग मिगी, प्रणाम ! येते ! ' बगळा पंख झटकून भुर्रर्र-उडाला - पहाता पहाता अंतराळी कुठे दूर निघून गेला. आकाशात दूरवर ठिपका काहीवेळ दिसत राहिला इतकेच ! मिगीला आपल्या उतावळेपणाचा फारफार पश्चात्ताप झाला. फक्त एक रात्रच त्याने मन आवरले असते तर ! पण जे झाले ते झाले ! पश्चात्तापाने त्यातले नुकसान भरून थोडेच येते ? शिवाय ती साक्षात् परी, मी साधा गरीब शेतकरी, मी तिच्या योग्यतेचाही नव्हतोच मुळी.

असा विचार करून त्याने मन आवरले व पाहिले तो खरोखरीच त्या पिसांखाली कितीएक सोन्याची नाणी होती ! बहुधा त्याचेच धागे काढून ती वस्त्रात विणत असावी. होय, परीला काय अशक्य ? नवल एवढेच की इतकेसे तिचे काम केले, पंखातून बाण उपसून काढला, त्याचे एवढे मोठे बक्षिस दिले तिने !

*

खरोखरच त्या महावस्त्राचे जपानच्या राजाने फार मोठे मोल दिले.पिसे तर इतक्या मोठ्या किंमतीला विकली गेली की मिगीच्या कुटुंबाची जन्माची गरिबी दूर झाली व परत कधी त्याला आर्थिक चिंता करावी लागली नाही. बोलून चालून ती परीची देणगी, ती अशी दिव्य असायचीच नाही काय ?

(मालती दांडेकर : अतिपूर्वेच्या परीकथा (जपान))

# ५.१६. उपकाराची परतफेड

(जपानी लोककथा)

जपानच्या किनाऱ्यावर एक छोटे खेडे होते. तिथे सुझुकी अन् मत्सू हे म्हातारे जोडपे राहात होते. बिचारे अगदी गरीब होते. गवताच्या टोप्या करून सुझुकी शहरात विकायचा. मत्सूला म्हातारपणामुळे काबाडकष्ट मुळीच होत नव्हते. ती बसल्या बसल्या पंखे विणायची. नाहीतर नेहमी सणात लागणारे कागदांचे कंदील करायची. जपानमध्ये कोणीच स्वस्थ बसत नाही; मग म्हातारी मत्सू तरी कशी आळसटपणे बसून राहणार ?

पण या गोष्टी जपानात घरोघर होतात, म्हणून अगदी थोडे पैसे सुझुकीला मिळत. मग भात, चहा, उकळलेले पाणी अन् 'सांग' नावाचे तांदुळाचे सार असा स्वयंपाक करून मत्सू सुझुकीची वाट पहायची अन् ते फक्त एक वेळच जेवायचे. दोन वेळा पोटभर भात, मासे खायला पैसे नकोत का भरपूर ?

एक दिवस सुझुकी जेवायला बसला होता, मत्सू वाकून वाढत होती. तोच बाहेरून कुत्र्याच्या रडण्याचा चमत्कारिक आवाज तिने ऐकला. ताबडतोब ती बाहेर गेली. बाहेर एका झाडाखाली एक मरतुकडे कुत्रे पडले होते. त्याला कसली तरी जखम झाली असावी. तिने कुत्रे उचलून आणले. थंडीने ते मरायला झाले होते अन् भुकेने त्याचा जीव जाऊ पाहात होता. मत्सुने त्याला थोडे दूध पाजले. जखमेला मलमपट्टी केली व एका चटईवर त्याला ऊबदार पांघरुणात ठेवले. म्हातारा सुझुकी आपले पांढरे केस कुरवाळीत हसला व म्हणाला,

'वा, कुत्र्याची इतकी काळजी कशासाठी घेतेस ?'

'असूदे ! तुम्ही बाजारात गेलात की मला करमत नाही एकटीला, पोर ना बाळ. गोजिरवाणे पिल्लू खेळेल इथे.' मत्सु म्हणाली व खरोखरच कुत्रे बरे होऊन तिच्याभोवती बागडू लागले. सुझुकी एक दिवस बाहेर बसला होता. झोपडीच्या दाराशी बसून मत्सू पंखे करीत होती. बाहेर एक वाकडेतिकडे झाड होते. कुत्रे

तिथे जाऊन पायांनी उकरू लागले. सुझुकी म्हणाला,

'काय तिथे हा मिंटो उकरतोय कुणाला ठाऊक ? एखादे हाडूक तर नाही ना?'

'साप असेल एखादा. मत्सू म्हणाली.'

'काही असो. काय ते मला पाहिलेच पाहिजे.' सुझुकी म्हणाला व आपल्या गवती सपाता घालून तो त्या वाकड्या झाडाकडे गेला, त्याने छोटीशी कुदळ आणली अन् तिथे उकरले. मत्सू नाक उडवून म्हणाली, 'पुरे झाले. काही नाही तिथे. माझा मिंटो सहज आपला खेळ करतोय पायांनी.'

सुझुकी म्हणाला, 'पण म्हटले, पाहावे जरा खोदून. व्यायामही होतो तेवढा. पण असे म्हणतो तोवर खणकन आवाज झाला, अन् काय आश्चर्य ! सोन्याच्या जुन्या नाण्यांनी भरलेली कळशी त्यांना सापडली! मत्सूच्या मिंटो कुत्र्याने त्यांची गरिबी दूर केली होती.

मत्सूला आता काय चिंता? तिने भारी किंमतीचा फुलांच्या कापडाचा किमोने (झगा) घेतला. पाठीवर बांधायला जरीच्या कापडाचा ओवी नावाचा शेला घेतला. बसायला जाड जाड चटया केल्या; रंगीबेरंगी कागदांच्या जाड पुठ्ठयांचे एक टुमदार घर बांधून घेतले अन् खोल्यांतून सुंदर कागदांचे दिवे हलताना लोकांना दिसू लागले. फुजीयामा पर्वताच्या रंगीत चित्रांनी शोभून दिसणारे पडदे प्रत्येक भिंतीवर दिसू लागले.

म्हातारा सुझुकी देखील रोज रेशमी कापडाचे झगे वापरू लागला व मत्सू रोज माशांची उंची पक्वान्ने करू लागली. एक दिवस त्यांनी शेजाऱ्यांना मेजवानी दिली.

सगळीकडे विघ्नसंतोषी माणसे असतातच. एका शेजाऱ्याला सुझुकीची ही भरभराट पाहून पोटात दुखायला लागले. त्याने विचारले,

'मत्सुसान, कशाने तुमचे दैव उघडले बरे ? '

मत्सू म्हणाली, 'देवाची कृपा. दुसरे काय ? '

बिचारा भोळा सुझुकी, त्याला डावपेच कळत नव्हते. तो सरळपणे म्हणाला,

'देवाची कसली ? आमच्या मिंटो कुत्र्याचीच कृपा म्हणानात ? त्यानेच आम्हाला द्रव्य मिळवून दिले. '

मग त्याने सर्व सांगितले. लगेच यामाडाने - त्या शेजाऱ्याने कुत्रा एक दिवस उसना मागितला व मत्सू नको म्हणत होती तरी सुझुकीने तो दिला.

यामाडाने संध्याकाळी मिंटोला बागेत सोडले व कुत्रा कुठे उकरतो की काय हे पाहायला तो बागेत बसून राहिला. मिंटोला याही बागेत काही आढळले वाटते, कारण तो पायांनी एके ठिकाणी उकरू लागला होता.

केवढा आनंद वाटला यामाडाला. त्याने झटपट कुदळीने तिथे खणले. अन् बघतो तर काय ? एका मेलेल्या मांजराची हाडे तिथे होती ! यामाडा खूप चिडला व त्याने तीच कुदळ बापड्या मिंटोच्या डोक्यांत घातली. मिटो मेला, तसे यामाडाने मागल्या बाजूस एक खड्डा खणून त्याला पुरुन टाकले. मग तो सुझुकीकडे जाऊन म्हणाला, 'कसले ते द्वाड कुतरडे तुमचे ? उड्या टाकीत कुठे पळाले देव जाणे. चार तास हुडकतोय मी. माझे पाय मोडायला झाले कुत्र्याचा शोध करता करता. तुम्हीच शोधा आता. मी दमलो बुवा.'

सुझुकीला फार वाईट वाटले, मत्सू म्हणाली, 'मिंटो कुठेच बाहेर जात नाही कधी. मग आताच कसा जाईल ? या यामाडाने काही केले तर नसेल ना ?'

सुझुकी रागावून बाहेर पडला. खूप शोधाशोध झाली पण त्याला मिंटो सापडणार कसा ?

त्या रात्री सुझुकीला स्वप्नात मिंटो दिसला. तो म्हणाला,

'धनी,मागल्या उकिरड्यात एक काटेरी जाड असे नवे झाड उगवलेय; ते उपटून आणा अन् त्याच्या खोडाची उखळी बनवा. मग दर वेळी माझी आठवण करा हं धान्य कांडताना. '

काय नवल ? स्वप्नातल्याप्रमाणे मागल्या दारी सुझुकीने पाहिले तो खरोखरच एक रुंद खोडाचे नवे झाड होते ! त्यांनी त्याची एक छोटी उखळी करून घेतली. त्यांनी धान्य कांडायला घेतले व ते चौपट झाले ! मिंटो मेल्यावरही त्याने धान्य चौपट करणारी उखळी धन्याला दिली.

शेजारी यामाडाला हे कळताच त्याने उखळी उसनी मागितली. मत्सू परत रागावली. परंतु सुझुकी भला माणूस होता. तो म्हणाला, 'घेऊन जा उखळी. ' काम झाल्यावर परत द्या, शेजाऱ्याच्या उपयोगी पडणे आपले कर्तव्यच आहे.

उखळी उसनी घेऊन यामाडाने धान्ये खूप कांडून पाहिली, पण ती वाढली नाहीत, तशी रागावून त्याने उखळी फोडून टाकली व नंतर भट्टीत जाळून राख उकिरड्यावर फेकून दिली.

परत सुझुकीला स्वप्नात मिंटो दिसला. तो म्हणाला, 'धनी काही हरकत नाही. उखळी जाळून टाकली ना ? त्यातून बरीच राख घेऊन या अन् मागल्या परसात वठलेले पेरुचे झाड आहे त्यावर चिमूटभर टाका. मग पाहा गंमत !'

सुझुकीचा स्वप्नांवर विश्वास होता. त्याने ती राख डबा भरुन आणली व चिमूटभर त्या झाडावर टाकली. व त्या खोडाला एकदम कोवळे कोंब फुटले. जाड फांद्या दिसू लागल्या व पाहाता पाहता हिरवे पिवळे पेरू फांद्यांवर झोके खाऊ लागले ! मग इतरही झुडपांवर त्याने चिमटी चिमटी राख टाकली व त्यांची क्षणात मोठी झाडे बनून त्याची खुरटलेली बाग सुंदरशी फळबाग झाली.

म्हाताऱ्या मत्सूच्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले. ती म्हणाली,'माझा मिंटो खरोखरी देवदूतच होता. मेल्यावरही बापडा आमचे कल्याण करीत आहे.'

लवकरच सुझुकीची कीर्ती चहुकडे पसरू लागली. जादुगार सुझुकी वठलेली झाडे परत सजीव करतो ! दुरुन मळेवाले, बागवाले त्याला बोलावू लागले व तो लवकरच श्रीमंत झाला. राजाचे एक आवडते फळझाड वठले होते ते त्याने सजीव केले व मग तर राजाने त्याला रत्ने दिली.

यामाडाला चैन पडेना. जे करायला जावे त्याने ह्या थेरड्याचेच कल्याण होतेय ! बरे आपणही असेच करावे. त्याने राखेबद्दल ऐकले होते व उखळीची उरलेली राख झाडून आपल्या घरात आधीच नेऊन ठेवली होती, ती बरोबर घेऊन तोही राजाकडे गेला व आपणही वठली झाडे परत फुलवतो असे त्याने सांगितले.

राजाला बरे वाटले. आपल्या राज्यात ही एक नवी विद्याच निर्माण झाली व

अनेक लोक ती जाणतात हे किती चांगले आहे ? त्याने राजबागेतली दहा वठकी झाडे दाखवून म्हटले, 'ही झाडे मी हिंदुस्थानातून आणवून लावली. फार गोड फळे येतात. पण येथली हवा त्यांना मानवली नाही व लवकरच ती वठून गेली. ही तुम्ही फळांनी लगटलेली करा. मी तुम्हांस दहा रत्नहार देईन.'

सगळे दरबारी उभे होते. बक्षिसाचे दहा हार ! बाप रे, किती आपण श्रीमंत होऊ ? सुझुकीहून जास्त.

यामाडाने ऐटीत डबाभर राख फुंकली. त्या राखेचा एक लोट झाडावरून फिरला. पण एकही वठल्या खोडाला पालवी फु टली नाही. दुष्टाच्या मनाप्रमाणे ते वृक्ष जसेच्या तसे रुक्ष राहिले. उलट लोट अधिकाऱ्यांच्या व राजाच्या डोळ्यात शिरला व तिखट घातल्याप्रमाणे त्यांच्या डोळ्यांची भयंकर आग होऊ लागली.

मग राजाने चिडून यामाडाला तुरुंगात टाकले. लोभाचे फळ त्याला असे मिळाले. मत्सू अन सुझुकीच्या भाग्यात यामाडाची परत कधी कटकट झाली नाही, ते सुखात आहेत. मिंटो त्यांना स्वप्नात भेटतो व म्हणतो,'मी परत येणार आहे.' त्याची ते वाट पाहात असतात. मिंटोवर केलेल्या उपकारांची फेड त्याने किती प्रकारांनी केली पाहा बरे !

(मालती दांडेकर : अतिपूर्वेच्या परीकथा (जपान))

# ५.१७. साबुरचा जादुई पंखा

(मॉरिशसची लोककथा)

एके काळी एक खूप श्रीमंत व्यापारी रहात असे. त्याला तीन सुंदर मुली होत्या. एकदा तो व्यापारानिमित्त शेजारच्या देशांमध्ये जाणार होता. त्याने आपल्या मुलींना विचारले, 'माझ्या लाडक्या मुलींनो, मी परत येतांना तुमच्यासाठी भेटवस्तू म्हणून काय आणू ?' सर्वात मोठी मुलगी होती ती म्हणाली की माझ्यासाठी एक हिऱ्याचा हार आणा. दुसरी होती तिला मखमलीचा झगा हवा होता. परंतु सगळ्यात धाकट्या मुलीला विचारण्यात आलं तेव्हा ती म्हणाली, 'मला भेटवस्तू म्हणून साबूर आणा. मला ती वस्तू पसंत आहे. '

'साबूर' म्हणजे काहीतरी असेल असा विचार त्या व्यापाऱ्याने केला. तरी त्याचा फारसा विचार न करता तो आपल्या प्रवासाला निघाला.

शेजारच्या देशात गेल्यावर त्याने वस्तू खरेदीला सुरुवात केली. आपल्या धंद्याचा जम तिथे त्याला बसवायचा होता. त्याला थोडा वेळ लागला. हळूहळू सगळी कामे पार पडली तेव्हा परत आपल्या देशाला निघायचे त्याने ठरविले. परंतु खरेदी केलेला माल जनावरांच्या पाठीवर टाकण्यापूर्वी आणि निघण्यापूर्वी त्याला आपल्या मुलींची आठवण झाली. आपल्या मुलींसाठी भेटवस्तू घ्यायच्या आहेत हे त्याच्या लक्षात आलं.

त्याप्रमाणे तो एका जवाहिऱ्याच्या दुकानात गेला आणि आपल्या वडील मुलीसाठी त्याने एक सुंदर हार खरेदी केला. नंतर तो कापडाच्या दुकानात गेला व त्याने आपल्या दुसऱ्या मुलीसाठी छानदार निळा मखमलीचा झगा खरेदी केला. परंतु त्याने जेव्हा 'साबुर'ची चौकशी केली तेव्हा तशी वस्तू कुणाकडेच त्याला मिळेना. खूप दुकानातून तो हिंडला. मग त्याने आणखी त्याची चौकशी करायचे सोडून दिले आणि त्या देशाचा निरोप घ्यायचा त्याने ठरविले.

अनेक उंटांच्या पाठीवर त्याचा माल लादलेला होता. तो स्वत: हत्तीवर स्वार झाला व म्हणाला, “चल, हत्ती, चल. आपण निघूया."

परंतु आश्चर्याची गोष्ट! हत्ती हालेना. हत्तीला हालविण्याचे त्याने खूप प्रयत्न केले. पण ते सगळे फुकट गेले. मग त्या हत्तीचे रहस्य त्या व्यापाऱ्याच्या लक्षात आले. त्या हत्तीची एक सवय होती. परदेशात गेल्यावर त्याच्या मालकाला जर अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीचा विसर पडला तर तो हत्ती जागचा हालत नसे. मात्र मालकाला त्या गोष्टीची आठवण झाली व त्याप्रमाणे त्याने केले की मग हत्ती हालत असे. चालत असे. यावेळी आपण काय विसरलो बरे म्हणून तो व्यापारी विचार करू लागला. चटकन् ती महत्त्वाची गोष्ट त्याच्या लक्षात आली. आपल्या धाकट्या मुलीसाठी तिने सांगितलेली भेटवस्तू त्याला आठवली.

पुन्हा एकदा तो हत्तीवरून खाली उतरला. इकडे, तिकडे, सगळीकडे फिरला. सर्व वेळ त्याने 'साबूर'ची चौकशी करण्यात घालविला. परंतु कुणीही त्याला त्याबद्दल सांगेना. फिरून फिरून तो दमला. परंतु दुसरा मार्ग नव्हता. म्हणून तो त्या नगराच्या आत आत सगळ्या भागात गेला. अशा रीतीने त्याने सगळा दिवस घालविला. परंतु कुठे जावे व काय करावे हेच त्याला समजेना.

काय आफत येऊन कोसळलीय आपल्यावर असे त्याला वाटू लागले. ती अभद्र भेटवस्तू घेतल्याशिवाय त्याला तो देश काही सोडता येईना. कुणालाच तिच्याबद्दल काहीच ठाऊक नव्हते. सरतेशेवटी त्याने एका म्हाताऱ्या बाईला विचारले. ती घाणेरडी दिसत होती. त्या नगरीच्या वेशीवर ती रहात होती. तिने त्याला आपल्याबरोबर आपल्या झोपडीत यायला सांगितले. मग झोपडीचे दार बंद करून ती म्हणाली,

“होय महाराज, मला साबूरबद्दल माहिती आहे. आमच्या देखण्या राजपुत्राचे ते नाव आहे. शेजारच्या राजाचा तो मुलगा आहे."

ते ऐकून व्यापाऱ्याला धक्का बसला. एका राजाचा मुलगा भेटवस्तू म्हणून तो आपल्या मुलीला देण्यासाठी कसा काय नेणार होता? तो फार मोठ्या अवघड परिस्थितीत सापडला. त्या म्हातारीने त्याची ही अवस्था ओळखली. त्याच्या

मनातील संशय ती दूर करू शकत होती. ती त्याला म्हणाली,

"तू एक अत्यंत सुंदर भेटवस्तू विकत घे. ती त्या राजपुत्राला दे. आणि मग तुझ्या मुलीच्या मनातील ही विचित्र इच्छा त्याला सांग."

आपण जर 'साबूर' बरोबर घेतला नाही तर हत्ती हालणार नाही हे त्या व्यापाऱ्याला ठाऊक होते. म्हणून काय वाटेल ते करून त्या राजपुत्राची भेट घेण्याचे त्याने ठरविले. त्याने एक अत्यंत सुंदर भेटवस्तू विकत घेतली. मग तो त्या राजाच्या राजवाड्यात गेला. आपल्याला राजाची भेट घ्यावयाची आहे असे पहारेकऱ्यांना त्याने सांगितले. त्यांनी त्याला आत सोडले. तो राजाला म्हणाला,

'महाराज, मला आपल्या राजपुत्राला भेटण्याची व त्याला एक मौल्यवान भेटवस्तू देण्याची इच्छा आहे.'

तो वृद्ध राजा उदार मनाचा होता. त्याने त्या व्यापाऱ्याला राजपुत्राला भेटण्याची परवानगी दिली. तो व्यापारी त्या राजपुत्राला भेटायला गेला. त्याची ओळख झाल्यावर त्याने त्याला भेटवस्तू दिली आणि आपल्या मुलीने आपल्याकडे केलेल्या विचित्र मागणीची सगळी कथा त्या राजपुत्राला सांगितली. या बाबतीत आपल्याला मदत करण्याची राजपुत्राला त्याने विनंती केली. त्याला तो देश सोडून लवकरात लवकर आपल्या देशाला जायचे होते.

त्या तरुण राजपुत्राला ती मनोहर कहाणी ऐकून आनंद वाटला. आपल्याला एक भेटवस्तू म्हणून मागणारी ही मुलगी कोण अद्भुत असेल असे त्याला वाटले. ती किती धाडशी असेल ! आणि तो मोठमोठ्याने हसू लागला. मग त्याने त्या व्यापाऱ्याला त्याची मुलगी खरोखरच सुंदर आहे का म्हणून विचारले. सुदैवाने, त्या व्यापाऱ्याजवळ आपल्या तिन्ही मुलींचे एकत्र काढलेले चित्र होते. ते त्याने राजपुत्राला दिले व त्याला ती सर्वात धाकटी मुलगी दाखवली.

राजपुत्राचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. कोण लावण्यवती होती ती ! तो राजपुत्र असल्यामुळे त्याने कितीतरी सुंदर स्त्रिया पाहिल्या होत्या. परंतु ही तरुण स्त्री इतकी काही देखणी होती, तिचे अवयव आणि शरीर इतके काही

परिपूर्ण होते, की आजवर त्याने पाहिलेल्या सर्व स्त्रियांपेक्षा ती कितीतरी अधिक सुंदर होती. त्या चित्राकडे पहाता पहाता तो राजपुत्र त्या मुलीच्या प्रेमात पडला होता. परंतु तो शहाणा होता. त्याने आपल्या भावना छान लपवून ठेवल्या. त्याने ते चित्र परत केले आणि त्या व्यापाऱ्याला मदत करण्याचे वचन दिले. तो आपल्या खोलीत गेला आणि एक जादूचा पंखा घेऊन बाहेर आला ; त्याने तो त्या व्यापाऱ्याला दिला आणि म्हणाला, 'तू माझ्याशी इतका काही दयाळूपणाने आणि प्रमाणिकपणाने वागलास की मी तुला इथून रिकाम्या हातांनी जाऊ देणार नाही. शिवाय तू मला एक मौल्यवान भेटवस्तू दिली आहेस. कृपा करून तुझ्या मुलीच्या नावाने या 'पंख्या'चा स्वीकार कर. ती आपल्या खोलीत एकटीच असेल तेव्हाच तिला या पंख्याचा उपयोग करायला सांग. तिला तो आवडेल अशी मला आशा आहे.'

व्यापाऱ्याने तो पंखा घेतला. त्याने राजपुत्राचे आभार मानले. मग तो राजवाड्यातून बाहेर पडला. हत्तीवर तो चढून बसताच कोणताही हुकूम न करता हत्ती चालू लागला. घरी आल्यावर त्याने आपल्या मुलींना बोलावले. मोठ्या मुलीला त्याने हार दिला. दुसरीला मखमली झगा दिला. आणि तो पंखा त्याने धाकटीला दिला. ती एकटीच खोलीत असेल तेव्हाच त्याने तिला तो वापरायला सांगितला.

आपल्या मौल्यवान भेटवस्तूंचा आनंद त्या दोघी वडील बहिणी मनमुराद लुटीत होत्या. त्याचवेळी धाकट्या बहिणीची त्या थट्टा करीत होत्या. कसला क्षुल्लक पंखा तिला भेटवस्तू म्हणून मिळाला ! त्या म्हणायच्या. उलट तुलनेने त्यांच्या वस्तू किती मौल्यवान् होत्या असे त्यांना वाटायचे. परंतु धाकट्या बहिणीला आनंद वाटत होता आणि वाटतही नव्हता. कारण तिच्या बापाने तिला विचारले तेव्हा 'साबूर' हा शब्द तिच्या तोंडातून अकस्मात बाहेर पडला होता. पंखा मिळाल्यावर आपण काय बोलून गेलो याचा ती विचार करीत होती.

रात्र पडली. ती एकटीच आपल्या खोलीत होती. तिने तो पंखा उघडला. किती सुंदर पंखा होता तो ! त्या पंख्याने ती वारा घेऊ लागली तेव्हा त्यातून

गारगार हवा सभोवार पसरू लागली. काय आश्चर्य होतं ! तिच्या पुढ्यात एक देखणा तरुण माणूस उभा होता. तो तिला वाकून नमस्कार करीत होता आणि म्हणत होता,

'लाडके ! मी आहे राजपुत्र साबूर. मी खूप दूरवरून आलो आहे. मला तुझ्याशी लग्न करण्याची इच्छा आहे. तू मला तुझा नवरा म्हणून स्वीकारशील काय ? आणि मला जगातील सर्वात आनंदी माणूस करशील काय ?'

असे म्हणून त्या मुलीचा हात त्याने आपल्या हातात घेतला आणि तिचे हळुवार चुंबन घेतले.त्या तरुणीच्या आनंदाला पारावार राहिला नाही. इतक्या देखण्या राजपुत्राशी आपले लग्न होईल असे स्वप्नातही तिला वाटले नव्हते. राजपुत्राबरोबर बराच वेळ एकांतात आणि आनंदात घालविल्यानंतर आपल्यासमोर वाकून उभ्या असलेल्या राजपुत्राला ती म्हणाली,

'माझ्या लाडक्या ! ऊठ, मी तुझ्याशी लग्न करायला आणि तुझी बायको व्हायला तयार आहे. परंतु माझ्या बापाकडून मला परवानगी मिळाली पाहिजे. '

दुसऱ्या दिवशी तिने आपल्या बापाला बोलाविले. राजपुत्र साबूरने आपल्याला कशी मागणी घातली ती गोष्ट तिने बापाला सांगितली. तिच्या बापाला आनंद झाला. त्याने संमती दिली. म्हणून मुळीच उशीर न लावता लग्न धूमधडाक्याने करण्याचे ठरले.

आपल्या धाकट्या बहिणीला राजपुत्रासारखा नवरा मिळाला हे पाहून तिच्या मोठ्या बहिणी तिचा द्वेष करू लागल्या. आपल्यापेक्षा कमी सुंदर असलेल्या आपल्या धाकट्या बहिणीला इतका सुंदर नवरा मिळालेला पाहून त्यांना आपला अपमान झालाय असे वाटू लागले. आणि मोठ्या बहिणींचे लग्न न होता धाकट्या बहिणीचे लग्न अगोदर होते म्हणजे काय ? त्या दोघीजणी धाकटीला पाण्यात पाहू लागल्या. इतकेच नव्हे तर तिच्या प्रियकराला ठार मारण्याचा कट त्यांनी केला.

त्या देशामध्ये लग्नानंतर नवराबायकोचा बिछाना वडील बहिणींनी धाकट्या बहिणीसाठी तयार करावा अशी प्राचीन प्रथा होती. धाकटीचे राजपुत्राबरोबर

लग्न मोठ्या थाटात झाले. त्या दिवशी त्या दोघी बहिणी धाकटीला म्हणाल्या,

'आम्ही तुला तुझा बिछाना तयार करून देणार आहोत. चालेल ना?'

बिचाऱ्या त्या धाकट्या बहिणीला आपल्या वडील बहिणींचा हा कावा ठाऊक नव्हता. तिने त्यांना होकार दिला. परंतु बिछाना तयार करताना त्या दोघाही बहिणींनी ज्या बिछान्यावर राजपुत्र झोपणार होता त्या बिछान्यावर फुटलेल्या काचा पसरून ठेवल्या. त्या रात्री लग्नसमारंभ संपल्यानंतर आणि पाहुणेमंडळी घरोघरी गेल्यानंतर राजपुत्र आपल्या बायकोसह आपल्या झोपण्याच्या खोलीत आला. नवराबायको खूप आनंदात व मजेत होती. ती दमली भागली होती. क्षणार्धात त्या दोघांनी बिछान्यावर अंग टाकले.

राजपुत्राने बिछान्यात अंग टाकताच बारीक बारीक काचांचे तुकडे त्याच्या शरीरात घुसले. त्याचा देह जखमांनी रक्तबंबाळ झाला. एक बाजूला काचा टोचतात म्हणून तो दुसऱ्या बाजूला वळला तर त्याच्या शरीराची ती बाजू जखमी झाली. क्षणार्धात त्या शरीरातून रक्त वाहू लागले. त्याने उठून बसण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला खूप अशक्तपणा वाटू लागला. त्याला उठता येईना. राजपुत्राने आपल्या बायकोला हाक मारली. आपला नवरा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहून ती भयभीत झाली. ती किंकाळी मारणार होती पण राजपुत्राने तिला थांबविले. तिच्या बापाकडून जो पंखा त्याने तिला दिला होता तो तिला त्याने आणावयाला सांगितले. तिने तो लगेच आणला. तो पंखा आपल्या हातात घेऊन राजपुत्र तो हालवू लागला. थोडा वेळा हालवून त्याने तो पंखा पटकन मिटला. त्या क्षणालाच तो अदृश्य झाला. त्याच्या बायकोची बोबडी वळली. तिने मोठ्याने किंकाळी मारली आणि ती जमिनीवर बेशुद्ध पडली.

थोड्या वेळाने धाकटी शुद्धीवर आली. आपल्या दुर्दैवाला दोष लावीत ती खूप रडली. रात्रभर ती कण्हत होती. आपला नवरा परत येईल म्हणून तिने वाट पाहिली. पण राजपुत्र परत कधीच आला नाही. दुसऱ्या दिवशी ती सगळी हकिगत तिने आपल्या आईबापाला सांगितली. आईबाप अत्यंत दुःखी झाले.

आपल्या धाकट्या मुलीवर कोसळलेली आपत्ती पाहून ते शोक करू लागले. तिच्या दोन्ही वडील बहिणी वरवर आपल्याला दुःख झाले असे दाखवित होत्या. परंतु मनातल्या मनात त्यांना आनंदाच्या उकळ्या फु टत होत्या. त्यांनी आपल्या बहिणीचे जीवन उध्वस्त करण्यासाठी आखलेला कट यशस्वी झाला होता.

असे सहा सात महिने गेले. परंतु राजपुत्र साबूरबद्दल कुणालाच काही समजले नाही. आपल्या धाकट्या मुलीच्या लग्नाचे हे रहस्य त्या व्यापाऱ्याला कुणालाच सांगता येईना. कारण त्याच्या देशाच्या राजाचा त्याच्यावर प्रकोप होईल म्हणून त्याला भीती वाटत होती. एके दिवशी धाकटी एक पुस्तक वाचत होती. त्या पुस्तकात राजे लोकांची ताजी माहिती दिलेली होती. ती वाचता वाचता तिची नजर 'राजपुत्र साबूर' या शब्दांवर पडली. तिने ती माहिती आधाशासारखी वाचली. तिच्यात म्हटले होते, राजपुत्र साबूर हा खूप आजारी आहे. त्याला एक दुर्धर रोग झाला आहे. त्याच्या वृद्ध बापाला आपल्या मुलाचे प्राण वाचावेत म्हणून मोठी चिंता पडली आहे. त्याने राजवाड्यांतून फर्मान काढले होते, जो कुणी आपल्या मुलाला आजारपणातून बरा करील त्याला देणगी म्हणून त्याचे अर्धे राज्य मिळेल.

धाकटीने ती माहिती वाचली आणि ते पुस्तक बंद करून बिछान्याखाली लपवून ठेवले. त्याबद्दल ती कुणाशीच काही बोलली नाही. रात्र झाली. घरातील सर्व मंडळी डाराडूर झोपलीत हे पाहून ती उठली. तिने वेषांतर व रूपांतर केले. ती एक अरब डॉक्टर बनली. तिने दाढी लावली . हातात डॉक्टरची औषधाची पेटी घेऊन ती आपल्या आजारी नवऱ्याचा शोध करायला निघाली.

राजपुत्र रहात होता तो देश फार दूर होता. परंतु धाकटीने एकदा पुढे टाकलेले पाऊल मागे घ्यायचे नाही असा निश्चय केलेला होता. वाटेत तिची खूप गैरसोय झाली. अनेक अडचणींना तिला तोंड द्यावे लागले. मोठ मोठे उंच पर्वत तिला चढावे लागले. मोठमोठ्या खोल पाण्याच्या नद्या पोहून तिला पलीकडे जावे लागले. हिंस्त्र श्वापदांनी भरलेल्या घनदाट अरण्यातील बारीक चिंचोळ्या

वाटांतून ती चालत गेली. सगळेच दिवस जवळ जवळ तिचे अन्न आणि पाणी यांच्याशिवाय जात होते. परंतु न घाबरता, न डळमळता प्रचंड धैर्याने तिने आपला प्रवास चालू ठेवला. तीन महिन्यानंतर एकदाची ती राजपुत्र रहात होता त्या देशाच्या सीमेवर येऊन पोचली. रात्र झाली होती. वाटेत एक प्रचंड मोठे वडाचे झाड उभे होते. त्याच्या फांद्या व पारंब्या चारी बाजूला पसरलेल्या होत्या. त्या झाडाच्या ढोलीत धाकटीने रात्री मुक्काम केला. ती खूप दमली भागली होती. तिला झोपेची डूलकी येत होती. इतक्यात त्या झाडावरचे दोन पक्षी राजपुत्राच्या आजारीपणाबद्दल बोलत होते ते तिच्या कानावर आले. एक पक्षी म्हणाला,

'आज मी नगरात गेलो होतो. राजपुत्र साबूरचा आजार दिवसेंदिवस वाढतच आहे. थोड्याच दिवसांचा तो पाहुणा आहे. कारण कुठल्याच डॉक्टरला त्याच्या आजारीपणावरचं औषध ठाऊक नाही. शिवाय ते करतात त्या उपायांचा राजपुत्रावर कसलाच परिणाम होत नाही.'

त्यावर दुसरा पक्षी म्हणाला, 'परंतु, तुला सुद्धा ठाऊक आहे, या आजारीपणावरचा उपाय मुळीच अवघड नाहीय. या वडाच्या झाडाखाली आमची सगळी विष्ठा जी गोळा झालीय त्याचे मलम तयार करणे हा राजपुत्राच्या आजीरपणावरचा खात्रीचा उपाय आहे. ते मलम जर त्याच्या सर्वांगाला चोळले तर त्याच्या शरीरातील काचांचे बारीक सारीक तुकडे आपोआपच बाहेर पडतील व क्षणार्धात तो बरा होईल.

एवढे म्हणून ते पक्षी झोपी गेले. ती धाकटीसुद्धा झोपली.आता तिला आनंद झाला होता. कारण राजपुत्र अजून जिवंत आहे हे तिला कळले होते. शिवाय नशिबाने पण तिला हात दिला होता. आपल्या आजारी नवऱ्याला कसे बरे करावे यावरचे औषध तिला सापडले होते. पहाटे पहाटेलाच ते दोन पक्षी अन्न शोधण्यासाठी उडून गेले. धाकटीसुद्धा झोपून उठली. तिने झाडाखाली पडलेली त्या पक्ष्यांची विष्ठा एका गाठोड्यात गोळा केली. ते गाठोडे घेऊन घाईघाईने ती नगराकडे निघाली. दुसऱ्या दिवशी सकाळी ती त्या नगरात

जाऊन पोहोचली. परंतु सगळीकडे तिने पाहिले. त्या नगरातील लोक रस्त्यात, घरात, बागेत रडत होते. तिने लोकांना ते का रडतात म्हणून विचारले. तेव्हा तिला कळलं की राजपुत्राची ती रात्र फार वाईट गेली होती. कोणत्याही क्षणाला तो मरण पावेल असे प्रत्येकाला वाटत होते. डॉक्टरांनी सगळी आशा सोडून दिली होती. धाकटीला वाटले आता फारच थोडा वेळ उरलेला आहे. राजपुत्राला वाचवायला पाहिजे. ती लगबगीने राजाच्या राजवाड्यावर गेली. प्रवेशव्दारातील रक्षकांना तिने म्हटले, 'जा आणि राजाला सांगा की, राजपुत्राला बरे करण्यासाठी एका दूरच्या देशातून एक अरब डॉक्टर आलाय.'

तो निरोप ऐकून स्वतः राजा बाहेर आला. त्या अरब डॉक्टराला पाहून तो म्हणाला, 'या महाराज, जर तुम्ही माझ्या मुलाला वाचवलेत तर तुम्हाला जे काय हवं ते मी देईन. त्याचप्रमाणे मी जाहीर केलेले इनामही देईन. कृपा करून या मार्गाने या.'

धाकटी म्हणाली, 'फारच छान ! मी तुमचं म्हणणं ऐकलंय. मला एक प्रयत्न करून पाहू द्या. मला राजपुत्राच्या खोलीत घेऊन चला.' लगेच तिला राजपुत्र साबूरच्या खोलीत नेण्यात आले.

आपला आजारी नवरा एखाद्या प्रेतासारखा बिछान्यात तळमळत पडलेला पाहून तिला फार दुःख झाले. ते दृश्य तिला पहावेना. तिला चक्कर आल्यासारखे झाले. तिचा तोल जाऊ लागला. म्हणून तिला सक्तीने खाली बसविण्यात आले तथापि, क्षणभर विश्रांती घेऊन ती मोठ्या धैर्याने उठली आणि साबूरच्या बिछान्याजवळ गेली. आपल्या गाठोड्यातून तिने ते मलम बाहेर काढले आणि आपल्या नवऱ्याच्या शरीराला ती ते हळुवारपणे चोळू लागली. काय चमत्कार झाला पहा ! त्या मालमाचा खरोखरच जादूसारखा परिणाम घडून आला. साबूरच्या अंगाला ते मलम चोळताच हळूहळू काचांचे तुकडे त्याच्या शरीरातून बाहेर पडू लागले. सगळ्या अंगाला मलम चोळून होताच सगळे बारीक सारीक सुद्धा काचांचे तुकडे बाहेर आले. सगळेजण आश्चर्यचकित झाले. हळूहळू त्या राजपुत्राने आपले डोळे उघडले आणि पाणी

मागितले. नक्कीच तो जिवंत असल्याची ती खूण होती. अरब डॉक्टराने जो इलाज केला होता, त्यात त्याला यश आले होते.

राजा हे सगळं काही पहात होता. त्याला इतका आनंद झाला की बसल्या जागेवरून पटकन उडी मारून तो त्या अरब डॉक्टरकडे आला. त्या डॉक्टराला त्याला कडकडून मिठी मारावीशी वाटत होते. परंतु तो डॉक्टर चटकन चपळाईने दूर झाला. आपले सोंग तर बाहेर पडणार नाही ना याची त्याने काळजी घेतली. आपली दाढी आणि आपले पागोटे त्याने दोन्ही हातांनी घट्ट धरुन ठेवले. परंतु राजाला इतका काही आनंद झाला होता की तो डॉक्टर असे विचित्र का वागतोय हे त्याच्या लक्षात आले नाही. सरते शेवटी तो त्याला म्हणाला, 'तू माझ्या मुलाला बरे केलेस. आता तुला काय हवे ते माग. मी तुला दिलेल्या वचनाला बांधलेला आहे.'

त्यावर तो अरब डॉक्टर म्हणाला, 'तू तुझ्या शब्दाला जागतोस की काय ते मला पाहूदे. मला एक सुंदर मुलगी आहे. तिचा हात तुझ्या मुलाच्या हातात देण्याची माझी इच्छा आहे.'

राजा म्हणाला, 'का नाही ? मला तुझं म्हणणं मान्य आहे. माझा मुलगा तुझ्या मुलीशी लग्न करील. जा आणि तिला घेऊन ये.'

आता साबूरला बरं वाटत होतं. नोकरांच्या मदतीने बिछान्यात तो उशांना टेकून बसला होता. त्या दोघांमधील संभाषण तो ऐकत होता. अरब डॉक्टरांची ती मागणी ऐकून तो मध्येच बोलला, 'बाबा, तुम्ही घाई करू नका. या अरब डॉक्टराच्या मुलीबरोबर मी कसे काय लग्न करू शकतो ? कृपा करून त्याला हवा तितका पैसा द्या. परंतु त्याच्या मुलीबरोबर लग्न करण्याची सक्ती माझ्यावर करू नका. '

तो वृद्ध राजा हा नकार ऐकून अवाक् झाला. तो क्रुद्ध झाला. आपल्या मुलावर त्या अरब डॉक्टराच्या मुलीबरोबर लग्न करण्याची सक्ती करायचे त्याने ठरविले. काही झाले तरी आपण दिलेला शब्द त्याला पाळावयाचा होता. परंतु तो राजपुत्र बापाचे म्हणणे काही केल्या ऐकून घेईना. यावेळी मात्र तो अरब

डॉक्टर रागावला. आपला आपल्या मनावरचा ताबा उडालाय असे सोंग करीत तो म्हणाला,

'अच्छा. माझ्या मुलीचा असा अपमान होणार आहे हे जर मला अगोदर ठाऊक असते तर मी तुला तसेच ते हालअपेष्टांचे दुःखदायक मरण दिले असते. तुझ्या बापाने आपली सगळी संपत्ती तुला बरा करण्यासाठी दिली असती तरी मी तुला बरा केला नसता. परंतु मला असं सांग. तू माझ्या मुलीशी का लग्न करीत नाहीस ? ती कुरूप आहे असं तुला वाटतं कां ? छे, छे ? मी तुला खात्री देतो. ती तुझ्यापेक्षा कितीतरी सुंदर आहे.'

राजासुद्धा तिची स्तुती करू लागला. आपल्या मुलाला तो आग्रह करू लागला. तो म्हणाला, 'तुझ्या मनात आहे तरी काय ? तिला तू नाकारतोस याचे कारण तरी काय ? बोल. मी दिलेले माझे पवित्र वचन पाळ.'

सगळ्या बाजूंनी साबूरला आग्रह होत होता. आता त्याला वाटू लागलं की आपलं रहस्य आपण सांगितले पाहिजे. एका व्यापाऱ्याच्या मुलीशी आपण अगोदरच लग्न केलेलं आहे हे लोकांना कळलं पाहिजे. म्हणून त्याने आपल्या बापाचा हात आपल्या हातात घेतला. मग त्याला शांत करीत तो म्हणाला,

'मला क्षमा करा ! बाबा, या माणसाची मुलगी माझी बायको म्हणून मी स्वीकारू शकत नाही याबद्दल मला तुम्ही माफी केलीच पाहिजे. माझे अगोदरच एका तरुण मुलीशी लग्न झाले आहे आणि माझं तिच्यावर इतकं काही निस्सीम प्रेम आहे की तिला सोडून देण्याऐवजी मी मरण पत्करीन.'

नंतर मग तो नम्रपणे त्या अरब डॉक्टराला म्हणाला, 'मी तुझ्याकडे भीक मागतो. मी पूर्वी तसा होतो तसा मला पुनः कर. तुझ्या मुलीशी लग्न करण्यापेक्षा मला दुःख भोगू दे. मरण पत्करू दे. माझ्या लाडक्या पत्नीचा वियोग मी सहन करू शकत नाही.' नंतर मग आपली मान खाली घालून तो गप्प झाला.

आपल्या मुलाने गुप्तपणे लग्न केले आहे हे मुलाच्याच तोंडून बापाला कळले तेव्हा त्याला काय बोलावे हेच सुचेना. त्याने सर्वांची क्षमायाचना केली. मात्र यावेळी तो अरब डॉक्टर मुळीच रागावला नाही किंवा काहीच बोलला नाही.

त्याऐवजी त्याने आपल्या डोक्यावरचे पागोटे काढले. आपली खोटी दाढी उपटून टाकली. साबूर अजून खाली मान घालून बसला होता.त्याची प्रिया, ती सुंदर स्त्री जिची कहाणी त्याने नुकतीच सांगितली होती, ती त्याच्या पुढ्यात उभी आहे हे त्याने पाहिलेच नव्हते. मग ती स्त्री आपल्या गोड बायकी आवाजात म्हणाली, 'साबुर ! माझ्या लाडक्या ! मान वर करून माझ्याकडे पहा.'

आपल्या लाडक्या पत्नीचा गोड आणि नाजूक आवाज ऐकून त्याच्या दुःखी अवस्थेतही साबुरला आश्चर्य वाटले आणि त्याने मान वर केली तेव्हा तर काही काळ त्याची वाचा बंद झाली. त्याला त्या अरब डॉक्टराएवेजी त्याची बायको समोर दिसत होती. आपण स्वप्न पहात आहो असे त्याला वाटले. परंतु जेव्हा त्याने त्या स्त्रीचा हात आपल्या हातात घेतला तेव्हा तो आनंदाने ओरडला,

'अगे, माझ्या लाडके ! इतक्या दूरवर तू कशी आलीस अशी एकटीच ? फक्त माझे प्राण वाचविण्यासाठी का ?'

तो उठून उभा राहिला आणि त्याने तिला आपल्या बाहूत घेतले. त्या वृद्ध राजाने ते दृश्य पाहिले. नवरा बायकोचे मीलन झाले होते. त्याला आनंद झाला. आपली सून म्हणून त्या स्त्रीचे त्याने स्वागत केले. दुसऱ्या दिवशी राजाने बडी मेजवानी आपल्या राजवाड्यात दिली. त्या उत्सवप्रसंगी राजपुत्राचे लग्न जाहीर करण्यात आले. त्या रात्री खूप उशीरापर्यंत पाहुणे मंडळी आनंद लुटीत होती. लवकरच राजा नंतर निवृत्त झाला. राजपुत्राच्या डोक्यावर राजमुकुट चढला. एका व्यापाऱ्याची एक मुलगी राणी झाली. मुलीच्या बापालाही ती गोष्ट कळली. आपल्या धाकट्या मुलीचे भाग्य उजळलेले पाहून तो खूप आनंदीत झाला. मात्र धाकटीच्या दोन्ही मोठ्या बहिणी तिचा अधिकच द्वेष करू लागल्या. कारण अजून त्यांचे लग्न झालेले नव्हते.

(प्र. श्री. नेरूरकर : मॉरिशसच्या लोककथा)

# ५.१८. जादुची किटली

(जपानची लोककथा)

त्या डोंगराळ भागात तो वृद्ध माणूस एकटाच रहायचा. मोठा समाधानी माणूस. आपली इटुकलीशी झोपडी त्याने जाड कागदांच्या साहाय्याने भिंती उभारून सजवली होती. जपानमध्ये भूकंप फार होतात म्हणून तिथे चटकन आवरता येणारी अशी कागदाच्या भिंतीची घरे असतातच. काही ठिकाणी खिडक्यांना त्याने बाबूंच्या बारीक पट्ट्यांचे सुरेख पडदे केले होते, त्या खिडकीशी हा म्हातारा दिवसा तासन्तास उभा राही व समोरच्या डोंगरशिखरांचे, वनश्रींचे देखावे बघत राही. हीच त्याची करमणूक ! एक दिवस हा असाच बघत उभा होता तर त्याच्या पाठीमागे काहीतरी खडबड चाललेली त्याने ऐकली. पण खडबड, गडबड , बडबड करायला त्या घरात होतेच कोण मुळी ? ना एखादा मुलगा, ना एखादी पोरगी. तो दचकून बघायला लागला, तर काय ? एका कोपऱ्यात पत्र्याची एक जुनाट किटली ! किती वर्षांत तिला हवा अन सूर्यदर्शन झालं होतं देव जाणे, ही किटली आली कुठून ?

पण जाऊ द्या, माझ्या घरात आली आपोआप, आता मी ती वापरायला घ्यायला काय हरकत? नाहीतरी किटलीला आताशा बरेच पैसे पडतात. कुणाजवळ आहेत इथे? हीच बरी. पाणी तापवायला छान आहे. चहालाही छान !

त्याने किटली धुवून पुसून त्यात पाणी गरम केलं मात्र, एक मोठा चमत्कारच घडला ! त्यानं पाहिलं की किटलीच्या तोटीचं झालंय एक शेपूट आणि किटलीचा मोठा हाती पकडायचा कान ! त्यातून एका प्राण्याचं डोकं प्रकट होऊ लागलं आहे ! बघता बघता किटलीतून चार पाय बाहेर आले व जपानी लोक ज्याला 'तानुकी' म्हणतात असा एक छोटा लांडग्यासारखा प्राणी किटलीच्या जागी दिसू लागला तो उडी मारून शेगडीवरून खोलीत उतरला व पाळलेल्या कुत्र्याप्रमाणे खोलीभर हिंडू लागला ! त्यानं एक दोन पाण्याची भांडी व कपबशा

दंग्यानं फोडून टाकल्या. म्हातारा खूपच भ्याला अन् त्याने त्याला पकडून एका जुन्या पेटीत टाकून कुलूप लावले. किटलीतून प्रकट होणारा प्राणी ? छे छे, हा नको बुवा घरात. काहीतरी भुताटकी दिसतेय ही. विचित्र किटली कुणाला तरी देऊन टाकूया म्हणजे पीडा टळेल ! म्हाताऱ्याच्या डोक्यांत विचार खेळू लागले. मग त्यानं जिम्मू नावाच्या एका व्यापाऱ्याला बोलवून आणले. त्याला 'तानुकी' विकत घेतोस का म्हणून विचारले.

जिम्मू म्हणाला, 'मला आधी बघू दे तो कसला प्राणी आहे ते ! मग बोलू ! ' म्हाताऱ्याने पेटीचे कुलूप काढून पेटी उघडली तर काय ! फक्त तीच जुनी किटली पडलेली आपली. तानुकी नाही अन् कुणी नाही पेटीत ! ती किटली जादूचीच दिसत होती जशी.

म्हातारा म्हणाला, 'तो प्राणी पळून गेलेला दिसतो आहे जिम्मू. पण ही जुनी किटली तू विकत घेतोस ? चार पैसे आले तर तेवढेच मला उपयोगी पडतील.'

तो व्यापारी जुन्या वस्तू विकत घेऊन व्यापार करणारा होता. त्याने किटली स्वस्तात विकत घेतली व तो घरी आला. मनात म्हणत होता- छान मिळाली चला, जुन्या बाजारात उद्या हिला झकास किंमत येणार ! विकून टाकू. हिला बरीच किंमत येणार ! जिम्मू या विचाराने झोपताना खुदूखुदू हसत होता स्वतःशी .

मध्यरात्र झाली असावी. सगळीकडे सामसूम. अन् कसलातरी आवाज जिम्मूच्या झोपण्याच्या खोलीत होत होता. दाणदाण, धप्पधप्प. गुर्रर्र गुर्रर्र ऽऽ धाडधाड, खडमखडा ! हे आवाज कुठून येतात ? त्याला कुणी दिसलं नाही. तो परत झोपला. मग सकाळी चहा करावा म्हणून पाणी भरून त्याने किटली शेगडीवर ठेवली तर काय ! पाणी तापू लागलं तशी किटलीचे रूपांतर तानुकीत झाले ! तो नवलाने थक्क झाला. त्याने किटली झटपट उतरली, तशी तानुकी अदृश्य ! परत निवलेली किटली जशीच्या तशीच !

बापरे ! खात्रीनं ही किटली नाही, हे भूत आहे भूत ! मला शेजाऱ्याला विचारलं पाहिजे. तो मोठा विद्वान अन् शहाणा आहे, या द्वाड किटलीचं भूत मी कसे दूर

करू ? त्याने आपल्या शेजाऱ्याला ते खरेच विचारले. हा शेजारी त्याचा चांगला मित्र होता. मोठा सरळ मनाचा. त्याने ते सगळं ऐकून घेतलं. मग त्याला लहानपणी कुठे तरी ऐकलेली एक दंतकथा आठवली. जपानमध्ये कुठेतरी एक जादूची अद्भूत किटली आहे व युक्तीने वागणाराचं ती कल्याण करू शकते, अशी कथा होती ती. बहुतेक ही तीच किटली.

तो शेजारी म्हणाला, देवानं तुला फार मोठी देणगी दिली आहे मित्रा.

'कोणती ? तो लांडग्यासारखा तानुकी वाटेल तेव्हा उत्पन्न होतो की काय ? ही देणगी नव्हे, ही तर कटकट आहे रिकामी. तुम्हीच घ्या विकत ही ब्याद ! मला काय करायचा तो प्राणी ! '

'मित्रा, ऐकून तरी घे. हा प्राणी विचित्र असला तरी तो तुझं कल्याण करील. तुला कधी त्यानं ओरबाडलं, बोचकारलं आहे का ? बापडं पाळीव मांजर, कुत्रं असतं तसा हा तानुकी. त्यानं तुला इजा केलीय का ?

'नाही, तशी इजा नाही. थोडा वेळ प्रकट होतो येवढंच. '

'छान. इजा नाही ना तानुकी करत ? मग झालं तर. तू आता प्रवासाला जायची तयारी कर, मोठमोठी शहरं व निरनिराळे प्रांत यांतून हिंडून ये. तू अन् बरोबर तुझी किटली. बस दोघेच. '

'छान ! ती जुनी किटली कशाला बरोबर? मध्येच त्या किटलीतून तानुकी निघेल अन् मला खाऊन टाकील की ! '

'नाही, मित्रा, हा प्राणी माणसाळणारा आहे. या किटलीतला. अन् मी या किटलीबद्दल हेही ऐकलंच की हा प्राणी खेळ करू शकतो- खेळ म्हणजे नृत्य-तऱ्हेतऱ्हेचे ! '

'असं ? पण मला काय फायदा त्याचा ?

'जिम्मू, अरे अडाण्यासारखं काय बोलतोस ? तू याच्या कलेचं प्रदर्शनच जागोजाग मांड ! तानुकी तुझ्या आज्ञेत राहणारा असेल एखाद्या विश्वासू कुत्र्याप्रमाणे तर फार चांगलं . त्याला भिऊ नकोस, मित्र समज व त्याचा उपयोग करून घे ! '

विचार करीत जिम्मू परतला. घरी आल्यावर किटली त्याने गरम करायला ठेवली तशी तानुकी प्रकट झाला. जणू एखादा लांडगाच ! जिम्मू धीराने म्हणाला - 'तानुकी बेटा, बाहेर ये, मला नाच करून दाखव बरं ? '

काय नवल ! तानुकीला जणू त्याचे बोलणे समजलेच. तो मागल्या दोन पायांवर उभा राहिला व ऐटीत मागेपुढे पावले टाकीत नाचू लागला. तशी जिम्मूने एक छोटी कागदी छत्री उघडून त्याच्या हाती दिली.

'आता पंख्याचा नाच येतो कां ? बघू ?' जिम्मूने एक कागदी पंखा उघडून त्याच्या हाती दिला तशी तानुकी ऐटीने नृत्य करू लागला- इतके तालात की जिम्मुला राहवेना. त्याने आपले तारांचे वाद्य सुरू केले ! फारच झकास नृत्य होते. जिम्मू म्हणाला, तानुकी बेटा पुरे ! आता विश्रांती ! जिम्मू अगदी खूष झाला.'

आणि मग पहाता पहाता तानुकीचे रूपांतर त्या किटलीत झाले. ओहो, केवढी किमया होती त्या जुन्या किटलीची. अन् मग खरोखरच जिम्मुने आपल्या जादूच्या किटलीचे लहानसे प्रदर्शन भरवून गावोगाव हे खेळ केले. एक छोटा तंबू, त्यात एक टेबल, टेबलावर किटली, पलीकडच्या बाजूस शेगडी (किटली तापवायला) आणि शेजारी झकास पोशाख केलेला जिम्मू, आपले छोटे मेंडोलिन (तारांचे वाद्य) घेऊन नृत्याची साथ करायला उभा. तंबूवर तानुकीच्या नृत्याची रंगीत चित्रे चिकटवलेली व मोठा फळा दाराशीच, त्यावर लिहिलेले -

'या मंडळी, या व पहा ! तुमचा 'तानुकी' सुंदर नृत्ये करून दाखवीत आहे- ही अपूर्व संधी घालवू नका. प्रवेशाकरता फक्त चार छोटी नाणी. या ! पहा.'

अन् मग तानुकीचे नृत्य-पंखानृत्य व छत्रीनृत्य पहायला. जिम्मुचा डबा नाण्यांनी भरून येत होता.

'अहो ! किटलीतून तानुकी प्रत्यक्ष प्रकट होतो व तो नाचतो ! '

'अरे ! निर्जीव किटलीचे रूपांतर सजीव पशूत तुमच्या डोळ्यांदेखत घडतो? चला पाहून घेऊ या. '

लोक बोलत होते व तंबूत गर्दी करीत होते. तानुकी नाचत होता- परत

किटली होत होता व जिम्मूचे धान्याचे पोते नाण्यांनी भरत आले होते!

तसा जिम्मू व्यापारी मोठा नेकीचा अन् सच्चा होता स्वभावाचा. तानुकीमुळे त्याला खूपच धन मिळाले, तो चांगला श्रीमंत झाला. तरीही तो मनात म्हणे, 'हे सगळं धन जादूच्या किटलीचं अन् ती किटली दिली मला त्या गरीब म्हाताऱ्यानं. तेव्हा या श्रीमंतीचा खरा वाटेकरी तोच. त्याचा या द्रव्यावर जरूर हक्क पोचतो. मी क्षुद्र दहा नाण्यांना किटली घेतली होती विकत; पण या किटलीनं मला लाखोपती केलं, हे त्या वृद्धाचे उपकार मला कसे विसरता येतील? त्यालाही मी काही द्रव्य यातून दिलं पाहिजे, तेच योग्य!'

अन् खरेच एक दिवस एक लहानशी थैली सोन्याच्या नाण्यांनी गच्च भरुन घेऊन जिम्मू त्या म्हाताऱ्याकडे गेला व किटली आणि नाणी त्याच्यापुढे ठेवून हात जोडून म्हणाला, 'बाबा, आता ही किटली घ्या तुमची तुम्ही. हिनं माझं नशीब उदयाला आणलं खूप. त्यातून ही तुम्हाला भेट आहेत. थोडीशी सोन्याची नाणी!! घ्या बक्षीस!'

म्हातारा बाबा अगदी चकित झाला. बापड्याने शंभर तांब्यांचीसुद्धा नाणी एकदम पाहिली नव्हती तिथे झगझग करणारी शंभर सोन्याची नाणी? बापरे बाप! तो हसला व म्हणाला, 'बाबा जिम्मू, देव तुझं भलं करो. अरे अशी सज्जन नि कर्तव्याला जागणारी माणसं फार कमी असतात. पण मी झालोय् म्हातारा. मला आता किटली काय करायची? असे किती दिवस जगणार आहे वेड्या मी? तर ही तुलाच परत मी बक्षीस देतो-अन् ही नाणी मात्र बरं झालं आणलीत ते हं! आता मी यातून माझं झोपडं दुरुस्त करीन अन् औषधं आणीन थोडी मला. आपण मित्र झालो आहोत यापुढे कायमचे. बरे का, आणि तेही या जादूच्या किटलीमुळेच! जा सुखी हो!' खरेच ते! ती किटली होतीच तशी गुणांची!

(मालती दांडेकर : अतिपूर्वेच्या परीकथा (जपान))

# ५.१९. एक अंडे झाडू आणि एक पंखा

(मॉरिशसची लोककथा)

कोण्या एका काळी एक अत्यंत सुंदर मुलगी कोण्या एका देशात रहात होती. खूप लोक तिच्याशी आपले लग्न व्हावे अशी इच्छा करीत होते. त्यांच्यामध्ये काही सुंदर देखणे तरुण होते. काही श्रीमंत लोक होते आणि काही बडबडे लोक होते. त्या सर्वांना तिने नकार दिला.

लग्नासाठी इतक्या मागण्या येतात पण त्यातील एकही मागणी ती स्वीकारीत नाही हे पाहून तिचे आईवडील तिला टोचून बोलायचे. तिला मात्र तिच्या स्वप्नातला आदर्श तरुण हवा होता. ती स्वतःशीच म्हणायची,

'मी एका अशा राजपुत्राशी लग्न करीन. ज्याच्या अंगात त्याने सोन्याचा बिल्ला धारण केलेला असेल. त्याच्याकडे चार घोड्यांची सुंदर बग्गी असेल. त्या बग्गीला वर निळ्या साटीनचे आच्छादन असेल. त्या आच्छादनाला हिरे जोडलेले असतील.'

एके दिवशी आपल्या घराच्या आवरात एक बग्गी आल्याचा आवाज तिने ऐकला. तिने खिडकीतून पाहिले. काय पाहिले तिने ? चार घोड्यांची एक सुंदर बग्गी. तिच्यावर निळ्या साटीनचे आच्छादन. त्यावर हिरे जोडलेले. त्या बग्गीतून एक सुंदर देखणा तरुण खाली उतरला. तो घराच्या पडवीत आला. त्या मुलीच्या बापाला तो म्हणाला,

' मी एक राजा आहे. तुझ्या मुलीशी लग्न करायला मी आलो आहे. ती माझ्याशी लग्न करायला तयार आहे काय हे तिला विचार.'

यावेळी मात्र ती मुलगी म्हणाली,

'होय ! बाबा ! या राजाशी लग्न करायला मी तयार आहे.'

ते सगळे लोक एका मंदिरात गेले. तिथे तिचे त्या राजाशी लग्न लागले. लग्नानंतर ते नवविवाहीत दांपत्य त्या सुंदर बग्गीत बसले. बग्गीहाक्याने

घोड्यांना चाबूक मारला. बग्गी रस्त्याने दौडत चालली. रात्र अंधारी होती. तरीसुद्धा त्या बग्गीला कोणत्या कंदिलाच्या प्रकाशाची गरज नव्हती. कारण त्या हिऱ्यांचा प्रकाश त्या रस्त्यावर सगळीकडे पसरत होता.

ती तरुण नवरी आपल्या नव्या घरात अत्यंत आनंदात रहात होती. तिच्याकडे सुंदर सुंदर पोषाख होते. आरामशीर खोल्या होत्या. नक्षीदार खुर्च्या व पलंगपोस होते. प्रत्येक दिवशी सकाळी एका मोठ्या पेल्यातून तिला तिच्या बिछान्यातच कॉफी प्यायला मिळत होती.

तथापि तिची एक तक्रार होती. आपण सांबरे आणि रानटी डुक्कर यांच्या शिकरीसाठी जात आहोत असे सांगून वारंवार तिचा नवरा तीन चार दिवस तिला एकटीला सोडून गडप व्हायचा. एके दिवशी सकाळी ती कॉफी पीत होती. इतक्यात एका इवल्याशा उंदराने टुणकन उडी मारली. त्या तरुणीने त्या उंदराचा पाठलाग केला. परंतु उंदीर सारखा तिच्या हातातील कॉफीच्या पेल्याकडे आपल्या लुकलुक्या डोळ्यांनी पहायचा आणि पळ काढायचा. पुनः पुनः ती तरुणी त्या प्राण्याचा पाठलाग करायची. तेव्हा मात्र मध्येच पळता पळता थांबून तो इवलासा उंदीर तिला म्हणाला,

'माझा पाठलाग तू करू नकोस. मला भूक लागलीय. मला थोडी कॉफी प्यायला दे. परमेश्वर तुझे कल्याण करील.'

ती तरुण मुलगी दयाळू होती. तिने एक चमचाभर कॉफी त्या उंदराला प्यायला दिली. आठ दिवस निघून गेले. तरीसुद्धा तिचा नवरा परत आला नाही. दरम्यान प्रत्येक सकाळी त्या एकाकी तरुणीबरोबर कॉफी प्यायला तो उंदीर येत असे. अशा रीतीने दिवस उजाडला. ती तरुणी आणि तो उंदीर कॉफी पीत होते इतक्यात एक जासूद पत्र घेऊन आला. ते पत्र तिच्या नवऱ्याचे होते. त्या रात्री तो घरी परत येणार होता असे त्याने लिहिले होते. शिवाय त्याच्याबरोबर त्याचे काही मित्र येणार होते. आपल्या बायकोने त्या रात्री सुंदर जेवण तयार करावे असे त्याने आपल्या बायकोला लिहिलेले होते.

त्या तरुणीला खूप आनंद झाला. ती त्या उंदराला म्हणाली, 'मला आता

बिछ्यान्यातून उठले पाहिजे. माझ्या नोकरांना कामे वाटून दिली पाहिजेत.'

तेव्हा तो उंदीर म्हणाला, 'मी तुझ्यावर प्रेम करतो. कारण तुझे हृदय दयाळू आहे. तू मला कॉफी दिलीस. आता माझे म्हणणे ऐकून घे. मध्यरात्र झाली की, जागी हो. मग बंद दाराच्या फटीतून बाहेर पहा. उद्या, आपण त्याच्याबद्दल बोलू या.' असे बोलून तो उंदीर निघून गेला.

त्या रात्री तिचा नवरा आपल्या मित्रांसह घरी आला. मग ते सगळेजण खात होते, पीत होते, गाणी म्हणत होते,हसत खेळत होते, गप्पागोष्टी विनोद करीत होते. एकमेकांची थट्टा करीत होते. मग तो नवरा आपल्या बायकोला म्हणाला,

'आता खूप उशीर झालाय. तू खूप थकली भागलेली आहेस. तू झोपी जा. मी माझ्या मित्रांबरोबर मौजमजेत माझी रात्र घालवीन.'

ती त्याची बायको आपल्या शयनगृहात गेली. मध्यरात्र झाली तशी ती झोपेतून जागी झाली. दाराच्या फटीतून तिने बाहेर पाहिले. ती पौर्णिमा होती. चंद्र आकाशात विलसत होता. तिचा नवरा आणि त्याचे मित्र आवारात मधोमध नाचत होते. त्यांनी आपल्या अंगावरचे कपडे काढून टाकले होते. त्यांच्या शरीरावर लांब लांब केस उगवलेले होते. त्यांची सोन्याची पदके त्यांच्या पाठीवर लोंबकळत होती. त्यांना शेपट्या फुटलेल्या होत्या आणि त्या जमिनीवर लोळत होत्या. ते सगळे जण म्हणजे लांडग्यांचा एक कळप होता. ते पाहून त्या दुर्दैवी तरुणीला धक्का बसला. आपला तोल जाईल आणि आपण जमिनीवर कोसळून पडू या भीतीने तिने दाराला घट्ट धरुन ठेवले. नंतर काही वेळाने तिला एक गाणे ऐकू आले. ते लांडगे गात होते.

'तुझ्या बायकोला आपण खाऊन टाकूया
तुझ्या बायकोला आपण खाऊन टाकूया'

ते गाणे चालू असताना तिच्या नवऱ्याने उडी मारली आणि तो गाऊ लागला.

'आत्ता नाही, आत्ता नाही
लठ्ठ होऊद्या तिला आणखी,
लठ्ठ होऊद्या तिला आणखी'

त्या तरुणीला मरणाची भयंकर भीती वाटत होती. तीने बिछान्यावर पडून विचार करायला लागली. मग तिने आपले हातपाय चाचपून पाहिले. तिचे शरीर बारीक किडकिडीत आहे असे ते लांडगे मानीत होते हे पाहून तिला लाज वाटली. दुसऱ्या दिवशी काही तो उंदीर आला नाही. त्या गरीब बिचारीला काय करावे तेच कळेना. जेवणाच्या वेळी तिच्या नवऱ्याने तिला हाक मारली. परंतु ती जेवलीच नाही. आपण लठ्ठ होऊ अशी तिला भीती वाटत होती. आपले डोके दुखतेय असे सोंग तिने केले. तिचा नवरा तिला टाकून बोलला. तो जेवणाच्या खोलीत गेला. नंतर त्याने तिला एक केळ्यांचा घड पाठविला. तिची डोकेदुखी थांबली की त्याने तिला तो केळांचा घड खाऊन टाकायला सांगितला. ती तरुणी एकटीच होती. आपल्या मदतीला कुणी येत नाही याचे ती दुःख करू लागली. तिला रडू आले. ती म्हणाली, 'ए आई ! तू कुठे आहेस ? हे लोक मला खाऊन टाकणार आहेत. मला कोण वाचवणार आहे ? अरे इवल्या उंदरा ! तू कुठे आहेस ? माझ्यावर दया कर. त्यांच्या हातून मला मरू देऊ नकोस.

ती एकसारखी रडत होती. दुःख करीत होती. रात्र झाली होती. तिच्या नवऱ्याने आणि त्याच्या मित्रांनी आवारात आपला रानटी नाच सुरू केला होता. ती तरुणी भीतीने थरथर कापत होती. इतक्यात अकस्मात आपल्या पायाकडे कसला तरी आवाज तिने ऐकला,

'मी आलोय. तुझा इवलासा उंदीर, घाबरू नकोस. दाराखिडक्यांच्या फटी झाकून घे. नाहीतर आपण काय करीत आहोत ते ते पाहतील. '

ती तरुणी आपल्या बिछान्यावरून उठली. तिने दाराखिडक्यांच्या फटी झाकून टाकल्या. परंतु परतून जेव्हा तिने मागे पाहिले तेव्हा तिला आपली खोली प्रकाशमान झालेली दिसून आली. तिथे तो इवलासा उंदीर नव्हता. उलट त्याच्या जागी एक सुंदर परी उभी होती. तिने सुंदर पोषाख केला होता. त्या पोषाखाला लावलेल्या रत्नमाणकांचा तो अद्भुत प्रकाश त्या खोलीत पसरला होता. नंतर ती परी त्या तरुणीला म्हणाली,

'पळून जायला आत्ताची वेळ चांगली आहे. माझे ऐकून घे. मी तुला एक अंडे,

एक झाडू आणि एक पंखा देत आहे. हे घेऊन तू तुझ्या आईच्या घराकडे पळत जा. हे लांडगे तुझा पाठलाग करतील. ते तुला आता अगदी पकडणार असे वाटले की ते अंडे तू मागे वळून न पहाता तुझ्या पाठीमागे फेक आणि तशीच पळत रहा. काही काळ ते लांडगे आपोआपच थांबतील. परंतु नंतर पुनः ते तुझ्याजवळ येतील. त्यावेळी मात्र तू झाडू फेकून दे. आणि तिसरी वेळ येईल तेव्हा तू तो पंखा मागे फेक. तोपर्यंत तू तुझ्या आईच्या घराकडे जाऊन पोचलेलीसुद्धा असशील.'

त्या तरुणीने त्या परीचे आभार मानले. तिने दिलेल्या त्या तीन वस्तू तिने बरोबर घेतल्या. मागचे दार उघडून ती धूम पळत सुटली. ती निघून गेल्यावर त्या परीने तो केळ्याचा घड घेतला. तिने तो त्या तरुणीच्या साडीत गुंडाळला आणि त्या बिछान्यावर ठेवून दिला. त्यावर तिने चादर ओढून घेतली. खोलीत काळोख आहे असे पाहून तो लांडगा झालेला नवरा हळूच त्या खोलीत आला. तो चोरपावलांनी त्या बिछान्याकडे गेला. आपल्या बायकोचे अवयव तो चाचपून पाहू लागला. ती लठ्ठ झाली आहे कां ? ती खाण्यासासारखी झाली आहे कां ? हे तो पहात होता. त्याने तो केळ्यांचा घड हाताने दाबून पाहिला तेव्हा ती सगळी केळी चिरडली गेली. त्याला फार मोठे आश्चर्य वाटले. त्याने आपल्या हाताच्या बोटांचा वास घेतला तेव्हा त्याला केळयांचा वास आला. तो नंतर ओरडून म्हणाला, 'अगे, माझे प्रिये ! ऊठ. ऊठ.'

परंतु बिछान्यात कसलीच हालचाल झाली नाही. कुणा स्त्रीने उत्तर दिले नाही. तेव्हा त्या लांडग्याने मेणबत्ती पेटविली. बिछान्यात तो केळ्याचा घड त्याने पाहिला तो रागाने गुरगुरु लागला. त्याचे मित्र आत आले. आपल्या मित्राची बायको अदृश्य झालेली पाहून ते भयंकर रागावले. त्यांनी उघड्या दरवाजातून बाहेर उडी मारली. पळून जात असलेल्या त्या तरुणीचा त्यांनी पाठलाग सुरू केला.

एकसारखी सगळा वेळ ती तरुणी आपल्या आईच्या घराच्या दिशेने पळत होती. अकस्मात लांडगे आपल्या जवळ जवळ येत आहेत असे तिने ऐकले. ते

अगदी जवळ आले तेव्हा तिला परीचे शब्द आठवले. मागे वळून न पाहता तिने ते अंडे आपल्या पाठीमागे फेकले. ते जादूचे अंडे फुटले आणि ते एखाद्या समुद्रासारखे पसरले. ते लांडगे त्या समुद्राच्या किनाऱ्यावर अडकून पडले. आता ते काय करणार होते ? एक लांडगा मोठ्याने ओरडला,

'आपण हे सगळे पाणी पिऊन टाकूया. मग त्या तरुणीचा पाठलाग करूया. तिला पकडूया आणि खाऊन टाकूया.'

त्यांनी ते सगळे पाणी पिऊन टाकले. तो समुद्र सगळा कोरडा झाला. पुनः त्यांनी पळायला सुरुवात केली. परंतु त्या परीने दिलेले ते अंडे नासके कुजके होते. त्यामुळे त्यांच्या पोटात दुखू लागले. त्यांना उलट्या होऊ लागल्या. तेव्हा ते क्षणाक्षणाला वाटेत थांबत होते. तरीसुद्धा आपली पोटे ते थापटीत राहिले आणि त्यांना बरे वाटू लागले. त्यांच्या उलट्या थांबल्या. ते पुनः त्या तरुणीचा पाठलाग करू लागले. त्या तरुणीने पुनः त्यांची पावले आपल्या अगदी जवळ येताना ऐकली. ते तिला आता पकडणार इतक्यात तिने तो झाडू आपल्या पाठीमागे फेकला. 'फटाक' नावाच्या गवताचा तो झाडू होता. ते गवत सगळीकडे पसरले. त्याचे एक मोठे लांबरुंद अरण्यच तयार झाले. परंतु ते केवळ त्या 'फटाक गवताचेच अरण्य नव्हते. त्या अरण्यात एबनी, बॅन्झॉ, कोलोफेन, नाट यासारखे मोठमोठे प्रचंड वृक्षसुद्धा वाढलेले होते. त्यांची इतकी दाट वाढ झाली होती की, त्यातून त्या लांडग्यांना बाहेर पडायला कोणती वाटच मिळत नव्हती.

'चला आपण ही सगळी झाडे तोडून टाकूया. मग तयार होईल ते प्रचंड पठार ओलांडूया. त्या तरुणीला पकडूया आणि तिला खाऊन टाकूया.'

त्यांनी ते सगळे प्रचंड वृक्ष तोडून टाकले. मग ते प्रचंड पठार ओलांडले. आणि त्या तरुणीचा ते पाठलाग करीत तिच्या जवळ जवळ येऊ लागले. तिसऱ्यांदा त्या तरुणीने आपल्या अगदी जवळ येत असलेली त्या लांडग्यांची पावले ऐकली. तिच्या आईचे घर फार दूर नव्हते. ती आता आपल्या घरी जाऊन पोहोचणार होती. परंतु काहीही करून अधाशी लांडग्यांना थोपवून

धरणे आवश्यक होते. परंतु एखाद्या झंझावातासारखे ते तिच्या मागून येत होते. आता ते तिला अगदी पकडणार होते इतक्यात तिने तो पंखा आपल्या पाठीमागे फेकून दिला आणि ती पळत राहिली. तो पंखा खाली पडला. हंस पक्षाच्या पिसाऱ्यात त्या पंख्याचे रुपांतर झाले. नंतर ते पिसारे चाकासारखे गरागरा फिरू लागले. एका क्षणार्धात त्या जादूई पंख्याचे हजारो लाखो पंखे तयार झाले आणि ते वेगाने गरागरा फिरू लागले.

ते लांडगे इतक्या वेगाने धावत येत होते की, त्या पिसाऱ्यांची अणकुचीदार टोके भयानकपणे त्यांच्या अंगात घुसली. त्यांच्या अंगाची लाही लाही होऊ लागली.

ती तरुणी एकदाची आपल्या आईच्या घरी येऊन पोचली. आपल्याला कोणत्या कठीण संकटातून कसे बाहेर पडावे लागले याची सगळी कहाणी तिने आपल्या आईला निवेदन केली. आपली मुलगी सुखरुप परत घरी आलेली पाहून तिच्या आईला आनंद झाला. मग ती म्हणाली,

"मी आता उंदरांना कधीच ठार मारणार नाही. त्यांनी माझे सगळे टमाटे खाऊन टाकले तरी मला चालेल."

त्या रात्री अनेक मोठमोठ्या लोकांना निमंत्रण देऊन तिने बडी मेजवानी दिली आणि आपला आनंद व्यक्त केला.

(प्र. श्री. नेरूरकर : मॉरिशसच्या लोककथा)

# ५.२०. मुडिया पर्वत

(मॉरिशसची लोककथा)

खूप खूप वर्षे झाली. पोर्ट लुई शहरापासून दूरवरच्या एका गावात एक गवळी रहात होता. त्याचे नाव होते स्यन्तक. त्याचे आईबाप अतिशय गरीब होते. स्यन्तकच्या घरात थोड्या गाई होत्या. त्यांचे दूध विकायला तो दररोज घराबाहेर पडत असे. पहाटेला उठून तो आपल्या डोक्यावर दुधाचा हंडा घ्यायचा आणि दूरदूरच्या गावांना चालत जायचा. दूध विकून जी कमाई व्हायची यातून तो आपल्या आईबापाचे पोट भरीत असे. परंतु त्याची कमाई इतकी थोडी होती की कसेबसे त्यांना दोन वेळचे जेवळ मिळत असे.

स्यन्तक पहाटेच्या पहिल्या प्रहारालाच दूध विकण्यासाठी बाहेर पडायचा. अरण्यातून त्याला दुसऱ्या गावी जावे लागत असे. कधी कधी दूध विकता विकता संध्याकाळ व्हायची. मग स्यन्तक खूप उशिराने घरी यायचा. एके दिवशी काय घडले ? दूध विकता विकता स्यन्तक खूप दूर दूर गेला. घराकडे परत येतांना वाटेत त्याला रात्र झाली. चारी बाजूला घनदाट काळोख पसरला. आकाशात तारे चमकू लागले. चंद्र अजून उगवलेला नव्हता. रात्रीच्या अंधारात पायाखालची वाटसुद्धा दिसत नव्हती. स्यन्तक अरण्यात भटकत राहिला.

तो भटकत भटकत एका ताडाच्या झाडाकडे आला. त्या झाडाजवळ एक सुंदर तलाव होता. परंतु स्यन्तकला तो दिसला नाही. तो अतिशय दमून थकून गेला होता. तो तिथेच बसला आणि विश्रांती घेऊ लागला.गार गार वारे वहात होते. हवा थंड होती. थकूनभागून गेल्यामुळे लवकरच तो डुलक्या देऊ लागला. क्षणार्धातच त्याला गाढ झोप लागली. अर्धी रात्र होईपर्यंत तो तसाच झोपून राहिला. इतक्यात त्याच्या कानावर जोरजोराचे आवाज आले. त्याची झोप उडाली. विस्मयचकित होऊन त्याने सभोवार पाहिले. त्याला अतिशय नवल वाटले. चारी बाजूला दिव्य प्रकाश पसरलेला होता. त्या घनदाट अरण्याच्या

आणि पर्वतांच्या मधोमध दिव्य प्रकाशात झगमगणारे सरोवर पाहून तो चकित झाला. त्याचा त्याच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. त्याला वाटले आपण स्वप्न तर पहात नाही ना ? तो त्या झगमगणाऱ्या तलावाकडे पहातच राहिला. चारी बाजूला हवेत सुगंध भरून राहिला होता. वातावरणात कर्णमधुर संगीताचा गुंजारव होत होता. तलावाच्या काठावर सुंदर सुंदर पऱ्या नाच करीत होत्या आणि मधुर गाणी गात होत्या. त्यांच्या पायातील नूपुरांचा छुमछुम आवाज आणि वीणेचा झंकार अरण्यातील त्या शीतल वातावरणात अधिकच मोहक वाटत होता. स्यन्तक मंत्रमुग्ध होऊन संगीत ऐकत होता.

थोडया वेळाने नाचगाणे बंद झाले. पऱ्या भोवताली काहीतरी शोधू लागल्या. शोधत शोधत त्या गवळ्याजवळ आल्या. स्यन्तक अतिशय घाबरून गेला. त्याचे शरीर थरथर कापू लागले. जणू त्याच्या शरीरातील सगळी शक्ती निघून गेली होती. पऱ्यांच्या राणीने स्यन्तकाला पाहिले. ती त्याला म्हणाली, 'तू इथे काय करतोयस ?'

स्यन्तकचा कंठ गहिवरून आला. कापऱ्या आवाजात थांबून थांबून त्याने आपली करुण कहाणी परीराणीला सांगायला सुरुवात केली. तो म्हणाला,

' मी एक भुकेकंगाल गवळी आहे. दूध विकून मी आईबापाचं पोट भरतो. आज दूध विकता विकता पुष्कळ उशीर झाला आणि काळोखात वाट चुकत चुकत मी इथे आलो. थकून भागून गेल्यामुळे मला झोप आली.'

स्यन्तकची ती दुःखद कहाणी ऐकून त्या पऱ्यांना त्याची दया आली. त्यांनी स्यन्तकला क्षमा केली आणि दररोज तिथे त्या सरोवराकडे येण्याची त्याला परवानगी दिली. परीराणी त्याला म्हणाली,

'तू अतिशय गरीब आणि दुःखी आहेस. तू दररोज आमचे नृत्य पाहू शकतोस. परंतु आमच्याबद्दल तू कुणाला काही सांगावयाचे नाही. नाहीतर तू पाषाण बनशील.'

ते ऐकून स्यन्तक परीराणीला म्हणाला, 'मी तुला वचन देतो की, तुझी माझी भेट झाल्याची गोष्ट मी कुणाला तोंडाने तर सांगणार नाहीच पण खुणेनेसुद्धा

कधी सांगणार नाही. एवढे तो बोलतो तो तो पहातच राहिला. पऱ्या काही शोधता शोधता अन्तर्धान पावल्या होत्या. स्यन्तकही घरच्या रस्त्याला लागला. रात्रीच्या चौथ्या प्रहरी तो घरी येऊन पोहोचला.

आता स्यन्तकवर पऱ्यांची कृपा झालेली होती. दरदिवशी त्याच्या उत्पन्नात वाढ होत गेली. त्याची मिळकत दाम दुप्पटीने वाढत गेली. आता त्याच्या मातापित्यांचे जीवन मोठ्या आनंदाने जाऊ लागले. तो दिवसा सगळे दूध झपाट्याने विकून टाकीत असे आणि रात्री पऱ्यांचे नृत्य पहायला त्या सरोवरावर जात असे. स्यन्तकला संगीत आवडू लागले. वीणेचा झंकार, मृदंगध्वनी आणि नूपुरांची छुमछुम ऐकून सगळे काही तो विसरून जात असे. खूप उशिरापर्यंत पऱ्यांचे नृत्य पहात तो ताटकळलेला असे, नृत्य संपले की घरचा रस्ता तो धरीत असे आणि अर्धी रात्र उलटून गेल्यावर घरी येत असे.

स्यन्तकच्या मातापित्याला अतिशय काळजी वाटू लागली. ते त्याला पुन्हा पुन्हा विचारीत की इतकी रात्र होईपर्यंत तू कुठे असतोस ? स्यन्तक काहीच बोलत नसे. स्यन्तक रात्री उशिरा घरी येतो ही बातमी शेजाऱ्या पाजाऱ्यांमध्ये पसरली. लोकांना शंका येऊ लागली. नाना तऱ्हेच्या अफवा पसरू लागल्या. शेजारी पाजारी एकमेकाला सांगायचे, 'स्यन्तक आता जाणता झाला आहे. रात्रीचा तो घरी येत नाही. कुठे दुसरीकडेच रात्र घालवतो. आता त्याचे लग्न करून दिले पाहिजे.

त्याच्याबद्दल उठणाऱ्या नाना तऱ्हेच्या अफवा ऐकून स्यन्तकचे आईबाप हैराण झाले. त्यांनी मुलाचे लग्न करण्याचा घाट घातला. दुसऱ्या एका गावी जाऊन त्यांनी एक मुलगी पाहिली. दोन्ही कुटुंबांचे नाते जमविले. लग्नाचा शुभमुहूर्त काढण्यात आला. दोन्ही कुटुंबांनी एकमेकाला आमंत्रण पाठविले. धूमधाम करीत लग्नाची तयारी सुरू झाली. त्या काळात वाहने नव्हती. लोक पायीच एका गावाहून दुसऱ्या गावाला जात येत होते. त्यामुळे लग्नाची वरातसुद्धा पायीच निघत असे. स्यन्तकच्या लग्नाची वरात निघाली. अरण्यातील वाटेने ती दुसऱ्या गावी जात होती. चालता चालता वराती मंडळींचे पाय थकले. विश्रांतीसाठी ती मंडळी त्याच सरोवराच्या काठावर थांबली.

सरोवराच्या काठी ज्या झाडाखाली स्यन्तक बसला होता तिथेच ती मंडळी बसली. तिथेच त्या पऱ्यांचे नृत्य पहायला स्यन्तक येत असे. वराती मंडळी पुनः पुनः स्यन्तकला विचारीत होती की रात्री तो कुठे रहात होता ? पुनः पुनः विचारित राहिल्यामुळे स्यन्तकला रहावले नाही. त्याने रात्री आपण याच सरोवरावर कसे येतो आणि पऱ्याचे नृत्य कसे पहातो ती गोष्ट त्यांना सांगितली. एका वराती माणसाने उत्सुकतेने त्याला विचारले. 'जिथे त्या पऱ्या येऊन नृत्य करतात ती जागा आम्हाला दाखव ना.'

स्यन्तक आज नवरा मुलगा झाला होता. तो पिवळे धोतर नेसला होता. आणि त्याच्या डोक्यावर फेटा बांधलेला होता. तो वराती मंडळींचा मुकुटमणी होता. धुंदीत येऊन तो पऱ्यांची गोष्ट सांगू लागला. परीराणीला आपण दिलेले वचन त्याला आठवले. परंतु पऱ्यांच्या बरोबर त्याची घनिष्ट मैत्री झाली होती. त्याला विश्वास वाटत होता की पऱ्या आपल्याला क्षमा करतील. खुषीत येऊन तो वराती मंडळींना म्हणाला, 'चला, तुम्हाला त्या जागेवर घेऊन जातो जिथे पऱ्या मध्यरात्रीला नृत्य करतात.'

तिकडे जाण्यासाठी त्याने पाऊल उचलललेे आणि हाताने तो कुठे जायचे हे दाखवीत असतानाच एक भयानक गर्जना झाली. आकाश काळेठिक्कर पडले. काळेकाळे ढग तुफान वेगाने धावू लागले. वादळी वारे वाहू लागले. वातावरण अत्यंत भेसूर व भीषण झाले. विजेचा कडकडाट होऊ लागला. इतक्यात वातावरणात शब्द उमटले, 'अरे विश्वासघातक्या, तू आपले दिलेले वचन मोडलेस. तुझे पाय जमिनीत घुसोत. तुझे हात तुटोत. तू पाषाण बन.'

त्या क्षणालाच स्यन्तकचे हात तुटून पडले. त्याचे पाय जमिनीत घुसले. तो पाषाण बनला. हा प्रकार पाहून वराती मंडळी घाबरली व आपापल्या गावाकडे पळू लागली. तेव्हापासून हातपाय नसलेला मुडिया पर्वत समाधी लावून आपल्या पापाचे प्रायश्चित्त घेत आहे.

(प्र. श्री. नेरूरकर : मॉरिशसच्या लोककथा)

# ५.२१. उडणारा घोडा

(मॉरिशसची लोककथा)

खूप वर्षांपूर्वी एक राजा राज्य करीत होता. त्याला चार मुलगे होते. पहिल्या तीन मोठ्या भावांचं धाकट्या राजकुमाराशी कधी पटत नसे. तिन्ही भाऊ लबाड होते. आपल्या बापाच्या प्रत्येक म्हणण्याला ते होकार द्यायचे. धाकटा राजकुमार मात्र बापाचे प्रत्येक म्हणणे ऐकून घ्यायचा. नंतर त्याचा विचार करायचा. मग आपल्या मनाला व बुद्धीला जर आपल्या बापाचे म्हणणे पटले तर तो हो करायचा किंवा नाही म्हणायचा. राजाला आपला हा धाकटा मुलगा उद्धट आहे असे वाटत असे आणि म्हणून तो नेहमी उदास होत असे.

एके दिवशी राजाने आपल्या चारही राजकुमारांना आळीपाळीने बोलावले व प्रश्न केला, 'मुलांनो, तुम्हाला कुणाच्या भाग्यामुळे खायला प्यायला व सुंदर सुंदर पोषाख करायला मिळतेय?'

'महाराज, आपल्या भाग्यामुळेच मला खायला प्यायला आणि अंगावर घालायला कपडेलत्ते मिळतात.' सर्वात मोठा राजकुमार होता त्याने नम्रतेने उत्तर दिले.

राजकुमाराचे उत्तर ऐकून राजा हर्षभरीत झाला. नंतर राजाने दुसऱ्या व तिसऱ्या राजकुमाराला तोच प्रश्न विचारला. त्या दोन्ही राजकुमारांनी तेच उत्तर दिले. धाकट्या राजकुमाराची पाळी आली तेव्हा तो म्हणाला, 'महाराज, मी माझे भाग्य जसे आहे त्या जोरावर खायला प्यायला व अंगावर घालायला कपडेलत्ते मिळवितो.'

ते उत्तर ऐकून राजाच्या अंगाचा तिळपापड झाला. राजकुमार तिथून निघून गेल्यावर त्याने राजमंत्र्याला बोलाविले. ताबडतोब त्याने त्याला एक लोखंडी पिंजरा तयार करण्याचा हुकूम केला.

काही दिवसानंतर तो पिंजरा तयार झाला. राजाने धाकट्या राजकुमाराला

पकडून आणले आणि त्या पिंजऱ्यात बंद करून ठेवले. नंतर तो पिंजरा राजमंत्र्याने एका घनदाट अरण्यात नेऊन ठेवला. राजा स्वतःशीच म्हणाला,

'आता पाहूया त्याचे भाग्य आहे म्हणून त्याला खायला प्यायला आणि अंगावर घालायला कपडे आणि रहायला राजवाडा मिळतो का ? '

एके दिवशी योगायोगाने एक राजा शिकारीसाठी त्या अरण्यात गेला होता. तो तिथून जाता जाता त्याची दृष्टी त्या पिंजऱ्यातील राजकुमारावर पडली. राजकुमाराचा निष्पाप चेहरा पाहून राजाला त्याची दया आली. त्याने आपली तलवार काढून एका झटक्यात त्या पिंजऱ्याचे दार उघडले आणि त्या राजकुमाराला आपल्या बरोबर घेऊन तो आपल्या राजवाड्यात आला.

राजाला एक मुलगी होती. आता राजवाड्यात दोन समान वयाचे राजकुमारी आणि राजकुमार एकत्र राहू लागले. अशा रीतीने काही काळ निघून गेला. राजकुमार व राजकुमारी तरुण वयात आली. याच वेळी एक घटना घडली. एके दिवशी त्या राजवाड्यात एक सिद्ध योगी महाराज आले. राजकुमाराने त्या योग्याची खूप सेवाचाकरी केली. योगीमहाराज जायला निघाले तेव्हा त्या राजकुमाराला म्हणाले,

'मुला, तू माझी खूप सेवा चाकरी केलीस. तुझ्या सेवेने मी प्रसन्न झालो आहे. तुला वर देण्याची माझी इच्छा आहे. माग ! तुला काय पाहिजे ?'

पहिल्यांदा त्या राजकुमाराने त्या योगीमहाराजांना टोलवाटोलवीची उत्तरे दिली. परंतु योगी महाराज त्याचे काहीच ऐकून घेईनात. तेव्हा तो राजकुमार म्हणाला, 'ठीक आहे. महात्मे हो. मला तुम्ही अशी शक्ती द्या की ज्यामुळे मला जीवजंतू आणि पशू पक्षी यांची भाषा समजू शकेल.'

योगी महाराजांनी आपले दोन्ही हात आकाशाच्या दिशेने वर उचलले. मग ते म्हणाले, 'तुझी इच्छा पूर्ण होवो. जा तुला ती शक्ती क्षणाचाही वेळ न लागता प्राप्त होईल. मात्र एक गोष्ट लक्षात ठेव. ज्या दिवशी हे गुपित तू प्रकट करशील त्या दिवशी आकाशातून एक लाल साप येईल आणि तो तुला दंश करील. मग तू मरण पावशील.' असे बोलून ते योगीमहाराज निघून गेले. राजकुमार प्रसन्न

चित्ताने परत राजवाड्यात आला.

दिवसामागून दिवस जात होते. राजकुमार आणि राजकुमारी आता लग्नाला योग्य झाली होती. राजाच्या मनात विचार येत होते,'मला कुणी मुलगा नाही. मी मेल्यानंतर माझ्या या राज्याच्या उत्तराधिकारी कोण होणार ? माझ्या एकुलत्या एक मुलीचे लग्न या तेजस्वी राजकुमाराशी मी करून दिले तर काय नुकसान होणार आहे ? मी मेल्यानंतर तोच या राज्याच्या उत्तराधिकारी होईल.'

राजाने दुसऱ्या दिवशी आपल्या मनातील विचार त्या राजकुमाराला सांगितला. राजकुमार राजाला वडिलांसमान मानीत होता. त्यामुळे राजाच्या विचाराचा अवमान करण्याची त्याला इच्छा नव्हती. तो म्हणाला,

'तुम्ही मला जीवदान दिले. आपली आज्ञा पाळणे हा माझा धर्म आहे. आपण जे काही म्हणाल तसेच होईल.'

राजकुमाराचे उत्तर ऐकून राजा अत्यंत प्रसन्न झाला. त्याने राजपुरोहिताला बोलाविले आणि लग्नाचा शुभ मुहूर्त काढण्याचा हुकूम केला. त्यानंतर लग्नाची तयारी सुरू झाली. देशोदेशीच्या पाहुण्यांना आमंत्रणे पाठविण्यात आली. ठरल्याप्रमाणे राजकुमार आणि राजकुमारी यांचे लग्न मोठ्या धामधुमीने झाले. या लग्नसमारंभाला देशोदेशीचे आणि परदेशाचे शेकडो राजेमहाराजे आले होते. सर्वांनी वधूवराला आशीर्वाद दिले. या निमित्ताने राजाने सर्वांना एक मोठी मेजवानी दिली. इतर राजे लोकांबरोबर राजकुमारही पंक्तीत जेवायला बसला. चांदीच्या ताटात नाना तऱ्हेची पक्वान्ने वाढली जात होती. सगळे लोक जेवणाचा आनंद मनसोक्त लुटीत होते इतक्यात त्या राजकुमाराची दृष्टी आपल्या ताटात खाली जमिनीवर गेली. तिथे दोन मुंगळे आपापसात बोलत होते :

एक लंगडा मुंगळा पुरीचा एक तुकडा आपल्या तोंडात घेऊन आपल्या बिळाकडे जात होता. दुसरा मुंगळा त्याच्या तोंडातील तो तुकडा काढून घेण्याचा प्रयत्न करीत होता. तेव्हा तो लंगडा मुंगळा म्हणत होता, 'भैय्या, मला लंगड्याला तू का हैराण करतोस ? जा. राजाच्या भटारखान्यात जा. तिथे

अन्नाचे ढीग पडले आहेत.'

लगेच तो दुसरा मुंगळा भटारखान्याकडे धावत निघाला. राजकुमाराला मुंगळ्यांचा तो संवाद ऐकून हसू आले. तो पोट धरधरून हसला. राजकुमाराच्या आसपास जे लोक बसले होते त्यांनी राजकुमाराला हसताना पाहिले आणि त्यांना आश्चर्य वाटले. राजाला ते राजकुमाराचे वागणे अयोग्य वाटले. त्याने राजकुमाराला विचारले, 'मुला, तुला कशामुळे हसू आले ते आम्हाला तरी सांग.'

राजकुमाराने काहीच उत्तर दिले नाही. त्यानंतर राजाने राजकुमारीलाही राजकुमार कसा अचानक हसत होता ती गोष्ट सांगितली. राजकुमारीने आपल्या पतीला त्याच्या हसण्याचे कारण विचारले. राजकुमाराने आपल्या पत्नीच्या आग्रहाकडेही दुर्लक्ष केले. त्यामुळे राजा आणि राजकुमारीच्या मनात संशय निर्माण झाला. राजकुमाराच्या हसण्यात कोणते तरी रहस्य आहे आणि राजकुमार ते रहस्य कुणाला सांगत नाही असे त्यांना वाटू लागले. त्याचा परिणाम असा झाला की त्या दिवसापासून तो राजा आणि ती राजकुमारी त्याला हट्टाने तो का हसत होता हे विचारू लागली.

राजकुमार मोठ्या संकटात पडला. योगी महाराजांनी दिलेली सूचना त्याला आठवत होती. 'गुपित प्रकट होताच आकाशातून लाल साप येऊन तुला दंश करील.'

परंतु ते रहस्य तो त्या राजवाड्यात किती दिवस लपवून ठेवणार होता? त्याला नाहीतर त्या राजवाड्यात सुखाने व चैनीने कसे रहाता येणार होते? ही परिस्थिती त्याचा छळ करीत होती. एके दिवशी त्याने राजकुमारीला सांगितले,

'माझ्या हसण्याचे कारण विचारून तुम्ही लोक माझ्या मृत्यूला आमंत्रण देत आहात. जर आपणा सर्वांची हीच इच्छा असेल तर काही दिवसांची मला सवड द्या.'

राजाने राजकुमाराला दहा दिवसांची मुदत दिली. चिंतातुर होऊन राजकुमार इकडे तिकडे भटकत राहिला. एके दिवशी भटकत भटकत राजकुमार एका जत्रेच्या ठिकाणी आला. त्या जत्रेत निरनिराळ्या तऱ्हेच्या

वस्तू, पशू, पक्षी विकण्यासाठी ठेवलेले होते. त्यामध्ये एक खंगलेला अशक्त असा घोडा होता.त्याला कोणीही विकत घेत नव्हता. घोड्याला पहाताच राजकुमाराने ओळखले की हा पंख असलेला घोडा आहे आणि तो आकाशात उडू शकतो. त्याने ताबडतोब त्या घोड्याला विकत घेतले आणि त्याला तो राजवाड्यात घेऊन आला.

तो घोडा राजकुमाराला म्हणाला, 'तू माझी सेवा कर. मी तुला प्रत्येक संकटातून वाचवीन.'

राजकुमाराने घोड्याची खूप सेवा केली. दहा दिवसानंतर घोडा टुणटुणीत झाला. एक तलवार घेऊन राजकुमार त्या घोड्यावर स्वार झाला आणि तो राजा आणि राजकुमारीला म्हणाला,

'मेजवानीच्या दिवशी दोन मुंगळ्यांना मी आपापसात बोलताना ऐकलेले होते. तेव्हा मला अचानक हसू आले होते. योगी महाराजांमुळे पशुपक्ष्यांची भाषा जाणण्याची शक्ती मला प्राप्त झाली आहे.'

राजकुमार एवढे बोलला नाही तोच सगळे आकाश लाल लाल झाले. जोरजोराने वारे वाहू लागले. वीज गर्जना करू लागली. त्याच वेळी आकाशात एक भयानक लाल साप दिसू लागला. तो राजकुमाराला दंश करण्यासाठी आपला फणा उभारून येत होता. राजकुमाराने घोड्याला टांग मारली. तो घोडा राजकुमाराला आपल्या पाठीवर घेऊन आकाशात उडाला. कितीतरी काळ राजकुमार आणि नाग यांच्यामध्ये भयंकर युद्ध झाले. शेवटी राजकुमाराने तलवारीच्या एका झटक्याने त्या नागाचे डोके उडवले. आकाशातून रक्ताचे थेंब आणि सापाच्या शरीराचे तुकडे खाली पृथ्वीवर पडू लागले. राजा आणि राजकुमारी हा सर्व प्रकार आश्चर्यचकित होऊन पहात राहिली.

सापाला मारल्यानंतर तो पंखवाला घोडा राजकुमाराला घेऊन मोठ्या वेगाने समुद्र ओलांडून पलीकडे जात होता. तेव्हा तो खूप थकला. एका रमणीय तलावाच्या काठावर तो उतरला आणि तिथेच बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळला. तो राजकुमाराला म्हणाला,

‘ मी पुष्कळ थकलो आहे, राजकुमार ! एक महिना मी याच अवस्थेमध्ये राहीन, मी धडधाकट होईन तेव्हा तुला पुनः तुझ्या राज्यात घेऊन जाईन. एक महिन्याच्या आत जर तुझ्यावर कोणते संकट कोसळले तर माझी बहीण कामधेनू तुझे रक्षण करील. ‘

तलावाच्या जवळच कामधेनू चरत होती. राजकुमाराने इकडे तिकडे पाहिले आणि तलावाच्या दक्षिण दिशेकडे तो जाऊ लागला. कामधेनूने त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. ती म्हणाली, ‘तिकडे जाऊ नकोस, राजकुमारा.'

राजकुमाराने तिच्या म्हणण्याकडे लक्ष दिले नाही. तो तिकडेच चालत राहिला. थोडे अंतर चालून गेल्यावर राजकुमाराने पाहिले की तलावामध्ये अनेक सुंदर सुंदर पऱ्या आंघोळ करीत होत्या. त्यांचे कपडे तलावाच्या काठावर पडलेले होते. राजकुमाराला गंमत करण्याची हुक्की आली. त्याने पऱ्यांचे ते कपडे उचलले आणि तो पळू लागला. पऱ्यांची एक राणी होती. तिने कपडे घेऊन पळून जाताना राजकुमाराला पाहिले. तिने आरडाओरडा सुरू केला.

‘अरे एक राजकुमारा, हे कपडे सुद्धा घेऊन जा. इकडे पहा. या कपड्यांकडे वळून तर पहा.’ राजकुमाराने पाठीमागे वळून पाहिले. त्याच वेळी तो जळून भस्म झाला.त्याचा आत्मा मात्र आकाशात उडत राहिला. तेव्हा कामधेनूने त्याला आपल्या तोंडात पकडला आणि आपल्या शक्तीने तिने त्या राजकुमाराला जिवंत केले. ती राजकुमाराला म्हणाली, ‘पऱ्यांनी सांगितले म्हणून कधी मागे वळून पाहू नये.’

दुसऱ्या वेळी सुद्धा राजकुमाराने पऱ्यांचे कपडे उचलले आणि जोरजोराने तो धावू लागला. लाखो वेळा पऱ्यांनी ओरडून सांगितले तरी राजकुमाराने मागे वळून पाहिले नाही. राजकुमाराचा पाठलाग करीत त्या पऱ्या एका सुंदर राजवाड्यात येऊन पोचल्या. हा पऱ्यांचा राजवाडा होता. राजकुमार त्या राजवाड्यात दडून राहिला. पऱ्यांनी त्याला खूप शोधले. पण तो त्यांना सापडला नाही. तेव्हा पऱ्यांच्या राणीने त्याला क्षमा केली आणि आपले कपडे त्याच्याकडे मागितले. आपल्याला क्षमा केली आहे हे पाहून राजकुमार बाहेर

आला आणि त्याने त्या पऱ्यांना त्यांचे कपडे परत दिले.

पऱ्यांच्या राणीने राजकुमाराला त्या राजवाड्यात नाना तऱ्हेने जेवण दिले. जेवण झाल्यावर राजकुमार जायला निघाला तेव्हा ती पऱ्यांची राणी त्याला म्हणाली, 'तुझ्यावर कोणतेही संकट आले तरी तू माझी आठवण कर. मी तुझ्या मदतीला धावून येईन.'

पऱ्यांचा पाहुणचार घेऊन राजकुमार त्या तलावाच्या काठावर बेशुद्ध पडलेल्या घोड्याजवळ आला. त्याने पऱ्यांच्या राणीची आठवण केली. त्याच क्षणाला पऱ्यांची राणी त्याच्या पुढ्यात येऊन उभी राहिली. राजकुमार म्हणाला, 'माझ्या घोड्याला आत्ताच या क्षणाला धडधाकट कर. मला लवकर त्वरेने घरी जायचे आहे.'

पऱ्यांच्या राणीने मूर्च्छित पडलेल्या त्या घोड्यावर तलावातील पाणी शिंपडले. घोडा थरथरला आणि टुणटुणीत होऊन उभा राहिला. राजकुमाराने परीराणीला धन्यवाद दिले आणि घोड्यावर स्वार होऊन त्याने त्याला टांग मारली. तो पंखवाला घोडा राजकुमाराला घेऊन राजवाड्यात आला. राजवाड्यात सगळे लोक रडत होते. राजा आणि राजकुमारी आपण उगीचच हट्ट धरला म्हणून पश्चाताप करीत होती. त्यांनी राजकुमाराला त्या घोड्यासह राजवाड्यात प्रवेश करताना पाहिले. त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. धावत पुढे जाऊन राजाने राजकुमाराला आलिंगन दिले आणि राजकुमारीने त्याच्या पायावर लोटांगण घालून घेतले आणि ती त्याची क्षमा मागू लागली. त्यानंतर तो राजकुमार त्या राजवाड्यात आनंदाने राहू लागला.

काही दिवसानंतर राजाने संन्यास घेतला आणि त्या राजकुमाराला आपल्या राज्याचा उत्तराधिकारी केला. राजाला पाहताना राजकुमाराला आपल्या बापाची आणि तिन्ही भावांची आठवण होत असे. त्याना भेटायला तो अधीर झाला.

मग काय ? राजाच्या थाटामाटात राजकुमार आपल्या बापाला भेटायला त्याच्या राज्यात गेला. राजकुमारी सुद्धा त्याच्याबरोबर होती. त्या राज्यातील

सगळी स्थिती बदलून गेली होती. त्याचा नबाप भिकेकंगाल झाला होता. त्याच्या तिन्ही भावांनी राज्याच्या सर्वनाश केला होता. आता ते तिघेही मजुरी करून आपले पोट भरत होते. त्यांची ती करुण अवस्था पाहून राजकुमाराला दया आली. त्याच क्षणाला त्याने परीराणीची आठवण केली. परीराणी त्याच्या पुढ्यात येऊन उभी राहिली. राजकुमार तिला म्हणाला,

'माझ्या बापाचे राज्य पूर्वी जसे होते तसेच पुनः करून दे.'

परीराणीने आपल्या दिव्य शक्तीने राजकुमाराच्या बापाचे राज्य पूर्वी जसे होते तसे करून दिले. हा क्षणात झालेला चमत्कार पाहून राजाने आणि त्या तिन्ही राजकुमारांनी धाकट्या राजकुमाराची क्षमा मागितली. धाकट्या राजकुमाराने सर्वांना प्रेमाने आलिंगन दिले. त्यानंतर धाकटा राजपुत्र आपली राणी आणि सैन्य घेऊन आपल्या राज्यात परत आला आणि चिरकाल आनंदाने राज्य करू लागला.

(प्र. श्री. नेरूरकर : मॉरिशसच्या लोककथा)

# ५.२२. अजगरभाईची गोष्ट

(उझबेकिस्तानची लोककथा)

एक होता अजगरभाई नावाचा माणूस. नावासारखाच तो सुस्त होता. पाळण्यातसुद्धा त्यानं कधी हातपाय हालविले नसावेत; म्हणून आई-बापांनी त्याचं ते नाव ठेवलं असावं. त्याला काम म्हणून नको असे. त्याची अशी गोष्ट सांगतात की एकदा तो एका बोरीच्या झाडाखाली झोपला असताना झाडावरनं एक पिकलेलं टपोरं बोर खाली पडलं. ते अगदी हातापाशीच पडलं होतं. पण हात उचलावा कुणी, बोर घ्यावं कुणी ; अन् तोंडात टाकावं कुणी ? त्याच वेळी कुणी एक घोडेस्वार तिकडून चालला होता. याला झाडाखाली झोपलेला बघून तो थांबला. अजगरभाईनं त्याला मानेनं 'इकडं ये' म्हणून बोलावलं. स्वाराला वाटलं, तो आजारी पडलाय् वाटतं, म्हणून तो घोड्यावरून उतरला आणि त्याच्यापाशी गेला. विचारलं, 'काय रे बाबा, काय झालंय् तुला ? माझ्या जोगतं काही काम असलं तर सांग. ' अजगरभाई म्हणाला, 'तुमच्या जागेतच काम आहे. हे बोर एवढं उचलून माझ्या तोंडात टाका. 'स्वार चकितच झाला. तो तसाच मागं फिरला अन् घोड्यावर स्वार होऊन निघून गेला. अजगरभाई म्हणतो, 'काय आळशी माणूस हा ! ' गोष्ट खरी की खोटी देव जाणे; पण असा हा अजगरभाई होता !

जंगलात एक जोगी राहत होता. एकदा अजगरभाईशी त्याची गाठ पडली. भाई जोगीला म्हणाला, 'काय हो, देवाच्या घरी सूर्य असूनसुद्धा अंधार ?'

जोग्यानं विचारलं,' का रे बाबा, काय झालं ? '

भाई म्हणाला, 'बघा ना, मला इतकं झकास पोट आहे, इतकी झकास भूक आहे, अन् असं असूनसुद्धा मी भुकेनं मरावं ? हे आपल्याला नाही बुवा पसंत !'

' मग तुला काय पसंत आहे ? '

'पोट भरून खावं हे आपल्याला आवडतं!'

'मग मेहनत-मजुरी कर, काम कर, भरेल तुझं पोट. सृष्टीचा नियमच असा आहे की आपण काम करावं, आणि पोटभर खावं.'

भाई म्हणाला, 'हा नियम चुकीचा आहे. मेहनत करावी हे मला कबूल नाही. पण तरी पोट भरलं पाहिजे; म्हणून जोगी बुवा, मला असं वरदान द्या, की मेहनत न करता माझं पोट भरेल!'

जोगी म्हणाला, 'आज मध्यरात्री वादळ होईल अन् विजा चमकतील. त्या वेळी जर तू उघड्या आभाळाखाली उताणा पडून राहाशील तर विजेच्या तीन चमकाऱ्यांनी तुझ्या तीन इच्छा पुऱ्या होतील. बोल, तुझ्या काय तीन इच्छा आहेत?'

' माझी पहिली इच्छा-' क्षणभर थांबून अजगरभाई म्हणाला, 'पहिली इच्छा पोट भरावं अशी आहे.' थोडा वेळ थांबून तो म्हणाला, ' माझी दुसरी इच्छा - पोट पुरेपूर भरावं अशी आहे. अन् तिसरी इच्छा', तो खूप विचार करून म्हणाला, पोट भरावं ही आहे.'

जोगी म्हणाला, 'ठीक आहे. तुझ्या या तिन्ही इच्छा पुऱ्या होतील.'

खूष होऊन अजगरभाई घरी आला. रात्री घराच्या अंगणात तो जमिनीला पाठ लावून अन् आकाशाकडे तोंड वर करून पडला. झोप येऊ नये म्हणून वरचेवर पापण्या बोटांनी उचकटत राहिला.

मध्यरात्र झाली. आकाशात ढग जमा झाले. पावसाचे थेंब पडू लागले. वारा जोरजोरानं वाहू लागला. अजगरभाईला वाटलं,की आता विजेच्या चमका होतील. एवढ्यात अचानक त्याच्या पोटात शूळ उठला. पोटात इतक्या कळा येऊ लागल्या की त्याला दुसरं काही सुचेचना. एकसारखा पोट चोळीत म्हणू लागला,'मरो हे पोट! देवा, काढून घे हे पोट!'

आणि त्याच क्षणी वीज चमकली. त्याची ती इच्छा पूर्ण झाली.पाहतो तो पोट कुठाय ? पोटाच्या जागी फक्त खबदाडीसारखा खड्डा पडलेला होता. 'अरे देवा, हे काय झालं ? माझं पोट कुठं गेलं ?' पोटाशिवाय मला अजगर म्हणून

कोण ओळखणार ? पोट, पोट पाहिजे, मला मस्त मोठ्ठं पोट पाहिजे ! तो ओरडत सुटला.

आणि त्याच क्षणी वीज दुसऱ्यांदा चमकली. त्याची ही दुसरी इच्छा पुरी झाली. पुनः पोट आलं. ते पूर्वीपेक्षा खूप मोठं, समुद्राच्या पाण्यातून बेट हळूहळू वर यावं तसं ते हळूहळू वर आलं. नगाऱ्यासारखं पोट ! त्याच्या पोटापुढं खालचे पाय दिसेनासे झाले. त्यानं उभं राहण्याचा प्रयत्न केला; पण जमेना. पोटाचा डेराच एवढा मोठा होता. 'अरे, एवढं मोठं पोट घेऊन काय करू? माझं पूर्वी जेवढं होतं तेवढंच पोट असू दे. ' त्याच क्षणी वीज चमकली आणि त्याची ही तिसरी इच्छा पूर्ण झाली. पूर्वीसारखं पोट आलं.

आता त्याला भान आलं. तीन वरदानं पुरी झाली आणि मिळालं तर काहीच नाही. भुकेजलेलं पोट होतं तसंच राहिलं !

जोगीबुवाचा त्याला राग आला. रात्रीचाच तो त्याच्याकडे जायला निघाला. चालणं नकोसं वाटत होतं; पण रागाचा जोर त्यापेक्षा मोठा होता. म्हणून इच्छा नसताना तो चालत जंगलात गेला. जंगलातल्या वाटेवर त्याला लांडगा भेटला. त्याचं शरीर सुकून हाडांचा सापळा बनलं होतं.

लांडगा म्हणाला, ' कुठं चाललास ? '

'जोगीबाबाला भेटायला. '

'कशासाठी ?

'विचारायला की देवानं मला पोट दिलंय् , भूक दिलीय अन् पोटाला अन् भुकेला पुरविण्याइतकं खायला का तो देत नाही ? मेहनत केली तरच खायला मिळावं असं का म्हणून ? '

लांडगा म्हणाला, 'मेहनत केली की पोट भरतं असं कुणी सांगितलं ? तू मेहनत करीत नाहीस म्हणून तुझं पोट भरत नाही ना ? पण मी मेहनत करतो तरी माझं पोट कुठं भरतं ? किती जरी खाल्लं तरी भुकेची वखवख काही थांबत नाही. माझं शरीर दिवसेंदिवस सुकत चाललंय, हा मी नुसता हाडांचा सापळा राहिलोय् बघ. तू जोगीकडं जातो आहेस तर त्याला माझ्या वतीनंही विचार, की

काय खाल्लं तर माझं पोट भरेल ?'

अजगरभाई म्हणाला, 'ठीक आहे, 'असं म्हणून तो पुन्हा चालला. थोड्या अंतरावर त्याला एक सफरचंदाचं झाड लागलं. झाडावर पिकलेली फळं बघून अजगरभाई मनात म्हणाला, 'अहाहा, काय छान सफरचंद आहेत ! बघताच खावीशी वाटतात.'

हे ऐकून झाड म्हणालं, ' मग खा ना भाई ! तुला नको कुणी म्हटलंय् ?'

भाई म्हणाला, 'पण ती तोडायची मेहनत कुणी करावी ? आयती तोंडात पडली तर खाईन ! '

'असं ? तर मग उघड तोंड.' अजगरभाईनं तोंड आ केलं आणि त्याच्या तोंडात एक सफरचंद येऊन पडलं. भाईनं बचक करुन त्याचा चावा घेतला आणि लगेच थू थू थू करीत त्यानं ते थुंकून टाकलं. झाडाकडं वळून तो म्हणाला, 'हे काय सफ रचंद आहे की अफूचं बोंड ? किती कडू कडू जहर आहे ! '

हे ऐकून झाडानं दुःखानं उसासा टाकला आणि ते म्हणालं, 'इतकी फळं लागतात; पण कोणी माझी फळं चाखतसुद्धा नाही. भाई, तू जोगीकडं चाललायस तर जरा माझ्या वतीनं त्याला विचार, की काय केलं म्हणजे माझी फळं गोड होतील ?'

'बरं आहे', असं म्हणून अजगरभाई पुढं चालला. पुढं वाटेत नदी लागली.अजगरभाई नदीत पाऊल टाकताच पाण्याच्या आतून आवाज आला, 'अजगरभाई, कुठं चाललात ?

'जोगीबाबाला भेटायला ! तू कोण आहेस ?'

'मी मासा आहे. गेली सात वर्षं माझं तोंड असं आ वासलेलं राहिलं आहे. काही केल्या बंद होत नाही. जोगीबाबाला जरा याचं कारण विचाराल का ?'

'विचारीन' असं म्हणून अजगरभाई पुढं चालला.

यावेळी पहाटेचे तारे चमकायला लागले होते. जोगीबाबा त्या प्रकाशात आपली चार हात लांब पोथी पुढं घेऊन वाचीत बसला होता. अजगरभाई गेल्याबरोबर त्याला तडातडा बोलू लागला. 'जोगी होऊन तुम्ही माझी चेष्टा

केलीत ? अशी वरदानं कधी कुणी दिली आहेत ? आता खरीखुरी वरदानं द्याल तरच इथून उठेन ! '

जोगीनं विचारलं, 'खरीखुरी म्हणजे ?

खरीखुरी म्हणजे कसलीही मेहनत न करता माझं पोट भरपूर भरेल अशी !

जोगी म्हणाला, 'अजूनही मेहनत न करता पोट भरावं अशी तुझी इच्छा आहे?'

'इच्छा नव्हे, माझा हा सिद्धांत आहे ! आणि सिद्धान्त म्हटला, म्हणजे तिथं तडजोड नाही ! '

जोगी म्हणाला, ' मग तूच सांग, मी काय करू?'

' मला लखपती करा. मला इतकं धन द्या की रोज सात वेळा जरी मी जेवलो, तरी ते संपणार नाही. बसल्या बसल्या अन् पडल्या-पडल्या मला खायला मिळावं.'

'खात राहिलं तरी संपणार नाही इतकं धन देऊ ? '

'हो हो, खाल्लं तरी संपणार नाही इतकं ! मी संपलो तरी धन संपू नये ! '

हसून जोगी म्हणाला, 'तू संपलास तरी धन संपू नये, अं ? हे बरोबर बोललास!'

बोलता बोलता जोगी विचार करू लागला. मग म्हणाला, 'ठीक आहे, होईल तुझ्या सिद्धांताप्रमाणं ! आता जा. '

'थांबा, वाटेत भेटलेल्या आणखी तिघांचे प्रश्न आहेत. त्यांची उत्तरं द्या. ' जोगी म्हणाला, 'विचार.कोण कोण भेटलं ? '

अजगरभाई म्हणाला, 'भेटला एक मासा. सात वर्षं झाली, त्याचं तोंड फाटल्यासारखं उघडंच राहिलंय्; मिटतच नाही. त्याचं काय कारण ? '

जोगी म्हणाला, 'खायचा पदार्थ समजून त्यानं एक बहुमोल हिरा गिळलाय्. तो हिरा त्याच्या घशात अडकलाय. तो जर त्याच्या घशातून निघाला तर त्याचं तोंड मिटेल. हं, दुसरं काय ? '

अजगर म्हणाला, 'दुसरं भेटलं एक सफरचंदाचं झाड. त्याची फळ कडू-कडू

जहर म्हणून बिचारं रडत होतं. त्यानं विचारलंय काय केलं तर माझी कडू फळं गोड होतील ? '

जोगी म्हणाला, 'त्या झाडाच्या मुळाशी सोन्याच्या मोहोरांनी भरलेले सात हंडे पुरलेले आहेत. त्या द्रव्यामुळं त्याची फळं कडू-कडू होतात. हां आता आणखी काही ? '

'हां, वाटेत मला एक लांडगा भेटला होता. तो म्हणत होता, किती खाल्लं तरी आपलं पोट काही भरत नाही, सारखी वखवख कायम असते. त्यामुळं मी हाडकुळा बनत चाललोय. त्याचं काय कारण ? '

जोगी म्हणाला, 'तो जे खायला पाहिजे, ते खात नाही ! '

अजगरानं विचारलं, 'काय खाल्लं पाहिजे ? '

जोगी म्हणाला, 'त्याला म्हणावं, तू कोणातरी आळशी लोंद्याचा घास घेतलास तर तुझा रोग जाईल. '

अजगरभाईचं काम संपलं. तो घराकडं परत वळला. वाटेत नदी लागली. नदीतल्या माशानं विचारलं, 'अजगरभाई, जोगीबाबा काय म्हणाला ? '

भाई म्हणाला, 'बाबा म्हणाला, तू खाऊचा पदार्थ समजून एक अतिशय मोलाचा हिरा गिळलायस्. तो घशातून काढला तर तुझं तोंड मिटेल. '

हे ऐकून मासा म्हणाला, ' मग अजगरभाई, तुम्ही काढा ना तो मोलाचा हिरा बाहेर ! '

अजगरभाई म्हणाला, 'शीः , तुझ्या घाणेरड्या घशात मी हात घालू ? आणि ती मेहेनत कुणी करावी ? '

मासा म्हणाला, 'भाई, तो फार मोलाचा हिरा आहे म्हणता, तर तो हिरा तुम्हीच घ्या ना, तुमचं जन्माचं दारिद्रय मिटेल ! '

अजगर म्हणाला, 'जोगीनं मला तू संपलास, तरी धन संपणार नाही इतकं धन विनामेहनत द्यायचं कबूल केलंय्. मला काय करायचा तो हिरा ? ' असं म्हणून तो पुढं चालू लागला.

वाटेत ते सफरचंदाचं झाड भेटलं. 'अजगरभाई, जोगीबाबा काय म्हणाला ?'

अजगरभाई म्हणाला,'जोगीबाबानं सांगितलं की, तुझ्या मुळाशी सोन्याच्या मोहोरांचे सात हंडे पुरलेले आहेत म्हणून तुझी फळं कडू झाली आहेत.'

झाड गयावया करून म्हणालं, ' मग तेवढे हंडे काढून टाका ना, अजगरभाई ! सोन्याच्या मोहोरा तुम्हाला मिळतील अन् तुमचं दारिद्र्य जन्मभराचं दूर होईल.'

अजगर म्हणाला, 'हंडे काढायचे म्हणजे उकरा-उकरी करायला पाहिजे. ती कुणी करावी ? जोगीबाबा म्हणालाय काही मेहनत न करता तू संपलास तरी धन संपणार नाही इतकं धन तुला देतो ! ' तुझे हंडे मला नकोत ! ' असं म्हणून तो पुढं चालू लागला.

मग वाटेत तो लांडगा भेटला. जोगीबाबा काय म्हणाला, असं त्यानंही विचारलं. अजगरभाई म्हणाला, 'हे बघ, जोगीबाबा काय म्हणाला ते मी तुला सांगेन. पण मग मला तू असं कर, तसं कर असं काही सांगता कामा नये. त्या माशाला अन् त्या झाडाला जोगीबाबाची उत्तरं सांगितली, तर ते मलाच सांगतात की तू एवढं आमचं काम कर, तू एवढं आमचं काम कर ! काम करायचं असतं तर जोगीबाबाकडं गेलो असतो कशाला ? मी माझ्या पोटाकरिता काम करणार नाही तर दुसऱ्याचं करू काय ? काम न करता आपलं पोटं भरले पाहिजे असा माझा सिद्धांत आहे ! '

लांडगा म्हणाला, 'पण एवढं बोलायचं कारणच काय, अजगरभाई ? जोगीबाबानं माझ्यासाठी काय सांगितलंय् तेवढं सांग, म्हणजे झालं. मी काही तुला काम करायला सांगणार नाही ! '

अजगरभाई म्हणाला, 'जोगी बाबा म्हणजे जोगीबाबाच आहे. दुसऱ्याची चेष्टा करायला त्याला काही वाटत नाही. तुझा प्रश्न विचारताच तो म्हणाला, की लांडग्यानं जे खायला पाहिजे ते तो खात नाही म्हणून तो असा भुकेजलेला राहतो अन् हाडकुळा बनत चाललाय् ! '

' मग मी काय खाल्लं पाहिजे असं त्यानं सांगितलं ? उत्सुकतेनं लांडग्यानं विचारलं.

अजगरभाई हसत हसत म्हणाला, 'जोग्यानं सांगितलं कोणा आळशी लोद्याचा एक घास करून खाल्ला तर तो चांगला धष्ट-पुष्ट होईल !

लांडगा अजगरभाईच्या अधिक जवळ जाऊन कोणा आळशी लोंद्याचा एक घास करायचा असं म्हणाला ? काम न करता पडल्या पडल्या पोट भरावं म्हणणाऱ्या आळसुटल्याचा ? '

अजगरभाई रागानं म्हणाला, 'पुनः पुनः काय विचारतोस ? एकदा सांगितलं ना ? पुनः तेच तेच बोलण्याची मेहनत मला करायला लावू नकोस', असं म्हणून तो पुढं निघाला तोच-

'आता विचारण्याची गरजच नाही' असं म्हणून लांडग्यानं अजगरभाईवर झडप घातली आणि आपल्या जबड्यानं त्यानं त्याच्या पोटाचा लचकाच तोडला. अजगरभाईची पोट भरण्याची चिंता कायमची मिटली !!

(भाऊ धर्माधिकारी : देशोदेशीच्या लोककथा (भाग ७))

# ५.२३. माणूस झाला अजगर

(निकोबारची लोककथा)

खूप खूप वर्षांपूर्वी काही माणसे त्यांच्या वार्षिक महोत्सवासाठी (कुन येनसे) लागणारी फळे आणि भाजी काढण्यासाठी अरण्यात गेली होती. परतीच्या मार्गावर जंगलातून मार्गक्रमण करताना त्यांना तहान लागली आणि ते सर्वजण नारळाचे पाणी पिण्यासाठी थांबले. त्यांच्यातील एकजण झाडावर चढला आणि त्याने नारळ काढून ते खाली टाकले. तहान पूर्णपणे शमेपर्यंत ते भरपूर नारळ-पाणी प्यायले.

नारळ काढण्यासाठी वर चढलेला माणूस बराच वेळेपर्यंत जेव्हा खाली उतरला नाही, तेव्हा त्याच्या सहकाऱ्यांना काळजी वाटली. त्यांनी त्याला हाक मारली 'ताबडतोब खाली ये.' आपल्याला निघायचे आहे. वर चढलेला माणूस उतरला, 'तुम्ही सगळे घरी जा मी परवापर्यंत घरी येणार नाही.' अशाप्रकारे ते सगळे त्याला जंगलात सोडून आपल्या घरी परतले.

काही काळ त्याने अतिशय चिंतामुक्त आणि बिनधास्त असले आयुष्य भोगले. त्याला आपल्या पोटाभोवती चरबी वाढवून खूप मोठे पोट असलेला ढेरपोट्या व्हायचे होते म्हणून गोडपेय आणि नारळाच्या झाडाची कोवळी पाने खाऊन तो राहू लागला. लवकरच त्याच्या पोटाभोवती चरबी खूप वाढली. परंतु इवि नावाच्या पिशाच्चाने केलेल्या जादूमुळे त्याचे एका अजगरात रूपांतर झाले. दुसऱ्या दिवशी बाजूच्या खेडेगावातील एक बाई झाडाच्या चिकामधून तंतूमय पदार्थ काढीत होती. तेव्हा नागमोडी चालणारा आडदांड तिच्या नजरेस पडला. त्याच्या शेपटामुळे तिच्या तो लक्षात आला. त्याचे स्वरूप काय भयंकर होते ! तो आता मानवी शरीरधारी राहिला नव्हता तर अजगर झाला होता. सगळ्या माणसांनी भीती आणि उरात धस्स झाल्याने किंकाळ्या ठोकल्या.

तो पिशाच्च दुष्ट आत्मा असेल या विचाराने त्या सर्वांनी पळून जाण्यासाठी घरातून उड्या मारल्या परंतु दुर्दैवाने ते थेट अजगराच्या तोंडात जाऊन पडले आणि त्याने त्यांना गिळून टाकले. पुढे घडलेली गोष्ट खूप मनोरंजक होती.

अजगराच्या पोटात अडकलेल्या स्त्रियांच्या हातात स्वयंपाक घरातील मोठे चाकू होते. त्या चाकूनी अजगाराचे पोट फाडून त्या स्त्रिया बाहेर आल्या.

तिथे उभे असलेल्या लोकांनी जेव्हा हे पाहिले, त्या सर्वांचा भयाने थरकाप उडाला आणि त्यांनी भीतीने आरोळ्या ठोकल्या. जिवाची काळजी करीत ते सगळे तिथून पळाले. शेवटी जखमी झालेला आणि घाबरलेला तो अजगर जंगलात गेला आणि दृष्टीआड झाला.

आताशा त्या अजगराचे एकच काम असते आणि ते म्हणजे सूर्य आणि चंद्र यांना अधूनमधून गिळणे. यामुळे सूर्यग्रहणे होत असतात. आणि माणसे अजूनही त्या अजगराला घाबरत असतात. कारण त्यांना त्याची ती जुनी त्रासदायक गोष्ट आठवत असते.

(संदर्भ : निकोबारच्या लोककथा)

# ५.२४. जादुचा आरसा

एक होता राजा. तरुण आणि देखणा. आपल्या प्रजेवर त्याचं प्रेम होतं; अन् प्रजेचंही त्याच्यावर प्रेम होतं. तो राज्यकारभार उत्तम रीतीनं करायचा. न्यायाच्या बाबतीत तो डावं-उजवं, जवळचा-परका असं बघायचा नाही. सर्वांना सारखा न्याय द्यायचा. कुणावरही अन्याय करायचा नाही. पण अजून त्याचं लग्न झालं नव्हतं; कारण त्याच्या मनाजोगी राणी त्याला मिळत नव्हती.

मुख्य प्रधान सांगे, ' महाराज,आता राणी आणा ! '

राजा हसून म्हणायचा, 'राणी काय जन्माला येते ? बनते ! '

प्रधान म्हणे, 'अगदी खरं, मग एखादी राजकुमारी पसंत करा अन् बनवा ना तिला राणी ! '

राजानं विचारलं, 'राजकुमारीच फक्त राणी बनू शकते कां ? '

प्रधान म्हणाला, 'असं तर आतापर्यंत आम्ही ऐकत आलोय् अन् बघत आलोय.'

राजा यावर काही बोलला नाही.

राजा या वेळी हजामत करून घ्यायला बसला होता. प्रधानजी गेल्यावर न्हावीबुवा म्हणाला,'महाराज, प्रधानजींनी ऐकलेलं सांगितलं. मी मला समजलेलं सांगू ? '

राजा-'तुला काय समजलंय् ? '

न्हावी - 'हेच की राजकुमारीबरोबर राजाचं लग्न व्हायचं असा नियम असता तर आतापर्यंत कितीतरी राजकुमार कुवारच राहिले असते. '

राजा - 'बरोबर आहे तुझं म्हणणं, राणी व्हायला काही राजघराण्यातच जन्म घेतला पाहिजे असं नाही. राणी व्हायला राणीचे गुण अंगी असले पाहिजेत. राणी रूपवान तर पाहिजेच, पण गुणांनी थोर असली पाहिजे. स्वभावानं शांत, श्रीमंतीनं न चढणारी, सत्तेनं उन्मत्त न होणारी, सर्वांशी मिळून मिसळून

वागणारी, गोड आणि दयाळू असली पाहिजे. '

न्हावीबुवा चतुर होते. राजाच्या मनची गोष्ट त्यांना चटकन समजली. ते एकदम म्हणाले, ' महाराज, आपली परवानगी असेल तर मी अशी मुलगी शोधू?'

राजा म्हणाला, 'अवश्य जा, तुला हे काम सोपवलं.'

आता 'न्हावी म्हणजे गोष्टीवेल्हाळ. चालतं बोलतं वर्तमानपत्र. त्याच्या पोटात पडलेली बातमी गावभर व्हायचीच. तशी ही बातमी हां हां म्हणता गावभर पसरली - राजाला लग्नासाठी मुलगी पाहायचीय. लोकांना वाटलं, राजा लग्न करणार ते राजकुमारीशीच. पण न्हावीबुवा म्हणाले, छेः छेः राजकुमारी नसली तरी चालेल ! '

लोकांनी विचारलं, 'म्हणजे ?

न्हावी म्हणाला, 'म्हणजे कुणाचीही मुलगी चालेल; पण ती राजाच्या परीक्षेत उतरली पाहिजे ! '

लोकांनी विचारले, 'परीक्षा ? परीक्षा कसली ? '

न्हावी म्हणाला, 'जगात कितीतरी मुली आहेत. प्रत्येकीला कदाचित राजाशी लग्न करायची इच्छा असेल ; पण सगळ्याच काही राजाशी लग्न करण्याच्या लायकीच्या असत नाहीत. म्हणून लायक कोण आहे याची परीक्षा करावी लागणारच की नाही ? तशा परीक्षेत जी उतरेल ती राजाची राणी होऊ शकेल. '

'छेः छेः, महाराज स्वतः कसे सगळीकडे जातील ? त्यांना तितका वेळ तरी कुठं आहे ? परीक्षा करण्याचं काम माझ्याकडं आहे. मी परीक्षा करीन अन् जी माझ्या परीक्षेला उतरेल तिला घेऊन मी महाराजांकडं जाईन. '

हा न्हावी राजाच्या विश्वासातला होता हे लोकांना माहीत होतं. रोजच्या रोज तो राजाच्या डोक्याला हात लावतो अन् डोक्यावरनं शस्त्र फिरवतो, तो राजाच्या विश्वासाला पात्र असणारच !

थोड्याच वेळात बातमी सगळीकडं पसरली की राजकुमारी नसलेलीसुद्धा राणी होण्याच्या परीक्षेत दाखल होऊ शकते. मग काय ? मोठे-मोठे अमीर

उमराव, सरदार-सेनापती, शेठ-सावकार आपापल्या मुली घेऊन न्हावीबुवांकडं येऊ लागले अन् त्याची खुशामत करू लागले. प्रत्येकजण म्हणू लागला, 'बघा, माझ्या मुलीत राणी होण्याचे सगळे गुण आहेत. '

न्हावी म्हणाला, राणी होणारी मुलगी रूपानं देखणी तर हवीच; पण नुसतं रूप नको, गुणानंसुद्धा उंच असलेली हवी. ती स्वभावानं शांत,श्रीमंतीनं न चढणारी, सत्तेनं उन्मत्त न होणारी,सर्वांशी मिळणारी-मिसळणारी, गोड अन् दयाळू अशी हवी. अशी जी शरीरानं, मनानं शुद्ध, निष्पाप, सरळ, निर्दोष असेल, तिलाच राजा वरील. '

प्रत्येकजण म्हणत असे, 'न्हावीबुवा, माझी मुलगी अगदी अश्शीच आहे हो! '

प्रत्येकाला न्हावी कोपऱ्यात ठेवलेला आरसा दाखवून सांगे, 'हा माझा आरसा, जे सांगेल, ते खरं. हा जादूचा आरसा आहे. राणी होण्याचे गुण मी सांगितले तसे असणारी जी असेल, तिलाच या आरशात आपलं तोंड बघता येईल. तिच्यात जर का थोडीसुद्धा उणीव असेल तर आरशात बघितल्याबरोबर तिचं तोंड काळं-ठिक्कर पडेल अन् ते कायमचं काळंच राहील. अशी आहे या आरशाची जादू! '

'कायम काळं पडेल? '

हो, 'आरसा तिचं तोंड कायमचं काळं करील. '

हे ऐकून सगळे विचारात पडत. कोणी-कोणी मुली राणी होण्याची इच्छा करणाऱ्या होत्या, त्या नटून-थटून आपलं रूप आपल्या आरशात न्याहाळून पाहत अन् आपणच खूष होत. पण न्हाव्याचा आरसा काय दाखवील ? हं, हा न्हाव्याचा आरसा फोडूनच टाकला पाहिजेच; नाही तर न्हाव्याशी लाडी-गोडी लावली पाहिजे.

लगेच त्यांच्या मनात येई, 'पहा, राणी होण्याच्या आशेनं हे कसले वाईट विचार आपल्या मनात येतात ! आपण नाही राणी व्हायला लायक. न्हावीबुवांच्या आरशात आपलं तोंड काळं दिसणार अन् ते कायमचं काळं राहील.' आरशात तोंड बघण्याचा धसकाच त्यांनी घेतला.

न्हावीबुवा सांगायचे, 'या, राणी बनायची परीक्षा द्या. संधी सोडू नका.' पण कोणी आलं नाही. मग ते शहर सोडून खेड्या-पाड्यात शोध घ्यायला निघाले. घोड्यावर स्वार होऊन फिरू लागले. सगळ्या राज्यात ही बातमी पसरली. न्हावीबुवा गावच्या मुखियाकडं मुक्काम टाकीत अन् त्यांच्याकडं मुलीची चौकशी करीत. 'आहे कुणी तुमच्या पाहण्यात राजाची राणी व्हायला लायक अशी सुंदर, चांगल्या स्वभावाची, विनयी आणि परोपकारी मुलगी ? ' कोणी सांगे,अमुक मुलगी चांगली आहे. तर दुसरा त्या मुलीच्या विरुद्ध सांगे. असा शोध करीत गावोगाव न्हावी दरबारी लवाजमा घेऊन फिरू लागला.

फिरता फिरता एका डोंगराळ भागात ते गेले. अलीकडे डोंगर, पलीकडं डोंगर, मधल्या दरीत लहान-लहान ओढे आणि हिरवी हिरवी शेतं. जिकडं तिकडं मेंढरांचे कळप चरत असलेले.

एका गावात त्यांना बातमी लागली की बिरू धनगराची पोरगी रूपाली चांगली देखणी आहे आणि गुणी आहे. ज्यांच्या ज्यांच्याकडं चौकशी केली, त्यांचं त्यांचं तिच्याविषयी चांगलंच मत दिसून आलं. मात्र तिला लिहिता वाचता येत नव्हतं. पण राजाच्या अटीत लिहायला-वाचायला येण्याची अट नव्हती. म्हणून न्हावीबुवानं रूपालीला बघायचं ठरवलं.

रूपालीच्या घरी गेले तर समजलं, ती रानात डोंगरावर मेंढरं चरायला घेऊन गेली आहे. रूपालीच्या बापाला न्हावीबुवा भेटले आणि त्याला मुलीबद्दल विचारलं, तर तो म्हणाला, 'आम्ही जंगलची माणसं, तुमच्या राजाला कशी हो पसंत पडणार ? माझी मुलगी वयात आलीय, मी तिच्यासाठी चांगला नवराही बघतोय. पण तिला पाहिजे खूप कमाई करणारा, सर्वांवर प्रेम करणारा, नडेल-अडेलच्या उपयोगी पडणारा. असा खेड्यात कसा मिळायचा, याचा मलाही घोर लागलाय. पण ही मुलगी माझी स्वतःच्या मनानं चालणारी, फार शहाणी अशी आहे. देवाची कृपा असेल तर मिळेल तिला लायक नवरा ! '

न्हावीबुवा जिकडं रूपाली गेल्याचं तिच्या बापानं सांगितलं त्या दिशेकडं गेले. वाटेतली झाडी पार करून ते डोंगर चढायला लागले. चढता चढता त्यांना

धाप लागली. मधेच थोडा वेळ बसले. मग उठून परत वर चालले. एकीकडून मेंढरांचा 'बें बें' आवाज त्यांच्या कानी आला. त्या आवाजाच्या रोखानं ते चालले. तर मेंढरांचा एक कळप चरत असलेला त्यांना दिसला.

डोळ्यांवर हाताचा पंजा ठेवून मुलगी कुठं दिसते का ते बघू लागले, तो त्यांच्या कानांवर धनगरी गाण्याचे गोड सूर पडले. ते त्या मुलीचेच आहेत हे जाणून न्हावीबुवा पुढं गेले, तेव्हा एका खडकावर एक गव्हाळी रंगाची, सोनेरी लांबसडक केसांची मुलगी हातात लांबशी काठी घेऊन आपल्याशीच गाणं म्हणत बसलेली दिसली. तिचं रूप बघताच न्हावीबुवा हरखले. ती नुसती सुंदरच नव्हती; तर तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा गोडवा होता, निर्भयता होती. जणू वनसुंदरीची लाडकी मुलगीच.

न्हावीबुवांना बघून तिनं आपलं गाणं थांबविलं; पण ती दचकली नाही किंवा बुजली नाही. हा कोण नवीन अनोळखी माणूस येत आहे ते ती पाहू लागली. तिच्या अंगावरचे कपडे ठिगळं लावलेले ; पण नीटनेटके अन् स्वच्छ असल्याचं न्हावीबुवांच्या बारीक नजरेला आढळलं.

'कोण बाबा तुम्ही ? इकडं कुठं आलात ? तिनं सहज चौकस भावानं विचारलं. तिच्या आवाजात रूपेरी घंटेचा मधुर नाद होता. विचारण्यात विनय होता, अगत्य होतं. तिचे डोळे स्वच्छ सरोवरासारखे निर्मळ होते, टपोरे होते.

न्हावीबुवा तिच्या प्रश्नाला उत्तर द्यायचं विसरले अन् तिच्याकडे बघत राहिले. तेव्हा तिनं पुनः विचारलं, 'बाबा, डोंगर चढून इतकं वर आलात, दमला असाल, नाही ? या इथं खडकावर बसा जरा. पाणी आणून देऊ ? '

न्हावीबुवा आपल्या मनात या सुंदर मुलीवर जर राणीचा पोशाख चढवला तर ही कशी दिसेल, याचं चित्र बघण्यातच गुंतले होते. त्यांनाही खरं म्हणजे आता भूक लागली होती. भानावर येऊन ते म्हणाले,'बसतो, बसतो. पाणी आणतेस ? आण जा. '

रूपाली झटकन झऱ्याकडं पळत गेली. जाताना जणू ती नाचतच जात आहे असं न्हावीबुवांना वाटलं. येतांना तिनं एक मोठा झाडांच्या पानांचा द्रोण बनवून

त्यात पाणी भरून घेऊन आली. म्हणाली, 'बसा बाबा, आपण भाकर खाऊ या.'

'भाकर ? ती आणलेली भाकर मला देऊन तुला काय उरणार बये ? '

'थोडी-थोडी दोघं मिळून घेऊ; अन् मग पाणी प्या. ' असं म्हणून तिनं आपली आणलेली शिदोरी सोडली आणि आपण थोडं घेऊन उरलेलं न्हावीबुवांना दिलं. तिची ही मायाळू वागणूक बघून न्हावीबुवांचं मन भरून आलं.

खाऊन झाल्यावर न्हावीबुवांनी ते झऱ्याचं थंडगार, गोड पाणी द्रोणातून तोंडात घेतलं आणि त्यांचं मन कसं थंड झालं. मग ते तिला म्हणाले, 'रूपाली, तुला भेटायलाच मी गावातनं इकडं वर चढून आलो. '

' मला भेटायला ? ' तिनं आपल्या कमानदार भुवया आश्चर्यानं उंचावून विचारलं.

'हो, तुला भेटायला. मी आमच्या राजाला राणी शोधण्याच्या कामगिरीवर निघालोय. गावोगाव फिरलो अन् इथं आज आलो. इथं कळलं की बिरू धनगरची मुलगी रूपाली राणी व्हायच्या लायकीची आहे; म्हणून तुला बघायला वर आलो. '

रूपाली हसायला लागली. म्हणाली, 'राजाला राणी ? अन् इथं डोंगरात ? ' तिला ही थट्टाच वाटली.

'डोंगरात, राना-वनात, मिळेल तिथं,' न्हावीबुवा म्हणाले, 'आमच्या राजाला राणी पाहिजे ती त्याला शोभेल अशी, म्हणून शोधतोय.'

'बाबा, माझी थट्टा केली तर चालेल; पण आपल्या राजाची नका हं थट्टा करू!'

तिचे हे शब्द ऐकून या मुलीला बुद्धीही चांगली आहे हे न्हावीबुवांच्या लक्षात आलं. ते म्हणाले, 'नाही मुली, मी थट्टा नाही करीत, खरंच सांगतो. मुलगी राजाचीच पाहिजे, सरदाराची किंवा शेट सावकाराचीच पाहजे, असं नाही. कुणाची देखील मुलगी राजाला चालेल. पण ती आमच्या पारखीला उतरली पाहिजे. ती नुसती सुंदर असून उपयोगी नाही; गुणांनीदेखील चांगली पाहिजे तुझ्यासारखी ! '

रूपाली ऐकत राहिली. मग म्हणाली, 'गुणांनी अन् माझ्यासारखी ? माझे गुण एवढ्यात काय पारखलेत ? मला तुमची कागदावरची अक्षरं वाचता येत नाहीत, मला लिहिता येत नाही. मला हे आभाळ वाचता येतं, हे डोंगराचं अन् रानावनाचं पुस्तक वाचता येतं, मला माझ्या मेंढरांशी बोलता येतं. तुमच्या राजाच्या शहरात या सगळ्याचा काय उपयोग ? राजानं तुम्हाला पारख करण्याचं काम दिलंय; चांगली पारख करता की ! राजाला फसवता काय ? '

न्हावीबुवा म्हणाले, 'नाही बेटी, माझ्या राजाला फसवून वाटेल ती मुलगी बायको म्हणून त्याच्या गळ्यात घालण्याइतका मी मूर्ख नाही की बेईमान पण नाही. हा बघ, एक जादूचा आरसा माझ्यापाशी आहे. या आरशात आपलं तोंड बघण्याची एकाही राजाच्या, सरदाराच्या किंवा मोठ्या मोठ्यांच्या मुलींनी हिंमत केली नाही. कारण या आरशात बघणारं माणूस वाईट गुणांचं असलं, की त्याचं तोंड हा आरसा लगेच काळं करून दाखवितो; अन् मग ते त्या मुलीचं काळं तोंड जन्मभर तसंच काळं राहातं. ज्याला त्याला आपलं मन, आपले गुण कळतात ना ? म्हणून कुणीही मुलगी आतापर्यंत या आरशात आपलं तोंड पाहायला धजलीच नाही. तुझीसुद्धा पारख मी या आरशातच करणार आहे.

असं म्हणून न्हावीबुवांनी तो आरसा बाहेर काढला.

रूपाली म्हणाली, 'एवढं त्यात घाबरण्यासारखं काय आहे ? आपण जसे असू, तसे दिसू. मी चांगली असेन तर तुमचा जादूचा आरसा काय मला वाईट दाखवील ? आणि मी वाईट असल्याचं आरशानं दाखवलं तर छानच होईल की. माझं मला आपण कसे आहो, ते कळेल अन् चांगलं होता येईल. आरसा थोडाच मला चांगलं किंवा वाईट करणार आहे ? मीच मला चांगलं वाईट करणारी नाही कां ? '

रानावनात मेंढरामागं भटकणाऱ्या या मुलीचे ते शब्द ऐकून न्हावीबुवा तर चकितच झाले. ते तिला म्हणाले, 'असं पूर्वी कुणीसुद्धा बोललं नव्हतं. मुली, तुला आरशानं पसंत केली. तू माझ्याबरोबर राजाच्या राजधानीला येशील ? '

रुपाली म्हणाली, ' मी कशी येऊ ? माझे आई-बाबा नेतील, तर येईन ! '

न्हावीबुवा याही तिच्या उत्तरानं खूष झाले. ते दोघे मेंढरांना घेऊन गावाकडं परतले. तिच्या घरी आल्यावर न्हावीबुवा तिच्या आई-बाबांशी बोलले आणि दुसऱ्या दिवशी त्या सर्वांना घेऊन ते राजधानीला आले.

न्हावीबुवांनी राजाला जसं घडलं, तसं सारं सांगितलं. मुलगी रूपा-गुणांनी उत्तम, फक्त उणीव शिक्षणाची. मुलीला लिहिता वाचता येत नाही ! अशी राणी चालेल ?

राजा म्हणाला, 'पाहून ठरवू ! '

न्हावीबुवांनी धनगराच्या कुटुंबाला राजधानीतच शहराच्या एका टोकाला असलेल्या एका घरात ठेवलं आणि सांगितलं, की दोन दिवसांनी राजेसाहेबांना दाखवायला तिला न्यायचं. तोवर सर्वांनी शहरभर फिरावं, शहर बघून घ्यावं असं न्हावीबुवा म्हणाले. दुसऱ्या दिवशी त्यांना शहरात फिरण्यासाठी मदतीला न्हावीबुवांनी एक माणूस पाठवून दिला. तो माणूस सतत दोन दिवस त्यांच्याबरोबर राहिला.

ठरल्याप्रमाणे तिसऱ्या दिवशी रूपालीला आणि तिच्या आई-बाबांना राजवाड्यात न्हावीबुवांनी नेलं. त्यांच्या दिमतीला दिलेला माणूस आदल्या दिवशीच निघून गेला होता. राजवाड्यात जाताना रूपालीला न्हावीबुवांनी चांगले कपडे घालायला दिले. त्या कपडयांत ती अधिकच सुंदर दिसू लागली.

दरबारात सर्व मंडळी जमली. राजा आपल्या सिंहासनावर येऊन बसला. बिरु धनगराला एका चांगल्या आसनावर बसविण्यात आलं. रूपाली आणि तिची आई वर सज्जात पडद्याआड बसले.

जमलेले सरदार-उमराव , शेठ सावकार राजानं कशासाठी आपल्याला बोलावलं आहे, ते ऐकण्यासाठी उत्सुक होऊन बसले होते. राजा आपल्या सिंहासनावरून उठून सर्वांना उद्देशून म्हणाला, 'या राज्याला आता राणीची गरज आहे. ती राणी या राज्यातील सर्वांना आवडेल; रूपानं, गुणानं, आपल्या वागणुकीनं सर्वांना पसंत पडेल अशीच असली पाहिजे. माझ्या लोकांना माझ्या राणीबद्दलसुद्धा प्रेम वाटलं पाहिजे. अशी मुलगी बघण्याचं काम आम्ही आजच

पुरं केलं आहे. आम्ही मुलगी पसंत करण्याच्या काही कसोट्या योजल्या होत्या. त्या सर्व कसोट्यांतून ही मुलगी उतरली आहे हे सांगण्यास मला आनंद वाटतो... '

इतक्यात न्हावीबुवा उठून उभे राहिले. ते म्हणाले, 'नाही नाही, महाराज, एक आणखी कसोटी राहिली आहे. या आमच्या जादूच्या आरशात तिचा चेहरा दिसला पाहिजे. मनानं अन् वागणुकीनं जर ती शंभर गुणी असली तर हा आरसा तिला चमकदार दाखवील.तशी ती नसली तर तिचं तोंड यात काळं दिसेल अन् ते कायमचं काळं राहील, असं आम्ही सगळ्या मुलींना सांगत आलोय. तेव्हा ही एक कसोटी तिनं दिलीच पाहिजे. '

राजा म्हणाला, 'आम्हाला त्या कसोटीची काही गरज वाटत नाही. पण सर्वांना न्याय सारखा, म्हणून मी ती मान्य करतो. तिचं रूप या आरशात दिसू दे.'

सज्जाच्या बरोबर समोर आरसा ठेवण्यात आला आणि पडदा बाजूला सारून रूपाली त्या आरशासमोर उभी राहिली. तिचं प्रतिबिंब आरशात पडलेलं सर्वांनी पाहिल. तिचं चंद्रांसारखं उजळ अन् देखणं रूप बघून सर्व जमलेल्या लोकांच्या तोंडून आपोआप शब्द निघाले... 'आमच्या राणीचा जय होवो !'

रूपाली गौरपूर्वक खाली उतरली. आणि बिरू धनगरानं तिचा हात राजाच्या हातात दिला. दोन दिवसांनी मोठ्या धामधुमीनं रूपालीशी राजाचं लग्न झालं आणि रूपाली राणी झाली.

राजानं रूपालीची पारख कधी अन् कुठं केली ? राजधानीतल्या घरात त्यांना शहर दाखवणारा वाटाड्या म्हणून तोच तर राहिला होता ! जादूचा आरसा हा खरे तर साधासुधा आरसाच होता. सुजाण निवडीचं काम त्यामुळे साध्य झालं होतं.

(भाऊ धर्माधिकारी : देशोदेशीच्या लोककथा (भाग ७))

# ५.२५. व्यवहारशून्य पंडित

(वेताळ पंचविशी)

फार पूर्वी मिलींदपूर येथे राजा विद्याधर राज्य करीत होता. त्याच्या राज्यात महादेवशास्त्री म्हणून एक ब्राह्मण राहत होता. त्याला चार मुलगे होते. विद्याभ्यास करण्यासाठी चौघेजण परदेशी गेले. शिक्षणक्रम संपवून ते घरी आले. किरकोळ आजाराचे निमित्त होऊन महादेवशास्त्री मरण पावले. त्यांची पत्नी त्यांच्याबरोबर सती गेली.

आई वडिलांच्या पश्चात या व्यवहारशून्य पंडितांना त्यांच्या भाऊबंदानी लुबाडले. घरात खाण्याची पंचाईत झाल्यामुळे ते आपल्या मामाकडे जाऊन पोहचले. या कफल्लक भाच्यांना कोणी मानाने वागविना. सर्वजण त्यांच्याकडे आश्रित म्हणून पाहत असत. त्यांचा पदोपदी अपमान करत. त्यामुळे कंटाळून गेलेला मोठा भाऊ आपल्या तीन भावांना म्हणाला, 'बंधूंनो,असे लाजिरवाणे जिणे जगण्यापेक्षा आपण सर्वांनी सरळ आत्महत्त्या करावी असं माझं मत आहे.'

तेव्हा दुसरा भाऊ म्हणाला, 'दादा, तू हुशार आहेस, तरी असे कसे बोलतोस? संपत्ती कधी घरी राहते का ? त्या चंचल लक्ष्मीसाठी इतके निराश होणे योग्य नाही. तेव्हा आपण असे काही तरी करू या की,ज्यामुळे आपले नाव अजरामर होईल.

तेव्हा दुसऱ्या भावाचे बोलणे सर्वांना पटले. मग विचारांती असे ठरले की, प्रत्येकाने निरनिराळ्या वाटेने दूर जायचे आणि परिश्रमाने एखादी अलौकिक विद्या संपादन करून सहा महिन्यांनी ठरलेल्या ठिकाणी एकत्र जमायचे. ठरल्याप्रमाणे प्रत्येकजण आपापल्या वाटेने निघाले. सहा महिने भराभर निघून गेले. ठरल्या दिवशी चौघेजण त्याच ठिकाणी जमले.

थोरल्या भावाने कोणतेही हाड मिळाल्यास त्यावर मांस उत्पन्न करण्याची

विद्या मिळविली होती. दुसऱ्या भावाने हाड व मांस मिळाल्यास त्यावर योग्य ते कातडे उत्पन्न करण्याचे ज्ञान मिळविले होते. तिसऱ्याने हाड-मांस-कातडी असल्यानंतर त्या प्राण्याचे इतर अवयव निर्माण करण्याचे ज्ञान संपादन केले होते. चौथ्याने कोणत्याही मृत देहांत प्राण घालण्याचे ज्ञान मिळविले होते.

चौघांनी आपापल्या विद्येची माहिती परस्परांना सांगितली. आपली कला कितपत साध्य झाली आहे याचा अंदाज घेण्यासाठी ते एका जंगलात शिरले. एका ठिकाणी काही हाडे पडली होती. प्रथम थोरला बंधू पुढे झाला. त्याने आपल्या विद्याशक्तीने हाडावर मांस निर्माण केले. दुसऱ्याने त्या मांसावर कातडी चढवली. तिसऱ्याने आपल्या विद्याशक्तीने त्या प्राण्याचे अवयव निर्माण केले. तेथे सिंहाची भव्य आकृती तयार झाली. तिघांची विद्या परिपूर्ण झालेली आहे असे सिद्ध झाले. चौथ्याने समोर सिंह आहे हे लक्षात न घेता त्या आकृतीत 'प्राण' ओतला. त्याबरोबर सिंह जिवंत झाला आणि त्याने त्या चौघांनाही खाऊन टाकले.

एवढे सांगून वेताळ म्हणाला, 'विक्रमा, या चौघा भावांत अपराधी कोण ?'

विक्रम म्हणाला, 'वेताळा,चौथा भाऊ खरा अपराधी आहे. कारण त्यानेच या मृत देहात प्राण ओतला. इतर तिघांना मांस,कातडी व अवयव तयार होईपर्यंत हा प्राणी कोण आहे याची कल्पना नव्हती. पण चौथ्याचे तसे नव्हते. त्याला समोर सिंह दिसत असूनही त्याने सिंहाच्या शरीरांत प्राण ओतला. तेव्हा या चौघांच्या मृत्यूला जबाबदार धाकटा बंधूच ठरतो.

राजा विक्रमाचे हे उत्तर ऐकतांच वेताळ परत स्मशानांतील झाडावर जाऊन बसला. विक्रमाने परत त्याला झाडावरून खाली काढले व खांद्यावर टाकून चालू लागला.तेव्हा वेताळ म्हणाला,'राजा तू खरोखरच हुशार आहेस.' तरी पण तुझी करमणूक व्हावी म्हणून मी तुला आणखी एक कथा सांगतो.

(लोकसाहित्य : य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक)

# ५.२६. सिंह आणि बैल

(वेताळ पंचविशी)

'एका सिंहाची एका बैलाशी जानी दोस्ती झाली होती. एका लबाड कोल्ह्याला ती पाहवली नाही. आपला दुष्ट कावेबाज हेतू साधण्याकरिता त्याने त्यांच्या मैत्रीत विघ्न आणलं, कसं ते ऐका. ' विष्णुशर्मा म्हणाले.

दक्षिण देशात आहे एक नगर. महिलादुपा नावाचं. तिथं आहेत खूप बागबगीचे, देवळं, राजवाडे आणि इतर साऱ्या सुखसोयी. नगरात राहात होता एक व्यापारी. वर्धमान त्याचं नाव. वर्धमान केवळ श्रीमंतच होता असं नव्हे, तर सद्गुणी आणि उदारही होता. पैसा सहजगत्या कसा मिळवावा हे जसं त्याला माहीत होतं, तद्वतच तो शहाणपणानं कसा खर्च करावा हेही त्याला अवगत होतं.

वर्धमान नेहमीच म्हणे, 'पैसा खूप मिळवावा आणि खूप खर्च करावा. चांगल्या टाकीत खूप पाणी येत राहिलं पाहिजे आणि त्याला बाहेर जायची वाटही असायला हवी. व्यापाऱ्याचं आयुष्यही असंच असायला हवं. व्यापारी कधी एकाच जागी अडखळलेला नसावा, चौफेर लक्ष असणारा असावा ! माणसाळवलेल्या हत्तीकडून दुसरे हत्ती पकडवणाऱ्या माणसाप्रमाणं त्यानं आपल्या जवळच्या पैशाच्या मदतीनं आणखी पैसा मिळवावा. न वापरलेला पैसा हा केवळ ओझ्यासारखा. जवळचा पैसा वापरणारा माणूस हा पाठीवरून सोनं वाहून नेणाऱ्या गाढवासारखा आणि दुसऱ्यांकरिता आपला पैसा राखून ठेवणाऱ्या मूर्खासारखा समजावा.'

एकदा हा वर्धमान यमुनेच्या काठावर असलेल्या मथुरेला व्यापार करण्यासाठी निघाला. दोन बैलांनी ओढल्या जाणाऱ्या अनेक बैलगाड्यांत किंमती माल लादून त्यानं प्रस्थान ठेवलं. एका बैलगाडीला जोडलेल्या दोन उत्तम बैलांची नावे होती नंदिक आणि संजीवक. दोघा बैलांची उत्तम काळजी

घेतली जात असल्यामुळं ते अगदी पुष्ट दिसत असत, जणू पांढरे ढगच ! शिवाय त्यांच्या गळ्यात सोन्याच्या घंटा बांधलेल्या होत्या. ते दोघे चालू लागले की त्या घंटा मंजुळ आवाज करीत. सरते शेवटी तो काफिला सर्व प्रकारची झाडं-झुडुपं असलेल्या आणि वन्य श्वापदांनी व्यापलेल्या यमुनेच्या काठी असणाऱ्या एका अरण्यात येऊन ठेपला. इथं, पावसानं झालेल्या चिखलात, संजीवकाचा पाय घसरला आणि घोटा दुखावल्यामुळं तो मटकन खाली बसला. घडलेली हकिगत गाडीवानानं वर्धमानाला सांगितली. दयाळू वर्धमानाला फार वाईट वाटलं. आपल्या साऱ्या लवाजम्यासह तो पाच रात्री तिथं थांबला आणि त्यानं संजीवकाला औषधोपचार करवला. पण काही उपयोग झाला नाही. वर्धमानला मथुरेला तातडीनं पोहोचायलाच हवं होतं. म्हणून गाडीवानाला आणि एका नोकराला भरपूर दाणापाणी आणि पैसा देऊन संजीवकाच्या जवळ राहावयास सांगितलं आणि तो म्हणाला,'संजीवकाची उत्तम काळजी घ्या आणि तो बरा झाल्यावर माझ्याकडं घेऊन या. पण दुर्दैवानं जर काही विपरीत घडलं तर त्याची उर्वरित व्यवस्था उत्तमरित्या करून परता.' वर्धमान मग मथुरेला निघून गेला. दुसऱ्याच दिवशी मागं ठेवलेले ते दोन नोकर जंगलात राहावयास घाबरले. संजीवकाला मग त्यांनी तसंच तिथं सोडून दिलं आणि आपल्या मालकाला मार्गातच गाठून त्यांनी त्याला सांगितलं की, संजीवक मेला आणि त्याची उत्तम व्यवस्था लावून ते त्याच्या सेवेला आले.

दैवयोगाने संजीवक बरा झाला. हळूहळू तो इकडे-तिकडे फिरू लागला. थोड्याच दिवसात,अरण्यातील ज्या ठिकाणाहून यमुना वाहत होती त्या जागी संजीवक येऊन पोहोचला. तिथे असणाऱ्या हिरव्या, कोवळ्या गवताचा खुराक तो मनसोक्त घेऊ लागला आणि चैतन्य आणणारे यमुनेचे पाणी पिऊन आनंदात कालक्रमणा करू लागला.

काही दिवसातच संजीवक केवळ शंकराच्या नंदीएवढा दिसू लागला; इतकंच नव्हे तर आनंदाने डरकाळ्या फोडत तो ते अरण्य दुमदुमवू लागला !

त्याच अरण्यात पिंगळक नावाचा सिंह-कोल्हे आणि इतर प्राणी ह्या आपल्या आश्रित मंडळींसह राहात होता. एके दिवशी पिंगळक यमुना काठावर पाणी

पिण्यासाठी आला असताना, संजीवकाच्या डरकाळ्या ऐकून भयभीत झाला. एवढा भारदस्त आवाज कुणाचा असावा ह्याची शहानिशा न करता, पाणी न पिताच पिंगळक आपल्या वडाच्या झाडाजवळील गुहेत परतला. जणू काही घडलंच नाही अशारीतीने घडलेल्या प्रसंगाबाबत विचार करत पिंगळक गुहेच्या बाहेर उभा राहिला. सभोवताली त्याचे सारे आश्रित जमले. भ्यालेल्या अवस्थेतही पिंगळक सिंह भव्य आणि रुबाबदार दिसत होता. माणसाच्या राजाप्रमाणे जंगलाच्या राजाला शिक्षणाची, कपड्याची अथवा समारंभाची जरुरी नसते. कारण निसर्गानेच त्याला राजा केलेला असतो. त्याचं भोजन म्हणजे हत्तीचं मांस. कितीही भुकेलेला असला तरी तो गवत खायचा नाही.

पिंगळकाच्या अवतीभोवती जे आश्रित उभे होते त्यांच्यात होते कोल्हे,करटक आणि दमनक. त्यांचे वडील पूर्वी सिंह महाराजांचे सल्लागार होते. पिंगळक यमुनेवर गेला होता आणि पाणी न पिताच परतला होता हे, दमनकानं पाहिलं होतं म्हणूनच आपल्या भावाला बाजूला घेऊन तो म्हणाला,'करटका,पिंगळक सिंह महाराज पाणी प्यायला गेले खरे, पण पाणी न पिताच तातडीने परतले, असं का ? शिवाय ते असे उदासवाणे, गोंधळलेले का दिसतात बरं ?

'दमनका,' आपल्या भावाला संबोधत करटक कोल्हा म्हणाला,'राजे लोकांच्या गोष्टीत सामान्यांनी लुडबूड करू नये; तसं केल्यास अशा चौकसपणाचं फळ तात्काळ मृत्यू हेच पदरात पडतं. पाचर उपटण्याच्या बाबतीत भलता चौकसपणा केल्यामुळं एका माकडाला प्राण गमवावे लागले होते ! '

'असं कसं झालं ? ' दमनकानं विचारलं.

'सांगतो सारं', करटक म्हणाला आणि त्यानं गोष्ट सांगायला सुरुवात केली.

(लोकसाहित्य : य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक)

# ५.२७. माधोसिंह

(गढवाली लोककथा)

एक सिंह वन का, एक सिंह रण का

एक सिंह माधोसिंह, और सिंह काहे का ?

गढवाल प्रदेशातील वृद्ध एकत्र जमले म्हणजे अजून देखील माधोसिंहाची त्यांना आठवण येते. माणूस मर्त्य आहे. पण त्याची आठवण, त्याची कृती मात्र मरत नाही !

गढवाल प्रदेशात, कोणे एके काळी माधोसिंह म्हणून एक पहेलवान होता. तो खरोखरच सिंहासारखा दिसायचा आणि त्याची कृतीही सिंहासारखीच असायची. इतर सारे त्याच्यापुढे कोल्हेच ! कालीकुँमाऊ मध्ये त्याने कित्येक लढाया लढल्या होत्या. त्याची हिंमत आणि वीरता बघून इतर थक्क व्हायचे. त्याच्या विरोधामध्ये जो कोणी असेल तो मूग गिळून बसायचा ! गढवालच्या वीरगीतांमध्ये माधोसिंहाचे उल्लेख सतत येत असतात ! माधोसिंहाच्या गावचे नाव 'मलेथा'असे होते.तिथे एक छोटा झरा होता. त्या छोट्या नदीशी अजूनही माधोसिंहाचे नाव जोडले गेले आहे. माधोसिंहाने जो त्याग केला तो मात्र अमर असाच म्हणावा लागेल. मलेथाच्या शेतातील पिकांवर आज देखील त्याच्या त्यागाची झळाळी आहे. संघर्षात विपत्तीत माधोसिंहाचा फार मोठा आधार लोकांना वाटायचा !

एकदा गढवालमध्ये दुष्काळ पडला. वर्षा ऋतू संपत आला तरी पाऊस पडला नाही. या दुष्काळानेच लोकांना त्राही भगवान करून टाकले. त्यांना जगणे मुष्किल झाले. सर्वांच्या मनात जे एक होते ते प्रकट झाले. ते म्हणजे एखादा छोटासा झरा लागतो की काय ते बघायचे ! अगोदरच गढवालची त्या वेळची जमीन खरडबरड होती. त्या जमिनीतून पीक तरी काय निघणार ?

मलेथा पासून थोड्या अंतरावर एक नाला वहात होता. त्या नाल्यातून पाणी

आणले तर ? तथापि हे काम सोपे नव्हते. त्या नाल्यापासून गावापर्यंत पाणी आणायचे म्हणजे मोठेमोठे पुरातन दगड काढावे लागतील, कापावे लागतील, खोदावे लागतील !

पुढारी म्हणून सगळ्यांना माधोसिंहाचीच आठवण झाली. माधोसिंहही पुढे झाला आणि सगळी शक्ती एकवटून तो कामाला लागला. मोठमोठे दगड छिन्नीने तोडून पाण्यासाठी तो मार्ग काढू लागला. रात्रंदिवस काम करून देखील असा मार्ग दिसेना, सुचेनाही ! तरीपण माधोसिंह हिंमत हरला नाही ! आजवर त्याला पराजय माहीत नव्हता. मग इथेच तो कसा हरणार ?

माधोसिंहाची कसोटी लागणार काय ? त्याला हरावे लागणार काय ?

एक दिवस त्याला स्वप्न पडले. त्याची कुलदेवता त्याच्या स्वप्नात आली. माधोसिंहाने तिच्यापुढे साष्टांग नमस्कार घातला. कुलदेवता म्हणाली, 'माधोसिंह, तू हे काम सगळ्यांसाठी करतो आहे. तुला जर पराभव पत्करायचा नसेल तर आपल्या मुलाचा बळी दे. तरच पाणी लागेल.'

'देवी,सगळ्यांबरोबरच मी आहे. आजवर माझी शारीरिक शक्ती कामी आली. आज मला त्याहून मोठ्या शक्तीशी सामना करावा लागत आहे. तुझ्या मनासारखे होईल. तुझा आशीर्वाद मात्र हवा ! '

देवी अंतर्धान पावती !

सकाळ झाली. माधोसिंहाने आपल्या मुलाला हाक मारली. गावातील सगळ्या लोकांना आपल्या बरोबर घेतले. सगळ्यांना त्याने आश्वासन दिले की, आज पाणी येईलच !

सर्व लोक मिळून कामाला लागले. त्यात माधोसिंहाचा मुलगा सुद्धा ! माधोसिंहाची शारीरिक शक्ती कमी पडते की काय असे त्याच्या मनात आले. असेल नसेल ते सर्व धैर्य एकवटून त्याने आपल्या काखेत लपविलेले खड्ग काढले. आपल्या गोजिरवाण्या मुलाकडे एकदा पाहिले. एकीकडे त्याग आणि कर्तव्य, तर दुसरीकडे ममत्व, वात्सल्य आणि थोडे दुबळेपण !

माधोसिंहाने डोळे बंद केले. त्या बंद डोळ्यातून त्याला सर्वत्र दुष्काळ

दिसला. लहान लहान मुलांची भुकेली तोंडे दिसली. सर्व विधवांचे चेहरेही दिसून गेले. अन् ते खड्‌ग आपोआप लाडक्या मुलाच्या देहातून आरपार गेले.

सर्वजण बघतच राहिले. त्यांना काय दिसले ? दिसले की माधोसिंहाच्या मुलाचे शिर अलीकडे अलीकडे सरकत आहे आणि पाण्याचा झरा त्या शिराच्या मागोमाग येत आहे.

पाण्याचा सुकाळ झाला. शेतातील पडलेली पिके उभी झाली. मोहरीची पिवळी फु ले भरभरून आली आणि पक्षांची किलबिल किलबिल...

एक सिंह वनका,
एक सिंह रणका,
एक सिंह माधोसिंह
और सिंह काहे का ?

(संदर्भ : गढवाली लोककथा)

# ६

# चातुर्यकथा


६.१. बिरबलची खिचडी ६६१

६.२. चतुर बिरबल ६६३

६.३. बिरबलचे स्वर्गारोहण ६६६

६.४. शेतकऱ्याचे चातुर्य ६६९

६.५. बंडुचे चातुर्य ६७१

६.६. तेनालीरामचे वाक्चातुर्य ६७३

६.७. आनंदी व्हा ६७४

६.८. आहे त्यात संतुष्ट रहा ६७५

६.९. दिसणे आणि पाहणे ६७६

६.१०. अप्पाजी प्रधान ६७७

६.११. हुशार कावळा ६७९

६.१२. कोण बुद्धू कोण शहाणा ६८०

# ६.१ बिरबलची खिचडी

भर थंडीच्या दिवसात अकबर आणि बिरबल तळ्याभोवती फेऱ्या मारत होते. बिरबलच्या मनात विचार आला की, पैशासाठी माणूस काहीही करू शकतो. बिरबलने आपल्या मनातले विचार व्यक्त केले. अकबराने तत्काळ त्याचे बोट पकडले आणि तळ्यातल्या पाण्यात बुडवले; बिरबलने चटकन आपले बोट मागे घेतले, कारण तळ्यातल्या थंड पाण्याने ते गारठले होते.

अकबर म्हणाला, "मला नाही वाटत पैशासाठी कुणी माणूस या तळ्यात रात्र काढील!"

बिरबलने उत्तर दिले, "मी खात्रीने असा माणूस शोधून काढीन."

अकबरने बिरबला आव्हान दिले आणि त्याने खरोखर असा माणूस शोधून काढला तर आपण त्याला शंभर सोन्याच्या मोहरा बक्षीस देऊ, असे सांगितले.

बिरबलने खूप शोध घेतला, अखेर त्याला पैशाची अत्यंत निकड असलेला असा एक माणूस भेटला की जो हे दिव्य करायला तयार झाला.

तो गरीब माणूस तळ्यात उतरला. हा माणूस आपले वचन खरोखर पूर्ण करतो की नाही हे पाहण्यासाठी अकबराने त्याच्यावर पाळत ठेवण्याकरिता दोन पहारेकरी नेमले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते पहारेकरी त्या तळ्यातल्या गरीब माणसाला अकबराकडे घेऊन आले.अकबराने त्या गरीब माणसाला विचारले की, तू खरोखर रात्रभर त्या तळ्यात होतास का? त्या गरीब माणसाने उत्तर दिले, 'होय, आपण रात्रभर तळ्यात राहिलो.' अकबराने त्यावर त्या गरीब माणसाला विचारले, तू कशी काय त्या तळ्यात रात्र काढली?

त्या गरीब माणसाने सांगितले की, तळ्याबाहेर एक दिव्याचा खांब होता, मी पाण्यातल्या गारठ्याकडे लक्ष जाऊ नये म्हणून एकटक त्या दिव्याकडे पहात

राहिलो. अकबराने त्या गरीब माणसाला बक्षीस दिले नाही; कारण अकबराच्या मते त्या गरिबाने दिव्याची उष्णता मिळवली, आणि म्हणून त्याला थंडी वाजली नाही.अखेर तो गरीब माणूस बिरबलाकडे मदतीसाठी गेला.

दुसऱ्या दिवशी बिरबल दरबारात गेला नाही. राजाने वाट पाहिली, अखेर बिरबलाच्या घरी चौकशीसाठी नोकर पाठविला. नोकर परत आला आणि त्याने सांगितले की खिचडी शिजल्यावर बिरबल दरबारात येईल. राजाने तासन तास त्याची वाट पाहिली पण बिरबल काही आला नाही. अखेर राजाने ठरविले की आपणच बिरबलाच्या घरी जावे आणि तो काय करतो आहे ते पहावे.

राजाने पाहिले, बिरबल जळत्या लाकडांसमोर जमिनीवर बसला होता, आणि खिचडीचे भांडे पाच फूट उंचावर टांगलेले होते. राजाला आणि त्याच्या नोकराला हसे आवरेना.

अकबर बिरबलाला म्हणाला, जाळापासून एवढ्या उंचीवर भांडे ठेवल्यावर खिचडी कशी काय शिजेल?

बिरबल म्हणाला, " अगदी याच पद्धतीने चांगल्या फर्लांगभर अंतरावरून त्या गरीब माणसाने खांबावरल्या दिव्यापासून ऊब मिळवली ना?"

राजाला त्याची चूक उमगली, आणि त्याने त्या गरीब माणसाला शंभर मोहरांचे बक्षीस दिले.

(ब्रेन टॉनिक मासिक, मे २०१३)

# ६.२ चतुर बिरबल

अकबर बादशहाच्या पदरी अनेक सरदार होते. एका सरदाराला उंची दागिने घालण्याचा शौक होता. त्याच्या अंगावर नेहमी हिऱ्या-मोत्यांच्या माळा झगमगत असत.

एकदा अकबर बादशहाने त्याला एक तातडीचे काम सांगितले. सरदार गडबडीने घरी आला. चार घास खाल्ले व नवीन वस्त्रे घालून तो कामाला निघाला. त्या गडबडीत रत्नाचा एक हार त्याने खुंटीवर ठेवला. बादशहाने सांगितलेले काम संपवून तो रात्री घरी परतला. तो फारच थकला होता. अंथरुणावर पडताच त्याला झोप लागली व त्या हाराबद्दल तो पूर्णपणे विसरून गेला.

दुसऱ्या दिवशी त्याला दरबारात जावयाचे होते. त्याने दरबारी पोषाख चढविला. गळ्यात माळा घातल्या. तेव्हा त्याला आपला रत्नांचा हार दिसेना. त्याने शोधण्यास सुरुवात केली. त्यावेळी आपण तो हार काल गडबडीत खुंटीवर टांगला होता, याची त्याला आठवण झाली. लगेच त्याने आपल्या सर्व नोकरांना दिवाणखान्यात बोलावून हारासंबंधी विचारले. कोणी कबूल करेना. त्याने बराच धाक दाखवला. तरीही त्याची मात्रा चालेना. त्याला दरबारी जायचे असल्याकारणाने तो तसाच दरबारी गेला.

त्याची चिंताग्रस्त मुद्रा पाहून बिरबलने त्याला विचारले, “ आज काय तुमचा चेहरा काळवंडला आहे? कालचे बादशहाचे काम बरोबर झाले नाही का? महाराज काही बोलले का?” हे ऐकून त्या सरदाराने रत्नाचा हार चोरीला गेल्याची सारी हकिगत बिरबलाला सांगितली. बिरबल म्हणाला, “तुम्ही मुळीच काळजी करू नका. खरा चोर मी तुम्हाला पकडून देतो.”

बिरबलाने काठ्यांचा एक भारा आणवला. त्या काठ्या त्याने एकाच

मापाच्या कापून घेतल्या व त्या साऱ्या काठ्या त्याने एकत्र बांधल्या. सरदाराच्या नोकरांना त्याने बोलावणे पाठविले. त्या सर्वांना एकत्र बोलावून तो त्यांना म्हणाला, " या काठ्या मी एका मांत्रिकाकडून मंत्रून आणलेल्या आहेत. ही एकेक काठी तुम्हा प्रत्येकाजवळ देतो. ती तुम्ही घरी घेऊन जा व उद्या परत आणा. ज्याने तो रत्नहार चोरला आहे, त्याची काठी उद्या दोन बोटे वाढलेली असेल."

एवढे सांगून त्याने प्रत्येकाच्या हाती एकेक काठी देऊन त्या सर्वांना रजा दिली. सारे जण घरी गेले.

ज्या नोकराने रत्नहारांची चोरी केली होती, त्यास मुळीच झोप येईना. आपली काठी उद्या सकाळपर्यंत दोन बोटे वाढली तर? हीच चिंता त्याला सतावीत होती. त्याला झोप येईना. बिछान्यावर पडून तो या कुशीवरून त्या कुशीवर तळमळू लागला. त्याला एक नामी युक्ती सुचली. आपली काठी मुळातच दोन बोटे कमी केली तर? लगेच तो घरात गेला; त्याने कोयता आणला आणि ती काठी दोन बोटे कमी करून टाकली.

दुसऱ्या दिवशी सकाळी बिरबल त्या सरदाराच्या घरी आला. सारे नोकर कामावर हजर झालेलेच होते.

बिरबलाने एकेकाला बोलावून काठी तपासण्यास सुरुवात केली. ज्या नोकराने चोरी केली होती, तो आरामात होता. त्याने मुळातच काठी दोन बोटे कमी केली होती. आता त्याला बिलकूल भीती नव्हती. त्याने आपली काठी बिरबलाच्या हाती दिली. ती दोन बोटे कमी भरली. बिरबलाने लागलीच त्याला मानगुटीस पकडले आणि सरदाराला सांगितले, "हा घ्या तुमचा रत्नहार चोर."

ह्या अनपेक्षित प्रसंगाने तो नोकर घाबरून गेला. त्याने बिरबलाचे पाय धरले. धन्याची माफी मागितली व आपणच हार चोरला, ही गोष्ट कबूल केली. तो चोरलेला हारही आणून दिला.

चोरी पकडण्यासाठी बिरबलाने कोणती युक्ती केली, हे त्या सरदाराला अजूनही समजले नव्हते.

बिरबलाने सांगितले, “ ह्या काठ्या मी कोणा मांत्रिकाकडून मंत्रून आणल्या नव्हत्या. पण जो खरा चोर असेल तो आपली काठी दोन बोटे कमी करेल हे मला चांगले माहीत होते. आणि अगदी तसेच झाले. या युक्तीने चोर मात्र हाती गवसला.” त्या चोराकडे वळून बिरबल म्हणाला, “हे पहा, दागिन्याने पुरुषाचे सौंदर्य कधीच वाढत नाही. शौर्य हाच खरा पुरुषाचा दागिना! हे शौर्य ज्याच्या अंगी असेल तोच पुरुष खरा सुंदर!”

[ 'बालसुधा', पुस्तक ४ थे , कर्नाटक सरकार, १९७७, पृ. ३९-४१]

# ६.३ बिरबलचे स्वर्गारोहण

बिरबलाला बादशहाच्या मर्जीतून उतरविण्यासाठी त्याचा द्वेष करणारे लोक नेहमीच काहीना काही डाव रचीत असत. परंतु बिरबलापुढे त्यांची डाळ मुळीच शिजत नसे. त्यांचे सर्व डाव त्यांच्याच अंगाशी येत व त्यांची चांगलीच फटफजिती होते.

एकदा बिरबलाच्या शत्रूंनी एक नवाच डाव रचला. व त्या डावात बादशहाच्या मर्जीतला न्हावी, जो करीम, त्याला सामील करून घेतले.

त्यानंतर एक दिवस बादशहाची मर्जी पाहून त्याची दाढी घोटता घोटता करीम म्हणाला, "सरकार आपल्या पिताजींचा माझ्यावर फार लोभ होता. त्यांचं स्वर्गामध्ये कसं काय चाललं आहे, हे जाणून घ्यायची मला फार इच्छा होत आहे." ते ऐकून बादशहा हसून म्हणाला, "अरे मुर्खा, स्वर्गातली हकिगत आपल्याला इथे कशी कळणार?"

"सरकार! आपण स्वर्गात एखादा जासूद पाठवला तर?" करीमने वस्तरा साफ करता करता विचारले.

"हे कसे शक्य आहे?" बादशहाने आरशात पहात विचारले.

"सरकार, बिरबलासारखे चतुर लोक दरबारात असल्यावर कोणतीच गोष्ट अवघड नाही." करीम उत्तरला.

"तू म्हणतोस तेही खोटं नाही. हे काम बिरबल नक्कीच करू शकेल." - बादशहा म्हणाला. आणि बादशहाने बिरबलाला हाक मारून स्वर्गात जाऊन पिताजींची खबर आणण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली.

आपल्या शत्रूंचा कावा बिरबलाने लागलीच ओळखला व त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटवायचे असे ठरवून तो नम्र स्वरांत बादशहाला म्हणाला, "सरकार, सदेह स्वर्गात जायचे तर खर्च फार येईल; शिवाय त्यासाठी पाचसहा

महिन्यांचा अवधीही लागेल."

"काही हरकत नाही. तुला हवे तेवढे पैसे खजिनदाराकडून घेऊन जा." बादशहाने हुकूम सोडला.

बिरबलाने लगेच खजिनदाराकडून दहा हजार मोहरांची रक्कम घेतली व तो आपल्या कामगिरीला लागला.

दुसऱ्या दिवसापासून बिरबलाने आपल्या विश्वासू सेवकाकरवी आपल्या घरापासून थेट स्मशानापर्यंत एक भुयार खणण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत भुयार खणण्याचे काम संपले. मग बिरबलाने एक चांगला मुहर्त पाहून त्या दिवशी स्वर्गात जाण्याचा बेत जाहीर केला. आता बिरबल नक्की मरणार हे पाहून त्याच्या शत्रूंना मोठा आनंद झाला. परंतु बिरबल त्या सर्वांना पुरून उरणारा होता. ठरल्या दिवशी बादशहासकट सर्व लोक स्मशानभूमीवर जमा झाले. बिरबलाने मुद्दामच भुयाराच्या तोंडाशी चिता रचली. नंतर सर्व लोकांसमक्ष बिरबल त्या चितेवर चढला. चिता पेटविण्यात आली. ज्वाळांचे लोट उसळले. काळाकुट्ट धूर आकाशात उंच झेपावला. तेवढ्यात बिरबलाने गुपचूप भुयाराचे दार उघडले व तो आत शिरला. तेथे पूर्वीच आणून ठेवलेला हाडांचा सापळा त्याने चितेत ठेवून दिला व भुयारातून तो आपल्या घरी जाऊन झोपला.

दुसऱ्या दिवशी चितेत तो हाडांचा सापळा राजसेवकांना सापडला. तो पाहून बिरबलाचे शत्रू आनंदाने बेहोश झाले. बादशहाच्या दु:खाला मात्र सीमा राहिली नाही. बिरबलाचे गुण आठवून तो हुंदके देऊ लागला. पुढे काही दिवस लोटल्यानंतर बिरबल एका रात्री भुयारातून एकदम स्मशानात प्रकट झाला. त्याला पाहून तिथल्या डोंबाला मोठे आश्चर्य वाटले. त्याने ती बातमी बादशहाला कळविली. बिरबल जिवंत आहे हे ऐकून बादशहाचा आनंद गगनात मावेना. त्याने बिरबलाला घेऊन येण्यासाठी रथ रवाना केला. त्या रथात बसून बिरबलाची स्वारी मोठ्या ऐटीत राजवाड्याकडे आली. बिरबलाला पाहून बादशहाने त्याला कडकडून मिठी मारली. बिरबलाला गहिवरून आले.

नंतर बादशहाने बिरबलाला मोठ्या प्रेमाने शेजारी बसवून विचारले, " काय

बिरबल, काय म्हणते तुझी सफर? स्वर्गात तुला आमचे पिताजी भेटले का?"

त्यावर बिरबल आनंदून म्हणाला, " सरकार, स्वर्गाच्या सफरीची कथा काय सांगू आपणाला. आपण तर अगदी मजेत होतो तिथे. देवदूताने सोन्याच्या विमानात बसवून मला सर्व स्वर्ग दाखवून आणला. वा ! वा! काय तेथली अपूर्व शोभा! तिथला तो रत्नजडीत राजवाडा. तेथले ते रंगीबेरंगी फुलांनी नटलेले वृक्ष. ते अमृताचे झरे. वा! वा! वाहवा! आपण तर इतके खूष झालो की, तेथून परत इकडे येऊच नाही, असे वाटत होते."

"बरं, ते राहू दे; आमचे पिताजी भेटले का तुला?" बादशहाने कुतुहलाने विचारले.

"वा! वा! सरकार, अहो त्यांना भेटण्यासाठीच तर मी तिकडे गेलो होतो. मला पाहून त्यांना मोठा आनंद झाला."

"तिकडे सुखात आहेत ना ते?"

"वा, वा. ते काय सांगावे! स्वर्गातली सारी सुखे त्यांच्यासमोर हात जोडून उभी आहेत. पण ..!"

"पण काय?" बादशहाने घाबऱ्या स्वरांत विचारले.

"पण फक्त एकाच गोष्टीची त्यांना तेथे उणीव आहे सरकार."

"कोणत्या?"

"त्यांना तिथे चांगला न्हावी काही मिळत नाही!"

"मग?"

"म्हणून त्यांनी आपल्याला असा निरोप दिला आहे की, माझ्या करीमला इकडे ताबडतोब पाठवून द्या."

आपल्या पिताजींचा हा निरोप समजताच बादशहाने ताबडतोब हुकूम सोडला - "करीम न्हाव्याला आताच्या आता चितेवर जाळून स्वर्गात पाठवा."

बादशहाच्या हुकूमाची अंमलबजावणी ताबडतोब झाली. करीम न्हावी प्राणास मुकला, आणि बिरबलाच्या शत्रूंचा डाव त्यांच्याच अंगाशी येऊन त्यांची फटफजिती झाली.

[ 'बालसुधा', पुस्तक ७ वे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. १९-२२]

# ६.४ शेतकाऱ्याचे चातुर्य

एका चोराने देवळातली घंटा चोरली व तो जंगलातल्या बाजूने पळून गेला. जंगलातून जाताना चोराला वाघाने ठार केले. चोराने चोरून नेलेली घंटा जंगलातच पडून राहिली. पुढे ती घंटा एका माकडाला सापडली. माकड आपले दररोज दिवसा-रात्री जोरजोराने ती घंटा वाजवी. जंगलाजवळच्या गावात त्या घंटेचा आवाज ऐकू येई. गावातील लोकांना वाटे रात्री, अपरात्री घंटा कोण वाजविते?

असेच काही दिवस गेले. एकदा एका गावकऱ्याची चरायला गेलेली गाय परत आलीच नाही. पुढे एकदा जंगलाच्या तोंडाशी माणसाचे कपडे व वहाणा दिसल्या. लोक आपसात बोलू लागले, "जवळच्या जंगलात राक्षस रहात असावा. तो दिवसारात्री घंटा वाजवीत असावा." लोक अगदी घाबरून गेले. जंगलाच्या बाजूने कोणीही जायला तयार होईना. राजाला ही बातमी कळली. त्याने राज्यात दवंडी पिटली, 'जो कोणी राक्षसाला ठार करील, व त्याच्या जवळची घंटा घेऊन येईल, त्याला मी दहा हजार रुपये बक्षीस देईन'. दवंडी पिटवूनही राक्षसाला ठार करण्यास कोणी पुढे येईना. शेवटी एक शेतकरी पुढे आला व म्हणाला, " महाराज, मला आज्ञा द्या, मी त्या राक्षसाला ठार मारतो व त्याच्या जवळची घंटा घेऊन येतो."

दुसरे दिवशी तो धीट शेतकरी जंगलात जायला निघाला. जंगलात शिरतो न शिरतो तोच त्याला घंटेचा आवाज ऐकू आला. शेतकरी इकडे तिकडे पाहू लागला; तोच त्याला झाडावर एक माकड घंटा वाजवीत असलेले दिसले. आता ही घंटा कशी मिळवावी, या विचारात तो असता, त्याला एक युक्ती सुचली. तो जंगलातून परत आला. बाजारात गेला. त्याने पेरू, द्राक्ष,केळी, आंबे इत्यादी फळे विकत घेतली व ती टोपलीत भरली.

दुसरे दिवशी तो शेतकरी ती फळांनी भरलेली टोपली घेऊन जंगलाकडे निघाला. इतक्यात त्याला 'घण् घण्' असा घंटेचा आवाज ऐकू आला. माकड एका झाडाच्या फांदीवर बसून घंटा वाजवीत असलेले दिसले. शेतकरी हळूच त्या झाडाखाली गेला आणि त्याने ती फळांनी भरलेली टोपली त्या झाडाखाली ठेवली व आपण दुसऱ्या झाडाआड जाऊन बसला. थोड्या वेळाने त्या माकडाचे लक्ष त्या फळांनी भरलेल्या टोपलीकडे गेले. टोपलीतील फळे पाहून माकडाच्या तोंडाला पाणी सुटले. ते झाडावरून झरझर खाली उतरले. त्याने हातातली घंटा फेकून दिली व ते टोपलीतील फळे खाण्यांत गुंग झाले. हे पाहून तो शेतकरी झाडाआडून पुढे आला. त्याने ती घंटा उचलली व आपल्या गावाकडे निघाला.

शेतकरी राजाकडे आला. त्याने ती घंटा आपल्या महाराजांना दाखविली व म्हणाला, " महाराज, राक्षसाला ठार मारून त्याच्या जवळची घंटा आंणली आहे." महाराजांनी शेतकऱ्याला शाबासकी दिली व दहा हजार रुपये बक्षीस दिले.

[ 'बालसुधा', पुस्तक २ रे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. ७-१०]

# ६.५ बंडूचे चातुर्य

वडगावात एक मोठा वाडा होता. वाड्यातील बिऱ्हाडात चार मुलगे होते. राजू, संजू, अजू, बंडू ही त्यांची नावे. रामराव त्या वाड्याचे मालक. त्यांना मूलबाळ नव्हते. ते फार मायाळू होते. मुलांना ते कधी खाऊ देत, कधी पैसे देत. एकदा ते गावाला जायला निघाले. ते तीन महिन्यांनंतर परत येणार होते. त्यांनी मुलांना जवळ बोलावून म्हटले, "राजू, संजू, अजू, बंडू इकडे या! मी तुम्हांला दहा दहा पैसे देतो. त्या पैशांचा उपयोग तुम्ही कसा करता पाहू या. मी आता गावाला जाऊन तीन महिन्यांनंतर परत येईन. त्यावेळी मला भेटा आणि सांगा."

मुले पैसे घेऊन नाचत आपापल्या घरी गेली. प्रत्येकाने आपल्याला दिलेल्या पैशांचा उपयोग निरनिराळ्या प्रकारे केला. तीन महिन्यांनी रामराव गावाहून परत आले. त्यांनी सर्व मुलांना जवळ बोलाविले व प्रत्येकाला दहा पैशांचा उपयोग कसा केला याबद्दल विचारिले.

राजू म्हणाला, " तुम्ही दिलेल्या पैशांचा मी एक रबरी फुगा आणला व तो फुगा घरात अधांतरी टांगून ठेवला. दुपारी 'फाट्' असा आवाज होऊन फुगा फुटून गेला."

संजू म्हणाला, "त्या दहा पैशांची मी बोरे आणली, ती मी माझ्या भावंडांना दिली व स्वत: खाल्ली."

अजू म्हणाला, " तुम्ही दिलेले सर्व पैसे मी पेटीत जपून ठेवले आहेत."

रामराव बंडूला म्हणाले, " बंडू तू सर्व पैसे चट्ट केलेस वाटते!"

बंडू म्हणाला, " नाही, मुळीच नाही!"

रामराव म्हणाले, "मग सांग ना, तू तुझ्या पैशांचे काय केलेस!"

बंडू म्हणाला, " मला दिलेल्या दहा पैशांचे मी घेवड्याचे बी आ्णले. प्रथम परसातील एका बाजूची जमीन कुदळीने खोदली. ढेकळे फोडून साफ केली.

वाफा तयार केला. त्यात सरी पाडल्या व घेवड्याचे बी पेरले. वाफ्याला दररोज पाणी घातले. बीपासून वेल तयार झाले. दोन महिन्यांनी वेलाला शेंगा लागल्या. त्या शेंगा काढल्या; थोड्या शेंगांची भाजी करून खाल्ली. राहिलेल्या शेंगा विकल्या, त्यांचा एक रुपया आला." असे म्हणून बंडूने खिशातून एक रुपयांची नोट काढून ती रामरावांना दाखविली.

रामराव म्हणाले, " शाबास बंडू! तू पैशांचा चांगला उअपयोग केलास!" त्यांनी बंडूच्या हुशारीचे कौतुक करून त्याला चांगले बक्षीसही दिले.

[ 'बालसुधा', पुस्तक २ रे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. ४-६]

# ६.६ तेनालीरामाचे वाक्चातुर्य

तेनाली रमण एकदा सपत्नीक मित्राच्या विवाहास जात होते. लग्नसमारंभाला जायचे म्हणून पत्नी महागडी साडी आणि दागिन्याने लखलखलेली होती. चारचौघात उठून दिसावे म्हणून तिने सर्व काळजी घेतली होती.

दोघेही रमत गमत रस्त्याने चालत होते. अचानक पाठीमागून एक उधळलेली बैलगाडी येताना तेनालीरामला दिसली. ते पाहून तेनालीरामाने पत्नीला वाचवण्यासाठी तिला चटकन मागे खेचले. या धांदलीत दोघेही तोल जाऊन खड्ड्यात पडले.

तेनालीरामच्या पत्नीची साडी चुरगळली, धुळीत माखली. तिच्या सगळ्या उत्साहावर पाणी फिरले. ती तेनालीरामला म्हणाली, " हे काय केलेत तुम्ही, माझी सगळी साडी खराब झाली. आत्ता या अवतारात मी कशी लग्नाला येऊ? मी नाही येत जा." पत्नीला कुठे खरचटले नाही, म्हणून तेनालीरामने स्वत:चे समाधान केले होते; पण पत्नीचा आता लग्नाला न जाण्याचा हा पवित्रा पाहून तो क्षणभर बुचकळ्यात पडला. पण लागलीच त्याने पत्नीच्या मानसिकतेला गालातल्या गालात हसून दाद दिली आणि म्हणाला, "त्यात काय एवढं. जे झालं ते बरंच झालं. यानिमित्ताने आपण आता नवीन साडी खरेदी करू शकतो."

तात्पर्य, काही चांगले करण्याच्या प्रयत्नात कधी अडथळे येतात; अशा वेळी वाईट वाटणं स्वाभाविक असलं, तरी स्वत:ला वा परिस्थितीला दोष देत बसण्यापेक्षा वस्तुस्थिती समजून घ्यावी आणि योग्य पर्याय स्वीकारून पुढे जावे. त्यातच खरा आनंद आहे.

# ६.७ आनंदी व्हा

समुद्रावरचे आल्हाददायक वारे अंगावर घेत तेनाली रामचा मित्र स्वत:शीच विचार करीत झोपाळ्यावर पहुडला होता. तेनालीरामने त्याला विचारले, "मित्रा कसला विचार करतोस?" तेव्हा तेनालीरामच्या मित्राबरोबर त्याचा संवाद सुरू झाला.

मित्र म्हणाला, " मी खरोखरच आनंदी कधी असेन याचा विचार करतोय."

त्यावर तेनालीराम म्हणाला, "मग तो दिवस कधी उगवणार आहे?"

मित्राने तेनालीरामकडे आपले मन मोकळे केले. तो म्हणाला, " जेव्हा सागरकिनारी माझा एखादा बंगला असेल, स्वत:ची गाडी असेल, चार चार मुले असतील, त्यांना चांगले शिकवता येईल, मग ते छानशी नोकरी मिळून भरपूर पैसे मिळवतील, आणि ...

तेनालीरामने मध्येच त्याला थांबवून म्हटले, " मला कल्पना आली तुला काय म्हणायचे आहे ते; परंतु त्यानंतर काय?

मित्राने तत्काळ आपला मनोदय व्यक्त केला व म्हणाला की, "मग मी मस्तपैकी पायावर पाय टाकून असा हवा खात आराम करीन.".

तेनाली त्यावर म्हणाला, "परंतु माझ्या मित्रा, तू आत्ता पण कोणत्याही कष्टाशिवाय तेच करतो आहेस ना? मग भविष्याची चिंता करीत आपला आनंद कशाला पुढे ढकलतोस?"

तात्पर्य, भविष्याची चिंता करण्यात वेळ घालवण्यापेक्षा वर्तमानातला आनंद वेचायला शिका.

# ६.८ आहे त्यात संतुष्ट रहा

टळटळीत दुपारी तेनालीरामने एका व्यक्तीला त्याच्या डोक्यावर सूर्यापासून आडोसा करताना पाहून उत्सुकतेने विचारले, "मित्रा तू हे काय करतो आहेस?"

मित्र : सूर्य खूपच तळपतोय, त्याला लपवण्याचा प्रयत्न करतोय .

तेनाली : त्यासाठी इतका का त्रास करून घेत आहेस? एक सोपी युक्ती आहे. हे बघ..

असे म्हणत तेनालीरामने वाळू उचलून त्याच्या डोळ्यांत फुंकली.

तात्पर्य, मनातल्या इच्छापूर्तीमुळे आपल्याला आनंदप्राप्ती होईल या या भ्रमात आपण असतो आणि मग त्यामागे धावताना आनंद घ्यायचे राहूनच जाते. इच्छा या डोळ्यांतील वाळूच्या कणाप्रमाणे असतात, त्यांच्यामुळे आपण आपल्याकडे असणाऱ्या वस्तुमधील सौंदर्य पाहू शकत नाही .

# ६.९ दिसणे आणि पाहणे

तेनालीराम आणि त्याची पत्नी घराला कोणता रंग द्यावा हे ठरवत होते. पत्नीला गुलाबी रंग पसंत होता. तेनाली म्हणत होता, आपण सफेद रंग देऊ या. दोघांमध्ये काही केल्या एकमत होत नव्हते. पत्नीने अखेर निकराने सांगून टाकलं की, "मी ठरवलं आहे, गुलाबीच रंग द्यायचा. आणि त्याचं कारण एकच आहे, फक्त गुलाबी रंगामुळेच मी आनंदी राहू शकते.

तेनालीरामने मग वाद घालायचे सोडून दिले. त्याने बाजारात जाऊन पत्नीला दोन गुलाबी काचांचे चश्मे आणून दिले, आणि तिला म्हणाला, " होऊ दे तुझ्या मनासारखं. या चष्म्यामुळे या भिंतीच काय मी देखील तुला गुलाबी दिसेन. त्यामुळे तुझा आनंद आणखीनच वाढेल.

तात्पर्य, तेनालीरामच्या सांगण्याप्रमाणे गुलाबी काचेच्या चष्म्यामुळे घर गुलाबी होणार नव्हते, तसे केवळ भिंतीचा रंग कोणता आहे, एवढ्यावरून जीवनाचा आनंद कशात आहे, हे ठरवण्याचा निष्कर्ष काढण्यात हशील नव्हते. आपण कोणत्या नजरेने पाहतो हे महत्त्वाचे असते. काय दिसते, यापेक्षा काय पहातो याला महत्त्व असते. आनंद भिंतीच्या रंगात नसतो, पहाणाऱ्याच्या मनात असतो. त्यामुळे एवढ्या तेवढ्या कारणावरून भांडत बसण्यापेक्षा या दुष्ट-चक्रातून मुक्त होण्यासाठी वस्तुस्थितीचं आपलं आकलन उतावळेपणाने न करता चिंतन, मनन करून केले तर आपले आंतरिक समाधान वाढते. मृगजळाकडे न धावता खरा आनंद आपल्याला वेचता येतो. .

# ६.१० अप्पाजी प्रधानाची गोष्ट

खूप खूप वर्षांपूर्वी विजयनगरचा राजा कृष्णदेवराय यांच्या राज्यात अप्पाजी प्रधान नावाचा एक हुशार आणि चतुर मंत्री होता.

एकदा विजनगरला कलिंग देशाच्या राजाचा एक प्रतिनिधी आला आणि कृष्णदेवराय राजाला म्हणाला, 'मी कलिंग देशातून आलो असून आमच्या राजाला कोबी आणि मुळा खाण्याची इच्छा झाली आहे. परंतु आमच्या देशात कोबी आणि मुळा पिकत नाहीत. त्यामुळे आपण आपल्या राज्यातून ते राजेमहाराजांसाठी लवकरात लवकर पाठवावे अशी मी आपणास विनंती करीत आहे.' राजाचा प्रतिनिधी निरोप घेऊन आला असल्यामुळे राजाने त्याचा यथोचित सन्मान व आदरातिथ्य केले. प्रतिनिधी संतोषाने कलिंग देशास परत गेला.

दुसऱ्या दिवशी कृष्णदेवरायांनी आपल्या दरबारात सर्व मंत्रीगणांना बोलावले. कलिंग देशाच्या राजाचा निरोप सांगितला. कृष्णदेवरायांसह सर्व मंत्रीगण प्रश्नांकित चेहऱ्याने एकमेकांकडे पाहू लागले. थोड्याच वेळात कृष्णदेवराय म्हणाले, 'ह्या कलिंग देशाच्या राजेसाहेबांना वेड लागले असावे. विजयनगरहून कलिंग देशास कोबी कसा पाठवायचा? तीन महिन्यांच्या प्रवासात कोबी आणि मुळा खराब नाही का होणार? काय करावे? नाही म्हणावे तर राजाचा अपमान केल्यासारखे होईल. या राजांनी फारच संकटात टाकले आहे.

कृष्णदेवरायांची अस्वस्थ मनःस्थिती ओळखून अप्पाजी प्रधान म्हणाले, 'महाराज, कलिंग देशाच्या राजेसाहेबांना वेडबिड लागलेले नाही. उलट ते आपल्या हुशारीची परीक्षा पाहात आहेत असे वाटते. आपण काळजी करू नका. आम्ही योग्य तो मार्ग शोधतो आणि गाडीभर कोबी आणि मुळा कलिंग

देशास पाठविण्याची व्यवस्था करतो.' अप्पाजींच्या सकारात्मक उत्तराने कृष्णदेवरायांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. राजांनी अप्पाजींना 'कामाला लागा' असा आदेशही दिला.

अप्पाजींनी दोन बैलगाड्या घेतल्या. प्रत्येक गाडीत अर्धी गाडी इतकी माती भरली. त्या मातीत खत मिसळले. एका गाडीत कोबीचे बी पेरले तर दुसऱ्या गाडीत मुळ्याचे बी पेरले. गाडीतल्या मातीवर रोज पाणी टाकत होते. दहा दिवसात दोन्ही गाडीतल्या बियांना अंकुर फुटले.

दुसऱ्या दिवशी दोन सैनिकांना बोलावले आणि अप्पाजी म्हणाले, 'या दोन्ही गाड्या घेऊन कलिंग देशास जायचे आहे. कोबी आणि मुळ्याचे बी या गाड्यांमधील मातीत पेरले आहे. दर दोन दिवसांनी पाणी घाला. दर आठ दिवसांनी सोबत दिलेले खतही घाला. तीन महिन्यांच्या प्रवासात दोन्ही भाज्या तयार होतील. तेथील राजास आपल्या विजयनगरचा ताजा उपहार प्रदान करा!'

सैनिकांनी अप्पाजींच्या सूचनांचे पालन करीत गाडीतील रोपांची निगराणी उत्तम राखली. कलिंग देशास पोहचताच कोबी आणि मुळे तयार झाले. कलिंग देशाच्या राजाला विजयनगरचे सैनिक भेटले आणि म्हणाले, 'आम्ही विजयनगरहून आलो असून आमच्या राजांनी आपणासाठी हे ताजे कोबी व मुळे दिले आहेत. आपण त्याचा स्वीकार करावा, ही विनंती!'

ताजे टवटवीत कोबी पाहताच कलिंग देशाच्या राजाला आनंद झाला. त्यांनी कृष्णदेवरायांना मनापासून धन्यवाद दिले आणि सैनिकांना विचारले, 'तीन महिने हे कोबी आणि मुळे इतके ताजे कसे राहिले?' सैनिकांनी अप्पाजी प्रधानांनी ही व्यवस्था केल्याचे सांगताच कलिंग देशाच्या राजाने अप्पाजींचीही प्रशंसा केली!

प्रसंगानुरूप परिस्थितीचा अंदाज घेत कृती करण्याचे अप्पाजींचे चातुर्य सर्वश्रुत आहे.

# ६.११ हुशार कावळा

एक होता कावळा. कोळसा जसा काळा काळा,

नजर त्याची चोहींकडे, मान करी इकडे तिकडे.

एकदा काय झाले, त्याला लागली खूप भूक. त्याने खाल्लेही खूप खूप. पण पाणी नव्हते प्यायला. शोधून शोधून दमला. इतक्यांत त्याला दिसली घागर. गेला तिकडे भरभर. उडून बसला घागरीवर. पाणी होते तळाशी. त्याची चोच पोचावी कशी? पाणी चोचीत येईना, काय करावे कळेना.

कावळा विचार करत राहिला. पाणी तर प्यायला हवे. मग उपाय शोधायलाच हवा. तो उपाय शोधू लागला. उपाय काही सुचला नाही; पण तो निराश झाला नाही. कावळा उपाय शोधीत राहिला. विचार करत बसून राहिला. एकच प्रश्न त्याला पडला काय करावे बरे आता? बघू लागला इकडे तिकडे. त्याला दिसले काही खडे. मग एक उपाय सुचला. पंख पसरून उडाला. त्याने एक खडा आणला, पट्कन तो घागरीत टाकला; डुबकन वाजले.

काय गंमत! पाणी वर उडाले. मग – खड्यांमागून खडे आणले. भराभर घागरीत टाकले. पाणी वर चढत गेले. चोचीपर्यंत पाणी आले. त्याला खूप खूप आनंद झाला. तो पोटभर पाणी प्याला. हुशारीचा लाभ झाला.

[कथन : नारायण सुर्वे, बालभारती, पु. २ रे, १९७९, महाराष्ट्र, पृ. ६-७]

# ६.१२ कोण बुद्दू कोण शहाणा

सकाळपासून तो मुख्य रस्त्याच्या कडेच्या भुसभुशीत जमिनीमध्ये खड्डे खणण्याच्या उद्योगाला लागला होता. कुदळ मारून मारून आता तो अगदी थकला होता. थोडा वेळ विश्रांतीसाठी म्हणून तो बाजूला बसला. तेव्हाच राज्याचे एक मंत्रीमहोदय तेथून जात होते. रस्त्याच्या कडेचे खड्डे पाहून ते थांबले. त्याला आपल्याजवळ बोलावून ते म्हणाले, "हे काम तू केलंयस का?"

"हो."

"अगदी बिनडोक आहेस की."

"सरकार, माझं नाव बिनडोक नाही, बुद्दू आहे."

"बुद्दूजी, तुम्ही हे खड्डे का बरं खणून ठेवलंत? त्यात एखादा वाटसरू पडलाबिडला तर त्याची हाडं मोडून जातील," मंत्री खोचकपणे म्हणाला.

बुद्दू मस्तक नमवून त्याला म्हणाला, "सरकार, हे खड्डे मी रस्त्यात कुठे खणले आहेत? ते तर बाजूला खणले आहेत. जे रस्त्यावरून सरळमार्गाने जातात, ते खड्यात पडण्याचा प्रश्न येतोच कुठे? जे आडमार्गाने, वाट वाकडी करून जातात त्या वाट चुकणाऱ्यांना इशारा देण्यासाठीच मी हे काम केलं आहे."

हे उत्तर ऐकल्याबरोबर मंत्रीमहोदय एकदम चमकले. त्यांनी बुद्दूला विचारले,

"कुठे राहतोस तू?"

"आकाशाच्या छपराखाली."

"एकटाच?"

"एकटा कुठे आहे? झाडेपेडं आहेत, पशुपक्षी आहेत. हे सगळे माझे सोबती आहेत."

"काय करतोस काय?"

“ईश्वरावर निष्ठा, विश्वास.”

“पोटापाण्याची व्यवस्था कशी करतोस?”

“ज्याने पोट दिलंय तोच ते भरण्यासाठी अन्न देतो,” बुद्दू म्हणाला. त्याची ईश्वरावरची ही अगाध निष्ठा मंत्र्याच्या हृदयाला स्पर्श करून गेली. त्याने बुद्दूला विचारले, “काही काम दिलं तर करशील?”

“पाखराचे पंख छाटून टाकता आहात सरकार?”

“नाही, तसं कसलंच मी बंधन घालणार नाही. जर आवडलं नाही तर जेव्हा वाटेल तेव्हा सोडून दे माझं काम.”

बुद्दूने मंत्र्याला होकार दिला; मंत्री त्याला आपल्या घरी घेऊन गेला. बुद्दू त्यांच्या गुरांची, बागेची काळजी घेऊ लागला. गाईम्हशींना तो चरायला रानात घेऊन जाई. झाडावर चढून बासरी वाजवत तो त्यांच्यावर लक्ष ठेवीत असे.

असाच एकदा तो बासरी वाजवत होता. बाजूच्या फांदीवर पक्ष्यांची एक जोडी मोठ्या गोड लकेरी घेत होती. एवढ्यात अजून एक पक्षिणी तिथे आली आणि तिने त्या सुरेल गाण्याचा भंग केला. तिने जोडीतल्या मादीला चोची मारून तिथून हटवले. ती जखमी पक्षीण दुसऱ्या फांदीवर बसली. आता जोडीतला नर पक्षी फांदीवरून उडून तिच्याजवळ गेला. त्याबरोबर मादीने त्या जोडीवर पुन्हा हल्ला करण्यासाठी आपले पंख पसरले. बुद्दूने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. त्याला पक्ष्यांची भाषा चांगली येत होती. त्याने दुसऱ्या मादीला या भांडणाचे कारण विचारले.

“या मेलीने माझ्या नराला भुलवले आहे. तिला तर मी मारूनच टाकणार आहे,” मादी म्हणाली.

हे ऐकून दुसऱ्या फांदीवरून नर पक्षी मोठ्या तोऱ्यात म्हणाला, “मी पुरुष आहे. मला हव्या त्या मादीला मी माझ्याबरोबर ठेवणार. मी तुला टाकली आहे थोडीच? ही माणसं दोन दोन बायका करीत नाहीत का? तुलाही दुसरीच्या बरोबरीने नांदवीन. तूही राहा तिच्याबरोबर.”

पण मादीला हे मुळीच मान्य नव्हते. तिची मान रागाने फुलून गेली. जोरात

पंख फडफडवून तिने आपला निषेध व्यक्त केला.

बुद्धूने त्यांना सल्ला दिला. तो म्हणाला, “हे पाहा; आपले राजेसाहेब मोठे बुद्धिमान आहेत. सर्वांच्या तक्रारी ऐकतात. त्यांचा न्याय अगदी योग्य, अचूक असतो. त्यांच्या दरबारात जाऊन तुम्ही आपले म्हणणे मांडा. तुमचं भांडण मिटवण्याचा उपाय ते सांगतीलच.”

दुसऱ्या दिवशी नर पक्षी आणि दोन्ही पक्षिणी उडून राजाच्या महालात जाऊन पोचले. पण तोपर्यंत राजाच्या दरबाराचे त्या दिवशीचे कामकाज संपले होते. दुसऱ्या दिवशी सकाळीच ते तिघेही दरबारात जाऊन तिथल्या एका खांबाच्या कडेला जाऊन बसले. राजाची नजर तेथे गेली खरी, पण त्याला वाटले, उडता उडता असेच येऊन विसावले असतील.

दुसरा दिवसही असाच उलटला. तिसऱ्या दिवशीसुद्धा राजाने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले, तेव्हा मात्र पक्ष्यांचा धीर सुटला. त्यांची आपसात बेचैनी होऊन कलकल सुरू झाली. राजाने तिकडे पाहिले, पण तो काहीच बोलला नाही. चौथ्या दिवशी मात्र पक्षी अगदी अधीर झाले आणि त्यांनी कर्कशपणे कलकलाट सुरू केला. दरबारच्या कामकाजात त्यांच्या आवाजाने व्यत्यय येऊ लागला. या पक्ष्यांची नक्कीच काहीतरी समस्या आहे हे राजाच्या लक्षात आले. पण त्याला काही पक्ष्यांची भाषा येत नव्हती. त्याने दरबारातील साऱ्या मानकऱ्यांना विचारले. पण त्यांना कोणालाच पक्ष्यांची भाषा समजत नव्हती. शेवटी त्याने या मंत्र्यालाच आज्ञा केली आणि त्याला फर्मावले की, दुसऱ्या दिवसापर्यंत पक्ष्यांचे काय गाऱ्हाणे आहे हे जर त्याने शोधून काढले नाही तर तो मंत्री म्हणून कुचकामी ठरेल.

हा मंत्री तर प्रधान बनण्याची स्वप्ने रंगवीत होता. ही आज्ञा ऐकली आणि तो अगदी निराश, दुःखी होऊन घरी परतला. त्याला खाण्यापिण्याची शुद्ध राहिली नाही. तसाच तो अंथरुणावर पडला. आपल्या घरातल्यांशी एक शब्दसुद्धा बोलला नाही. उद्या दरबारात आपली कशी फट्फजिती होणार आहे या विचाराने त्याची अगदी झोपच उडाली होती. यापेक्षा आत्महत्या करावी असे

त्याला वाटत होते.

एवढ्यात अचानक त्याला आठवले की, मागे बुद्धूने सांगितले होते की पशुपक्षी, झाडेपाने हे त्याचे सोबती आहेत. म्हणजे त्याला पक्ष्यांची भाषा नक्की समजत असणार. मंत्र्याने बुद्धूला बोलावून घेतले. दरबारात घडलेला प्रसंग आणि राजाने दिलेली धमकी याबद्दल त्याने बुद्धूला सांगितले. हे ऐकून बुद्धू हसला आणि तो मंत्र्याला धीर देत म्हणाला, "मालक, तुम्ही चिंता करू नका. मला त्या पक्ष्यांच्या भांडणाबद्दल सगळी कल्पना आहे. खरं तर त्यांना न्याय मिळावा म्हणून मीच त्यांना राजाकडे पाठवलंय."

"तू?"

"हो, मालक!"

"अरे पण, राजाला जर पक्ष्यांची भाषाच येत नाही तर पक्ष्यांची अडचण त्याला कळणार कशी?"

"मी सांगतो मालक..." असे म्हणून बुद्धूने पक्ष्यांच्या भांडणाची हकिकत मंत्र्याला सांगितली आणि तो पुढे म्हणाला, "नर पक्ष्याने दोन्ही माद्यांसह राहावे असा निर्णय जर राजाला द्यायचा असेल, तर त्याने आपली तीन बोटे त्यांना दाखवावी. जर दुसऱ्या पक्षिणीबरोबर त्याने राहावे असे ठरवले तर दोन बोटे आणि पहिल्या मादीबरोबर राहावे असे म्हणायचे असेल तर एक बोट वर करून दाखवावे. मी या संकेतांचा अर्थ पक्ष्यांना समजावून सांगेन."

हे ऐकून मंत्री अगदी हरखून गेला. त्याने आपल्या गळ्यातला हार काढून बुद्धूला बक्षीस दिला. ठरल्याप्रमाणेच दुसऱ्या दिवशी दरबारात सारे काही घडले. राजाने एक बोट दाखवून आपला निर्णय दर्शवला. हे पाहून आधी दुसरी मादी एकटी उडून गेली आणि नंतर नर आणि पहिल्या मादीची जोडी दरबारातून निघून गेली.

मंत्र्याला या पक्ष्यांची भाषा कशी कळली याचे दरबारातल्या सर्वांनाच खूप आश्चर्य वाटले. पण मंत्री मात्र तोंड मिटून गप्प राहिला होता. त्याने आपले गुपित कोणालाच सांगितले नाही. राजाने मंत्र्याची प्रधान म्हणून नेमणूक केली.

आता मंत्र्याला एक नवीन चिंता भेडसावू लागली. ही सारी किमया बुद्दूची आहे. आपल्याला पक्ष्यांची भाषा समजत नाही हे आपले बिंग बाहेर फुटले आणि राजाला समजले तर आपली काही धडगत नाही. आपल्याला या लबाडीबद्दल कडक शिक्षा मिळेल असे त्याला सारखे वाटू लागले. त्याने ठरवले की, या चिंतेचे मूळच नष्ट करून टाकावे; म्हणजे घाबरायला नको आणि काळजीही करायला नको.

त्याने एक पत्र लिहिले आणि बंद करून बुद्दूला दिले; आणि सांगितले की, हे पत्र त्याने स्वतः नेऊन चांडाळाच्या (चांडाळ - फाशीची शिक्षा झालेल्या गुन्हेगाराला फाशी देणारा) हातात द्यावे. त्या पत्रात त्याने 'पत्र आणणाऱ्याचे डोके त्वरित उडवावे,' असा आदेश दिला होता.

बुद्दू पत्र घेऊन निघाला. रस्त्यात त्याला मंत्र्याचा मुलगा भेटला. त्याच्या हातात फुलांची टोपली होती. तो खूप घाईत होता. त्याने बुद्दूला सांगितले, "आई पूजेला बसली असणार तेव्हा ही फुले आधी आईला देऊन ये." त्याचे बोलणे ऐकून बुद्दू जरा आढेवेढे घेऊ लागला. त्याने मंत्र्याच्या मुलाला सांगितले, "स्वतः मंत्रीसाहेबांनी हे पत्र तातडीने चांडाळाकडे नेऊन देण्याची आज्ञा केली आहे."

मंत्र्याचा मुलगा म्हणाला, "तू फुले तर घेऊन जा आणि ते पत्र दे माझ्याकडे. मी एका मित्राच्या घरी निघालो आहे, चांडाळाचं घर मला वाटेतच लागेल. तेव्हा हे पत्र मी पोचतं करीन. बाबा काही म्हणाले तर मी समजावेन त्यांना."

बुद्दू फुले घेऊन घरी परतला; आणि मंत्र्याचा मुलगा पत्र घेऊन चांडाळाच्या घरी निघाला. पत्र वाचल्याबरोबर चांडाळाने पत्रातल्या आज्ञेचे तंतोतंत पालन केले.

मंत्री संध्याकाळी राजवाड्यातून घरी परतल्यावर तिथे बुद्दूला पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याने रागाने बुद्दूला विचारले, "काय रे, तू पत्र दिलं नाहीस का चांडाळाला?"

बुद्दू घाबरून म्हणाला, "मी काय करणार मालक? रस्त्यात मला छोटे मालक

भेटले आणि स्वतः पत्र घेऊन ते चांडाळाकडे गेले. त्यांनीच आईसाहेबांना फुलं देण्यासाठी मला घरी पाठवून दिलं. आता यात माझा काय दोष आहे?"

हे ऐकल्याबरोबर मंत्री आक्रोश करू लागला, "अरे देवा, असं कसं रे झालं?" असं म्हणून तो रडू लागला. त्याचा आकांत ऐकून मंत्र्याची पत्नी घाबरीघुबरी होऊन बाहेर आली. तिला सगळा प्रकार कळल्याबरोबर ती ऊर बडवून घेऊन रडू लागली. मंत्र्याचा विलाप ऐकून त्याची करणी बुद्धूच्या लक्षात आली आणि त्याला समजले की, खड्डा कोणासाठी खणला गेला होता आणि त्यात पडले कोण! मंत्री जरासा शांत झाल्यावर बुद्धूने हात जोडून त्याला विनंती केली, "मालक तुम्ही मला जेव्हा पहिल्यांदा भेटला तेव्हा मला विचारलं होतं की, मी रस्त्याच्या कडेला खड्डे का खणतो आहे? कोणी त्यात पडले तर काय होईल? तेव्हा आठवतंय का, मी काय म्हणालो होतो? मालक, मी म्हटलं होतं की, जो रस्त्यावरून सरळपणे जाईल त्याला बाजूच्या खड्यांची भीती नाही. हे खड्डे तर वाकड्या वाटेने जाणाऱ्यांसाठी आहेत. तुम्ही बुद्धिमान अन् शहाणे असूनही आडमार्गाला गेलात, सरळ मार्ग सोडून दिलात आणि खड्ड्यात पडलात. यात माझी काहीच चूक नाही. आता आपण मला मोकळे करा. मी निघालो आहे. नमस्कार."

(गोपालदास : निर्बुद्धीचा राज्यकारभार)

# ७

# राजाराणीच्या गोष्टी


७.१. राजाची चूक ६८९

७.२. हुशार राणी ६९२

७.३. राजपुत्रांची परीक्षा ६९६

७.४. मेधी राजा ७००

७.५. काळशिंग राजा ७०३

७.६. राजा आणि गरीब माणूस ७१०

७.७. न्यायमंत्री ७१२

७.८. संकेतसुंदरी ७१६

७.९. समईचं लगीन ७२२

७.१०. मृदुंग आणि सारंग ७३२

७.११. भविष्यवादी नंदादीप ७३९

७.१२. कडेकोट बंदोबस्ताचे वर्तूळ आणि संरक्षक वस्तू ७५०
७.१३. बैठो - अजब वस्तू ७५८
७.१४. माणकांचं फूल ७६५
७.१५. जीवनदान ७७३
७.१६. मणिधर आणि राजकुमार ७७६
७.१७. पारितोषिक ७७८
७.१८. खूर्चीची किमया ७८०
७.१९. अल असनाम नामक राजा व यक्षांचा राजा ७८२
७.२०. समुद्रतळीचा राजवाडा ८०५
७.२१. गोष्ट गुणवंत कुमाराची ८१२
७.२२. गाणारी सफरचंदे ८२५
७.२३. नागराणीचा मुकुट ८३३
७.२४. शुक्राची चांदणी ८४४
७.२५. भाजीचा प्रताप ८५५
७.२६. जोजाची गोष्ट ८७३
७.२७. राजपुत्राची गोष्ट ८७४
७.२८. ब्रह्मफूल ८७९
७.२९. राजा वीरकेतू, चोर आणि रत्नवती ८८६

# ७.१ राजाची चूक

(बंजारा लोककथा)

एक राजा होता. त्याची एक राणी होती. राणी अतिशय देखणी होती. राज्य भले मोठे होते. प्रजा अतिशय सुखी व गुण्यागोविंदाने नांदत होती. पण राजा निपुत्रिक होता. त्यामुळे राजा-राणी दुःखी होते. त्यामुळे प्रजाही चिंतीत होती. राजानंतर राजगादीवर कोण बसणार? राजा राणी आपल्या प्रजेवर पुत्रवत प्रेम करीत. त्यामुळे राज्यात भांडण-तंटा, चोऱ्या-माऱ्या होत नव्हत्या. पण एकच एक चिंता होती राजाला मूल-बाळ व्हावे म्हणजे राजगादीला वारस मिळावा.

एकदा काय झाले, राजा आणि राणी जरा फेरफटका मारण्यासाठी निघाले. राजाचे लक्ष एका अनोळख्या व्यक्तीकडे गेले. राजाने त्याची आस्थेने चौकशी केली. त्या व्यक्तीने आपला परिचय दिला. राजा तुझी कीर्ति ऐकून तुझ्या राज्यात आलो. ऐकलेली कीर्ति खोटी नाही. तुझ्या राज्यात सगळेच गुण्यागोविंदाने राहतात. पण तुमचे दुःखही मी जनतेकडून जाणले. माझा आशीर्वाद आहे, लवकरच आपल्याला संतान प्राप्त होईल. राजा-राणी खूप आनंदी होतात. राजा त्याचे पाय धरतो.

राजा-राणी त्यांना आपल्या महालात घेऊन येतात. राजा-राणीच्या आदर-सत्काराने खूष झालेला सद्‌गृहस्थ म्हणतो, “राजा मी कुणी जादुगार नाही की चेटूक करणारा भगत नाही. दीर्घ तपश्चर्या करून सिद्धी प्राप्त झालेला ऋषी आहे. राजा-राणी त्यांना राजमहालात राहण्याचा खूप आग्रह धरतात. पण ऋषी महाराज राजाला समजावतात. बघ राजा, मी जास्त दिवस एके ठिकाणी राहत नाही. पण तुला लवकरच संतान प्राप्त होईल व तुम्ही आनंदात राहाल हा माझा आशीर्वाद आहे.

ऋषीची वाणी खरी ठरते. राजाला नक्षत्रासारखी कन्या होते. राजा-राणी संपूर्ण प्रजा आनंदी होते. राजा आपल्या सेवकांना सांगतो या आनंदसोहळ्यात

सगळ्या प्रजेला जेवणासाठी आमंत्रित करा.

सेवक संपूर्ण नगरीत फिरतात आणि राजाच्या महालात जेवणासाठी येण्याचे आमंत्रण देतात. त्यातील एक सेवक एका गरीब म्हातारीचे घर वगळतो. सारी प्रजा राजवाड्यात राजकन्येला बघायला व जेवायला जाते. म्हातारी अस्वस्थ होते. दुःखी होते. संतापते. क्रोधीत होऊन ती राजाच्या राजवाड्यात पोहचते. सरळ राजापुढे जाऊन उभी राहाते आणि राजाला जाब विचारते, "राजा, तुला कन्यारत्न झाले. साऱ्या प्रजेबरोबर मलाही आनंद झाला. तिला बघावे, आशीर्वाद द्यावा असे मलाही वाटत होते. पण तू मला या आनंदात सहभागी करून घेतले नाही. मी गरीब आहे म्हणून?"

राजा-राणी मुळातच नम्र, सद्गुणी, कृपाळू व सगळ्यांना समजून घेणारे असल्याने ते दोघेही म्हातारीची क्षमा मागतात. चूक झाल्याचे कबूल करतात. पण म्हातारी त्यांना समजून घेण्याच्या अवस्थेत नव्हती. ती अपमानाने क्रोधीत होते आणि आपली शापवाणी उच्चारते, "राजा, राणी आजपासून बरोबर चौदा वर्षांनी तुझी मुलगी झोपली की, झोपलेलीच राहील. तिला स्पर्श करणाऱ्याची अवस्था तिच्यासारखीच होईल."

शापवाणी ऐकून राजा-राणी स्तब्ध झाले. पुन्हा दोघे चिंतामग्न झाले. राजा-राणी, प्रधान सगळेच म्हातारीला शापवाणी मागे घेण्यास विनवू लागले. पण उच्चारली गेलेली वाणी मागे घेता येईना. तेव्हा दया येऊन म्हातारी म्हणाली, "ठीक आहे. उःशाप देते. जोपर्यंत चंदनपूरचा राजपुत्र तिला येऊन उठवत नाही, तोपर्यंत ती निद्रावस्थेतच राहील. तोच तिला शापमुक्त करू शकेल."

म्हातारी न जेवता, राजकन्येला आशीर्वाद न देता निघून गेली. सगळ्या आनंदावर पाणी फिरले. पुन्हा सगळी प्रजा चिंतामग्न झाली. राजाने शापमुक्त होण्यासाठी खूप प्रयत्न केले. पण व्यर्थ.

शेवटी तो काळा दिवस उजाडला. राजकन्या चौदा वर्षांची झाली. त्या रात्री ती झोपली ती उठलीच नाही. राजा-राणी तिला उठवायला गेले. तिचा स्पर्श होताच दोघेही निद्रावस्थेत गेले. प्रजा राजा-राणीला उठवायला गेली. त्यांचीही

तिच अवस्था झाली. एक-एक करता करता सगळी प्रजा निद्रावस्थेत गेली.

दिवसामागून दिवस लोटले. जंगले वाढली. पण चंदनपूरचा राजकुमार काही येईना. उलट त्या जंगलातून कोणी वाटसरू जाऊ लागला की, निद्रावस्थेतील माणसाला उठवण्यासाठी स्पर्श करायची आणि मग तेही निद्रेत जात.

एके दिवशी एक राजबिंडा तरुण घोड्यावर बसून जंगलात शिकारीसाठी आला. तिथले दृश्य पाहून तो आश्चर्यचकित झाला. जंगलात माणसे उभी-आडवी, तिरपी कशीही झोपलेली होती. तो वाट काढत राजवाड्यात पोहचतो. तिथे त्याला एक अतिशय सुंदर राजकन्या दिसते. तिचे लावण्य बघून त्याला आश्चर्य वाटते. ही स्वर्गाची परी की अप्सरा? पण ती निद्रावस्थेत होती. तो तिला उठविण्यासाठी स्पर्श करतो तर ती शुद्धीवर येते. राजकन्या शुद्धीवर येताच सगळ्यांची निद्रा भंग होते. राजा ओळखतो हाच चंदनपूरचा राजकुमार आहे. राजाने या कृतीवरून धडा घेतला. प्रजेला समान वागणूक दिली पाहिजे. गरीब-दुबळा कुणीच पंक्तीत सुटायला नको.

राजा राजकन्या व चंदनपूरच्या राजकुमाराचा विवाह करतो तेव्हा संपूर्ण प्रजेला स्वतः त्यांच्या घरी जाऊन जेवणाचे व लग्नाचे आमंत्रण देतो. यावेळी एकही घर सुटले नव्हते. सगळे पोटभर जेवण करतात, राजा-राणी, राजकन्या व राजकुमारास पोटभरून आशीर्वाद देतात.

या लोककथेची शिकवण म्हणून की काय बंजारा समाजात कोणत्याही कार्यक्रमात संपूर्ण तांड्याला आमंत्रण असते. तिथे भेदभाव नसतो. 'गोरगरिबांना टाळू नये' ही एका म्हातारीची शिकवण आजही टिकून आहे.

(प्रा. सुनंदा विनोद पाटील, ब्रेन टॉनिक मासिक, ऑगस्ट २००९)

# ७.२ हुशार राणी

(पंजाबची लोककथा)

एक राजा होता. एक दिवस तो शिकारीला गेला. रस्त्यात त्याला एक लाकूडतोड्या भेटला. तो लाकडं गोळा करीत होता. राजाने त्याला विचारले, "तुझं नाव काय आहे?"

त्याने सांगितले, हुजूर, माझं नाव बहादुरशाह आहे."

राजा विचार करू लागला की याचं नाव पण बहादुरशाह आणि माझं नाव पण बहादुरशाह. पण मी संपूर्ण राज्याचा मालक आहे आणि हा लाकडं विकून उदर निर्वाह करतो..... हाच विचार करता करता तो शिकारीला न जाता परत आपल्या महालात आला. त्याने आपल्या राज्यातील विद्वानांना बोलाविले व त्यांना विचारले, "माझं आणि त्या लाकूडतोड्याचे एकच नाव आहे. मग आमच्या दोघांच्या भाग्यात इतके अंतर का आहे?"

पण त्याच्या प्रश्नाचे उत्तर कोणी देऊ शकले नाही. रात्री राजाने ही गोष्ट आपल्या बायकोला सांगितली. ती म्हणाली, "मला तर काही विशेष अंतर जाणवत नाही असे वाटते की त्या लाकूडतोड्याच्या बायकोला घर कसे चालवावे याची अक्कल नसेल."

राजाला हे ऐकून वाईट वाटले आणि तो म्हणाला, "त्याचा अर्थ असाच आहे की तुझ्यामुळे मी राजा आहे. तेव्हा राणी म्हणाली, "माझा म्हणण्याचा असा अर्थ होता की घराच्या भरभराटीत पत्नीचा फार मोठा वाटा असतो." हे ऐकून राजाला फारच राग आला आणि त्याने त्या लाकूडतोड्याला बोलाविले आणि राणीला त्याच्या स्वाधीन करीत सांगितले की, "जा याला राजा बनवून दाखव."

राणी काय करू शकत होती. तिला लाकूडतोड्याबरोबर जावं लागलं. रस्त्यात ती लाकूडतोड्याला म्हणाली, "राजाने माझ्यावर चिडून तुमच्या स्वाधीन केलं आहे. आता मी तुमची कन्या आणि तुम्ही माझे वडील. काही

दिवस विचार करू आणि मग ठरवू की काय करावं."

लाकूडतोड्या स्वतः दुःखी होता, तो फक्त इतकंच म्हणाला, "बरं."

राणी त्याच्या घरी गेल्यावर तिनं पाहिलं की घरात लाकूडतोड्याची पत्नी, दोन मुले, दोन मुली असे सहा जणांचं कुटुंब आहे. सातवी ती होती. ती चूपचाप पाहत होती की ते सर्वजण कसे अर्धापोटी राहिल्यामुळे झोपू शकत नव्हते.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे लाकूडतोड्या वनात गेला. संध्याकाळी लाकडं विकून जे पैसे मिळाले त्यात पोळ्या विकत घेऊन आला. त्या पोळ्या कमी असल्यामुळे सर्व अर्धपोटी राहिले. दुसऱ्या दिवशी राणी म्हणाली, "बाबा आज तुम्ही पोळ्या न आणता गहू आणा."

लाकूडतोड्याने तसंच केलं. त्यांनी गहू दळले आणि कणकेच्या पोळ्या बनविल्या. सर्वांनी पोटभर जेवण केलं तरीपण कणिक शिल्लक राहिली. राणी म्हणाली, उद्यापासून एक पाव गहू कमी आणा. अशाप्रकारे आपले काही पैसे पण वाचतील." लाकूडतोड्या म्हणाला, "बरं बेटी."

अशाप्रकारे काटकसर केल्यामुळे त्यांच्याजवळ इतके पैसे जमले की त्यांनी गाढव विकत घेतले. आता तो जास्त लाकूड तोडून गाढवावरून बाजारात आणू लागला. त्यामुळे त्याची कमाई वाढली. आता ते पूर्वीपेक्षा चागलं खाऊ पिऊ लागले. लाकूडतोड्याला आणि त्याच्या बायकोला असं वाटलं की जणू लक्ष्मीच त्यांच्या घरी आली आहे. ते दोघं पक्क घर बांधण्याचं स्वप्न पाहू लागले. एके दिवशी राणी म्हणाली, "बाबा, आता पावसाळा सुरू होईल. पावसाळ्यात लाकडं ओली असतात. म्हणून लोकं आधीच लाकडं विकत घेऊन ठेवतात. तेव्हा जर आम्ही सर्वांनी तुमची मदत केली तर आपली मिळकत वाढेल. काही पैसा शिलक राहिला तर पावसाळ्यात काही काम करता येईल."

लाकूडतोड्याने विचारलं, "बेटी हे कसं शक्य होईल." तेव्हा राणी म्हणाली, "आम्ही सर्वजण तुमच्याबरोबर चलू. लाकडं गोळा करणे, त्यांचा ढीग लावणे आणि ते गाढवाच्या पाठीवर ठेवणे ही कामे आम्ही करू म्हणजे तुम्हाला लाकडे

तोडायला जास्त वेळ मिळेल."

लाकूडतोड्याने लागलीच होकार दिला.

सगळ्यांच्या मेहनतीमुळे रोज लाकडं आणून देखील वनात लाकडांचा एक मोठा ढीग तयार झाला. तेव्हा राणी म्हणाली, "बाबा, गाढवावर नेले तरी हा ढीग पंधरा दिवसात संपणार नाही आणि पावसाळा सुरू होईल म्हणून तुम्ही उद्या एक बैलगाडी भाड्याने घेवून या म्हणजे सगळी लाकडं घरी नेता येतील.

दुसऱ्या दिवशी लाकूडतोड्या बैलगाडी घेऊन जंगलात गेला तर त्याने पाहिलं की लाकडाचा ढीग जळून राख झाला आहे. सगळीकडे फक्त कोळसे दिसत आहेत त्यात काही पिवळे तुकडे चमकत आहे. त्यातील त्याने काही तुकडे उचलले व रडत रडत घरी आला आणि म्हणाला, "बेटी, आमचे सर्व काही श्रम वाया गेले, सर्व लाकडे जळून खाक झाली आहेत. तेथे फक्त कोळसे आणि हे असे पिवळे तुकडे पडले आहेत."

राणीने ते तुकडे पाहिले आणि म्हणाली, "तुम्ही सर्व तुकडे आणले की तेथे अजून पडले आहेत."

तो उदास होऊन म्हणाला, "अजून तेथे बरेच तुकडे पडले आहेत. पण आम्हाला या तुकड्यांचं काय काम. आमचं तर नुकसानच झालं आहे."

राणी धैर्य देत म्हणाली, "बाबा, काळजी करू नका. हे तुकडे फार किमती आहेत." आणि राणी त्याला व त्याच्या बायकोला घेऊन जंगलात गेली, त्यांनी तिघांनी त्या कोळशाच्या ढिगातून ते चमकणारे तुकडे गोळा केले. ते सोन्याचे तुकडे होते.

आता ते श्रीमंत झाले. आधी त्यांनी एक मोठे घर बांधले. आणि सोन्याचा व्यापार करू लागले. एक दिवस राणी म्हणाली, "बाबा, आता तुम्ही राजा आणि त्यांच्या मंत्र्यांना मेजवानीसाठी घरी आमंत्रित करा."

राजा त्यांच्या घरी आला. पण त्याने कोणालाच ओळखले नाही. सगळ्यांनी बरोबर जेवण केले. नंतर राणी पुष्कळ सोनं घेऊन आली. आणि हात जोडून म्हणाली, "याच्याकडे पाहा, हा तोच लाकूडतोड्या आहे. मी तिच तुमची पत्नी

आहे. जिला तुम्ही घराबाहेर काढलं होत.”

राजा लाजिरवाणा झाला आणि आनंदीपण. तो राणीला घेऊन महालात आला आणि राणीच्या बुद्धिमत्तेची प्रशंसा करू लागला.

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ७.३ राजपुत्रांची परीक्षा

(चंद्रपुरी लोककथा)

आटपाट नगर होते. तिथे एक राजा राज्य करीत होता. त्या राजाला चार पुत्र होते. राजाने त्या चारी पुत्रांना योग्य शिक्षण देवविले. मुले आता चांगली वयात आली.

या चार मुलांत अत्यंत हुशार कोण आणि आपल्या पश्चात हे सर्व आपापसांत एकोप्याने राहून राज्य करू शकतील का? यासाठी राजाने मुलांची परीक्षा घ्यायचे ठरवले.

राजाने एके दिवशी चारी पुत्रांना प्रेमाने जवळ बोलावून सांगितले, "मी तुम्हाला प्रत्येकी हजार मोहरा देणार आहे. चार दिवस मनसोक्त मौज करून घ्या. वाटेल ते विकत घ्या. माझी त्याला कसलीही हरकत नाही."

मुलांना हे ऐकून अत्यंत आनंद वाटला व त्यांचा वडिलांविषयीचा आदर दुणावला. मुलांनी लडिवाळपणे राजाला विचारले, "तरीपण बाबा, तुम्हीच सांगा ना, आम्ही काय खरेदी करावे ते?" ह्यावर राजाने किंचित् करड्या व निश्चयी आवाजांत उत्तर दिले, "मी एकदा सांगितले ना तुम्हाला की, काय वाटेल ते खरेदी करा." असे म्हणून त्याने कोषाध्यक्षाला बोलावून त्या राजपुत्रांना प्रत्येकी हजार मोहरा दिल्या.

दुसऱ्या दिवशी मोठ्या सकाळीच ते चारी राजपुत्र मौज करायला दूर देशी निघून गेले. जाता जाता एक मोठे शहर लागले. त्या शहरात त्यावेळी कसलीशी जत्रा भरली होती. त्यामुळे अनेक ठिकाणांहून नाना प्रकारचे सामान विक्रीस आले होते. ते चारी राजपुत्र काहीतरी घेण्याच्या दृष्टीने त्या जत्रेत भटकू लागले.

पहिला राजपुत्र एका आरसेवाल्याच्या दुकानात गेला व एक सुंदर आरसा हवा असे सांगितले. दुकानदाराने बरेचसे आरसे दूर सारीत एक आरसा काढून दाखविला व म्हणाला की, "हा आरसा नुसते रूपच दाखवितो असे नाही, तर

कुठे काय घडत आहे हेही तो दाखवू शकतो.” राजपुत्राला तो विचित्र आरसा फार आवडला. त्याने त्या दुकानदाराला त्याची किंमत विचारली.

“एक हजार मोहरात मी एक मोहरसुद्धा कमी घेणार नाही.” दुकानदार उत्तरला. राजपुत्राने त्याला हजार मोहरा मोजून दिल्या आणि तो आरसा घेतला.

दुसरा राजपुत्र लाकडी खेळण्याच्या आळीत शिरला होता. तो एका सुताराच्या दुकानासमोर उभा राहिला व ती खेळणी पाहू लागला. थोड्या वेळाने त्याने दुकानदाराला त्यांतील सर्वांत उत्तम असे खेळणे द्यावयास सांगितले. दुकानदारानं क्षणभर मनाशी विचार करून एक मोठा थोरला लाकडी घोडा राजपुत्राला दाखविला. राजपुत्राने त्याला “ह्या घोड्याचा गुण काय?” म्हणून विचारले. त्यावर दुकानदाराने उत्तर दिले, “ह्या घोड्यावर बसून आपण जेथे जावयाची इच्छा कराल तेथे तो तत्काळ पोचवील.”

“असं?” राजपुत्र अधीरतेने उद्‌गारला व विचारू लागला, “काय आहे ह्या घोड्याची किंमत?”

“एक हजार मोहरा. एक मोहरसुद्धा मी कमी घेणार नाही.” दुकानदार उत्तरला.

राजपुत्राने त्याला हजार मोहरा मोजून दिल्या व घोडा विकत घेतला.

तिसरा राजपुत्र एका भांड्यांच्या दुकानात गेला व सुंदर भांडी मागू लागला. दुकानदाराने त्याला एक ताट व चार वाट्या दाखविल्या. राजपुत्राने त्यांचा गुण विचारला. त्यावर दुकानदाराने सांगितले, “तुम्ही स्वच्छ आंघोळ करून ह्या ताटावर ओले फडके पसरा व मनांत ज्या पक्वान्नाची किंवा भोजनाची इच्छा कराल ते आपोआप ताटवाट्यांतून वाढून येईल.”

राजपुत्राने त्यांची किंमत विचारली.

“एक हजार मोहरांत एक मोहरसुद्धा मी कमी घेणार नाही.” असे दुकानदार म्हणाला. राजपुत्राने हजार मोहरा मोजून दिल्या व ते ताट आणि वाट्या घेतल्या.

चौथा राजपुत्र जेथे वैदू लोक जडीबुटी विकत होते त्या आळीत शिरला व एका दुकानासमोर उभा राहून त्याने एक जडीबुटी उचलली व दुकानदाराला तिचा गुण विचारला. तेव्हा तो सांगू लागला, "ती जडी सात वेढ्यांनी उगाळली व तिचे चाटण मृत प्राण्याच्या जिभेला लावले तर तो सजीव होईल. पण एवढ्याशा जडीची किंमत एक हजार मोहरा पडतील, एक मोहरसुद्धा मी कमी घ्यायचा नाही."

राजपुत्राने त्याला हजार मोहरा दिल्या व ती जडीबुटी घेऊन तो आपल्या निवासस्थानाकडे येऊन पोचला. तेथे येऊन पाहतो तो अगोदरच त्याचे तिन्ही बंधू आलेले दिसले.

सर्वांनी आपापल्या वस्तू परस्परांस दाखविल्या व त्या वस्तूंची प्रचीती पाहाण्याचे ठरविले.

प्रथम आरसेवाल्या राजपुत्राने आरसा समोर घेतला व तो उद्‌गारला, "चल, सांग पाहू आरशा! ह्या वेळी आमचे आईवडील (राजा-राणी) काय करीत असतील?" आणि काय चमत्कार पाहा, त्यात राणी मृत होऊन पडलेली आहे आणि राजा प्रजाजनांसह राणीजवळ शोक करीत बसलेले आहेत, असे त्याला दिसले. सर्व राजपुत्र मनांत घाबरले.

घोडेवाल्या राजपुत्राने तो लाकडी घोडा समोर केला व त्यावर आपल्या तिघा भावांसह स्वतः स्वार होऊन सर्वांस राजधानीत पोचविण्याचा त्या घोड्यास हुकूम फर्माविला. आणि आश्चर्य हे, की डोळ्याचे पाते लवते न लवते तोच ते सर्व राजपुत्र राजधानीला येऊन पोचले!

तेथे येऊन पाहातात तो काय? खरेच सर्वजण राणीचे शव बाहेर काढण्याच्या तयारीत होते. जडीवाल्या राजपुत्राने झटकन् पुढे होऊन त्यांना थांबावयास सांगितले आणि त्याने जडीबुटी काढून सात वेढे उगाळले व ते चाटण राणीला दिले. राणीने डोळ्यांची हळूहळू उघडझाप करीत चौफेर नजर टाकली. राणी जिवंत झाली हे पाहून राजाला आणि प्रजाजनांना फार आनंद झाला. पण भूक लागली म्हणून राणी सारखी ओरडत होती. ताटवाटी खरेदी

करणाऱ्या राजपुत्राने झटकन् आंघोळ केली व ओले फडके त्या ताटावर पसरून सुंदर सुंदर पक्वान्नांच्या भोजनाची मागणी केली.

एका क्षणांत तेथे सुग्रास अन्न तयार झाले व ते राणीने मोठ्या आधाशीपणे संपविले.

राजाला आपल्या मुलांनी खरेदी करून आणलेल्या वस्तूंचे मोठे कौतुक वाटले व त्याने चौघांना मोठ्या प्रेमाने आलिंगन दिले.

त्यानंतर तो राजा दीर्घकाल सुखाने व ऐश्वर्याने राज्य करिता झाला!

(विनायक वासुदेव जोशी : चंद्रपुरी लोककथा)

# ७.४ मेधी राजा

(मध्य भारतातील लोककथा)

एक होता मेधी राजा. मोठा भरभक्कम. ताजा तवाना. रंगानं काळा. पण मोठा ऐटबाज. मनात आलं की, आभाळात उंच उंच भरारी मारायचा. धावल्या ढगांना पकडायचा. त्यांची मानगूट धरायचा. धक्काबुक्की करायचा. त्यामुळं पाऊस अवचितच पडायचा. माणसं मग, आच्यारी का विच्यारी व्हायची. ते बघून हा असा हसायचा की, दोन पर्वतांची टक्करच जणू झालीय असा दणका उडायचा! त्याच्याजवळ एक छानदार लहान पिशवी असायची. देवानं ती त्याला दिलेली होती. म्हणून ती तो आपल्या केसात लपवून ठेवायचा. पण हा खुशीत आला की, ती एकदम चकाकायची. मग अंधार असू दे नाही तर उजेड असू दे. विंध्य पर्वताच्या जंगलात मेधी राजाचं राज्य होतं. आदिवासींचा तो आवडता होता. त्याच्या आदेशाप्रमाणं त्यांनी वागावं आणि त्याच्या दबदब्याखाली रहावं असं असायचं.

तर एकदा काय झालं की, मेधी राजानं गिल्ली राजाची कळ काढली. अवचितच गेला न् त्याच्या दाढीमिशा कातरून आला! आला ते थेट आभाळातच उडून गेला. गिल्ली राजाला कळायच्या आत हं अगदी! दुसऱ्या दिवशी गिल्ली राजानं या गोष्टीचा वचपा काढावा म्हणून आपल्याच लेकीची वेणी कापून घेतली! ती लागली रडायला. पण ह्यानं लक्षच दिलं नाही. रडू दे म्हणाला. त्यानं मग फौजेला इशारा दिला की, कसंही करून मेधी राजाला जिवंत पकडून आणा.

राजाचीच आज्ञा. मग काय? सगळ्या फौजफाट्यानं जंगल, पहाड, गुहा. दरी, खोरी पार धुंडाळून काढली. अखेर शेवटी दोन दिवसांनी एका पहाडाच्या माथ्यावर मेधी राजा गवसला. सैनिकांनी त्याला पकडून गिल्ली राजाकडे आणलं. राजानं त्याच्याकडे रागानं पाहिलं न् म्हटलं, " ये, असा पुढं ये. तुला

मंगलजी वाण्याकडे पाठवून जबर सजा देतो. " आणि दिला तिकडे पाठवून.

मंगलजी वाणी मोठा करारी होता. त्याने आपले मोठे नेत्र उघडून ह्याच्याकडे पाहिलं. आपल्या भल्या दांडग्या मिशा कुरवाळल्या. खदखदून हसला आणि म्हणाला, " जा, या पाजी माणसाला घेऊन जा. मी याचं तोंडही बघू इच्छित नाही. याला कोंडवाड्यात फेकून द्या. पहातो मग कशी मस्ती करतो ते."

मेधी राजा पण कमी नव्हता. कोंडवाड्यात आणल्याबरोबर त्यानं जिकडं तिकडं पाणीच पाणी करून सोडलं. त्या पाण्याचा लोंढा मंगलजी वाण्याच्या दारात गेला! ते बघून तो घाबरून गेला आणि पळत पळत गिल्ली राजाकडे आला. त्यावेळी हा राजा पान खात बसला होता. त्यानं ह्याचं बोलणं ऐकलं. मंगलजीनं गयावया करीत ह्या मेधी राजापासून आपलं रक्षण कर अशी राजाला गळ घातली. त्यामुळं गिल्ली राजानं मेधी राजाला एका गरम खोलीत कोंडून टाकलं. पण मेधी राजानं तिथंही पाणीच पाणी करून सोडलं. सगळीकडे धुराचे लोटच लोट पसरले. राजा त्यामुळं संतापून ओरडला, " ह्याला पुऱ्या बंदोबस्तात ठेवून द्या!...

सैनिकांनी मग ह्याला जंगलात नेलं. ठार मारायचा बेत केला. मेधी राजा त्यामुळं रडू लागला. सैनिकाला दया आली. त्यानं मग ही सजा मोठी होईल म्हणून सांबराच्या शिंगात बंदिवान केलं. तिथं मग हा गुपचूप पडून राहिला. थोडे दिवस हे कुणाला कळलंही नाही. होता होता काय झालं की, जिकडं तिकडं दुष्काळ पडला. हाहाकार उडून गेला. धनधान्य संपून गेलं. लोक मरायला लागले. दगाफटका होऊ लागला. अपघात घडू लागले. नदीचं पाणी आटलं. जमिनीला तडे पडले. त्यामुळं गिल्ली राजाकडे लोक तक्रार घेऊन गेले. तो चिंताक्रांत झाला. पाऊस कोठून आणावा? धान्य कोठून आणावं? लोकांना काय खायला द्यावं? त्याचा जीव उडून गेला. रात्रंदिवस चिंता लागली. झोप उडाली. राजानं मग दरबार भरवला. मेधी राजाला शोधून आणील त्याला मोठ्ठं बक्षीस जाहीर केलं. पैजेचा विडा पुढं ठेवला. पण चटकन कोणी पुढं येईचना. राजानं पुन्हा पुन्हा हे जाहीर केलं. पण छे! कोणी मान वर करीनाच. अखेर शेवटी एक जोगीण पुढं आली. तिनं हा पैजेचा विडा उचलला.

जोगिणीनं मग सगळीकडे तपास केला. सांबराच्या शिंगाजवळ ती गेली. चारी बाजूंनी ते बंदिस्त होतं. म्हणून तिनं मेधी राजाला हाकारा घालीत विचारलं, " जागा आहेस का झोपला आहेस?"

मेधी राजानं आतून उत्तर केलं, " मी तर. झोपलोही नाही ' किंवा जागाही नाही."

" मग बाहेर का येत नाहीस?"

" माझ्या मनाची मर्जी."

" कशात बिघडलंय?"

" समजेल ते समजून घे."

" तुला हवंय काय?"

" गिल्ली राजाच्या मुलीशी लगीन. "

जोगीण हसली. तिनं मेधी राजाची विनंती मान्य केली. राजाची समजूत घालीन म्हणाली. पण मेधी राजाला सांबरशिंगातून बाहेर कुठं येता येतंय? धड शिंग फुटेना की हा पण बाहेर येईना! खूप धडपड केली. पण काहीच नाही.

जोगीण मग पळत गेली. तिनं रेशीम दोरा आणला. सोन्याची सुरी आणली. मोत्यांचा घाव आणला. मग चारी बाजूंनी शिंग गच्च बांधून तिनं ते घाव घालीत फोडलं तेव्हा कुठं मेधी राजा बाहेर आला. त्यावेळी त्याला बघून एकदम आकाश गरजलं. मुसळधार पाऊस आला. नदी नाले भरून गेले. जमीन शांत झाली. लोकांना बरं वाटलं.

गिल्ली राजानं मग हात जोडून मेधी राजाची क्षमा मागितली. आपल्या लेकीशी त्याचं लगीन लावून दिलं. मग म्हणाला, " मी नावाचा राजा. पण तूच खरा राजा. पावसाचं पाखरू तू. दुनिया तुझ्यामुळं जगते. तुझ्यामुळं सुखावते. तू खरा मोठा. "

मेधी राजानं मग सगळीकडे आनंदी आनंद करून सोडला. तसा तो तुम्ही आम्ही पण करू या.

(पुनःकथन : डॉ. श्याम परमार, सांगीवांगी (संपा. सरोजिनी बाबर))

# ७.५ काळशिंग राजा

एक होता राजा. त्याला तीन मुलं. दोन आवडतीची. एक नावडतीचा. ह्या नावडतीच्या मुलाचं नाव काळशिंग. तर एक दिवस काय झालं की, राजाला स्वप्न पडलं. त्या स्वप्नात राजानं चांदीच्या मुळ्या सोन्याचे ढापे आणि मोत्यांचे घोस असलेलं एक झाड पाहिलं. राजा ते बघून भुलला. दिवसा ढवळ्या असलं झाड बघायला पाहिजेच म्हणाला. त्यानं आपल्या राज्यात दवंडी पिटली. पैजेचा विडा ठेवला. म्हणाला कसा, "चांदीच्या मुळ्या, सोन्याचे ढापे आणिक मोत्यांचे घोस असलेलं झाड कुणी आणून देईल त्याला निम्मं राज्य बक्षीस देईन."

झालं. गावोगाव ही बातमी गेली. साती वन ओलांडून तिनं ज्याच्या त्याच्या जवळ ही गोष्ट केली. पण कोण धजेचना. कुणाला काय युक्ती गवसेनाच. तशी आवडतीच्या दोन मुलांनी विचार केला. पैजेचा विडा जिंकायचा बेत केला. दोघं मिळून निघाले. आवडतीकडून तहानलाडू, भूकलाडू घेऊन वाड्याबाहेर आले. कामगिरीवर निघाले.

इतक्यात काळशिंग धावत आला. ह्या दोघांना हाक देत तो म्हणाला, "दादा दादा, थांब, मी पण येतो. "तर हे दोघे म्हणाले, "तुझं काय काम? जा मागं तू?" म्हणून मग हा माघारी गेला. त्याला वाईट वाटलं. "एकटा जाईन तर नावाचा!" असा त्यानं बेत केला. धावत धावत आईकडे गेला. झुणका भाकरी दे म्हणाला. नावडतीनं ते ऐकलं. लगोलग झुणका भाकरी बांधून दिली. काळशिंग ती घेऊन निघाला. त्यानं आवडतीच्या दोघांना पुन्हा वाटेत गाठलं. तशी त्या दोघांनी विचार केला, "आपण उत्तर दिशेला जाऊ .या." आणिक मग त्यांनी काळशिंगला दक्षिण दिशेला जा म्हटलं. पण जायच्या आधी त्यांनी प्रत्येकाचा एकेक बाण त्या जागेवर ओळखीचा म्हणून मारून ठेवला. जो आधी येईल त्यानं

आपला बाण घेऊन जावा असं ठरलं आणि मग सगळे आपापल्या वाटेनं निघून गेले.

जाता जाता आवडतीची मुलं गेली त्या वाटेत एक मोठं गाव लागलं. तिथं एक माणूस दवंडी पिटीत होता," आमच्या राजाच्या मुलीनं एक पैज मारलीय. सोंगट्याच्या डावात तिला, जो कुणी हार खायला लावील त्याच्याशी ती लग्न करील. शिवाय त्याला अर्धे राज्य बक्षीस मिळेल." त्या मुलांनी हे ऐकलं. ते गावात गेले. त्यांनी राजवाड्यावर जाऊन पैजेचा विडा उचलला. दोघेही राजाच्या मुलीबरोबर सोंगट्या खेळायला बसले. पण त्यांना डाव जिंकता आला नाही. ते पैजेत हरले. त्या कारणानं राजानं त्यांना बंदिखान्यात पाठविलं.

इकडे तोवर काळशिंग बारा न् बारा चोवीस कोस वाट चालून गेला होता. दिवस बुडायची वेळ. आसपास चिटपाखरू पण नाही. दाट जंगल. किर्रर्र झाडी. भयाण काळोख. पण काळशिंग घाबरला नाही. एके ठिकाणी रात्र झाली म्हणून बसून राहिला.

इतक्यात काय झालं की, एका झाडीत त्याला थोडासा जाळ दिसला. इथं कुणी तरी वस्ती करून राहिलंय अशी त्याला खात्री पटली. उजेडाच्या दिशेनं हळूहळू चालत तो निघाला. तिथं जाऊन बघतोय तर कुणी नवरा बायको जाळ करून शेकत बसलेले. हा त्यांच्या जवळ गेला.. तशी त्यांनी त्याला विचारलं," तू कोण? कुठला? कशाला आलास?" म्हणून काळशिंग म्हणाला," मी एका राजाचा मुलगा. पण नावडतीचा. आमच्या राजाला चांदीच्या मुळ्याचं, सोन्या च्या ढाप्याचं, न् मोत्यांच्या घोसाचं झाड बघायचंय. ते कुठे गवसतंय म्हणून बघायला निघालोय."

त्यावर तिथला माणूस म्हणाला कसा, "लई अबजूक गोष्ट हाय बाबा ही!"

आणि मग असं बराच वेळ इकडचं तिकडचं बोलत बोलत तिथंच सगळे झोपी गेले. पण मध्यरात्रीला नवरा जागा झाला. बायकोला म्हणाला, "अगं अगं, काय तरी उकड. पोरगं उपाशी तापाशी असेल." तशी तिनं काळशिंगची पिशवी चाचपली. बघतेय तर झुणका भाकरी. कधी न बघितलेला न खाल्लेला

जिन्नस. तिनं तो चटकन बाहेर काढला. दोघांनी मिळून खाल्ला. त्यांना भाकरी आवडली. तोंडाला चव आली. म्हणून मग दोघांनी विचार केला. काळशिंगसाठी भात उकडला. अन् मग ते पुन्हा झोपी गेले.

काळशिंग सकाळी उठला. जेवला खावला. मग ह्या नवरा बायकोनी एक पिंजरा तयार केला. काळशिंगच्या जवळ दिला. पण तो देताना ते म्हणाले, "इथनं बारा कोसांवर जा. एक भयंकर मोठी शिळा दिसेल. तिथं एक उंच झाड असेल. एक चांगली बाग दिसेल. तर तू तिथं जा. रात्री बाराच्या सुमाराला सावध आस. एक भला मोठा नाग येईल. तो आला रे आला की, त्याच्या फडीवर हा पिंजरा मार. एक जोराचा तडाखा भडकाव. त्याचे तुकडे होतील. दिसला की पिंजरा पुढं कर. शत्रू मरून जाईल. तुझं काम होईल." काळशिंगला आनंद झाला. त्या दोघांचा निरोप घेऊन तो तेथून निघाला. त्यांनी सांगितल्या बरहुकूम त्यानं सारं केलं. बारा कोसांवर जाऊन त्यानं नागाला ठार मारलं.

आणि मग तो तिथं दिसणाऱ्या एका भल्या मोठ्या वाड्याकडे गेला. तिथं त्या नागाची लेक रहात होती. तिला माणूस कसला तो माहीत नव्हता. तेव्हा काळशिंगला बघून ती घाबरली आणि त्याच्यावर ओरडली. "अहो, अहो इथून निघून जा. तुम्हांला बघितलं तर माझा बाप खाऊन टाकील."

हे ऐकून काळशिंग हसला. म्हणाला, "त्यानं मला खाऊन टाकायच्या आधी मीच त्याला खाऊन टाकलंय!" तशी ती पळत पळत बागेत गेली. खरं खोटं बघावं म्हणाली. बघतेय तर खरंच बाप मरून पडलेला! रडत रडत ती बिचारी माघारी आली. तिनं त्याला विचारलं, "माझ्या बापाला का मारलंस? आणि तू कोण?"

त्यावर काळशिंग म्हणाला, "मी एका राजाचा मुलगा. माझ्या बापाला चांदीच्या मुळ्याचं, सोन्याच्या ढाप्याचं आणि मोत्यांच्या घोसाचं झाड बघायचंय म्हणून मी आलोय!... आणि त्यासाठीच मी तुझ्या बापाला मारलं"

"असंच आहे तर मग आता मी सांगते तसं कर."

"सांगशील ते करतो. पण तसलं झाड दाखव."

“दाखवते. असं बघ, मी नटून सजून नाचत नाचत येते. तू त्या तरवारीनं एका फटक्यात माझ डोकं उडव. रक्ताच्या चिळकांडीत तसलं झाड तुला दिसेल.”

“आणि मग?... तू?... तू मरशील ते?” काळशिंग थोडा घाबरला. म्हणून मग ती म्हणाली, “अहं! मी मरत नाही. हीच तरवार तू एकदम उलटी कर म्हणजे मी साजिवंत होईन.”

काळशिंगानं तिनं सांगितलं. तसं सगळं केलं. त्याला पाहिजे ते झाड दिसलं. तो आनंदला, हारखला. मग नागाची मुलगी त्याला आणखी म्हणाली, “येथून बारा कोसांवर जा. तिथं माझी बहीण असते. तिला ही चिठी दे. घेऊन ये तिला.” तसा काळशिंग तिच्या म्हणण्याप्रमाणं गेला. बारा कोसांवरच्या तिच्या बहिणीला भेटला. त्या बहिणीनं याला आणखी बारा कोसांवर पाठवलं. तिथं तिची आणखी एक बहीण राहत होती. काळशिंग मग तिकडे पण गेला. ह्या दोघींना घेऊन पहिलीकडे आला.

त्यावेळी त्यांच्यापैकी जी थोरली होती ती काळशिंगला म्हणाली, “आता बापाला मारलंस तर आम्हा तिघींशी लग्न कर. आमचा पालनकर्ता हो.” काळशिंगानं ते कबूल केलं. तिघींना घेऊन त्या वाटेतल्या नवरा बायकोकडे आला. त्या देखण्या पोरींना बघून तो माणूस काळशिंगला म्हणाला, “असल्या स्वरूपवान पोरींना बघून कुणी तरी वाटेत तुझा घात करील. तर त्या तिघींच्या तीन लवंगा करून देतो त्या घे आणि मी सांगतोय तो मंत्र म्हण की त्या जिवंत होतील. काळशिंग कबूल झाला. हा हा म्हणता त्या तिघींच्या झालेल्या लवंगा एका लहानग्या पेटीत घालून तो निघाला.

आणि आला तो थेट तिघा भावांनी बाण मारून ठेवले होते तिथं आला. तिथं येऊन बघतोय तर बाण जसेच्या तसे. हाच पहिल्यांदा आलेला. त्याने आपला बाण उचलला आणि भावांच्या शोधाला तो निघाला. वाटेत त्याला एक गाव लागलं. राजाच्या मुलीनं मारलेली पैज त्याच्या कानांवर आली. सोंगट्यांच्या डावात तिला आपण सहज जिंकू म्हणाला. ह्यानं राजाकडे जाऊन पैजेचा विडा उचलला. राजाच्या लेकीला सोंगट्यांचा डाव जिंकून हारवली, राजानं मोठ्या

थाटानं त्याचं लग्न लावून दिलं. अर्ध राज्य बक्षीस दिलं. आणि कैदेत डांबलेल्या सगळ्यांना सोडून दिलं.

ह्या कैदेतल्या माणसांत काळशिंगचे भाऊ होते . ह्यानं त्यांना ओळखलं. पण त्यांना ह्याची ओळख पटली नाही. म्हणून मग ह्यानं ओळख दिली. कपडेलत्ते दिले. आणि मग ह्या तिघींच्या लवंगा मोडून त्या झाडाचा चमत्कार करून दाखवला! पुन्हा मंत्र म्हटला. पुन्हा तिघी लवंगा झाल्या.

काळशिंगानं मग ह्या राजासमोर ती करामत केली. मोत्यांचा घोस तोड म्हणून राजाला आज्ञा केली. पण राजा जसा पुढं जाई तसा मोठा चमत्कार होई. ते झाड उंच उंच व्हायचं आणि काळशिंग जवळ आला की, जवळ जवळ यायचं! काळशिंगनं घोसाला हात लावला तसा हा राजा हारखला. त्यानं उरलेलं राज्य पण त्याला देऊन टाकलं.

होता होता गंमत झाली. त्या तिघींच्या लवंगा करायचं काळशिंगला भान राहिलं नाही. तो तसाच दोघा भावांना व ह्या चौघींना घेऊन बापाकडे निघाला.

पण जाता जाता वाटेत थोरल्या भावाला तहान लागली. काळशिंगाला पाणी आण म्हणाला. काळशिंग पाणी आणावं म्हणून विहिरीवर गेला. तसा ह्या आवडतीच्या दोघांनी विचार केला की, काळशिंगला विहिरीत ढकलून द्यावं आणि वरून तोडी टाकून मारून टाकावं. तर काळशिंगाला ठरल्याप्रमाणे ह्यांनी लगोलग विहिरीत ढकललं. वर तोडी फेकल्या. आणि तो मेला म्हणून सांगत माघारी आले. त्या चौघींना घेऊन राजाकडे निघाले. पुढं सांगावा दिला.

राजाला आनंद झाला. हत्ती, घोडे, पालख्या न् मेणे घेऊन राजा सामोरा आला. त्यानं ह्या दोघांना विचारलं, "सांगितलं काम केलं बाळांनो?" तशी हे "हो" म्हणाले. पण राजानं करामत दाखवा म्हणून तगादा केला तरीही आज उद्याची चालढकल त्यांनी फार दिवस चालवली. करामत येतच नव्हती तर करतायत कुठले?

झालं. ह्या चालढकलीत चांगले पंधरा दिवस लोटले. इकडे तोवर काळशिंग विहिरीच्या खबदाडात लपून बसला होता. तर होता होता काय झालं की, त्या

वाटेनं वाणी लोक व्यापार करून निघाले होते. ते त्या विहिरीवर जेवण करावं म्हणून थांबले. त्यांनी जेवण केलं. आणि पाणी घ्यायला आणावं म्हणून त्यांच्यापैकी दोघेजण विहिरीत उतरले. तशी काळशिंग काकुळतीनं बोलला, "अरे बाबा, मला वर काढा." पण हे ऐकून ह्यांची दातखिळीच बसली. भूतबित असेल या भीतीनं ते आरडत ओरडत तसेच बिनपाण्याचे माघारी आले. त्यांनी अशानं असं आहे म्हणून बाकीच्यांना सांगितलं. तर त्यात एक मुडदार माणूस होता तो म्हणाला कसा, "बघूया तरी कोण आहे ते?" आणि तो धिटाईने विहिरीत उतरला. तशी काळशिंग पुन्हा बोलला, "अरे बाबा मला वर काढ." ह्या माणसानं युक्ती काढली. एक बादली विहिरीत सोडून म्हणाला, "ह्यातून वर ये." काळशिंग बादलीतून वर आला. त्याला बघून सगळेजण पोट धरधरून हसले व आपल्या वाटेला लागले.

काळशिंगानं भावांनी केलेला कावा ओळखला. बैराग्याचं रूप घेतलं. एका जंगलात निघून गेला.

नागाच्या मुलींना हे ठाऊक होतं. त्यांनी राजाला घडली गोष्ट सांगितली, आणि इच्छा प्रकट केली की, "आपल्या राज्यात जेवढे म्हणून गोसावी असतील तेवढ्यांना बोलवा. अन्नसत्र उघडा. बक्षीस द्या." राजानं तसं केलं. गोसाव्यांच्या झुंडीच्या झुंडी येऊ लागल्या.

राजानं प्रत्येक गोसाव्याला प्रश्न केला, "काळशिंग राजाची गोष्ट सांगशील का?" पण कुणी हुंकार भरला नाही. राजाची उत्सुकता वाढीला लागली.

इकडे काळशिंग जंगलातल्या एका शिळेवर बसला होता. त्या वाटेनं आठदहा गोसावी निघालेले. ह्याला बघून त्यांचा म्होरक्या म्हणाला "ये... गोसावड्या... भोजनाला चल. बसलायस काय एकटाच?" तशी हा म्हणाला, "नाही येत मी!"

"वा! नाही म्हणजे? येतोस की नाही, का घालू त्रिशूळ डोक्यात?"

जिवाला धोका होतोय हे बघताच काळशिंग उठला. त्यांच्या मागोमाग निघाला. वाड्यावर आला. जेवण झालं. बाकीचे निघून गेले. हा एकटाच

राहिला. राजानं त्याला विचारलं, “काळशिंग राजाची गोष्ट सांगशील का?” तर हा म्हणाला, “हो. .सांगतो.” पण ह्यानं काय केलं की, चारदोन गोष्टी सांगाव्या आणि एकदम गप्प व्हावं? “पुढं येत नाही” म्हणावं! मग राजा चिडला. शिरच्छेद करायची त्यानं त्याला धमकी घातली! तशी मग ह्यानं होय नाही करीत झाली गोष्ट राजाच्या कानांवर घडली तशी घातली. आणि आपण स्वतःच काळशिंग राजा असल्याचं कबूल केलं.

त्या घटकेला नागाच्या तिघी मुली पुढं आल्या. त्यांनी ह्याच्या पायांवर लोळण घेतली. तशी हा म्हणाला, “साज शिणगार करून या.” त्या लगोलग शिणगार करून आल्या. बापासमोर नाचत या म्हणाला. त्या नाचत आल्या. ह्यानं एकदम त्या तिघींची डोकी तरवारीच्या एका फटक्यात उडविली! त्यासरशी रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. राजाला चांदीच्या मुळ्याचं, सोन्याच्या ढाप्याचं न् मोत्यांच्या घोसाचं झाड दिसलं! काळशिंगानं राजाला तोड म्हटलं, राजा बिगीनं पुढं गेला. पण झाड त्याच्या दर पावलागणिक वर वर निघालं! तशी मग काळशिंग पुढं झाला. त्यानं तो घोस तोडला. बापाच्या फेट्यात खोवला. तरवार उलटी करून ह्या तिघींना साजिवंत केलं!

आपलं म्हणणं काळशिंगानं खरं केलं म्हणून राजा त्याच्यावर खूष झाला. त्यानं आवडतीच्या दोघांना फाशीची सजा केली.

पण काळशिंग आडवा झाला. म्हणाला, “तसं करू नका बाबा. तुमचं राज्य ह्यांनाच असू द्या. माझ्या बायकोच्या राज्यात मी मालक म्हणून जाईन.”

राजाला अचंबा वाटला. पण काळशिंग मग तिथं थांबलाच नाही. आपली आई व चौघी बायका घेऊन जिंकलेल्या राज्यात आला. त्यानं मग सुखानं राज्य केलं. चांगुलपणाचं फळ चांगलंच असतं !

(पुनःकथन : श्रीमती जानकीबाई पाटील
- सांगीवांगी (संपा. सरोजिनी बाबर))

# ७.६ राजा आणि गरीब माणूस

(कजाकिस्तानची लोककथा)

एका गावात एक बुद्धिमान आणि अनुभवी वृद्ध रहात होता. त्याला एक मुलगा होता. एक दिवस त्याने आपल्या मुलास सांगितले, "बेटा, तीन महत्त्वाच्या गोष्टी लक्ष्यात ठेव. एक - कधीही अशा माणसास आपला मित्र करू नकोस. ज्यावर तुझा विश्वास नसेल. दोन - कधीही अशा माणसाकडून कर्ज घेवू नकोस. जो खानदानी श्रीमंत नसेल आणि तीन - कधीही कोणतीही गुपित गोष्ट कोणालाही सांगू नकोस मग ती तुझी बायको का असे ना."

मुलाने वडिलांच्या ह्या तीन गोष्टींची परीक्षा घेण्याचे ठरविले. त्याने एका विश्वासघातकी माणसाशी मित्रता केली. एका नवीनच श्रीमंत झालेल्या व्यक्तिकडून कर्ज घेतले. नंतर त्याने एक बकरा मारला. आणि आपले रक्ताळलेले कपडे बायकोला देत सांगितले की, "मी एका माणसाचा खून केला आहे. हे कपडे त्याच्या रक्ताने माखलेले आहेत. यांना स्वच्छ धुवून घे."

एक दिवस त्याने उगीच बायकोशी भांडण केले. तिला नको ते बोलला. त्यामुळे ती रागाने राजाकडे गेली आणि म्हणाली, "महाराज, माझा नवरा हत्यारा आहे. त्याने एका माणसाची हत्या केली आहे." राजाने तिच्या नवऱ्याला पकडून आणण्याचा आदेश दिला.

शिपाई त्याला पकडून राजमहालाकडे घेवून जात होते की त्याने रस्त्यात थांबून आपल्या विश्वासघातकी मित्राची मदत मागितली. त्याने उत्तर दिले, "मित्रा, आता तर मला मुळीच वेळ नाही. तू मला माफ कर."

तेव्हाच त्याला कर्ज देणारा तो श्रीमंत भेटला. त्या श्रीमंताने विचार केला की आता राजा ह्याला दंड करेल आणि माझे कर्जाचे पैसे बुडतील. म्हणून तो ताबडतोब कर्ज फेडण्याचे त्याला सांगू लागला.

त्या मुलाने राजाला सर्व कथा सांगितली आणि वडिलांनी जो उपदेश दिला

तो पण सांगितला. राजा त्याच्या वडिलांच्या उपदेशावर तसेच त्याच्या प्रामाणिकपणा आणि बुद्धीवर प्रसन्न झाला आणि त्याला सोडून दिले.

काही दिवसानंतर राजावर एक संकट आले. राजा मांस खात होता की एक हाड त्याच्या घशात अडकले. राज्यातील नावाजलेले वैद्य बोलाविण्यात आले पण कोणीही ते हाड काढू शकले नाही. राजाला अचानक ते बुद्धिमान बाप-बेटे आठवले. त्याने त्यांना बोलावून आणण्याचा आदेश दिला.

त्या वृद्ध माणसाने येऊन राजाला सांगितले की, "महाराज, आपण वाचू शकता पण त्याकरिता आपल्याला आपल्या मुलाचा बळी द्यावा लागेल."

राजदरबारातील सर्वांनी राजाला समजाविले तेव्हा तो आपल्या मुलाला बळी देण्यास तयार झाला.

त्या वृद्धाने व त्याच्या मुलाने जवळच्या एक खोलीत राजकुमाराला नेऊन त्याचे हातपाय बांधून त्या खोलीत टाकून दिलं. मग त्यांनी एका बकऱ्याचं तोंड बांधून त्याच्या गळ्यावर तलवार चालविली, बकऱ्याचा बळी दिला जात असताना व्यक्ती ओरडतो तसा त्या वृद्धाचा मुलगा ओरडला. बाहेर असलेल्या राजाला कळले की त्याच्या एकुलत्या एक मुलाला बळी दिले गेले आहे. तो पुत्र शोकामुळे इतक्या जोराने ओरडला की त्याच्या घशातील हाड बाहेर पडले आणि राजा बेशुद्ध झाला.

जेव्हा राजा शुद्धीवर आला तेव्हा त्या बुद्धिवान वृद्धाने राजास सांगितलं की, "महाराज, आपणपण वाचलात आणि आपला राजकुमार पण जिवंत आहे. राजा अत्यंत प्रसन्न झाला आणि त्याने आपले अर्धे राज्य त्या वृद्धास देऊन टाकले."

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ७.७ न्यायमंत्री

रामपूर नावाचं एक गाव होतं. त्या गावाचा एक राजा होता. त्या गावचा राज्यकारभार अतिशय सुरळीत सुरू होता. त्याचे कारण म्हणजे त्या राजाचा न्यायमंत्री होय. त्याच्याकडून योग्य न्याय निवाडा होत असल्याने राजाची प्रजाही सुखी होती.

एकदा न्यायमंत्री राजाला म्हणाला, "महाराज, मी आता वृद्ध झालो. राज्याचा न्यायनिवाडा करण्यास माझी कार्यक्षमता कमी पडते. आपला मोठेपणा की, या वयातही आपण मला चाकरीवर ठेवलं. आपणास विनंती की, माझ्या जागेवर कोणी योग्य असा तरुण ठेवावा." न्यायमंत्र्याचे वक्तव्य ऐकून राजा चिंतेत पडला. न्यायमंत्र्यासारखा योग्य माणूस शोधून सापडणे कठीण! तेव्हा राजाने स्पष्ट नकार न देता न्यायमंत्र्यास सांगितले, "ठीक आहे. पण एका अटीवर आम्ही आपली विनंती मान्य करू. आपल्यासारखा न्यायमंत्री आपणच शोधून आणायचा! त्याचे कार्य आम्ही बघू. आम्हास रूचले तर त्याला चाकरीवर घेऊ अन् आपली सुटका करू." न्यायमंत्र्याने राजाकडून एका महिन्याची मुदत मागून घेतली.

राजाला मनापासून वाटत होते, न्यायमंत्र्याने आपल्या तरुण मुलावर ही जबाबदारी सोपवावी. पण न्यायप्रिय मंत्र्याने ती संधी आपल्या मुलाला न देता गावातील मुलांतून निवड करायचे ठरविले.

गावात दवंडी पिटली, "ऐका हो ऐका. रामपूरचा राज्यकारभार सुरळीत चालविण्यासाठी एका तडफदार, बुद्धिमान, शक्तिशाली व न्यायप्रिय मंत्र्याची आवश्यकता आहे. तरी इच्छूक तरुणांनी राजवाड्यावर उपस्थित व्हायचे आहे. तेथे परीक्षा घेतली जाईल. त्यात जो यशस्वी होईल तोच या राज्याचा न्यायमंत्री होईल हो..."

दुसऱ्या दिवशी इतर अनेक युवकांप्रमाणे न्यायमंत्र्याचा मुलगाही राजवाड्यावर हजर झाला. प्रत्येकजण आपली बुद्धिमत्ता, बलशक्ती प्रदर्शन करण्यासाठी आसुसले होते. पण परीक्षा केव्हा घेणार हे सांगितले नव्हते. 'परीक्षेपर्यंत सर्वांनी राजवाड्यावरच रहा' असे मात्र सांगण्यात आले. दुसऱ्या दिवशी पहाटेच मुले तयार झाली. जे बलवान, शक्तिशाली होते ते कसरती करून स्वत:चे आणि इतरांचे मनोरंजन करीत होते. आजचा दिवस गेला. दुसरा, तिसरा... विसावा आणखी किती दिवस रहायचे? मुले परीक्षेच्या दडपणाने कंटाळली. ते राजाला, न्यायमंत्र्यांना विचारू लागले 'केव्हा घेणार आमची परीक्षा?' न्यायमंत्र्याने सांगितले, 'फार लवकर होणार आहे तुमची परीक्षा?' त्यानंतर पाच दिवस गेले. कुणी योग्य व्यक्ती एवढ्या मुलांमधून निवडणे सोपे नव्हते. प्रत्येक मुलाच्या हालचालींवर, वागण्या-बोलण्यावर बारीक लक्ष ठेवले जात होते. अत्यंत हुरूपाने व उत्साहाने आलेले काही तरुण आता ढिले पडले होते. हुशार व बलशक्तीचे प्रयोग करणारे कंटाळले, आळसावले. रोज फुकटात खायला मिळतंय म्हटल्यावर आरामात उठणे, शिस्तीचे नियम भंग करणे असे चित्र दिसू लागले. न्यायमंत्री हताश झाले. महिनाभर मागितलेली मुदत संपत आली होती. राजाने न्यायमंत्र्याला विचारले, "मंत्रीजी फक्त पाच दिवस राहिले. आपण नवा न्यायमंत्री निवडला की नाही? माझं ऐका! तुमच्या मुलाला आपण न्यायमंत्रीपद देऊ. तुमच्या देखरेखीत तो तयार होईल." न्यायमंत्री राजाला म्हणाला, "महाराज आपण उद्याच मुलांची परीक्षा घेऊ या. आपण माझ्यासोबत याल?" राजा तयार झाला. सगळ्या मुलांना उद्या परीक्षा आहे असे कळविण्यात आले. प्रत्येकजण आपली बुद्धी, शक्ती घासून पुसून तयार करू लागले.

पहाटेच मुलांना तयार व्हायला सांगितले आणि त्यांना पायी गावातून फिरविण्यात आले. सकाळपासून मुलं चालत होती. रस्त्याने, शेतातून, मळ्यांतून, वस्तीतून, गल्लीतून, दलदलीतून, घाणीतून. त्यांच्या प्रतिक्रियांवर लक्ष ठेवले जात होते. राजा आणि न्यायमंत्री अर्थातच वेष बदलून मुलांच्या घोळक्याच्या कधी मागून तर कधी पुढे असे चालत होते. यात एक गरीब

शेतकऱ्याचा मुलगा वस्तीतील लोकांची आस्थेने चौकशी करायचा. त्यांचे दु:ख, दारिद्र्य यावर त्यांना दिलासा देणारे भाष्य करायचा आणि महत्त्वाचं म्हणजे तो लोकांना विश्वास देत होता, मी जर न्यायमंत्री झालो तर तुमच्या समस्या राजापर्यंत पोहोचवीन. योग्य न्यायनिवाडा करीन.

पुढे गेल्यावर अतिशय दलदलीत एका शेतकऱ्याची बैलगाडी फसली होती. मुलांचा घोळका तेथून जात होता. शेतकऱ्याने विनंती केली, "कृपया माझी फसलेली गाडी काढण्यास मदत करा." मुलं पुढे चालली होती. त्यातील शेतकऱ्याचा मुलगा त्याच्या मदतीला धावला. आपल्या बलशक्तीने व युक्तीने त्याने फसलेली गाडी बाहेर काढली. शेतकरी प्रसन्न झाला. मुलाची चौकशी करू लागला. "कोण रे मुला तू! इकडे कशासाठी आलास?" मुलाने वृत्तांत दिला, "मी राजवाड्यावर न्यायमंत्री बनण्यासाठी आलो होतो. गेल्या महिनाभरापासून मी आणि माझ्यासारखी अनेक मुलं राजवाड्यावर मुक्कामी आहेत. आज आम्हाला गावात फेरफटका मारण्यासाठी बाहेर सोडले. आपण भेटलात. आपल्या उपयोगी पडण्याची संधी मिळाली. परिचय झाला. आनंद वाटला. हा तरुण मुलाचा नम्रपणा, शिवाय कुठेही उपकारकर्त्याची भावना नाही, हे बघून शेतकरी म्हणाला, "मुला तूच न्यायमंत्री होशील. माझा आशीर्वाद आहे तुला!"

मुलं गावात फेरफटका मारून निराश होऊन राजवाड्यात परतली. आजही परीक्षा झाली नाही. बलशक्ती प्रयोग नाही की ज्ञानाची स्पर्धा नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी राजाने सभा बोलावली. सगळ्या युवकांना राजमहालात बोलावले, "गेल्या महिनाभर झालेल्या परीक्षांत सर्व मुलांमधून एक युवक सफल झाला. त्याची न्यायमंत्री म्हणून निवड घोषित करण्यात येत आहे." इतर मुले एकमेकांच्या तोंडाकडे बघत होते. महिनाभर परीक्षा! कधी झाली परीक्षा? राजाने प्रत्येक गोष्टीचा खुलासा दिला, "तुम्हाला सुखात, चैनीत ठेवले. पण सुखाला बळी न पडता आपले कर्तव्य पार पाडणारा, प्रसंगी सर्वांना नि:स्वार्थ बुद्धीने मदत करणारा तरुण म्हणजे एका गरीब शेतकऱ्याचा मुलगा!" राजा

म्हणाला,“मुला काल ज्या शेतकऱ्याची चिखलात फसलेली गाडी काढण्यास मदत केली तो शेतकरी मीच होतो. तुमची तीच परीक्षा होती. तू त्यात यशस्वी झालास!”

शिवाय कर्तव्यदक्ष, न्यायप्रिय न्यायमंत्र्याचेही राजाने कौतुक केले. वृद्धापकाळात आपली कार्यक्षमता कमी पडते हे लक्षात येताच स्वत:हून सेवानिवृत्ती घेणारा, शिवाय आपला तरुण मुलगा असतानाही निरखून, पारखून न्यायमंत्री निवडण्याचा आग्रह धरणारा! धन्य त्या न्यायनिवाड्याची! राजानेही मोठ्या आनंदाने न्यायमंत्र्याचा कार्यभार कमी करून तरुण, तडफदार, बलवान, ज्ञानी, न्यायप्रिय तरुणास तो कार्यभार सोपवला. असा स्वच्छ व्यवहार असल्यावर राज्यव्यवस्था सुरळीत चालणार यात शंकाच नाही!

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ७.८ संकेतसुंदरी

(चंद्रपुरी लोककथा)

आटपाट नगर होते. तिथे एक राजा राज्य करीत होता. चांगला तरुण, सुंदर नि धिप्पाड. पण त्याचे काही लग्न झाले नव्हते. त्याने देशोदेशीच्या राजकन्या पाहिल्या. काही त्याला दाखविल्या; पण त्यातून त्याला एकही पसंत पडेना.

असेच काही दिवस निघून गेले. राजाला शिकारीचा नाद होता. असाच तो एकदा शिकारीस निघून गेला असता रस्ता चुकून एका घोर अरण्यात शिरला. काही केल्या त्याला घरची वाट सापडेना. तेवढ्यात त्याला खूप तहान लागली. एखादी नदी किंवा तळे दृष्टीस पडते की काय म्हणून तो इकडे तिकडे शोध करू लागला. बऱ्याच प्रयासानंतर त्याला एक सुंदर तळे दिसले. आपला घोडा भरधाव तिकडे उधळीत तो तळ्यावर पोचला. क्षणभर त्याने त्या सभोवतालची निसर्गशोभा पाहिली. त्याला फार प्रसन्न वाटू लागले. उंच उंच पर्वतांच्या परकोटांत ते तळे असून भोवती गगनचुंबी वृक्षराजींचा जणू मंडप शोभत होता. पृष्ठभागावर जललहरी जणू लंपडाव खेळत असल्याचा भास होत होता. सूर्याची सुंदर किरणे पाण्यावर चकाकत होती आणि रंगीबेरंगी कमळांनी तो तलाव भरगच्च फुलून गेला होता.

काही वेळानं तो ही निसर्गशोभा पाहून भानावर आला. तो घोड्यावरून खाली उतरला व तळ्यांत उतरण्याचा मार्ग शोधू लागला. शोधता शोधता एक पायवाट त्याला दिसली. घोड्याला शेजारच्या झाडाला बांधून तो पाण्यात उतरू लागला. थोड्याच अंतरावर त्याला काही कोलाहल ऐकू आला. मध्येच कोणीतरी मोठमोठ्याने हसत आहे असाही त्याला भास झाला. तो किंचित् दचकला, पण त्याला जे एक, दृश्य दिसले ते पाहून तो चकितच झाला. काही सुंदर तरुण मुली त्या तलावात स्नान करीत असल्याचे त्याच्या दृष्टीस पडले.

त्याच वेळी ह्या राजबिंड्या तरुणाकडे त्यांचे लक्ष गेले असावे. त्या झपाझप काठावर आल्या आणि आडोशाला होऊन कपडे बदलू लागल्या. त्यांपैकी एक राजाला फारच अनुपम सौंदर्यवती दिसली व तिच्या चालचलवणुकीवरून व एकंदर बोलण्यावरून तीच ह्या घोळक्याची प्रमुख असावी असा त्याने अंदाज केला.

क्षणात तिचेही राजाकडे लक्ष गेले आणि तीही त्याच्याकडे पाहात राहिली. तिच्या सख्या आपल्याच नादात, थट्टाविनोदात गुंग होऊन गेल्या होत्या. आणि ही त्या राजाकडे अधूनमधून पाहात होती. राजाच्या मनात ती एकदम भरली. पण तिच्याशी बोलायचे कसे हा प्रश्न त्याला पडला. शिवाय हे सारे एकदम घडले कसे? एवढ्या घोर अरण्यात अशा विलक्षण जागी ह्या मुली निर्धास्तपणे आंघोळीला आल्या कशा? कदाचित् हे काहीतरी चेटूक तर नसेल? अशी एक शंका ज्याच्या मनाला चट्दिशी चाटून गेली त्याने किंचित् संयमानेच सारे घ्यावयाचे ठरविले.

तेवढ्या वेळात त्या सर्व मुलींची तयारी झाली व त्या भराभर पाऊलवाटेने जावयास निघाल्या. तेवढ्यातल्या तेवढ्यात त्यांच्यातील त्या म्होरक्या मुलीने चट्दिशी मागे फिरून तळ्यातील एक कमळ तोडले व कांठावर ते ठेवून दिले. सर्व सख्यांची नजर चुकवून त्या राजबिंड्या पुरुषाला बोटाने कमळाचे फूल दाखवून ती सख्यांसह पसार झाली.

त्या दूर गेल्यानंतर राजाने धावत जाऊन ते कमळ उचलले व इकडून तिकडून फिरवून पाहिले पण त्याला विशेष असे काही आढळले नाही. किंवा काही विशेष घडले नाही. त्याला वाटले, द्यावे ते फेकून तळ्यात पण त्याने तो विचार बदलला.

मोठ्या कष्टाने कशीबशी वाट काढीत तो राजधानीस परत आला. मनाशी तो खूप विचार करू लागला. तासन्तास तो त्या कमळाकडे टक लावून बसे. एक दिवस गेला, दुसरा दिवस गेला; तिसरा गेला. राजाच्या अबोल वृत्तीचे आणि एकंदर वर्तनात बदल झाल्याचे वृत्त चोहीकडे पसरले. जो तो त्यासंबंधी चर्चा

करू लागला. राजाचा प्रधान मोठा चाणाक्ष होता. राजाच्या बेचैनीचे कारण विचारावे असे प्रथम त्याच्या मनात आले. पण मुद्दामच त्याने तो विचार लांबणीवर टाकला. राजा स्वतः आपणास बोलावून जोवर काही सांगत नाही तोवर आपण त्याच्या बाजूस फिरकूच नये असे त्याने ठरविले.

राजाला काहीच सुचेना. शेवटी त्याने प्रधानाचा सल्ला घेण्याचे ठरविले. त्याने प्रधानाला बोलावणे पाठविले. त्याने प्रधानाला ते कमळ दाखविले. ते अद्यापही पहिल्या दिवशी इतकेच ताजे अन् टवटवीत होते. त्याने ते नीट न्याहाळून पाहिले व घडलेला वृत्तांत लक्षपूर्वक ऐकला. त्या कमळाच्या पाकळ्या मोजून काढल्या. अमळशाने भेटतो असे म्हणून प्रधानाने राजाचा निरोप घेतला.

राजाची उत्कंठा सारखी वाढत चालली होती. प्रधानाच्या वाटेकडे त्याचे सारखे डोळे लागले होते. काही वेळाने प्रधान आला, तो येताच त्याने समाधानाचा सुस्कारा सोडला. त्याने राजाला सांगितले की, त्या म्होरक्या मुलीने ह्या कमळाच्या निमित्ताने तुम्हांला असे सुचविले आहे की, आम्ही आठ बहिणी आहोत. त्यातील मी एक असून मोठी आहे. जसे मी कमळ तळ्यातून खुडून काढले तसे तू मला खुडून वेगळे कर म्हणजे मी तुझीच आहे. दुसरे असे की, तू ह्याच ठिकाणी आठ दिवसानंतर भेट.

राजाला प्रधानाच्या चातुर्याचे अत्यंत कौतुक वाटले. त्याचा त्याने खूप सत्कार केला.

हां हां म्हणतां आठवा दिवस उजाडला. भल्या पहाटे उठून राजा शिकारीच्या निमित्ताने राजवाड्याबाहेर पडला आणि त्या सुंदर तळ्यावर जावयास निघाला, पण वाट चुकल्यामुळे त्याला तेथे पोचण्यास उशीर झाला. पाहातो तो त्या मुली तेथे येऊन निघून सुद्धा गेल्या. क्षणभर त्याला चक्कर आल्यासारखे झाले. असे वाटले की समोरच्या प्रशांत तळ्यात स्वतःला लोटून द्या. पण जरा संयम करून त्याने तो विचार बदलला, व सचिंत मुद्रेने त्या पायवाटेवर तो येऊन बसला. त्याला त्या कमळाची आठवण झाली. घोडा बांधला होता तेथे तो

जावयास निघाला, ती त्याची नजर पूर्वी कमळ जेथे ठेवले होते त्या जागेकडे वळली. तेथे काही कमळे पसरून ठेवलेली दिसली. म्हणून तो तिकडे वळला.

वर्तुळाकार अशी विशिष्ट पद्धतीने लावलेली कमळे त्याला तेथे दिसली. पण त्या वर्तुळात काही अंतरावर एक कमळ नव्हते. अशा आठ जागा होत्या. त्या वर्तुळात छोटी छोटी आठ कमळे बिनदेठांची ठेवलेली होती. आणि एका देठावर रेशमाच्या दोऱ्यात दोन लवंगा गुंफून ठेवल्या होत्या. राजाने ते सर्व अगदी बारकाईने व चिकित्सेने पाहिले. पण त्यावरून काय समजावयाचे ह्याचा काही त्याला बोध होईना. आणखी काही खुणा आहेत काय म्हणून त्याने चौकसबुद्धीने पाहिले तर थोड्याच अंतरावर त्याला काही कमळांची पूजा करून ठेवल्याचे व एक देठ उभा असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. राजाला कळून चुकले की आपण येथे कितीही डोके खाजवीत विचार करीत बसलो तरी आपणाला ह्यातले काही समजावयाचे नाही. तेव्हा त्याने राजधानीस प्रयाण केले. नंतर प्रधानास घेऊन तो त्या जागी आला. प्रधानाने सुमारे तासभर त्या जागेचे व सभोवतालचे निरीक्षण केले. तो रेशमाचा दोरा व त्यात ओवलेल्या त्या दोन लवंगा पाहिल्या. वर्तुळाबाहेरील ती पूजा केलेली कमळे पाहिली व ते उभे देठदेखील पाहिले. नंतर त्याने ती जागा मोजून पाहिली. प्रधान ह्या सगळ्याचा उकल केव्हा करतो आणि आपण त्याप्रमाणे केव्हा वागतो असे राजास होऊन गेले. पण बाहेरून त्याने उतावळेपणा दाखविला नाही.

प्रधानाच्या मुखावरील गंभीरता हळू हळू मावळून तेथे स्मिताची उत्साहकारक छाया पसरू लागली. थोड्या वेळाने प्रधान राजास म्हणाला, “महाराज, खरोखरीच आपण फार भाग्यवान आहात. आपणाला अगदी अनुरूप व अत्यंत चलाख अशी राणी लाभणार. याची तिच्या ह्या संकेतावरून कल्पना येईल. ह्या कमळाच्या वर्तुळाने तिने असे दर्शविले आहे की, येथून तीन मैलांवर पद्मापूर (शंख+चक्र+पद्म) नावाच्या किल्ल्यात आपण आठ बहिणी निरनिराळ्या आठ महालात राहातो. वर्तुळातील ह्या आठ मोकळ्या जागा आणि आतील आठ बिनदेठांची कमळे ही दरवाजे आणि आठ महाल

सुचवितात. लवंगेच्या रूपाने तिने आपल्या महालाची कल्पना दिली आहे. ती ह्या आठ महालांपैकी 'लवंगी महालात' असते. दोनच लवंगा असल्याने ती दुसऱ्या मजल्यावर राहाते. रेशमाच्या दोऱ्याने व त्यावर अगदी मधोमध मारलेल्या गाठीमुळे ती असे सुचविते की 'मध्यरात्री तुम्ही तेथे त्या लवंगी महालाजवळ यावे. ती रेशमाचा दोर टाकील, त्याला धरून वर ये. वर्तुळाबाहेर ज्या कमळांची पूजा केली आहे व जो देठ उभा आहे त्यावरून ती असे सूचित करते की, किल्याबाहेर देवालय आहे व त्याला लागून एक थोरला वृक्ष आहे. तेथे मुक्कामास राहावे." राजाला ते सारे ऐकून अत्यंत आनंद झाला. प्रधानाच्या चातुर्याबद्दल त्याला कौतुक वाटले आणि त्याच्या डोळ्यात कृतज्ञतेचे आनंदाश्रू चमकू लागले. नंतर दोघांनी यथेच्छ जलविहार केला. आणलेल्या फराळावर त्यांनी ताव मारला. तिसरे प्रहरी ते दोघे त्या पद्मपूर किल्ल्याबाहेरील देवळाकडे रवाना झाले. प्रधानाच्या म्हणण्याप्रमाणे खरोखरीच तेथे देऊळ व शेजारी वडाचे थोरले झाड होते. तेथे ते उतरले. कदाचित् सायंकाळी कोणी तेथे दिवे लावायला येतील अशी प्रधानाला कल्पना आली. तद्नुसार त्याने आडोशाची जागा पाहून ठेविली.

हां हां म्हणतां मध्यरात्र समीप येत चालली तसा राजा बेचैन होऊ लागला. एक तर नवख्या ठिकाणी निव्वळ संकेताने त्याला जावयाचे होते. आणि दुसरे म्हणजे प्रधानाने सांगितलेले सारे जुळूनच येईल की नाही अशी त्याला शंका वाटली. प्रधानाने दर्शविलेल्या मार्गाने राजा किल्ल्याकडे इष्टवेळी रवाना झाला व लवंगी महालाच्या दुसऱ्या मजल्याजवळील खिडकीच्या खाली येऊन उभा राहिला. हाताने चाचपडून पाहातो तर खरेच रेशमाचा घट्ट दोर लोंबकळत असलेला दिसला. त्याला धरून तो वर चढला. राजकन्या तेथे त्याची वाट पाहात होती. दोघांची दृष्टादृष्ट झाली. राजकन्येने सुचविल्याप्रमाणे लागलीच तो आणि राजकन्या त्या रेशमी दोराच्या साह्याने खाली उतरले. आलेल्या मार्गाने ती परत देवळात पोहोचली. प्रधान तेथे त्यांची वाट पाहात होताच. लागलीच त्या तिघांनी तेथून कूच केले.

राजकन्या राजाच्या घोड्यावर बसली. थोड्या वेळात ती तलावावर आली. मघाचे ते कमळांचे वर्तूळ व देठ राजकन्येने मोडून टाकले व तेथे एक आडवी रेघ मारली. त्याबरोबर तो मार्ग आपोआप बंद झाला. झुंजुमुंजू होत नाही तो राजा, प्रधान, राजकन्येसह राजधानीत पोचला. एका सुमुहूर्तावर त्या दोघांचे लग्न झाले व सुखासमाधानाने त्यांनी खूपखूप वर्षे राज्य केले. त्यांनी जसे राज्य केले तसे तुम्ही करा. आमची कहाणी संपली.

(विनायक वासुदेव जोशी : चंद्रपुरी लोककथा)

# ७.९ समईचं लग्न

(चंद्रपुरी लोककथा)

आटपाट नगर होते. तिथे एक राजा नांदत होता. त्याच्यासारखा न्यायी, दयाळू आणि दिलदार असा दुसरा राजा आजवर त्या राज्यात झाला नव्हता. सारी प्रजा सुखाने नांदत होती. पण राजाराणी दोघंही मनात मोठी दुःखी होती. त्यांच्या ह्या दुःखात त्यांची प्रजा सहभागी होती. वडीलधारी व राज्यातील जबाबदार माणसे गरीबांच्या झोपडीतून, सरदारांच्या वाड्यातून, अमिराच्या बंगल्यातून, गाईच्या गोठ्यांवर व नदी-तळ्या-विहिरींच्या पाणवठ्यावर, जिथे जिथे राजा-राणीच्या गोष्टी निघत तिथे तिथे शेवटी सुस्कारे टाकून साऱ्यांनी म्हणावे, "अहो, सारं सुख आहे, संपत्ती आहे; पण संतती नसल्यानं सारं कसं ओकं ओकं दिसतं." राजा-राणीने संततीसाठी खूप नवससायास केले, व्रतवैकल्ये केली, दानधर्म तर दररोज चालू होता. राजवाड्यातून कधी कोणी विन्मुख गेल्याचे कोणाच्या लक्षात नव्हते. ते तीर्थ-यात्रा करून आले होते; पण पन्नाशी उलटून गेली तरीही त्यांना संतानप्राप्ती काही झाली नाही. कधी कोणी राजवाड्यात राजासमवेत बसले, प्रधान, सरदारमंडळी असली आणि हा विषय निघाला तर वरपांगी संतुष्ट असल्याच दाखवून म्हणावे, "बाबांनो, मला माझी स्वतःची संतती नसली तरी देवानं ही केवढी मोठी संतती दिली आहे! सारी प्रजा माझी संततीच नव्हे का? केवढं माझं भाग्य !" आणि राणी दासदासींच्या व सरदार-भालदारणींच्या मेळाव्यात बसली अन् तिथे हा विषय निघाला की, तिनेही असेच उत्तर द्या.

दिवसांमागून दिवस जात होते. एके दिवशी राजधानीत असाच कुण्या देशचा तांब्यापितळेची भांडी विकणारा आला. त्याच्याजवळची ती मोठमोठाली नानातऱ्हेची चित्रविचित्र आणि सुंदर सुंदर घाटाची भांडी पाहून त्याच्या दुकानावर एकच गर्दी झाली आणि हां हां म्हणता ती सारी खपून गेली. ही गोष्ट

राजाच्या कानावर जाताच त्याला त्याने राजवाड्यात बोलावलं. राजाने त्याची विचारपूस केली. काही भांडी शिल्लक असल्यास दाखविण्यात आणावीत म्हणून सांगितले. त्या भांडीवाल्याने खरी हकिगत सांगितली. त्याच्याजवळ फक्त एकच थोरली समई शिल्लक राहिली होती. तिची त्याला आठवण झाली. ती समई चांगल्या घाटाची व एवढी मोठी होती की, तीत एक माणूस सहज बसावा. त्याला वाटले एवढी समई इतर कोण घेणार? खरे म्हटले तर राजवाड्यातच, त्यातल्या त्यात राजाच्या खास महालात ती विशेषच शोभून दिसेल. त्याने लागलीच आपल्या माणसांकरवी ती समई आणविली आणि राजास भेट म्हणून दिली आणि नम्रतेने सुचविले, "महाराज आपण दररोज ही आपल्या खास महालात लावीत जा. पाच पौर्णिमांना हिची समारंभाने पूजा करा. आपल्या वाड्यात ही कुलदीपक निर्माण करील. राजाने त्या भांडीवाल्याला जेवू घातले व खूप नजराणा देऊन मोठ्या थाटाने निरोप दिला.

आणि खरेच राजवाड्यात समई आल्यापासून थोड्याच अवधीत राणीला दिवस गेल्याचे शुभवर्तमान चोहीकडे पसरले. राजधानीत व राज्यात सर्वत्र उत्सव झाले. देवळात पूजाभिषेक करण्यात आला. गरीबास व भिकाऱ्यांस कपडेलेत्ते वाटले. सर्वत्र आनंदीआनंद झाला. योग्यवेळी राजास कन्यारत्न प्राप्त झाले. त्या वेळचा तर आनंद वर्णन करणेच अशक्य होते. साऱ्या राज्यात महोत्सव केला. पाच हत्तींवरून गुळखोबरे वाटले. बारशाच्या दिवशी त्या राजकन्येला हिरेमाणकांनी ओवाळले. 'राजसुंदरी' असे तिचे नाव ठेवले.

ती कलेकलेने वाढू लागली. आपल्या गोड गोड बालीश वृत्तीने तिने राजा-राणीला रंजवावे. राजाची मुलगी, त्यांत पहिलीवहिली, जिथे जिथे जावे तिथे तिथे सन्मान व्हावा, तिचे स्वागत व्हावे ह्यात नवल नव्हते. आणि तिचे होत असलेले असे कोडकौतुक पाहून राजाराणीला अपरिमित आनंद होत होता.

होता होता ती मोठी होऊ लागली; नाचूबागडू लागली; सख्या-सोबतिणींबरोबर खेळू लागली. एके दिवशी असाच लंपडाव खेळत असता ती आपल्या मैत्रिणींचा डोळा चुकवून राजमहालात गेली. पण तिला लपायला जागा

कुठेच मिळेना. तिने पुष्कळ जागा पाहिल्या. इकडे तिच्या मागावर तिच्या मैत्रिणी धावत येत असल्याचा आवाज ऐकू आला. इतक्यात तिला ती मोठी समई दिसली. तिच्या डोक्यात कल्पना आली. आपण ह्या समईवरील पंचारतीचे कमळ काढून आत शिरावे आणि वर पुन्हा ते जसेच्या तसे लावून ठेवावे. कोणालाच मुळी कल्पना करता येणार नाही. मग आपल्याला धुंडाळता धुंडाळता सगळ्याजणी थकून जातील. चांगल्याच चकतील त्या. राजसुंदरीने अगदी तसेच केले आणि मग ती कुठेच कुणाला दिसली नाही. मैत्रिणी शोधून शोधून थकल्या व घरोघर निघून गेल्या. मग ती हळूच बाहेर निघाली. पण तिने कुणालाच ती कुठे लपली होती हे काही सांगितले नाही.

होता होता राजसुंदरी उपवर झाली. न्हाणी उटणी इत्यादि अनेक शृंगारसाज व इतर समारंभ तिचे चालूच होते. दासदासींनी तिला दररोज उंची सुवासिक उटण्यांनी व अत्तर-गुलाबांनी तिच्या अंगाची मळी काढावी आणि वर दह्याचे पाणी ओतून ती मळी आणि ते पाणी शेजारच्या न्हाणीजवळ फेकून द्यावे. असे होता होता तिथे एक विचित्र झाड निर्माण झाले. आणि ते उत्तरोत्तर वाढू लागले. त्याच्याजवळून जाणाऱ्या येणाऱ्यास ते आपल्या मोहक सुवासाने गुंगवून टाकी. लवकरच ती गोष्ट राजाच्या कानी गेली. राज्यातील व राजधानीतील अनेक वनस्पतितज्ज्ञ, मांत्रिक, जादुगार व अनेक वृद्ध गृहस्थ त्या झाडाची परीक्षा करू लागले. पण कोणालाच ते झाड ओळखता आले नाही. तेव्हा राजाने जिकडे तिकडे दूर देशात दवंडी पिटविली की, हे झाड कोणी ओळखील त्याच्याशी ही राजकन्या लग्न करील. ही वार्ता ऐकताच दशोदेशीचे राजपुत्र व सरदार आपापल्या इतमामांसह तिथे प्राप्त झाले. परंतु कोणाला ते झाड काही केल्या ओळखता येईना. राजकन्येने हे सारे आपल्या माडीवरून पाहावे. निराश झालेल्या राजपुत्रांची ती चर्या पाहून तिला मोठे हसू येई.

असे होता होता एके दिवशी कुणा एका राजपुत्राने त्या झाडाचे निरीक्षण केले व एक महिन्याची मुदत मागून तो निघून गेला. जाता जाता त्याची व माडीत बसलेल्या राजकन्येची दृष्टादृष्ट झाली. राजकन्येला हा राजबिंडा तरुणा फार

आवडला, आणि आपले लग्न ह्याच्याबरोबरच झाले तर फार बरे होईल असे तिला वाटले. पण राजाचा 'पण' लक्षात येताच तिला वाईट वाटले. न जाणो, एक महिन्यानंतर तरी ह्या राजपुत्रास हे झाड ओळखता येते किंवा नाही? राजपुत्राच्या मनातही ती राजसुंदरी भरली. करीन तर हिच्याशीच लग्न, अशी प्रतिज्ञा करून तो निघून गेला.

मध्यंतरी कितीतरी राजपुत्र येऊन झाड पाहून गेले, पण कोणालाच ते झाड काही केल्या ओळखता आले नाही. एके दिवशी कुठलातरी एक चांभार त्या राजधानीत जोडे विकण्यास आला. तो गावाबाहेरच्या नदीवर फराळ करीत होता. त्याच्या शेजारी राजवाड्यातील दासी आपापसात बोलत कपडे धूत होत्या. त्यांच्या आपसातील बोलण्याकडे त्या चांभाराचे प्रथम लक्षच नव्हते. पण जेव्हा त्या विचित्र झाडाची गोष्ट त्याच्या कानावर पडली तेव्हा तो चौकसबुद्धीने ऐकू लागला. एक दासी दुसऱ्या दासीला सांगत होती. "बाई, आता ही राजकन्या केवढी वाढवून ठेवणार हा राजा, आपण लावीत होतो नाही का त्या मळीचं नि दह्याच्या पाण्याचं, असं मिळून हे 'दहीमळी'चं झाड उत्पन्न झालं ते का कुणाला ओळखता येणार? आणि राजकन्या तर तिकडे लग्नासाठी सारखी झुरत आहे."

चांभाराला हे ऐकून फार आनंद झाला. तो आला तशाच पावली आपल्या गावी परत गेला. त्याचे गाव ते कसले. एक लहानसे खेडे होते ते आणि त्या खेड्यातील चांभारवाड्यात तो एका लहानशा खोपटात दूर एका बाजूला राहात होता. त्याचे मायेचे असे कोणीच जगात नव्हते. त्याने लागलीच गावातल्या सावकाराचे घर गाठले आणि माझे लग्न जुळले आहे असे सांगून त्याच्याकडून काही पैसे उसने घेतले. जुजबी पोषाख तयार केला आणि मोतद्दार मित्राकडून एक घोडा मिळविला. चांभार रूपाने तसा काही मोठा देखणा नव्हता. तरी साधारण चार माणसांसारखा दिसत होता आणि पोषाख केल्यानंतर तर चांगला सरदारासारखा दिसू लागला.

त्याची सर्व जय्यत तयारी झाल्यावर तो घोड्यावर स्वार होऊन

राजधानीकडे निघाला. त्याच्या मनात अनके विचार सारखी गर्दी करू लागले. आपण सांगितले झाड खरेच निघाले व राजाने आपली राजकन्या देऊ केली तर पुढे कसे वागायचे ह्याचा त्याने मनाशी बेत करून ठेवला. योग्यवेळी तो राजधानीत पोचल्यावर राजाने त्याला त्या झाडाजवळ आणले. त्या चांभार तरुणाने त्या झाडाचे बराच वेळ निरीक्षण केले. पाने हुंगली, एक मुळी उकरून काढली, राजवाड्यातून एक सहाण आणविली. एका वाटीत त्या मुळीचा त्याने रस काढला. तो पांढरा शुभ्र दह्यासारखा दिसू लागला आणि पाने चोळताच ती मळीसारखी दुमडली. ते पाहून चांभाराची खात्रीच झाली की, हे दहीमळीचे झाड असावे व दासींनी आपापसात केलेली कुजबूज त्याला आठवली. त्याने थोडेसे स्मित करून राजाला त्या झाडाचे नाव सांगितले. राजा तर प्रथम खो खो करून मोठ्याने हसला; प्रधानाने व तेथे हजर असलेल्या सरदारमानकऱ्यांनी राजाची री ओढली व त्या सरदारास म्हणाले, 'वा! वा! हे कसलं झाड हो?' पण तो चांभार न डगमगता सांगू लागला, "ऐका, राजेसाहेब व सरदार मानकऱ्यांनो, राजकन्या दररोज आंघोळ करण्यापूर्वी अंगाला सुगंधी मळी लावीत होती काय? ती मळी दह्याने व घमघमीत अत्तरानं धुऊन काढीत होती काय? ती मळी इथं ह्याच ठिकाणी तिच्या दासी टाकीत होत्या काय, ह्याची अगोदर चौकशी करावी."

लागलीच राजकन्येकडे चोपदार धावले व चौकशी करून आले. ही गोष्ट खरी असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर चांभारानें, 'आतां तरी खात्री झाली ना?' असे म्हणून समाधानाने पण तितक्याच अभिमानाने राजाकडे पाहिले. राजाला ते पाहून सरदाराच्या अक्कलहुषारीबद्दल खात्री पटली व खूप आनंद झाला. त्याने तिथे हजर असलेल्या सरदारमानकऱ्यांसमक्ष आपली राजकन्या त्या सरदाराला द्यावयाचे जाहीर केले.

राजकन्या माडीवरून हा प्रकार पाहातच होती. तिने त्या सरदाराकडे पाहिले, पण तो तिच्या मनात मुळीच भरला नाही. पण ती काय करणार होती? एकतर राजाने 'पण' जाहीर केला होता तो त्याने जिंकला. त्याला आता राजकन्या न दिली तर त्याची - म्हणजेच आपल्या वडिलांची - सर्वत्र छी: थू:

होणार होती. मुकाट्याने ती आसवे गाळीत तिथून निघून आत गेली.

इकडे राजधानीत राजकन्येचे लग्न ठरल्याचे सर्वत्र जाहीर केले. जोरात तयारी सुरू झाली. त्या सरदाराच्या घरी दुसरे कोणी नव्हते. राजाच्या घरचे लग्न ते! धूमधडाक्याने सोहळा चांगला झाला व पाचव्या दिवशी वरात निघाली. राजाने राजधानीतच राहाण्याचा आग्रह जावयाला केला पण त्याने तो नाकारला. तेव्हा राजाने आपल्या इतमामानुसार त्याची बिदागी करून दिली. सोबत भांडीकुंडी, जुजबी सैन्य आणि आंदणाची म्हणून ती थोरली समई आणि दासदासी दिले. तो चांभार त्या सर्व इतमामासह निघाला. आपण एवढ्या समारंभाने परत गावी गेलो तर आपले खरे स्वरूप ह्या सर्वांच्या लक्षात येईल व त्यामुळे दारुण प्रसंग ओढवेल; आपण खोटे सरदार आहो, असे पाहून कदाचित् हे सैन्य आपला निःपात करील; आणि राजकन्येला परत घेऊन जाईल; अशी भीती त्याला वाटली, म्हणून बरेच अंतर कापल्यावर त्याने एके ठिकाणी मुक्काम केला. ते सैन्य व दासदासी ह्यांना मोठ्या खुबीने त्याने परतविले. आता फक्त राजकन्या आणि तो चांभार ही दोघेच राहिली.

त्या चांभाराने नंतर सामान वगैरेची व्यवस्था करण्यास त्या गावातून गाडीबैल आणले आणि आपल्या गावी तो येऊन पोचला. तेथे येताच राजकन्येला खरा प्रकार कळला. ती आपल्या मनाशी धाय मोकलून खूप रडली. पण आता त्याचा काही उपयोग होणार नव्हता. राजाला ही गोष्ट कळूनही ती अत्यंत शरमेची व कुळाला बट्टा लावणारी असल्याने तिला काहीच उघड करता येणार नव्हते. प्राप्त परिस्थितीला धैर्याने तोंड देण्याचे तिने ठरविले. योग्य संधीची वाट पाहात ती बसली.

आपल्या दुर्दैवानं आपली लग्नगाठ ह्या चांभाराशी पडली. आता आपण भ्रष्ट होऊन आपले जीवन मातीमोल होईल ही कल्पनाच तिला सहन करवेना. पण त्याला काही उपाय नव्हता. आत्मघाताचाही विचार तिच्या मनात आला. पण न जाणो त्यात, आपल्याला यश न आले तर आपली अधिकच गांजणूक होईल, असे तिला वाटले.

त्या चांभाराने सामानाची आवराआवर केली. सायंकाळच्या सोईला व एकदोन दिवसात स्वजातीयास लग्नानिमित्त मेजवानीची व्यवस्था करण्यासाठी त्या राजकन्येला सांगून तो बाहेर पडला. तिला वाटले, आपणाला ही एक योग्य संधी आहे. पण पळून तरी कुठे जाणार? ती कधी राजवाड्याबाहेर मेण्याशिवाय पडली नव्हती. बाहेरचे जग देखील तिला माहीत नव्हते. अशा स्थितीत ती कुठे जाणार? नदी-तळ्या-विहिरीत जीव द्यावा तर नीटशी ठिकाणेही तिला माहीत नव्हती. बराच वेळ विचार करून करून ती थकली. आता अंधार पडू लागला होता. चुलीतल्या विस्तवाच्या साहाय्याने ती जवळील दिवा पेटविणार इतक्यात तिला त्या समईची आठवण झाली. लहानपणी आपण ह्याच समईत लपून बसलो होतो, हेही तिला आठवले तिने एक क्षणभर विचार केला की, ह्या चांडाळाच्या हाती लागण्यापेक्षा ह्या समईतच लपून बसावे म्हणजे त्याला काही कल्पना येणार नाही. शोधून शोधून तो बाहेर शोधावयास निघेल. इतक्यावरही सापडल्यास जशी वेळ येईल तसे वागू अगर वेळ मारून नेऊ असा तिचा बेत ठरला.

तिला ही कल्पना इतकी पसंत पडली की, विलंब न लावता त्या समईत ती जाऊन बसली. योग्य वेळी चांभार त्या झोपडीत परत आला पण तिथे राजकन्या दिसली नाही. शेजारीपाजारी व इतरत्र पुष्कळ शोध केला. पण तिचा काही पत्ता लागेना.

चांभाराला आपला लग्नप्रसंग आठवला. आपण कसल्यातरी वृक्षसंशोधनाच्या आहारी जाऊन ह्या लग्नाच्या फंदात पडलो असे त्याला वाटू लागले. ह्यात खचित काहीतरी जादू असली पाहिजे, नाहीतर माझ्यासारख्या यःकश्चित् चांभाराचे राजकन्येशी लग्न व्हावे ही गोष्ट अशक्यच. राजकन्या तर गेलीच. आपल्यावर आणखी कोणकोणती संकटे येणार देव जाणे. त्यापेक्षा आता आपण बरोबर आणलेल्या ह्या एकच एक वस्तू विकून किंवा नाहीशा करून टाकाव्या व आपले जीवन पूर्ववत चालू होते तसे ठेवावे असा त्याने निर्धार केला. आपल्या कुलदेवतेची त्याने मनोभावाने प्रार्थना केली.

कोपऱ्यातल्या एका लहानशा गाडग्यातील राळ-उदेची बुकणी करून घेतली आणि तोंडाने काही उच्चार करीत ती विस्तवावर सोडली. राजकन्येने ते सगळे काही समईतून ऐकले. तिने आपली ह्या सामानविक्रीमुळे केव्हातरी सुटका होईल असे वाटून समाधानाचा सुस्कारा सोडला. चांभाराचा दररोज एक एक वस्तू विकण्याचा सपाटा सुरू झाला. होता होता समईची वेळ आली. एवढी मोठी समई ह्या लहानशा गावात घेणार कोण? आपल्या राजधानीच्या गावी जावे व तिथेच राजवाड्यात ती विकता आली तर पाहा शिवाय तेथील राजपुत्राला एक किनखापी मखमालीचा जोडा पण द्यावयाचा आहे. एका हिशेबानं दोन्ही कामे होतील, असा विचार करून तो दुसऱ्या दिवशी सकाळी त्या राजपुत्राकडे गेला.

राजपुत्राने तो जोडा आणि ती समई दोन्ही योग्य किंमत करून विकत घेतली. नंतर त्याने ती समई आपल्या महालात नेऊन ठेवली. खरोखरीच त्या महालाला ती शोभण्यालायक होती.

राजपुत्राचे अजून काही लग्न झाले नव्हते. त्याला फक्त आईच होती. तो स्वतःच राज्यकारभार पाहात असे. त्याला शिकारीचा विशेष नाद होता आणि तो वेळी अवेळी शिकारीला निघून जात असे. दास-दासी त्याचे जेवण आणि जेवणानंतरची फळे मिठाई त्याच्या महालात आणून ठेवीत. राजपुत्राने शिकारीवरून आल्यानंतर भोजन करावे व नंतर झोपी जावे, असा त्याचा क्रम होता. असे होता होता त्याच्या नजरेत एक गोष्ट आली की, आपल्या गैरहजेरीत कोणीतरी इथे येऊन काहीतरी वस्तू खाऊन जात असावे. कित्येकदा रात्री ठेवलेले फराळाचे पदार्थ सकाळी उठताच कमी झाल्याचे त्याच्या नजरेस आले. तेव्हा तर त्याला अधिकच विस्मय वाटला. कारण दार बंद असल्यावर बाहेरून आत कोण येईल? आतच महालात कुठे कुणी दडून असावे तर त्या महालांतील कोनान् कोपरा धुंडाळून सुद्धा कोणीही त्याला सापडले नाही. काही जादू वगैरे तर नाही ना? अशी त्याला शंकाही आली. पण तो तसा चिकित्सक असल्याने त्याचा त्यावर विश्वास बसेना.

अजून वारंवार तसेच व्हावयास लागल्याने तो अगदी बेचैन झाला. सारी रात्र झोपेचे सोंग घेऊन जागून काढण्याचे त्याने ठरवले आणि आपल्या पलंगावर स्वस्थपणे तो पडून राहिला. ऐन मध्यरात्रीच्या सुमारास कोपऱ्यातील त्या समईचे कमळ आपोआप वर आले आणि त्यातून एक सुस्वरूप तरुणी इकडेतिकडे पाहात व कानोसा घेत पलंगाजवळ आली. राजपुत्र घोर निद्रेत असल्याची तिची खात्री झाली. पण नंतर जेथे फलाहारादि पदार्थ ठेवले होते तेथे ती गेली. त्यावर तिने यथेच्छ ताव मारला. उशाशेजारी मेजावर ठेवलेल्या तांब्यातील पाणी पिऊन ती परत त्या समईत जाऊन बसली.

राजपुत्र झोपेचे सोंग करून हे सर्व पाहात होता. त्याने त्या सुस्वरूप तरुणीस चांगले न्याहाळले. त्याला एकदम आठवण झाली की, आपण एकदा एका राजाकडे एक विचित्र झाड पाहण्यास गेलो असता परत येतांना माडीवर राजकन्या पाहिली तीच ही असावी. जिच्यासाठी आपण अहोरात्र झुरत आहो तीच अनायासे आपणाला अशा रीतीने लाभत आहे, ह्याचा त्याला अत्यंत आनंद झाला. उद्या रात्री फिरून ह्याची नक्की खात्री करून घ्यावी असे त्याने ठरविले आणि नंतर तो स्वस्थपणे झोपी गेला.

दुसऱ्या रात्री फिरून राजपुत्र झोपेचे सोंग करून पलंगावर पडला असताना राजकन्या त्या समईबाहेर आली. राजपुत्र झोपेत असल्याची खात्री करून फलाहार करण्यास बसली. ती पाठमोरी बसलेली होती. ही संधी बरी आहे असे पाहून तो हळूच पलंगावरून उठला आणि त्याने तिला पकडले. राजकन्येने कसलीही आरडाओरड केली नाही. तिने शांतपणे त्या राजपुत्राला हकिगत सांगितली. समईतून ह्या राजमहालात ती आली; पहिल्या रात्री राजपुत्राचे स्वरूप तिच्या दृष्टीस पडले त्याच वेळी तिला मनस्वी आनंद होऊन तिने ईश्वराचे आभार मानले. आता कसलेही संकट न येता आपणाला ह्या महालातच राहायला मिळावं म्हणून वारंवार त्या प्रभुरायाची विनवणी केली, ही माहिती तिने सांगितल्यावर राजपुत्रालाही अत्यंत आनंद झाला. त्याने तिला अभय दिले व ती राजकन्या पूर्ववत त्या समईत लपली. दुसऱ्या दिवशी राजपुत्राने आपल्या

आईला सांगितले की, आपणाला काही अनुरूप अशी बायको मिळत नाही आणि आता ह्यापुढे अविवाहित राहाण्याची इच्छा नाही. तेव्हा नुकतीच जी समई घेतली आहे तिच्याशी मी लग्न लावणार आहे!

राजपुत्राचे हे शब्द ऐकून राजमातेला तर हसूच लोटले. याला वेड तर लागले नाही, अशी तिला शंका आली. जवळच बसलेल्या प्रधानजीलाही राजपुत्राचा हा हट्ट ऐकून अत्यंत आश्चर्य वाटले. पण राजपुत्र आपल्या हट्टापासून यत्किंचितही परावृत्त झाला नाही. उलट प्रधानजीला लग्नसोहळ्याची जय्यत तयारी करावयास त्याने फर्माविले.

"राजपुत्राचं समईशी लग्न" ह्या वार्तेमुळे सगळ्यांना आश्चर्य वाटले. देशोदेशीच्या राजांना लग्नानिमित्त बोलविले होते. खुद्द राजकन्येच्या वडिलांसही खास दूताकरवी निमंत्रण दिले. पांच दिवस यथाविधि तो लग्नसोहळा झाला. वरातीच्या वेळी लग्नमंडपांत सारी मंडळी बसली होती. वराच्या कडेवर वधू बसवण्याचा तो प्रसंग आता व्हायचा होता. कोणीतरी उपहासाने उद्‌गारले, "घ्या आतां समई कडेवर"

राजपुत्राने तितक्याच तडफेने उत्तर दिले, "हो हो, घेतोच की," आणि त्याने हलक्या हाताने त्या समईवरचे कमळ दूर केले. इतक्यात समईमधून एक सुंदर राजकन्या पुष्पहार घेऊन बाहेर पडली. तिने तो पुष्पहार राजपुत्राच्या गळ्यात घातला आणि राजपुत्राने तिला अलगद उचलून कडेवर घेतले.

वाजंत्र्यांचा आणि टाळ्यांचा एकदम कडकडाट झाला. आणि त्या निनादांत राजपुत्राचे राजकन्येशी खरे शुभमंगल झाले. त्यांनी जसे राज्य केले, तसे आपण करावे.

आमची कहाणी संपली.

(विनायक वासुदेव जोशी : चंद्रपुरी लोककथा)

# ७.१० मृदुंग आणि सारंग

(चंद्रपुरी लोककथा)

आटपाट नगर होते. तिथे एक राजा राज्य करीत होता. फार दिवसांनी नवससायासांनी त्याला दोन मुले (जुळी) झाली. मोठ्या आवडीने त्याने एकाचे मृदंग आणि दुसऱ्याचे सारंग अशी नावे ठेवली. ती दोन्ही जुळी असली तरी त्यात सारंग छोटा दिसायचा. राजाच्या घरची ती मुले. तिथे उणीव कशाची? राजा तसा मोठा कडक व धोरणी होता. पण थोडा लहरी स्वभावाचा छांदिष्टच म्हणाना; त्याने एकदा काही म्हटले की, अगदी तसे व्हायलाच हवे आणि तसे न झाले की तो आकांडतांडव करायचा, गुन्हेगारांना कडक शिक्षा करायचा.

मृदंग आणि सारंग दोघे आता मोठे झाले होते. मृगया-शिकार खेळण्यात मोठे तरबेज. विशेष बुद्धि, धोरण, समयसूचकता सारंगमध्ये दिसून यायची आणि मृदंग अगदी त्याच्या कलाने घ्यायचा.

एकदा काय झाले राजा आपल्या राजधानीतून फेरफटका करीत असता त्याच्या दृष्टीला अनेक फुकट्या साधूंचा, भिकाऱ्यांचा रयतेस होणारा त्रास नजरेस पडला. धर्म न द्यावा तर पाप घडते. पण कुणा कुणाला व किती द्यावा ? ऐपतीपेक्षा दानधर्मच जास्त व्हायचा. त्यातल्यात्यात अपंग आंधळ्यांची गोष्ट वेगळी. चांगले धष्टपुष्ट व श्रम करण्यास योग्य असे कित्येक भिक्षा मागून पोट भरीत. निव्वळ रयतेलाच त्रास होत होता असे नव्हे तर राजवाड्याच्या कोठारांतून अशा धडधाकट भिकाऱ्यांना निरर्थक 'धर्म' द्यावा लागे. अगदी ह्या क्षणापासून भिकाऱ्यास धर्म करण्याची, दान देण्याची बंदी करण्याचे राजाने ठरवले ! जो ही आज्ञा पाळणार नाही, त्यास फाशीची शिक्षा. राजाचा हुकूम तो; जिकडे तिकडे दवंडी पिटली. आणि कडक बंदोबस्त ठेवला. अशा स्थितीत दोन अनोळखी व परगावचे साधू राजधानीत भिक्षा मागण्यास आले. नगरसंरक्षकांच्या नजरेस ही गोष्ट येताच त्याने त्या दोन्ही साधूंना आपल्या

शिपायांकरवी दूर अरण्यापर्यंत हाकून लावले. आधीच भुकेने व्याकूळ झालेले ते साधू आणि आता पुढे त्यांना गहन अरण्य लागणार होते. पण ते काय करणार बिचारे? कसेबसे त्या अरण्याबाहेर पडणे त्यांना भागच होते. ते चालून चालून थकून गेले व विश्रांतीसाठी एका विशाल वृक्षाच्या सावलीत बसले. इतक्यात त्याच्या कानावर घोड्यांच्या पावलांचा 'टाप टाप' आवाज पडला; त्यामुळे तर ते अधिकच घाबरून गेले; न जाणो राजाने आपणांस सैनिकांकडून पकडून आणून काही मोठी शिक्षा द्यावयाचे ठरविले असेल. कसल्यातरी आडोशाच्या आश्रयार्थ जावे ह्या विचारात असतानाच ते दोन घोडेस्वार त्यांच्या पुढे दत्त म्हणून उभे राहिले. त्यांनी त्या साधूची चौकशी केली व त्यांची ती स्थिति पाहून त्यांना दया आली. पोषाखावरून दोघे घोडेस्वार राजबिंडे दिसत होते. राजतेज तोंडावर नुसते झळाळत होते. त्यांच्या हातातील व खांद्यावरील आयुधावरून ते नुकतेच मृगया करून परतले असावेत, असा भास होत होता. त्यापैकी लहान दिसणाराने आपल्या हातातील एक सुंदर रत्नजडित अंगठी एका साधूला प्रदान केली. त्याचे अनुकरण म्हणून दुसऱ्याने आपल्या गळ्यातील पाणीदार मोत्याचा कंठा दुसऱ्या साधूला दिला. दोन्हीही साधूंना परम संतोष झाला आणि त्यानी अंतःकरणपूर्वक त्या राजबिंड्या तरुण शिकाऱ्यांना शुभाशीर्वाद दिले. ते राजबिंडे तरुण दुसरे कोणी नसून मृदंग व सारंग होते. क्षणार्धात ते घोड्यांचा टापटाप आवाज करीत पुढे शिकारीस निघून गेले. राजा आपण दिलेल्या आज्ञेचे आपल्या राज्यात पालन होत आहे किंवा कसे ह्याचे निरीक्षण करण्यास वेषांतर करून बाहेर पडला. फिरता फिरता त्याला एका धर्मशाळेत दोन साधू स्वयंपाकपाण्याच्या तयारीत असले दिसले. राज्यातील साऱ्या धर्मशाळा ओस पडल्या असताना व रस्त्यातून एकही भिकारी फिरकत नसताना ह्याच धर्मशाळेत दोन साधू कसे ह्याचे राजाला नवल वाटले व आपला हुकूम योग्य तऱ्हेने पाळला गेला नाही ह्याचा त्याला अत्यंत राग आला. त्याने ह्या प्रकरणाची कसून चौकशी केली. त्याला चौकशीत साधूंना भिक्षा देणारे खरे गुन्हेगार कोण हे कळून चुकले. खुद्द दोन्हीही राजपुत्र ह्या बाबतीत गुन्हेगार ठरले. राजा अत्यंत

कडक न्यायी होता; तरी राजपुत्रांना फाशीची अगर तत्सम शिक्षा देणे राजाला अवघड वाटले. त्याने प्रधानाला राजदरबारांत बोलावून ह्याबाबत सल्ला घेतला; प्रधान फार चतुर होता. त्याने सर्व जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेण्याचे पत्करले. शिकारीच्या निमित्ताने राजपुत्रांना दूर गहन अरण्यांत नेऊन राजाचा हुकूम कळविला व त्यांना हद्दपार केले आणि साऱ्या राज्यात राजाच्या न्यायीपणाबद्दल विश्वास निर्माण केला. मृदंग आणि सारंग दोघेही राजपुत्र त्या गहन अरण्यातून आपला मार्ग काढीत होते; जाता जाता त्यांना ते गहन अरण्य संपून एक थोरली नदी लागली आणि पलीकडील काठावर एक सुंदर नगर वसलेले दिसले.

विश्रांतीसाठी ते नदीवर उतरले. ज्या वृक्षाखाली ते उतरले तेथे कोकीळ आणि मैना आपापसांत बोलत होती. ह्या झाडाच्या दक्षिणेस एक योजनावर कदंबाचा एक थोरला वृक्ष आहे. त्या वृक्षाच्या ढोलीत सात फणांचा एक नाग राहत आहे. त्याच्या सातही फणा जो छेदील त्याला सुंदर व मौल्यवान हिरे-माणके मिळतील व त्याचे भाग्य उजळेल.

सारंगला पशुपक्ष्यांची भाषा येत होती. त्याला ते कोकीळ-मैनेचे भाषण ऐकून आश्चर्य वाटले व उत्सुकताही वाटली. मृदंगाला त्याने ती हकिगत मोठ्या कौशल्याने सांगितली व दक्षिण दिशेला ते दोघेही निघाले. कोकिळेने सांगितल्याप्रमाणे त्यांना समोरच कदंबवृक्ष दिसला. त्याला ढोल असलेली पण त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आली. मोठ्या सावधगिरीने त्यांनी त्या ढोलीचे निरीक्षण केले. त्यात त्यांना तो सात फणांचा नाग मोठ्या जागरूकपणे वेटाळे करून बसलेला दिसला. सारंग व मृदंग दोघेही त्याला पाठमोरे असल्याने व ते कसलीही चाहूल न लागू देण्याविषयी दक्षता बाळगीत असल्याने नागाच्या दृष्टीस ते पडले नव्हते. ही संधी फार चांगली आहे असे पाहून, त्यांनी आधीच आपल्या म्यानातून काढून हाती परजीत ठेवलेल्या तरवारी वर करून सातही शिरे सपासप कापून काढली. त्याबरोबर धबधब पाऊस पडावा त्याप्रमाणे त्या शिरांतून हिरे-माणके पडू लागली आणि त्यांचा मोठा ढीग तयार झाला. सारंगानं

त्याचे दोन भाग केले आणि अर्धा भाग स्वतः घेऊन अर्धा त्याने मृदंगाला दिला व आपल्या पूर्वस्थळी दोघे येऊन पुढील मार्गास लागले.

नदी उतरून ते त्या सुंदर नगरात प्रवेश करते झाले. एका चौकात ते दोघेही घोडेस्वार येताच समोरून अत्यंत वेगाने एक रथ दौडत आला व क्षणार्धात तो पुढे पसार झाला. बहुधा तो तेथील राजाचा असावा अशी त्या घोडेस्वारांनी कल्पना केली. पण ह्या आकस्मिक घटनेने त्या घोडेस्वारांचे घोडे उधळले आणि ते दोघे दोन दिशांना लागले. सायंकाळपर्यंत सारंगाने मृदंगाचा व मृदंगाने सारंगाचा शोध केला. पण परस्परांची भेट झाली नाही. उलट सारंगाला चुकीनेच कोणी एक घोडेस्वार पुढील नगराकडे गेल्याचे सांगितले, त्यामुळे तो तिकडे वळला.

मृदंग आता अगदी थकून गेला होता. चौकशीअंती गावात एक धर्मशाळा असल्याचे त्याला कळले. तिकडे त्याने आपला घोडा वळविला; तेथील एकंदर व्यवस्था पाहून त्याने रात्री तेथेच मुक्काम करण्याचे ठरविले. आता आपणांस सारंग कसा व केव्हा भेटेल, ह्या चिंतेत त्याला रात्रभर झोप लागली नाही.

रात्री शिधापाणी, भोजनाची व्यवस्था करताना त्याला असे कळले की ह्या सुंदर नगरीच्या राजाला एक अप्रतिम व लावण्यवती उपवर कन्या असून तिला अत्यंत मौल्यवान हिरे-माणके आणून देणाऱ्यास ती माळ घालील. मृदंगाला वाटले अनायासे आपणास हिरे-माणके मिळालेलीच आहेत. त्यापैकी आपण काही राजकन्येला नेऊन दाखवावीत. तिला ती पसंत पडली तर ती लग्नाला तयार होईल आणि त्यामुळे तिची अनायासे भेट होईल. त्याने कुणाला न कळत घोड्यावरील जिनाच्या आत दडवून ठेवलेल्या हिऱ्यामाणकांतून काही उत्कृष्ट हिरे-माणके काढली आणि राजवाड्यात वर्दी देऊन राजासमक्ष ती राजकन्येला दाखविली. राजकन्येला ती इतकी पसंत पडली की ती ताबडतोब लग्नाला तयार झाली.

राजपुत्र मृदंग जेव्हा हिरे-माणके दाखवून परत आला त्या वेळी त्याच्याबरोबर प्रधानास खास राजाने पाठविले होते. कारण राजकन्येने

त्याच्याबरोबर लग्न करण्याची कबुली दिल्यामुळे त्याची त्याच्या इतमामाप्रमाणे निराळी व्यवस्था करणे प्राप्त होते. राजपुत्राने तूर्त तरी आपणास कोणीच नाही, असेच देशोदेशी हिंडत फिरत असतो, हे सांगितले होते. प्रधान राजाच्या हुकुमावरून त्याला त्याचा घोड्यासह एका स्वतंत्र महालात घेऊन जाण्याकरिता सोबत आलेला होता. दोघे धर्मशाळेत आले. तेथे येऊन पोचताच राजपुत्राने तबेल्याकडे पाहिले तो घोडा ठाण्यावर नाही. सामान व जीन जेथे गुंडाळून ठेवली होती तीही नाहीत. राजपुत्र एकदम कावरा बावरा झाला. त्याने आपला घोडा व सामान कोणीतरी घेऊन फरारी झाल्याचे प्रधानाला सांगितले.

प्रधानाने ताबडतोब सेनापतीला हुकूम देऊन शोधार्थ चोहीकडे सैनिक पाठविले. काही गुप्त हेर पण मदतीला दिले. राजपुत्र मृदंगाने जरी राजवाड्यात जाण्यापूर्वी मोठ्या सावधगिरीने जिनामधून ती हिरे-माणके काढलीत तरी पण एका चोराने ते कृत्य पाहिले होते. (धर्मशाळेसारख्या ठिकाणी बहुधा असे चोर नेहमी वावरत असतात.) त्यानेच तो घोडा आणि ते सामान पळविले होते.

बराच प्रयत्न करूनही मृदंगाचा घोडा, जीन व सामान ह्यांचा पत्ता लागला नाही. मृदंगाला अत्यंत वाईट वाटले, सारंगाचाही कुठे पत्ता नव्हता.

पण इकडे राजधानीत केवढा महोत्सव चालू होता. 'एवढ्याशा घोड्याचे काय' असेच राजाला व राजकन्येला वाटले. हिरे-माणके तर राजकन्येला फार आवडली होतीच पण प्रत्यक्षात तिने मृदंगाला पाहिल्यानंतर तो तिला फारच आवडला होता.

धूमधडाक्याने पाच न पाच दिवस लग्न झाले. नव्या महालात राजपुत्र मृदंग व राजकन्या राहू लागली. वरून जरी मृदंग आनंदी असल्याचे दाखवीत होता तरी त्याची व सारंगाची चुकामूक झाल्यावेळेपासून तो मनांतून अत्यंत उदास होता. पण आपणास ह्या जगात दुसरे कोणीच नाही असे प्रथम सांगून चुकल्यामुळे, त्याला त्यासंबंधी काही बोलता येत नव्हते.

इकडे सारंग जो निघाला तो दुसऱ्या अशा एका राज्यात शिरला की तेथे घनघोर युद्ध चालू होते व तेथील राजाचा आता पराभव होणार अशी त्याला चिन्हे दिसू लागली.

सारंग जसा शिकार करण्यात तरबेज तसाच तरवार चालविण्यातही मोठा पटाईत. त्याने एकंदर रणक्षेत्राचे अवलोकन केले आणि त्याच सैनिकांतील काही निवडक सैनिक घेऊन अशा शिताफीने लढाई जिंकली की, त्याची सर्वत्र वाहवा झाली. पराभव होऊन अटकेत जाऊ पाहाणारा राजा जेव्हा त्याने परत मिळवून राजधानीस आणला, तेव्हाच त्याच्या पराक्रमाने मोहित होऊन त्याने आपली सुंदर व सुस्वरूप कन्या देण्याचे मनाशी ठरविले. त्याची स्वतंत्र महालात व्यवस्था करून मोठा राजदरबार भरविला व तेथे त्याचा गौरव करून आपली मनातील गोष्ट उघड केली.

लवकरच एका शुभमुहूर्तावर सारंगाचे त्या राजाच्या कन्येशी लग्न मोठ्या समारंभाने झाले. लग्नप्रसंगी सारंगाने ती सर्व हिरे-माणिके आपल्या नूतन वधूस प्रदान केली. त्यामुळे तर ती आणि तिचे वडील अत्यंत खूष झाले. तो पण मृदंगाप्रमाणे वरून आनंदी दिसत असला तरी मनातून अत्यंत उदास होता व मृदंगाचा कसा पत्ता काढावा, ह्या विवंचनेत होता.

एके दिवशी तो असाच राजदरबारात बसला असता राजधानीतील प्रख्यात सुवर्णकार (जो नेहमी राजाच्या घरचे दागदागिने तयार करीत असे) तेथे आला. राजेसाहेब काही कामाकरिता परगावी गेले होते व त्यांच्या पश्चात राजेसाहेबांना एकुलत्या एक कन्येशिवाय अपत्य नसल्याने सारंगालाच काम पाहाण्यास सांगितले होते. सुवर्णकाराने अदबीने सारंगाला नमस्कार केला व सांगितले की त्याच्या दुकानात कोणीतरी एक श्रीमंत गृहस्थ आला आहे आणि त्याच्याजवळ सुंदर सुंदर हिरे-माणिके आहेत. त्याला पैशाची नड असल्यामुळे त्यापैकी काही हिरे-माणिके विकावयास काढली आहेत. पण कदाचित् तो माणूस खरा श्रीमंत नसून त्याने कुठं तरी ही हिरे-माणके चोरली असावी,व ह्या नवख्या ठिकाणीं खपवावयास आणलीं असावीं असा संशय व्यक्त केला.

ती हिरे-माणके पाहिल्यानंतर सारंगाला आठवले की तिथली हिरे-माणके आहेत. जी आपण मृदंगाला दिली होती, व तो श्रीमंत गृहस्थही मृदंगच असावा अशी त्याला शंका आली. त्याने अधीरतेने सुवर्णकाराजवळ त्या अनोळखी माणसाची चौकशी केली व त्वरेने सुवर्णकाराबरोबरच त्याच्या घरी गेला. तेथे तो

श्रीमंत गृहस्थ बसलाच होता. पण तो मृदंग नव्हे हे पाहून सारंगाला दुसरी एक शंका आली. कदाचित् ह्याच माणसाला मृदंगाची व आपली चुकामुक झाल्यानंतर तो (मृदंग) सांपडलेला असावा व त्याने त्याच्याजवळून त्या मौल्यवान वस्तू हिसकावून घेऊन वाटेला लावले असावे.

मोठ्या कौशल्याने त्याने त्या नवागत श्रीमंताशी संगनमत करून खरी हकिगत काढून घेतली. त्याच्याबरोबर निवासस्थानी गेला. तेथे मृदंगाचा घोडाही आढळला. तो पाहून हा कोणी तरी चांगला अट्टल चोर असावा ह्याविषयी सारंगाची खात्रीच झाली. त्याने त्यांपैकी काही हिरे-माणके स्वतः विकत घेण्याची बतावणी करून व राजवाड्यातील कोषाध्यक्षांकडून पैसे देण्याची व्यवस्था करीत असल्याचे सांगून राजवाड्यात आणले तेथे आणल्यावर त्याला गिरफ्तार केले आणि त्याचा अत्यंत छळ करून त्याच्या तोंडून खरी माहिती वदविली. शेवटी तो मृदंगाचा घोडा आणि ती धर्मशाळेत चोरलेली हिरे-माणके घेऊन पळणारा चोर निघाला पण त्यामुळे मृदंगाचा त्याला अनायासे पत्ता लागला.

सारंगाने नंतर मोठ्या कौशल्याने व त्या चोराच्या मध्यस्थीने मृदंगाची भेट घेतली आणि नंतर दोघे मोठ्या इतमानाने आपापल्या राण्यांसह आपल्या वडिलांच्या गावी गेले. आधी गुप्त रीतीने प्रधानची भेट घेतली. पुत्रविरहाने राजा अगदी खंगून गेला होता आणि राजपुत्रांसाठी प्रजा अगदी उत्सुक होती. शेवटी मोठा राज्यारोहणसमारंभ होऊन त्या दोघा राजपुत्रांस राज्याभिषेक करण्यात आला. राज्यात सर्वत्र आनंदी आनंद झाला. सारग आणि मृदंग ह्यांच्या सासऱ्यांना सुद्धा गादीस वारस असा मुलगा नसल्याने त्यांनी स्वेच्छेने आपल्या राज्यातला मोठा भाग आपल्या त्या जावयास प्रदान केला. त्या सर्वांनी नंतर सुखाने राज्य केले. त्यांनी जसे दीर्घकाल सुख भोगले तसे तुम्ही भोगा.

(विनायक वासुदेव जोशी : चंद्रपुरी लोककथा)

# ७.११ भविष्यवादी नंदादीप

(चंद्रपुरी लोककथा)

आटपाट नगर होते. तिथे एक राजा राज्य करीत होता. त्याला एक राणी होती. अति सुंदर व रेखीव बांध्याची, पण अत्यंत नाजूक. त्यामुळे राजाला तिला अत्यंत जपावे लागे. राजाचा तिजवर जिवापलीकडे लोभ होता.

दिवसांमागून दिवस जात होते. एकदा काय झाले? राजा रात्रीचे भोजन करून शतपावली करीत होता. दासदासींनी राणीची शय्या सायंकाळीच तयार करून ठेवली होती. राणी जेवण संपवून झोपायला शय्यागृहात शिरली. आजची शय्या तिला काही विशेष सुंदर वाटली. ती पाहून तिला अत्यंत आनंद झाला. त्या आनंदाच्या भरात तिने अंग आडवे करताच तिला किंचित रूतल्यासारखे झाले आणि तेवढ्याशा हलक्या स्पर्शानेही तिला मूर्च्छा आली. ती धाडकन् मंचकावरून खाली पडली.

बाहेर शतपावली करीत असलेल्या राजाला काहीतरी पडल्याचा आवाज ऐकू आला म्हणून तो धावतच आत गेला. तेथे जाऊन पाहातो तो काय, त्याची अत्यंत लाडकी राणी मूर्च्छा येऊन पडलेली. राजा ते दृश्य पाहून घाबरून गेला आणि त्याने तिला अलगद उचलून पुन्हा शय्येवर झोपविले; पण राणीने तशाही स्थितीत तिथे झोपण्यास नकार दिला व खुणेने जवळच लागून असलेल्या राणीमहालात झोपण्याची आपली इच्छा दर्शविली. ती आणखी बोलण्याच्या मनस्थितीत नव्हती. राजा तिच्या खुणांवरून काय ते उमगला व त्याने तिला तेथे नेऊन थोपटून झोपविले.

राजाला नेहमीच्या सवयीप्रमाणे माहीत होते, की तिला किंचितही दगदग झाली, की अशी मूर्च्छा येते आणि नंतर तिला स्वतंत्ररित्या राणीमहालात झोपवावे लागते. चांगली शांत व गाढ झोप झाली की, दुसऱ्या दिवशी राणीला बरे

वाटते.

राणीचा डोळा लागला हे पाहून राजा आपल्या महालात आला आणि त्या पुष्पशय्येकडे बारकाईने पाहात राणीच्या मूर्च्छाचे कारण शोधू लागला. परंतु त्याला तेथे काहीच वावगे आढळले नाही. सुगंधी अत्तरमिश्रित नंदादीपाच्या मंदमंद प्रकाशात ती पुष्पशय्या फारच खुलून दिसत होती. राजाला पण तिचा मोह पडला. त्या सबंध महालात त्याला सर्व काही रोजच्या प्रमाणे सुव्यवस्थित व सुसज असेच दिसले. पुष्पशय्येत काही कृमी-कीटक तर नाहीत ना, म्हणून त्याने नंदादीपाचा प्रकाश अधिक करून प्रत्येक फूल न् फूल निरखून पाहिले. राजाला मोठे आश्चर्य वाटले.

त्याचा तो सचिंत चेहरा व राणीच्या मूर्च्छेचा तो प्रकार पाहून नंदादीप मनुष्यासारखा बोलू लागला, "हे राजन्, तुझी राणी अत्यंत नाजूक खरी. आजच्या पुष्पशय्येत चुकून एक पुष्पकळी आलेली आहे, पण तेवढी कठोरतासुद्धा तिला झोपतांना सहन झाली नाही! आणि राणी लागलीच मूर्च्छित पडली. अशा राणीच्या नशिबात आता आठ दिवसानंतर-येत्या कृष्णप्रतिपदेनंतर -मोलमजुरीचे - विटा, चुना, दगड, माती उचलण्याचे - काम लिहिलेले आहे. कसे झेपणार ते तिला; अन् राजा तुझे तरी नंतर कसे होणार!"

ते भाषण ऐकून राजाच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. पिढ्यान्-पिढ्या उभ्या असलेल्या ह्या राजवाड्यात अनेक छोट्या मोठ्या घटना आणि क्रान्त्या घडल्या असतील, पण आजच्यासारख्या विलक्षण प्रकार कधीच घडलेला नव्हता. निर्जीव नंदादीपाला वाचा फुटावी आणि त्याने भविष्य वर्तवावे ही किती विलक्षण घटना आहे! तो आपल्या मनाशीच उद्गारला, "छे छे! असे कधीच होणे शक्य नाही." नंतर तो काहीशा निश्चयी पण करड्या आवाजात म्हणाला, "मी तसे होऊ देणार नाही! माझ्यासारख्या एवढ्यामोठ्या कीर्तिमान, शूर, पराक्रमी राजाची ती राणी, कोमलपुष्पातील एका सामान्य कळीची कठिणता जिला सहन झाली नाही, तिला विटा, चुना, दगड उचलण्याचे काम करावे लागेल! छे! अगदीच काहीतरी !"

सभोवती सर्व काही शांत निःस्तब्ध होते, पण नुकत्याच घडलेल्या एकंदर प्रकारामुळे ती शांतता भयाण भासू लागली होती.

राजा रागाच्या भरात निश्चयी, करारी आणि कडक भाषेत काहीही बोलून चुकला तरी त्याला नंदादीपाने वर्तविलेले भविष्य टाळता येणे शक्य नव्हते.

राजा अस्वस्थ झाला व महालात अगदी बेचैन स्थितीत इकडे तिकडे येरझारा घालू लागला. उत्तरादाखल नंदादीप विकट हास्य करीत आहे असा त्याला भास होऊ लागला.

सारी रात्र राजाला झोप आली नाही. एक मन त्या नंदादीपाच्या भविष्यवाणीविषयी विचार करू लागे आणि त्याचे दृश्य राजाच्या दृष्टीसमोर दिसताच तो हताशपणे आपले डोळे घट्ट झाकून घेई.

दुसरे मन त्याला धीर देऊ लागे, "छट्, असल्या भविष्यवाणीवर कसला विश्वास ठेवायचा! आपली ऐकण्यात काहीतरी चूक झाली असावी; कदाचित् तो स्वप्नमय भास असावा." अशा ह्या मनाच्या द्विधा स्थितीत त्याची सारी रात्र उलटून गेली व बाहेर चांगले फट्ट उजाडले.

राजा आपल्या मनातील विचार दूर सारण्याचा नाना परीने प्रयत्न करीत होता; पण कशालाही न जुमानता ते विचार त्याच्या मनात आलटून पालटून थैमान घालीत होते. नंदादीपाच्या भविष्यवाणीनुसार, उद्या आपली अत्यंत प्रिय व कोमल अशी राणी दगडविटा-चुन्याचे मोलमजुरीचे काम करावयास लागली आणि ते आपल्या प्रजाजनांपैकी कुणी पाहिले तर केवढी नामुष्कीची गोष्ट! ही गोष्ट कोणाकडे बोलावी हेसुद्धा राजाच्या मानी आणि करारी स्वभावाला पटेना व त्याच्या मते ह्या बाबतीत कुणी योग्य सल्ला देईल असे त्याचे मन त्याला सांगेना.

ज्योतिष्यांना बोलावून खरे भविष्य वर्तविण्यास सांगावे व त्यांनाही हेच सांगण्याची पाळी आली, तर स्वतःच्या जिवावर बेतायची म्हणून ते माझ्या समाधानासाठी काही खोटेच सांगावयाचे. प्रधानालाही अशी नामुष्कीची गोष्ट सांगायला त्याचे मन घेईना. तो आपल्या मनाशीच काही निश्चय ठरवू लागला व

शक्यतोवर आपल्या विचारांचा व आचारांचा कुणास थांग लागू नये म्हणून चेहरा निर्विकार ठेवीत रोजच्या कामात मग्न झाला.

हां हां म्हणता कृष्णप्रतिपदा येऊन ठेपली. राजाला त्या नंदादीपाचे भविष्य अत्यत भेडसावू लागले आणि आता अगदी दोनच दिवसानंतर ते प्रत्यक्षात उतरणार होते. रात्री महालात प्रवेश करताना त्याला त्या नंदादीपाकडे बघवेनासुद्धा! इतकी धास्ती त्याच्या मनाने घेतली आणि कितीही झाले तरी त्याच्या आंतरिक बेचैनीमुळे त्याची वागणूक काहीशी विचित्र बनत चालली. राणीच्या लक्षात आल्यावाचून ते राहिले नाही तिने एकदा दोनदा छेडूनही पाहिले; पण त्याने ती गोष्ट वाऱ्यावर उडवावी त्याप्रमाणे उडवून लावली व स्वतःच्या आणि राणीच्या दोघांच्याही मनाच्या समाधानासाठी निराळ्याच गोष्टीत मन गुंतविले.

पण आज राजाची ती बेचैनी राणीला जाणवल्यावाचून राहिली नाही. ती अगदी मनातले खरेखरे सांगा, असा हट्टच धरून बसली. राजाचा आता निश्चयही झालेला होता. त्याने त्याप्रमाणे गुप्त व्यवस्थाही करून ठेवली होती. तेव्हा राणीला सांगावयास आता काही हरकत नाही, असे त्याने मनाशी ठरविले. मोठ्या उत्साहाने तिला जवळ घेऊन तो म्हणाला, “माझ्या मनात बरेच दिवसांपासून समुद्रावर दोघेही मिळून जलविहार करण्याचा विचार घोळत आहे. आपण दोन वेगवेगळ्या नावा घेऊ आणि मनसोक्त विहार करू. पण समुद्राची लहर, पाण्याशी प्रसंग. नावाडी कितीही निष्णात घेतले तरी एखादवेळी.”

पण राणीने राजाला पुढे बोलूच दिले नाही. उलट अत्यंत उल्हासाने ती म्हणाली, “खरंच, आपण समुद्रावर जाऊ. ह्या महालाच्या आणि भिंतीच्या आत राहून राहून मला अगदी कंटाळल्यासारखे झाले आहे. आपण आजच सायंकाळचा बेत ठरवू या.”

राणीचे हे भाषण ऐकून राजाला मनातून फार आनंद झाला आणि आता आपण योजल्याप्रमाणे अनायासे सर्व काही घडून येईल. ह्या आयुष्यात

आपणास राणीला मुकावे लागेल, ह्याचा त्याला अत्यंत विषाद वाटला; पण त्यापेक्षाही राजप्रतिष्ठेला धक्का देणारी नंदादीपाची भविष्यवाणी आणि त्याप्रमाणे घडणाऱ्या घटना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहाणे हे अपमानाचे व नामुष्कीचे होईल. पण त्या घटना घडून येणे अगदीच अशक्य व्हावे ह्यासाठी त्याने मनाशी एक योजना आखली होती. ती यशस्वीपणे पार पडल्यावर नंदादीपाला, मोठमोठ्याने विकट हास्य करून, तो जाब विचारणार होता.

राणी आज अत्यंत प्रसन्न चित्ताने वावरत होती. तिने स्वतःला उंची अत्तरे, सुवासिक तेले आणि उटणी लावून स्नान आटोपून घेतले होते. दुपारी राजासह तिने पंचपक्वान्नाचे भोजन केले व तांबूल सेवन करून त्याच्यासह ती मंचकावर पहुडली.

दासदासीकरवी हां हां म्हणता राजधानीत आज राजा-राणी समुद्र स्नानास जाणार असल्याची बातमी पसरली. कित्येक लोक राजरस्त्यावर आगाऊच दुतर्फा रांगेने येऊन उभे राहिले आणि श्रृंगारलेल्या रथांतून राजाराणी आपल्या संपूर्ण वैभवानिशी जात असता अभिवादन करते झाले.

राजा-राणी दोघेही समुद्रावर आली, तेव्हा सायंकाळ झाली होती. उद्या कृष्णप्रतिपदा, तेव्हा आज पौर्णिमेचा चंद्र त्या स्वच्छ व निरभ्र नीलाकाशांत चकाकणाऱ्या तारांगणासह दिमाखाने विहार करीत होता आणि त्याच्या त्या चौफेर प्रकाशात समुद्र आनंदाने व उत्साहाने आपल्या उत्तुंग लाटांच्या रूपाने नुसता थयथय नाचत होता. त्याचे शुभ्र रुपेरी चकाकणारे पाणी आणि त्यावर भिरभिरणारा गार खारा वारा कुणाच्याही मनाला अत्यंत उल्हसित आणि उन्मादक करील असाच होता.

ठरल्याप्रमाणे कोळ्यांनी (नावाड्यांनी) समुद्रावर आगाऊच दोन नावा तयार करून ठेवल्या होत्या. राजाराणी आपापल्या नावात बसली आणि त्यांनी मनसोक्त विहार करण्यास सुरुवात केली. चंद्रप्रकाशात जलविहार करताना राणीला अत्यंत आनंद वाटत होता. पण राजाला त्याच्या द्विधा मनस्थितीमुळे काही सुचेनासे झाले.

समुद्र, नदी किंवा तलाव अशा ठिकाणी पतिपत्नीनी जोडीने विहार करू नये, असा तत्कालीन लोकसमज रूढ होता (अजूनही आहे). केवळ पतिपत्नीच नव्हे तर मामा-भाचा, मुलगा-पुतण्या, बाप-लेक, इत्यादी सख्ख्या नात्याची माणसे जलप्रवास बहुधा टाळीत. ह्या रीतीचाही राणीच्या व इतरांच्या समजुतीकरिता राजाने फायदा घेतला.

एकदा राजाला वाटे, "छे छे! कोळ्यांकरवी राणीची नाव बुडवून तिला ह्या जगातून नाहीशी करण्यापेक्षा तिच्या नशिबी असलेले दगड, माती, विटा, चुना वाहाण्याचे काम तिला करू द्यावे. पण लागलीच स्वतःचे वैभव व राणीचे ते भावी काबाडकष्टाचे जीवन, त्याचे चित्र त्याच्या नजरेसमोर उभे राही व त्याला ते पाहाणे असह्य होई. शेवटी त्याच्या निश्चयी मनाने त्याच्यावर विजय मिळविला. त्याने झपाट्याने आपली नाव राणीच्या नावेजवळ नेली. प्रेमभराने तिला अखेरचे मनसोक्त न्याहाळून घेतले. डोळ्यांत चमकू लागलेले अश्रुबिंदू त्याने निग्रहाने मागे परतविले आणि तिच्या हाताचे चुंबन घेऊन व नावाड्याला संकेत करून आपण दुसरीकडे जलविहारार्थ निघून गेला. थोड्याच वेळात राणीची नाव एके ठिकाणच्या प्रचंड लाटात सापडून उलटी झाली आणि राणी समुद्रात बुडाली.

राणीच्या नावेतील कोळ्याने स्वतःचा कसाबसा बचाव करून किनारा गाठला व राजा तेथे येताच त्याला सर्व वृत्त निवेदन केले. राजा त्याच्यावर वरपांगी अत्यंत रागावला व नोकरीवरून बडतर्फ करण्याची त्याला त्याने धमकी दिली. बराच वेळ सर्वांनी राणीचा शोध केला पण ती काही त्यांना सापडली नाही.

राजा राजवाड्यात जेव्हा परतला तेव्हा जिकडे तिकडे, "राणी समुद्रात बुडून मरण पावली." ही बातमी वाऱ्याच्या वेगाने चोहोकडे पसरली आणि एकच हाहाकार उडाला. प्रधान, सेनापती, सरदार आणि प्रजाजन, तसेच अनके लोक राजवाड्याकडे धावले. प्रधानादिकांनीही राणीच्या शोधार्थ बरेच कोळी धाडले आणि ते राजाचे सांत्वन करू लागले.

राजा अगदीच विचित्र मनस्थितीत होता. मध्यरात्र व्हावयाची वेळ झाली तेव्हा लोकांची वर्दळ बरीच कमी झाली आणि त्याने आपल्या महालात स्वतःस कोंडून घेतले. आणि मग त्या नंदादीपापुढे उभा राहून विकट हास्य करीत तो म्हणाला,

"बोल दीपा! क्षुद्रा, बोल! आता तुझी भविष्यवाणी कशी खरी ठरणार?" तो उत्तराची वाट पाहात होता. नंदादीप मनुष्यवाणीने मागील वेळेप्रमाणे काही तरी बोलेल अशी तो अपेक्षा करीत होता. पण नंदादीपाकडून काहीच उत्तर आले नाही. उलट तो दुसऱ्या क्षणी विझला. चोहीकडे अंधार पसरला. राजाला वाटले, नंदादीप हरला, आपण विजयी झालो; म्हणूनच त्याने आपले तोंड काळे केले असावे. लांबलचक विकट हास्यात राजा आसुरी समाधानाने झोपी गेला. पण त्याच्या भविष्यात जे लिहिले होते ते कदापि चुकणारे नव्हते!

राणी जी समुद्रात बुडाली ती तुफानी लाटांमुळे खूप दूरवर फेकली गेली आणि तिच्या नाकातोंडात पाणी जाऊन जवळ जवळ बेशुद्धावस्थेत ती वाहात चालली. कित्येक योजने ती वाहात गेली असेल. समुद्राची एक लाट अशी काही जोराने उसळली, की ती किनाऱ्यावरील एका वृक्षाकडे फेकली गेली आणि बुडत्यास काडीचा आधार म्हणून राणीने तशाही अर्धबेशुद्धावस्थेत त्या झाडाला घट्ट पकडले. दुसरी अशीच ती लाट ओसरली आणि दूर दूर आत समुद्रात लुप्त झाली.

राणी ज्या झाडाला धरून लोंबकळत होती तिथून थोड्याच अंतरावर कोळी लोक मासे पकडीत होते, त्यांना ती दिसली. एवढी सुंदर स्त्री आणि समुद्राच्या लाटेवरून वर आलेली. प्रथम त्यांच्या समजुतीप्रमाणे त्यांना ही खरोखरीच कोणी स्त्री आहे, की चेटकीण ह्याचा संशय पडला. पण नंतर त्यापैकी दोघातिघानी मनाचा हिय्या करून त्या झाडाकडे प्रयाण केले व राणीला खाली उतरून घेतले.

राणीने काही वेळाने सावध होऊन जेव्हा चौफेर नजर टाकली, तेव्हा आपण एका कोळ्याच्या झोपडीत खाटेवर पडलो आहोत व एक अनोळखी स्त्री-बहुधा

कोळ्याची पत्नी असावी ती आपल्याजवळ उभी आहे असे तिला दिसले. आपण कोण, कुठून येथे आलो, ह्याबद्दल आपणास आता विचारल्यास काय सांगावे ह्याचा तिला विचार पडला. तिच्या अंगावरील काही दागिने समुद्रात पडले असले तरी काही अजून अंगावर होते आणि त्यांची प्रभा त्या झोपडीत चमकल्यावाचून राहिली नाही. ही कोणी तरी थोरामोठ्याच्या घरची आहे असे कोळिणीला वाटले. संकटात सापडल्यामुळे तिची अशी स्थिति झाली असावी. तिने आपल्या नवऱ्याला बाजूला नेऊन सांगितले व योग्य तो उपचार करविला. एक दोन दिवसात राणीला बरे वाटू लागले. जन्मात कधी अशा घाणेरड्या घरात आणि वस्तीत राहाण्याचा तिजवर प्रसंग आला नव्हता; पण आकस्मिक संकटामुळे तो आज आला होता खरा. ती अत्यंत नाजूक असली तरी मोठी समजूतदार होती. तिने आपले रहस्य कोणास तूर्त कळू नये म्हणून त्या कोळ्याला त्याच्या पत्नीसह विश्वासात घेतले व एक दोन जुजबी दागिने मोडून ती कालक्रमणा करू लागली.

हां हां म्हणता दिवस निघून चालले होते आणि राणी ज्या राज्यात आता समुद्रातून वाहात आली होती, तेथील राजाने आपल्या राणीकरिता गावाबाहेर एका उंच टेकडीवर एक सुंदर महाल बांधण्याचे काम हाती घेतले होते. त्याकरिता राज्यातील मोठमोठे कारागीर, कामगार व अनेक स्त्रीपुरुष मजूर अहोरात्र खपत होते. महाल लवकर तयार करावयाचा असल्याने राजाला जितके मजूर मिळतील तितके हवेच होते; त्याला कसेही करून तो महाल दिवाळीच्या आत तयार करून घ्यावयाचा होता.

राणीला आपल्यावरील प्रसंगाची आता जाणीव होऊन चुकली होती. त्या गरीब कोळी कुटुंबात काही दिवस काढून योग्य संधीची ती वाट पाहाणार होती; तेव्हा ती आपला वेष व राहाणी बदलून कोळणीप्रमाणेच तिथे वावरू लागली. कोळी आणि त्याची बायको स्वभावाने फार चांगली होती. त्यांनी आपापल्यापरी राणीला चांगल्या रीतीने वागविण्याचा प्रयत्न केला तरी मोलमजुरीवर गुजराण करणाऱ्या कुटुंबात राणीला हलके सलके काम करावेच

लागे. इतक्यातच योजलेल्या वेळेत महालाचे काम मजुरांच्या अभावामुळे होणार नाही असे पाहून राजाने फर्मान काढले, की ते पूर्ण होईपर्यंत सर्व घरातील स्त्रीपुरुषांनी व मुलामुलींनी कामास आलेच पाहिजे.

राजाचे फर्मान निघाल्यावर त्याची अंमलबजावणी व्हावयास काय उशीर? तदनुसार कोळी आणि त्याच्या पत्नीची इच्छा नसतानाही राणीला महालाच्या कामावर जावे लागले. राणीला दगड, विटा, चुना, माती वाहावी लागली. तिच्या नाजूकपणामुळे तिला ते काम झेपेना. कधी कधी ती मूर्च्छित होऊन पडे, पण तिच्या नशिबात ते लिहिलेलेच होते. भोग भोगणे तिला भागच होते. महालबांधणीचे काम पूर्ण झाले. अमाप पैसा खर्च करून अत्यंत परिश्रमपूर्वक बांधलेला तो महाल पाहून राजाराणी आनंदित झाली. दिवाळी नजीकच येऊन ठेपली होती. राजधानीत मोठा महोत्सव करून राजाराणी महालात प्रवेश करणार होती.

इकडे नंदादीपाच्या भविष्यवाणीवर विजय मिळविणारा राजा, राणी नाहीशी झाल्यापासून शोकसागरात बुडून गेला होता. त्याचे कामावरून लक्ष उडाले व महाल सोडून तो फारसा कुठे जाईनासा झाला. बदल म्हणून कुठे तरी देशान्तरास निघून जावे असे प्रधानाने सुचविले. राजालाही ती कल्पना पटली. राजाची एक बहीण दूर एका समुद्र देशीच्या राजाला दिली होती. तिच्याकडे जाण्याचा राजाने बेत निश्चित केला आणि ह्याच वेळी सुदैवाने ज्या बहिणीकडूनही राजाला खास निमंत्रण आले, की तिने आपल्या राजधानीत एक सुंदर महाल बांधला आहे आणि तेथेच राणी यंदा दिवाळी करून भाऊबीजेच्या दिवशी राजाला ओवाळणार आहे. तरी कसलीही सबब न सांगता निघून यावे.

राजाला ते निमंत्रण पाहून अत्यंत आनंद झाला आणि त्याने ऐन दिवाळीत बहिणीकडे जावयाचा बेत नक्की करून तसा उलट निरोपही पाठविला.

महालाचे काम पूर्ण झाले असले तरी अजून पुष्कळ किरकोळ कामे व्हावयाची राहिली होती. सभोवती पडलेला लाकूडफाटा, दगड, माती, चुना तेथून बाहेर काढून नीट लावायचा असल्यामुळे मजूर लोक तेथे राबत होते.

राजा अगदी लक्ष्मीपूजनाच्या दिवशीच बहिणीकडे येऊन पोचला. आज नव्या महालात सायंकाळी लक्ष्मीपूजन होणार होते व तेथे त्याची तयारी चालू होती.

महालात कशी काय तयारी चालली आहे ते पाहावे ह्या हेतूने त्या नगरीचा राजा आपल्या ह्या पाहुण्या राजाला - मेहुण्याला घेऊन तेथे आला. पाहुणा राजा तो महाल पाहून अत्यंत आनंदित झाला. हे पाहून तेथील राजाला नुसते समाधानच झाले असे नाही तर आपण घेतलेल्या एवढ्या परिश्रमाची कृतकृत्यता वाटली व तोही मनातून आनंदला.

पाहुणा राजा चौफेर नजर टाकीत महालाभोवती तेथील शोभा पाहात चालला होता. कारागिरांना काही सूचना देण्यासाठी तेथील महालाचा राजा दुसरीकडे गेला. बगीच्यांतील एका पुष्करिणीजवळ काही स्त्रीपुरुष दगड, विटा, माती, हटविण्याचे काम करीत होती. त्यांपैकी एक स्त्री घमेल्यातून डोक्यावर देण्यात आलेल्या विटांचे ओझे सहन न झाल्यामुळे घेरी येऊन पडली आणि त्यामुळे इतर मजूर तिकडे धावून गेले. ह्या गडबडीमुळे पाहुण्या राजाचेही तिकडे लक्ष गेले. तो तातडीने तिकडे धावला. जवळ जाऊन पाहातो तो काय?

ती स्त्री त्याचीच राणी होती. राजाने तिच्याकडे पाहिले. अंमळ भानावर आल्यावर राणीचेही राजाकडे लक्ष गेले. क्षणभर दोघेही भोवतालचे जग विसरली. राजाने पटकन् राणीला जवळ घेतले. सर्वजण तो प्रकार पाहून अगदी आश्चर्यचकित झाले. इतक्यात तेथील राजाही काम संपवून तेथे आला.

पाहुण्या राजाने त्यांच्या कानात काही तरी सांगून त्या सर्व मजुरांना तेथून दूर केले व एक मेणा बोलावून राणीला राजवाड्यात घेऊन जाण्याबद्दल ताबडतोब हुकूम फर्माविला.

पाहुण्या राजाने बहिणीला सर्व हकिगत निवेदन केली. ती ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटले आणि आज शुभदिनी लक्ष्मीपूजनाच्या वेळी राजाला त्याची लक्ष्मी सापडली ह्याचा अत्यंत आनंद वाटला. रात्री त्या महालात आनंदोत्सवात लक्ष्मीपूजन पार पडले.

लक्ष्मीपूजनाचा महोत्सव आटोपल्यावर, दुसऱ्या दिवशी राजा राणीला बरोबर घेऊन स्वतःच्या राजधानीस निघून गेला.

रात्री एकान्तात राजा राणीला जेव्हा भेटला तेव्हा नंदादीप पुन्हा मनुष्यवाणीने बोलला, "का राजा, माझी भविष्यवाणी खरी ठरली ना? पण आता तुला अभय आहे. ह्यापुढे आता वृथा अभिमान धरू नकोस. तुम्ही दोघेही सुखाने दीर्घकाळ नांदा." राजाराणी पटकन् मंचकावरून उठली आणि मनोभावे त्यांनी त्या नंदादीपाला नमस्कार केला. आमची कहाणी संपली.

(विनायक वासुदेव जोशी : चंद्रपुरी लोककथा)

# ७.१२ कडेकोट बंदोबस्ताचे वर्तुळ आणि संरक्षक वस्तू

(चंद्रपुरी लोककथा)

आटपाट नगर होते. तिथे एक राजा राज्य करीत होता. राजाला एक अनुपम अशी सुंदर राणी होती. कित्येक वर्षे आनंदाने त्यांचा सुखाचा संसार चालू होता; पण दुर्दैवाने त्यांना मूलबाळ झाले नव्हते. त्यामुळे राजाराणी सदा सचिंत व दुर्मुखलेली असत. व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, वगैरे त्यांनी केल्या. ईशचिंतनात ते आपला काळ घालवू लागले.

एकदा राजधानीसह सर्व राज्यात अवर्षण पडले व पाण्याचा अत्यंत तुटवडा पडला. एकंदर परिस्थितीचा विचार करून प्रधानाने गावच्या किल्याबाहेर तलाव खोदण्याची एक योजना मांडली. ती राजाला पसंत पडली. लवकरच तलाव खोदण्याचे काम सुरू झाले. खोदण्याचे काम चालू असता खणकन् आवाज आला व भळभळ रक्त बाहेर आले. कामकऱ्यांच्या लक्षात ही गोष्ट येताच त्यांनी ती प्रधानाला कळविली व प्रधानाने ती राजाला कळवून ते दोघेही त्या जागी आले. हा काय चमत्कार हे त्यांच्या लक्षात येईना.

रात्री राजाच्या स्वप्नात एक देवी आली. ती म्हणाली, “आज ज्या ठिकाणी खोदताना भळभळ रक्त वर आले, त्या ठिकाणी माझी मूर्ति आहे. तिची तू तळ्याच्या काठावर महाद्वाराजवळ एक भव्य देऊळ बांधून स्थापना कर. तुझे सर्व मनोरथ परिपूर्ण होतील.” राजाने स्वप्नात देवीने सांगितल्याप्रमाणे केले व महोत्सवपूर्वक देवीची स्थापना केली. थोड्याच दिवसांत राणी गर्भवती राहून योग्य काळी तिला अत्यंत सौंदर्यवान् व कांतिमान् असे कन्यारत्न झाले. केवळ राजालाच नव्हे, तर अनेकांच्या नवसाला ती देवी पावू लागली. कालिकादेवी म्हणजे मोठे जागृत दैवत, अशी तिची चौफेर ख्याती पसरली.

दिवसांमागून दिवस जाऊ लागले. हळूहळू राजकन्या वाढत जाऊन योग्य वेळी उपवर झाली. राजाराणीने तिला हौसेने सर्व प्रकारचे शिक्षण दिले. मृगया, जलविहार, सृष्टिसौंदर्य निरीक्षण, अचूक नेमबाजी, इतकेच नव्हे, तर ती काव्यशास्त्रविनोदांत सुद्धा तरबेज झाली. दरबारात व राज्याच्या अनेक कारभारात ती प्रधानाच्या खालोखाल मदत करू लागली. हे पाहून राजाला जितका आनंद झाला. तितकाच तिला योग्य वर कसा मिळेल ह्याची चिंता त्याला लागली.

राजकन्येच्या कर्तृत्वाची व मृगयेची दूरवर कीर्ति पसरली. देशोदेशींचे राजे ती आपणांस मिळावी म्हणून मनात अभिलाषा धरून बसले. कित्येक राजपुत्र तर तिचा क्षणभर सहवास लाभावा म्हणून सारखे धडपडत; पण ती जितकी निष्णात तितकीच जागरूक आणि धोरणी होती. तिला एकदोनदा धोक्यांत आणणारास तिने अशी काही चुणूक दाखविली, की तदनंतर तिच्या वाटेला फारसे कुणी गेलेच नाही. उलट तिचा सर्वत्र वचक बसला. राजाने एकदा आपल्या कन्येचा लग्नासंबंधाने काय विचार आहे ह्याची चौकशी केली; तेव्हा तिने प्रधानाकरवी काही गवंड्यांना किल्ल्याच्या महाद्वाराजवळ देवीच्या मंदिरासमीप नेले आणि किल्ल्याच्या भिंतीवर खालील काव्यमय ओळी खोदवून घेतल्या व आपला विचार जाहीर केला, की जो कोणी ह्या प्रश्नाचे सक्रिय उत्तर देईल त्यालाच मी माळ घालीन.

अनेक देशोदेशींचे राजे, राजपुत्र व अनेक तरुण त्या काव्यपंक्ती वाचू लागले. तेथे लिहिले होते -

वर्तूळ परि भाग चार
आत कडेकोट फार
एक दोन तीन वरी
प्रश्न टाकित मी नारी
चारामधि एक फक्त
सज्जहि सोपान तेथ
संरक्षक वस्तू कोणी

तेथिल दे मज आणुनि
कोण सज्जन वरायास?
घालिन मी माळ त्यास.

कित्येकांनी तर वरील पंक्ती तोंडपाठ केल्या. ज्याच्या त्याच्या तोंडी ह्याच ओळी घुमू लागल्या. पण त्यांची उकल मात्र कुणालाच झाली नाही. काहीनी आपल्या अकलेनुसार जी वस्तु राजकन्येला पाठविली ती चुकीची ठरली.

कुण्यातरी एका देशाचा राजबिंडा तरूण देशाटणाला निघाला असता ह्या नगरीत (राजधानीला) आला. त्याने त्या देवीच्या देवळात मुक्काम ठोकला. सायंकाळच्या वेळी राजकन्या नित्याप्रमाणे आपल्या दासदासींसह तेथे दर्शनास आली. त्या वेळी ती राजपुत्राच्या नजरेस पडली व तो तिला पाहून मोहित झाला.

दर्शन घेऊन राजकन्या किल्ल्याच्या आतील राजवाड्यात निघून गेली; तेव्हा त्या राजपुत्राने आपल्या माणसांकरवी तिच्यासंबंधी अधिक चौकशी करविली. ती अविवाहित आहे हे ऐकून त्याला अत्यंत आनंद झाला; पण तिने लग्नाच्या बाबतीत घातलेली अट ऐकून तो अत्यंत सचिंत झाला.

त्याने प्रत्यक्ष किल्ल्याच्या महाद्वाराजवळ जाऊन त्या ओळी वाचल्या, चांगल्या मनन केल्या व तो मुक्कामावर परतला.

सारी रात्र त्याने विचार केला व देवीची मनोभावे प्रार्थना केली. पहाटे पहाटे त्याला त्या ध्यानमग्न तंद्रीतच "प्रयत्न कर, राजकन्या तुझीच आहे." असे दैवीचे काहीसे अस्फुट शब्द कानी पडल्याचा भास झाला. ते ऐकून त्याला अत्यंत हुरूप आला.

त्याने आपल्या हाताखालील सरदार नोकरास तिथून ताबडतोब तळ हलविण्यास व राजधानीस रवाना व्हावयास सांगितले. राजपुत्र आपण स्वतः वेष बदलून तिथेच राहू लागला. हळूहळू किल्ल्याच्या आत प्रवेश मिळवून राजमहालाचे निरीक्षण करू लागला. प्रत्येक ओळ अत्यंत दक्षतापूर्वक त्याने वाचावी. तेथील भूरचनेचा एकंदर विचार करून त्यातील अर्थ जुळवून पाहावा. पण खास राजमहालात त्याला प्रवेश मिळेना. राजकन्येने आपल्या

दासदासींना "अंतर्गमन-बहिर्गमना" चे असे काही संकेत निश्चित केले होते, की ते माहीत नसणाऱ्याचा घोटाळा होई. अशा घोटाळ्यात तो एकदा सापडला, पण चपळाईने तिथून पसार झाला म्हणूनच वाचला. तद्नंतर त्याला एक आठवडा तर अगदीच गुप्त रीतीने काळ कंठावा लागला. ह्या काळात मात्र त्याने राजघराण्यासंबंधी बरीच अचूक माहिती मिळविली.

राजपुत्रास हेरगिरीचे व बहुरुप्याचे असे दोन्ही कलांचे चांगले ज्ञान असल्याने त्याने फिरून यत्न करून पाहिला आणि महंताचे (साधूचे) सोंग घेऊन खुद्द राजवाड्यात प्रस्थान ठेवले. राजाची वंशावळ व राज्यातील अनेक घटना त्याने अशा काही बिनचूक रीतीने वर्तविल्या, की राजा बेहद्द खूष झाला व त्याचा त्या महंतावर विशेष विश्वास बसला.

राजवाड्यातील वास्तव्यात त्याने सबंध राजवाड्याचे तर निरीक्षण केलेच पण राजकन्येने घातलेल्या सांकेतिक अटीचाही आपल्या मनाशी उलगडा केला. पण जेथे अगदी कडेकोट बंदोबस्त व सांकेतिक भाषेशिवाय प्रवेश मिळणे कठीण तेथे कोणती युक्ति योजून प्रवेश मिळवावा, ही त्याला मुख्य अडचण पडली आणि अत्यंत चिंतामग्न स्थितीत त्याचे दिवस जाऊ लागले. "वर्तूळ परिभाग चार" ह्याचा अर्थ त्याच्या केव्हाच लक्षात आला होता. तो किल्ला असून त्याला चार दरवाजे आहेत आणि त्यानंतर त्याला दुसऱ्या "आत कडेकोट फार" ह्या ओळीचा अर्थ सहज कळला. जेथे अत्यंत कडेकोट बंदोबस्त आहे अशा राजवाड्यात "एक दोन तीन-वरी" म्हणजे चौथ्या मजल्यावर माझ्या संकेताचे उत्तर आहे ते कोणते ते शोधून सांगा, असा प्रश्न टाकित "मी नारी" असे सुचविलेले आहे. ह्याचाही त्या महंत वेषधारी राजपुत्राला उलगडा झाला. "ह्या चार मजल्यांपैकी एकांत जेथे (बाहेर पडण्यास) शिडी तयार आहे तेथे जी मी 'संरक्षक' वस्तू ठेविली आहे ती मला जो कुणी आणून देईल त्याला मी माळ घालण्यास व वरावयास सज्ज आहे."

थोडक्यात जो राजपुत्र संपूर्ण निरीक्षणानंतर समजून चुकला, की ज्या चौथ्या मजल्याला एका गुप्त वाटेने बाहेर पडण्यास शिडी तयार आहे त्या मजल्यावर तिचे शय्यागृह असावे आणि तेथेच तिने 'संरक्षक वस्तू' ठेवलेली

असावी.

महंताने काही दासदासींना फितविण्याचा प्रयत्न करून पाहिला व त्या वरच्या मजल्यावर प्रवेश मिळविण्याची शिकस्त केली. पण त्याचे सर्व बेत राजकन्येच्या कुशाग्र बुद्धीमुळे फसले. राजपुत्र शेवटी अगदी कातावून गेला. त्याला राजकन्या जितक्या लवकर मिळेल तितकी हवी होती व विलंबाने महंताचे सोंग फार दिवस टिकणारे नव्हते.

एके दिवशी तर तो अत्यंत निराश झाला व मध्यरात्रीच्या सुमारास कालिकादेवीच्या मंदिरात गेला त्याने कमरेला बांधलेली गुप्त कट्यार तिच्यापुढे ठेवून, "काहीतरी मार्ग सुचव नाही तर मी आत्महत्या करीन! असे म्हणून निधार्राने हट्ट धरून बसला आणि चमत्कार असा, की कालिकेच्या गळ्यातील पुष्पहारातून एक साप निघाला. तो भरभर त्या महंताकडे येऊ लागला. ते पाहून त्या महंताने जो पळ काढला तो थेट राजवाड्यात. नंतर त्याने तो साप इथवर तर आला नाही ह्याची खात्री करून घेतली व अंमळ पहुडला. मात्र त्याच्या डोक्यात "देवीने असा कौल का दिला?" ह्याचे नुसते थैमान सुरू झाले व पहाटेच्या प्रसन्न वेळी त्याच्या मनात एक कल्पना चमकून गेली. त्याने त्या आनंदाच्या भरात टाळी वाजवून "बस्स. उद्या अगदी असेच करावयाचे" असे काहीसे मनाशी पुटपुटून तो नंतर शातपणे झोपी गेला.

दुसरा दिवस उजाडला. त्याने नित्याप्रमाणे आपली प्रातःकर्मे आटोपली पूजा आणि ध्यान संपविले. राजाही महंताची पाद्यपूजा करून प्रधानासह दरबारांतील कामकाज पाहाण्यास निघून गेला. ह्या वेळी राजकन्या स्नानाच्या तयारीत असून अर्धा तास तरी बाहेर येणार नव्हती अशी संधी साधून, त्याने राजकन्येच्या शय्यागृहात प्रवेश करण्याचे ठरविले. त्याच्या मनाचा अगदी दृढनिश्चय झाला, की आज काहीही होवो, एकदा येथे कोणती 'संरक्षक वस्तू' आहे ती हस्तगत करून घ्यावयाचीच. राजकन्येच्या शय्यागृहापर्यंत प्रवेश मिळविणे अत्यंत कठीण हे त्याला पक्के माहीत होते, पण देवीने रात्री दिलेला 'संकेत' त्याला आठवला. क्षणाचाही विलंब न करता त्याने आपला दंड उचलला व 'साप साप' ओरडत पहिला, दुसरा व तिसरा मजला ओलांडून

चौथ्या मजल्यावर-खुद्द राजकन्येच्या शय्यागृहात-शिरकाव केला.

सापाच्या भीतीमुळे सर्व दासदासी व द्वाररक्षक घाबरले आणि आपले प्राण वाचावण्यासाठी वाट मिळेल तिकडे पळू लागले.

महंताने राजकन्येच्या शय्यागृहात येताच चौफेर नजर टाकली. राजकन्येची हिऱ्यामाणकांनी व सुंदर ताज्या पुष्पांनी सुसज्ज अशी शय्या पाहून त्यास तेथे पहुडण्याचा मोह अनावर झाला पण तो त्याने मोठ्या कष्टाने आवरला. त्याचे सारे लक्ष संरक्षक वस्तूकडे होते. त्या शय्यागृहात एका भिंतीला हिरेमाणकांनी जडित व चकचक करणारी अशी एकच एक तलवार लटकत असलेली दिसली. त्याने चटकन् संकेत ओळखला व ती हस्तगत करून व पुन्हा मोठ्याने 'अरे बाप रे, साप, साप' ओरडत ज्या मार्गाने पळावयास सुरुवात केली. तेथे त्याला सुदैवाने 'सोपान सज्ज' असलेला दिसला. त्या वाटेने खाली उतरून लगेच तो कुठल्या कुठे पसार झाला.

साप निघाल्यामुळे दासदासींची व द्वाररक्षकांची धावपळ पाहून इतर अनेकही त्या गडबडीत मिसळले. राजाच्या व प्रधानाच्या कानांपर्यंत ती गोष्ट गेली. स्नानगृहांत राजकन्या स्नान करीत होती तिच्या कानांवरही हा गलका पडला. तिने पण घाईघाईनेच स्नान उरकले. राजा, प्रधान, राजकन्या, दासदासी व इतर नोकरचाकर ह्या सर्वांचीच राजवाडाभर शोधाशोध चालू झाली. साप कुठे निघाला, कुणी पाहिला, नंतर कुणीकडे गेला, तो कसा होता, वगैरे चौकशी झाली पण पुष्कळ शोधाशोध होऊनही शेवटी तो काही सापडला नाही. ह्यात बराच अवधी निघून गेला. अखेर तो प्रथम महंताने पाहिला असे समजले, तेव्हा त्यालाच अगोदर जाऊन विचारावे, म्हणून ती सर्व मंडळी महंताकडे आली. पण तेथे महंत होता कुठे?

राजाला व राजकन्येला जेव्हा हे कळले तेव्हा ह्यात काहीतरी गडबड झाली असावी म्हणून त्यांना शंका आली. प्रधानानेही त्या शंकेला दुजोरा दिला. इतक्यात राजकन्या सर्वांचा डोळा चुकवून चौथ्या मजल्यावरील आपल्या शय्यागृहात आली व तिने चौफेर नजर टाकली. पाहाते तो काय, तिच्या सांकेतिक अटीतले उत्तर जी 'संरक्षक वस्तू' तीच नेमकी तेथून नाहीशी झाली

होती!

तिला त्या महंताचा पक्का संशय आला. लगेच जुजबी सैन्यासह चौफेर शोध करण्यास ती निघून गेली. संपूर्ण आठवडा लोटला, पण त्या महंताचा काही पत्ता लागला नाही राजकन्या अगदी बेचैन होऊन गेली.

एका पंधरवाड्याने राजाला कुणातरी राजपुत्राकडून दूताकरवी एक खलिता आला. त्यात लिहिले होते, "राजकन्येने स्वतःच्या विवाहासंबंधी जी काव्यमय अट घातली आहे ती पूर्ण करण्यास आपण तयार आहो. आपली संमति असल्यास आम्ही प्रत्यक्ष येऊन उलगडा करू. जर त्यांत अपयश आले तर राजा देईल ती शिक्षा आनंदाने भोगू."

राजाला तो खलिता वाचून अत्यंत आनंद झाला. राजपुत्राने जर ही सांकेतिक अट (राजकन्येने जाहीर केली होती) पुरी केली तर 'ह्याचि देही ह्याचि डोळा' आपल्या परम प्रिय कन्येचा लग्नसोहळा पाहाण्याचे भाग्य लाभेल, पण ह्याविषयी खुद्द राजकन्येचे मत काय आहे हे जाणून घ्यावे म्हणून राजाने तिची भेट घेतली व तिला तो खलिता दाखविला.

राजकन्येने काही क्षण मनाशी विचार करून आपली संमति दर्शविली पण तिने एक अट अशी घातली, की राजपुत्राने त्या अटीचा पूर्णपणे उलगडा केला नाही तर त्याचा संपूर्ण दरबारासमोर जाहीररित्या शिरच्छेद करण्यात येईल.

राजाने तेच उत्तर त्या राजपुत्राकडे पाठविले. हां हां म्हणता ही गोष्ट सर्वत्र पसरली. नुसत्या त्या राजाच्या राज्यातच नव्हे तर इतर देशोदेशीच्या राज्यातही ती जाऊन धडकली.

योग्य वेळी राजपुत्र आपल्या जाम्यानिम्यासह तेथे आला व त्याने त्या देवीच्या देवळातच प्रस्थान ठेवले. बऱ्याच देशोदेशीचे राजे, तरुण राजबिंडे राजपुत्र व इतर अनेक मानकरी ही मौज पाहाण्यास आले होते.

राजाने किल्ल्याबाहेरील पटांगणात मोठा दरबार भरविला. मोठ्या सन्मानाने सर्व पाहुणेमंडळीस पाचारण केले व त्यांचे स्वागत करून त्यांना योग्य स्थळी बसविले. प्रधान, सरदार, सेनापती व राज्यातील इतर सर्व मानकरी आपापल्या दर्जानुसार स्थानापन्न झाले. दुंदुभी, नगारे, ढोल, आदि वाद्यांच्या

गजरात राजा आपल्या प्रिय राजकन्येसह येऊन सिंहासनावर बसला. त्या राजपुत्रासाठी एक विशिष्ट स्थान त्या सभामंडपात निश्चित करण्यात आले होते. तेथे राजपुत्र येऊन बसला.

दरबारच्या कारभारी मंत्र्याने आजच्या आयोजनासबंधी प्रासंगिक असे चार शब्द सांगितले. नंतर राजाने त्या राजपुत्रास अटीसंबंधी उलगडा करण्याची अनुज्ञा दिली.

राजपुत्राने आपल्या स्थानावरून उठून प्रथम राजास व नंतर सर्व उपस्थितांस अभिवादन केले. नंतर सकलजनांस उद्देशून त्याने किल्ल्याच्या महाद्वारावरील प्रत्येक ओळीचा अर्थ व प्रत्यक्ष राजवाड्यातील सुसंगती विशद केली आणि सोबत आणलेली व श्लोकात नमूद केलेली 'सरंक्षक वस्तू' सर्वांसमक्ष राजासमोर नेऊन ठेवली आणि खसकन् म्यानातून आपली लखलखीत तलवार काढीत वीरोचित असा 'सैनिकी मुजरा' ठोकला. मग तो आपल्या स्थानावर येऊन बसला.

टाळ्यांच्या गजराने सर्व सभामंडप दणाणून गेला. सर्वांचे लक्ष आता राजकन्येकडे लागले. राजकन्याही काही लेचीपेची नव्हती. ती काव्यशास्त्रविनोदात पारंगत होती, तशीच खिलाडूही होती. तिने सर्वत्र स्मितमुखाने पाहात टाळी वाजविली. संकेताप्रमाणे तिच्या दासींनी सुवर्णतबकांतून एक अत्यंत सुवासिक पुष्पहार व पुष्पगुच्छ आणला.

राजकन्या विद्युत गतीने आपल्या स्थानावरून उठली व तिने तो हार त्या विजयी राजपुत्राच्या गळ्यांत घालून त्याच्या हाती तो पुष्पगुच्छ दिला. सभामंडपात पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट झाला व बाहेर मंगल वाद्ये वाजू लागली. राजा सिंहासनावरून उठला व त्याने राजपुत्राला आलिंगन देऊन आपल्या सिंहासनासमोर आणले आणि त्याचा हात आपल्या राजकन्येच्या हाती दिला.

(विनायक वासुदेव जोशी : चंद्रपुरी लोककथा)

# ७.१३ बैठो - अजाब वस्तू

(चंद्रपुरी लोककथा)

आटपाट नगर होते. तिथे एक राजा होता. त्या राजाला दोन सुंदर मुली होत्या. एके दिवशी राजाने त्यांना लडिवाळपणे विचारले, “तुम्ही कोणाच्या भाग्याने जन्मलात?” त्यावर मोठ्या मुलीने उत्तर दिले, “बाबा, मी तुमच्या भाग्याने जन्मले आहे.” नंतर धाकटीला विचारण्यात आले. तिने उत्तर दिले, “कोणी कुणाच्या भाग्याने जन्मत नसते. जे ते आपले नशीब (भाग्य) आपापल्याबरोबर घेऊन येत असते.” ह्या उत्तराने राजास अर्थातच राग आला. त्याने म्हटले, “असे आहे, तर पाहातो मी, तू आपल्या भाग्यावर कशी जगतेस ती.” आणि राजाने ताबडतोब प्रधानाला हुकूम दिला, “प्रधानजी, ह्या माझ्या धाकट्या मुलीकरिता गावाबाहेर एक झोपडी बांधून द्या आणि जुजबी सामान व एक दासी देऊन तिची रवानगी करा. तिला लागणारे धान्यकपडा पुरवीत जा.” राजाचा हुकूम तो. तेथे उशीर कशाचा! त्याप्रमाणे व्यवस्था झाली आणि दुसऱ्याच दिवशी त्या धाकट्या मुलीची त्या झोपडीत रवानगी झाली. मोठी मुलगी तर आता राजाची अत्यंत आवडती झाली आणि तिचे वाटेल तसे लाड पुरविले जाऊ लागले.

दिवसांमागून दिवस जाऊ लागले. दोघीही मुली आता उपवर झाल्या व सुस्वरूप दिसू लागल्या. राजाने ‘वंजेस’ जाण्याची तयारी केली व तिथूनच दूरदूरच्या देशात जाऊन मोठ्या मुलीला वर मिळाल्यास पाहावा असाही त्याचा विचार झाला. लहान मुलीचा तर प्रश्नच नव्हता. राजाने मनाशी अगदी ठरवून टाकले होते, की ती जर एवढी घमेंडखोर आहे तर ती जाणे आणि तिचे नशीब जाणे.

मोठ्या मुलीला जाताना राजाने विचारले, “मुली, तुझ्याकरिता काय आणू?” तिने आपल्या आवडीच्या खूप खूप वस्तू सांगितल्या. किती झाले तरी बापाचे

हृदय ते! त्याने धाकट्या मुलीलाही दरवानाबरोबर निरोप पाठविला, की राजा वंजेस जाऊन राहिला आहे, तर त्याने येताना तुला काय आणावे? धाकटी मुलगी त्या वेळी स्नान करीत होती. दाराशी तिची दासी बसली होती तिने त्या मुलीला जाऊन विचारताच तिने 'बैठो' म्हणून निरोप पाठविला. आडमुठा दरवान तो, त्याला वाटले 'बैठो' नावाची वस्तूच जणु धाकट्या राजकन्येने आणावयास सांगितली. त्याने तोच निरोप राजास सांगितला.

राजा वंजेस निघून गेला व बऱ्याच दिवसांनी परत आला. त्याने मोठ्या मुलीसाठी तिने सांगितलेल्या मूल्यवान वस्तू आपल्या, पण त्याला धाकट्या मुलीकरिता 'बैठो' नावाची वस्तू काही केल्या मिळेना. येथे जेथे तो विचारावयास जाई तेथे तेथे त्याला नुसता नकार मिळत नसे, तर ही कसली वस्तू म्हणून आश्चर्य व्यक्त केले जाई आणि त्याची वेड्यात गणना केली जाई. होता होता ही गोष्ट एका गावच्या वाढ्यास (सुतारास) कळली. त्याला राजेलोकांच्या लहरी चांगल्या परिचित होत्या. त्याच्या घरी लाकडाच्या ठोकळ्यांचा मोठा ढीग पडला होता. त्यापैकी एकाला काही ओबड-धोबड आकार व दंगा देऊन त्याने तो ठोकळा बरीच मोठी किंमत घेऊन राजास विकला. राजाला अखेरीस ती वस्तू मिळाल्याचा अत्यंत आनंद झाला. राजधानीत येताच त्याने दोन्ही मुलींच्या वस्तू त्यांच्याकडे रवाना केल्या. मोठीस त्या पाहून अत्यानंद झाला आणि तिने पुन्हा एकदा राजाच्या नजरेस आणून दिले, की "पाहा बाबा, तुमच्या नशिबाने मी जन्मले म्हणूनच मला किती आनंदात राहायला मिळते आहे." कन्येचे ते शब्द ऐकून राजाला अभिमान वाटला.

राजाने तो रंगीत लाकडाचा ओबडधोबड ठोकळा 'बैठो' म्हणून धाकट्या मुलीकडे पाठवून दिला. तो पाहाताच व त्याचे नाव ऐकताच तिला आपण 'बैठो' कशासाठी म्हटले आणि राजाने काहीतरी समजून काय पाठविले, त्याचा उलगडा झाला. तरी तिला त्याचे मुळीच वाईट वाटले नाही. तिने विचार केला, त्या ठोकळ्याचा काही उपयोग होणार नाही, पण जाळायला तर होईल. म्हणून

तिने दासीला त्या 'बैठो'ला अडगळीच्या लाकडात टाकून देण्यास सांगितले.

एके दिवशी तिच्या घरची लाकडे संपली. तेव्हा तिने दासीला तो ठोकळा फोडण्यास सांगितले. दासीने तो फोडला. फोडताच त्याचे दोन तुकडे झाले आणि त्यातून एक पंखा निघाला. हे काय विचित्रच. म्हणून लगबगीने आत जाऊन तिने तो पंखा आपल्या मालकिणीला दाखविला. धाकट्या राजकन्येने तो हाती घेऊन न्याहाळला व फिरवून पाहिला. किती गार वारा येत होता त्यातून! पण पाच फेरे होताच त्यातून एक सुंदर राजपुत्र निघाला. त्याला पाहताच राजकन्या गोंधळली. दासी दूर बाहेर जाऊन बसली. राजपुत्राने त्या राजकन्येला विचारले, "तू मला कशाला बोलावलेस?" राजकन्येने भानावर येऊन सर्व हकिगत सांगितली. राजपुत्राला ती ऐकून फारच वाईट वाटले. पण आता त्याला मनाजोगती राजकन्या मिळाल्याने अपरिमित आनंद झाला. राजकन्येलाही तो राजपुत्र मनापासून आवडला.

राजपुत्राने सांगितले, "मी अमूक अमूक देशचा राजा आहे. वडील-आई कुणीच नाही. मनाजोगी वधू मिळाली नाही म्हणून आपण आजवर अविवाहित राहिलो आहो. पण आता हरकत नाही. तू पुन्हा उलट पंखा फिरव म्हणजे मी आपल्या राजधानीस निघून जाईन. तुला जेव्हा जेव्हा माझी आठवण होईल तेव्हा तू पंखा घेऊन पाचदा फिरव. मी प्रगट होईन. योग्य वेळी आपण विवाह करू. कारण आपण आजच असे पळून गेलो तर राजाला व तुझ्या बहिणीला ते बरे वाटणार नाही आणि कुळालाही बट्टा लागेल. शिवाय आपण आपल्याच नशिबाने इतक्या उत्कर्षास चढलो हे आपणास दाखविता येणार नाही." राजकन्येला ती गोष्ट पटली. ह्यानंतर राजकन्येला जेव्हा जेव्हा त्या राजपुत्राची आठवण होई तेव्हा तेव्हा तिने तो पंखा फिरवावा आणि राजपुत्र प्रविष्ट होताच त्याच्या सहावासात खूप आनंद भोगावा. पुन्हा पंखा फिरविला की राजपुत्र गुप्त होई.

धाकट्या बहिणीचे काय हाल आहेत म्हणून एक दिवस मोठी बहीण तिच्या भेटीला गेली. अजूनही तिच्या मनांत अभिमानाची अढी तशीच आहे की

निवळली आहे हेसुद्धा पाहाता येईल व ती 'हरल्ये मी' म्हणून कबूल करील तर अजूनही राजाचे मन वळवून तिला राजवाड्यात बोलावून घेऊ असा तिचा अंतस्थ हेतू होता. पण तिथे ती जाताच तिला निराळाच अनुभव आला. आपली धाकटी बहीण त्या चंद्रमौळी झोपडीतही अत्यंत सुखासमाधानाने राहात आहे आणि पूर्वीपेक्षाही सुंदर व आनंदी दिसत आहे, हे पाहून तिला वैषम्य वाटले व आपले मनोगत उघड करण्याचे धारिष्ट्य तिला झाले नाही. अगोदरच ती एकलेपणाच्या आगीने नुसती होरपळून गेली होती कारण अजूनही तिच्या लग्नाचे निश्चित झाले नव्हते. त्याचा परिणाम तिच्या प्रकृतीवरही झाला होता. धाकट्या बहिणीने तिचे मनापासून स्वागत केले. तिला न्हाऊ धुवू घातले, गोडधोड केले आणि खेळीमेळीने निरोप दिला.

आपल्या धाकट्या बहिणीच्या सुखाचे कारण वडील बहिणीने मोठ्या गुप्त रितीने शोधून काढले. जेव्हा तिला कळले, की कोणीतरी राजपुत्र गुप्त रीतीने धाकट्या बहिणीकडे येत असतो आणि ती त्याच्या सहवासात मजेत दिवस घालविते, तेव्हा तिला तिच्या बहिणीचा मत्सर वाटू लागला. तिने तिचे हे सुख हिरावून घेण्याकरिता एक युक्ती योजिली. आपल्या एका दासीस विश्वासात घेऊन तिने धाकट्या बहिणीच्या पलंगावर न दिसेल अशा रितीने विषारी काचा पसरून दिल्या. नित्याप्रमाणे धाकट्या बहिणीने पंखा फिरविला व राजपुत्र प्रवेश करताच त्याला पलंगावर बसविले. थोड्या वेळाने राजपुत्र झोपी जाताच त्याला त्या काचा रुतल्या आणि खूपच वेदना होऊ लागल्या. धाकटी राजकन्या काय झाले म्हणून पहाते तो राजपुत्राच्या साऱ्या अंगभर काचा रुतलेल्या आणि वेदनाही खूपच होऊ लागल्या. पुष्कळ आषैधोपचार करून पाहिले, पण काही गुण येईना. तेव्हा राजपुत्राने सांगितले, तू पंखा फिरव, म्हणजे मी राजधानीस जाऊन पोचेन आणि तिथे औषधपाणी करून लवकर बरा होईन. चांगला झालो, की तू पंखा फिरव म्हणजे मी परत येईन." धाकट्या राजकन्येला तो विचार पटला. इकडे उजाडू लागले. तिने पंखा फिरविला व राजपुत्र नाहीसा झाला.

काही दिवस लोटले. आता राजपुत्राची प्रकृति चांगली झाली असले असे तिला वाटले. तिने पंखा फिरविला. पण नित्याप्रमाणे राजपुत्र काही प्रगट झाला नाही. आलटूनपालटून तिने दोन-चारदा पंखा फिरवून पाहिला पण काहीच उपयोग झाला नाही. तिला फार चिंता वाटू लागली. आता कसे करायचे?

पुढे मार्गशीर्ष महिना आला. वडील बहिणीचे मोठ्या थाटामाटाने लग्न झाले व ती सासरी गेली. राजाला वाटले, की धाकटी मुलगीही अभिमानाने न वागती तर तिचेसुद्धा आपण असेच थाटामाटात लग्न केले असते. तिला तिच्याच भाग्याची फार घमेंड आहे. जिरू दे ती चांगली!

कसेही करून राजपुत्राचा शोध लावून त्याच्या प्रकृतीची चौकशी केली पाहिजे. पंखा फिरवूनही तो येत नाही, तर अजूनही त्याची तब्येत ठीक झाली नसावी. पण शोध करून ती करणार कुठे? तिने कधी राजधानीच्या बाहेर पाऊल टाकलं नव्हते व राजपुत्राचा देश कुणीकडे हे पुरतेपणी विचारलेही नव्हते.

पुढे पौष मास आला. पौष मांसातला पहिला आदितवार होता तो. राजकन्या सकाळी उठली. उठून तिने स्नान केले. दासीने अंगण स्वच्छ करून सडासंमार्जन केले. त्यावर तिने सुंदर रांगोळ्या घातल्या. सूर्यमंडळ काढले आणि पाटी, पाणी, आरसा, तोंड धुण्याला राख, पाच बोरे, पाच शेंगा, एक दुर्वांची जुडी ठेवली. सूर्यनारायणाची पूजा केली. सुंदर स्वयंपाक केला. त्याचा नैवेद्य दाखविला. दुपारी भोजन केले. भोजनोत्तर दासीकडून कहाणी ऐकली. नारायणाला हात जोडले. पाच बोरे दासीला दिली, पाच बोरे आपण घेतली, राजपुत्र कुठही असो. त्याला बरे वाटू दे म्हणून नारायणाची पूजा केली. रात्रौ भोजनोत्तर पंखा काढून फिरवू लागली, पण राजपुत्र काही आला नाही. पंख्यावर डोळ्यांतून दोन आसवे गळली.

दुसरा आदितवार उजाडला. मागल्या आदितवाराप्रमाणेच तिने केले. रात्री पंखा वारून पाहिला. राजपुत्र काही आला नाही. खूप वाईट वाटले. तिच्या डोळ्यातून गळलेली दोन आसवे पुन्हा पंख्यावर पडली. तिसरा, चौथा आणि

पाचवा आदितवार उजाडला. पण पंखा फिरवूनही राजपुत्र आला नाही. आता तिचा जीव खालीवर होऊ लागला व निरनिराळे विचार तिच्या मनात डोकावू लागले. तिने मनाशी आत्महत्येचा विचार केला. राणादेवीने अंतर्ज्ञानाने हें जाणले. सूर्यनारायणास ती विनवणीच्या स्वरात म्हणाली, "स्वामी, पाच पुषा आदितवारी तिने तुमचे मनोभावे यथासांग पूजन केले, तिच्यावर कोसळलेले संकट तुम्हाला माहीत आहे, तरी त्यातून तिचे रक्षण व्हावे एवढीच माझी नम्र प्रार्थना आहे."

सूर्यनारायणाने मनाशी विचार केला व सांगितले की राजकन्येला तू स्वप्नात दृष्टान्त दे. तिच्या त्या पंख्याजवळ दहा सुंदर चमकदार मोती दिसतील. त्यांची राख करून जर ती त्या राजपुत्राचा शोध करून त्यास देईल तर तो बरा होईल, इतकेच नव्हे तर तो तिला मिळेलही. राणादेवीने नारायणास हात जोडले आणि राजकन्येस दृष्टान्त दिला.

राजकन्या गाढ झोपेत होती. ती कसले तरी स्वग्न पाहात होती. तिला आता हळूहळू त्याचा उलगडा होऊ लागला. लागलीच तिने मोत्यांची राख तयार केली. दासीला राजाच्या तबेल्यातून एक सुंदर घोडा घेऊन येण्यास सांगितले. मग तिने आपल्याजवळच्या भगव्या कपड्याचा एक साधूचा पोषाख तयार केला. कुणासही आपण कुठे जातो हे कळता कामा नये म्हणून दासीला ताकीद दिली. दासी मोठी हुषार होती. तिने निश्चिंत राहाण्याबद्दल सांगितले.

अगदी मोठ्या पहाटेसच ती धाकटी राजकन्या साधूच्या वेषात अश्वारूढ होऊन बाहेर पडली आणि मजल दर मजल करीत त्या राजपुत्राच्या गावी जाऊन पोचली. गावाबाहेर मारुतीच्या देवळाजवळ तिने तळ दिला. हां हां म्हणता गावभर ती बातमी कळली. कित्येक लोक तिथे जमले. काही पीडित लोकांना तिने ज्या राखेतील थोडी राख दिली. ते तत्काळ बरे झाले. हां हां म्हणता त्यांनी ती गोष्ट राजपुत्राच्या कानी घातली. साधूस राजवाड्यात बोलावणे पाठवले. साधूने राजपुत्राची तब्येत पाहिली व त्यास ती राख दिली आणि त्याच्या सर्वांगावरून हात फिरवला. लागलीच त्याचा देह पूर्ववत् सुंदर

दिसू लागला आणि होणाऱ्या वेदना तत्काळ बंद झाल्या.

साधूच्या हाताला गुण आला म्हणून राजपुत्र अत्यंत खूष झाला व काहीतरी मागण्यास विनंती करू लागला. पण साधूने, मला काही नको असे सांगितले. राजपुत्राने, "काही तरी मागा, वाटल्यास अर्धे राज्य देण्यास तयार आहो" असे सांगितले. पण साधूने ते सारेच नाकारले. अत्यंत आग्रह झाल्यामुळे त्याने निरुपायाने शेवटी राजपुत्राच्या हातातील हिऱ्याची आंगठी मागितली. राजपुत्राने ती लागलीच काढून दिली. साधूने ती आपल्या बोटात घातली व तो तेथून निघून गेला.

साधुवेषधारी राजकन्या ताबडतोब आपल्या झोपडीकडे रवाना झाली. त्या वेळी जेवण-रात्री झाले असेल. दासीकरवी घोडा परत करून तिने स्नान केले. भोजन केले व पंखा फिरविला. ताबडतोब राजपुत्र तेथे हजर झाला.

राजकन्येने "किती उशीर करून आलात" असे विचारून आपण हे दिवस कसे घालविले असतील त्याची कल्पना दिली. राजपुत्रानेही घडलेला वृत्तान्त सांगितला आणि एका साधूने आपणास औषध देऊन बरे केले म्हणूनच आपण येऊ शकलो, नाहीतर ते शक्यच नव्हते, असे सांगितले. इतक्यात त्याचे लक्ष राजकन्येच्या बोटातील आंगठीकडे गेले. तो एकदम, चमकला. भीतभीतच त्याने राजकन्येला विचारले. राजकन्येने हसत हसत सर्व माहिती सांगितली व आता आपणला लवकर विवाहबद्ध झाले पाहिजे, असे सांगितले.

कर्णोपकर्णी राजाच्याही कानी धाकट्या मुलीची गुप्त गोष्ट आली आणि तिचे म्हणणेही राजाला पटू लागले. त्याने तिची एकान्तात भेट घेतली आणि त्याच वेळी तो राजपुत्रही तेथे प्रगट झाला. त्यांचे मोठ्या थाटाने राजाने लग्न केले.

(विनायक वासुदेव जोशी : चंद्रपुरी लोककथा)

# ७.१४ माणकांचं फूल

आटपाट नगर होतं. तिथं एक राजा राज्य करीत होता. राज्य मोठं सुखाचं होतं. या राजाला मुलगा नव्हता खरा, पण एकुलती एक अशी एक अतिशय सुंदर, अतिशय गुणी अशी मुलगी होती. मुलीचं नाव होत चंद्रप्रभा. नावाप्रमाणंच ही चंद्राच्या शीतळ प्रकाशानं आल्हाद द्यावा तसा सर्वांना आल्हाद द्यायची. साऱ्यांचा चंद्रप्रभेवर जीव होता. राजालाच काय, राणीलाच काय, प्रजेलाही तिचं खूप कौतुक वाटायचं. त्यामुळे चंद्रप्रभा उपवर झाली त्यावेळी तिला योग्य असाच चांगलासा वर मिळावा म्हणून राजाप्रमाणंच साऱ्यांनाच मोठी हुरहूर लागून राहिली होती.

चंद्रप्रभेच्या या स्वयंवराची योजना झाली. स्वयंवरासाठी भव्य मांडव उभारला गेला आणि वैभवाला साजेसा नटवलाही गेला. निरनिराळ्या देशांचे ' राजे, युवराजे तिथं येणार होते. त्यांची सर्वांची राजेशाही व्यवस्था ठेवण्यात आली होती. उत्तम उंची आसनं मांडवात मांडली गेली होती. स्वयंवराच्या दिवशी एकच धमाल उडाली. एकच लगबग दाटून राहिली होती. विशेष म्हणजे कसलाही पण लावलेला नव्हता मग तो जिंकण्याचा प्रश्नच नव्हता. तथापि सारे शूर राजे युवराजे मोठ्या उत्सुकतेने मांडवातील आसनांवर बसले होते..

वधूच्या वेषात नटलेली सुंदर चंद्रप्रभा हातात लगीनमाळ घेऊन आपल्या सखीबरोबर मांडवात आली. लगीनमाळ हातात घेऊन ती या राजे युवराजांच्या आसनांपुढून हळूहळू जात होती. चंद्रप्रभेला त्या त्या व्यक्तीची माहिती सांगण्यात येत होती. मंद हसत शांतपणे चंद्रप्रभा माहिती ऐकून घ्यायची, आणि त्या त्या आसनावर बसलेल्यांकडे एक नजर टाकून हळूच पुढे जायची. चंद्रप्रभा पुढेच जात होती. अजून तिनं कोणालाच पसंत केलं नव्हतं. बऱ्याच जणांची त्यामुळं निराशा झाली होती. राजाच्या चेहऱ्यावर काळजी उमटू लागली होती.

तरी तो निरनिराळ्या देशांच्या निरनिराळ्या राजांची युवराजांची माहिती चंद्रप्रभेला सांगतच राहिला होता. होता होता मग एका आसनाजवळ राजा व चंद्रप्रभाही आली. राजानं माहिती सांगायला सुरुवात केली. चंद्रप्रभेनं आसनावर बसलेल्या तेजस्वी विक्रमाकडे पाहिलं आणि तिला तो पसंत पडला. तिनं आपल्या वडिलांकडेही पाहिलं. ते विक्रमाकडे मोठ्या आपुलकीनं पहात बोलत होते. हे पाहून चंद्रप्रभेचा विचार पक्का झाला आणि तिनं विक्रमाच्या गळ्यांत लगीनमाळ घातली.

अलकापुरीच्या तरुण युवराजाचं, विक्रमाचं, जावई म्हणून खूपच कौतुक झालं. विक्रमाच्या आणि चंद्रप्रभेच्या विवाहाचा सोहळा हौसेनं आणि दिमाखानं साजरा झाला. राजेशाही इतमामानं चंद्रप्रभेची पाठवणी सासरी झाली. चंद्रप्रभा आपल्या लवाजम्यासह विक्रमबरोबर अलकापुरीकडे निघाली. वऱ्हाड वाटचाल करीत होतं. इतक्यात त्याची पवनखिंड नावाच्या खिंडीजवळ अडवणूक झाली. मोठ्या आनंदात मग्न असलेलं वऱ्हाड बावरलं खरं पण लगेच अचानक झालेल्या हल्ल्याला तोंड द्यायलाही सरसावलं.

गोष्ट अशी होती की, चंद्रप्रभेच्या स्वयंवराला कमलपूरचा राजा शूरसेन हाही आला होता. मोठ्या हौसेनं आणि आशेनं आला होता तो. परंतु चंद्रप्रभेनं त्याला नाकारलं होतं. त्याच्या आसनापुढून जाताना नाक मुरडलं होतं. हे पाहून शूरसेनाचा जळफळाट उडाला होता. विक्रमला चंद्रप्रभेनं माळ घातल्यावर विक्रमच्या नि चंद्रप्रभेच्या जयजयकाराची जी लाट उसळली होती त्याच वेळी हा अचानक मांडवातून निघून गेला होता. आणि गेला होता तोही लग्नात विघ्न आणण्याचा पण करूनच. कमलपूरला जाऊन त्यानं आपलं बरचसं सैन्य गोळा केलं. आपला जादूगार मित्र कुमारील याला बरोबर घेतलं आणि पवनखिंडीकडे कूच केली. लग्नाचं वऱ्हाड अलकापुरीकडे जात असताना हल्ला करायला ते सारे सज्ज झाले होते...

त्यामुळं वऱ्हाड पवनखिंडीशी येताच त्याच्यावर जोराचा हल्ला केला होता. नवऱ्या मुलासकट सारेजण लढू लागले होते. चांगलीच लढाई जुंपली आणि

लढाईच्या नादात सारेजण असतानाच जादूगार कुमारील चंद्रप्रभेजवळ गेला!... जादूचा मंत्र म्हणवून त्यानं चंद्रप्रभेला फूल बनवून टाकलं!... मौल्यवान माणकांचं फूल! ते देखणं फूल आपल्या मंदिलाच्या तुऱ्यात खोवून तो कमलपूरला येऊन दाखलही झाला!

मुलगी सासरी जात असताना वाटेतच हल्ला होऊन लढाई जुंपली असल्याची बातमी राजाला कळली होती म्हणून आपलंही निवडक सैन्य घेऊन तो मदतीला आला होता. कमलपूरच्या शूरसेनाच्या सैनिकांनी माघार घेतली होती. शूरसेनानं तर सर्वांच्या अगोदर पळ काढला होता आणि कमलपुरातल्या आपल्या राजवाड्यात येऊन तो पोचलादेखील होता.

लढाईत मार खाऊन आला होता तरी शूरसेन आपल्या जादूगार मित्राला सुखरूप आलेला पाहून आनंदला होता. लढाईत झालेली फजिती ध्यानात न घेता तो निर्लज्जपणे चंद्रप्रभेची चौकशी करू लागला. शूरसेनाचा हा निर्लज्जपणा पाहून जादूगार कुमारीलनं एक डाव आखला. राजाला न कळेल अशा बेतानं त्यानं आपल्या मंदिलातलं माणकांचं फूल काढून लगोलग त्याच्यावर आणखी एक मंत्र घातला. त्यामुळं झालं काय की, त्या फुलाला काही प्रमाणात भावना निर्माण झाल्या. कुठलीही नावडती गोष्ट ऐकली की माणकांच्या फुलात गुप्त झालेली चंद्रप्रभा संताप दाखवू लागली. अशा वेळी फुलातली सारी माणकं एकमेकांवर थडाथड आपटून त्यातून गडद गुलाबी जाळ उठायला लागला!.. राजाला या फुलाचं आश्चर्यच वाटलं. चंद्रप्रभा झाल्या प्रकारानं नुसती भडकून गेली होती. तो आधीचा तिचा संताप राजाच्या कुठल्याही बोलण्यासरशी बेफाम व्हायचा आणि अशा वेळी माणकं एकमेकांवर आपटून गुलाबी जाळ उठायचा. हा प्रकार तीन चार वेळा झालेला पाहून राजानं विचारलं, " हे काय कुमारील? मी विचारतोय की चंद्रप्रभा कुठाय आणि तू उत्तर न देता गप्प का बसलास? आणि हे फूल कसलं? कुठून आणलं आहेस? निराळंच दिसतंय हे फूल?...

हे ऐकून कुमारील माणकांचं फूल दाखवीत म्हणाला, " महाराज, अहो हीच

ती तुमची चंद्रप्रभा."

“म्हणजे?” राजानं डोळे विस्फारीत विचारलं.

“अहो तिला तिच्या खऱ्या रूपात आणता आली असती का?... सांगा ना?... मग?... मी तिला बनवलं माणकांचं फूल... ती आपल्यापुढं या तऱ्हेने हजर आहे महाराज.

राजा शूरसेन कमालीच्या उत्सुकतेनं पुढं झाला. आणि त्यानं कुमारीलच्या हातातल्या फुलाला हात लावला. त्याबरोबर माणकं एकमेकांवर आपटली आणि इतका तेजस्वी जाळ उठला की राजा त्याच्यामुळे जणू जळून खाक झाला! काळा ठिक्कर पडला तो!...

या प्रकारानं तो दुष्ट राजा इतका संतापला की त्या संतापाच्या भरात कुमारीलच्या थोबाडात मारीत त्यानं कर्कश आवाजात विचारलं, “कायरे? काय प्रकार आहे सारा?”

तेव्हा कुमारील गाल चोळीत म्हणाला, “महाराज, साधी-सुधी गोष्ट नाही ही. चंद्रप्रभा आहे ही. आपल्या गुणामुळं साऱ्यांची आवडती झालेली चंद्रप्रभा, ती अतिशय तेजस्वी आहे. तिला उपमर्द नाही सहन होणार कधीच.”

“मग याला आता उपाय?” राजानं जरा 'नरमतच विचारलं तेव्हा हा म्हणाला

“मी सारं ठीक करून देऊ शकेन महाराज...”

“खरंच?”

“पण एक अट आहे...”

“कोणती अट?”

“आपण मला अर्ध राज्य दिलं पाहिजे.”

हे शब्द ऐकताच कुमारीलचा मतलब ध्यानात येऊन राजा चिडून ओरडला, “कोण आहे रे तिकडे? या स्वार्थी माणसाच्या हातापायांत बेड्या घालून त्याला अंधार कोठडीची हवा दाखवा!... माझ्याशी खेळ खेळतोय!...”

राजाचे शिपाई तिथं येऊन पहातात तो तिथं राजाशिवाय कोणीच उरलं नव्हतं. कुमारील माणकांच्या मुलासह अदृश्य झाला होता!

हा मतलबी जादूगार शूरसेनाच्या कमलपुरातून जो निघाला, तो अलकापुरीत विक्रमाच्या पुढ्यात येऊन उभा राहिला. लग्न करून आलो खरं, पण वधू वाटेतच गमावली या विचारानं विक्रमासारखा सुंदर नि शूर पुरुष मलूल होऊन गेला होता. अशातही हा जादूगार त्याच्यापुढं येताच त्यानं त्याचं आगत स्वागत केलं आणि त्याची विचारपूस केली.

कुमारीलनं विक्रमलाच विचारायला सुरुवात केली, "युवराज, मला सारं कळलंय... काही पत्ता लागला की नाही अजून ?"

विक्रमनं उत्तर दिलं नाही. नुसती नकाराची मान हलवली व विचारलं, "सारं खरं पण तुम्ही कोण ?"

तेव्हाही कुमारीलनं सरळ उत्तर दिलं नाही. तो म्हणाला, "मी जर शोध लावून दिला तर काय द्याल मला ?"

"काय हवं तुम्हांला?"

"मला आपलं अर्ध राज्य द्याल का ?"

तर विक्रम म्हणाला, "महाराजांना सांगितलं पाहिजे हे." मग दोघे विक्रमच्या वडिलांकडे गेले आणि त्यांना तसं विचारलं तेव्हा तो राजा धूर्तपणे म्हणाला, "हो, देऊ की अर्ध राज्य."

गंमत अशी होती की, एव्हापर्यंत राजानं योग्य बक्षीस देऊ एवढंच जाहीर केलं होतं. पण "हा कोण कुठला नि एकदम येऊन सांगतोय की मी वधूचा शोध लावून देतो न् मला अर्ध राज्य द्या." तेव्हा पाहूया हो म्हणून असा राजानं विचार केला.

आणि मग त्यानं सांगून टाकलं की "देईन अर्ध राज्य तुला. शोध लाव आमच्या सूनबाईचा."

कुमारीलनं तिथल्या तिथं ते माणकांचं फूल निर्माण केलं. दिसत नव्हतं ते दिसतं केलं. त्यावेळी ते फूल इतकं चमचमलं की वाटलं खुदकन हसतंच आहे. राजा आणि विक्रम पहातच राहिले. लकाकणाऱ्या फुलाकडे बोट करीत राजा म्हणाला, "हे काय?"

तशी कुमारील म्हणाला, "महाराज, युवराजांनी आपल्या स्वतःच्या उजव्या.

हाताच्या अंगठ्यातून रक्त काढून फुलाच्या देठाला तिलक लावावा."

"म्हणजे काय होईल?"

"पहा तर खरं, आपल्याला हवं ते घडेल."

राजानं विक्रमला खुणावलं. विक्रमनं स्वतःची तलवार हाती घेत उजव्या हाताच्या अंगठ्याला जखम केली व पुढं होत त्या चमकत्या माणकांच्या फुलाला रक्ताचा टिळा लावला. त्यासरशी केवढं नवल घडलं. ते फूल जादूगाराच्या हातून हळूच सटकलं आणि आपल्या असंख्य पैलूंच्या चमचमाटानं साऱ्यांना दिपवीत त्यातली माणकं थरथरू लागली. बघता बघता फूल मानवी आकार घेऊ लागलं आणि त्या फुलामधून चंद्रप्रभा साजिवंत झाली.

हरवलेली ही गुणांची खाण समक्ष उभी राहिलेली पहाताच राजा गहिवरला. विक्रमाला आनंदानं काही सुचेनासं झालं. राजानं ही आनंदाची बातमी जाहीर केली आणि आनंदोत्सव सुरू करायला लावला. चंद्रप्रभेच्या आईवडिलांनाही हो गोष्ट कळवली. खूप खूप आनंद झाला सर्वांना.

चंद्रप्रभा तर चांगलीच सुखावली होती. पण सुखावली म्हणून सावधगिरी विसरली नव्हती. आनंदोत्सव साजरा होत असताना तिनं आपल्या नवऱ्याला, सासऱ्यांना नि सासूबाईंना एका महालात बोलावून सारी हकिगत सांगितली. आजवरची सारी हयात यानं दुष्ट शूरसेनाच्या सहवासात घालविली असल्यानं हा स्वतःही किती दुष्ट आहे ते सांगितलं, आणि म्हणाली " अर्ध राज्य द्यायचं कबूल केलंत ते ठीकच केलंत, कारण त्याखेरीज पुन्हा त्यानं मला जिवंत केलंच नसतं. पण आता त्याचा काही तरी बंदोबस्त करा. स्वतःच्या मित्रावरही तो स्वतःच्या मतलबासाठी उलटला, तर तुम्हा आम्हांला किती छळेल. आज अर्धं राज्य मागितलं उद्या आणखी काही मागेल ते लगेच दिलं नाही की स्वतःच्या मंत्रशक्तीचा अत्यंत आसुरी वापर करून तो आपल्याला पिडून टाकील. तेव्हा त्याला काहीच चाहूल लागू न देता त्याचा तात्काळ नाश करावा हे उत्तम, नाही का? चंद्रप्रभेचं बोलणं सर्वांना पटलं, पण यातून नेमका मार्ग कोणता काढायचा हे

कोणालाच सुचेना.

राणी म्हणजे चंद्रप्रभेची सासू म्हणाली, “सूनबाई तो माणूस दुष्ट हे तर खरंच. परंतु हेही लक्षात घेतलं पाहिजे की, त्याच्यामुळे तुझं एक प्रकारे रक्षणच झालं आहे. त्यानं तुझ्याशी वाईट वर्तन केलं नाही की दुष्ट शूरसेनाच्या ताब्यातही तुला दिलं नाही. तेव्हा त्याला ठार करणं मला पटत नाही.”

“पण त्याच्या दुष्टबुद्धीवर नि मंत्रशक्तीवर वचक बसायला हवा ना?”

विक्रम मध्येच म्हणाला, “मंत्रशक्ती नाहीशी केली म्हणजे झालं.”

राजा म्हणाला, “मंत्रशक्तीचा दुष्ट बुद्धीनं तो वापर करतोय खरा. ती नाहीशी व्हायला हवी. पण ती कशी करायची नाहीशी? “विक्रम एकदम म्हणाला, “ठरलं, त्याची मंत्रशक्ती नाहीशी करणार मी. माझ्याकडे लागलं हे काम.”

“छान, पण कुणी विरोध केला तरी मी त्याला अर्ध राज्य देणार. माझा शब्द मला जपला पाहिजे.” राजा म्हणाला, यावर कुणीच काही म्हटलं नाही आणि त्यांची मसलतही इथेच थांबली.

विक्रमनं यानंतर खूप विचार केला आणि या बाबतीत राजवैद्याचा सल्ला घेऊन विचारलं, “त्याची मंत्रशक्ती तेवढी नाहीशी झाली पाहिजे. आहे का काही उपाय तुमच्याकडे?”

तेव्हा वैद्यानं विचार करून तशा तऱ्हेचं औषध शोधून काढलं. एक भस्म होतं ते. आता ते जादूगार कुमारील याला चारायचं कसं? मग विक्रमनं एक थाटाची मेजवानी दिली आणि केवळ कुमारीलच्याच समोरच्या ताटातल्या दुधाच्या वाटीमध्ये ते भस्म पडेल याची त्यानं चोख व्यवस्था केली. नंतर त्या भस्मानं आपलं काम बजावलं.

कुमारीलची मंत्रशक्ती आणि दुष्ट बुद्धी नाहीशी झाली. या गोष्टीची खात्री करून घेण्यासाठी राजा उगीचच म्हणाला, “अर्ध राज्य द्यायचं म्हणजे चेष्टा आहे काय? मी नाही देणार अर्ध राज्य. खूप मोलाचा नजराणा देतो हवं तर.”

या शब्द पालटीनं कुमारील चकित झाला खरा. पण तो दबकला. एरवी चिडून त्यानं शाप दिला असता, समोरच्या निरनिराळ्या माणसांचे निरनिराळे

प्रकार करून सोडले असते. पण तो एवढंच म्हणाला, “दिलेला शब्द न पाळणं शोभत नाही क्षत्रियाला.”

मग सारं ठीक झालं. एक फार मोठी धास्ती साऱ्यांना दडपत होती ती नाहीशी झाली. जादूगार कुमारील एका छोट्या राज्याचा स्वामी झाला. मग राजा, राणी, विक्रम आणि चंद्रप्रभा सारीच सुखावली. आनंदित झाली. मोठ्या सुखानं दिवस चालले त्यांचे. काही काळानं राजा, राणी, चंद्रप्रभेचे आईवडील आपला राज्यकारभार या दोघांवर सोपवून वनात निघून गेले. दोन्ही राज्यांची जबाबदारी अंगावर पडली. अशावेळी काही भागात सीमा जुळलेलीच असल्यानं त्यांनी दोन्ही राज्ये एक करून टाकली आणि वरचेवर वनात जाऊन या थोर राजाचं मार्गदर्शन घेत, आशीर्वाद घेत दोघांनी सुखाचं आणि आनंदाचं राज्य केलं, आपल्या प्रजेचा दुवा घेतला. त्यांचं राज्य आनंदाचं झालं तसं ते तुमचं आमचं पण होवो.

(पुनःकथन : सौ. शरदिनी मोहिते - सांगीवांगी (संपा.सरोजिनी बाबर))

# ७.१५ जीवनदान

असाच एक राजपुत्र होता. तो दररोज एका सुशोभित नावेत बसून नदीतून फिरायला जायचा. त्यावेळी राजपुत्राच्या हातात एक गलोल असे आणि नावेत खडे भरून ठेवलेले असत. नदीच्या काठानं कुणी दिसलं रे दिसलं की, तो आपल्या गलोलीनं नेम धरून दगड मारायचा. आपल्या दगडानं एखाद्याचा डोळा फुटला, डोक्याला खोक पडली, डोईवरची मातीची घागर फुटून सारं अंग पाण्यानं भिजून गेलं की, त्याला गंमत वाटे. दगडानं जखमी झालेला माणूस तळमळू लागला म्हणजे त्याला आनंदाच्या उकळ्या फुटत. तो जोरजोरानं पोट धरधरून हसू लागे.

तर एकदा काय झालं की, या राजपुत्राची नजर एका देखण्या मुलीवर पडली. ती साधीभोळी मुलगी आपल्या मातीच्या घागरीत नदीचं पाणी घेऊन घरी चालली होती. राजपुत्रानं तिच्या घागरीवर गलोलीनं खडा मारला आणि आपली नाव किनाऱ्याला लावण्याचा नावाड्यांना हुकूम दिला.

इकडे राजपुत्राच्या खड्यानं त्या मुलीची घागर फुटली होती म्हणून ती घाबरली होती. आता ती तेथून पळून जाणार इतक्यात राजपुत्र तिथं पोचला आणि त्यानं तिला पकडलं. त्याबरोबर त्या मुलीच्या अंगात वीरश्री चढली. तिनं त्याचा हात झटकून टाकला आणि त्याची चांगली खरडपट्टी काढली, “तू राजपुत्र असून असला हलकटपणा करायला तुला लाज कशी वाटत नाही?”

तिच्या त्या कडक शब्दांनी राजपुत्राचा पारा जास्तच चढला. त्यानं त्या कोवळ्या मुलीच्या गालावर फाड फाड थपडा मारल्या. तशी ती मुलगी रडत ओरडत घराकडे गेली. परंतु जाता जाता ती राजपुत्राला एवढंच म्हणाली, “दुष्टा, आजवर तू नुसता दुरूनच लोकांना त्रास देत होतास, पण आता बायाबापड्यांच्या अंगावरही हात टाकू लागलास! जा! तूं आंधळा होशील,

जोपर्यंत तू माझ्या या गवताच्या चुंबळीची राख आपल्या डोळ्यांना लावणार नाहीस तोपर्यंत तू आंधळाच राहशील. देव माझी ही शापवाणी अवश्य खरी करील." त्यावेळी राजपुत्रानं तिच्या बोलण्याला मुळीच भीक घातली नाही.

पण रात्री जेव्हा तो झोपायला आपल्या महालात गेला तेव्हा एकाएकी त्याचे डोळे सुजले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी तर त्याला काही दिसेनासंही झालं! तो खरोखरीच आंधळा झाला!

बादशहाला ही बातमी कळताच तो धावतच राजपुत्राच्या महालात गेला. आपल्या शाहजाद्याची ती अवस्था बघून त्याचं काळीज उडून गेलं. त्यानं ताबडतोब राजवैद्याला बोलावून घेतलं आणि राजपुत्राच्या डोळ्यांवर उपचार करायला सांगितलं. राजवैद्यानं आपल्याकडून प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण त्याला यश आलं नाही. मग बादशहानं देशोदेशींच्या वैद्यांना, हकिमांना बोलावून त्यांच्याकडून उपचार करविले. पीर-फकीर, साधू-बैरागी, जादूटोणे, अंगारे-धुपारे, बकऱ्या-कोंबड्यांचे बळी वगैरे सारे उपाय करण्यात आले. परंतु कशाचाही उपयोग झाला नाही.

मग मात्र एक दिवशी बादशहा राजपुत्राला म्हणाला, "बाळ, तुला कुणाचा तरी शाप बाधलेला दिसतोय. खरं सांग, तू कुणाला त्रास दिला होतास काय?"

बापाचे हे शब्द ऐकताच राजपुत्राला त्या मुलीच्या शापाची आठवण झाली. त्यानं रडत रडत सारी हकिगत बादशहाला सांगितली आणि तो म्हणाला, "बाबा, मी जर तिच्या औषधानं बरा झालो तर मी तिला सख्ख्या बहिणीप्रमाणं वागवीन. काहीही करून तुम्ही तिचा ठावठिकाणा शोधून काढा. मी तिचे पाय धरीन. यापुढं कुणालाही मी त्रास देणार नाही."

दुसऱ्या दिवशी बादशहानं सगळीकडे दवंडी पिटवून जाहीर केलं की, "ज्या मुलीला राजपुत्रानं त्रास दिला होता तिच्या शापानं शाहजादा खरोखरीच आंधळा झाला आहे. तरी आता त्या मुलीनं आमच्यावर दया करून राजपुत्राचे डोळे पहिल्यासारखे करून द्यावेत. तिला आमचं अभय आहे. आम्ही तिला आमची मुलगी आणि राजपुत्राची बहीण मानतो."

त्या मुलीनं ही दवंडी ऐकली आणि बादशहाला निरोप धाडला की, "माझ्या

भावाला जर खरोखरीच आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झालेला असेल तर त्यानं माझ्याकडे येऊन उपचार करून घ्यावा. मात्र ज्या थाटामाटात तो पूर्वी लोकांना त्रास द्यायला बाहेर पडत असे त्याच राजेशाही थाटात त्यानं माझ्याकडे आलं पाहिजे."

हा निरोप ऐकताच राजपुत्र उठला आणि पूर्वीच्याच थाटामाटानं बसून त्या मुलीच्या घरी गेला. तो दाराशी येताच त्या मुलीनं त्याला विचारलं, "भाऊ, तू आपला दुष्टपणा खरोखरीच सोडून दिलास काय?"

राजपुत्र काकुळतीला येऊन म्हणाला, "ताई, देवाची शपथ घेऊन मी तुला सांगतो की, माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी माझ्या माणसांना कधीही त्रास देणार नाही. तुझ्या गळ्याची शपथ, मी कधीही, कुणाही स्त्रीचा अपमान करणार नाही."

त्याचे ते तळमळीचे शब्द ऐकताच त्या मुलीची खात्री पटली. तिनं आपल्या गवताच्या चुंबळीतल्या चार काड्या काढून त्या जाळल्या आणि त्यांची राख राजपुत्राला देऊन ती म्हणाली, "भाऊ, ही राख घे अन् सुरम्यासारखी डोळ्यांत घाल. देव तुझं भलं करील."

राजपुत्रानं ती राख अंजनासारखी आपल्या डोळ्यांत घातली. त्याबरोबर त्याची दृष्टी पुन्हा परत आली. तो आनंदानं नाचू लागला. म्हणाला, "ताई, आज तू मला जणू जीवदान दिलंस. ऊठ. आता तुझं स्थान यापुढं या झोपडीत नाही. जिथं भाऊ तिथं बहीण. यापुढे तूर माझ्याबरोबर राजवाड्यातच राहिलं पाहिजेस. माझी खरी पाठीराखी आता तूच."

राजपुत्र मग त्या मुलीला व तिच्या घरच्या सगळ्या मंडळींना घेऊन राजवाड्यात रहायला गेला. सगळीकडे मग आनंदी आनंद झाला. सर्वजण सुखात राहू लागले. तसे तुम्ही आम्ही पण राहू या.

(पुनःकथन : श्री. श्रीपाद जोशी - सांगीवांगी (संपा.सरोजिनी बाबर))

# ७.१६ मणिधर आणि राजकुमार

(बिहाराची लोककथा)

एका वनात एक मणिधर साप राहत होता. तो रोज रात्री आपला मणी तोंडातून बाहेर काढून त्याच्या प्रकाशात कीटके शोधून खात असे. पोट भरण्यासाठी त्याला रोज अशी हिंसा जरी करावी लागत असे तरी पण तो चांगला स्वभावाचा होता. त्याच्या बिलाजवळ दाट वनराई होती. त्यावर पक्ष्यांनी आपली घरटे बांधली होती. दिवसा जेव्हा पक्षी चाऱ्यासाठी दूर दूर निघून जात तेव्हा तो साप त्यांच्या पिल्लांचे रक्षण करीत असे. रात्री पण जर एखादे पिल्लू खाली पडले तर तो त्याला पुनः घरट्यात नेवून ठेवीत असे. तो पारध्यांपासून देखील त्यांचे रक्षण करीत असे. जर एखाद्या पारध्याने पक्ष्यांना पकडण्याकरिता जाळे टाकले तर तो साप त्याला दंश करीत असे. त्यामुळे पक्षी त्याचा फार आदर करीत.

एक दिवशी एक शिकारी तेथील मोठ्या झाडावर मचाण बांधून सावजाची वाट पाहू लागला. तो दिवसभर तेथे बसून राहिला पण त्याला सावज दिसलाच नाही. रात्री तो मचाणावर बसला होता. तेव्हा त्याला एका ठिकाणी प्रकाश दिसला. तो प्रकाश सापाच्या मणीचा होता. एका झटक्यात त्याने तो मणी उचलून खिशात टाकला. मणी नाही पाहून सापाला फार राग आला आणि त्याने शिकाऱ्याचा पाठलाग केला. पंरतु तो चढून मचाणावर जावून बसला. जेव्हा साप वर चढू लागला तेव्हा त्याने आपल्याजवळील भाल्याने त्याला मारून टाकले. सापाला मारून शिकारी झाडावरून खाली उतरला आणि त्या मृत सापाला आपल्या गळ्याभोवती लपेटून प्रसन्न मनाने चालू लागला. त्याने खिशातून मणी काढून हातात ठेवला. मृत सापाला शिकाऱ्याच्या गळ्यात पाहून पक्ष्यांच्या सरदाराला फार राग आला. त्याने चीं-ची आवाज काढून सगळ्या पक्ष्यांना ही बातमी दिली. पहाता पहाता सर्व पक्षी त्याच्या डोक्यावर आघात करू लागले.

त्यामुळे तो बेशुद्ध झाला. एका मैनेला त्याची कीव आली. तो शिकारी कौशल देशाचा राजकुमार होता आणि ती मैना मागच्या जन्मी त्याची प्रेयसी होती. तेव्हा ती सामंताची सुंदर कन्या होती. तिने विरह व्याकूळ होऊन आपल्या प्राणत्याग केला होता. मैनाने आपली कथा सांगून पक्ष्यांच्या सरदाराला आपल्या प्रियकराच्या प्राणाची भिक्षा मागितली. सरदाराला दया आली. आणि मग शेकडो पक्षी आपल्या पंखांनी राजकुमारास वारा घालू लागले. त्यामुळे तो शुद्धीवर आला. राजकुमाराने आपल्या प्रेयसीला ओळखले आणि तिला वचन दिले की पुढच्या जन्मात तो तिच्याशी लग्न करून तिला सुख देईल. पक्ष्यांच्या सरदाराने एका जडीबूटीने सापाला जिवंत केले. तो मणी सापाला दिला आणि मग सर्वजण आनंदाने राहू लागले.

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ७.१७ पारितोषिक

(उत्तर भारतीय लोककथा)

कामनगरचा राजा विद्वान, मूर्तिकार, चित्रकार यांचा खूप आदर करीत असे. त्याच्या राज्यात दरवर्षी एक मूर्तिस्पर्धा होत असे. राज्यातील मूर्तिकार मूर्त्या तयार करून राजदरबारात येत आणि स्वतः राजा त्यांचे बारीक निरीक्षण करून पारितोषिक घोषित करीत असे.

राजाच्या मंत्र्याचा मुलगा अजय पण मूर्त्या बनवित असे पण तो काही उत्कृष्ट मूर्तिकार नव्हता. परंतु त्याची इच्छा हीच असे की कसेही करून प्रथम पारितोषिक पटकावे. मंत्री पण चतुर होता. तो काही तरी युक्ती करून मुलाला कसे बक्षीस मिळेल याचा तो विचार करू लागला.

ठरलेल्या दिवशी सर्व मूर्तिकार मूर्त्या घेऊन आले. रामकिरण नावाच्या मूर्तिकारने राजाची अतिशय सुंदर मूर्ती तयार केली होती. ती पहाताच मंत्री समजून गेला की नक्कीच या मूर्तीला प्रथम पारितोषिक मिळेल. त्याने रामकिरणला एकीकडे नेऊन सांगितले, खरंच, तू सुंदर मूर्ती बनविली आहेस. या मूर्तीला घेऊन माझ्या घरी ये. मी हिचे चांगले निरीक्षण करीन.

रामकिरण मूर्ती घेऊन मंत्र्याच्या महाली गेला. मंत्री व त्याच्या मुलाने रामकिरणचे हाथ पाय बांधून त्याला एका खोलीत डांबून टाकले. आणि त्या मंत्र्याचा मुलगा अजय ती मूर्ती घेऊन दरबारात हजर झाला. राजा ती मूर्ती पाहून अतिशय प्रसन्न झाला आणि अजयला प्रथम पारितोषिक मिळाले.

दोन दिवसानंतर रामकिरणला सोडून देण्यात आले. त्याने ही गोष्ट कोतवालाला जाऊन सांगितली. कोतवाल प्रामाणिक होता. परंतु काही प्रमाण नसल्यामुळे तो काहीच करू शकत नव्हता.

एक दिवस राजा, मंत्री आणि कोतवाल शिकारीला गेले. राजा आणि मंत्री पुढे होते. कोतवालाला रस्त्यात चमकणारे मोती पडलेले दिसले. ते पहाताच तो समजला की हे मोती राजाच्या गळ्यातील हारातून तुटून पडले आहेत. त्याने घोड्यावरून उतरून पटकन ते उचलून घेतले. जेव्हा राजा परतला तेव्हा

त्याच्या लक्ष्यात आले की आपले मोती कुठेतरी पडले आहेत. त्याने दंवडी पिटवली, “ज्याला पण हारातील मोती मिळाले आहेत त्यांनी ताबडतोब आणून द्यावे. नाहीतर पकडल्यावर त्याचा शिरच्छेद केला जाईल.”

परंतु तपास करूनही मोती मिळाले नाही, वर्ष झाले. मूर्ती स्पर्धा जाहीर झाली. कोतवालने रामकिरणकडून राजाची सुंदर मूर्ती बनविली. पण कोतवालाने त्याला सांगितले की यावेळेस तू जाऊ नकोस आपल्या लहान भावाला पाठव.

तिकडे मंत्री आणि अजय लक्ष्य ठेवून होतेच की यावर्षी कोणाची मूर्ती सुंदर आहे. रामकिरणच्या भावांची मूर्ती सुंदर होतीच. मागच्या वर्षीप्रमाणे त्यांनी त्याला खोलीत डांबून टाकले व अजय मूर्ती घेऊन दरबारात हजर झाला.

लागलीच कोतवाल उभा राहिला व म्हणाला, “महाराज, माझ्या गुप्तहेरांनी तपास केला आहे त्यावरून ह्या मूर्तीत आपल्या हाराचे मोती लपवून ठेवले आहे.” हे ऐकून सर्व स्तब्ध झाले. मूर्ती तोडताक्षणी त्यातून मोती निघाले.

हे पाहताच अजय राजाच्या पायावर डोक टेकवीत म्हणाला, “महाराज, चुकीची माफी असावी. ही मूर्ती मी बनविली नसून दुसऱ्या मूर्तिकाराने बनविली आहे.” आणि त्याने सर्व सत्य सांगून टाकले. राजा खूप चिडला आणि त्याने मंत्री आणि अजय दोघांना कैद केले.

रामकिरणला दरबारात आणले. मोत्यांच्याबद्दल त्याला विचारले तेव्हा तो चूप राहिला. तेव्हा कोतवाल म्हणाला, “महाराज, मीच ह्याला मूर्तीत मोती टाकण्यास सांगितलं होत. खरं तरं मोती माझ्याजवळच होते. मी, मंत्री आणि त्याच्या मुलाच्या दुष्कर्माचा गौप्यस्फोट सर्वांसमक्ष करू इच्छित होतो. यांनी मूर्तिकाराला खोलीत कैद करून कलेचा तर अपमान केलाच आहे. आपल्याला धोका दिला आहे. तसेच मंत्रीपदाचा देखिल दुरूपयोग केला आहे.”

हे सर्व ऐकून राजाने कोतवालाला हार बक्षीस म्हणून दिला आणि रामकिरणला मूर्तिकाराचे प्रथम पारितोषिक प्रदान केले.

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ७.१८ खुर्चीची किमया

(राजस्थानची लोककथा)

अलाखिया बाबा आपल्या धुनीच्या चोहोबाजूनी बसलेला लोकांना एक गोष्ट सांगत होते. एक उज्जैन नगरी होती तेथे राजा विक्रमादित्य राज्य करीत होते. एक दिवस एक शिपाई येऊन दिवानांना म्हणाला की एका झाडाखाली एक शिपाई उभा आहे आणि जोराजोराने लोकांना सांगत आहे की, "मी खरा राजा विक्रमादित्य आहे. जो राजा बनून सिंहासनावर बसला आहे. तो नकली आणि कपटी आहे." दिवाणांनी राजाला ही बातमी दिली. लागलीच राजा दिवाण, सेनापती आणि आपल्या शिपायासह त्या जागेवर गेला. तेथे खरंच एक शिपाई विक्रमादित्याच्या विरोधात बोलत होता. राजाने रागाने त्या शिपायाला अटक करण्यास बजाविले.

शिपायांनी त्याला पकडून राजासमोर उभे केले. राजाने चिडून त्याला विचारले, "तर तू खरा विक्रमादित्य आहेस?"

"नाही, अन्नदाता, मी तर आपला शिपाई आहे, दास आहे मी असं कसं म्हणेन."

राजाने त्याला सोडून दिले. तो शिपाई पुन्हा त्या झाडाखाली बसून अनर्गल बोलू लागला. राजाने पुन्हा त्याला पकडून आणण्यास सांगितले तेव्हा तो म्हणाला, "मी असं काही बोललोच नाही." असं चारपाच वेळा घडलं. तेव्हा राजाने आपल्या विद्वान राजपुरोहितास बोलाविले.

राजपुरोहिताने गंभीरतेने सगळी गोष्ट ऐकून आदेश दिला, "जिथं हा उभा राहून बोलतो तेथील जागा खोदा." तेथील जमीन खोदली तेव्हा तेथून एक सिंहासन निघाले. राजपुरोहित स्मित करीत म्हणाले, "महाराज, हे सिंहासन आपल्या पूर्वीच्या राजाचे होते. त्यामुळे या सिंहासनावर बसताच हा सामान्य शिपाई स्वतःला विक्रमादित्य समजतो. यात या गरीबाचा काहीच दोष नाही. हा

तर सिंहासनाचा प्रभाव आहे.”

गोष्ट पूर्ण करीत बाबा म्हणाले, “राम सर्वांचे भले करो. आज पण कोणी कोणात्याही मोठ्या खुर्चीवर बसताच स्वतःला काय समजू लागतो सांगा बर?”

श्रोते समवेत स्वरात म्हणाले, “राजा विक्रमादित्य.”

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ७.१९ अल असनाम नामक राजा व यक्षांचा राजा

पूर्वी बसोरा नामक शहरात एक राजा राज्य करीत होता. त्याजपाशी संपत्ती पुष्कळ असून त्याजवर त्याची प्रजा फारच संतुष्ट असे. परंतु त्याला संतती नव्हती या गोष्टीचे त्याला मोठे दुःख होते. तो आपल्या राज्यातील फकीर,जोगी, महंत वगैरे लोकांना पुष्कळ दानधर्म करीत असे. त्याच्या मनातला हेतू असा की,त्यापैकी एखाद्या पुण्यवानाच्या प्रार्थनेने परमेश्वरास करुणा येऊन तो आपणाला संतान देईल. हा त्याचा हेतू सिद्धीस गेला. त्याची राणी गरोदर राहिली व सुदैवेकरून तिला पुत्रच झाला ! त्याचे नाव त्याने झेन अलसनाम (मदनाचा पुतळा) असे ठेवले.

राजाने आपल्या राज्यातील सर्व मोठमोठ्या ज्योतिष्यांस बोलाविले व 'मुलाची लक्षणे कशी काय आहेत?' म्हणून त्यांस विचारले. त्यांनी त्याचे जन्मकाळाचे ग्रह पाहून सांगितले की,'हा शातयुषी, शूर आणि धैर्यवान असा होईल; परंतु त्याच्यावर संकटे इतकी मोठमोठी येणार आहेत की, त्यापुढे याच्या शैर्याचा टिकाव मुळीच लागणार नाही.' राजाला या भाकिताची काहीच धास्ती वाटली नाही. तो म्हणाला,'काही चिंता नाही; तो शूर निपजेल ना ? बस आहे. राजे लोकांस संकटाचे प्रसंग हे आलेच पाहिजेत. कारण असे प्रसंग आले म्हणजे त्यांच्या अंगचे गुण कसास लागतात व ते आपली कर्तव्यकर्मे बजावण्यास लायक होतात.' असे म्हणून राजाने त्या ज्योतिषांची संभावना करून त्यांना वाटेस लाविले.

या नवानवसांनी झालेल्या मुलास त्याने केवळ आपल्या तळहाताच्या फोडाप्रमाणे वागविले. त्याला अंमळ समजू लागताच त्याच्या विद्याभ्यासासाठी

त्याने मोठमोठ्या विद्वान शिक्षकांची योजना केली. पुढे क्रमाक्रमाने सर्व गोष्टीत त्यास तरबेज करण्याचा त्याचा इरादा होता. इतक्यात राजा दुखण्यास पडला व त्यातून बरा होईलसे दिसेना. त्या दुखण्यापुढे सर्व वैद्यांनी हात टेकले. तेव्हा आता आपण वाचत नाही असे त्यास वाटून त्याने झेन यास आपल्याजवळ बोलाविले आणि त्याला पुष्कळ बोधाच्या गोष्टी सांगितल्या. त्यात मुख्य हे ध्यानात ठेवण्यास सांगितले की,'तू आपल्या प्रजेवर विशेष कडक हुकूम न चालविता होईल तेथपर्यंत तिजवर दया करून तिची प्रीति संपादन कर; हांजी हांजी करणाऱ्या लबाड लोकांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नको; बक्षीस व शिक्षा ही दोन्ही विचाराने देत जा ; कारण पुष्कळ वेळा असे घडते की, राजे लोक हे कावेबाज लोकांच्या बकवृत्तीस भुलून सर्वांशी नुकसान करून घेतात व जे बिचारे सज्जन असतात त्यांना मात्र निराकारण त्रास देतात.

नंतर लवकरच राजा मरण पावला. तेव्हा तिथल्या चालीप्रमाणे राजपुत्र झेन याने सात दिवसांपर्यंत सुतक धरून आठव्या दिवशी तो सिंहासनारुढ झाला. त्याने आपल्या नावाने शिक्कामोर्तब वगैरे सर्व केले. सर्व कामगार लोक आपल्यास अगदी नमून असून आपापली कामे दक्षतेने करीत आहेत हे पाहून त्याला मोठा आनंद झाला व तो त्यातच अगदी निमग्न होऊन गेला. सारांश, त्याला राज्यपदप्राप्तीचे परमसुख वाटू लागले. प्रजेचे आपल्या संबंधाचे कोणते कर्तव्य आहे, एवढे मात्र त्याच्या लक्षात असे. पण आपण तिकरिता काय केले पाहिजे याचा मुळीच विचार करीत नसे. तेव्हा अर्थातच त्यापासून तीस सुख होईनासे झाले. पुढे त्याने असे केले की, राज्यातील मोठमोठी कामे गैरमाहीत, मदोन्मत्त व कामांध अशा तरुण लोकांच्या हाती दिली व त्यांच्या संगतीने तो व्यभिचार कर्मे करू लागला व अनेक प्रकारची इतर दुर्व्यसने त्यास लागली. तो सदासर्वकाळ त्यातच गुंग असे. राज्यात काय चालले आहे याची त्याला दादही नसे; यामुळे चोहोंकडे बेबंदशाही होऊन गेली. पैसा म्हणजे काय हे त्याच्या खिजगणतीत नव्हते. त्याने हवे त्यास हवे तितके पैसे द्यावे. अशा रीतीने त्याच्या मर्जीतले लोक व बायका यांनी त्याचा सर्व खजिना धुऊन नेला.

त्याची आई ही हुशार, शहाणी आणि समजूतदार बायको होती. ती आपल्या

मुलास त्याच्या ह्या उधळेपणाबद्दल व बदफैलीबद्दल पुष्कळ रागे भरे. ती त्यास म्हणे, 'तू जर असाच हा क्रम चालविशील, तर तुझी सर्व संपत्ती जाईल, इतकेच नव्हे तर तुझी प्रजाही तुजवर नाखूष होऊन बंड करील व त्यापासून तू आपल्या राज्याला व कदाचित जिवालाही मुकशील. ' ती त्यास असा पुष्कळ बोध करी, पण त्याच्याकडे त्याने कधीही लक्ष दिले नाही. शेवटी तिने भविष्य केल्याप्रमाणे झाले; रयत लोकांची मने बिथरली व बंडाचाही उद्भव झाला. परंतु त्याच्या आईने लोकांस चार गोष्टी सांगून मोठ्या चातुर्याने सर्व स्थिरस्थावर केले.

झेन याच्या आईने, ही स्थिती काही चांगली नाही असे पाहून, ती त्यास म्हणाली, 'बाबारे, हा राज्याच्या एवढा थोरला गाडा अनुभवी, पोक्त, शहाण्या व इमानी लोकांवाचून नीट चालायचा नाही. त्यास हे बारा वर्षे-सोळा वर्षे वयाची पोरे काही उपयोगाची नाहीत. त्यांनी पाहिलास ना कसा सगळा नाश करून टाकला आहे तो! याकरिता माझे ऐकशील तर आता तरी ह्या पोरांस काढून टाकून पूर्वीचे सर्व कामगार त्या त्या कामावर पुन्हा नेमून टाक, म्हणजे पहा पुन्हा कशी पूर्ववत सर्व व्यवस्था सुरळीत चालते ती !' झेन याने या गोष्टीस शेवटी एकदाचा रुकार दिला व त्याप्रमाणे व्यवस्था करण्यास आपल्या आईसच सांगितले.

झेन यास आपली सर्व संपत्ती चोरापोटी गेली हे पाहून फार पश्चात्ताप झाला. त्याची वृत्ती अगदी उदासीन झाली व त्याला काहीच गोड वाटेना. पुढे एके दिवशी रात्री एक वृद्ध मनुष्य त्याच्या स्वप्नात येऊन त्यास म्हणाला, 'झेन, तू हे लक्षांत ठेव की, संकटाच्या पाठीमागून आनंद हा आहेच व दुःखाच्या पाठीमागून सुख हे आहेच; तेव्हा आता तुला आपल्या दुःखाचा परिहार व्हावा अशी इच्छा असेल तर ऊठ आणि मिसर देशाची वाट धर. कैरो शहरास गेलास म्हणजे तुझे नशीब उदयास येईल.'

झेन ह्यास ह्या स्वप्नाचे मोठेच आश्चर्य वाटले व सकाळी उठल्याबरोबर त्याने आपल्या आईस ते मोठ्या उत्सुकतेने सांगितले. पण तिला त्याचे हसू मात्र आले. ती म्हणाली, 'बेटा,आता ह्या स्वप्नाच्या भरवशावर तू का मिसर देशास जाणार ?' झेन म्हणाला, 'कां नाही बरे ? सगळीच स्वप्ने खोटी असतात की

काय ? नाही. काहींचे प्रत्यय येतात. मला याबद्दल गुरुजींनी पुष्कळ गोष्टी सांगितल्या आहेत व त्यावरून ह्या गोष्टीवर माझा विश्वास बसला. कारण मला जो म्हातारा मनुष्य दिसला, त्याच्या अंगी काही अमानुष शक्ती मला दिसून आली. तो नुसता वयोवृद्ध असल्यावरून मला केवळ पूज्य वाटला असे नाही; तर त्याच्या अंगी तसेच काही विलक्षण तेज दृष्टीस पडले. सारांश, आपला पैगंबर ज्या प्रकारचा होता म्हणून म्हणतात, त्या प्रकारचा तो मनुष्य मला भासला आणि खरोखर पुसशील तर मला स्वप्नात येऊन त्यानेच दर्शन दिले असावे व त्याला माझी दया येऊन त्याने माझ्या दुःखाचा परिहार करण्याचे मनावर घेतले असावे, असे मला वाटते. एकंदरीने त्याच्या बोलण्यावर माझा पक्का भरवसा बसला आहे. त्याने जे मला वचन दिले आहे व ज्याप्रमाणे करण्यास सांगितले आहे, ते एकसारखे माझ्या मनात घोळत आहे. ' राणीने त्याला पुष्कळ बुद्धिवाद सांगितला, पण ज्याचे नाव ते; त्याला ते काही रुचले नाही ! शेवटी त्याने राज्याची व्यवस्था तिजवर सोपवून दिली, आणि एके दिवशी रात्री कोणास बरोबर न घेता तो गुप्तपणे कैरो शहरास जाण्याकरिता राजवाड्यातून निघाला.

पुष्कळ त्रास व श्रम सोसून तो कैरो  शहरास जाऊन पोहोचला. या शहरासारखी सुंदर व विस्तीर्ण शहरे पृथ्वीत फारच थोडी असतील. तो त्या शहरातील एका मशिदीत जाऊन उतरला. तो फारच थकून गेल्यामुळे त्या ठिकाणी पडता पडता त्याला झोप लागली. तितक्यात त्याला स्वप्न पडून तो पूर्वीचाच म्हातारा मनुष्य त्याला दिसला. तो त्यास म्हणाला, 'तू माझ्या बोलण्यावर भरवसा ठेविलास आणि वाटेचे हाल व त्रास सोसून येथे आलास, येणेकरून मला फार संतोष झाला. पण तुला मी येथे बोलाविले, ते फक्त तुझी कसोटी पाहण्याकरिता बोलाविले व तू मोठा दृढनिश्चयी आणि धैर्यवान आहेस याविषयी माझी खात्री झाली. तुला मी अत्यंत संपत्तीवान व सुखी करावे अशी तुझी योग्यता आहे. आता तू बसोरा येथे परत जा, तेथे तुझ्या वाड्यातच तुला इतके द्रव्य सापडेल की, तू पृथ्वीवरील सर्व राजांहून श्रीमंत होशील.'

झेन यास या स्वप्नापासून मुळीच आनंद झाला नाही. तो जागा झाल्यावर

मनात म्हणाला, 'अरेरे ! मी कसा फसलो गेलो पाहा ! तो पैगंबर कसचा ? माझे मन व्यग्र झाल्यामुळे मला उगाच आपला काही तरी भास झाला, दुसरे काही नाही ! व माझ्या ध्यानी मनी सगळा तो असल्यामुळे, मला तो स्वप्नात पुन्हा दिसला यात काही नवल नाही. आता येथे राहून आपल्याला काय कर्तव्य आहे? मुकाट्याने आपले बसोरा येथे परत जावे हे बरे. मी आपला हा प्रवास करण्याचा उद्देश फक्त आईलाच कळविला एवढे तरी बरे झाले ! जर का हे लोकांस कळले, तर ते माझी फजिती करून टाकतील !

याप्रमाणे त्याच्या मनात विचार येऊन तो परत आपल्या राज्यात यावयास निघाला. तो घरी येऊन पोहोचताच त्यास राणी म्हणाली, 'कसे काय बेटा, तुझा मनोरथ सिद्धीस गेला ? ' त्याने झालेली सर्व हकिगत तीस सांगितली, तेव्हा त्याला ह्या आपल्या भोळसटपणाबद्दल फारच लज्जा वाटली आहे, असे तिला दिसल्यावरून, आपण आता यासंबंधाने आणखी बोललो अगर हसलो तर याला वाईट वाटेल असे तिला वाटले; सबब तिने तसे न करिता उलटी त्याची समजूत केली. ती म्हणाली, 'बेटा, तू आपल्या मनाला काही वाईट वाटू देऊ नको. परमेश्वराने तुझ्या कपाळी संपत्ती लिहिली असली, तर ती घरी बसल्या तुझ्याकडे चालत येईल. तू स्वस्थ ऐस. तुला आता मी सांगते एवढे मात्र तू कर; काय ? तर हा हलकटपणा सोडून देऊन विचाराने व शहाणपणाने वागत जा. गाणे-बजावणे, नाच तमाशे, दारू वगैरेनी तुझी नासाडी केली हे तू पाहातच आहेस, याकरिता ही अजिबात सोडून दे. आपल्या प्रजेच्या हितासाठी झटत जा. तू प्रजेचे हित केलेस म्हणजे तुला कशाचीही वाण नाही, हे तू पक्के समज.'

झेन म्हणाला, 'आई तुझ्या गळ्याशपथ आजपासून तू सांगशील त्याप्रमाणे मी चालेन व तू आपल्या पंसतीने नेमलेल्या प्रशासकांच्या सांगण्याप्रमाणे राजव्यवस्था चालवीन.' परंतु त्याच दिवशी रात्री पुनः त्याच्या स्वप्नात तो पूर्वीचा वृद्ध मनुष्य येऊन त्यास म्हणाला, 'झेन तुझा उदयकाळ होण्याची वेळ समीप आली आहे. तू उद्या सकाळी उठताक्षणी एक कुदळ घेऊन आपल्या बापाच्या खोलीची जमीन खण. तेथे तुला अपार द्रव्य सापडेल.'

झेन सकाळी उठून आपल्या आईकडे धावतधावतच गेला आणि रात्री

पडलेले नवे स्वप्न मोठ्या उत्सुकतेने त्याने तिला सांगितले. ती हसून म्हणाली, 'खरेच बेटा, त्या मनुष्याने तुझी अगदी पाठच पुरविली ! त्याने तुला दोनदा फसविले एवढे त्याला पुरे झाले नाही ! आता पुन्हा आणखी त्याच्यावर भरवसा ठेवावासे तुला वाटते काय ?' झेन म्हणाला, 'त्याच्या बोलण्यावर माझा आता मुळीच भरवसा नाही; तथापि मी उगीच आपल्या मनाची खात्री करण्याकरिता बाबांच्या खोलीची जमीन एकदा खणून पाहतो.' हे ऐकून राणीला फारच हसू आले व ती म्हणाली, 'मला असे वाटलेच होते ! बरे, आपला एकदा संशय फेडून घे. मिसर देशाला जाण्यापेक्षा यात श्रम तरी कमी आहेत इतकेच मी समाधान मानते.'

झेन म्हणाला,'पण आई, ह्या तिसऱ्या स्वप्नाचा मी राहून राहून जो जो विचार करतो, तो तो त्यावर माझा भरवसा बसतो. कारण पूर्वीच्या दोहींशी याचा संबंध जुळतो आणि म्हणूनच त्या म्हाताऱ्याच्या बोलण्याची आणखी एकवार प्रचिती पाहावी असे मला वाटते. पाहा, त्याने प्रथम मला मिसर देशास जावयास सांगितले. तेथे गेल्यावर त्याने मला सांगितले की, तुझी कसोटी पाहण्याकरिता तुला मी इतके दूर आणिले तर तू आता परत बसोऱ्यास जा, म्हणजे तेथे द्रव्यप्राप्ती होईल व ते द्रव्य कोठे सापडणार ते ठिकाण त्याने मला गेल्या रात्री सांगितले. म्हणून ह्या तिन्ही स्वप्नांचा एकमेकांशी संबंध जुळतो असे मी म्हटले. पण हे सगळे खोटे ठरले तरी चिंता नाही, मी आपला त्याने सांगितल्याप्रमाणे करणार. कारण, तसे करण्यात आपले नुकसान थोडेच आहे ! शिवाय त्याने म्हटल्याप्रमाणे तेथे खरोखरच द्रव्य असून आपण विनाकारण त्याच्या बोलण्याचा भरवसा न धरिला आणि तसेच बसलो तर आपण आपल्या हाताने आपले नुकसान करून घेतले असे होईल. त्या बिचाऱ्याकडे मग काय दोष?'

याप्रमाणे बोलून तो तेथून उठला आणि कुदळ घेऊन एकटाच आपल्या बापाच्या खोलीत गेला, त्याने ती जमीन बरीच खोल खणली, पण द्रव्याचे चिन्ह दिसेना. तेव्हा तो अंमळ थांबला आणि म्हणाला, 'आई मला हसली त्याप्रमाणे खरोखरच माझे हसू होऊ पाहात आहे की काय न कळे !' तथापि त्याने धैर्य सोडिले नाही. त्याने ती जमीन जरा आणखी खोल खणली; तेव्हा एकाएकी एक

पांढरा दगड त्याच्या दृष्टीस पडला. तो त्याने काढला, तो त्याच्या खाली एक दार त्याच्या दृष्टीस पडले. त्याला एक मोठे थोरले कुलूप घातलेले होते. ते त्याने त्या कुदळीने फोडिले व ते दार उघडले. त्याच्या खाली पांढऱ्या संगमरवरी पाषाणांचा एक जिना होता. त्याने लागलीच एक मेणबत्ती लाविली व तो त्या जिन्यातून खाली उतरला. तेथे एक खोली होती. तिची जमीन पांढऱ्या संगमरवरी पाषाणाची असून कडीपाट व भिंती स्फटिकांच्या होत्या. तेथे चार मोठमोठ्या घडवंच्या होत्या व त्या प्रत्येकीवर दहा-दहा बरण्या होत्या. झेन यास वाटले की यात बहुधा दारू असावी व ती जुनी असल्यामुळे उत्तमच असेल यात संशय नाही. तेव्हा त्याने बरण्यांपैकी एका बरणीचे झाकट काढिले आणि पाहतो तो त्यात तोंडातोंड मोहोरा भरल्या आहेत ! हे पाहून त्याला पराकाष्ठेचा आनंद व आश्चर्य वाटले. मग त्याने त्या सर्व बरण्या उघडून पाहिल्या. त्याही सर्व पहिलीप्रमाणे मोहोरांनी भरलेल्या होत्या. त्याने त्यातील एक ओंजळभर मोहोरा घेतल्या, आणि त्या तो आपल्या आईकडे घेऊन आला.

झेन याने आईस हे सर्व सांगताच तिलाही आनंद झाला. ती त्यास म्हणाली, 'बेटा,आता हा तरी पैसा पूर्वीसारखा उधळून टाकू नको व आपल्या शत्रूंस आनंद मानण्याचा प्रसंग आणू नको !' झेन याने उत्तर केले, 'आई, पूर्वी कधी जी गोष्ट होऊन गेली ती गेली. पण आता तुझ्या इच्छेबाहेर मी पाऊलही टाकणार नाही, याबद्दल तुला खात्री असू दे. '

झेन याच्या बापाने हे द्रव्य इतक्या गुप्तरीतीने ठेवले होते की,त्या विषयी राणीलाही काहीएक माहीत नव्हते. ती त्यास म्हणाली, 'बेटा, चल ते मला दाखीव पाहू ? ' तेव्हा तो तिला त्या खोलीत घेऊन गेला. तिने लक्षपूर्वक चोहोंकडे पाहिले. तो आणखी एक लहानशी बरणी तिच्या दृष्टीस पडली. हिच्याकडे झेन याचे लक्ष पूर्वी गेले नव्हते; त्याने ती उघडून पाहिली; तर त्यात एक सोन्याची किल्ली सापडली. राणी म्हणाली, 'बेटा, ही दुसऱ्या अशाच एखाद्या खजिन्याची किल्ली असावीसे वाटते. आपण चोहोंकडे पाहू, म्हणजे ही कोठे लागते ते आपणाला कदाचित कळेल.'

त्याने चोहोंकडे बारीक नजरेने पाहिजे, तर एके ठिकाणी किल्लीचे भोक

त्याला दिसले. तेथे त्याने ती लावून पाहिली, तर ती चालली. किल्ली फिरवताच एक दार उघडले; त्यातून ती दोघे आत गेली तर त्यांना दुसरी एक खोली लागली. तिच्या मध्यभागी सोन्याच्या मोठमोठ्या नऊ तिवया असून त्यापैकी आठांवर हिऱ्यांचे एकसंधी पुतळे होते. त्यांचे तेज इतके होते की, तेथे स्वच्छ प्रकाश पडला होता!

झेन म्हणाला, 'काय चमत्काराची गोष्ट आहे ! ह्या इतक्या मौल्यवान चिजा बाबांनी कोठून पैदा केल्या, भगवान जाणे!' त्या नवव्या रिकाम्या तिवयीच्या संबंधाने त्याला फारच आश्चर्य वाटले. कां की तिच्यावर पांढऱ्या रंगाची साटीण पसरलेली असून तिजवर असे लिहिले होते की, 'प्रिय पुत्रा, हे आठ पुतळे मिळवण्यासाठी मला पराकाष्ठेचे श्रम पडले आहेत. हे जरी अतिशय सुंदर आहेत, तरी या पृथ्वीवर आणखी एक नववा पुतळा आहे, त्याच्या पासंगालाही हे पुरावयाचे नाहीत. तो प्राप्त करून घेण्याची तुला इच्छा असेल, तर तू कैरो शहरास जा. तेथे माझा एक गुलाम राहतो. त्याचे नाव मुबारिक असे आहे. त्याची गाठ पडण्याला तुला काही अडचण पडणार नाही. कोणीही तुला भेटेल त्याला तू त्याचे नाव सांगितलेस की तो तुला त्याचे घर दाखवील. तो भेटला म्हणजे त्याला तू आपली सर्व हकिगत कळीव. तू माझा मुलगा आहेस हे त्याला कळताच, तो नववा पुतळा ज्या ठिकाणी आहे तेथे तो तुला नेईल आणि तो तुझ्या हाती लागण्याची युक्तीही तुला सांगेल.'

हे वाचताच झेन आपल्या आईला म्हणाला, तर मग तो नववा पुतळा आपल्याला मिळालाच पाहिजे; नाहीपेक्षा आपले जिणे व्यर्थ आहे. तो या सर्वांहूनही अत्यंत मौल्यवान आहे. त्या अर्थी तो केवळ अजब चीज असेल यात संशय नाही. तर मी आता कैरो शहरास जाण्याची तयारी करतो व तूही मला आता मोडता घालणार नाहीस अशी माझी खात्री आहे.' राणी म्हणाली, 'नाही बेटा, या गोष्टीस माझे पूर्ण अनुमोदन आहे. तुझ्यावर पैगंबराची पाखर आहे; त्या अर्थी तो तुझा सर्व प्रकारे सांभाळ करील. तुला वाटेल तेव्हा तू खुशाल चालता हो. तुझे प्रधान व मी राज्याची सर्व व्यवस्था नीट ठेवितो; तू काही काळजी करू नको.' झेन याने लगेच निघण्याची तयारी केली, पण बरोबर लवाजमा वगैरे

काहीएक घेतला नाही; थोडेसे गुलाम मात्र घेतले.

वाटेत काही अडथळा न येता तो कैरो येथे पोहोचला. तेथे पोहोचताच मुबारिक याच्या घराचा त्याने शोध केला. त्यास लोकांनी सांगितले की,'तो घरचा मोठा श्रीमान् असून एखाद्या उमरावाप्रमाणे मोठ्या थाटाने राहतो. त्याच्या घरी जाण्यास कोणालाही अटकाव नाही. त्यात परक्या ठिकाणच्या मनुष्यास तर मुळीच नाही. त्यास त्या लोकांनी त्याचे घर दाखविले. त्याने दरवाजाला धक्का देताच एका गुलामाने तो उघडला. तो झेन यास म्हणाला, 'आपण कोण व येथे काय उद्देशाने आला आहात ?' झेन याने उत्तर केले, ' मी मुशफर आहे. मुबारिकसाहेबांच्या औदर्याची वार्ता ऐकून त्यांच्या येथे उतरण्याच्या उद्देशाने आलो आहे'. त्या गुलामाने त्यास अंमळ थांबण्यास सांगून तो आपल्या धन्याकडे गेला आणि त्याने त्यास ही हकिगत सांगितली. त्यावरून त्याने झेन यास आत घेऊन येण्याविषयी त्याला सांगितले. तो गुलाम परत येऊन झेन यास आत घेऊन गेला व त्याची भेट घेण्याकरिता ज्या दिवाणखान्यात मुबारिक बसला होता, तेथे त्यास घेऊन आला. तो दिवाणखाना हंड्या झुंबरे व नाना प्रकारच्या तसबिरा यांनी फारच सुशोभित केलेला होता. मुबारिक याने झेन याचे मोठे आदरातिथ्य करून त्यास म्हटले, 'आपण कृपा करून माझ्या येथे आला याबद्दल मी आपला फार आभारी आहे. ' झेन यानेही त्याच्या थोरपणाबद्दल त्यास उलट आभार दर्शवून म्हटले, 'मी बसोऱ्याच्या माजी राजाचा मुलगा; मला झेन अलसनाम म्हणतात.' मुबारिक म्हणाला, 'अहो,बसोऱ्याच्या राजे साहेबांच्या पदरीच पूर्वी मी होतो; पण त्यांना मूलबाळ काही नव्हते. तुमची किती वर्षांची उमर आहे ?' झेन म्हणाला, ' मला वीस वर्षे आहेत. आपण आमच्या येथून आल्यास किती वर्षे झाली ?' मुबारिक म्हणाला, 'बावीस वर्षे झाली असावी. पण तुम्ही त्यांचेच चिरंजीव याबद्दल माझी कशी खातर करणार ?' झेन म्हणाला, 'माझ्या बापाच्या खोलीखाली एक तळघर आहे. त्याठिकाणी मला मोहोरांच्या चाळीस बरण्या सापडल्या.' मुबारिक म्हणाला, 'याखेरीज आणि काही सापडले कां?' झेन म्हणाला,'आणखी नऊ सोन्याच्या तिवया सापडल्या. त्यापैकी आठांवर

हिऱ्यांचे पुतळे आहेत, व नवव्या तिवयीवर पांढरी साटिण घातली असून, तिजवर ह्या आठही पुतळ्यांहून मौल्यवान जो एक पुतळा आहे, तो कोणत्या रीतीने प्राप्त होईल हे बाबांनी लिहून ठेवले आहे, तो कोठे आहे ते तुम्हाला ठाऊक असेलच; कारण तुम्ही तो मला दाखवाल असे त्या साटिणीवर लिहिले आहे.'

झेन याच्या तोंडचे हे शब्द ऐकताच मुबारिक याने त्याच्या पायांवर डोकी ठेवली व त्याच्या हाताचे वारंवार चुंबन घेतले. नंतर तो म्हणाला, 'परमेश्वराने तुम्हाला येथे आणिले ही त्याने मजवर मोठीच कृपा केली. तुम्ही बसोऱ्याच्या राजेसाहेबांचे चिरंजीव आहात याविषयी आता माझी खातरी झाली. तुम्हाला तो अमोलिक पुतळा पाहण्याची इच्छा असल्यास तो दाखवावयास मी तुम्हाला नेईन. पण तुम्ही दमून भागून आला आहात, याकरिता काही दिवस विश्रांती घ्या. आज आमच्या घरी येथील सरकारी कामगारांना मेजवानी आहे. सर्व मंडळी आलेली आहेत. मी तेथेच बसलो होतो, इतक्यात तुमची वर्दी घेऊन पोहोचली. आता कृपा करून तुम्ही आपल्या पंक्तीचा लाभ आम्हास द्यावा अशी माझी विनंती आहे.' झेन म्हणाला, 'ठीक आहे, माझ्याकडून काही हरकत नाही,' तेव्हा ती मंडळी ज्या बंगल्यात बसली होती, त्या ठिकाणी झेन यास मुबारिक घेऊन गेला. मग सर्वजण भोजनास बसले. मुबारिक झेन याजपुढे हात जोडून उभा राहिला व त्यास मोठ्या नम्रतेने म्हणाला, 'तुम्हाला फार श्रम झाले आहेत; तर आता सावकाश होऊ द्या. ' त्याने स्वतः त्यास आग्रहपूर्वक पक्वान्ने वगैरे वाढविली. ते पाहून जेवावयास आलेल्या मंडळींस मोठे आश्चर्य वाटले व ते एकमेकांना कुजबुजू लागले की, मुबारिक साहेब एवढा याचा आदरसत्कार करतात, तो हा आहे तरी कोण ? '

जेवण झाल्यावर मुबारिक सर्व मंडळींना म्हणाला, 'गृहस्थहो, मी ह्या पाहुण्यांचा एवढा मान ठेवला याचे तुम्हाला आश्चर्य वाटू देऊ नका. कारण, माझे यजमान बसोऱ्याचे राजेसाहेब यांचे हे प्रत्यक्ष चिरंजीव आहेत. मला यांच्या वडिलांनी विकत घेतले होते व त्यांचा काळ होईपर्यंत त्यांनी मला गुलामपणापासून मुक्त केले नव्हते; तेव्हा अद्यापिही मी त्यांचा गुलामच आहे.

यास्तव माझ्यावर व माझ्या सर्व मालमत्तेवर यांची सत्ता आहे.' हे ऐकताच झेन म्हणाला,' मुबारिकसाहेब, मी ह्या जमलेल्या सर्व मंडळींसमक्ष तुम्हांस सांगतो की, या वेळेपासून तुम्हांस मी मुक्त केले आहे. तुमच्यावर व तुमच्या मालमत्तेवर माझा काहीएक वारसा राहिला नाही; याखेरीज आणखी तुम्हाकरिता मी काय करू ते तुम्ही विचार करून मला सांगा.' हे ऐकून मुबारिक याने झेन याच्यापुढे साष्टांग नमस्कार घातला आणि त्यांचे अतिशय आभार मानले. संध्याकाळपर्यंत त्या सर्वांनी आनंदी आनंद केला. नंतर भोजनास बोलावलेल्या गृहस्थांस मुबारिक याने नजरनजराणे दिले व ते आपापल्या घरी गेले.

दुसरे दिवशी झेन मुबारिक यास म्हणाला, मला आता विश्रांती पुष्कळ झाली. मी काही येथे चैनीखातर आलो नाही, तर तो नववा पुतळा प्राप्त करून घेण्याकरिता आलो आहे व मला एकसारखा त्याचा निदिध्यास लागला असल्यामुळे, ती प्राप्त होईपर्यंत मला चैन म्हणून पडावयाचे नाही. याकरिता त्या उद्योगास आता लागावे हे बरे.' मुबारिक म्हणाला, ठीक आहे, मजकडून तयारी आहे. पण ह्या कामात मोठमोठी संकटे येणार आहेत व तुम्हाला तर संकटाचा मुळीच अनुभव नाही. तेव्हा याचा विचार कसा काय ?' झेन याने उत्तर केले, 'कितीही संकटे येईनात, मी ती भोगण्यास तयार आहे. मी एक तर आपला हेतू सिद्धीस नेईन, नाहीपेक्षा मरून जाईन. या जगात ज्या ज्या गोष्टी घडतात, त्या सर्व ईश्वरेच्छेने घडत असतात. तेव्हा त्या कोणी टाळू म्हटल्यास कधीही टळावयाच्या नाहीत. आता तुम्ही फक्त मजप्रमाणेच आपल्या मनाचा निर्धार करून माझ्याबरोबर चला म्हणजे झाले.'

मुबारिक याने झेन याचा हा दृढनिश्चय पाहून निघण्याची तयारी करण्याविषयी नोकर लोकांस सांगितले. तयारी होताच देवाचे नाव घेऊन ते निघाले. त्यांना बऱ्याच मजला कराव्या लागल्या. शेवटी एके दिवशी ते एका आंबराईपाशी आले व तेथे घोड्यावरून खाली उतरले. मुबारिक याने बरोबर जे लोक आणिले होते, त्यांस तो म्हणाला, 'तुम्ही हे घोडे व सामान-सुमान सांभाळा, आम्ही काही कामाकरिता जरा जाऊन येतो.' नंतर तो झेन यास

म्हणाला,'आता आपल्याला स्वतःच पुढे गेले पाहिजे. तो नववा पुतळा ज्या ठिकाणी आहे, त्या ठिकाणानजीक आपण आलो आहोत. आता मात्र भिता कामा नये हो ! हीच काय ती मोठी आणीबाणीची वेळ आहे ! '

याप्रमाणे बोलत बोलत ते एका तलावापाशी आले. मुबारिक म्हणाला, 'आता यातून आपल्याला पलीकडे गेले पाहिजे.' झेन म्हणाला,'आपल्यापाशी होडी तर नाही, मग कसे जाता येईल ? मुबारिक याने उत्तर केले, 'आता एका क्षणात यक्षांच्या राजाची होडी आपणाला न्यावयास येईल. पण मी सांगतो हे तुम्ही पक्के ध्यानात ठेवा; काय तर, तुम्ही अगदी मौनव्रत धारण करा. त्या होडीवरच्या कोळ्याचे रूप तुम्हाला मोठे विलक्षण दिसेल; पण त्याच्याशी तुम्ही एक चकार शब्दही बोलू नका व एकंदरीने कसलाही प्रसंग येवो, तुम्ही तोंडातून ब्र देखील काढू नका. पण मी तुम्हाला वारंवार इतके बजावून सांगतो याचे कारण असे की, आपण होडीत बसल्यावर जर का तुम्हा तोंडावाटे एक अक्षर निघाले, तर लागलीच होडी बुडून जाईल.' झेन म्हणाला, 'बरे आहे, मी अगदी गप्प बसेन. तुम्ही काय काय करायचे ते मला सांगा मात्र, मी त्याप्रमाणे करण्यात अणुमात्र अंतर करीन तर मग मला म्हणा !'

याप्रमाणे त्यांचे बोलणे चालले आहे तो एकदम त्या तलावात होडी दिसू लागली. ती रक्तचंदनाच्या लाकडाची केलेली होती. तिची डोलकाठी अंबर नामक वृक्षाची असून शीड निळ्या रंगाच्या साटिणीचे होते. तिजवर एकच कोळी होता. त्याचे डोके हत्तीच्या डोक्यासारखे असून अंग वाघासारखे होते. होडी मुबारिक व झेन यांच्याजवळ येऊन पोहोचताच त्या राक्षसी प्राण्याने आपल्या सोंडेने एकेकास उचलून होडीत ठेवले व एका क्षणात तो ती पलीकडच्या काठाशी घेऊन गेला. नंतर त्याने पूर्ववत त्यांना उचलून ठेवले व लागलीच तो व ती होडी अदृश्य झाली.

मुबारिक म्हणाला, आता आपणास बोलण्यास हरकत नाही. हा सर्व प्रदेश यक्षांच्या राजाच्या ताब्यातला आहे. जगामध्ये अशी सुंदर स्थळे फारच थोडी असतील ! चोहोंकडे नीट नजर देऊन पाहा. इतका रमणीय देखावा कोठे तरी असेल काय ? सन्मार्गाने वागणारांस अंती स्वर्गसुख जे प्राप्त होते, त्याची ही

खरोखर प्रतिमाच आहे, यात काहीच संशय नाही ! हे पाहा चोहोंकेडे बाग लागून गेले आहेत. यात सर्व प्रकारची सुवासिक व इतर प्रकारच्या फुलांची झाडे व वनस्पती आहेत. ती फळझाडे पाहा किती सुंदर दिसताहेत ती ! यांच्या फांद्या फळांच्या भाराने कशा जमिनीस लागल्या आहेत ! हजारो प्रकारचे पक्षी मधुर स्वर काढीत आहेत, ते किती बरे कानाला संतोष देत आहेत ! असे आनंददायक स्थळ सगळ्या पृथ्वीत कोठे तरी सापडेल काय ?' झेन याला ते सर्व पाहून इतका आनंद झाला की,तो त्याला शब्दांनी व्यक्त देखील करून दाखविता येईना !

शेवटी ते यक्षांच्या राजाच्या वाड्याच्या समोर आले. तो सर्व पाचू,हिरे यांनी बांधला होता. त्याच्या सभोंवती मोठा खंदक असून त्या खंदकाच्या काठाकाठाने झाडे लावलेली होती. ती फारच उंच गेलेली असून त्यांच्या शाखांचा विस्तार अतिशय झालेला होता; त्या योगाने राजवाड्यावर ऊन्ह मुळीच येत नसे. राजवाड्याची देवडी सोन्याची होती. तिच्या समोरच्याच बाजूस त्या खंदकावर एक पूल होता, तो फक्त एकाच माशाच्या हाडाचा केलेला होता, तरी त्याची लांबी सुमारे सहा वावां व रुंदी तीन वावां होती. त्या पुलाच्या तोंडी राक्षसाएवढे कित्येक यक्ष हातात मोठमोठे लोखंडी भाले घेऊन राजव्दाराचे रक्षण करण्याकरिता उभे होते.

मुबारिक म्हणाला, 'आता आपणास पुढे जाता कामा नये. हे यक्ष आपल्याला भाले मारुन ठार मारून टाकतील. याकरिता, आपणापाशी त्यांना येताच येणार नाही, अशा प्रकारचे काही मंत्रसंधान केले पाहिजे,' नंतर त्याने आपणाबरोबर एक पिशवी आणली होती, तिच्यातून पिवळ्या कापडाच्या लांबलांब लंगोट्या काढल्या. त्यापैकी एक त्याने आपल्या कंबरेला बांधली व दुसरी गळ्याला बांधली आणि बाकीच्या दोन झेन यास देऊन त्यालाही त्याचप्रमाणे करण्यास सांगितले. नंतर त्याने सकलादीचे दोन लहान लहान तुकडे जमिनीवर टाकले व त्यांच्या काठावर कित्येक प्रकारचे हिरे, स्फटिक आणि कस्तुरी ही पसरली. त्या सकलादीच्या तुकड्यांपैकी एकावर तो स्वतः बसला व दुसऱ्यावर झेन बसला. मग तो झेन यास म्हणाला - आपल्यासमोर जो हा राजवाडा दिसत

आहे, त्यातून मी यक्षांच्या राजास मंत्राने पाचारण करतो. ईश्वर करो आणि तो सैम्यवृत्ती धारण करून येवो, म्हणजे आपण मिळविली ! कारण, या राजश्रीची तबियत कोणत्या कलावर जाईल याची मलाही खरोखर भीतीच आहे ! तो आपल्या समोर आला, की लागलीच तुम्ही उठून मुजरा करा. पण या सकलादीवरून मात्र हलू नका. तुम्ही त्यास म्हणा की, 'यक्षराज,आपला सेवक जो माझा बाप, त्यास परमेश्वराचा दूत यम हा घेऊन गेला; तर आपणाला माझी अशी प्रार्थना आहे की, त्याचा ज्याप्रमाणे आपण सांभाळ केला, त्याप्रमाणे माझाही करावा.' त्याने जर तुम्हाला विचारले की, 'तुझे काय म्हणणे आहे ?' तर तुम्ही म्हणा की, 'म्हणणे दुसरे काही नाही;तो तेवढा नववा पुतळा मला मिळावा'.

याप्रमाणे झेन यास सांगून मुबारिक याने मंत्र म्हणण्यास प्रारंभ केला. तर लगेच विजेचा लखलखाट होऊन त्याचे डोळे दिपून गेले. इतक्यात मोठ्याने मेघांचा गडगडाट झाला व सर्व प्रदेश अंधारमय होऊन गेला. त्याचप्रमाणे मोठा सोसाट्याचा वारा वाहू लागला. चोहोंकडून भयंकर आरोळ्या ऐकू येऊ लागल्या, जमीन थराथरा कापू लागली आणि प्रलयकाळ जो म्हणतात तोच येऊन ठेपला की काय असे होऊन गेले.

झेन या भयाने अगदी चकित होऊन गेला व त्या आरोळ्या ऐकून पुढील चिन्ह कांही ठीक नाही असे त्यास वाटले; पण मुबारिक याला या गोष्टीच्या संबंधाने चांगली माहिती होती, त्यामुळे त्याला याचे काहीच वाटले नाही. तो किंचित हसून झेन यास म्हणाला, 'हं भिऊ नका, धैर्य धरा, हे सर्व चालले आहे ते ठीक आहे; यात वाईट मुळीच नाही.' इतक्यात यक्षांचा राजा परमररूपवान पुरुषाचे रूप धारण करून त्या ठिकाणी प्राप्त झाला. तथापि त्याची मुद्रा किंचित उग्रच दिसत होती.

मुबारिक याने पूर्वी सांगून ठेविल्याप्रमाणे झेन याने यक्षांच्या राजास मुजरा केला. तेव्हा तो हास्यवदन करून म्हणाला, तुझ्या बापावर माझी मोठी मर्जी होती व जेव्हा जेव्हा तो मला भेटावयास येई, तेव्हा तेव्हा त्याला मी एक पुतळा बक्षीस देत असे. ' मुला, तुझ्यावरही माझी त्याच्यापेक्षा काही कमी ममता आहे असे तू समजू नको. तुझा बाप मरण पावण्यापूर्वी मला भेटावयास आला होता,

त्या वेळी मीच त्याला मुद्दाम त्या साटिणीवर तीच अक्षरे लिहून ठेवण्यास सांगितले होते व त्यास असे वचन दिले होते की, मी तुझ्या मुलावर नेहमी आपली पारख ठेवीन आणि तुला दिलेल्या आठ पतुळयांहूनही अत्यंत सुंदर जो नववा पुतळा मजपाशी आहे, तो मी त्यास देईन. पण तू स्वप्नात वृद्ध मनुष्य पाहिलास , तो मीच. त्या मोहोरांच्या बरण्या व ते आठ पतुळे जे तुला तळघरात सापडले, ते कोणत्या रीतीने तुला प्राप्त होतील हे मीच तुला सांगितले. तुला जी काही आजपर्यंत संकटे वगैरे भोगावी लागली, त्यात माझेच पुष्कळ अंग आहे. निदान त्यास मी कारणीभूत तरी झालो आहे. तू कोणता हेतू मनात धरुन आला आहेस ते मी समजलो, तुझा हेतू सिद्धीस जाईल. तो नववा पुतळा देण्याचे तुझ्या बापाला मी वचन दिले होते; तर तुला मी तो देईन. पण माझी एक अट अशी आहे की, एक सोळा वर्षांची मुलगी-जिला पुरुषाचा वारा देखील लागला नाही अशी - मी तुम्हाला आणून देईन, अशी तुला शपथ घेतली पाहिजे. ती मुलगी रुपानेही उत्तम असली पाहिजे व तुला आपले मनोविकार इतके स्वाधीन ठेवले पाहिजेत की, तू तिला येथे घेऊन येत असता तिच्यावर तुझे मन बिलकूल जाता कामा नये.'

झेन याने विचार न करता ती गोष्ट करण्याविषयी शपथ घेतली. नंतर तो यक्षांच्या राजास म्हणाला,'पण महाराज, सुदैवेकरून आपण म्हणता तशी सुंदर मुलगी सापडली, तर तिच्या अंगी दुसरे जे गुण पाहिजेत ते आहेत की नाहीत हे मी कसे समजावे ?' यक्षांच्या राजाने हसून उत्तर केले, 'ही अडचण तर खरीच; तुम्हा लोकांना ते समजण्याची पंचाईतच आहे. कां की,ती ज्ञानशक्ती तुमच्या ठायी नाही. परंतु मीही त्या गोष्टीच्या संबंधाने केवळ तुझ्यावरच अवलंबून राहीन असे नाही. तुला मी एक आरसा देईन. तुला सोळा वर्षांची परमरुपवती मुलगी आढळली, म्हणजे तू त्या आरशातून तिला पाहा. ती जर निष्कलंक असेल तर आरसा स्वच्छ राहील-त्याजवर डागबीग काही पडणार नाही व तसे नसल्यास तो मळकट दिसू लागेल आणि असे झाले म्हणजे ती काही निष्कलंक नाही असे तू समज. असो; आता तू जी शपथ घेतलीस, तिची पक्की आठवण धर व आपला बोल खरा करून दाखव. नाहीपेक्षा तुजवर जितकी कृपा झाली आहे,

तितकीच अवकृपा होईल व मग मी तुझा प्राण घेतल्यावाचून राहणार नाही. झेन याने पुनः प्रतिज्ञापूर्वक सांगितले की, 'मी बोलल्याप्रमाणे करून दाखवल्यावाचून कधीही राहणार नाही.'

नंतर यक्षांच्या राजाने झेन याच्या हातात एक आरसा दिला आणि तो म्हणाला, ' मुला, हाच तो मी तुला सांगितलेला आरसा. हा घेऊन जा आणि वाटेल तेव्हा परत ये.' झेन व मुबारिक या उभयतांनी त्याचा निरोप घेतला आणि परत ते त्या तलावापाशी आले. तेथे तो पूर्वीचा कोळी होडी घेऊन आलेला होताच; त्याने त्यांना होडीत बसवून अलीकडे आणले. मग ते आपले घोडे व नोकर लोक होते त्या ठिकाणी आले व त्यासह कैरो शहरास सुखरूप येऊन पोहोचले.

झेन मुबारिक याचे घरी काही दिवस राहिला; नंतर एके दिवशी तो त्यास म्हणाला,'चला आता आपण यक्षांच्या राजाकरिता एखादी मुलगी पाहण्यास बगदाद येथे जाऊ.' मुबारिक याने उत्तर केले. बगदादेसच कशाला जायला पाहिजे ? येथे का मुलींना तोटा गेला आहे ?' झेन म्हणाला, 'ते खरे, पण त्या आहेत कोठे हे आपणाला कसे समजावे ?' मुबारिक याने उत्तर केले, 'अंः, त्याची तुम्हाला काळजी नको. येथे माझ्या ओळखीची एक चतुर स्त्री आहे. तिला मी हे काम सांगतो. ती ते उत्कृष्ट तऱ्हेने बजावील.'

मुबारिकाने म्हटलेली स्त्री खरोखरच तशी कर्तृत्वाची होती. त्याने तिला सांगताच तिने सोळा वर्षे वयाच्या एकीपेक्षा एक वरचढ अशा रूपवती मुली झेन यास दाखविल्या. त्याने प्रत्येकीस आरशात पाहिले; पण एकीलाही पाहताना आरसा साफ राहिला असेल तर शपथ ! तो अगदी मलिन होऊन जाई. सगळ्या शहरातल्या व राजवाड्यातल्या एकूण एक मुलींची अशी फजिती उडून गेली !

याप्रमाणे कैरो येथे आपल्याला हवी तशी मुलगी मिळत नाही हे पाहून ते बगदाद येथे गेले. तेथे त्यांनी भरवस्तीच्या ठिकाणी एक मोठा सुंदर वाडा भाड्याने घेतला आणि त्यात ते मोठ्या थाटाने राहिले. त्यांचे तेथे दररोज सर्वांस मुक्तव्दार भोजनास मिळे. सगळी मंडळी जेवून उठल्यावर जे काही शेष राही, ते दरवेशी वगैरे गरीब लोकांस देत. तेणेकरून त्यांचाही चांगला निर्वाह

होत असे.

हे दोघे ज्या पेठेत राहत असत, त्याच पेठेत एक इमाम राहात असे. त्याचे नाव आबू बेकर असे होते. त्याच्या अंगी हा एक मोठा अवगुण होता की, त्याला दुसऱ्याचे चांगले पाहवत नसे. श्रीमंत म्हणून जेवढे लोक, तेवढ्यांचा तो फार द्वेष करी. याचे कारण दुसरे काही नाही. तर आपण दरिद्री असता इतर लोक श्रीमंत का असावेत हेच काय ते ! लोक हवे तसे जेवतात, खातात, चांगला कपडालत्ता व दागदागिने घालतात व आपण भुकेकंगाल ! हे पाहून त्याच्या तळव्याची आग मस्तकास जाई. झेन हा मोठा श्रीमंत व उदार आहे हे ऐकून त्याजविषयी त्याच्या मनात फार मत्सर उत्पन्न झाला. तेव्हा एके दिवशी मशिदीमध्ये नमाज पढून झाल्यावर तेथल्या सर्व लोकांस तो म्हणाला, 'बांधवहो, आपल्या पेठेत कोणी परदेशाचा माणूस आलेला आहे, तो लोकांस शेकडो रुपये देतो असे माझ्या ऐकिवात आले आहे. मला वाटते की, हा कोणी लबाड मनुष्य असावा. ह्याने स्वदेशात कोणाचे घर बुडविले असेल व येथे निर्धास्त चैन करण्याकरिता आला असेल. तेव्हा या गोष्टीचा आपणाला विचार करणे जरुर आहे. अशा प्रकारचा मनुष्य अमुक पेठेत राहतो असे कालिफ याच्या कानावर गेले तर, ही गोष्ट लागलीच आम्हांस का कळविली नाही असे तो म्हणेल व आपणा सर्वांस शासन करील. 'तेव्हा लोकांना काय, दुनिया झुकती है ' या न्यायाने त्या सर्वांनी म्हटले, 'हो खरेच, इमामसाहेब, तुम्ही म्हटले हे काही खोटे नाही. आता तुमच्या मनात पहिल्यांदा ही गोष्ट आली आहे, तर तिजबद्दल सरकारात वर्दी तुम्हीच द्या म्हणजे झाले, ' अबू बेकर यास हेच हवे होते ! लोकांचे बोलणे ऐकून त्याला मोठा हर्ष झाला आणि त्याने घरी येऊन अर्ज तयार केला व दुसरे दिवशी तो कालिफाकडे नेऊन गुजरण्याचा त्याने निश्चय केला.

मुबारिक हा त्या मशिदीत नमाज पढण्यकरिता आलेला होता. त्याने हे सर्व ऐकताच केले काय, की पाचशे मोहोरांची एक थैली व कितीएक उंची कपड्याचा बस्ता घेऊन तो अबू बेकर याचे घरी आला. त्यास पाहून अबू बेकर याने रागावून म्हटले, 'तुम्ही कोण हो ? येथे कशाला आला ?' मुबारिक याने मोठ्या नम्रतेने त्याच्यापुढे ती थैली व कपड्यांचा बस्ता ठेवून म्हटले, 'इमामसाहेब, मी

आपल्या शेजारी राहात असून आपल्या छायेखाली आहे. झेन राजा हा आपल्या आळीत राहत आहे, त्याजकडून मी आलो आहे. आपली लोकोत्तर पवित्रता व सौजन्य याविषयी वार्ता ऐकल्यावरून आपला परिचय व्हावा अशी इच्छा त्यास उत्पन्न झाली आहे व त्याबद्दल त्याने आपणास विनंती करण्याकरिता मला आपल्याकडे पाठविले आहे आणि ही अल्प भेट आपण स्वीकारावी अशी त्याची विनंती आहे,' हे ऐकून आबू बेकर याचा हर्ष त्रिभुवनात माईना ! तो मुबारिक यास म्हणाला, 'तर मग तुमच्या राजेसाहेबांचा माझ्याकडून मोठाच अपराध झाला ! पण तुम्हास माझी विनंती आहे की, 'तुम्ही मजकरिता त्यांची क्षमा मागा; मी अद्यापि त्यांचे भेटीस आलो नाही, याची मला मोठी शरम वाटते. असो. आता उद्या मी त्यांच्या भेटीस खास येतो, तेव्हा आपले आणखी बोलणे होईलच.'

दुसरे दिवशी आबू बेकर हा मशिदीत नमाज पढण्याकरिता गेला, तेव्हा त्याने सर्व लोकास सांगितले, 'गृहस्थहो, ज्याला शत्रू नाही असा एकही मनुष्य या जगात नाही. त्यात विशेषतः जे श्रीमंत असतात, त्यांच्या पाठीस तर लोक एकसारखे हात धुऊन लागलेले असतात. काल संध्याकाळी ज्या मनुष्याविषयी मी तुम्हांस सांगितले, त्यांच्या संबंधाने एका लबाडाने माझे कान फुंकले म्हणून मी तसे बोललो. पण वास्तविक पुसाल तर तो मोठा सज्जन व सत्त्वधारी आहे. तर अशा परमयोग्य पुरुषाच्या संबंधाने आपण कालिफास खोटी बातमी देऊन त्या बिचाऱ्याची विनाकारण नुकसानी करावी हे योग्य नाही.'

आबू बेकर याने आदले दिवशीच्या भाषणाने झेन याजविषयी लोकांच्या मनात जो वाईट ग्रह करून टाकला होता, तो त्याने आपल्या या भाषणाने अगदी नाहीसा करून टाकला. नंतर तो घरी गेला आणि सणावाराच्या दिवशी घालण्याचा जो त्याचा पोषाक होता तो घालून झेन याचे भेटीस आला. झेन याने त्याचा मोठा सत्कार केला. नंतर लोकसंप्रदायाप्रमाणे उभयतांच्या इकडच्या तिकडच्या थोड्याशा गोष्टी झाल्यावर आबू बेकर झेन यास म्हणाला, 'तुमचा येथे बरेच दिवस मुक्काम होणार आहे वाटते ? ' झेन याने उत्तर केले, 'सोळा

वर्षांची अतिरुपवती मुलगी- मला पाहिजे आहे व ती मिळेपर्यंत या ठिकाणी मला राहावयाचे आहे,' आबू बेकर म्हणाला,'तुम्ही म्हणता तशी मुलगी तुम्हाला मिळणे दुरापास्त आहे. पण माझ्या आढळात एक तशा प्रकारीच मुलगी आहे. तिचा बाप पूर्वी कालिफचा मुख्य वजीर होता. पण त्याने बरेच दिवसांपासून ते काम सोडून दिले असून तो आपला सुखवस्तू होऊन राहिला आहे व आपल्या मुलीला उत्तम प्रकारचे शिक्षण देण्यात तो आपला सर्व वेळ घालवीत असतो. तुमची मर्जी असल्यास मी त्याजकडे जाऊन तुम्हाकरिता तिजविषयी त्याजपाशी गोष्ट काढतो. तुम्हासारखा कुलीन व गुणवान् वर आपल्या कन्येस मिळत आहे हे पाहून त्याला मोठा आनंद होईल अशी माझी खातरी आहे.' झेन याने उत्तर केले, 'या गोष्टीची इतकी घाई करून उपयोग नाही. ती मुलगी अगोदर मला हवी तशी आहे अशी माझी खातरी झाल्यावाचून मी तिच्याशी विवाह करणार नाही.तिच्या सौंदर्याच्या संबंधाने तुम्ही माझी खातरी कराल,पण ती निष्कलंक असल्याविषयी कशी करणार ?' आबू बेकर म्हणाला, 'त्यासंबंधाने तुम्ही तशी कशी खातरी करून घेणार ? ' झेन याने उत्तर केले, 'ती माझ्या एकदा दृष्टीस पडली पाहिजे, की मी लागलीच तिची परीक्षा करून सोडीन.' आबू बेकर किंचित हसून म्हणाला, 'तर मग तुम्ही मुखसामुद्रिकात मोठे निष्णात दिसता बोवा ! बरे, काही चिंता नाही. तिच्या बापाच्या घरी मी तुम्हाला नेतो व त्याच्या समक्ष एक क्षणभर तिला तुमच्यासमोर आणून उभी करतो.'

आबू बेकर याने झेन यास वजिराच्या घरी नेले. त्याने झेन याचे कुलशील व थोर पदवी ह्याविषयी वजिरास सांगताच त्याने लागलीच मुलीस हाक मारिली, आणि तिच्या तोंडावरचा बुरखा काढवून तिला झेन ह्याजपुढे उभे केले. झेन याने अशी अनुपमेय लावण्यवती स्त्री कधीच पाहिली नव्हती, यामुळे तिजकडे पाहात तो अगदी चित्रासारखा स्तब्ध राहिला. नंतर त्याचे चित्त अंमळ थाऱ्यावर आल्यावर त्याने आपल्या जवळचा आरसा काढिला, आणि त्यात तिला पाहिली, तो तो आरसा जसाचा तसाच स्वच्छ राहिला-किंचित् देखील मलिन दिसला नाही.

याप्रमाणे ती मुलगी आपल्या कसोटीस उतरली असे पाहून झेन याने

वजिरास ती आपणाला देण्याविषयी विनंती केली, त्याने 'होय' म्हणून लागलीच काजीला बोलावून आणून तेथल्या तेथेच तो विधी करविला. हे झाल्यावर झेन याने वजिरास आपल्या घरी नेले व त्यास मोठ्या थाटाची मेजवानी करून बहुमोलाचा नजराणा दिला. नंतर त्याने मुबारिक याचे हाती जडावाच्या सुंदर मोठमोठ्या दागिन्यांनी भरलेली एक पेटी नवऱ्या मुलीकडे पाठविली. ती मुबारिक त्या मुलीकडे घेऊन गेला आणि त्याने तीस झेने याचे घरी आणिले. नंतर मोठ्या थाटाने लग्नाचा सोहळा झाला. हे सर्व उरकल्यावर मुबारिक झेन यास म्हणाला, 'आता आपण येथून निघून कैरो शहरास जाऊ; कारण आपण यक्षांच्या राजास दिलेले वचन आपणाला पुरे केले पाहिजे.' झेन म्हणाला, 'हो अलबत, त्याची तर मला फार काळजी आहे. पण खरोखरच पुसाल तर, मुबारिकसाहेब, मी तुम्हाला सांगतो की, यक्षांच्या राजाच्या म्हणण्यास मी जरी रुकार दिला आहे, तरी त्याप्रमाणे आता करण्यास माझे मन माघार घेते व ही जी रूपसुंदरी मला प्राप्त झाली आहे, तिला बसोऱ्यास घेऊन जाऊन आपली पट्टराणी करावी अशी माझ्या मनात इच्छा उत्पन्न झाली आहे. ' मुबारिक म्हणाला,'असे नाही हो उपयोगी ! कसेही करून तुम्हाला आपल्या मनाचे आकलन केलेच पाहिजे व यक्षांच्या राजास दिलेले वचन पुरे केले पाहिजे. ' झेन म्हणाला, 'बरे तर, तुम्ही आता इतके तरी करा की, इतःपर तिला माझ्या दृष्टीस पडू देऊ नका. काकी, आतापर्यंत मी तिला जितके पाहिले आहे, तेवढ्यानेच माझ्या मनाची मोठी चलबिचल झाली आहे !'

मग मुबारिक याने निघण्याची तयारी केली व ते दोघेही त्या मुलीसह कैरो येथे जाऊन पोहोचले. तेथून लागलीच ते यक्षांच्या राजाच्या मुलखात गेले. तेथे गेल्यावर ती मुबारिक यास म्हणाली, 'आपण आता बरीच दूर आलो नाही बरे ? आता प्राणपतीचे राज्य येथून जवळच असेल नाही ? ' मुबारिक म्हणाला, ' मुली, आता तुला खरे सांगण्यास हरकत नाही; तू समजलीस का ? तुला झेन राजाने वरिले खरे, पण ते सगळे थोतांड आहे ! त्याने तुझ्या बापाकडून तुला काढण्याकरिता ती केवळ युक्ती केली. तुला त्याने आपले तनमन मुळच अर्पण केले नाही व बसोरा येथे नेऊन तुला पट्टराणी करण्याचा त्याचा मुळीच उद्देश

नाही. यक्षांच्या राजाने त्याजपाशी एक अत्यंत पवित्र स्त्री मागितली होती व झेन याने पुष्कळ मुली पाहिल्या, पण त्याला तशी तूच एक सापडलीस; तेव्हा आता तो तुला त्या राजाच्या स्वाधीन करणार. हे ऐकून त्या मुलीला अतिशय दुःख झाले व तिने रडून आकांत केला. ते पाहून झेन व मुबारिक ह्यांसही फार वाईट वाटले. ' ती म्हणाली,महाराज, मजवर दया करा. माझे या ठिकाणी कोणी नाही; माझ्या बापाकडून तुम्ही मला काढून आणून माझा असा जर विश्वासघात केलात, तर त्याबद्दल परमेश्वरापाशी तुम्हास जाब द्यावा लागेल !'

तिने रडून आकांत केला, तरी त्याचा काहीएक उपयोग न होता त्यांनी तिला यक्षांच्या राजाचे स्वाधीन केले. त्याने तिला पाहताच त्यास मोठा आनंद झाला व तो म्हणाला, 'झेन,तू मजकरिता जी मुलगी पाहून आणिलीस, ती सुंदर असून निष्कलंक आहे व तू इतके श्रम सोसून आपला शब्द शेवटी खरा केलास हे पाहून मला फार संतोष झाला आहे. तू आता आपल्या राज्यात परत जा. घरी पोहोचताच आपल्या त्या तळघरात जाऊन पाहा, म्हणजे तेथे तो नववा पुतळा तुझ्या दृष्टीस पडेल. मी यक्षांकडून तो तेथे नेऊन ठेवितो.' झेन याने यक्षांच्या राजाचे मोठे आभार मानले व तो आणि मुबारिक हे कैरो येथे आले. झेन हा तेथे फार दिवस राहिला नाही; का की, तो नववा पुतळा पाहण्याची त्यास फार उतावळी झाली होती. आपल्या इच्छेप्रमाणे तो पुतळा आपल्याला मिळणार असे पाहून जरी त्यास आनंद झाला, तरी त्या मुलीचा आपण विश्वासघात केला ही गोष्ट त्याच्या मनास खाऊ लागली. तो आपल्या मनात म्हणाला, 'त्या रूपसुंदरीला मी तिच्या बापापासून तोडून यक्षाच्या स्वाधीन केले, हा मजकडून केवढा प्रमाद घडला ! हे मृगनयने, खरोखर तुझी अशी स्थिती व्हावी हे फार शोचनीय होय !'

त्याप्रमाणे झेन राजाचे मन अतिशय व्यग्र होऊन गेले. शेवटी तो बसोरा तेथे येऊन पोहोचला. तो आला त्या दिवशी राजधानीतल्या लोकांनी मोठा आनंदोत्सव केला. झेन हा वाड्यात येताच आपल्या आईस भेटला व झालेला सर्व वृत्तांत त्याने तीस सांगितला. त्याचा हेतू सिद्धीस गेला हे पाहून तिला मोठा हर्ष झाला. ती त्यास म्हणाली, 'बेटा, यक्षांचे राजाने तो पुतळा तळघरात आहे

म्हणून सांगितले, त्या अर्थी तो तेथे असेलच; चल तर आता आपण तो पाहू. ' मग ती दोघे लागलीच तळघरात गेली, पण तेथे पाहतात तो त्या नवव्या तिवयीवर पुतळा असावयाचा तो मुळीच नसून तेथे एक अत्यंत लावण्यवती सोळा वर्षांची मुलगी त्यांच्या दृष्टीस पडली. हे पाहून त्यांना पराकाष्ठेचे आश्चर्य वाटले व त्यातूनही जी मुलगी आपण यक्षांचे राजाच्या स्वाधीन केली होती, तीच ही आहे असे जेव्हा त्याने पाहिजे,तेव्हा तर त्याच्या आश्चर्यास पारावारच नाहीस झाला ! ती मुलगी झेन यास म्हणाली, 'महाराज, मला या ठिकाणी पाहून आपणाला मोठे नवल वाटले असेल यात संशय नाही. याहूनही जास्त मोलाची वस्तू आपल्याला सापडेल अशी आपणास आशा होती व ती सफल न झाल्याकारणाने, आपण जे एवढे श्रम केले ते उगीच केले, असे खचित आपणास वाटेल व मीही कबूल करते की, आपल्या श्रमाचे फळ आपणाला यात खरोखर मिळाले नाही.' झेन म्हणाला, 'छे छे, प्रिये, असे म्हणू नको. माझ्या अंतःकरणात काय आहे हे सर्व साक्षी परमेश्वर जाणत आहे. तुझा प्रथम स्वीकार करून यक्षांच्या राजास दिलेले वचन मोडावे हा विचार अनेक वेळा माझ्या मनात आला होता. पण तसे करण्यापासून आपणा उभयतांसही सुख न होते. आता फार बोलून काही अर्थ नाही. पण त्या पुतळ्याच्या संबंधाने म्हणशील तर तसले शेकडो पुतळे तुजवरून ओवाळून टाकावे अशी तुझी योग्यता आहे. या जगात जेवढी म्हणून संपत्ती आहे, तिजपेक्षा तुझ्या सहवासाचे सुख मला अधिक प्रिय आहे.'

हे बोलणे चालले आहे इतक्यात मोठी मेघगर्जना होऊन ते तळघर हालले. तेणेकरून झेन याच्या आईस फार भीती वाटली. पण तितक्यात यक्षांचा राजा तेथे प्रगट झाला आणि त्याने तिची भीती नाहीशी केली. तो तिला म्हणाला, 'बाईऽ तुमच्या मुलाने रक्षण करण्याचा मी पतकर घेतला असून त्याजवर माझी पूर्ण कृपादृष्टी आहे. त्याला या अल्प वयात आपले मनोविकार स्वाधीन ठेविता येतात की नाही, एवढेच मला पाहावयाचे होते, म्हणून मी हे सर्व केले. आता या मुलीच्या रूपाला तो भुलून तिजविषयी त्याला इच्छा उत्पन्न झाली व त्यामुळे त्याने मला दिलेले वचन त्याजकडून बरोबर रीतीने पाळले गेले नाही हे मी

जाणून आहे. पण याबद्दल मी त्याला दोष देत नाही; का की, मानवी स्वभावाच्या दुर्बलत्वाचा हा गुणच आहे. नंतर झेन याजकडे वळून तो म्हणाला, 'मुला, तुला मी जो नववा पुतळा देणार होतो, तो हाच. आता ह्या स्त्रीबरोबर तू सुखाने नांद. हिने तुजवर सदोदित प्रीती करावी अशी जर तुझी इच्छा असेल, तर हिजखेरीज इतर स्त्रिया केवळ मातेसमान समजून हिजवरच आपले प्रेम ठेव आणि तू असे केलेस म्हणजे मग हिच्या पातिव्रत्याविषयी मी जबाबदार आहे.'याप्रमाणे बोलून तो अदृश्य झाला. झेन याने मोठ्या आनंदाने त्याच दिवशी बडा दरबार भरवून तिला आपली पट्टराणी केल्याविषयी सर्व रयतेस जाहीर केले. पुढे त्यांची एकमेकांवरची प्रीती दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन ती पुष्कळ वर्षे सुखाने नांदली.

(कृष्णशास्त्री चिपळूणकर : अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी)

# ७.२० समुद्रतळीचा राजवाडा

(जपानची लोककथा)

दोन भाऊ सख्खेच. पण दोघांच्या दोन तऱ्हा होत्या व्यवसायाच्या. मोठा "होना" पाण्यात गळ टाकून मासे पकडून विकत असे, तर धाकटा "होकी" हा डोंगरदऱ्यात हिंडून धावून शिकार करणारा. पक्षी मारणारा फासेपारधी म्हणून लोक त्याला ओळखीत असत. 'होकी' हा स्वभावानेही दयाळू, चांगला व सरळ तर 'होना' मोठा दुष्ट स्वार्थी व निष्ठुर ! एकाच आईची मुलं, पण किती फरक असतो, पाहिलंत ?

एक दिवस होकी वडील भावाला म्हणाला - 'दादा, रोज उठून रानात धावायचा फार कंटाळा आला आहे. आजच्या दिवस थंडपणे समुद्रकाठी बसून मासे मारावे म्हणतो. तुमचा गळ देता आज मला ?'

'पण माझा गळ मी मुद्दाम बनवून घेतलेला आहे. भारी महागाईचा आहे, यशस्वी आहे, तू कुठेतरी हरवशील. मी देत नाही !'

'अहो, हरवायला काय झालं ? द्याकी,एकच दिवस तर मागतो आहे मी दादा-द्या ना.असं काय करता ?'

'बरं ने, पण हरवलास तर याद राख, हाकलूनच देईन घरातून. असे म्हणून त्याने आपला तो मूल्यवान गळ होकीला दिला.

गेला समुद्रावर होकी. समुद्र कसा शांत निळा गहिरा दिसत होता, थंड वाऱ्याच्या झुळका त्याला किती सुखकर वाटत होत्या व काम तर मजेचच. इतके छान छान मासे समुद्रात पोहत होते ते गळाने पकडायचे. 'एखादा मोठा मासा गळाला लागला की, बस्स तेवढ्यात आपलं जेवण होईल आजचं. रोजचं माझं डोंगर पहाडात धावणं, त्याऐवजी हे काम सोपं-अगदी सोप्पंच !' तो विचार करीत होता. पण ते काम तेवढं 'सोप्पंसं' नव्हतं. इतके मासे समुद्रात फिरत होते पण एक मासाही याच्या गळाला लागेना ! समुद्रातले सारेच मासे जणू शहाणे झाले

होते आज या गळाला फसणे म्हणजे मरण हे ओळखत होते जसे. सायंकाळ झाली, तरी करंगळीएवढी मासोळीसुद्धा गळाला नाही लागली ! चला उठा. हा व्यवसाय नशिबाचाही आहेसे दिसते - तो उठता उठता गळ टाकून म्हणाला - 'आता हा शेवटचा प्रयत्न. पाहू नशीब ! पण खरेच, ' त्याचे नशीब आज रुसले असावे त्याच्यावर. कारण एक भला मोठा देवमासा या गळाला अडकलासे त्याला वाटले. गळ तो ओढून घेणार, तर हे काय झाले ? त्या माशानेच याचा गळ जोरात उसळी मारून ओढून घेतला व तो समुद्रात दूर कुठे गडप झाला ! गळ गेला. आता दादा किती संतापतील ? कोण जाणे ! भीत भीत तो घरी आला व दादांना त्याने सर्व सांगितले व 'मी बाजारातून नवा गळ आणून देतो,' असेही म्हटले !

होना दादा ओरडला. 'मला वाटलंच, तू असा धांदरट, तुला गळ देऊ नये म्हणून. पण म्हटलं जाऊ द्या, लहान भाऊ कधी नव्हे ते मागतो आज, द्यावा. तर माझा यशस्वी गळ गमावून आलास ? 'गळ गेला ! म्हणून तोंड वेंगाडून सांगताना लाज नाही वाटली ? '

'पण-पण मी-मी उद्याच आणून देतो- त्याहून चांगला दादा. '

'नाही ! मला दुसरा नको ! माझाच गळ मला हवा ! जा निघ, चालता हो घरातून. घरात यायचं असलं तर माझा तो गळ हुडकून मगच पाऊल ठेव इथे, तोवर या घराची दारं तुला बंद ! जा, निघ, काळं कर इथून ! ' होनाने त्याचे धनुष्य व बाणही उचलून घेतले व म्हटले - 'आणि ध्यानात ठेव, गळ आणशील तेव्हाच तुझं धनुष्य अन् बाण परत मिळतील. मी अडकवून ठेवतोय ते ! चलावं !'

होनाने हात धरून त्याला दाराबाहेर ढकलले व खाडकन् दार बंद करून टाकले. किती निर्दयपणा हा ? होकी लहान भाऊ, स्वभाव नम्र, तरही, थोरला भाऊ एवढं मोठं शासन करील असं त्याला वाटलं नव्हतं. क्षुद्र गळ तो काय ? गोष्ट किती क्षुल्लक अन् शिक्षा किती मोठी ? म्हणे घरात येऊ नको ! 'अरे, या घरातच माझ्या आईच्या कितीक आठवणी जागोजाग आठवीत राहातो मी, आईच्या लाडक्या वस्तू मी रोज काढून पहातो, ते माझं सुखही दादा तुम्ही हिरावून घेतलंत ? एवढा मोठा अपराध होता का माझा ? मोठे कठोर मन तुमचे.'

स्वतःशी विचार करीत तो समुद्रावर आला. काठावर उदासपणे बसून राहिला. एवढ्या प्रचंड समुद्रात हरवलेला गळ सापडवून काढणं म्हणजे वाळूच्या मैदानात हरवलेली टाचणी हुडकण्यासारखंच वेडेपणाचं, काय बरं करावं ?

समोरून एक वृद्ध आला. त्यानं विचारलं - 'रात्र झाली बेटा, तरीही इथे का बसून राहिला आहेस ? ' त्यानं सारे सांगितले, वृद्ध म्हणाला, 'तर मग तुला तुझा गळ आणायला समुद्रतळी देवमाशाच्या किंवा आपल्या पाणसर्प राक्षसदेवांच्या राजवाड्यातच जायला हवं. समुद्रात हरवलेल्या साऱ्या वस्तू तेथे आणल्या जातात. 'राजे चांगले आहेत. तू त्यांना भेट-'

'सांगायला ते ठीक, पण समुद्रतळी मी जायचं कसं ? '

'हात्तेच्या,त्यात काय अवघड ? चल,माझी ही छोटी नाव आहे त्यात बैस. मी पोचवतो. डोळे मीट जरा !'

त्याने डोळे मिटले. नाव सुरू झाली पण ती खोलखोल जाते आहे व तरीही आपण भिजत नाही आहोत हे त्याला जाणवले. 'उघड डोळे. हाच ड्रॅगन किंगचा (पाणसर्प राक्षसदेवाचा) राजवाडा.' त्याने शब्द ऐकले. डोळे उघडतो तो खरेच ! केवढा सुंदर व कोरीव कामाचा प्रचंड राजवाडा तो ? राजवाड्याभोवती सोनेरी चकाकणारी वाळू पसरलेली होती, चीनमधील शिंगावर शिंगे असलेल्या देवालयांप्रमाणे याची छपरे होती. समुद्रशेवाळाच्या रंगीबेरंगी झुपक्यांनी ह्या शिखरांवर नक्षी कोरली होती. रत्नाकराचेच राज्य ते ! तेथे मोत्यांची कमतरता थोडीच? रत्नमहाल म्हणण्यासारखी रत्ने, मोत्ये तेथे खिडक्या दारांवर बसवली होती व त्यांनी त्या राजवाड्याची दालने चकाकत होती. त्याने जन्मांत इतका भव्य व एवढा दिव्य राजवाडा पाहिला नव्हता. पण या राजवाड्याची दारे गच्च बंद. शेजारीच एक मोठे निराळ्या प्रकारचे पण सुंदर फुलांचे मोठे झाड होते. कुणीतरी आतून बाहेर येईल दार उघडेल, तोवर बघूया, असे म्हणून तो त्या झाडावर चढून बसला.

आणि खरेच; थोड्या वेळाने दोन अत्यंत सुंदर मुली तेथे राजवाड्याचे एक दार उघडून आल्या. अगदी मानवाच्या मुलीसारख्याच ! होकीला वाटत होते

की, हे ड्रॅगनचे राज्य, येथले सारेजण म्हणजे मासे, देवमासे, सुसरी, मगरी किंवा पाणसर्प, पाणघोडे अशाच आकारात असणार ! पण येथेही मानवांच्याप्रमाणेच काही मंडळी आहेत कां ? वा ! फार छान. त्या दोघी राजकन्या फु लं वेचायला आल्या व त्यांनी होकीला पाहिले व खाली येण्याची खूण केली व म्हटले, 'आपण कोणी पृथ्वीवरचे दिसता, इकडे कसे ?

' मी माझी एक समुद्रात बुडालेली वस्तू शोधायला आलो. मी एक गरीब तरुण आहे. होकी माझं नाव. आपण ? '

'आम्ही समुद्रदेव सर्पराक्षसराज यांच्या मुली, चला तुम्हाला आम्ही बाबांकडे नेतो. पृथ्वीवर त्यांचे मानवमित्रही आहेत. '

त्यांच्याबरोबर तो राजवाड्यात राजाकडे गेला. राजा पाणसर्पराज यावेळी मानव रूपात होता. होकीला बघून व त्याची हकिगत ऐकून तो म्हणाला -

' मुला,तुला बघून मला पृथ्वीवरच्या एका माझ्या सज्जन मित्राची आठवण झाली.' त्याचं नाव युशिन. टोकियो शहरात ते मच्छीमारीचा धंदा करायचे. तू अगदी तस्सा दिसतोस' -

' मी त्यांचाच पुत्र आहे महाराज, युशिन् माझे वडील आता राहिले नाहीत, देवाघरी गेले ते. '

अरेरे ! बरं तू मित्राचा मुलगा आला आहेस तर तुझं कामही करू पण जरा सावकाशीनं. राहा, मजा कर, माझ्या राज्यातली प्रेक्षणीय स्थळे बघून घे. खूपच चमत्कार आहेत येथे. माझा तू पाहुणाच आहेस, आनंदात रहा बेटा.'

अन् यांत दोन वर्ष उलटली - तरी त्याला समजलेच नाही ! इतका तो रमला तेथे. मोठे चित्रविचित्र जग होते ते ! जपानही खरे बेटच, पुष्कळ प्रकारचे मासे त्याने पाहिलेलेच; पण हे एकाहून एक निराळे मासे तो बघतच राही. काय त्यांचे चकाकते अंगरंग ! किती विचित्र रचना देहाची ! समुद्रीय फुलझाडे म्हणून त्याने एका मोठ्या फुलाला हात लावला तर विंचू डसल्याप्रमाणे झटकाच बसला हाताला ! तो समुद्रजीव होता. अर्थात खरी फुले, तीही अतिशय सुंदर फुले, तेथे कमी नव्हती. समुद्रवेलींचे इतके मनोहर प्रकार ? त्याने भूमीवर कधीच वेलींचे असे प्रकार बघितले नव्हते.....

त्यातल्या एका राजकन्येचे त्याच्यावर प्रेम बसले तशी राजाने आनंदाने त्याला जावाई करून घेतले. तीन वर्षे झाली. ‘ गळाची त्याला एकदम आठवण झाली. अरे ! आपण त्या गळासाठी ना आलो होतो ? मग ? विसरलो कसे इतके दिवस ते ? त्याने सर्पराजाना विचारले. त्यांचा एक ‘सापडलेल्या वस्तूंचा‘ महाल वेगळा होता तेथे तो गळ त्याला सापडलाही. मग तो म्हणाला -

‘ मी या गळासाठी आलो होतो खरे तर. पण विसरलोच मी. ‘

‘आहेच आमचं राज्य तसं, सारं विसरायला लावणारं.'

‘पण तो माझ्या मोठ्या भावाचा गळ आहे, मी देऊन यावं म्हणतो -'

‘हरकत नाही, पत्नीला घेऊन जाणार कां ?’

‘आधी तिच्यासाठी मी एक राजवाडा बांधतो. एक वर्षात होईल मग पाठवा - माझ्या भावाच्या घरात मलाच जागा मिळणं कठीण -’

‘ठीक, ठीक. तोवर तुझा तान्हा मुलगाही ५-६ महिन्यांचा होईल, जाऊन ये. आणि एक. तू समुद्रकाठी राहणारा. समुद्रापासून तुला भय नको म्हणून हा एक जादूचा शिंपला ठेव जवळ. हा हातात घेऊन म्हणायचं - ‘शिंपल्या भरती आण ! ‘ की कोठलीही वेळ असो - भरती येईल ! बरं, नको वाटलं तर ‘ओहोटी आण.‘ म्हटलं की बस ! एकदम समुद्र ओहोटीस लागेल. लक्षात ठेव. ‘

*

बरोबर काही रत्ने, देणग्या व तो गळ घेऊन जवळजवळ तीन वर्षांनी परत होकी होनादादाला भेटायला निघाला होता. ‘दादा रागीट आहेत. पण मी त्यांचा गळ समुद्रातून हुडकून आणला आहे हे पाहून ते सारे विसरतील व मला प्रेमाने शाबसकीही देतील. शिवाय ही रत्नं पृथ्वीमोलाची मी भेट देणार आहे त्यांना. किती खूष होतील दादा ?

मनात गोड विचार करीत तो वर आला, पण अरेरे, पुष्कळदा आपले विचार, आपल्या गोड अपेक्षा, आपल्या मधुर कल्पना यांना प्रत्यक्षात अशी काही जोराची थप्पड बसते व भलताच कटू अनुभव येतो की काय सांगावे ? तो समुद्रावर आला तर काही अंतरावर होनादादाच एक मासे पकडायचे जाळे दुरुस्त करीत बसलेला! खूप खूप आनंदाने त्याने धाव घेतली, मनात भावाचं

प्रेम जणू उचंबळून आलं, रागीट असो कसाही असो, सख्खा भाऊ आहे आपला. बाळपणी आम्ही एका थाळीतून जेवण कितींदा जेवत होतो.... त्याला मी केव्हा बघेन ? असं मनात येत होतं त्याच्या. धावत येऊन त्याने म्हटले -

'दादा, होनादादा, बरे आहात ना ? अहो, तुमच्या गळासाठी मी समुद्रात बुडी मारुन तळी गेलो व हा तुमचा गळ शोधून आणला ! आता तर नाही ना राग ? चला घरी जाऊ आपल्या.'

पण होना काही वेळ कर्माला आठ्या घालून बघतच राहिला. हाच आपला तो खेडवळ मूर्ख भाऊ ? याचे कपडे तर राजासारखे आहेत, गळ्यात मोत्याचे सर आहेत टपोरे. हा समुद्रातून वाचून आला तो आला, अन् गाढव माझ्याहूनही श्रीमंत होऊन मला हिणवायला आला आहे. नालायक कुठला- ! याच्यापायी मला लोकात कमीपणा येणार आता. ह्याचाच मान जास्त ठेवणार लोक माझ्याहून, मला कोण विचारतो याच्यापुढे ? तो विचार करीत होता. धाकटा होकी प्रेमाने भेटायला आला, पण होनाचे मन मत्सराने, व्देषाने बरबटून गेलेले. तो अतिसंतापाने त्याच्या अंगावर धावून गेला व ओरडला -

हरामखोरा, तू अजून जिवंत ? समुद्रातून जिवंत परत कसा आलास ? पाजी माणसा,परत मला खिजवायला, आपली श्रीमंती मिरवून चारचौघात मला मान खाली घालायला लावायलाच आलास ना ? आण माझा गळ-आधी !! '

गळ हिसकावून घेत होनाने तो भांबावलेल्या होकीच्या गळ्याभोवती आवळायला सुरुवात केली एकदम् ! होकीला काहीच समजेना प्रथम, पण मग त्याच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला सख्खा भाऊ होनादादा द्वेषाने आंधळा होऊन आपल्याला ठार करू पाहतो आहे ? अरे ! मग जग इतकं वाईट असतं ? तोवर होना तिरस्कारानं ओरडला -

'कुत्र्या, मर, मर एकदाचा, पीडा टळेल माझ्यामागची ! ' होकीच्या प्राणावरच बेतले. गळफास घट्ट होऊ लागला ! आता मात्र तो एकदम ओरडला -

अगदी जीवाच्या आकांताने म्हणाला,

'शिंपल्या, शिंपल्या भरती आण मला वाचव !! '

त्याच्या हातातच होता शिंपला. ती आज्ञा होताच संध्याकाळी चार वाजताच

सपाट्याची भरती येऊ लागली त्याची होनाला कल्पनाच नाही ! भांबावून तो मागे पहातो तोवर डोक्याएवढ्या लाटा किनाऱ्याकडे धावत येताहेत ! तो पळणार तोवर भरतीची एक प्रचंड लाट आली व होनादादाच्या डोक्यावरून गेली तो होन्याला घेऊनच परतली !

दूर धावत जाऊन त्याने गळ काढून फेकला तोवर पाण्यातून एकदा वर डोके काढून होना ओरडला,

'होकी, होकी मला वाचव, क्षमा कर हो ऽऽकी ! '

मग होकी ओरडला,

'शिंपल्या शिंपल्या-ओहोटी ! एकदम एकदम ओहोटी आण ! '

काय चमत्कार ? पहाता पहाता भरती हटू लागली. डोक्याएवढ्या लाटा कुणी धक्के मारून मागे ढकलावे तशा माघारी गेल्या-पण हाय ! होना तेवढ्यात कुठेतरी समुद्रात गडप झाला तो परत कधीच होकीला दिसला नाही ! होकीला वाईट वाटले, पण थोडा वेळच ! दादाही आपल्या जीवावर उठले होते हे त्याच्या मनातून जाईनासे झाल्याने तो लवकरच ते सारे प्रकरण विसरला. 'वाईट कृत्याला देव शिक्षा करणारच. 'असे म्हणून त्याने मनाचे समाधान करून घेतले.

**

मग त्याने मोठा राजवाडा बांधायला घेतला. राजवाडा इतका सुंदर व नक्षीदार होता की एक वर्षांत ते बांधकाम पुरे झाले नाही. सर्पदेवांची कन्या मुलाला घेऊन वर्षाने ठरल्याप्रमाणे तेथे आली, पण अटीप्रमाणे राजवाडा तयार नव्हता, म्हणून परतली. मात्र मुलगा तिने होकीच्या हवाली केला व म्हटले, ' मी परत दोन वर्षांनी येईन ! '

पण खूप वर्षे झाली ती परत येऊ शकली नाही, का कोण जाणे मात्र होकीचा मुलगा उत्तम मच्छीमार झाला व त्याचा संसार पहात होकी आनंदात आता जीवन कंठीत आहे ! आपली समुद्रतळीची अद्भुत सफर तो अजूनही विसरला नाही !

(मालती दांडेकर : अतिपूर्वीच्या परिकथा)

# ७.२१ गोष्ट गुणवंत कुमारार्ची

(म्यानमारची लोककथा)

राजा पे-चौ व त्याचा प्रधान, दोघेही राजमहालात बसले होते. त्यांचे सारे लक्ष सिंहासनाला दोन साखळ्या (लहान लहान घंटाघुंगरे लावलेल्या) जोडलेल्या होत्या तिकडे होते. त्यातली एक साखळी सोन्याची होती, तर दुसरी होती चांदीची. त्यांना बोलायलाही सुचत नव्हते. बरोबर राणी यावेळी प्रसूतिगृहात होती, बाळ होणार होते. मुलगा झाला तर सोन्याची साखळी ओढली जाणार ! मुलगी झाली तर चांदीची ! त्यांचे डोळे साखळ्यांवर गुंतलेले होते.

'प्रधान, मला वाटतं सोनेरी साखळी ओढली गेली-हलतेय ती.' राजा म्हणाला. प्रधान हसत म्हणाला-

'आपल्याला भास झाला महाराज. घंटा नसत्या का वाजल्या साखळी ओढली गेली असती तर ? मी पण प्रार्थना करतो आहे सोन्याची साखळी ओढली जावी ! पांढऱ्या हत्तीवरून मिठाई वाटणार आहोत आपण -'

'थांबा ! पहा पहा ! घंटा वाजू लागल्या ! अरे ! दोन्ही साखळ्या ओढल्या गेल्या ! म्हणजे ? '

'म्हणजे - जुळे ! एक पुत्र एक कन्या दोन बाळे झाली !

प्रधान म्हणाला व उठलाच- पॅगोडाला दानदक्षिणा देण्याचं पवित्र काम आधी करून टाका महाराज - तो घाईने म्हणाला.

'नाही प्रधानजी ! आधी मी माझी बाळं डोळ्यांनी बघतो, अन् मग ते सारं ! चला, मला तर केव्हा बाळं बघेनसं झालंय.'

राजा उत्साहाने म्हणाला व लगबगीने प्रसूतिगृहाकडे आला तर तेथे भलताच प्रकार ! दाई व सुईण डोळ्यांतून पाणी गाळताहेत व राणी हुंदके देऊन रडते आहे ! काय झालं तरी काय ? बाळ उपजताच तर त्याचं काही बरंवाईट

झालं नाही ना ? राजाने राणीकडे धाव घेतली तोवर ती बेशुद्ध झाली ! सुईण म्हणाली - 'महाराज बुद्ध भगवानांची आपल्यावर अवकृपा झाली आहे. राणी सरकारांना त्यांना-त्यांना-' तिने रडायला सुरवात केली.

'ऑ ? त्यांना- त्यांना काय झालं ? लौकर बोल-मुलगा की-'

'नाही हो ! त्यांना मूल झालंच नाही महाराज; हे एक भले मोठे अंडे झाले आहे फणसाएवढे ! हे पाहून त्या रडत होत्या आपणाला पाहून तर शुद्धच गेली त्यांची'

'अन् मी हे अंडे बघूनच दोन्ही साखळ्या चुकून ओढल्या महाराज घाबरून ! खात्रीनं काही भुताटकी झाली! बाळ नाही तर अंडे ! बाईला अंडे होते हे पाहूनच घाबरले मी. क्षमा महाराज ! ' दासी हात जोडून म्हणाली.

राजा पे-चौ आधीच तापट माणूस, त्यात हा असला विचित्र प्रकार पाहून तर त्याच्या तळपायाची आग मस्तकात शिरली ! खरं म्हणजे राजवैद्याला बोलावून अंड्याची तपासणी तरी करायची ? राणीला शुद्धीवर तरी आणायचं ? पण छे ! भडक माथ्याच्या माणसाला संतापाच्या भरात कसले तरी भान असते काय ? राजा पे-चौ ओरडला -

'उचला हे अभद्र अंडे माझ्या नजरेसमोरून अन् फेकून द्या नदीत ! अन् ही माझी राणी ! राणी कशाची? ही तर खास चेटकीण असली पाहिजे. माणूस नाहीच ही बया. कारण कुठलीही स्त्री अंडे घालीत नसते माणसात !! उचला हिला न् नदीत द्या फेकून बेशुद्धावस्थेतच.- ते अंडे अन् ही चेटकी,-दोन्ही जाऊ देत दूर दूर वाहून !' तो संतापाने थरथरत होता अगदी. म्हातारा माळी हातात फुलमाळा घेऊन आला होता, तो हात जोडून म्हणाला, 'थांबा महाराज ! शांत व्हा. यांचा अन्याय काय यात ? देवाची करणी विचित्र असते पुष्कळदा, पण त्याचे प्रायश्चित्त यांना नको. या तर किती सालस, सद्गुणी ! माझी मुलगी नुकतीच देवानं नेली ! मी माझ्या घरी यांना नेऊ का ? मुलगी म्हणून वाढवीन. पाण्यात फेकू नका हो या बापडीला-हात जोडतो मी. प्रधानानेही हे मान्य करण्याबद्दल राजाची विनवणी केली.

राजा थोडा शांत झाला व म्हणाला, 'बरं बरं ठीक, ने हे सोंग तुझ्या झोपड्यात ! पण मी एकही नाणं देणार नाही या चेटकीसाठी तुला. आणि हिचं

तोंड मला परत दिसलं तर तुझं डोकं उडवीन थेरड्या ! याद राख. '

'आणि प्रधानजी ताबडतोब हे नष्ट अंडे ब्रह्मपुत्रेत फेका. सकाळी गावात हे सारं कळलं तर लोकात माझं हसू होईल, ते नको ! ' परत राजा गरजला. राजा बोले न् दळ हाले म्हणतातच; खरोखरच बेशुद्ध पण अप्सरेसारखी सुंदर राणी, तिला उचलून माळ्याच्या झोपडीत एका कांबळ्यावर नेऊन ठेवण्यात आले. अंडे धाडकन् पाण्यात फेकले गेले व निघाले वहात दूर दूर कुठेतरी ! राजा बेअब्रतून वाचला व उदासवाणे दिवस काढू लागला. एकेकाचे नशिबच विचित्र, दुसरे काय ?

*

इकडे अंडे पाण्यावर तरंगत होते. एखादा हलका भोपळा तरंगत राहावा तसे ते पुढे पुढे प्रवाहात वाहात चालले. भयंकर वन्य प्रदेशातून नदीचा प्रवाह चाललेला, तिकडे अंडे गेले व सूर्य किरणे त्यावर पडताच एका सकाळी ते तडकले, आपोआप एक कोवळा सुंदर हाताचा पंजा अंड्याच्या फटीतून बाहेर येऊन अंड्यावर चाचपडू लागला...

अन् काय योगायोग बघा ? त्याच वेळेला एक राक्षसीण सहज नदीवर आलेली होती, काठावर बसून मासे पकडीत होती. तिने तो हात पाहिला. पांढऱ्या सफेद अंड्यातून आता दुसरा हातही बाहेर आला, जणू पांढऱ्या सफेद पांघरुणाखाली झोपलेल्या बाळाने दोन्ही हातच पांघरुणावर ठेवले बाहेर ! राक्षसीने क्षणात ओळखले, हे मानवाचे मूल आहे ! झटकन् पाण्यात उडी घेऊन तिने ते अंडे सावरुन किनाऱ्यावर आणले व त्याला हातात घेताच अंड्याला आतून लाथा मारीत चिमुकले दोन्ही पाय बाहेर आले व अंडे काटकन् फुटलेच तिच्या हातात, बघते तर काय ? एक अपूर्व सुंदर, राजबिंडा असा मुलगा - मानवाचाच खात्रीनं !

राक्षसीला खूप आनंद झाला. तिला मूलबाळ नव्हतंच; मनात ती म्हणाली, 'मी याची आई होईन व याला मोठं करीन ! माझं हे राक्षसीचं रूप पाहून बाळ घाबरेल ! म्हणून मी साध्या मानवी स्त्रीचं रूप घेईन याच्यासाठी. इतका मोठा वाडा आहे दोन बुरुजांचा, धनदौलत आहे, त्याला मालक कुणी नव्हता तो

राक्षसदेवांनी दिलाय ! बरं, नको वाटला तर खाऊन टाकू !!

मग खूप आनंदाने तिने बाळाचे पालन केले. अगदी एका साध्या मानवी व सोज्वळ दिसणाऱ्या बाईचे रूप घेऊन. खरं म्हणजे ती बोलून चालून राक्षसी. नरमांसभक्षणाची भयंकर आवड तिला, पण तिने मुलाच्या कधी ते दृष्टीसही पडू दिले नाही ! त्या वाड्याच्या पिछाडीला सहा खोल्या होत्या, त्यामागे तिनं खूप खूप उंच भिंत बांधून घेतली. त्या भिंतीवर काचांचे तुकडे व काटेरी वेली लावल्या. कोण ओलांडणार ती ? त्यापलीकडे एक छोटे पटांगण, ते राक्षसीणीचे माणसं मारून खायचे गुप्त स्थान. परत आपले सोज्वळ व मानवी बाईचे रूप घेऊन हजर घरात !

बाळ मोठा होत होता. बोलून चालून तो राजपुत्र, त्यातही त्याची खरी आई तर अति रूपसुंदर. तो थेट आईच्या रूपाचा राजबिंडा असा दिसे. त्याच्या आईच्या हनुवटीवर गोंदल्याप्रमाणे एक हिरवट ठिपका होता जन्मखूण म्हणून- तो सुद्धा याच्या हनुवटीवर तसाच ! राणी बिचारी माळ्याघरी राबत होती, टाकलेली बायको असली तरीही, रोज हातांनी राजासाठी हारतुरे,गजरे, माळा विणून पतीला पाठवीत होती. नवऱ्याने दिले होते तिला कष्ट ! पण ती त्याबद्दल त्याला फुले देत होती, किती सद्गुणी पतिव्रता होती राणी ! माळी नेहमी डोळे भरून ही तिची राजसेवा पाही. म्हणे, 'मुली,तुझ्या या पतिनिष्ठेचं तुला एक ना एक दिवस उत्तम फळ देव देईलच! विश्वास ठेव देवावर,' राणी होय म्हणायची अन् देवपूजेत दिवस काढायची.

*

दिवसांना काय ? ते उलटतच असतात- कुणी सुखात असो की कुणी दुःखात असो ! उन्हाळा येतो, धरणीला भाजून काढतो पण फळाफुलांची देणगी घेऊन वसंऋतूही येतो बरोबर. पावसाळा येतो महापुराने अनर्थ करतो. पण अनेक ठिकाणी जीवनाला जरूर  ती धान्ये अमाप पिकवतो,वर्षा ऋतुला कोण वाईट म्हणेल? शिशिराची थंडी. झाडाची पाने गळतात, सुकतात,पण त्या शुष्क फांद्यातून पुन्हा कोवळे हिरवेचार अंकुर लवलवत हलकेच डोकावून पहातात. हे सृष्टीचक्र चालूच ! अशीच अठरा ऋतुचक्रे उलटली, राजपुत्र आता मोठा झाला.

राक्षसीने त्याला योग्य शिक्षणही दिले होते. पण दोन गोष्टी बजावल्या होत्या. राजपुत्र विचारी,

'माँ, त्या उंच बुरुजात काय असतं ? '

'तेथे आता नाही काही. पूर्वी पहारेकरी रहायचे. पहारा नको ? '

'माझे वडील कोण होते आई? एवढा चारचौकी वाडा बांधला, मोठमोठ्या दोन बुरुजांचा ? श्रीमंत सावकार होते की, राजे ? '

ती डोळे झाकून घेई. म्हणे, - 'होते असेच, फार लौकर जग सोडून गेले, नकोरे बाळ विचारू तसलं काही!! आठवणी येतात; मग वाटतं आपणही जीव द्यावा- कशाला जगले ?

'वा ! माझ्यासाठीच जगलीस मां. नको दुःख करूस. परत नाही विचारणार. पण त्या बुरुजात काय आहे आता ? '

'बेटा, का विचारतोस ? '

'छान आहेत. फार सुंदर बांधलेले. एकदा हिंडून बघावे वाटतं. तो डावा बुरुज किती प्रमाणशीर बांधलाय'

'नको नको. तिथं भुतं हिंडतात म्हणे. भुताटकीचा तोच बुरुज आहे उलट ! कध्धी कध्धी जायचं नाही ! समजलास ? पोरा, खबरदार गेलास तर ! '

कधी राक्षसणीचा आवाज इतका चढला नव्हता. मुलाला त्याचा चमत्कार वाटला, तो आवाजही त्याला मायेचा वाटला नाही. हे काय विपरीत ? आईचा आवाज असा.... जनावरासारखा कसा ? पण राजपुत्र विचारशील होता. मनावर ताबा ठेवणारा होता. तो म्हणाला - 'राहू दे मां. माझं चुकलं, माफ कर. ' मग राक्षसीणही शांत झाली. आवाज गोड झाला परत, म्हणाली,

'बाळ उद्या मला काही कामाला एका गावी जाऊन यायचं आहे. वाड्यात सकळीकडे हिंड. फक्त डावा बुरुज मात्र -'

'ध्यानात आहे माझ्या ते, परत नको सांगायला ! खुशाल जाऊन ये तू कामाला - निश्चिंतपणानं.

राक्षसी खूष झाली. हे मानवाचं पोर फार समंजस ! पण हे आता फार चौकस अन् फाजिल व्हायला लागलं. कसा मस्त झालाय् पोरटा ? अगदी खाऊन

टाकावासं वाटतं ! काय गोड लागेल मांस याचं ? तिला नकळत तिच्या नजरेत राक्षसी उग्र छटा उठली, तीही मुलाला समजली. पण त्याने काहीच दाखवले नाही. मात्र आई दाखवते तशी मायाळू किंवा सालस नाही, तर इथे काहीतरी पाणी मुरते आहे, अशी त्याची खात्री झाली. बस् ठरलं. काय आहे हा प्रकार ! अशी क्रूर का दिसली ? आवाज काय असा भसाडा निघाला एकदम ? याचा तलास मला लावलाच पाहिजे अन् नक्की त्या डाव्या बुरुजातच लागणार ! निश्चितच मी आजच तिथे जाणार', तो मनात म्हणत होता. पण बाह्यतः मात्र म्हणाला, 'मां ! लवकर ये. मला घर खायला उठेल तू नसलीस म्हणजे !'

' मग मागल्या चार सहा खोल्याच्या या किल्ल्या घे. एकात सुंदर मासे आहेत दुसऱ्यात किती तऱ्हांचे पक्षी ! तिसऱ्यात दुर्मिळ फुलं तर चौथ्यात जुनेनवे खेळ आहेत... वाटेल तेवढे रंजन ! '

'होय. पण मी एकटा - एकटाच ना ? '

'अरे, लौकर येईन बेटा, असं काय करावं ? मोठा झालाहेस की आता, संभाळ वाडा. कुणा पाहुण्याला येऊ देऊ नको. जगात वाईट लोकही असतात बरं ! जप. ' मायेचे नाटक सारे उत्तम करीत. डोळे पुशीतच राक्षसीण बाहेर पडली. मुलानेही वाईट वाटण्याचे सोंग उत्तम वठवले होते, हे बिचारीला कळले नाही !

*

ती निघून जाण्याचा अवकाश ! राजपुत्राने पहिली कोणती गोष्ट केली असेल तर तो लपत छपत बुरुज चढू लागला. नको का म्हणते आई ? माझ्या वडिलांचा लाडका बुरुज होता तरी मी का तो नाही पहायचा ? अन् दिवसा उजेडी कसली भुताटकी होते तिथे ? अन् असलंच समजा भूत तर मला काय करणार आहे, बघू तरी !

मोठा धाडसी तरुण. तो चढायला भारी अवघड बुरुज चढून टोकावर गेला तेव्हा आतून त्याला कण्हणे ऐकू आले. कुणी तरी अगदी केविलवाणेपणाने 'हाय देवा देवा ! पाणी ! पाणी' असेही म्हणताना त्याने ऐकले. कुणाचा हा आवाज ? इथे कोणी मनुष्य आहे काय ? होय मनुष्यच ! भूत 'देवादेवा' म्हणत नसते...

त्याने जोरात बाहेरचा अडसर ओढून दार उघडले. कोण असेल आत बरे ? अंधार होता सारा. मग त्याने फटाफट तेथल्या बंद खिडक्या उघडल्या. पहातो एक वृद्ध माणूस, अगदी मरू घातलेला, पाणी पाणी म्हणून तळमळतो आहे.... अन् उशाशीच तर तांब्याभांडे भरलेले- मग हा का घेत नाहीये ? तो म्हणाला-

'आजोबा, तुम्ही कोण ? पाणी तर उशाशीच आहे तुमच्या. '

'बाळ, जवळ ये. नीट बघ. साखळ्यांनी माझे हातपाय खाटेला घट्ट जखडलेले आहेत, मला हात हलवता तरी येतो कां ? तू पाजतोस का पाणी ? देव तुझं कल्याण करील !'

त्याने पाहिले तो खरेच, त्याचे हातपाय घट्ट घट्ट जखडलेले. त्याने वृद्धाला तांब्यातून पाणी ओतून घेऊन पाजले व म्हटले,

'थांबा, कुऱ्हाड आणून सगळ्या साखळ्या तोडतो मी तुमच्या आधी ! '

'आता काय ? मी घटकाभराचा सोबती. मोकळं केलं न केलं तरी मला सारखंच. पण साखळ्या तोडायला नकोत. याची किल्ली तळमजल्यावरच्या कपाटात आहे. साऱ्या दोन्ही बुरुजांच्या किल्ल्या तिथे तर असतात. '

'थांबा ! मी त्या आणतो आधी. '

'थांब तूच. तू तान्हेल्याला पोटभर पाणी पाजलस, जीव शांत झाला. माझ्या छातीत दुखतंय फार , तू किल्ल्या आणीपर्यंत कुणास ठाऊक जगतो का मरतो मी फट्कन ! तर -'

'आजोबा बोलू नका, तुम्हाला श्रम होताहेत, खायला काही आणू का ? '

'ते नंतर ! हा बघ घाम येतोय. माझी घटका भरत आलीय बेटा. मला तुला काही सांगायचं आहे-पहिली गोष्ट ! तुझी आई माणूस नाही राक्षसीण आहे ! '

तो ओरडला- 'काऽऽ; य ! आई राक्षसीण ? मी राक्षसाचा मुलगा ? खरंच ? '

म्हातारा म्हणाला -' नाही, तू कुणाचा मुलगा; कोणाला ठाऊक नाहीये ! पण माणसाचाच पोर आहेस एवढं खरं. तू पाण्यातून वाहात आलास उपजल्याबरोबर अन् या बयेनं तुला तीरावरून पाहिलं. गोजिरवाणं बाळ ते फार आवडलं तिला ! होतासच तू तसा सुरेख राजबिंडा ! '

'अं ? तुम्हाला बरं माहीत ? तुम्ही होता वाटतं तिथे ? '

हां ! मी रानातला शिकारी, मी झाडाआडून पाहिलं. तिनं तू घाबरशील म्हणून मानवी स्त्रीचं रूप घेतलं, तेही पाहिलं मी अन् तेवढ्यात मला तिनं बघितलं, 'चला की घरी माझ्याशी, लग्न करा, हा मुलगा वाढवू आपण' असं गोड बोलली कारण- कारण'

'कारण- तुम्ही दिसायला छान असला पाहिजे त्यावेळी ! '

'मोठा चतुर आहेस. होतोच मी तसा ! पण मी नाही म्हटलं. अरे, माझी बायको छान होती, पोरं होती, लग्न झालेला माणूस !' मी म्हटलं.

'मी राक्षसिणीशी लग्न करणार नाही माफ करा ! ' आणि-

बस्स ! एवढाच गुन्हा माझा ! त्याबद्दल मला इथं तिनं कोंडलंय् बघ. अठरा वर्षं झाली ! रोज येते ! तुला खाऊन टाकते म्हणते !

'काय ? काय बोलता हे ? माझी आई माणसं खाते ? मला हे कसं खरं वाटणार ? तुम्ही सारं ढोंग तर करीत नाही ना आजोबा ? '

'खोटं ? देवा शपथ , नाही ! मरताना कुणी खोटं बोलतं का रे बाळ ? '

'पण मला विश्वास वाटत नाही-आई ! माणसं मारून - छे छे ! '

'असं ? मग या बुरुजाच्या मागल्या खोलीत जा. तुझ्या वाड्याच्या उंच भिंतीपलीकडचं पटांगण बघ दिसतंय इथून, ते आधी बघून ये ! '

त्याने त्या खिडकीतून खरेच दूरवर पाहिले. चहूकडे हाडांचे सांगाडे पडलेले.... गिधाडं अजून झेपावताहेत ! तो कष्टाने म्हणाला, ' पण माझ्या आईनंच मारलं या माणसांना हे कशावरून ? '

'बाबारे अठरा वर्ष बघत आलोय ! परवा तुझ्या घरी कोण पाहुणे होते ? ' सांग,

'चीनचे लांब वेण्या घातलेले कुणी चार इसम ! मोठे थोर विद्वान वाटसरू होते. प्रत्येकाला झगा वेगळ्या रंगाचा व ढिल्या तुमानी गर्द निळ्या ! गळ्यात मोत्यांचे कंठेपण होते -'

'मग पहा जाऊन. अजून तिथं ते मरत पडलेले असतील. वाटसरू खाणं हा तिचा आवडता धंदाच. खूप पाहिलंय रे ! डोळे थकले बघून बघून ! बेटा,तू जीव घेऊन पळ... तुझीही त्या हाडकांच्या राशीत पडण्याची आता वेळ आलीय् !

पण मला बोलवत नाही. कळ येतेय रे ! आई गं.'

त्याने धावत जाऊन खालून किल्ल्या आणल्या व बेड्या साखळ्या सोडल्या, परत पाणी पाजले. मग तो मायाळूपणाने म्हणाला.

'बरं सांगितलंत, खालून मी थोडं अन्नही आणलंय. मऊ भात करून ठेवलेला दिसला ! खाता कां ? भरवू कां ? निजा तुम्ही, मी जेवू घालतो -'

त्याने चमच्याने त्याला ते अन्न खाऊ घातलं. तसा तो समाधानानं हसला व कष्टानं म्हणाला,

'जीव तृप्त झाला बाळ, आणि माझी शेवटची देणगी धनुष्य माझं, हे तुला घे ! '

'हां ! आजोबा असलं नका बोलू ! मी आलो त्याच दिवशी या घरी तुम्ही आलात - आता मी निघालो की तुम्हीही चला. मी घेऊन जातो इथून -

म्हातारा हसला, वेडा कुठला. इकडे छातीतून जीवघेण्या कळा येतात अन् आता जायचय मला देवाघरीच ! दिसत नाही का रे ? एक ऐक,त्या किल्ल्यांच्या जुडग्यात पलीकडच्या बुरुजाच्या खोल्यांच्या किल्ल्या पण आहेत. अन् त्यात एक खोली धान्याची आहे. त्यात तांदुळाच्या पोत्यांत तीन चेंडू लपवलेले आहेत ते घेऊन जा ! बया कुणाजवळ बोलत होती मैत्रिणीजवळ ते मी ऐकलंय. ते चेंडू जादूचे, अन् कठीण प्रसंगातून जीव वाचविणारे जीव-

पुढचे शब्द उमटले नाहीत. कॉटवर उठून बसलेला तो वृद्ध एकदम कोसळला व मरण पावला !

'काय आपल्या आईची - नव्हे नव्हे, त्या राक्षसीणीची ही क्रूरपणाची वर्तणूक? याला अठरा वर्ष इथे कोंडून ठेवलं बांधून.

वा ! काय छान धनुष्य आहे उशागती ! मी हे घेऊन निघतोच. आता नकोरे बाबा इथं राहणं, मरणच ते !

त्याने दुसऱ्या बुरुजात जाऊन ते चेंडू घेतले. दुसऱ्या पेटीत त्या कालच्या पाहुण्यांचे मोत्यांचे कंठे दिसले! त्याने ते ओळखले. पण हात लावला नाही ! 'मला नको ते प्रेतावरचे हिरेमोती ! मी धनुष्य बाणाने शिकार करून जगेन !' तो मनात म्हणाला.

तेथून निघून जाण्यापूर्वी खरेच तो त्या उंच भिंतीपलीकडे पटांगणात गेला. चार लांब वेणीवाल्या डोक्याच्या कवट्या त्याने ओळखल्या व ते भारी झगेही त्याला आठवले जवळच आईचे ?- म्हणजे राक्षसीची एक ओढणी रक्तानं भरलेली ! आता कसली शंका ? जीव घेऊन पळावं झालं इथून.

तो त्या भयानक जागेपासून दूर पळत सुटला, दूर दूर गेला.

*

चालून चालून दमला बापडा. त्याने धनुष्याने एक हरण मारले होते. ते शिजवून खावे म्हणून वाटत होते. पण कसे? जवळ चकमक नाही विस्तव पेटवायला, की भांडेपण नाही. एका मोडक्या देवळात तो बसला चिंतेत. त्या भरल्या रत्नभांडाराच्या घरातून त्यानं एक दमडीही उचलली नव्हती हेच विशेष. पापाचा पैसा नकोच आपल्याला. हे सुरेख धनुष्य तर आहे मदतीला ?

' मी करू कां काही मदत?' हळूच शब्द आले. त्याने पाहिले, एक पन्नाशीला टेकलेली बाई. ती त्याचे धनुष्य लक्ष लावून पहात होती.... तो म्हणाला- 'आजी ! मदत कराल तर एवढीच; मला हे हरण शिजवायला भाजायला विस्तव पेटवून द्या ! भांडं द्या एक.'

ती हसून म्हणाली- 'मला आजी म्हटलंस ना एकदम? तर चल आजीच्या घरी. हरणाचं सुरेख अन्न बनवून खाऊ आपण. मसाले घालीन मी छान छान, येतोस ? '

'चल ! '

'पण आधी सांग, हे माझ्या नवऱ्याचं-नैची धनुर्धराचं-धनुष्य; अन् भाताही त्यांचाच ! मी ओळखलं, कुठे मिळवलंस तू ? आज अठरा वर्ष ते बेपत्ता आहेत मुला. तू बारीक नजरेनं बघ, धनुष्याच्या आतल्या बाजूला अन् भात्याच्या तळाशी नैची धनुर्धर ही अक्षरं खोदली होती आम्ही दोघांनी मिळून. बघ आहेत कां ? तुला ते भेटले होते का रे ? मला विकत देतोस हे धनुष्य अन् भाता ? '

त्याने पाहिले, धनुष्यभात्यावर नावे होती खरी नैचीची. अन् ही तर त्याची बायकोच. त्याने सारी हकिगत तिला सांगितली व नवऱ्याची शेवटी आठवण

म्हणून ते धनुष्यबाण तिला बक्षीसच देऊन टाकले. तिचेच होते ना ते? पण मग त्या बाईनेही न ऐकता त्याला वाटखर्चाला म्हणून पुष्कळच पैसे दिले.

मुलगा जेवून दूर निघाला. लांब अरण्यात एक देऊळ लागलं. लाकडी मूर्ती फुटकी तुटकी झालेली, मूर्तीचं छोटे देऊळ ढासळलेलं, देव्हारा भोके पडलेला मोडका ! त्याला वाईट वाटलं. तो शेजारच्या गावी गेला व गावप्रमुखांपुढे ते वाटखर्चाचे सगळे पैसे ओतून म्हणाला --

'बंधू, हे धनद्रव्य खर्च करा, मला वाटतं यातून मूर्तीची सर्व दुरुस्ती होईल व देऊळही ठीक होईल, द्रव्य यातून उरलेच तर देवाचा देव्हारा पण नवा घ्या करून. अहो, जो देव आपल्याला साऱ्या सुखसोई देतो, त्याची मूर्ती अशी का बरं दीनवाणी ठेवता ? तसंच द्रव्य उरेल तर मूर्तीचं आसनही नवं करावं. देवळाला रंग यात बसेल तर जरूर द्यावा. माझी नाणी सुवर्णाची आहेत. तेव्हा जमेल.'

गावप्रमुख म्हणाले, 'आपले नाव काय शेठजी ? ते कोरून ठेवू आम्ही देवळाच्या चिऱ्यावर.'

'त्याची काय जरूरी ? ' एक सामान्य मनुष्य असं वाटल्यास खोदा !

'ठीक. आपण १५ दिवस येथे रहावे. पंधरा दिवसात हे काम पुरे होईल. गावकरीही देवाचं काम म्हटल्यावर स्वतः होऊन मदतीचा हात देऊ लागतात. हे पैसे पुष्कळ आहेत. सारं होईल यात'

पंधरवड्यात मूर्ती खरेच दुरुस्त झाली. तिला घासून पुसून नवा रंग दिला गेला. त्या मूर्तीचे डोळे त्याच्याकडे बघून हसताहेत असं त्याला वाटलं. चौथराही छान झाला. देऊळी दुरुस्त झाले होते, कसे टुमदार दिसत होते.

मग तो निघाला. एका गरीब दिसणारा माणूस येत होता. तो म्हणाला, 'नवे दिसता मित्र या भागात ? मी इथला माहितगार आहे. जाऊ या सोबती सोबतीनं?'

'जाऊया. चल मित्रा,' ते जाऊ लागले. मित्र रानाचा माहितगार. भूक लागली की, चटकन् कुठूनतरी फळे पाडून आणी. नारळाच्या बेल्यातून पाणी आणी. गर्द

रान लागले की, तो बरोबर पायवाट सांगे. रमतरमत ते दोघे मित्र चाललेले. तोवर पाठीमागून कर्कश आरोळी व धपाधप पावले ऐकू आली. पहातो तर काय राक्षसीण मूळ रूपात धावत पाठीस लागली आहे. ती ओरडत होती - कारट्या तुला एवढं पोसलं, लुसलुशीत मांस खायला मिळावं म्हणून. तर तू माझ्याच वस्तू चोरून पळवतोस ? ती जवळ आली तशी सोबती म्हणाला,

'अरे ! तुझ्याजवळचा एक चेंडू मागे फेक ! बघतोस काय?'

आँ ? याला कसे कळले ? त्याने विचारले, 'तू कोण?'

'ते मग. आधी चेंडू फेक जोरात मागे !'

त्याने चेंडू जोरात मागे फेकला तर मोठाले पर्वत उत्पन्न झाले राक्षसीच्या वाटेत ! ते ओलांडून आली ती दाढा करकर वाजवीत. तर दुसरा चेंडू फेकला याने, तेव्हा घनदाट जंगल उत्पन्न झाले त्याच्या व तिच्यामधे. तेही ओलांडून बया आलीच की. तर मग शेवटचा चेंडू याने फेकला तर त्या जंगलात फार मोठा वणवा लागला. चहूकडे आगीच्या ज्वाळा ! त्यात सापडून राक्षसीण मरण पावली !

मग ते एका सुंदर राजधानीजवळ आले. राजपुत्राने विचारले, 'तू कोण ते अजूनही सांगितलं नाहीस बरं का !'

तो माणूस हसला न् म्हणाला, 'सांगतो लवकरच. वेळ आलीच आहे ते सांगायची. पण आधी तुला येथल्या राजाकडे नेतो मी.'

'पण कशासाठी ? राजा कोण आहे इथे ? '

'ते कळलेच आता. चला, हा बघ राजवाडा आलाच ! '

राजा दुःखित मनाने बसला होता. त्यासमोर हे दोघे उभे राहिले. राजा ताडकन् उठून उभा राहिला. राजपुत्राला बघून म्हणाला,

'अरेच्या ! हे तर रूप माझ्या रूपराणीचेच थेट ! अगदी तस्सेच नाकडोळे, वा! बाळ, कोणाचा मुलगा तू ?

'दुर्दैवाने मी कोणाचा मुलगा ते मला माहीत नाही महाराज. मी पाण्यातून वाहात आलेल्या अंड्यातून जन्मलो व पाळलं मला एका राक्षसणीनं ! तेव्हा

काय सांगू ?' तो उदासपणे म्हणाला.

एकदम तो त्याचा सवंगडी म्हणाला, 'तेच सांगायला आलो आहे राजा ! अठरा वर्षापूर्वी रूपाराणीच्या पोटी एक अंडे झाले त्यातून उत्पन्न झालेला हा तुझाच पुत्र आहे व राक्षसणीच्या घरी वाढूनही अतिशय सद्गुणी परोपकारी असा ह्याचा स्वभाव आहे. ईश्वराची लीला होती. ते अंडे म्हणजे रूपाराणीचा काहीएक अन्याय नव्हता त्यात. तर आता तिला बोलाव व हा अंतरलेला पुत्र स्वीकार करा आपण.'

'पण तुम्ही कोण ? हे सगळं तुम्हाला कसं माहीत ? '

''मी कोण ? बघा, राजपुत्रा तुही बघ !' तो मनुष्य अदृश्य झाला, त्याच्याजागी ती रंगवलेली सुंदर मूर्ती दिसली व शब्द आले - 'या राजपुत्राने ज्या पडझड झालेल्या प्रतिमेची सुरेख दुरुस्ती करवली, ती माझीच मूर्ती होती. मीच तो तेथला देव. याने सहज जाता जाता त्या मूर्तीची दुर्दशा बघून जवळचे सगळे द्रव्य देऊन मूर्ती, आसन दुरुस्त केले. इतकेच नाही तर पडके देऊळही छान केले. मला ही वृत्ती फार आवडली याची; म्हणून मी त्याचा मित्र झालो. मानवरूप घेऊन अन् तुमची त्याची भेट करवली. चांगलपणाचे देवही चांगलेच बक्षीस देतो सुखी व्हा !

पहाता पहाता आवाज थांबला व मूर्तीही अदृश्य झाली. राजाने धाव घेऊन पुत्राला पोटाशी धरले व म्हटले, 'बाळ ! तू माझ्यासारखा अविचारी व अतितापट नाहीस, तर तुझ्या आईसारखा विचारी व सद्गुणी आहेस याची मला धन्यता वाटते ! चल, तुझ्या आईकडे जाऊ या. मला तिची क्षमा मागायची आहे ! आणि तुझं नावही मी आता अठरा वर्षांनी ठेवणार आहे. गुणवंतकुमार ! तसेच आहा तुम्ही युवराज ! '

(मालती दांडेकर : अतिपूर्वीच्या परिकथा)

# ७.२२ गाणारी सफरचंदे

(आयर्लंडची लोककथा)

एक होता राजा. त्याचं राज्य लहान होतं; पण मन मोठं होतं. त्यामुळं तो सुखी होता, आणि त्याची प्रजाही सुखी होती.

एकदा तो फि रत-फि रत एका जत्रेत जाऊन पोचला. तिथं त्याला एक तरुण दिसला. त्याच्या हातात सफरचंदाच्या झाडाची एक फांदी होती आणि त्या फांदीला सात सफरचंद लागली होती. राजाला मोठी गंमत वाटली. त्यानं त्या तरुणाला विचारलं, 'काय रे भाऊ, ही सफरचंद विकायची आहेत कां ? '

तरुण म्हणाला, 'लायक माणूस भेटला तर विकायची आहेत ! '

'हे बघा, असं आहे की ही आहेत गाणारी सफरचंदं. हलविली की गाऊ लागतात, असं म्हणून त्यानं ती फांदी हलविली; त्याबरोबर त्या सफरचंदातून सुंदर मधुर संगीताचे सूर निघू लागले. ते ऐकून राजा खूष झाला. म्हणाला, 'वा, काय सुंदर सूर आहेत ! '

तरुण म्हणाला, 'या सफरंचंदात एक गुण आहे. जो याचं संगीत ऐकतो तो जर आजारी असेल तर बरा होतो, जखमी झाला असेल तर त्याची जखम भरून येते; आणि अपंग असेल तर तो धडधाकट होतो; दुःखी असेल तर तो आपलं दुःख विसरतो. '

राजा म्हणाला, 'वाः हे तर आणखीनच छान ! '

तरुण म्हणाला, 'पण या सफरंचंदात एक उणीव आहे त्यांच्या या देणग्या त्यांच्या मालकाला मात्र उपयोगी पडत नाहीत. फक्त त्याला संगीताचा आनंद घेता येतो.

'काही हरकत नाही. दुसऱ्यांची दुःखं तरी दूर होतील ! भाऊ, मला ही हवीत. काय घेणार त्याचं ? '

तरुण म्हणाला, 'त्या भानगडीत पडू नका. मी मागेन ते देणं तुम्हाला होणार

नाही ! '

राजा म्हणाला, 'कां ? मी अवश्य देईन. काय मागशील ते देईन. दुसऱ्यांची दुःखं , दोष जर असे यांनी दूर होत असले तर त्यांची किंमत द्यायला मी माघार घेणार नाही ! '

तरुण म्हणाला, 'तर मग यांची किंमत म्हणून- तो बोलता बोलता थांबला. म्हणाला, उगाच कशाला त्या भरीला पडता ? तुम्हाला स्वतःला काही याचा लाभ होणार नाही; आणि दुःख मात्र ओढवून घ्याल.

राजा म्हणाला, 'अरे, पण दुसऱ्यांना तरी लाभ होईल ! तेव्हा बोल आता तुझी किंमत ? '

तरुण म्हणाला, 'तुमची राणी अन् तुमचा कुमार अन् कुमारी मला त्याबदली द्या ! '

हे ऐकून राजाला आपल्या डोक्यावर कुणी घण घातला असं झालं, त्याला वाटलं होतं, हा मागून-मागून काय मागेल ? धन-संपत्ती मागेल, जमीन-जहागीर मागेल; पण यानं तर राजाचा जणू प्राणच मागितला !

राजाला पराकाष्ठेचं दुःख झालं; पण आता तो वचनानं बांधला होता. मनात अतिशय वेदना होत असतानासुद्धा त्या दाबून टाकून तो म्हणाला, 'ठीक आहे, घेऊन जा !

राजानं त्याला आपल्या वाड्यात नेलं. तिथं राणीला अन् आपल्या लहान कुमाराला आणि कुमारीला बोलावलं आणि त्यांना झालेली हकिगत सांगून ह्या तरुणाबरोबर जायला सांगितलं. राणीच्या अन् कुमार-कुमारीच्या डोळ्यांत पाणी आलं. ते दुःखानं रडू लागले. तेव्हा राजानं त्यांच्या डोक्यावर ती गाणाऱ्या सफ रचंदाची फांदी हलवली. त्याबरोबर त्यातून अत्यंत सुरेख संगीत बाहेर पडू लागलं आणि ते ऐकता ऐकता राणी अन् मुलं आपलं दुःख पूर्ण विसरून गेली. ते आपला महाल सोडून, राजाला सोडून त्या तरुणाबरोबर चालू लागले.

दुःखानं राजा जमिनीवर कोसळला; पण त्याचं दुःख काही गाणाऱ्या सफरचंदाकडून दूर झालं नाही. असे दिवस चालले. राजा त्या फांदीचा उपयोग

आता आपल्या राज्यातल्या दुःखी, अपंग, आजारी माणसांच्या बाबतीत करू लागला. दुःखी होते ते दुःख विसरू लागले, आजारी होते ते बरे झाले, अपंग होते ते धड झाले. पण राजा मात्र स्वतःचं दुःख विसरू शकत नव्हता. दिवसें दिवस ते वाढतच जात होते. आता त्याला खाणं-पिणंही नकोसं वाटायला लागले. जिकडं-तिकडं त्याला आपली प्रिय राणी अन् मुलं दिसू लागली. भरल्या ताटावरून तो न जेवता उठू लागला. असं एक वर्ष निघून गेलं. 'आता नाही मला राहवत. माझी राणी अन् कुमार-कुमारी यांचं काय झालं हे कळल्यावाचून मला चैन पडणार नाही. मला त्यांना शोधून काढलंच पाहिजे. असं म्हणून राजा आपल्या राज्याचा कारभार प्रधानाकडे सोपवून एकटाच बाहेर पडला.

राजा निघाला. त्यानं नगर सोडलं. राज्याची सीमा ओलांडली, तेवढ्यात अचानक धुक्यानं चारी दिशा अंधुक झाल्या, कुणीकडचं काही दिसेनासं झालं; तरी राजा थांबला नाही. भूक नाही, तहान नाही, विसावा नाही; धुकं भरलेलं असो की वावटळ सुटलेली असो , आता थांबायचं नाही. तो माहीत नसलेल्या वाटेनं पुढं-पुढं चालू लागला. धुकं पार करीत तो बाहेर आला, तेव्हा त्याला एक मोठ्ठं मैदान लागलं. तिथं काही माणसं एका घराचं छप्पर झाकीत होती- कौलांनी नाही; पंखांनी !

राजाला आश्चर्य वाटलं. छप्पर झाकता झाकताना पंख कमी पडले. आता काय करायचं ?

'चला, आणखी घेऊन येऊ या. छप्पर तर पंखांनीच झाकायचं ! '

राजा म्हणाला, 'छप्परावर कौलं घातली तर ? '

सगळे म्हणाला, 'काय कौलं ? शी, आम्ही पंखानीच ते झाकणार ! '

राजानं विचारलं, 'कोणत्या पक्ष्यांचे हे पंख आहेत ? '

माणसं म्हणाली, 'ते तर आमचं गुपित आहे. ते आम्ही कुणालाही सांगणार नाही ! '

असं म्हणून ती माणसं पंख आणायला घोड्यावर स्वार होऊन लगोलग निघून गेली. राजा त्यांच्या परत येण्याची वाटत पाहत तिथंच उभा राहिला.

इतक्यात जोराचा वारा सुटला आणि छपरावर झाकलेले पंख उडून वाऱ्याबरोबर कुठच्या कुठं गेले होते. माणसं परत आली तर पंख नाहीसे झाले होते अन् छप्पर उघडं पडलं होतं.

माणसं म्हणाली, 'पंख उडून गेली ? हरकत नाही. पण छप्पर आम्ही पंखांनीच झाकणार ; कौलांनी नाही. नाही म्हणजे नाही, नाही, नाही !

राजा आता पुढं निघाला. वाटेत एक मुलगा भेटला. जंगलातून एक वाळलेली काटकी आणून त्यानं एका शेकोटीत ती टाकली; आणि दुसरी काटकी आणण्याकरिता तो परत जंगलात गेला, थोड्या वेळात दुसरी काटकी त्यानं आणली; तर तेवढ्यात पहिली टाकलेली काटकी जळून खाक झाली होती. ही दुसरी काटकी त्या शेकोटीत टाकून तो तिसरी आणायला परत जंगलात गेला. तिसरी काटकी घेऊन तो येतो, तेवढ्यात दुसरी काटकी जळून गेली होती.

राजानं विचारलं, 'तू हे काय करतो आहेस ? '

तो म्हणाला, 'दिसत नाही तुम्हाला ? थंडी किती पडली आहे, त्यासाठी शेकोटी करीत आहे.'

राजा म्हणाला, 'अरे, मग शेकायला तू बसत का नाहीस ? '

मुलगा म्हणाला, 'शेकोटी चांगली पेटली तर पाहिजे, म्हणजे बसेन. त्याकरिता तर काटकी आणायला मी जातो आहे. 'असं म्हणून तो फिरून जंगलात काटकी आणायला पळत गेला.

तिथून राजा पुढं चालला. तेव्हा एके ठिकाणी त्याला तीन विहिरी दिसल्या. प्रत्येक विहिरीवर माणसाचं मोठ्या आकाराचं डोकं कोरलेलं होतं. पहिल्या डोक्याच्या तोंडात पाण्याची एक धार पडत होती; आणि तोंडातून दोन धारा बाहेर पडत होत्या. दुसऱ्या डोक्याच्या तोंडात दोन धारा पडत होत्या आणि तोंडातून एक धार बाहेर पडत होती. तिसऱ्या डोक्याच्या तोंडात तीन धारा पडत होत्या आणि तोंडातून एकही धार बाहेर पडत नव्हती.

राजा आश्चर्यानं हे दृश्य पाहत राहिला. त्याला वाटलं, नक्की यात काही तरी रहस्य आहे, पण विचारायचं कुणाला ? तिथं तर कुणीच नव्हतं.

राजा पुढं चालला. चालता चालता एक मोकळं पटांगण लागलं. त्यात मधोमध एक घर होतं. राजा थकून गेला होता. त्यानं त्या घरात जाऊन आसरा मागावा असा विचार केला. त्यानं दार खडखडावलं. एक बाई आणि एक पुरुष यांनी दार उघडलं आणि राजाचं स्वागत केलं.

राजानं नमस्कार करून विचारलं, 'आजच्या रात्रीपुरता मला इथं आसरा मिळेल कां ? '

घर-धनी म्हणाला, 'हे काय विचारावं ? आपण आमचे अतिथिदेव आहात. अतिथीचा सत्कार करणं हा गृहस्थाचा धर्म आहे. '

इतक्यात घरधनीण एका टोपलीत गहू भरून घेऊन आली. तिनं टोपली राजापुढं ठेवली, तेव्हा घरधनी म्हणाला, 'धान्य तयार आहे. आपण आनंदानं स्वैपाक करुन जेवण करा.'

राजा म्हणाला, 'हे गहू आहेत, याचं काय करायचं, अन् कसं करायचं ते काही मला माहीत नाही. बाई म्हणाली, 'ते मी सांगते. हे दाणे दळून त्याचं पीठ करायचं, पिठाची कणिक मळायची. अन् तिच्या पोळ्या बनवायच्या. एक एक पोळी भाजायची अन् मग... खायची ! हे शेवटचं काम तरी येतं ना ? '

राजा हसून म्हणाला, 'हां, ते मात्र येतंय्.'

गृहस्थ म्हणाला, 'तर मग दुसरी कामं मी तुम्हाला शिकवितो. धान्यातून पोळ्या बनवायच्या, त्याच्या तीन पायऱ्या आहेत. एक खरी-खरी गोष्ट दुसरी तुम्ही सांगितलीत की पहिली पायरी सर; म्हणजे गव्हाचं -पीठ तयार होईल. दुसरी एक खरी गोष्ट सांगितलीत की पिठाच्या पोळ्या होतील; आणि तिसरी एक खरी गोष्ट सांगितलीत की पोळ्या भाजून तयार होतील. बोला, एवढं करता येईल की नाही. '

राजा म्हणाला, 'पहिली खरी गोष्ट तुम्ही सांगा. '

घरधनी म्हणाला,'ठीक आहे, मी सांगतो. माझ्यापाशी घरात इतकंच धान्य आहे. बघा, यातला एक दाणा मी माझ्यापाशी ठेवून घेतो. टोपलीतले बाकीचे दाणे दळले जातील आणि त्यांची पोळी बनून ती खाल्ली जाईल. तेव्हा हा दाणा

मी परत टोपलीत टाकीन, तेव्हा टोपली फिरुन दाण्यांनी भरुन जाईल. ही माझ्या अनुभवाची खरी गोष्ट आहे!'

हे तो बोलताच टोपलीतल्या दाण्यांचं पीठ झालेलं त्याला दिसलं. आता राजा बाईकडे वळला आणि म्हणाला, 'दुसरी खरी गोष्ट तुम्ही सांगा.'

बाई म्हणाली, 'अतिथीनं म्हटल्यावर त्याला नाही कोण म्हणेल ? ऐका तर मग माझी खरी गोष्ट. माझ्यापाशी सात गायी आहेत. त्यांचं दूध रोज सात बादल्या भरतील इतकं निघतं. मी दूध सगळं झाडाला घालते पण मी एकाही गायीची धार काढीत नाही. मोटेतलं पाणी जसं शेताला जातं तशा दुधाच्या धारा आपोआप झाडाला जाऊन पोचतात. माझ्या अनुभवाची ही खरी गोष्ट आहे.'

राजाला दिसलं- कणकीच्या पोळ्या तयार झाल्या होत्या.

आता राजाची पाळी आली. तो म्हणाला, 'बरोबर बारा महिन्यांपूर्वी एक तरुण जत्रेत सात सफरचंद विकायला आला होता. मी त्यानं मागितल्या किंमतीला त्याची गाणारी सफरचंद खरेदी केली होती. तो ती घेवून गेला. त्याला शोधायला मी बाहेर पडलो आहे. माझ्या अंगाची सालटी लोंबू लागली तरी मी आता स्वस्थ राहणार नाही. माझ्या अनुभवाची ही खरी गोष्ट आहे.'

एवढं तो म्हणतो आहे, तेवढ्यात त्या पोळ्या भाजून तयार झाल्या होत्या. घरधनी म्हणाला, 'चला तर, आता आपण जेवून घेऊ यां.'

हे शब्द ऐकताच राजाच्या डोळ्यांत पाणी आलं. त्याला राणीची न् मुला-मुलीची आठवण होऊन त्याचं मन तडफडू लागलं होतं, त्यांना सोडून तो कधी समाधानानं जेवला नव्हता. तो उदास स्वरानं म्हणाला, 'एकट्यानं जेवण मला जमायचं नाही. मला माफ करा!'

गृहस्थ म्हणाला, 'सोबत आम्ही दोघं आहोत ना!'

राजा म्हणाला, 'तरी माझं मन होत नाही.'

गृहस्थ म्हणाला, 'आणखी तिघांना सोबतीला बोलावलं तर ?'

तर- 'राजाला पुढे बोलवलं नाही, त्याचा गळा भरून आला.'

इतक्यात आतला एक दरवाजा उघडला आणि तीनजणं बाहेर येऊन उभी

राहिली.

'राणी ! माझा कुमार, कुमारी ! ' असं ओरडत राजा एकदम धावत जाऊन तिघांना भेटला. त्याच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

आता राजाचं लक्ष त्या घरधऱ्याकडं गेलं, तर तो गाणारी सफरचंदं घेऊन येणारा तरुणच तिथं उभा होता आणि मंद-मंद धावत होता. राजा आश्चर्यानं त्याच्याकडं बघत राहिला.

तरुण म्हणाला, 'राजा, मी परीचा मुलगा आहे. मीच तुला गाणारी सफरचंदं दिली. मला तुला इकडं बोलवायचं होतं - माझ्या परिलोकात. बोल, तुला आणखी काही समजून घ्यायचं आहे ? '

राजा म्हणाला, ' मी इकडं येत असताना वाटेत मी दोन-तीन अद्‌भुत गोष्टी बघितल्या, त्याचं रहस्य मला समजून घ्यायचं आहे. प्रथम मी पाहिलं, की कित्येक माणसं घराचं छप्पर कौलांनी न झाकता पंखांनी झाकत होती. पंख अपुरी पडली म्हणून ती आणखी पंखं आणायला धावत गेली; पण येऊन बघतात तर छपरावर पसरलेली पंखं उडून गेली होती. तरी ती पंखांनीच छप्पर झाकायचा हट्ट धरीत होती. हे काय ? '

परिकुमार म्हणाला, 'जगात जे लोक पैशाच्या मागे धावतात आणि पैसा कमावण्यासाठी आकाशपाताळ एक करतात - ते पंखांनी छप्पर झाकणाऱ्या या लोकांसारखे होत. त्यांनी कितीही पंखं गोळा केली तरी ती नेहमी कमीच पडणार; आणि अधिक पंख आणण्यासाठी ते धावत राहणार. त्यांची गरज कधीच सरायची नाही आणि संतोषाचं त्यांचं छप्पर कधीच झाकलं जायचं नाही!'

राजा म्हणाला, 'दुसरी एक गोष्ट मला दिसली. एक मुलगा काटकी पेटवून शेकोटी करीत होता, ती पेटवून तो लगेच दुसरी काटकी आणायला जंगलात जात होता. ती दुसरी काटकी घेऊन येईपर्यंत ही पहिली काटकी जळून राख होऊन जात होती, तेव्हा तो दुसरी काटकी पेटवून पुनः जंगलात तिसरी काटकी आणायला जात होता. अशी तो शेकोटी करीत होता; पण त्याला काही

शेकायला मिळत नव्हतं. याचा अर्थ काय ?'

परिकुमार म्हणाला, 'राजा, स्वार्थी माणूस आपला स्वार्थ साधण्याकरिता कितीही जळण गोळा करीत राहिला तरी त्याची शेकोटी त्याला ऊब कधीच देत नाही. तो आडवाटेलाच जातो, त्याची फसगत होत राहते ! त्याच्या आशेतच त्याची निराशा दडलेली असते हे त्याला कळत नाही ! '

राजा म्हणाला, 'तिसरी गोष्ट, वाटंनं येताना मी तीन विहिरी पाहिल्या. तिन्ही विहिरीवर माणसाचं डोकं कोरलेलं होतं. एका डोक्याच्या तोंडात पाण्याची एक धार पडत होती आणि तोंडातून दोन धारा बाहेर पडत होत्या. दुसऱ्या डोक्याच्या तोंडात दोन धारा पडत होत्या; पण बाहेर एकच धार पडत होती. आणि तिसऱ्या डोक्याच्या तोंडात तीन धारा पडत होत्या; पण एकही धार बाहेर पडत नव्हती. हे काय ? '

परिकुमार म्हणाला, 'हे डोक्याचं चित्र प्रत्येक माणसानं सतत आपल्या डोळ्यापुढं ठेवण्यासारखं आहे. तीन प्रकारच्या डोक्यांप्रमाणे तीन तऱ्हेची माणसं या जगात आहेत. विहीर म्हणजे मानव-समाज. पहिल्या प्रकारची माणसं समाजापासून जेवढं घेतात त्याच्या दुप्पट ते समाजाला देतात, दुसऱ्या प्रकारची माणसं जेवढं देतात त्याच्या दुप्पट घेतात; आणि तिसऱ्या प्रकारची माणसं फक्त घेतच राहतात,देत काहीच नाहीत ! फक्त गट्टम करायचं एवढेच त्यांना माहीत असतं.

ही सारी रहस्यं ऐकून राजाला फार आनंद झाला. रात्री भोजन करून सगळे झोपले. सकाळी झोप संपताच राजा उठून बघतो तो, त्याची राणी आणि कुमार-कुमारी सगळे आपल्या महालातच आहेत !

(भाऊ धर्माधिकारी : देशोदेशीच्या लोककथा)

# ७.२३ नागराणीचा मुकुट

(स्वित्झर्लंडची लोककथा)

एक होता राजा. त्याला एकुलती एक मुलगीच होती. त्या मुलीला त्यानं खूप कोडकौतुक करून वाढविलं होतं. एकदा राजा राजकुमारीला बरोबर घेऊन फिरायला बाहेर पडला. फिरता-फिरता एके ठिकाणी त्यांना लोकांची गर्दी जमलेली दिसली. राजा आणि राजकुमारी दोघेही त्या गर्दीत घुसले. बघतात तर एक गारुडीण नागाला खेळवीत होती. एकदा नागाची बांगडी करून ती हातात घाली, तर एकदा कंठीसारखी त्याच्या गळ्यात घाली. राजा आणि राजकन्या पुढं होऊन हे खेळ पाहत होते. सापाला असं हातात खेळविताना बघून राजकन्येला किळस आली. ती एकदम बोलली, 'ईऽऽ, कसलं घाणेरडं जनावर!'

हे शब्द गारुडिणीच्या कानावर पडले. ती दूर होती. तिनं डोळे वटारून राजकुमारीकडे पाहिलं. मग नागाचे खूप लाड करुन त्याच्या फणीवर तोंड टेकून त्याचा पापा घेतला. हे बघून तर राजकुमारीला राहवलंच नाही. ती एकदम ओरडली, 'शीः शीः !'

गारुडणीचा चेहरा एकदम बदलला. तिनं डाव्या हातानं नागाला आपल्या डोक्यावर मुकुटासारखं ठेवलं, उजव्या हातानं बगलेतली जादूची कांडी काढली आणि राजकन्येच्या पुढे येऊन तिच्या तोंडावरून ती तीन वेळा गोल गोल फिरवून म्हटलं, 'पोरी,माझ्या नागाचा शीः शीः म्हणून अपमान करतेस ? तर घे, आत्ता लगेच तू नागीण हो !'

राजा घाबरून 'अरे अरे' म्हणून पुढं सरकतोय् एवढ्यात राजकन्या नागीण होऊन जमिनीवर सरपटू लागली. तिला अतिशय पश्चाताप झाला असावा असं तिच्या डोळ्यांवरून दिसत होतं. केविलवाण्या नजरेनं ती आपल्या बापाकडं पाहत होती. राजाला भयंकर राग आला. त्यानं कमरेला असलेल्या म्यानातून तलवार उपसली. 'अग दुष्टे,' असं म्हणत तो तिला मारायला धावला. पण

गारुडिणीनं पुनः आपली कांडी उंच करून राजाच्या तोंडापुढं उभी धरली. ताबडतोब राजाचा हात खालच्या खालीच राहिला अन् त्याचे शब्द तोंडातल्या तोंडातच राहिले.

गारुडिणीनं आपली जादूची कांडी नागिणीच्या शेपटीला लावली आणि हुकूम केला, 'चल चालू लाग इथून. बापाच्या कोडकौतुकात नाही राहू देणार मी तुला. नागिणीचं रूप आलंय् तर नागिणीचं सुख-दुःख भोग, म्हणजे तुला अभागी जीवांशी कसं वागावं ते समजेल ! '

सर्रसर्र करीत नागीण निघून गेली. कुठं गेली कुणालाच कळलं नाही.

राजाला आता आपण किती दुबळे आहोत याची जाणीव झाली. गारुडीण म्हणाली, 'राजा, मी तुला ओळखलं. तू राजा आहेस; पण राजसत्ता म्हणजेच जगात सर्व काही असं समजू नकोस. जगात सगळंच राजाच्या इच्छेप्रमाणं घडावं असा कायदा नाही.मुलीला लाडात वाढवून दुसऱ्याचा तिरस्कार करायला शिकवलंस, दुसरं काय केलंस ? '

राजा आता गारुडिणीपुढे गयावया करू लागला, जमलेले लोक सारं पाहत होते. राजाच्या डोळ्यांत पाणी आलं. तो म्हणाला, ' माझ्या मुलींकडून अपराध झाला, मी त्याची माफी मागतो. मला माझी एकुलती एक मुलगी परत दे ! '

गारुडीण म्हणाली, ' मुलीला मी नागीण केलं असलं तरी मी काही ईश्वर नाही. मी शाप देऊ शकते; पण तो मागं घेण्याची मला शक्ती नाही ! '

तरी राजा तिच्यापुढे वाकून गयावया करीत राहिला. तेव्हा गारुडीण म्हणाली, 'राजा, मी शाप काही परत घेऊ शकत नाही; पण तुझी मुलगी राजमहालात वाढली आहे, तर तिला मी नागलोकाची राणी बनवीन. राणी झाल्यामुळं ती सुखानं नागलोकात राहील. एवढं मी करू शकते.'

राजा ऐकत राहिला. गारुडीण पुढं म्हणाली, 'नागराणीच्या डोकीवर राहील एवढा लहानसा शुद्ध सोन्याचा मुकुट बनवून तू घेऊन ये. आजपासून चौथ्या दिवशी याच वेळेला मी तुला इथं भेटेन. तेव्हा तो मुकुट तू मला दे. तो मी तुझ्या मुलीकडं पोचवीन. मात्र लक्षात ठेव, मुकुटाचं सोनं शुद्ध बावनकशी असलं

पाहिजे. तो मुकुट राणीच्या डोक्यावरच राहून झिजत जाईल. तो सगळा झिजेपर्यंत तुझी मुलगी नागीण राहील. '

'बापरे !' राजाच्या तोंडून किंकाळी निघाली. 'ही म्हणजे युगायुगांची गोष्ट झाली !'

गारुडीण म्हणाली, 'सोनं जितकं शुद्ध असेल, तितक्या लवकर ते झिजेल किंवा दुसरं म्हणजे कोणी त्या मुकुटाचा शेवटचा मालक होईल आणि नरकात जाईल. तेव्हा नागिणीच्या रूपातून तुझ्या मुलीची सुटका होईल ! ' एवढं सांगून आणि 'आजपासून चौथ्या दिवशी याच वेळी इथं' अशी आठवण देऊन गारुडीण आपल्या नागाला घेऊन निघून गेली.

राजानं राजमहालात येऊन ताबडतोब कारागिरांना बोलावून आणलं आणि शुद्ध सोन्याचा छोटासा मुकुट बनविण्याचा हुकूम केला. मुकुट तीन दिवसात पाहिजे असं सांगितलं. कारागीर कामाला लागले. तीन दिवस पुरे होण्यापूर्वीच एक लहानसा सुरेख मुकुट त्यांनी बनवून आणला.

चौथ्या दिवशी राजा तो मुकुट घेऊन ठरलेल्या वेळी ठरलेल्या जागी गेला. गारुडीण तेथे हजरच होती. राजानं मुकुट तिच्या हाती दिला आणि डोळ्यांत पाणी आणून म्हणाला, ' माझ्या मुलीवर दया करा ! '

मुकुट राजकन्येकडं पोचता झाला. तिच्या डोक्यावर तो ठेवताच जणू तो तिच्या अंगचाच असल्यासारखा बसला. राजकुमारी नागराणी झाली.

नागराणीला सरोवरात जाऊन आंघोळ करण्याची सवय. अंघोळ करायच्या वेळी ती तो मुकुट डोक्यावरून काढून काठावरच्या खडकावर ठेवी आणि मग सरोवरात उतरे. अंघोळ करून बाहेर आली की बेतानं ती आपलं डोकं मुकुटात घाली की मुकुट परत तिच्या अंगचा झाल्यासारखा डोक्याला चिकटे.

हळूळळू त्या प्रदेशातल्या लोकांत बोलवा होऊ लागला की, एक नागीण रोज पर्वतावरच्या सरोवरात येऊन अंघोळ करते, तिच्या डोक्यावर चकचक करणारा सोन्याचा मुकुट असतो, अंघोळ करताना तो मुकुट ती खडकावर काढून ठेवते. अन् अंघोळ झाल्यावर घालून निघून जाते.

नागाच्या मुकुटासंबंधी लोकात नाना तऱ्हेच्या अफवा पसरलेल्या होत्या. कोणी म्हणे, हा मुकुट धुवून त्याचं पाणी प्यालं तर मरणाच्या दाढेतूनसुद्धा माणूस परत येतो. कोणी म्हणे, धान्याच्या कोठीत हा मुकुट ठेवला तर त्यातलं धान्य संपता संपत नाही. कोणी म्हणे, पैशाच्या थैलीत जर हा मुकुट ठेवला तर त्यातले पैसे कधी कमीच होत नाहीत. मुकुट जरी एकाच्या हातून दुसऱ्याच्या हाती गेला तरी त्याच्या या विलक्षण शक्तीत फ रक पडत नाही. पण जर का काही कारणानं मुकुटाचा नाश झाला, तर तो नाश होताना ज्याच्या ताब्यात तो असेल, तो माणूस सैतानाच्या पकडीत सापडतो; आणि सैतानाच्या पंजात सापडलेला कधी सुटूच शकत नाही.

एकदा असं झालं की त्याच भागातला एक गरीब शेतकरी आपल्या गाढवावर बसून जंगल पार करून चालला होता. त्याची वाट त्या सरोवराच्या काठानंच जात होती. गाढवावर बसल्या बसल्या तो इकडं तिकडं पाहत चालला असताना त्याची नजर सरोवराजवळच्या एका काळ्या कुळकुळीत खडकावर गेली. तिथं त्याला झगमग-झगमग करीत असलेलं काही दिसलं. ते काय आहे हे पाहावं म्हणून तो आपल्या गाढवावरून खाली उतरला आणि त्या खडकाकडं गेला. बघतो तो एक लहानसा सोन्याचा मुकुट ! एकदम त्याला लोकांच्या तोंडची अफवा आठवली. नक्की हा त्या नागराणीचाच मुकुट असला पाहिजे.

फार विचार करण्याचा फुरसत नव्हती. त्यानं तो मुकुट उचलला आणि आपल्या बंडीच्या खिशात घातला. झरझर परत येऊन तो गाढवावर स्वार झाला आणि गाढवाला त्यानं टाच मारुन दौडविलं.

काही वेळानं नागराणी अंघोळ करून बाहेर येऊन बघते तर मुकुट कुठं आहे? मुकुट चोरीला गेला हे लक्षात येऊन ती 'मुकुट चोरीला गेला, चोराला पकडा' असं ओरडली. त्याबरोबर तिचे नोकर नाग होते ते चोराचा पाठलाग करण्यासाठी सळसळ करीत पळत सुटले.

सापांच्या गतीशी गाढवाची गती काय बरोबरी करणार ? थोड्याच वेळात नागांनी गाढवाला गाठलं. गाढवाच्या सभोवर त्या लांब लांब नागांनी वेढा दिला.

शेतकरी समजला, की आता आपली घटका भरली. तो एकदम गाढवावरून उतरला अन् जवळच्याच ओकाच्या झाडावर सरसर चढला. त्याच्या मागोमाग एक दोन नव्हे , अकरा नाग झाडावर चढू लागले.

एक झेप घेऊन शेतकरी झाडाच्या वरच्या भागावर गेला आणि एका फांदीला धरून लटकत राहिला. त्याला नक्की वाटलं की आता हे नाग काही आपल्याला सोडीत नाहीत. चावायला आले तर लाथेनं त्यांना उडवायचं अशा तयारीत तो राहिला. पण काय चमत्कार ! नाग पायापाशी येत होते, फूं फूं करून चढू पाहत होते; पण त्याला चावत नव्हते. त्यामुळं त्याच्या जिवात काहीसा जीव आला, हा चमत्कार काय आहे हे त्याला कळेना. तेवढ्यात त्याची नजर झाडाच्या खोडांच्या ज्या भागाला धरून तो लटकत होता त्या भागावर गेली. त्याच्या लोंबत्या पायाजवळच एका खोबणीत एक लाकडाची मूर्ती बसविलेली होती. ही कोणा संतपुरुषाची मूर्ती असली पाहिजे, त्याच्या पुण्याईमुळेच हे नाग आपल्यापर्यंत पुढं सरकत नाहीत, असं त्याला दिसलं. खात्री करून घेण्याकरिता त्यानं आपला पाय थोडा त्या मूर्तीच्या खाली केला तोच सगळे नाग चावण्याकरिता धावून आले. त्यानं चट्कन पाय वर ओढून घेतला आणि त्या संतपुरुषाच्या आधारावर तो लोंबकळत राहिला.एका हातानं त्यानं फांदी पकडून धरली आणि दुसरा हात संताच्या मूर्तीच्या पायावर ठेवला. या अवस्थेत तो किती काळ दम काढू शकणार होता ?

असा काही वेळ गेला. नागराणीच्या सेवकांचा मोर्चा लागलेलाच होता. एवढ्यात एक म्हातारी हातातली काठी टेकीत टेकीत तिकडून चालली होती. झाडाला चिकटलेले इतके साप आणि फांदीला लोंबकळता माणूस हा तमाशा बघून तिला आश्चर्य वाटलं. आपल्या काठीनं कोंडाळी करीत करीत आणि त्यात पाय टाकीत-टाकीत ती त्या झाडाच्या खोडापाशी येऊन उभी राहिली. झाडावर लोंबकळणाऱ्या शेतकऱ्याला नवल वाटत होतं की या म्हातारीला साप कसे चावत नाहीत ? सगळे तिच्या कोंडाळ्यापासून दूर-दूर राहत होते. खास ही जादुगारीण असली पाहिजे.

म्हातारीनं वर बघितलं अन् शेतकऱ्याला विचारलं, 'काय रे पोरा, काय मामला आहे ? '

तरुण शेतकरी म्हणाला, 'आजी, हे साप माझ्या मागं लागले आहेत. '

'साप मागं लागण्यासारखं तू त्यांचं काय केलंस ? '

'त्यांचं, आजी, मी काही केलं नाही; पण सरोवरापासच्या खडकावर असलेला सोन्याचा एक छोटासा मुकुट मी उचलून आणला. एवढंच मी केलं.'

'अरे म्हणजे तो नागराणीचा मुकुट असला पाहिजे. बरं नव्हे रे बाबा, बरं नव्हे. मी चालले.'

'जाऊ नको आजी, पण हे नाग तुला कसे चावायला येत नाहीत, सांग ! '

हा प्रश्न ऐकून म्हातारी उभी राहिली. हातातल्या काठीनं आपल्या भोवती कोंडाळं करून ती म्हणाली, ' मी हे कोंडाळं केलंय् ते बघितलंस ? हे कोंडाळं ओलांडून आत यायची, नाग असो नाही तर नागाचा बाप असो, त्याची छाती व्हायची नाही.अशीच जादू माझ्यापाशी आहे ! '

शेतकरी म्हणाला, 'तर मग, आजी, मला या नागांपासून वाचव ना ! '

म्हातारी म्हणाली, 'वाचवीन; पण एकाच अटीवर. '

'काय अट आहे सांग. '

'तुझ्यापाशी नागराणीचा सोन्याचा मुकुट आहे, तो मला दे ! '

शेतकऱ्यानं क्षणभर विचार केला आणि म्हणाला, 'देतो.'अशी कबुली दिल्यावर म्हातारीनं आपल्या हातातली काठी हवेत तीन वेळा जोरानं फिरविली, तीन वेळा काही मंत्र म्हटले, पूर्व दिशेकडून पश्चिमेकडे जमिनीवर रेघा ओढल्या आणि बोलली, 'एक,दोन,तीन,चार ! चार नागांनी या वाटेनं जायचं ! '

राजाचा हुकूम होताच शिपायी जसे धावतात, तसे त्या अकरा नागांपैकी चार नाग झाडापासून दूर होऊन पश्चिमेकडे गेले. मग म्हातारीनं मंत्र म्हणून पश्चिमेकडून पूर्वेकडे रेघोट्या ओढल्या आणि म्हटलं, 'एक, दोन, तीन,चार ! नागांनी या वाटेनं जावं. चार नाग त्या वाटेनं गेले. '

असेच मंत्र म्हणून म्हातारीनं दक्षिण दिशेकडे रेघोट्या काढल्या आणि

म्हटलं, 'तीन नागांनी इकडं चालतं व्हावं. उरलेले तीन नाग तिकडं निघून गेले. '

असे सगळे नाग निघून गेल्यावर म्हातारीनं शेतकऱ्याला झाडावरून खाली उतरायला सांगितलं. शेतकरी खाली आला अन् तत्काळ उत्तरेकडे चालू लागला. तिकडं त्यानं आपलं गाढव उभं केलं होतं. गाढवावर त्यानं टांग मारली अन् ते पळवीत नेलं. म्हातारी मागं ओरडत राहिली.. 'एक , सोन्याचा मुकुट टाक, सोन्याचा मुकुट टाक ! '

शेतकऱ्यानं ओरडून उत्तर दिलं, 'देतो, ये, माझ्या मागोमाग पळत ये. '

म्हातारी ती, ती पळणार कशी ? ती आपली चालत-चालत त्याच्या मागोमाग गेली. शेतकऱ्याचं गाव आलं. तो गाढवावरून उतरून सरळ आपल्या घरात शिरला. थोड्या वेळात म्हातारीही तिथं आली. गाढवावरून तिनं त्याचं घर ओळखलं. शेतकरी म्हणाला, 'ये, आजी, हे तुझंच घर आहे. आनंदानं रहा, खा, पी,मजा कर ! '

म्हातारीनं ओळखलं, की ही आता आपल्याला झुलवायला पाहतो आहे. 'काही हरकत नाही, मीपण बघून घेईन, ' ती मनाशी म्हणाली. म्हातारी शेतकऱ्याच्या घरी राहिली.

शेतकऱ्यानं नागराणीचा मुकुट कुणाला नकळत आपल्या धान्याच्या कोठीत ठेवला आणि तो समजला होता तसाच चमत्कार घडला. कोठीतला गहू काढून तो विकीत होता आणि तरी गहू संपत नव्हता. विक्रीतून त्याच्या थैलीत पैसेच पैसे भरून गेले. तो म्हातारीला ऐष आरामात ठेवू लागला. तिचं मन सांभाळू लागला. तिनं पाणी मागितलं तर यानं तिला दूध द्यावं. त्याच्या बायकोला आश्चर्य वाटलं, की या भिकारड्या थेरडीची हा इतकी खुशामत का करतोय ? याला वेड बीड तर नाही लागलं ? एवढं या थेरडीत काय आहे ? ती आपल्या नवऱ्याला तसं तोंडावर म्हणू लागली. तो फक्त ऐकून घेई. मुकुटासंबंधी त्यानं आपल्या बायकोलासुद्धा काही सांगितलं नाही.

असे काही दिवस गेले. एके दिवशी त्या शेतकऱ्याला अचानक बाहेरगावी जावं लागलं. आता म्हातारीला संधी गवसली. शेतकऱ्यानं मुकुट कुठं ठेवला

असेल याची तिला काही कल्पना आली होती. कोटीतले गहू काढून-काढून विकत असतानासुद्धा गहू संपत नाहीत, यावरून तिनं अंदाज बांधला होता. तेव्हा शेतकरी परगावी गेलाय् अन् त्याची बायको विहिरीवर कपडे धूत होती. हे बघून हळूच ती कोठीत शिरली, कोठीत ठेवलेला मुकुट तिनं घेतला आणि सरळ आपल्या घरची वाट धरली !

संध्याकाळी शेतकरी परत आला. बघतो तो घरात म्हातारी दिसेना. त्यानं बायकोला विचारलं,'काय गं, आजी कुठं गेली ? '

बायको नाकाचा शेंडा चढवून म्हणाली, ' मेली ती थेरडी ! आजी, आजी करताय, एवढं तिला काय सोनं लागलंय् ?'

शेतकरी धावत-धावत गेला अन् कोठीत घुसला. पाहतो तो जागेवर मुकुट नाही. त्यानं जाणलं, की मुकुट म्हातारीनंच पळविला. वेड्यासारखा तो घरातून पळत सुटला आणि गावच्या शिवेपर्यंत गेला; पण म्हातारीचा कुठंच पत्ता नव्हता. निराश होऊन आणि मुकुट गेल्याचा शोक करीत तो घराकडं परत आला; आणि एवढंसं तोंड करून घराच्या एका कोपऱ्यात जाऊन पडला.

त्याच्या बायकोला नवऱ्याचे हे चाळे आवडले नाहीत. हाताचे पिळे करीत अन् नाक-तोंड वेडं-वाकडं करीत ती म्हणाली, 'ती म्हातारडी गेली म्हणून एवढा का जीव टाकताय् ? ती काय तुमची आई मेलेली जिवंत होऊन आली होती ? गेली तर बरंच झालं. बसून बसून गोळे गिळत होती, ते तरी वाचलं ! '

शेतकऱ्याला राग आला. त्यानं कोपऱ्यातली केरसुणी हातात घेऊन बायकोला झोड-झोड झोडपलं. नवऱ्याला एवढा का राग आला ते बायकोला समजेना. तीही रागावून , रुसून कोपऱ्यात जाऊन पडली. त्या दिवशी रांधलेलं अन्न वाया गेलं.

इकडं तो नागराणीचा मुकुट घेऊन ती म्हातारी निघाली ती थेट आपल्या घरात गेली. तिनं तो मुकुट आपल्या धान्याच्या कोठारात ठेवला. तिचंही धान्य संपेनासं झालं. विकून विकून तिनंही पुष्कळ धन जमा केलं तरी धान्य जसंच्या तसं ! मग तिनं एक मोठा भटारखाना काढायचं ठरविलं. भटारखान्यात पाव-

रोटी बनवायची अन् विकायची. त्याकरिता तिनं एकदम सात पोती गहू दळून आणण्यासाठी काढले; पण सातवं पोतं भरताना चुकून त्यात तो एवढासा मुकुटही धान्याबरोबर गेला. पोती गाडीवर चढवून ती चक्कीवाल्याकडं गेली आणि साती पोती त्याच्याकडं देऊन घरी आली.

इकडं चक्कीवाल्यानं सहा पोती गहू दळला; पण सातव्या पोत्यातले गहू काही केल्या संपेचना ! चक्कीत गव्हाचं संबंध पोतं त्यानं खाली केलं. चक्कीतून पीठ बाहेर पडत राहिलं, पिठानं पोतीच्या पोती भरली; तरी चक्कीतला गहू संपेना. चक्कीवाला चकित झाला. त्यानं चक्की उलगडून बघितली, तेव्हा त्याला तो चकचक करणारा सोन्याचा मुकुट आढळला. नागराणीच्या मुकुटाची गोष्ट त्याच्याही कानी आलीच होती. हाच तो मुकुट अशी त्याची खात्री झाली आणि त्यानं तो मुकुट काढून घेऊन आपल्या घराच्या छपरात दडवून ठेवला.

इकडं म्हातारी गहू दळायला देऊन आली अन् आपल्या धान्याच्या कोठीत गेली तर तिथं काय होतं ? संबंध कोठी रिकामी ! गव्हाचा एक दाणाही तिथं नव्हता. आणि मुकुट ? मुकुटाचाही पत्ता नव्हता. म्हातारीच्या छातीत धस्स झालं. मुकुट गव्हाबरोबर दळायला तर गेला नाही ? ती धावत पळत चक्कीवाल्याकडं गेली. रागानं म्हणाली, 'दे, माझा सोन्याचा मुकुट. मुकाट्यानं दे.

चक्कीवाला जणू आपल्याला काही कळतच नाही, असा चेहरा करून म्हणाला, 'आजी, मुकुट ? कसला मुकुट ? तुझा मुकुट म्हणतेस तर तू काय मुकुट घालणारी राजाची राणी झालीस काय ? '

म्हातारीनं विचारलं, ' माझी गव्हाची पोती कुठं आहेत ? '

चक्कीवाल्याने बोटानं पिठानं भरलेली पोती दाखविली आणि म्हणाला, 'ही सहा पोती भरली. आता हे सातवं चालू आहे. '

फिरती चक्की बंद करायला लावून म्हातारीनं चाललेला घाणा तपासला; पण मुकुट काही तिच्या हाती लागला नाही. ती चक्कीवाल्याला म्हणाली, 'या गव्हाबरोबर माझा सोन्याचा मुकुट आलाय्. एवढा होता. '

चक्कीवाल्यानं भुवया चढविल्या अन् आश्चर्य दाखविलं. म्हातारी निराश होऊन डोक्यावर हात मारीत घरी परतली. तिला जगणं नकोसं झालं.

चक्कीवाल्याला वाटलं, की मुकुट आपल्याला पचला. त्यानं तो छपरातून काढला अन् आपल्या धान्याच्या कोठीत ठेवला. आता त्याच्या कोठीतलं धान्य संपता संपेना. रोज तो पोती भरभरुन कोठीतून धान्य काढायचा अन् दळायचा, पीठ विकायचा. पिठाच्या आलेल्या पैशानं तिजोरी भरली. असं कित्येक दिवस चालत राहिलं.

एकदा त्याच्या मनात आलं, कोठीत मुकुट ठेवायचा, रोज कोठीतलं धान्य काढायचं अन् चक्कीत ओतायचं आणि दळून घ्यायचं. त्यापेक्षा चक्कीतच मुकुट ठेवला म्हणजे धान्य टाकायलाच नको. टाकलेलं धान्य कधी न संपता पीठ बाहेर पडत राहील. आपले श्रम वाचतील, आरामात बिडी फुंकत आपण बसू आणि नोकरांकडून पीठ पोत्यात भरून ठेवायला लावू. त्यानं शेवटच्या घाण्याबरोबर मुकुट चक्कीच्या नाळक्यात टाकला अन् बघत राहिला. मुकुटाच्या प्रतापानं चक्कीच्या तोंडापर्यंत गहू भरलेलाच राहत होता आणि खाली पिठाचा धबधबा पडत होता ! त्याच्या आनंदाला पारावर राहिला नाही.

असे कित्येक दिवस गेले. चक्कीवाल्याच्या पिठाचा व्यापार दसपटीनं, वीसपटीनं वाढला आणि चक्कीत धान्य न टाकता फक्त पिठाची पोती भरण्याचंच काम राहिलं. चक्कीवाला तंगड्या लांब पसरून चिरुट ओढीत आरामखुर्चीत पडून रहायचा. नोकरलोक नदीच्या लोंढ्यासारखं एकसारखं पडणारं पीठ भरुन पोती तयार करायचे.

इकडं चक्कीत रोज तो मुकुट धान्याबरोबर हळूहळू खाली-खाली उरत जात होता. एके दिवशी गव्हाबरोबर तोही धान्याच्या नाळक्यातून खालच्या चक्कीच्या तोंडात गेला आणि खालच्या तळीत सापडून त्याची चकती झाली. 'खट्' असा आवाज झाला आणि चालत असलेली चक्की एकदम बंद पडली.

चक्कीवाला वर्तमानपत्र वाचीत पडला होता. चक्कीचा आवाज बंद पडताच त्यानं वर बघितलं. गहू दळायचं अन् पीठ खाली पडायचं थांबलं होतं. त्याला

आश्चर्य वाटलं. उठून बघतो, तो वरच्या गहू टाकायच्या नाळक्यातले गहू खलास झाले होते. असं कसं झालं ? त्यानं हात घालून सगळीकडं चाचपलं. यातला मुकुट कुठं गेला ?

इतक्यात जंगली रेड्याच्या आवाजासारखा आवाज त्याच्या कानी आला. 'हा ! हा ! हा ! ' कोणी तरी भयंकर वाटावं असं हसत होतं. एकदम आकाशातून कडकड करत वीज चक्कीघरावर पडली. चक्कीघर, आतली चक्की अन् चक्कीवाला तिन्हीची राख झाली.

'फुकटचं खायला सोकावलेल्या लोभ्या, मुकुट,मुकुट करुन मुकुटाला आपल्यापाशी ठेवणारा शेवटचा मालक तू; तू माझ्या तावडीत आलास ! ' असं म्हणून सैतानानं चक्कीवाल्याचा जीव आपल्या चिमटीत घेतला आणि त्याला नरकाकडं घेऊन चालला.

याच वेळी नागराणी गारुडिणीच्या मंत्राच्या पकडीतून सुटली. नागराणीची फिरुन ती राजकन्या झाली आणि आपल्या राजमहालाच्या अंगणात जाऊन उभी राहिली. राजाला कळलं, तो ' माझी लाडकी, माझी लाडकी, ' करीत धावत आला आणि त्यानं तिला मिठीत कवटाळलं.

मात्र आता ती पूर्वीची राजकन्या राहिली नव्हती. जीव लहान असो, मोठा असो, माणूस असो, जिवाणू असो, सर्वांना दुःखाची वेदना एकच आहे हे तिला कळलं आणि ती शहाणी झाली.

(भाऊ धर्माधिकारी : देशोदेशीच्या लोककथा)

# ७.२४ शुक्राची चांदणी

कोण म्हणेल त्याला राजपुत्र ? कपडे मळके, अन् स्वस्ताईचे. अन् काम मलायाच्या राजेसरकारांच्या शरीररक्षकाचं. तरीपण मळकट चिंधीत एखादे सुरेख मोती बांधावे तसे त्याचे रूप वाटे-तजेलदार आणि देखणे.

राजपुत्र अजुब मोठा तरतरीत छोकरा होता. पण पुष्कळदा दैव माणसाला कुठल्याकुठे फरफटत दूर नेते म्हणतात ना ? तसंच झालं होतं बापड्याचं. त्याच्या वडिलांचं एक राज्य होतं. छोटंसं, पण सुखी राज्य. पण मग शेजारचा एक बलाढ्य राजा, त्याला हे राज्य हवंसं झालं. तो भलं मोठं चतुरंग सैन्य घेऊन आला चालून. चतुरंग म्हणजे माहीत आहे ना ? हत्ती,घोडे, रथ व पायदळ असे चारी प्रकारचे लढाऊ, ते चतुरंग सैन्य. मोठ्या माशाने छोट्या माशाला गिळू पाहावे तसंच झालं. अजुबचा बाप, तो छोटा राजा, त्याचा पराभव झाला. शत्रूनं राज्य हिसकावून घेतलं, सारी संपत्ती पण बळकावली व राजाला नेसत्या वस्त्रानिशी हद्दपार करुन टाकलं, राजाराणी अन् हा चौदापंधरा वर्षांचा पोर निर्वासित, वनवासी झाले. हा मुलगा सोळा वर्षांचा झाला तेव्हा राजा म्हणाला,

'बेटा या झोपडीजवळ माझा घोडा आहे. तीच काय ती आपली संपत्ती आता. तू या घोड्यावर बसून दूरदेशी जा अन् नोकरी कर मिळेल ती, नशीब काढ. कुठेही रहा, पण प्रामाणिक रहा, अन् मन लावून काम कर. तू यशस्वी होशील.'

मलायाच्या राजाला हा चलाख पोरगा आवडला. त्याची हकिगत ऐकून तो म्हणाला- 'ठीक आहे, मीच आता तुझी काळजी घेईन. तू माझ्या बरोबर नेहमी असत जा, हीच तुझी नोकरी. ती त्रासाची नाही.'

आणि मग राजाबरोबर नेहमी अजुबही दिसायला लागला. शिकारीला, फिरायला, जिथेजिथे राजा जाई, तिथेतिथे अजुब आहेच. ही नोकरी सुखाचीच आहेसे त्याला वाटत होते. पण सुखाच्या फुलाजवळ त्रासाचे, दुःखाचेही काटे

असतात जगात, हे त्याला माहीत नव्हते.

एक दिवस काय झालं, राजा निघाला शिकारीला, बरोबर राजपुत्र होताच. ते वेशीबाहेर आले तेवढ्यात राजा म्हणाला, 'मुला, मी माझी कट्यार वाड्यातच विसरून आलो आहे. मला ही शिकरीच्या वेळी जवळ लागते. जा पळ, तेवढी घेऊन ये लौकर. '

'कुठेशी आहे ? '

'पंधराव्या खोलीत माझ्या चौरंगावर सापडेल ती. जा धावत जा व पळत ये हं. मी थांबतो इथेच जरा. '

हलक्या पावलांनी अजुब पंधराव्या खोलीत आला. तेथे त्याला ती रत्नजडित कट्यार तर दिसलीच, पण आणखी एक नवलाची गोष्ट त्याने पाहिली. राणीसरकार पलीकडच्या खिडकीशी उभ्या होत्या व त्यांच्या हातात एक अतिशयच चकाकणारी वस्तू होती. तिचं तेज इतकं होतं की, अजुबचे डोळेच दिपले. त्याने मान खाली घालून मुकाट्याने कट्यार उचलली, तोवर राणीने झटपट हातातली वस्तू लपवली व ती ओरडली -

'कोण रे तू ? पोरट्या, परवानगीवाचून एकदम आमच्या महालात येतोस, लाज नाही वाटत ? काय हवंय तुला ? एकदम चालता हो इथून. मूर्ख, फाजील कारटा.

तो गहजब अजुबला भारी अजब वाटला. कुठे राजाचे गोड प्रेमळ शब्द अन् कुठे राणीचे हे शिव्याशाप ? तरी पण तो नम्रपणे म्हणाला -

'महाराजांनी मला कट्यार आणायला स्वतःच पाठवलंय. क्षमा असावी राणीसरकार. आपण आत आहा, हे मला ठाऊक नव्हतं.'

' मग घे ती कट्यार अन् निघ इथून. चले जाव. '

अजुबने कट्यार आणल्यावर मग राजा शिकारीला गेला. राजा घरी परतला, तेव्हा राणीचे डोळे रडूनरडून सुजलेले. ती हुंदके देत म्हणाली, 'महाराज, काय न् कसं सांगू ? आपली शुक्राची चांदणी तो बहुमोल हिरा चोरीला गेला आहे बहुतेक. अयाई ग कोणीतरी पाळत ठेवून नेला - ऊंऊं कसा मिळेल तो ? '

राजाला संताप आवरेना. त्याचा तो अती मूल्यवान हिरा, मुकुटात सणावाराला बसवायचा तो दागिनाच जसा. आजूबाजूच्या कितीक राज्यात असं तेजस्वी रत्न नव्हतं. आणि तोच चोरीला गेला ? कसा ? कुणी नेला ? सहज हातात धरला तर आजूबाजूला लख्ख उजेड पडायचा इतकी लखलखीत माझी शुक्राची चांदणी, कोणी चोरली ? त्याला काही सुचेनाच.

पण हे वर्णन अजूने ऐकले. त्याला आठवले. राणीसरकार त्या दिवशी काहीतरी चकाकणारी वस्तू हातात घेऊन पाहात होत्या- आणि त्या वस्तूच्या आजूबाजूला लख्ख प्रकाश पडला होता. आपले तर डोळेच दिपले होते. खात्रीनं तो शुक्राचा तारा-हिराच-असला पाहिजे, पण तो हाती असूनही राणी स्वतःच तो चोरीला गेला, चोरीला गेला, असा बोभाटा का करतेय ! राजाला, चोरुन हिनंच तर हिरा लपवला नाही ना ?

एकदा त्याला वाटलं हे सारं मालकाला सांगावं. पण लहान असला तरी अजू व्यवहारी व शहाणा होता. आपण बोलूनचालून चार पैशाचे चाकर. आपल्यावर राजा थोडाच विश्वास ठेवणार यात ? त्यातून ही पतिपत्नीची भांडणं, ती होतात तशी मिटतातही झटदिशी. त्यात तिसऱ्याने पडू नये हेच बरं. अजू मग त्याबद्दल कुठेच काही बोलला नाही अन् ती गोष्ट विसरुनही गेला मग.

पण राणी विसरली नव्हती. या चलाख पोरट्यानं खात्रीनं आपल्या हातात शुक्रतारा पाहिलाय. तो कधी ना कधी राजाला सांगणारच . पण त्यापूर्वीच याचं तोंड कायमचं बंद केलं तर कसं काय ? हा लाच देऊनही वळणारा पोर दिसत नाही. याला ठार करावं हाच उपाय दिसतो. राणीच्या मनात भलतेच भयंकर विचार येऊ लागले. सापाचं विष हळूहळू भिनत जावं तसा हा दुष्टपणा मनात पसरू लागला. ठरलं, या नष्ट पोरट्याचा काटाच काढून टाकायचा.

ती राजाला गोड शब्दात म्हणाली,

'आपल्या पायांपाशी एक मागणी आहे गडे. '

'काय आहे एवढं ? सांगा राणी सरकार. '

'आपला हा नवा नोकर अजुब आहेना, भारी तरतरीत छोकरा. '

' मग ? आहेच. म्हणून तर मला तो आवडतो. त्याचं काय ? '

'तसं काही नाही फारसं, मला चार दिवस हा उसना देता का ? काही जरुरीची कामं मी त्याला सांगणार आहे, अन् इतका हुशार तत्पर नोकर आमच्या दासांत कोणी नाही. सगळे मेले बावळोबा आहेत, सुस्त मठ्ठ आहेत एकाहून एक. देणार कां ? '

राजा खुषीनं हसून म्हणाला-

'बरं बरं देऊ. पण तो परत केव्हा येईल माझ्याकडे ? '

'फ क्त चारच दिवसांत. आपला आवडता नोकर, मी जपेन हो. '

मग राजाने हो म्हटले व अजुबची बदली चार दिवसांसाठी राणीसरकारांकडे करण्यात आली.

अजूला समजेना, राणीने आपल्याला त्रास देण्यासाठी तर मागून घेतले नाही ना ? पण तसे नसेल. राणीसरकार फारच गोडगोड बोलत होत्या त्याच्याशी, त्याची स्तुती करीत होत्या. मी त्यांच्या हातात रत्न पाहिले, हे कळलेच नसेल कदाचित त्यांना असंही त्याला वाटू लागलं.

राणी त्याला म्हणाली,

'बेटा, आज दुपारीच झोप काढ एक चांगली. रात्री मी तुला एक महत्त्वाचं काम सांगणार आहे. '

मग संध्याकाळी तो हजर झाला, तशी राणीने सांगितले-

'बाळ, तुला मासे मारायला येतात का ? '

'येतात राणीसरकार. लहानपणापासून मी माझे पकडतो. '

'छान. मग तू सायंकाळी बंदरावर जा. अन् थोडे मासे घेऊन ये. उद्या पहाटे मी त्याचं पक्वान्न करणार आहे राजांसाठी. होय, बरी आठवण झाली. तिथे आमची एक राजेशाही बोट आहे. त्या नावाड्याला येताना हे पत्र देऊन यायचे. बोटीवरच नावाडी सापडेल तुला. करशील एवढे ? '

'जरुर. हे सोपंच काम आहे. सारं नीट करीन. '

'ठीक. जा तर मग. जेवण करुन जा हं बेटा, उशीर लागेल. '

'वा, हा प्रेमळपणा तर भलताच होता. अजूला वाटलं मालकाप्रमाणे मालकीणही चांगल्या स्वभावाचीच दिसतेय.'

तो समुद्रकिनारी पोहोचला. तेथे आज कायसा सण होता म्हणून काही लोक जमून भजन करीत होते. अजुबला ओळखणारे त्यात काही होते. एक म्हणाला -

'बेटा, तुझा आवाज छान आहे. तूही म्हण देवाचं पद एक.'

'नका दादा. मला राणीसरकारांच्या खास नावाड्याला एक पत्र द्यायचं आहे, मीच हे काम करावं म्हणून ताकीद आहे, मला उशीर होईल. जाऊ द्या मला. '

एक म्हातारा म्हणाला-

'मी राजाचा जुना पहारेकरीच आहे पोरा. तू गाणं छान म्हणतोस, मी ओळखतो. अन् राणीचं काम म्हणतोस ? हात्तेच्या. त्यात काय ? दुसरं कुणी पाठवू पत्र घेऊन तिकडे. राणीला समजणारसुद्धा नाही. चल, गाऊ लाग. अरे देवाच्या सेवेला नाही म्हणावं कां ! वेडा कुठला. '

मग म्हाताऱ्याने एका माणसाजवळ पत्र दिले व नावाड्याला दे म्हणून सांगितलं. मग तो म्हणाला,

'अरे नावाड्यानं तुझं नाव विचारलं तर 'अजुब' सांग बरं का रे, म्हणजे त्या राणीला काही एक कळायचं नाही, हा इथं थांबलाय ते.' मग तो मनुष्य तिकडे गेला. नावाड्याकडे - नाही नाही नावाड्याकडे कसला ? मरणाकडेच गेला बापडा म्हणा ना ? कारण त्या पत्रात राणीनं नावाड्याला लिहिलं होतं की-

'जो माणूस पत्र घेऊन येईल, त्याचं नाव विचारावं. ते नाव 'अजुब' असलं, तर त्याला पकडावं, गळ्याला एक धोंडा बांधावा व सरळ समुद्रात फे कून द्यावं. हा माणूस मला नकोस झाला आहे. त्याचा निकाल लावावा ही आज्ञा.

नावाड्याने पत्र वाचले, नाव विचारले, 'अजुब ! ' मग तोच माणूस पकडून समुद्रात दिला फेकून-धोंडा गळ्यात बांधून त्याने बिचारा माणूस मरून गेला बुडून.

भजन संपताच अजुबने जाऊन छान मासे पकडले व राणी पुढे तो हजर ! राणी भूत पहावे तशी बघतच राहिली. हा पोरगा जिवंत कसा राहिला त्यातून !

नावाड्यानं तर कळवलं होतं की, आपलं 'काम' पार पाडलं म्हणून, मग त्यानं मारलं ते कुणाला ? ती गोंधळली, पण बोलली नाही... राजा म्हणाला, 'अजुबचं काम झालं असलं तर माझ्याकडे पाठवा. मला चैन पडत नाही त्याच्याशिवाय !'

'पण चार दिवस मला दिलाहेत उसना नोकर, तुम्ही विसरलात का महाराज ! चार दिवसांनी परत येईल. इतकं काय ? दुसरे दिवशी राणी अजुबला म्हणाली,

मुला, गावात एक भटारी आहे. तो गोड रोट्या फार छान करतो. तो अमुक ठिकाणी राहतो. मला फार आवडतात त्या आणि आजच मेजवानीला मला त्या हव्या आहेत. तर तू मी लिहून देते ते पत्र त्याला देऊन त्या रोट्या आणशील का?'

'हात्तेच्या यात काय मोठं कठीण ? हा निघालोच.'

अजुब म्हणाला व धावत निघाला. पण वाटेत गम्मतच झाली. रस्त्यात जावा बेटातले काही लोक आले होते. ते छान नाच करीत होते. अजुबला हा नाच फार आवडायचा व ते त्याच्या मित्रांनाही ठाऊक होतं. ते मित्रही तेथे उभे होतेच. पण तो कामाला निघालेला माणूस, असंतसं काम नव्हे, सरकारी. आणि कोण्या लुंग्याचं काम नव्हतं, तर राणीचं प्रत्यक्ष. तो थांबणार कसा ?

बापडा निघाला घाईने. मित्र म्हणाले,

'थांब रे घटकाभर. एवढं कसलं घाईचं काम ?'

'त्या अमुक भटाऱ्याकडे जाऊन राणीसरकारासाठी गोड रोट्या आणायच्या आहेत. उशीर होतो,जाऊ दे मला.' अजुब म्हणाला.

मित्र खदाखदा हसले. कुचेष्टा करु लागले. मग एक म्हणाला.

'तुझं हे पत्र घेऊन हा आपला बाबू जाईल अन् घेऊन येईल त्या रोट्या इथं, तोवर तू हा नाच बघ जरा. अरे तुला कधीसुद्धा सुट्टी नाही देत मालक तुझे. मग काही करमणूक असली तर असंच करावं ! काय ? एक बाबू तुझं नाव तू 'अजुब'च सांग रे भटाऱ्याला म्हणजे तो रोट्या राणीसाठी देईल.

मग तो बिचारा कोणी बाबू तो गेला. गेला तो गेलाच.कारण पत्र वाचताच भटाऱ्यानं विचारलं.

'पोरा तुझं नाव ? '

'अजुब.'

हे ऐकातच त्या पैलवान दिसणाऱ्या त्या बाबूला उचलले व सरळ धगधगीत पेटलेल्या भट्टीत दिले फेकून. राणी सरकारांनी स्पष्टच लिहिले होते तसे - 'अजुब नाव असेल तर भट्टीत घाल एकदम' म्हणून. आणि हे जिवंत जळून मरण अजुबसाठी त्या दुष्ट राणीने ठरवले होते. पण माणूस वाटेल ते ठरवीत असला तरी देवाने ठरवले असेल तेच होते अखेर. आणि देवानेच अजूला दोन्ही मरणप्रसंगातून वाचवले होते म्हणा ना ? *जया देव तारी, तया कोण मारी ?* असे म्हणताच ते अजूच्या बाबतीत किती खरे ठरले होते !

बराच वेळ झाला बाबू परत येईना. तसे अजुब स्वतःच गेला व त्या रोट्या घेऊन आला. बाबू काम न करता घरी पळाला असेल असं त्याला वाटलं. बिचाऱ्या बाबूचा भट्टीत बळी पडला असेल ही त्याला कल्पनाच नाही. रोट्या राणीसरकारांपुढे ठेवताच राणी एकदम् दचकलीच. हा लोचट कारटा मरता मरत कसा नाही इतक्या योजना केल्या तरी ? तिने रागाने विचारले,

'ए, तुला इतका उशीर का झाला ? खात्रीनं तू स्वतः गेलाच नाहीस भटाऱ्याकडे, होय ना ? खोटं नको बोलूस -'

अजुब खोटं बोलणारातला नव्हताच. त्यानं होत जोडून म्हटलं,

'माझं थोडं चुकलं, माफी असावी. ' मग त्याने रस्त्यात नाच पाहात थोडा वेळ उभं असल्याचं कबूल केलं. राजा म्हणाला,

'हं हं ! रागावू नका त्याच्यावर. पोराची जात, वाटलं असेल जरासं कुठं मजेत उभं रहावंसं. सारखं काम करुन पोर कंटाळत नसेल का ? जाऊ द्या. मेजवानीच्या वेळेपर्यंत आल्या ना त्या रोट्या ? झालं तर मग. बरं नेऊ परत याला ? झालं काम ? '

'फारच करता तुम्ही तरी. उद्या एकच दिवस ठेवून घेते अन् परवा सकाळी पाठवून देते हो याला परत. '

खोटं खोटं हसत राणी म्हणाली.

तिसरे दिवशी असंच एक पत्र देऊन राणीने एका मांस विकणाऱ्या खाटकाकडे त्याला पाठवलं. पण बजावलं, 'हे बघ, वाटेत कुठं न थांबता जाणार आहेस कां ? तर देते पत्र. अन् दुसऱ्या कुणाच्या हाती पत्र देणार असलास वाटेत तर नाही चालायचं. तूच जाऊन पत्र देशील ? घे शपथ. '

'शपथ राणी सरकार, परत मी चुकणार नाही. आता मीच स्वतः पत्र देईन.' अजुब गरिबीनं, नम्रतेनं म्हणाला. व मग त्या दिवशी तो स्वतः खाटकाकडे गेला न थांबता. खाटकाने राणीचे पत्र वाचले. तीच दुष्ट कठोर आज्ञा.

'बकरे कापतोस त्याच सुऱ्याने या पोरट्याचे तुकडे कर. मला हा नकोसा झालेला मुलगा आहे म्हणून. '

प्रथम तर खाटकाने सुरा हाती घेतला. पण अजुबच्या चर्येकडे पाहताच तो थांबलाच. अशा गोजिरवाण्या, सुंदर लेकराचे तुकडे करू मी ? त्यातून त्याला त्याचा चेहराच कुठेतरी पाहिलेला वाटू लागला. पण कुठे ? केव्हा ? ते आठवेना. तो म्हणाला.

'मुला, तुला मी पाहिल्यासारखं वाटतं. तू खरा कुणाचा ? इथला दिसत नाहीस तू. '

'नाहीच आहे इथला मी खाटीकमामा. खरं सांगायचं तर मी फार दुरून आलो नोकरीसाठी. माझा बाप राजा होता. पण दुसऱ्या कोणी बलाढ्य राजानं आमचं राज्य लढून घेतलं व आम्ही वनवासी झालो. बाबा थकले आहेत. रानात रहातात. '

'कुठलं राज्य होतं तुमचं ? '

'अजूने नाव सांगितलं. तशी खाटकाच्या डोळ्यात पाणी आलं.' तो म्हणाला.

'बेटा अजुब, तर मग मी तुला पाहिल्यासारखं वाटलं ते उगीच नाही. अरे त्याच गावात मी रहात होतो ना ? माझा बाप तुझ्या वडिलांचा नोकर होता. अन् मी तर तुला लहानपणी कडेवरून हिंडवलं आहे, मांडीवर खेळवलंय बघ राजवाड्यात. आणि अरे राम, या राणीनं बघ मला काय आज्ञा दिली आहे ती. वाच तूच. '

ते पत्र वाचताच अजुबचे पाय कापू लागले. भीतीने जीव थरारला. तो म्हणाला.

'तर मग आत्ता मला समजलं. तो माझ्याबद्दल नावाड्याकडे गेलेला मनुष्य अन् तो बिचारा पोर बाबू परत का आले नाहीत ते- या राणीच्या मनात मलाच ठार करायचं होतंसं दिसतंय्.'

'पण कां ? तुला हे भयंकर मरण द्यायला ती बया का एवढी खटपट करते आहे बेटा ? तू तिचा गुन्हा तरी असा काय केलास ?

'गुन्हा ? मी बापडा एवढासा पोर, मी काय गुन्हा करणार त्यांचा ? पण अरे, मला आठवलं मामा. हे सारं कदाचित तो हरवलेला शुक्राचा तारा-हिरा राणीच्या हातात मी पाहिला होता, म्हणून तर नसेल ना ? स्वतःची चोरी लपवायची म्हणून ? '

त्याने सारी हकिगत खाटकाला सांगितली. खाटीकमामा प्रेमाने म्हणाला,

'बरं आता परत जाऊ नकोस त्या दुष्ट बयाबाईसमोर. रहा इथेच. खा-पी. मी तुला छान नोकरी लावून देईन हवीतर. '

पण अजुबच्या मनात दुसराच विचार होता. तो अंधार पडल्यावर राजवाड्यात गेला व राणीच्या महालाखाली बागेत लपून उभा राहिला. राजा तेथे आल्यावर काय बोलणी होतात ती तो ऐकणार होता व राजाला सारे सांगणार होता. दोन चिमण्या चिवचिव करू लागल्या बागेत. एक म्हणाली,

'आज कोजागिरी. अन् शुक्राचा तारा मध्यरात्री राणी पाहील. फारच तेज वाढतं त्याचं वर्षातून या एकाच दिवशी. '

'असेल. त्यात काय एवढं जागून बघायचं ?' दुसरी किलबिल करीत म्हणाली. पहिलीनं उत्तर दिलं.

'तुला त्या हिऱ्याचा अद्भुत गुण माहीत नाही, म्हणून तू असं म्हणतेस अग मध्यरात्री हा हिरा जो कोणी घाशील व त्या वेळी मनाची जी इच्छा बोलून दाखवील ती पुरी होते, अशी जादू आहे याच्यात. ' म्हणून तर राजा जपत होता इतका याला.

'मग राणीला काय हवंय आता ? तिनं कशाला हा हिरा चोरला ? नवऱ्याचं सामान बायकोनं चोरायचं ? '

'अगं तिला पूर्वेच्या पाचसात देशांची राणी व्हायचं आहे. त्यासाठी आपला नवरा मरावा अशी तिची इच्छा आहे- एकटीनेच बलाढ्य सम्राज्ञी व्हायची इच्छा आज ती बोलून दाखवणार आहे बघ हिऱ्याजवळ. '

'पण राजाला कसा सापडत नाही हरवलेला हिरा ! कुठे ठेवलाय् राणीनं लपवून तो ? '

'तिच्या चढावात, डाव्या पायाच्या टाचेच्या मोकळ्या पोकळीत. म्हणून तर सगळा दिवस चढाव चढवून बसते. बरं, चल, पुरे झाल्या गप्पा. जाऊ या.' मग दोन्ही चिमण्या भुर्रकन उडून गेल्या.

आता आणखी काय ऐकायचे ? अजुबला राहवेना. तो धाडकन दार उघडून राजाकडेच गेला एकदम. राजा झोपायच्या तयारीत होता. त्याला अजुबने सगळे सांगितले व खाटकाला लिहिलेले पत्रही दाखवले. राणीने ते दुष्ट पत्र बघून राजाच्या अंगावर तर शहारेच आले.

त्याला अतिशय संताप आला राणीचा. तो ओरडला.

'कोण आहे रे तिकडे ? राणीसरकारांना बोलावून आणा. '

राणी हसत आली पण अजुबला बघताच तिचे हसू मावळले. रागाने ती पाय आपटीत म्हणाली.

'परत हा लुडबुड्या फाजील नोकर आहेच का इथे ? कायरे उद्धटा, राजांच्या झोपण्याच्या खोलीत तू का आलास ? थांब, या चढावानंच झोडपून तुझा चढेलपणा दूर केला पाहिजे -

'खबरदार ! राणीसरकार, त्याला चढावानं झोडपणाऱ्या तुम्ही कोण ? आणा तो डाव्या पायातला चढाव. त्यातच माझा शुक्रतारा हिरा लपवलास ना दुष्टे तू ? आणि सहज तुझ्या हातात रत्न पाहिलं, म्हणून, या निर्दोष मुलाला भट्टीत टाकण्याची, समुद्रात बुडवण्याची अन् खाटकाकडून याचे तुकडे करण्याची योजना. शिपाई, पकडा या चोरटया बाईला. आणा तो चढावातला हिरा. '

राणीची चोरी सापडली. राणीने राजाची माफी मागितली. पण आता राजाला तिचा वीट आला होता. त्याने तिला अंधारकोठडीत जन्मभर डांबले व अजुबला आपल्याजवळ ठेवून घेऊन पुत्रच मानले. अशी ही पूर्वेच्या त्या हिऱ्याची-शुक्राच्या चांदणीची ही गोष्ट.

(ना. रा. शेंडे : लोकसाहित्यसंपदा)

# ७.२५ भाजीचा प्रताप

(झेकोस्लोवाकियाची लोककथा)

एक राजा होता. तो एकदा आपल्या महालाच्या खिडकीपुढं बसला होता. तिथं त्याला रस्त्यावरून एका फेरीवाल्याची आरोळी ऐकू आली.. 'भाजी घ्या हो भाजी ! चमत्काराची भाजी ! भाजी घ्या भाजी !'

राजाला नवल वाटलं. चमत्काराची भाजी म्हणजे कसली भाजी बुवा ? त्यानं नोकराला सांगितलं, 'जा, त्या भाजीवाल्याला बोलाव.'

भाजीवाला आला तेव्हा राजानं त्याला विचारलं चमत्काराची भाजी तू म्हणालास काय ?

भाजीवाला म्हणाला, 'होय महाराज !'

'म्हणजे काय ? मेथीची भाजी, पालकाची भाजी, भेंडीची भाजी म्हटलं तर समजतं; पण चमत्काराची भाजी म्हणजे काय ?'

'ते , महाराज, जो भाजी विकत घेईल त्यालाच मी सांगेन.'

' मी घोतो तुझी ही भाजी विकत.'

'पण त्यासाठी माझी किंमत भारंभार सोनं ही आहे !' राजाला आश्चर्य वाटलं. साध्या भाजीपाल्याची एवढी किंमत ? तो म्हणाला, 'दाखव बघू तुझी भाजी. भाजीवाल्यानं वरचा कपडा काढून भाजी दाखविली. साधी पालेभाजीसारखी तर ही भाजी दिसत होती. पण राजाला ही काय गंमत आहे, ते समजून घ्यायची उत्सुकता लागली होती. तो म्हणाला, बरं, चल. दिली तुला ती किंमत ! '

तेव्हा भाजीवाला म्हणाला, ' महाराज, या भाजीचा गुण असा आहे की जो ही खाईल त्याला पशु-पक्षी, किडे-मुंग्या वगैरे सर्व जीवजंतूंची भाषा आपोआप समजायला लागेल ! '

राजा म्हणाला, 'असं ? वाः, खरंच चमत्कार म्हणायचा ! ' त्यानं ती भाजी ठेवून घेतली, तिचं वजन केलं आणि त्या वजनाचं सोनं द्यायला आपल्या

खजिनदाराला सांगितलं. मग त्यानं आपल्या स्वैपाक्याला बोलावलं आणि म्हणाला, 'बुढ्ढा, ही भाजी आज करून मला वाढायची आहे. पण लक्षात ठेव यातलं एक पान देखील दुसऱ्या कुणाला तोंडात घालायलादेखील द्यायचं नाही!'

बुढ्ढा हात जोडून 'बरं आहे, महाराज! म्हणाला आणि त्यानं ती भाजी मुदपाकखान्यात (मोठ्या स्वैपाकघरात) नेली. त्यानं ती भाजी हातात घेऊन उलटून पालटून पाहिली. पानन् पान तपासलं; पण त्याला तिच्यात विलक्षण असं काही आढळलं नाही. त्याला आश्चर्य वाटलं. तो आपल्याशीच पण जरा मोठ्यानं म्हणाला, कुणालादेखील एक पानसुद्धा तोंडात घालायला द्यायचं नाही एवढं या भाजीला काय लागलंय ? '

त्याचे हे शब्द जवळच त्याचा साथीदार उभा होता त्याच्या कानी पडले, त्यानं चमकून बुढ्ढ्याकडं पाहिलं अन् विचारलं 'बुढ्ढेबाबा, काय म्हणालात ? '

'काही नाही, ही भाजी आत्ताच महाराजांना खाऊ घालायची आहे, सगळीच्या सगळी. आजवर महाराज गुरासारखी आख्खी पेंडी पाल्याची कधी खात नव्हते; ही भाजी मात्र आख्खीच्या आख्खी आपण खाणार म्हणाले. एवढं या भाजीत काय विशेष आहे, कुणास ठाऊक ! '

बुढ्ढ्या स्वैपाक्याचा हा साथीदार तरुण होता, हुशार अन् चलाख होता. एका गरीब बाईचा मुलगा वशिल्यानं राजवाड्यात कामाला म्हणून लागला होता. अन् तूर्त त्याला मुदपाकखान्यात बुढ्ढा स्वैपाक्याच्या हाताखाली मदतीला देण्यात आलं होतं. त्याचं नावं होतं ब्रजकिसन.

सारा स्वैपाक तयार झाला. त्याबरोबर अर्थात् भाजीही तयार झाली. आता राजेसाहेब जेवायला येणार, एवढ्यात ब्रजकिसनला वाटलं, आपण थोडी भाजी चपातीबरोबर खाऊन तर पाहू. एवढीशी भाजी खाल्ली तर कुणाला कळणार आहे ? असं मनात म्हणून, त्यानं इकडं-तिकडं बघून, चोरून त्यातली थोडी भाजी अन् चपाती घेतली अन् जरा बाजूला तोंड करुन खाऊन टाकली. भाजी त्याला फार छान लागली.

तोंडात कोंबलेला शेवटचा खास त्याच्या पोटात जातो न जातो तो त्याच्या

कानांवर कोणी बोलत असल्यासारखे शब्द आहे, ‘ मला बाई इथली मिठाई फार आवडते. राजाच्या स्वैपाकघरातली मिठाई फार छान असते !’

कोण बोलतंय् ? इथं या मुदपाकखान्यात या वेळेला तर कोणीच नाही; पण आपल्याजवळच कोणीतरी आपपसात बोलताहेत ते कोण हे तो पाहू लागला. तर पुढच्या मिठाईवर घोंगावणाऱ्या दोन माशा आपपसांत हे बोलत आहेत असं त्याला दिसलं. त्याला आश्चर्य वाटलं. माशांचं बोलणं आपल्याला समजलं ?

एवढ्यात त्याला दुसरा एक आवाज ऐकू आला. तो जरा दूर असलेल्या कोपऱ्यातून येत होता.. ‘ मी एक खातो ना ? ‘

‘नाही, नाही, मी दोन्ही खाणार ? ‘

‘ते का म्हणून ? ‘

‘ते का म्हणून ? हे लाडू मी ओढून आणले आहेत ! ‘

अरेच्चा ! हे कोण बोलतंय् ? तर कोपऱ्यात एक बीळ होतं. अन् त्याच्या तोंडाशी छोन छोटेसे उंदीर आपापसांत भांडत होते. अरे, म्हणजे आपल्याला जीव-जंतूसुद्धा बोललेलं कळायला लागलं ! हा त्या भाजीचाच प्रताप आहे हे किसननं ओळखलं.

एवढ्यात दोन कावळे खिडकीत ’काव काव’ करीत आले. किसनला त्यांचीही बोली कळली. एक कावळा म्हणत होता, माझ्या मुलाशी जर तू तुझ्या मुलीचं लग्न केलंस, तर मी तिला रोज राजाच्या उष्टयातला भात देत जाईन ! ‘ दुसरा कावळा म्हणाला, ठीक आहे, मला कबूल आहे.

वाः वाः ! पक्ष्यांचीदेखील भाषा आपल्याला समजू लागली.

राजाची स्वारी शिकारीला निघाली तेव्हा त्याच्या मागे असणाऱ्या शिलेदारांपैकी एक ब्रजकिसनचा दोस्त होता. त्यानं किसनलाही एका घोड्यावर घेतलं. घोडे दौडत चालले असताना किसनच्या कानावर शब्द आहे, ‘घोड्यावरचा स्वार कसा वजनदार अन् घट्ट पकडीचा पाहिजे. माझ्यावरचा स्वार अगदीच माशीच्या वजनाचा अन् ढिल्या पकडीचा आहे, त्यामुळे दौडायला उत्साहच वाटत नाही, फुर्र फुर्र ! ‘

हे शब्द ऐकून ब्रजकिसनला हसू आवरेना आणि तो खो खो करून हसू लागला. त्याच्या शेजारचे शिलेदार आणि खुद्द राजाही या अचानक चमत्कारिक हसण्यानं त्याच्याकडं पाहू लागले. राजानं घोडा थांबविला अन् विचारलं, 'हा कोण रे नवा शिलेदार!'

राजाच्या दिमतीतल्या शिलेदारानं भीत-भीत सांगितलं, 'हां माझा एक दोस्त आहे आणि तो आपल्या मुदपाकखान्यात तूर्त काम करतो. पण तो हुशार अन् चलाख आहे म्हणून मी त्याला आपल्या टोळीत घ्यायचा विचार करून आज आणलंय्, महाराज!'

राजानं ब्रजकिसनकडं पाहिलं. त्यानं हात जोडले अन् तो म्हणाला, ' माफी करावी महाराज ! ' ब्रिजकिसनचा उमदा चेहेरा राजाला आवडला असावा. त्यानं विचारलं, 'दौड चालली असताना एकदम इतकं मोठ्यानं हसण्याइतकं काय तुला दिसलं?'

'दिसलं नाही महाराज ऐकू आलं!'

'ऐकू आलं? काय ऐकू आलं?' राजानं विचारलं.

ब्रजकिसन गप्प राहिला. घोडा जे बोलला ते राजाला कसं सांगावं? तो काही बोलेना. राजा रागानं ओरडला, 'सांग, काय तू ऐकलंस? नाहीतर आज तुझीच शिकार करीन!

ब्रजकिसन हात जोडून म्हणाला, 'माफी करावी सरकार; पण मी ते सांगू शकत नाही. आपण माझ्यावर फार रागवाल.'

' मी रागावण्यासारखं काय ऐकलंस? बोल, मला कळलंच पाहिजे.

'आपण मला माफी करीत असला तर सांगतो. राजानं माफी कबूल केली. तेव्हा ब्रजकिसन म्हणाला, महाराज आपला घोडा बोलत होता की मला दौडायला उत्साहच वाटत नाहीय कारण माझ्यावरचा स्वार माशीसारखा हलका आहे अन् त्याची पकडच ढिली आहे!'

' माझा घोडा बोलला अन् ते तुला कळलं? थापा मारतोस काय? बोलावून आण.'

'माझ्या जिवाची शपथ महाराज, आपला घोडा हे बोलला अन् ते मी ऐकलं.'

राजा क्षणभर गप्प राहिला. मग म्हणाला, 'म्हणजे माझ्यासारखी तुलादेखील पशूंची बोली समजते ? तू मुदपाकखान्यात काम करतोस ? तू त्या दिवशीची चमत्काराची भाजी खाल्ली होतीस ? '

ब्रजकिसन गोरामोरा झाला. हात जोडून म्हणाला,'होय महाराज, मी थोडीशी भाजी चाखून पाहिली होती ! '

'तरीच ! घोडा काय बोलला ते मला जसं कळलं तसं तुला कळलं. पण तू माझा हुकूम मोडून भाजी का खाल्लीस ? त्याबद्दल तुला जबर शिक्षा का करू नये ? चला रे, आपण परत जाऊ ! ' असं म्हणून राजा परत महालाकडं आला.

राजा महालात येऊन आपल्या पलंगावर पडला. आपल्या घोड्यानं आपल्या म्हातारपणाची चेष्टा केली आणि ती आपल्या ह्या नोकराला कळली आणि तो आपल्याला हसला, याचं त्याच्या मनाला दुःख वाटलं अन् रागही आला. आता आपली अशी चेष्टा बाहेर लोकांतही होणार याचं त्याला दुःख वाटलं. याला काय उपाय करावा ? आपण लग्न करावं, म्हणजे लोक आपली अन् आपल्या म्हातारपणाची चेष्ट करणार नाहीत असं त्याच्या मनात आलं. पण आपणाशी या वयात कोण राजकन्या लग्न करायला तयार होणार किंवा कोण राजा आपली तरुण मुलगी आपल्याला देणार ?

असा त्याचा विचार चालला असताना कोणाची तरी भांडाभांडी चाललेली त्याच्या कानावर पडली, 'हा केस तुझा नाही, माझा आहे. मी तो अगोदर बघितला अन् तुला सांगितलं . '

'पण तो चोंचीत धरून आणला मीच ना, म्हणून त्यावर माझाच हक्क आहे. '

'ते काही नाही, तू चोर आहेस, मी सांगितल्यावर तू त्यावर झडप घालून मी जायच्या अगोदर तू उचलून घेऊन पळालीस.

'फार शहाणी आहेस. ज्याला दिसलं त्याचं धन की ज्याला मिळालं त्याचं ? ' असं भांडण अन् बाचाबाची चालली होती आणि राजा ऐकत होता.

त्याला दिसलं, दोन सुगरण पक्षी आपापसात भांडत होते. दोन्ही पक्षिणी

असल्या पाहिजेत. त्या कशाबद्दल भांडताहेत हे राजा बारकाईनं बघू लागला, तर एकीच्या चोचीत एक लांबसडक सोनेरी चमचम करणारा केस होता अन् त्याबद्दल दोघीचं भांडण चाललं होतं. एक म्हणत होती, 'राजकन्या सोनचंपा केस विंचरायला बसली असतानाच तिचे गळलेले केस वेचून घ्यायला मी टपून बसले होते, तू कुठं तिथं होतीस ? तुला मी बोलले तेव्हा तू तिकडं उडत गेलीस ना ? '

'हो,पण अग, मला किनई माझ्या बाळासाठी रजई करायची आहे, तू मला दे ना तो केस ! '

राजाच्या मनात आलं, 'कोण बरं ही सोनचंपा राजकन्या' आत्तापर्यंत नाव कधी ऐकलेलं नाही. कुठल्या तरी लांबच्या देशाची राजकन्या असावी. ती बरी आपल्याला राणी करायला. पण तिला इथं आणायची कशी ? कुणाला हे काम सांगावं ? राजा विचार करू लागला, इतक्यात त्याचं संध्याकाळचं खाणं-पिणं घेऊन एक दासी अन् एक नोकर आला. हा नोकर म्हणजे ब्रजकिसन होता. त्याला बघून राजाच्या मनात एक विचार झटकन येऊन गेला. खाणं पिणं ठेवून दोघे परत फिरणार, तोच राजा ब्रजकिसनला म्हणाला, 'तू थांब.' तो उभा राहिला. दासी निघून गेली.

राजा त्याला म्हणाला, तू माझा हुकूम मोडून माझा अपमान केला आहेस आणि घोड्यानं माझी केलेली चेष्टा तू ऐकली आहेस. तुला मी जिवंत ठेवणार नाही. बोल, तुला फासावर चढवू की तुझं डोकं उडवू ? '

ब्रजकिसन गयावया करीत म्हणाला, 'महाराजांनी विनाकारण गरिबाचा जीव घेऊ नये. पशु-पक्षांची बोली मला समजू लागल्यानं महाराजांचं मी काही नुकसान करणार नाही. महाराज जी भाजी खाणार ती बिनमाहितीची, कधी कोणी न बघितलेली, कधी कोणी न चाखलेली, अशी जर महाराजांना खाऊ दिली तर महाराजांच्या जीवाला धोका कशावरून पोचणार नाही, असं वाटून मी ती भाजी अगोदर चाखून पाहिली आणि मग महाराजांना दिली. यात मी आपला अपराध केला असं महाराजांना वाटतं कां ?'

ब्रजकिसनचा प्रश्न बिनतोड होता. स्वतःचा जीव धोक्यात घालून आपला जीव वाचविण्याची काळजी घेणाऱ्याचाच आपण जीव घ्यायचा काय, असा हा प्रश्न होता.

महाराज काही वेळ गप्प बसले. मग त्याला म्हणाले, 'तुझ्यावर एक कामगिरी सोपवितो. ते बघ, त्या खिडकीत दोन सुगरण पक्षी भांडताहेत, दिसले ? त्यांच्यापैकी एका पक्षाच्या चोचींत एक चमचम करणारा सोनेरी केस आहे, दिसला ? नीट बघून घे. '

ब्रजकिसननं जरा पुढं सरकून जवळून तो केस बघितला. राजा म्हणाला, 'तो केस आहे एका राजकन्येचा. तिचं नाव सोनचंपा. या राजकन्येचा शोध लावून तिला इकडं तू घेऊन ये. तिला मी माझी राणी बनविणार आहे. जर हे काम तू केलंस तर तुझा जीव वाचेल, न केलंस तर या माझ्या देशात तुला पुनः पाऊल टाकू देणार नाही, आलेला दिसलास तर तिथल्या तिथं तुझं डोकं उडवलं जाईल !

ब्रजकिसनच्या मनात आलं, आत्ता तरी आपण जीवे सुटलो; पुढचं पुढं पाहू. त्यानं ती कामगिरी कबूल केली. त्यानं राजाकडून एक चांगला घोडा मागितला आणि वाटखर्चीला काही धन मागितलं. राजानं ते सर्व देण्याचा आपल्या प्रधानाला हुकूम केला आणि ब्रजकिसन आपल्या कामगिरीवर निघाला. बुढ्ढा स्वैपाक्यानं त्याला वाटेत खाण्याकरिता शिदोरी बांधून दिली.

घोड्यावर स्वार होऊन ब्रजकिसन निघाला, पण कुठं, कुणीकडं जायचं ते काही त्याला ठाऊकच नव्हतं. घोडा नेईल तिकडं, नशिबावर हवाला ठेवून, जायचं असं त्यानं ठरविलं. घोडा दौडत दौडत घोर जंगलात शिरला. ब्रजकिसनही पाहत पाहत चालला. एके ठिकाणी त्याला आग लागलेली दिसली. तिकडं तो गेला, तेव्हा आगीच्या मधोमध मुंग्यांचं एक मोठ्ठं वारुळ असलेलं त्याला दिसलं. त्यातून हजारो मुंग्या रडत ओरडत बाहेर धावत होत्या. 'आम्हाला वाचवा, आम्हाला वाचवा' असं त्या ओरडत असलेल्या ब्रजकिसनला कळलं.

तो ओरडा ऐकून त्याला दया आली. तो घोड्यावरून खाली उतरला आणि झाडांच्या ढाप्या मोडून आजूबाजूला पसरत चाललेली आग विझविण्याचा प्रयत्न करू लागला. पुनः काही ढाप्या मोडून तो आगीच्या आत-आत शिरला आणि त्यानं सारी आग विझवून टाकून त्या मुंग्यांचा बचाव केला.

मुंग्यांनी बघितलं की एक माणूस आला अन् त्यानं आपला बचाव केला. त्या मोठ्या संख्येनं त्याच्यापुढे आल्या आणि माना वळवून त्यांनी त्याचे आभार मानले. त्या म्हणाल्या, 'तू आज आमचा जीव वाचविलास; कधीतरी आम्ही देखील तुला मदत करू.'

ब्रजकिसन हसला. तेव्हा मुंग्यांची राणी म्हणाली, 'तुला खरं वाटत नाही ? पण वेळ आली की बघ, आम्ही तुझ्या मदतीला येतो की नाही ! नुसती आमची तू आठवण कर, की आम्ही आलोच समज ! '

ब्रजकिसन घोड्यावर स्वार होऊन पुढं निघाला. जाता-जाता एके ठिकाणी त्याला कावळ्याची दोन पिलं घरट्यातून खाली पडलेली दिसली. प्रत्येक पिलू रडून म्हणत होतं, 'आई,मला घरट्यात ने, आई मला घरट्यात ने. ' आणि त्यांचे आई-बाप कावळे त्यांच्याभोवती फक्त घिरटया घालीत रडत होते. त्यांना त्या पिलांना उचलता येत नव्हतं. ब्रजकिसन घोड्यावरून उतरला,त्यानं ती दोन पिलं आपल्या तळहातावर घेतली आणि झाडावर चढून त्यांच्या घरट्यात अलगद ठेवून दिली.

कावळा-कावळीनं ब्रजकिसनचे आभार मानले. म्हणाले, 'कधी काही आमची गरज लागली तर आमची आठवण कर, आम्ही येऊन तुला मदत करू! ' ब्रजकिसनला वाटलं, आपण कुठं असणार अन् ही जोडी कुठं असणार ? आणि ही तिथं आपल्याला काय मदत करणार ! पण तो बोलला नाही. तसाच घोड्यावर स्वार होऊन पुढं चालला.

खूप वेळानं तो त्या जंगलातून बाहेर पडला आणि एका मोठ्या तलावाच्या काठावर आला. घोड्याला तलावापाशी नेऊन ब्रजकिसन खाली उतरला आणि त्यानं अगोदर घोड्याला पाणी दाखविलं आणि मग आपण पाणी

पिण्यासाठी जरा पुढं गेला, तो दोन मच्छीमार आपापसात भांडत होते. एक म्हणत होता, 'हा सोनेरी मासा मी मारलाय्, तो माझा आहे, ' तर दुसरा म्हणत होता, 'पण जाळं माझं होतं, म्हणून मासा माझा आहे, ' आणि पलीकडं तो सोनेरी मासा अर्धवट पाण्यात उलथा-पालथा होऊन ओरडत होता, 'मला वाचवा, मला वाचवा. '

ब्रजकिसनला त्या माशाची दया आली. तो पुढं होऊन त्या मच्छीमारांना म्हणाला, 'तुमचा हा मासा मी विकत घेतो, मला द्या.' असं म्हणून त्यानं आपल्या खिशात जेवढ्या मोहोरा होत्या, त्या सर्व मुठीत घेऊन त्यांच्यापुढं केल्या. मच्छीमारांना हा सौदा खूपच फायदेशीर वाटला आणि त्यांनी चट्कन् मोहोरा घेऊन तो मासा त्याला देऊन टाकला.

ब्रजकिसननं तो मासा तसाच त्या तलावाच्या खोल पाण्यात सोडून दिला. म्हणाला, 'जा, सुखानं रहा! ' पाण्यात शिरता शिरता तो मासा म्हणाला, तुमचे हे उपकार मी कधी विसरणार नाही. कधी माझी गरज लागली तर माझी आठवण करा, की मी येऊन तुमचं काम करीन ! '

मच्छीमारांना आश्चर्य वाटलं इतक्या मोहोरा देऊन खरेदी केलेला मासा हा माणूस फिरून पाण्यात सोडून देत आहे हे कसं, त्यांना कळेना. त्यांनी विचारलं, 'बाबारे, तू कोण आहेस ? इथं काय करतोस ?

ब्रजकिसननं आपण कोणत्या कामगिरीवर निघालोय् ते थोडक्यात त्यांना सांगितलं आणि उसासा टाकून म्हणाला, 'पण ही सोनचंपा कुठं अन् कशी ? नशीबावर हवाला ठेवून जीव बचावावा म्हणून मी आपला भटकत निघालोय् खरा ! '

हे ऐकून ते मच्छीमार म्हणाले, 'अरे, ती सोनचंपा ? सोनचंपा राजकन्येला शोधणं काय कठीण ? ती या तलावाच्या मध्यातच ते दूर बेट दिसतंय ना, तिथल्या राजाची मुलगी आहे. ते बघ तो राजाचा महाल इथून दिसतो आहे. तू बस आमच्या होडीत, आम्ही नेतो तुला त्या बेटावर. पण एक अडचण आहे. त्या राजाला एक नव्हे, बारा मुली आहेत त्यातून या सोनचंपेला तू कशी शोधणार ? '

ब्रजकिसन म्हणाला, 'तिथपर्यंत तर जाऊ. ज्यानं मला इथंवर आणलं आणि राजकन्येचा पत्ता माहीत करुन दिला, तोच पुढं काय अन् कसं करायचं ते दाखवील.' त्यानं आपला घोडा एका झाडाला बांधून त्याला तोबरा दिला आणि त्या होडीत बसून तो निघाला.

मच्छीमारांनी त्याला बेटावर उतरविला आणि ते परत गेले. ब्रजकिसन हळूहळू राजवाड्यापाशी आला आणि चौकीदाराला म्हणाला, ' मला महाराजांना भेटायचं आहे. मी दूरच्या देशाहून त्यांना भेटायला आलोय्.' चौकीदारानं त्याला आत राजापाशी नेऊन सोडलं.

राजा त्यावेळी बुद्धिबळाचा खेळ खेळत होता. त्याने या नव्या पाहुण्याकडं पाहिलं अन् म्हणाला, 'हं बस, आणि टाक डाव !'

ब्रजकिसन बसला. त्यानं डाव पाहिला अन् एक प्यादं पुढं सरकवलं. असं खेळता खेळता तो राजाला म्हणाला, ' मी माझ्या देशाच्या राजाकडून आपल्या सोनचंपेला मागणी घालण्याकरिता आलो आहे ! '

हे ऐकून राजानं डोकं वर करून पाहिलं. जवान चांगला तगडा, रूपानं डोळ्यांत भरण्याजोगा, वागण्यात आदबशीर अन् बोलण्यात चतुर असा त्याला दिसला. तो म्हणाला, ' माझ्या सोनचंपेला मागणी ? माझी मुलगी काय वाटेवर पडली आहे असं वाटलं की काय तुझ्या राजाला ? कुठं आहे तो तुझा राजा ? इतक्या दूर त्याला सोनचंपेचा वास कसा आला ? '

ब्रजकिसननं पक्षांच्या चोचीत दिसलेल्या सोनचंपेच्या केसांची हकिगत सांगितली. पक्षांची बोली कळून त्यांच्याकडून सोनचंपेचं नाव कळलं हे ऐकून राजाला मजा वाटली. पण तो म्हणाला, 'तू त्या राजाचा दूत आहेस ना ? जर तुझ्या राजाला सोनचंपा हवी असली तर तुला पहिल्यांदा माझी एक शर्त पुरी करावी लागेल ! '

'ती कोणती ! ' ब्रजकिसननं विचारलं.

'शर्त अशी की तीन दिवस जी तीन कामं मी तुला दाखवीन, ती तुला करता आली पाहिजेत. तर मग पुढची गोष्ट.'

ब्रजकिसन म्हणाला, 'बोला, आजच्या या पहिल्या दिवशी आपलं कोणतं पहिलं काम आहे ?'

राजा उठून त्याला आपल्या गडाच्या खिडकीपाशी घेऊन गेला, म्हणाला, 'खाली तुला काय दिसतंय ?'

'गवत.'

'साधं गवत नाही, हत्ती गवत. हत्ती जरी या गवतात शिरला तरी दिसायचा नाही इतकं उंच हे गवत आहे. माझी सोनपंचा एके दिवशी या खिडकीत बसून आपल्या गळ्यातल्या मोत्यांच्या माळेशी चाळा करीत असताना सगळे मोती ओघळून खाली पडले अन् त्या गवतात गडप झाले. तू ते एकूण एक मोती शोधून आणून मला दे. हे माझं पहिलं काम.'

ब्रजकिसन खाली गवतात उतरला. खिडकीखालचा बहुतेक भाग त्यानं फिरुन खाली हात घालून शोधला; पण एकही मोती हाती लागला नाही. मोती केवढे बारीक, त्या मानानं गवत किती मोठं अन् गच्च, मोती सापडावीत कशी ? त्यासाठी गवताच्या मुळातल्या मातीचा कण न् कण तपासावा लागेल. हे माणसाच्या साध्या डोळ्यांना कसं शक्य आहे ? मुंग्यांसारख्यांकडूनच हे काम होण्यासारखं आहे ! असं मनात येताच त्याला त्या जंगलातल्या मुंग्यांची आठवण झाली.

इतक्यात त्याच्या कानी आवाज आला, मित्रा, चिंता करू नकोस. का आमची आठवण केली सांग ! त्या मुंग्यांच्या राणीला बघून ब्रजकिसनला आश्चर्य वाटलं. त्यानं तिला आपलं काम सांगितलं. मुंग्यांचा थवाचा थवा कामाला लागला. काही वेळानं दोन-दोन मुंग्या एक-एक मोती ढकलीत ढकलीत ब्रजकिशोरपाशी आणून ठेवू लागल्या. संध्याकाळपर्यंत त्यांच्या पायापाशी मोत्यांचा लहानसा ढीग झाला.

मुंग्या म्हणाल्या, 'आता गवतात एकदेखील मोती नाही. ब्रजकिसननं सगळे मोती गोळा करून आपल्या रुमालात भरले अन् तो चालू लागणार इतक्यात आवाज आला.. थांबा ! '

एक लंगडी मुंगी एक लहानसा मोती लंगडत लंगडत ढकलीत आणीत होती. ती म्हणाली, ‘ माझा एक पाय त्या आगीत भाजल्यामुळं मी लंगडी झाले. पण तुझं काम मी लंगडी असले तरी टाकलं नाही हं ! ‘

ब्रजकिसन तिचे आभार मानून म्हणाला, ‘शाबास, शाबास ! तूसुद्धा काही कमी नाहीस बरं ! एवढा एक लहानसा मोती राहिला असता तरी मी हरलो असतो. तू लंगडी असूनसुद्धा मोठ्ठं काम केलंस हं !’

ब्रजकिसननं राजापुढं जाऊन सगळे मोती ठेवले. राजानं ते मोजून पाहिले. सगळे बरोबर जेवढे होते तेवढे मिळाले ! तो म्हणाला, ‘हां, हे काम तू पुरं केलंस खरं ! आता उद्या दुसरं.’

दुसऱ्या दिवशी राजा म्हणाला, ‘हा तलाव पाहिलास ? ‘ किसन म्हणाला, ‘पाहिला. ‘

राजा म्हणाला, ‘एक दिवस माझी सोनचंपा या तलावात अंघोळ करीत असताना तिच्या बोटातली अंगठी पाण्यात पडली, ती सापडत नाही. लाल माणिक असलेली ती अंगठी होती. ती अंगठी तू शोधून काढ हे आजचं दुसरं काम ! ‘

ब्रजकिसन अंगठी शोधायला काठावर गेला. त्यानं पाहिलं, तलाव इतका मोठा होता की पलीकडचा तीरच दिसत नव्हता,जणू समुद्रच. तो तलावात उतरला आणि त्याचा तळ शोधू लागला तर तो तळही त्याला सापडला नाही. अशा या अथांग तलावात पडलेली एवढीशी अंगठी शोधायची कुठं अन् कशी ! पाण्यात राहणारा मासाच हे काम करणं शक्य आहे असं त्याच्या मनात आलं अन् त्याला त्या सोनेरी माशाची आठवण झाली. त्याबरोबर त्याच्या लगतच त्याला शब्द ऐकू आले, ‘ मी हजर आहे ! ‘

मग ब्रजकिसननं त्याला आपली कामगिरी सांगितली. मासा म्हणाला,‘त्यात काय आहे ? माझे सगळे भाईबंद इथं तुझ्या मदतीला आहेत असं समज. तलावाचा तळ सगळाच्या सगळा आम्ही शोधून काढू !

ब्रजकिसन काठाच्या बाजूच्या पाण्यात उभा राहून वाट पाहू लागला. बराच

वेळ गेला, कोणी आलं नाही, तसा तो निराश होऊ लागला. तो वर काठावर येऊन बसला. आता सूर्य मावळतीकडं झुकत चालला होता अन् दिवस संपणार होता. ही या प्रचंड तलावात हरवलेली अंगठी आपल्याला मिळणं कठिणच, असं त्याला वाटू लागलं. तेवढ्यात त्याच्या पुढ्यात डोकं वर काढून तो सोनेरी मासा आला आणि म्हणाला, 'हीच का सोनचंपेची अंगठी, पाहा. '

ब्रजकिसनने माशानं टाकलेली अंगठी उचलली. ती मध्ये माणकाचा खडा बसविलेला राजानं सांगितली तशी अंगठी होती. त्याला खूप आनंद झाला. तो माशाला म्हणाला, 'मित्रा, तुझे किती आभार मानू कळत नाही. '

मासा म्हणाला,'तुझ्या उपकाराच्या ओझ्यातून बाहेर पडण्याची एवढी संधी मला मिळाली याचा मलाच आनंद वाटतो. आता मी जातो. असं म्हणून सोनेरी मासा दिसेनासा झाला.

अंगठी पाहून राजाला आनंदही वाटला आणि खूप आश्चर्यही वाटलं. त्याला वाटत होतं, माणसाला हे काम करणं अशक्य आहे. तो ब्रिजकिसनला म्हणाला, 'वाः ! हे दुसऱ्या दिवसाचं दुसरं कामदेखील तू यशस्वी केलंस. आता उद्या तिसऱ्या दिवसाचं तिसरं काम.

तिसऱ्या दिवशी त्यानं त्याला सांगितलं, ' माझ्या सोनचंपाला विषजळ अन् अमृतजळ हवं आहे, ते तू आणून दे.' आता ही दोन जळं म्हणजे काय, ती कशी असतात, कुठं मिळतात हे राजानं काहीच सांगितलं नाही. ती शोधायची कुठं ? असा विचार करीत ब्रजकिसन इकडे-तिकडे फिरू लागला. त्याला वाटलं, पाण्याचे असे झरे असतील; पण विषाचं पाणी अन् अमृताचं पाणी हे तरी ओळखायचं कसं ? काही न सुचून तो घनदाट जंगलात पोचला. आपल्याला भेटलेलं ते कावळ्यांचं जोडपं हे काम करू शकेल कां ? असं मनात आलं तोच ती जोडी हजर झाली. म्हणाली, 'आम्ही इथं या झाडावर आहोत, काय काम करायचं सांग ! '

ब्रजकिसननं पाहिलं तर ते दोन कावळे ! तो त्यांना म्हणाला, 'राजानं मला फक्त विषजळ आणि अमृतजळ आणि एवढंच सांगितलं; त्या संबंधानं आणखी

काही सांगितलं नाही. ही दोन जळं आता कुठं शोधायची ? तुमची काही मदत होईल ? '

ती जोडी म्हणाली, 'ते काम आमचं. आम्हाला ते माहीत आहे. तू इथं थोडा वेळ वाट पहा.' असं सांगून ती दोघं उडाली. ब्रजकिसन त्याच झाडाखाली वाट पाहत बसला.

तासाभरात ती जोडी परत आली. एकेकाच्या चोंचीत एक-एक कुपी होती. कावळा म्हणाला, 'ही विषजलाची कुपी.' कावळी म्हणाली, 'ही अमृतजळाची कुपी. ' दोन्ही त्याच्या पुढ्यात ठेवून तो आभाराचे शब्द उच्चारण्याच्या पूर्वीच ती दोघं उडून गेली.

त्या कुप्या घेऊन ब्रिजकिसन राजाच्या गडाकडं परत आला. इतक्यात त्याच्या कानावर एक किंकाळी आली, 'वाचवा, वाचवा, कुणी मला वाचवा ! '

ब्रजकिसनला दिसलं, की गडाच्या दरवाजाच्या कमानीत कोळ्याचं एक मोठ्ठं जाळं होतं अन् त्यात एक माशी अडकून त्यातून सुटू पाहत होती; पण अधिकाधिकच गुरफटत होती. आणि तिकडून एक मोठा कोळी हळूहळू आपल्या त्या भक्ष्याकडे नजर ठेवून येत होता, म्हणून ती माशी ओरडत होती. ब्रजकिसन तिला वाचविण्यासाठी धावत जातो, तो कोळ्यानं तिला आपल्या तोंडात धरलेलं त्याला दिसलं. रागारागानं त्यानं विषजळाच्या कुपीतला फक्त एकच थेंब त्या कोळ्याच्या अंगावर टाकला अन् तो कोळी तत्काळ तिथल्या तिथं मेला. ब्रजकिसननं अमृतजळाचा एकच थेंब त्या कोळ्याच्या तोंडात मेलेल्या माशीच्या अंगावर टाकला, तोच ती माशी जिवंत होऊन तोंडातून बाहेर पडली आणि उडून ब्रिजकिसनच्या खांद्यावर बसली. म्हणाली, 'किती मानू मी तुझे उपकार ! वेळ येईल तेव्हा या उपकारांची परतफेड मी जरूर करीन !' असं म्हणून ती उडून गेली.

ब्रजकिसननं त्या दोन्ही कुप्या राजाला नेऊन दिल्या. 'वाहवा, वाहवा ! हे सुद्धा अगदी अशक्य काम तू केलंस ? ' राजा उद्गारला.

ब्रजकिसन म्हणाला, ' मग आता सोनचंपाला...'

'थांब थांब, सोनचंपा इतकी स्वस्त नाही, मुला ! मला बारा मुली आहेत ; त्यांच्यातून सोनचंपाला तू शोधून काढलंस तर तू जिंकलास ! '

असं म्हणून राजा त्याला एका मोठ्या ऐसपैस असलेल्या दिवाणखान्यात घेऊन गेला. तिथं बाराही राजकन्या गोल गोल करून नाचत होत्या. राजा आणि ब्रजकिसन बाजूला उभे राहून पाहू लागले. एकाही राजकन्येचा चेहराच काय, पायाचं बोटसुद्धा दिसत नव्हतं. सगळ्या एकाच उंचीच्या होत्या.

नाच संपला आणि सगळ्याजणी एका रांगेत उभ्या राहिल्या. आता यातून सोनचंपाला शोधून कसं काढायचं ? सगळ्यांचे पोशाख एकसारखे, म्हणजे सर्वांनी पांढराशुभ्र बुरखा घेतलेला. ही शेवटची कसोटी अतिकठीण दिसते. 'यात आता मला कुणाची मदत होणार ? 'तो तोंडातल्या तोंडात पुटपुटला, तोच त्याच्या कानाजवळच आवाज आला, 'कां बरं ? मी नाही का मदत करायला ? तू एक-एक मुलीकडून पुढं पुढं चल, मी तुला सांगते सोनचंपा कोणती ती ? ' हे बोलणारी ती माशी होती.

ब्रजकिसन पहिल्या मुलीपुढं उभा राहिला, माशी म्हणाली, 'अंहं, ही नव्हे.' दुसऱ्या मुलीपुढं गेला. 'ही पण नव्हे. तिसरी, चवथी असं करीत करीत सातव्या मुलीपाशी जाऊन तो उभा राहिला अन् माशी म्हणाली, 'हीच ती ! ' ब्रजकिसननं बोट करुन 'हीच सोनचंपा' असं सांगितलं, त्याबरोबर राजकन्या सोनचंपानं आपला बुरखा काढून फेकून दिला. तिचं ते परीसारखं रूप अन् डोकीवर मुकुटासारखे चमकणारे सोनेरी केस पाहून ब्रिजकिसन चकितच झाला. राजा म्हणाला, मुला सगळ्या शर्ती तू पुऱ्या केल्यास. तू जिंकलास; मी हरलो ! '

दुसरे दिवशी ब्रजकिसन सोनचंपाला घेऊन परत आपल्या देशाला जायला निघाला. राजानं मुलीबरोबर पुष्कळ धन, नोकरचाकर आणि लवाजमा दिला.

ब्रजकिसन सर्व लवाजम्यासह जिथं त्याचा घोडा बांधला होता तिथं आला. त्याला पाहताच घोडा फुरफुरू लागला. त्या घोड्यावर स्वार होऊन ब्रजकिसन एखाद्या राजासारखा निघाला. जंगल ओलांडून ते नगरात आले. ब्रजकिसन या सगळ्या प्रवासात राजकुमारीशी एक शब्दही बोलला नव्हता. त्यानं राजापुढं

जाऊन राजकुमारी सोनचंपाला पुढं केली. तिचं सुंदर अन् परीसारखं रूप पाहून म्हातारा राजा तर आनंदानं वेडा झाला. पण त्याच्या मनात एक शंका जोरानं उठली. मी म्हातारा असं सांगून या पोरानं राजकन्येचं मन भडकविलं तर नसेल ना ? हा चांगला, दिसायला उमदा, हुशार तरुण आहे. एवढा शोध करून तिला इथंवर आणण्याचा पराक्रम करणाऱ्या तरुणाला सोडून ही माझ्यासारख्या म्हाताऱ्याशी लग्न करील ? त्याकरिता या ब्रजकिसनला ठार मारुन टाकलं पाहिजे; त्याशिवाय तिच्या मनातून तो जाणार नाही.

राजा ब्रजकिसनला म्हणाला, ' माझ्या मागणीप्रमाणं राजकन्येला तू घेऊन आलास हे उत्तम. तुला मी वचन दिल्याप्रमाणं इतके दिवस तू जगलास. पण माझ्या राज्यात राजाचा हुकूम मोडणाऱ्याची शिक्षा कधीच कमी होत नाही. म्हणून तुला मी मारणार. उद्या सकाळी माझं राजकन्येशी लग्न होईल त्या अगोदर तुझा निकाल ! '

हे ऐकताच सोनचंपा म्हणाली, 'छेः छेः, राजाला ही गोष्ट शोभणारी नाही. याला तुम्ही मारू नका ! '

हे ऐकून तर राजाच्या मनातला संशय अधिकच वाढला. तो म्हणाला, 'ते होणार नाही. याला मेलंच पाहिजे. मी उद्या सूर्य उगवायच्या आधी त्याचे डोके उडवायला सांगणार होतो; पण तू त्याची बाजू घेते आहेस तर आताच मी त्याचं डोकं उडवायला लावतो. ' असं म्हणून त्यानं टाळी वाजविली.त्याबरोबर एक काळा काळा सैनिक हाती तलवार घेतलेला राजापुढं येऊन सलाम करून उभा राहिला.

ब्रजकिसन आता ताठ उभा राहिला. म्हणाला, 'राजेसाहेब, मोठी माणसं वचनाची धड असतात असं मी समजत होतो. तुमच्या शब्दावर भरवसा ठेवून मी खटपट करून राजकन्येला इथं आणलं. पण राजकन्येला काय दिसलं इथं ? तुमचं म्हातारपणच नव्हे, तर तुमची दगलबाजी. अशा राजाबरोबर ती लग्न लावायला तयार तरी कशी होईल ? आणि अशा विश्वासघातकी राजापुढं मी जीव वाचविण्याची भीक तरी कशाला मागू ? हा मी तयार आहे, उडवा माझं

डोकं ! '

त्याच्या या बोलण्यानं राजा अधिकच भडकला आणि त्यानं सैनिकाला हुकूम केला. 'याला राजवाड्याच्या चौकात नेऊन आत्ताच्या आत्ता याचं डोकं उडवा !'

राजकन्या सोनचंपा म्हणाली, त्याचं मरण बघायला मी तिथं जाईन. यानं मला माझ्या वडिलांकडून इथवर आणलं, 'मरणाच्या वेळी तरी मला त्याच्याजवळ राहू दे ! ' राजा 'ठीक आहे' म्हणाला.

ब्रजकिसनला राजवाड्याच्या चौकात नेण्यात आलं. नगरातले लोक हे क्रूर कृत्य बघायला तिथं जमले. राजाही येऊन बसला. ब्रजकिसनला बघून सगळ्यांना हळहळ वाटू लागली. ते आपापसात (हलक्या आवाजात) म्हणू लागले, 'अरेरे, एवढा तरुण वयाचा हा उमदा जवान फुकट मरणार ! काय हा राजा निष्ठुर, किती क्रूर ! असा राजा नसलेला बरा ! '

आजूबाजूच्या लोकांत सोनचंपाही आपल्या सेवकांसह जाऊन उभी राहिली. ब्रजकिसननं हात जोडून आणि मान वाकवून लोकांना नमस्कार केला आणि छाती पुढं काढून अभिमानानं तो उभा राहिला. सैनिकानं हातातली तलवार आपल्या डोक्याभोवती तीन वेळा गरगर फिरविली आणि एका फटक्यासरशी ब्रजकिसनचं डोकं उडविलं. डोकं आणि धड एकदम खाली पडलं. त्याबरोबर राजकन्या सोनचंपा एकदम पुढं झाली आणि तिनं ते डोकं धडाला चटकन चिकटवून त्यावर अमृतजळाची धार टाकली. त्याबरोबर ब्रजकिसन पूर्वी होता तसा... नव्हे, त्यातूनही अधिक सुंदर झाला. तो उठून बसला. हा चमत्कार बघून जमलेल्या लोकांनी आनंदानं टाळ्या वाजविल्या.

राजा आश्चर्यानं थक्क झाला. राजकन्येजवळ हे अमृतासारखं पाणी आहे अं? ते आपल्यावर टाकलं तर आपणही बुढ्ढ्याचे जवान होऊ. तो राजकन्येला म्हणाला, 'ते अमृतजळ माझ्याही अंगावर टाक.' पण राजकन्या म्हणाली, याला जिवंत करण्यात ते सारं संपलं.'

'संपलं कसं ? ती दुसरी कुपी दिसते आहे, ती ओत माझ्या अंगावर'.

‘ती तुमच्या अंगावर ओतण्यासारखी नाही, महाराज ! भलता आग्रह करू नका ! ‘

राजा आता हट्टाला पेटला. म्हणाला, ‘ते काही चालणार नाही. त्या कुपीतलं जळ माझ्यावर तू ओतलंच पाहिजेस. नाहीतर मी ते तुझ्यापासून जबरदस्तीनं काढून घेईन ! ‘ असं म्हणत तो पुढं सरकला.

त्याबरोबर राजकन्येनं ती दुसरी कुपी हातात घेऊन उघडली आणि त्यातलं विषजळ राजाच्या अंगावर टाकलं. त्याबरोबर राजाच्या अंगाचा भडका झाला आणि राजा तडफड करीत मेला.

राजा मेल्याचा कुणालाही शोक झाला नाही. लोकांनी सोनचंपा राजकन्येचा जयजयकार केला. ‘राजकन्या सोनचंपा हीच आमची राणी ! राजकन्या सोनचंपा हीच आमची राणी ! ‘

राजकन्येनं पुढे होऊन ब्रजकिसनचा हात आपल्या हाती घेतला आणि लोकांनी दोघांचाही राजा-राणी म्हणून जयजयकार केला. दुसऱ्या दिवशी दोघांचं समारंभपूर्वक लग्न झालं. लग्नाला मुदपाकखान्यातला बुढ्ढा स्वैपाकीच आला होता असं नाही; तर आजूबाजूचे सारे पक्षी आणि पशुसुद्धा आले होते. प्राणिमात्रांवर ज्याचं प्रेम, त्याच्यावर प्राणिमात्रही प्रेम करणारच !

(भाऊ धर्माधिकारी : देशोदेशीच्या लोककथा)

# ७.२६ जोजाची गोष्ट

(इटालियन लोककथा)

'जोजा ही एका राजाची मुलगी, पाय घसरून पडलेल्या एका म्हातारीला कुचेष्टेने हसली. तशी म्हातारीने चिडून शाप दिला : 'तादेव' नावाचा मृत राजपुत्र तुला पती मिळू दे अन् तुझे खूप हाल होऊ देत !' बिचारी राजकन्या, तिने म्हातारीची विनवणी केली. तो मृत राजपुत्र कशाने उठेल म्हणून विचारले. तशी म्हातारीने सांगितले की, त्याच्या उशाशी थडग्यात एक मोठे चांदीचे पिंप ठेवलेले आहे, ते जी तरुणी तीन दिवसांत अश्रूंनी भरून टाकील तीच त्याला जीवदान देऊ शकेल व मग त्यांचे लग्न होईल. तू फिदीफिदी हसलीस ना?आता सारखी रड अन् कर त्याला सजीव.'

राजकन्येने कष्टाने राजपुत्राचा शोध लावला व खरोखरच तो देखणा पण मृत राजपुत्र पाहून तिला इतके अनिवार दुःख झाले की, तिच्या डोळ्यांतून सारख्या धाराच लागल्या पाण्याच्या. इतक्या की, ते भांडे भरत आले, दोनचार थेंब कमी होते, तेवढ्यात जरा थकल्यामुळे तिचा डोळा लागला आणि काय दुर्दैव बघा, एक हलकट मोलकरीण हे पाहत होती, तिने पिंप ओढून दुसऱ्या कोपऱ्यात नेले व आपल्याच डोळ्यांतली चार आसवे त्यात टाकली ! त्या चार थेंबांनी ते पिंप भरले. लगेच तो राजपुत्र सजीव होऊन थडग्यातून बाहेर आला, ती काळूबाईच आपला जीव वाचवणारी तरुणी असे समजून तिला बरोबर घेऊन गेला व त्याच रात्री त्यांचे लग्नही लागले. बिचारी राजकन्या तेथेच हळहळत बसली व काळीचे आयतेच साधले ! मग त्या कळकट राणीला डोहाळे लागले ते गोष्टी ऐकायचे. तेव्हा राजपुत्राने दवंडी देऊन ठिकठिकाणच्या गोष्टीवेल्हाळ बाया आणवल्या. ती राजकन्याही या बायांतच मिसळून आलेली होती. तिने आपली खरीखुरी कथा सर्वात शेवटी सांगितली. तशी काळ्या राणीचा चेहरा खर्रकन उतरला. राजपुत्राला तिचे कपट कारस्थान कळले. तशी तिने सारे कबूल केले. मग त्याने तिला देहान्त शिक्षा दिली व राजकन्येशी त्याचे लग्न झाले.

# ७.२७ राजपुत्राची गोष्ट

एक राजा होता. त्याला एक मुलगा होता. तो दोनतीन वर्षांचा झाल्यावर राजाची बायको मेली. तेव्हा राजाने दुसरी बायको केली. तिलाही मुलगा झाला. सावत्र आई पहिल्या मुलाचा द्वेष करू लागली. दुसरी बायको केल्यावर राजाचेही मन पहिल्या मुलावरून उडाले होते. एके दिवशी राणी राजाला म्हणते, 'आपली काळी कपिली गाय सांभाळण्याकरिता या मुलाला जाऊ दे रानामध्ये.' राजानेही तिचे ऐकले. राणी रोज राजपुत्राकडून गाईचे शेणपाणी करून घ्यायची व कोंड्याची भाकरी भाजून देऊन त्याला रानात पाठवायची.

राजपुत्र गाय घ्यायचा व रोज सकाळी रानामध्ये जायचा. रानात तो काय करी ? गाय चरायला लावी, भाकरी सोडी व देवाला हात जोडून रडत बसे. असे करता करता दोन महिने झाले. एके दिवशी काय झालं, शंकरपार्वती नंदीवर बसून त्या वनातून जात होते. राजपुत्र रडत होता. तेव्हा पार्वती शंकराला म्हणाली, 'शंकरा, या भयंकर वनामध्ये राजकुमाराचा आवाज कसा येतो आहे ? माणसाचा थारा-पांखराचा वारा नाही अशा ठिकाणी रडते आहे कोण पाहूया.' शंकर म्हणतो, 'असेल कोणीतरी रडत. चल तू.' पण पार्वती म्हणते, 'कोणावर तरी संकट पडले असेल तेव्हा आपण पाहिलेच पाहिजे.' तेव्हां शंकर-पार्वती राजपुत्राजवळ गेले व विचारले, 'का रडतोस बाळ?' राजपुत्राने आपली सगळी हकिगत त्यांना सांगितली, कोंड्याची भाकरी त्यांना दाखविली तेव्हा त्यांच्या मनात दया उत्पन्न झाली. त्याला एक लहानशी वाळकाची बी देऊन शंकर म्हणतो, 'जिथं माणसाचा थारा-पांखराचा वारा नाही अशा ठिकाणी ही बी लाव. रोज तांब्याभर पाणी घालीत जा. थोड्या दिवसांनी वाळके येतील ती खात जा. पण कोणाला सांगू नको.'

मग त्या मुलाने दोन दिवस झटून निवडुंगामध्ये वाट केली व तेथे वाळकाची

बी लाविली. दोन-चार दिवस पाणी घातल्यावर त्याला काकड्या आल्या. राजपुत्र रोडका झाला होता तो वाळके खाऊन चांगला लठ्ठ झाला. तेव्हा राणीच्या मनात संशय आला. तिने आपल्या मुलाला तहानलाडू-भूकलाडू करून दिले व राजपुत्राबरोबर रानात जाऊन तो काय करितो, काय खातो ते पहाण्यास सांगितले. तेव्हा तो मुलगा राजपुत्राला म्हणतो, 'दादा मी येतो आज तुझ्याबरोबर रानात. तेव्हा राजपुत्र म्हणतो, 'तू काही येऊ नको. तुला ऊन लागेल, भूक लागेल. पाणी काही लवकर भेटायचे नाही, पण त्याने हट्ट घेतला व तो राजपुत्राबरोबर रानात गेला. रानात गेल्यावर त्याने हट्ट घेतला की मला भूक लागली, काही खायला दे, नाहीतर आईला सांगेन.'

आता काय करणार? तेव्हा त्याने त्याला वाळकाचा वेल दाखविला व ही खा म्हणाला. वाळके खाल्ल्यावर तो मुलगा घरी गेला व त्याने सगळी हकिगत आईला सांगितली. तेव्हा तिने राजाला सांगून शिपाई पाठविले व वाळकाचा वेल तोडून टाकला.

तेव्हा त्या राजपुत्राचे मागचे दिवस पुन्हा आले. रोज तो कोंड्याची भाकरी घ्यायचा व पहिल्याप्रमाणे रडत बसायचा. असे करता करता एके दिवशी शंकर-पार्वती नंदीवर बसून त्या वाटेने चालली होती. तेव्हा पार्वतीला राजपुत्राचे रडणे ऐकू आले. ती शंकराला म्हणते, 'या भयंकर रानामध्ये कोण रडत आहे ? आपण जाऊन पाहू या.' तेव्हा ती राजपुत्राजवळ गेली व त्याला विचारतात, 'बाळ रडतो का ? तेव्हा त्याने आपली सगळी हकिगत शंकरपार्वतीला सांगितली. तेव्हा शंकराने त्याला आपल्या झोळीतून विभूतीचा खडा काढून दिला व म्हणतो 'वीतभर जागा गाईच्या पुढे सारवीत जा. गाईचे पाय त्या ठिकाणी ठेवीत जा व हा विभुतीचा खडा गाईचे शिंगावर हाणीत जा म्हणजे पाहिजे तो पदार्थ तुझ्यापुढे येत जाईल.'

शंकरपार्वती गेल्यावर राजपुत्राला काय धीर निघतो आहे. त्याने जागा सारविली. तोंड उगवतीकडे केले. व गाईच्या शिंगावर खडा मारला. त्याबरोबर पंचपक्वान्नांचे ताट त्याच्यापुढे आले. त्याने ते अन्न खाले, पुन्हा गाईचे पाय

त्याच जागी ठेवले व तिच्या शिंगावर खडा हाणला त्याजबराबर ताटवाटी सगळे गुप्त झाले.

असे करता करता दोन महिने गेले तसा पुन्हा राणीला संशय आला की राजपुत्र रानात काही तरी खात असावा. म्हणून तिने आपल्या मुलाला त्याच्या बरोबर रानात जावयास सांगितले. दुसऱ्या दिवशी राजपुत्र काळी कपिली गाय घेऊन रानात निघाला तेव्हा दुसरा मुलगा त्याला म्हणतो दादा, मी येतो तुझ्याबरोबर रानात. राजपुत्र म्हणतो, तू काही येऊ नको; तुला भूक लागेल, ऊन लागेल, पाणी काही लवकर भेटायचे नाही. पण तो काही ऐकेना. त्याने हट्ट घेतला. तेव्हा राजपुत्र त्याला घेऊन रानात गेला. दुपार झाली व उन्हं पडू लागले तसा तो मुलगा म्हणू लागला की मला काहीतरी खावयाला दे नाहीतर मी आईला सांगतो. आता काय करणार ? राजपुत्राला तर मोठे वाईट वाटले. शेवटी त्याने जागा सारविली त्यावर गाईचे पाय ठेविले व तिच्या शिंगावर शंकराने दिलेला विभूतीचा खडा हाणला; त्याबरोबर पंचपक्वान्नांचे ताट तिथे आले. दोघे जसे जेवलेखाल्ले तसा दुसरा मुलगा घरी गेला व त्याने सगळी हकिगत राणीला सांगितली. तेव्हा राणीने खाट-वाकळ घेतले व महालात जाऊन झोपली. दासींनी तिला पुष्कळ विचारले पण ती काही सांगेना. शेवटी राजा तिच्या महालांत गेला काय झाले म्हणून तिला विचारू लागला. तेव्हा राणी म्हणते, 'ही काळी कपिली गाय आहे; ही जर उद्या, कापून टाकली नाही तर मी काही प्राण ठेवायची नाही. तेव्हा राजाने दुसऱ्या दिवशी काळी कपिली गाय ठार मारायचे ठरविले.

तो मध्यरात्रीच्या सुमाराला काय वर्तमान घडले. काळ्या कपिला गाईला वाचा फुटली. तिने राजपुत्र जवळ गोठ्यात झोपला होता. त्याला जागे केले व म्हणते, "माझे मरण जवळ आले, तुझे कसे होईल ?'

तेव्हा राजपुत्राने गाईचे पाय धरले व तो रडू लागला. तेव्हा गाय बोलू लागली, 'बाळ रडू नको; तिथे शिंके बांधले आहे ते सोडून आण, माझ्या गळ्यात बांध व त्यात तू बस, आपण लांब कुणीकडे निघून जाऊ. तू काही घाबरू नको.' तेव्हा

राजपुत्राने ते शिंके आणले, कपिल्या गाईच्या गळ्यात बांधले व आपण त्यात बसला. त्याबरोबर त्या गाईने जे उड्डान केळे ती लांब एका जंगलात वनगाईचा कळप होता तिथे येऊन उभी राहिली.

तेथे आपल्यावर राजपुत्र काय करी. रोज वनगाईचे शेणपाणी करी. कपिल्या गाईचे दूध पिई व एका झाडावर चढून बसत असे.

ही कपिलागाय वनगाईपासून लांब उभी राहून चरत असे. असे करता करता एके दिवशी त्या वनगाईंना वाचा फुटली. त्या म्हणू लागल्या, "बाई, हा मुलगा खातो काय ? असा झाडावर चढून का बसतो ?" तेव्हा काळ्या कपिल्या गाईने मागचा सगळा वृत्तांत त्यांना सांगितला. तेव्हा वनगाईंना वाईट वाटले व त्या मुलाला म्हटले-बाळ, जेव्हा म्हणून तुला भूक लागेल तेव्ही आमचे दूध काढून पीत जा. असे म्हणून त्यांनी त्या मुलाला दोन पावे दिले. एक सुखाचा न एक दुःखाचा. दुःखाचा पावा वाजवलास की आम्ही तुझ्या जवळ हजर होऊ. तेव्हा पुन्हा राजपुत्राचे दिवस मोठ्या आनंदात जाऊ लागले.

पुढे राजपुत्राची हजामत वाढली. तेव्हा वनगाई म्हणाल्या, 'ते तिथे वारूळ आहे. त्याच्या भोकावर डोके टेकून नीज. राजपुत्र वारुळावर डोके टेकून निजला तसे आतून नाग आले व त्यांनी त्याच्या डोक्याचे केस उपटून काढले व ते एका द्रोणात भरून ठेविले. तेव्हा वनगायांनी त्याला तो द्रोण नदीत नेऊन सोडावयास सांगितला. राजपुत्राने तो द्रोण घेतला व नदीत नेऊन सोडला. त्याबरोबर त्यांतले केस सोन्याचे झाले.

त्या नदीच्या काठी एक गाव होते तेथे एक राजा होता. त्याची कन्या दोन दासी बरोबर घेऊन नदीवर गेली होती. नदीवर गेल्यावर पहाते तो एक द्रोण नदीतून वहात चालला आहे. तेव्हा तिने दासींकडून तो द्रोण आणविला. द्रोण बघितल्याबरोबर तिचे भान हरपले व तिने निश्चय केला की लग्न करीन तर या सोन्याच्या केसाच्या मुलाशी करीन.

राजाला हा निश्चय कळल्यावर राजाने पैजचे विडे मांडले, पण कोणी विडा उचलेना. शेवटी एक म्हातारी म्हणाली, मी सोन्याच्या केसांच्या मुलाला शोधून

आणते. व दोन महिन्यांची मुदत घेऊन ती गेली. भटकता भटकता ती वनगायी राहात होत्या तेथे आली. तिला पाहिल्याबरोबर राजपुत्र धावत तिच्याजवळ आला. तेव्हा सोन्याच्या केसांचा मुलगा सापडला म्हणून म्हातारीला आनंद झाला. ती त्याला घेऊन राजाकडे आली व राजपुत्राचे व त्या राजकन्येचे मोठ्या थाटाने लग्न झाले.

लग्न झाल्यावर राजपुत्र बायकोला घेऊन पुन्हा वनगाईच्या गोठणीकडे गेला. पहातो तो काय ? वनगाईंनी राजपुत्र गेल्यामुळे केव्हाच प्राण सोडले होते. तेव्हा राजपुत्राला रडू आवरेना. गाईच्या मानेवर मान टाकून तो अश्रू ढाळू लागला. ते पाहून दया येऊन शंकरपार्वती तेथे धावून आली व म्हणतात, बाळ रडू नको. आपल्या हाताची करंगळी काप व सगळ्या गाईच्या तोंडाला लाव. राजपुत्र गाईच्या विरहाने व्याकुळ झाला होता त्याने तत्काळ करंगळी कापिली व गाईच्या तोंडाला लाविली तेव्हा सगळ्या गाई जिवंत झाल्या व त्याच्या गळ्यात गळा घालू लागल्या. तेव्हा शंकरपार्वती म्हणाली, आम्ही जातो आता. पण राजपुत्र म्हणतो, मी धावा करीन तेव्हा आले पाहिजे, बरे म्हणून शंकरपार्वती निघून गेली.

इकडे राजपुत्र बायकोला व गाईंना घेऊन सासरी गेला. तेथे राजाने त्यांना सात तळाचा राजवाडा बांधून दिला. गाईंना छानसा गोठा करून दिला व राजपुत्र सुखाने राज्य करू लागला तसे तुम्ही करा.

इटकुली मिटकुली
गोष्ट सरो
तुमचे आमचे
पोट भरो

(ना. रा. शेंडे : लोकसाहित्यसंपदा)

# ७.२८ ब्रह्मफूल

रात्र झाली तरी म्हातारीची नातवंडे झोपी जाईनात. ती म्हातारीला बिलगून म्हणाली, “आजीमाय, एखादी कहाणी सांग ना.” तिनं बरेच आढेवेढे घेतले पण नातवंडे काही केल्या आपला हट्ट सोडीनात. तेव्हा म्हातारी कहाणी सांगू लागली...

चमन नावाची नगरी होती. तेथील राजा मोठा ग्यानी होता, चतुर होता. राज्यात सगळीकडे सुखशांती होती. कोणाला दुःख नाही, कोणाला त्रास नाही, कोणाला चिंता नाही. लोक भल्या पहाटे उठत, आंघोळ करीत, पूजाअर्चा करीत आणि राजाचा जयजयकार करीत.

नगरीच्या बाहेर एक गाव होतं. गावाजवळून एक ओढा वाहात होता. ओढ्याला लागून एक आंबराई होती. आंबराईच्या सावलीत एक तुटकी पडकी झोपडी होती. झोपडीत साठ वर्षांची बुढ्ढी रहात होती. तिला तीन मुलं होती. मुलं फार हुशार होती. दिवसभर कष्ट करीत. सायंकाळी घरी येत. दिवसामागून दिवस जात. रात्री मागून रात्री जात. मुलं कामधंदा करीत. ना कुणाशी खटखट, ना कुणाशी देवाण घेवाण. आपण भले, आपले काम भले, असा भाउल्यांचा स्वभाव होता.

एके दिवशी राजा शिकारीला गेला. घोर रान होते. वाघ, सिंह, अस्वल यांचेच राज्य, राजाबरोबर त्याचा प्रधान आणि काही भालदार चोपदार होते. सकाळची संध्याकाळ झाली. पण राजाला शिकार काही सापडली नाही. अंधार पडू लागला. तेव्हा प्रधान म्हणाला, “महाराजाधिराज, आता रात्र होत आली आहे, चला परत जाऊ या.” राजा म्हणाला, “प्रधान, शिकार सापडल्याशिवाय कसा बरं परत जाऊ ? या आयुष्यात मी शिकारीला निघालो आणि शिकार सापडली नाही असं कधी घडलं नाही. मग आज असं का बरं घडलं ?” प्रधान हात जोडून

म्हणाला, “महाराज, आज आपला व्रताचा दिवस, या दिवशी कशी शिकार मिळेल ? चला, परत चला.” पण राजानं आपला हेका सोडला नाही.

प्रधानानं राजाला एका झाडाखाली नेऊन म्हटलं, “महाराज, ही जागा बरी दिसते. आपण आराम करा. तोपर्यंत आम्ही पहारा देतो.” आता राजा आराम करण्यास त्या झाडाच्या बुंध्याशी बसणार इतक्यात वाघोबाची आरोळी ऐकू आली. राजा तडक उठला व धनुष्यबाण घेऊन वाघाकडे धाव घेणार तोच त्याच्या छातीत कळ येऊन त्यानं, “प्रधान धावा !” अशी किंकाळी फोडली... प्रधान धावला, भालदार-चोपदार घावले. त्यांनी राजाला उचलून पुन्हा झाडाखाली आणले. करता येतील तेवढे इलाज केले. पण राजाची कळ बसली नाही. उलट ती वाढून राजा विव्हळू लागला. प्रधानानं गडीमाणसांना ताबडतोब नगराकडे पाठवून धन्वंतरीला बोलावून आणण्याचा हुकूम सोडला.

मध्यरात्र झाली. राजाचं दुखणं काही केल्या थांबेना. राजा सारखा विव्हळत होता, ‘धावा, धावा..मला वाचवा!’... धन्वंतरी आला. त्यानं जडीबुटी उगाळून राजाला दिली. तरी कळ बसेना. मांत्रिक आले. त्यांनी अनेक मंत्र भारले, पण कळ काही केल्या थांबेना. इतक्यात आकाशवाणी ऐकू आली, “राजा तुझ्या नगरीत सुख-शांती आहे. तुझ्या नगरीत कोणी गरीब नाही, कोणी दुःखी नाही. पण राजा, तुला स्वतःला समाधान नाही. तुला पुत्र नाही आणि म्हणून चमन नगरीचा पुढे कोणी वारसदार नाही. तुला वारसदार प्राप्त झाला पाहिजे. पण त्यासाठी तू या दुखण्यातून उठला पाहिजेस. परंतु हे दुखणे वैद्याकडून, धन्वंतरीकडून किंवा मांत्रिकाकडून बसणे शक्य नाही. आज तुझ्या व्रताचा दिवस. या दिवशी तरी तुझ्या मनात पशूची शिकार करण्याची इच्छा होणे व त्यासाठी तू धडपडणे हाच तुझा मोठा अपराध आहे. परंतु आतापर्यंत तू जे पुण्यकाम केलेस ते पाहून या दुखण्यातून उठण्यास आता तुला एकच उपाय आहे, तो ऐक. येथून पूर्व दिशेला जेथे सात डोंगर एकावर एक उभे आहेत, त्याच्या टोकावर एक शिवमंदिर आहे. त्या मंदिराच्या पुढे एक मोठा ब्रह्मवृक्ष आहे. त्या झाडाच्या वरच्या फांदीला एकच ब्रह्मफूल आहे. ते फूल आणून तू

हृदयाशी धरशील तर तुझं दुखणं जाऊन तू पुत्रफळही प्राप्त करशील. तेव्हा राजा, हे अवघड काम जो खरा पुण्यवान असेल तोच साध्य करू शकेल, नाही तर राज्याचा नाश होईल !" या आकाशवाणीनं सारं रान दुमदुमून गेलं. सर्वजण घाबरून गेले. पशु-पक्षी आक्रोश करू लागले. झाडे-झुडपं, लतावेली कोमेजून गेल्या. नगरभर व आसपासच्या सर्व टापूत अवकळा पसरली.

दुसरे दिवशी राणीनं ताबडतोब आसपासच्या टापूत दवंडी पिटविली. जो कोणी सात पहाडावरील ब्रह्मझाडाच्या शेंड्यावरील फूल आणील त्याला चमन नगरीचं राज्य बक्षीस देण्यात येईल, सगळीकडे चर्चा सुरू झाली. प्रत्येक जण स्वतःला पुण्यवान समजत होता. प्रत्येकाला यशाची आशा वाटू लागली. जो तो ब्रह्मफूल आणण्याची चुरस करू लागला. कितीतरी लोक पहाडाच्या पायथ्यापर्यंत कसेबसे जात आणि मग डोंगराचं कडं, उंचच्या उंच आभाळाला भेदणारं ते शिखर पाहून हताश होत व परत येत. त्या सात डोंगरांच्या आसपास ब्रह्मझाडासंबंधी चमत्कारिक गोष्टी कळू लागत. कोणी म्हणायचा, डोंगराची चढण चढायला सुरुवात झाली की माणूस दगड होऊन पडतो. कोणी म्हणायचा, डोंगर चढताना चारी बाजूंना फार मोठी गुहा आहे व पावलापावलावर नागोबा फणा काढून पहारा देत असतो व तो वर चढणाऱ्याला दंश करतो. कोणी म्हणायचा, डोंगराच्या वर चढताना हिरे-माणकांनी मढवलेलं एक दार आहे व तेथे एक सुंदर तरुणी बसली असते. ती डोंगरावर येणाऱ्याला आत घेऊन जाते व मग तो आत जाणारा गृहस्थ कधी परत येत नाही. त्याचं नंतर काय होतं कुणाला ठाऊक ? अशा शेकडो कथा सांगितल्या जात व मग जाणारे कच खाऊन मागे परत येत.

दिवसामागून दिवस लोटत होते. हिंमत बांधून कोणी ना कोणी डोंगराकडे जायचा आणि परत यायचा. काही तर मध्येच वाटेत मृत्युमुखी पडत. रोजच्या रोज राजा खंगत होता. त्याच्या वेदना वाढत होत्या. आपल्याला सगळं राज्य मिळेल या आशेनं, या मोहानं जे जे डोंगराकडे जात त्या सर्वांची दुर्दशा होई व नंतर त्यांच्या दुर्दशेच्या भयंकर वार्ता ऐकायला मिळत. त्यामुळे तर आणखी

दुसरेही लोक घाबरून जात.

एके दिवशी आंबराईतील मुले कामावरून घरी आली. सायंकाळ झाली होती. मुलांनी हातपाय धुतले. तुळशीवर जळती दिवटी ठेवली. आणि मग नैवेद्यासाठी आईला हाक दिली. पण त्यांची आई झुऱ्याभुऱ्या गोधडी पांघरून माजघराच्या कोपऱ्यात बसली होती. मुलांच्या हाकेला तिन ओ दिली नाही. मुलं काय झालं म्हणून तिच्याजवळ गेली. तिच्या कुशीला बिलगली आणि आमच्या हातून काय अपराध झाला म्हणून काकुळतीनं विचारू लागली.

आईनं त्या मुलांच्या चेहऱ्यावरून आपली क्षीण नजर टाकली. मग मुलांना कवटाळून गहिवरून म्हणाली, "बाळांनो काय सांगू तुम्हाला ? देवाच्या कृपेनं तुम्ही सुखी आहात पण तुमचा राजा सुखी नाही. म्हणून राणी दुःखी आहे, प्रजा दुःखी आहे. सर्व राज्यात दुःख पसरलं आहे !"

"मग आई तू आज्ञा कर, काय करावं आम्ही ?" मोठा मुलगा म्हणाला.

"तू सांगशील तसं करू," दुसरा मुलगा म्हणाला.

"तू सांग आई, म्हणशील तर आपल्या राजासाठी प्राण देऊ," तिसरा मुलगा म्हणाला.

"शाब्बास माझ्या लेकरांनो !" म्हाताऱ्या आईनं मुलांना छातीशी धरून आनंदानं उद्‌गार काढले. तिच्या डोळ्यातून अभिमानानं अश्रू ओघळले. नंतर म्हातारी आई म्हणाली, "आज दुपारी मला डोळा लागला आणि एक स्वप्न पडलं. एकावर एक असलेले मला ते डोंगर दिसले. डोंगरावरील ते देऊळ दिसलं. देवळापुढील ब्रह्मझाड दिसलं अन् माझी नजर त्या झाडाच्या शेंड्यावर गेली, एकच एक फूल तेथे चमकत होतं. त्याचा प्रकाश आजूबाजूला पडला होता."

म्हातारी थोडा वेळ थांबली. मुलं टक लावून आईकडे पाहात म्हणाली, "मग काय झालं आई ?"

म्हातारी पुढे सांगू लागली, "देवळाच्या चबुतऱ्यावर एक म्हातारा पुजारी बसला होता. त्याच्यासमोर पंचारती होती. पंचारतीत वाती जळत होत्या.

बाजूला एक गाय होती. दुसऱ्या बाजूला नाग डुलत होता. म्हातारा ओंजळीत फूल घेऊन मजकडे पाहून म्हणाला, 'या देवळात आजपर्यंत कोणी आलं नाही, पण आता तू आलीस. तुला ब्रह्मफूल मिळणार नाही. जा, परत जा आणि आपल्या पुत्रांना पाठव. त्यांना हे फूल प्राप्त होऊ शकेल. पण लक्षात ठेव, या डोंगरावर जिकडे तिकडे सोने, चांदी, हिरे, माणिक, मोती आहेत. आजूबाजूला सुंदर सुंदर अप्सरा शृंगार करून फिरत असतात. तुझी मुलं मोहाला बळी पडली की जागच्या जागी दगड होऊन पडतील आणि तुझी पुण्याई नष्ट होईल!' मी हात जोडून परतले तोच तो म्हातारा पुजारी पुन्हा म्हणाला, 'डोंगराच्या पायथ्याशी पूर्वेच्या बाजूला एक झरा आहे. झऱ्याला लागून बेलाची तीन झाडे आहेत. मधल्या झाडाला एक दगड टेकला आहे. त्या दगडाच्या खाली एक निळा मणी आहे. तो मणी घेऊन डोंगरावर चढण्याची शक्ती येईल, परंतु तो हरवला तर मनुष्य प्राणाला मुकेल व मणी जागच्या जागी परत जाईल, जा आता.' इतक्यात माझे डोळे उघडले. चिमण्यांनी माझ्या जवळच्या सुपातील तांदळावर चिवचिवाट केला नसता तर माझ्या स्वप्नाचा भंग झाला नसता. पण झालं ते बरंच झालं. चिमण्यांनी मला जागं केलं हा शुभ शकून आहे." स्वप्न सांगून झाल्यावर म्हातारी म्हणाली, "बाळांनो, राजाला वाचवणं आपला धर्म आहे. राजा वाचला, सुखी झाला तर सर्व प्रजा सुखी होईल. तेव्हा सांगा. ते ब्रह्मफूल आणण्याची कोणाची तयारी आहे ?" मोठा मुलगा म्हणाला, 'माझी', दुसरा म्हणाला, 'माझी' आणि तिसराही म्हणाला, 'माझी तयारी आहे.' आई म्हणाली, "लेकरांनो, तुम्ही तिघेही जा. पण ब्रह्मझाडाचे ते फूल घेऊनच परत या. तोपर्यंत मात्र मला तुम्ही तोंड दाखवू नका."

आईच्या आज्ञेप्रमाणे ती तिघंही मुलं दुसरे दिवशी अगदी सकाळी त्या सात डोंगरांकडे निघाली. आईने हसतमुखानं त्यांना आशीर्वाद दिला.

मुलं शोध करीत करीत पूर्वेकडील त्या डोंगराच्या झऱ्यापाशी आली. त्यांना बेलाची तीन झाडे आढळली व मधल्या झाडाला टेकलेला तो दगड दिसला. मोठ्या भावानं तो दगड बाजूला सारला. तेव्हा चकाकणारा एक निळा मणी

त्यानं पाहिला. तो हाती घेताच बेलाच्या त्या झाडातून ध्वनी निघाला, “सांभाळ बरं, या मण्याचा दुरुपयोग करू नको. तुला एकट्यालाच डोंगरावर गेलं पाहिजे; आणि सूर्य मावळण्याच्या आधी पायथ्याशी परत आलं पाहिजे. चल पुढे जा.” ह्या आदेशाप्रमाणे मोठा भाऊ पुढे चालू लागला आणि त्याचे दोघे भाऊ घरी परत आले व आपल्या वडील भावाची आतुरतेने वाट पाहू लागले.

अंधार पडू लागला तरी वडील भाऊ परत येईना. आईनं दुसऱ्या मुलाला आज्ञा केली. तो त्या बेलाच्या झाडाजवळ गेला. त्यानं दगड बाजूला सारला. तोच निळा मणी हाती घेऊन तो पुढे निघाला. पण हा दुसराही भाऊ वडील भावाप्रमाणे रात्र पडली तरी परतला नाही. शेवटी पहाट होत आली. तेव्हा म्हातारी बाई छोट्या मुलाला म्हणाली, “बाळ, आता तू कुणाची वाट बघतोस ? चल तयारी कर.” या छोट्या मुलाने आंघोळ केली. देवपूजा केली. गाईला टिळा लावला आणि आईच्या चरणावर डोकं ठेवलं. आईनं त्याला आशीर्वाद दिला. मग तो त्या सात डोंगरांच्या वाटेला लागला. तो घरून तडक निघाला. त्याने इकडे तिकडे कुठंही पाहिलं नाही. सरळ त्या दगडाखालील मणी घेऊन व देवस्मरण करून तो डोंगर चढू लागला. त्याच्या डोळ्यासमोर आईनं स्वप्नात सांगितल्याप्रमाणं सोने, चांदी, हिरे, माणिक, मोती यांच्या राशी पडलेल्या होत्या. प्रत्येक झाड सोन्याचं होतं. त्याला हिरे, माणिक मोती लटकत असल्याचे दिसत होते. पण तो सरळ सरळच जात होता. वाटेत त्याला एक सुंदर भव्य दरवाजा लागला. तेथे एक रूपवान तरुण मुलगी शृंगार करून बसली होती. ती त्याला पाहून धावत पुढे आली व त्याला बिलगू लागली. परंतु तिच्याकडे न पाहाता, तिला जोरानं झिडकारून तो त्या दरवाजापुढील गुहेत शिरला. तिथंही त्याला अनेक सुंदर तरुणी मोह पाडू लागल्या, पण त्याने आपला सरळ मार्ग धरला. थोड्याच वेळात तो त्या मंदिराच्या पायथ्याजवळ आला. पायरीवर पाऊल ठेवताच सर्वत्र घंटानाद, शंखध्वनी होऊन त्याच्यावर पुष्पांचा वर्षाव झाला. मंदिरातील पुजारी हात जोडून सामोर आला. त्यानं मुलाला वंदन केलं, मुलगा त्या ब्रह्मवृक्षाखाली उभा झाला व त्याने विनम्रतेने

हात जोडले. तोच ब्रह्मझाडावरील ते एकुलते एक फूल त्याच्या ओंजळीत गळून पडले ! तेव्हा ब्रह्मवृक्ष म्हणाला, “मुला, तू फार भाग्यवान आहेस. तुझ्या घराण्यातील पुण्याईमुळे तुला मी माझं आवडतं फूल दिलं आहे. या फुलानं चमन नगरीचा राजा बरा होईल व त्याला पुत्रप्राप्तीही होईल. जा तुझं कल्याण होईल !” मुलगा ब्रह्मवृक्षाला प्रणाम करून परत जाणार तोच पुन्हा ब्रह्मवृक्ष म्हणाला, “मुला थांब. पुजारी तुला प्रसाद देईल तो जाताना घेऊन जा. तो प्रसाद तुझ्या गरीब व पवित्र आईचा आहे. या प्रसादानं तुझे दोघे पुण्यवान परंतु मोहाला बळी पडलेले भाऊ, जिवंत होतील. हे फूल तुला जाताना, दगड होऊन पडलेल्या तुझ्या भावाकडे घेऊन जाईल. त्यावर हा प्रसाद ठेव म्हणजे तुझी व त्यांची भेट होईल, जा मुला, जा. आणि सुखी हो.”

ब्रह्मफुलाच्या इच्छेप्रमाणे सर्व काही घडून आलं. त्याचे दोघे भाऊ जिवंत होऊन त्याला भेटले. मुलाने राजाला ते फूल देऊन त्याला दुःखातून मुक्त केलं. चमन नगरीत आनंदीआनंद झाला. राजा-राणी खूष होऊन त्या मुलाला छातीशी कवटाळून म्हणाले, “मुला, तू माझ्या पुत्रासारखाच आहेस. राणीनं जाहीर केल्याप्रमाणे चमन नगराचं सर्व राज्य घे व सुखानं राज्य कर.” तेव्हा मुलगा राजाला वंदन करून म्हणाला, “राजाधिराज, तुमचं राज्य तुम्हाला लखलाभ असो. मी कष्ट करूनच आपल्या तुटक्या पडक्या झोपडीत गरिबीनं आयुष्य भोगीन. आपला कृपालोभ असू द्या, म्हणजे झालं !”

इतक्यात पुन्हा आकाशवाणी झाली... “मुलाचा जयजयकार असो. त्याच्या पवित्र झोपडीत सदा पावित्र्य आणि पुण्य नांदो ! ...”

राजा-राणीनं आणि सर्व प्रजाजनांनी त्या मुलाला लवून प्रणाम केला. आणि ते ब्रह्मफूल त्याच्या डोक्यावर चमकू लागलं !

(ना. रा. शेंडे : लोकसाहित्यसंपदा)

# ७.३३ राजा वीरकेतू चोर आणि रत्नवती

त्रिविक्रमसेन राजा शिंशपवृक्षाकडे आला आणि वेताळाला पूर्वीप्रमाणेच खाद्यांवर घेऊन तो पुन्हा यायला निघाला. तेव्हा खाद्यांवरील शवातील वेताळ त्याला म्हणाला, 'हे महाराज, तू फार दमला असशील! म्हणून तुझे श्रमपरिहार करण्यासाठी मी एक कथा सांगतो. ती ऐक.'

'अयोध्या नावाची एक नगरी आहे. ही पूर्वी राक्षसकुलाचा संहार करणाऱ्या श्रीरामाची राजधानी होती. त्या नगरीत वीरकेतू नावाचा राजा होता. नगराभोवतीच्या तटामुळे नगराचे जसे संरक्षण होते, त्याप्रमाणे त्या महापराक्रमी राजाने पृथ्वीचे संरक्षण केले होते.

तो राजा अशा प्रकारे पृथ्वीचे राज्य करीत असताना त्या अयोध्यानगरीत रत्नदत्त नावाचा खूप श्रीमंत व्यापारी राहात होता. दैवतांची खूप आराधना केल्यानंतर त्याला त्याच्या नंदयती नावाच्या पत्नीपासून रत्नवती नावाची मुलगी झाली. रूपलावण्य, विनय वगैरे गुण स्वभावतःच असलेली ती कन्या आपल्या वडिलांच्या घरी वाढू लागली. ती तरुण झाल्यानंतर रत्नदत्ताकडे तिच्यासाठी मोठे मोठे व्यापारी आणि राजेलोकही याचना करू लागले; पण ती बद्धिमान तरुणी पुरुषांचा द्वेष करत असे! म्हणून ती इंद्राला देखील आपला पती बनवायला इच्छित नसे! तिच्या विवाहाची गोष्ट जर काढली तर ती प्राणत्याग करायला निघे! त्यामुळे तिचा प्रेमळ पिता दुःखी होऊन मुकाट्याने बसला आणि तिच्याविषयीचा हा प्रवाद अयोध्यानगरीभर पसरला.

दरम्यान, चोरांच्या संपत्तीच्या लुटालुटीमुळे त्रासलेले सर्व नागरिक राजा वीरकेतूकडे आले आणि त्यांनी निवेदन केले की, 'हे प्रभू! रोज रात्री आम्हाला चोर लुटतात व प्रयत्न करूनही ते आम्हाला दिसून येत नाहीत. तेव्हा या बाबतीत काय करावे ह्याचा निर्णय आपणच घ्यावा!'

नागरिकांनी अशी विनंती केली असता त्या राजाने चोरांना पकडण्यासाठी नगराच्या चारी बाजूंना रात्रीच्या वेळी गुप्त रक्षक पाठविले. पण त्यांना ते चोर सापडेनात. तेव्हा एकदा रात्री राजा स्वतःच हातात शस्त्र घेऊन गुप्तपणे व एकटाच नगरात फिरावयाला निघाला. तेव्हा तटाच्या मागच्या बाजूने जाणारा एक पुरुष त्याला दिसला. तो पुरुष संशयाने सारखा मागे वळून पाहात होता. जाताना पायांचा आवाज मुळीच करत नव्हता; आणि त्याचे डोळे चंचल आणि भयग्रस्त दिसत होते.

'माझ्या नगरात एकट्याने चोऱ्या करत असलेला हाच चोर असला पाहिजे.' असा तर्क करून राजाही त्याच्याजवळ गेला. राजाला पाहून त्या चोराने विचारले, 'तू कोण आहेस?' राजाने त्याला उत्तर दिले. 'मी चोर आहे!' हे ऐकताच तो चोर आनंदाने राजाला म्हणाला, 'तर मग तू माझा व्यवसायमित्रच आहेस! माझ्या घरी चल, म्हणजे मी तुझा पाहुणचार करतो.' ते ऐकून राजा 'तसेच करू या' असे म्हणाला आणि त्याच्या बरोबर अरण्यातील त्याच्या भूमिगत वसतिस्थानाकडे गेला.

भूमीत खोदलेले ते वसतिस्थान म्हणजे राजवाडाच होता. तेथे सर्व सुखोपभोग हजर होते. रत्नांच्या तेजामुळे ते गृह चमकत होते. ते जणू काय पाताळ-राज्यच होते! फक्त बळीराजा तेथे नव्हता इतकेच! तेथे प्रवेश करून त्याने राजाला एका आसनावर बसविले आणि तो चोर आतल्या बाजूला गेला.

इतक्यात एक दासी तेथे आली आणि राजाला म्हणाली, 'अरे महाभागा! हे केवळ मृत्यमुख आहे! तू येथे कसा आलास? हा चोर अंतर्गृहातून बाहेर आल्यावर पापाचरण करून तुझा वध करेल कारण तो विश्वासघातकी आहे. म्हणून तू लवकर येथून निघून जा.'

दासीचे हे बोलणे ऐकून राजा वीरकेतू तेथून निसटला आणि आपल्या राजधानीला पोहोचला.

तेथे पोहोचल्यावर त्याने रातोरात सैन्य जमविले आणि थोड्याच वेळात सैन्यासह जाऊन त्याने त्या चोराच्या भूमिगत निवासस्थानाला वेढा घातला.

आपल्याला घेरलेले पाहून तो चोर युद्धात मरण्याचे ठरवून युद्धासाठी बाहेर पडला. ढाल आणि तलवार घेऊन लढणाऱ्या त्या वीर चोराने एकट्यानेच हत्तीच्या सोंडा तोडल्या, घोड्यांचे पाय कापले आणि सैनिकांची डोकी छाटून टाकली! त्याने पुष्कळशा सैनिकांचा असा नाश केल्यानंतर राजाने स्वतः त्या चोरावर आक्रमण केले. खड्गविद्येत प्रवीण असलेल्या राजाने युक्तीने त्याच्या हातातील ढाल-तलवार उडवून टाकली व त्यास निःशस्त्र केले! नंतर स्वतःही निःशस्त्र होऊन, कुस्ती खेळून त्या चोराला जमिनीवर पाडले आणि जिवंत धरले. नंतर त्याला बांधून, त्याच्या सर्व धनासह नगरात नेले. सकाळी त्याला राजाज्ञेवरून सुळावर चढवण्याकरिता डंका वाजवत वध्यभूमीकडे नेत असता व्यापाऱ्याची मुलगी रत्नवतीने आपल्या प्रासादाच्या गच्चीवरून त्याला पाहिले. त्या चोराच्या अंगावर अनेक जखमा झाल्या होत्या आणि त्याचे शरीर धुळीने भरले होते. अशा परिस्थितीत त्या चोराला पाहताच आपल्या पित्याकडे जाऊन ती म्हणाली, 'बाबा, हा जो पुरुष वध्यभूमीकडे सुळावर चढवण्यासाठी नेला जात आहे त्यालाच मी माझा पती म्हणून मनाने वरले आहे! म्हणून राजाकडे जाऊन त्याचे प्राण वाचवा! नाही तर त्याच्या मागोमाग मीही प्राणत्याग करेन!'

हे ऐकून व्याकुळ झालेला तिचा पिता तिला म्हणाला, 'मुली तू हे काय बोलतेस! तू साक्षात राजांनाही पती म्हणून पसंत करत नव्हतीस आणि आता हा चोर पती म्हणून स्वीकारायला तयार झालीस? आणि तोही चोर कसा की, आता त्याला लवकरच सुळावर चढविणार आहेत असा! त्याला मी राजापासून कसा वाचवू शकेन?' अशा प्रकारे तिची हेटाळणी करून तिला हिताच्या गोष्टी सांगितल्या असताही तिने आपला हट्ट सोडला नाही. तेव्हा मुलीच्या प्रेमामुळे तो व्यापारी राजाकडे गेला आणि 'आपली सर्व संपत्ती घ्यावी व त्या बदली त्या चोराला मरणाच्या शिक्षेतून सोडावे,' अशी प्रार्थना करू लागला; परंतु राजाने स्वतःचे प्राण धोक्यात घालून त्याला पकडले होते व नागरिकांची खूप संपत्ती त्याने चोरली होती. म्हणून शंभर कोटी सुवर्णमुद्रांच्या मोबदल्यातही राजा

त्याला सोडण्यास तयार झाला नाही.

तेव्हा पिता अयशस्वी होऊन परत आल्यानंतर त्या हट्टी कन्येने चोराबरोबर सहगमन करण्याचे ठरविले. सर्व आप्तांनी तिची समजूत घातली असताही सती जाण्याच्या इच्छेने तिने स्नान केले व शिबिकेत बसून वध्यभूमीकडे जाण्यास निघाली. तिचे आईवडील व इतर आप्त बांधव रडत रडत तिच्यामागे निघाले ! अशा प्रकारे ती कन्या वध्यभूमीवर पोचत आहे तोच त्या चोराला वधकांनी सुळावर चढवले देखील! प्राण जाता जाता त्या चोराने आप्तजनांसह आलेल्या त्या कन्येला पाहिले. त्या सर्वांनी तिचा हट्ट व घडलेली सर्व हकिगत चोराला सांगितली. ते ऐकून त्या चोराच्या डोळ्यांतून काही क्षण अश्रू वाहू लागले व पुढल्याच क्षणी तो एकदम हसला! आणि काही क्षणांतच त्याने सुळावरच प्राण सोडला.

तेव्हा सुळावरून उतरवलेल्या त्या चोराच्या शवाला घेऊन ती पतिव्रता वैश्यकन्या चितेवर चढली.

तेव्हा स्मशानात राहणारा भगवान श्रीशंकर अदृश्य राहूनच आकाशातून तिला म्हणाला, 'हे पतिव्रते, तू स्वतः मनाने वरलेल्या ह्या पतीबद्दल जी दृढभक्ती दाखवलीस त्यामुळे मी संतुष्ट झालो आहे. म्हणून माझ्याकडून वर मागून घे.'

हे ऐकून तिने त्याला वंदन केले आणि वर देणाऱ्या त्या देवाकडे वर मागितला, 'हे भगवान! मुलगा नसलेल्या माझ्या बाबांना शंभर पुत्र होवोत! म्हणजे दुसरे अपत्य नसल्यामुळे माझ्या वियोगामुळे ते प्राणत्याग करणार नाहीत!'

तिने असा वर मागितला असता भगवान भैरव तिला म्हणाला, 'तुझ्या पित्याला शंभर पुत्र होतील. पण तू आणखी दुसरा वर माग. कारण तुझ्यासारख्या दृढनिश्चयी मुलीला एकच वर देणे मला योग्य वाटत नाही!'

हे ऐकून ती म्हणाली, 'देवा! आपण जर माझ्यावर इतके प्रसन्न झाला असाल तर हा माझा पती जिवंत होऊ दे आणि नेहमी धार्मिक राहू दे.'

तिचे हे शब्द ऐकताच भगवान श्रीशंकर अदृश्य राहून आकाशातूनच

म्हणाला, 'तसेच होईल. हा चोर अक्षत शरीराने जिवंत होईल व धार्मिक बनेल! राजा वीरकेतूही त्याच्यावर प्रसन्न होईल.'

श्रीशंकराच्या या आकाशवाणीनंतर चोर जखमा बऱ्या होऊन जिवंत होऊन उठला. तेव्हा पुत्र होण्याचा वर मिळालेला तो रत्नदत्त व्यापारी आपली मुलगी व जावई यांसह व आनंदित आप्तांसह घरी परत आला व त्याने मोठा आनंदोत्सव साजरा केला. हे सर्व वर्तमान राजाला कळाले व त्यालाही आनंद झाला. त्याने त्या श्रेष्ठ वीर असलेल्या चोराला आपल्या दरबारात बोलावले आणि त्याला आपले सेनापतीपद दिले.

त्यानेही चोरी करणे सोडून दिले आणि व्यापाऱ्याच्या कन्येबरोबर विवाह केला. त्यानंतर त्याने धर्ममार्गाचे पालन केले व रत्नवतीबरोबर तो सुखाने काल घालवू लागला.

अशी कथा सांगून आणि पूर्वी दिलेल्या शापाचे भय दाखवून वेताळ त्या राजाला म्हणाला, 'हे राजेन्द्रा! आई-बापांच्या बरोबर आलेल्या त्या वैश्य कन्येला पाहून सुळावर चढविलेला तो चोर प्रथम रडला आणि नंतर हसला. याचे कारण काय? राजाने उत्तर दिले, 'काही कारण नसता भावाप्रमाणे मदतीला धावून आलेल्या त्या व्यापाऱ्याच्या उपकारातून मला मुक्त होता येणार नाही, असे समजून त्या दुःखामुळे तो चोर प्रथम रडला आणि 'ही कन्या उत्तम राजांना सोडून माझ्यासारख्या चोरावर भाळली! हा काय चमत्कार आहे! खरोखर स्त्रियांचे मन अति विचित्र असते!' असा विचार मनात येऊन आश्चर्यचकित होऊन तो हसला!'

राजाचे हे उत्तर ऐकताच तो वेताळ राजाच्या खाद्यांवरून नाहीसा झाला व पुन्हा शिंशपवृक्षावर शवरूपाने लटकू लागला. राजाही त्याच्या मागोमाग शिंशपवृक्षाकडे त्याला आणायला जाऊ लागला.

(रा. चिं. ढेरे, ह. अ. भावे : वेताळ पंचविशी)




# मनुष्य स्वभावाच्या गोष्टी


८.१. संस्कार ८९५

८.२. हट्ट ८९८

८.३. सहवासाचे फळ ९०३

८.४. नवी दोस्ती ९०५

८.५. आळसाने गाठला कळस ९०८

८.६. वेंधळा नारायण जावई बनतो ९१०

८.७. आधण उत्रे जावई ९१६

८.८. गुंडोबा भटाची धूर्त पत्नी ९१८

८.९. पैशाचा लोभ ९२०

८.१०. अंधविश्वास ९२२

८.११. दान ९२४

८.१२. धन आणि जीवनगाणे ९२५

८.१३. एकाचे सुख दुस-याचे दुःख ९२७

८.१४. सर्वात मोठा कोण? ९२९

८.१५. बोबड्या मुलीची गोष्ट ९३१

८.१६. नटखटलाल ९३३

८.१७. चक्कीवाल्याच्या मुली ९३५

८.१८. बुरखेवाला ९४१

८.१९. पुटाक्का ९४८

८.२०. दाढीवाला कीर्तनकार ९५७

८.२१. मधुमती ९५८

८.२२. पसाटी ९५९

८.२३. कोटास जेवण ९६२

८.२४. लाकुडतोड्याची गोष्ट ९६६

८.२५. पैजेचा विडा ९६९

८.२६. तलवारीचा सैतान ९७६

८.२७. दोन भाऊ ९७७

८.२८. पंजाबचे भोजन ९७९

८.२९. धन्य आहात तुम्ही ९८०

८.३०. बडबडी बायको ९८२

८.३१. कष्टाचा रुपया ९८७

८.३२. मालक आणि नोकर ९९०

८.३३. तुझ्या नोकरीस हरलो ९९६

८.३४. तीन भाऊ ९९८

८.३५. मूर्ख मुलगा १००३

८.३६. स्पार्टाकस १००८

८.३७. कुरूप अली १०२०

८.३८. मित्राची निवड १०२८

८.३९. आळशी असतो चोराचा बाप १०३०

८.४०. शेखचिल्लीचा जन्म १०३६

८.४१. स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारणे १०३७

८.४२. तेलही गेले तूपही गेले १०३८

८.४३. शेखचिल्लीची लांब दाढी १०४१

# ८.१ संस्कार

(अहिराणी लोककथा)

एक लाकुडतोड्या होता. तो खूप गरीब होता. रोज जंगलात जायचा. सुकलेल्या झाडांची लाकडं तोडायचा. तोडण्यापूर्वी हात जोडून झाडांना नमस्कार करायचा आणि झाडाला विचारायचा, "बाबरे सुकून पार लाकूड झालंय, तोडू ?" झाडाने परवानगी दिली की तो आपली कुऱ्हाड चालवायचा. लाकुडतोड्याचे इतर मित्र त्याला हसायचे, "काय वेडा माणूस आहे, झाडं कधी बोलतात काय ?" त्याच्या मित्रांनी झाडाचा कधी विचार केलाच नाही. दिसेल ते झाड आडवे पाडायचे. भरमसाठ लाकडं गोळा करून पैसे कमवायचे ! त्यांचं हे कृत्य बघून लाकुडतोड्याला फार वाईट वाटायचं. त्यांच्या ह्या कृत्यामुळे जंगलातील अनेक पक्ष्यांचे खोपे मोडले होते. एकदा लाकुडतोडया जंगलात गेला तेव्हा बघतो तर काय ! कालपर्यंत अत्यंत डेरेदार असलेले अत्यंत हिरवेगार, डेरेदार आंब्याच्या झाडाचे तुकडे तुकडे केलेले. लाकुडतोड्याला हे दृश्य बघवेना. तो झाडाजवळ गेला. त्याला ओंजारले-गोंजारले आणि त्याच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले. "राजा, कोण्या पाप्याने तुझ्यावर एवढे घाव घातले रे !" एवढ्यात त्याचे लक्ष पोपटांच्या पिल्लांकडे गेले. झाडावरचा पोपटांचा थवा उडून गेला होता. खोपा मोडून पडला होता. त्यातील दोन कोवळी पिल्ले वाचलेली पाहून लाकुडतोड्या उठला; त्यांना अलगद आपल्या जवळ घेतले. भेदरलेले ते दोन जीव लाकुडतोड्याला बिलगले.

लाकुडतोड्याने दोघा पिल्लांना घरी आणलं. जिवा पलीकडे जपलं. आपण उपास काढून त्यांना भरवलं. वाढवलं. आता ते छान बोलू लागले.

एके दिवशी अगदी सकाळी-सकाळी एक भिक्षुक भिक्षा मागण्यासाठी लाकुडतोड्याच्या दारात उभा राहिला. आज लाकुडतोड्याजवळ भिक्षा वाढायला काहीच नव्हतं. तेव्हा नाईलाजाने त्या दोन पोपटांपैकी एका पोपटाला

त्याने ब्राह्मण भिक्षुकाला वाढले. पुन्हा काही दिवसातच असाच प्रसंग त्याच्यावर ओढवला. दाराशी एक फकीर भिक्षा मागण्यासाठी येतो. त्यालाही द्यायला घरात काहीच नव्हतं. तेव्हा दुसरा पोपट तो फकिराच्या झोळीत टाकतो. आता दोन्ही पोपटांचे पिंजरे रिकामे झाले होते.

ब्राह्मण भिक्षुकाकडे गेलेला पोपट अतिशय हुशार होता. ब्राह्मणाने शिकविलेले, दिलेले संस्कार त्याच्या बोलण्यातून पटकन उमटून येत. हा पोपट ब्राह्मणाकडे आलेल्या अतिथीचे स्वागत अतिशय अदबीने करत असे. येणारा अतिथी पोपटावर आणि त्याच्यावर झालेल्या संस्कारांचे तोंडभरून कौतुक करायचा.

मात्र फकिराकडे गेलेला पोपट अतिशय उद्धट होता. फकिराचीच भाषा, शिव्या तो शिकला होता. कोणीही मेहमान फकिराकडे आले रे आले की, पोपट त्याचे स्वागत शिव्यांनीच करायचा. त्यांना फार त्रासून सोडायचा. मेहमान कंटाळून निघून जायचे. तेव्हा फकीर आणि पोपट दोघेही हसायचे !

एकदा लाकुडतोड्याला वाटले; दोघा पोपटांना भेटून यावे. खूप दिवस झाले त्यांना बघून, कसे असतील ते ? त्यांना खायला व्यवस्थित देत असतील ना ? या विचाराने तो प्रथम ब्राह्मणाकडे येतो. ब्राह्मण भिक्षुकाकडे येताच पोपट त्याचे स्वागत करतो, "नमस्कार, मी आपले स्वागत करतो. कसे आहात, आपल्याला काही त्रास तर झाला नाही ना ? बसा बसा." येवढ्यात ब्राह्मण येतो. तो लाकुडतोड्याचे स्वागत करतो. त्याला जेवणाचा आग्रह करतो. पोपटाच्या आणि ब्राह्मण भिक्षुकाच्या प्रेमाने लाकुडतोड्या तृप्त होतो आणि समाधानाने मनातल्या मनात म्हणतो, "अगदी योग्य त्या व्यक्तीकडे आपण पोपटाला सोपविले."

आता दुसऱ्या पोपटाची खुशाली घेण्यासाठी तो फकिराकडे जातो. दारात पाय ठेवताच पोपट त्याला म्हणतो, "कौन हे रे साले, क्युं आया इधर ! भागता हे क्या दूं एक !" लाकुडतोड्या पोपटाचे संभाषण ऐकून दुःखी झाला. फकीर तर त्याला ओळखच दाखवायला तयार नव्हता. निराश होऊन लाकुडतोड्या

त्यांच्या घराच्या पायऱ्या उतरताना मनातल्या मनात म्हणतो, या व्यक्तीची पारख करायला आपण चुकलो. चूक पोपटाची नाही त्याच्यावर घडलेल्या संस्कारांची आहे. तसेच चूक त्याच्या इतर लाकुडतोडी करणाऱ्या मित्राचीही नाही. जे संस्कार आपल्याला बालपणी मिळाले. 'झाडांना जीव असतो' हा धडा माझ्याकडून बालपणीच गिरवल्यामुळे मी असा घडलो आणि 'पैशांसाठी निरपराध झाडांना मारा' हा धडा ज्यांनी गिरवला तो त्यांना मिळालेल्या संस्कारांमुळे ! शेवटी काय तर सगळा खेळ संस्कारांचाच ना !

(सुनंदा पाटील, ब्रेन टॉनिक मासिक, फेब्रुवारी २००७)

# ८.२ हट्ट

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. अरब देशात एक व्यापारी राहात होता. त्याला अशी सिद्धी प्राप्त झाली होती की ज्यामुळे त्याला पशु-पक्ष्यांची भाषा समजत असे. त्याचबरोबर असेही बंधन होते की जर त्याने हे गुपित कोणासमोर उघड केले तर त्याचा त्याचक्षणी मृत्यू होईल. म्हणून तो हे गुपित लपवून ठेवत असे आणि पशुपक्ष्यांच्या भाषेचा स्वतःसाठी फायदा करून घेत असे. त्याची बायको अत्यंत सुंदर होती. पण स्वभावाने हट्टी होती. तो व्यापारी श्रीमंत असल्यामुळे त्याच्या पशुशाळेत उंट, बैल, गाढव, कोंबड्या असे उपयोगी पशू होते.

एक दिवस तो व्यापारी आपल्या पशुशाळेचे निरीक्षण करीत असताना त्याने एका बैलाला गाढवाशी गप्पा मारताना ऐकले, "तुझी तर मजा आहे. तू काय दिवसभर लोळत राहतो पण कोणी काही म्हणत नाही. मस्त खातो आणि मजा करतो. मला पहा, सकाळपासून संध्याकाळपर्यंत सतत काम करावे लागते. पाठीवर ओझं वाहून, शेतात काम करून, गाडी खेचून, मार खाऊन, मी तर अगदी बेजार झालो आहे. खरं तर माझ्या मनात तुझ्याबद्दल ईर्ष्या निर्माण झाली आहे. तुला खायला मिळते आणि शिवाय दिवसभर आराम."

यावर गाढव म्हणाला, "हे तर आपलं भाग्य आहे. तू आपल्या मूर्खपणामुळे माणसांच्या वर्चस्वाखाली राहतो. जरा हिंमत दाखवशील तर माझ्यासारखं मजेत राहशील."

"मला या त्रासातून मुक्त होण्यासाठी काही उपाय तर सांग." बैल विनंती करत म्हणाला.

"का नाही बैलदादा." गाढव गर्वाने म्हणाला, "अत्यंत सोपा उपाय आहे. जेव्हा नोकर तुला शेतात नेण्यासाठी येईल तेव्हा त्याला शिंग मारून पिटाळून लाव. गवत वगैरे काहीच खाऊ नकोस. जमिनीवर पडून तोंडातून फेस काढ.

मग पहा तुला कोणीही कामावर नेणार नाही."

व्यापाऱ्याला त्या दोघांच्या गप्पा ऐकून मजा वाटली. त्याचवेळेस नोकर धावत धावत येऊन घाबरत म्हणाला, "शेठजी, विलक्षण घडलंय. बैल पाय झाडतो आणि शिंगाने मारत आहे. आम्हाला जवळपण येऊ देत नाही. जमिनीवर पडला आहे आणि त्याच्या तोंडातून फेस येत आहे. आजारी दिसतोय."

व्यापाऱ्याने लक्षपूर्वक त्याचे म्हणणे ऐकले आणि म्हणाला, "कदाचित बैल आजारी असेल. तुम्ही आज त्याला शेतावर नेऊ नका. आज गाढवाकडून शेतात नांगरणी करून घ्या. उद्या दुसरा बैल विकत आणू."

"पण गाढवावर नांगर?" एका सालदाराने विचारले. व्यापारी त्याला रागवून म्हणाला, "जास्त बोलू नकोस. मी सांगतोय तसे करा. दिवसभर या गाढवाकडून तितकेच काम करवून घ्या जितके बैल करतो."

मालकाच्या आदेशाप्रमाणे सालदारांनी गाढवावर नांगर जुंपला आणि दिवसभर त्याच्याकडून शेत नांगरून घेतले. त्याने कधी हे काम केले नव्हते. जर तो सुस्तावला तर मार पडत असे. तो विचार करू लागला असंच रोज काम करावं लागलं तर मी काही जिवंत राहणार नाही. यावर तो काही उपाय शोधू लागला.

संध्याकाळी तो व्यापारी आपल्या पशुशाळेत गेला. त्याला पूर्ण विश्वास होता की गाढव बैलाजवळ आपलं रडगाणं सांगत असेल. तेथे जाऊन त्याने पाहिले की गाढव बैलाला सांगत होता, "काय बैलदादा, कशी काय होती माझी युक्ती?"

"फारच चांगली, आता रोज सकाळी मी नोकरांना येताना पाहताच हीच युक्ती करीत जाईन आणि दिवसभर आरामाने बसून राहीन." बैलाने आनंद व्यक्त केला. हे ऐकून गाढव घाबरला. असं बैलाने रोज नाटक केलं तर त्यालाच त्रास सहन करावा लागेल म्हणून तो गंभीरतेने बैलाला म्हणाला, "अरे बैला, तू शेवटी बैलच राहशील... उद्या चुकूनही असं करू नकोस. नाहीतर तुला मरावं लागेल. आज जेव्हा मी शेतातून येत होतो तेव्हा मालक नोकरांना सांगात होते, जर उद्या

सकाळी बैल कामावर येऊ शकला नाही तर समजा की तो आता शेतीच्या कामासाठी उपयोगी नाही. त्याला कापून मांस तयार करा आणि नातेवाईकांना वाटून द्या आणि मग दुसरा बैल विकत आणा."

"बाप रे!" बैल ओरडला. "याचा अर्थ मला उद्यापासून शेतावर जायलाच हवं."

व्यापारी मनातल्या मनात गाढवाच्या अक्कल हुशारीची प्रशंसा करीत निघून गेला.

दुसऱ्या दिवशी तो व्यापारी आपल्या कुटुंबाबरोबर न्याहारी घेत होता. तेव्हाच नोकराने येऊन सांगितलं की बैल बरा झाला आहे. हे ऐकून व्यापारी समजून गेला की गाढवाने चतुराईने आपला त्रास वाचवून घेतला आहे. त्यामुळे तो जोर जोराने हसू लागला. त्याला अशाप्रकारे हसताना पाहून बायकोने विचारले, "इतके हसायला काय झाले?"

तो म्हणाला, "मी एक गुपित ऐकलं म्हणून मला इतकं हसू आलं."

त्याच्या बायकोला आश्चर्य वाटलं! तिनं विचारलं, "काय? असं कोणतं गुपित होतं? आम्हाला पण सांगा."

"नाही. ते गुपित मी कोणाला सांगू शकणार नाही."

"मला पण नाही?" बायकोने आश्चर्याने विचारलं.

"नाही, कोणालाच नाही. सांगितलं तर माझा तत्काळ मृत्यू होईल." व्यापारी म्हणाला.

पण त्याची बायको हट्टी होती. ती म्हणाली, "ते काहीही असो, जर तुम्ही मला हे गुपित सांगितलं नाही तर मी तुमच्याबरोबर मुळीच राहणार नाही आणि आपलं नातंही संपेल."

व्यापाऱ्याने बायकोला समजविण्याचा खूप प्रयत्न केला. पण ती मानावयास तयार नव्हती. शेवटी दुःखी होऊन व्यापारी म्हणाला, "पहा, मी तुला आधीच सांगितलं आहे की हे गुपित उघड केल्यास मला मृत्यू येईल. जर तू आपला हट्ट सोडत नसशील तर आपल्या आई - वडिलांना, नातेवाईकांना बोलावून घे

म्हणजे ते तुम्हा सर्वांची काळजी घेतील."

पत्नीने ती विधवा होईल, मुलं अनाथ होतील ही चिंता न करता आपल्या आई-वडिलांना, नातेवाईकांना तत्काळ बोलावून घेतले. त्यांनीही खूप प्रयत्न केला की तिने आपला हट्ट सोडावा परंतु त्यांना यश मिळाले नाही. व्यापारी दुःखी होऊन शेवटची प्रार्थना करण्यासाठी हातपाय धुण्यास विहिरीजवळ आला. तिथे त्याला कुत्रा आणि कोंबडा आपसात बोलताना ऐकू आले.

"कोंबड्या, तू किती निर्लज्ज आहेस. आज आपले मालक मरणार आहेत आणि तू आपल्या कोंबडीबरोबर मजा करीत आहेस. पहा आम्ही सारेजण किती दुःखी झालो आहोत. कुत्रा रागाने सांगत होता."

"रागावू नकोस मित्रा, खरंच मला आपल्या विलासी वृत्तीची लाज वाटत आहे. पण आमचे हे दयाळू, प्रेमळ मालक असे दुःखी होऊन मृत्यूपूर्वीची प्रार्थना करण्यास का तत्पर आहेत?" कोंबड्याने आतुरतेने विचारले.

"त्यांना देवाने कोणीतरी रहस्यमय शक्ती दिली आहे आणि जर त्याने ते गुपित कोणासमोर उघड केले तर त्याला तत्काळ मृत्यू येईल. इकडे त्याची बायको तर हट्ट धरून बसली आहे की मला ते गुपित सांगाच. आता तो बिचारा हे माहित असूनही की आपला मृत्यू निश्चित आहे, ते गुपित तिला सांगणार आहे." कुत्रा अत्यंत उदास होऊन म्हणाला.

"ही तर अत्यंत वाईट गोष्ट आहे.' कोंबडा गंभीरतेने म्हणाला, "पण आपला मालक पण किती मूर्ख आहे. खरंच इतक्या मूर्खाचा मृत्यू योग्य आहे. मला पहा मी पन्नास कोंबड्यांना सांभाळतो. प्रत्येक कोंबडी खूष असते माझ्यावर! कोणाचीही मजल आहे वर तोंड करून बोलायची? आणि आपले मालक एका बायकोला ताब्यात ठेवू शकत नाही."

"आता ते तरी काय करू शकतात?" कुत्रा म्हणाला.

"काय नाही करू शकत. जरा आपला पुरुषार्थ दाखवावा. थोडी अक्कल हुशारी दाखवावी." कोंबडा छाती फुगवून म्हणाला, "एक छडी घ्यावी आणि बायकोला बदडवून काढावे. की पुन्हा असा मूर्खासारखा हट्टीपणा करणार

नाही. मी तर असंच करतो. नाहीतर पन्नास कोंबड्या ताब्यात ठेवणे किती कठीण आहे. मी त्यांच्यावर प्रेम करतो आणि चुका झाल्यास शिक्षापण देतो. घरात आनंदाने रहावयाचे असेल तर असे करावेच लागते."

हा वार्तालाप ऐकताच व्यापाऱ्याचे डोळे उघडले. तो आतमध्ये जाऊन सर्वांसमोर बायकोला म्हणाला, "चल, एकांतात तुझ्याशी बोलावयाचे आहे आणि शेवटचा निरोप पण घ्यावयाचा आहे." ते खोलीत गेले. त्याने आतून दाराची कडी लावून घेतली आणि छडीने तिला बदडण्यास सुरुवात केली. शेवटी बायकोने आपला हट्टीपणा सोडला आणि त्यानंतर ते सर्वजण आनंदाने राहू लागले.

(देशोदेशीच्या लोककथा : डॉ. मनोहर सराफ)

# ८.३ सहवासाचे फळ

वाराणसीत एक श्रद्धावान उपासक राहात होता. एकदा काही कामानिमित्त जहाजातून परदेशी प्रवासास निघाला. त्याच जहाजातून गावातील न्हावी प्रवासास निघाला. न्हाव्याला जहाजापर्यंत सोडायला त्याची बायकोही आली होती. संत महापुरूषासारखे उपासक पाहून ती उपासकांना म्हणाली, "महाराज, माझे पती याच जहाजातून प्रवास करत आहेत, आपण प्रवासात त्यांची काळजी घ्यावी अशी मी आपल्याला नम्रपणे विनंती करते. "महाराजांनी वचन दिले की, "माते, माझ्याकडून शक्य होईल तितकी मदत मी निश्चित करेन, काळजी नसावी."

जहाजाचा प्रवास सुरू झाला. प्रवासाच्या आठव्या दिवशी मोठे वादळ झाले. त्या वादळात जहाजाचे तुकडे झाले. महाराजांनी जहाजाच्या एका फळीला घट्ट पकडले. न्हाव्यालाही फळीचा आधार घ्यायला सांगितले. फळीच्या सहाय्याने तरंगत तरंगत महाराज आणि न्हावी एका लहानशा बेटाच्या किनाऱ्यावर आले. बेटावर मिळतील ती कंदमुळे, फळे मिळवून महाराज आपली उपजीविका चालवू लागले. परंतु न्हाव्याला कंदमुळांसारखं निरस जेवण नकोस होतं. पोटाची भूक भागविण्यासाठी न्हावी परिसरातील पक्षी मारत असे आणि अग्नीवर भाजून ते जेवण जेवत असे.तो भाजलेले पक्ष्याचे मांस खाण्याचा आग्रह महाराजांना करी. जी कंदमुळे मिळतात ती मला पुरेशी आहेत असं म्हणून महाराजांनी जेवण जेवण्यास नकार दिला.

महाराजांचा संतुष्टपणा, पशु-पक्ष्यांवरील प्रेम आणि माणुसकीवरील श्रद्धा पाहून त्या बेटावरील नागराज प्रसन्न झाले आणि महाराजांना म्हणाले,"हे महान उपासका मी माझ्या देशाच्या होडीतून तुम्हाला तुमच्या गावी पोहोचवतो. "महाराजांनी प्रथम नागराजाचे आभार मानले. नागराजाच्या होडीत बसता

बसता न्हाव्यालाही आपल्या सोबत बोलावले. पण नागराज म्हणाले, "या दुष्ट माणसाला माझ्या होडीत बसता येणार नाही. पुण्यवान सत्कृत्य करणाऱ्या लोकांनाच मी मदत करतो." यावर महाराज म्हणाले, "हे नागराजा तो दुष्टकर्मी असला तरी तो माझ्यासोबतत आलेला आहे. त्यामुळे माझे जे काही पुण्य असेल त्यातला काही वाटा मी त्याला देऊ इच्छितो." नागराज आणि महाराजांचा संवाद न्हावी ऐकत होता. न्हावी कृतज्ञतापूर्वक महाराजांना म्हणाला, "महाराज तुमच्या सहवासाचे पुण्य मला लाभले आणि तुमच्या पुण्याचा वाटेकरी मला करून घेतले यासाठी मी आभारी आहे, आजपासून मी पुण्यवान काम करण्याचा प्रयत्न करीन."

नागराजाने न्हाव्याचे हे कृतज्ञतापूर्वक बोल ऐकून त्यालाही होडीत बसवून घेतले. समुद्रदेवतेने होडी वाहाण्याचे काम केले. नागराजाने दोघांनाही सुरक्षितपणे वाराणसीला आणून सोडले. उपासकांनी बेटावरील अनमोल रत्ने सोबत आणली होती. त्यातील न्हाव्याला दिली. समुद्रदेवता म्हणाली, "श्रद्धा, शील, त्याग, समर्पण हे गुण उपासकाजवळ असल्यामुळे नागराजांनी स्वतःची होडी बनवून त्यांना गावी आणून सोडले."

न्हावी उपासकाच्या सहवासात राहिला नसता तर समुद्रातच त्याचा अंत झाला असता, पण उपासकाच्या चांगल्या सहवासामुळे न्हाव्याचा जीव वाचला आणि रत्नरूपी धनाचाही लाभ झाला. म्हणूनच म्हणतात, *'सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो.'*

(ब्रेन टॉनिक मासिक, फेब्रुवारी २०१२)

# ८.४ नवी दोस्ती

कोणे एके काळी एका नगरीत 'बडी' नावाचा हुषार कुत्रा रहात होता. त्याचा मालक एक मोठा व्यापारी होता. मोठ्ठे घर, घराभोवती ऐसपैस अंगण, अंगणात पेरू, जांभूळ, आंबा अशी अनेक छोटी-मोठी झाडे होती. मालकाने या अंगणात बडीसाठी एक खास छोटेखानी 'डॉग-हाऊस' बांधले होते. मालकाप्रमाणेच बडीचेही चैनीचे दिवस होते. सकाळी उठल्यावर मालकाबरोबरच त्याचाही चहा-नाश्ता व्हायचा. संध्याकाळी त्याचा मालक आठवणीने त्याला उद्यानात फिरायला न्यायचा. या उद्यानाच्या हिरवळीवर बडीबरोबर त्याचा मालक बॉल खेळत असे. एके दिवशी त्यांचा बॉल खूप दूरवर फेकला गेला. बडी बॉल घेण्यासाठी उड्या मारीतच कुंपणाबाहेर धावला. मात्र कुंपणाच्या आत येण्याचा रस्ता विसरला. गोल गोल फेऱ्या मारीत तो रस्ता शोधत राहिला. त्याचा मालकही त्याला दिसेना आणि उद्यानापासून तो इतका दूर गेला की, त्याला ते उद्यानही सापडेना.

अंधार झाला. बडीला अगदी एकाकी, पोरके झाल्यासारखे वाटले. अखेर एका झाडाखाली त्याने बैठक मारली. त्याचवेळी एक तरुण मुलगा बॅटरी घेऊन चालला होता. बडीने भू भू करून त्याचे लक्ष वेधून घेतले. बडीने त्या मुलाला थेटच विचारले,

"दादा , मला आजच्या रात्री तुझ्या घरी राहू देशील का?"

तो मुलगा म्हणाला, "नाही रे बाबा, माझे घर अगदी छोटे आहे"

बडी म्हणाला, "घरात जागा नसेल तर मी बाहेर पायरीवर बसेन, आणि दिवस उगवला की माझा मी निघून जाईन."

मुलाला हा पर्याय योग्य वाटला. तो बडीला त्याच्या घरी घेऊन आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मुलाने बडीला विचारले, "आता जातोस ना?" बडी म्हणाला, "मी जातो; पण मला एक बॅग आणि बुट देतोस का?"

मुलाला हसू आले. तो घरात गेला आणि एक जुन्या बुटाचा जोड आणि एक बॅग बडीला दिली.

बडीने पायात बुट घातले, आणि तोंडात बॅग धरून चालू लागला. चालता चालता त्याला वाटेत हिरवेगार गवत दिसले, ते त्याने बॅगेत भरले आणि झाडाखाली विश्रांती घेत बसला. तेवढ्यात एक पांढरा शुभ्र ससा उड्या मारीत आला. सशाला मऊ लुसलुशीत गवताचा वास आला. गवताने भरलेली ती बॅग पाहून सशाला खूप आनंद झाला. गवत खाण्यासाठी तो थेट बॅगेतच घुसला. तेवढ्यात बडीने बॅगेला दोरी बांधून तिचे तोंड बंद केले. ससा बॅगेत अडकून पडला .

आता बडी रस्ता चालू लागला. वाटेत त्याला एक छोटेसे गाव लागले. त्या गावातल्या चौकात काही लहान मुले खेळत होती. बडी त्या मुलांमध्ये धुसला. मुले घाबरली. पण बडी म्हणाला, “मुलांनो घाबरू नका. मी तुमच्यासाठी एक गंमत आणली आहे.“ असे म्हणून बडीने बॅगेची दोरी सोडली. बॅगेतून सशाने टुणकन बाहेर उडी मारली. “ससा, ससा” म्हणत मुलांनी सशाभोवती फेर धरला.

“ससा ससा, दिसतोस कसा, कापूस पिंजून ठेवला जसा.“ मुले सशाशी खेळण्यात रमली.

या मुलांमध्ये ’हरी’ नावाचा एक मुलगा होता. त्याला आपल्या घरी एक पाळीव प्राणी असावा, असे खूप दिवसांपासून वाटत होते. सशाला सोबत घेऊन फिरणारा बडी त्याला खूप आवडला. त्याने बडीला विचारले,

“आमच्या घरी राहशील का?“

बडी प्रवास करून खूप दमला होता. त्याला कुठेतरी जेवायला-झोपायला जागा हवीच होती. बडीने लगेच हरीला आपली संमती सांगितली.

हरी बडीला घेऊन घरी आला. आईला म्हणाला, “आई, मला एक सोबती मिळाला आहे. याचे नाव ’बडी’ आहे. तो खूप प्रामाणिक आहे. आपण त्याला आपल्या घरी ठेवून घेऊ या. मला त्याची सोबतही होईल, आणि बडी आपल्या

घराची राखणही करील.“ आईलाही बडी खूपच आवडला. ती म्हणाली,

“ठीक आहे. ठेवून घे त्याला. पण मी त्याला घरात मात्र घेणार नाही. त्याला बाहेरच बाल्कनीत राहू देत.”

हरी खूष झाला. रात्र झाली होती. हरीने बडीला बसायला एक चादर दिली आणि एका ताटात पोळी वाढून आणली. बडी जेवला आणि चादरीवर झोपला.

पहाटेच्या सुमारास हरीचा दरवाजा वाजत असल्याचे बडीने ऐकले. कोणीतरी दार तोडत होते. बडी जोरजोरात भुंकू लागला. त्याने दरवाजाकडे झेप घेतली. बडीच्या आवाजाने बाबांना जाग आली. त्यांनी लाइट लावले. तेवढ्या वेळात चोरांनी पोबारा केला.

बडीच्या वडिलांनी दार उघडले. त्यांना दाराशी कुऱ्हाड, पकड अशी हत्यारे पडलेली दिसली. चोर पळाले त्या दिशेकडे तोंड करून बडीचे भुंकणे सुरूच होते. आता घरातले सगळेच जागे झाले होते. झाला प्रकार सगळ्यांच्या लक्षात आला. प्रत्येक जण बडीचा पाय घातात घेऊन त्याला “थॅंक्स बडी, थॅंक्स बडी” म्हणून त्याचे आभार मानीत होता. या प्रेमळ स्पर्शाने बडीचे डोळे पाणावले. तो विचार करीत होता, “हे सगळे लोक चांगले आहेत; पण तिकडे माझा मालक माझी वाट पहात असेल, त्याला आता कसे शोधायचे?“

हरीने बडीच्या मनातली घालमेल ओळखली. बडीला नक्कीच आपल्या घराची आठवण येत असणार. हरी बडीला म्हणाला,

“बडी, तू काळजी करू नकोस. आता तू हेच तुझे घर समजून रहा. माझी आई, तुझीही आई असेल.” हरीला या नव्या दोस्ताची भाषा समजत होती. तेवढ्यात हरीच्या आईनेही लगेचच बडीला जवळ घेतले, त्याच्या पाठीवरून मायेचा हात फिरवला. या थोपटण्यामुळे बडीच्या मनातला परकेपणाचा भाव कमी झाला, आणि या घरचाचा माणूस असल्यासारखे त्याने विश्वासाने घरात पाऊल टाकले.

(रमेश नारायण वरखेडे, ब्रेन टॉनिक मासिक, नोव्हेंबर २०१४)

# ८.५ आळसाने गाठला कळस

आळस! आळसही कधी कधी कळस गाठतो. खूप खूप प्राचीन काळी.. कृत युगात एक उंट होऊन गेला. उंटच तो, अतिशहाणा! त्याचीच ही मजेदार कथा. ह्या उंटाने पूर्वजन्मी पुण्यकर्म केले. पुण्य गाठीस जोडले. ह्या पुण्याईच्या बळावर मागील जन्मातील सर्वकाही त्यास आठवे. त्याला जपतप आठवले. या जन्मी देखील आपण जपतप का करू नये? आळस का झटकू नये? असे विचार त्याच्या डोक्यात येताच त्याने अनुष्ठान मांडले. अहोरात्र जप आणि कठोर तप आरंभले. ब्रह्मदेवाचा धावा केला. प्राण्यांच्या दुनियेत असा अनोखा चमत्कार घडला.

एक साधा उंट! पण केवढी तपस्या!! ब्रह्मदेवास मोठे नवल वाटले. जी गोष्ट माणसांनाही साधत नाही ती एका पशूला साधल्याने ब्रह्मदेवास प्रसन्नता लाभली. उंटावर ब्रह्मदेवाने प्रसन्न व्हावे हे स्वाभाविकच होते. ब्रह्मदेव झगझगाटात अवतीर्ण झाले आणि उंटास म्हणाले, 'हे पशूश्रेष्ठा! तू आपल्या कृतीने मला संतुष्ट केलेस. खरोखरच तू श्रेष्ठ आहेस. सांग? तुझी कोणती कामना पूर्ण करू?'

वाळवंटातील निरस वातावरणास तो कंटाळला होता. भगभगीत रेताडात भ्रमंती करून... पोटासाठी वणवण भटकून तो जेरीस आला होता. सावकाशपणे उंट म्हणाला, 'हेऽ देवा, संपूर्ण वाळवंटात सहजपणे पोहोचू शकेल अशी चारशे कोसांची लांब मान मला द्या!' तथास्तू म्हणून ब्रह्मदेव सुप्त झाले. उंट सुखावला.

आता एवढी मोठी लांब मान भेटल्यावर वाळूत भटकण्याची त्याला गरज नव्हती. भगभगीत वाळवंट आता तुडविण्यात काय मतलब असे मनात आल्यावर तो एकाच ठिकाणी बसून मान चारशे कोसांच्या परिसरात फिरवू लागला. चारा खावू लागला... हळूहळू आळसावला. शरीराने गलेलठ्ठ आणि

मेंदूने मठ्ठ झाला. दूर दूर अंतरावर मान टेकवून तो आता सुस्त झाला. आळसाने कळस गाठला.

एकदा काय झाले... खूप प्रचंड वादळ सुटले. चारा खाण्यासाठी उंटाची मान चारशे कोसांवर असतांना सुसाट पाऊस पडला. निसर्गाने रौद्ररूप धारण केले. वादळवाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी उंटाने आपली मान एका गुहेत घातली. वादळापासून बचाव झाला म्हणून उंट निर्धास्त बनला.

अशा त्या वादळवाऱ्यात निसर्गाचे तडाखे खात एक कोल्हा आपल्या बायकोसह आसरा शोधत होता. योगायोगाने ती गुहा त्यास दिसली. भुकेने व्याकुळ झालेला कोल्हा बायकोसह गुहेत घुसला. आंधळा मागतो एक डोळा नि देव देतो दोन अशी त्या दोघांची अवस्था झाली. त्या कोल्हा-कोल्हीने एका क्षणात त्या गलेलट्ठ उंटाच्या मानेवर झडप घातली. कचाकच लचके तोडण्यास सुरुवात केली आणि चारशे कोसावरील उंटाला याची जाणीव उशीरा झाली.

मान वाचविण्यासाठी उंटाने धडपड केली पण ती व्यर्थ ठरली. कोल्हा कोल्हीने त्या मानेचा पूर्ण फडशा पाडला... तृप्त होऊन ढेकर दिला. पण उंट मेला! आळसाने कळस गाठला, उंट बिचारा प्राणास मुकला!

# ८.६ वेंधळा नारायण जावई बनतो

(गोदाकाठच्या कथा)

( फार फार वर्षांपूर्वी खूप लहानपणी मुलांची लग्ने होत होती. अशा या किशोरवयातील मुलं दसरा-दिवाळीच्या निमित्ताने सासुरवाडीला गेली की, काहीशा अपरिचित नातलगांबरोबर कसे वागावे, काय करावे हे न कळल्यामुळे गोंधळून जात होती. त्यांच्या मजेशीर गोष्टी मराठी लोककथांमध्ये आढळतात. त्यातील काही गोष्टी पाहता येतील ).

एका गावातील नारायण नावाचा मुलगा त्याच्या लग्नानंतर पहिल्यांदाच बायकोच्या माहेरी म्हणजे सासुरवाडीला जाणार होता. आई-वडिलांनी आठ दिवस आधीपासून त्याची सगळी तयारी केली. नवे कपडे घेतले, तो छान दिसावा म्हणून न्हाव्याला त्याचे केस कापायला सांगितले, नव्या चपला घेतल्या, आई म्हणाली, `बाळ नारायणा, सासुरवाडीला लवून जा!' बालीशपणा किंवा भांडखोरपणा करू नकोस!, परंतु नारायणाला आईच्या सांगण्याचा उद्देश कळला नाही. आई लवून जा, म्हणाली याचा शब्दश: अर्थ घेत नारायण रस्त्याने चालू लागला. गावाबाहेर पडताच ज्वारीचे शेत लागले. ज्वारीच्या शेतातून लवून जात असताना (म्हणजे वाकून जात असताना) शेतकऱ्याला वाटले हा कणसे चोरायला आला आहे. शेतकऱ्याने त्याला पकडले आणि चार-पाच चापट्या लगावल्या, पाठीवर फटके मारल. हुसक हुसक करीत शेतातून बाहेर काढले. शेताच्या अगदी जवळच हरिण पकडण्यासाठी एका पारध्याने जाळे टाकले होते. जाळ्याच्या अगदी जवळ हरिण आले आणि हुसक हुसक असा आवाज आल्यामुळे हरिण पळून गेले. नारायण गाल चोळत चोळत चालत होता. पारध्याला वाटलं या मूर्ख माणसामुळेच आपली हातची शिकार पळाली. म्हणून पारध्याने नारायणाला पकडले आणि बेदम मारलं! बिचारा नारायण गयावया करीत पारध्याला म्हणाला, `अहो, मी काहीच केलं नाही, मला का मारता?

पारधी म्हणाला, `माझी हाती आलेली शिकार तू घालवली असंच पाहिजे तुला!' असं म्हणून पुन्हा चार-पाच रट्टे मारले. हात-पाय झाकून पुन्हा पुढची वाट चालू लागला. आणि स्वत:शीच पुटपुटत होता. `मी काहीच केलं नाही तरी म्हणतो, असंच पाहिजे' चालता चालता एका चिखलाच्या डबक्यात गाडीवाल्याच्या गाडीचे चाक अडकले होते. त्याचे प्रयत्नपूर्वक चाक काढण्याचे काम चालू होते. इतक्यात 'असचं पाहिजे, असचं पाहिजे' असे ऐकू आले. नारायण थोडा जवळ येताच गाडीवाल्याने नारायणाच्या पाठीत एक धपाटा लागावला. नारायण गाडीवाल्याला म्हणाला, `कशाला मारतोस?' काय केलं मी? गाडीवान म्हणाला, `माझी गाडी अडकली आहे, आणि तू म्हणतोस असंच पाहिजे! माझी फजिती पाहून तुला आनंद होतोयं का? असं म्हणून पुन्हा एक रट्टा मारला. मार खाऊन आणि चालून चालून नारायण खूपच दमला होता. पुन्हा रट्टा बसू नये म्हणून नारायण म्हणाला, `बाबा मी तुम्हाला हे गाडीचे चाक काढायला मदत करू का? गाडीवाल्याला मदतीची गरज होती. तो म्हणाला चल दोघे मिळून हे चाक काढू!' थोड्याच वेळात गाडीचे चाक चिखलातून बाहेर आले. परंतु नारायणाचे कपडे चिखलामुळे फारच खराब झाले होते. आतापर्यंतचे सर्व अनुभव घेतल्यानंतर नारायणा स्वत:शीच म्हणू लागला `कुणाच्याही बाबत असे कधी न होवो.'  इतक्यात तिकडून लग्नाचे वऱ्हाड येत होते. त्या वऱ्हाडातील एका माणसाने नारायणाचे `असे कधी न होवो` हे वाक्य ऐकले. आणि नारायणाला नवरदेवाच्या घोड्यासमोर आणून बेदम मार दिला. सगळ्याच्या हाता पाया पडत नारायण म्हणाला, 'की तुम्हाला काहीच बोललो नाही. तुमच्या सारखंच सगळ्यांचे होवो असं म्हणायचं होतं मला. तुम्ही चुकून काहीतरी ऐकलं असेल! माझ्यासह सगळ्यांना हे आनंदाचे दिवस येऊ देत ही माझी इच्छा आहे. सोडा मला!' वऱ्हाड पुढे निघून गेले. नारायण आता अगदी रडकुंडीला आला होता. देवाची प्रार्थना करीत तो म्हणाला, `हे देवा, सगळ्यांना असेच आनंदाचे दिवस येऊ दे!' हे ऐकले आणि पळतच तो नारायणाच्या दिशेने आला. नारायणाची मानगुटी पकडली आणि दोन थोबाडीत लगावल्या!

नारायण आता फारच गांगरला होता. काय बोलावे काही सुचत नव्हते. डोळ्याला हात लावून एका झाडाखाली बसला. समोर एक तळं दिसलं. तळयातल्या पाण्याने हात-पाय तोंड धुतले, ताजातवाना झाला. सगळा मार आणि थकवा विसरला. आणि आपण थोड्यात वेळात सासुरवाडीस पोहोचणार या कल्पनेने आनंदही झाला.

सासुरवाडीला पोहचताच सगळेजण आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागले. चिखलात मळलेले कपडे, सुजलेला चेहरा पाहताच सासऱ्यांना त्याने घडलेली हकिगत सांगितली. त्यांनी त्याला आंघोळीला गरम पाणी दिले.. सासूने गरम गरम जेवण वाढले. नारायणाला थोडी हुशारी वाटू लागली. थोड्याच वेळात अंथरुण-पांघरुण मिळताच नारायण निद्रादेवीच्या अधीन झाला.

दुसऱ्या दिवशी जावयाच्या आदरातिथ्यासाठी जेवणाचा उत्तम बेत करण्यात आला. जावई प्रथमच आलेला आहे म्हणून सासूने गुळाची काकवी काढली. स्वत: वाढायला आली. संकोचाने नारायण नाही नाही म्हणून पानावर हात आडवा करू लागला. वाढता वाढता चुकून एक थेंब नारायणाच्या बोटावर पडला! नारायणाने चाटून पाहिले त्याला फारच छान वाटले. परंतु पुन्हा मागता येईना! रात्री सगळे झोपल्यावर नारायण उठला. शिंक्यावरील काकवीचे मडके काढले परंतु तितक्यात मांजरीच्या म्याव म्याव आवाजाने नारायण दचकला आणि हातातील काकवीचे मडके खाली पडले. मडकेही फुटले आणि काकवीही सांडली. नारायण घाबरला, अंथरुणाकडे जाऊ लागताच काकवीवरून पाय सटकला आणि पडला. सगळे अंग काकवीने माखले. मांजर जोरात म्याव म्याव ओरडू लागली. घरातील सर्व माणसे गोळी झाली. नारायण लपण्यासाठी तसाच लोळत कापसाच्या ढिगाऱ्याकडे गेला. काकवीच्या चिकटपणामुळे सगळ्या अंगाला कापूस लटकला. अंधारात काहीतरी हलत आहे हे पाहून सासऱ्यांनी चिमणीचा दिवा आणला. उजेडात पाहतात तर जावईबापू कापसाने लडबडलेले, खोलीत काकवी सांडलेली, सासऱ्यांना हसू आले ते आपल्या बायकोला म्हणाले. `अहो. दुसरे काकवीचे मडके काढा.' जावईबापूंना काकवी

फारच आवडली आहे.' ओशाळलेला नारायण कसबसा बाहेर निघून गेला.

सकाळी सगळे न्याहारीला बसले. सासूबाईंनी गरम गरम धिरडे केले. जावईबापूंना आग्रह करून पोटभर धिरडे खायला घातले. नारायणालाही धिरडे खूप आवडले. बायकोला सोबत घेऊन आपल्या गावी परत आला. घरी येताच आई-वडिलांनी विचारले, `नारोबा, कसा झाला प्रवास?' सासुरवाडी कशी आहे?' नारायण काही न बोलता आपल्या कामाला लागला. आई-वडिलांना वाटले नारोबा लाजतो आहे! पण नारायणाची बायको तोंडाला पदर लावून गालातल्या गालात हसत होती! दोन-तीन दिवस झाल्यानंतर एके दिवशी नारोबा आपल्या बायकोला म्हणाला. `तुझ्या आईने बनविले होते ते कर, तिला काही कळत नव्हते की, नेमके काय हवे आहे! पाच-सहा वेळा सांगूनही बायकोला कळत नाही हे पाहून नारायणाचा तिसरा डोळा उघडला. प्रचंड राग आला. रागाच्या भरात नारायणाने बायकोच्या पाठीवर सात-आठ रट्टे मारले. बिचारीची पाठ फारच दुखत होती. सासूला म्हणाली, `बघा ना माझी पाठ कशी आहे?' सासूने पाहिले आणि म्हणाली `काय रे नारायणा, पाहिलंस का? बिचारीच्या पाठीचं अगदी धिरडं झालं आहे!' नारायणा लगेच म्हणाला, हं हेच कर म्हणत होतो मी!'

असा हा नारायण दुसऱ्यांदा सासुवाडीला निघाला, पहिल्या प्रवासात झालेल्या चुकांची दुरुस्ती करत सुखरूप पोहोचला. फार दिवसांनी जावई आलेला पाहून सासूला फार आनंद झाला. जावयाचं आगत-स्वागत करीत सासुबाई म्हणाल्या, कसा झाला प्रवास? प्रसन्न मुद्रेने जावई म्हणाला, 'अगदी उत्तम ! हवामानही चांगले असल्यामुळे फारसा त्रास वाटलाच नाही.' 'जरा आराम करा मी थोडसं फराळाचं घेऊन येते.' थोड्याच वेळात सासूबाई चिवडा घेऊन आल्या. इतक्यात नारायणाला आईचे बोलणे आठवले. आई म्हणाली होती की, कुणी काही खायला-प्यायला दिले तर प्रथम नको म्हणायचे. खूप आग्रह केल्यावरच खायचे! आईच्या सूचनेप्रमाणे नारायणाने मला फारशी भूक नाही मला आता नको म्हणाला. सासूबाईंनी चिवड्याची डीश नारायणाच्या

समोरच्या स्टुलवर ठेवली. आणि म्हणाल्या, चहा करून आणते. त्या आतल्या खोलीत जाताच नारायणाने आपल्या समोरच्या डीशमधील चिवड्याचा बकाणा भरला, इतक्यात सासरे आणि लहान मेहुणा आले. नारायणाला पाहून त्यांनाही खूप आनंद झाला. `केव्हा आलात ?' असे विचारताच नारायण काहीच बोलू शकला नाही. नारायणाचे दोन्ही गाल फुगलेले पाहून सासरे घाबरले. मेहुणा म्हणाला, `बाबा थांबा, कालच आमच्या गुरुजींनी आम्हाला सांगितले आहे की, `नाक दाबले की तोंड उघडते.' असे बोलून मेहुण्याने नारायणाचे नाक दाबताच नारायणाच्या तोंडातून सपकन चिवडा बाहेर पडला! इतक्यात सासूबाई चहा घेऊन आल्या. घरभर चिवडा पसरलेला पाहून काय घडले असेल याचा अंदाज सासूबाईंना आला. मागच्या वेळच्या काकवीची आठवण आली. गालातल्या गालात हसत त्या घरात गेल्या. आणि सगळ्यांसाठी पुन्हा चिवडा घेऊन आल्या. सासरेबुवा म्हणाले, नारायणराव अगदी मनमोकळेपणाने रहा. आपलचं घर समजा.' नारायणाने होकारार्थी मान हलवली!

एक दोन वर्षांनी पुन्हा दिवाळीसाठी नारायण सासुरवाडीला निघाला, आई म्हणाली, `नारोबा, आता तू मोठा माणूस झाला आहेस! सासुरवाडीला जरा रुबाबात रहात जा! आत्मविश्वासाने, ताठ, वजनदारपणे चालले म्हणजे तुझे चांगले वजन पडेल! आईच्या सांगण्याचा अगदी सरळ अर्थ असा होता की, बालीशपणा करू नकोस. प्रौढांसारखे वागत जा! परंतु नारायणाचे वय वाढले असले तरी परिपक्वता आली नव्हती. प्रत्येक गोष्टीचा शब्दश: अर्थ काढण्याची त्याची बालवृत्ती तशीच होती. म्हणूनच `वजनदार' चालण्यासाठी त्याने घरातील मोठा पाटा घेऊन सासुरवाडीच्या रस्त्याला लागला. वाटेत नारायणाला त्याचे मित्र भेटले. ते म्हणाले, अरे, पाटा घेऊन का चालतोस?' नारायण म्हणाला, `सासुरवाडीला वजनदारपणे गेलो तर माझे चांगले वजन पडेल!' नारायणाच्या बोलण्यावर त्याचे मित्र त्याला हसत होते. परंतु नारायणने दुर्लक्ष केले आणि चालत राहिला! काही वेळातच सासुरवाडीला पोहोचला!

सासूबाई अंगणातच उभ्या होत्या. त्यांनी नारायणाला विचारले, `पाटा का आणला?' तितक्यात नारायणाची बायको आली आणि म्हणाली, `अग आई आपल्याकडे मोठा पाटा नव्हता म्हणून आणला असेल?' तो काही बोलणार तितक्यात घाईघाईने बायको पाटा घ्यायच्या निमित्ताने पुढे आली. आणि हळूच म्हणाली, तोंड बंद ठेवायचे. काही बोलू नको!' आपल्या नवऱ्याच्या अनेक वेंधळ्या गोष्टी तिला माहीत होत्या. आपल्या आई-वडिलांसमोर त्याचा वेंधळेपणा ती नेहमीच सांभाळून घेत राहिली आणि नारायणाचा जावईपणाही तो निभावत राहिला!

अशा या नारायणाचा झाकली मूठ सव्वा लाखाची! बायकोने नेहमीच सांभाळली!

# ८.७ अधाण उत्रे जावई

एका छोट्या गावात एक सुखी कुटुंब रहात होते. (आई-वडील आणि राम-श्याम दोघे भाऊ) दोघे भाऊ बरोबरच शाळेत जात.मिळून मिसळून रहात होते. एकमेकांचा आदर करीत असत. दोघेही लहानाचे मोठे झाले. शिकले, नोकरीही करू लागले, मोठ्या भावाच्या लग्नानंतर धाकट्या भावाचेही लग्न झाले. परंपरेप्रमाणे धाकट्याची बायको पहिल्यांदाच माहेरी गेली . तिला आणण्याचे काम श्यामच्या वडिलांनी केले. दुस-यांदाही काही कारणांमुळे श्यामला वेळ नसल्यामुळे रामच्या मुलाने काकूला आणण्याचे काम हौसेने केले. जवळ जवळ एक वर्ष झालं तरी लग्नानंतर जावई भेटला नाही याची सासूबाईंना खंत वाटली. त्यामुळे तिसऱ्यांदा श्यामची बायको माहेरी आल्यानंतर सासूबाईंनी दमदाटी देणारा निरोप पाठविला. `जावई घ्यायला आले तरच मुलीला सासरी पाठवीन?' आई-वडील श्यामला म्हणाले, `श्याम यावेळी तू सासूरवाडीला जा आणि राधिकेला घेऊनच ये?' काहीही उत्तर न देता श्याम त्याचे काम करीत होता. काम करता करता श्यामने विचार केला रामला न घेता आपण एकटेच सासूरवाडीला जाणे योग्य होणार नाही. आजपर्यंत श्यामने रामशिवाय कुठलाही प्रवास केला नव्हता किंवा कुठली मौजमजाही केली नव्हती. त्यामुळे आता एकटे सासूरवाडीला कसे जावे हाच श्यामला प्रश्न पडला. खूप विचार केल्यानंतर श्यामने रामला सासूरवाडीतून राधिकेला घेऊन ये असा निरोप पाठविला. राम श्यामच्या सासूरवाडीला पोहोचला. लग्नाच्या गर्दीत जावयाला निरसे पाहिल्यामुळे रामलाच श्याम समजून सासूबाईंनी जावयाच्या सरबराईची तयारी सुरू केली. पंचपक्वांन्नाचा स्वयंपाक करण्याचे ठरले. शेवयांसाठी आधणही ठेवले गेले. दारामागे उभे राहून सासूबाई आनंदी सुरात म्हणाल्या, ‘किती निरोप पाठविले तेव्हा आपले आज येणे झाले. फार समाधान वाटले.’

रामला कुठलीही पार्श्वभूमी माहीत नसल्यामुळे राम सहज म्हणाला, `फार निरोप कुठले? एकच निरोप मिळाला आणि लगेच आलो!' सासूबाई फार हुशार होत्या. त्यांच्या लक्षात आले की, जावयाचा भाऊ आला आहे. त्यांनी लगेच स्वयंपाकघरात आदेश सोडला, `आधण उतरवा भाजी-भाकरी करायला घ्या. रामने श्यामच्या सासूबाईंचे बोलणे ऐकले आणि पाणीही न घेता लगेचच परत निघाला. गल्लीतले लोक आश्चर्याने पाहू लागले. (पाहुणा आत्ताच आला आणि लगेच परत कसे काय निघाले? म्हणून) काहिंनी कुतूहलाने, शंकेनेही विचारले, पाहुणे परत का निघाले, सासूबाईंप्रमाणेच रामही हुशार हजरजबाबी होता. राम म्हणाला, आम्ही आधण उत्रे जावई आहोत. खरा जावई पाठवितो. गावातील चर्चांमुळे सासूबाई खजील झाल्या!

# ८.८ गुंडोबा भटाची धूर्त पत्नी

(मराठवाड्यातील लोककथा)

एका गावात एक गुंडोबा ब्राह्मण रहात होता. या ब्राह्मण कुटुंबात रोज दुपारी एखाद्या अतिथी ब्राह्मणासोबत भोजन करण्याची पद्धत होती. या पद्धतीनुसार नित्यनेमाने गुंडोबा भट एका ब्राह्मणाला घरी सोबत घेऊन येत असे. ब्राह्मणाच्या बायकोला रोज एका माणसाचा जास्तीचा स्वयंपाक करावा लागत होता. या नित्यकामाचा तिला फार कंटाळा आला. एके दिवशी गुंडोबाने बायकोला सांगितले, `दुपारी नारायण कुलकर्णी आप्पा जेवायला येतील. त्यांना जरा वेळ पडवीत बसायला सांग. मी पूजा आटोपून लगेच परत येतो.' गुंडोबा ब्राह्मण पूजा सांगायला निघून गेला. गुंडोबाच्या बायकोने विचार केला की, ही बरी संधी आहे. आज जरा गंमतच करू या !

मध्यान्हाच्या वेळी कुलकर्णी आप्पा आले, गुंडोबाची बायको म्हणाली, `आप्पा तुम्ही आलात?' आप्पा म्हणाले, `हो, गुंडोबांनी जेवायला बोलावले.' नाही म्हणता येईना! आहेत ना गुंडोबा? गुंडोबाची बायको म्हणाली, `अहो, आप्पा, बरं झालं तुम्ही लवकर आलात!' माझा नवरा रोज एक अतिथी जेवायला बोलवतो. आणि त्या अतिथीला दोऱ्याने बांधून मुसळाने मारतो. अतिथी घाबरला, गुंडोबाची बायको म्हणाली, तुम्ही मागच्या दाराने पळ काढ मी बघते काय करायचे ते. घाबरलेला अतिथी मागच्या दाराने पळून गेला.

थोड्याच वेळात गुंडोबा भट घरी आले. बायको म्हणाली, `अहो, ते कुलकर्णी आप्पा आले होते. त्यांनी दावे आणि मुसळ मागितले मी नाही म्हणताच आपल्या वाटेने परत गेले. तुम्ही त्यांना काय सांगितले होते. गुंडोबा म्हणाले, `अग मी त्यांना जेवायला बोलावले होते. बायको म्हणाली, `अहो, ते आले आणि त्यांनी दावे-मुसळ मागितले. मी देणार नाही असे म्हणताच ते परत गेले. गुंडोबांना आपण आपला अतिथी धर्म महत्त्वाचा वाटला. आतापर्यंत भट

परिवारात कुणीही अतिथी विन्मुख गेलेला नव्हता. `अतिथी देवो भव:' अतिथी तृप्त समाधानी असणे हे कुटुंबाचं व्रत होतं. गुंडोबांना वाटले अतिथी नाराज होऊन परत गेले. त्यांना दावे-मुसळ देऊन परत आणलं पहिजे असा विचार करून गुंडोबांनी दावे-मुसळ घेतले आणि कुलकर्णी आप्पाच्या शोधासाठी घराबाहेर पडले. थोड्याच वेळात दूरवर अतिथी चालताना दिसताच गुंडोबांनी आप्पा, आप्पा अशा हाका मारल्या, कुलकर्णी आप्पांनी मागे वळून पाहिले आणि जोरात पळत सुटले. कुलकर्णी आप्पा पळताहेत आणि मागून दावे-मसुळ घेऊन गुंडोबाही पळतच राहिले.

# ८.९ पैशाचा लोभ

(राजस्थानची लोककथा)

श्रोत्यांनो, तुमचे सर्वांचे भाग्य उजळ होवो आणि तुमच्या मनातून दुसऱ्यांच्या पैशाबद्दल लोभ, मोह टळावा.....

तर एक व्यक्ती होती. त्याच्याजवळ खूप संपत्ती होती. पण त्याला मुलबाळ नव्हते. आणि बायको सतत आजारी असायची. आजार वाढला आणि एक दिवस तिचे निधन झाले.

त्याने दुसरे लग्न केले. देवकृपेने त्याच्या दुसऱ्या बायकोने एका मुलीस जन्म दिला. आता तो जास्त उत्साह आणि परिश्रम करून पैसा कमवू लागला.

परंतु प्रभुची माया तर विचित्र असतेच. तो सर्वांना कठपुतळी सारखा आपल्या बोटांनी नाचवित असतो. यावेळेस ती व्यक्ती स्वतः आजारी पडली. आता जगण्याची आशा पण क्षीण झाली. त्याच्याजवळ पैसा होता. बायको होती आणि मुलगी तर लहानच होती.

तो विचार करू लागला की जर त्याचा मृत्यू झाला तर त्याची बायको दुसरे लग्न करेल आणि सर्व संपत्ती घेऊन नवऱ्याकडे निघून जाईल. आणि त्याच्या मुलीचे आयुष्य दुःखी होईल.

हाच विचार सतत मनात घोळत असे. त्यामुळे तो रात्रंदिवस चिंता करीत असे. काय करावे ह्याच प्रश्नाने तो त्रासला होता. शेवटी त्याने आपल्या मित्राला बोलावून सांगितले, “मी माझ्याजवळील पैसा जमिनीत पुरून ठेवू इच्छितो. जेव्हा माझी मुलगी मोठी होईल तेव्हा तिला तो पैसा देशील. ऐक मित्रा, आमच्या दोघांच्यामध्ये प्रभु राम आहे. आणि काही दिवसानंतर त्या व्यक्तीचा मृत्यू झाला.”

पण त्याचा अंदाज खोटा ठरला. त्याच्या बायकोने दुसरे लग्न केले नाही. ती आपलं वैधव्य आपल्या मुलीच्या आधारावर काढू लागली.

पण काही काळानंतर मुलगी मोठी झाली. तिच्या वडिलांच्या मित्राने येऊन सांगितले, “तुझ्या वडिलांनी पैसा कुठे लपवून ठेवला आहे. हे मला माहीत आहे. आज रात्री तू कूदळ फावडा घेवून शेताजवळ ये.”

मुलगी रात्री तेथे गेली आणि म्हणाली, “काका चला.”

दोघेही शेतात पोहोचले. की अचानक तो रागाने त्या मुलीला चिडून म्हणाला, “तुझ्या वडिलांनी पैसा कुठे लपविला आहे मला माहीत नाही. तू तुझ्या मर्जीनुसार जमीन खोदत रहा. मी काही तुझा आणि तुझ्या बापाचा नोकर नाही की वेड्यासारखा रात्री फिरत बसू.”

ती बिचारी मुलगी रडत रडत घरी आली. असे तीन चार दिवस गेले.

आई आणि मुलगी दोघेही दुःखी झाल्या. तुझ्या काकांचा इरादा बदललेला दिसतोय. देवाची इच्छा.

राम भलं करो. त्याच गावात एक महात्मा आले. आई आणि तिची मुलगी त्यांना भेटावयास गेल्या आणि रडत रडत महात्माजींना घडलेला सर्व प्रसंग सांगितला.

महात्माजींनी काही वेळ विचार केला आणि सांगितले, “बेटी, त्या व्यक्तीचा इरादा खराब नाही. जिथं तो व्यक्ती उभा राहतो तिथेच पैसा गाडून ठेवला आहे. जेव्हा तो त्या जागेवर उभा राहतो तेव्हा त्याला पैशाचा उन्माद चढतो. तेव्हा तो स्वतः बोलत नसतो. तर पैशाचा मद बोलत असतो. पैसा पचविणे अत्यंत कठिण असते..... जा तो जेथे उभा होता. तेथील जमीन खोद.”

दोघींनी तेथील जमीन खोदली. खोदताच धन मिळाले. त्या पैशातून आईने आपल्या मुलीचे लग्न केले आणि शांतनेने भजनात मग्न होऊन आनंदाने जीवन जगू लागली.

# ८.१० अंधविश्वास

(मिथिलाची लोककथा)

नुकतेच लग्न झालेल्या आपल्या नवीन सूनेस सासूने पूजेसाठी मंदिरात चलण्यास सांगितलं. पण जेव्हा मंदिराच्या आवारात पोहचली तेव्हाच घाबरून सासूला बिलगली. सासूने कारण विचारलं तर तिने फाटकाजवळ दोन्ही बाजूला वरती सोंड केलेल्या हत्तीकडे बोट दाखवित म्हणाली, "मला हत्तीची फार भीती वाटते."

सासू म्हणाली, "अगं वेडे तो खरोखरचा हत्ती नाही. तर दगडाची मूर्ती आहे." आणि ती सूनेचा हात धरून पुढे गेली. ते जेव्हा सिंह द्वाराजवळ आले. ते पाहून सून पुन्हा घाबरून मागे सरकली. कारण समोर दाराच्या दोन्हीकडे तिला सिंह दिसले. तिच्या सासूने तिला पुन्हा समजवून सांगितले की हे खरोखरचे सिंह नाहीत. त्या हत्तीप्रमाणे हे पण दगडापासून बनविले आहेत. आणि तिने त्या मूर्तीच्या पाठीवर हात फिरवून सूनेचे समाधान केले. सून प्रसन्न होऊन आश्चर्याने त्या मूर्त्यांकडे पाहू लागली.

मंदिराच्या भव्यतेने ती आश्चर्यचकित झाली. तिने पाहिलं की मंदिरात चहुकडे प्रकाश पसरला आहे. धूप-दीप प्रज्वलित आहे. सर्व पुजारी मिळून एका काळ्या पाषाणाच्या स्तंभाची पूजा करीत आहेत. त्या पाषाणाच्या चहुकडे संगमरवराच्या फर्श्या आहेत. स्तंभावर दूध तूप ओतत आहेत. मोठ्या स्वरात स्तुतिगान सुरू आहे. घंट्याच्या आवाज ऐकू येत आहे. नक्कीच तो स्तंभ म्हणजे शिवलिंग आहे. सासूने सुनेला त्या शिवलिंगाची पूजा अर्चा करावयास सांगितले. पण ती म्हणाली, याची पूजा करून काय होईल. हे तर पाषाण आहे.

सूनेचे हे उत्तर ऐकून सासूला वाईट वाटले. तिने पुन्हा तिला सांगितले. परंतु सून म्हणाली, जेव्हा दारावरच्या हत्ती आणि सिंहद्वारावर असलेल्या सिंहात त्याचे कोणतेच गुण नाहीत. त्यांनी आपल्याला काहीच केले नाही. तर मग ह्या

दगडाच्या मूर्तीची पूजा करून काय होणार? मी पूजा करणार नाही आणि यावर माझा विश्वास पण नाही.

इतके सांगून ती माघारी फिरली. आणि मंदिराबाहेर आली. तिच्या सासू जवळ सूनेच्या प्रश्नाचे उत्तर नव्हते.

# ८.११ दान

(पाकिस्तानची लोककथा)

एका गावात एक श्रीमंत मनुष्य रहात होता. देव कृपेने त्याच्याजवळ संपत्ती होती. मनाने उदार होता. गावातील गरीबांची आणि गरजूंची उदार मनाने मदत करीत असे. एक दिवस एक भिकारी हातात भिक्षापात्र घेवून आला आणि त्या श्रीमंत माणसाला म्हणाला, "तुमच्याजवळ जे काही असेल मला द्या." त्या श्रीमंत माणसाने त्याला पैसे देण्याकरिता आपल्या खिशात हात टाकलाच होता की, तो भिकारी म्हणाला, "मला पाच रूपये हवे." तो श्रीमंत म्हणाला, "तू दुसऱ्याकडून पैसे दोन पैसे मागतो आणि माझ्याकडून पाच रूपये का?" भिकारी म्हणाला, "कारण तुम्ही संपत्तीचे शत्रू आहात."

श्रीमंत माणूस म्हणाला, "असं कसं होईल? मला देवाने संपत्ती दिली आहे आणि ती मी गरजू गरिबांना देतो."

भिकारी म्हणाला, "तुम्ही बरोबर सांगत आहात पण लक्ष्यात ठेवा सदाव्रत आणि उगीच खर्च करणे यात अंतर आहे. खर्च मिळकतीप्रमाणे करावा तर सदाव्रत टिकून राहते. तुम्ही उगीच खर्च करणारे सदाव्रती आहात?"

"तर तू पांच रूपये मागून मला उगीच खर्चात का टाकत आहेस?"

भिकारी म्हणाला. "मी दुसऱ्यांकडून पैसे दोन पैसे मागतो म्हणून त्यांच्याकडून रोज मागू शकेन. परंतु तुम्ही उगीच खर्च करता तेव्हा तुमची संपत्ती लवकरच संपेल आणि मग तुम्ही मला काही देऊ शकणार नाही म्हणून माझी इच्छा आहे की तुमच्याकडून आताच तितके रुपये मागून घ्यावे की पुन्हा मागावयास येणाची गरज राहणार नाही." त्या श्रीमंत माणसाने भिकाऱ्याच्या भिक्षा पात्रात पाच रूपये टाकले आणि भविष्यात उगीच व्यर्थ खर्च न करता काटकसरीने खर्च करावयाचे ठरविले.

(देशोदेशीच्या लोककथा : डॉ. मनोहर सराफ)

# ८.१२ धन आणि जीवनगाणे

(युक्रेनची लोककथा)

एका कुटुंबात पति-पत्नी आणि त्यांची मुले राहात होती. ते अत्यंत गरीब आणि दुःखी होते. लहानशा घरात एकत्र राहणे त्यांना कठीण झाले होते. पति-पत्नी रात्रंदिवस कष्ट करून ही त्यांना एकच वेळचे जेवण मिळत असे. इतका त्रास आणि गरिबी असूनही ते सर्व संध्याकाळी एकत्र येवून गोड गोड गाणी गात असत.

काही दिवसांनी अचानक पत्नीचे निधन झाले. त्यामुळे मुलं आणि पतीला अत्यंत दुःख झाले. आता ते सर्वजण निराशेची गाणी गाऊ लागली. त्यांच्या घराजवळच काही अंतरावर एक सावकार एक मोठ्या हवेलीत राहत होता. एकदा तो सावकार त्या गरीब माणसांकडे आला. तो पैशानी भरलेली पिशवी घेऊन आला होता. थैली त्याच्यासमोर ठेवून सावकार म्हणाला,

"तुम्हाला किती मुले आहेत!"

"दहा," त्याने उत्तर दिले

'ही तर जास्त मुले आहेत.' आश्चर्यचकित होऊन सावकार म्हणाला, "तुम्ही पैश्याने भरलेली ही थैली ठेवून घ्या आणि त्याच्या बदल्यात मला एक मुलगा द्या."

हे ऐकून त्या गरीब माणसाने आपल्या सर्व मुलांना जवळ बोलून विचारले, "हे सावकार तुमच्यापैकी एका मुलास घेण्यास आले आहे आणि त्या बदल्यात आपल्याला खूप पैसे मिळतील; ज्याची इच्छा असेल तो यांच्याबरोबर जाऊ शकतो. तेथे राहण्यास चांगली जागा, चांगले कपडे आणि खेळण्यासाठी खेळणी पण मिळतील."

हे ऐकून सर्व मुले रडू लागली. तेव्हा सावकार म्हणाला, "जाऊ द्या जशी तुमची मर्जी, परंतु तुम्ही सर्व गाणी म्हणता त्यामुळे मला झोप लागत नाही. तेव्हा

तुम्ही हे सर्व पैसे ठेवून घ्या; पण मला वचन द्या की आता तुम्ही गाणी म्हणणार नाही."

'ठीक आहे' त्या गरीब माणसाने आश्वासन दिले. तेथून सावकार आनंदाने घरी परतला.

त्या घरात काही दिवस शांतता राहिली. परंतु एक दिवस एक मुलगा अचानक गाणं गावू लागला. त्याचे गाणे इतके करूण होते की जवळ बसलेल्या सर्व भावांच्या डोळ्यातून आसवे वाहू लागली. हे पाहून तो गरीब माणूस त्या सावकाराच्या हवेलीत गेला आणि पैशांनी भरलेली ती पिशवी त्याच्यापुढे ठेवून म्हणाला, "आपण आपली पिशवी परत घ्या."

"का?" सावकाराने आश्चर्याने विचारले .

"कारण, न तर माझी मुले आणि न तर त्यांची गाणी बाजारातील वस्तू आहे. ज्यांना पैशाच्या बदल्यात विकत घेतले जाऊ शकते."

त्या दिवसानंतर त्या गरीब माणसाच्या घरी पुन्हा गाणी गायली जाऊ लागली. काही सुखाची काही दुःखाची. पण जर ती मुले भूकबळीने मेली नसती तर आजदेखील गातांना दिसली असती.

(देशोदेशीच्या लोककथा : डॉ. मनोहर सराफ)

# ८.१३ एकाचे सुख दुसऱ्याचे दुःख

(तापीकाठची लोककथा)

एक गाव होतं. तिथे एक धोबी आणि शेतकरी शेजारी शेजारी राहत होते. दोघांची आपसात भलतीच मैत्री. दोघांचे व्यवसाय पोटा-पाण्यापुरते व्यवस्थित चालत होते.

एकदा खूप पाऊस सुरू झाला. थांबायचं नावच घेईना. शेतकऱ्याची जमीन ओली-चिंब झाली. तो आभाळातल्या देवाला हात जोडून म्हणाला, "परमेश्वरा, उन्हाने रापलेली ही जमीन कधीची तहानलेली आहे. अजून थोडा पाऊस पडू दे. जमीन पाणी पिऊन तृप्त झाली की पेरलेला दाणा टराटर फुगून वर येईल. पिक चांगलं आलं की, चार पैसे हाती येतील अन् लेकरांच्या तोंडात घास पडेल."

इकडे धोबी सतत पडणाऱ्या पावसाने बेचैन झाला होता. त्यामुळे बारीक कपडेही वाळणं मुश्किल झालं होतं. नदीचं पाणी इतकं थंड, अगदी गाराच जणू! त्यामुळे कपडे धुण्याचं काम बंद होतं. त्यामुळे धोब्याची उपासमार होत होती. त्याने आभाळातल्या देवाला हात जोडले. म्हणाला, "किती अंत बघशील ! गेल्या तीन दिवसांपासून घरात दाणा नाही. पोरांच्या पोटात अन्न नाही. आता आणखी कोसळला तर आमचं कसं होईल ?"

इकडे देवाला संकट पडलं. काय करावं ? पाऊस पडला तर शेतकरी सुखी होतो आणि याच पावसामुळे धोब्याच्या कुटुंबावर मात्र संकट कोसळलं आहे. पडत्या पावसामुळे धोबी दुःखी झाला आहे. म्हणजेच एकाचं सुख ते दुसऱ्याचं दुःख झालं आहे.

त्याच गावात नवसाला पावणारा देव होता. शेतकरी भल्या पहाटेच उठला. स्नान केलं आणि मंदिराकडे निघाला. तो मनात विचार करत होता, "देवाला साकडं घालतो. यंदा पीक भरघोस यायला पाहिजे. त्यासाठी पाऊस पडायला पाहिजे."

योगायोगाने धोबीही त्याच मंदिरात जायला निघाला होता. मनात विचार करीत होता, “देवाला पाऊस थांबावा म्हणून नवस करतो. अजून दिवस-दोन दिवस पाऊस उघडला नाही तर ? उपाशी मरण्याची पाळी येईल !”

एवढ्यात मागून येणाऱ्या शेतकऱ्याने त्याला गाठलं. “राम राम धोबीदादा. सकाळी सकाळीच मंदिराची वाट धरली. काय मागायला निघाला ?”

धोबी निराश होऊन म्हणाला, “काय मागणार शेतकरीदादा ? बंगला का गाडी, जमीन का जुमला, पैसा का अडका ? काय मागणार ? देवाला विनंती करायला आलो, हा पडता पाऊस थांबव ! दादा आठ दिवस निघाले बिना धंद्याचे ! पोरांच्या पोटाला दोन दिवसापासून दाणा नाही. तेव्हा पाऊस थोडा उघडला तर बरं होईल. म्हणून विनंती करायला आलो देवाजवळ ! तुम्ही काय मागायला आलात दादा !” धोबी अत्यंत अदबीने शेतकऱ्याला विचारत होता.

त्यावर शेतकरी म्हणाला, “मी देवाला पाऊस मागायला आलो रे ! पावसावर आमचं जीवन. पाऊस पडला तर जमीन पिकेल. आमच्यासकट सगळ्यांना पोटात घालायला दाणेच लागतात. तेव्हा देवाला साकडं घालायला आलो होतो, आणिक थोडा पाऊस पडू दे.”

दोघं शेजारी, मित्र. पण दोघांच्या तक्रारी वेगळ्या, देवाजवळ मागणं वेगळं. दोघं मंदिरात एकाच वेळी प्रवेश करतात. पण शेतकऱ्याला आठवतो आपला मित्र, धोब्याचं कुटुंब. दोन दिवसापासून उपाशी होतं. तेव्हा तो देवाला विनंती करतो, “देवा, पाऊस दोन-चार दिवस उघडू दे. धोब्याचं म्हणणं ऐक.”

इकडे धोबी विचार करतो, “आपण किती स्वार्थी आहोत. आपला मित्र शेतात राबतो तो एकट्या स्वतःच्या कुटुंबासाठी नाही, तर सगळ्यांच्याच पोटा-पाण्यासाठी.” तेव्हा धोबी हात जोडून देवाला विनंती करतो, “देवबाप्पा माझं दुःख राहू दे. माझ्या मित्राचं म्हणणं ऐक.”

दोघा मित्रांचं एकमेकांवरचं प्रेम पाहून देव प्रसन्न होतो आणि चार दिवस पाऊस उघडतो. धोबी कामाला लागतो. परत मधून पावसाची रिमझिम सुरू होते. दोघं मित्र खूष होतात. कष्ट करतात आणि सुखाने नांदतात.

(सुनंदा पाटील, ब्रेन टॉनिक मासिक, ऑक्टो-नोव्हें. २००८)

# ८.१४ सर्वात मोठा कोण?

(तापीकाठच्या लोककथा)

कोणे एके काळी एका नगरात एक शक्तिशाली कोळीपुत्र रहात होता. या कोळी पुत्राला आपल्या शक्तीचा फार गर्व होता. माझ्या इतके शक्तिशाली या जगात कुणी नाही असे गर्वाने तो सगळ्यांना आव्हान करायचा. सगळीकडे बोलबाला झाला होता. त्याच्या या महान शक्तीचा. एका तळ्याकाठी फिरत असताना मगर म्हणाली, `ये कोळीपुत्रा, जरा जगभ्रमण कर म्हणजे तुझे गर्व हरण होण्यास फार वेळ लागणार नाही.' कोळीपुत्राने हे आव्हान स्वीकारले. आणि आपल्यापेक्षा शक्तिवान माणसाच्या शोधात भ्रमण यात्रेस निघाला. चालता चालता एका गावात अति जड लाकडी फळ्या उचलणारा सुतार दिसला. कोळीपुत्र मनात म्हणाला, `हे काम तर मी अगदी सहज करू शकतो,' असे म्हणत छाती फुगवून गावाबाहेर आला. तेथे एक मोळीविक्या दिसला. जंगलातील लाकडांची भली मोठी मोळी डोक्यावर घेऊन चालला होता. कोळीपुत्र म्हणाला, `हू. किती शुल्लक् काम करतो हा माणूस, थोडावेळ पुढे गेल्यावर एका मोठ्या मैदानावर दहा-पंधरा गाड्या ओढणारा माणूस दिसला.

कोळीपुत्र म्हणाला, मी तर यापेक्षा जास्त गाड्या ओढू शकतो. काही अंतरावर उभ्या असलेल्या एक शेतकरणीने हे ऐकले. कोळीपुत्राजवळ आली, आणि कोळीपुत्राला म्हणाली, काय रे मुला या सगळ्यांपेक्षा अधिक शक्तिशाली तूच आहे ना? गर्वाने फुगलेला कोळीपुत्र म्हणाला, `अर्थात! मीच सर्वात मोठा शक्तिशाली आहे.' शेतकरीण गालातल्या गालात हसली आणि म्हणाली, `तळहातावर या दहा गाड्या माझ्यासह उचलू शकतोस?' कोळीपुत्राने शेतकरणीचे आव्हान स्वीकारले, दीर्घ श्वास घेतला, शेतकरीण एका गाडीवर उभी राहिली. कोळीपुत्राने खूप प्रयत्न केला परंतु त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. शेतकरीण म्हणाली, आता तुझ्यासह मी तळहातावर या सगळ्यांना

उचलून दाखविते. तिने अगदी सहजपणे कोळीपुत्रासह सगळ्यांना सहजपणे उचलले. इतक्यात आकाशात एक घार उडत होती. तिने झटकन झडप घातली आणि शेतकरीण कोळीपुत्रासह सगळ्यांना एका दमात उचलले. सर्वांना खाऊन फस्त करायचे असा विचार करीत घार एका महालाच्या गच्चीवर उतरली. सगळ्यांसह खाली उतरल्यामुळे महालाला हादरा बसला. महालातील राणीने आपल्या केसांचा छताला आधार देत महालाचे हादरे थांबविले. गाड्या ओढणारा माणूस, सुतार, मोळीविक्या, शेतकरीण इ. चे श्रेष्ठत्व कोळीपुत्राला मनोमन पटले आणि शक्तिशाली घार तसचे राणीच्या केसांचे बळ पाहून कोळीपुत्र अचंबित झाला. सगळे कोळीपुत्राला म्हणाले, `शक्तिशाली युवका, निसर्गाने प्रत्येकाला कुठली ना कुठली शक्ती वरदान म्हणून दिली आहे. जसे हरिणाला चपळगती, बदकांना उडण्याची शक्ती, त्यामुळे अचानकपणे हल्ला झाल्यास, एखादे संकट आल्यावर आपले आपण रक्षण करण्यास समर्थ ठरतो. त्यामुळे कोणी कुणास श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरवायचे कारण नाही. किंवा गर्व मानण्याचेही कारण नाही. कोळीपुत्राचे गर्वहरण झाले आणि तो सर्व लोकांमध्ये मिळून मिसळून राहू लागला.!

(सुनंदा पाटील : तापीकाठच्या लोककथा)

# ८.१५ बोबड्या मुलींची गोष्ट

एक गावात एक किराणा दुकानदार होता. खाऊन-पिऊन सुखी होता. परंतु त्याला तीन मुली रूपवान व सुंदर होत्या. आणि तिघी बोबड्या होत्या. लहानपणी मुलींचं बोबडं बोलणं ही दुकानदाराला सुखावह वाटत होतं. हळूहळू मुली लहानाच्या मोठ्या झाल्या. मुलींची लग्न करावी या विचाराने मात्र रामभाऊ अस्वस्थ झाले. परंतु दुकानदाराची बायको राधिका हुशार होती. ती नवऱ्याला म्हणाली, `तुम्ही शेजारच्या गावी जा. तीन चांगले कामसू मुलगे शोधा. मी मुलींची तयारी करून घेते.' राधिकेच्या सांगण्याप्रमाणे रामभाऊ वर संशोधनासाठी जवळच्या एका गावात गेला. तीन चांगल्या कुटुंबातील हुशार मुलांची निवड केली. दुसऱ्या दिवशी त्या तिन्ही मुलांना त्यांच्या आई-वडिलांसह जेवणाचे निमंत्रण दिले. आणि घरी आला. राधिका मुलांना म्हणाली, `मुलींनो उद्या पाहुणे येणार आहेत; तुम्ही पाहुण्यांना चहा-पाणी द्या, जेवायला वाढा. परंतु काहीही बोलायचे नाही. गप्प राहयचं! जे काही सांगायचं असेल, बोलायचं असेल ते आम्ही दोघे बोलू!' मुलींनी होकारार्थी माना हलवल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठल्या. नटला-थटल्या! राधिकेला वरण-भात, बटाटयाची भाजी, कढी, पापड, पोळया आणि शिरा असा उत्तम जेवणाचा बेत केला.

ठरल्याप्रमाणे पाहुण्यांचे आगमन झाले. रामभाऊंनी सगळ्यांचे स्वागत केले. प्रथम चहा-पाणी दिले. एकेका मुलींचा परिचय करून दिला. मुली सुंदर असल्यामुळे सगळ्यांची पसंती झाली आहे, असे रामभाऊला वाटले. जेवणाची वेळ होताच केळीच्या पानांभोवती मुलींनी सुंदर रांगोळ्या काढल्या. उदबत्तीच्या सुवासाने घरात प्रसन्न मंगलमय वातावरण निर्माण झाले. पाहुणे जेवायला बसले. सुग्रास भोजनाने पाहुणेही प्रसन्न-तृप्त झाले. जेवणानंतर

मुखशुद्धीचा आस्वाद घेता घेता एक पाहुणा म्हणाला, `मुलींनो इकडे या, जेवण उत्तम बनविले होते. यात कोणी कोणता पदार्थ केला होता ते सांगा बरे! मुली आईच्या सुचनांचे पालन करीत खाली मान घालून उभ्या होत्या ! क्षणाचाही विलंब न करता रामाभाऊ म्हणाले, `अहो, आमच्या मुली जरा बुजऱ्या आहेत. कुणासमोर त्या पटकन बोलत नाहीत.' दुसरा पाहुणा म्हणाला, `मुलींनो, या सर्व जेवणात कढी फार उत्तम झाली होती. कुणी बनवली, कशी बनवली सांगा पाहू?' धाकटी मुलगी झटकन म्हणाली, `हिंग जिलं अन कढी गोय हुय,' मधली धाकटीला म्हणाली, 'कशा' या वाक्य बोल, मधली म्हणाली, `ती बोय्य तू कशाचा बोय्य,' तिन्ही मुलींचे बोबडे बोल ऐकताच पाहुण्यांनी पळ काढला!

# ८.१६ नटखटलाल

सुटीचा दिवस होता. नटखटलालला प्रश्न पडला आता काय करावे? घराबाहेर आल्यावर आपल्या पांढरा घोडा बघताच आईला म्हणाला,"आई, नानाआजोबांकडे जाऊन येतो."आईला वाटलं फिरून आला तर बरं होईल, नटखटलालचा वेळही जाईल. तरीही त्याला समजावलं,"जातोस तर जा, पण तिकडे कुणाला त्रास देऊ नको. ताटात जे वाढतील ते सर्व संपव. हट्ट करू नकोस!"

आपल्या पांढऱ्या घोड्यावर बसून 'चल घोड्या' म्हणत आजोबांच्या घरी नटखटलाल पोहोचला. नटखटलालला पाहून आजोबांना खूप आनंद झाला, त्याला छातीशी कवटाळून गोड पापी घेतली. बागेतून छान फिरवून आणलं. घरात येताच आजीने जेवायला वाढलं. जेवता जेवता आजोबांच्या ताटात, आपल्या ताटात नसलेला एक पदार्थ दिसला. आणि तेच आपल्याला पाहिजे असा हट्ट धरून बसला. शेवटी अजोबा म्हणाले,"एक घास खाऊन बघ."एक घास घेताच त्याला तो खूप आवडला. चविष्ट होता. आजीला विचारलं,"आजी या पदार्थाला काय म्हणतात गं?"आजीने सांगितलं, "याला खिचडी म्हणतात."

नटखटलालने ठरवलं घरी गेल्याबरोबर आईला खिचडी करायला सांगायचं.

खिचडी, खिचडी असा शब्द घोळवतं मोठ्या आनंदाने आपल्या घरी परत निघाला. आजोबांचा निरोप घेऊन घराबाहेर येऊन पाहतो, तर पांढरा घोडा निघून गेला होता. त्यामुळे त्याला पायी चालणे भाग होते. चालता, चालता खिचडी खिचडी असे तोंडाने पुटपुटत होता. थोड्याच वेळात नकळतपणे खिचडीच्या ऐवजी खाचिडी, खाचिडी असं पुटपुटू लागला. रस्त्याच्या बाजूला शेतात काम करणाऱ्या शेतकरणीने त्याचं खाचिडी, खाचिडी ऐकलं आणि

ओरडली, "ए बाबा, खाचिडी, खाचिडी  का बरळतोस? पुढच्या शेतातल्या लोकांनी ऐकलं तर तुझं भरीत करतील. मोठ्या कष्टाने शेतात धन्य पिकवतात ते आणि तू ते पक्ष्यांनी खावं असं का म्हणतोस? "नटखटलाल घाबराघुबरा झाला. त्या शेतकरणीलाच त्याने विचारले, "मग मी काय म्हणू?" ती म्हणाली, "अरे बाबा, उडचिडी, उडचिडी म्हण!"

उडचिडी, उडचिडी असं जोरजोरात म्हणत नटखटलाल घराकडे चालत होता. वाटेत एका जाळ्यात तांदळाचे दाणे टाकून चिमण्यांची वाट पहात असलेला म्हातारा दिसला. म्हातारा डोळे मोठे करून नटखटलालकडे पाहू लागला. आपली काहीतरी चूक होते आहे हे लक्षात येताच नटखटलाल गप्प झाला. म्हातारा जोरात ओरडला,"अरे वेड्या तुला दिसत नाही का चिमण्यांसाठी मी तांदळाचे दाणे टाकत आहे आणि तू  उडचिडी, उडचिडी ओरडत चालला आहेस. कशा येतील येथे चिमण्या? चल चालता हो इथून." म्हाताऱ्याच्या बोलण्यानंतर नटखटलाल एकदम गप्प होऊन चालत राहिला, थोडासा भांबावला. काय बोलावं तेच सुचेनासं झालं. या सगळ्या गोंधळात आपल्या आवडीच्या पदार्थाचं नावच विसरला. थकला भागलेला नटखटलाल नाराज मनानेच घरात शिरला.

घरात शिरता शिरताच खूप छान पदार्थ शिजवल्याचा वास आला. धावत धावत स्वयंपाक घरात गेला. एका मोठ्या भांड्यात काहीतरी शिजतं होतं. नटखटलालने जिज्ञासेने स्वयंपाकी काकांना विचारले, "काका आज काय बनवत आहात?"

महाराज म्हणाले, "बेटा आज जरा उशीर झाला, म्हणून पटकन खिचडी बनविली. "खिचडीचं नाव ऐकताच नटखटलालच्या तोंडाला पाणी सुटलं आणि लगेच थकवाही दूर झाला.

(ब्रेन टॉनिक मासिक, फेब्रुवारी २०१२)

# ८.१७ चक्कीवाल्याच्या मुली

(पोलंडची लोककथा)

पोलंडमधील विस्तुला नदीच्या काठी एक छोटेसे खेडे होते. त्या खेड्यात एक चक्कीवाला रहायचा. त्याला तीन मुली होत्या. थोरली मगदा, मधली विओला आणि धाकटी वंदा. आपल्या मुलींनी खूप शिकावं, पुस्तकं वाचावीत असं त्याला वाटायचं. पण त्याच्याकडे तिन्ही मुलींना द्यायला पुस्तकांचे तीन संच नव्हते. एकीला दिला तर दोघी तिचा मत्सर करतील. घरात तंटा नको म्हणून त्याने मुलींना शिकवण्याची कल्पना सोडून दिली.

एके दिवशी त्याच्या गिरणीवर एक भुकेली बाई आली आणि ती त्याच्याकडे काहीतरी खायला मागू लागली. चक्कीवाल्याला त्या भुकेल्या बाईची दया आली. त्याने तिला आपल्या घरी नेले. शेकोटीजवळ बसवून तिला ऊब दिली. त्यानंतर पाटावर बसवून सन्मानाने जेवू घातले.

जेवता-जेवता त्या बाईचं लक्ष घरातल्या एकुलत्या एक पुस्तकांच्या संचाकडे गेलं. तिने त्यातलं एक पुस्तक ओढून घेतलं आणि जेवता-जेवताच ती पुस्तक वाचू लागली. चक्कीवाल्याला या वाचणाऱ्या बाईकडे पाहून एक कल्पना सुचली. त्यासरशी तो त्या बाईला म्हणाला, “ताई, तू माझ्या मुलींना लिहा-वाचायला शिकवशील का? मी तुझी इथे रहाण्या-जेवण्याची सर्व व्यवस्था करतो, त्याची काळजी करू नकोस, पण तू माझी एवढी इच्छा पूर्ण कर.”

बाईने हसून स्मित केले आणि म्हणाली, “मला त्यांना शिकवायला आवडेल. नाहीतरी जेव्हा माझी परिस्थिती चांगली होती, त्या काळात मी शिकवायचेच काम करायचे.”

ठरल्याप्रमाणे मुलींना वाचायला शिकवायचे तिने नक्की केले. दुसऱ्या दिवशी थोरली मुलगी मगदा हिच्यापासून सुरुवात करायचे तिने ठरवले. तशी

मगदाला आधीच कल्पना दिली. दुसऱ्या दिवशी शिकवणीची वेळ झाली, पण मगदा आलीच नाही. मगदाला लिहिण्या-वाचण्यापेक्षा नव-नवे कपडे घालण्याचा, नटण्या-मुरडण्याचा शौक होता. आपल्याला एखादा देखणा नवरा मिळावा, एवढीच तिची महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळे नटून थटून सारखं आरशासमोर उभं रहायचं, एवढाच तिचा छंद होता. आजही छानशी हॅट घेण्यासाठी ती सकाळपासून बाजारात गेली होती. शिकवणीची वेळ टळून गेली, तरी ती आलीच नाही. वाट पाहून मास्तरीणबाई थकल्या.

नंतरच्या दिवशी मधल्या विओलाची वेळ होती. पण विओलालाही पुस्तकांमध्ये मुळीच रस नव्हता. तिला नाच-गाण्याची आवड होती. त्या दिवशी शेजारच्या गावात गाण्याचा कार्यक्रम होता, त्याला ती निघून गेली. मास्तरीणबाई वाट पाहून थकल्या.

तिसऱ्या दिवशी छोट्या वंदाची पाळी होती. आज मात्र मास्तरीणबाईंना वाट पहावी लागली नाही. वंदा तत्परतेने शिकवणीला हजर झाली. तिच्या बिछान्यात तीन कातडी बांधणीची पुस्तकं होती. रोज रात्री या पुस्तकांच्या बाईंडींगच्या कातड्याचा वास घेण्याचा तिचा छंद होता. पुस्तकाचा वास घेता-घेता ती कागद उलटवायची, चित्रं पहायची आणि अक्षरांमागे दडलेल्या अर्थाचा माग काढायचा प्रयत्न करायची.

शिकवणी संपल्याबरोबर वंदा धावतच तिच्या बापाकडे गेली. मोठ्या आत्मविश्वासाने ती वाचू लागली, “धडा पहिला.” हे ऐकून बापाच्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहिले. पुढे दररोज नित्यनेमाने वंदा शिकलेला धडा बापाला वाचून दाखवू लागली. मगदा आणि विओला मात्र काही ना काही सबब सांगून शिकवणीला दांडी मारायच्या. वंदा मात्र पुस्तक वाचण्यात पारंगत झाली.

एके दिवशी एक श्रीमंत माणूस गावात आला. आपल्याला चांगली बायको शोधण्यासाठी तो या गावात आला असल्याची गावभर कुजबूज सुरू होती. मगदाने ही वार्ता ऐकली आणि तिने या श्रीमंताचे आपल्याकडे लक्ष वेधून

घेण्याची शक्कल लढवली. तिच्याकडचा सगळ्यात सुंदर झगा परिधान करून ती रस्त्यावर आली, आणि चक्क त्याच्या समोर उडी मारून पडल्याचे नाटक केले. पहाताक्षणी श्रीमंत महोदय तिच्या प्रेमात पडले आणि त्याने चक्कीवाल्याकडे त्या मुलीसाठी लग्नाची मागणी घातली. चक्कीवाला आपल्या थोरल्या मुलीसाठी वर शोधतच होता. त्यामुळे श्रीमंत महोदयाच्या मागणीला त्याने तत्काळ संमती दिली. मगदाला हवा तसा देखणा, श्रीमंत नवरा मिळाला.

पण दुर्दैवाने हा श्रीमंत माणूस जसा दिसायचा तसा नव्हता. तो श्रीमंतही नव्हता आणि सज्जनही नव्हता. तो एक मायावी जादूगार होता.

लग्न होताच मगदा सासरी गेली. तिच्या श्रीमंत नवऱ्याच्या महालात आली. त्या महालातले वैभव पाहून ती दिपून गेली. महालाच्या दालना-दालनातून ती हिंडू लागली. प्रत्येक दालनात उंची कपडे, संगीताची वाद्ये आणि पुस्तके मांडून ठेवलेली होती. मगदा अगदी हरखून गेली.

जादूगार मगदाला म्हणाला, “लाडके, तुला हवे ते पोषाख घालून पहा. इथे नटण्या-मुरडण्याची तुला मोकळीक आहे. मला कामधंद्यासाठी शेजारच्या गावात जावे लागणार आहे, तोपर्यंत तू या महालातल्या वस्तूंचा लाभ घे. मनमुराद सर्व दालनांतून फिर. फक्त त्या शेवटच्या छोट्या खोलीकडे जाऊ नको. एवढी दक्षता घे आणि आनंदाने रहा!”

जादूगार बाहेर पडल्यावर मगदा महालात मुक्तपणे हिंडू लागली. एकेक करून नवे कपडे परिधान करून आरशासमोर उभी राहून स्वत:कडे पाहू लागली. पण असे ती किती वेळ करणार होती? अखेर तिला या चैनीच्या गोष्टींचाही कंटाळा आला. त्या शेवटच्या खोलीत काय असेल बरे? आपल्याला त्या खोलीकडे जाऊ नको असे नवऱ्याने का बरे बजावले असेल? तिच्या मनात आता त्या खोलीबद्दलचे कुतुहल जागे झाले. आपण त्या खोलीत डोकावून पहायला काय हरकत आहे? असे विचार मनात येताच ती खोलीच्या दिशेने चालू लागली. हलकेच तिने दाराची कडी काढली.

दार किलकिले उघडल्याबरोबर आतून एक केसाळ हात बाहेर आला आणि त्याच्या मजबूत पंजाने मगदाला खोलीत खेचून घेतले. मगदाची घाबरून गाळण उडाली. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. जरा वेळाने तिने खोलीत चहूकडे पाहीलं, तिथे कुणीच नव्हतं. आपल्याला भास झाला असेल, असे वाटून ती जरा स्वस्थ झाली.

खोलीच्या एका भागात पुस्तकांची कपाटे होती. दुसऱ्या भागात काही पक्ष्यांचे पिंजरे टांगलेले होते. त्यातले काही पिंजरे रिकामे होते, आणि काही पिंजऱ्यांत पिवळ्या रंगाचे सुंदर पक्षी होते.

जादूगार गावाहून परत आला. त्याने आपल्या नव्या नवरीला हाक मारली; पण प्रतिसाद मिळाला नाही. त्याने मग त्या गूढ खोलीचे दार उघडले. तिथे मगदा एका कोपऱ्यांत घाबरी-घुबरी होऊन बसलेली होती. जादूगार तिला म्हणाला, “तू माझ्या आज्ञेचे उल्लंघन केले आहेस. त्यामुळे तुला त्याची शिक्षा भोगावी लागणार.”

जादूगाराचे काही शब्दच मगदाच्या कानांवर पडले, आणि काही कळायच्या आतच तिचे एका पाखरात रूपांतर झाले. जादूगाराने त्या पक्ष्याला उचलून पिंजऱ्यात ढकलले आणि पिंजऱ्याचे दार ओढून घेतले.

दुसऱ्या दिवशी जादूगार पुन्हा त्या खेड्यात गेला. मगदाच्या नवऱ्याला पाहून विओला आणि वंदा यांना आनंद झाला. त्यांनी त्याला विचारले, “मगदाला नाही आणले? काय म्हणते आमची बहीण?” जादूगार त्या मुलींना म्हणाला, “माझ्याबरोबर चला आणि भेटा तिला.”

वंदा वाचनात गढलेली होती, त्यामुळे ती काही त्याच्याबरोबर गेली नाही; पण विओला मात्र जादूगाराबरोबर आपल्या बहिणीला भेटायला गेली.

जादूगाराच्या महालात पोहचल्यावर तो विओलाला म्हणाला, “ मगदा थोड्याच वेळात कपडे बदलून येईल. तोपर्यंत तुझेच घर समजून तू महालात हिंडून ये. वाद्ये वाजवून पहा, गाणी म्हण. फक्त त्या शेवटच्या छोट्या खोलीकडे जाऊ नकोस.”

विओलाने महालातली अनोळखी वाद्ये वाजवून पाहिली, पण त्यातून तिला हवे ते सूर येईनात. त्यामुळे गाण्याच्या चालीवर डोलत नाचण्याची तिची हौस पूर्ण झाली नाही. ती लवकरच कंटाळली. तिच्या मनात त्या खोलीचे कुतुहल जागे झाले, जाऊन पाहिले तर काही होणार नाही, असे समजून तिने दार ढकलले. करकर वाजत दार उघडले आणि आतून एक केसाळ हात बाहेर आला आणि त्या मजबूत पंजाने तिला आत खेचून घेतले. ती घाबरलीच. थोडा वेळपर्यंत कुणीच आले नाही, म्हणून ती खोलीत आजूबाजूला पाहू लागली. तिथे तिला पुस्तकांची कपाटं आणि पिवळ्या पक्ष्यांचे पिंजरे दिसले.

काही पिंजरे रिकामे असल्याचेही तिच्या ध्यानात आले. तेवढ्यात जादूगार तिथे आला आणि विओलाचे पिवळ्या पक्षात रूपांतर होऊन तिला रिकाम्या पिंजऱ्यात जागा मिळाली.

नंतरच्या दिवशी जादूगार पुन्हा त्या खेड्यात आला आणि चक्कीवाल्याच्या घरी गेला. वंदाने विचारले, "माझ्या बहिणी कुठे आहेत?"

जादूगार म्हणाला, "त्या दोघी महालात तुझी वाट पहात आहेत. तू स्वत:च जाऊन त्यांना भेटत का नाही? तुला मी तिथे काही गंमतीशीर पुस्तकं वाचायला देईल. त्यानंतर तू आणि विओला दोघी बहिणी सोबतच घरी परत जा."

वंदाचे बाबा, त्या दिवशी चक्कीवर गेले होते आणि अजून परत आले नव्हते. त्यामुळे बाबांना न सांगताच वंदा जादूगाराबरोबर आपल्या बहिणींना भेटायला निघाली.

महालात पोहचल्यावर जादूगार वंदाला म्हणाला, "मी त्या दोघींना बोलावतो. तोपर्यंत तू महालातली पुस्तकं चाळ." वंदा पुस्तकं चाळू लागली, आणि तिला आश्चर्याचा धक्काच बसला. ती सगळी पुस्तकं जादूविद्येची होती. 'मायाजाल कसे पसरावे?' या नावाचे एक पुस्तक तिने वाचायला सुरुवात केली.

काही वेळाने तिला पावलांचा आवाज आला. टप, टप, टप. दार उघडलं गेलं, तिने पाहिलं, तो आपला मेहुणाच होता. जादूगाराने त्याचे मायाजाल पसरवायला सुरुवात केली, तितक्यात वंदा तेवढ्याच आत्मविश्वासाने

म्हणाली, “अब्राकाडाब्रा ! या घराला शाप दे, या माणसाचा उंदीर कर !”

जादूगाराला पश्चाताप झाला, पण डोळ्याचे पाते लवते न लवते तोच त्याचे उंदरात रूपांतर झाले.

वंदाने त्याची शेपटी पकडली आणि त्याला रिकाम्या पिंजऱ्यात कोंबले. त्यानंतर ती पिंजऱ्यातल्या छोट्या पाखरांकडे वळली आणि म्हणाली, “आब्राकाडाब्रा! या पक्ष्यांना मुक्त कर! त्यांचे मूळ रूप त्यांना परत दे!”

पिवळे पक्षी पिंजऱ्यांतून बाहेर आले आणि त्यांचे माणसांत रूपांतर झाले. त्यात वंदाच्या दोन बहिणीही होत्या. वंदा आपल्या दोन्ही बहिणींजवळ गेली. त्यांनी एकमेकांना मिठी मारली. खांद्यावर डोकं ठेवून मुसमुसून रडल्या.

प्रत्येकालाच आपापल्या घरी जायची घाई होती. वंदाने उंदराचा पिंजरा हातात घेतला आणि म्हणाली, “जादूगारा! आता तुला मुकाट्याने माझ्यामागं यावं लागेल.”

तुम्हाला सांगायला खेद वाटतो, वंदा ही मुळात मुलगी नव्हतीच. ती एक लोभी, हावरट मांजर होती. एक-दोन दिवसानंतर पाहिलं तर पिंजऱ्याचं दार उघडं होतं आणि त्यात चवदार जेवण होतं. बहुतांश जेवण संपलेलंच होतं, शिल्लक होती ती तेवढी मांजराची शेपटी!

# ८.१८ बुरखेवाला

एका शहरात एक धनवान व्यापारी रहात होता. तो फार दयाळू व परोपकारी होता. तो दूरदूरच्या शहरांत जाऊन व्यापारधंदा करीत असे. त्याच्या मदतीला नोकरचाकर असल्यामुळे तो बिनधोक मनाला येईल तितका माल खरेदी करीत असे. त्याला एक मुलगा होता. तो असेल फार तर पाच सहा वर्षांचा. त्याचे गुण लहानपणीच दिसत होते. तो आईला कधीच त्रास द्यायचा नाही. आणि आईला लाडालाडाने म्हणायचा कसा, "आई आई मी की नाई दूलदूलच्या गावी जाऊन लई लई पैसे आनील आणि ते सर्व तुलाच देईन हं, मग आपण खूप खूप मजा कलू बलं का?" त्याचे हे बोलणे ऐकून आईला फार फार आनंद व्हायचा.

असेच अजून काही दिवस गेले. एके दिवशी व्यापारी खूप दूरच्या शहरी व्यापारासाठी गेला. आणि परत येताना बिचाऱ्याचे जहाज समुद्रात बुडाले. त्याबरोबर सर्व सामानसुमान नोकरचाकर बुडून मरण पावले. त्याचा एकुलता एक मुलगा विजयचंद्र उघडा पडला. घरात कोणी कर्ते नव्हते. जेव्हा ही खबर घरी पोचली तेव्हा त्याच्या बायकोला धक्काच बसला. घरात हिरेमोती, जडजवाहीर भरपूर होते. आणि तोच तिचा आधार. पण कमनशिबी बिचारी. नवऱ्याकडील लोकांनी घरातील सर्व चीजवस्तू पसार केल्या. घर सर्व धुऊन निघाले. ती उघड्यावर पडली. थाटामाटात दिवस काढले, आता उपाशी रहावे लागेल. आपल्यावर वाईट दिवस आले. लोक बघून हसतील म्हणून एके दिवशी तिने विजयचंद्राला आपल्याबरोबर घेतले. कपडालत्ता घेतला. आणि हळूच घराबाहेर पडली. कुठे जायचे कसे जायचे तिचे तिलाच माहीत नव्हते. बिचारी दर कोस दर मुक्काम करीत चाली होती. कधी चालायचे माहीत नाही. कधी ऊनवारा माहीत नाही. चालता चालता तिच्या पायाला फोड आला. तिला चालवेना म्हणून ती एका झाडाखाली विसाव्यासाठी थांबली. संगं आणलेली

शिळीपाकी भाकरी खाल्ली. विजयचंद्राला चार घास घातले आणि पाणी पिऊन तिथेच जरा कलंडली. तर तिला चांगली गाढ झोप लागली.

तिला त्यावेळी एक छान स्वप्न पडले. स्वप्नात शंकरपार्वती आले. त्यांनी तिला आशीर्वाद दिला आणि म्हणाले, "तू घाबरू नकोस विजयचंद्राला चांगलं सांभाळ. तोच तुझा मोठा आधार आहे. थोड्याच दिवसांत तो राजा होईल आणि मग तुझे कल्याण होईल." ती झोपेतून जागी झाली. तिला फार आनंद झाला. तिने देवाची करुणा भाकली. विजयचंद्राला झोपेतून जागं केलं. त्याचा गोड गोड पापा घेतला. आणि पुढे निघाली. चालता चालता त्यांना एक शहर लागलं. ती शहरात गेली, कामधंदा विचारू लागली. पण काम तरी काय मिळणार? एका सावकाराच्या घरी घरकाम मिळालं. दोघा मायलेकरांना आधार झाला. विजयचंद्र आता शाळा शिकू लागला. त्याला चांगले शिक्षण मिळू लागले. थोड्याच दिवसांत तो चांगला तरबेज झाला. पण पुढे त्याचे लक्ष शाळेत लागेना, म्हणून एकेदिवशी तो आईला म्हणाला, 'आई मी काही तरी व्यापारधंदा करतो.' आईला आनंद झाला. तिने विजयचंद्राला शंभर रुपये दिले. मग विजयचंद्राने आईचा आशीर्वाद घेतला आणि निघाला दरकोस दर मुक्काम करीत, तो एका खेडेगावी पोचला. त्या गावात शिरण्याच्या अगोदरच त्याला एक दृश्य दिसले. एका माणसाचे प्रेत दुसरा एक मनुष्य इकडून तिकडे व तिकडून इकडे ओढीत आहे. त्या माणसाची बायको व मुले रडत आहेत. विजयचंद्राने जवळ जाऊन चौकशी केल्यावर त्याला कळले की, त्या सावकाराचे पन्नास रुपये देणे आहे. ते मिळाल्याशिवाय तो प्रेत बायकोच्या व मुलांच्या ताब्यात देणार नाही. विजयचंद्राला फार वाईट वाटले. त्याने आपल्या जवळचे पन्नास रुपये त्या सावकाराला दिले. बाकीचे पन्नास रुपये मयत माणसाच्या बायकोला व मुलांना देऊन पुढची व्यवस्था करण्यास सांगितले. आता विजयचंद्राजवळ एकही पैसा उरला नव्हता.

विजयचंद्राला आता काळजी पडली. रिकाम्या हातांनी परत जायचे कसे? आई काय म्हणेल? म्हणून तो सटर फटर काम करू लागला. पण त्यातही काही

फायदा दिसून आला नाही. जेम तेम पोटापुरतेच मिळू लागले. त्याने बराच प्रयत्न केला. पण काही उपयोगहीत नाही असे दिसल्यावर बिचारा विजयचंद्र नाइलाजास्तव परत फिरला. काही दिवसांनी घरी पोचला, आईला नमस्कार करून गप्प उभा राहिला. आईने विचारपूस केल्यावर त्याने आईला खरे खरे ते सर्व सांगितले. आईला राग येण्याऐवजी आनंद झाला. म्हणाली, "विजयचंद्र तू फार चांगली गोष्ट केलीस. तू केलेस ते योग्य केलेस. काळजी करू नकोस. आता मी तुला भरपूर पैसे देऊन व्यापाराला पाठविते. तू आनंदात जा." पण विजयचंद्राला काळजी पडली हे पैसे येतील कोठून? आपल्याला कोण देईल? आईने विजयचंद्रासमोर आपल्या बिछान्यातील एक तक्क्या उसवून त्यातील भारी किंमतीचे हिरेमोती काढून दिले आणि म्हणाली, "बेटा विजयचंद्र, तुझ्या बापाची ही कमाई आहे." विजयचंद्राच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले, त्याला बापाची आठवण झाली. त्याने आईच्या पायांवर मस्तक ठेवले. आईचा आशीर्वाद घेतला. आणि पुढच्या तजविजीला लागला. थोड्याच दिवसांत तयारी पूर्ण केली. आणि तो व्यापारासाठी शहराबाहेर पडला. पण या वेळी तो एकटा नव्हता, दहा पंधराजण बरोबर होते. विजयचंद्र झपाट्याने मजल मारीत निघाला.

विजयचंद्र आता एका डोंगराजवळ पोचला होता. सूर्य मावळतीला चालला होता. डोंगर पार करणे शक्य नव्हते, म्हणून रात्री डोंगर पायथ्याशीच मुक्काम करण्याचे ठरविले. इतक्यात धुळीचे लोट त्यांच्या नजरेस पडले. सर्वांच्या नजरा तिकडे वळल्या आणि एक घोडेस्वार यांच्या काफिल्यात येऊन दाखल झाला.. पण तो बुरखाधारी होता त्यामुळे तो कोण आहे हे ओळखणे शक्य नव्हते. त्याने विजय-चंद्राला नमस्कार केला आणि म्हणाला, "तू कोण आहेस आणि कुठे निघालास?" विजयचंद्र इमानी मुलगा! त्याने सत्य तेच सांगितले. म्हणाला, "मी आईला एकुलता एक मुलगा. मी यापूर्वी व्यापारधंद्यासाठी एकदा आलो होतो. पण परत जावे' लागले." त्याने पैसे कसे दिले, कोणाला दिले, का दिले आणि परत का जावे लागले हे सर्व त्या बुरखाधारी माणसाला सांगितले,

आणि म्हणाला, “मला अजून धंद्याची माहिती नाही.” हे ऐकून बुरखाधारी म्हणाला, “दोस्ता तू काळजी करू नकोस. मी तुझ्या मदतीसाठी येतो आपण दोघे भागीत धंदा करू.” विजयचंद्राला काळजी पडली. हा नवखा माणूस, याचेजवळ पैसा नाही की, अडका नाही. आणि हा कोण आहे आणि कोण नाही. पण वेळ प्रसंग पाहून विजयचंद्राने संमती दिली. मग रात्री तिथेच मुक्काम केला. विजयचंद्राने चार चौघांना रात्री जागता पहारा करण्यास सांगितले. पण बुरखाधारी आडवा आला,” तो म्हणाला मित्रा हे काम माझे आहे. आपण भागीत व्यापार करतो ना, मग आजच्या रात्री मीच पहारा करतो.” त्याच्या हट्टापुढे विजयचंद्राने हात टेकले. सगळेजण आपापल्या बिछान्यावर जाऊन झोपले, पण विजयचंद्राला मात्र झोप नव्हती.

ठीक मध्यान रात्री भले वीस पंचवीस चोर आले आणि यांना लुटण्याचा प्रयत्न केला. पण त्या बुरखाधारी माणसाने चोरांना तंबूच्या आत येण्याच्या आधीच त्यांचा समाचार घेतला व सर्वांना यमसदनाला पाठविले. कोणीही जिवंत उरले नाही. मग बुरखाधारी निवांत झोपी गेला. हे सर्व विजयचंद्राने पाहिले. त्याने मनात देवाचे आभार मानले. सकाळ झाली. चोरांच्या प्रेताचा ढीग पाहून सर्वजण चकित झाले. सर्वांनी त्याची वाहवा केली. मग सर्व सामानसुमान बांधून पुढे चालू लागले. पुढे त्यांना एक शहर लागले. तिथे त्यांनी जो माल विकला व खरेदी केला त्यात त्यांना भरपूर नफा मिळाला मग तेथून ते पुढे निघाले. बुरखाधारी सारखा पुढे पुढे असायचा. तो कधी फारसे बोलत चालत नसे. कामापुरता फक्त बोलायचा. जाता जाता त्यांना भयंकर अरण्य लागले. जिकडे तिकडे झाडेच झाडे. तेथे एक पाटी लिहून ठेविली होती. त्यावर लिहिले होते की, जवळच्या रस्त्याने जाऊ नये. धोका आहे. लांबच्या रस्त्याने बिनधोक जावे.” विजयचंद्राने सर्वांचा विचार घेतला. बुरखाधारी म्हणाला, “विजयचंद्र दूरच्या रस्त्याने जास्त दिवस लागतील त्यापेक्षा आपण जवळच्याच रस्त्याने जाऊ या.” बुरखाधारीने मागे केलेल्या कामगिरीबद्दल सर्वांचा त्याच्यावर विश्वास होता. म्हणून सर्वांनी जवळच्याच रस्त्याने जायचे ठरविले.

पुढे पुढे बुरखाधारी व मागे मागे इतर काफिला चालू लागला. बरेच चालून गेल्यावर पुढे एक दरी लागली. ती चढण्यास फार अवघड होती. सूर्य मावळू लागला होता. म्हणून आजची रात्र इथेच काढण्याचे ठरले. सर्वांचे जेवणखाण झाले. विजयने नियमाप्रमाणे आपल्या साथीदारांना रात्री पहारा देण्यास सांगितले, पण आपला बुरखेवाला आहेच. तो म्हणाला, "आपण त्रास घेऊ नये हे काम माझे आहे. तुम्ही निर्धास्त झोपा." त्या सगळ्यांवर बुरखाधारीचा चांगलाच छाप बसला होता. त्यामुळे त्याच्यापुढे सहसा कोणाची बोलण्याची हिंमत होत नसे. सगळेजण थकल्या भागल्यामुळे पटापट झोपी गेले. बुरखाधारी जागता पहारा करीत होता. तो जरा विसाव्यासाठी जमिनीवर पडला तोच एक हाडळीण हळूहळू वास घेत आली. तिचे लांब हात होते. वीत वीत नखे वाढलेली होती. मोठमोठे डोळे होते. ती ज्या तंबूत शिरली नेमक्या त्याच तंबूत बुरखाधारी होता. हाडळणी मोठ्याने हसली आणि बुरखाधारीच्या शेजारी असलेल्या खुर्चीवर बसली. तर काय गंमत झाली सांगू, ती एक सुंदर अशी तरुणी झाली. तिचे ते भयंकर रूप पार बदलले. मग बुरखाधारी हळूच उठून बसला आणि हसत हसत म्हणाला, "बरे झाले तू आलीस. हे बघ, आमच्याकडे किनई स्वयंपाकाला कोणीच बाई माणूस नाही." त्यावर ती म्हणाली. "मी येते ना तुमच्याबरोबर."

ती हाडळीण काय करीत होती माहीत आहे का? त्या अरण्यातून जो जाईल त्याचे पोट फाडून फक्त काळीज खात होती. त्यामुळे त्या अरण्यातून कोणीच जिवंत जात नसे. म्हणून राजाने तो रस्ताच बंद केला होता. पण बुरखाधारीच्या जादूमुळे सर्वांचा जीव वाचला. सकाळी सगळेजण सुखरूप उठले. त्या बाईला पाहून कोणालाच काही समजेना. त्या बुरखाधारीशी विचारण्याची हिंमत कोणी केली नाही. उलट सर्वांना त्याची भीतीच वाटू लागली. मग त्या बाईला घेऊन ते पुढे निघाले. पुढे मात्र त्यांना काहीच त्रास झाला नाही. चालता चालता त्यांनाएक शहर लागले. तेथेही त्यांना भरपूर फायदा झाला. दोनचार दिवस तेथे राहून मग तेथून सर्वजण परत फिरले. बरेच दूर आल्यावर त्यांना एक सुंदर शहर लागले. पण यावेळी ते शहरात न जाता शहराबाहेर त्यांनी एका रमणीय ठिकाणी

डेरा दिला. प्रत्येक मुक्कामी रात्री पहाऱ्यासाठी बुरखाधारी असायचाच. येथेही एक गंमत झाली. जिकडे तिकडे आता सामसूम झाली असेल नसेल तोच त्यांच्या तंबूपासून एक रेडा जाताना दिसला. त्याच्या पाठीवर एका तरुणाला कसून बांधले होते. हे बुरखाधारीने पाहिले आणि त्या रेड्याला अडवून त्या तरुणाची सुटका केली व विचारपूस करता कळले की, प्रत्येक आठादिसा एक माणूस व एक रेडा, मणभर भात, एक गुळाची ढेप पाठवावी लागते. कशासाठी माहीत आहे का? तर तेथे एक राक्षशीण होती, तिच्यासाठी. हे भोजन तिला मिळाले नाही तर ती शहरात येऊन भराभर माणसे खाऊन टाकी!

राजाने त्या राक्षशिणीला मारण्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले. पण कोणालाही यश आले नाही. यावेळी राजाने फार मोठे बक्षीस देऊ केले होते. त्या राक्षशिणीला मारणाराला अर्धे राज्य व त्याच्याशी राजकन्येचा विवाह, त्यामुळे बऱ्याच लोकांचा प्रयत्न चालूच होता. पण भलत्याच माणसाला त्याचा लाभ झाला. म्हणतातना नशिबातले कधी चुकत नाही. अगदी तसंच घडलं. त्या तरुणाऐवजी त्या रेड्यावर बुरखाधारी स्वतःच सवार झाला आणि चालला. थोडा दूर गेला असेल तोच एक महाभयंकर राक्षशीण उड्या मारीत नाचत नाचत आली. बुरखाधारीने क्षणाचाही विलंब न लावता भराभर बंदुकीच्या गोळ्या झाडल्या. त्यासरशी राक्षशीण धाडकन जमिनीवर कोसळली आणि हातपाय आपटून आपटून मरण पावली. मग बुरखाधारीने तिचे दोन डोळे काढून घेतले व आपल्या पेटीत बंद करून ठेवले. सकाळ झाली. रेड्यावर बसून गेलेला तरुण घरी सुखरूप आला. सर्वांना आनंद झाला. थोड्या वेळाने राक्षशिणीला कोणीतरी मारल्याचा गाजावाजा झाला. बरेच जण पुढे झाले आणि मीच मारले अशा बढाया मारू लागले. पण त्या तरुणाने थोडक्यात हकिगत प्रधानाजवळ जाऊन सांगितली. त्यामुळे प्रधान स्वत: चौकशीसाठी यांच्या काफिल्याकडे आला. प्रधानाने बुरखाधारीची चौकशी करता त्याने ठासून सांगितले की, “आमच्या राजकुमार विजयचंद्राने रात्री त्या राक्षशिणीला मारले.” हे ऐकताच बिचाऱ्या विजयचंद्राचे धाबे दणाणले. मी त्या राक्षशिणीला पाहिलेदेखील नाही मग मारण्याचा प्रश्नच नाही. पण बुरखाधारीपुढे त्याचे काही चालेना

प्रधान परत फिरला, राजदरबारात जाऊन राजाला ही बातमी दिली. राजकुमार विजयचंद्राला पाहण्यासाठी राजा अंबारीवर बसून आला. बुरखाधारीच्या शिकवण्यावरून विजयचंद्र पुढे झाला. राजाला नमस्कार केला आणि त्याने राक्षशीण कशी मारली ते सांगितले. व दोन डोळे काढून ते राजाला दाखविले. राजाला आता शंकाच उरली नव्हती. विजयचंद्राचे राजकुमारी पद्मावतीशी थाटात लग्न झाले. विजयचंद्राला अर्धे राज्य बक्षीस मिळाले. आता विजयचंद्र राजा झाला होता. त्याला आता काही कमी नव्हते. महिना दोन महिने येथे राहून मग राजा विजयचंद्र आपल्या आईच्या भेटीसाठी निघाला. बरोबर फौजफाटा होता. सर्व लवाजम्यासह काही दिवसांनी राजा विजयचंद्र आपल्या गावी पोचला. आईला खबर दिली. आई धावत आली. आपल्या लाडक्या मुलाचा एवढा थाट पाहून तिचा आनंद गगनात मावेना, तिचे स्वप्न खरे ठरले. पद्मावतीला पाहून तिच्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रू वाहू लागले. सर्व जिकडे तिकडे झाल्यावर बुरखाधारी विजयचंद्राला म्हणाला, “दोस्ता माझा वाटा देऊन टाक आणि मला परवानगी दे.”

बुरखाधारीचे आपल्यावर किती उपकार आहेत हे राजा विजयचंद्र ओळखून होता. म्हणाला, “मित्रा तुला काय पाहिजे ते घेऊन जा. पण तुझी ओळख दे. तू कोण आहेस. तुझे गाव कोणते. तुझे नाव काय?” बुरखाधारी म्हणाला, “तू मला विचारल्यावरून सांगतो. ज्याच्या मुलांबायकोवर तू उपकार केलेस, ज्या माणसाला तू कर्जातून मुक्त केलेस, तोच मी आहे.” असे म्हणून तो काही एक मोबदला न घेता निघाला व दिसेनासा झाला. राजा विजयचंद्राला फार वाईट वाटले. त्याच्यामुळेच आज विजयचंद्र राजा झाला होता. आईलाही फार दुःख झाले. पुढे विजयचंद्राने त्या बुरखाधारी माणसाच्या बायकोला व मुलांना खूप मदत केली. राजा विजयचंद्र आपल्या आई व राणी पद्मावतीसह सुखात राज्य करू लागला.

(पुनःकथन : सौ. हव्वाबी खान)

# ८.१९ पुटाक्का

असंच आपलं एक गाव होतं. तिथं एक म्हातारी रहायची. पदरी मूलबाळ असावं असं बोलायची. नवस बोलायची. देवाच्या नावानं घोकण्या घालायची. तर काय गंमत की, एक दिवस तिनं देवाचा प्रसाद म्हणून मिळलेला मोठा नारळ एकलीनं खाल्ला. दिवसभर उगवल्यापासून मावळस्तोवर आपली खातच बसली. म्हणताना एक दिवस काय झालं की, स्वप्नात तिला एक साधू महाराज दिसला. तशी हिनं आपली कुस उजूदे म्हटलं न् त्या साधूला तिनं लोटांगणही घातलं. तर मग साधूनं तिला सांगितलं की, तुला लेक होईल. त्या सरशी हिचा जीव हारखून गेला. 'चालंल ' बोलली. मग त्या बाबानं तिला म्हटलं कसं, "पण तुझी लेक नखाएवढी लहान. गोरीगोरीपान जशी काय नेसलीय सूर्याबाण. लाखांत देखणी म्हण!" त्यावर ही आणखीच हारखूनच जात 'असूंदे' म्हणाली. त्या बाबनं मग हिला घरला जा म्हटलं. भल्या पहाटेला दारीचा रांजण उपस म्हणून सांगितलं. त्यावेळी ही लेक भेटेल असं बोलला न् गेला निघून.

तर त्या भल्या पहाटेला उठून ही बघतीय दारात तर रांजण उसळ्या मारतेला. अगबाई! ही हळूच पुढं गेली. मोगा घेतला न् लागली रांजण उपसायला. त्यासरशी त्या बाबानं म्हटल्यागत एक लालचुटुक जिवणीची, नक्षत्राच्या रूपाची, अप्रुबाईच्या लावण्याची अशी नखाएवढी पोरगी एकदम रांजपणाचा काठ चढून 'आई आई' करीत वर येतेली! म्हणताना हिनं हारखून जात त्या पोरीला म्हटलं, "आरं माज्या नशिबा! ये ये पुटाक्का. माजी काया तुज्यावानं ववाळून टाकते बयो, कित्ती गं एवढीशी तु पुट्टी ! नाजूक लुसलुशीत" आणि तिला आपल्या पोटासंगं धरली. हिला त्यावेळी एवढा आनंद झाला की, तिला बघून चांद सूर्या दिकुन खळखळून हसला ते ! देवळातल्या नाजूक घंटेगत त्या पोरीच्या बोलण्यानं हिचं घर घुमलं तशी ही आपल्या लेकीला घेऊन

'पुटाक्का पुटाक्का' करीत घरभर फिरली तेव्हा कुठं हिचा जीव खाली पडला. "पुट्टी म्हणजे लहानगी न् पुटाक्का म्हणजे थोरली" अशी बडबड तिनं तोंड दुखोस्तोवर केली. पोटभर तिचे मुके घेतले. शंभरदा तिचा आलाबला घेतला. मऊ मऊ कापसाची गादी तिच्यासाठी हिनं केली. स्वतः कापूस नखाबोटांनी पिंजला. चिटुकल्या गादीला पिटुकली उशी शिवली. काचेच्या न्हाणीत तिला नेऊन न्हाणली. आकाट्या शेकाट्यांनी पाळणा लांबवला. पुटाक्काला मग हिनं कापसाच्या बोळ्यानं दूध पाजलं. काजळ तीट केली न् मग गीतं गात निजवावं म्हणाली.

गुंजावणी डोळ्यांची, चाफेकळी नाकाची, गुलाबी गालाची, नाजूक टोकदार जीवणीची न् चिटुकल्या मिटुकल्या अंगलटीची ही लेक बघून म्हातारीला अस्मान ठेंगणं झालंवतं. तशात ती निजल्यावर मधेच खुदकिनी हसलेली बघून तर म्हातारीनं आपली काया तिच्यावरून ओवाळूनच टाकली.

होता होता मग ह्या मायलेकी झोपून गेल्या. कौलारू घराच्या छपरातून मग हळूच सूर्यदेव डोकावले. त्यांनी पुटाक्काचं रूप आणखीनच देखणं करून टाकलं.

तेवढ्यात तिथल्या पिंजऱ्यातल्या पोपटानं पुटाक्काला बघितली न् खाडदिशी पिंजऱ्याचं दार फोडून तो बाहेर आला. पण इकडचा आवाज तिकडे गेला नाही. अंहं! मग त्यानं म्हातारीनं बांधलेल्या पाळण्याची दोरी आपल्या चोचीनं हळूच तोडली न् ती आपल्या चोचीत घट्ट धरून तो त्या घराबाहेर पडला. उंच आभाळात उडाला; एका झुपकेदार झपाळ्या झाडावर त्या पाळण्यासह येऊन बसला. तर काय गंमत की, तेवढ्यात ह्या पोरीला जाग आली. तिनं आपले डोळे उघडले. बघतेय तर समोर एक फार सुंदर पोपट. तिनं त्याला पाहिलं मात्र न् बोलली कशी, "लाल चुटूक ओठ. हिरवंगार अंग, तू मला देशील एक गोष्ट?" तशी ह्यानं 'हो' म्हणत मान हलवली. काय पाहिजे म्हणाला. त्यानं मग हिला उचलून अलगद अशी एका पानावर ठेवली न् डाळिंबाचे दाणे, पेरूचे तुकडे खायला दिले. तर ते खात ही म्हणाली, "माझा दादा होशील का ?

मला नीट सांभाळशील तू? आणि ती आई? ती कुठं गेली?"

"आई घरात निजलीय आपण खेळूया. मी तुझा दादा. तू माझी ताई." पोपट बोलला. त्यानं गीतं म्हटली. त्याच्या आवाजानं सारी हवा गुंगून गेली. हवेतून गोड गोड आवाज घुमला. त्यात हिनं भर घातली. आपण पण गाणी म्हणाली. तशी नदी, डोंगर, नाले, खडक, आभाळ, धरणी अशा सगळ्याच ठिकाणांहून संगीत निघालं. ऐकणाराचे भान हरपून गेलं. झाडालादेखील वाचा फुटली तर! खरंच! गातं झाड नाचायला लागलं. पानं फांद्या. हसायला लागल्या. पुटाक्काला खूप खूप गंमत वाटली. ह्या पानावरून त्या पानावर लोळण फुगडी खेळत तिनं पोटभर हेंदकळून घेतलं. पोपटाबरोबर खेळून खेळून दमली. त्यानं खायला दिलेलं खाऊन मग ती एका पानावर निजली. पोपटाचाही घटकाभर डोळा लागला. झाडानंही मग डुलकी काढावी म्हटलं. हातपाय पसरून दिले.

त्या धांदलीत मग काय गंमत झाली की, पुटाक्का ज्या पानावर निजलीवती ते पान गेलं अवचितच घरंगळून आणि ते नेमकं टपकलं ते एका लहानग्या नदीच्या घोळात. त्यासरशी त्या नदीचं पाणी उसळून वर उडालं अन् ही पार भिजून गेली. "अगबाई! काय झालं? दादाऽऽ आईऽऽ" नाकातोंडात पाणी गेलेली पुटाक्का किंचाळली. म्हणताना तिच्या त्या गोड आवाजानं नदीकाठ भुलून गेला न् एका बेडकानं वर मान काढीत डराव डराव केलं. तर त्या आवाजानं ही दचकली न् घाबरून गेली. लागली रडायला. तशी बेडकानं काय आहे ते बघावं म्हणून पाण्यातून तो वर आला. बघतोय तर ही सुंदर मुलगी. त्यानं हिला पाहिली मात्र न् करीन तर हिच्याशीच लगीन करीन म्हणाला. त्यासरशी ही गेली हादरून न् बसली गपकिनी डोळे मिटून नदीतून ते पान चाललवतं तर ही पण तरंगतच निघालेली...

पण बेडकाला कुठला आलाय दम निघायला.? त्यानं ते पान खस्दिशी ओढलं न् हिला फरफटत नेली एका बिळात. तिथला चिखल न अंधार बघून ही गेली पारच हादरून. आणि ह्याचं ते ध्यान बघून तर तिचा जीव आणखीनच उडून गेला. बसली आपल्या आईच्या न् दादाच्या नावानं घोकण्या घालीत. पण

तिथं कोण यायला बसलंय? सगळीकडं गारीगार न् अंधार. बिचारी गेली काकडून.

तेवढ्यात बेडूक बाहेर काही आणावे म्हणून गेला. मग हिला बरं वाटलं. हळूहळू चालावं न् कुठून तरी बाहेर निघावं म्हटली न् उठली. पण जाणार कुठं? तिने आपले डोळे मोठे केले. तशी तिला समोर एक परी दिसली. तिने मग हात देऊन हिला त्या चिखलातून बाहेर ओढली. न् आपल्या घरी नेली. मग हिला एकदम हायसं वाटलं. त्या ओबडधोबड बेडकाच्या तडाख्यातून सुटल्याचा आनंद तिनं त्या परीजवळ शंभरदा बोलून दाखवला. परीनं मग तिला जवळ घेऊन थोपटली. तिचा मुका घेतला. तिला जरतारी पोशाख घातला. न्हाऊमाकु घातलं, काजळ तीट केली आणि खेळ जा म्हणून तिच्या पुढ्यात रत्नांचे सागरगोटे, माणकांचे हत्तीघोडे आणि चांदण्यांची झाडं खेळायला टाकली. मग ही हारखून गेली. पिटुकल्या मिटुकल्या हातांनी खेळायला बसली. तशी हिला एकदम त्या पोपटदादाची आठवण आली. तिनं दादाऽऽ दादाऽऽ केलं. तर ती परी कशी म्हणते, “हा कुणाचा कोण दादा” हिनं मग अशानं असं आहे म्हटलं. त्यासरशी परीचा चेहरा काळवंडून गेला. म्हणाली, “त्याच्या वाटेला नको जाऊस. वाईट्ट आहे.” पण हिनं ते ऐकलं नाही. म्हणाली, “खोटं! माझा दादा फार चांगला आहे. राजाच्या लेकापेक्षा देखणा. बघितलायस का तू कधी?”

त्यावर ती परी गप्प राहिली. तिनं हिच्या पुढ्यातला तो खेळ घालवून टाकला आणि बागेत खेळायला जा म्हटलं. हिला काय? जा म्हणायचा अवकाश. लगेच गेली लुटूलुटू पळत. तर तिथं एक माळी बसलावता. त्याच्या हातात फुलांचं गुंफलेलं वस्त्र. भोवती फुलांचा ढिगारा. वास तर असा सुटलेला की बास. हिचं मन त्या वस्त्रात एवढं गुंतलं एवढं गुंतलं की, तिनं त्या माळ्याला विचारलं, “कुणासाठी हे?” तशी त्यानं तिला सांगितलं, “त्या परीसाठी.” मगही आपल्याला पण एक तसलं गुंफून दे म्हणाली. तर माळ्यानं ते जमायचं नाही म्हटलं. फुलंच नाहीत म्हटला. आता फुलं संपली बोलला. तशी ही हुंदक्यानं

दाटली न् गडागडा लोळायला लागली. त्यासरशी त्या जागेवरचं एक फूल तिला म्हणतं कसं, “मला गदागदा हालव. मग काय होतंय बघ” तर तिनं लगेच तसं केलं न् काय सांगावं देवा! तिथं सुवासिक फुलांचा एवढा भडिमार झाला की, त्या दरवळीनं ती परी धावत तिथं आली. तिनं भराभर ती फुलं उचलली न् गेली निघून. मग ही पुन्हा लोळली तर पुन्हा तेच घडलं. पुन्हा त्या परीनं सगळी फुलं पळवून नेली.

तेवढ्यात एक उंदीर तिकडून आला. हिचं रूप बघून तो एवढा हुरळून गेला की, करीन तर हिच्याशीच लगीन करीन म्हणाला न् त्यानं हिला चुटकीसरशी उचलून आपल्या पाठीवर बसवली आणि गेला की एका बिळात घेऊन! आता काय करायचं? असल्या काळुंद्र्याबरोबर कोण लगीन करील! तिनं आपल्या मनाशी पक्का बेत केला. एका कोपऱ्यात अंधारात जाऊन बसली. तर तिला काय काय खायला देत उंदीर कसा म्हणतो, “तुला एक पोपट दिसलावता का पुट्टे?” लाल लाल चोच. हिरवंगार अंग. गातेला. बोलतेला.” तशी हिला उत्सुकता लागली. हिनं त्याला विचारलं, “कशाला पाइजे?”

“भेटलावता काय सांग.”

“कशाला पाइजे ते पैलं सांग.”

“तो माझा दोस्त होता. परीनं त्याला हाकलून दिलं.”

“कारण?”

“त्यानं तिच्याशी लगीन केलं नाही म्हणून.”

“खरंच?”

“हं! म्हणून ती फुलं पळवते. फुलांची वस्त्रं गुंफून घेते. फुलं बागेत झाडावर राहिली की, पोपट येईल न् घेऊन जाईल म्हणते.”

“अस्सं!”

"मला खूप आवडतो माझा दोस्त. मी हिंडहिंड हिंडलो. पण पत्ताच नाही. कोण्या म्हतारीनं लेकागत सांभाळलाय म्हणतात.” हे ऐकून पुटाक्का गंभीर झाली. आपल्या पोपटदादाबद्दल परीच्या मनात काळंबेरं असलं पाहिजे

याबद्दल तिची खात्री पटली. म्हणून ती या उप्पर काहीच बोलली नाही. मनातल्या मनात तिनं देवाला हात जोडले, “माझ्या दादाला सांभाळ बाबा.” आणि ती गप्प राहिली. म्हणून मग उंदीर बोललाच नाही. हिच्यासाठी फुलं घेऊन येतो म्हणून तिथून बाहेर गेला. हिनं आवतीभोवती पाहिलं. एक मुंगी तिथून चालली होती. हिनं तिला हाटकली. येथून मला घेऊन कुठे तरी दूर दूर चल म्हणाली. तिनं आपल्या मागोमाग ये म्हटलं. ही निघाली. वाट मऊ मऊ होती. चढणाची होती. लांबलांबची होती. पण ही गेली. रांगत, चालत. थांबत, बोलत.

होता होता मग त्या मुंगीनं तिला एका जंगलात आणली. एका दांडग्या झाडाखाली बैस म्हटलं न् स्वत: एका बिळात घुसली. त्यासरशी त्या झाडावरून पोपटाचा आवाज आला, “ताईऽऽ ताईऽऽ’ हिला नवल वाटलं. मान वर करून बघू लागली. पण झाड दाट पानाचं. खालचं वर दिसेना. वरचं खाली दिसेना अशातली गत झाली. म्हणून ही झाडावर चढायला लागली तर झाड कसं उंच उंच व्हायला लागलं. चढण जशी संपेचना. पोपटाचा तर आवाज सारखा येतेला. आता काय करावं?” हिचा जीव दमून गेला. साती आसरा भेटाव्यात, आईची वाट दिसावी. दादाची गाठ पडावी. पुटाक्काला ध्यास लागला.

तेवढ्यात एका खारूताईनं हिला बघितलं न् आपल्या शेपटात गुंडाळून पळवली. ती गेली ती तुरू तुरू झाड चढून वर. म्हणताना एका उडत्या सुतार पाखरानं हिला पटकिनी चोचीत धरली न् गेला उंच भराऱ्या मारीत. ही पार भेदरून गेली. आईंच्या न् दादाच्या नावानं घोकण्या घालायला लागली. तशी सुतारपक्षी कसा म्हणतो, “तू माझी राणी. मी तुझा राजा. कसली आलीय आई न् कसला आलाय दादा? मी म्हणेन तशी आता उठायची धजा.”

“अग बाई!” पुटाक्काला कसं खुळ्यागत झालं. बसली गपचूप. नाजूक नारीला, आभाळातली गार हवा सोसावी कशी? गेली गारठून. सुतार पक्ष्यानं तिला एक उंच डोंगरावर नेऊन ठेवली. आणि बसला तिच्या बरोबर गुलूगुलू

बोलत. पण हिचं ध्यान कुठं ठिकाणावर होतं? घडल्या गोष्टींनी ती हाडबडून गेलीवती. कुणीपण धसमुसळ्या हिच्यासंगं लगीन कराय निघालावता! आणि ही एकली एकली नको त्याच्या तडाख्यात गवसत होती. म्हणताना स्वत:च्या चिटुकलेपणावर ती चिडून गरजली, "लांब बैस तू. मला नाही लगीन करायचं." तशी सुतार पक्षी गुरगुरला, 'जाशील कुठं? करीत नाहीस कशी ते बघतो." आणि तिला त्यानं चोचीनं असा दणका दिला की ती पट्दिशी खाली पडली न् डोंगराच्या घसरणीवरून गडगडत गडगडत खोल दरीत जाऊन आदळली. तिचं अंग ठेचून निघालं. रक्ताळलं. घामेजल. थरथरलं. "आईऽऽ दादाऽऽ" करीत तिनं आक्रोश मांडला जसा. त्या कारणानं ती सारी दरी दणाणली.

तेवढ्यात तिकडून एक भला दांडगा नाग फुस्कारत आला. हिला पाहिल्या बरोबर त्यानं फणा काढला. शेपटीनं हिला उचलीत त्यानं आपल्या फण्यावर बसवली न् पुन्हा सळसळत सुसाट आपला निघाला. मग वाटेत त्यानं झाडपाल्याची औषधं हिला केली. जखमा बांधल्या. खाणंपिणं दिलं न् पुन्हा हिला डोक्यावर घेऊन तुझ्या आईकडे नेतो म्हणून निघाला. तर वाटेत एक भली दांडगी गुहा लागली न् त्यातून आक्राळ विक्राळ राक्षस बाहेर आले. नाग दचकला न् ही हेंदकाळली. तशी राक्षस हिला पकडायला पुढं धावले म्हणताना नाग जोरानं फुस्कारला. कडाडून चावा घेईन म्हणाला. पण राक्षसांनी हिला पकडायचा जसा चेव धरला. मग ह्यानं खडी उंची धारण करीत राक्षसांच्या बरोबर लढाई सुरू केली. तर ते पडले पाच सात न् हा एकटा. म्हणताना हिला भेटलेला तो उंदीर, तो बेडूक, ती मुंगी, ती परी, तो सुतार पक्षी न् तो पोपट झाडून सारे वेष बदलून तिथं आले न् त्यांनी त्या राक्षसांचा समाचार घेत पुटाक्काला एका उंच दगडावर बसवली न् सगळे निघून गेले. पण तो पोपट न् ती परी मात्र मागं राहिले. त्यांनी हिच्याबद्दल काही भाषा केली. त्यामुळंही काही म्हणणार तर ती परी निघून गेली न् पोपटानं हिला आपल्या चोचीनं उचलून त्या गुहेत नेली. तर तिथं वाटेत एक भला दांडगा राक्षस घोरत पडलेला. शेजारी हंडाभर दूध उकळतेलं तर पोपटानं पुटाक्काला एका दिवाळीत बसवली न् ते उकळतं दूध

त्या राक्षसावर ओतलं. तसा तो तडफडून मेला. मग पुटाक्काला घेऊन पोपट आत गुहेत गेला. खूप आत आत दोघेजण गेले. तिथं सुंदर राजवाडा होता. हंड्या झुंबरांचा चहूकडे लखलखाट झालेला. दीपमाळा पाजळतेल्या. पक्षी गातेले. माकडं नगारा नौबत झडवतेले. मुंगळे तुतारी फुंकतेले. वानरं काम करतेली. तर ते बघून पुटाक्का भुलून गेली. पोपटाला सोडून एकलीच लुटूलुटू निघाली. बघतेय तर तिथं इवलासा डोंगर विडी ओढतेला. इवलीशी नदी फुगडी खेलतेली. सातरंगी कमान मागं मागं होतेली. आणि पोपट गमती जमती सांगत सोबत करतेला. म्हणताना ही हवेतून तरंगावं तशी झोकात निघाली.

जिकडं बघावं तिकडं तिथं गंमत जंमतच. ही जवळ आली की, भिंतीवरची चित्रं साजिवंत होत होत पुढं यायची. हिला नमस्कार घालायची. हिच्या बरोबर बोलायची. त्यावेळी हिचं बोलणं निघायचं ते जलतरंगासारखं काळजाचा ठाव घेणारं. ही हसायची ती सुखाची कारंजी उसळावीत तशी. आणि ही चालायची ती आवतीभोवती फुलांचे ताटवे घेऊनच. त्यामुळे त्या दुनियेला जशी जाग आलीवती न् रत्नामाणकांचा उपसा व्हावा तसा सुखाचा डोंगर जिथं तिथं धा धावून पुढं यायचा.

होता होता सात दालनं ओलांडून ही पुढं आली तर तिथं हिचा पोपटदादा होता. त्याला बघून हिचा आनंद गगनात मावेना. त्यानं हिला प्रेमानं जवळ घेतली. झालं गेलं सारं आठवीत हिनं त्याला सांगितलं. मग दोघे पुढं निघाले. तर तिकडून ह्या पुटाक्काएवढाच एक देखणा पिटुकला राजा ह्यांना सामोरा येतेला. बरोबर लवाजमा. हत्ती, घोडे, उंट, येतेले. ताशे तर्फे वाजतेले. रंभा नाचतेल्या. शिंग घुमतेलं. चांदण्याची रिमझीम होतेली. सुवासिक फुलांचे फवारे उडतेले. मखमलीचा सडा होतेला. तर ते सगळं बघून ही भांबावून जातेली. पोपटदादा हारखतेला.

राजा पुढं पुढं आला मात्र अन् इकडे त्या म्हातारीला जाग आली. त्यासरशी तिनं आपल्या लेकीला हाकारा घातला. पण ती निजलीवती तिथं होतीच कुठं ती? तो पाळणा तरी होता कुठं? म्हातारीचा जीव उडून गेला. तिनं

झटक्यासरशी आपल्या अंगणातला खराटा घेऊन उंच आभाळात फेकला न् तरंगत्या ढगाला खालीये म्हणाली. खराट्याच्या फटकाऱ्यासरशी ढग खाली उतरला. म्हातारीनं मग आपल्या डोळ्यांत चंद्रसूर्य बसवले. ढगावर स्वत: बसली न् लेकीच्या शोधाला चल म्हणून तिनं ढगाच्या पाठीत रपाटा घातला. त्यासरशी ढग म्हातारीला घेऊन उंच उडाला आणि साता समुद्रापलीकडं पुटाक्का राजाच्या वाड्यात उभी होती तिथं या म्हातारीला घेऊन आला.

म्हातारी लेकीला बघून एवढी सुखावली की, तिनं पोट भरस्तोवर तिचे मुके घेतले. मग राजानं म्हातारीजवळ पुटाक्काची मागणी केली. तशी हिला कोण आनंद! काय करू न् काय नको अशा धांदलीत हिनं त्या पोपटाला पिटाळून लग्नाचं सामान आणलं. मग या राजाचं न् पुटाक्काच झोकात लगीन लागलं. सगळीकडे आनंदी आनंद झाला. त्यांनी मग सुखानं राज्य केलं तसं ते तुम्ही आम्ही पण करूया.

(पुनःकथन : डॉ. सरोजिनी बाबर)

# ८.२० दाढीवाला कीर्तनकार

विनोबा भावे

(तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून एक गोष्ट सांगितली आहे. वस्तू किंवा व्यक्तींमध्ये दिसणाऱ्या साम्यामुळे स्मृती कशी जागृत होते आणि चित्त कसे भरकटत जाते हे या गोष्टीवरून लक्षात येईल.)

एक कीर्तनकार होता. त्याला होती दाढी. ती होती विरळ आणि केवळ एका हनुवटीवरच. त्यामुळे ती बोकडाच्या दाढीसारखी दिसायची. एक दिवस कीर्तनकार कीर्तन करीत होता. श्रोते बसले होते. त्यात एक शेतकरी पण होता. कीर्तन ऐकता ऐकता त्या शेतकऱ्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले !

परमेश्वराचे नाव ऐकल्याबरोबर अंत:करण भरून यावे आणि दोन बिंदू डोळ्यांतून गळावेत ही गोष्ट लहान नाही! त्यासाठी चित्त निर्मळ हवे असते. एकाग्रता हवी असते. त्या शेतकऱ्याची तशी योग्यता पाहून कीर्तनकाराला त्याच्याविषयी विशेष आपुलकी निर्माण झाली.

कीर्तन संपल्यावर मंडळी पांगू लागली. तो शेतकरीही उठून जाऊ लागला. तेव्हा कीर्तनकारांनी त्याला विचारले, “बाबाजी, तुमचे मन आज कीर्तनात चांगले रमले होते. तुमच्या डोळ्यांतून आज अश्रुधारा वाहिल्या! कोणता प्रसंग विशेष हृद्य वाटला ?”

शेतकरी खुलासा करीत म्हणाला, “महाराज, त्याचे असे झाले - माझा एक बोकड होता. त्याची दाढी अगदी तुमच्यासारखी होती. नुकताच तो मेला. थोडेच दिवस झाले. तुमची दाढी पाहिल्यावर मला त्याची सारखी आठवण व्हायची. तो माझा फार लाडका होता. त्याच्या आठवणीमुळे माझी तशी स्थिती झाली महाराज!”

शेतकरी ऐकत होते हरिभक्तीची कथा, परंतु त्या दाढीच्या सारखेपणामुळे त्याच्या मनाने त्याला कीर्तनातून बोकडाजवळ नेऊन बसवले. स्मृतीची आहे ही करामत !

# ८.२१ मधुमती

(मिथीला लोककथा)

एका गावात महामारी पसरली. त्यामुळे लोकं दगावली. परंतु एका घरात सात भाऊ आणि त्यांची बहीण जिवंत राहिले. भावांनी बहिणीला सांगितलं, “मधुमती, घरात धान्य वगैरे सर्व काही आहे. आम्ही दूर देशात व्यवसायासाठी जात आहोत. जेव्हा परत येवू तेव्हा तुला आवाज देऊन जोऱ्यात असं सांगू, “मधुमती, मधुमती उघड दार, साती भाऊ बाहेर उभे” तरच दार उघडावयाचे.

आसपासच्या दुष्ट राक्षसांने हे कळाले, एक दिवस ते येऊन दार ठोठावत म्हणाले, “मधुमती, मधुमती उघड दार, साती भाऊ बाहेर उभे.” हे ऐकून ती दाराजवळ आलीच होती की अंगणातल्या लिंबाचे झाड म्हणाले, “मधुमती, मधुमती नको उघडू दार, राक्षस बाहेर उभे.” तिने दार उघडले नाही. राक्षसांनी चिडून ते लिंबाचे झाड कापून टाकले. काही महिन्यानंतर ते राक्षस परत आले. “मधुमती, मधुमती उघड दार.....” ती दार उघडण्यास पळाली. परंतु, अंगणातल्या लिंबाच्या एका लहानशा झाडाने तिला दार उघडू नकोस म्हणून सांगितले. जेव्हा सात भाऊ आले तेव्हा त्या लिंबाच्या झाडाने होकार दिला. मधुमतीने दार उघडले. नंतर तिचे लग्न झाले व ती सासरी जावू लागली. तेव्हा ती पळत लिंबाच्या झाडाजवळ गेली आणि त्याला आलिंगन देवून खूप रडली.

# ८.२२ पसाटी

(खानदेशी लोककथा)

एक छोटसं गाव होतं. या गावात बाराबलुतेदारी होती. शेतकरी शेतात धान्य पिकवीत, सुतार दारे, खिडक्या इ.लाकडाचा वस्तू तयार करी, सोनार दागदागिने घडविण्याचे काम करीत; धोबी, न्हावी, चांभार इ. लोकही आपापल्या व्यवसायाची कामे करीत. सगळे गुण्यागोविंदाने रहात होते. एकदा एक शेतकरी न्हाव्याकडे केस कापायला गेला; केस कापता कापता न्हावी म्हणाला, `शेतकरी दादा तुम्ही खरे सुखी लोक. एकदा शेतात पेरणी केली की, बाकी काही काम नसतं. फार डोकं चालवावं लागत नाही. कुठलं शिक्षण घ्यावे लागत नाही की बाकी काही काम नसतं. पीकं आपोआप तयार होतात आणि कापणी केली की, धान्याचं कोठार भरतं! आमचं पहा रोज काम करावं लागतं. सगळ्यांच्या डोकीचे काळजीपूर्वक आकार देत केस कापावे लागतात. शेतकरी म्हणाला, तसं नाही रे, न्हावीदादा, प्रत्येकालाच आपापल्या व्यवसायातल्या ज्ञानाची माहिती आवश्यक असते. न्हावी म्हणाला, `ठीक आहे, आता काही दिवस मी माझं सलून बंद करतो आणि तुमच्या शेताला लागून माझी थोडी जमीन आहे तेथे शेती करून पाहतो.'

न्हाव्याने शेतीची सर्व अवजारे खरेदी केली. शेतात कामासाठी धडधाकट मजबूत शरीरयष्टीचे सांगकामे गडी कामाला लावले. गडी माणसांना शेती कामाची माहिती नव्हती. न्हाव्याला तर अगदीच नव्हती. त्यामुळे पहिल्या दिवशी गडी माणसांना काय काम सांगावे हे न्हाव्याला समजत नव्हतं आणि काय काम करावे हे गडी माणसांनाही कळत नव्हतं. थोड्या वेळाने न्हाव्याने त्या सर्व गडी माणसांना सुटी दिली आणि स्वत:ही घरी आला. थोडा विचार करता करता न्हाव्याला एक युक्ती सुचली. दुस-या दिवशी लवकर शेतात गेला. शेतकरीदादा जे काम आपल्या कामगारांना सांगत होता ते न्हाव्याने चोरून

ऐकले. थोड्याच वेळात गडी कामावर येताच त्यांना ऐकल्याप्रमाणे सर्व सूचना दिल्या. गडी कामाला लागले. दिवसामागून दिवस गेले. रोज ऐकीव माहिती करून न्हावी योग्य पद्धतीने शेतीचे काम करून घेत होता. पाहता पाहता निसर्गाचीही उत्तम साथ मिळाली. पाऊसपाणी चांगला झाला. शेतात कापसाची पिके डोलू लागली. कापसाला बोंडे लागली. योग्य वेळी ऊन चांगले मिळाले, कापसाची बोंडे डोलू लागली. उन्हामुळे शेतात चांदी चमकावी तसा कापूस दिसू लागला. एके दिवशी सकाळी शेतकऱ्याच्या एका माणसाने न्हाव्याला बांधाजवळ फिरतांना पाहिले. त्याने शेतकऱ्याला बातमी दिली. शेतकरी न्हाव्याजवळ येत म्हणाला, `काय कापूस चांगला झाला ना!' न्हावी नकळत बोलला, तुम्हीच आमचे गुरू, जसं तुमचं शेत फुललं तसंच माझंही फुलणार! असं म्हणून न्हावी निघून गेला. शेतकऱ्याला शंका आली. परंतु काही न बोलता शेतकऱ्याने आपल्या कामगारांना बोलावले आणि म्हणाला, ` हे पहा, मी उद्या सकाळी तुम्हांला काहीही सांगितलं तरी तुम्ही कापूस वेचायचेच काम करा!' सगळ्यांनी होकारार्थी मान हलवली. सगळे आपापले काम करू लागले.

नित्यनेमाप्रमाणे सकाळी शेतकरी शेतात आला. न्हावी बांधावर काहीतरी काम करीत असल्याचे नाटक करीत उभा होता. शेतकऱ्याने आपल्या गडी माणसांना सांगितले, `आज काट्यांच्या पसाट्या कपाशीवर फिरवा.' बोलल्याप्रमाणे शेतकऱ्याचे कामगार कामाला लागले. न्हाव्यानेही आपल्या गडी माणसांना आज्ञा केली, पटापट कामाला लागा, कापसाच्या पसाट्या कपाशीवर फिरवा! मालकाची आज्ञा होताच सर्व कामगार काम करण्यास तयार झाले नाहीत. आपआपसात कुजबूज करू लागले. कसा मालक आहे हा! इतकं उत्तम पीक हाताशी आलं आहे आणि कपाशीवर काट्यांच्या पसाट्या फिरवायला सांगतो. आपल्या हातून आपण हे पाप कसं करणार? परंतु न्हावी गड्यांना दमदाटी करू लागला. पटापट कामाला सुरुवात करा असा आदेश देऊ लागला. नाईलाजाने गड्यांनी कपाशीवर पसाट्या फिरवल्या आणि थोड्याच वेळात चमचमणाऱ्या चांदीसारख्या कापसाची राख झाली. बाजूच्या शेतातील

लोकांनी पाण्याच्या बादल्या फेकल्या आणि आग आटोक्यात आणली. तितक्यात शेतकरी आला. न्हाव्याला म्हणाला, `काय केलेसं रे?' न्हावी म्हणाला, तुमच्या लोकांना तुम्ही जे सांगितलं तेच मी माझ्याही गडी माणसांना सांगितलं, परंतु तुमचे लोक कापूस गोळा करत आहेत आणि माझ्या माणसांनी पसाट्या फिरवा म्हणताच कापूसच जाळून टाकला! एक-दोन गडी पुढे आले. ते म्हणाले, आम्ही नाही म्हणत होतो. पण मालकांनी दमदाटी केल्यामुळे आम्हाला त्यांच्या आदेशाचे नाईलाजाने पालन करावे लागले.

न्हाव्याच्या खांद्यावर हात ठेवीत शेतकरी म्हणाला, `प्रत्येक व्यवसायाचे, कामाचे काही तंत्र-मंत्र असतात. ते अनुभवाने किंवा चर्चा करून समजून घ्यायचे असतात. चोरून लपून, लांडी-लबाडी केली की, काय होतं हे कळलं का दादा? म्हणूनच म्हणतात, `जेणो काम तेणो थाय, बिजा करे सो गोता खाय.'!

# ८.२३ कोटास जेवण

(टर्की लोककथा)

कोणे एके काळी टर्की देशात 'नासर्टीन होका' नावाचा एक गमतीशीर आणि हुशार माणूस राहत होता. ठिगळाचा कोट, डोक्याला पांढरी पगडी असा पोशाख असायचा. त्याच्याकडे एक करड्या रंगाचे गाढव होते. या गाढवावर बसून तो गावभर हिंडत असे. गावात कुणाला काही अडचण असेल तर त्यांना मदत करीत असे. एके दिवशी गावातून फिरत असताना त्याला कळले की, गावाबाहेरच्या धर्मशाळेत प्रचंड आरडाओरड आणि गोंधळ चालू आहे. बकरीचं पिलू दोरी तोडून धर्मशाळेच्या स्वयंपाकघरात उड्या मारत फिरत होतं. स्वयंपाकघरातल्या चिनीमातीच्या डिशेस फुटल्या. तेलाची बरणी कलंडली, घरभर तेल पसरले. धर्मशाळेतील स्वयंपाकी आणि मुक्कामाला राहिलेले प्रवाशी बकरीला पकडण्याचा प्रयत्न करीत होते. सांडलेल्या तेलावरून लोक घसरून पडत होते. अशा आगाऊ बकरीला पकडण्यासाठी काहीतरी युक्ती केली पाहिजे, असा विचार करीत होका तेथे पोहचला.

होकाजवळ एक सफरचंद होते. त्याने सफरचंदाचे तुकडे करून तिथे रांगेने मांडले. सफरचंद खाण्यासाठी बकरी होकाच्या दिशेने आली. होकाने बकरीला हळूच उचलले आणि पिंजऱ्यात बंद केले. सगळ्या प्रवाशांनी आणि आचाऱ्याने सुटकेचा श्वास सोडला. होकाने केलेल्या कामगिरीची प्रशंसा कण्यासाठी धर्मशाळेच्या मालकाने त्याला सगळ्यांसोबत जेवणाचे आमंत्रण दिले. होका नम्रपणे म्हणाला, "आपल्या सोबत जेवणाचा आनंद घेतला असता. परंतु आज मला मित्राकडे पार्टी आहे. आपल्याला मदत केल्याचा मला आनंद आहे. तुमच्या आमंत्रणासाठी मी आभारी आहे."

सगळ्यांचा निरोप घेऊन होका धर्मशाळेबाहेर आला. बाहेर येताच होकाच्या लक्षात आले की, संध्याकाळ होत आली आहे. आपला कोटही तेलकट झाला

आहे. घरी जाऊन, कपडे बदलून पार्टीला जायचे तर फारच उशीर होईल. त्यामुळे होकाने आहे त्याच पोशाखात पार्टीला जायचे ठरवले. आपल्या करड्या रंगाच्या गाढवावर स्वार होऊन थोड्याच वेळात तो मित्राच्या घरी पोहचला.

होकाने दारावर टकटक केले. काही क्षणातच मित्राने दार उघडले. होकाचे तेलकट वासाचे कपडे पाहून मित्राने पाठ फिरवली आणि तो सरळ आत निघून गेला. अर्थात मित्रापाठोपाठ होकाही घरात आला. पार्टीला जमलेल्या मित्रांना हस्तांदोलन करण्यासाठी होका पुढे आला. परंतु कुणीही हस्तांदोलनासाठी हात पुढे केला नाही. कुणीच होकाशी बोलत नव्हते. आपल्याला उशीर झाल्यामुळे मित्रांना राग आला असावा, असा विचार करीत होकाने त्याच्या मित्राजवळ बसण्याचा प्रयत्न केला. परंतु होकाशी न बोलताच सगळे मित्र उठले आणि जेवणाच्या टेबलाशी जाऊन बसले. होकाला हे सगळेच वातावरण वेगळे वाटले. नेमके काय झाले आहे, हे त्याला कळत नव्हते.

थोड्याच वेळात मित्राच्या नोकराने सगळ्यांना जेवण वाढले. परंतु होकाला मात्र जेवण वाढले नाही. तरीही बराच वेळ होका बसून राहिला. काहीतरी विषय काढून प्रत्येकाशी बोलण्याचा प्रयत्न करीत राहिला. पण कुणीच त्याला प्रतिसाद दिला नाही.

सगळेच मित्र आपल्यावर नाराज आहेत, हे पाहून होकाला एक कल्पना सुचली. होका उठला. आपल्या घरी आला. साबण लावून गरम पाण्याने आंघोळ केली. चंदनाची सुगंधी पावडर लावली. सोनेरी रेषांचा रेशमी कोट घातला. मोत्याचे दागिने घातले. चकाकणारे नवे बूट घातले. आरशासमोर उभे राहून आपण नीटनेटके दिसत असल्याची खात्री केली. आपल्या लाडक्या गाढवाच्या पाठीवर गालीचा टाकला, आणि मोठ्या रूबाबात घराबाहेर पडला. थोड्याच वेळात परत मित्राच्या घरी आला. मित्राच्या नोकराने दार उघडले. रूबाबदार होकाला त्याने आदरपूर्वक नमस्कार करून जेवणाच्या टेबलाशी नेले. सगळ्या मित्रांनी हसतमुखाने होकाचे स्वागत केले.

नोकराने जेवणाचे ताट आणले. यजमान मित्र म्हणाला, “माझ्या प्रिय मित्रा, सावकाश जेव. आम्ही सर्व तुझ्यासाठीच थांबलो आहोत.” होकाने स्मितहास्य करीत मान डोलावली; आणि पोळी-भाजीचा घास कोटाच्या आत टाकीत कोटाला म्हणाला, “कोटा बाबा, खा मनापासून. आजचे जेवण तुलाच आहे.” हळूहळू ताटातला सुकामेवा, फळे सारे काही त्याने कोटाला दिले. त्यानंतर त्याने हलकेच कोटाचे बटन लावले.

होकाचे हे विक्षिप्त वागणे पाहून सगळे मित्र चकित झाले. अखेरीस यजमान मित्र म्हणाला, “मित्रा तू हे काय करतो आहेस?”

होका म्हणाला, “अरे मित्रा असे काय विचारतोस? तू माझ्या कोटालाच जेवण दिलेस ना? आधी मी जुने तेलकट कपडे घालून आलो तेव्हा तू माझ्याशी बोलला नाहीस, मला जेवण दिले नाहीस! आणि आता मी नवा रेशमी कोट घालून आलो तर मला अगत्याने जेवण दिलेस! याचा अर्थ तुझे हे जेवणाचे आमंत्रण मला नसून माझ्या रेशमी कोटालाच होते. म्हणूनच मी तुझ्या इच्छेचा मान राखून कोटाला जेवण दिले.”

होकाचे बोलणे ऐकून सगळ्यांनी शरमेने माना खाली घातल्या. होका उठला आणि आपल्या मित्रांना उद्देशून म्हणाला, “मित्रांनो, आपल्या माणसाने परिधान केलेल्या कपड्यांपेक्षा, त्याच्या उंची पोशाखापेक्षा आपण आपल्या माणसांना, आपल्या खऱ्या मित्रांना ओळखले पाहिजे. कपडे, पोशाख बदलता येतात; पण मित्र, आपली माणसं बदलता येत नाहीत. चकचकीत भारी किंमतीचा कोट किंवा पोशाख हे मैत्रीचं वैभव नसून प्रेमाचा जिव्हाळा, निरपेक्ष प्रेम हेच खरं मैत्रीचं लक्षण असतं. ज्याला मित्राच्या मनातील प्रेम, आपुलकी, वात्सल्य ओळखता येतं तोच खरा मित्र. अशा मैत्रीत राग, द्वेष, मत्सर, हेवेदावे या गोष्टींना स्थान नसते. त्या सर्व विकारांना हद्दपार केलेले असते. भारी कपड्यातील, दागदागिन्यांनी सजलेली माणसे तशी छानच दिसतात; पण गुणवान मित्र साध्या वेशातही त्याहून अधिक रूबाबदार दिसतो, आपला सखा, मित्र, दोस्त म्हणून तो आपल्याला अधिक शोभून दिसतो."

यजमान मित्र खजील झाला. त्याला आपली चूक कळली आणि होकाच्या निखळ मैत्रीचा प्रत्ययही आला. “होकाने दिलेला शहाणपणाचा गुरूमंत्र आपण सगळ्यांनी आचरणात आणला पाहिजे; आणि म्हणूनच आता आपण खऱ्या पार्टीला सुरुवात करूया.” असं म्हणून यजमान मित्राने सर्वांना पुन्हा एकदा पार्टीचा आनंद लुटण्यासाठी आमंत्रित केले. मधुर संगीत लावले. फटाक्यांची आतषबाजी केली. होकासह सर्व मित्र फेर धरून नाचू लागले. या खेळकर वातावरणाचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर ओसंडताना दिसत होता.

तात्पर्य काय, प्रत्येकाच्या मनात होकासारखा निरागस आनंदाचा रत्नदीप उजळत राहिला तर सर्व समाजात आनंदाचे, समाधानाचे, तृप्तीचे मोर नाचताना दिसतील!

[‘होका’ हा टर्किश शब्द आहे. त्याचा अर्थ ‘शिक्षक’ असा असून ‘नासर्टिन होका’ म्हणजे विवेक, शहाणपण आणि सहज-स्वाभाविक विनोद करणारी व्यक्ती असा होतो. तुर्कस्थानातील Akcehir या गावात हा नासर्टिन राहत होता. जन्म १२०८ आणि मृत्यू १२८४. आजही ५ जुलैला नासर्टिन होकाच्या स्मृतिप्रित्यर्थ सर्जनशीलतेचा उत्सव (festival of creativity) साजरा केला जातो. त्यात अनेक कलावंत सहभागी होऊन नवनिर्मिती सादर करतात.]

# ८.२४ लाकुडतोड्याची गोष्ट

एक लाकूडतोड्या होता. तो रोज सकाळी उठायचा. जंगलात जायचा आणि लाकडे तोडायचा. नंतर लाकडाची मोळी बांधायचा. जवळच्या गावात मोळी विकायला जायचा. जे पैसे मिळतील त्यातून पोळीसाठी गहू, भातासाठी तांदूळ, वरणासाठी डाळी, भाजी, दूध विकत घ्यायचा आणि घरी यायचा. लाकूडतोड्याची बायको चविष्ट जेवण बनवायची. पोटभर जेवण करून लाकूडतोड्या झोपी जायचा. सकाळी उठून पुन्हा त्याचा दिनक्रम सुरू व्हायचा.

एके दिवशी नित्यनेमाप्रमाणे कुऱ्हाड घेऊन लाकूडतोड्या जंगलात आला. एक तळ्याकाठच्या झाडाखाली जेवणाचा डबा ठेवला, कुऱ्हाड घेऊन झाडावर चढला. एका फांदीवर कुऱ्हाडीचा घाव घालताच कुऱ्हाड तळ्यात पडली. लाकूडतोड्या झाडावर उतरला आणि तळ्याकाठी झाडाच्या सावलीत निराश मनाने बसला. बिचारा लाकूडतोड्या, आता लाकूड मिळाले नाही तर मोळी कशी बांधणार? विकणार कशी? पैसे कसे मिळणार? पैसे नसतील तर जेवण कसं मिळणार? असे अनेक प्रश्न त्याच्यासमोर उभे राहिले.

इतक्यात पांढराशुभ्र गुबगुबीत ससा तेथे आला. त्याने लाकूडतोड्याला विचारले, “काय रे बाबा, असा उदास बसलास!” लाकूडतोड्याने आपली कुऱ्हाड तळ्यात पडल्याचे संगितले. ससा म्हणाला, “बाबा, काळजी करू नको. मिळेल तुझी कुऱ्हाड!” सशाने ही गोष्ट जंगलातील हरीण, मोर, वाघ, गेंडा, इ. प्राण्यांना सांगितली. हळूहळू सगळ्या जंगलात ही वार्ता पोहोचली.

थोड्याच वेळात तळ्यामागून एक जलदेवता वर आली. तिनेही लाकूडतोड्याला विचारले, “काय रे बाबा, तू असा उदास दिसतोस! लाकूडतोड्या म्हणाला, “अगं देवी माझी कुऱ्हाड तळ्यात पडली आहे. त्यामुळे मला लाकडे तोडता येत नाहीत.” देवी म्हणाली, “बाबा, काळजी करू नकोस,” असं म्हणून देवी पाण्यात गडप झाली. थोड्याच वेळाने देवीने सोन्याची कुऱ्हाड

आणली आणि “हीच कारे बाबा तुझी कुऱ्हाड?” असे विचारले. तर लाकूडतोड्या म्हणाला, “नाही गं बाई, ही माझी कुऱ्हाड नाही!” देवी पुन्हा तळ्यात गडप झाली. थोड्याच वेळात पुन्हा चांदीची कुऱ्हाड घेऊन आली. तेव्हा लाकूडतोड्या म्हणाला, “नाही गं देवी ही माझी कुऱ्हाड नाही,” देवीने पुन्हा पाण्यात बुडी मारली आणि लोखंडाची कुऱ्हाड घेऊन आली. लाकुडतोड्याला खूप आनंद झाला. त्याने लोखंडी कुऱ्हाड घेतली. देवीने लाकूडतोड्याचा प्रामाणिकपणा पाहून लाकूडतोड्याला सोन्याची, चांदीचीही कुऱ्हाड भेट दिली.

लाकूडतोड्याने सोन्याची, चांदीची कुऱ्हाड झाडाखाली ठेवली आणि लोखंडी कुऱ्हाडीने लाकडे तोडण्यास सुरुवात केली. लाकडाची मोळी बांधली. त्यावर चांदीची, सोन्याची कुऱ्हाड ठेवली. बाजारात लाकडे विकली. रोजचे किराणा सामान घेतले आणि घरी आला.

लाकूडतोड्याच्या बायकोने सोन्याची, चांदीची कुऱ्हाड पाहून विचारले, “या दोन कुऱ्हाडी कशा आणल्या?” लाकूडतोड्या म्हणाला, “आज जंगलात तळ्याकाठी झाडावरची फांदी तोडताना कुऱ्हाड पाण्यात पडली. जलदेवतेने आधी सोन्याची, नंतर चांदीची आणि शेवटी लोखंडाची कुऱ्हाड आणली. पण आपली लोखंडाची कुऱ्हाड मी ओळखली. म्हणून जलदेवतेने मला सोन्याची आणि चांदीची कुऱ्हाड भेट दिली. अशा या तीन कुऱ्हाडी आहेत. आणि खरं सांगू का, या सोन्या-चांदीच्या कुऱ्हाडी केवळ शोभेसाठीच चांगल्या आहेत. सोन्या-चांदीच्या कुऱ्हाडींनी काही लाकडं तोडता येत नाहीत. शेवटी आपली लोखंडाचीच कुऱ्हाड बरी!”

आपल्या नवऱ्याचा प्रामाणिकपणा आणि कष्टाळूपणा पाहून लोकूडतोड्याच्या बायकोला खूप आनंद झाला. जलदेवतेचा कृपाप्रसाद म्हणून चांदीची आणि सोन्याची कुऱ्हाड देवघरात ठेवली. पूजा केली. देवाला नमस्कार करून म्हणाली, “देवा, सोन्या-चांदीपेक्षा रोज पोटभर कष्टाची भाकरी मिळविण्यासाठी माझ्या नवऱ्याचे हातपाय बळकट असू दे एवढीच प्रार्थना!” असं म्हणून लाकूडतोड्याची बायको झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी लाकूडतोड्या जंगलात गेला. झाडाखाली जेवणाचा डबा

ठेवला. कुऱ्हाड घेऊन झाडावर चढणार इतक्यात वाघ, गेंडा, हरीण, मोर, ससा असे जंगलातील अनेक प्राणी-पक्षी लाकूडतोड्याभोवती जमा झाले. सगळ्यांनी एकसुरात लाकूडतोड्याला सांगितले, "आजपासून लाकडे तोडायची नाहीत. रोज लाकडे तोडली तर जंगलातील आमची सुरक्षितता धोक्यात येईल." लाकूडतोड्या म्हणाला, "तुमचं सगळं खरं आहे. पण मी लाकडे तोडली नाहीत तर मला पैसे मिळणार नाहीत. मी जेवण कसे करू?"

वाघोबा म्हणाले, "हे बघ बाबा तू या जंगलात फिरलास तर तुला अनेक फळं-फुलं मिळतील ती गोळा कर आणि ती फळंफुलं बाजारात जाऊन विक. रानमेवा खाऊन अनेक मुलं सुदृढ होतील."

वाघोबाचा पर्याय लाकूडतोड्याला उत्तम वाटला. लाकडे तोडून झाडांना इजा पोहोचविण्यापेक्षा, प्राणिमात्रांचे अस्तित्व धोक्यात आणण्यापेक्षा रानमेवा गोळा करणे कमी कष्टाचे होईल. प्राणी, पशुपक्षी, निसर्गाचेही जतन-संवर्धन होईल. आपणही जगू आणि इतरांनाही जगता येईल. लाकूडतोड्याने गुरुवर्य वाघोबांसमोर कुऱ्हाड तळ्यात टाकली. सर्व प्राणी-पक्ष्यांचे आणि वाघोबाचे आभार मानून लाकूडतोड्याने जंगलातील करवंदं-जांभळं गोळा केली. बाजारात जाऊन विकली. थोडे पैसे मिळाले. गरजेपुरता धान्य घेतले. घरी आल्यावर लाकूडतोड्याच्या बायकोने विचारले, "आज खूप कमी धान्य आणले." लाकूडतोड्याने गुरुवर्य वाघोबांनी सुचविलेला पर्याय सांगितला. लाकूडतोड्याची बायको म्हणाली, "ठीक आहे. उद्यापासून मी येईन तुमच्यासोबत. आपण दोघे मिळून रानमेवा गोळा करू."

हळूहळू जंगलातील नवनवीन फळांचा, फुलांचा शोध लागला. भरपूर फळं-फुलं मिळू लागली. दिवसेंदिवस पैसेही जास्तीचे मिळू लागले. एके दिवशी लाकूडतोड्याची बायको म्हणाली, "आपण एक दुकानासाठी जागा घेऊ. सकाळी फळं-फुलं जमा करायची. दुपारी दुकानात आणून विकायची. लाकूडतोड्याला ही कल्पना खूप आवडली. 'रानमेवा' दुकान सुरू झाले.

(पुनःकथन : डॉ. मंगला रमेश वरखेडे, ब्रेन टॉनिक मासिक, ऑगस्ट २०१५)

# ८.२५ पैजेचा विडा

(मराठी लोककथा)

एका गावात एक गरीब लोहार राहायचा. त्याचं नाव बलदेव. अंगापिंडानं तो लोखंडाच्या कांबीसारखा दणकट होता. त्याच्या बायकोचं नाव मृत्तिका, आणि मुलाचं नाव कुमार. तो आईबापांचा फार लाडका होता. एक दिवस काय झालं की, बलदेवला जंगलातून फिरत असताना राजाच्या घरच्या दवंडीचा आवाज ऐकू आला.

"ऐका हो ऐकाऽऽ आपल्या या राज्याचे अधिपती पशुपतिमहाराज यांच्या राजवाड्याच्या पिछाडीला एक पडीत शेत आहे. हे शेत जो कोणी एका दिवसात नांगरील त्याला महाराजांचं अर्धे राज्य बक्षीस मिळेल आणि पैजेचा विडा उचलून जो हरेल त्याचं डोकं फोडलं जाईल होऽऽऽ"

बलदेवाला वाटलं, आपण ताकदवान आहोत. प्रयत्न करून पहावा, म्हणून दुसऱ्या दिवशी राजधानीच्या शहरात जाऊन त्यानं ते शेत पाहिलं. ते अगदीच लहान होतं. पण जमीन तव्याच्या पाठीसारखी कडक होती. बलदेवानं निश्चय केला. गावातल्या सुताराकडून त्यानं एक नांगर बनवून घेतला. लोखंडाचा एक दणकट फाळ तयार करून त्यानं तो स्वत: नांगराला बसवला. दोन धष्टपुष्ट बैल पैदा केले. त्याचा हा बेत मृत्तिकेला पसंत नव्हता. पण तिच्या विरोधाकडे त्यानं कानाडोळा केला. जाहीर केलेल्या दिवशी तो दरबारात गेला आणि त्यानं पैजेचा विडा उचलला. आणि मग दुसऱ्याच दिवशी सकाळी त्यानं त्या शेतात नांगर घातला. पण घटकाभरातच नांगराचा फाळ तुटला व तो नांगर मोडून पडला. आता काय करायचं ? बलदेव पैज हरला. राजाच्या मारेकऱ्यानं त्याच दिवशी त्याचं डोकं धडावेगळं केलं.

मृत्तिका धाय मोकलून रडली. पण तिनं बेत केला. तिनं गावातलं घर सोडलं. गावाबाहेर एक झोपडी बांधून ती तिथे रहायला गेली. कुमार अजून लहान होता.

त्याला रोज दूध मिळावं म्हणून तिनं एक गाय घेतली. रोज सकाळी उठून जंगलात जावं, लाकूडफाटा तोडावा, त्याची मोळी बांधावी आणि ती गावात आणून विकावी असा उद्योग तिनं सुरू केला. गाईचं चारापाणी नेहमीच कुमार करायचा म्हणून रोज रात्री झोपताना कुमारला जवळ घेऊन त्याची आई म्हणायची, "बाळा, तू मोठा हो, बलदंड हो. आपल्या गाईला जे दोन गोऱ्हे होतील त्यांना आपण चांगलंचुगलं खायला घालून बळकट बनवू. पशुपतिमहाराजांचं काळीज उलटं आहे. तुझ्या बापाला त्यांनी हकनाक मारलं. त्याचा तो अघोरी पण अजून कोणी जिंकला नाही. तू बरीक तो जिंकावा असं मला वाटतं बघ. आपण सगळी तयारी करू."

असेच दिवस येत जात होते. कुमार मोठा होत होता. पण त्या गाईला गोऱ्हा काही होईना. मृत्तिका निराश झाली. एक दिवस मग ती कुमारला म्हणाली,

"बाळा आपलं नशीब फुटकं, आपली गाय भाकड निघाली. तू उद्या हिला जंगलात घेऊन जा आणि सोडून दे."

दुसऱ्या दिवशी कुमार गाईला घेऊन जंगलात गेला. एका झाडाच्या खोडाला त्यानं ती गाय दोरीनं बांधली. त्याचा त्या गाईवर जीव होतां. तिच्या पाठीवर थाप मारून भरल्या डोळ्यांनी तिचा निरोप घेऊन तो परत फिरला; पण जंगलाच्या बाहेर पडताना त्याच्या कानांवर एक आवाज आला. एक मैना काटेरी झुडपात अडकली होती. ती ओरडत, थिरकत होती. कुमार तिच्याजवळ गेला. त्यानं तिला बाहेर काढलं. तिच्या अंगात काटे घुसले होते. एक पंख तर पारच फाटून गेला होता. कुमारने तिच्या अंगातले काटे हलक्या हाताने काढले. जखमी मैनेला घेऊन तो घरी आला.

एका जुन्या टोपलीत कापूस पसरून त्यानं तिला निजवलं. तो रोज तिला खायला घालू लागला. पाणी पाजू लागला. काही दिवसांनी मैनेच्या जखमा बऱ्या झाल्या. ती झोपडीत हिंडू फिरू लागली. मधूनच गाऊ लागली. कुमार तिला कुरवाळी, तिचे लाड करी, तिचे पापे घेई. तिचा दुखावलेला पंख बरा झाला. ती कुमारच्या अंगाखांद्यावर खेळू लागली. तिच्या पंखात ताकद भरली आणि मग

एक दिवस ती भुर्रदिशी कुठं तरी उडून गेली. कुमारला वाईट वाटलं. तो जंगलात जाऊन तिची वाट बघत बसला.

इकडे पशुपती राजानं या वर्षी नवीनच शक्कल लढवली. त्याला एकच मुलगी होती. एखाद्या परीप्रमाणं ती फार सुंदर होती. पशुपतीनं यंदा राजकन्येचं स्वयंवर मांडलं व पण लावला. जो कोणी पैज जिंकेल त्याला अर्धे राज्य तर मिळेलच पण राजकन्येशी त्याचं लग्नही होईल. ही दवंडी देत राजाचे सेवक गावोगाव हिंडू लागले.

होता होता एक दिवस लाकडांची एक भली मोठी मोळी बांधून कुमार जंगलातून घरी जायला निघाला. तेवढ्यात त्याच्या कानांवर त्या मैनेचा त्याच्या ओळखीचा आवाज आला. कुमारने आनंदानं तिला हाक मारली. ती त्याच्या खांद्यावर येऊन बसली. कुमारने प्रेमाने तिला पोटाशी धरली. तिचे पापे घेतले. तो तिला म्हणाला, "मैने, मैने, आता नको मला सोडून जाऊस. चल माझ्या घरी, मी नाही तुला सोडणार."

तेवढ्यात मैना त्याच्या हातून सुटली आणि एका फांदीवर जाऊन बसली. कुमार तिला धरायला धावला पण ती दूरदूर जात होती. कुमार तिचा पाठलाग करीत होता. ती पुढं न् हा मागं धावतच होते. असं होतां होता अंधार पडला. दिवस कधी बुडाला ते कुमारला कळलेच नाही. मैना एकदम दिसेनाशी झाली. मग तो भानावर आला. बघतो तर गुडूप अंधार. बाहेर कसं पडावं ते त्याला उमजेना. बराच वेळ तो चाचपडत भटकत राहिला.

शेवटी त्याला दूरवर प्रकाशाचा एक बारकासा झोत दिसला. त्या दिशेनं तो जात राहिला. जराशानं त्याला दिवा दिसला. झाडांची दाटी विरळ झाली होती. मोकळ्या जागेत, एका झोपडीत तो दिवा जळत होता. त्याला हायसं वाटलं.

झोपडी समोरच्या अंगणात दोन बैल होते. विलक्षण धष्टपुष्ट. जवळच एक गाय होती. त्या मंद प्रकाशात कुमारनं तिला ओळखलं. ती त्याचीच गाय होती. तो पुढं सरकला. त्यानं तिच्या गळ्याला मिठी मारली. तेवढ्यात झोपडीतून एक म्हातारी बाहेर आली. तिच्या खांद्यावर त्याची मैना बसलेली होती. ह्याला बघून

ती म्हातारी म्हणाली,

"माझ्या या मैनेला तूच वाचवलंस नाही का बाळ?"

"होय."

"तुझ्या उपकारांची फेड मी आधीच केली. तुझ्या गाईला मी वाचवलं."

"पण हे बैल?"

"या बैलांना हिनंच जन्म दिला. बघ कसे हत्तीसारखे बैल आहेत हे"

"मला हे बैल हवे आहेत. नेऊ का मी?"

"ने की. तुझेच आहेत हे. गाय बरीक राहू दे. मला तिचा फार लळा लागला आहे. ही गाय अन् ही माझी मैना यांच्या जिवावर मी उरलेले दिवस काढीन. तू आज रात्री इथंच रहा. चल, मी तुला जेवायला वाढते." कुमार जेवला. त्या रात्री तो तिथंच झोपला. सकाळी उठून बैलांना घेऊन तो परत फिरला. मृत्तिका काळजीनं हैराण झाली होती. कुमारला पाहून तिचा जीव वर आला. बैलांना पाहून तर तिचा आनंद गगनात मावेनासा झाला.

कुमारनं सांदीला पडलेला बापाचा भाता बाहेर काढला. ऐरण, हातोडा ही आयुधं सरसावून त्यानं भट्टी पेटवली. लोखंडाचे तुकडे जमवून त्यानं जोडणीला सुरुवात केली. मृत्तिकेनं लोखंड तापवून लाल करावं आणि कुमारने घणाचे घाव घालून त्याला आकार द्यावा. असा त्यांनी रात्रंदिवस कामाचा पिट्टा पाडला. थोड्याच दिवसांत संपूर्ण लोखंडाचा एक अजस्त्र नांगर तयार झाला, तो पाहून गावकऱ्यांनी अचंब्यानं तोंडात बोटं घातली.

इकडे तोवर पशुपती राजानं दरबार भरवला. राजा सिंहासनावर बसला होता. त्याच्या पुढ्यात चांदीचा चौरंग होता. चौरंगावर सोन्याचं तबक होतं. तबकात पैजेचा विडा ठेवलेला होता. राजानं नेहमीचं आव्हान दिलं. कुमार पुढं सरकला. त्यानं साधेच, पण स्वच्छ कपडे घातले होते. मुजरा करून तो म्हणाला,

"महाराज, हा पैजेचा विडा मी उचलतो."

"तू तर कोवळा दिसतोस. ही हिंमत करणाऱ्यांची आतापर्यंत काय दशा

झाली ते तुला माहीत आहे ?”

“हो माहीत आहे. या शहराच्या वेशीवर आपण आतापर्यंतची डोकी लटकावली त्यातलं एक माझ्या बापाचं होतं.”

“मला माहीत आहे. माझे हेर मला सगळ्या बातम्या अचूक देतात. तू त्या बलदेव लोहाराचा मुलगा नाहीस का?”

“होय. माझ्या बापानं मारलेली पैज मी आज पुरी करणार आहे.” राजा खूप मोठ्यानं हसला व मारेकऱ्याला उद्देशून म्हणाला, “येऽऽ तुझी तलवार तू तयार ठेव.”

कुमार दुसऱ्या दिवशी पहाटेच उठला. त्यानं स्नान करून देवाचं दर्शन घेतलं. तो बैलांना घेऊन राजवाड्याच्या पिछाडीशी आला. मृत्तिका बरोबर होतीच. नांगराला बैल जोडून तो तयार झाला. शहरातले लोक त्या दिशेनं लोंढ्यांनी येत होते. भरजरी कपडे घातलेले पशुपती महाराज जागेवर येऊन हजर झाले. त्यांच्यासाठी व दरबारातल्या मानकऱ्यांसाठी एक प्रशस्त तंबू उभारला होता. त्यात लहानमोठी आसनं ओळीनं मांडून ठेवली होती. राजा उंच आसनावर बसला. सरदारदरकरांनी तंबू गच्च भरला. लोकांची थाप गर्दी जमली होती.

उगवतीच्या डोंगरावर सूर्याच्या लाल गोळ्याची किनार दिसू लागली. राजानं खूण करताच येसकरानं तुतारी तोंडाशी नेली. गाल फुगवून त्यानं तुतारी फुंकली. कुमारनं बापाचं स्मरण करून हात जोडले. वाकून त्यानं आईच्या पायांना हात लावले. त्याला उठवून पोटाशी धरून मृत्तिका म्हणाली,

“बाळा, यशस्वी हो.”

कुमारनं शेतात नांगर घातला. रेटा देऊन त्यानं त्या टणक जमिनीत नांगराचा फाळ खुपसला. बैलांनी हिसका देताच जमिनीचे कवच फुटले आणि ढेकळे बाहेर पडली. नांगरट सुरू झाली. बैल नांगर ओढीत होते. कुमार दोन्ही हातानी जोर लावीत होता. जमीन फुटत होती. बैलांना जोर चढला. ते धावत सुटले. एक सर पुरी झाली. कुमारने नांगर फिरवला आणि बैलांना वळवले.

दुसऱ्या सरीचं काम सुरू झालं. दिवस वर चढत होता. सरीमागून सरी संपत होत्या. लोक टाळ्या वाजवीत होते. मृत्तिका पापण्या न हलवता एकटक बघत होती. राजाची भिवई वर चढली होती.

दिवस डोक्यावर चढला. बैल धापा टाकीत होते. घामानं ओलेचिंब झाले होत.. कुमारची घेरदार छाती भात्यासारखी फुसफुसत होती, अंगातून पाझरणाऱ्या घामाच्या धारा मातीत मुरत होत्या. त्याला तहान लागली होती. मृत्तिका पाण्याचा तांब्या घेऊन शेतात शिरली. राजा ओरडला,

"ओढा त्या थेरडीला मागं. पैजवाल्यानं पाणी प्यायचं नाही." "पण महाराज, या पूर्वी आपण पाणी देत होतो." एकजण पुटपुटला.

"या खेपेस आमची परवानगी नाही." राजा गुरगुरला.

मृत्तिका मुकाट्यानं मागं सरकली. कुमारची नजर समोर रोखलेली होती. एक क्षणही वाया घालवायचा त्याची तयारी नव्हती. शेताचा अर्धा भाग नांगरून झाला होता.

दुपार उलटली. उन्हे उतरू लागली. लोकांना उत्साह चढला. टाळ्या पिटून व मोठमोठ्याने ओरडून ते कुमारला प्रोत्साहन देत होते. मृत्तिकेचा चेहरा आनंदाने फुलत होता. आता शेताचा थोडाच भाग शिल्लक उरला होता. यश टप्प्यात आलं होतं.

शेताच्या पलीकडच्या टोकाशी एक मुलगी उभी होती. ती सुंदर होती. तिच्या अंगावरले कपडे मळके व फाटके होते. केस पिंजारल्यासारखे दिसत होते. ती कुमारला म्हणाली,

"हे तरुणा, शाबास तुझी! मला तू फार आवडतोस. तुझं नाव काय?"

"चल, निघ इथून, मला तुझ्याशी बोलायला वेळ नाही." कुमार तिच्या अंगावर खेकसला.

"नको बोलू, पण तुझ्यासाठी मी एक भेट आणली आहे. तिचा स्वीकार कर."

डोळे उचलून कुमारनं तिच्याकडे पाहिलं. तिचं लावण्य बघून तो चकित झाला. तिच्या हातात कमळाचं एक सुंदर फूल होतं. ते कुमारला देण्यासाठी तिनं हात पुढं केला. किती गोड मुलगी! किती सुंदर फूल! ती मुलगी गोड गोड

हसली. त्यानं तिच्या हातातलं फूल घेतलं आणि ते आपल्या नाकाशी लावलं. त्याच क्षणी तो जमिनीवर कोसळला.

ती तरुणी विजेच्या चपळाईने निघून गेली. लोकांच्यामध्ये गडबड उडाली. कुमारची आई धावली. पहारेकऱ्यांनी तिला अडवून धरलं. ती छाती पिटीत रडू लागली. राजाचा चेहरा आनंदाने फुलला.

एवढ्यात एक मैना भुर्रदिशी आली आणि एका बैलाच्या वशिंडावर बसून आवाज करू लागली. तिथून लगेच उतरून ती कुमारच्या कपाळावर बसली. त्याच्या तोंडावर ती जोरजोराने चोच मारू लागली. इतक्या जोरानं की रक्ताच्या चिळकांड्या उडू लागल्या. कुमार चुळबूळ करू लागला. त्यानं डोळे उघडले. ताडकन उठून तो उभाराहिला. मैनेला कुरवाळून त्यानं तिचा एक पापा घेतला आणि बैलांच्या शेपट्या पिरगाळल्या. दिवस मावळायला थोडाच अवधी होता. लोक दात खाऊन ओरडू लागले. बैल वाऱ्यासारखे पळू लागले. कुमार जिवापाड धावत सुटला. सूर्यदेव मावळायला आणि शेवटची सर पुरी व्हायला एकच गाठ पडली. मृत्तिकेने सुटकेचा निःश्वास सोडला.

कुमारनं जमिनीवर अंग टाकलं आणि तो गप्प पडून राहिला. मृत्तिका धावत त्याच्याजवळ गेली. आपल्या कानशिलावर बोटे मोडून तिनं त्याची अलाबला घेतली. लोकांनी त्याचा जयजयकार केला.

दुसऱ्या दिवशी दरबार भरला.भरजरी वस्त्रे नेसलेली राजकन्या हातात कमळांची माळ घेऊन उभी होती. राजानं कुमारला पुढं येण्याची खूण केली. कुमारनं राजकन्येकडं पाहिलं आणि त्याला चटकन् ओळख पटली. आदल्या दिवशी त्याला कमळाचं फूल देणारीच होती ती! दोघांची नजरभेट झाली. राजानं दोघांचं थाटात लगीन करून दिलं. सगळीकडे मग आनंदी आनंद झाला.

(पुनःकथन : श्री. ग. ल. ठोकळ)

# ८.२६ तलवारीचा सैतान

(बिहारची लोककथा)

एका हवेलीत एक दुःखी स्त्री रहात होती. तिला मूलबाळ होत नव्हते. म्हणून सगळे तिला वाईट वागणूक देत असत. ती काही न बोलता शांतपणे पती आणि कुटुंबियांची मनापासून सेवा करीत असे.

मनाला विरगुंळा हवा म्हणून तिने मातीची एका बालकाची मूर्ती बनविली. वेळ मिळताच ती त्या मूर्तीजवळ बसून त्याचाशी बोलत असे. जणू काय, तो जिवंत बालक आहे. जेवण्याच्या वेळेस ती त्याला खोटं खोटं भरवीत असे आणि देवाजवळ मूलबाळ व्हावं म्हणून प्रार्थना करीत असे.

त्या स्त्रिला दोन मुलं झालीत. जशी जशी मुलं मोठी होऊ लागली तशी तशी ती त्या मूर्तीला पण मोठं बनवीत असे.

एकदा तिचा पती आजारी झाला. वाचावयाची खात्री नव्हती. त्याने दोन्ही मुलांना जवळ बोलविले आणि दोघांमध्ये संपत्ती वाटून दिली. त्याचवेळेस एक आवाज ऐकू आला. मातीपासून बनविलेला मुलगा हातात तलवार घेवून समोर उभा होता. तो तलवार दाखवित म्हणाला की संपत्तीचे तीन भाग करा नाही तर मी तुम्हा सगळ्यांना मारून टाकीन आणि त्याने तलवार आजारी वडिलांच्या गळ्यास लावली.

वडिलांनी घाबरून संपत्तीचे तीन भाग केले. पण तो दटावून म्हणाला, “मला कमी हिस्सा मिळाला आहे. मी मोठा आहे तेव्हा मला जास्त हिस्सा मिळावयास हवा.” आणि त्याने तलवारीच्या जोरावर सगळी संपत्ती हस्तगत केली आणि त्या दोघा भावांना घराच्या बाहेर हाकलून दिले.

तेव्हापासून दोघे भाऊ त्या तलवारवाल्या सैतानशी सतत लढत आहे. पण त्यांना अजून तलवार मिळाली नाही.

(डॉ. मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ८.२७ दोन भाऊ

(जापानची लोककथा)

फार पूर्वीची गोष्ट आहे. एका गावात दोन भाऊ राहत होते. मोठा भाऊ खूप श्रीमंत आणि लहान भाऊ अत्यंत गरीब होता. एकदा जेव्हा सर्व लोक नवीन वर्षाचा आनंद लुटत होते; त्यावेळी लहान भावाजवळ खायला पण काहीच नव्हते. त्याने मोठ्या भावाकडे जाऊन थोडे तांदूळ उधार मागितले. पण त्याने देण्यास नकार दिला. जेव्हा तो भावाकडून निराश होऊन परतत होता तेव्हा त्याला रस्त्यात एक म्हातारा भेटला त्याच्या डोक्यावर एक लाकडाची मोळी होती. म्हाताऱ्याने त्याला विचारले, "काय झालं. तू इतका उदास आणि चिंतित का दिसतोय."

लहान भावाने आपली व्यथा सांगितली. म्हातारा त्यास धीर देत म्हणाला, "जर तू ही लाकडाची मोळी माझ्या घरी पोहचविली, तर मी तुला अशी वस्तु देईन की त्यामुळे तू श्रीमंत होशील."

लहान भावाने पटकन ती मोळी डोक्यावर ठेवली आणि त्या म्हाताऱ्याच्या मागे चालू लागला. घरी पोहचल्यावर त्याने त्याला एक जातं दिलं आणि सांगितलं, "पहा, हे जातं काही साधारण जातं नाही. ह्या जात्याला उजवीकडे फिरविले तर तू जी वस्तू मागशील ती तुला तोपर्यंत मिळत राहील जोपर्यंत तू हे जातं उजवीकडे फिरवित राहशील."

तो लहान भाऊ ते जातं घेवून घरी आला. त्याची बायको उपाशी होती व त्याची वाट पहात होती. या नवऱ्याने येताच तिला आत जाऊन एक कपडा अंथरण्यास सांगितलं. त्याने कपड्यावर जातं ठेवल आणि त्यास उजवीकडे फिरवित सांगितलं की, "तांदुळ हवे." म्हणताच तांदुळाचा ढीग लागला. मग त्याने मासोळ्या मागितल्या तर मासोळ्या मिळाल्या. त्यानंतर आपल्या गरजेच्या सर्व वस्तू मिळविल्या. मग त्या जात्यांकडून एक सुंदर महाल आणि

त्या महालाला सुंदर सामानांनी सजवून घेतलं. आता तो ऐटीत राहू लागला. नवीन वर्षानिमित्त त्याने शेजारी तसेच मित्रांना जेवणासाठी आमंत्रित केलं.

लहान भावाचा हा थाटमाट पाहून मोठा भाऊ विचार करू लागला की काही दिवसांपूर्वी तर हा महादरिद्री होता. आज इतका श्रीमंत कसा झाला. नक्कीच कांही तरी गुपित असावं. एक दिवस तो चुपचाप लहान भावाच्या घरात शिरला आणि दाराच्या आड उभा राहिला. तेव्हा काय पाहतो? त्याचा भाऊ एक जातं फिरवून मिठाईने पराती भरत आहे. हे पाहून तो आश्चर्यचकित झाला व ते जातं मिळविण्यासाठी उपाय शोधू लागला.

त्याच रात्री जेव्हा सर्व झोपले होते. तेव्हा मोठा भाऊ चोरासारखा घरात घुसला आणि ते जातं घेऊन पळून गेला. त्याने विचार केला की आता मी एका बेटावर जाऊन राहीन आणि ह्या जात्यामुळे लक्षाधीश होईन. हा विचार करून तो समुद्राजवळ आला आणि ते जातं घेऊन एक नावेत बसला. त्याने घरून निघतांना सर्व आवश्यक वस्तू घेतल्या होत्या. परंतु मीठ घेण्यास विसरला होता. तो खूप अंतर गेल्यावर जेव्हा भूक लागली आणि जेवायला बसला तर लक्ष्यात आलं मीठ नाही. तेव्हाच त्याच्या लक्ष्यात आलं की हे जातं तर आहे ना? त्याने जाते उजवीकडे फिरवून सांगितलं की “मीठ हवयं” लागलीच मीठ निघू लागलं. त्याची अडचण अशी झाली की जातं कसं थांबवायचं आहे हे त्याला माहीत नव्हते. पहाता पहाता मीठाचा ढीग होत गेला आणि तो जात्यासहित समुद्रात बुडाला.

लोकांचं म्हणणं आहे की ते जातं अजूनही फिरत आहे आणि त्यातून मीठ सतत निघत आहे. म्हणूनच समुद्राचे पाणी खारट आहे.

(मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ८.२८ पंजाबीचे भोजन

(काश्मीरची लोककथा)

एक पंजाबी आणि काश्मीरी असे दोन मित्र होते. एकदा पंजाबी आपल्या काश्मीरी मित्राकडे गेला. त्याने त्याचे यशोचित स्वागत केले. आणि विविध प्रकारचे बरेच स्वादिष्ट पदार्थ जेवणासाठी बनविले. तो पंजाबी म्हणाला, "मित्रा, तुझ्याकडील जेवण तर एखाद्या राजाच्या थाटमाटासारखे आहे. परंतु हे जेवण आमच्या गावातील जेवणाची बरोबरी करू शकणार नाही."

काही दिवसानंतर तो काश्मीरी आपल्या पंजाबी मित्राच्या गावी गेला. त्या पंजाबी मित्राने जेवणाच्या वेळेस गव्हाच्या चपात्या, दह्याची मोठी वाटी, आणि भाजीचा एक मोठा वाडगा आणून ठेवला. त्या काश्मिरी मित्राला वाटले. अजून काही चांगले पदार्थ येतील; पण त्याचा मित्र म्हणाला, "मित्रा! जेवण सुरू कर." काश्मिरी मित्राने चुपचाप जेवण केलं. तो तेथे आठवडाभर राहिला. रोज असेच साधे जेवण. निघताना त्याने विचारले, "मित्रा! मला हे कळले नाही की तू जेव्हा माझ्याकडे आला तेव्हा मी तुला विविध पदार्थ असलेले स्वादिष्ट जेवण दिलं. तू येथे मला साधे सामान्य पदार्थाचे जेवणं दिलं. तरी पण तू तेथे म्हणत होता की काश्मिरी जेवण आमच्या गावातील जेवणाची बरोबरी करू शकणार नाही. हे कसं काय?"

तेव्हा तो पंजाबी म्हणाला, "मित्रा! आम्ही गावातील भोळी व साधी माणसं आहोत. म्हणून आमचा स्वभाव आणि जेवणपण साधे असते. आमच्या उत्तम प्रकृती आणि संपन्नतेचे हेच रहस्य आहे. तुम्ही तेथे जेवणासाठी जे पदार्थ बनविले होते ते नक्कीच किंमती होते. तू येथे जे जेवण घेतले ते साधे होते परंतु त्यात जीवनश्यक घटक जास्त आहेत. मग महाग पदार्थांचा काय उपयोग?" काश्मिरी मित्र आपल्या पंजाबी मित्राशी सहमत झाला आणि तेथून एक नवीन व्यक्ती होऊन परतला. आता तो घरी साधे पण पोष्टिक जेवण घेत असतो.

# ८.२९ धन्य आहात तुम्ही

(पंजाबची लोककथा)

एकदा एक विद्वान पंडित बरेच ग्रंथ घेवून एका शहरातून जात होता. बोळीत राहणाऱ्या एका स्त्रीने त्याला विचारलं, “इतकं मोठं गाठोडं घेऊन तुम्ही कुठे जात आहात आणि यात काय आहे?”

पंडित थांबला आणि त्या स्त्रीकडेच एकटक पाहू लागला. ती अत्यंत सुंदर होती. पंडित म्हणाला, “ह्या गाठोड्यात ग्रंथ आहेत. आणि त्यात मी तुम्हां स्त्रियांचे चरित्र लिहून ठेवले आहे.”

ती स्त्री स्मित करीत म्हणाली, “यावर माझा विश्वास नाही. तुम्ही मला ते ग्रंथ दाखवा. खरं तर स्त्रीचे हृदय समुद्रासारखे असते. आणि समुद्राच्या तळापर्यंत कोण पोचू शकतं. तुम्ही आत या, जरा तुमचे ग्रंथ तर पाहू द्या.”

पंडित तिची मधुर वाणी ऐकून तिच्या मागे घरात गेला. त्या स्त्रीने त्याला खोलीत बसवून ते ग्रंथ दाखविण्यास सांगितले. तो ते गाठोडे उघडतच होता की दारावर ठोठावण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. ती स्त्री म्हणाली, “माझा नवरा आला आहे. तो राक्षस आहे. जर त्याने तुला येथे पाहिलं तर तो तुम्हाला मारून टाकेल. पंडित घाबरून म्हणाला, कसेही कर पण मला वाचव.”

तिने इकडे तिकडे पाहिलं. खोलीत एक मोठी पेठी होती. त्यात त्याला लपवून तिने पेटीला कुलूप लावलं.

दार उघडताच तिचा नवरा तिला चिडून म्हणाला, “काय झालं, दार उघडायला इतका वेळ का लागला?..... काय करीत होती?..... आत कोण आहे?”

ती स्त्री हसत हसत म्हणाली, “आत कोण असू शकेल. माझा प्रियकर होता. त्याला लपवित होते, कारण तुम्ही त्याला मारून टाकाल.”

हे ऐकून नवरा हसू लागला आणि त्याने विचारले, “तर मग त्याला कुठं

लपविलं आहेस?”

स्त्री पेटीकडे इशारा करीत म्हणाली, “अरे भल्या माणसा, त्याला कुठं लपवू शकते. याच पेटीत लपवून कुलूप लावलं आहे.”

किल्ली नवऱ्याला देत ती म्हणाली, “ही घ्या किल्ली, तुम्ही स्वतःच पाहून घ्या.”

तिचा नवरा हसत हसत म्हणाला, “तू फार नखरेल बाई आहेस. बरं आता गंमत करू नकोस. भूक लागली आहे. पटकन जेवण वाढ. दुकानावर जायचे आहे.”

ती आत गेली. एका ताटात जेवण वाढून आणलं, बरोबर लस्सीचा ग्लास आणला आणि म्हणाली, “त्या माझ्या प्रियकराला पण बरोबर जेवायला घ्या. बिचारा सकाळपासून उपाशी आहे.”

हे ऐकून नवरा स्मित करीत जेवण करू लागला. ती सारखं आपल्या प्रियकराबद्दल बोलत होती. तिचा नवरा थोडा विश्रांती घेवून दुकानात निघून गेला.

घराचे दार बंद करून तिने त्या पंडिताला पेटीतून बाहेर काढलं आणि म्हणाली, “तुमच्या ग्रंथात तुम्ही हे चरित्र लिहिलं आहे का?” तो आश्चर्याने म्हणाला, “नाही, नाही. मी तर कधी असा विचारच करू शकलो नव्हतो.”

ती स्त्री उपरोधाने म्हणाली, “तर ह्या ग्रंथांना आगीत टाकून द्या. काय उपयोग याचा. जर त्याच्यात माझं एक लहानसं चरित्र पण नसेल.”

पंडिताचा चेहरा उतरला आणि तो हात जोडून म्हणाला, धन्य आहात तुम्ही स्त्रिया आणि धन्य आहे तुमचे चरित्र!

(डॉ.मनोहर सराफ : देशोदेशीच्या लोककथा)

# ८.३० बडबडी बायको

(रशियन लोककथा)

काराचारोवा नावाच्या गावी एक शिकारी होता. 'इवान' होतं त्याचं नाव. त्याची बायको 'तात्याना' साधी-भोळी अशी स्त्री होती. फारच बडबड करायची ती. कोणतीही गोष्ट तिला पचतच नसे. एखादी गोष्ट तिला कळाली की साऱ्या गावभर पसरायला मुळीच वेळ लागत नसे. सबंध गावाला तिचा स्वभाव चांगलाच माहीत होता. या बडबड्या स्त्रीमुळे कधी कधी इवान त्रासून जायचा. एखाद्या दिवशी तिच्या अशा स्वभावामुळे आपण संकटात सापडू अशी त्याला भीती वाटे. आणि त्यामुळेच तो अत्यंत सावधगिरीने राहत असे.

नेहमीप्रमाणे एके दिवशी भल्या पहाटे तो शिकारीसाठी निघाला. जंगलात पोहोचल्यावर जनावर पकडण्यासाठी मोक्याची जागा हेरून तेथे त्याने जमीन खणायला सुरुवात केली. काही वेळ खणल्यानंतर त्याला काही सोन्याची नाणी सापडली. आता तो वेगाने खणू लागला. काही वेळेतच त्याला जमिनीत गाडलेलं एक मडकं सापडलं. या मडक्यात सोन्याची नाणी शिगोशीग भरलेली होती.

एवढी नाणी सापडल्याचे पाहून त्याला अतिशय आनंद झाला.... पण क्षणभराने त्याचा चेहरा चिंताक्रांत दिसू लागला. त्याच्या मनात आलं-ही गोष्ट तात्यानाला कळताच सगळ्या गावाला माहीत होणार. 'ही गोष्ट ती लपवून ठेऊच शकणार नाही. आणि जमीनदाराला ही गोष्ट कळायला असा कितीसा वेळ लागणार ? आणि मग हे सारं धन जमीनदाराच्या घशात जाणार...'

तो फतकल मारून जमिनीवर बसला. बराच वेळ खणत राहिल्याने त्याला खूप घाम आला होता. घाम पुसून तो स्वस्थपणे विचार करू लागला. बराच वेळ विचार केल्यावर त्याला एक युक्ती सुचली.

ते मडकं परत खड्ड्यात ठेऊन त्याने वरून माती लोटली. वर खुणेसाठी

एक दगड ठेऊन तो परत फिरला. परत येत असताना तो नदीवर गेला. रात्री नदीत त्यानं जे जाळं टाकलं होतं त्यात एक भला मोठा मासा अडकला होता. जाळ्यातून मासा काढून तो पुढे गेला. एके ठिकाणी त्याने लावलेल्या फासात एक ससा अडकलेला होता. सशाला फासातून काढून त्याच्या जागी तो मासा अडकवून तो पुन्हा नदीकडे वळला. नदीतील जाळं काढून त्यात त्या सशाला अडकवून त्यानं ते जाळं पुन्हा नदीत टाकून दिलं. नंतर बाजारात जाऊन त्याने भरपूर पावरोट्या विकत घेतल्या. परत जंगलात येऊन त्याने त्या पावरोट्या झाडांवर लटकावून टाकल्या. एवढं सारं काम व्यवस्थितपणे झाल्याची खात्री करून घेऊन तो घरी परतला.

घरी परतल्यावर हातपाय धुवून तो जेवायला बसला. जेवताना तो बायकोला म्हणाला,'आपलं भाग्य उजळलय् बघ. देवाने कृपा केलीय् आपल्यावर. सावज पकडण्यासाठी खड्डा खणताना मला गुप्तधन सापडलं. दिवसा ढवळ्या ते धन आणणं शक्य नसल्याने मी तिथेच गाडून आलो आहे. रात्री आपण ते धन घेऊन येऊ . तू तयार रहा.'

आणि मग रात्र पडेपर्यंत इवानने तिला घराबाहेर जाऊ दिलं नाही. ही बाहेर गेली तर नक्कीच काही तरी घोटाळा झाल्याशिवाय राहणार नाही हे त्याला पुरतं ठाऊक होतं. रात्र होताच तो बायकोला घेऊन निघाला. लख्ख चांदणं पडलं होतं. सारं जंगल चंद्रप्रकाशात उजळून निघालं होतं. अत्यंत सुंदर असं दृश्य दिसत होतं. अचानक तात्यानाची नजर झाडांवर गेली. झाडांवर लटकलेल्या पावरोट्या पाहून ती थक्कच झाली. म्हणाली, 'अग बाई ! इथे तर झाडांना पावरोट्या लागलेल्या दिसतात.'

'त्यात काय आहे आश्चर्य करण्याजोगं ? अग दर पंचवीस वर्षानं या झाडांना फळाऐवजी पावरोट्या येतात.' इवान सहजपणे म्हणाला.

आणखी पुढे गेल्यावर इवान म्हणाला, 'इथे जवळच मी एक फास लावला होता. त्यात एखादा प्राणी अडकला का ते पाहून घेऊ.'

फासाजवळ पोहोचल्यावर त्यात अडकलेला मासा पाहून तर तात्यानाची

मती गुंग झाली. काही क्षणांनी भानावर येत ती म्हणाली, ‘ हे काय ? फासात मासा कुठून आलाय ? ‘

जमिनीवरून चालणारा मासा आहे हा. इवानने तिला समजावले.

‘ कम्मालच म्हणायची ही ! मी स्वतः आपल्या डोळ्यांनी पाहिलं नसतं तर कधीच विश्वास ठेवला नसता.' तात्याना पुटपुटली.

नदीजवळ पोहोचताच तात्याना म्हणाली, ‘इथं तुम्ही जाळं टाकलं असेल तेही पाहून घेऊ आपण.'

इवानलाही हेच हवं होतं. इवानने जाळे बाहेर ओढून काढले. त्यात फसलेला ससा पाहून तात्याना ओरडली, ‘अरे देवा ! विचित्रच घटना घडताहेत सगळ्या. नदीत ससा ? असं तर कधी माझ्या स्वप्नातही आलं नसतं.'

‘ओरडतेस कशाला ? पाण्यातले ससे कधी पाहिले नाहीस का तू ?' इवानने दटावले.

‘देवा शप्पथ ! अशा अजब गोष्टी मी पहिल्यांदाच पहातेय्' ती म्हणाली.

इवान मनातल्या मनात हसला.

त्याने तिला गुप्तधनाच्या जागेवर नेले. माती बाजूला सारून ते धन त्यानं बाहेर काढलं. एवढं सोनं पाहून तात्यानाचे डोळे विस्फारले गेले. धन घेऊन दोघे घरी आले.

धन व्यवस्थित लपवून ठेवल्यावर तो तिला म्हणला, हे बघ तात्याना, ‘ही गोष्ट कुणालाच कळता कामा नये. आपलं तोंड बंद ठेव तू.'

तात्यानानं होकार दिला. दुसऱ्या दिवशी तात्याना बऱ्याच उशीरा उठली. विहिरीवरून पाणी आणायला ती निघाली तेव्हा शेजारणीनं विचारलं, 'काय झालं ग तात्याना ? खूपच उशीर झाला तुला आज. तब्येत बरी नाही का तुझी ?’

‘तसं काही नाही.' तात्याना म्हणाली.

‘मग ? '

‘काल रात्री मी त्यांच्याबरोबर जंगलात गेले होते.'

'जंगलात ? अन् ते कशाला ?'

'एक काम होतं महत्त्वाचं. ' एवढं बोलून ती गप्प बसली.

शेजारणीची उत्सुकता ताणली गेली. तिने विचारले, 'असं कोणतं काम होतं ग ?'

'म्हणजे तेवढं काही महत्त्वाचं नाही ग, आपलं सहजच गेले होते मी...'

तात्याना सारवासारव करू लागली.

' मला सांगायचं नाहीए असंच ना ? ' शेजारीण रोषाने म्हणाली.

'तू कुणाला सांगत नसशील तर....'

' माझ्यावर विश्वास नाही का तुझा ? अगदी कुण्णालाच सांगणार नाही मी. काय झाले ते सांग ना.' शेजारणीनं गळ घातली.

आता मात्र तात्यानाला रहावलं नाही. ती म्हणाली, 'माझ्या पतीला जंगलात असलेल्या गुप्त धनाचा पत्ता लागला. रात्री आम्ही ते धन आणायला गेलो होतो. परतायला बराच उशीर झाल्यामुळे सकाळी उठायला वेळ झाला मला.'

झालं ! लवकरच ही खबर साऱ्या गावभर वणव्यासारखी पसरली. जमीनदाराच्या कानावर ही बातमी जाताच त्याने ताबडतोब इवानला पकडून आणण्याची आज्ञा दिली. इवानला त्याच्यापुढे उभे करण्यात आले. त्याला पाहताच जमीनदार संतापाने म्हणाला, 'माझ्या इलाख्यात सापडलेलं धन माझ्यापासून लपवून ठेवण्याची तुझी हिंमतच कशी झाली ?'

'कसलं धन महाराज ?' इवानने नम्रपणे विचारले.

'खामोश !' जमीनदाराचा पारा आणखी वर चढला. तो दरडावून म्हणाला, 'तुला आपला जीव प्यारा असेल तर सारं धन ताबडतोब माझ्या हवाली करून टाक.'

'पण माझ्याजवळ कसलंही धन नाही. अगदी खरं तेच सांगतोय मी.' इवान शांतपणे म्हणाला.

जमीनदार मोठ्ठयाने हसला. म्हणाला, 'असं वेड पांघरू नकोस.... तुझ्या बायकोने गुप्त धन सापडल्याचं साऱ्या गावाला सांगून टाकलंय्.'

'तात्यानान्‌ ? अन्‌ आपणाला हे खरं वाटलं ? महाराज, माझी पत्नी काहीशी वेडसर आहे. कधी काय बोलेल याचा नेम नाही.... वाटल्यास आपण तिची परीक्षा घ्यावी.' इवान नम्रपणे म्हणाला.

त्याचं बोलणं ऐकून जमीनदार विचारात पडला. तात्यानाला बोलावण्यात आलं. तिला जमीनदाराने विचारलं, 'तात्याना, तुझ्या पतीला गुप्त धन सापडलंय असं ऐकलय्‌ मी. खरं आहे का ते ? '

'ज....ज.... जी.... ' तात्याना घाबरून गेली. तिला काहीच बोलता येईना.

'घाबरू नकोस. खरं काय ते सांग. काल रात्री जे काही तू पाहिलंस ते सविस्तरपणे सांग.' जमीनदार कोमल स्वरात म्हणाला.

तिला काहीसा धीर आला. ती म्हणाली, 'त्याचं असं झालं. काल माझ्या पतीनं मला सांगितलं की त्यांना जंगलात गुप्तधन सापडलंय्‌ अन्‌ ते आणण्यासाठी रात्री जायचं आहे. रात्री आम्ही निघालो. सगळ्या जंगलात चंद्राचा प्रकाश पसरला होता. काही अंतर चालून गेल्यावर मला एक विचित्रच दृश्य दिसलं. झाडांवर फळांऐवजी पावरोट्या लटकत होत्या...

'झाडावर पावरोटी ?' जमीनदाराने आश्चर्याने विचारले.

'हो आणि जराशानं आम्ही माझ्या पतीनं लावलेल्या फासाजवळ पोहोचलो तर तिथं फासात एक भला मोठा मासा अडकल्याचं मला दिसलं...'

जमीनदाराच्या कपाळावर आठ्यांचे जाळे जमले.

'मग आम्ही नदीवर पोहोचलो. माझ्या पतीनं जाळं ओढून बाहेर काढलं तर त्यात एक ससा अडकलेला होता....'

'बडबड बंद कर ! मूर्ख कुठली ! चल निघ येथून.' जमीनदार मोठ्ठयानं ओरडला.

आणि इवान आपल्या बायकोला घेऊन आनंदाने निघून गेला.

(देवीचरण राठोड : देशोविदेशच्या कहाण्या)

# ८.३१ कष्टाचा रुपया

(गुर्जी लोक-कथा)

एक माणूस आपल्या पत्नीसोबत रहात होता. त्याला एक मुलगा होता. तो इतका आळशी होता की, जगात त्याच्यासारखा कोणताही मुलगा भेटणे कठीण होते. तो प्रत्येक कामाला टाळत होता, व एक कवडीदेखील कमाई करीत नव्हता.

जोपर्यंत त्याच्या बापाच्या अंगात शक्ती होती तोपर्यंत त्याने आपल्या मुलाचे पालन-पोषण केले. पण म्हातारपण आल्यामुळे व आजाराने पछाडल्यामुळे त्याच्यात शक्ती उरली नाही. खाटेवर पडल्यानंतर त्याने आपल्या पत्नीला बोलावून सांगितले- "मी आपली सर्व इस्टेट कुणा परक्या माणसाला देऊन टाकेन आणि आपल्या मुलासाठी काहीच ठेवणार नाही. हा आळशी आहे, निष्क्रिय आहे व एक कवडी देखील कमाई करू शकत नाही."

आपल्या प्रिय पतीचे बोलणे पत्नीला आवडले नाही. ती आपल्या पुत्राचा पक्ष घेवून बोलली-

"काय काहीच कमाई करू शकणार नाही ? अवश्य कमाई करेल."

तेव्हा पती म्हणाला-"बरे,जर तुझ्या दृष्टीने तो कमाई करू शकतो, तर पाहू या. जर तो एक रुपया देखील कमाई करून आणेल, तर ही सर्व इस्टेट मी त्याला देऊन टाकेन."

पत्नीने पतीच्या म्हणण्याचा स्वीकार केला. मग आपल्या मुलाजवळ जाऊन त्याला तिने एक रुपया दिला आणि त्याला म्हणाली, " बाबा, तू संध्याकाळपर्यंत कुठेतरी फिरावयास जा, संध्याकाळी घरी परत ये. त्यानंतर हा रुपया तू आपल्या बापाला दे आणि सांग की, हा रुपया आज दिवसभर काम केल्यामुळे मला मिळाला आहे."

आळशी पुत्राने तसेच केले. संध्याकाळ झाल्यावर तो आपल्या घरी परत

आला आणि त्याने आपल्या बापाला तो रुपयाचा शिक्का दिला.

"तू हा कमाई करून आणला नाहीस." असे म्हणून बापाने त्या रुपयास चुलीत टाकले. त्याच्या उत्तराने त्याचा तो आळशी मुलगा हसला व निघून गेला. पुन्हा त्याची आई त्याला एक रुपयाचा शिक्का देवून म्हणाली, "आता तू पहाडावर जाऊन संध्याकाळी दोन मैलांपर्यंत धावत जा. एवढे की घाम निघू लागेल, मग आपल्या बापाजवळ जाऊन म्हणावे - 'आज फारच त्रासाने आणि परिश्रमाने हा रुपयाचा शिक्का मिळाला आहे."

मुलाने तसेच केले. रात्रीला तो आपल्या घरी परत आला. फार थकलेला होता आणि त्याच्या शरीरातून घाम निघत होता. आपल्या बापाजवळ जाऊन तो म्हणाला -"बाबा पहा ! माझ्या शरीरातून घामाचे कसे लोट निघत आहेत. मोठ्या परिश्रमाने मला हा सोन्याचा शिक्का मिळाला आहे."

बापाने शिक्का हाती घेतला व मग त्याला चुलीत टाकले आणि म्हणाला - "माझ्या प्रिय पुत्रा, तू मला धोका देऊ शकणार नाहीस. हा शिक्का तू कमाई करून आणला नाहीस."

बापाचे हे शब्द ऐकताच मुलगा हसला व निघून गेला. आई समजली की, अशा रीतीने ही गोष्ट साध्य होऊ शकणार नाही. काही विचार करून ती आपल्या मुलास म्हणाली, "अरे बाबा, तू आपल्या बापाला कमाईचे ढोंग करून फसवू शकणार नाहीस. यासाठी चल,आता कुठे ना कुठे तरी काम करू. शक्य आहे, दर दिवशी कवडी कवडी कमाई करू शकशील तेव्हा तुझा बाप तुझ्यावर विश्वास करेल."

मुलाने आईच्या म्हणण्याचा स्वीकार केला. तो आपल्या घरून निघून गेला आणि एक आठवडाभर कुठेना कुठे काम करीत राहिला. एखाद्या जागी एखाद्या इसमाचे काम केले, दुसऱ्या ठिकाणी दुसऱ्या इसमाच्या कामात मदत केली. याप्रमाणे लहान लहान शिक्के कमवून त्याने एक रुपया पूर्ण केला, व आपल्या बापाजवळ घेवून गेला. बापाने त्या शिक्क्यांना चुलीत टाकले आणि म्हटले - "अरे मुला, हे शिक्के देखील तू कमाई करून आणले नाहीस." तेव्हा तो मुलगा

ही गोष्ट सहन करू शकला नाही. अतिशीघ्रतेने चुलीजवळ जाऊन त्याने ते शिक्के बाहेर काढले व म्हणाला, "बाबा, आपण हे काय करीत आहात ? मी आठवडाभर परिश्रम करून हे शिक्के कमावले आहेत. आणि आपण ते अग्नीत टाकत आहात !"

मग बाबा म्हणाले, "बेटा, आता मला पूर्ण विश्वास आहे की हे शिक्के तू परिश्रमाने कमावले आहेस."

(वा. रा. गाणार : रव (मूळ लेखक : प. अ. बारान्निकोव),
सोविएत संघातील लोककथा)

# ८.३२ मालक आणि नोकर

(आर्मेनियम लोक-कथा)

दोन भाऊ होते ते गरीब होते. जेव्हा त्यांची परिस्थिती खूप बिघडली तेव्हा त्यांनी निश्चित केले की, लहान भाऊ घरी राहील व मोठा भाऊ कुठेतरी जाऊन कुणातरी मालकाजवळ नोकरी करेल, आणि जे कमावेल ते आपल्या घरी पाठवित राहिल. त्याप्रमाणे जे निश्चित केले होते, तेच कृतीमध्ये उतरविले. लहान भाऊ घरी राहून घर सांभाळू लागला, आणि मोठा भाऊ दूर जाऊन एका धनी इसमाजवळ नोकरी करू लागला.

मालक आणि नोकराने असा निर्णय केला की, नोकरीचा काळ वसंत ऋतुपर्यंत राहील, जेव्हा कोकिळा प्रथम गीत गाईल, प्रथम आवाज देईल. पण मालकाने नोकरास ही अट घातली की, जर या काळात आपणा दोघांमधून कुणी एक दुसऱ्यास सोडून पळेल, तर त्याला त्याचा मोबदला द्यावा लागेल. जर तू माझ्यावर रागावलास तर तुला एक हजार रुबल द्यावे लागतील, आणि मी तुझ्यावर रागावलो तर मी तुला एक हजार रुबल देईन.

नोकर म्हणाला, "पण महाराज, मजजवळ तर एक हजार रुबल नाहीत."

त्यावर मालक म्हणाला - "काही हरकत नाही, रुबलच्या ऐवजी तू माझ्याकडे दहा वर्षं काम करशील." नोकराला या कराराची भयंकर भीती वाटू लागली. पण मग काही विचार करून त्यानंतर तो कबूल झाला.

नोकराने विचार केला की, काहीही होवो, मी नाराज होणार नाही; आणि मालक नाराज झाला तर ठरल्याप्रमाणे तो एक हजार रुबल मला देईल. असा विचार करून त्याने नोकरी करण्याचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मालकाने नोकरास शेतात काम करण्यासाठी पाठविले व म्हटले- "जा आणि जोपर्यंत प्रकाश राहील तोपर्यंत गव्हाची कापणी

कर, आणि जेव्हा अंधार होईल तेव्हा घरी परत ये."

नोकराने दिवसभर शेतात काम केले. आणि जेव्हा सूर्यास्त झाला तेव्हा थकून-भागून तो घरी आला. तेव्हा मालक म्हणाला- "तू का परत आलास ?"

नोकर म्हणाला -"हे कसे काय ? सूर्यास्त झाला, म्हणून मी परत आलो."

"हे बंधू, या रीतीने काम चालणार नाही. मी तुला म्हटले होते की, जोपर्यंत प्रकाश आहे तोपर्यंत काम करावयाचे आहे.सूर्यास्त झाला, पण त्याचा भाऊ चंद्र तर निघाला ना. तो देखील प्रकाश देतो आहे."

नोकर आश्चर्यचकित होऊन म्हणाला-"तर काय, हे शक्य आहे ?"

तेव्हा मालक म्हणाला- "तर काय, तू नाराज होतो आहेस ?"

नोकर भ्याला व म्हणाला - "नाही, नाराजी नाही. खरी गोष्ट ही आहे की, मी खूप थकलो आहे. थोडा वेळ आराम करतो..." आणि तो काही वेळाने पुन्हा शेतात काम करण्यासाठी गेला. चंद्र बुडेपर्यंत शेतात काम करीत राहिला. पण त्यानंतर पुन्हा सूर्य उगवला. फार थकल्यामुळे नोकर जमिनीवर पडला, आणि निराश होऊन आपल्या मालकास शाप देवू लागला - "तुझे शेत, तुझा गहू, तुझे धन - सर्वांचा धिक्कार !"

त्यावेळी त्या ठिकाणी मालक आला. तो म्हणाला... "तर काय, बंधू, तू नाराज झालास ? जर नाराज झाला असशील तर माझ्या त्या कराराची आठवण ठेव आणि मग मजवर काही आरोप लावू नकोस की, मी तुझ्यावर काही अन्याय केला आहे ."

आता नोकर काय करणार? त्याच्याजवळ ना एक हजार रुबल आहेत की, जे कराराप्रमाणे तो मालकास देवू शकेल आणि ना अशा मालकाकडे दहा वर्षं नोकरी करणे त्याला शक्य होईल. विचार करता करता त्याने मालकास एक करारनामा लिहून दिला की, तो मालकास एक हजार रुबल देण्याचे आश्वासन देतो आहे. त्यानंतर मोठा भाऊ नोकरी सोडून हात हलवित 'जान बची लाखो पाये' म्हणत घरी परत आला.

"आपण कसे आहात ?.." मोठ्या भावाला पाहून लहान भाऊ म्हणाला.

तेव्हा मोठ्या भावाने सगळा वृत्तांत लहान भावास सांगितला.

सर्व रामायण ऐकल्यावर लहान भाऊ म्हणाला- "काही हरकत नाही, सर्व काही ठीक होईल. आता तुम्ही घरी रहा, आणि मी नोकरी करण्यासाठी जातो."

लहान भाऊ त्याच मालकापाशी गेला. मालकाने मग तीच शर्त त्याच्यापुढे ठेवली...'जोपर्यंत वसंत ऋतूमध्ये कोकिळा प्रथमवेळी मंजुळ गीत गाणार नाही, तोपर्यंत नोकर नोकरी करेल. जर नोकर कधी नाराज होईल तर आपल्या मालकास एक हजार रुबल देईल, किंवा मालकाजवळ दहा वर्षांपर्यंत फुकट काम करेल आणि जर मालक नोकरावर नाराज झाला तर नोकरास एक हजार रुबल देईल आणि कामावरून त्याची सुट्टी करील.'

तेव्हा लहान भाऊ म्हणाला-- "नाही, ही शर्त मला पसंत नाही. ती माझ्यासाठी फारच कमी आहे. माझी शर्त ही आहे - 'जर तुम्ही नाराज व्हाल तर मला दोन हजार रुबल द्याल आणि मी तुमच्यावर नाराज झालो तर मी दोन हजार रुबल देईन. अथवा तुमची नोकरी वीस वर्षापर्यंत करेल."

मालकाने खूष होऊन म्हटले..."बरे, मी तयार आहे."

अशा रीतीने त्याचवेळी दोघांनीही निर्णय घेतला व लहान भाऊ तेथे नोकरी करू लागला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्य निघाला, पण नोकर झोपूनच होता. तेव्हा मालक त्याला उठवू लागला-- "उठ जा . आता तर दुपार होणार आहे."

"काय तुम्ही नाराज झालात ?" आपले डोके वर उचलत नोकर म्हणाला.

"नाही, मी केवळ इतकेच म्हणतो की शेतात जाण्याची वेळ झालेली आहे."

शेवटी नोकर उठला आणि हळूहळू आपले जोडे घालू लागला. हे पाहत असताना मालक म्हणाला-" हे बंधू, हे चांगले नाही, चल लवकर आटप."

नोकर म्हणाला- "तर काय, तुम्ही नाराज झाले?"

मालक म्हणाला - "नाही, मुळीच नाही, मी केवळ हे सांगतो की, काम करण्यासाठी शेतात जायला उशीर होत आहे."

"बरे,. ही दुसरी गोष्ट आहे. पण आपण केलेल्या कराराची आठवण करा !"

नोकराने जोडे घातले व तो शेताकडे जाऊ लागला. तर दुपार झाली. तेव्हा त्याने मालकास म्हटले- "आता तर कामावर जाण्याची आवश्यकता नाही. पहा, सर्व लोक दुपारचे जेवण करीत आहेत. तेव्हा आपण देखील जेवण करून घेऊ"

दोघेही जेवण करू लागले. जेवण झाल्यानंतर नोकर मालकास म्हणाला- "आम्ही लोक तर खूप काम करतो . त्यासाठी जेवण झाल्यावर थोडी विश्रांती केली पाहिजे, जेणेकरून आमची शक्ती आणखी वाढेल." असे म्हणून तो जमिनीवर झोपला.

जेव्हा सूर्यास्त होऊ लागला तेव्हा मालक निराश होऊन ओरडू लागला. "ये मित्रा, आपल्या कार्याने ईश्वराला रागात आणू नकोस. अंधार होणार आहे, सर्व लोकांनी आपापल्या शेतातील गव्हाची कापणी केलेली आहे. केवळ माझ्याच शेतातील गहू अजूनपर्यंत कापण्यात आला नाही. ज्याने तुला माझ्यापाशी पाठविले त्याची मान तुटून पडो ! कुठून मला हा दंड मिळाला !"

"काय, तुम्ही नाराज झालात ? " नोकराने आपले डोके वर उचलून म्हटले.

"नाही, नाराज होण्यासारखी कोणतीच बाब नाही. मी केवळ एवढेच म्हणतो की, अंधार पडत चालला व घरी जाण्याची वेळ झालेली आहे."

"ठीक, ही तर दुसरी गोष्ट आहे. पण आपण केलेल्या करारास विसरू नका."

मालक आपल्या घरी पोचला तर त्याने पाहिले की, त्याच्याकडे एक पाहुणा आलेला आहे. तेव्हा त्याने आपल्या नोकरास गोठ्यातील एका मेंढराला कापायला सांगून, पाहुण्यांसाठी उत्तम भोजन तयार करण्यास सांगितले. हे ऐकल्यानंतर नोकर घराच्या बाहेर निघाला. काही वेळाने मालकाजवळ अनेक लोक धावत आले आणि म्हणाले की, तुमचा नोकर पागल होऊन सर्वच मेंढरांना कापत सुटला आहे. मालक बाहेर निघाला आणि पहातो तर नोकराने सर्वच मेंढरांना कापून टाकले आहे. तेव्हा मालक आरडाओरड करू लागला.

"तू हे काय केले ! सर्वनाश होवो तुझा !"

नोकर म्हणाला- "आपण स्वतः सांगितले होते की, जे मेंढरू मिळेल त्याला कापायचे, मी त्याचप्रमाणे केले. जे मेंढरू माझ्या हाती येत होते त्याला मी कापत

होतो, यात माझा काय दोष आहे ? पण मला वाटते तुम्ही तर माझ्यावर नाराज झाला आहात ?" मालकाने उत्तर दिले - 'नाही, मी नाराज नाही झालो. पण मला खेद वाटतो की, तू माझ्या सर्वच मेंढरांना कापून टाकलेस." तेव्हा नोकर म्हणाला- "ठीक, जर तुम्ही नाराज झाला नाहीत तर ! तेव्हा मी आपली नोकरी करीत राहीन."

याप्रमाणे लहान भाऊ अनेक महिन्यांपर्यंत मालकाजवळ नोकरी करीत राहिला. त्याचा मालक विचारमग्न होऊन या नोकरापासून आपली सुटका कशी होईल याचा मार्ग शोधू लागला. करारानुसार जेव्हा वसंत ऋतूत कोकिळा प्रथम मधुर गीत गाईल तेव्हा त्या नोकरांची नोकरी संपेल. पण आता तर थंडीचे दिवस सुरू झाले आहेत आणि वसंत येण्यासाठी पुष्कळ काळ बाकी आहे. विचार करता करता मालकाने हा निश्चय केला की, या हुशार नोकरास धोका द्यावा, या हेतूने तो आपल्या बायकोस जंगलात घेवून गेला, तिला एका उंच झाडावर बसवून दिले आणि सांगितले की, मी नोकरासोबत जेव्हा इथे येईन, तेव्हा तू कोकिळेसारखा आवाज काढशील.

मालक जंगलातून घरी परत आला. त्याने नोकरास बोलाविले व म्हटले, "माझ्या सोबत शिकार करण्यासाठी जंगलात चल." जेव्हा दोघंही जंगलात आले. तेव्हा झाडावर बसलेली मालकाची बायको आवाज काढू लागली.

'कुहू कुहू कुहू !'

मालक म्हणाला -"अहाहा, स्वागत असो! कोकिळा गीत गाऊ लागली आहे; आता तुझ्या नोकरीचा करार संपला आहे."

पण लहान भाऊ काही मूर्ख नव्हता. त्याने मालकाचे डावपेच ओळखले. तो म्हणाला-"ही गोष्ट अशक्य आहे, थंडीच्या दिवसात कोकिळा मधुर गीत गाऊच शकत नाही. मी या कोकिळेस गोळीने मारेन व पाहीन की,ती कोणती पक्षीण आहे," असे म्हणून त्याने आपली बंदूक उचलली व ज्या बाजूने आवाज येत होता त्या बाजूने निशाण धरले. तेव्हा रागात येवून मालक जोराने ओरडला व त्याने आपल्या नोकराची बंदूक हिसकून घेतली.

तेव्हा नोकराने विचारले - ‘काय झाले ? मला वाटते तुम्ही माझ्यावर नाराज झालात !‘

मालक म्हणाला- ‘हो, हो, अवश्य नाराज झालो ! चल, मी तुला दोन हजार रुबल देवून टाकतो आणि तू माझ्या घरून निघून जा ! आता मला त्या जुन्या म्हणीचा अर्थ समजला की, 'दुसऱ्यासाठी खड्डा खोदू नका, नाही तर तिथे स्वतःच जाऊन पडाल !”

(वा. रा. गाणार : रब (मूळ लेखक : प. अ. बारान्निकोव),
सोविएत संघातील लोककथा)

# ८.३३ तुझ्या नोकरीस हरलो

(रशियन लोक-कथा)

एका शिपायाने सैन्यातील नोकरी सोडून एका कंजूस जमीनदाराची वार्षिक शंभर रुबलांवर नोकरी पत्करली. जमीनदार त्याच्याकडून घोड्यांची देखरेख आणि त्यांच्या चारापाण्याची व्यवस्था करवून घेत असे. सोबतच घोड्यांची घाण काढणे, लाकडे फोडणे आणि बागेतील कामे देखील तो करवून घेत असे. जमीनदार त्याला क्षणभर देखील विश्रांती घेऊ देत नव्हता. त्याला जास्तीत जास्त काम सांगून शारीरिक कष्ट देत असे.

जेव्हा एक वर्ष पूर्ण झाले, तेव्हा शिपायाने जमीनदारास पैशांची मागणी केली. पण पैशांचे नाव घेताच जमीनदारांच्या हृदयाला झटका बसला, आणि तो पेटीतून पैसे काढताना अश्रू ढाळू लागला.

शिपाई म्हणाला- "आपण कशाला रडता ?"

"पैसे देतांना दुःख होते" जमीनदाराने उत्तर दिले.

"सरकार, आपण देखील न जाणे कशी गोष्ट करता . मी आपल्या घरी पूर्ण वर्षभर नोकरी केली आहे. जर आपण माझी केवळ तीन दिवस नोकरी कराल तर मी शंभर रुबल आपणांकडून घेणार नाही" असे नोकर म्हणाला.

जमीनदार विचार करू लागला की, तीन दिवस तर काही जास्त होत नाहीत. तेव्हा ही रक्कम कशाला आपल्या हातून जाऊ द्यावी. त्याने याविषयी आपल्या बायकोचा सल्ला घेतला. बायकोने देखील विचार केला की, केवळ तीन दिवसांचेच तर शारीरिक कष्ट होतील आणि जे काही कष्ट होतील ते सर्व पतीदेवाला भोगावे लागतील. त्याचे मला काय; असा विचार करून तिने 'हो' म्हटले.

जमीनदाराने शिपायाची गोष्ट मान्य केली. रात्रीला शिपायाने जेवण केले

आणि वाळलेले गवत ज्या गोठ्यात ठेवले होते तेथे जाऊन तो विश्रांती घेऊ लागला. त्याने आपला एक जोडा गोठ्यातील एका कोपऱ्यात गवतात लपवून ठेवला आणि दुसऱ्याला दुसऱ्या कोपऱ्यात. त्यानंतर तो झोपला.

सकाळी उठताच तो दरडावून म्हणाला 'अरे ये, कुठे मेलास,जरा इकडे ये'. जमीनदार गोठ्याच्या आत गेला.

' माझे जोडे कुठे आहेत, जरा लवकर आण' जमीनदाराने इकडे तिकडे पाहिले पण जोडे कुठेच दिसले नाहीत. शेवटी त्याने शिपायाला विचारले - "जोडे कुठे ठेवले होते ?" मग काय पाहता, शिपाई खूप रागावला.

"बदमाश, तू आपल्या मालकास जोड्यांबद्दल विचारतोस ? तू आतापर्यंत त्यांना साफ देखील केले नसतील." असे म्हणून त्याने खूप जोराने एक थापड त्याच्या एका गालावर आणि दुसरी दुसऱ्या गालावर मारली.

जमीनदार भांबावून गेला. त्याने जोड्यांना इकडे तिकडे खूप पाहिले ? काही वेळाने त्याला एक जोडा मिळाला. पण दुसरा जोडा खूप धुंडाळल्यानंतर देखील मिळाला नाही.

शिपाई जोराने ओरडला. त्याने त्यास काठी आणण्याचा हुकूम दिला. जमीनदाराने काठी आणून दिली. हातात काठी येताच शिपायाने त्याला चांगला चोप दिला. त्याने जमीनदारास इतके मारले की, त्याची शंभर रुबल हडप करण्याची इच्छा वाहून गेली.

जोराने श्वासोच्छवास घेत जमीनदार म्हणाला, - "बाबा, तू मला क्षमा कर, मी तुझ्या नोकरीस हारलो, घे सांभाळ आपली नोकरी आणि आपले शंभर रुबल. तुझी लीला एखादा सैतानच समजू शकेल."

(वा. रा. गाणार : रव (मूळ लेखक : प. अ. बारान्निकोव),
सोविएत संघातील लोककथा)

# ८.३४ तीन भाऊ

(युक्रेनी लोक-कथा)

एका गावात तीन भाऊ रहात होते. जेव्हा त्याचे आई-बाप मरण पावले, तेव्हा ते अनाथ झालेत. त्यांच्या जवळ काहीच नव्हते. ना काही सामान, ना राहण्यासाठी घर. तेव्हा ते तिघेही नोकरी शोधावयास निघाले. चालत असताना ते विचार करीत होते की, ईश्वराच्या कृपेने आम्हांस चांगला मालक मिळावा. एवढ्यात त्यांना एक वृद्ध इसम भेटला, त्याची सर्व दाढी पांढरी झालेली होती.

म्हाताऱ्याने त्यांना विचारले, "या मुलांनो, तुम्ही कुठे जाता ?"

सर्वांनी एकसरशी उत्तर दिले - "नोकरीच्या शोधात."

"काय तुमच्याजवळ स्वतःचे घर-दार नाही ?"

"नाही. जर आम्हा लोकांस एखाद्या सज्जन माणसाजवळ नोकरी मिळाली असती तर आम्ही प्रामाणिकपणे नोकरी करून मालकाची प्रत्येक गोष्ट ऐकून आणि त्याला आपल्या बापासारखे समजून घेतले असते."

तेव्हा म्हातारा म्हणाला - "जर अशी गोष्ट आहे तर मी तुम्हांस आपले दत्तक पुत्र मानून घ्यायला तयार आहे. आजपासून मी तुमच्या बापासमान आहे. तुम्ही माझ्या आज्ञेचे पालन कराल तर मी देखील तुम्हाला माणूस बनवून देईन आणि खऱ्या जीवनाचा मार्ग दाखवेन."

तिन्ही भावांनी ही गोष्ट मान्य केली आणि म्हाताऱ्यासोबत चालते झाले. घनदाट जंगले आणि विस्तीर्ण पठारे पार करीत पुढे पुढे जात असता वाटेत त्यांना एक घर दिसले. ते घर फार सुंदर आणि पांढरे होते. त्याच्या चोहीकडे चेरीच्या झाडांचा सुंदर बागबगीचा होता. घरातून फुलासारखी एक सुंदर मुलगी हसत हसत बाहेर आली. तिला पहाताच मोठा भाऊ म्हणाला, "या मुलीबरोबर माझे लग्न झाले असते व सोबतच माझ्या जवळ अनेक गाई-बैल असते, तर

किती चांगले झाले असते.” तेव्हा म्हातारा म्हणाला- "चला,तिला मागणी घालू. तुला सोबतच गाई-बैल देखील मिळतील. सुखाने राहा, पण एक गोष्ट लक्षात ठेव की, सत्य कधीही विसरू नकोस.”

तेव्हा त्या मुलीला मागणी घालण्यासाठी ते तिच्या घरी गेले. लग्न जुळले. लग्न झाल्यावर मोठा भाऊ त्या घराचा मालक झाला व तिथे राहू लागला. मग म्हातारा व दोन मुले पुढे निघाली. पुढे त्यांना एक घर, घराशेजारी पाणचक्की आणि एक तळे दिसले. त्या घराशेजारी एक सुंदर मुलगी काम करीत होती. ती आपले प्रत्येक काम अगदी उत्तम रीतीने पार पाडीत होती. मधला भाऊ मुलीला पाहून म्हणाला- "जर माझे लग्न अशा मुलीशी झाले असते, पाण-चक्की आणि तळे देखील माझ्या जवळ असते, तर मी माझे जीवन खूप आनंदाने घालविले असते.”

म्हातारा म्हणाला - "बरे बाबा, जशी तुझी इच्छा आहे तसेच होईल.”

त्या घरी जाऊन, मुलीच्या बापाला भेटून म्हाताऱ्याने ते आपल्या दुसऱ्या दत्तक-पुत्राचे लग्न जोडले. लग्न देखील झाले. त्यानंतर तो म्हातारा मुलास म्हणाला "बाबा, आता तू सुखाने रहा, पण सत्याला कधीही विसरू नकोस.”

मग म्हातारा आणि सर्वात लहान दत्तक पुत्र पुढे जाऊ लागले. चालता चालता वाटेत त्यांना एक पडकी झोपडी दिसली. त्या झोपडीतून एक मुलगी बाहेर आली. ती इतकी सुंदर होती की, जसा काही गगनातला एखादा चमकणारा तारा! पण ती गरीब होती. तिच्या अंगावरील वस्त्रांना अनेक ठिगळे लागलेली होती. तेव्हा त्या लहान दत्तक पुत्राने म्हटले - "जर माझे लग्न या मुलीबरोबर झाले तर आम्ही खूप काम करू. मग आम्हाला भाकरीसाठी भटकावे लागणार नाही. भाकरीची कमी पडणार नाही. आम्ही गरीबांना देखील विसरू शकणार नाही. स्वतः आपले पोट भरू व त्यांनाही देवू.”

म्हातारा धर्मपिता म्हणाला-"बरे बाबा, जे म्हणशील ते होईल. पण हे बघ, सत्याला कधीही विसरू नकोस.” म्हाताऱ्याने त्याचे लग्न त्या मुलीबरोबर करून दिले व तो मग एकटाच जगाच्या यात्रेला निघाला.

तिन्ही भाऊ आपापल्या घरी आनंदाने जीवन जगू लागले. मोठ्या भावाने इतके पैसे जमविले की, त्याने आपल्यासाठी अनेक घरं तयार करवून घेतलीत. त्याला केवळ रुपये जमा करण्याचा छंद लागला होता. तो गरीबांना मदत करण्याचे विसरून गेला. तो खूप लोभी झाला होता. मधल्या भावाने देखील खूप धन कमविले होते. त्याच्याकडे अनेक नोकर काम करीत होते, आणि तो आरामात पलंगावर पडून रहात होता. खूप खात-पित असे व आपल्या कामाची देखरेखदेखील चांगल्यारीतीने करीत असे. लहान भावाजवळ धन जमले नाही. जे काही त्याच्यापाशी उरत होते ते तो दुसऱ्यास देवून टाकीत होता. 'हातावर आणणे व तव्यावरचे खाणे' अशी त्याची स्थिती होती.

एके दिवशी तो म्हातारा फिरत फिरत त्या बाजूला गेला. त्याने विचार केला, आपले दत्तक पुत्र कसे रहातात ते पाहून घ्यावे. ते मी सांगितलेल्या सुंदर शिकवणीला विसरलेत तर नाहीना? गरीब भिकाऱ्याच्या वेषात तो प्रथम मोठ्या मुलाच्या घरी गेला. तेव्हा त्याने पाहिले की, त्याचा मोठा मुलगा आपल्या घराच्या अंगणात शतपावली करतो आहे. म्हाताऱ्याने आपल्या शरीराला जमिनीपर्यंत वाकवून म्हटले-"महाराज, आपली दया होईल तर थोडीशी भिक्षा मिळेल?"

म्हाताऱ्याचे शब्द ऐकताच अपशब्दाबरोबरच हे वाक्य त्याला ऐकायला मिळाले - "तू तर अजून इतका म्हातारा झाला नाहीस. जर विचार केलास तर स्वतः कमाई करू शकतोस व आपली परिस्थिती सुधारू शकतोस."

मोठ्या मुलाजवळ असलेली संपत्ती पाहून म्हातारा थक्कच झाला. घर, वाळलेल्या गवताची मोठी गंजी, गुरे-ढोरे, मालाने भरलेली अनेक दुकाने व फार मोठी नगदी रक्कम. पण त्याने भिकाऱ्यास भीक देण्यास नकार दिला.

म्हातारा तिथून निघून गेला व काही दूर जाऊन थांबला, त्याने मोठ्या मुलाच्या संपूर्ण मालमत्तेकडे एक दृष्टी टाकली तेव्हा पहाता पहाताच त्या सर्व मालमत्तेला आग लागली.

मग म्हातारा मधल्या मुलाजवळ गेला. तेथे त्याला दिसून आले की, पाणचक्की आहे, तळे आहे आणि त्याचे घर अन्नधान्याने भरपूर भरलेले आहे.

तिथेही डोके जमिनीवर वाकवून म्हातारा म्हणाला - "हे, भल्या माणसा, मला थोडेसे पीठ दे, मी एक गरीब माणूस आहे. माझ्याजवळ खाण्यास काहीच नाही."

"मला खेद वाटतो, मी माझ्यासाठी देखील आतापर्यंत पीठ दळून आणले नाही. तुझ्यासारखे किती तरी लोक इकडे येतात, कुणा कुणाला पीठ देऊ ?" - मुलगा म्हणाला. म्हातारा तिथून निघाला; पण जास्त दूर न जाता त्याने त्याच्या सर्व मालमत्तांकडे एक दृष्टी टाकली. पहाता-पहाताच त्याच्या घरातून आणि चक्कीतून अग्नीच्या ज्वाळा निघू लागल्यात; व थोड्याच वेळात सर्व काही जळून राख झाले.

त्यानंतर म्हातारा लहान मुलाकडे गेला. त्याने पाहिले की, तो अत्यंत गरिबीत आपले जीवन घालवित आहे. एक लहानसे घर आहे. पण स्वच्छ आहे. तिथे जाताच म्हाताऱ्याचे कपडे जुने झाले व फाटले. म्हातारा म्हणाला 'ईश्वराच्या नावावर मला देखील भाकरीचा एक तुकडा देवून टाक.'

लहान मुलगा म्हणाला - "बाबा, तुम्ही घरात या ! इथे आपण पोटभर जेवण करा आणि थोडेसे सोबत घेऊन जा."

म्हातारा घरात गेला. तेव्हा त्याची जुनी व फाटलेली जीर्ण वस्त्रं पाहून घर मालकीण दुःखी झाली. तिने एका खोलीत जाऊन एक पायजमा आणि एक सदरा म्हाताऱ्यास आणून दिला. जेव्हा म्हातारा सदरा घालू लागला तेव्हा मालकिणीने पाहिले की, त्याच्या छातीवर एक जखम आहे. दोघांनीही म्हाताऱ्यास टेबलाजवळ बसवून खूप जेवण दिले. जेवण झाल्यावर लहान मुलाने विचारले- 'बाबा, ही तुमच्या छातीवर एवढी मोठी जखम कशी झाली ?'

म्हातारा म्हणाला-'ही एक एवढी भयंकर जखम आहे की, थोड्याच तासांच्या आत मला मरावे लागेल. मला केवळ आता एकच दिवस जिवंत रहावयाचे आहे.

केवढे हे संकट, केवढे हे दुःख ?-मालकीण म्हणाली- 'तर काय याच्यासाठी कोणतेच औषध नाही ?'

"तसे तर एक औषध आहे व प्रत्येक व्यक्ती ते देवू शकते; पण देईल कोण ?" म्हातारा म्हणाला.

त्यावर शेतकरी म्हणाला -"का देणार नाही, कदाचित मीच देऊन टाकेन ! सांगा पाहू, ते कोणते औषध आहे ?"

म्हातारा म्हणाला - "औषध आहे, जर कोणताही मालक आपल्या घराला स्वतः आग लावेल आणि जेव्हा सर्व सामान जळून राखल होईल, तेव्हा त्या राखेचा लेप लावल्यानंतर माझी जमखम चांगली होऊ शकते. पण या जगात असा कुणी माणूस मिळेल काय की जो हे सर्व करेल ?"

हे ऐकताच लहान मुलगा फार चिंतेत पडला. तो खूप वेळेपर्यंत विचार करू लागला. आणि नंतर आपल्या पत्नीस म्हणाला - 'सौभाग्यवती ! या विषयी तुझी काय इच्छा आहे. ?" ती म्हणाली - "आपण घर तर पुन्हा देखील बांधून घेवू शकतो, परंतु हा सज्जन पुरुष मरण पावला तर पुन्हा याला पुनर्जन्म मिळणार नाही."

"बस , तेव्हा सर्व मुलांना घराच्या बाहेर काढले पाहिजे."

दोघांनीही मुलांना घराच्या बाहेर काढले व स्वतः बाहेर निघाले. आपल्या घराला सोडताना घर मालकास भयंकर दुःख झाले. परंतु त्यामुळे म्हाताऱ्या माणसाविषयी त्यांच्या मनात आणखी श्रद्धा निर्माण झाली. घर मालकाने आपल्या घराला आग लावली. पाहता-पाहता ते सर्व घर जळाले. तिथे काहीच उरले नाही. पण आश्चर्य घडले. त्या ठिकाणी एकाएकी एक सुंदर घर बनून तयार झाले. समोरच म्हातारा हसत उभा होता. तो म्हणाला - "मी तुझी परीक्षा घेतली होती. मी पाहिले की तिन्ही भावांमधून तूच केवळ सत्याला सोडले नाहीस. आता तू आपले जीवन सुख-शांतीने घालव."

म्हाताऱ्याच्या तोंडून निघालेले हे वाक्य ऐकून लहान मुलाने आपल्या बापाला ओळखले. तो त्याला भेटण्यासाठी धावत गेला. पण तोपर्यंत म्हातारा अंतर्धान पावला होता.

(वा. रा. गाणार : रब (मूळ लेखक : प. अ. बारान्निकोव),
सोविएत संघातील लोककथा)

# ८.३५ मूर्ख मुलगा

(मॉरिशसची लोककथा)

एके काळी एक म्हातारी बाई राहात होती. तिला एक मुलगा होता. तो अत्यंत मूर्ख होता. जणू काही तो त्या मूर्ख राजाच्या राज्यातून आला होता. तो राजा इतका मूर्ख होता की त्याच्या राज्यात भाजीचा एक जुडगा आणि लोण्याचा एक गोळा सारख्याच किंमतीला मिळत होता.

एके दिवशी त्या गरीब बाईने त्या मुलाला बाजारात एक कुऱ्हाड आणण्यासाठी पाठविले. तो मूर्ख होता खरा, तरीपण एका लोहाराच्या दुकानात जाऊन त्याने एक कुऱ्हाड विकत घेतली.

परंतु घराकडे येताना वाटेत त्या मुलाचा मूर्खपणा वर उफाळून आला. गावातील लोकांनी फळझाडे लाविली होती. त्यांच्या फांद्या तो सपासप तोडू लागला. त्यामुळे सगळीकडे हाहाःकार उडाला. त्याने पपई आणि केळीची झोडेसुद्धा तोडून टाकली. शेवटी एकदाचा तो घरी आला.

घराच्या कुंपणात त्याच्या आईची मेंढरे चरत होती. त्या मूर्ख माणसाला आपाला पराक्रम आपल्या गरीब बिचाऱ्या आईला दाखविण्याची इच्छा झाली. त्याने ती आपली धारदार कुऱ्हाड आईला दाखविली आणि तो मोठ्याने ओरडून तिला म्हणाला,

'आई ! आई ! बघ. किती छानदार कुऱ्हाड मी तुझ्यासाठी आणलीय.'

असे म्हणून त्याने आपली कुऱ्हाड जवळच एक कोकरू चरत होते त्याच्या नाजूक मानेवर हाणली. त्या कोकराचे डोके तुटून उडाले. एवढे मोठे आपले नुकसान ती गरीब बिचारी बाई सहन करू शकत नव्हती. ती भयंकर रागावली. रागारागाने ती त्याला शिव्या घालू लागली. त्याला चांगले धोपटण्यासाठी त्याच्या पाठीमागे धावू लागली. परंतु तो मुलगा चपळ होता. धावत धावत त्या वेळी तो दूर अरण्यात निघून गेला.

त्यानंतर काही दिवसांनी जेव्हा तिचा राग शांत झाला तेव्हा ती त्याच्याबरोबर त्या कुऱ्हाडीबद्दल बोलतांना म्हणाली,

'तू जर ती धारदार कुऱ्हाड गवताच्या बैलगाडीतून आणली असतीस तर तू माझे आणि गावकऱ्यांचे एवढे मोठे नुकसान केले नसतेस. परंतु आता यापुढे काळजी घे.' ते ऐकून तो मूर्ख मुलगा ओक्सबोक्सी रडला. मग त्याने आईची क्षमा मागितली.

पुढे एके दिवशी त्या गरीब बाईला काही थोड्या सुयांची गरज लागली. बाजारातून सुया आणण्यासाठी आपल्या मुलाला पाठवताना तिने त्याला काही कडक सूचना दिल्या. ती म्हणाली, 'कुऱ्हाडीचं काय केलेस ते तुला ठाऊक आहे? यावेळी तरी माझ्या सुया हरवून येऊ नकोस.'

तो मूर्ख मुलगा ताबडतोब शहरात गेला. अवघ्या काही तासातच तो पुनः घरी आला. परंतु त्याच्याजवळ सुया नव्हत्या. आश्चर्यचकित होऊन त्याच्या आईने त्याला विचारले, 'अच्छा, माझ्या सुया कुठे आहेत ?'

तो मूर्ख मुलगा आनंदाने म्हणाला, 'तू काही एक काळजी करू नकोस, आई. त्या सुरक्षित आहेत. मी घराकडे परत येत होतो तेव्हा वाटेत मला एक गाडीवान भेटला. त्याची बैलगाडी गवताने भरलेली होती. त्याचा फायदा मी घेतला आणि त्या सगळ्या सुया त्या गाडीतील गवताच्या गठ्ठयांवर पसरून टाकल्या.'

त्या दुर्दैवी बाईचा आपल्या मनावरचा ताबा सुटला. त्याचा तो मूर्खपणा पाहून ती जोराने ओरडली, 'अरे बदमाषा ! त्या सुया त्या गवताच्या गठ्ठयात टाकण्याऐवजी तुझ्या टोपीत का खुपसल्या नाहीस ? यावेळी सुद्धा तू माझा पैसा पाण्यात फेकलास.'

हा प्रकार घडल्यानंतर काही दिवसांनी त्या म्हाताऱ्या बाईने त्याला बाजारात थोडे लोणी आणण्यासाठी पाठविले. पुनः तिने त्याला ताकीद दिली व म्हटले, 'तू माझ्या सुया कसा घालवून बसलास ते आठव. यावेळी तरी माझे लोणी खराब करू नकोस.'

तो मुलगा ताबडतोब शहरात निघून गेला. त्याने एका दुकानात जाऊन

लोणी विकत घेतले. ते त्याने आपल्या टोपीवर ठेवले. मग तो घरी यायला निघाला. परंतु ते उन्हाळ्याचे दिवस होते. आकाशात सूर्य प्रखरतेने तळपत होता. त्यामुळे ते लोणी वितळले आणि त्याच्या तोंडावरून वाहू लागले. त्याचे कपडे लोण्याने बरबटून गेले. तो घरी परत आला तेव्हा डबक्यात लोळणाऱ्या एखाद्या डुकरासारखा तो दिसत होता.

यावेळी मात्र त्याला पाहून ती दुर्दैवी आई त्याच्या मूर्खपणाला दोष देऊ लागली. ती म्हणाली, 'अरे परमेश्वराने कशाला तुला या जगात पाठविले आहे? माझ्या नजरेसमोरून दूर हो, मूर्खा. तुझा या जगात काडीचाही उपयोग नाही.

एक महिना झाला. त्या गरीब बाईला पैशाची गरज लागली. तिच्याकडे काही कोंबड्या होत्या. त्यातील काही विकायच्या असे तिने ठरविले. परंतु त्या बाजारात नेऊन विकायला तिच्याजवळ कुणी माणूस नव्हता. तिने पुनः आपल्या मुलाला बोलाविले. त्याच्याकडे एक कोंबडी देऊन ती त्याला म्हणाली, 'यावेळी तरी नीट ऐकून घे. शहाणा हो. गिऱ्हाईकाने पहिली किंमत सांगितली तर त्या किंमतीला त्याला तू कोंबडी देऊ नकोस. तो दुसरी किंमत सांगेपर्यंत वाट पाहात रहा.'

ती कोंबडी आपल्या हातात घेऊन तो मूर्ख मुलगा म्हणाला, 'अर्थातच आई, गिऱ्हाईक दुसरी किंमत सांगेपर्यंत मी वाट पाहीन. तुला काय वाटते मी इतका मूर्ख आहे म्हणून ? तुझा उपदेश ऐकणार नाही असं तुला वाटते?'

असे म्हणून तो शहराकडे निघाला. त्या शहरात त्याला एक आचारी भेटला. तो कोंबडी कुठे मिळेल का पहात होता. त्या आचाऱ्याने त्या मुलाला त्या कोंबडीची किंमत विचारली. तो मूर्ख मुलगा उलट त्याला म्हणाला,

'तूच स्वतः मला तिची किंमत सांग.'

आचाऱ्याने ती कोंबडी आपल्या हातात घेतली. तिचे वजन हातातल्या हातात करून तो अंदाजाने त्याला म्हणाला,' मी तिला पाच रुपये देईन.'

'ही तिची तुझी पहिली किंमत झाली. मला तुझी दुसरी किंमत सांग.'- तो मूर्ख मुलगा म्हणाला. त्या आचाऱ्याला वाटले आपण या मुलाची गंमत करावी. म्हणून

तो त्याला म्हणाला, 'मी तुला तिचे दोन रुपये देईन.'

'मग घे तर ती कोंबडी. मी फक्त दुसऱ्या किंमतीला विकतो.'

आचारी ते ऐकून थक्क झाला. पण त्याचेळी त्याला खूप आनंदही झाला. त्याने दोन रुपये दिले आणि ती कोंबडी घेऊन तो निघून गेला.

तो मूर्ख मुलगा पुनः घरी आला. आईला दोन रुपये देतांना आपण शहाणपणाने कसा व्यवहार केला हे तो मोठ्या आवेगाने तिला सांगू लागला. त्याने केलेला हा गैरव्यवहार पाहून त्या दुर्दैवी बाईने आपल्या कपाळाला हात लावला. ती भयंकर संतापली. तिने त्याला पकडण्याचा आणि झोडपण्याचा प्रयत्न केला. परंतु यावेळीसुद्धा तो तिच्या हातातून निसटून दूर अरण्यात पळून गेला.

असेच काही महिने निघून गेले. त्या म्हाताऱ्या बाईला पुनः पैशांची गरज लागली. यावेळी तिने त्या मूर्ख मुलाकडे एक बकरा विकायला दिला. तो विकताना पैशांचा व्यवहार कसा करायचा ते खूप कष्ट घेऊन तिने त्याला समजावून सांगितले. ती त्याला म्हणाली, 'तू कोंबडी विकलीस तसा बकरा विकू नकोस. काही लोक जेव्हा तुला बकऱ्याची किंमत सांगतील तर त्याना ती किंमत पुनः पुनः वाढवीत राहू दे. ती इतकी वाढवू दे की ती किंमत सर्वात अगदी जास्तीत जास्त होईल. त्यानंतर तू तो बकरा विकून टाक.'

'होय आई ! मला तू काय सांगितलंस ते नीट समजलंय.'

असे म्हणून तो मूर्ख मुलगा तो बकरा घेऊन दूर निघून गेला. शहरात त्याला एक खाटीक भेटला. त्याने त्याला त्या बकऱ्यासाठी सोळा रुपये देऊ केले. तो मूर्ख मुलगा त्याला म्हणाला, 'या किंमतीला हा बकरा विकणे अशक्य. तू तुझी किंमत वाढविली पाहिजेस.'

त्या खाटकाबरोबर त्याचा मुलगा होता. त्याला त्या मुलाचा मूर्खपणा ठाऊक होता. म्हणून त्याने आपल्या बापाला बाजूला नेले आणि त्याच्या कानात म्हटले,

'बाबा तुम्ही स्वतः या भानगडीत पडू नका. मला तो व्यवहार पाहू द्या. अशा

माणसाबरोबर कसा व्यवहार करावा ते मला माहीत आहे. '

त्या खाटकाने आपल्या मुलाला तसे करू दिले. तिथे जवळच एक शिडी होती. त्या खाटकाच्या मुलाने ती भिंतीला लावली. मग तो त्या शिडीच्या पहिल्या पायरीवर चढला. आणि मोठ्याने ओरडला, 'पंधरा.' अशा रीतीने तो एका पायरीमागून एक पायरी चढत राहिला. प्रत्येक वेळी तो ओरडत होता 'चौदा, तेरा, बारा' असा उतरत्या भाजणीत तो ओरडत होता. शेवटी तो त्या शिडीच्या अगदी शेवटच्या पायरीवर जाऊन उभा राहिला. तिथून तो खाली ओरडला, 'हे बघ. आता यापुढे मला किंमत वाढविता येणार नाही. मी तुला त्या बकऱ्याचे पाच रुपये देईन. तुझे काय म्हणणे आहे ?'

त्यावर तो मूर्ख मुलगा म्हणाला, 'ज्या अर्थी आणखी वर जायला एखादी पायरी नाही तर मग मी तरी काय करू ? तू हा बकरा घे आणि मला पाच रुपये दे.'

आपल्या मुलाने केलेला व्यवहार पाहून त्या खाटकाला आनंद झाला.त्याने त्या मूर्ख मुलाला पाच रुपये दिले आणि तो बकरा घेतला. अशारीतीने त्या मुलाने पुनः मूर्खपणा केला होता. नंतर तो घरी आला. आईला त्याने पैसे दिले. ते पैसे पाहून ती गरीब बिचारी आई आश्चर्यचकित झाली. त्याने व्यवहार कसा काय केला हे तिने त्याला विचारले. त्याला कोणती दुसरी पळवाट नव्हतही. त्याने तिला सगळी कहाणी सांगितली.

यावेळी मात्र ती दुर्दैवी आई एवढे मोठे प्रचंड नुकसान सहन करू शकली नाही. ती क्रुद्ध झाली. तिने हातात एक झाडू घेतला आणि त्याच्या अंगावर ती धाऊन गेली. तिने त्याला त्या झाडूनं झोड झोड झोडपलं. त्या मूर्ख मुलाच्या पाठीवर, डोक्यावर, पोटात ती तडाख्यामागून तडाखे देत होती. मग आपला जीव वाचविण्यासाठी तो आपल्या आईच्या घरातून दूर दूर पळून गेला.

(प्र. श्री. नेरूरकर : मॉरिशसच्या लोककथा)

# ८.३६ स्पार्टाकस

(इटलीची लोककथा)

स्पार्टाकस हा होता एक गुलाम ! केवळ पेशाने, धंद्याने नव्हे तर आता परंपरेनेही तो गुलाम बनलेला होता. म्हणजे असे की, त्याचे जन्मदाते वडील गुलामच होते आणि त्याच्या वडिलांचे वडीलदेखील एक गुलामच होते. तीन पिढ्यांच्या गुलामीचा वारसाच जणू स्पार्टाकसच्या वाट्याला आलेला होता.

त्याच्यासह तीनही पिढ्या रोमन लोकांच्या पदरी गुलाम म्हणून नांदल्या आणि वाढल्या. त्या जुन्या काळी इटली देशात गुलामीची पद्धत रुढ होती. माणसं गुलाम म्हणून भर बाजारात विकली जात असत आणि माणसंच त्यांना विकत घेत असत. गायी-बैल-घोडे-शेळ्या-मेंढ्या या पशूंप्रमाणेच चालत्या बोलत्या माणसांचीही बाजारात खरेदी विक्री चाले !

माणुसकीला काळा कलंक लावणारी ही रुढी रोमसारख्या तत्कालीन नावाजलेल्या व पुढारलेल्या साम्राज्यातही चाले. खुद्द रोम नगरीत दूरदूरच्या ठिकाणांहून गुलामांचे तांडेच्या तांडे विक्रीसाठी आणले जात असत आणि त्यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार राजरोसपणे चालत असत. या दृष्टीने रोम नगरी ही गुलाम प्रसृत करणारीच एक मोठी नगरी होती, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्पार्टाकस हा गुलाम होता हे खरे, पण तो एक भला माणूस होता हे त्याहून खरे ! स्पार्टाकसला गुलामगिरीविषयी भयंकर चीड होती, तिरस्कार होता. दुःख आणि घृणा होती.

स्पार्टाकस स्वातंत्र्याचा भोक्ता होता. माणूस हा माणूस म्हणून सर्व दृष्टींनी स्वतंत्र हवा, असे त्याला वाटे. जेवढ्या तिडकीने तो गुलामगिरीचा तिरस्कार करीत असे, तेवढ्याच जिव्हाळ्याने तो स्वातंत्र्यावर प्रेम करीत असे. गुलामीचे साखळदंड हातापायात खळखळत असताना देखील स्पार्टाकस स्वप्ने पाही ती मुक्त, स्वतंत्र मानवाची. तो अतिशय दयाळू मनुष्य तर होताच, पण जगातील

सर्व मानव पूर्णपणे स्वतंत्र असून एकमेकांशी अत्यंत सलोख्याने वागत आहेत, प्रेमाने बोलत आहेत आणि बंधुत्वाने नांदत आहेत अशा मंगल आकांक्षा उराशी बाळगून असे. आणि तो स्वप्नाळू इसम ही नव्हता. तर मोठा शूर, पराक्रमी लढवय्या आणि उत्कृष्ट नेताही होता.

स्पार्टाकसने आपल्या अंगच्या कुशल नेतृत्वाने आणि कार्याच्या आत्यंतिक तळमळीने फार मोठी 'गुलामांची सेना' त्या काळात संघटित केली होती. या गुलामांच्या सेनेत सुमारे पंचेचाळीस हजार गुलाम सामील झाले होते ! आपल्या क्रूर,मस्तवाल धन्याविरुद्ध खालची पापणीदेखील वर करण्याची हिंमत ज्या काळी बिचाऱ्या गुलामांना नव्हती, त्या काळात त्याच धन्याविरुद्ध व प्रत्यक्ष रोमन सम्राटांविरुद्ध दंड थोपटून समरांगणात उभे ठाकण्याची ताकद एकटया स्पार्टाकसनेच त्यांना दिली होती आणि या अभूतपूर्व कामगिरीमुळेच आज इतका काळ उलटला असला तरी मानवी स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या लढवय्यांच्या मालिकेत स्पार्टाकसचे नाव अग्रक्रमाने घेतले जात आहे.

बिचारे गुलाम श्रीमंतांच्या पदरी जनावरांसारखे राबत असत. त्यांना घरातील आणि शेतातील कामे करावी लागत असत. शेतावर तर त्यांना बैलाप्रमाणे नांगरासदेखील जुंपण्यात येई. उन्हातान्हात शेत नांगरावे लागे आणि बैलांप्रमाणेच पाठीवर आसुडाचे फटके बसत, तेही मुकाट्याने खावे लागत. काही जणांना गाड्यांनाही जुंपले जाई. चार चार, सहा सहा माणसे बसलेल्या गाड्या, टांगे ओढीत धावावे लागे.

आणि सगळ्यात भयंकर कष्टाचे दुःखाचे काम असे खाणीतले. चांदी-सोन्याच्या व तांबे शिशाच्या खाणीत गुलामांनाच काम करावे लागे. बऱ्याच खाणी रोमन साम्राज्याच्या अधिपत्याखालीच होत्या.

अशाच खाणींपैकी नूबीन वाळवंटातील सोन्याची खाण एक भयंकर त्रासदायक खाण होती. या ठिकाणचे उष्णतामान जगातल्या अन्य कोणत्याही ठिकाणापेक्षा अधिकच भरेल इतके भयंकर होते. या खाणीत काम करणे म्हणजे मृत्यूच्या दाढेत वावरणेच होय. परंतु एके दिवशी स्पार्टाकसवरच ही पाळी

आली. थ्रॅस ह्या त्याच्या गावाहून त्याला हातकड्या घालूनच नूबीनला आणले. त्याच्याबरोबर आणखीही काही गुलाम होतेच. स्पार्टाकस याच्या मानेभोवती कुत्र्याला बांधतात तसा, पण लोखंडाचा एक पट्टा घातलेला होता. त्याला साखळी बांधलेली होती आणि तिचे दुसरे टोक त्याच्यावर पहारा करणाऱ्या पाहरेकऱ्याच्या हातात असे.

खाणीतले जीव गुदमरुन टाकणारे. काम करून करून गुलाम हैराण होत असत. एकदा रात्री खाणीतले काम संपवून स्पार्टाकस वर आला असतानासुद्धा केवळ एक सेकंदभरच विसावला म्हणून त्याच्या पहारेकऱ्याने त्याला चाबकाने फोडून काढले. रात्री अपरात्री त्याला असे मारून कुठे तरी अंधाऱ्या गोठ्यात किंवा छपरात टाकीत असत. आणि सकाळ झाली की पुन्हा कामाला जुंपीत असत.

असे कित्येक महिने चालले होते. मग एकदा त्यांच्यापैकी जे अधिक सशक्त गुलाम होते त्यांना बाजूला काढण्यात आले. खरे तर ते सगळेच दणकट शरीरयष्टीचे होते. म्हणून तर त्यांना या खाणीत कामाला आणले होते. पण त्यांच्यातूनही बळकट गुलामांची निवड करण्यात आली होती. नूबीनहून त्यांना कैपूआला नेण्यात येणार होते- ग्लॅडिएटरचे शिक्षण देण्यासाठी. ग्लॅडिएटर म्हणजे द्वंद्वयुद्ध खेळणारा गुलाम.

इटली देशात हजारो गुलामांची विक्री होत असे. मोठ्ठा बाजार भरत असे आणि त्या बाजारात अतिशय कमी किंमतीत गुलामांना विकले जात असे. ही किंमत इतकी कमी असे की, घोड्यांचीही किंमत त्या गुलामांपेक्षा कितीतरी पटींनी अधिक असे. रोमन लोक त्यांना वागवीतही तसेच. जनावरांपेक्षा हलक्या दर्जाने. द्वंद्वयुद्ध खेळणारा गुलाम म्हणजे त्यांच्यादृष्टीने करमणुकीचा एक प्राणी, मनोरंजनाचे एक साधन आणि स्वतःच्या करमणुकीसाठीच ते अशा ग्लॅडिएटर्सना विकत घेऊन पाळीत असत.

एखाद्या मैदानात एक रिंगण तयार करण्यात येई. त्या रिंगणात दोन ग्लॅडिएटर्स एकमेकांशी पशूंप्रमाणे झुंजण्यासाठी सोडले जात. रिंगणाच्या

सभोवती धनिक मंडळी खुर्च्या टाकून गंमत पाहायला बसत. रिंगणात उतरलेल्या योद्धांवर , कोण कोण मारणार याविषयी तर्कवितर्क करून, हे बघे लोक आपसात पैजाही लावीत असत. रेसच्या घोड्यावर जसे पैसे लावतात तसेच.

हे ग्लॅडिएटर्स एकमेकांशी झुंजत ते काही एकमेकांचा एकमेकांवर राग, संताप किंवा वैर म्हणून नव्हे, तर त्यांचे रक्षक त्यांना अशा प्रकारे झुंजायला सक्ती करून भाग पाडीत असत आणि जर एखाद्या ग्लॅडिएटर गुलामाने आपल्या रक्षकाचे ऐकले नाही, किंवा झुंजीत भाग घ्यायचे नाकारले, तर दुसऱ्या ग्लॅडिएटरकडून तशाच प्रकारच्या सक्तीने त्याला जबर जखमी करण्यात येत असे; त्याचे हातपाय तोडण्यात येत असत, इतकेच नव्हे तर कधी कधी त्याला ठार देखील मारण्यात येत असे.

या झुंजीच्या वेळी लढणाऱ्या गुलामांच्या हाती कधी लखलखत्या तलवारी दिल्या जात तर कधी पल्लेदार कट्यारी दिल्या जात. कधी खंजीर, सुरी, फरशी तर कधी भालेदेखील दिले जात. कधी त्रिशूळ घेऊनही त्यांना लढावे लागे. आणि भयंकर शस्त्रास्त्रे चालवायची कुणावर तर आपल्याच सहकाऱ्यांवर, आपल्याच मित्रांवर ! कशासाठी ? तर धनिकांच्या करमणुकीसाठी ! नाहीतर मृत्यू ठेवलेलाच ! असे हे भयंकर जीवन गुलामांच्या वाट्याला येई. स्पार्टाकसला याची चीड, घृणा वाटे.

रिंगणाच्या कडेला बसलेले बघे आनंदाने बेहोष होऊन ओरडत, किंचाळत असत. ग्लॅडिएटर्सना एकमेकांना मारण्यासाठी उत्तेजन देत असत. ज्या बघ्या मंडळीत बायकांचा भरणा विशेष असे; त्याही अशा प्रकारच्या आरडाओरडीत सामील होत असत. जे विशेष श्रीमंत असत त्यांच्यासाठी खास कोच ठेवलेले असत. ते मऊ मऊ गादीच्या कोचावर बसून, सुवासिक अत्तरे कपड्यांवर शिंपडून येत असत. आणि बसल्या बसल्या मिठाईचे बकाणे भरून, दारुचे प्यालेही रिकामे करत असत. समोर रिंगणात झुंजणारे गुलाम मात्र तीक्ष्ण शस्त्रास्त्रांच्या घावाने रक्तबंबाळ झालेले असत. त्यांच्या वाहत्या जखमा आणि

रक्ताची उडती कारंजी पाहण्यात ह्या गुलहौशी मंडळींना अतिशय मौज वाटे.

कधी कधी काय होई की, दोन गुलामांची ही झुंज दिवस नि दिवस आणि आठवडेच्या आठवडेदेखील चाले. अखेरीस जखमी गुलामांचे काय करायचे याचा निर्णय ही गुलहौशी बघी मंडळी करीत असत. विजयी योद्धा गर्दीकडे पाहत उभा राही. गर्दीने जर हात वर करून आणि अंगठा खाली वळवून इशारा केला तर विजयी योद्धा जखमी योध्याचा तिथल्या तिथेच निकाल लावून टाकीत असे. पण क्वचित असेही घडे की, जर गर्दीची लहर फिरली आणि जर ती विशेष अनुकूल असली, तर जखमी योध्याला बाजूला घेऊन मलमपट्टी करावी असावी कौल ती देई.

स्पार्टाकसची निवड अशा झुंजणाऱ्या योद्धांसाठीच झालेली होती. त्याला आणि त्याच्या बरोबरीच्या सहकाऱ्यांना आता पोटभर खायला-प्यायला मिळे. याचा अर्थ रोमन लोक एकाएकी दयाळू बनले होते, असा नाही, तर द्वंद्वयुद्धाची रंगत वाढण्यासाठी ह्या लढवय्यांना धष्टपुष्ट बनविणे अगत्याचे असे. बळी द्यावयाच्या बोकडाला किंवा रेड्याला नाही का आधी भरपूर खाऊ-पिऊ घालून मस्त बनवीत! तीच गत ह्या गुलामांची.

*

गुलामांच्या या टोळीत जसे सर्व देशांतले गुलाम होते, तसेच वर्णाने काळे-गोरेदेखील होते. पण त्यांचे पहारेकरी मात्र अत्यंत क्रूर आणि पाषाणहृदयी होते. एकमेकांना ठार करायला ते सक्तीने भाग पाडीत असत. त्यामुळे सगळेच बिचारे अतिशय दुःखी होते.

स्पार्टाकस या दुःखातून कशी सुटका करून घेता येईल, याचाच सारखा विचार करीत असे. तो गुलाम असला तरी वागणुकीने सभ्य होता. हुशार होता. तो तरुण होता, तरी सर्व गुलाम त्याची प्रशंसा करीत असत. स्पार्टाकसने, केवळ स्वतःचीच नव्हे तर सगळ्यांचीच सुटका कशी करता येईल या दृष्टीने विचार व प्रयत्न चालविले. तो एक गुलामाजवळ बोलला, तो दुसऱ्याजवळ, दुसरा तिसऱ्याजवळ अशी कारवाई सुरू झाली. स्वातंत्र्याची ठिणगी पडलेली

होती. आता वेळ येताच भडका उडणार होता. प्रत्येक गुलाम आपल्या मुक्तीच्या कल्पनेने भारुन गेला होता आणि ह्या कराल तुरुंगातून निसटण्याच्या संधीची वाट पाहत होता.

आणि एक दिवस उगवला. त्यांच्या टोळीतील एकाने आपल्या पहारेकऱ्यांची आज्ञा अव्हेरली होती. आपल्या झुंजीतल्या सहकाऱ्याला ठार मारण्यास नकार दिला होता. पाहरेकऱ्याने त्याच्यावर सक्ती केली, त्याला धाकदपटशा दाखविला, छळ आरंभला; पण हे प्रकार आता सर्वांनाच असह्य झाले होते. सर्वांनीच विचार केला आणि सर्वांनी मिळूनच पहारेकऱ्यांवर हल्ला चढविला. तशी त्या तुरुंगात एकच गडबड उडाली. गोंधळ माजला. ह्या अनपेक्षित हल्ल्यान पाहरेकरी भेदरून जीव घेऊन पळाले.

गुलामांनी तिथली सगळी शस्त्रास्त्रे गोळा केली आणि स्पार्टाकसच्या नेतृत्वाखाली तो तुरुंग फोडून ते सारेजण बाहेर पडले.

तुरुंग फोडून गुलाम बाहेर पडल्याची वार्ता रोमन सोल्जरांना ताबडतोब मिळाली. कारण तुरुंगाबाहेर अगदी जवळच त्यांचा तळ पडलेला होता. ही वार्ता मिळताच ते सरसावून उठले. शस्त्रास्त्रे परजून सिद्ध झाले आणि गुलामांना पुन्हा पकडून तुरुंगात डांबण्यासाठी त्यांचा पाठलाग करू लागले.

झुंज खेळणाऱ्या गुलामांजवळ वस्तुतः हत्यारे-पात्यारे नव्हती. उलट रोमन सोल्जर्स शस्त्रसज्ज होते. तेव्हा त्यांच्याशी सरळ सरळ मुकाबला देणे कठीणच होते. म्हणून मग त्यांनी युक्ती केली. एका मोठ्या वर्तुळाकारात ते सारे जंगलात पांगले. रोमन सैनिकांनाच त्यांनी चोहोबाजूंनी वेढले आणि मोठमोठया दगडगोट्यांचा वर्षाव सैनिकांवर सुरू केला. सैनिकांनीही सुरुवातीस आपल्या हातातले तीक्ष्ण भाले गुलामांच्या रोखाने फेकले . पण नंतर मात्र त्यांचे काही चालेना. भिरभिरत येणारे दगड ढालीच्या साहाय्याने थोपवून कसाबसा जीव वाचविण्यासाठी प्रयत्न नंतर ते करू लागले. त्याशिवाय आता गत्यंतरच नव्हते. कारण त्यांना सरळ सरळ समोरासमोर लढाचयचे फक्त ठाऊक होते. अशा तऱ्हेचे गनिमी युद्ध त्यांना ठाऊक नव्हते. त्यांना उत्तम भालाफेक जमे. पण

दगडाने नेमका माणूस टिपायला येत नव्हता. त्यामुळे लवकरच ते सैनिक गुलामांच्या माऱ्याने हैराण झाले. त्यांनी शरणागती पत्करली. गुलामांनी त्यांना निःशस्त्र करून आपले बंदी केले. स्पार्टाकस आणि त्याचे साथीदार यांनी मिळविलेला हा पहिला महत्त्वपूर्ण विजय होता !

ग्लॅडिएटर्स होते फक्त पन्नास ! त्यांचा हा पराक्रम जंगलात काम करणाऱ्या अन्य गुलामांनी हातातली कामे टाकून जेव्हा पाहिला, तेव्हा त्यांनाही आनंदाने गगन ठेंगणे झाले. धावत-पळत काही गुलाम आपली अवजारे, हत्यारे घेऊन ग्लॅडिएटरांच्या जवळ आले. त्यांची तारीफ करू लागले. उन्मत्त रोमन सैनिकांनी शरणागती पत्करल्याचे अभूतपूर्व दृश्य त्यांनी पाहिले होते.

या क्रांतीवीर गुलामांच्या पथकात आणखी काही गुलाम दाखल झाले. पथक वाढू लागले. पण काही गुलाम तसेच राहिले. कारण आजवरच्या अमानुष, पाशवी अत्याचारांनी त्यांच्या हृदयात जबरदस्त भीती निर्माण झालेली होती. ती ठाण मांडून बसलेली होती. या भीतीमुळेच ते स्पार्टाकसच्या स्वातंत्र्यपथकात सामील झाले नाहीत.

पहिल्या अभूतपूर्व विजयानंतर स्पार्टाकस आणि त्याचे साथी ह्यांचा आत्मविश्वास दुणावला. स्वातंत्र्याची ज्योतही प्रज्वलित झाली. त्यांनी एकमेकांना प्रेमभराने मिठ्या मारल्या. चुंबने घेऊन आणि हसून नाचून विजयाचा आनंदोस्तव साजरा केला. असा मुक्त, मोकळा, निर्मळ आनंद त्या मंडळींनी पूर्वी कधीच अनुभविलेला नव्हता.

स्पार्टाकसने पराभूत सैनिकांची शस्त्रास्त्रे आपल्या साथीदारांना देऊन शस्त्रसज्ज पलटणच उभी केली. झुंजणारे गुलाम आणि इतर गुलाम ह्यांच्यामध्ये आता वेगळ्याच प्रकारचा भ्रातृभाव आणि कौटुंबिकता निर्माण झाली. ते परस्परांशी मोठ्या सलोख्याने, स्नेहाने वागू लागले. गुलामांच्या कुटुंबियांनीही त्यांना साथ दिली. त्यांच्या गनिमी युद्धात स्त्रियांनीही भाग घेतला. व्हॅरिनिया ही स्पार्टाकसची पत्नीदेखील या सैन्यात सामील झाली. जसजसे गुलामांचे सैन्य वाढू लागले, तसतसे त्यांचे गटही करण्यात आले.

निरनिराळ्या देशांचे गट तयार झाले. त्या सर्वांचे नेतृत्व होते स्पार्टाकस आणि व्हॅरिनिया ह्यांच्याकडे.

आता आमचे युद्ध सुरू झाले आहे. वीरहो ! उठा, लढा ! स्पार्टाकस गुलामांना आवेशयुक्त शब्दात चेतावणी देत असे. गुलामांच्या सैन्याची संचलने निघू लागली. स्पार्टाकस आपल्या शूर शिपायांना उद्देशून म्हणे,'आपण असे साऱ्या देशभर संचलन करीत फिरू आणि ठायी ठायी जे आपले बांधव गुलामगिरीत पिचत आहेत, त्यांना मुक्त करू ! ' सैन्यातील शिपायांना स्फुरण येई. ते स्वातंत्र्याचा आणि स्पार्टाकसचा जयजयकार करीत. स्पार्टाकसची तेजस्वी भाषणे व ओजस्वी विचार गुलामांना अतिशय आवडू लागले. भराभर येऊन ते स्पार्टाकसच्या सैन्यात दाखल होऊ लागले.

*

सुमारे अडीचशे सोल्जरांचा पराभव स्पार्टाकसच्या लोकांनी केला. ही वार्ता रोमला पोहोचली. रोमन साम्राज्याचे संरक्षणखाते होतेच. त्यातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या मंडळाला म्हणत असत सेनेट आणि सेनेटमध्ये काम करणारे ते सेनेटर. रोमन सेनेटरांना ही वार्ता कळजी, तेव्हा त्यांना विशेष काही वाटले नाही. आपण या गुलामांचा बंदोबस्त सहज करू शकू अशीच त्यांची भावना होती. मात्र, त्यांनी आपली सभा भरविली आणि सहा कोहोर्ट इतके सैन्य गुलामांना ताळ्यावर आणण्यासाठी धाडावयाचे असे त्यांनी ठरविले. एका कोहोर्टमध्ये सुमारे पाचशेसाठ सैनिक असतात. या हिशोबाने ३३६० सैनिक निघाले. त्यांनी उत्तम कवायत केलेली होती आणि शस्त्रास्त्रेही त्यांच्याजवळ होती.

'मूठभर बंडखोर गुलामांचा आमचे हे शिपाई सहज फ डशा पाडतील, ' असे एक सेनेटर म्हणाला. कोहोर्टमधल्या प्रत्येक सैनिकाचीदेखील अशीच भावना होती की, आपण या गुलामांना पराभूत करू, पकडू आणि पुन्हा पूर्वीप्रमाणे तुरुंगात त्यांना डांबून टाकू.

सैनिकांची पथके निघाली. लष्करी बँड वाजू लागला. रोमन लोकांनी

जयजयकार केला. मोठ्या दिमाखाने आणि आत्मविश्वासाने रोमन सैनिक गेले. स्पार्टाक्सच्या सैन्याचा सुगावा काढून जवळच त्यांनी आपली छावणी ठोकली.

रात्री छावणीतल्या राहुट्यांमधून निजानीज झाली. गुलाम आपल्याला पाहूनच घाबरून गेले असतील, तेव्हा त्यांची फिकीर करण्याचे कारणच काय, असा शहाणपणाचा विचार करून सगळे अशाच विचाराने गुंगले नि मग कोलमडले.

ही पर्वणी साधून मध्यरात्रीच्या वेळी स्पार्टाकसने आपल्या फौजेसह रोमन सैनिकांच्या छावणीवर हल्ला चढविला आणि त्यांची दाणादाण उडवून दिली. सकाळ उगवण्याच्या आत एवढ्या सैनिकांचा पूर्णपणे पाडाव करून गुलामांच्या फौजेने दुसरा अपूर्व विजय मिळविला होता.

स्पार्टाकसने परत जाताना एका रोमन सैनिकाला आपल्याबरोबर घेतले आणि त्यांच्याबरोबर 'सेनेटरांना सांग, आमचा पार धुव्वा उडविला स्पार्टाकसने.' असा निरोप देऊन त्याला रोमला पिटाळले. वरती आणखी असेही कळविण्यास कमी केले नाही की, त्यांना म्हणावे, हवे तर आणखी पालटणी पाठवा आमच्याशी लढायला. त्यांनाही धूळ चारल्याशिवाय राहणार नाही. आम्ही... सगळ्या रोमन सैन्याचा पराभव करून ह्या भूमीतून गुलामगिरी नष्ट करू आणि हा देश सुखी करू तेव्हाच आता आम्ही स्वस्थ बसू. '

बिचारा रोमन शिपाई ! निमूटपणे स्पार्टाकसचा निरोप घेऊन रोमन आला आणि सेनेटला तो कळविला. आता मात्र सेनेटर घाबरले. त्यांनी तातडीने उत्कृष्ट लढवय्ये असलेले सैन्य धाडण्याचा निर्णय घेतला. या लढवय्यांच्या जोडीला तुफानी घोडेस्वारही धाडले. आणि या पलटणीला निरोप देतांना बजविण्यात आले की, गुलामांचा आणि स्पार्टाकसचा पूर्णपणे निःपात केल्याशिवाय परतू नका. यावेळी गुलामांवर चालून जाणाऱ्या फौजेत सात हजारांहून अधिक एवढे उत्कृष्ट , वेचक योद्धे होते आणि स्पार्टाकसजवळ त्याच्या आसपास भरतील एवढी सगळी साधी माणसेही नव्हती.

रोमन योध्यांची पलटण प्युब्लिअस नामक सेनापतीच्या नेतृत्वाखाली

मोठ्या आत्मविश्वासाने गेली. परंतु प्युब्लिअसने प्रथमच मोठी चूक केली. त्याने आपले सैन्य तीन टोळ्यांत विभागले आणि एकेका टोळीस देशातील जंगले, दऱ्याखोऱ्या, खेडी आदी भाग धुंडाळण्यास नेमून दिला. त्याप्रमाणे एकेक टोळी रवाना झाली.

पण त्यामुळे स्पार्टाकसचे आयतेच फावले. त्याने आपली फौज एकत्र केली आणि प्युब्लिअसच्या सैन्याच्या एकेका टोळीला अवघड जागी गाठून हल्ला चढविला. कुठे घनदाट जंगलात, तर कुठे अरुंद दरीत हल्ल्यांवर हल्ले चढविले आणि बहाद्दूर म्हणवून घेणाऱ्या रोमन सैन्याला कोंडीत धरून पराभूत केले.

या तिसऱ्या प्रचंड विजयानंतर स्पार्टाकसच्या सैन्याला बरीच शस्त्रास्त्रं मिळाली. भाले, तलवारी, भरपूर चिलखते, अस्त्रे उपलब्ध झाली. स्पार्टाकसने आपल्या सैन्यास कवायत शिकविली. त्यांच्या पलटणी तयार केल्या. मोठमोठ्या छावण्या घेतल्या. जे गुलाम त्यांच्यात सामील व्हायला आजवर भीत होते, त्यांच्यापैकी काही आजचे हे सामर्थ्य पाहून स्पार्टाकसला येऊन मिळाले, तर काहीजण रोमन सैन्याच्या हालचाली, त्यांचे बेत, इत्यादीची गुप्त माहिती स्पर्टाकसला पुरवू लागले.

स्पार्टाकसच्या सैन्यात ग्यॅनीकस आणि क्रिग्झस हे दोन शूर योद्धे होते. धाडसी होते. हुशार होते. क्रिग्झस हा तर महाधाडसी योद्धा होता. त्याला वाटे, आपले सैन्य घेऊन सरळ रोमवर चालून जावे. पण स्पार्टाकसला हे पसंत नव्हते. कारण रोमवर चालून जाण्याइतपत गुलामांची, फौज अद्याप बळकट आणि लढाऊ बनलेली नव्हती.

अशीच दोन वर्षे गेली. या दोन वर्षाच्या कालावधीत स्पार्टाकसने अनेक लहानमोठ्या लढाया केल्या आणि जिंकल्या. त्याचा हा पराक्रम देशभर लोकांच्या कानी गेला. साऱ्या रोमन साम्राज्यात त्याला प्रसिद्धी लाभली. ह्या काळात व्हॅरिनियाची त्याला बहुमोल मदत लाभली.

स्पार्टाकस आपल्या सैनिकांसह टेकडीसारख्या उंचवट्याच्या जागी तळ ठेवी. त्यामुळे रोमन सैन्याचा सुगावा त्यांना लांबूनच मिळे.

आणि एकदा महाप्रचंड असे रोमन सैन्य त्यांच्यावर चालून येत असल्याचे त्याने पाहिले. बघता बघता तो रोमन सैन्याचा महासागर त्यांच्या नजीक येऊन पोहोचला. स्पार्टाकसने आपल्या पलटणी जय्यत तयार ठेवल्याच होत्या. त्यांना भराभर हुकूम फर्माविले आणि शत्रूवर धाडले. क्षणार्धात युद्धास तोंड लागले. स्पार्टाकस टेकडीच्या माथ्यावरून रणभूमीचे निरीक्षण करीत होता आणि आपल्या सैन्याला मार्गदर्शनही करीत होता. पण थोडक्याच अवधीत त्याच्या अवतीभोवती युद्ध येऊन धडकले आणि स्पार्टाकस स्वतःच त्यात गुंतून गेला, तोही शत्रूशी लढू लागला.

रोमन सेनाधिकारी आपले निवडक लढवय्ये स्पार्टाकसला जिवंत पकडण्यासाठी किंवा त्याला ठार मारण्यासाठी मुद्दाम त्याच्यावर धाडले होते. गुलामांच्या हे लक्षात येताच त्यांनीही प्राणाची बाजी लावून स्पार्टाकसला संरक्षण देण्याचा प्रयत्न चालविला. त्यांनी स्पार्टाकसभोवती कडे तयार केले.

युद्धाची धुमश्चक्री उसळली. रोमन सैन्याचा सारा रोख स्पार्टाकसवरच होता. स्पार्टाकसही अतुल धैर्याने शत्रूशी लढत होता. युद्धाची दुसरी आघाडी सांभाळली होती क्रिग्झसने. त्यानेही बहादद्री दाखविली आणि रोमन सैन्याला मागे हटविले.

दिवसभर आणि रात्रभर युद्ध चालूच राहिले, खरे तर त्या काळी दिवस मावळताच युद्ध थांबवयायचे, अशी प्रथा होती. पण प्रचंड उत्साही गुलामांनी युद्ध जारीच ठेवले. त्यामुळे एकसारखे लढून लढून रोमन सैनिक अगदी जेरीस आले आणि पहाट होताहोताच जीव घेऊन दाही दिशांनी पसार झाले.

स्पार्टाकसने फार च मोठा विजय संपादन केला होता. या त्याच्या विजयाने त्याच्या शौर्यकथा तर सर्वत्र पसरल्याच पण बलाढ्य रोमन साम्राज्यालाही हादरा बसला.

*

अशीच आणखी चार वर्षे गेली.

उतावळ्या स्वभावाच्या क्रिग्झसला आता धीर धरवेना झाला. त्याने वीस

हजार गुलामांना घेऊन रोमवर हल्ला चढविला.

पण हाय ! रोमन सैन्यापुढे त्यांचा टिकाव लागला नाही. क्रिग्झस आणि सैन्य सारेच ठार झाले.

क्रिग्झसच्या मृत्यूचे आणि गुलामांच्या एवढया हानीचे स्पार्टाकसला अतीव दुःख झाले. शेवटी तोही रोमन सैन्याच्या तडाख्यात सापडला. चोहोबाजूंनी त्याला शत्रूने वेढले. स्पार्टाकस दुबळा बनलेला होता, असहाय्य होता. त्याला आणि त्याच्या उरल्यासुरल्या साथीदारांना शत्रूने ताब्यात घेतले. स्पार्टाकसला अनंत यातना देऊन ठार मारण्यात आले. कित्येक गुलामांना फासावर चढविले, कित्येकांना क्रूसावर खिळे ठोकून लटकाविले, कित्येकांना तोफेच्या तोंडी दिले गेले. तर कित्येकांना जिवंत जाळण्यात आले.

स्पार्टाकसचा अंती जरी पराभव झाला, तरी मानवांच्या गुलामगिरीविरुद्ध लढणारा वीर म्हणून तो मानवी इतिहासात अमरच झाला आहे. सत्तेसाठी, संपत्तीसाठी, भूभागासाठी निरनिराळे देश एकमेकांविरुद्ध लढतात. रक्त सांडतात. पण स्पार्टाकस लढला तो माणसांच्या माणुसकीकरिता. केवळ आपल्याच देशातल्या नव्हे, तर सर्व देशांतल्या जिथे जिथे गुलामगिरीची दुष्ट प्रथा आहे तिथल्या मानवांकरिता. म्हणूनच स्पार्टाकसचा पराभवदेखील विजयाहून धवल आहे. त्याचा अंत तर अनंत काळपर्यंत पिचलेल्या, गांजलेल्या मानवांना स्फूर्ती देत राहील.

(राजा मंगळवेढेकर : देशोदेशीच्या कथा)

# ८.३७ कुरूप अली

(ऱ्होडेशियाची लोककथा)

एका गावात एक अली नावाचा मुलगा राहत होता. तो रूपानं अगदीच कुरूप होता. इतका की लोक त्याला कुरूप्या म्हणूनच हाक मारीत.

अशा कुरूप माणसाला मुलगी कोण देणार ? त्यामुळं गावातल्या सगळ्या तरुण मुलांची लग्नं झाली तरी याचं लग्न काही झालं नाही. घरात आई-बाप, बहीण-भाऊ कोणी नव्हतं. एकटा जीव सदाशिव ! त्यामुळं त्याला स्वतःलाच रांधून खावं लागत होतं. पुष्कळ वेळा तर तो नदीच्या तीरावरच जाऊन बसायचा अन् मासे पकडून आपलं पोट भरायचा.

एवढ्यात एका उत्सवाचे दिवस आले. गावापासून दूर असलेल्या एका टेकडीवर या दिवसात गावातले सगळे तरुण जमत, नाना तऱ्हेच्या खेळांच्या स्पर्धा लावीत, कुस्त्या करीत; आणि नाना प्रकारच्या मौज-मजा करीत.

कुरूपालासुद्धा अशा खेळांची आणि विशेषतः कुस्तीची आवड होती. पण तो स्वतः काटकुळा होता आणि काळाकुट्ट होता; त्यामुळे त्याच्याशी खेळायला कोणाला आवडत नसे. तो बिचारा एकटा बाजूला बसून आपल्या बरोबरीच्या सर्व तरुणांच्या गमती-जमती पाही. मनातून त्याला आपल्या एकटेपणाचं फार दुःख होई.

उत्सवाच्या दिवशी दुपारपर्यंत सर्व तरुण मंडळी नाना प्रकारचे खेळ खेळली आणि उन्हं तापू लागली, तेव्हा थकून-भागून झाडाखाली जाऊन आरामात पडली. एका तरुण मुलापाशी एक लहानसं ढोलकं होतं. ते त्यानं वाजवायला सुरुवात केली. त्या ढोलक्याचा आवाज गावात ऐकू गेला. त्याबरोबर घरोघर असलेल्या त्या तरुणांच्या तरुण बायका नटून, सजून आपापल्या घरातून बाहेर पडल्या. प्रत्येकीच्या डोक्यावर एकेक टोपलं होतं अन् त्यात खाण्याचे छान-छान पदार्थ होते. डोक्यावर टोपलं अन् कमरेवर पाण्याचा लहानसा कळसा

घेऊन त्या सगळ्या तरुणी टेकडीवर गेल्या. तिथं बसलेले तरुण आपापल्या बायकांची वाट पाहतच होते. प्रत्येक बायकोनं आपल्या नवऱ्यापुढं खाण्याची आणलेली शिदोरी ठेवली आणि सर्वांची मोठ्या मजेत जेवणी-खाणी झाली. अली दूर बाजूला बसून सारं पाहत होता. त्याला भूक सपाटून लागली होती; पण त्याला कोणी हटकलं नाही की विचारलं नाही. तरुणी तर त्याचा इतका तिरस्कार करीत होत्या की त्या त्याच्याकडं पाठ करून बसल्या.

अली भुकेनं व्याकुळ झाला. त्याला बसून राहवेना. तो आपल्या कमरेला बांधलेली मासे पकडण्याच्या गळाची दोरी हाती घेऊन नदीकाठी केला आणि त्यानं गळ पाण्यात टाकला.

थोड्या वेळानं गळाला ओढ लागली. अलीला वाटलं, चांगला मोठा मासा गळाला लागला बरं का ! त्यानं जोर करून गळ वर ओढायला सुरुवात केली; पण पाण्याच्या आतून त्याहून जास्त जोरानं ओढ बसू लागली. अलीला वाटलं, अरे, बराच मोठा मासा असला पाहिजे. तो आणखी जोरानं वर ओढू लागला, तशी दोरी तुटली अन् गळ पाण्यात गेला !

आता काय करायचं ? छेः ! असा गळ जाऊ देऊन कसं भागेल ? त्यानं लगेच पाण्यात सुरकांडी मारली आणि तो पाण्याच्या तळाशी गेला. तिथं पुढ्यातच त्याला एक सुसर दिसली. ती आपले बटबटीत डोळे फाडून त्याच्याकडं बघत होती. अलीनं तिला नम्रपणे विचारलं, ‘ मावशीबाई, तुम्ही माझा गळ घेतलाय ? ‘

ती म्हणाली, ‘इतकी मी मूर्ख नाही. काय खावं न् काय खाऊ नये हे मला कळतं. पण एक भला मोठा मासा तुझा गळ घेऊन आत्ताच इकडून त्या तिकडं गेला. हवं तर तिकडं जाऊन त्याला पकड.‘

सुसरमावशीचे आभार मानून कुरूपअली मावशीनं दाखविलं त्या दिशेनं पुढं गेला. दोन्ही बाजूंना त्याला सुरेख-सुरेख वनस्पती दिसल्या. लहान-लहान मासे त्याच्या डोक्यावरून सुळकन् जात होते. लहान-लहान साप त्याच्या हाता-पायाखालून सळसळ धावत होते. त्यांना आपल्याकडून इजा होऊ नये अशा बेतानं अली पुढं-पुढं जात होता.

असं चालता चालता त्याला समोरच एक खडकाच्या आत असलेली गुहा दिसली. त्या गुहेच्या तोंडाशी एक कमरेत वाकलेली अन् पाय माशाच्या शेपटीसारखे निमुळते असलेली बाई दिसली. अलीनं विचारलं, 'आई, माझा गळ चोरून घेऊन कोणी एक मजबूत मासा पळून इकडं आलाय, बघितलंस का तू त्याला ?'

म्हातारी म्हणाली, 'त्या एवढ्याशा गळाचा शोध करीत इतक्या लांबवर तू आलास ? तू फार गरीब वाटतोस ?'

अली म्हणाला, 'गरीब आहे आणि कुरूप आहे मी, आई !'

म्हातारीनं जवळच्याच एका वनस्पतीचा शेंडा धरून उपटला आणि खालचा गड्डा दाखवून ती त्याला म्हणाली, 'या गड्ड्यानं माझी पाठ जरा घास बरं, मुला ! पाठीवर फार दिवसांचा मळ साठलाय्.'

अलीनं तो गड्डा घेतला अन् तो त्या म्हातारीची पाठ घासू लागला. घासून-घासून त्यानं तिची पाठ चकचकीत केली. पाठ चांदीसारखी चमकू लागली.

अली म्हणाला, 'आई, पाठ कशी चंद्रासारखी चमकते आहे !'

म्हातारी म्हणाली, 'बरं, बरं, आणखी थोडी घास. तू थकला तर नाहीस ना ?'

अली म्हणाला, 'आईची चाकरी करताना मुलाला कधी थकवा येईल का बरं? 'असं म्हणून तो आणखी जोरजोरानं पाठ घासू लागला. थोड्या वेळानं तो म्हणाला, तुझी पाठ आता सूर्यासारखी चकाकायला लागली आहे, आई !'

म्हातारी म्हणाली, 'छान छान ! तुझ्या चाकरीनं मी खूष झाले ! माग, तुला काय हवं ते मागून घे !'

अली म्हणाला, 'आई, गावात सर्वांना बायका आहेत; पण मला मात्र नाही, द्यायची तर एक बायको मला दे.. जी माझ्यावर प्रेम करील अशी! 'हे बोलताना त्याचा गळा भरुन आला. म्हणाला, 'पण अशी बायको माझ्या सारख्या कुरूपाला तू तरी कशी देणार? ती थोडीच तुझ्या हातची गोष्ट आहे !'

म्हातारी म्हणाली,'अरे माझ्या मुला, तुमच्या माणसाच्या जगातल्या रूपा-बिपाच्या गोष्टी आमच्या इथं नाहीत. इथं आत काय आहे हेच बघितलं जातं. तुला कुरूप म्हणतात ना, त्या कुरूपाच्या आत सुरूप असलेलं मला दिसलं,

त्या सुंदर रूपाला शोभेल अशीच बायको मी तुला देते.' असं म्हणून ती आत गुहेत गेली अन् एका टोपलीतून चार काकड्या घेऊन आली. टोपली अलीपुढं करून ती म्हणाली, ही घे, या टोपलीत तुझ्यासाठी एक नाही,चार बायका मी ठेवल्या आहेत. पण एक लक्षात ठेव, एक-एक काकडी कापताच त्यातून जी मुलगी बाहेर पडेल ना, ती तुझ्याकडं अगोदर पाणी मागेल. झटकन् तिला अगोदर पाणी दे. जरा वेळ लागला की ती एकदम निघून जाईल. तेवढं लक्षात ठेव. '

अलीला ती काय म्हणते तेच समजेना. पण त्यानं ती टोपली घेतली, म्हातारीचा निरोप घेतला आणि तो परत निघाला. वाटेत त्याला ती सुसर भेटली. ती त्याच्याकडे बघून हसली आणि अलीनंही तिचे आभार मानले. मग तो पाण्यातून बाहेर पडून वर जमिनीवर आला.

आता त्याला कडकडून भूक लागली होती. डोक्यावर सूर्य तापत होता. म्हणून तो तीरापासून थोड्या अंतरावर एक झाड होतं त्याखाली जाऊन बसला. भूक इतकी लागली होती की, चारी काकड्या एकदमच खाव्यात असं त्याला वाटलं. पण त्याला म्हातारीचे शब्द आठवले की यातून एक-एक बायको निघणार आहे ! त्या आठवणीनं त्याला हसू आलं. आपल्यासारख्या कुरूपाला अन् बायको ? पण म्हातारीचा शब्द मोडू नये म्हणून एक काकडी दाताखाली न चावता तिच्या दोन फाकी केल्या.

फाकी होताच काय चमत्कार ! त्यातून एक सुंदरतेची खाण अशी एक मुलगी निघाली. बाहेर पडताच ती म्हणाली, 'पाणी, पाणी, मला तहान लागलीय.'

अली थक्कच झाला. अरे, खरोखरच यातून बायको निघाली ! तो तिच्याकडे बघतच राहिला. तेवढ्यात ती पुनः म्हणाली, 'पाणी, पाणी, मला तहान लागलीय.'

अली भानावर आला. कमरेत खोवलेला वाडगा काढून तो पाणी आणायला नदीकडं धावला. त्यानं पाणी भरून घेतलं अन् तो परत फिरला. पाहतो तो मुलगी अदृश्य ! कारण त्याला पाणी आणायला उशीर लागला होता.

अलीनं कपाळावर हात मारून घेतला, म्हणाला,'नशीबानं सुरेख बायको

मिळाली होती; पण माझ्या मूर्खपणामुळं मी गमावली !'

आता दुसऱ्या काकड्या फोडायच्या अगोदर तो शहाणपणानं नदीच्या पाण्याच्या शेजारीच जाऊन बसला आणि दुसरी काकडी फोडली. तर त्यातून जी मुलगी निघाली ती परीसारखी देखणी अन् नाजूक होती. ती बोलली, 'पाणी, पाणी, मला तहान लागलीय् !'

अलीनं लगेच वाडगा भरला अन् तिला पाणी दिलं. घटाघटा ते पिऊन ती हसली. म्हणाली, 'अहाहा, तुम्ही किती सुंदर आहात ! मला असाच नवरा आवडतो !'

अलीचा आनंद गगनात मावेना. त्यानं तिसरी काकडी कापली. त्यातूनही एखाद्या राजकन्येसारखी उत्तम रूपाची मुलगी निघाली. बाहेर पडताच ती बोलली, 'पाणी,पाणी मला तहान, लागलीय् !'

अलीनं लगेच वाडगा भरुन तिला पाणी पाजलं. तिनं हसून अलीकडं बघितलं अन् लाजून म्हणाली,'किती सुरेख आहात हो तुम्ही ! मला असाच नवरा आवडतो !'

अलीला आणखी आनंद झाला. चौथ्या काकडीतूनही अशीच उत्तम देखणी मुलगी बाहेर पडली. तिलाही अलीनं लगेच पाणी पाजलं आणि तिनंही अलीला आपला प्रिय नवरा म्हणून मानलं.'

अशा अलीच्या एकाहून एक सुंदर अशा अगदी तरुण तीन बायका झाल्या.

आता संध्याकाळ झाली होती; म्हणून अली त्यांना म्हणाला, 'चला, आपण आता आपल्या घरी जाऊ. पण माझ्या घरात अन्नाचा कण नाही. त्या तिघींना घेऊन तो घरी आला. अंधार पडू लागल्यामुळं त्या कुणाला दिसल्या नाहीत. त्या घरात आल्या अन् अलीचं घर उजेडानं भरलं. आता त्या घरात कसली कमतरता राहिली नाही.

उत्सवाचा दुसरा दिवस उजाडला. फिरून गावचे तरुण खेळांच्या कार्यक्रमासाठी टेकडीवर जमले. कुरूपअलीही खेळ बघायला गेला. खूप खेळून झाल्यानंतर आणि ऊन तापू लागल्यामुळं झाडांच्या रायीत सगळे बसले. एकजण ढोलकं वाजवू लागला. त्याचा आवाज गावात ऐकू आला. गावच्या नारी

सजल्या अन् लगबगीनं डोक्यावर शिदोरी अन् कमरेवर पाण्याचा कळसा घेऊन टेकडीवर गेल्या. आपापल्या नवऱ्यांना त्यांनी खाऊ घातलं. त्यांची नजर अली बसला होता तिकडं गेली. तो त्याच्याकडं सुद्धा तीन मुली नटून, सजून आलेल्या त्यांना दिसल्या. त्यांच्या नवऱ्यांचीही नजर तिकडं गेली. त्या देखण्या तरुण मुलींना बघून सगळेच चकित झाले. या कुरूपअलीच्या बायका ?

अलीच्या बायकांनी नवऱ्याला अतिशय प्रेमानं खाऊ-पिऊ घातलं. अलीनंही प्रेमाने एकेकीच्या तोंडात घास घातले. असं हसत-खेळत आनंदानं त्यांचं खाणं झालं.

सगळेजण पाहतच राहिले. अलीचं लग्न झालं केव्हा ? आणि तीन बायकांशी एकदम् ? आणि त्या इतक्या देखण्या ? आपली बायको या तिन्हीपैकी बरोबरीला उतरणार नाही असं प्रत्येकाला वाटलं. इतक्या फटाकड्या या दरिद्री, कुरूप सगळ्यांना नकोशा वाटणाऱ्या माणसाच्या वाट्याला आल्या कशा ? आणि याला त्या किती प्रेमानं खायला प्यायला देताहेत ! कोणता असा देव किंवा राक्षस याला प्रसन्न झाला ? ते सगळे विचारच करीत राहिले. अलीच्या बायका सर्वांच्या देखत ठुमकत मुरडत चालत गेल्या. त्यांच्या मागोमाग गावातल्या आलेल्या दुसऱ्याही बायका त्याच्याकडं बघत निघून गेल्या.

मग हे सगळे तरुण उत्सुक मनानं अलीकडं धावत गेले. त्यांनी त्याला गराडा घातला अन् ते त्याला विचारू लागले, 'लेका कुरूप्या, ही बाजी कुठं मारलीस ? एकदम तीन बायका; अन् इतक्या छान, देखण्या ? त्याबरोबर श्रीमंतीसुद्धा ? अरे , काय मंत्र बिंत्र मिळाला काय तुला ? आम्हाला तरी सांग !

मग अलीनं घडलेली सारी हकीकत त्यांना जशीच्या तशी सांगितली. ती त्यांनी पुरती ऐकून घेतली न् घेतली आणि लगेच घराकडं सर्वांनी धूम ठोकली. आपापल्या घरात जाऊन प्रत्येकानं बायकोचा हात पकडला अन् तिला घराबाहेर काढीत म्हटलं, 'कसली कैदाशीण आलीय् माझ्या नशीबाला ! चल नीघ इथून, जा आपल्या बापाकडं ! पुनः तुझं भुंडं तोंड दाखवू नकोस मला ! आता मी फक्कड बायका आणणार आहे - कुरूप्याच्या बायकांसारख्या !'

प्रत्येकाच्या घरात नवरा-बायकोचं भांडण झालं अन् सगळ्या बायका आपल्या नवऱ्यांना शिव्या देत अन् पुनः तुझ्या घरात पाऊल टाकणार नाही असं म्हणत निघून गेल्या.'

दुसऱ्या दिवशी सकाळी सगळे तरुण हातात गळ घेऊन जिथं अली बसला होता, त्याच जागेवर गर्दी करून गळ टाकून बसले. बराच वेळ झाला तरी त्यांच्या गळांना खाली कोणी खेचेचना. तेव्हा त्यांनी स्वतःच दोरी तोडून गळ पाण्यात टाकून दिले आणि पाण्यात बुडी मारून ते तळाशी गेले. तिथं त्यांना ती सुसर भेटली. तिला त्यांनी विचारलं, 'ऐ, थेरडे, कुठं आहे त्या म्हातारडीचं घर?'

सुसरीनं दिशा दाखविली तिकडं ते सगळे गेले. त्यांच्या पायाखाली अनेक लहान लहान साप अन् पाण्यातले जीव चिरडून मेले. असं करीत करीत ते त्या म्हातारीच्या गुहेपुढं आले आणि सर्वांनी मिळून मोठयानं हाक दिली, 'ए, म्हातारे, बाहेर ये!'

म्हातारी हा ओरडा ऐकून बाहेर आली. म्हणाली,'कोण तुम्ही ? इथं शांत जागेत इतका ओरडा कशाला करता ? काय हवं तुम्हाला ?'

'काल आमच्या गावचा कुरूप्या आला होता. त्याला जशा तू बायका दिल्यास, तशा आम्हाला दे!'

'बाबानो, त्याच्या गुणानं त्याला तशा बायका मिळाल्या; तुम्हाला तुमच्या गुणांप्रमाणे मिळतील, चालतील ?

प्रत्येकाला वाटलं, कुरूप्या अलीपेक्षा आपण किती तरी सुंदर आहोत. आपल्याला एक नव्हे, चार नव्हे, सात सुंदर बायका हव्यात! ते म्हणाले, 'हो हो, चालतील! पण चार नव्हे, सात पाहिजेत हं!'

म्हातारी गुहेत गेली अन् तिनं एक मोठा हारा भरून काकड्या आणल्या आणि प्रत्येकाला सात-सात उचलायला सांगितलं. तरुण मंडळी खूष झाली. 'कुरूप्यानं तीन; पण आम्ही सात मिळविल्या असा अभिमान त्यांना वाटला!

प्रत्येक जण सात-सात काकड्या घेऊन परत फिरला. वाटेत सुसरबाईनं हळूच हसून त्यांच्याकडं बघितलं.

तिच्याकडं दुर्लक्ष करून सगळे नदीतून बाहेर आले. नदीतून बाहेर पडताच

या काकड्यातून निघणाऱ्या सुंदर तरुणींना पाहायला ते इतके उत्सुक झाले होते की त्यांनी तिथल्या तिथं फ टाफट काकड्या फोडल्या.

काकड्या फुटल्या तो काय ? एकाहून एक भयानक तोंडाच्या, अक्राळ विक्राळ हिडिंबा सर्वांतून बाहेर पडल्या. त्यांना बघून प्रत्येकजण हबकूनच गेला. तेथून प्रत्येकजण पळ काढू लागला. पण एकेकाच्या वाटणीला आलेल्या सात-सात राक्षशिणींनी आपापल्या नवऱ्याला धरून मारपीट करायला सुरुवात केली. कुठून या फंदात पडलो, असं प्रत्येकाला वाटू लागलं. सर्वांची हाडं मऊ करून त्या बाया जशा उत्पन्न झाल्या तशा नाहीशा झाल्या.

त्या मारानी सगळे बेशुद्ध पडले. अलीच्या कानावरती गोष्ट जाताच तो आपल्या बायकांना घेऊन धावत-धावत तिथं आला आणि त्या सर्वांना शुद्धीवर आणून आणि त्यांच्या वेदना कमी करून तो त्यांना गावात घेऊन गेला.

पण आता प्रत्येकाच्या घरात त्याची बायको होती कुठं ? त्या सगळ्या नवऱ्यांना सोडून आपल्या बापाच्या घरी गेल्या होत्या. नाईलाज होऊन त्या तरुणांना नाक मुठीत धरून आपल्या बायकांच्याकडं जावं लागलं; पण त्यांनी त्यांना नवरा म्हणून मानण्याचं साफ नाकारलं. ज्यांच्यात इमानदारी नाही, प्रेम नाही, मनाचा स्थिरपणा नाही, जे लालचावलेले, चंचल आहेत, अशांच्या संसाराची जोडीदारीण व्हायचं सर्वांनी नाकारलं. तरुणांना आपली काय चूक झाली ते पुरतं कळलं. त्यांनी नाक घासून, हाता-पाया पडून आपापल्या बायकांची मनापासून माफी मागितली; तेव्हा मग त्या परत घरी आल्या.

या सर्व प्रकारात कुरूप म्हणून ज्याचा आपण तिरस्कार करीत होतो, तोच वरुन कुरूप असला तरी आत आपल्यापेक्षा अतिशय सुरूप आहे हे त्यांना कळून आलं आणि त्यांनी अलीलाच गावाचा मुखिया करून त्याच्या आज्ञेत ते राहू लागले.

(भाऊ धर्माधिकारी : देशोदेशीच्या लोककथा)

# ८.३८ मित्राची निवड

हिमालयाच्या कुशीत जन्मलेली रंगीत आणि टिस्टा ही दोन्ही मुलं निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटीत, मौज-मजा करीत हिंडायची. कधी अती-उंचावरून खाली खोल दरीत झरकन उतरायचं, तर कधी लपाछपी करीत एकमेकांना पकडायचं ! असा हा दोन्ही मित्र-मैत्रीणींचा खेळ रोजच रंगतदार व्हायचा !

एके दिवशी एका डोंगराच्या कपारीत सभोवताली नजर फिरवत दोघांच्या गप्पा सुरू होत्या. गप्पा करता करता ते एकमेकांना म्हणाले, 'आपण रोज या निसर्गरम्य परिसरातच खेळतो. कधी तरी खालच्या मैदानात फिरायला जायला हरकत नाही ! ' दोघांनाही कल्पना फारच आवडली. आणि भल्या मोठ्या मैदानी प्रदेशात फिरायला तयारही झाले कोण पुढे जाईल याची स्पर्धा सुरू झाली. परंतु दोघांनाही या मैदानी प्रदेशाची माहिती नव्हती. त्यामुळे सर्वप्रथम योग्य रस्ता दाखविणाऱ्या मार्गदर्शकाचा शोध सुरू झाला. इतक्यात रंगीतला घार दिसली. आकाशात फिरणाऱ्या घारीला जमिनीवरची सर्वच माहिती असेल आणि उडता उडता आपल्याला ती रस्ता सहज दाखवू शकेल असा रंगीतला विश्वास वाटला म्हणून त्याने मार्गदर्शक मित्र म्हणून घारीची निवड केली. टिस्टाला साप दिसताच मैदानी प्रदेशात वेगाने सरपटणारा प्राणी मार्गदर्शक मित्र म्हणून निवडला. ठरल्याप्रमाणे रंगीत आणि टिस्टार अती उंच पर्वतावरून खाली उतरायला सुरुवात केली. नवीन प्रदेशातील नाविन्य पाहता पाहता कोण आधी पोहोचेल या खुशीत दोघेही पुढे जात होते. गगनभरारी घेत घार रंगीतला रस्ता दाखवित होती. आणि जमिनीवर वेगाने सरपटत साप टिस्टाला रस्ता दाखवत होता. परंतु लालची स्वभावाची घार जमिनीवर काही खाद्य दिसताच थांबून आपली भूक भागवायची. तर कधी गगनभरारी घेता घेता काळ्या ढगांबरोबर लपंडाव खेळायची. त्यामुळे रंगीनला आपला वेग नियमित

करता येत नव्हता. मनातल्या मनात चुकीचा मित्र निवडल्याबद्दल रंगीनची घालमेल सुरू झाली. परंतु तो काहीच करू शकत नव्हता ! टिस्टाचा प्रवास सातत्यपूर्ण योग्य दिशेने सुरू होता. त्यामुळे ती पुढे पुढे जात राहिली.

टिस्टा बरीच पुढे आल्यानंतर तिच्या लक्षात आले की, रंगीन बराच मागे राहिला आहे. टिस्टा थोडावेळ थांबली. रंगीनच वाट पाहू लागली. दूरवर एका सखल मैदानात टिस्टा विश्रांती घेत असल्याचे रंगीनने पाहिले. आकाशात पाहिले तर घार दिसतच नव्हती. रंगीनला प्रचंड राग आल्यामुळे रंगीनचा प्रवाह चित्र विचित्र पद्धतीने वाहू लागला. किनाऱ्याजवळची शेती-वाडी, घरं-दारं पाण्यात बुडली. पाण्याचा वेग अधिकच वाढला !

पूरग्रस्त परिस्थिती पाहताच टिस्टाला रंगीनच्या रागाचे कारण समजले. हळूहळू वहात टिस्टा रंगीन जवळ आली. रंगीनला म्हणाली, 'प्रिय मित्रा इतकं रागवायला काय झालं ? या गरीब बिचाऱ्या गावकऱ्यांनी तुझं काय बिघडवलं ? बेजबाबदार घारीची शिक्षा या गरीब लोकांना कां देतोस ? रागाला आवर घाल ! शांत हो ! आपण एक खेळ खेळायचा म्हणून खाली आलो. आपल्याला हरणं-जिंकणं महत्त्वाचं नाही ! आपण बालपणापासूनचे चांगले मित्र आहोत ? तुला असं अस्वस्थ झालेलं मला पहावत नाही. मी वचन देते. आतापासून मी नेहमीच तुझ्या सोबतच राहिन ! बरोबरीनेच पुढे जाऊ ! आमच्या या मैत्रीचां आदर्श मानवजातीपुढे सतत राहिल ! ' टिस्टाच्या या बोलण्याने रंगीनला गहिवरून आले. टिस्टाची गळाभेट घेत तो म्हणाला, 'माझी चूक झाली. या गावकऱ्यांवर उगाचच रागावलो ! मला माफ कर ! '

त्यानंतर टिस्टा आणि रंगीन शांतपणे पुढे-पुढे जात राहिले. या दोन्ही नद्यांचा संगम हे एक पवित्र तीर्थस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. आणि वृद्ध लोकही आपल्या मुलांना ही गोष्ट सांगतांना समजावतात की मित्राची निवड समजून-उमजून करावी ! आचार-विचार. गती,स्थिती यांचा मेळ जमला पाहिजे.

# ८.३९ आळशी असतो चोराचा बाप

(आटपाटनगराची गोष्ट)

एक होते नगर. आटपाटनगर त्याचे नाव. आटपाटनगराच्या वेशीपाशी राहात होत्या एक आजीबाई.

आजीबाई एकट्याच होत्या. ना लेकी, ना सुना, ना जावई, ना नातवंडे-ना पतवंडे. आजीाबाईंना कोणीच नव्हते.

आजीबाई मेहनती होत्या. प्रेमळ होत्या.

त्यांचे होते एक छोटे शेत. शेतात एक छोटी विहीर होती.

आजीबाईंना शेतीवाडी करण्याची हौस होती. नाना तऱ्हेची पिके आजीबाई घ्यायच्या. त्यांचे शेत सर्वात उजवे. लोक पाहायचे आणि आजीाबाईंची वाखाणणी करायचे.

आजीबाईंचे आपल्या शेतीवाडीवर भलते प्रेम ! घनदाट माया ! आजीबाई झाडापेडांशी पानाफु लांशी गोष्टी करत.

गाईगुरांवर त्यांचे प्रेम. पक्षांशी त्यांची दोस्ती.

एका गोष्टीची आजीबाईंना फार चीड होती. चीड होती ऐतखाऊंची, मेहनत न करणारांची.

आळशी हा चोराचा बाप असतो, असे आजीबाई म्हणायची. आळशी दिसला की, आजीबाई त्याला धारेवर धरायची, फ टकारायची.

आजीबाईंनी शेतात खूप मेहनत केली. पीक छान आले कापणी, मळणी झाली. धान्याची रास लागली.

आजीबाईंना वाटले, धान्याला चांगले ऊन दाखवावे म्हणजे जीवजंतूंची पीडा व्हायची नाही.

आजीबाईंनी अंगण छान सारवले. सुकवले. नंतर ते झाडून काढले. मग अंगणात पसरले एक जाजम आणि त्याच्यावर पसरले दाणे. सुंदर,टपोरे,

दळदार दाणे. कोणालाही मोह पडावा असे.

आजीबाईंच्या घराजवळ होते एक मोठे वडाचे झाड. त्याच्यावर बसला होता एक कावळा. त्याची त्या धान्यावर नजर गेली. त्याच्या तोंडाला सुटले पाणी. आजीबाईंची नजर चुकवून दाणे उचलून खाण्याची संधी केव्हा मिळते त्याची टेहेळणी तो करू लागला.

कावळा मनाशी म्हणाला, 'खाणाऱ्याचे नाव दाण्यादाण्यावर लिहिलेले असते असे म्हणतात. आपलेही नाव दाण्यांवर लिहिले आहे की नाही ते अजमावून पाहायला काय हरकत आहे!'

तो आजीबाईंपाशी आला. विनवणीच्या सुरात म्हणाला, आजीबाई, काय हो तुमचे ज्वारीचे दाणे, जसे काही मोतीच! माझ्या तोंडाला पहा कसे पाणी सुटले आहे ! तुमच्या धान्याची एवढी मोठी रास घेऊ या मला पाचपन्नास दाणे. कावळीला, पिल्लांना हे दाणे खाऊन किती संतोष होईल ! संतोषासारखी संपत्ती नाही म्हणतात.

कावळ्याची ती लालचावलेली नजर आणि विनवणीची भाषा ऐकून आजीबाई सावध झाल्या. म्हणाल्या, 'चालता होतोस की नाही सैताना! म्हणे, दाण्यादाण्यावर खाणाराचे नाव लिहिलेले असते. आळसुड्याचे नाव दाण्यावर लिहायला कोणी वेडाबिडा तर नाही ? आळशी असतो चोराचा बाप आणि त्याला खाऊ घालणे म्हणजे असते महापाप. एक दाणासुद्धा तुला मी देणार नाही. गेला होतास शेत नांगरायला ? निंदणं-खुरपणं केलीस ? दाणे पेरलेस ? राखण केलीस ? कापणी , मळणी केलीस ? खळ्यात सोंगणी केलीस ? आला दाणे मागायला! बायको-पेरांना असलीस फु कटेगिरी शिकवणार आहेस काय ? खबरदार दाण्याला चोच लावशील तर!'

आजीबाईंनी काठी उचलली. कावळा उडून झाडाच्या फांदीवर जाऊन बसला. म्हणाला,'काय वाटेल ते होवो, आजीबाईंना हुलकावणी देऊन चोचभर दाणे तरी मी लुंगवणारच!'

आजीबाईंनी हे कावळ्याचे बोल ऐकले आणि म्हणाल्या, '

मेल्या,आळसुटल्या ! कसे दाणे लुंगवतोस ते पाहतेच मी !

फांदीवर बसून तो आजीबाईंची टेहेळणी करू लागला. एकदम आजीबाईंच्या झोपडीसमोर उडून यायचा. अंगणात नाचाबागडायचा. आजीबाई तो दिसला की खेकसायच्या,'नीच कुठला ! घाम न गाळता, मेहनत न करता फुकटचे गिळायला हवे काय ? तू दाण्याला शिवलास की कपाळमोक्ष झालाच म्हणून समज ! आळशी असतो चोराचा बाप आणि फुकट खाऊ घातल्यास होते महापाप ! निघ म्हणते ना इथून.'

'आजीबाई,पाहातच रहा, पाचपन्नास दाणे लुंगवल्याशिवाय काही मी राहात नाही. ठकवून, चोरी करून मी हे करणारच, करणार ! ' कावळा बोलला.

झाडाच्या फांदीवर बसून तो टेहेळणी करू लागला. दुपारी आजीबाईंनी तिथेच बसून भाकरतुकडा खाल्ला. उजव्या हाताने खाई आणि काठी डाव्या हातात उगारुन ठेवी. खाल्ल्यावर आजीबाईंना आली सुस्ती. मधेच एखादी डुलकी यायची. कावळ्याने आजीबाईंचा डोळा लागलासे पाहिले आणि उडत येऊन चोचभर दाणे घेऊन तो झाडाच्या फांदीवर जाऊन बसला. आजीबाईंना वाकुल्या दाखवू लागला !

आजीबाई झाडापाशी गेल्या आणि कावळ्याला हाकारून म्हणाल्या, ' माझे दाणे परत कर. आळशी असतो चोराचा बाप आणि त्याला फुकट खाऊ घालणे असते महापाप !'

कावळा झाडाच्या आणखी वरच्या फांदीवर बसला आणि तिथून वाकुल्या दाखवू लागला. आजीबाई म्हणाल्या, 'झाडा झाडा, कावळ्याला हुसक रे. आळशी असतो चोराचा बाप आणि त्याला फुकट खाऊ देतो तो करतो महापाप. हुसक त्या कावळ्याला.'

झाड म्हणाले, 'कावळ्याने माझी थोडीच खोडी काढली आहे ? मी कशाला हाकलू त्याला ? तू आणि तो घ्या काय करायचे ते करून.'

आजीबाईंना आला झाडाचा राग. त्या म्हणाल्या, 'तुझी नाही खोडी काढली, माझी काढली असे घटकाभर धरून चाल. पण आळशाला असे पाठीशी घालणे

शोभते काय ? अशाने सर्वनाश होईल, सर्वनाश ! पाचपन्नास दाणे कमी झाल्याने मला काही भीक लागणार नाही, पण आळशाला मी एक दाणासुद्धा घेऊ देणार नाही. आळशी असतो चोराचा बाप आणि अशाला मोफत खाऊ देणे म्हणजे असते महापाप. हाकल त्या कावळ्याला !'

झाड कावळ्याला हाकलत नाही हे पाहून आजीबाई गेल्या लाकूडतोड्याकडे म्हणाल्या, 'लाकूडतोडे दादा, लाकूडतोडे दादा, तुम्ही झाड तोडून टाका म्हणजे कावळ्याला बसायला जागा राहणार नाही. तो माझे दाणे परत देईल. आळशी असतो चोराचा बाप, त्याला श्रमाविना खाऊ घालणे असते महापाप. आळशाला धडा शिकवताना अंगचुकारपणा करील तोही त्या पापाचा भागीदार असतो. लाकूडतोडेदादा, तुम्ही झाड तोडा म्हणजे कावळ्याला शहाणपणा सुचेल आणि तो माझे दाणे परत करील.'

लाकूडतोड्या म्हणाला, 'झाडाने माझे काहीच बिघडवले नाही. मी झाड कशाला तोडू ?'

आजीबाई गेल्या पोलिसाकडे. म्हणाल्या, 'पोलिसदादा,पोलिसदादा तुम्ही लाकूडतोड्याला गिरफदार करा. कावळ्याने माझे दाणे चोरले आणि तो झाडावर जाऊन बसला. तिथून मला तो वाकुल्या दाखवतो. आळशाला कष्ट न करता खाऊ घालणे म्हणजे चोराच्या बापाला शक्ती पोचवणे. आळशी असतो चोराचा बाप. त्याला फुकट खाऊ घालणे असते महापाप. झाड कावळ्याला हाकलत नाही.लाकुडतोड्या झाड तोडत नाही. त्याला सजा झालीच पाहिजे.

पोलिस म्हणाला, 'लाकुडतोड्याने माझे काहीच बिघडवले नाही. मी कशी त्याला अटक करू ? कावळ्याने तुमचे दाणे चोरले त्याचा काही पुरावा आहे तुमच्याजवळ ? तुम्ही कावळ्याचे काय करायचे ते बघून घ्या. मी कशाला ह्या भानगडीत पडू ?'

आजीबाई तिथून गेल्या नगरसेवकाकडे,त्याची विनवणी करीत म्हणाल्या, 'नगरसेवक मामा,नगरसेवक मामा,कावळ्याने चोरले माझे दाणे. झाडावर जाऊन तो बसला. मला चिडवू लागला. मी गेले झाडाकडे त्याला म्हणाले,

झाडा झाडा, कावळ्याला हाकल रे. झाड म्हणाले, मी नाही हाकलीत जा. मग गेले लाकूडतोड्याकडे. त्याला म्हणाले, लाकूडतोडे दादा,लाकूडतोडे दादा, तुम्ही झाड तोडा हो. लाकुडतोड्या म्हणाला, मी नाही तोडत जा. मग गेले शिपायाकडे. शिपाईदादा,शिपाईदादा,तुम्ही लाकूडतोड्याला पकडा हो. ते म्हणाले,मी नाही पकडत जा. आळशी असतो चोराचा बाप, त्याला फुकट खाऊ घालणे असते महापाप.'

नगरसेवक म्हणाला, 'यांच्यातल्या कोणीच माझे काही बिघडवले नाही. मी कशाला या फंदात पडू ? तुम्ही कावळ्याचे काय करायचे ते करा.'

आजीबाई गेल्या नकरसेवकाच्या बायकोकडे. म्हणाल्या, 'आवडत्या सूनबाई, तू आहेस शहाणी. तू नवऱ्यावर रुस ग. म्हणजे तो पोलिसदादाला डाटेल. पोलिसदादा लाकूडतोड्याला रागवेल. लाकूडतोड्या झाड तोडायला निघेल. झाड कावळ्याला हुसकेल. आळशी असतो चोराचा बाप, त्याला फु कट खाऊ घालणे असते महापाप.'

सूनबाई बोलली, 'आजीबाई, तुमचे म्हणणे योग्यच आहे. आळशी असतो चोराचा बाप, त्याला फु कट खाऊ घालणे असे महापाप. मी नवऱ्यावर रुसते.'

नगरसेवकाने बायकोचे हे बोलणे ऐकले. तो म्हणाला, 'आजीबाई म्हणतात ते बरोबर आहे. आळशी असतो चोराचा बाप, त्याला फुकट खाऊ घालणे असते महापाप. बाई ग, तू माझ्यावर रुसू नको. मी पोलिसदादाला समजवतो.'

पोलिसदादाने हे ऐकले. तो म्हणाला, 'नगरसेवक मामा, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. मी लाकूडतोड्याला पकडतो. आळशी असतो चोराचा बाप. त्याला फुकट खाऊ घालणे म्हणजे महापाप.

लाकूडतोड्याने हे ऐकले. तो म्हणाला. पोलिसदादा, तुम्ही म्हणता ते बरोबरच आहे. आळशी असतो चोराचा बाप. त्याला फुकट खाऊ घालणे असते महापाप. मी झाड तोडतो.

झाड म्हणाले, 'नको, नको. आळशी असतो चोराचा बाप. त्याला फुकट खाऊ घालणे असते महापाप. मी कावळ्याला हाकलतो.'

कावळ्याने हे ऐकले. कावळा म्हणाला,'झाडदादा, झाडदादा तू मला हुसकवू नकोस. आळशी असतो चोराचा बाप. फुकट खाणारा करतो महापाप. आजीबाई,आजीबाई, तुमचे दाणे तुम्ही परत घ्या. दाण्या दाण्यावर असते नाव त्याच्यासाठी राबणाराचे घाम गाळणाराचे असा दाणा आळशाच्या कामी कसा येणार ? '

आजीबाईंना कावळ्याने दाणे परत केले. तेव्हा आजीबाई म्हणाल्या, 'कावळोजी बाळा, आज तुला चांगला धडा मिळाला हे छान झाले. दाण्यादाण्यावर लिहिलेले असते नाव काम करणाराचे,घाम गाळणाराचे. घाम न गाळणाऱ्याला,काम न करणाऱ्याला असा दाणा पचत नाही. आळशी असतो चोराचा बाप. त्याला फुकट खाऊ घालणे असे महापाप. रोज उजाडण्याच्या वेळी काव काव करून तू सर्वांना हा धडा शिकवत जा.'

तेव्हापासून उजाडताच कावळा काव काव करून सांगत असतो, 'काव काव काव, आळशी असतो चोराचा बाप, त्याला फुकट खाऊ घालणे असते महापाप. दाण्यादाण्यावर असते नाव त्याच्यासाठी घाम गाळणाराचे. काम न करणाऱ्याला असा दाणा काही पचवता येत नाही. '

कावळ्याची काव काव ऐकून आटपाटनगरातले लोक जागे होतात आणि आपापले काम करू लागतात. आटपाटनगरात सगळे कष्टाची भाकरी खातात. प्रत्येक माणूस म्हणतो, 'आळशी असतो चोराचा बाप, त्याला फुकट खाऊ घालणे असते महापाप. दाण्यादाण्यावर असते काम करणाराचे, घाम गाळणाराचे नाव.'

अशीही आटपाटनगराची साता उत्तराची कहाणी,पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

# ८.४० शेखचिल्लीचा जन्म

शेखचिल्लीचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. त्याला सगळे जण 'शेख' म्हणत असत. त्याच्या आईला असे वाटायचे की आपला मुलगा मोठा होऊन पैसे कमवेल आणि आपली गरिबी दूर करेल म्हणून तिने त्याला शाळेत शिकायला पाठवले.

शाळेत शिकवले जायचे की मुलगा असेल तर 'वो खाना 'खाता' है' असे म्हणायचे आणि मुलगी असेल तर 'वो खाना 'खाती' है' असे म्हणायचे. शाळेतला हा धडा शेखचिल्लीच्या चांगलाच लक्षात राहिला.

एक दिवस एक मुलगी चुकून विहिरीत पडली आणि मदतीसाठी मोठ्याने आवाज देत होती. हे पाहून शेख त्याच्या मित्रांकडे आला आणि म्हणाला 'वो मदद के लिए 'चिल्ली 'रही है'. त्याच्या मित्रांना काही कळेना. मग तो त्यांना विहिरीजवळ घेऊन गेला आणि त्या मुलीला वाचविले. पण त्या दिवसापासून 'शेख'चा 'शेखचिल्ली' झाला.

# ८.४१ स्वतःच्या पायावरा कुऱ्हाडा मारणे

एके दिवशी शेखचिल्लीला लाकडाचा व्यवसाय सुरू करण्याच्या विचाराने पछाडले. लाकूड तोडण्याकरिता तो जंगलात पोहोचला. एक मोठे झाड पाहून त्यावर चढला. मोठी फांदी पाहून शेखचिल्ली त्यावर उलटा बसला आणि तीच फांदी तोडू लागला. साहजिकच फांदी तोडता-तोडता शेखचिल्ली जमिनीवर दाणकन आपटला...

# ८.४२ तेल गेले आणि तूपही गेले

आपला मुलगा मूर्खपणा करून अनेक वेळा आपल्याला तोंडघशी पाडतो हे अम्मीला (त्याच्या आईला) माहीत होते. त्यामुळे ती त्याला जबाबदारीचे कसलेच काम सांगत नसे.

पण एक दिवस स्वयंपाक करताना तेल संपल्याचे तिच्या लक्षात आले. दुकानावर जाऊन तेल घेऊन यायचे म्हटले तर एवढा वेळ तिच्याजवळ नव्हता. म्हणून तिने शेखला हाक मारली आणि म्हणाली, "जरा दुकानावर जाऊन तेल घेऊन ये."

पैसे आणि पेला त्याच्याकडे देऊन ती म्हणाली, "तेल घेऊन ये. मात्र वाटेत कोठे सांडू नको. सांभाळून ये."

"त्याची तू चिंता करू नकोस." असे म्हणून उड्या मारीतच तो दुकानात गेला. त्याच्या मूर्खपणाच्या कथा दुकानदाराच्या पण कानावर होत्या. म्हणून दुकानदाराने विचारले, "काय रे, काय पाहिजे ?"

"तेल पाहिजे."

"पैसे आणलेस ना ?"

"हे काय ?" आपल्या मुठीतील पैसे दुकानदाराकडे देत तो म्हणाला.

"आणि तेल कशात देऊ ?" दुकानदाराने विचारताच त्याने भांडे पुढे केले.

दुकानदाराने त्याच्यात तेल ओतले पण थोड्याच तेलाने पेला भरला. "अरे, हा तर भरला. पण अजून वीस पैशांचे तेल बाकी आहे. त्यासाठी दुसरे भांडे लागेल."

"दुसरे भांडे आता कुठून आणणार ?"

"मग काय उरलेले पैसे परत देऊ ?"

"नको नको. अम्मीने दिलेल्या सगळ्या पैशांचेच तेल आणायला सांगितले

आहे."

"मग दुसरे भांडे घेऊन ये."

परत घरी जाऊन दुसरे भांडे आणायचे त्याच्या जिवावर आले. आता काय करावे बरे ? तो विचार करू लागला. विचार करता करता त्याच्या लक्षात आले. पेल्याचा तळ खोलगट आहे. त्याच्यात उरलेले तेल घ्यावे, म्हणून पेला उलटा करीत तो म्हणाला, "याच्यात उरलेले तेल घाला."

पण तोपर्यंत पेल्यातील सगळे तेल जमिनीवर सांडून गेले. जमीन खराब झाली म्हणून दुकानदार ओरडला, "मूर्खा, तेल ओतून माझी जमीन खराब केलीस. अरे अकलेच्या कांद्या, पेला उलटा केला तर तेल सांडेल एवढेही कळत नाही ! आता उरलेले तेल तरी व्यवस्थित घरी ने. आण तो पेला इकडे." दुकानदारही मूर्खच. त्याने उलट्या केलेल्या पेल्याच्या तळवटीत उरलेले तेल दिले.

उलटा पेला धरून शेख घरी आला. पेला उलटा धरलेला पाहून अम्मीच्या काळजात धस्स झाले. तिने विचारले, "पेला उलटा का धरला आहेस ?"

"दुकानदाराने उरलेलं तेल तळवटीच्या खोलगट भागात दिले. तीस पैशाच्या तेलाने पेला भरला. मग काय करणार? म्हणून वीस पैशांचे तेल तळवटीच्या भागात घेतले."

"म्हणजे तीस पैशांचे पेल्यातील तेल ओतून टाकलेस तर ?" रागवून अम्मी म्हणाली.

अगदी शहाण्यासारखा शेख म्हणाला, "छे छे, तेल ओतायला मी काय मूर्ख आहे. हा बघ भरलेला पेला." असे म्हणून त्याने पेला परत उलटा केला, तेव्हा तळवटीच्या भागातले तेलही जमिनीवर सांडले.

"अरे मूर्खा, तेही तेल ओतून टाकलेस. खरंच रे तू मूर्ख पोर आहेस. तुझ्यासारखा मूर्ख पोर जन्मात बघितला नाही मी."

"अम्मी, तू कशाला रागवतेस माझ्यावर ? मी काय केले ?"

"तू काहीच केले नाहीस. मेल्या, तू धांदरट तो धांदरट."

“अगं, पण माझी चूक काय ते तरी सांग.” शेखचिल्लीने विचारले आणि अम्मी आणखी खवळली. एवढे रामायण घडूनही तो आपली चूक काय म्हणून विचारतो. तिला वाटले एक धपाटा घालावा पाठीत. पण त्याचा चेहरा इतका निरागस होता की, धपाटा घालण्याचा मोह तिने आवरला.

“माझी काहीच चूक नसताना तू मला का फाडफाड बोलते आहेस ?”

“नाही. तुझी चूक काहीच नाही. चूक माझीच. तुझ्यासारखा मूर्ख पोर जन्माला घातला ही माझीच चूक.”

# ८.४३ शेखचिल्लीची लांब दाढी

शेखचिल्लीस वाचनाची आवड होती. तासन् तास तो वाचत बसायचा.

एके दिवशी सकाळी शेखचिल्लीने एक पुस्तक वाचायला घेतले. वाचता-वाचता त्याची नजर थांबली. पुन्हा तेच वाक्य वाचू लागला... तब्बल दहा वेळा तेच वाक्य वाचून काढले.

"लांब दाढी असलेली माणसं मूर्ख असतात..." शेखचिल्ली विचारात पडला. दाढीवरून हात फिरवू लागला..

"अरे, आपली दाढीसुद्धा लांब आहे. एक फूट भरेल एवढी लांब! म्हणजे आपणही... गावातील सर्व जण आपल्याला दाढीमुळेच मूर्ख म्हणत असतील! दाढी... लांब दाढी, हेच आपल्या मूर्खपणाचे कारण आहे. जर आपण ही लांब दाढी काढून टाकली, तर मग आपल्याला मूर्ख म्हणायची कोणाची हिंमत होईल? आपण तर बुद्धिमान आहोत, या दाढीमुळेच मूर्ख ठरतो आहोत. या लांब दाढीचं काही तरी केलंच पाहिजे."

"पुस्तकातील छापलेलं वाक्य कसं खोटं असू शकेल? शक्यच नाही..."

शेखचिल्ली उठला. घरभर कैची शोधू लागला. लांब दाढी त्याला आता नकोशी वाटू लागली. कैची दिसेना. काही केल्या सापडेना. कैची सापडत नाही म्हणून शेखचिल्ली हैराण झाला.

''आता काय करावं?'' विचार करू लागला.

तेवढ्यात त्याची नजर दिव्यावर गेली. दिवा जळत होता. शेखचिल्ली दिव्याजवळ गेला. ''कैची मिळत नाही, तर मग दिव्यानेच आपण थोडी लांब झालेली दाढी जाळून घेऊ, नंतर न्हाव्याकडून व्यवस्थित कापून घेऊ.''

शेखचिल्लीने दिवा उचलला. दाढीला हात लावला. हातापर्यंतची दाढी जाळून घेण्यासाठी त्याने वातीजवळ दाढी नेली. दाढी जळू लागली. जंगलातलं

कोरडं गवत जळू लागतं तशी चेहऱ्याला... छातीला उष्णता जाणवू लागली.

शेखचिल्ली घाबरला. त्याने दिवा दूर फेकून दिला. पळत-पळत बादलीतील पाण्यात डोकं खुपसलं.

“अरे बापरे! वाचलो. नाही तर पूर्ण चेहरा जळाला असता दाढीबरोबर. पुस्तकात खरंच लिहिलंय की, लांब दाढीवाली माणसं मूर्ख असतात!”




# संकीर्ण कथा


९.१. अंतिम परीक्षा १०४५

९.२. दोघांचे भांडण तिस-याचा लाभ १०४७

९.३. एक-दोन-तीन १०४९

९.४. सत्याचे फूल १०५१

९.५. जोडे आणि काटकसर १०५५

९.६. ऐकावे तरी कुणाचे १०५८

९.७. लोभीपणाचे फळ १०६०

९.८. झोपलेलं नशीब १०६४

९.९. चीनमधील वैद्य १०६८

९.१०. तुगरी आणि एगरी १०७२

९.११. शेतकरी आणि कोडे १०७९

९.१२. कोडे १०८१

९.१३. सुख आणि दुःख १०८३

९.१४. पिशवीत येऊन जा १०८६

९.१५. पिशवी १०९०

९.१६. शिका-याचे मनोराज्य १०९४

९.१७. चोरांच्या चार गोष्टी १०९६

९.१८. दोन घरचा पाहुणा १०९९

९.१९. भाग्यवंत ११०४

९.२०. एक जुनी कोकणी गीतकथा १११३

# ९.१ अंतिम परीक्षा

आचार्य बहुश्रुत यांच्या पाठशाळेत अनेक शिष्य शिकत होते. आचार्य सर्वांना जीव तोडून शिकवत. एकदा त्यांच्या तीन शिष्यांचा शिक्षणक्रम पूर्ण झाला व त्यांना निरोप देण्याची वेळ जवळ येऊन ठेपली. आचार्य त्यांना म्हणाले, "बाळांनो, आतापर्यंत प्रत्येक परीक्षेत तुम्ही छान उत्तीर्ण झाला आहात. उद्या सकाळी तुम्ही माझ्या कुटीत या. तिथे तुमची अंतीम परीक्षा होईल. तीनही शिष्यांनी होकार दिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून नैमित्तिक कर्मे आटोपून तिघेही शिष्य आचार्यांच्या निवासस्थानाकडे निघाले. अहो आश्चर्यम! रस्ताभर काटेच काटे पसरलेले होते. पण काय इलाज? गुरूजींची आज्ञा तर पाळलीच पाहिजे. त्यांच्या कुटीत पोहोचणे हे तर आजचे ध्येयच होय. ते तर पार पाडलेच पाहिजे. पहिला शिष्य तसाच काट्यांवरून चालत राहिला. पायाला काटे टोचत होते. पाय रक्तबंबाळ होत होते. पण चालण्याचे व्रत त्याने सोडले नाही. तो तसाच गुरुजींच्या कुटीत जाऊन पोहोचला.

दुसरा शिष्य ते काटे शक्यतो वाचवून, टाळून चालू लागला. तरी काही काटे टोचलेच. पाय थोडेफार रक्तबंबाळ झालेच. तोही गुरुजींच्या कुटीत पोहोचला. तिसऱ्या शिष्याने वाटेत काटे पाहिले. चालता चालता त्याने सारे काटे गोळा केले. ते रस्त्याच्या कडेला दूर टाकून दिले. थोड्याच वेळात तोही गुरुजींच्या कुटीत पोहोचला. तिघेही गुरुजींची वाट पाहू लागले.

थोड्या वेळाने आचार्य बहुश्रुत कुटीत आले. ते तिसऱ्या शिष्याला म्हणाले, बाळा आज तुझे शिक्षण पूर्ण झाले. आजच्या या अंतिम परीक्षेत तू उत्कृष्टपणे यशस्वी झालास. अरे ज्ञान तेच जे व्यवहारात कामी येते. तू काटे वेचून ते दूरवर

फेकून देऊन दोन गोष्टी साधल्या. स्वतः जखमी होण्यापासून वाचलास. इतरांच्या मार्गातील काटे अर्थात दुःख, वेदनाही दूर केल्यास. तेव्हा आता खरंच तू बाहेरच्या विस्तृत जगात जाऊन कार्य करायला लायक झाला आहेस. जा बाळा, सुखी राहा. यशस्वी हो. स्वतःसाठी जगताना दुसऱ्यांच्या उपयोगी पड.

(ब्रेन टॉनिक मासिक, डिसेंबर २०१३)

# ९.२ दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ

खूप खूप जुनी गोष्ट आहे ही. तेव्हा मानव रानावनात राहात असे. कंदमुळे खाऊन पोट भारत असे. शिकार करीत असे. रात्री झाडावर झोपत असे. तेव्हा कोणी नोकर नव्हता की मालकही नव्हता. जंगलातच हत्ती, घोडे, गायी, बैल, बकऱ्या वगैरे प्राणीसुद्धा स्वतंत्र हिंडत, मुक्तपणे वावरत.

एकदा जंगलात एक गाय नरम, कोवळं, लुसलुशीत गवत खात होती. तिचे वासरू तिच्याबरोबर होते. वासरू उंडारत होते, आईशी खेळत होते. मध्येच धावत जाऊन दूध पित होते. मनसोक्त बागडत होते. तेवढ्यात तिकडे एक घोडा आला. त्याला वाटले असे कोवळे, लुसलुशीत गवत तर मला मिळायला हवे. ही गाय का हे गवत खाते आहे? त्याने गायीला एक लाथ मारली. बिचारी गाय पडता पडता कशीबशी सावरली. मागे हटली. घाबरून दूर गेली. आता घोडा ते कोवळं, मऊ लुसलुशीत गवत खाऊ लागला.

गाय विचार करू लागली. याने मला विनाकारणच लाथ मारली. मी याला चांगला धडा शिकवेन. ती धावत जाऊन घोड्याच्या पुढे उभी राहिली. आपल्या शिंगांनी पूर्ण शक्तिनिशी तिने घोड्यावर वार केला. बेसावध घोडा चांगलाच जखमी झाला. गाय आपल्या वासराला घेऊन तेथून निघून गेली. आता घोडा विचार करू लागला, हिने मला घायाळ केले. मी नक्कीच हिला चांगली अद्दल घडवेन.

तेवढ्यात तेथून जाणारा एक शिकारी त्याला दिसला. घोडा त्या शिकाऱ्याला म्हणाला, "तू मला मदत करशील का? गाईने मला तिच्या शिंगांनी जखमी केले. तू तिला चांगली ठोकून काढ. शिकाऱ्याजवळ धनुष्यबाण होताच. तो घोड्याला म्हणाला, "दाखव, कुठे आहे ती गाय?" घोडा म्हणाला, "आपल्या वासरासह ती नदीकडे जात होती. अजून फार दूर गेलेली नसेल. बैस माझ्या

पाठीवर. मी तुला घेऊन जातो. शिकारी घोड्याच्या पाठीवर बसला. दोघे नदीकिनारी पोहोचले. गाय तिथे उभी होती. वासरू तिचे दूध पित होता. शिकाऱ्याने गायीच्या पायावर बाण मारला. बिचारी गाय पडता पडता वाचली. दुःखाने हंबरू लागली. वासरूही घाबरले. शिकाऱ्याने पळत जाऊन गायीच्या गळ्यात दोर टाकला, तिला झाडाशी बांधून ठेवले. त्याने गायीचे दूध पिऊन पाहिले. ते छान गोडसर, चवदार होते. शिकाऱ्याला आनंद झाला. चला, आता या गायीचे दूध आपल्याला रोज प्यायला मिळेल.

शिकाऱ्याला धन्यवाद देऊन घोडा जायला निघाला तेव्हा शिकाऱ्याने मोठ्या चपळाईने घोड्याच्या गळ्यात दोर बांधला. त्यालाही गायीच्या जवळच्याच झाडाला बांधले. तो घोड्याला म्हणाला, "अरे, तू तर फार कामाचा आहेस. तुझ्या पाठीवर बसल्याने माझे चालण्याचे श्रम वाचले. त्यामुळे मला अजिबात थकवा आला नाही. तेव्हा आता मी तुला माझ्याजवळच ठेवेन. आता घोडाही बंधनात अडकला. शिकाऱ्याचा सेवक बनला.

शिकाऱ्याची आता चंगळ होती. प्यायला गायीचे दूध. फिरायला घोडा. करमणुकीला वासरू. तो आता नदीकिनारी झोपडी बांधून राहू लागला.

गाय व घोडा मात्र मनातून दुःखी होते. आपण आपसात भांडलो नसतो तर माणसाचे गुलाम झालो नसतो. खरंच एकतर आपसात भांडू नये. दोघांच्या भांडणात लाभ तिसऱ्याचाच होतो.

(ब्रेन टॉनिक मासिक, डिसेंबर २०१३)

# ९.३ एक-दोन-तीन

(संथाली लोककथा)

एक अतिशय श्रीमंत आणि सामर्थ्यशाली राजा होता. त्याची अशी समजूत होती की, त्याच्याइतका समर्थ राजा दुसरा कुणी नाही. पण त्याचे हे मनोगत त्याने कधी कुणाजवळ बोलून दाखवले नव्हते. एके दिवशी त्याला वाटले की, आपल्या मनातले हे विचार दुसऱ्या कुणाला ओळखता येतील का? त्याने मग त्याच्या सर्व अधिकाऱ्यांची आणि सेवकांची एकत्र सभा बोलावून विचारले की, त्यांच्यापैकी कुणी राजाच्या मनात काय विचार चालले आहेत, हे सांगू शकेल का? अनेकांनी आपापल्या पद्धतीने अंदाज बांधून उत्तर दिले, पण कोणत्याच उत्तराने राजाचे समाधान झाले नाही.

राजाने मग प्रधानाला आदेश दिला की, “एका महिन्याच्या आत राजाचं मन वाचू शकेल असा अलौकिक बुद्धिमत्ता असलेला माणूस शोधून आणा.” दिवाणाने सर्वदूर अशा हुषार माणसाचा शोध घेतला, पण महिन्याची मुदत संपत आली तरी असा चाणाक्ष माणूस काही त्याला सापडला नाही. प्रधानाची एक कन्या होती. तिने आपल्या पित्याची चिंता ओळखून त्याला सांगितले,"काळजी करू नकोस, दिलेल्या मुदतीत मी अपेक्षित असलेल्या योग्य व्यक्तीला हजर करेल.” प्रधान म्हणाला, “ठीक आहे. बघू या तुझ्या प्रयत्नांना किती यश मिळतं?” आणि प्रधानाने त्याच्या कन्येवर ही कामगिरी सोपवली.

दिलेल्या मुदतीचा दिवस उगवला. प्रधानकन्येने एका अडाणी भोळ्या-भाबड्या धनगराला आपल्या घरी कामावर ठेवले होते. त्या मेंढपाळाला राजाकडे घेऊन जा, असं तिने आपल्या प्रधान पित्याला सांगितलं. तिच्या या निवडीने प्रधान चक्रावून गेला. पण प्रधानाच्या कन्येनं ठासून सांगितलं की, हा भोळा धनगरच प्रधानाची चिंता दूर करेल. प्रधानासमोर दुसरा पर्याय नव्हता. त्याने आपल्या मुलीवर विश्वास ठेवला आणि त्या धनगराला राजदरबारात हजर

केले.

दरबार आधीच भरला होता आणि राजा वाट पाहत होता. दिवाणाने मेंढपाळाला राजासमोर उभे केले. मेंढपाळाने नजर वर करून राजाकडे पाहिले, तेव्हा राजाने एक बोट वर केले असल्याचे त्याने पाहिले. धनगराने लगेचच दोन बोटे वर केली. नंतर राजाने तीन बोटं वर केली. आता मात्र या भोळ्या माणसाने जोरजोरात मान हलवली आणि दरबारातून पळ काढला. राजाच्या चेहऱ्यावर हास्याची लकेर उमटली. तो चांगलाच प्रसन्न झालेला दिसत होता. इतका हुषार माणूस शोधून काढल्याबद्दल राजाने प्रधानाचे कौतुक केले आणि घसघशीत बक्षिसही दिले.

राजाने नेमके काय प्रश्न विचारले आणि धनगराकडून राजाला कोणती उत्तरे मिळाली हे जाणून घेण्याची प्रधानाने इच्छा व्यक्त केली. राजा म्हणाला, " जेव्हा मी एक बोट वर केले तेव्हा माझ्या मनातला प्रश्न असा होता की, या जगात मीच सर्व शक्तीशाली राजा आहे का? परंतु मेंढपाळाने दोन बोटे वर करून सांगितले की, तुमच्या इतकाच शक्तीशाली दुसरा परमेश्वर आहे. तिसऱ्या बोटाचा प्रश्न होता की, अजून कुणी तिसरा आहे का? मेंढपाळाने मान हलवून नाही म्हटले. माझं अचूक मन वाचून दाखवणारा हा मेंढपाळ आहे. मी स्वत:ला एकटाच शक्तीशाली समजत होतो; परंतु त्याने मला सर्वशक्तिमान परमेश्वराची आठवण करून दिली. त्यानंतर सारेजण आपापल्या घरी निघून गेले.

प्रधानाने मेंढपाळाला विचारले, राजात आणि तुझ्यात काय संवाद झाला? मेंढपाळ म्हणाला, "माझ्या स्वत:च्या तीनच मेंढ्या आहेत, राजाचे एक बोट पाहून मला वाटले की राजाला एक मेंढी हवी आहे. एवढ्या मोठ्या राजाला एकच कशी द्यायची म्हणून मी म्हटले दोन देतो. परंतु राजाने तीन बोटे वर करताच मला वाटलं राजाला तीन मेंढ्या हव्या आहेत. मला तिन्ही मेंढ्या देणं शक्य नव्हतं, म्हणून नकार देत मान हलवली आणि राजदरबारातून पळ काढला."

# ९.४ सत्याचे फूल

(डोंगरी लोककथा)

फार पूर्वीची गोष्ट आहे. एका गावात एक प्रामाणिक गुराखी रहात होता. जरी त्याचे नाव ज्ञान होत तरी लोक त्याला वंशी नावानेच हाक मारीत असत कारण तो फारच मधुर बासरी वाजवित असे.

वंशी दररोज गायींना चरावयास नेत असे. आणि तिथं त्या कुरणात गवत चरित असतं तेव्हा तो एका झाडाखाली बसून एकाग्रतेने बांसरी वाजवित असे.

वंशी बांसरी वाजविताना इतका तन्मय होत असे की माणसच काय? पशु पक्षी आणि लता वृक्ष देखील त्याच्या मधुर स्वराने मोहित होत.

एक दिवस तो बांसरी वाजवित बसला होता. तेव्हा त्याला अचानक जाणवले की कोणीतरी त्याच्या जवळ बसले आहे. हे पहाण्याकरिता की कोण आहे त्याने वाजविणे थांबविले आणि पाहिले की चमेलीच्या फुलासारखी एक सुंदर युवती बसली आहे आणि तिच्या अंगातून चंदनासारखा सुवास दरवळत आहे.

“बांसरी वाजव ना, ती गोड स्वरात म्हणाली.

“कोण आहेस तू? वंशीने विचारले.

तूझ्या बांसरी ने माझ्यावर जणु काय मोहिनीच टाकली आहे. ती ऐकायला मी दररोज पर्वत, समुद्र ओलांडून येते. माझं नाव सरस्वती आहे. यापेक्षा जास्त मी माझ्याबद्दल काही सांगणार नाही. आणि तू पण विचारू नकोस. जर तू मला रोज माझ्यासाठी बासरी वाजविशील तर मी तुझा पति म्हणून स्वीकार करण्यास तयार आहे.

वंशी इतका प्रभावित झाला की त्याला कळले नाही की हे स्वप्न आहे की सत्य.

वंशीने आज इतकी सुंदर बासरी वाजविली की पूर्वी कधी वाजविली नसेल.

सरस्वतीने वंशीचा पती म्हणून स्वीकार केला. त्यांना विवाह गुप्त म्हणून

ठेवावयाचा होता. म्हणून या बाबतीत कोणाला काही सांगण्यात आले नाही. दोघे रोज जंगलात भेटत दिवसभर बरोबर रहात आणि संध्याकाळी वंशी आपल्या घरी परतत असतं आणि सरस्वती आपल्या प्रदेशात निघून जात असे. एका गुफेत त्यांनी दिवसाभरासाठी संसार थाटला होता. वंशी बासरी वाजवित आणि सरस्वती तन्मय होवून ऐकत असे.

आणि एक दिवस सरस्वती दोन जुळ्या मुलांना जन्म देवून नेहमीसाठी निघून गेली. कारण दोघांमध्ये तसेच ठरले ही होते. वंशी अत्यंत दुःखी झाला आणि मग त्याने कधी बासरी वाजविली नाही. त्याने गुराख्याचे काम ही बंद केले. व तेथे गुफेत आपल्या दोन्ही पुत्रांबरोबर राहू लागला.

वंशीची दोन्ही मुलं इतकी एकरूप होती: की त्यांना ओळखण्यात त्याला स्वतःला अडचण येत असे. म्हणून तो दोघांना वेगवेगळ्या रंगाचे कपडे घालीत असे. त्याने दोघांचे पालन पोषण सारखे केले पण न जाणो कसे. त्यातील एक अत्यंत चांगला प्रामाणिक तर दुसरा अत्यंत धूर्त झाला.

वंशी चांगल्या मुलास पांढरा व धूर्त मुलास काळा पायघोळ अंगरखा घालीत असे. अंगरखा पायघोळ असल्यामुळे त्यांचे पाय पण दिसत नसे. काही वर्षानंतर वंशीचा मृत्यू झाला. चांगला मुलगा वडिलांच्या निधनामुळे गंभीर झाला आणि धूर्त मुलगा स्वच्छंद. लोकांनी चांगल्या मुलाचे नाव सत्य आणि धूर्त मुलाचे नाव खोटारडा ठेवले. वडिलांनी दोघांना वेगवेगळ्या रंगाचे कपडे शिवून दिले होते. त्यामुळे लोक त्यांना सहज ओळखू शकत होते. ते खोटारड्याचा उल्लेख काळा अंगरखावाला याच नावाने करीत.

खोटारड्याला नेहमी ही गोष्ट खटकायची की लोक त्याच्याशी बोलत नाही, त्याला टाळतात. काळा अंगरखा त्याच्या करिता एक संकट झाला होता. पण आता काही उपाय नव्हता.

एक दिवस विद्या नावाची एक मुलगी वाट विसरली. आणि त्यांच्या गुफेपाशी आली. काळा अंगरखा असणाऱ्याने तिला त्रास देण्याचा प्रयत्न केला आणि पांढरा अंगरखा असणाऱ्याने तिचे मन रमविले. विद्याला सत्य आवडला.

त्यामुळे खोटारड्याच्या मनात त्याच्याविषयी असूया निर्माण झाली. तो मनात भावाच्या विरूद्ध कारस्थान रचू लागला. तिकडे विद्येच्या मनात दोघे भाऊ नेहमी घालत असलेल्या पायघोळ अंगरखामुळे जिज्ञासा उत्पन्न झाली की याचे कारण काय असावे?

संध्याकाळ झाल्यावर दोघे भाऊ आपल्या गुफेत गेले. कोणालाही गुफेत जाण्याची परवानगी नसल्यामुळे विद्या बाहेरच एक झाडाखाली बसली व थकल्यामुळे झोपी गेली.

पहाट होताच तिला जवळच चालण्याचा आवाज ऐकू आला तिने डोळे उघडून पाहिलं तर ते दोघे भाऊ स्नानासाठी जाताना दिसले. तिने दबल्या पायानी त्याचा पाठलाग केला. कारण तिला पायघोळ अंगरखा घालण्याचे रहस्य जाणून घेण्याची उत्कंठा होती.

दोघे भाऊ नदी जवळ आले. त्यांनी अंगरखे काढले व पाण्यात उतरले. विद्याला हे पाहून आश्चर्य वाटले की खोटारड्या मुलास पाय नाहीत. तिला रहस्य उलगडले. लागलीच तिने पाहिलं की तो पाण्यातून लवकर निघाला आणि त्याने पांढरा अंगरखा घातला. ती अचानक ओरडली.

दोघे भाऊ पण तिला पाहून अचानक आश्चर्य चकित झाले. सत्यने पाहिलं की खोटारड्याने त्याचे कपडे परिधान केले. आणि खोटारड्याने पाहिल की विद्याला त्याचे रहस्य कळले आहे. आता सत्याला काळा अंगरखा घालण्यावाचून पर्याय नव्हता. त्याने चुपचाप काळा अंगरखा घातला.

खोटरडा रागाने लालसूद झाला आणि विद्येजवळ येवून रागाने ओरडला; “खबरदार! कोणांला हे गुपित सांगू नकोस. नाहीतर तुला आयुष्यभर दारिद्रय आणि दुःख भोगावे लागेल.”

काळा अंगरखा घालून सत्य खाली मान करून गुफेकडे निघून गेला. तो विद्येशी एकही शब्द बोलला नाही. पांढरा अंगरखा घातलेला खोटारडा ऐटीने चालू लागला आणि दूर निघून गेला.

विद्या एकदी राहिली. पुष्कळ दिवस इकडे तिकडे फिरत राहिली व आपल्या

घरी निघून गेली अगदी उदास..... दुःखी मनाने.

आज या गोष्टीला किती युग झाली आहेत. विद्या प्रत्येकाला स्वतःच्या डोळ्याने पाहिलेला हा प्रसंग सांगत असते परंतु कोणी तिच्यावर विश्वास ठेवीत नाही.

ती आजपण सत्य आणि असत्याची ही गोष्ट सांगत आहे. पण आता तिला समाधान एवढेच आहे की लोकांनी तिच्या गोष्टीला म्हणीमध्ये रुपातंरित केले आहे आणि लोक म्हणत आहे सफेट झूठ (धडधडीत असत्य). झूठ के पांव नहीं होते (असत्याला पाय नसतात) काळा अंगरखा घातलेला सत्य गुफेत लपून बसला आहे आणि पाय नसलेला खोटारडा आजपण ऐटीने वावरत आहे आणि विद्या ही गोष्ट अजूनही सांगत असते. कदाचित तुम्हास देखील ती भेटेल.

(देशोदेशीच्या लोककथा : डॉ. मनोहर सराफ)

# ९.५ जोडे आणि काटकसर

(इराणची लोककथा )

बगदाद शहरामध्ये अब्दुल करीम नावाचा श्रीमंत व्यापारी रहात होता. त्याची कंजूषपणाबद्दल फार ख्याती होती. त्याचे कपडे इतके तेलकट, मळकट असत की, त्यांचा मूळचा रंगही ओळखू येत नसे. गेली दहा वर्षे तो एकच जोडे वापरीत आला होता. शहरातील सर्व चांभारांकडून वेळोवेळी दुरुस्त केले गेल्यामुळे तऱ्हेतऱ्हेच्या चामड्याचे कप्पे आणि लहान मोठे खिळे यांचा त्या जोड्यांमध्ये जणू काही संग्रह झाला होता.

शक्य तेवढ्या कमी भावात माल खरेदी करून त्यावर दुप्पट तिप्पट फायदा काढण्यात करीम हुशार होता. एकदा त्याने काचेचे मौल्यवान खडे व अत्तराच्या कुप्या यांची अगदी स्वस्त भावात खरेदी केली. विक्रीनंतर त्याला खूप फायदा होणार होता. म्हणून त्याने बादशाही स्नानगृहात जाऊन स्नान करण्याचे ठरविले. अशा प्रकारची चैन त्याने कित्येक दिवसात केलेली नव्हती.

स्नानगृहात जात असताना त्याला एक ओळखीचे सद्गृहस्थ भेटले. गप्पागोष्टी करता करता त्यांची नजर अब्दुलच्या जोड्यांवर गेली. तो म्हणाला, “ अरे, तुझे जोडे अगदीच खराब झाले आहेत. तू नवीन का घेत नाहीस?” त्यावर विचार करून अब्दुल म्हणाला, “मलासुद्धा तसे वाटते, पण लगेच वाटते की, हे जोडे अजून पुष्कळ दिवस वापरता येतील!”

स्नानगृहातून बाहेर पडल्यावर दरवाजाजवळ तो आपले जोडे शोधू लागला. पण त्याच्या जोड्याच्या जागी नवीन सुंदर जोडे ठेवलेले त्याला दिसले. मघा भेटलेल्या सद्गृहस्थाने ही भेट दिलेली दिसते, अशा विचाराने त्याने ते जोडे पायात घातले व आनंदाने घरी गेला. पण त्याच्या दुर्दैवाने ते जोडे त्याचवेळी स्नानाला आलेल्या बगदादच्या काजीचे होते. इकडे नोकरांनी काजीचे जोडे शोधले, पण त्यांना ते काही सापडले नाहीत. त्याऐवजी जुने-पुराणे घाणेरडे

जोडे तिथे होते. आणि ते अब्दुल करीमचेच आहेत, हेही त्यांनी ओळखले. ही सारी करामत त्या सद्‌गृहस्थांची होती. लगेच अब्दुलला चोरीच्या आरोपावरून पकडण्यात आले. त्याने आपली बाजू मांडण्याचा खूप प्रयत्न केला, पण काहीही न पटून काजीने त्याला तुरुंगात टाकले. खूप दंड भरून अब्दुलने आपली सुटका करून घेतली.

तो घरी आला. आपल्या शिक्षेला कारण झालेल्या त्या जोड्यांचा त्याला इतका राग आला की, त्याने खिडकीखालून वहात असलेल्या तैग्रीस नदीच्या प्रवाहात ते जोडे फेकले. बरेच दिवसांनी मासे पकडणाऱ्या एका कोळ्याला आपले नदीत फेकलेले जाळे जड वाटू लागले. आता बरेच मासे मिळणार या आनंदात त्याने जाळे बाहेर काढले. पण पाहतो तो काय, अब्दुलचे जोडे!.. त्याला खूप राग आला. त्याचे जाळेही खूप खराब झाले होते. त्याने रागाने ते जोडे अब्दुलच्या घराच्या खिडकीवर फेकले. त्यामुळे खिडकीलगत असलेल्या अत्तराच्या कुप्या फुटल्या. अब्दुलला होणाऱ्या फायद्याची आशा पार मातीला मिळाली.

खरोखर काय दुष्ट आहेत हे जोडे !.. यांचा पुरा बंदोबस्त केला पाहिजे, असे म्हणून तो खाली येऊन जोडे पुरण्यासाठी खड्डा खणू लागला. त्याच्या चहाडखोर शेजाऱ्याने ते पाहिलं. त्याने राज्यपालाला कळवले की, अब्दुल करीम बागेमध्ये भूमीगत द्रव्य शोधीत आहे. लगेच शिपाई आले. त्यांनी अब्दुलला पकडले. अब्दुलने आरोप नाकबूल केला. बागेत ज्याकरिता खड्डा खणला ते जोडे दाखविले. परंतु त्यावर विश्वास न बसून राज्यपालाने त्याला दंड केला. दंडाचे पैसे भरताना, त्या कद्रू माणसाचा जीव तीळ तीळ तुटत होता.

संतापून चरफडत घरी जात असता, या जोड्यांचा स्पर्शसुद्धा नको असे वाटून अब्दुलने राज्यपालाच्या घराशेजारी एका पाण्याच्या हौदात ते जोडे फेकून दिले. ते जोडे वहात जाऊन नेमके नळाच्या तोंडावर अडकून बसले. याच हौदाचे पाणी राज्यपालाच्या घरी येत असे. नळाचे कारागीर आले. तपासणी झाली. दुरुस्तीमध्ये नळाच्या हौदामधील तोंडावर जोडे

अडकल्यामुळे पाणी बंद झाल्याचे समजले. त्या जोड्यांची ओळख पटली. आणि अब्दुलला परत पकडण्यात आले. या वेळी त्याला जबर दंड करण्यात आला.

आता ह्या जोड्यांचे काय करावे? त्याला मोठा प्रश्न पडला. जाळून टाकावेत, तर पाण्यात भिजल्यामुळे ते जळेनात. तेव्हा सुकण्यासाठी त्याने ते जोडे छपरावर टाकले. पण त्याचे दुर्दैव अजून संपले नव्हते. शेजारच्या छपरावरून एक मांजर तिथं आलं. आणि त्या जोड्यांबरोबर खेळू लागलं. खेळता खेळता एक जोडा छपरावरून खाली रस्त्यावर एक बाई चालली होती, तिच्या डोक्यावर पडला. तिला जखम झाली. कोतवालाजवळ फिर्याद केली. अब्दुलला चौथ्यांदा पकडण्यात आले. न्यायाधीशाने केलेली शिक्षा मान्य करून तो म्हणाला, "महाराज, तुम्ही सांगाल तितका दंड मी भरीन. पण या दुष्ट, भयंकर जोड्यांपासून तुम्ही माझं रक्षण करा. हे जोडे तुमच्या ताब्यात घ्या.

काजीने ते मान्य केले, आणि त्याला सांगितले, "बाबारे, खरीखुरी काटकसर कद्रूपणे दिडकी दिडकी जमवण्यात नसून नित्योपयोगी वस्तूवर व्यवस्थित रितीने खर्च करण्यांत आहे!

[ सुबोध वाचन, पुस्तक ६ वे, कर्नाटक सरकार, १९७७, पृ. ७२-७५]

# ९.६ ऐकावे तरी कुणाचे

एका गावात एक परीट होता. त्याचे नाव गंगाराम. त्याला एक मुलगा होता. त्याचे नाव महादेव. हे बापलेक दोघे मिळून काम करत. ओझी वाहण्यासाठी त्यांनी एक गाढव पालले होते. गाढवावर ओझी लादून ते कधी नदीवर जात, तर कधी बाजारहाट करण्यासाठी तालुक्याच्या गावी जात.

एकदा काय झाले - बाजारहाट करण्यासाठी ते निघाले तालुक्याला. ओझे वाहून आणण्यासाठी त्यांनी गाढवालाही बरोबर घेतले. जाताना काही ओझे नव्हते. त्या दोघांबरोबर गाढव रिकामेच चालले होते. त्यांना पाहून एकजण म्हणाल, "काय गंगाराम, असे चालत काय निघालात? कोणी तरी बसा की त्या गाढवावर."

त्या माणसाचे म्हणणे गंगारामला पटले. तो आपल्या मुलाला म्हणाला, "महादू, तू बैस गाढवावर"

महादू म्हणाला, "मी चालेन. तुम्ही बसा."

यावर गंगाराम बोलला, "अरे, तू लहान आहेस; तू बैस, मी चालेन. वाटल्यास थोड्या वेळाने मी बसेन, तू चाल."

वडिलांचे ऐकून महादेव गाढवावर बसला. गंगाराम मागून चालत राहिला. वाटेत एकजण महादेवाला म्हणाला, "काय रे पोरा, तुला काही अक्कल आहे की नाही? आपल्या बापाला चालायला लावून तू आपला खुशाल बसला आहेस गाढवावर."

त्या माणसाचे हे बोल महादेवाच्या मनाला लागले. गाढवावरून खाली उतरत तो वडलांना म्हणाला, " बाबा, तो माणूस बोलला तेच बरोबर आहे. तुम्ही बसा, मी चालतो."

मुलाने आग्रह केल्यावर गंगाराम गाढवावर बसला. महादेव पायी निघाला.

एवढ्यात आणखी कोणीतरी ओळखीचे भेटले. ते हसून बोलले, “काय गंगाराम हे ! अरे, बाप आहेस का कोण? मुलाला पायी चालवतोस, आणि स्वत: खुशाल गाढवावर बसून आरामात निघाला आहेस. अरे, मुलाबद्दल काही माया?”

हे ऐकून गंगाराम चांगलाच खजील झाला. मग करावे तरी काय, असा त्याला प्रश्न पडला. एकदम त्याच्या मनात आले - आपण दोघेही बसलो तर!

तो म्हणाला, “ महादू, असे कर, तुही बैस माझ्या मागे. आपण दोघेही बसलो म्हणजे मग आपल्याला कोणी बोलणार नाही, कोणी नावे ठेवणार नाही. बैस, बैस.”

मग दोघेही बसले गाढवावर. त्यांना वाटले, आता आपल्याला कोणी बोलणार नाही.

एवढ्यात त्यांना काही लोक समोरून येताना दिसले. त्यातील एक जण म्हणाला, “अरे गंगाराम, काय रे हे?”

भीत भीत गंगारामने विचारले, “काय झाले? चुकले का काही आमचे?”

लोक हसले. त्यातील एक जण म्हणाला, “अरे, तुम्ही माणसं आहात का गाढव?’

गंगाराम म्हणाला, “असे काय केले आम्ही?”

“अरे गंगाराम, एवढ्याशा या लहान गाढवावर कुणीतरी एकाने बसायचे का दोघांनी? तुम्हाला काही दया माया आहे की नाही?”

हे ऐकून दोघेही खाली उतरले, ऐकावे तरी कोणाचे हेच त्यांना कळेनासे झाले. मग महादेव वडलांना म्हणाला, “आपणच ह्या गाढवाला पाठीवर घेऊन जाऊ या.”

कपाळाला हात लावत गंगाराम म्हणाला, “महादेवा, तरी लोक म्हणतील – अरे, तुम्ही माणसं आहात की गाढव?”

[कथन- व. द. देसाई, बालभारती, प. २ रे, १९७९, महाराष्ट्र, पृ. २०-२३]

# ९.७ लोभीपणाचे फळ

(इराकची लोककथा)

हसन फारच लोभी माणूस होता. सोने जमविण्याचे जणू त्याला वेडच लागले होते. सोन्याच्या मोहापायी तो एवढा कंजूष झाला होता की गरजेच्या वस्तू विकत घेणंसुद्धा त्याच्या जीवावर यायचं. स्वस्तातील स्वस्त अशा वस्तू तो शोधत राही. अगदी खाण्या-पिण्याच्या बाबतीतही तो असाच वागत असे. अत्यंत निकृष्ट प्रतीचं अन्न तो घेत असे. त्याची बायको फतिमासुद्धा सोन्याची भुकेली होती ! दोघं नेहमी सोन्याबद्दलच विचार करीत. सोनं जमा करण्यासाठी वेगवेगळ्या युक्त्यांच्या शोधात ते आपलं डोकं खर्च करीत असत.

त्या काळी बगदादमध्ये एक न्यायप्रिय अशा खलीफांचे राज्य होते. त्याचं नाव 'हारुन-अल-रशीद.' एक प्रजाहितदक्ष राज्यकर्ता म्हणून त्यांचा नावलौकिक होता. या खलीफाकडे हसन सेवक म्हणून काम करीत असे. वेतनाच्या रूपात त्याला जी काही रक्कम मिळे त्यातल्या जास्तीत जास्त पैशांनी सोनं विकत घेण्याचा तो प्रयत्न करी. हळू हळू त्याच्या जवळ बरचसं सोनं जमा झालं. या सोन्याचा साठा काढून न्याहाळीत बसणं हा पती-पत्नीचा आवडता उद्योग होता.

त्याचा लोभीपणा दिवसेंदिवस वाढतच गेला. कमीतकमी वेळेत जास्तीत जास्त सोनं गोळा करण्याच्या हव्यासापोटी तो वाममार्गाकडे वळला.

एके दिवशी फातिमाने नवीनच शक्कल लढविली. तिची शक्कल हसनला बेहद्द आवडली.

दुसऱ्या दिवशी फातिमा बाजारात गेली. तिने रडत रडत एका दुकानदाराला सांगितले, 'फारच मोठा अन्याय झाला माझ्यावर... आपल्या खलीफांनी खोटा आळ घेऊन माझ्या पतीला तुरुंगात डांबून टाकलं. मी निराधार झाले आहे. या निराधार असलेलीला मदत करा... अल्ला तुमचं भलं करील... '

खलीफांच्या न्यायप्रियतेबद्दल दुकानदाराला मुळीच शंका नव्हती. खलीफांच्या हातून असं कृत्य घडणं केवळ अशक्य आहे याची त्याला खात्री होती. पण फातिमाच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंमुळे त्याचं हृदय सहानुभूतीने भरून गेलं. त्यानं फातिमाला मोफत धान्य दिलं.

आता रोजच वेगवेगळ्या दुकानदारांना गाठून ती धान्य गोळा करून आणू लागली. अनेक दुकानदार तिच्या या युक्तीला फसले होते.

सूर्योदयापूर्वीच हसन घराबाहेर पडायचा आणि रात्री झाली म्हणजे लपत-छपत घरी परतायचा. आपण कोणाच्याही दृष्टीस पडणार नाही याची तो खबरदारी घेई.

काही दिवसांपर्यंत दुकानदारांनी धान्य दिलं. एके दिवशी मात्र सगळ्या दुकानदारांनी एकत्र येऊन फातिमाच्या पतीची सुटका करण्याचा प्रयत्न करायचे ठरवले. आपली योजना त्यांनी तिला सांगितली. ते म्हणाले, 'आपले खलीफा न्यायप्रिय आणि दयाळू आहेत. आपण सगळेजण त्यांच्याकडे जाऊन विनंती केली तर कदाचित ते हसनला सोडूनही देतील.

त्यांचं बोलणं ऐकून फातिमा खूपच घाबरून गेली. हात जोडून गयावया करीत ती म्हणाली, 'नको... नको... असं मुळीच करू नका. उलट यामुळे खलीफांना अधिकच राग येईल अन् ते माझ्या पतीला आणखी कठोर अशी शिक्षा करतील.'

'मग तू आपल्या नातलगांकडे आश्रयाला जा. आता आम्ही कसलीच मदत करू शकणार नाही.' साऱ्यांनी जणू एकमुखाने आपला निर्णय ऐकवला. फुकटात धान्य मिळविण्याचा हा मार्ग आता बंद झाला होता.

हसनच्या डोक्यात नवाच किडा वळवळू लागला. नव्या योजनेच्या शोधात तो बेचैन झाला. कसलाच उपाय न सुचल्याने शेवटी त्यानं महालात चोरी करायचा बेत ठरवला!

दररोज महालातून तो लहान-मोठ्या वस्तू चोरून आणू लागला. या वस्तू विकून तो सोनं विकत घ्यायचा. काही दिवस त्याचा हा उद्योग निर्विघ्नपणे चालू

होता. एके दिवशी मात्र तो पकडला गेला. त्याला गिरफदार करून खलीफांपुढे उभे करण्यात आले. भीतीने त्याची बोबडी वळली. त्यानं सगळं काही खलीफांना सांगून टाकलं.

खलीफांना हसनचा खूपच राग आला; पण आपल्या संतापाला आवर घालीत ते म्हणाले, 'तुझा अपराध क्षमायोग्य मुळीच नाही. दुकानदारांची फसवणूक करणे आणि महालात चोरी अशा अपराधांबद्दल तुला फाशी द्यायला हवी... पण मी असं करणार नाही...'

काही वेळ मौन धारण करून पुढे ते म्हणाले, 'हे सोनं तुम्ही स्वतःजवळ बाळगू शकता, पण हे सोनं नेहमी गळ्यात लटकावून ठेवावं लागेल तुम्हाला. आणखी एक गोष्ट कटाक्षाने लक्षात घ्या... या सोन्याच्या बदल्यात तुम्हाला एकही वस्तू विकत घेता येणार नाही... जाऊ शकता तुम्ही.'

खलीफांच्या आज्ञेप्रमाणे दोन पिशव्या मागविण्यात आल्या. या पिशव्यांत सोनं भरून हसन व फातिमाच्या गळ्यात त्या अडकविण्यात आल्या. याच बरोबर 'हसन आणि फातिमाकडून सोनं घेऊन त्यांना वस्तू देण्याचा प्रयत्न करणाऱ्याला कठोर शासन करण्यात येईल' असे फर्मान सोडण्यात आले.

धन आणि प्राण वाचल्याचा दोघांना खूप आनंद झाला. पण लवकरच त्यांचा आनंद मावळला. गळ्यातील पिशव्यांचं ओझं घेऊन घरी पोहोचेपर्यंत त्यांचा जीव मेटाकुटीला आला. रस्त्याने जाताना लोक या दोघांना पाहून हसत होते.

घरी पाऊल ठेवताच त्यांना आठवलं की घरात तर अन्नाचा एक कणही शिल्लक नाही. जवळ भरपूर संपत्ती असूनही त्यांना उपाशी रहावं लागलं ! दोन-तीन दिवस त्यांनी पाण्यावर भागवलं पण भुकेने अतिशय व्याकूळ झाल्यावर त्यांचा धीरच सुटला.

दोघंही गळ्यातील पिशव्यांचं ओझं घेऊन धडपडत महालाकडे निघाले. खलीफांच्यासमोर लोटांगण घालीत त्यांनी दयेची याचना केली. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूरच वाहू लागला.

खलीफांनी तत्काळ वजीराला आज्ञा दिली, 'या सोन्यापैकी अर्धं त्या

दुकानदारांना देऊन टाका ज्यांना यांनी फसवलं आहे आणि बाकीचं अर्धं महालात चोरी करण्याच्या अपराधाबद्दल दंड म्हणून खजिन्यात जमा करण्यात यावं... आणि हा हसन... याला पूर्वीप्रमाणेच राजमहालात सेवक म्हणून नियुक्त करण्यात यावं.'

आपला निर्णय ऐकवून झाल्यावर खलीफा पुढे म्हणाले, 'एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा ज्या धनाचा आपल्या सुखासाठी आपण उपयोग करू शकत नाही ते असून नसल्यासारखंच आहे...

(देवीचरण राठोड : देशविदेशच्या कहाण्या)

# ९.८ झोपलेलं नशीब

(इराणची लोककथा)

एका लहानशा गावात मकसूद नावाचा शेतकरी होता. वेगवेगळे प्रयोग करून तो आपल्या शेतातून भरपूर उत्पादन मिळवित असे. इतर अनेक शेतकरी त्याचा सल्ला घेत असत. आपल्या कष्टाच्या बळावर त्याने समृद्धी प्राप्त केली होती. गावातील एक सधन शेतकरी म्हणून तो ओळखला जाई. तो केवळ पैशानं श्रीमंत नव्हता तर मनानेही श्रीमंत होता. परोपकारासाठी त्याने कधीही मागे पुढे पाहिले नाही.

त्याचा शेजारी अब्दुल अत्यंत आळशी माणूस होता. काम करण्याचा त्याला भारी कंटाळा येई. दिवसभर चकाट्या पिटत हिंडणे किंवा घरी पडल्या पडल्या शेखचिल्ली-सारखी स्वप्नं रंगवीत राहणं हा त्याचा प्रिय उद्योग होता. तो फारसं कामच करीत नसल्याने त्याच्या घरी दारिद्रय ठाण माडून बसलं होतं. मकसूदच्या संपन्नतेचा त्याला हेवा वाटे.

एके रात्री चोरी करण्याच्या उद्देशाने तो मकसूदच्या घरात शिरला. एका खोलीत त्याला तिजोरी दिसली. त्याचा चेहरा उजळला. तो तिजोरीच्या दिशेने जाऊ लागला तोच एकभरदार आवाज घुमला, 'खबरदार ! तिजोरीला हात लावू नकोस.'

आवाज ऐकताच तो एकदम घाबरला. पण लगेच त्याच्या लक्षात आले की हा आवाज मकसूदचा नाही. त्याने धैर्य एकवटून विचारले, 'तू कोण आहेस ?'

' मी ? मी आहे मकसूदचं नशीब. त्याच्या संपत्तीचं रक्षण करणं माझं कर्तव्य आहे.' पुन्हा तो आवाज घुमला.

'आँ ? मकसूदचं नशीब ? ' अब्दुल म्हणाला, ' माझं नशीब कुठं जाऊन बसलय् हे सांगू शकशील काय ? तुझे उपकार मी कधीच विसरणार नाही. '

'तुझं नशीब झोपलेलं आहे.'

'झोपलय ? 'अब्दुल आश्चर्याने म्हणाला.

'हो. सुलेमानच्या पर्वतावर तुझं नशीब झोपा काढीत आहे. तिथे जाऊन तू तुझ्या नशिबाला झोपेतून उठव. एकदा का त्याला जाग आली म्हणजे तू सुद्धा अपार संपदेचा धनी होशील.'

ते ऐकून अब्दुलला हुरूप चढला. त्याने सुलेमानच्या पर्वतावर जायचे ठरवले. दुसऱ्याच दिवशी भल्या पहाटे तो निघाला. सुलेमानचा पर्वत खूप दूरवर होता. रस्ताही अत्यंत कठीण होता. पण अब्दुल एका नव्या उत्साहाने पुढे पुढे जातच राहिला. आयुष्यात पहिल्यांदाच तो एवढे कष्ट घेत होता ! वाटेत एक घनदाट अरण्य लागलं. या जंगलातून जीव मुठीत धरून तो चालला होता. अचानक त्याच्यापुढे एक वाघ येऊन उभा राहिला. वाघापुढे गुडघे टेकून तो त्याला विनवू लागला, 'माझ्या झोपलेल्या नशिबाला जागं करण्यासाठी मी जातो आहे. मला खाऊ नकोस.... माझ्यावर दया कर....'

'ठीक आहे. पण माझं एक काम तुला करावं लागेल.' वाघ म्हणाला.

'तुझं कोणतही काम करायला मी एका पायावर तयार आहे. सांग काय करू मी तुझ्यासाठी ? अब्दुल घाईघाईने म्हणाला.

'मी एवढं भरमसाठ खातो; पण तरीही माझी भूक काही शकत नाही. माझं पोट रिकामंच आहे असं वाटत राहतं मला. माझी भूक कशाने शमेल हे तुझ्या नशिबाला विचारून ये.' वाघ म्हणाला.

वाघाला वचन देऊन तो पुढे निघाला. एका आठवड्याच्या प्रवासानंतर तो एका भव्य अशा महानगरात प्रवेशला. एका राज्याच्या राजधानीचं शहर होतं ते. कोणताही परका माणूस या नगरीत आला की त्याला राजापुढे नेऊन उभं करण्यात येई. अब्दुललाही राजासमोर आणलं गेलं. अब्दुलने सारं काही प्रांजळपणे राजाला सांगून टाकलं. सगळं ऐकल्यावर राजा म्हणाला, 'तुझ्या नशिबाला माझ्याही एका समस्येवर उपाय विचार... राज्याच्या भल्यासाठी मी रात्रंदिवस कष्ट उपसतो पण राज्याच्या समृद्धीत भर टाकण्याचे माझे प्रयत्न व्हावेत तेवढे सफल होत नाहीत... याचं कारण विचारायला तू विसरू नकोस.'

राजालाही त्याचं काम करण्याचं वचन देऊन तो निघाला.

अनेक दिवसांच्या खडतर प्रवासानंतर तो सुलेमान पर्वताजवळ येऊन ठेपला. झपाट्याने तो पर्वतावर चढू लागला. पर्वताच्या शिखरावर त्याला एक विशालकाय माणूस झोपलेला दिसला. त्याला हवून जागा करीत तो म्हणला, 'केव्हा पासून असा झोपलेला आहेस तू ? आता तरी जागा हो बाबा.'

तो माणूस उठून बसला. अब्दुलकडे पाहत तो म्हणाला,'आता मला जाग आली आहे. आता मुळीच झोपणार नाही मी. तुम्ही अगदी निश्चिंत असा.'

अब्दुलने त्याला वाघ आणि राजा यांच्या समस्या सांगितल्या. या समस्यांवर त्या महाकाय व्यक्तीने त्याला उपाय सांगितले. आपल्या नशिबाला - 'आता कधीच झोपू नकोस' असं बजावून तो खाली उतरला.

परतीच्या प्रवासात तो राजाला भेटला. राजाने उत्सुकतेने विचारलं, 'तुझ्या नशिबाशी भेट झाली ? '

'हो तर.' अब्दुल म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर अपूर्व असा आनंद दिसत होता.

' माझ्या प्रश्नाचं काय उत्तर दिलं त्यानं ?' राजाने अधीर होऊन विचारले.

' महाराज, ही गोष्ट सर्वांसमोर सांगता येणार नाही.' अब्दुल म्हणाला.

राजाने सगळ्यांना तेथून जाण्याची आज्ञा दिली. सगळे निघून गेल्यावर अब्दुल कुजबुजत्या स्वरात म्हणाला, 'माझ्या नशिबानं सांगितलं की तुम्ही एक स्त्री आहात आणि जिथे एखादी स्त्री पुरुषाच्या वेषात वावरते अशा राज्याची प्रगती होणं कठीण आहे.' हे ऐकून ती म्हणाली, ' माझं रहस्य आता तुला समजलंच आहे. तुझ्यामुळेच राज्याच्या समस्येवरचा उपाय कळू शकला. या राज्यावर तुझे अनंत उपकार आहेत. माझ्याशी विवाह करून या राज्याचा तू स्वामी व्हावास अशी माझी इच्छा आहे.'

अब्दुल विचार करू लागला - 'समजा आपण राजा झालो तर राज्याची सारी जबाबदारी आपल्या शिरावर येईल. राज्याच्या भल्यासाठी कष्ट उपसावे लागतील. ही नसती आफत कशाला ओढवून घ्यायची ? '

तो आळशी तिला म्हणाला, 'मला आता कोणत्याच गोष्टीची गरज वाटत नाही. माझं झोपलेलं नशीब जागं झालं आहे.... इथला राजा व्हायची माझी मुळीच इच्छा नाही.'

आणि तो निरोप घेऊन निघाला. वाटेत त्याच्या डोक्यात आले- 'नशीब जागं झाल्यावर नसत्या उठाठेवी करायची गरजच काय ? आता आरामात पडल्या पडल्या सारं काही मला प्राप्त होणार... '

थोड्याच दिवसांत त्याची वाघाशी भेट झाली . वाघानं विचारलं, 'तुझा हेतू सफल झाला का नाही ? '

उत्तरादाखल अब्दुलनं त्याला सगळं काही तपशीलवार सांगितलं. राजाशी झालेल्या भेटीचं विस्ताराने वर्णन करून झाल्यावर तो म्हणला, 'त्या स्त्री वेषातील राजाने माझ्याशी विवाह करण्याची इच्छाही प्रकट केली. सारं राज्य मला देण्याच्या गोष्टी करीत होती ती. पण मी चक्क नकार दिला. अरे, नशीब जागं असल्यावर मला हातपाय हलवायची गरजच काय मुळी ?'

'असं ?' वाघ हसून म्हणाला, ' माझ्या समस्येवर उपाय सांगितला की नाही त्यानं ?'

'अरे हो. विसरलोच की.' अब्दुल म्हणाला, 'तुझ्या समस्येवर अगदी साधा उपाय सांगितला त्यानं. तो म्हणाला की एखाद्या मूर्ख माणसाला जर तू खाल्लंस तर तुझी तक्रार सहजपणे दूर होऊन जाईल.' हे ऐकताच वाघाने क्षणभर विचार केला आणि लगेच आनंदाने ओरडला, 'तुझ्याएवढा मूर्ख माणूस मी आजपर्यंत पाहिला नाही.'

पुढच्याच क्षणी वाघानं अब्दुलवर झेप घेतली अन् अब्दुलचं नशीब कायमचं झोपलं !

(देवीचरण राठोड : देशविदेशच्या कहाण्या)

# ९.९ चीनमधील वैद्य

(चिनी लोककथा)

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. त्यावेळी चीनमध्ये चेंग नावाचा एक म्हातारा वैद्य रहात होता. तो फार कंजुष होता. तसेच तो पैशाचाही फार लोभी होता. त्याने स्वतःसाठी एक छोटेसे घर बांधले होते. त्या घराभोवती त्याने सुरेख बाग केली होती. त्याच्या बागेत अनेकरंगी वेल होते. छोटीमोठी असंख्य झाडे-झुडपे होती. आणि अगणित फुले होती. चैंगला प्रत्येक फुलाचे व पानाचे गुणधर्म माहीत होते.

चैंगची एक सवय होती. रात्र झाली की तो बागेत शतपावली करीत फिरे. आणि तो प्रत्येक झाडाजवळ जाई. त्या झाडाकडे पाहून त्या झाडाचे औषधी गुणधर्म म्हणे व पुढे जाई. जवळ जवळ पहाटेपर्यंत त्याचा असा अभ्यास चाले. त्यामुळे तो अनेक प्रकारचे रोगी बरे करीत असे आणि त्यांच्या जवळून खूप पैसे घेत असे.

एका रात्री तो असाच बागेतून फिरत असता त्याला एक खूप उंच माणूस एका झाडाच्या कोपऱ्यात रडत बसलेला दिसला. त्याला पाहून चैंगला नवल वाटले. चैंग त्याच्याजवळ गेला व त्याला म्हणाला,

"तू कोण आहेस ?"

तो माणूस बोलला, " मी काळ आहे."

"तू येथे माझ्या बागेत कशासाठी आला आहेस ?"

तो माणूस बोलला, " मी नुसताच काळ नाही. मी भविष्यकाळ आहे. भविष्यातले खूप पुढचे मला दिसते. मी माणसांची भविष्ये तर सांगतोच; परंतु झाडाझुडपांची भविष्येही वर्तवितो."

"परंतु तू माझ्या बागेत कशासाठी आला आहेस ? आणि तू रडतोस कां ?"

"माझे भविष्य खरे की खोटे हे बघायला."

"तू काय भविष्य केले आहेस ?"

"सांगतो," काळ म्हणाला.

त्याने चैंगला एका झाडाखाली बसविले आणि तो बोलू लागला, "तुमच्या बागेत असंख्य झाडे आहेत. परंतु एक वेल नाही, ती वेल बरोबर बारा वाजून एक मिनिटाने तुमच्या बागेत उगवणार आहे असं माझं भविष्य आहे."

"परंतु आता तर बारा वाजून गेले आहेत."

"होय आणि तरीही त्या वेलींचा जन्म झालेला नाही. माझं भविष्य खोटं ठरणार की काय ? म्हणून रडतो आहे."

हे तो बोलत असतानाच कोपऱ्यातील एका झाडाजवळ त्याला एक कोंब वर येताना दिसला. तेव्हा एकदम टाळी वाजवून माणूस बोलला, "ती पहा-ती पहा ती वेल उगवते आहे."

चैंगने निरखून बघितलं. तिथे खरोखरच एक कोंब वर येत होता. आपल्या बागेतली सगळी झाडं झुडपं चेंगला तोंडपाठ होती. त्यामुळे तो वेल नवीनच आहे हे चैंगच्या लक्षात आलं.

तो उंच माणूस स्वतःच्या तंद्रीत बोलत होता. "या वेलीचे नाव अमरवेल, या वेलीवर एकच फळ येतं; त्या फळाचं नाव अमरफळ."

"त्याचा काय उपयोग?" चैंगने विचारले.

"या फळाने असाध्य रोग बरा होतो, आणि मुख्य म्हणजे हे फळ खाल्ले असता कोणताही माणूस अमर होतो."

" मी अमर होईन कां ?" चैंगने उत्सुकतेने विचारले.

"हो तुम्ही अमर व्हाल." तो माणूस बोलला.

नंतर चैंगने त्याला आपला हात दाखविला. तेव्हा बरंच भविष्य अचूक सांगितल्यानंतर तो माणूस चैंगला म्हणाला, "तुम्ही अजूनही अनेक रोगी बरे कराल आणि वयाच्या ८४ व्या वर्षी तुम्हाला असाध्य रोगाने मरण येईल."

त्याबरोबर चैंगला भविष्य सांगणाऱ्या त्या माणसाचा राग आला. चैंग बोलला, 'तू नुसताच थापेबाज आहे. आत्ता थोड्या वेळापूर्वी तू मला म्हणालास

तुम्ही अमर व्हाल आणि आता म्हणतोस की तुम्हाला वयाच्या ८४ व्या वर्षी मरण येईल. यातलं खरं काय ? चल निघ येथून."

असे म्हणून चैंगने धक्के मारून त्या माणसाला हाकलून दिले.

त्यानंतर बरेच दिवस गेले. चैंग आपले औषधे देण्याचे कार्य करीतच होता. अशीच वर्षामागून वर्षे गेली.

अमरवेल आता चांगलीच फोफावली होती. त्यावर एक लाल गुलाबी फळही आलं होतं. चैंग त्या फळावर रात्रंदिवस पहारा करीत असे. ते फळ तो स्वतः खाणार होता आणि अमर होणार होता. म्हणजे वयाच्या ८४ व्या वर्षीच काय , पण त्याला केव्हाच मरण येणार नव्हते.

एक दिवस चैंगने ठरविले की आज रात्री हे फळ आपण खायचे. रात्र झाली. चैंग अमरवेलीजवळ आला. परंतु त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. ते फळ कोणीतरी तोडून नेले होते.

चैंग मटकन खाली बसला. आपण आता नक्कीच मरणार आणि भविष्यकाळाचे भविष्य खरे ठरणार असे त्याला वाटू लागले. तोच बागेतील कडेच्या झुडुपाखालून त्याला कण्हण्याचा आवाज ऐकू आला. चेंग पुढे गेला, तेव्हा त्याला दिसले की, एक रोगजर्जर म्हातारा शरीराचे मुटकुळे करून तेथे उकिडवा बसला होता. तो खुणेने चैंगला बोलावत होता. चैंग त्याच्या जवळ गेला.

तो माणूस एक एक शब्द जेमतेम उच्चारत चैंगला म्हणाला, "माझ्या घशात एक फळ अडकले आहे, ते मला गिळताही येत नाही आणि बाहेरही निघत नाही."

त्या माणसाने 'आ' केला. चैंगने त्याच्या घशात बघितले.

ते फळ चैंगच्या वेलीवरचे अमरफळ होते. "मला हे फळ खायचे आहे." तो मनुष्य बोबड्या आवाजात बोलू लागला.

चैंगने खूप विचार केला. फळ काढताही आले असते किंवा त्या मनुष्याला खाताही आले असते. काय करावे ? ते फळ आपण खाऊन अमर व्हावे की त्या

माणसाला देऊन त्याची रोगातून मुक्तता करावी ? चैंगला काय करावे ते सुचत नव्हते.

शेवटी काही एक निश्चयाने चैंग पुढे झाला. त्याने त्या म्हाताऱ्या माणसाच्या घशातील अडकलेले फळ अलगद काढले. आणि एका क्षणाचाच विचार करून त्या माणसालाच खायला दिले.

पुढे काही महिन्यांनी वयाच्या ८४ व्या वर्षी चैंग मरण पावला. पण गंमत अशी की फळ त्या दुसऱ्या म्हाताऱ्याने खाल्ले आणि चैंग मात्र अमर झाला. अजूनही चीनमध्ये वैद्य असावा तर चैंगसारखा असे म्हटले जाते.

(शशिकांत केतकर : चीनमधला वैद्य आणि इतर गोष्टी)

# ९.१० तुगरी आणि एगरी

(उजबेकी लोक-कथा)

फार प्राचीन काळी एका गावात तुगरी नावाचा एक मुलगा रहात होता. एके दिवशी नोकरी शोधण्यासाठी तो गावाबाहेर पडला. त्याने अनेक गावांना भेटी दिल्या, पण कुठेच काम मिळाले नाही. दूर देशास काम मिळेल या अपेक्षेने तुगरी पुढचा प्रवास करीत होता.

वाटेत तुगरीला पदयात्रा करणारा एक प्रवासी भेटला. तुगरीने त्याला विचारले, "तुम्ही कोणत्या बाजूस जात आहात ?" प्रवासी म्हणाला,याच बाजूने नोकरी शोधण्यासाठी जात आहे.

"तुमचे नाव काय आहे ?"

"एगरी"

"आणि माझे नाव आहे तुगरी. तुम्हाला जर वाटत असेल तर मित्रता ठेवू. आणि कुठेतरी एखाद्या ठिकाणी दोघेही मिळून नोकरी करू"

एगरीने होकार दिला, आणि दोघांनीही निश्चय केला की, जोपर्यंत या जगात राहू तोपर्यंत आपली मित्रता कायम ठेवू.

तुगरीने पाहिले एगरी पदयात्रा करता करता थकून गेला आहे. त्यासाठी त्याने आपला घोडा एगरीस दिला. एगरी घोड्यावर बसला. त्याने त्याला चाबूक मारला, तेव्हा पहाता पहाता घोडा दृष्टिआड झाला.

तुगरी थबकला व म्हणाला - 'ज्या इसमास मी आपला मित्र समजत होतो, त्याने तर एखाद्या शत्रुपेक्षा माझी अधिक वाईट परिस्थिती केली आहे.'

तुगरी खूप चिंतेत पडला. पण आता तो काय करू शकत होता ? त्याच्याजवळ घोडादेखील राहिला नव्हता. काही वेळाने तो हळूहळू पुढे जाऊ लागला. जेव्हा अंधार होऊ लागला तेव्हा त्याला एक पायवाट लागली. त्या पाऊलवाटेने जाता जाता तो एका भयंकर जंगलात शिरला व चालता चालता

काही वेळ निघून गेला. एकाएकी तुगरीने गवताच्या एका लहानशा मैदानात तंदूरी पाहिली.

तुगरीने विचार केला - 'अंधाऱ्या रात्री जंगलातून जाणे भयंकर त्रासदायक आहे. त्या तंदूरीत जाऊन झोपावे. असा विचार करून तो त्या तंदुरीत शिरला.'

त्या गवताच्या मैदानात प्रत्येक रात्रीला पुष्कळसे पशू एकत्रित होत असत. आकाशात चंद्र आला की, जंगलचा राजा सिंह, त्याचे मंत्री -अस्वल व चित्ता,जंगलातील शिंग फुंकणारा- लांडगा, बांसरी वाजविणारे गिधाड आणि जंगलातील कथ्थक नृत्य करणारी कोल्ही इत्यादी सर्व तिथे पोचत होते.

जेव्हा चंद्र निघाला तेव्हा गिधाड ओरडत ओरडत तंदुरीच्या चोहीकडे फिरू लागले. त्याच्या निमंत्रणानुसार जंगलातील सन्माननीय पशू तिथे येऊन पोचले.

जंगलाचा राजा-सिंह आला, तो हळूच बसला आणि त्याने वेगवेगळ्या कथा सांगण्याचा सर्वांना आदेश दिला. तेव्हा जंगलातील कोल्ही एक कथा सांगू लागली : "या जंगलाच्या शेजारी एक गुंफा आहे. मी तिच्यात दहा वर्षांपासून राहाते आहे. ज्या वस्तू मनुष्य प्राण्यांजवळ असतात त्या सर्व माझ्या गुहेत मिळू शकतात. दहा वर्षांपासून पुष्कळ वस्तू मी जमा करून ठेवल्या आहेत. त्या वस्तूंमध्ये पुष्कळसे गालिचे, कंबळ आणि गाद्या आहेत. खाण्याच्या पुष्कळशा वस्तू आहेत."

तुगरीने तंदुरीत बसून या सर्व गोष्टी ऐकल्यात व तो म्हणाला -"अहाहा ! किती चांगल्या गोष्टी मी ऐकल्यात! या कोल्ह्याच्या घरी तर मी अवश्य जाईन."

पण मंत्री महोदय श्री.अस्वल म्हणाले - "ह्यात काय विशेष आहे ? ह्याच्यात हृदयाला स्पर्श करणारी कोणतीच खास गोष्ट नाही. मी ज्या जंगलात राहतो, त्यात एक झाड आहे, ज्याचे नाव कारागच, उभे आहे. झाडाच्या खालच्या भागाला दोन फांद्या आहेत. या फांद्यांच्या प्रत्येक पानाने प्रत्येक आजार चांगला होऊ शकतो. आपण सर्वांनी ऐकले असेल की, जवळच्या शहरातील राजाची मुलगी सात वर्षांपासून आजारी आहे. त्या राजाने जाहीर केले की, 'जो इसम

माझ्या मुलीचा आजार बरा करेल, तो माझ्या मुलीचा पती होईल. परंतु कुणी माझ्या मुलीचा इलाज करेल, व त्यात तो तिचा रोग पूर्ण ठीक करणार नाही; तर त्याला प्राण-दंडाची शिक्षा मिळेल." अस्वल पुढे बोलले- "पुष्कळशे लोक राजाच्या मुलीला औषध देण्यासाठी आले होते, पण ते असफल झाले. त्यामुळे त्यांना प्राणास मुकावे लागले. जर कोणता माणूस या फांद्यांच्या पानांना तोडेल आणि पाण्यात उकडून त्या काढ्याला राजाच्या मुलीस पाजेल, तर मुलगी एकदम निरोगी होऊन जाईल!"

अस्वलाने आपले रामायण आटोपते घेतले. नंतर तो शिंग फुंकणारा लांडगा म्हणाला- "या जंगलाच्या किनाऱ्यावर चाळीस हजार मेंढरांचा कळप फिरतो. दर दिवशी मी दोन मेंढरांना मारून खात असतो. त्यांना राखणारे गुराखी खूप प्रयत्न करतात पण मला ते धरू शकत नाहीत. तिथूनही कांही अंतरावर - त्या टेकडीवर एक वृद्ध इसम राहतो. त्याच्याजवळ एक मोठा कुत्रा आहे. जर का मेंढरांना राखणारांनी त्या कुत्र्याला विकत घेतले, तर मग आपले वाजलेच तीन तेरा. तो कुत्रा माझे तुकडे तुकडे करून टाकेल. '

लांडग्याचे बोलणे आटोपले, तेव्हा वाघ म्हणाला , "या जंगलाशेजारी घोड्यांचा एक कळप फिरतो. मी रोज त्यामधून एक घोडा घेऊन जातो. पण मला कुणीच धरू शकत नाही. पण त्या घोड्यांच्या घोळक्यांत असा एक घोडा आहे की जो मला सहजगतीने पकडू शकतो. पण फार चांगले आहे की, ही गोष्ट कोणत्याच इसमास माहीत नाही. नाही तर तो मला अगदी सहजच पकडू शकला असता!

जेव्हा ह्या गोष्टी आटोपत आल्यात तोपर्यंत इकडे सूर्य नारायण निघू लागला होता व सर्व पशू आपल्या आपल्याला घराची वाट धरू लागले होते.

जेव्हा त्या मैदानात एकही पशू राहिला नाही, तेव्हा तुगरी तंदुरीतून बाहेर निघाला. त्याने ज्याविषयी अस्वलाने उल्लेख केला होता, त्या झाडाचा पत्ता लावला. झाडाच्या खाली त्याला त्याच दोन फांद्या मिळाल्यात. त्या फांद्यांची पाने तोडून तुगरी पुढे निघाला. रस्त्यात त्याला मेंढरांचा एक कळप दिसला.

राखणदारास तो भेटला. त्याने त्याला नमस्कार केला आणि विचारले ,"काय समाचार आहे. बंधू तुमचा?"

धनगर म्हणाला - "माझी स्थिती फारच वाईट आहे. प्रत्येक रात्रीला इकडे एक लांडगा येतो. आणि सर्वात उत्तम दोन मेंढरांना मारून घेऊन जातो. माहिती नाही की या गोष्टीबद्दल माझा मालक मजबरोबर कसा व्यवहार करेल. आणि कोणत्या रीतीने मी मेंढरांची पाहाणी करावी, हे माझ्या लक्षात येत नाही."

तेव्हा तुगरी म्हणाला- "दुःखी होऊ नका ! मी तुम्हाला मदत करीन." असे म्हणून तुगरी ज्याच्याविषयी लांडग्याने सांगितले होते त्या म्हाताऱ्याकडे निघाला. जिथे तो म्हातारा राहात होता, त्या टेकडीकडे तुगरी गेला. त्याने म्हाताऱ्याकडून तो मोठा कुत्रा विकत घेतला. जेव्हा रात्री मेंढरांना खाण्यासाठी लांडगा आला तेव्हा त्या कुत्र्याने त्याला धरून खूप घोमाटले-रगडले.

या गोष्टीमुळे धनगरास फार आनंद झाला. मग तुगरी घोड्यांच्या कळपाचा शोध करू लागला. जेव्हा घोड्यांचा कळप मिळाला तेव्हा तुगरी राखणदाराशी बोलू लागला. धनगर म्हणाला, 'माझी परिस्थिती फार गंभीर आहे- वाईट आहे. इथे प्रत्येक दिवशी वाघ येतो आणि एका घोड्याला मारून घेऊन जातो.'

तेव्हा तुगरी म्हणाला-"काही हरकत नाही, सर्व काही ठीक होऊन जाईल. या हुशार घोड्यावर जीन कसा ? आणि मला एक लांब व ठोकळ काठी द्या ?"

धनगराने सर्व काही तयार केले, तुगरी काठी घेऊन त्या लाख्या रंगाच्या हुशार घोड्यावर स्वार झाला, आणि जंगलातील पाऊलवाटेवर वाघाची वाट पहात बसला.

वाघ अचानक त्याच्यावर धावून गेला. पण तुगरीने जाळे फेकून वाघाला पकडून घेतले. वाघ लगेच पळू लागला आणि जाळ्यातून आपली सुटका करून घेण्याचा प्रयत्न करू लागला. पण तुगरीने त्याला काठीने इतके मारले की तो त्याच ठिकाणी मरण पावला. जेव्हा तुगरी धनगराजवळ परत आला, तेव्हा धनगरास इतकी खुशी झाली की, त्याने तो हुशार घोडा तुकरीला बक्षिस दिला.

मग तुगरी त्या धनगराचा निरोप घेऊन घोड्यावर स्वार होऊन नगराकडे

रवाना झाला. नगरात जाताच त्याने ऐकले - 'राजाची मुलगी सात वर्षांपासून आजारी आहे ! जो माणूस तिला निरोगी करेल, राजा त्याला ती मुलगी पत्नीच्या रुपाने बक्षीस देईल. पण जो इसम तिचा औषधोपचार करण्यास सहमत होईल; पण औषधोपचार करण्यात असफल राहील तर मात्र राजा त्याला मृत्यूदंड देईल !' ह्या गोष्टी मोठ्या बाजारात दवंडी घालणारा ढोल वाजवून जाहीर रीतीने सांगत होता.

हे ऐकून तुगरी दवंडी घालणाऱ्याजवळ गेला आणि म्हणाला -"मी राजाच्या मुलीचा औषधोपचार करण्यास तयार आहे." तेव्हा तुगरीला अगदी तत्परतेने राजमहालात पोचविण्यात आले. राजाने तुगरीच्या सर्व गोष्टी ऐकल्यावर आपल्या मुलीचा औषधोपचार करण्याची अनुमती दिली.

तेव्हा तुगरीने फांद्यांच्या पानांना वाटून नंतर पाण्यात टाकले व उकडले. त्यानंतर जो काढा तयार झाला तो त्याने राजाच्या मुलीला पाजला. तीन दिवसांनंतर राजाची मुलगी अगदी चांगली झाली-निरोगी बनली. राजाला खूप आनंद झाला. राजाने आपले वचन पूर्ण केले. त्याने तुगरीशी आपल्या मुलीचे लग्न फार थाटामाटाने लावून दिले.

दोन तीन दिवसानंतर राजाने तुगरीला विचारले,"सांगा, आता तुम्ही माझ्या राज्यात कोणता शासक होणे पसंत कराल ?"

उत्तर देतांना तुगरी म्हणाला, "महाराज, आपल्या कृपेबद्दल फार फार धन्यवाद ! पण मी कोणाताही शासक होणे पसंत करीत नाही. आपणांस माझी काही एक प्रार्थना आहे. जंगलाशेजारी जी टेकडी आहे तीवर माझ्यासाठी एक सुंदर घर तयार करून द्या ! मी आपल्या पत्नीसोबत तिथे राहीन व आपल्या श्रमाच्या बळावर आपला संसार चालवेन."

हे वाक्य ऐकताच राजाला फार आश्चर्य वाटले. तरी पण त्याने तुगरीचा प्रस्ताव मंजूर केला आणि तुगरीच्या इच्छेप्रमाणे त्याला सर्व काही व्यवस्था करून दिली. तुगरी आपल्या पत्नीस घेऊन त्या टेकडीवर राहू लागला.

एके दिवशी दुपारी तुगरीने आपल्या वाटेने येत असलेला एक इसम पाहिला.

त्याच्याजवळ एक घोडा देखील होता. दोघांनाही पाहून तुगरीने एगरीला ओळखले. घोडेदेखील तेच होते. ज्यांची चोरी एगरीने तुगरीपासून केली होती. तुगरी रस्त्यावर गेला व त्याने एगरीला आवाज दिला. मनात काहीच संकोच न बाळगता एगरी तुगरीबरोबर भेटला, आणि त्याच्यासोबत त्याच्या घरी गेला. तुगरी एगरीला खाण्यासाठी पुलाव देत असे व पिण्यासाठी फळांचा रस. जेवण करताना एगरी तुगरीला विचारत असे, "सांग,तुला हे सर्व कसे प्राप्त झाले ? तुझे घर देखील फार सुंदर आहे. मी तुझ्या घोड्यांची चोरी केली. विचार करीत होतो की धनवान व्हावे. पण जिथेही गेलो तिथे माझ्या हाती अपयशच आले."

तुगरीने उत्तर दिले - "मी जंगलातील जुन्या तंदुरीत बसून एक रात्र घालविली. आणि तिथूनच हे सर्व काही मला मिळाले."

ही गोष्ट ऐकताच एगरी म्हणाला - " मला ती जागा दाखवून दे !"

तेव्हा तुगरी त्याच्यासोबत जंगलात गेला आणि एगरीला त्याने ती जागा दाखविली, जिथे रात्रीला सर्वच जंगली पशू एकत्र येते होते. त्यानंतर तुगरी आपल्या घरी परत गेला. जेव्हा अंधार होऊ लागला तेव्हा एगरी तंदुरीत शिरला. रात्रीला त्याठिकाणी जंगली पशू आलेत. जंगलाचा राजा सिंह आला. त्याचा मंत्री अस्वल आला, जंगलात शिंग फुंकणारा लांडगा आला, बासरी वाजविणारे गिधाड आले आणि कथ्थक नृत्य करणारी कोल्ही इत्यादी आलेत.

सिंहाने विचारले - "माझा दुसरा मंत्री वाघ का आला नाही? बरे असो, तुम्ही आता प्रत्येकजण एकेक कथा सांगा पाहू !"

परंतु गिधाड म्हणाले -"नाही, आता तर कोणतीच कथा सांगितली जाणार नाही. कथा सांगितल्यामुळेच आता आमच्या सोबत आमचा प्रिय मित्र वाघ नाही."

तेव्हा अस्वल देखील म्हणाले - "कथा ऐकविल्यामुळे औषधींची सर्व पाने कुणी तरी चोरुन नेलीत."

यानंतर लांडगा म्हणाला- "मी तर अर्धा मरण पावलो आहे. मला नित्य उपाशी राहावे लागले. कारण की धनगराने त्या मोठ्या कुत्र्याला विकत घेतले

आहे, ज्याबद्दल मी आपणास नेहमी सांगत होतो, आता तर मी त्या मेंढरांपाशी देखील जाऊ शकत नाही. कारण की त्या कुत्र्याने मला जोराचा चावा घेतला आहे."

ह्या गोष्टी ऐकताच जंगलाचा राजा सिंह क्रोधित झाला. फार जोराची डरकाळी फोडून तो म्हणाला- "आमच्या गुप्त गोष्टींना कुणी उघडकीस आणले ? त्या गद्दराला पकडा आणि मारून टाका !"

परंतु हा गद्दार कोण आहे ? याविषयी कोणताच पशू जाणत नव्हता. 'या सर्व रहस्याचा कुणी पत्ता लावला आणि भेद उघडकीस आणला ?' अस्वल गिधाडास विचारू लागले,गिधाड लांडग्याला विचारू लागले, लांडगा कोल्हीला, परंतु या विषयी कुणालाच बरोबर माहिती नव्हती.

जवळच एका झाडावर एक मृणाल पक्षी बसला होता. तो ह्या गोष्टी ऐकता ऐकता बोलला - 'तंदुरीत पाहून घ्या !' असे म्हणून तो उडून गेला.

सर्व पशू एकसरशी धावले व तंदूरी जवळ गेलेत. तंदुरीतून एगरीला काढून त्यांनी त्याचे तुकडे तुकडे केलेत. याप्रमाणे सत्यवादी तुगरीचे स्वप्न पूर्ण झाले आणि दुष्ट अप्रामाणिक एगरीने केलेल्या कृत्याचे त्याला फळ मिळाले.

(वा. रा. गाणा 'रव' (मूळ लेखक : प. अ. बारान्निभोव)
सोविएत संघातील लोककथा)

# ९.११ शेतकरी आणि कोडे

(रशियन लोक-कथा)

एका गावात राहणाऱ्या एका शेतकऱ्यास धान्याची फार आवश्यकता होती. त्या गावातील जमीनदार बुद्धिवंत शेतकऱ्यांना फार पसंत करीत होता. तो शेतकरी जमीनदाराजवळ गेला. तेव्हा जमीनदाराने त्याला विचारले "शेतकरी बंधू, तुला काय पाहिजे ?"

"आपली कृपा,महाराज ! माझ्या घरी धान्याचा एक कण नाही. अन्न अन्न करीत मी भटकत आहे. आपल्या कृपेने काही धान्य मिळेल अशी आशा आहे."

जमीनदार- "ठीक आहे, तू माझे कोडे सोडवशील तर मी तुला धान्य देईन. हे सांग की, जगात सर्वात शीघ्र गतीने पळणारी वस्तू कोणती आहे ?"

शेतकरी- "जगात मनासारखी जास्त शीघ्रगतीने पळणारी वस्तू कोणतीच नाही."

जमीनदार- "बरे ठीक आहे. ह्या कोड्याचे उत्तर बरोबर आहे. आता दुसऱ्या कोड्याचे उत्तर सांग पाहू, जगात सर्वात मजबूत वस्तू कोणती आहे?"

शेतकरी- "ऋतुपेक्षा मजबूत कोणतीच वस्तू नाही."

जमीनदार - "ठीक आहे. आता शेवटचे कोडे सोडवायला पाहिजे. हे सांग की जगात सर्वात प्रिय वस्तू कोणती आहे ?"

शेतकरी- "झोपेसारखी अधिक प्रिय वस्तू कोणतीच नाही."

जमीनदार फार खूश झाला. त्याने एक गाडी भरून धान्य शेतकऱ्यास दिले. शेतकरी आपल्या घरी परत आला. त्याच गावात एक श्रीमंत, परंतु ईर्षा करणारा एक शेतकरी राहत होता. त्याने त्या गरीब शेतकऱ्याला विचारले- "तुला हे धान्य कसे मिळाले ?"

शेतकरी- जमीनदाराची कृपा झाली. त्यांनी मला हे गाडीभर धान्य मिळवून दिले.

"पण गाडीभर धान्य कशासाठी मिळवून दिले ? "

गरीब शेतकरी - "त्याने मला काही कोड्यांची उत्तरे द्यावयास सांगितलीत त्याप्रमाणे मी त्यांची बरोबर उत्तरे दिलीत, आणि म्हणून त्याने मला

गाडी भरून धान्य मिळवून दिले."

श्रीमंत शेतकऱ्याने विचार केला. मी देखील त्या जमीनदाराकडे का जाऊ नये. शक्य आहे मी देखील त्याची कोडी सोडवेन. या धनी शेतकऱ्याजवळ अगदी सुंदर तीन घोड्यांची गाडी होती. तो जमीनदाराजवळ गेला. जमीनदाराने त्यास विचारले - "शेतकरी बंधू! तुला काय पाहिजे?"

श्रीमंत शेतकरी -"आपल्या कृपेने काही धान्य मिळावे ही इच्छा आहे. मला धान्याची खूप आवश्यकता आहे."

जमीनदार - "बरे, देईन; पण त्यापूर्वी माझी काही कोडी तुला सोडविली पाहिजेत, जर कोडे सोडविले तर तुझी ही तीन घोड्यांची गाडी मी घेईन."

श्रीमंत शेतकरी- शक्य आहे, मी उत्तर देऊ शकेन.

जमीनदार- 'जगात सर्वात शीघ्रगतीने जाणारी वस्तू कोणती आहे?'

श्रीमंत शेतकऱ्याने आपल्या घोड्यांकडे खूण करीत म्हटले -'माझ्या घोड्यांसारखी धावणारी जगात कोणतीच वस्तू नाही. '

जमीनदार- 'नाही, हे उत्तर बरोबर नाही. आता माझे दुसरे कोडे सोडव, जगात सर्वात मजबूत वस्तू कोणती आहे?'

श्रीमंत शेतकरी - 'माझ्या दृष्टीने जगात अस्वलासारखी दुसरी मजबूत कोणतीच वस्तू नाही.'

जमीनदार - 'हे देखील बरोबर नाही. आता सांग की, जगात सर्वात प्रिय वस्तू काय आहे?'

श्रीमंत शेतकरी - माझ्या दृष्टीने माझ्यासाठी जगात सर्वात प्रिय माझी पत्नी आहे.

जमीनदार - 'तुझ्याजवळ तुझे स्वतःचे धान्य पुष्कळ आहे, आणि तू माझ्या कोडी देखील सोडवू शकला नाहीस.'

शेवटी जमीनदाराने त्या श्रीमंत शेतकऱ्याकडच्या गाडी-घोड्यांना आपल्या ताब्यात घेतले, आणि तो श्रीमंत शेतकरी आपल्या घरी पायी गेला. ईर्षा करण्याचे असे हे फळ मिळाले.

(वा. रा. गाणा 'रव' (मूळ लेखक : प. अ. बारान्निभोव)
सोविएत संघातील लोककथा)

# ९.१२ कोडे

(रशियन लोक-कथा)

एका मोठ्या रस्त्याच्या शेजारी एक शेतकरी आपल्या एका लहानशा शेतात पेरणी करीत होता. त्याचवेळी त्या देशाचा राजा त्या वाटेने जात होता. शेतकऱ्यास पाहून राजा थांबला व त्याला म्हणाला - "ईश्वर तुझे कल्याण करो, शेतकरी बंधू!"

'धन्यवाद, प्रिय बंधू! ' (तो राजा आहे हे शेतकऱ्यास माहीत नव्हते.)

राजा म्हणाला-"या शेतातील उत्पन्नापासून तुला चांगली कमाई होते का ?"

"हो, जर उत्तम पिक आलं, तर ८० रुबलपर्यंत मिळतात."

"तू हे रुबल कसे खर्च करतोस ?"

"वीस रुबल कर देतो, वीस रुबल कर्ज चुकवितो, वीस रुबल कर्ज देतो आणि वीस रुबल खिडकीतून बाहेर फेकतो."

"बंधू, तू मला नीट समजावून सांग की, हे कोणते कर्ज आहे जे तू परत करतोस, कुणाला कर्ज देतोस आणि कशासाठी खिडकीतून रुबल बाहेर फेकतोस?"

शेतकरी म्हणाला - "कर्ज चुकवितो याचा अर्थ असा की, मी आपल्या बापाला सांभाळतो, कर्ज देतो याचा अर्थ असा की, मी आपल्या मुलाचे पालन-पोषण करतो, आणि खिडकीतून बाहेर फेकतो याचा अर्थ असा की, मी आपल्या मुलीला पोसतो."

राजा म्हणाला - "तू खरे बोललास". या बरोबरच राजाने शेतकऱ्यास मुठभर चांदीचे नाणे दिले आणि मी राजा आहे असे सांगून ही गोष्ट माझ्या आज्ञेशिवाय कुणालाच सांगू नये अशी त्याने शेतकऱ्यास ताकीद दिली. राजा आपल्या राजधानीत परत आला व त्याने आपल्या सामंतांना आणि सेनापतींना बोलावले.

राजा त्यांना म्हणाला- "माझे कोडे सोडवा. मला रस्त्यात एक शेतकरी भेटला, तो आपल्या शेतात पेरणी करीत होता. मी त्याला विचारले की, तुला या

शेतातून किती कमाई होते आणि ती कमाई कोणत्या रीतीने खर्च करतो ? तेव्हा शेतकरी म्हणाला- 'जेव्हा पिक उत्तम येतं तेव्हा ८० रुबलपर्यंत कमाई होते. त्यामधून तो वीस रुबल कर देतो, वीस रुबल कर्ज चुकवितो,वीस रुबल कर्ज देतो आणि बाकी वीस रुबल खिडकीतून बाहेर फेकतो. तुम्हा लोकांमधून जो हे कोडे सोडवेल त्याला माझ्याकडून फार मोठी रक्कम बक्षीस देण्यात येईल. सोबतच सन्मानही करण्यात येईल.

सामंत आणि सेनापती खूप वेळपर्यंत विचार करीत राहिले. पण त्यांना कोड्याचे उत्तर मिळाले नाही. तेव्हा एका सामंतास वाटले की, ज्या शेतकऱ्याशी राजाने गोष्टी केल्यात आपण त्यालाच जाऊन भेटावे. तो शेतकऱ्यास भेटला आणि त्याच्यासमोर त्याने चांदीच्या नाण्याचा ढीग टाकला व म्हणाला - 'जे कोडे तू राजाला सांगितले त्याचे उत्तर मला सांग !'

शेतकरी लोभात पडला आणि त्याने सामंतास त्या कोड्याचे उत्तर सांगितले. मग सामंत राजाजवळ आला व त्याने कोड्याचे उत्तर दिले. शेतकऱ्याने आपल्या आज्ञेचे पालन केले नाही असे समजून राजाने त्या शेतकऱ्यास आपल्या दरबारात हजर करण्यास सेवकांना सांगितले. शेतकरी राजसभेत उपस्थित झाला, त्याने कोड्याचे उत्तर सामंतास सांगितले हे मान्य केले.

राजा म्हणाला- "तेव्हा तू आपल्या कर्माचे फळ भोगण्यास तयार हो, मी तुला या दोषासाठी मृत्यू-दंड देईन."

शेतकरी म्हणाला - "महाराज ! यात माझा काहीच दोष नाही. मी तर आपल्या मुखचंद्रासमोरच त्या सामंताला कोड्याचे उत्तर दिले होते." असे म्हणून शेतकऱ्याने आपल्या खिशातून एक रुबलचे नाणे काढले. त्यावर राजाचे चित्र अंकित होते. ते नाणे त्याने राजाला दाखविले. तेव्हा राजा म्हणाला -"तुझी गोष्ट खरी आहे, हा मीच आहे." राजाने विशाल मनाने त्या शेतकऱ्यास फार मोठे बक्षिस देवून घरी परत जाण्याची परवानगी दिली.

(वा. रा. गाणा 'रव' (मूळ लेखक : प. अ. बारान्निभोव)
सोविएत संघातील लोककथा)

# ९.१३ सुख आणि दुःख

(रशियन लोक-कथा)

दोन भाऊ होते. एक होता श्रीमंत आणि दुसरा होता गरीब. एके दिवशी गरीब भाऊ आपल्या श्रीमंत भावाजवळ गेला आणि म्हणाला- "भाऊ , मला शेती करण्यासाठी एक घोडा दे."

धनी भाऊ म्हणाला,"बरे, घेऊन जा, पण त्याला जास्त त्रास देऊ नकोस."

गरीब भाऊ घोडा आणण्यासाठी खळ्यावर गेला. तेथे त्याने पुष्कळसे घोडे पाहिले. त्यातल्या एका घोड्याला तो लगाम घालणार होता, तेवढ्यातच एक इसम आला व त्याने लगाम लावण्यास त्याला मनाई केली. तेव्हा गरीब शेतकरी त्या इसमास म्हणाला- "तुम्ही कोण आहात ? माझ्या भावाच्या घोड्याला लगाम लावण्यास का मनाई करता ?"

तो इसम म्हणाला- "मी तुमच्या भावाचे सुख आहे."

"तर मग माझे सुख कुठे आहे ?" गरीब भावाने विचारले .

"ते पहा, तिकडे, त्या झाडाच्या छायेत; ते लाल सदरा घालून झोपले आहे."

गरीब शेतकऱ्याने आपली काठी घेतली, फार आनंदित होऊन तो त्या झोपलेल्या माणसापाशी गेला आणि त्याला जोराचा एक धक्का देऊन म्हणाला,

"अरे आळशी माणसा, तू इथे कशासाठी पडून आहेस ?"

तो माणूस उभा राहिला आणि म्हणाला-"अरे राम, मला मारू नका. मला शेती करण्याची सवय नाही. वाटल्यास तुम्ही काही व्यापार करा. तेव्हा मी तुमची सेवा करू शकेन."

ही गोष्ट ऐकताच त्या गरीब शेतकऱ्याने घोड्याच्या भानगडीत न पडता आपल्या घराची वाट धरली. घरी जाऊन त्याने आपल्या पत्नीचा एक नवा

परकर घेतला आणि थेट बाजाराला गेला. त्याने तिचे परकर दोन रुबलला विकले. आणि अर्ध्या रुबलमध्ये एक दुसरे परकर विकत घेतले व पुन्हा तो देखील जास्त किंमतीत विकला. याप्रमाणे तो दोन तीन आठवडे खरेदी-विक्री करीत राहिला. त्यामुळे त्याला बराच नफा मिळाला. त्यानंतर त्याने एका जवळच्या शहरात एक सुंदर घर खरेदी केले. तो आपल्या जुन्या झोपडीतील सर्व सामान गाडीत भरून निघणार होता, तेवढ्यात त्याच वेळी झोपडीतील कोणत्या तरी कोपऱ्यातून कुणाच्या तरी रडण्याचा आवाज कानी पडला. तो आवाज ऐकून गरीब शेतकरी म्हणाला -

"कोण आहे तिकडे ? '

"मी आहे."

"तू कोण आहेस ?"

"मी तुझे दुःख आहे."

"तू रडतोस कशाला ?"

दुःख म्हणाले : "जर तू मला आपल्या सोबत घेऊन जात नसलास तर रडण्याशिवाय अजून मी काय करणार आहे ?"

शेतकरी : "रडू नकोस, गूपचूप रहा. बरे या पेटीत बस, तुला मी घेऊन जाईन."

जेव्हा दुःख पेटीत शिरले, तेव्हा शेतकऱ्याने ती पेटी बंद केली व तिला झोपडीच्या शेजारी जमिनीत गाडून दिले. त्यानंतर नगरात जाऊन तो शेतकरी आनंदाने आपले जीवन जगू लागला.

एके दिवशी त्या गरीब शेतकऱ्याचा 'धनी भाऊ' पाहुणा होऊन आपल्या भावाच्या घरी त्या नगरात आला. आपल्या भावाबरोबर बोलत असताना तो धनी भाऊ गरीब भावाला म्हणाला, "भाऊ, हे सांग की तू 'धनी' कसा झालास?"

दुसरा भाऊ म्हणाला मी आपले दुःख जमिनीत गाडले.

"कोणत्या ठिकाणी?"

"आपल्या जुन्या झोपडीच्या शेजारी."

हे ऐकताच धनी भाऊ खूप प्रसन्न झाला. आपल्या गावी परत गेल्यावर तो आपल्या भावाच्या झोपडीशेजारी गेला आणि जमीन खोदू लागला. खोदता खोदता त्याला ती पेटी मिळाली. ती त्याच्या गरीब भावाने गाडून ठेवली होती. पेटी उघडून त्याने आपल्या भावाच्या दुःखाला बाहेर काढले आणि त्याला म्हणाला - "माझ्या भावाजवळ जा", पण दुःखाने उत्तर दिले - "नाही, साहेब ! आपला भाऊ फार क्रूर माणूस आहे. आपण दयाळू आहात. आपण मला जमिनीतून बाहेर काढले, यासाठी मी आपला आभारी आहे. साहेब ! मी आपल्याजवळच राहीन."

तेव्हा धनी भावाने त्या दुःखाला धरून पुन्हा जमिनीत पुरण्याचे प्रयत्न केले, पण दुःख अति शीघ्रतेने अंतर्धान पावले. मग धनी भाऊ गरीब झाला आणि त्याचा गरीब भाऊ खूप श्रीमंत झाला.

(वा. रा. गाणा 'रव' (मूळ लेखक : प. अ. बारान्निभोव)
सोविएत संघातील लोककथा)

# ९.१४ पिशवीत येऊन जा

(लिथुआनियाची लोक-कथा)

एक वृद्ध आपल्या पत्नीसोबत रहात होता. त्या उभयतांना एक मुलगा होता. तरी पण गरिबीमुळे त्या मुलास ते पोटभर अन्न देऊ शकत नव्हते. त्यांनी आपल्या मुलाला एका श्रीमंत शेतकऱ्याच्या घरी गुराख्याचे काम करण्यासाठी पाठविले. नोकरीच्या पारिश्रमिकाच्या रुपात त्याला डाळीचा एक गर्नेत्स, एक मूठ मीठ आणि तीन ग्रोश मिळत होते.

मुलाने संपूर्ण उन्हाळाभर गुराख्याचे काम केले. जेव्हा थंडीचे दिवस आले, आणि जमिनीवर चोहीकडे बर्फ पडू लागला तेव्हा मुलगा आपल्या मालकास म्हणाला."आता मला घरी जाण्याची आज्ञा द्या." मालकाने उत्तर दिले- "जर तुझी जाण्याची इच्छा असेल तर जाऊ शकतोस."

मालकाने त्या मुलास डाळीचा एक गर्नेत्स, मूठभर मीठ आणि तीन ग्रोश देऊन त्याला सुट्टी दिली. मुलगा तिथून निघाला. चालता चालता वाटेत त्याला एक भिकारी मिळाला. तो मुलाकडे भीक मागू लागला. मुलाच्या मनात दया उत्पन्न झाली. त्याने थोडा विचार करून तीन ग्रोश भिकाऱ्यास देऊन टाकले. मुलगा पुढे गेला. त्याला अजून एक भिकारी मिळाला, जो पहिल्या भिकाऱ्यापेक्षा जास्त गरीब दिसत होता. भिकारी म्हणाला- "अरे बाबा माझ्यासारख्या अभागी माणसावर दया कर, काहीना काही तरी मला देण्याची कृपा कर, भगवंत तुझे कल्याण करेल."

मुलगा म्हणाला -"मी काय देऊ शकतो. मी तर स्वतः गरीब आहे. एका भिकाऱ्यास भीक दिलेली आहे. आता माझ्यापाशी देण्यासाठी काय उरले आहे?"

वृद्ध भिकारी पुन्हा पुन्हा भिकेची मागणी करीतच होता -"मला देखील काही देण्यात यावे. तुझे कल्याण होईल." मुलाने थोडा विचार केला व म्हाताऱ्यास

मीठ देऊन टाकले, त्यानंतर तो पुढे निघाला.

चालता चालता रस्त्यात त्याला पुन्हा तिसरा भिकारी भेटला. तो तर दोन्ही भिकाऱ्यांपेक्षा खालच्या थराचा होता. बिचारा खूपच म्हातारा होता. त्याचे कुबड निघाले होते. हळू हळू चालत होता. तो मुलाजवळ येऊन नमस्कार करून भीक मागू लागला.

मुलगा म्हणाला - "माझ्याजवळ आता देण्यासाठी काहीच उरले नाही. जे काही होते. ते मी प्रथम भेटलेल्या दोन भिकाऱ्यांना देऊन टाकले. पण हो, माझ्याजवळ डाळीचे एक गर्नेत्स आहे; पण आम्ही देखील गरीब लोक आहोत. माझे आई-वडील घरी माझी वाट पहात बसले असतील."

म्हातारा म्हणाला- "तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. पण तुझे आई-वडील इतके गरीब नाहीत, जितका की मी आहे. पहा मी किती वृद्ध नि कुबडा आहे,माझे पाय इतके लुळे झाले आहेत की, मी चांगल्या रीतीने चालू फिरू देखील शकत नाही. मी मृत्यूच्या दारात उभा आहे. मला काही साहायता करता आली तर अवश्य कर."

मुलाने म्हाताऱ्याकडे पाहिले व काही विचार करून त्याला डाळ देऊन टाकली. भिकाऱ्याने आभार व्यक्त करीत त्याला एक पिशवी, एक काठी आणि एक व्हायोलिन दिले व म्हणाला -"मी आपल्या जीवनाची सिद्धी आज तुला देत आहे. तू मला प्राणदान दिले आहेस. तू ज्या माणसास ठरवशील त्याला या पिशवीत ठेवू शकशील. फक्त तुला इतकेच म्हणावे लागेल की, 'पिशवीत येऊन जा!' आणि जर का तू कुणाला मारण्याची इच्छा करशील तर केवळ हे म्हणणे पुरेसे होईल - ' हे काठी, याला काही तरी धडा दे !' आणि काठी त्याला त्वरित धडा देईल. जेव्हा तू या व्हायोलिनला वाजवशील तर वाळलेल्या वृक्षांना देखील पाने फुटतील- वसंत ऋतूचा बहर येईल."

मुलाने त्या तिन्ही वस्तूंचा स्वीकार करीत त्या सिद्ध पुरुषास धन्यवाद दिले व तो पुढे निघाला. आपल्या घराकडे जाताना मुलाला भीती वाटू लागली. कारण की तो तर घरून नोकरीसाठी गेला होता! आणि घरी परत येताना

घरातील लोकांसाठी तो काहीच घेऊन आला नाही ! मुलाने विचार केला , प्रथम कुठेतरी नोकरी करावी आणि आपल्या आई-वडिलांसाठी काही कमाई गोळा केल्यावर मगच घरी जावे.

चालता चालता त्याला वाटेत एक शेत दिसले. त्यात शेतकरी गव्हाची कापणी करीत होते. ते सर्व शेतकरी इतके थकले होते की, ते काहीच बोलू शकत नव्हते. मुलाला त्या शेतकऱ्यांची दया आली. त्याने आपले व्हायोलिन काढले व वाजविण्यास सुरवात केली. ते शेतकरी आनंदित होऊन , हात धरून नाचू लागले. ते इतके नाचले की, कापलेल्या गव्हाला जमा करण्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात जाऊन पडले. अचानक शेताचा मालक फिरत फिरत तिकडे आला. एकही मजूर काम करताना दिसला नाही. असे पाहून त्याने आपला चाबूक काढला व खड्ड्यात पडलेल्या मजुरांना बाहेर काढून फटाफट फटके मारू लागला. जमीनदार अजून आवेशात पेटला व जोराने ओरडू लागला. "ये व्हायोलिन वाजविणाऱ्या सैताना ! शेतातून चालता हो ! तू कोण आहेस ?"

मुलाने मनात विचार केला, हीच वेळ आहे, आता पिशवीची परीक्षा घेतली पाहिजे. पिशवीला काढून मुलाने सिद्ध पुरुषाच्या मंत्राचा उच्चार केला - 'पिशवीत येऊन जा!' पहाता पहाता तो मोठ्या ढेरपोट्या जमीनदार, त्या लहानशा पिशवीत कसाबसा शिरला. मग मुलगा म्हणाला - ' हे काठी देवी ! याला जरा चांगला धडा दे ! ' आणि काठीने मग मागेपुढे काही विचार न करता जमीनदाराला चांगला चोप दिला.

जमीनदाराची खूप दुर्दशा झाली, तेव्हा त्याने दयेची याचना केली - "मला सोडून दे ! हे काम करणारे लोक - श्रमिक - माझ्या पाळलेल्या गाईसारखे आहेत, माझे ते भाऊ आहेत. मी आपल्या श्रमिक बंधूंना कधीच त्रास देणार नाही. माझे सर्व काही या श्रमिक बंधूंचे आहे. मला क्षमा कर ! मी आता कधी चुकून देखील त्यांना त्रास देणार नाही- मारणार नाही"

मुलगा म्हणाला - "हं, या श्रमिकांचा कधीही अपमान करू नकोस. जा तुला क्षमा केली, आणि पहा आता तू आपल्या या श्रमिकांना उत्तम प्रकारचे भोजन दे;

आणि मी केलेल्या उपकारास विसरू नकोस. माझ्या या पिशवीत देखील काही अन्न भरून आण."

संकटात सापडलेल्या जमीनदारास मुक्ती मिळाली. त्याने आपल्या दुसऱ्या नोकरांना बोलावून खाण्या-पिण्याची व्यवस्था करण्यास सांगितले. टेबलं लावण्यात आलीत, त्यावर सुंदर कापड टाकण्यात आले, विविध प्रकारच्या मिष्टान्नांनी भरलेली ताटे ठेवण्यात आलीत. मुलाने मजुरांना म्हटले- "वसुंधरेच्या पुत्रांनो, पोटभर जेवण करा- पोटभर खा-प्या !" त्या मजुरांनी खूप जेवण केले आणि त्या मुलाने देखील जेवण केलं. आपल्या पिशवीत वेगवेगळ्या प्रकारचे मिष्टान्न भरून, त्या सर्वांचा निरोप घेऊन आनंदित होऊन तो आपल्या घराच्या वाटेने निघाला.

वृद्ध आई-बाप आपल्या पुत्राला पाहून खूप आनंदित झाले. कारण की, त्यांचा मुलगा घरी परत आला होता. 'मुलाने अपल्या सोबत पिशवीत भरून खाण्यासाठी मिष्टान्न आणले, व्हायोलिन आणले- जेव्हा तो व्हायोलिन वाजवेल तेव्हा आम्हाला अपार आनंद होईल !

(वा. रा. गाणा 'रव' (मूळ लेखक : प. अ. बारान्निभोव)
सोविएत संघातील लोककथा)

# ९.१५ पिशवी

(युक्रेनी लोक-कथा)

एक इसम आपल्या बायकोसोबत एका गावात रहात होता. त्याच्यापाशी दोन बैल होते, आणि शेजाऱ्याजवळ होती गाडी. जेव्हा रविवार किंवा कोणताही सणाचा दिवस आला की, तो किंवा त्याचा शेजारी बैलांना गाडीला जुंपत व मंदिरास किंवा आपल्या नातेवाईकास भेटण्यासाठी जात असत. अशा रीतीने ते दोघेही बैल-गाडीला एकमेकांच्या उपयोगात आणत होते.

एके दिवशी बायकोने वृद्ध पतीला म्हटले की, आपण बैलांना विकून त्यांच्या ऐवजी आपल्यासाठी घोडा खरेदी करावा. मग आपण रविवारला मंदिरास किंवा आपल्या नातेवाईकास भेटण्यास जाऊ शकू. शेजाऱ्याला तर आपल्या गाडीला काही चारा नाही द्यावा लागत, पण आम्ही तर आपल्या बैलांना चारा-पाणी देतो.

म्हाताऱ्याने बैलांच्या शिंगांना दोरी बांधली व तो बैलांना आपल्या सोबत घेऊन बाजारात निघाला. रस्त्यात त्याला एक घोडेस्वार भेटला.

'नमस्कार !'

'नमस्कार !'

'आपल्या बैलांना कुठे घेऊन जात आहात ?'

'विकण्यासाठी'

'आपल्या बैलांना माझ्या घोड्यांबरोबर बदलवाल काय ?'

'हो, हो,अवश्य.'

मग म्हाताऱ्याने घोडा घेतला व बैल दिले. त्यानंतर तो घोड्यावर स्वार होवून बाजाराच्या वाटेने निघाला, रस्त्यात त्याला एक माणूस पुन्हा भेटला. तो इसम आपली गाय विकण्यासाठी बाजारात घेऊन चालला होता.

'नमस्कार !'

'नमस्कार !'

'तुम्ही कुठे जात आहात ?'

' मी बाजारात आपल्या बैलांना विकण्यासाठी जात होतो. पण रस्त्यात त्यांना बदलवून घोडा घेतला.'

'आपण आपल्या घोड्याला माझ्या गाईशी बदलवाल काय ?'

'हो, बदलवून घेईन.' त्याने घोडा बदलविला व गाय घेऊन म्हातारा पुन्हा पुढे चालला. रस्त्यात एक इसम त्याला डुक्कर घेऊन जाताना भेटला.

'नमस्कार !'

'नमस्कार !'

'तुम्ही आपली गाय कुठे घेऊन चालले ?'

'मी तर आपल्या बैलांना बाजारात घेऊन जात होतो. रस्त्यात त्यांना घोड्याशी बदलविले. घोड्याला गाईशी बदलविले. तेव्हा गाय डुकराबरोबर बदलवाल ?'

'हो बदलवून घेऊ.' गाय देखील बदलविली व डुकराला घेऊन म्हातारा पुन्हा पुढे चालला. एक इसम त्याला मेंढरू घेऊन जात असताना भेटला. बोलता बोलता तो इसम म्हणाला 'मला डुक्कर द्या आणि तुम्ही मेंढरू घ्या.' म्हाताऱ्याने मान्य केले व मेंढरू घेऊन तो पुढे जाऊ लागला. पण पुन्हा रस्त्यात त्याला एक माणूस हंस घेऊन जाताना दिसला. दोघांमध्ये बोलणी झाली.

' मेंढरू घेऊन हंस द्या !

''हो, घ्या."

पुढे गेल्यावर पुन्हा त्याला एक माणूस कोंबडा घेऊन भेटला. त्यांची बोलणी झाली.

'कोंबड्याच्या ऐवजी हंस द्याल ?'

'हो, घ्या.'

आता म्हातारा कोंबड्याला घेऊन पुढे चालला, वाटेत एक इसम भेटला. त्याच्या जवळ एक रिकामी पिशवी होती. दोघांची बोलणी झाली.

' मला रस्त्यात एक पिशवी सापडली तिला घेऊन मला कोंबडा द्याल ?'

'हो, घ्या.'

म्हाताऱ्याने पिशवी घेतली. आपल्या खिशात ठेवली आणि बाजाराकडे जाऊ लागला. शहराशेजारी त्याला एक नदी लागली. नावेत बसून तिला पार करावे लागत असे. पण पलीकडे जाण्यासाठी लागणारे भाडे देण्यास म्हाताऱ्याजवळ पैसे नव्हते. तेव्हा नाविक त्याला म्हणाला- 'जर तुम्ही मला आपली पिशवी द्याल तर मी नदीपलीकडे तुम्हाला उतरवून देईन.' पलीकडे जाण्यासाठी म्हाताऱ्याने त्याला पिशवी देवून टाकली.'त्याच ठिकाणी फिरून व्यापार करणारी काही मंडळी उभी होती. जेव्हा त्या म्हाताऱ्याची सर्व कथा त्यांनी ऐकली तेव्हा ते त्याची टिंगल करू लागले.

'आता तुमची बायको तुम्हाला काय म्हणेल ?'

'काहीच म्हणणार नाही.' म्हातारा म्हणाला- 'केवळ हेच म्हणेल की, ईश्वराची कृपा आहे, तुम्ही तरी आपल्या घरी जिवंत परत आलात.' यावर त्यांनी शर्यत लावली - जर पत्नी अशारीतीने बोलेल तर व्यापारी बारा गाड्यांमध्ये भरलेला आपला सर्व माल म्हाताऱ्यास देऊन टाकतील. त्यांनी एका व्यापाऱ्यास निवडून म्हातारी जवळ पाठविले.

तो व्यापारी म्हातारीजवळ गेला व म्हणाला- 'नमस्कार !'

'नमस्कार !' म्हातारीने म्हटले, 'काय म्हाताऱ्याशी तुमची भेट झाली ?'

'हो झाली व ऐकले आहे, त्याने आपले बैल घोड्याशी बदलविलेत.'

'ही तर चांगली गोष्ट आहे ! गाडी तर इतकी किंमती नाही, कधी तरी तीही खरेदी करून घेऊ'

'पण त्याने घोडा गाईशी बदलविला.'

'हे तर आणखी चांगले आहे. तेव्हा तर आमच्या घरी दूध भरपूर होईल.'

'पण त्याने गाईला देखील डुकराशी बदलवून टाकले.'

हे देखील चांगले झाले. तेव्हा तर आमच्यापाशी डुकराची पिल्ले रहातील, आणि घरी खाण्यासाठी मांस बाजारातून विकत घ्यावे लागणार नाही.'

'पण त्याने डुकराला मेंढराशी बदलवून घेतले.'

‘हे देखील चांगले झाले. तेव्हा तर आमच्या जवळ मेंढराची पिल्ले आणि गरम लोकर देखील राहील. मी त्यापासून कपडे तयार करीन.‘

‘पण त्याने मेंढरू हंसाशी बदलविले.'

‘ते तर फारच चांगले झाले. आमच्या जवळ हंसाची अंडी आणि त्याचे पंख रहातील.'

‘पण त्याने हंसाला कोंबडयांशी बदलवून टाकले.'

‘तेव्हा तर आणखीनच उत्तम झाले. भर दिवसा कोंबडा गीत गात जाईल. आणि आम्हाला कामावर जाण्यासाठी जागृत करीत राहील.'

‘पण त्याने कोंबडा एका रिकाम्या पिशविशी बदलविला.'

‘हे देखील चांगले आहे. तेव्हा तर आम्ही जे रुबल कमाई करून आणू ते, मी किंवा माझी मुले त्या पिशवीत जमा करीत जाऊ.'

‘पण नदी पार करण्यासाठी त्याला पिशवीदेखील द्यावी लागली.'

‘बरे झाले. पण ईश्वराची कृपा आहे ते आपल्या घरी जिवंत तरी परत आलेत.'

आता व्यापारी काय करणार होते, त्यांना मालाने भरलेल्या बारा गाड्या म्हाताऱ्यास द्याव्या लागल्यात.

(वा. रा. गाणा ‘रव’ (मूळ लेखक : प. अ. बारान्निभोव)
सोविएत संघातील लोककथा)

# ९.१६ शिकाऱ्याचे मनोराज्य

(इंडोनेशियन लोककथा)

इंडोनेशियातील पेराक शहरात आवांग दुरामान नावाचा एक तरुण शिकारी राहात असे. एके दिवशी तो भाला घेऊन शिकारीसाठी बाहेर पडला. निघताना त्याने आपली चिलीम आणि तंबाखूचा बटवा या वस्तू आठवणीने बरोबर घेतल्या होत्या.

आयांग दुरामान शहराच्या बाहेर पडून जंगलात शिरला. थोडे अंतर गेल्यावर जनावरांच्या पावलांचे माग त्याला दिसू लागले. त्या मागांच्या अनुराधाने तो सावधपणे पुढे पुढे जाऊ लागला. जंगलातले वातावरण मोठे रम्य होते. हवाही शीतल नि सुखकर होती. आयांग प्रसन्न मनाने स्वतःशी अनेक मनोराज्ये करीत चालला होता. अधूनमधून आपल्या स्नेहाळ मित्रांच्या आठवणी त्याला येत होत्या. सुंदर सुंदर मुलींच्या प्रतिमा त्याच्या नजरेसमोर उभ्या राहात होत्या. चालताना मऊ गवतावर नि पालापाचोळ्यावर त्याची पावले पडत होती नि एखाद्या गालिच्यावरून चालल्यासारखे त्याच्या पायांना सुख वाटत होते. वाटेत त्याला ठिकठिकाणी कोठे पांढरीशुभ्र तर कोठे लालभडक रंगाची सुंदर सुंदर फुले दिसली. त्याने बरीच फुले खुडली आणि काही कानावर खोचली. काहींचा गुच्छ करून हातात ठेवली. त्या रम्य जंगलात भटकताना आपल्याला शिकार करायची आहे हेही तो विसरून गेला.

आनंदाच्या अशा तंद्रीत फिरता फिरता त्याला समोर थोड्या अंतरावर एक सुंदर हरीण दिसले. आवांग चोर पावलांनी त्या हरिणाच्या जवळ गेला. हरीण स्वस्थ झोपलेले होते. त्याला आवांगच्या पावलाची जरादेखील चाहूल लागली नाही. त्या हरणाला सहज हात लावता येईल इतका जवळ जाऊन आयांग हळूच त्या हरणाच्या शेजारी बसला. तरीही ते हरिण जागे झाले नाही हे पाहून आयांगला स्वतःचा मोठा अभिमान वाटला. हातातला भाला हळूच जमिनीवर ठेवीत तो आपल्या मनाशी म्हणाला,

'वारे आयांग ! वारे बहाद्दर ! काय हुशार शिकारी आहेस तू ! हरिण खुशाल

झोपलेले आहे ! माझ्यासारखा इतका निःशब्द चालणारा शिकारी साऱ्या पेराक शहरात दुसरा कुणी असेल काय ? छे !'

हरणाजवळ बसल्यानंतर आयांगने आपल्या बटव्यातून तंबाखू काढली आणि चिलमीत भरली. विस्तव पेटवायला त्याने बटव्यातल्या दोन गारगोट्या काढल्या. ठिणगी पाडायच्या वेळेस त्याने दृष्टी टाकली आणि पाहतो तर, तात्काळ ताडताड उड्या मारीत ते पळून गेले. क्षणार्धात दिसेनासे झाले.

आवांगचे गलबत केव्हाच अदृश्य झाले होते ! समुद्र नाहीसा झाला होता, त्याची राजकुळातली पत्नी आणि गोंडस मुलगा हसन ही पण दृष्टीपुढून नष्ट झाली होती. हरण ज्या दिशेला पळाले होते तिकडे पाहात, मुठी वळून, चिडून त्या हरणाला शिव्या देत आयांग ओरडला,

'काय चोर आहे पहा ! मी क्षणापूर्वी केवढा श्रीमंत होतो ! पण या बदमाश हरणाने मला भिकारी करून टाकलं ! त्याने माझी बायको पळवली, मुलगा नेला, गलबत मारलं आणि जाता जाता माझा तंबाखूचा बटवा पण लाटला ! चोर ! डाकू ! दरोडेखोर !

क्षणभराने आयांगचा राग ओसरला. दीर्घ निःश्वास टाकून त्याने जमिनीवरचा आपला भाला उचलला आणि परत घरी जाण्यासाठी तो त्या जंगलातून मागे वळला. चालता चालता त्याचे मन पुन्हा मनोराज्य करू लागले. हरणाच्या शिंगावरचा तो बटवा पाहून जंगलातील झाडे विचारू लागतील - 'कुणाचा रे हा इतका छान छान बटवा ?' मग वारा उत्तर देईल, 'कुणाचा म्हणजे ? तो चतुर नि शूर शिकारी आवांग दुरामान नाही का ठाऊक ? त्याचा हो हा बटवा ! ' या कल्पनेवर आयांगने एक गीतच रचले आणि चालता चालता तो मोठमोठ्याने ते गीत गाऊ लागला-

वृक्ष बोलती, हा कोणाचा
सुंदर सुंदर तमाखू बटवा ?
वारा सांगे आवांगचा
बटवा नेई हरीण फसवा ! '

(विजया खांबेटे : देशोदेशीच्या लोककथा)

# ९.१७ चोरांच्या चारा गोष्टी

(अरबी लोककथा)

## थेरडी पण आहे!

एक मुलगा एकदा आपल्या घरामागच्या विहिरीत सहज वाकून पाहू लागला. विहिरीच्या स्वच्छ पाण्यात त्याला आपले प्रतिबिंब दिसले. मुलगा घाबरला. पळत पळत तो घरात आला आणि आपल्या आईला सांगू लागला,

'आई, आई ! आपल्या मागील दाराच्या विहिरीत एक चोर लपून बसलेला आहे ! '

'खरंच की काय ? ' असे म्हणत ती म्हातारी त्या मुलाबरोबर विहिरीकडे धावत गेली. दोघेजण विहिरीत वाकून पाहू लागली. आत नजर जाताक्षणीच म्हातारी एकदम ओरडून मुलाला म्हणाली,

'अरे ! खरं आहे तुझं म्हणणं ! जा, जा पळ ! शिपायाला बोलावून घेऊन ये ! एक चोर तर आहेच, आणि त्याच्याबरोबर कुणीतरी एक चोरटी थेरडी पण आहे!'

## खूण हरवली !

एका अरब चोराने एक पैशाची थैली चोरली आणि तो नजीकच्या वाळवंटात पसार झाला. दुसऱ्या दिवशी त्या वाळवंटातून तो वणवण हिंडत असलेला त्याच्या एका मित्राला दिसला. त्याने त्या चोराला विचारले,

'अरे, या वाळवंटात का भटकतो आहेस तू ?'

चोर म्हणाला, 'इथे वाळूत मी माझी पैशाची थैली पुरुन ठेवली होती. पण आता काही केल्या ती मला सापडतच नाही !

'वाळूत थैली पुरून ठेवली होतीस ?'

'पण या अफाट वाळवंटात पुरलेली थैली तुला सापडेल कशी ? जिथे थैली

पुरलीस तिथे तू काहीतरी खूण ठेवली होती का ?' यावर चोर उद्गारला,

'इतका का तू मला खुळा समजतोस ? चांगली उंटाएवढी ठसठशीत खूण ठेवूनच मी थैली पुरली होती!'

'उंटाएवढी खूण ? मग कुठे आहे ती ? '

'तीच तर आता दिसेना !'

'म्हणजे ? एवढी खूण नाहीशी कशी झाली ?'

'तेच मोठे आश्चर्य आहे'- चोर हताश स्वरात म्हणाला, 'ज्या ठिकाणी मी काल थैली पुरली त्या जागेच्या बरोब्बर वरच्या बाजूला आकाशात उंटाच्या आकाराचा भला मोठा ढग होता ! पण काय झालं कळत नाही ! तो एवढा मोठा ढगही आता कुठे दिसत नाही आणि ती थैलीही सापडत नाही !

## दूरदर्शी चोर

एक अरब मोठा धार्मिक म्हणून प्रसिद्ध होता. पण तो चोऱ्या करीत असे. एकदा एका गंध्याच्या दुकानातून त्याने कस्तुरीची डबी चोरली. पण या चोरीत तो पकडला गेला. त्याला काजीसमोर उभे करण्यात आले. काजीने त्याला विचारले,

'अरे,तू स्वतःला एवढा धार्मिक म्हणवतोस आणि अशी चोरी करण्याची दुर्बुद्धी तुला कशी काय सुचली?'

'अरब म्हणाला, एक नीतिग्रंथ वाचून ही चोरी करण्याची कल्पना मला सुचली !'

'नीतिग्रंथ वाचून ?' काजी आश्चर्याने उद्गारला, 'ते कसं काय ?'

' मी असं वाचलं.' तो अरब सांगू लागला, 'एखाद्या माणसाने जर काही वस्तू इथे या लोकात चोरली , तर परलोकात देवापुढे पापपुण्याचा निवाडा होताना ती वस्तू त्या चोराविरुद्ध साक्ष देईल आणि पुढे ती सतत त्याच्या गळ्यात बांधून ठेवली जाईल ! उदाहरणार्थ, कुणी बोकड चोरला असला तर देवापुढच्या निवाड्यात तो बोकड चोराविरुद्ध साक्ष देईल आणि नंतर तो त्याच्या गळ्यात

टांगला जाईल. अनंतकाळपर्यंत त्या चोराला त्या बोकडाचं ओझं सहन करीत राहावं लागेल. मला स्वतःला अत्तरांचा शौक आहे. तेव्हा काजीसाहेब , माझ्या असं मनात आलं की, आपण जर उत्तम कस्तुरी चोरली तर पुढे देवापुढे निवाडा झाल्यावर अनंतकाळापर्यंत आपल्या गळ्यात ती कस्तुरी टांगली जाईल ! म्हणून मी चोरी केली !'

## विचारी अरब

असाच दुसरा एक अरब मोठा विचारी होता. त्याने एक बोकड चोरला आणि घरी आणून तो मारला व चार दिवस त्याच्या सागुतीवर यथास्थित ताव मारला. त्याच्या मित्राला या चोरीची हकिगत समजली. तो त्या अरबाला म्हणाला,

'अरे, असं समज की इथे तुझी चोरी पचली, पण परलोकात अखेरचा निवाडा होईल तेव्हा बोकडाचा मालक तुझ्यावर चोरीचा आळ घेईल, त्यावेळी तू काय करशील ? '

अरब म्हणाला, ' मी चोरी चक्क नाकबूल करीन ! '

'पण त्याचा काय उपयोग ? तो बोकड तुझ्याविरुद्ध साक्ष द्यायला त्यावेळी तिथे हजर होईलच ना ?'

' मग उत्तमच झालं. अरब निश्चिंत स्वरात म्हणाला, मग मी त्या बोकडाचा कान धरून त्याला ओढीत नेईन आणि त्याच्या मूळ मालकाच्या हवाली करून टाकीन ! मग ज्याचा माल त्याला मिळाला असं होईल ! मग कुठली चोरी नि कुठलं काय ?'

(विजया खांबेटे : देशोदेशीच्या लोककथा)

# ९.१८ दोन घरचा पाहुणा

(इंडोनेशियाची लोककथा)

इंडोनेशियातील मालांग नदीच्या काठावरील एका गावात पामुडजो नावाचा एक गरीब माणूस राहात असे. त्याच गावात केरोमो नावाचा एक श्रीमंत मनुष्य नदीच्या वरच्या बाजूला राहात होता. त्याच्या मुलीचे नुकतेच लग्न झाले होते आणि त्या निमित्ताने एक दिवशी तो गावातल्या एकूण एक माणसांना जेवण देणार होता. पामुडजोने ही बातमी ऐकली, तेव्हा त्या दिवशी तो आपल्या बायकोला म्हणाला,

'बरं का ग, आज केरोमोकडे गावजेवण आहे. तिकडे मी जेवायला जाणार आहे. बऱ्याच दिवसांत मी पोटभर सुग्रास अन्न खाल्लं नाही; तू कंजूषपणाने इतकं थोडं जेवण करतेस की कधी माझं पोट भरतच नाही. आज मी केरोमोकडे जाईन आणि पोटभर मिष्टान्न खाईन.'

'होय का ! ' पामुडजोची बायको आनंदाने उद्गारली. मग छानच झालं ! नाही तरी मला मेलीला विश्रांती मिळतच नाही. दिवसभर स्वैपाक नि घरकाम करायचं आणि वर पुन्हा तुमच्या शेतात राबायचं ! तुम्ही जा केरोमोकडे ! एक दिवस तरी माझ्या मागणी कटकट टळली !'

असे म्हणून ती नवे नवे कपडे नेसली, होते ते दागिने अंगावर घातले आणि प्रसन्न मनाने आपल्या आईच्या घरी जाण्यासाठी बाहेर पडली.

पामुडजोने नंतर स्नान केले, आपला ठेवणीतला उंची झगा घातला आणि आपल्या होडीत बसून तो केरोमोच्या घरी जायला निघाला. केरोमोचे घर नदीच्या वरच्या बाजूस होते. होडी कष्टाने वल्हवीत पामुडजो जात असताना त्याला इतरही अनेक लोक होड्यांतून जाता-येतांना दिसले. सगळेजण एकमेकांना हाका मारीत होते, अभिवादन करीत होते, एकमेकांची खुशाली विचारीत होते.

पण त्यातल्या बऱ्याच होड्या नदीच्या खालच्या बाजूला जात होत्या. त्याचे पामुडजोला मोठे आश्चर्य वाटले. हे इतके लोक केरोमोकडे भोजनाला न जाता निघाले आहेत कुठे ? या कुतुहलाने त्याने उलट बाजूने निघालेल्या एका होडीवाल्याला हटकले आणि विचारले,'तुम्ही नदीच्या खालच्या बाजूला का चालला आहात?' त्यावर तो माणूस उत्तरला, म्हणजे तुम्हाला माहीत नाही वाटतं ? आज माकमूड सावकाराकडे मोठं जेवण आहे ! जे जे लोक जातील त्यांना तिथे आज चमचमीत मेजवानी मिळणार आहे ! '

पामुडजो होडी वल्हवताना मनाशी विचार करू लागला.

' माकमूड ! हा सावकार म्हणजे बडी आसामी ! त्याच्याकडे पण आज मेजवानी ! तो तर भलताच उदार माणूस आहे ! त्यांचा हात सढळ असल्याचा त्याचा लौकिक आहे. केरोमोही आज जेवण देतो आहे खरा , पण तो काही माकमूडइतका उदार नाही. माकमूडच्या जेवणात भरपूर नि छानदार पक्वान्न असतील. केरोमोकडचं जेवण त्याच्या मानाने साधं असणार ! '

असा विचार करीत त्याने आपली होडी उलट दिशेला वळवली आणि वल्हे जोराजोराने मारीत प्रवाहाबरोबर तो वेगाने जाऊ लागला. स्वतःच्या घरावरून पुढे जाताना त्याने आपल्या घराकडे नजर टाकली. घरचे रोजचे कदान्न आज आपल्याला चुकणार आणि माकमूडकडे झकास जेवण मिळणार, या आनंदात तो अधिकच जोराने वल्हे मारू लागला.

खाली जाता जाता त्याला वरच्या बाजूस जाणाऱ्या काही होड्या भेटल्या. त्यातले लोक मोठ्या आनंदाने हसतखिदळत चालले होते. त्यापैकी एकाला हाक मारून पामुडजो म्हणाला,

'काय हो ? आज एवढं विशेष काय ?'

तो माणूस होडीतून उलट दिशेने जात जात मोठ्याने म्हणाला,

'आम्ही केरोमोकडे जेवायला जातो आहोत ! आज त्याच्या घरी दहा बकरे मारले आहेत ! '

पामुडजो आपली होडी थांबवायचा प्रयत्न करू लागला, पण ती

प्रवाहाबरोबर खालीच जात होती. त्याच्या मनात विचार आला, दहा बकरे ! म्हणजे करोमोने खूपच खर्च करून भली मोठी मेजवानी द्यायचं ठरवलेलं दिसतं ! माकमूडच्या मेजवानीपेक्षा आपल्या घरचं जेवण अधिक गाजलं पाहिजे, असा केरोमोचा विचार असावा. दहा बकरे ! वाः ! माकमूडने फार तर चार पाच बकरी मारली असतील ! छेः छेः आपण केरोमोकडे जात होतो तेच बरोबर होते !

असा विचार येऊन पामुडजोने बराच प्रयत्न करुन होडी उलट वळवली आणि तो पुन्हा वरच्या बाजूस जाऊ लागला. परत वाटेत त्याला स्वतःचे घर दिसले. परत घरचे कदान्न आणि केरोमोकडचे मटणाचे जेवण यांची तुलना मनात येऊन त्याच्या तोंडाला पाणी सुटले. तो जोरजोराने होडी वल्हवू लागला. त्याला समोरून एक ओळखीचा होडीवाला उलट दिशेने जाताना दिसला. त्याने ओरडून विचारले,

'काय हो ! वरती कुठे जाताहाता तुम्ही ?'

'कुठे म्हणजे ? पामुडजो मोठ्याने उत्तरला, केरोमेकडे मेजवानीला जातो आहे मी ! तुम्ही येत नाही ?'

'नाही -' तो माणूस प्रवाहाबरोबर वेगाने होडी नेत ओरडला, माकमूडकडे जेवण आहे आणि वर प्रत्येकाला दहा रुपये दक्षिणा म्हणून वाटणार आहे !'

पामूडजो चपापला. त्याच्या मनात विचार आला, 'काय ? माकमूड दहादहा रुपये वाटणार ! मघाशी मी मनात म्हटलं तेच खरं ! तो केरोमोपेक्षा उदार आहे. छेः! केरोमोकडे नुसतं जेवायला जाण्यात काय अर्थ आहे ? माकमूडकडेच जाऊ या ! जेवणचं जेवण नि वर दहा रुपये दक्षिणा !'

असे म्हणता त्याने आपली होडी पुन्हा वळवली आणि तो परत खालच्या बाजूला जाऊ लागला. पुन्हा वाटेत त्याला आपले घर दिसले. 'चमचमीत जेवून वर पैसे घेऊन येणार मी घरी' असा प्रसन्न विचार करीत त्याने होडीला वेग दिला.

बऱ्याच वेळाने तो माकमूडच्या घरापाशी आला. नदीकाठी पुष्कळ होड्या तरंगत होत्या. आपली होडी काठाला लावायला त्याला बराच वेळ लागला.

कारण सोयीच्या सगळ्या जागा इतर होड्यांनी व्यापल्या होत्या. कशीबशी एक जागा मिळवून त्याने तिथे होडी बांधून ठेवली आणि तो घाईघाईने माकमूडच्या घराकडे निघाला. वाटेत त्याला एक माणूस भेटला तो आपल्या पोटावर हात फिरवीत म्हणाला,

'काय रे ? मामूडकडे जेवायला चाललास की काय ? '

पामुडजोने होकारार्थी मान डोलावली. त्यावर तो माणूस हसून म्हणाला, 'आता जाऊन काय उपयोग ? जेवणं केव्हाच आटोपली !'

'आटोपली ? ' सखेद स्वरात पामुडजो उद्गारला, 'पण निदान पैसे तरी वाटीत असेल ना तो ?'

'छे ! पैसे पण वाटून झाले आणि लोक घरोघर परतले सुद्धा ! माकमूडने आपल्या घराचे दरवाजे पण बंद केले !'

समोरून बरेच लोक गप्पा मारीत आपापल्या होड्यांकडे परत येताना पामुडजोला दिसले !

'अरेरे ! घात झाला ! असे पुटपुटून तो क्षणभर स्तब्ध राहिला आणि मग पळत आपल्या होडीकडे गेला. होडीत उडी मारून त्याने ती सोडली आणि जोरजोराने वल्ही मारीत तो केरोमोच्या घराकडे जायला निघाला, तिथे पोचल्यावर त्याने काठाला होडी लावली, बांधली आणि धक्क्यावर उडी मारून तो केरोमोच्या घराकडे धावत निघाला. वाटेत त्याचा एक मित्र त्याला भेटला, तो म्हणाला,

'कुठे पळत निघालास तू ?

'केरोमोकडे ! जेवायला !'

'आता पळून काय उपयोग ? जेवणं केव्हाच आटोपली ! सगळं अन्न संपलं. दहाचे दहा बोकडे पंक्तीत खलास झाले ! नोकरांनी जागासुद्धा साफ केली आणि दरवाजे लावून घेतले ! '

पामुडजो निराश होऊन आपल्या होडीकडे परतला. हळूहळू होडी वल्हवीत तो आपल्या घरापाशी आला. घरी पोचल्यावर त्याने बायकोला हाक मारली.

पण ती अजून माहेराहून परत आली नव्हती. घरात जाऊन त्याने स्वैपाकघरात शोधाशोध केली. ती करताना तो चिडखोर स्वरात चडफडत होता - 'उठल्या सुटल्या हिला माहेरी जायला पाहिजे ! नवऱ्याची मुळी काळजीच नाही कणभरसुद्धा !'

बराच वेळ शोधल्यावर त्याला एक लहानसा सुका मासा आणि थोडीच दारू शिल्लक असलेली एक बाटली मिळाली. त्याला सडकून भूक लागली होती. पण उपाय नव्हता. 'होडीत बसून खाऊ या हे असा विचार करुन तो आपल्या होडीकडे गेला. होडीत चढताना त्याने बाटली होडीच्या काठावर ठेवली आणि तो आता चढणार, इतक्यात त्याचा लाडका कुत्रा धावत मागून आला आणि त्याने होडीत उडी घेतली. त्याचा धक्का लागून बाटली नदीत पडली. कुत्र्याला शिव्या देत पामुडजोने मासा होडीत टाकला आणि बाटली काढण्यासाठी नदीत बुडी घेतली. पण बाटली प्रवाहाबरोबर वाहत गेली होती. ती त्याला सापडली नाही. मग वर येऊन तो होडीत चढला आणि मासा शोधू लागला. पण मासा कुठे दिसेना ! तो कुत्रा मात्र जिभल्या चाटीत आनंदाने शेपटी हालवीत बसला होता !

(विजया खांबेटे : देशोदेशीच्या रंजक लोककथा)

# ९.१९ भाग्यवंत

जुन्या काळची गोष्ट ! एक छोटेसे संस्थान होते. तेथला राजाही आपला छोट्या सैन्याचा अन् बेताच्या ताकदीचा होता. जगात नेहमी लहानांना मोठयांपासून त्रास होत असतो. शेजारच्या एका बलाढ्य राजाची नजर या संस्थानाकडे वळली. ही नजर साधी नव्हती, झेप घालून चिमणीपाखरं उचलून नेणाऱ्या घारीचीच नजर ती ! त्याने या संस्थानांवर हल्ला केला. संस्थानचा खजिना चांगला भरपूर होता. तो लुटला, सैन्याचा फ डशा पाडला व तो बलाढ्य राजा चालता झाला. बापडा धाकटा संस्थानिक ! त्याच्याजवळ आता सैन्यबळ नव्हते, की पैसा नव्हता. ही स्थिती सुधारायची तरी कशी ? अखेर त्याला एक युक्ती सुचली. त्याने आपल्या संस्थानात चहूकडे दवंडी पिटवली की, यावेळी त्याचे राज्य संकटात आहे, राष्ट्रभक्त लोकांनी जमेल ते साहाय्य केले पाहिजे, शक्य तर सैन्यात भरती व्हावे ; नाहीतर पैसा, धन, काही असल्यास आम्हाला कर्जाऊ द्यावे देशासाठी; पण सगळ्यांनी मिळून देशाची ही दुर्दशा दूर केली पाहिजे. ज्याला राजसेवेची इच्छा असेल, त्याने मला येऊन भेटावे.

त्या छोट्या देशाच्या टोकाला एक म्हातारा सरदार राहात होता. सरदार म्हणायचा, पण तोही एक,सर्वस्व गेलेला एक गरीब मनुष्यच होता. त्याला राजसेवेची इच्छा फार होती; पण त्याच्या जवळ शक्ती ना पैसा ! काय करायचं ? त्याला मुलगाही नव्हता सैन्यात पाठवायला. आपल्या राजासाठी काही करावेसे वाटले तरी उपयोग काय ? असे मनात येऊन म्हाताऱ्याच्या डोळ्यांत पाणी आले. ते पाहून त्याच्या तीन तरुण मुली म्हणाल्या 'आम्ही मुलगे नसलो तरी करू की काय जमेल ते राजासाठी अन् देशासाठी !! '

*

मग मोठी पहिल्यांदा पुरुषवेषाने निघाली. ' मी राजाची चाकरी करीन, बाबा'

असे तिने बोलून दाखवले होते. एकदोन गावे ओलांडली तोवर तिने एक म्हातारी पाहिली- हीऽऽ पुष्कळशी मेंढरे राखीत होती ती.तेवढ्यात तिचे एक कोकरू दलदलीत बुडू लागले. ती ओरडली - 'अहो सरदार, मला मदत करा जरा, देव तुमचं भलं करील-इकडे या कोकरू काढा बरं हे वर ? '

त्यावर ऐटीत मुलगी म्हणाली, 'अरे हुडूत ! वाटेत थांबायला आम्हा सरदारांना वेळ असतो काय ? जा जा इथून मी नाही मदत करीत बाबा'

म्हातारी हसली नि म्हणाली -

'ठीक आहे पोरी नको थांबूस. '

आँ ? काय म्हणाली ती मला पोरी ? त्या क्षुद्र म्हातारीनेही आपले वेषांतर ओळखले, तिथे आपण कसल्या पुरुषवेषाने दरबाराला नि राजाला फसवणार? मनात खट्टू होऊन मोठी मुलगी परत आली. दुसरीचीही तीच तऱ्हा झाली. मग निघाली धाकटी. मोठी चतुर अन् मदतशील स्वभावाची. तिलाही वाटेत तीच म्हातारी भेटली व तेच कोकरू ! म्हातारी म्हणाली, 'छोटे सरदार, माझं कोकरू चिखलात बुडून राह्यलं; काढू लागता का वर ? ' तशी 'छोटे सरदार' हो म्हणाले व चटकन पुढे होऊन आले ! म्हातारी हसली नि म्हणाली -

' मुली, मी तुझेही वेषांतर ओळखले; पण मी तुझे उपकार फे डीन म्हणते. मी साधी म्हातारी नव्हे, परी आहे एक. तुझं वेषांतर कुणाला ओळखू येणार नाही असा मी वर देते तुला,अन् हे कसलं ग तुझं लंगडं घोडं ? यावर बसून का लढाईला जाणार का तू ? भलतंच ! ही बघ गंमत. '

तिने जमिनीला आपल्या कांडीने स्पर्श केला आणि काय नवल ? जमिनीतून एक घोडा वर आला. उंच,सुरेख अन् लढाऊ. म्हातारी म्हणाली, 'याचं नाव मोती- मोत्यासारखाच अमोल आहे हा. आठ दिवसांतून एकदाच खातो अन् याला जगातलं सारं काही कळतं अन् भविष्यही दिसतं. शिवाय हा बोलतोसुद्धा. याचा सल्ला घेत जा नेहमी, भाग्यवन्त'

'भाग्यवंत ? मी'

'तर ? मुला पुरुषाचं नाव हवंच एखादं ; ते मी दिलंय. कारण पुढे तू भाग्यवंत

ठरणारच आहेस. जा आता, विजयी हो. '

त्या उंची घोड्यावर बसून, तिसरी मुलगी अथवा भाग्यवंत निघाली.

*

वाटेत त्याला विचित्र गुणांची काही माणसं भेटली. काय एकेकाचे वेगळे सामर्थ्य ? एक खूप खादाड होता. दोन-चारशे लोकांचे अन्न एकटाच फस्त करील, तेव्हा कुठे त्याचं पोट भरायचं ! दुसरा याचा सोबती होता, तो जन्माचा तहानलेलाच ! कितीही पाणी प्या, समाधान म्हणून कसं ते नाहीच ! पाणी पिऊन पिऊन नदीसुद्धा कोरडी करील, अशी त्याची हिंमत होती. तिसऱ्याला हजार -पाचशे मैलांवरचं देखील दिसायचं. इतकंच नव्हे तर दुरुन अचूक तीर मारता यायचा ; खादाड, तान्हेला व हा शिकारी यांना नोकरीस ठेवून घ्या, म्हणून मोतीने सल्ला दिला व ते भाग्यवंताने मान्य केलं. मग ते चौघं पुढं चालू लागले. तो त्यांना आणखी एक माणूस भेटला. जगातला वाटेल तो आवाज जमिनीला कान लावला की त्याला ऐकू येई. मग भेटला वारोबा ! हा नुस्त्या आपल्या श्वासाचा वाराही, इतक्या जोराने वाहवीत असे, की त्यावर मोठमोठ्या पवनचक्क्याही चालायच्या ! शेवटी भाग्यवंतला एक रुंद पाठीचा माणूस ठेटला. त्याच्या पाठीवर वाटेल तेवढं ओझं ठेवा. तो खुशाल मजेत वाहून न्यायचा. त्याचं नाव भाग्यवंताने 'लोहपाठ' असंच ठेवलं. आता हे सहा विलक्षण लोक, शिवाय तो बोलका अद्भुत घोडा, असं सैन्य घेऊन भाग्यवंत एकदाचा राजदरबारी आला व त्याची तरतरीत चलाख मुद्रा पाहून राजाने त्याला लगेच नोकरीही दिली. हळूहळू राजाला तो फारच आवडू लागला. बोलणे गोड व समयसूचक, वागणे धोरणी, स्वभाव चांगला व दिसायला रुबाबदार असा माणूस कुणाला आवडणार नाही ? पण यातूनच एक संकट उद्भवले. राजाची तरुण पण विधवा अशी एक बहीण होती. हा तिच्याही फार मनात भरला. तिचे याच्यावर मन जडले. व अखेर तिने ' माझ्याशी आपण लग्न करावे.' म्हणून भाग्यवंताची प्रार्थना केली. आता बघा तुम्हीच. भाग्यवंत म्हणजे खरोखरी एक स्त्रीच होती, अन् बाईचं बाईशी लग्न होतं का कधी ? अर्थात तो म्हणाला-

’क्षमा करा, मला लग्न करायचं नाही तुमच्याशी, आणि मग ती चिडली. इतकी चिडली की याला ठारच मारलं पाहिजे. असं तिच्या मनानं घेतलं ! किती हा दुष्टपणा ! पण हे संकट आभाळातून वीज पडावी तसं बापड्या भाग्यवंतावर अचानक येऊन आदळत होते खरेच. ती बाई वाटच पहात होती या भाग्यवंताला ठार मारायची संधी केव्हा मिळते ते. विनाकारण एक प्रबल शत्रू उत्पन्न झाला होता त्याला.

अन् भाग्यवंताचे दुर्दैव असं की, राजभगिनीला हवी ती संधी अगदी लवकरच चालून आली. राज्यात एक मोठा जलाशय होता व तेथून बातम्या येत होत्या, की एक भयंकर जलचर त्यातून रोज बाहेर येऊन लोकांचा आणि गुरांचा फन्ना उडवीत आहे म्हणून. खेडूत,तलावाकाठी राहणारे मच्छीमार , मुले, लहान मोठे पाळीव पशू,सगळ्यांवर फार मोठे अरिष्ट कोसळले होते. आज काय त्याने पाच पोरे पळवली, उद्या दोन बैल गट्ट केले, तर परवा एक नाव उपडी करुन नावाडीच मारले, असे रोज ऐकू येऊ लागले. राजा फार चिंतेत होता. प्रजेवरचं संकट म्हणजे राजाच्या जिवाला काळजी लागणारच. राजा खाईना, पिईना. डोके धरून बसून राहिला. कसं त्या प्रचंड जनावराचं पारिपत्य करावं ? त्याला काही समजेना !

राजाची बहीण गोड स्वरात म्हणाली-

’एवढी काय काळजी करता दादा ? ते नवे सरदार भाग्यवंत मोठे शूर नि वीर आहेत म्हणतात, त्यांना पाठवा या मोहिमेवर ! ते सहज ठार करून येतील त्या प्राण्याला. मोठे बहादूर आहेत, राजालाही ते पटलं; पण भाग्यवंताला मात्र ते ऐकून पार खचल्यासारखे झाले ! तो कोण प्रचंड सुसर-मगरीसारखा प्राणी त्याच्याशी मी बाईमाणसाने कशी टक्कर द्यावी ? पण घोडा हळूच जवळ येऊन म्हणाला,

’धनी,हे काम घ्या अन् चला उद्याच. मी बरोबर आहे ना ? आणि तुमचे विचित्र मित्रही घ्यायचे बरोबर, राजाला विचारा. निघूया आपण. भिऊ नका; विजय तुमचाच आहे. ’ आणि मग भाग्यवंत ते सहाजण व घोडा असे सारे तिकडे

निघाले. राजाची बहीण आनंदाने मनात म्हणाली -

'मर मेल्या आता त्या मगरीकडून ! मला बायको करून घ्यायला नको म्हणालास, घे त्याचं हे फळ. '

*

ते गाव बरेच दूर. वाटेत इतक्या नद्या नि तळी होती, की ती पार करणं अवघडच; शिवाय यांच्याबरोबर, घर खाऊन दार तोंडी लावणारा तो खादाड माणूस होता, त्याला रोज फराळाला किती नि काय द्यायचं ? मोठी चिंता पडली होती भाग्यवंताला, पण त्या सैन्यातला तहानलेल्यानेच हा प्रश्न सोडवला. तो तळेच्या तळे पाणी पिऊन कोरडे करी ! मग तेथले वाटेल तितके मासे 'शिकारी' पकडून सर्वांचे जेवण होई; अगदी त्या खादाडपंतोचेसुद्धा ! दूर हरणाचा कळप चाललेला दिसला रे दिसला, की सुकर्णाने चाहूल ऐकावी, शिकाऱ्याने नेम मारावे, वेगवंताने पळत जाऊन शिकार आणावी, व लोहपाठानं सगळ्यांचे सामान मजेने पाठीवरून वाहून न्यावे ! अशा तऱ्हेने प्रवास करीत एक दिवस ते त्या जलराक्षसाच्या ठिकाणाजवळ येऊन पोहोचले. घोडा म्हणाला -

'धनी ! आता मी सांगेन तसंच करायचं हं ! त्या पहा दुरुन किंकाळ्या ऐकू येतात, बहुतेक तो राक्षस माणसं मारून खात असेल. सुकर्णा, तू सांग बरं इथून किती दूर आहे तो राक्षस ? '

सुकर्णाने जमिनीला कान लावून म्हटले. 'सात कोस इथून ! '

ठीक तान्हेल्या, तू वाटेतल्या तलावांचं पाणी पिऊन ते कोरडे कर पाहू, आणखी लोहपाठ, आपण तुझ्या पाठीवरून ती चारशे-पाचशे पिंपे दारू आणली आहे ना, ती त्या तळ्याच्या खळग्यात ओतून ठेव. आता शिकारी बुवा, यानंतर तुमचं काम. शंभर ससे अन् पन्नास हरणं मारून आणा आणि त्याचा अतिशय चवदार रस्सा बनवा. सगळे मिळून आटपा झटपट.'

ही सगळी व्यवस्था भाग्यवंताने आपल्या देखरेखीखाली लौकर करवून घेतली. तो राक्षस, जलसर्पाच्या प्रचंड देहाचा होता. त्याच्या वाटेवरच हा रस्सा व थोडी दारू ठेवण्यात आली होती. तिच्या वासाने तो पुढे पुढे येऊ लागला, तर

वाटेत मारलेली लूसलुशीत ससे-हरणे ! सुपारीच्या खांडासारखे ते खाद्य चघळीत तो पुढे पुढे सरसरत तळ्याजवळ आला व तो बेफाम रस्सा आणि ती दारू, दोन्हीही त्याने प्यायला सुरुवात केली. महासर्प झाला तरी काय झालं ? सुग्रास पोटभर अन्नाने सुस्ती ही येणारच, दारुने बेहोषीही येणारच ! अरे वा ! तळ्याजवळच तो प्रचंड जलचर डोळे मिटून गाढ झोपी गेला अखेर. तुम्हीच सांगा, झोपलेल्याला ठार मारणं अवघड थोडंच ? भाग्यवंताने एका सपाट्यात त्याचे डोके उडवले व विजयाने ते सारेजण घरी परत आले.

राजाला खूपखूप आनंद झाला. पण ती खट्याळ बहीण ? ती जळफळू लागली ! काय बाई तरी लोचट माणूस हा ? मरता मरत नाही. तिला परत एक युक्ती सुचली. राजाचा खजिना पूर्वी मोठा भरलेला होता. तो त्या शेजारच्या बलाढ्य राजाने जिंकला होता. तो आणायलाच त्या भाग्यवंताला पाठवले तर कसे काय ? नाहीतरी सध्या राजाजवळ खजिन्यात खडखडाटच आहे मोहरांचा. मीच सुचविते दादाला. जाऊ दे या घमेंडखोर भाग्याला तिकडे अन् मार खाऊन येऊ दे रडत परत. नाहीतर मरुदे. हा विचार तिने भावाला म्हणजे राजाला, गोड गोड बोलून तो पटवला, व म्हणाली-

'दादा, ते भाग्यवंत ? त्यांना म्हणावं खजिना आणा परत नाहीतर देहान्ताची शिक्षा ! बरे, ते तिकडेच मेले, तरी कुठे बिघडले ? स्वामी-कार्यात मरण म्हणजे भाग्यच की ! त्यांच्याइतके शूर सरदार पदरी अन् खजिना मोकळा कसा राहू देता ? '

राजालाही तो विचार पसंत पडला व भाग्यवंताला हे नवे काम सांगण्यात आले ! झालं का ? आता काय करायचं ? त्याचा चेहरा उतरला. त्या बलाढ्य राजाकडून खजिना आणायचा म्हणजे मगरीच्या दाढेतून माणिक काढून आणण्यासारखे काम !

पण बोलका घोडा म्हणाला- 'ऊं ! त्यात कसली चिंता ? उलट यातूनच तुमचं कल्याण होणाराय. चला मला व या मित्रमंडळींना साऱ्यांना घेऊन तिकडेच. ' ते राजधानीत येऊन पोहोचले.

तेथे पोचल्यावर प्रथम हात जोडून भाग्यवंत त्या राजाला म्हणाला-

'महाराज,शेजारच्या छोट्या राजाचा खजिना आपण उगीचच काढून घेतला, हे योग्य नव्हे, ते फार अडचणीत आहेत. म्हणून मी तो खजिना कृपेने परत द्यावा अशी विनंती करतो. 'ते ऐकून महाराज मजेने हसूच लागले. मग म्हणाले, 'वाहवा ! इतकी मूर्खपणाची विनंती मला अद्याप कोणीही केली नव्हती. बाबा, असा मागून खजिना मिळत असतो होय रे पोरा ? आँ ? '

'आपण दिल्यास तो मिळेल ! ' धीराने भाग्यवंत म्हणाला. तसे महाराज म्हणाले, 'आता मलाही, मूर्खपणाचीच उत्तरे द्यावीशी वाटतात तुझ्या या मूर्ख बोलण्याला. हे बघ, आमच्या राज्यात एका दिवसात तयार होणारे सगळेच्या सगळे रोट जर एका घटकेत कोणी तुझा नोकर खाऊन दाखवील, तर देईन खजिना परत ! हे न जमले तर असं कर, आमच्या या राजधानीत आज जेवढी तयार दारू असेल ती एकाच वेळी पिऊन दाखवणारा माणूस आण, तर देईन खजिना बरं का बाळ तुला ? जा लाग कामाला पोरा. '

लोक हसू लागले व महाराज थट्टेने बोलू लागले; पण ही थट्टा खरी होणार होती. भाग्यवंताने खूण करताच वीसपंचवीस गाड्या भरून आलेले सारे जाड रोट ऊर्फ रोट्या खादाडाने मजेने फस्त केल्या, व तान्हेल्याने वीस पिंपे दारू आरामात पिऊन घेतली. मग खादाड म्हणाला,

'आज कुठे जरा बरी न्याहारी मिळाली इतके दिवसात ! अन् तान्हेला म्हणाला 'आत्ता कुठं बरं वाटलं आपल्याला ! ' पण राजाला हे पाहून राग आला तो म्हणाला. 'हुडूत् ! मी ते सहज मजेने म्हणालो; पण असल्या क्षुद्र अटीवर एवढा मोठा खजिना द्यायचा ? माझ्या बापाच्याने ते होणार नाही. तू असं कर. माझी मुलगी फार जलद पळते. वाऱ्याला पण मागे टाकते, तिच्याशी शर्यत लावू. तुझा कोणी माणूस जिंकू दे. मग देईन खजिना. कबूल ? '

'कबूल,' भाग्यवंत म्हणाला व त्याने वेगवंताला खूण केली व शर्यत सुरू झाली; पण ती राजकन्या मोठी लबाड. तिने शर्यतीपूर्वी एक पेलाभर पाणी मागितले प्यायला. तशी वेगवंतानेही मागितले. तर हिने खूण करुन त्याच्या

पेल्यात गुंगीचे औषध टाकले. बघता बघता वेगवंत थांबला व एका झाडाखाली बसून गाढ झोपी गेला. ती बऱ्याच मैलांची शर्यत, राजकन्या अर्धा रस्ता ओलांडून गेली तरी हा आपला घोरतोच आहे !

तेवढ्यात दुरून तिकडे डोळा लावून शिकारी म्हणाला, 'धनी आपला वेगवंत वाटेतच झोपला की ! आता कसं करायचं ? '

सुकर्ण जमिनीला कान लावून म्हणाला, 'केवढ्यांदा घोरतोय ! चौदा मैल दूर आहे तरी आवाज ऐकू येतो. आता कसं ? मोती म्हणाला, ' मी सांगतो काय ते शिकारी , बाण मारा एक त्याला असा, की त्याला फ क्त जाग यावी,जखम होऊ नये ! शिकाऱ्याने चातुर्याने बाण मारला तो त्याच्या दाढीत ! तो जागा झाला पाहतो तर राजकन्या शर्यत जिंकण्याचा रंग दिसतोय ? रागारागाने त्याने चार पाच उड्या घेतल्या व तिला मागे टाकून ती शर्यत त्याने जिंकली.

आता मात्र राजा भयंकर संतापून म्हणाला- 'छे, छे,छे ! काय तुझी ही विचित्र अन् जंगली माणसं ? मला नाही आणखी काही परीक्षा घ्यायची. पण मी शब्द पाळणारा आहे. तो खजिना एकाच माणसाने पाठीवर वाहून न्यावा ! तेवढाच काय तो ऐवज मी देईन, घे अन् हो चालता. '

वा, आता तर लोहपाठालाही आवडते काम मिळाले ! त्याने सोन्याच्या चिपा, मोहरांच्या थैल्याच्या थैल्या, चांदीचे वार, जडजवाहिराच्या पेट्या,सुवर्णाचे पलंग व आरसे, चांदीचे चौरंग, देव्हारे असे कितीतरी सामान पाठीवर उचलले. उंची शेले, शालू, पैठण्या, राजाचे दागिने यांचेही एक कपाट तेथे होतेच तेही उंचलले व तो बलाढ्य राजा तोंडात बोट घालून नवलाने बघतो तोवर ते सगळे चालते देखील झाले ! भाग्यवंताने गेलेला सारा खजिना मिळवून आणला.

*

भाग्यवंताच्या देशाच्या राजाने हे पाहिले. सारा खजिना परत आला ? सैन्य नसताना युद्ध न करताना परत मिळाला ? त्याला एवढा आनंद झाला, की त्याने भाग्यवंताला घट्ट मिठीच मारली ! भाग्यवंतालाही -म्हणजे आपल्या

भाग्यवतीला, राजा फार आवडला होता व उद्या त्याला सारं खरं सांगून त्याचा निरोप घ्यायचा असा त्याने मनात बेत केलाही होता. तेवढ्यात राजाची बहीण म्हणाले,

'आता तरी माझ्याशी लग्न कराल कां ? '

'नाही ! माझे लग्न दुसऱ्याशी ठरले आहे. माफ करा.' भाग्यवंत म्हणाला, तशी त्या खट्याळ बहिणाबाईने भावाला सांगितलं.

'दादा, हा मेला भाग्या मोठा अभागीच आहे. मला पलंगासकट पळवून नेण्यासाठी त्याने त्या दगडी पाठवाल्याला सांगितलं होते ! याला शिक्षा झालीच पाहिजे नाहीतर मी जीव देणार. तो जुलमाने माझ्याशी लग्न करणार होता ! आमचा असा अपमान ? '

राजाला खरे म्हणजे भाग्यवंत फार आवडू लागला होता; पण हे ऐकताच त्याला संताप आला. माझ्या बहिणीचा अपमान करून पळवून नेतो काय तो हरामखोर ? त्याला उघडे करुन फटके मारा. राजा ओरडला; पण लगेच भाग्यवंताने पुरुषाचा वेष काढून फे कून दिला व म्हटले.

' महाराज मीही पण एक स्त्रीच आहे. मी तुमच्या बहिणीला कशाला पळवून नेऊ ? एक मुलगी कधी दुसऱ्या मुलीशी लग्न करायला उभी राहील का, पहा आपणच. मी तर तुमच्या वीरसेन वृद्ध सरदारांची मुलगी आहे. ते पहा माझे वडील तुमची सेवा करायला आले आहेत. आता मला निरोप द्यावा.'

आपण भाग्यवंतावर घेतलेले कुभांड असे खोटे झालेले पाहून त्या खट्याळ बहिणीचे तोंड काळेच पडले व तेथून काळे केले कुठेतरी तिने, पण मग खुद्द राजा म्हणाला.

'बरं तर भाग्यवंत नव्हे, नव्हे भाग्यवती तू माझ्याशी लग्न करशील का ? या देशाची तू राणी हो, आहे पसंत ? मला तू आवडली आहेस फार.'

ती हो म्हणाली व ते लग्न झाले. मग भाग्यवती, तिचे ते विचित्र सोबती अन् मोती घोडा सगळेच आनंदाने राहू लागले. हे सांगायला नकोच !

# ९.२० एक जुनी कोकणी गीतकथा

आंबा जो कोंवळा
त्याचा मोहोर पिकला
त्या मोहोराचे मी
लोणचे घातले
ते मी लोणचे
दिराला वाढले
दिराने मला
चुडे ते दिले
ते मी चुडे
खेळतां वाढवले
सासूने मला
धपाटे दिले
त्यामुळे माझी
आसुवें गळाले
ती मी आसुवें
तांब्यांत भरीलीं
तो मी तांब्या
गंगेत सोडीला
गंगेनं मला
उदक ते दिले
तें मी उदक
कुडाला पाजीलें
कुडान् मला
काठी ती दिली
ती मी काठी
बुरडाला दिली
बुरडानं माला
परडी ती दिलन्
ती मी परडी
माळ्याला दिली
माळ्यान् मला
फुलें ती दिली
ती मी फुलें
ईश्वरा पार्वतीच्या
चरणी अर्पण केली
इटुकली मिटुकली
गोष्ट सरो
तुमचे आमचे
पोट भरो

(शंकर गणेश दाते : लोककथा)

# संदर्भ सूची


१. आपटे वा. गो. (१९०९) : बालभागवत, पुणे : आनंद

२. आंबेकर बापूजी त्र्यंबक (१९४४) : हितोपदेश (भाषांतर), पुणे : चित्रशाळा प्रकाशन

३. आंबेकर बापूजी त्र्यंबक (१९४९) : पंचतंत्र, पुणे : चित्रशाळा प्र. ४ थी आ.

४. उजंबळेकर कृष्ण मुकुंद (१९५९) : राजा कुबेर, नागपूर : कालिंदी प्रकाशन.

५. कानिटकर बा. मो (१९४९) : माझी इसापनीती, पुणे : सिटी बुक स्टॉल.

६. कालेलकर गोविंद मंगेश (१९३४ ) : लौकिक दंतकथा, बडोदे : श्रीसयाजी ग्रंथमाला, पुनर्मुद्रण, शब्दालय, श्रीरामपूर.

७. कुलकर्णी श्री. रं. (१९९१) : प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा, पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस

८. केतकर शशिकांत (१९७८) :चीनमधला वैद्य आणि इतर गोष्टी, पुणे : अनमोल प्रकाशन.

९. कोसंबी धर्मानंद (१९७८): जातककथासंग्रह, भाग १ ते ३, मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

१०. कोळेकर वैदेही ( ) : मराठी लोककथा : स्वरूपमीमांसा, औरंगाबाद : सविता प्रकाशन.

११. खांबेटे विजया ( ) : देशोदेशीच्या लोककथा, शब्दाली प्रकाशन.

१२. गडकरी राम गणेश (१९१०) : चिमुकली इसापनीती, पुणे : हनुमान.

१३. गवाणकर वि. स. (१९४१) : रामायण-महाभारतातील सुरस गोष्टी, मंबई : न्यू भारत.

१४. गाडगीळ दिगंबर (२००६) : थोडीशी गंमत, तरुण भारत, वर्षभरात प्रसिद्ध झालेल्या देशविदेशातील लोककथा.

१५. घोलप मधुकर सदाशिव (१९६८): तेनालीराम यांच्या चातुर्यकथा, पुणे : सुनंदा साहित्य.
१६. चिपळूणकर कृष्णशास्त्री (१८९०) : अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, पुणे : चित्रशाळा प्रकाशन.
१७. छत्रे सदाशिव काशिनाथ (१९४३) : वेताळपंचविशी, मुंबई : द. वि. पाठक, १२ वी आ.
१८. जोशी अनंत काशिनाथ (१९६८) : सिंहासनबत्तीशी, पुणे : रम्यकथा.
१९. जोशी चिंतामण विनायक (२००८) : जातकांतील निवडक गोष्टी, श्रीरामपूर : शब्दालय प्रकाशन.
२०. जोशी प्रभाकर शंकर (१९६३) : कथासरित्सागर, मुंबई : व्होरा आणि कं.
२१. जोशी विनायक वासुदेव (१९५८): चंद्रपुरी लोककथा, मुंबई : ढवळे पॉप्युलर.
२२. जोशी विनायक वासुदेव (१९३६): लोककथा व लोकगीते, नागपूर : सुविचार प्रकाशन.
२३. ढेरे रा. चिं.; भावे ह. अ. (१९७६): वेताळपंचविशी, पुणे : वरदा बुक्स.
२४. दाते शंकर गणेश (१९५५) : लोककथा , मुंबई : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय.
२५. दास गोपाल (२००५) : निर्बुद्धीचा राज्यकारभार, दिल्ली : साहित्य अकादेमी.
२६. दांडेकर मालती (१९७७) : केशरपुष्प, मुंबई : सौमय्या पब्लिकेशन्स.
२७. दांडेकर मालती (१९८२) : अतिपूर्वेकडील लोककथा (व्हिएतनाम, थायलंड,इंडोनिशिया, मलेशिया, जपान, ब्रह्मदेश), पुणे : वरदा बुक्स.
२८. देखणे रामचंद्र (१९९८): साठवणीच्या गोष्टी, पुणे : पद्मगंधा प्रकाशन.
२९. देव शंकरराव (१९८८): उपनिषदातील दहा गोष्टी, पुणे : सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट.
३०. देवळे शंभुराव रामचंद्र (१९७०) : रामायण आणि महाभारत यांतील बालकथा

३१. देसाई प. स. (१९२७) : रामकृष्ण कथामंजुषा, मुंबई : गणेश महादेव आणि कं.

३२. धर्माधिकारी भाऊ (१९९५): देशोदेशीच्या लोककथा, भाग १ ते १२, पुणे : उन्मेष प्रकाशन.

३३. निक ग्रीव्हज् (२०१३ ) : झाडावर चढणारा कोल्हा आणि आफ्रिकेतील इतर प्राणिकथा, ५ वी आ.

a. अनुवाद : व्यंकटेश माडगूळकर. दिल्ली : नॅशनल बुक ट्रस्ट

३४. नेरुरकर प्र. श्री. (१९७६) : मॉरिशसच्या लोककथा, मुंबई : राजा प्रकाशन.

३५. पाटील सुनंदा (२०१०) : तापीकाठच्या गोष्टी, नाशिक : ब्रेनटॉनिक प्रकाशन.

३६. पाठक बा. ल. (१९६३) : बिरबल आणि बादशहाच्या गोष्टी, भाग १ ते ४, मुंबई : बा. ल. पाठक.

३७. पाबळकर कृ. ना. (१९११) : पुराणातील मौजेच्या गोष्टी, मुंबई : पाठक.

३८. पायगावकर सुमती (१९६३) : हॅन्स अण्डरसनच्या गोष्टी, पुणे : व्हीनस प्रकाशन.

३९. प्रभुणे अरुण (२००६) :नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या अस्ललोककथा , पुणे : पद्मगंधा प्रकाशन.

४०. फडके वि. के. (१९८७) : निवडक अरेबियन नाईटस, पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.

४१. बर्वे द. के. (१९४९) : परदेशी मेवा, पुणे : लोकसंग्र छापखाना .

४२. बाबर सोजिनी (संपा.) : सांगीवांगी, मुंबई : महाराष्ट्र शासन , शिक्षण विभाग.

४३. बाबर सरोजिनी (संपा.) (१९९०) : दसरा-दिवाळी, मुंबई :महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग.

४४. बाबर सरोजिनी (१९५७) : मराठी लोककथा, पुणे : पुणे विद्यापीठ.

४५. बारान्निकोव प. स. (१९६०) : सोव्हिएत संघातील लोककथा, अनुवाद : वा. रा. गाणार 'रव', नागपूर : विश्वभारती प्रकाशन.
४६. भागवत दुर्गा (१९७६) : बंगालच्या लोककथा, पुणे : वरदा बुक्स.
४७. भागवत दुर्गा (१९९०): बालजातक, पुणे : वरदा
४८. भागवत लीलावती (१९९५) : मराठी बालसाहित्य ; प्रवाह आणि स्वरूप, पुणे : नवीन उद्योग.
४९. महाजन आबा गोविंद (२०१६): शेखचिल्लीची फुल्ल २ धमाल पुणे : मधुराज पब्लिकेशन्स.
५०. महाबळेश्वर पुष्पा (१९८३) : बालभक्त ध्रुव, पुणे : इंद्रायणी साहित्य.
५१. मालशे स. गं. ( ) : चतुराईच्या गोष्टी, पुणे : ज्योत्स्ना प्रकाशन.
५२. मंगळवेढेकर राजा (१९९९) देशोदशीच्या कथा,पुणे : मधुराज पब्लिकेशनस, दु. आ.
५३. राठवा चामुलाल (२००१) : देहवाली साहित्य, दिल्ली : साहित्य अकादेमी.
५४. राठोड देवीचरण (१९९९) : देशविदेशच्या कहाण्या, दिल्ली : माहिती आणि प्रसारण मंत्रालय.
५५. रॉयचौधरी उपेंद्रकिशोर (२००२) : ट्णटुणीच्या गोष्टी अनुवाद – निलिमा भावे, दिल्ली : साहित्य अकादेमी.
५६. रॉयचौधरी रॉबीन (२००३) : निकोबारच्या लोककथा, अनुवाद : अशोक बेंडखळे, दिल्ली : साहित्य अकादेमी
५७. रांगणेकर कुमुदिनी (१९८२) : मुलांचं पंचतंत्र, दिल्ली : माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार
५८. रेगे पंढरिनाथ (१९७५) : काश्मिरच्या लोककथा, मुंबई : सुमित्र.
५९. वरखेडे मंगला (२०१६) : ब्रेन टॉनिक : बालसाहित्य चर्चा विशेषांक, नाशिक.
६०. वाकोडे मधुकर (संपा.) ( १९९२) : मराठी लोककथा, दिल्ली :साहित्य अकादेमी.

६१. वैद्य गजानन महादेव (१९४३) : महाभार्तातील सोप्या गोष्टी, मुंबई : के. भि. ढवळे प्र.
६२. शाह सुलभा (२००१) : मराठी बालवाड्मय : स्वरूप आणि अपेक्षा, धुळे : लीलावती प्रकाशन.
६३. शेंडे ना. रा. (१९६४) : लोकसाहित्यसंपदा, नागपूर : विदर्भ साहित्य संघ.
६४. सराफ मनोहर (२००४) :देशोदेशीच्या लोककथा , पुणे : महाजन ब्रदर्स.
६५. स्मेल्स जॉन इ. (२०१४) : उत्तर ध्रुवाजवळील अलास्कन लोककथा, अनुवाद : उषा प्रभुणे, अरुण प्रभुणे.
a. पुणे :पद्मगंधा प्रकाशन.
६६. --------- (१९५९) : सुबोध गोष्टी, पुणे : चित्रशाळा प्रकाशन, ७ वी आ.
६७. ---------- ( ) : कथासौरभ. (प्रकाशन संदर्भ उपलब्ध नाही)
६८. पाठ्यपुस्तके व इतर संदर्भसाहित्य :
६९. वाचनपाठमाला , संपा. मे. कॅंडी, पाठशाळा प्र. १८५०,१८५५
७०. शाळांतील मुलांकरिता पुस्तक १ ते ६ , मुंबई : सरकारी विद्याखाते, १९०६
७१. मराठी वाचनपुस्तक १ ते ४, मुंबई : मॅकमिलन आणि कं.
७२. मन्वंतर वाचनमाला, पु. ५ वे, संपा. बाबूराव गणपतराव जगताप, १९४७.
७३. बालभारती, पु. ७ वे, १९७१.
७४. बालभारती, पु. २ रे, १९७९
७५. बालभारती, मराठी पुस्तक १ ते ७ , महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ. पुणे, १९८३.
७६. बालसुधा,पुस्तक २ रे, पु. ३ रे, पु. ४ थे , ५ वे , पु. ७ वे , कर्नाटक सरकार, १९७७.
७७. सुबोध वाचन, पु. ६ वे, कर्नाटक सरकार, १९७७
७८. साहित्यसुधा, इ. ७ वी, कर्नाटक सरकार, १९७९.
७९. नवयुग वाचनमाला. पुस्तक १ ते ४ , संपा. प्र. के. अत्रे, वि. द. घाटे, मुंबई : कर्नाटक प्र. १९३७

८०. लोकसाहित्य, पुस्तक १ ते ३ : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००२.

८१. ब्रेन टॉनिक मासिकाचे वर्ष १ ते ११ च्या विविध अंकात प्रसिद्ध झालेल्या कथा.

मुलांना गोष्ट ऐकायला आवडते, गोष्टीतल्या कल्पित आणि अद्‌भुतरम्य सृष्टीत ते रमतात. फार पूर्वीपासून लोककथांच्या माध्यमांतूनच मुलांचे भावनिक, बौद्धिक व सामाजिक पोषण होत आले आहे. मराठी कुटुंबात मुलांना घास भरवतांना आईने गोष्ट सांगण्याची प्रथा होती. 'एक घास चिऊचा, एक घास काऊ'चा करीत पुढे सरकणारी 'कावळ्या-चिमण्याची गोष्ट' ही या अर्थाने मराठीतीली पहिली बालकथा म्हणायला हवी. मराठीतल्याच नव्हे तर जगभरातल्या अशा काही निवडक कथांचा खजिना 'गोष्टींच्या गुहेत' या पुस्तकांतून आपल्याला उपलब्ध करून दिला आहे. अलिबाबाच्या गुहेची तिळा उघडल्यावर जसा सोन्यानाण्यांचा, हिऱ्या-मोत्यांचा खजिना हाती लागतो, तसाच गोष्टींचा खजिना या पुस्तकातून बालवाचकांना सापडेल. या लोककथांमध्ये जंगले आहेत, गुहा आहेत, सापळे आहेत, किल्ले आहेत, पऱ्या आहेत, भुते, राक्षस आणि चेटकिणी आहेत. बुद्धीला ताण देणारी कोडी आहेत, मनाला रिझवणारा कल्पनाविलास आहे; त्यातून आपले मनोरंजनही होईल आणि जीवनबोधही होईल, अशी अपेक्षा आहे.

**मंगला वरखेडे**

मराठी विषयात एम.ए., बी.एड., पीएच्.डी. शालेय पातळीपासून पदव्युत्तर पातळीपर्यंत मराठीचे अध्यापन. बालसाहित्य व स्त्री साहित्याच्या अभ्यासक. मुलांसाठी 'ब्रेन टॉनिक' या मराठी-इंग्रजी द्वैभाषिक नियतकालिकाचे बारा वर्षे संपादन. 'क्रिटिकल एन्क्वायरी' या संशोधन पत्रिकेचे सात वर्षे संपादन. 'स्त्रियांची नवकथा : नवी दृष्टी, नवी शैली', 'प्रकल्प अभ्यास पद्धती' इत्यादी पुस्तके प्रकाशित. 'अक्षरबालवाङ्मय' प्रकल्पाच्या समन्वयक.